Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
CNo - 3749
0155mN
G6.2
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सत्यकथा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

0155mN
G6.2

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
Acc. No. 3749

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

' हिज मास्टर्स व्हॉईस "

जुलै महिन्याचे कांहीं निवडक रेकॉर्डस्
ऐकण्यास विसरूं नका !

महाराष्ट्राचा एकमेव महात्मा

" सर्वाभूती वासुदेव " ही ग्वाही देणारा दरिद्री

नारायणांचा सम्राट

भक्त तुकाराम

रेकॉर्ड नं. 5159--5161

भक्तिरसानें ओथंबलेले तीन रेकॉर्डस्चें

ध्वनि-नाटक

मंबाजीची उपरति; रामेश्वरशास्त्र्यांची शरणांगति, शिव-छत्रपतींवर छापा, भक्ताघरचा चमत्कार वगैरे रोमांचकारी प्रसंग, वारकरी अभंग, छाप्याची चकमक, जिवंत स्वरूपांत प्रत्यक्ष ऐका.

महाराष्ट्रांत सर्वत्र लोकप्रिय झालेले

दुसरें ध्वनि–नाटक

सिंहगड

रेकॉर्ड नंबर 5133–5135

वाणकोटी बोलीची तुम्हांला ओळख आहे ना ?

रुसलेली नवराबायको, शास्त्रीबुवांची त्रेधातिरपिट दाखविणारे

– घरगुति त्रिकुट –

रेकॉर्ड नंबर N. 5142

आणि तुमची आवडती लाडकी

– कोंकणची नवरी –

रेकॉर्ड नंबर N. 5124

एवढें ऐकून झाल्यावर

– सकाळचा अभ्यास –

रेकॉर्ड नंबर N. 5125–5126

सुरू करा.

या शिवाय जुलै महिन्यांत निघालेल्या आमच्या दुसऱ्या रेकॉर्डसूच्या संपूर्ण गायनाच्या कॅटलॉगकरितां आम्हांस किंवा आमच्या ऑथराइज्ड डीलरला लिहिल्यास फुकट मिळेल.

हिज मास्टर्स व्हॉईस, २८ रामपार्ट रो, कोट, मुंबई.

" हिज मास्टर्स व्हॉईस "चा अस्सल व नवीन माल फक्त आमच्या ऑथराईज्ड व्यापाऱ्यांजवळ मिळेल.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संपादक—द. श. कुलकर्णी.

सत्यकथा

या अंकांत प्रसिद्ध झालेल्या कथा सत्यावर आधारलेल्या असल्या तरी त्यांतील नावें व स्थळें काल्पनिक आहेत—

जुलै १९३६

: अनुक्रमणिका :

	लेखक	पृष्ठ
१	संपादकीय	३
२	माझ्या विवाहानंतर—डॉ. केतकर	४—५
३	निसरगांठ—श्री. भा. वि. वरेरकर	८—११
४	सौंदर्य आणि प्रेम—श्री. अधिकारी	१२–१४
५	मूळ स्वभाव जाईना—श्री. अळेकर	१५-१६
६	आकर्षण—श्री. माडखोलकर	१७–१९
७	भैरवी—श्री. सरपोतदार	२०–२५
८	गाढवाचा गोंधळ—श्री. भावे	२६–२८
९	नेत्राचा आनंद—श्री. टिपणीस	२९–३१
१०	भाळीं चंद्र असे धरिला—सरस्वती कुमार ...	३३–३४
११	दयेचे दूत—श्री. गाडगीळ	३५-३७
१२	खुनी माता—श्री. शिरवाडकर	३८-
१३	सत्यकथा—श्री. व. र. ठकार	३९–४०
१४	सत्-सन्तान—सरस्वती-कुमार	४१–४८
१५	केलं तुला न् झालं मला - श्री. भोपटकर ...	४९–५१
१६	तरी सांगत नव्हतो—कवठेकर	५३–५४
१७	मोत्याला गोळी घातली—ना. वि. कुळकर्णी ...	५५–५८
१८	दोन तलवारी—प्र. तु. दिवे	५९–६०
१९	पतिता कीं पतिव्रता—सौ. कृष्णाबाई मुळे ...	६१–६२
२०	घरांत नाहीं म्हणून सांग—माधवराव बागल ...	६३–६४

मालक व प्रकाशकः—
मौज प्रिन्टिंग ब्यूरो,
खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४.

किंमत ४ आणे

पुंडलीक

पारिजात पिक्चर

मुंबईमध्यें

लवकरच दाखल होणार

पॉप्युलर पिक्चर्स .... दादर, मुंबई नं. १४

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



मानवी जीवितांतील अद्‌भुतरम्य घटनांवर आधारलेल्या सत्यकथा देणारें मराठींतील एकटेंच मासिक

— जुलै १९३६ —

वर्ष दुसरें : : अंक ५ वा.

प्रत्येक अंकांत नवीन कांहीं तरी द्यावयाचे अशी प्रथा ‘ **सत्यकथे** ’नें पाडली आहे. त्यास अनुसरुन या अंकांत डॉ. श्रीधर वेंकटेश केतकर यांचा लेख प्रसिद्ध होत आहे. मराठी भाषा जिवंत असेपर्यंत ज्या विद्वानांची नांवें घेतली जातील त्यांत डॉ. केतकर यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला जाईल यांत शंका नाहीं. ‘ **सत्यकथे**’च्या अगदीं पहिल्या अंकांतच डॉक्टरसाहेबांनीं आपले वैवाहिक अनुभव सांगितले होते. त्या नंतर आजच्या अंकांत त्यांनीं दिलेल्या विस्तृत लेखांत भिन्न धर्मीय विवाहांबद्दल दिलेली माहिती विचक्षण व जिज्ञासू वाचकांना सारखीच मनोरंजक वाटेल. डॉक्टर मजकुरांना जीवनाचा बहुविध [Kaleidoscopic] अनुभव आहे. ‘ **सत्यकथे**’च्या वाचकांना ते आपल्या रंगीत दुर्बिणीतून जीं अनेक चित्रें दाखविणार आहेत तीं जितकीं हृद्य तितकींच विचारप्रवर्तकहि असतील.

* * * * * * *

या अंकाचा दुसरा उल्लेखनीय विशेष म्हणजे कथांतून दिलेल्या चित्रांत झालेली इष्ट अशी सुधारणा ही होय. ‘ मासिकाचें चित्रीकरण ’ ही आपल्याकडे अगदीं नवीनच गोष्ट असल्यामुळें योग्य अशी चित्रें काढणारे कलावंत मिळणें सामान्यपणें कठीण होते. परंतु या अंकांत आमच्या अनेक आर्टिस्ट मित्रांनीं गोष्टींत घालण्यासाठीं विशेष परिश्रमपूर्वक चित्रें काढिली याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोंत.

* * * * * * *

सत्यकथेचे एक लेखक व माझे मित्र श्री. सरस्वतीकुमार यांची ‘ सत् संतान ’ ही कादंबरी वाचकांना फारच आवडली असल्याचें माझ्या निदर्शनास आले आहे. पुढील प्रकरणांत काय येतें याबद्दल वाचकांना चटका लागून राहिलेला असतो. श्री. सरस्वतीकुमार यांची ही पाहिलीच सामाजिक कादंबरी लोकप्रिय होण्याची स्पष्ट चिन्हें दिसत असल्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों. वाचकांच्या विनंतीवरून यापुढील प्रत्येक अंकातून तिची तीन प्रकरणें देण्यांत येणार आहेत.

* * * * * * *

या सर्व सुधारणा करणें हे वाचकांच्या वाढत्या आश्रयावरच शक्य झाले आहे. कथावाङ्मय देणारे मराठींतील पहिल्या प्रतीचें व एकच मासिक हा दर्जाहि वाचकांच्या वाढत्या कृपेचेंच निदर्शक आहे व त्याबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो.

—द. शं. कुळकर्णी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माझ्या विवाहानंतर—

डॉ. श्री. वें. केतकर, एम्. ए., पी. एच. डी.,

माझें लग्न होण्यापूर्वी मला अनेक लोकांनीं अनेक प्रकारचा सल्ला दिला व कित्येक जणांनीं तो न मागतां दिला. कै. बंडोपंत भाजेकर आह्मी 'शीख' व्हावें आणि 'आनंद' पद्धतीनें विवाह करावा, असें सांगत होते. लोकमान्य टिळकांचें मत असें होतें, कीं आम्ही आर्य समाजी व्हावें; कारण त्या समाजाच्या पाठीमागें बराच लोकसमाज आहे. तथापि तो सल्ला मीं स्वीकारला नाहीं. लग्नापूर्वीं माझ्या भावी पत्नीस 'व्रात्यस्तोम' विधि करून मीं हिंदुसमाजांत स्थान दिलें. तथापि त्यानंतर देखील हिंदु-मिशनरीच्या संपादकांनीं असें मत व्यक्त केलें होतें, कीं आम्हीं प्रथम रजिस्टर लग्न लावावें आणि दोघांनीं मागाहून त्या सोसायटीच्या मार्फत हिंदु व्हावें. तथापि मला कोणतीहि गोष्ट पसंत नव्हती. मला माझें कृत्य जुन्या आधारावरच करावयाचें होतें. जुनें जितकें तितकें चांगलें, हें खरें, तरी देखील माझें करणें पुष्कळांस आवडलें नाहीं. जुनें ठाऊक नसल्यामुळें जे नवे प्रकार सुरू झाले, त्या प्रकारांच्या अभिमानी मंडळीस आपला प्रकार चालू रहाण्याबद्दल फिकीर होती. आम्हीं जुना विधि शोधून काढल्याबद्दल गजानन भास्करांसहि राग येत होता. आमच्या व्रात्यस्तोम विधीबद्दल अत्यंत आक्षेपयुक्तता जर कोणास वाटली असेल, तर ती हिंदु-मिशनरी पत्राचे संपादक यांसच होय. प्रत्येकाचा प्रयत्न, आम्हीं त्यांच्या पद्धतीचें अवलंबन करावें, असा होता. सुधारक म्हणविणारा वर्ग अर्थात् सिव्हिल मॅरेजचा आग्रही होता; आणि 'हिंदु' होण्यांत मिस कोहन (मिसेस केतकर) यांनीं मोठी चूक केली, असें दाखविण्याकडे त्या वर्गाची प्रवृत्ति होती. मासिक मनोरंजनादि "सुधारक" पक्षीय पत्रांनीं तसें विधानहि केलें. ख्रिस्ती मंडळींपैकीं कांहींची आक्षेपवृत्ति या वेळेस व्यक्त झाली. पुण्यांतील एका ख्रिस्ती मास्तरणीनें व्रात्यस्तोमानंतर शीलवतीबाईस येऊन रोज उपदेश करावा, कीं डॉ. केतकर यांचें जर तुमच्यावर प्रेम असेल, तर त्यांनीं ज्यू किंवा ख्रिस्ती व्हावें, असा आग्रह तुम्ही धरा. तुमच्यासाठीं जर ते ज्यू व्हावयास तयार नाहींत, तर तुम्ही तरी कां हिंदु व्हावें ? अर्थात हा उपदेश फलद्रूप झाला नाहीं. याचें कारण असें होतें, कीं शीलवतीबाईचा व माझा दोघांचाहि ईश्वरविषयक मतावर विश्वास नव्हता. आणि "हिंदु" हें विशिष्ट मत नसून केवळ विशिष्ट संस्कृतीचा समाज आहे, ही गोष्टहि शीलवतीस चांगली समजली होती. ही गोष्ट पुष्कळ लोकांस समजत नव्हती हें मात्र खरें. तुळशीची पूजा करता का ? करीत नसाल, तर तुम्ही हिंदु कशा ! असे आक्षेपहि अनेकांनीं शीलवतीच्यापुढें व्यक्त केले.

व्रात्यस्तोम विधि २१ मार्च १९२० रोजीं झाला, १ एप्रिल रोजीं वाङ्‌निश्चय जाहीर केला, आणि १४ मे रोजीं आमचें लग्न झालें. लग्नाला सेनापति बापट आणि विनायकराव भुस्कुटे यांनीं उपाध्येपण केलें. १ एप्रिल रोजीं वाङ्‌निश्चयानंतर फोटो काढून घेतला.

व्रात्यस्तोम विधीची कल्पना पुष्कळांस समजली नाहीं. "शुद्धीकरणा" च्या विधीमध्यें नवीन येणारा मनुष्य अशुद्ध आहे, ही कल्पना असते. वैद्यांनीं "हिंदूकरण" हें नांव आपल्या विधीस दिलें. पण हें नांव देखील शास्त्रशुद्ध नाहीं. शास्त्रीय संज्ञांचें विवेचन येथें अप्रस्तुत आहे. येथें एवढेंच सांगावयाचें, कीं जुन्या विधीपेक्षां नवीन विधीच्या कल्पनेंत अधिक श्रेयस्करता नाहीं. व्रात्यस्तोमाची कल्पना नवीन सर्व विधींपेक्षां अत्यंत हृदयंगम आहे; आणि भारतीय संस्कृतीच्या जागतिक विकासाच्या कालांतच व्रात्यस्तोम कल्पना निघाली असल्यामुळें, हा विधि एकंदर समाजाच्या ठेवणीशीं जास्त सुसंगत आहे. वैदिक समाजांत ज्याला स्थान नाहीं तो व्रात्य हे व्रात्य म्हणजे हिंदुसमाजाच्या बाहेरचे लोक, यांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इत्यादि सर्व वर्णांचे असतात, ही गोष्ट वैदिकांस मान्य होती. या बाह्यांचा, स्वसमाजांत स्वीकार, करण्याची कल्पनाहि त्यांस मान्य होती व यासाठीं त्यांनीं ज्या विधीची योजना केली, तो विधि—केवळ सत्काराचा आहे, यांत नवीन मत घेणें नाहीं, जुनें सोडून देणें नाहीं, पश्चात्ताप नाहीं; शुद्धीकरण नाहीं, नवीन येणाऱ्यावर लादलेली गोष्ट म्हणजे फक्त कपडे बदलण्याची आहे ज्या नवीनानें आमच्यांत येऊन रहावयाचें त्यानें

नवपरिणित डॉ. व सौ. शीलवती केतकर

फक्त कपडे बदलून आमच्यासारखा पोषाख करावयाचा, आणि जुने कपडे व्रात्यांना देऊन टाकावयाचे, एवढीच क्रिया व्रात्यावर बसविली आहे. आपले जुने देव फेंकून देण्याची जबाबदारी त्याजवर नाहीं. व्रात्यांचा स्तोम म्हणजे व्रात्याची स्तुति. वात्य म्हणजे कोणी वाईट नाहीं तोहि ब्रम्ह आहे. असें व्रात्यस्तोमाच्या मंत्रांत उपदेशिलें आहे, आणि व्रात्याचा जो सत्कार करील, त्याला यज्ञ केल्याचें पुण्य लागेल, असेंहि सांगितलें आहे. जो आपल्या जवळचा त्याचा सत्कार केल्यास पुण्य कमी, जो बाहेरचा त्याचा सत्कार केल्यास पुण्य अधिक, ही व्रात्यस्तोमाची आधारभूत कल्पना अत्यंत हृदयंगम आहे. या विधीला "कन्व्हरशन" म्हणतांच येणार नाहीं. यासाठींच प्रो. वेबर यांनीं याला हिंदुसमाजाचें सदस्यत्व (सिटिझनशिप) देणारा विधि, असें नांव दिलें आहे. सांगावयाचें एवढेंच; कीं अन्य जनांचा स्वीकार करण्याची प्राचीन कल्पनाच अत्यंत उज्वल आहे; आणि यांतच हिंदूंचें औदार्ययुक्त वैशिष्ट्य आहे. येथें हेंहि सांगितलें पाहिजे; कीं व्रात्यस्तोमावर जें वेबरनें व इतर जर्मन ग्रंथकारांनीं लिहिलें, त्याचें भाषांतर मिस कोहन यांनींच व्रात्यस्तोमापूर्वीं माझ्यासाठीं केलें होतें.

माझ्या करण्याचें रहस्य बिचाऱ्या काशिनाथ पंत मित्रांना न समजल्यामुळें त्यांनीं 'सुधारक करतात तेंच करून जुनेपणाचा चिखल उडविला' अशा तऱ्हेची माझ्या लग्नावर "मनोरंजनांत" टीका केली आहे.

मनोरंजनादि सुधारकपक्षीय मासिकें व पत्रें असा आणखी आक्षेप घेतीं झालीं, कीं हिंदु होण्यांत शीलवतीबाईनींच चूक केली. ती ही, कीं हिंदुसमाजांत अनेकपत्नीपद्धति रूढ आहे आणि त्यास हिंदु कायद्याची परवानगी आहे. तर त्यांनीं हिंदु होण्यांत आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे, मागें उल्लेखिलेल्या ख्रिस्ती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मास्तरणीनें देखील हीच गोष्ट माझ्या भावी पत्नीच्या नजरेस आणिली; आणि मला पहिली बायको आहे, अशी देखील " लोक वार्ता " कळविली. लोकवार्तेचें निराकरण संकल्पित पत्नीनें करून घेतलें. तथापि हिंदु धर्माच्या अनेक क्रिया करण्याच्या बाबतींतल्या परवानगीसंबंधानें त्या ख्रिस्ती सुशिक्षितेस उत्तर दिलें, कीं कीं " यहुदी धर्माप्रमाणें देखील अनेक क्रिया करण्यास धर्मशास्त्राची हरकत नाहीं. हिंदुधर्माप्रमाणें अनेक, क्रिया करण्याची सवलत पुरुषांस आहे, तशी यहुद्यांसहि आहे."

" हिंदु होऊन लग्न करण्यामध्यें शीलवतीबाईनीं मोठी चूक केली. " असें म्हणणाऱ्या मंडळींचीं लग्नें मात्र हिंदु पद्धतीनेंच झालीं होतीं व ते आपल्या मुलींचीं लग्नें देखील हिंदु पद्धतीनेंच करीत होते. त्यांना फक्त मिस कोहन यांच्याच हिताची फिकीर पडली होती ! ! यावरून मी एवढेंच समजतों, कीं त्यांचा खरोखर हिंदु कायदेपद्धतीला आक्षेप नव्हता, पण नवीन गोष्ट करणारानें जी गोष्ट करावयाची, ती करतांना आपल्या संप्रदायांतील मंडळीनें जो प्रचार उत्पन्न केला तो स्वीकारला नाहीं याबद्दलच त्यांचा आक्षेप होता. म्हणजे ही केवळ परमतासहिष्णुता होती. असो.

आमचें लग्न झाल्यानंतरच नव्हे तर व्रात्यस्तोमानंतरहि बरीच मंडळी आमच्या या नवीन उपक्रमास सहानुभूति दर्शविली झाली. पाश्चात्यवधूपरिणीतांस या नवीन विधीचें महत्व कसें वाटलें, हें दाखविणारी एक गोष्ट पुढें दिलीच आहे. नवीन सर्व गोष्टी करावयासाठीं स्वकीय कायदेपद्धतीचेंच विस्तरण करणें अवश्य आहे व त्यानेंच समाजांत खरीखुरी कायमची सुधारणा होते, असें माझें मत आहे व तें पाश्चात्य वधुपरिणीतांपैकीं पुष्कळांस मान्य होऊं लागलें. स्वकीय धर्मशास्त्रांतच सर्व नवीन व्यवहारासाठीं शास्त्रार्थ काढण्यानें स्वकीय धर्मशास्त्राचें विस्तरण आणि संरक्षण होतें, ही गोष्ट ज्यांस समजत नव्हती, त्यांना माझ्या या करण्याचा अर्थच समजेना. आमचें लग्न रजिस्टर झालेलें नाहीं. तें तें जुन्या प्रकारचें हिंदु लग्न--आहे, तें मला त्या वेळेस आग्रहानें मांडावयाचें असल्यामुळें मीं रजिस्ट्रारमार्फत लग्न करण्याचें स्वीकारिलें नाहीं. दुसरी एक गोष्ट म्हटली, म्हणजे मला ब्राह्मणी अधिकारावर धोंडा पाडावयाचा नव्हता. त्या कालांत लग्नाचे रेजिस्ट्रार कोण असणार ? बहुतेक जिल्ह्यांत कलेक्टर व डिस्ट्रिक्ट रेजिस्ट्रार यूरोपियनच असत. ब्राह्मणाचे अधिकार इंग्रजाला जाऊं देणें याला माझा अत्यंत आक्षेप असे. जों पर्यंत आपल्यावर परराज्य आहे, तोंपर्यंत संस्थांचा म्हणजे शास-संस्थांचा अधिकार अत्यंत नियमित ठेवावा, आणि धार्मिक संस्थेचाच अधिकार मान्य करावा अशी माझी वृत्ति होती. धार्मिक संस्था म्हणजे प्राचीन नियमावलि प्रचारांत ठेवणारी संस्था, एवढ्याच अर्थानें धार्मिक अधिकार मी मान्य करतों. देवविषयक विशिष्ट मत घेण्याची जबाबदारी हिंदूंवर मुळींच नाहीं. त्यामुळें प्राचीन देवतांवर जरी माझा विश्वास नसला, तरी प्राचीन धार्मिक विधींना माझा मुळींच आक्षेप नाहीं. धार्मिक विधींत प्राचीन काळच्या देवविषयक कल्पना व्यक्त झाल्या आहेत, पण त्या घेण्याबद्दल आग्रह कोणाचाच नाहीं; आणि त्यामुळें जुन्या धार्मिक विधींचा स्वीकार करण्यास माझी मनोदेवता मला मुळींच आडवी येत नाहीं. ईश्वराच्या शरीराची भाषा सर्व बायबलभर पसरली आहे, तरी देखील—निराकार ईश्वर मानणाऱ्या ख्रिस्ती लोकांस ती भाषा वापरण्यांत आपण कांहीं गैर करतों, असें वाटत नाहीं, त्याप्रमाणेंच माझीहि गोष्ट आहे, असो.

लग्नानंतर कांहीं दिवसांनीं पाश्चात्यवधूपरिणीत अनेक मंडळीशीं माझा संबंध आला. त्यांत मुंबईचे डॉ. परूळकर, पंजाबचे मि. दिवाण चमनलाल, डॉ. रॉले इत्यादि मंडळींचा उल्लेख करतां येईल. या मंडळीकडे आमचें जाणें-येणें असे. रॉले व चमनलाल यांच्या स्त्रिया पुण्यासच कांहीं दिवस येऊन राहिल्या होत्या. दुसरीहि कांहीं अशा प्रकारची कुटुंबें पुण्यास आलीं म्हणजे भेटून जात असत, आणि अशी मंडळी जमली म्हणजे कांहीं विशिष्ट सामाजिक प्रश्न चर्चेस निघत असत.

पाश्चात्यवधूपरिणीत वर्ग आणि त्या समाजांतर्गत भावना

पाश्चात्य वधू करणाऱ्यांच्या समाजामध्यें कोणते सामाजिक प्रश्न उत्पन्न होतात, त्यांच्यामध्यें कोणत्या विषयांची चर्चा चालते, यांविषयीं बऱ्याच लोकांना कुतुहल असेल. या माहितीचें महत्व सामान्य कुतुहलपूर्णतेपेक्षा अधिक आहे. सामाजिक व्यवहारनीति ठरवितांना निरनिराळ्या सामाजिक वर्गामध्यें जागृत असलेल्या किंवा होऊं घातलेल्या भावनांचे ज्ञान लोकांस पाहिजे. हिंदु समाजापुढें जर क्षेत्रवर्धनाचें ध्येय असेल तर या प्रकारच्या समाजाची माहिती हिंदूंस अधिकाधिक हवी. आज हिंदु व युरोपियनांचे लग्न व्यवहार होतात त्याप्रमाणें जुन्या काळांत मुसलमान स्त्रियांशीं लग्न व्यवहार होत. आणि त्याचे परिणाम निरनिराळ्या व्यक्तींच्या बाबतींत भिन्न झाले आहेत. आतां युरोपीय स्त्रिया करणाऱ्या हिंदु समाजाचें पुढें काय होईल हा प्रश्न पुष्कळदां चमनलाल वगैरे मंडळी जमली असतां विचारास निघे. भवितव्यासंबंधीं मतभेद होई. तथापि हा समाज युरेशियन समजला जाऊं नये. ही इच्छा सर्वांचीं दिसे. हिंदू स्त्रियांनीं मुसलमान नवरा केला तर त्यांनीं मुसलमान व्हावें हें जसें ठरलेलें आहे त्याप्रमाणें हिंदूनें मुसलमान स्त्री केली तरी हिंदूनेंच मुसलमान व्हावे हेंहि ठरलेंच आहे. पण आपलें भवितव्य निराळें होईल, आपला समाज युरेशियन लोकांत समाविष्ट होण्याचें कारण नाहीं, असें सर्व म्हणत. कारण मागील काळांत देखील मुसलमान स्त्रिया करून देखील हिंदु रहाणारे लोक होतेच. अनेक हिंदूंनीं मुसलमान न होतां हिंदून राहिल्यामुळें त्यांना हिंदूंकडूनही सामाजिक छळ सोसावा लागला असें झालें आहे, तरी त्यालाहि अपवाद आहेतच. माझ्या लग्नापूर्वींच या सर्व गोष्टींचा मी विचार केला होता आणि त्या प्रश्नाच्या अनेक बाजू मी आपल्या भावी पत्नीस समजावून दिल्या होत्या. वस्तुस्थितीविषयीं स्त्रीस अज्ञानांत ठेवून तिला विवाहबद्ध करावें ही क्रिया मला नको होती जी सामाजिक माहिती मी आपल्या भावी पत्नीस सांगितली ती डॉ. रॉले व चमनलाल यांस सांगितली. ती सर्व लोकांस परिचित असलेली बरी.

जेव्हां हिंदूंनीं मोठ्या प्रमाणावर मुसलमान स्त्रिया, लढाईंत पाडाव करून विवाहबद्ध करून घेतल्या तेव्हां त्यांचा सामाजिक छळ झालेला नाहीं. ही कथा "चचनामा " या सिंधु देशाच्या इतिहासांत सविस्तर वर्णिली आहे आणि ती अनेकदां वर्तमानपत्रांतून मांडली गेली आहे. तिची पुनरुक्ति येथें करणें अवश्य नाहीं. मुसलमान स्त्रियांशीं संबंध ठेवून आपलें ब्राह्मण्य कायम राखण्यासाठीं ज्यांनीं प्रयत्न केले अशामध्यें तीन व्यक्ति उल्लेखनीय आहेत, त्या म्हटल्या म्हणजे जगन्नाथ पंडित, लोलिंबराज आणि बाजीराव. या तीन व्यक्तीपैकीं पहिली व्यक्ति संस्कृत कवित्वाबद्दल सुप्रसिद्ध आहे. त्याचा यवनस्त्रीशीं झालेल्या संबंधामुळें उत्पन्न झालेला काव्यग्रंथ भामिनी विलास आज सुप्रसिद्ध आहे.

तथापि हें मात्र सांगितलें पाहिजे कीं, जगन्नाथ पंडितासंबंधानें प्रचलित असलेली कथा जशीच्या तशीच ग्रहण करावयास मी तयार नाहीं. ज्या भामिनीविषयीं त्यानें विलाप केला ती भामिनी मुसलमान असावी असें खात्रीपूर्वक मला वाटत नाहीं. तर त्याची भामिनी हिंदूच असावी आणि लवंगीस पत्करणाऱ्या दुसऱ्या कोणातरी जगन्नाथ कवीविषयीं उत्पन्न झालेली कथा भामिनी विलासाच्या कर्त्याला चिकटली असावी असा संशय वाटतो. कारण जगन्नाथ पंडितानें करुण विलासांत ज्या स्त्रीविषयीं शोक केला ती मुसलमान नसावी; असें विवाह वर्णनाच्या उल्लेखावरून वाटतें. त्याच्या भामिनीचें लग्न हिंदुपद्धतीनें झालें असावें. याला ज्या ओळी प्रमाण आहेत त्या करुण विलासांतच आहेत. त्यांचें भाषांतर कृष्णशास्त्री चिपळुणकरांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे.

पड.य.च्या भीतीस्तव मम
करातें धरूनिया
िवाहीं पाषाणीं चढविस सये
तूं जपुनिया।

असा हिंदुविवाह विधीचा स्पष्ट उल्लेख आहे. त्याचें यवन कन्येशीं लग्न झालें असतें. तर तें वैदिक विधीनें झालें असतें असें वाटत नाहीं आणि तसें झालें असले तर ब्राम्हणांनीं त्यास बहिष्कार घातल्याची कथाय संशयास्पद होतें. प्रत्यक्ष भामिनी विलासांत त्याच्या स्त्रीच्या यवनत्वाचा कोठें उल्लेख आढळला नाहीं.

यवनी नवनीतकोमलांगी
शयनीये यदि नीयते कदाचित्

हा उल्लेख भामिनीविलासाच्या बाहेरचा आहे. जगन्नाथराय हा दिल्लीपतीचा आवडता होता. ही गोष्ट लवंगीप्रशस्तीच्या श्लोकांत आहे आणि भामिनीविलासांत दिल्लीपतीचा उल्लेख आहे. यामुळें दोघांचें एकीकरण झालें असावें. ते उल्लेख येणेंप्रमाणें आहेत.

दिल्लीवल्लभपाणिपल्लवतलें
नीतं नवीनं ती वयः

ही ओळ भामिनी विलासात आहे तर लवंगी प्रशस्तीच्या श्लोकांत

दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा। मनोरथान्
पूरयितुं समर्थः।

हा श्लोक आहे.

यवन स्त्रीचें पाणिग्रहण करण्याची क्रिया केवळ संस्कृत कवींकडून झाली आहे असें नाहीं तर प्राकृत कवींकडूनहि झाली आहे. महाराष्ट्रांतील आणि महाराष्ट्रीय ग्रंथकारांतील असलें उदाहरण म्हणजे लोलिंबराजाचें होय. या लोलिंब राजाविषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. त्याची प्रिया कोणी तरी " रत्नकला " नांवाची होती आणि तो यवनी होता अशी आख्यायिका रा. भावे यांनीं महाराष्ट्र सारस्वतांत दिली आहे आणि रत्नकलेविषयीं एक श्लोकीह दिला आहे.

हें रत्नकलेवरील काव्य भावे यांनीं फाजील सोंवळेपणामुळें प्रसिद्ध केलें नाहीं असें दिसतें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तें प्रसिद्ध झालें नाहीं व आतां नष्ट झालें असल्यास ती वाङ्मयाची मोठी हानि झाली.

रत्नकलेचा संबंध लोलिंबराजाशीं कोणत्या प्रकारचा होता हें पूर्णपणें ठाऊक नाहीं. जरी मुसलमान स्त्रीशीं संबंध ठेऊन तिला "रत्नकला" असें संस्कृत नांव दिलें असलें तरी तो विवाह संबंध झाला होता काय की केवळ वामसंबंध होता. विवाह झाला असल्यास कोणत्या पद्धतीनें झाला होता, वगैरे माहिती आपणांस उपलब्ध नाहीं. जगन्नाथ आणि लोलिंबराज यांच्या अपत्यां विषयीं आणि त्यांच्या सामाजिक स्थानाविषयीं तर आपणांस कांहींच माहिती नाहीं.

बाजीरावाच्या मस्तानीपासून झालेल्या अपत्यास मुसलमानच व्हावें लागलें ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे

या प्रकारच्या गोष्टींची आम्हामध्यें चर्चा चालत असें आणि जुन्या भारतीय संस्कृतीस चालना देऊन तिला प्रगमनशील स्वरूप द्यावें असा विचार उत्पन्न होई तथापि या समाजाच्या संघटन संबंधानें कांही कृति झाली असें म्हणतां येत नाहीं. भारतीय समाजामध्यें परकीय लोक जिरविण्याच्या बाबतींत कितपत सौकर्य आहे या संबंधानें लोकांत पूर्ण अज्ञान आहे. जरी ब्राह्मणांना त्यांच्या फाजील सोंवळेपणामुळें मुसलमानी स्त्रियांपासून झालेल्या अपत्यांचा स्वजातीयांत किंवा हिंदूंत स्वीकार करतां आला नाहीं तरी तशी गोष्ट ब्राह्मणेतरांच्या बाबतींत दिसत नाहीं. ग्वाल्हेरचे बळवंतराव भय्या शिंदे आणि इंदुरचे यादवराव होळकर हे दोघेहि मुसलमान स्त्रियांपासून झालेले होते यावरून हिंदुस देखील आपलीं मुसलमान स्त्रियांपासून झालेलीं अपत्यें हिंदूंत पचविता येत होती हें स्पष्टच आहे.

येणेंप्रमाणें प्रत्येक भिन्नधर्मीय स्त्रियांशीं संबंध ठेवणारे पुरुष आपापल्या परी हा प्रश्न सोडवीत आहेत. अनेकास जें यश आलें तें ब्राह्मण नसल्यामुळें आलें आहे. जर ब्राह्मणांत प्रवेश गरून घेण्याची इच्छा नसेल तर भिन्न जातीय आणि— भिन्न धर्मीय स्त्रीपासून झालेली प्रजा हिंदू म्हणून राहवयास कोणतीच हरकत नाहीं. वेदोक्त कर्मावर त्यानी हक्क सांगितला नाहीं म्हणजे झालें एवढीच ब्राह्मणांची वृत्ति दिसत आहे. याप्रकारच्या भिन्न प्ररिस्थितीचें कारण काय? ब्राम्हण हे समाज प्रगतीचे विरोधक आहेत काय याविषयीं चमनलाल व रॉले हे ब्राम्हण नसल्यामुळें एक पक्ष घेत तर मी दुसरा पक्ष घेत असें आणि त्यामुळें झालेल्या वादविवादांत कांहीं कल्पना माझ्या मलाच स्पष्ट झाल्या मी त्यास सांगितलें कीं ब्राम्हणेतरांतच समाजविस्तरणक्षमता अगोदर उत्पन्न व्हावी. ही गोष्ट दिसते तितकी आश्चर्यकारक नाहीं. ब्राह्मण म्हणजे धर्मशास्त्राच्या अभ्यासकांशीं अत्यंत सान्निध्यानें वागणारा वर्ग. धर्मशास्त्रकाराची वृत्ति आणि कायदेपंडिताची वृत्ति सारखीच असते. ते नवीन गोष्टीला कधींहि पाठिंबा द्यावयाचे नाहींत. पण नवीन गोष्ट होऊं लागली म्हणजे मात्र ते कायद्याच्या कक्षेंत तो आणूं लागतात. ब्राह्मणेतरांनीं नवीन नवीन प्रचार सुरू केले म्हणजे ते पुराणोक्त धर्माप्रमाणें बरोबर आहेत असें ब्राह्मण सांगूं लागतीलच. पण अशी नवीन गोष्ट करा असें म्हणावयाचे नाहींत. आपण व्यवहारांत वागतांनां हें ब्राम्हण समाजाचें वैशिष्ट्य लक्षांत ठेवावें. ब्राह्मणेतर समाजाला दुसरा एक आधार असतो तो म्हटला म्हणजे त्यांच्याच समाजच्या पंचायतींचा. त्यांच्या समाजाच्या पंचायतीनें ठरविलें म्हणजे ब्राम्हणांचा त्यांना आक्षेप कांहींच नसतो. ज्या समाजांत पंचायत आहे त्यांना जुनीशास्त्रवचनें फारशी बाधक होत नाहींत. ती वचनें पंचायत नसलेल्या ब्राम्हणांसारख्या समाजासच बाधक होतात हेंहि मी त्यांस अनेक उदाहरणें बोलून दाखवीत असें. एवंच आमचा विवाह नेहमींच्या प्रकारापेक्षां जरासा निराळा असल्यामुळें आमच्यापुढें प्रसंगीं भिन्न प्रकारचे कौटुंबिक प्रश्न उपस्थित होत. सध्यां कौटुंबिक भवितव्यासंबंधीं आमच्या घरीं चर्चा चालत नाहीं. याचें कारण आमची कृतक अपत्यें ब्राम्हण आहेत व त्यामुळें मिश्रविवाहित कुटुंबामुळें असलेले प्रश्न आज आमच्यापुढें नाहींत हें होय. आमच्यासारख्या दंपतींत अपत्यांच्या जातीय किंवा कौटुंबिक भवितव्याविषयीं नेहमीं विचार चालणें स्वाभाविक आहे ज्या हिंदू मंडळीचीं लग्नें युरोपियन स्त्रियांशीं झालीं आहेत अशीं कुटुंबें आज हजारांवर आहेत. आणि या सर्वांचें संघीकरण करण्याच्या बाबतींत कांहींतरी प्रयत्न व्हावा अशा तऱ्हेची इच्छा देखील अनेकांकडून व्यक्त झाली आहे, व या प्रकारच्या मंडळीच्या सामाजिक संघटनेमध्यें मी पुढाकार घ्यावा, अशीहि इच्छा पुष्कळांनीं व्यक्त केली. मी पुढाकार घेणें नाकारलें, त्याला अनेक कारणें आहेत. तथापि वर्गसंघटनेच्या क्रियेला मी असंमति दर्शविली नाहीं. तथापि त्या बाजूनें अजून प्रारंभ झालेला नाहीं.

पुण्यांत माझ्यासारखेंच लग्न डॉ. परुळेकरांचें झालें. आणि त्या लग्नाच्यापूर्वी त्यांच्या भावी वधूसाठीं व्रात्यस्तोम करण्यांत आला. आमच्या कुटुंबाच्या लग्नापूर्वी व्रात्यस्तोम झाला तेव्हांपासून बऱ्याच युरोपियन स्त्रियांशीं लग्न करणाऱ्या मंडळीचें या विधीकडे लक्ष ओढलें गेलें आणि आपल्या कुटुंबांत तो विधि व्हावा अशीहि इच्छा अनेकांनीं व्यक्त केली.

मिश्रविवाहित हा शब्द अधिक व्यापक आहे. त्या सर्वांविषयीं मी येथें बोलत नाहीं. "मिश्रविवाहित" हा शब्द हिंदुस्थानांतील दोन भिन्न जातींच्या व्यक्तींनीं विवाह केला तर त्यासही लागूं शकेल. "हिंदी युरोपियन" विवाह करणाऱ्या व्यक्तीसंबंधानें देखील लिहिण्याचा उद्देश प्रस्तुत लेखांत नाहीं. कारण यूरेशियन् लोकांच्या समाजास कारण होणारीं लग्नें देखील हिंदी युरोपियन आहेत. यूरोपियन पुरुष आणि हिंदी स्त्री यांपासून होणारी प्रजा हिंदी पुरुष आणि इंग्रज स्त्री यांपासून होणाऱ्या प्रजेपासून भिन्न धरली जावी आणि यूरोपीयन पुरुषापासून झालेल्या प्रजेबद्दलच आपण किळस बाळगावी अशी वृत्ति इंग्रजांनीं दाखविली आहे. गव्हर्मेंट ऑफ इंडिया आक्ट १९३५ यावर चर्चा होत असतां या भावना लार्ड लाईड यांच्याकडून व्यक्त झाल्या आहेत.

जेथें हिंदी पुरुष आणि पाश्चात्य स्त्रिया यांच्या विवाहामुळें जे समाज उत्पन्न होतो त्या समाजा विषयींच मी येथपर्यंत लिहीत आहे. या समाजांतील आद्य व्यक्तींस मी "पाश्चात्यवधूपरिणीत" हें नांव दुसऱ्या शद्वाच्या अभावीं देतों. तथापि त्यापासून झालेल्या प्रजेला काय नांव द्यावें हें अजून ठरलेलें नाहीं. या प्रकारच्या समाजाच्याविषयीं मला बरेंच सौहृद आहे ही गोष्ट मी मुळींच नाकारीत नाहीं. तथापि या समाजाच्या वैगुण्यासंबंधानें मी कानाडोळा करतो असेंही नाहीं या समाजामध्यें आढळून येणाऱ्या गुणदोषाविषयीं पुढें कधीं तरी लिहीन. एवढें मात्र खास समजावें कीं या समाजांतील व्यक्तीमध्यें आपल्या देशाविषयीं किंवा हिंदुत्वाविषयीं अभिमान नसतो असें कोणी समजूं नये. तर ज्यांचा देशाभिमान एवढेंच नव्हे तर हिंदुत्वाचा अभिमान अत्यंत तीव्रत्वाचा आहे अशी मंडळी या समाजांत जितकी अधिक आहे, तितकी इतर समाजांत थोडीच असेल. हा समाज विस्तारेच्छु आणि विस्तारक्षम हिंदूचा आहे. आणि या बाबतींतच तो इतर हिंदूहून निराळा आहे. या समाजाच्या भावना व्यक्त करणाऱ्या मंडळीपैकीं कांहीं गोष्टी मी येथें देतों.

व्रात्यस्तोमाची माहिती कळल्यानंतर एक यू. पी. कडचे बॅरिस्टर मला येऊन भेटले. आर्यसमाजापेक्षां भिन्न पण वैदिक पद्धतीचा जुना विधि पुन्हां स्थापित झाला आहे, आणि त्याच्यासाठीं माझेकडे चौकशी करावी अशी माहिती चित्रशाळेचे वासुदेव जोशी यांनीं त्यांस दिली होती. त्यांना आपल्या पत्नीचा व्रात्यस्तोम करून घ्यावयाचा होता. ते म्हणाले "कीं आमचें लग्न इंग्लंडमध्यें रजिस्टर झालेलें आहे. दोन मुलेंही झालीं अहेत. तथापि आपली प्रजा पुढें युरेशियन समाजांत मोडली जाऊं नये अशी आपली इच्छा आहे. आर्यसमाजाचा मार्ग मोकळा आहे परंतु आर्यसमाजी मंडळींत समाविष्ट व्हावीं असें मला वाटत नाहीं कारण विशिष्ट मताचा आग्रही असा समाज आहे. मला देवाचें आस्तित्व नाकारण्याचें त्याप्रमाणेंच वाटेल तर मूर्तीपूजा करण्याचें स्वातंत्र्य पाहिजे. त्याअर्थीं त्या समाजाचीं मतें न स्वीकारतां हिंदूंतच आपली गणना व्हावी अशी आपली इच्छा आहे. आणि यासाठीं आपल्या विधीचा अवलंब करूं इच्छितों. असें त्या वेळेस हे गृहस्थ बोलले तरी देखील यांनीं आपल्या पत्नीचा व्रात्यस्तोम कधींच करून घेतला नाहीं. हे गृहस्थ मला भेटण्यास पुण्यास आले तेव्हां ते आपल्या पत्नीची इंग्लंडमधून येण्याची अपेक्षा करीत होते. पण जेव्हां त्यांची बायको आली तेव्हां ती आणि मुलें आजारीच होती. आणि त्यामुळें ते घाईघाईनें हिमालयाकडे आपल्या धंद्याच्या गांवीं म्हणजे लॅन्सडाऊन येथें सर्व मंडळीसह गेले. व त्यांच्यानंतर त्यांच्याकडून कांहींच कळलें नाहीं.

पाश्चात्य वधूपरिणीतांमध्यें आपली नवीन जात निर्माण करावी काय? हा विचार वारंवार उत्पन्न होतो हें मागें सांगितलें आहे. जेव्हां कोणत्याहि संमेलनाच्या प्रसंगीं मग तें राजकीय असो किंवा साहित्यविषयक असो सामाजिक संघटनेच्या संबंधानें चर्चा चालल्याशिवाय राहत नाहीं. हा विचार चालतो तेव्हां दोन पक्ष उपस्थित होतात. जातिसंघटना करतांना मिश्रविवाहित हिंदूंस त्या संघटनेंत येण्यास आमंत्रण करावें कीं नाहीं हा वादाचा प्रश्न असतो. व त्यामुळें जे कांहीं कडाक्याचे वादविवाद सुरू होतात. त्यामुळें पाश्चात्य वधू परिणीतांचीहि संघटना झालेली नाहीं पाश्चात्य वधू करणाऱ्यांपैकीं जे हिंदू आहेत त्यांच्यातच हा विचार प्रामुख्यानें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

चालतो. मुसलमानांत चालत नसावा असें वाटतें. ख्रिस्ती मंडळापैकीं जे पाश्चात्य वधूपरिणीत आहेत त्यांचें मन द्विधा होत असतें. जे कॅथलिक आहेत त्यांच्यामध्यें हा प्रश्न उत्पन्नच होत नाहीं. जे कॅथलिक ख्रिस्ती असून पोर्तुगीज पद्धतीची नांवें धारण करीत आहेत त्यांच्यामध्यें आयरिश बायका करणारांची संख्या मोठी आहे. व त्यांना देशी देशी संस्कृतीचा चाड नाहीं. व आपण युरेशिअन् सदृश समाजाचे घटक व्हावयास त्यांची हरकत असल्याचेंच दिवस नाहीं. प्रॉटेस्टंट ख्रिस्ती मंडळींत जे बंगाली असून मूळचे ब्राह्मण, कायस्थ किंवा वैद्य अशा जातीचे ख्रिस्ती आहेत त्यांच्यात बंगाली संस्कृतीचा अभिमान असून त्यांना आपला हिंदिपणा पुसला जाउं नये असें वाटत असल्यामुळें त्यांना आपले वंशज हिंदुस्तानीय राहावेत अशी भावना दृष्टीस पडते. आणि त्यामुळें युरेशिअन लोकांपासून आपण निराळे असावें असें त्यांस वाटतें. त्यांची नांवें बानर्जी, चाटर्जी अशींच असल्यामुळें त्यांना यूरोपिअन समाजांत समाविष्ट होण्याची इच्छा फारशी नाहीं. आपण युरेशिअन समाजांत विसदृश दिसूं अशी त्यांनांदेखील जाणीव आहे. युरेशिअन समाज हा वरिष्ठ समाज आहे असेंहि त्यांस वाटत नाहीं. व याचें मुख्य कारण हें आहे कीं युरेशिअन लोकांमध्यें सुशिक्षित म्हणजे उच्च शिक्षणाचा वर्ग थोडा आहे. आंग्लो इंडियन लोकांस वांशिक कारणामुळें उपजीविका सुलभ झाले. आणि त्यामुळें ते शिक्षणांत मागें पडले. त्यांस वयुरोपिअनलोक युरोपियन् लोकांचे शूद्र म्हणून मानूं लागले. आणि त्यामुळें जे प्रतिष्ठित देशी जातींतील ख्रिस्ती आहेत. त्यांनांदेखील युरेशिअन हलके वाटूं लागतात. युरेशिअन लोक हलक्या हिंदु जातींतील स्त्रियांपासून झालेले आहेत, ही गोष्ट इतकी सर्वमान्य आहे कीं कांहीं युरोपियन लोक आपल्या कुटुंबाच्या प्रतिष्ठपणाविषयीं माहिती देतात तेव्हां मी इतर युरेशियन लोकांसारखा नाहीं, माझी पूर्वज हिंदी स्त्री प्रतिष्ठित घराण्यांतील होती अशा तऱ्हेची प्रस्तावना देखील करतांना दृष्टीस पडता. आणि त्या प्रकारच्या बोलण्याचा परिणाम प्रतिष्ठित जातींच्या देशी ख्रिस्ती लोकांत झाल्याशिवाय राहात नाहीं.

[अपूर्ण]

दिशाभूल होऊं देऊं नका

ज्याला धड शिवणकामाची माहिती नाहीं अशा कांहीं इसमांनीं दुकान काढून व स्वस्त दराची आशा लावून ग्राहकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न चालविला आहे. आपण आपली दिशाभूल होऊं न देतां आपलें कोणतेंही लहान मोठें शिवण–काम टेलर आणि कंपनीकडे सोपवा. प्रत्येक जातीचें नवीन कोटींग, शर्टींगचे नमुने प्रथम ह्याच कंपनींत येत असून, अनुभवी कारागिरांच्या हातून शिवणकाम होत असून शिवाय दरहि प्रत्येकाला परवडतील असेच असल्यामुळें आपल्याला हेंच दुकान फायदेशीर पडेल.

आमची हिंदुस्थानांत कोठेंहि ब्रँच नाहीं.

धी टेलर आणि कंपनी, चर्नीरोड, टाटारोड, मुंबई नं. ४

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निसरगांठ

लेखकः—भा. वि. वरेरकर.

कपाशीचें पीक म्हणजे वऱ्हाडच्या पाटलाचीं कामधेनु. इतर प्रांतांतला कुणबी कसेंबसें शेत नांगरून वर्षांकांठीं सहा महिन्याचा देखील गुजारा करूं शकत नाहीं, पण कपाशीचें शेत पिकवणारा वऱ्हाडचा पाटील ऐन मोसमाच्या दिवसांत, पैसे पायानें उडवीत असतो.

अशाच एका पाटलांपैकीं जानोजी पाटील हे वऱ्हाडांतील एक श्रीमंत शेतकरी होते. त्यांच्या कुटुंबाला चाळीस पन्नास माणसें होतीं; पाहुणेरावळे, सरकारी अंमलदार, व्याख्यानी देशभक्त, यांची त्यांच्या घरीं अखंड येरझारा सुरू असे, ती वेगळीच. केव्हां केव्हां रोज पंक्तीला शंभर पानसुद्धां असायचें. पण पाटलांना त्याची खिजगणती वाटत नसे.

निजामशाहीची अमदानी बंद होऊन ब्रिटिश अंमल नुकताच सुरू झाला होता. ब्रिटिश अंमलाखालीं पहिलीं कांहीं वर्षे सर्वांनाच सुखाचीं गेलीं. पण हळुहळूं कायदेबाजी सुरू झाली. दक्षिणेंतल्या वकिलांचीं पेवें वऱ्हाडच्या पेठेंत फुटूं लागलीं. मुंबई युनिव्हर्सिटींतून पास होणारा एल एल. बी. वऱ्हाडाची वाट पकडूं लागला, आणि तिथूनच कोर्टबाजी वधारूं लागली.

पाटील लोक श्रीमंत होते. पण बहुतेक अक्षरशत्रू होते. दोनशें रुपयांचें सोन्याचें घड्याळ खिशांत ठेवायचें आणि किती वाजले, म्हणून शेजाऱ्याला विचारायचें, ही वऱ्हाडी थट्टा अजूनाहि प्रचलित आहे. पण एव्हढें खरें, कीं पैसा होता, पण त्याचा उपयोग करण्याला उपयुक्त असलेलें संस्कृतीचें महत्व या श्रीमंत मंडळींना मिळालें नव्हतें.

वऱ्हाडच्या पेठेंतल्या वकिलांनीं या गोष्टीचा फायदा घेतला आणि कज्जेदलाली सुरू केली. जुन्या सनदी, जुने हक्क उकरून काढून, त्याची अंमलबजावणी होऊं लागली आणि त्याबरोबरच पाटलांचीं शेतें, वकिलांच्या मालकीचीं होऊं लागलीं. मोडकी ट्रंक घेऊन वऱ्हाडांत उतरणारा वकील, चार दोन वर्षांच्या अवधींत बंगले उभारूं लागला.

पैसा कांहीं पिकत नाहीं, मग वकिलांनीं हे बंगले उभारले कुठून ? याची चौकशी करण्याइतके वऱ्हाडचे पाटील चिकित्सक बनले नव्हते. आपल्याला इरेला घालतांना, आपल्या म्हाणा किंवा आपल्या भाऊबंदांच्या शेत–जमिनीवर वकिलांचा डोळा आहे, हें एकाहि भोळ्या पाटलाला कळलें नाहीं. पैसे सारखे खुळखुळत होते, त्याचा पाटलांना एक प्रकारचा कैफ चढला होता. ते पैसे बेगुमानपणें भिरकावून देण्यांत त्यांना अभिमान वाटत असे, आणि हा अभिमान चेतवून कज्जेदलाली पिकवण्यासाठीं दक्षिणेंतून वऱ्हाडांत गेलेला वकील, सदैव तयार असे.

अशाच एका वकिलाच्या तडाक्यांत सांपडून जानोजीचा पाय कोर्टांत शिरला. जुन्या निजामशाहीच्या सनदेंतल्या कांहीं खांचाखोंचा निघाल्या आणि कित्येक वर्षे दावा चालून बिचारा जानोजी खंक झाला.

घरच्या माणसांची पांगापांग झाली. सख्खे भाऊ, चुलतभाऊ, त्यांच्या लेकी,सुना भराभर रस्ता पकडूं लागल्या. भरलेलें घर रितें झालें; आणि उदरनिर्वाहासाठीं जानोजीला आकाशाकडे बघत रहावें लागलें.

जिथें आपण राजासारखे नांदलों, तिथें दैन्यावस्थेंत दिवस काढावे कसे, याची जानोजीला विवंचना पडली. फुकट पाहुणचार खाणारे शेंकडो पाहुणे ओळखसुद्धां दाखवीनात, अशा वेळीं गृहत्यागाखेरीज दुसरा मार्ग नाहीं, असा मनाचा निश्चय करून जानोजीनें मुंबईची वाट धरली.

एक बायको आणि एक मुलगी यांच्याखेरीज जिव्हाळ्याचें असें कुणीहि जवळचें माणूस त्याला राहिलें नव्हतें.

मुंबईला येऊन काय करावें, हेंच त्याला सुचेना. कापसाचा व्यापारी या नात्यानें, त्यानें मुंबईला पूर्वी सफरा मारल्या होत्या. पण त्या वेळीं जी ओळख झाली होती, ती श्रीमंतांची. याचक म्हणून त्या लोकांच्या आज दारीं जावें कसें ?

ओळखीच्या एका गृहस्थाकडे त्यानें कांहीं दिवस काढले. नोकरी कोणती करावी, हें त्याला ठरवतां येईना. ऐषआरामांत दिवस काढलेला माणूस—त्यानें नोकर बाळगले होते—पण नोकरी कशी करावी, हें त्याला माहीत नव्हतें.

त्याच्याजवळ थोडीशी पुंजी होती. त्या पुंजीवर कांहीं तरी धंदा करावा, असें त्याच्या मनानें घेतलें.

त्यावेळीं मोटारी नुकत्याच सुरू झाल्या होत्या. मोटार म्हणजे एक कौतुकाचा विषय होता. पण या मोटारींपायीं पुढें मोठमोठे कारखाने निर्माण होतील, याची जाणीव कुणालांहि उत्पन्न झाली नव्हती.

एके दिवशीं एक मोटर बिघडून रस्त्यांतल्या रस्त्यांत उभी राहिली लागलीच शेंकडों माणसें त्या मोटारीभोंवतीं गोळा झालीं. बिचाऱ्या ड्रायव्हरला मोटार कशी दुरुस्त करावी, याची माहिती नव्हती. अखेर हमाल आणून त्यांच्याकरवीं मोटर लोटीत नेली.

त्या प्रसंगानेंच जानोजीला कल्पना सुचली. लहान प्रमाणावर मोटर्स दुरुस्त करण्याचें एक लहानसें दुकान, त्यानें आपल्या तुटपुंज्या भांडवलावर सुरू केलें आणि अशा रीतीनें आपल्या पूर्वीच्या श्रीमंतीचा आव कायम ठेवला.पूर्वीप्रमाणेंच तो धनी राहिला, नोकर झाला नाहीं.

हळुहळूं कारखाना वाढूं लागला आणि मोटरींच्या वाढत्या संख्येबरोबर कामहि भरपूर मिळूं लागलें. पूर्वीचे दिवस पुन्हां दिसण्याची आशा जानोजीच्या समोर हळुहळूं दिसूं लागली.

वऱ्हाडांत असतांनाच जानोजीच्या मुलीचें—मंजीचें लग्न झालें होतें. लग्नाच्या वेळीं ती पांच वर्षांचीं होती. अजूनहि वऱ्हाडांत इतक्या लहान वयांत लग्नें होत असल्याचीं उदाहरणें—सारडा कायदा झाल्यानंतरसुद्धां—घडून येत नाहींत, असें नाहीं. अशा अल्प वयांत लग्नें झालेल्या मुली, बहुतेक माहेरींच रहात असतात. वयांत येईपर्यंत केव्हां तरी सणासुदी त्या सासरीं जाण्याचा योग येतो. पण अशा वेळीं देखील कुणी तरी घरचें वडील माणूस त्या मुलीच्या सोबतीला तिच्या सासरीं जातें आणि एक दोन दिवसांतच त्या मुलीला घेऊन परत येतें. वऱ्हाडांत असतांना मंजी अशी एक वेळच सासरीं गेलीं होती. पण मुंबईस आल्यापासून मंजीचें लग्न झालें आहे, ही गोष्ट जिथें जानोजीच विसरून गेला होता, तिथें मंजीला त्याची कुठून आठवण रहाणार ?

* * *

मुंबईंत आल्यापासून जानोजीनें मंजीला शाळेंत घातलें होतें. ती वऱ्हाडांत असती, तर तिच्यावर हा प्रसंग केव्हांहि आला नसता.

सुदैवानें म्हणा किंवा दुर्दैवानें म्हणा मंजीची बुद्धि सर्वसाधारण मुलींपेक्षां तीक्ष्ण होती. अभ्यासांत तिची भराभर प्रगति होऊं लागली आणि ती एक एक परीक्षा पास होत ती मॅट्रिकपर्यंत येऊन पोंचली.

मंजीचें सासरही श्रीमंत होतें. जानोजी जरी विसरला होता, तरी मंजीच्या सासऱ्याला आपल्या मुलाचें लग्न झालें आहे, हें विसरणें शक्य नव्हतें.

त्यानें पत्र पाठवलें आणि मंजीला सासरीं पाठवून देण्याचा हुकुम केला.

तें पत्र येतांच जानोजीचे डोळे उघडले. त्यानें मागें पुढें पाहिलें आणि त्याच्या छातींत धस्स झालें. मुंबईच्या रहाणींत सुखा समाधानांत वाढलेली ही मुलगी वऱ्हाडच्या पाटलाच्या घरीं नांदणार कशी, हा प्रश्न त्याच्यापुढें उभा राहिला. मुलील पाठवीत नाहीं, असें म्हणण्याची तर त्याची छाती नव्हती.

त्यानें व्याह्याला पत्र लिहिलें, कीं जांवई बुवानांच मुंबईला पाठवून द्यावें. मंजीच्या सासऱ्याला तें पटलें नाहीं. बरींच पत्रापत्री झाली, आणि त्याचा परिणाम दोघां व्याह्यांत वितुष्ट येण्यांत झाला.

कांहीं दिवसांनीं जानोजीला बातमी कळली, कीं मंजीच्या नवऱ्याचें लग्न झालें. जानोजीला एक प्रकारचें समाधान वाटलें. मुलीच्या मागचा एक ससेमिरा सुटला, असें वाटून तो स्वस्थ राहिला. मंजीचें शिक्षण सुरू होतें.

मुंबईंत आल्यानंतर त्याला अपत्यलाभ घडला नाहीं. त्यामुळें मंजीवरच त्याचा सारा जीव गुंतून राहिला. दिवसें दिवस त्याच्या कारखान्याची भरभराट होत होती, आणि पूर्वीइतकी जरी नाहीं, तरी मुंबईंत थाटानें रहाण्याइतकी त्याला ऐपत आली होती. त्याला वाटे, आहे एवढेंच पुरें आहे. खाणारें दुसरें कोण आहे ? मंजीच्या नवऱ्यानें दुसरा घरठाव केला, तरी मंजी कांहीं उघडी पडत नव्हती.

आपलें लग्न झालें आहे आणि आपल्या नवऱ्यानें आतां दुसरें लग्न केलें आहे, हें मंजीस जरी कळून चुकलें होतें, तरी त्या विशिष्ट परिस्थितीचा तिच्या मनावर कांहींच परिणाम झाला नव्हता. ती लहानपणींच शाळेंत जाऊं लागल्यामुळें सहज जें माहेरचें नांव पडलें होतें, तेंच पुढें कायम राहिलें होतें. मंजुळा पाटील ही सुभद्राबाई देशमुख आहे, याचा कुणालाच पत्ताच नव्हता.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिचें लग्न झाल्याचा जानोजी कोणाशीं उल्लेख करीत नसे आणि मंजीनेंहि तेंच व्रत चालवलें होतें. मंजुळा पाटील म्हणूनच ती मॅट्रीक झाली आणि त्याच नांवानें कॉलेजांत गेली.

मंजीच्या वैवाहिक जीवनाच्या बाबतींत जानोजी जरी बेफिकीर होता, तरी तिची आई मात्र या एकाच गोष्टीची खंत धरून राहिली होती. मंजीच्या नवऱ्याचें लग्न झालें, हें कळल्याचा तिच्या मनावर फार परिणाम झाला होता. मुलगी शिकते आहे, विद्वान होते आहे, नांवलौकिकाला येते आहे, पण—तिला वाटे–तिच्या संसाराचें काय ? जानोजीजवळ जर तिनें कधीं ही गोष्ट काढली, तर उत्तर न देतां तो तिचें तोंड बंद करून टाकीत असे. मुलीच्या भवितव्यानें साशंक होऊन विचारी मनांतल्या मनांत झुरत होती.

हळुहळू मंजीच्या मनावरहि परिणाम होऊं लागला होता. तिच्याबरोबरच्या कांहीं मुली मॅट्रिक होण्यापूर्वीच लग्न होऊन सासरीं गेल्या होत्या. कांहींचें लग्न मॅट्रिक झाल्यावर झालें होतें. आणि कांहीं कॉलेजांत असतांना लग्नाच्या गोष्टी बोलूं लागल्या होत्या–तशीच कांहींचीं Love Affairs सुरू झालीं होतीं. आपलें लग्न झालें आहे, याची दाद ती कुणालाच लागूं देत नव्हती. कुणी लग्नाची गोष्ट काढली, तर ती हंसण्यावारी उडवून देत असे. केव्हां केव्हां बी. ए. झाल्याशिवाय लग्न करावयाचें नाहीं, असा निश्चय केल्याचें सांगत असे. जानोजीचे मुंबईचे मित्रहि ज्यावेळीं मंजीच्या लग्नाची गोष्ट त्यांच्याजवळ काढित असत, त्यावेळीं तोहि अशीच उडवाउडवी करीत असे.

* * *

सर्व कांहीं सुरळीत चाललें होतें. जानोजीचा कारखानाहि जोरानें वाढत होता, मिळकतहि चांगली होत होती.

वऱ्हाडांतून घर सोडून निघाल्यानंतर जानोजीनें पुन्हां आपल्या गांवीं पाय टाकला नव्हता. मालाडला त्यानें एक लहानसें घर घेतलें होतें. ठाकुरद्वारवरील एक चाळहि त्याच्या मालकीची झाली होती. बॅंकेंतहि बरीचशी पुंजी होती. शेतवाडीची कल्पना मनांत न येण्याइतका तो मुंबईकर बनला होता.

मंजीचे पुढें काय होणार ? हा प्रश्न त्याच्यासमोर वारंवार उभा रहात असे. पण बुद्धिपुरस्सर तो तिकडे दुर्लक्ष करीत असे. हा प्रश्न विचारतांच त्याचें उत्तर मिळत नाहीं, म्हणून मंजीची आईहि स्वस्थ बसून राहिली होती.

एके दिवशीं मंजीच्या सासरचें पत्र आलें. पत्रावरील सही पहातांच जानोजी आश्चर्यचकित झाला; आणि मजकूर वाचल्यानंतर तर त्याला काय करावें, हें सुचेनासें झालें. मंजीची सवत मृत्यू पावल्याची खबर देऊन तिच्या सासऱ्यानें पुन्हां समेट करण्याची गोष्ट त्या पत्रांत काढली होती. झाल्या गेल्या गोष्टी विसरून जाण्याबद्दल, अगदीं काकुळवाणीनें लिहिलें होतें.

उत्तर काय द्यावें हें जनोजीला सुचेना. त्यानें तें पत्र मंजीला दाखवलें, तेव्हां तिलाहि धक्का बसला. जानोजी म्हणाला, " परिस्थिति ही अशी आहे. मी आतां थकत चाललों आहें. मला वाटतं जांवईबुवा इथं आले आणि माझा व्यवहार त्यांनीं पाहिला, मला मदत करूं लागले, तर तें कांहीं वाईट होणार नाहीं. आज जें कांहीं मिळवलें आहे, त्याच्यावर दुसऱ्या कुणाचाच हक्क नाहीं. तूं माझी एकुलती एक मुलगी. या साऱ्या इस्टेटीची मालकीण तूंच आहेस. पण ती इस्टेट तुझ्या मालकीची व्हायला, मला एक बक्षिसपत्र तरी केलें पाहिजे किंवा मृत्युपत्र तरी केलें पाहिजे, नाहीं तर ज्यांचा माझा कधीं संबंधहि नाहीं, असे माझे भाऊबंद ही इस्टेट बळकावून बसतील. बरं, बक्षिसपत्र केलें तरी देखील एक अडचण आहे. या इस्टेटीवर तुझ्या नवऱ्याला मालकी सांगतां येईल. तेव्हां मी असं म्हणतों, कीं तशी उगीचच्या उगीच मालकी त्याच्या हातीं देण्यापेक्षां, तो जर इथं येऊन राहिला, व्यवहार पाहूं लागला, वाकबगार ठरला, तर मी त्याला भागीदारीच देईन. तुला काय वाटतं ?"

प्रश्न अनपेक्षित होता. तोंवर मंजी निर्धास्त होती. आपल्या लग्नाचा पुन्हां प्रश्न निघेल ही कल्पनाहि तिच्या मनांत आली नव्हती.

ती म्हणाली: " या गोष्टीचा यापूर्वी मीं कधींच विचार केला नाहीं. लग्न होणं म्हणजे काय याची मला कल्पनासुद्धां नाहीं. ज्याला कधीं पाहिला नाहीं किंवा देखला नाहीं, अशा माणसानं एकदम यावं व आपली सत्ता सांगावी, ही कल्पना मनांत येतांच, मला भीति वाटूं लागते. आज इतकीं वर्षें मी मुंबईत राहिलें आहें. माझे आचार विचार पार बदलून गेले. आहेत. आपल्या गांवचीं कांहीं माणसं इथं येतात, तीं मीं पाहिलीं आहेत; तसाच जर हा माझा नवरा म्हणवणारा असेल, तर त्याची बायको म्हणून रहाणं मला शक्य होईल, ही कल्पनासुद्धां मला करवत नाहीं. तुम्हांला नाहीं का असं वाटत ? "

एक मुस्कारा सोडून जानोजी म्हणाला, " मला कांहीं वाटलं, तरी तें तूं हिशेबांत घेऊं नकोस. तूं म्हणतेस तें मला पटतं, पण देवाच्या घरीं तो तुझा नवरा आहे, मला माहीत आहे, तो अशिक्षित आहे. त्याला लिहितां वाचतां येतं कीं नाहीं, याचीसुद्धां मला शंका आहे. पण मी तरी कुठं शिकलों आहे. अजून माझी मला पुरती सहीसुद्धां करतां येत नाहीं. पण मी हा एव्हढा मोठा कारखाना उभारला आहे ना ? दिवसेंदिवस तो वाढतो आहे ना ? तसंच तोही करील—"

" रागावूं नका बाबा." मंजी म्हणाली:– "पण तुमची गोष्ट वेगळी आहे. जसे तुम्हीं आहांत, तशीच माझी आई आहे, म्हणून तुम्हां दोघांचा संसार सुखानं चालला आहे. तसं पाहिलं, तर आज तुमच्या व माझ्या रहाणींतसुद्धां फरक आहे. तुम्ही जरी आज कोट पाटलोण चढवली आहे, तरी कोट पाटलोण चढवणाऱ्या हायकोर्टांतल्या वकिलांशेजारीं बसूं शकत नाहीं. त्याच्याशीं बोलतांना देखील तुम्हाला संकोच वाटेल, हें खरं आहे ना ? "

" खरं आहे, " जानोजी म्हणाला, " कांहीं झालं तरी पूर्वीची जाणीव कांहीं जात नाहीं. इंग्रजी बोलणारी माणसं पाहिलीं कीं लवून रामराम करण्याची जुनी वृत्ति अजून आहे तशीच आहे. लोकं तो माझा विनय म्हणून समजतात. पण तो विनय नव्हे, ती माझी संवय आहे. मी त्यांच्यापेक्षां कमी दर्जाचा आहे, हें जें माझ्या अंतःकराला वाटतं, त्याचा तो परिणाम आहे. तूं म्हणतेस तें खरं आहे. तुझ्या नवऱ्यालादेखील तसंच वाटेल. तुझ्या आईशेजारीं तूं उभी राहिलीस, तर तूं तिची मुलगी आहेस असं कुणीहि म्हणणार नाहीं, इतका तुझ्या वागणुकींत बदल झाला आहे. तूं जितकी पांढरपेशाची मुलगी दिसतेस, तितकीच तुझी आई वऱ्हाडच्या पाटलाची बायको दिसते. किती बुट स्टॉकिंग घातले, तरी त्याच्या खालच्या वऱ्हाडचा पाटील कांहीं झांकला जात नाहीं. म्हणूनच तिचं माझं जमतंय. खरं आहे तूं म्हणतेस तें. डोक्याला मुंडासं बांधून तांबड्या भडक जाकिटांत पांचशें रुपयाचं सोन्याचं घड्याळ घालून जरी तो आला, हाताच्या पाचही बोटांत दोन दोन हजारांच्या हिऱ्याच्या आंगठ्या घातल्या, तरी त्याला पहातांच, तूं चिचकशील, असं वाटतं, म्हणूनच तुला विचारतों आहे. मग काय त्यांना उत्तर पाठवूं ? "

कांहीं वेळ विचार करून मंजी म्हणाली:– " सध्यां कांहींच उत्तर पाठवूं नका. पुढं काय होतं, तें पाहूं. "

असेच आणखी कांहीं दिवस निघून गेले बऱ्याच दिवसांत पुन्हां मंजीच्या सासरहून पत्र आलें नाहीं.

* * *

जानोजी एकाएकीं आजारी पडला. आणि एक–दोन दिवसांच्या दुखण्यांत त्यानें जगाला रामराम ठोकला.

मरण्यापूर्वीं त्यानें मृत्यूपत्र करून ठेवलें होतें. त्यांत त्यानें आपली सारी इस्टेट मंजीला देऊन टाकली होती.

जानोजीच्या मृत्यूची बातमी कळतांच मंजीचा नवरा आणि सासरा मुंबईला आले.

ती परिस्थिति मोठी विलक्षण होती. मंजीचें लग्न झालें आहे, हें त्या वेळीं सर्वांना कळून चुकलें. पितृवियोगाच्या दुःखांत हें आणखी नवीन दुःख आल्यामुळें ती मेल्याहून मेली झाली होती.

नवरा म्हणून तिच्यासमोर उभे राहिलेलें तें ध्यान पाहून तिला धक्का बसला. तिचें मस्तक भणभणूं लागलें. मृत्युपत्रान्वयें जरी इस्टेट तिला मिळाली होती, तरी तिच्या नवऱ्याचा तिच्यावरचा हक्क नाशावीत होत नसल्यामुळें, काय करावें, हें तिला सुचेनासें झालें होतें. तिची आई आपल्याच दुःखांत चूर होऊन गेली होती. मंजीच्या परिस्थितीचा विचार करण्याचें भानहि तिला राहिलें नव्हतें.

त्या विकट प्रसंगांतून कसें मुक्त व्हावें, याची तिला कल्पना करतां येईना.

त्यावेळीं ती बी. ए.च्या परिक्षेला बसली होती आणि एक–दोन आठवड्यांत तिचा रिझल्ट लागणार होता.

जानोजीची इस्टेट किती आहे, याची मंजीच्या सासऱ्याला ज्यावेळीं कल्पना आली त्यावेळीं त्यानें लवलपणा करण्यास सुरवात केली. मंजीच्या आईला उद्देशून तो म्हणाला, " रागाच्या भरांत मी माझ्या मुलाचं पुन्हां लग्न लावून दिलं, त्याची देवानं मला शिक्षा केली. आतां झाल्या गेल्या गोष्टी विसरून, जे धागेदोरे जुळले आहेत, ते आपण चालू ठेवूं या. तुम्ही इथं एकट्याच रहाणार, हें कांहीं बरं नाहीं. मला गांवीं गेलंच पाहिजे. तेव्हां संभाजला मी इथंच ठेवून जातों. तुमच्या कारखानाऱ्याचा मॅनेजर बरा माणूस दिसतो आणि तुमच्या घरधन्याचाहि त्याच्यावर विश्वास होता, असं त्याच्या मृत्युपत्रावरून दिसतं. म्हणूनच त्या मॅनेजरला ट्रस्टी नेमलं. तेव्हां हा माझा मुलगा तुमच्या पदरीं घालतों आहे म्हणा ना. चुकलंमाकलं पाहून घ्या. गांवठण सोडून तुम्ही इथं आलांत, नांवालौकिकाला चढलांत, तसाच तोहि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उद्यां आपलं नांव काढील तसा तो चांगला बुद्धिवान् आहे. शेतीचं काम फार चांगलं जाणतो. त्याचा इथं कांहीं उपयोग नाहीं म्हणा. पण हळुहळू तो इथलं काम शिकूं लागेल व त्यांतहि तो तरबेज होईल. आणि तुमच्या धन्यानें मांडलेला हा सारा पसारा, त्याहून वाढवील, असं माझं मन मला सांगतं."

मंजीची आई बिचारी काय उत्तर देणार! बापाच्या मृत्यूचं दुःख विसरून सासऱ्याला सणसणीत उत्तर द्यावं, असं मंजीच्या मनांत येत होतं, पण लोकापवादाकडे लक्ष देणं तिला भाग होतं.

क्रियाकर्मोत्तर पुरें होतांच, मंजीच्या सासऱ्यानें घाईघाईनें एके दिवशीं निरोप घेतला.

मंजीच्या डोळ्यासमोर काजवे चमकूं लागले. नवरेपणाचा हक्क गाजवण्यासाठीं हा वऱ्हाडचा पाटील सरसावला, तर काय करावें?

त्याच दिवशीं आईची संमति घेऊन, ती आपल्या मैत्रिणीकडे रहाण्यासाठीं गेली.

रिझल्ट लागला आणि मंजी पास झाली; मंजीच्या नवऱ्यानें सर्वांना पेढे वांटले.

शेजाऱ्यापाजाऱ्यांत मंजीचा नवरा एक थट्टेचा विषय होऊन राहिला होता. मंजीच्या एका चहाटळ मैत्रिणीनें 'हा नवा गडी तुम्ही कुठून आणलांत?' असा अगदीं त्याच्यासमोर प्रश्न केला.

संभाजी चिडला आणि त्यानें उत्तर दिलें, "मी गडी नाहीं, हिचा घरधनी आहे." मैत्रिण हीः हीः करीत हंसत निघून गेली. मंजीला मरणप्राय दुःख झालें.

पुन्हां पुन्हां मैत्रिणीकडे जाऊन रहाणें, लोकदृष्ट्या योग्य दिसेना. घरीं रहावें, तर नवऱ्याची भीति.

ज्या प्रसंगाला मंजी भीत होती, तोच प्रसंग चालून आला. भीडभाड सोडून मंजीनें नवऱ्याला निघून जाण्यास सांगितलें.

तो चवताळला, आरडला ओरडला पण निघून गेला. काय करावें, हें मंजीला सुचेना.

मंजीचें तें वर्तन तिच्या आईलाहि पसंत पडलें नाहीं. ती आपली एक जुन्या काळची बाई होती. मंजीची सवत हयात असती, तरी देखील तिनें, त्याच्याकडे जाऊन रहा म्हणून सांगितलें असतें; तीन तीन बायका करून रहाणारे, असे वऱ्हाडचे पाटील काय थोडे आहेत?

मंजीच्या मनःस्थितीची योग्य कल्पना होणारें, एकहि माणूस तिथें नव्हतें. वऱ्हाडचीं माणसें कोणी भेटायला आलीं, म्हणजे मंजीचा नवरा त्यांच्याकडे तक्रार करीत असे; आणि मग ते मंजीलाच दोष देत असत. एव्हढें मोठें ऐश्वर्य आणि बी. ए. झालेली बायको हीं सोडायला तो तयार नव्हता.

एके दिवशीं प्रकरण अगदीं हातघाईवर आलें. त्यावेळीं मंजी आपल्या नवऱ्याला म्हणाली: "लग्न झालं असं तुम्ही म्हणतां, म्हणून तुम्हाला नवरा म्हणायचं. बाकी इतक्या वर्षांत तुमचा मला थांगपत्तासुद्धां नव्हता. तुम्ही दुसरं लग्न केलंत—नवी बायको करून संसार थाटलात, त्याच वेळीं तुमचं माझं नातं संपलं आहे. तुम्ही पुन्हा लग्न केलं असतंत, पण तें कां केलं नाहीं, त्याची मला चांगली कल्पना आहे. माझ्या इस्टेटीवर तुमचा डोळा आहे. मला एकादा भाऊ असता, तर तो या इस्टेटीचा मालक झाला असता; आणि त्या वेळीं तुम्हीं माझी मुळीच पर्वा केली नसती. कुणी सांगावं अजूनहि तुम्ही पुन्हां लग्न कराल. तुमचं माझं पटणार नाहीं, हें अगदीं उघड आहे. तुमचे आचार निराळे, माझे आचार निराळे, रहाणींत साम्य नाहीं, पोषाखांतसुद्धां नाहीं. मी बोलतें ती भाषाही तुम्हांला बोलतां येत नाहीं. तुमच्या भाषेंतले अर्धे शब्दसुद्धां मला कळत नाहींत. अशा स्थितींत तुमचं माझं पटावं कसं?"

संभाजी म्हणाला: "तूं माझी बायको आहेस आणि मी तुझा नवरा आहे, हें सर्वांना माहीत आहे. मी माझा अधिकार गाजवल्यावांचून रहाणार नाहीं; तूं कितीहि विरोध केलास, तरी त्याचा कांहींहि उपयोग होणार नाहीं."

तो तिचा हात धरण्यासाठीं एक पाऊल पुढें टाकूं लागला, तसतशी ती घाबरून एक एक पाऊल मागें जाऊं लागली. आरडाओरड करण्यांत अर्थ नव्हता, हें मंजीला माहीत होतें.

ती चटकन आपल्या खोलींत शिरली आणि दारें बंद करणार, तोंच दाराला धक्का देऊन तो आंत शिरला. त्या दाराला कडी लावतांच, मंजी घाबरून गेली. तो सारखा बडबडत होता, पण त्याचे शब्द कानीं पडत नव्हते. तो आतां लगट करणार असें ज्यावेळीं मंजीला दिसून आलें, त्यावेळीं ती जीवावर उदार झाली.

तो पुढें झाला आणि त्यानें तिचा हात धरला. जोरानें हात सोडवायचा प्रयत्न करीत असतां तिच्या हातांतील बांगड्या पिचल्या.

मंजीची स्थिति ज्यावेळीं असहाय्य झाली होती. तो तिचा नवरा होता आणि त्याच्या विरुद्ध तक्रार करायला, तिला जागा नव्हती. कुणीच तिच्याबद्दल सहानुभूति दाखवली नसती.

तिनें हात सोडवून घेतला खरा, पण तिला बाहेर जातां येईना. तो दाराला पाठ टेंकून उभा होता. मंजी जवळ आली, असें पहातांच तिला घट्ट कवटाळण्याचा त्यानें प्रयत्न केला. त्याला कल्पना नव्हती. अनपेक्षित रीत्या मंजीनें त्याचे दोन्ही हात धरले आणि त्याला जोरानें बाजूला लोटून दिलें.

तो धाडकन जमिनीवर पधला. दाराची कडी काढून मंजी बाहेर गेली, व तिनें दाराला बाहेरून कडी लावली. बाहेर येतांच मंजीच्या डोळ्यापुढें चक्कर आली. कशी बशी सांवरून ती आपल्या आईच्या खोलींत गेली व झालेली हकीकत तिनें आईला सांगितली.

तिचे वर्तन तिच्या आईला पसंत पडले नाहीं. तिनें उलट मंजीलाच दोष दिला.

काय करावें, हें मंजीला सुचेना. संभाजी खोलींतून दार सारखे ठोठावीत होता. आई दार उघडण्यासाठीं जात आहे, असें पहातांच मंजी जी निघाली, ती तडक घराबाहेर पडली. त्या तशा रात्रींच्या वेळीं ती आपल्या मैत्रीणीच्या घरीं निघून गेली. मागें काय झालें हें तिला कळलेंहि नाहीं.

* * *

मंजीची मैत्रिण लीला, हीहि त्याच वर्षी बी. ए. झाली होती. तिचा बाप मुंबईचा एक सरकारी वकील होता. मंजीची हकीगत ऐकून त्याला दया आली आणि त्यानें तिला आपल्या घरीं राहून घेतलें.

आईकडून निरोप येत होते पण मंजीनें नवरा असेपर्यंत घरीं जाण्याचें साफ नाकारलें.

एके दिवशीं मंजीचा नवरा, ती रहात होती त्या ठिकाणीं आला. त्यावेळीं वकील घरीं होते. त्यांनीं त्याच्याशीं बराच वेळ बुद्धिवाद करून पाहिला. पण तो दहाला पेटला होता. घरांत शिरून मंजीचा हात धरून तो ज्यावेळीं तिला ओढूं लागला, त्यावेळीं वकीलसाहेबांनीं त्याची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला.

पण त्यांच्या रक्तांतील पाटील जागा झाला होता. तो मंजीला फरफटत ओढण्याचा प्रयत्न करूं लागला. मंजी आपल्याकडून शिकस्त करीत होती, पण त्या संकट राक्षसापुढें तिची शक्ति दुबळी पडली.

कांहीं चालत नाहीं, असें पाहून तिनें कडकडून त्याच्या हाताचा चावा घेतला, तेव्हां रागाच्या भिरीभरींत संभाजीनें तिला मार देण्यास सुरवात केली.

आणि मग मात्र वकीलसाहेब पुढें सरसावले. त्यांना तेंच पाहिजे होतें. शेजारची मंडळी, हा तमाशा पहायला गोळा झाली होती. त्यांना वकीलसाहेबांनीं मुद्दाम आंत बोलाविलें.

संभाजीचा मारण्याचा सपाटा सारखा सुरू होता. शेजारच्या एक दोन माणसांनीं पुढें होऊन त्याला ओढून त्याला दाराबाहेर घातलें आणि दार लावून घेतले.

रागानें टणटणत तो निघून गेला. तो जातांच वकिलसाहेब म्हणाले, "आतां तूं मोकळी झालीस. आम्हाला करणं जें शक्य नाहीं, तें तुला शक्य आहे. आम्ही पांढरपेशे लोक याबाबतींत मोठे दुर्दैवी आहोंत—आम्हीं होऊन आमच्यावर बंधनं लावून घेतलीं आहेत. आमच्या धर्मं लग्न म्हणजे ब्रम्हगांठ आहे, ती केव्हांहि सुटत नाहीं. तुम्हा शूद्रांच्या हिशेवीं ती निसरगांठ आहे. तसाच प्रसंग आला, तर सोडून मोकळं होतां येतं. ही निसरगांठ सोडण्याची तुझी तयारी आहे कायं?"

"एव्हढा प्रकार झाल्यावर आतां कशाला स्वस्थ राहूं?" मंजी म्हणाली: "मला ही कल्पना नव्हती. या लग्नांतून मुक्त होणं खरोखरच शक्य आहे का?"

"नुसतं शक्य नव्हे," वकीलसाहेब म्हणाले, "तर अगदीं सुलभ आहे. आमच्या घरीं तूं पाहुणी म्हणून येऊन राहिली असतां, त्यानं येऊन तुला मारहाण केली आहे. एव्हढी मंडळी साक्षीदार आहेत. तो कोर्टांत गेला, तर आतां त्याचं कांहीं चालणार नाहीं. नुसत्या एका नोटिशीचंच काम आहे. एक नोटिस देताच, तूं या लग्नाच्या बंधनापासून मुक्त होशील."

* * *

रीतीप्रमानें वर्तमानपत्रांतून नोटीस दिली गेली. "तुम्ही दुसऱ्याच्या घरीं येऊन चार चौघांदेखत मला मारहाण केली, इतकेंच नव्हे तर अशाच रीतीनें तुम्ही माझ्या घरीं मला वागवीत होतां. म्हणून या नोटिशी अन्वयें मी तुम्हाला सोडचिठ्ठी देत आहे आणि यापुढें गंधर्वाचा नवरा करून मी नवा घरटाव करण्यास मोकळी झाली आहे." सहीखालीं मंजीची 'बी. ए.' ही डिग्रीही देण्यांत आली होती.

संभाजी चूक करून बसला होता. आपलें इथें कांहीं चालणार नाहीं; असें पाहून तो मुंबई सोडून निघून गेला. जातांना तो मंजीच्या आईला म्हणाला: "असल्या जहांबाज बायकोची मला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुळींच पर्वा नाहीं. मीं तिला नांदवली असती, तरीहि मी गांवीं जाऊन लग्न करणारच होता. इथला हा कारखाना, घरं, चाळी विकून, तिच्यासकट गांवीं जाणार होतों; आणि मग तिला चांगला हात दाखवणार होतों. अजून देखील मी आपल्या वऱ्हाडच्या वकिलाचा सल्ला घेईन आणि तुम्हा लोकांची खोड मोडवां येते कीं, नाहीं तें पाहीन. ''

संभाजीनें ही धमकी दिली, त्यावेळीं कारखान्याचा मॅनेजर तिथें हजर होता, तो मंजीच्या आईला म्हणालाः ''म्हणावं काय तुमच्या वेडेपणाला. म्हणावं ज्या मुलीला धड बोलतांसुद्धां येत नव्हतं, त्यावेळी तुम्हीं तिचं लग्न केलंत अन् आतां ती बी. ए. झाल्यावर हा कुणबट तिच्यावर सत्ता गाजवूं पहातो का ? कुणबट म्हटलं म्हणून रागाऊं नका. पण तुम्हीच सांगा, तिचीं खेटरं पुसायची तरी याची लायकी आहे काय ? ज्याला धड शुद्ध मराठी सुद्धां बोलतां येत नाहीं, त्याच्याशीं या बी. ए. झालेल्या मुलीनं आयुष्य कंठावं असं तुम्हाला वाटतं तरी कसं ? कसलं तें लग्न ! तुम्ही पाटील आहांत, तुमच्या जातींत काडीमोड कयदेशीर आहे, त्याचा कायदा घ्या. वकीलसाहेबांनीं नोटीस दिलीच आहे—''

प्रत्यक्ष परिस्थिति पाहिल्यामुळें आणि संभाजीनें आपल्या मनांतलें विष ओकून टाकल्यामुळें मंजीच्या आईला मॅनेजरचा बुद्धिवाद पटला आणि मंजीचें पुन्हां लग्न करण्यास तिनें आपली संमति दिली.

* * *

पांढरपेशा लोकांत घटस्फोट रूढ केला म्हणून कॉलमावर कॉलम लिहिणाऱ्या वर्तमानपत्रांनीं नोटीस दिल्याबद्दल मंजीचे वाभाडे काढले, पण तिनें त्यांची कदर केली नाहीं.

* * *

मंजीचें लग्न झालें आणि मंजीच्या परिस्थितींत असणाऱ्या, पण पांढरपेशेपणामुळें कपाळाला हात लावून रडत बसणाऱ्या परित्यक्त स्त्रियांनीं तिचें हार्दिक अभिनंदन केलें.

सत्यकथेच्या आगस्टचे अंकांत

१ अंगे भिजली जलधारानें — ग. त्र्यं. माडखोलकर
२ सालंकृत कन्यादान — व. शा. देसाई
३ समाज सत्तावादी—सनातनी — सरस्वती कुमार
४ माझ्या विवाहानंतर — श्री. व्यं. केतकर
५ जान की जमीन — ग. वि. गोखले
६ आदर्श कोटचाबिश — स. अ. शुक्ल
७ सत्याग्रह — नी. गो. डोंगरे
८ हीराची आत्महत्या — ग. वा. गोखले
९ चोरांचा पोशिन्दा — वि. ना. कोठिवाले
१० सत् सन्तान (चालू कादंबरी)

बोलपटांत क्रांति करणारा
क्रांतिकारक बोलपट

शेंकडो प्रेक्षकांनी पाहून वाखाणलेला अलौकिक
मराठी संगीत बोलपट

: कथालेखक :
महाराष्ट्राचे आवडते कादंबरीकार
वि. स. खांडेकर

मुख्य भूमिकाः—रत्नप्रभा, इंदिरा वाडकर, लीला चिटणीस, मा. विनायक, बाबूराव पेंढारकर

मॅजेस्टिक सिनेमा मध्यें
सुरू आहे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

त्या दिवशीं वर्तमानपत्रांतील टीका वाचून माझ्या मनांत अनेक विचार आले. त्यानें दुसरी बायको केली. खरंच, पहिली बायको जिवंत असतां दुसरी बायको केली हा काय त्यानें गुन्हा केला? गुन्हा असेल तर तो तिला फसवून घराबाहेर काढण्याचा होय. त्याची दुसरी बायको सुंदर आहे, एवढा गुण किंवा पहिलीपेक्षां दुसरी सुशिक्षित आहे हें दुसरीचें महत्व त्याच्या पहिल्या बायकोवरील आजवरच्या प्रेमाला लाथाडून देण्यास पुरेसें कारण नाहीं. सौंदर्याचा मोह अनावर आहे असें म्हणून सौंदर्यापासून चार पावलें दूर रहाण्याचा उपदेश करणारे उपदेशक सौंदर्यसंबंधीं बरेच अज्ञानी असतात. किंबहुना, मी तर असें म्हणेन, कीं सामाजिक घटना विनाविघ्न अव्याहत पुढें चालावयास सौंदर्याच्या मोहानें घडणारे प्रसंग समाजाशीं कसे एकजीव करावे, हेंच त्यांना मोठें कोडें असावें. तें कोडें सोडवितां न आल्यामुळें ते तशा प्रसंगांनीं भ्यालेले असतात. म्हणूनच पावित्र्याचें त्यांनीं फार प्रस्थ मानविलेलें असते. हजारों हृदयें सुखासाठीं दुःखी-कष्टी झालेली व सदा जळत असलीं तरीं त्याचें त्यांना कांहींच वाईट वाटत नाहीं. त्याबाबतींत त्यांचीं हृदयें पाषाणाहूनहि कठीण असतात. त्यांना फक्त कुटुंबपावित्र्य पाहिजे असतें. आंतून कशीहि स्थिति असली, तरी त्याची त्यांना पर्वा असत नाहीं.

त्याच्यावर झालेल्या टीकेंत एक वाक्य असें होतें, कीं त्याची दुसरी पत्नी सुंदर आहे. हें वाक्य वाचून तर माझ्या अंगाला घामच सुटला. त्यांच्या द्वितीय लग्नासंबंधीं विचार करणारें माझें मन माझ्या आयुष्यांतील एका विलक्षण प्रसंगाच्या विचारांत घुटमळत गेलें. सौंदर्य! मी एक निःश्वास सोडला. माझ्या मुखांतून पुन्हां 'सौंदर्य' हा शब्द बाहेर पडला. मीं इकडे तिकडे पाहिलें. त्यावेळीं माझ्या खोलींत कोणीहि नव्हतें, हें ठाऊक असूनहि माझी दृष्टि स्वस्थ बसली नाहीं. इतकेंच नव्हे, तर मीं खोलीचें दार उघडूनहि बाहेर कोणी आहे कीं काय तें पाहिलें. पुन्हां आत आले. तरी मन कसलं स्वस्थ राह्यला? मी खालीं गेलें, दोन्ही मुलें निजलीं होतीं. पडवींत भिवा पुस्तकांची साफसूफ करीत होता. स्वैपाकीणबाई काम आटपून व उशाला पाट घेऊन निजल्या होत्या. मी वर आले. खोलीचें दार लावलें, व तिच्या खालच्या वरच्या दोन्ही कड्याहि लावून घेतल्या! मी कॉटवर पडलें. सौंदर्य! गुन्हा केला नाहीं अशी मी स्वतांची किती तरी वेळा समजूत करून घेतली असतांही माझें मन पुन्हां आज अस्वस्थ झालें. सौंदर्यामुळें त्यानें तिच्याशीं दुसरा विवाह केला! आणि मी! घाबरलेल्न आणि उठून बसलें. आणि समोरच्या आराम खुर्चीवर बसत स्वताशीच म्हटलें—तरी पण त्यांच्यावरील माझें प्रेम पूर्वीं होतें तसेंच त्यावेळी होतं आणि आजाहि तितकंच आहे. सौंदर्याचा आणि प्रेमाचा संबंध काय?

त्या गोष्टीची एक एक घटना माझ्यापुढें दिसू लागली. जणू काय मी एक बोलपटच पहात होते. या बोलपटांत व्हीलन नव्हता. या बोलपटांत कोणी कोणावद्दल सूड घेतला नव्हता किंवा या बोलपटांत नायिकाहि दुष्ट नव्ही.

मुंबईला आम्ही राहावयास आल्यावर त्यांचा धंदा जोरांत सुरूं झाला. स्वतंत्र इंजीनीअर असल्यामुळें बिल्डिंग कॉंट्रॅक्टस त्यांना फायदेशीर पडूं लागलीं. त्यांनीं आंखलेलीं अंदाजपत्रकें इतकीं बिनचूक असत कीं कल्पनेपेक्षां दोनचार हजार रुपये अधिक उरायचे. आम्ही दादर हिंदु कॉलनींत एक स्वतंत्र बंगला घेऊन राहिलों. मोटारहि आमच्याकडे होती. आम्ही अगदीं सुखांत होतों. कशाचीच उणीव नव्हती. बाबूलाही आपण स्वर्गांत आहोत असें वाटे. पैसा कमी नव्हता आणि माझ्यासारखी सुंदर पत्नीहि त्याला लाभली होती. समाजांत मानसन्मान वाढत होता. त्याला काय कमी होतें?

मी सुंदर होतें याच्याबद्दल मला फार अभिमान वाटे. सौंदर्याचा अभिमान आम्हां स्त्रियानां जितका असतो, तितका कोणालाच असत नाहीं. नुसतें नाक चांगलें असलें तरी आम्ही नाकाची स्तुति करतो. एकादीचें नुसते डोळे चांगले असले तरी डोळ्यांचें आम्हाला कौतुक वाटतें आणि एकाद्या बाईचे दांत चांगले असले तरी त्याची स्तुति करतांना मोगऱ्यांच्या कळ्यांची उपमा द्यावी, कीं मोत्याच्या सराची उपमा द्यावी असें आम्हांला होऊन जातें! सौंदर्यदृष्टी पुरुषांपेक्षां आम्हां स्त्रियांतच जास्त असते. माझ्या सौंदर्याची जेव्हां सर्वांकडून वाहवा होई तेव्हां मला किती तरी धन्यता वाटे. मी कॉलेजमध्यें असतांना पोरांचा थवा लाचारपणानें माझ्या मागें मागें हिंडतांना मी आहें तरी कोण, याचचें मला राहून राहून नवल वाटे. बाबू मात्र माझ्या सौंदर्याबद्दल एका अक्षरानेंहि कधीं बोलला नाहीं. माझी तो आस्थेनें चौकशी करी; माझें उणें अधिक काळजीनें पाही; माझ्या अभ्यासांत तो मला कळकळीनें साह्य करी; पण 'तूं किती सुंदर दिसतेस' असे त्यानें चुकूनसुद्धां उद्गार काढले नाहींत.

आणि इतर कार्टी मात्र मला भंडावून सोडीत. प्रेमपत्रें पाठवींत, कारण नसतां माझ्याशीं बोलण्याचा प्रयत्न करीत व स्वतांला ठाऊक असतांहि मला शंका विच-रायला येत. पुस्तक मागत त्यांत चिट्ट- घालून परत देईत! एक ना दोन. कांहीं तर माझ्यावर कॉलेज मॅगेझिनमधून कवित- प्रसिद्ध केल्या. बाबूचा मात्र निराळा प्रकार! रा. ब. जोश्यांचा तो एकुल- एक मुलगा, व आमच्या बाबांचे रा. जोशी बाल स्नेही. म्हणून बाबू आमच्या- कडेच शिकायला असे. बुद्धीमान् म्हणू- त्याचें नांव सर्व विद्यार्थ्यांना ठाऊक होतें- बाबूच्या सरळ वागणुकीचा परिणाम माझ्- मनावर इतका होई, कीं त्याच्याशीं बोल- बसावयास मला कधीं संकोच वाटला नाहीं- तो माझी थट्टा करी. मी रागवे. पण तो रा- कसला अनुरागच ठरे! बाबूच्या या वर्तना- चा माझ्यावर फार परिणाम झाला. इतक- कीं दुसऱ्यानीं केलेली स्तुति एकून मा- त्यांचा राग येई. इतरांनीं माझ्या सौंदर्याचं- करणें म्हणजे माझी बदनामी झाल्या- सारखें वाटे. याच सुमारास-म्हणजे मी सीनीअर बी.ए.त असतां माझ्या लग्नाच्या गोष्टी सुरू झाल्या. त्या माझ्या कानावर येत. एकदां तर बाबांनीं मला उघड विचारलेंहि. पण माझ्या मनांत काळवा काळव होई. नवरा कसा असावा, ह्यासंबंधीं अनेकदां माझ्या मनांत विचार आले होते, स्वताशींसुद्धां कांहीं ठरवलं, पण तें फुकट गेलं. या जंजाळांतून सुटायला माझ्यापुढें एकच मार्ग होता. बाबा जे स्थळ निवडतील त्याचा विचार करून आपलं मत द्यावयाचं, स्वतां निवड करावयाची नाहीं आणि त्याला अनुसरूनच बाबांना मीं 'उत्तर दिलें होतें. याच सुमारास माझ्या मनांत एकदां असाहि विचार येई, कीं बाबूशींच माझं लग्न झालं तर बरं होईल. पण माझ्या सौंदर्याबद्दल त्याला किती आदर होता, हें मात्र मला कळतं नव्हतं; आणि अशा तरुणाशी लग्न झाल्यामुळें मला किती सुख मिळेल, याचीहि कल्पना नव्हती. तरी पण त्याच्यावर माझं प्रेम होतं. पतीच्या दृष्टीनें त्याच्या प्रेमाचा मीं त्या वेळपर्यंत कधीं विचारच केला नव्हता; आणि ज्या वेळीं तो विचार मनांत आला, त्या वेळीं माझ्या सौंदर्याच्या अभिमानानें उचल घेतली. तो स्वतः किती सुंदर होता, याचा मात्र माझ्या मनांत कधींच विचार आला नाहीं. अशा मनःस्थितींत एक दिवशीं त्यानें मला स्वतांच पत्र आणून दिलें. तें पत्र त्याचेंच होतें व त्या पत्रात त्यानें मला मागणी घातली होती. एवढेंच नव्हे, तर एक दिवसांत उत्तर पाठवावें असें त्यानें निक्षून लिहिलें होतें. त्याचें पत्र वाचून मला अतिशय आनंद झाला. मी लगेच कबुली कळविली, व आम्हीं दोघा-

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नींहि त्याच दिवशीं माझ्या वडिलांना पत्र लिहून आमचा मनोदय सांगितला बाबा आमच्या इच्छेबाहेर गेले नाहींत. पुढल्याच महिन्यांत आमचें लग्न झालें व मी त्यांच्याबरोबर मुंबईस आलें. लग्नानंतरहि मी त्याला बाबूच ह्मणून हांक मारी.

दादर तेथे आल्यावर आमचा संसार सुखांत सुरू झाला. त्यानंतर दोन महिन्यानंतरची गोष्ट. आमच्या शेजारच्या बंगल्यांत मनोहरपंत रहावयास आले. मनोहरपंत हे बाबूच्या गांवचे व त्याचे बालपणापासूनचे स्नेही. बाबूनेंच त्यांना हा बंगला पाहून दिला. ते सेक्रेटरीएट मध्यें नोकरीस होते. मनोहरपंताची पत्नी विमलाबाई स्वभावानें फार चांगली आहे. तिच्या सारखीं प्रेमळ हृदयाची माणसें क्वचितच ! बाबूचा प्रेमळ स्वभाव मात्र तिच्यापेक्षां तसूभर जास्तच होता. मनोहरपंताकडे मी नेहमीं जात असे. तेहि आमच्याकडे वारंवार येत. इतकेंच काय, आम्हीही त्यांच्याकडे जेवावयास अनेक वेळ गेलों व तेहि आमच्याकडे किती तरी वेळा आले. आम्ही असे वागत असूं कीं इतरांना वाटावें हीं एकाच कुटुंबांतील मंडळी आहेत.

मनोहरपंत बोलावयाला लागले, कीं कितीतरी विनोदी बोलत त्यांनीं नेहमीं बोलत रहावें आणि त्यांचं बोलणं आम्ही सारखं ऐकत रहावं असं आम्हाला होई. थट्टामस्करी करण्यांत तर त्यांचा अगदीं हातखंडा असे. त्यानी माझी किती वेळां बाबूच्या देखत थट्टा केली होती. बाबूला जसें कांहीं वाटलं नाहीं, तसं मलाहि त्या थट्टेचें कांहीं वाटत नसे. मनोहरपंत बोलतानां दुसऱ्याचीं हृदयें जशीं तात्काळ काबीज करीत तसं त्यांचे सौंदर्यहि फार मोहक होतं. माझ्यासारख्या सुंदर स्त्रीला तें कितीतरी आकर्षक वाटे. ते जेव्हां गालांतल्या गालांत हंसत तेव्हां त्यांच्यावरून उभी पृथ्वी ओवाळून टाकावीशी वाटे. माझ्या सौंदर्याबद्दल त्यांच्या मुखांतून जेव्हां स्तुतीचे शब्द निघत, तेव्हां मात्र मला लाजल्यासारखें होई. त्यांच्याइतका सुंदर पुरुष मी पूर्वी पाहिला नव्हता. विद्वानानें विद्वानाचें कौतुक करण्यांत कांहीं अर्थ असतो. गायकानें गायकाची स्तुति करण्यांत खरें स्वारस्य आहे. मी सुंदर असल्यानें तर माझ्या सौंदर्याचा दिमाख सुंदर पुरुषानें स्तुती करण्यांतच सजून दिसे. तात्पर्य मनोहरपंताच्या सौंदर्यानें माझ्यासारख्या सुंदर स्त्रीचा एकांत अस्वस्थ केला होता.

बाबूचें लक्ष सर्वस्वी धंद्यांत गुंतलेलें असलें, तरी त्यानें माझ्या सुखसोहळ्याकडे कधींच दुर्लक्ष केलें नाहीं. किंबहुना, मनोहरपंतांच्या सहवासापासून बाबूवरील माझें प्रेम उलट द्विगुणीतच झालें. नेहमीं तो माझ्या शेजारीं असावा असें मला वाटे. त्याच्याबरोबर त्याच्या कामावर जाऊन त्याला मदत करावी, अशी मला इच्छा होई. त्याचा कामाचा भार थोडासा हलका करतां आल्यास पहावा, असें मला अलिकडे जास्तच वाटूं लागलें. त्याबरोबर मात्र मनोहरपंतांचें सौंदर्य माझ्या दृष्टीपुढें सारखें दिसत असे. ती दुपारची वेळ होती. मनोहरपंत शनिवार असल्यामुळें त्या दिवशीं कचेरीस गेले नव्हते. विमलाबाई लेडीज क्लबमध्यें गेल्या होत्या. मला बाबांना पत्र लिहावयाचें होतें म्हणून शाई आणण्यासाठीं मी मनोहरपंतांकडे गेलें. त्या वेळीं ते आपल्या खोलींत उघडेच कोचावर पडले होते. पुढच्या बाजूला पंखा चालू होता. मी एकदम आंत शिरलें. त्यांचा तो उघडा देह पाहून मला त्यांच्या सौंदर्याची अधिकच मोहनी पडली आणि मी उगीच आंत आले असें मला झालें लागलें. पण आंत जाऊन नुसतं परत फिरणं शक्य नव्हतें. शाईची दौत मी उचलली आणि तशीच परत फिरलें. त्यांच्याशी बोललेसुद्धां नाहीं. मला वाटतं माझी ही मनस्थिति मनोहरपंताच्याहि लक्षांत आली असावी. सौंदर्यसंपन्न शरीरांतील मनाचे खाचखळगे सौंदर्यसंपन्न मनालाच कळतात. घरीं आले आणि कसलं काय आणि कसलं काय? पत्र लिहीणें बाजूलाच राहिलें; मी कॉटवर पडून राहिल्यें. बाबू या वेळीं येथें येईल तर फार बरं असं वाटलं. एकांताची मला भीति वाटली. लगेच मी बाबूला टेलिफोन केला. मात्र त्यांत माझ्या मनाचा उतावीळपणा मी मुळींच भासवला नाहीं.

अर्धा तास झाला असेल. मनोहरपंत आंत आले व 'चला बाबूच्या ऑफिसांत जाऊं. त्याचा तुम्हांला घेऊन येण्याबद्दल टेलिफोन आला आहे' असें ते म्हणाले. पुन्हां मला अस्वस्थता वाटली. उत्तर काय द्यावं तें सुचेना. त्यांच्याबरोबर जाऊं नये अशाविचारानें मी कांहीं तरी सबब सांगितली. पण त्याचा आग्रहच पडला. सौंदर्याचा आग्रह सौंदर्याला नाकारतां येत नाहीं त्यांतून तो सुंदर पुरुष अन् मी स्त्री. त्यांचें म्हणणें मला कबूल करावंच लागलं. आम्ही दोघे बाबूच्या ऑफिसांत गेल्यावर मात्र मला जरा धीर आला. मी जास्त आनंदी झाले. माझ्या मनाची विपन्नता आतां मुळीच उरली नव्हती. त्यावेळीं बोलतांना मनोहरपंताचा हृदयाचा ठाव घेण्याचा मी प्रयत्न करावयास विसरले नाहीं. ते अगदीं शांत होते. माझ्या मनस्तापाची त्यांना कांहीं कल्पनांच झाली नसावी. स्त्रियांच्या हृदयावरील भावनांच्या भरत्या ओहोट्या, या सागराच्या भरत्या ओहोट्याप्रमाणें ठराविक वेळीं येणाऱ्या जाणाऱ्या नसतात.

त्या दिवसापासून मात्र मला जिकडेतिकडे अपूर्णता दिसू लागली. वस्तुतः मला काय कमी होतें ! मनांत आणीन तें बाबूकडून मला मिळत असे. बाबूवर माझें अत्यंत प्रेम असलें तरी तेंसुद्धां अपूर्णच वाटू लागलें. अपूर्णतेचीं कारणें विचार करूनहि मला त्यावेळीं समजलीं नाहींत. बाबूवर यापेक्षाहि मी प्रेम केलें पाहिजे, अशी जाणीव मला उत्पन्न झाली व पहिल्यापेक्षांहि मी त्याचं होय नको पाहू लागलें, तरी पण या प्रत्येक दक्षतेंत मनोहर डोकावून पहात असावा असा मला भास होई ! त्यानंतर दहा दिवस झाले असतील. बाबूला सिमल्यास जावयाचें होतें. तेथील कोणत्याशा साहेबाकडे एका मोठ्या कॉंट्रॅक्टचें काम निघालें. मनोहरपंतांनीं सूचना केली, कीं मीहि बाबूबरोबर जावें. प्रवासांत चांगली ठिकाणे अनायासें पहावयास सांपडतील. बाबूहि आग्रह करीत होता. पण त्याच वेळीं माझी धाकटी बहीण माझ्याकडे येणार असल्यानें इच्छा असून मला जाता आलें नाहीं. पण योगायोग असा, की बाबू गेला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं इंदूचं पत्र आलें-त्यांत तिनें येण्याचा बेत रहीत केल्याचें कळविलें होतें. आतां मी घरांत एकटीच होते. दोन तीन दिवसांतच मला कंटाळा आला. एकटें रहाणें अगदीं कठीण वाटूं लागलं. काय चमत्कार पहा. पूर्वी मी अशी किती तरी वेळां एकटी राहिलें होतें. त्या वेळीं मला आजच्या इतकं चमत्कारिक व अस्वस्थ वाटलं नव्हतं. या वेळेस मात्र अगदींच उलटा प्रकार घडला. कोणी तरी बोलावयास असावं, असं होऊन जाई. विमलाबाईना बोलावलं. मागच्या हकिगती काढून आम्ही आम्ही खूप बोललों ! तरी मन अस्वस्थच. मात्र मनोहरपंताबद्दल जेव्हां गोष्टी सुरू केल्या, तेव्हां माझी उत्सुकता वाढली. मनोहरसारखा सुविद्य व अत्यंत सुस्वरूप पति तिला कसा लाभला, हें एकतांच मी माझें जणूं अस्तित्वच विसरलें होतें. मीही बाबूच्या अनेक गोष्टी सांगून मला वाटणाऱ्या अपूर्णतेची पूर्णता करीत होतें. तरी पण मनोहरांचा तो सुस्वरूप देह, त्यांचें गोड हासणें, रुंद छाती व भरलेले दंड मला लाजवीत असत. विमलाबाईना मात्र त्याबद्दल कांहीं अभिमान वाटत होता असें मला दिसलें नाहीं. सहज मी—माझी ती चूकच होती—मनोहरपंत किती सुंदर दिसतात असे म्हटलं त्यावेळीं विमलाबाईचा चेहरा निर्विकार दिसला. माझी खात्री झाली कीं, आपल्यापेक्षां आपला पती मोहक व ऐटदार दिसतात. याची विमलाबाईना पूर्ण कल्पना असून त्या स्वतांना धन्य मानीत असतो माणसाचं असंच आहे, कीं त्याच्या योग्यतेपेक्षां त्याला अधिक लाभलं, तर त्याच्या तो बडेजाव मिरवीत नाहीं. उलट आपलें सौख्य तो लपवून ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. मनोहरपंतांची मी केलेली स्तुति तिला आवडली पण तिनें त्याबद्दल कांहीं दर्शविलें नाहीं, हें मनुष्यस्वभावास धरूनच होतें. मी मात्र खजिल झालें एवढें खरें.

आम्ही बोलत होतों इतक्यांत मनोहरपंत आले. चहाची व्यवस्था आमच्याकडेच करावयाची असं ठरलें. रात्रीं सिनेमाला जाण्याचा त्यांचा विचार होता. येतांना त्यांनीं बाक्सचीं तिकटं आणलीं होतीं. बाबू असतांनाच आम्ही जाणार होतों पण ते जमलं नाहीं. आणि पुढल्या आठवड्यापासून चित्र बदलणार असल्याचें जाहिर झालेलें वाचून मनोहरपंतांनीं आजचा बेत ठरविला. रात्रीं ९॥ वाजतां मी मनोहरपंताकडून आमच्या बंगल्यांत आलें. तोपर्यंत मी विमलाबाई व मनोहरपंत कॉंग्रेसच्या घडामोडीवर चर्चा करीत होतों. निघण्याच्या तयारीस मी लागले. बंगल्यांतल्या सर्व खोल्यांना कुलपं लावलीं व ट्रंकांचीं व कपाटांची कुलपं नीट लागली आहेत किंवा नाहींत हें स्वतः पाहिलें. गड्याला खालीं निजण्याबद्दल सांगून मी आपल्या खोलीत आलें. कोणतं पातळ नेसावं याचा विचार सुरूं झाला. बाबूला आकाशी रंगाचें जरीकांठीं पातळ व त्याच रंगाचा ब्लाऊज फार आवडे. मलाहि तो आवडत असे. मी त्याच्या निऱ्या करून नेसायला लागल्यें. इतक्यांत मनोहरपंत आंत आले. मला तशा स्थितींत पहातांच ते शरमिंदे झाले. स्नेह कितीही असला तरी सभ्य मनुष्याला अशा प्रसंगीं खंत ही वाटणारच. मला काय वाटलं ? मला त्यावेळीं कांहीं वाटलं नाहीं ! उलट मनोहरपंतांना हिरमुसल्यासारखें वाटूं नये म्हणून मी 'बसा कीं येतें मी बाहेर. नेसूं काय ? त्याला वेळ नाहीं लागणार' असें बोलून धीर दिला. ते बाहेर बसले आणि लगेच माझ्या मनांत विचार सुरूं झाले. कोणते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विचार होते हें मला सुद्धां आतां नीट आठवूनहि आठवत नाहींत. व आठवतात ते सांगतां येत नाहींत. मनोहरपंतांबद्दलच ते विचार होते. बाबू येथें नाहीं ही जाणीव भेडसावीत होती. हें भेडसावणं सुखकर होतें, की क्लेशदायक होतें ? इतक्यांत मनोहर बाहेरूनच सांगतात काय कीं विमलाबाई येत नाहींत तेव्हां कसं काय करावयचं ! मनोहरपंताचा ह्या प्रश्नानें मला धक्काच दिला. मी येत नाहीं असं सांगावं तर तेंहि बरं नाहीं. जावं तर ? मनोहर सभ्य गृहस्थ आहेत. आणि मी—मी पण सभ्य आहे. कोणत्याहि प्रसंगीं सभ्यतेस सोडून तें कांहीं करणार नाहींत. तरी पण मीहि येत नाहीं, असें सांगावयास माझ्या सभ्यपणा मुळीच कचरला नाहीं ! असें सांगितल्यावर ते काय म्हणतात, इकडे माझें लक्ष होतें. मी येत नाहीं असं म्हणतां न त्यांनीं माझी चेष्टा करावयास सुरवात केली. मी नेसून बाहेर आलें होतें. प्रथम त्यांच्याकडे लक्ष जातांच त्यांच्या कोटाची कॉलर दुमडलेली दिसली. सौंदर्यदृष्टीला विद्रा एवढा दोषहि चटकन दिसतो. मी पुढें होऊन त्यांची कॉलर नीट केली व त्याच धुंदींत 'येतें' असें म्हणालें. आम्ही दोघें खाली गेलों. विमलाबाईंना येण्याबद्दल मी बराच आग्रह केला. सरळ स्वभावाच्या व तृप्त वृत्तीच्या विमलाबाईंनीं आम्हांस जाण्यासाठीं मोकळ्या मनानें आग्रह केला. तिचें मन अत्यंत शुद्ध होतें.

मोटारींत निरनिराळे विचार मनांत येत होते. बाबू या वेळीं सिमल्यास एकटा आहे. तो यावेळीं काय करीत असेल, इत्यादि चित्रें दिसूं लागलीं. इकडे मी मनोहरशीं बोलतच होतें व आजच्या बोलपटाची तो मला माहिती देत होता ! आम्ही पोंचलों निं तीन मिनिटांत खेळ सुरू झाला. आमच्या शेजारीं दुसरे कोणीहि नव्हते. मनोहर आणि मी. पडद्यावर निरनिराळे प्रसंग येत जात होते. मनोहर बघण्यांत व त्यावर बरे वाईट अभिप्राय बोलून दाखविण्यांत अगदीं गढून गेला होता. त्याचें लक्ष चित्रपटाकडे तर माझें लक्ष त्याच्याकडे व सिमल्यास बाबूकडे होतें. इतक्यांतच एक लव्ह सीन येऊन गेला. आम्ही दोघे तो नीट पहात होतों. मनोहरनें त्या सीनविरुद्ध माझ्यावर टीका केली. मला ती आवडली. कारण त्यांत एक सुंदर पुरुष एका सुंदर स्त्रीवर तिच्या इच्छेविरुद्ध तिचें मन वळविण्याचा प्रयत्न करीत आहे, असें त्यांत दाखविलें होतें. मी अगदीं गांगरून गेलें ! तें पाहून माझें मन फारच अस्वस्थ झालं. मनोहरच्या लक्षांत माझा अस्वस्थपणा आला. पुरुष कांहीं कमी चाणाक्ष नसतात. त्याचें मन माझ्याकडे पहात होते व माझें मन त्यांच्या मनांत गुंतलें होतें. याच वेळीं बोलपटांतील नायकाचें एक महत्त्वपूर्ण वाक्य आमच्या कानावर आलं. "सौंदर्याची पूर्णता सौंदर्यांखेरीज होत नाहीं." तें ऐकताच बरोबर आहे, असा शेरा मात्र न कळत माझ्या तोंडून बाहेर पडला ! त्यावर नायिकेनें उत्तर दिलें. 'सौंदर्यापेक्षां प्रेम अधिक श्रेष्ठ आहे. सौंदर्य क्षण भंगूर ' तर प्रेम अविनाशी " त्यावर पुन्हा उत्तर मिळालें; ' प्रेमाचा आणि सौंदर्याचा कांहींच संबंध नाहीं. '

मला कोणी धीर दिल्याचा भास झाला आणि त्या भरांत मी माझे हात लांब केला तों चुकून नेम मनोहरपंतांच्या मानेमागें ! चटका बसल्याप्रमाणें तो भी मागें घेतला. मनोहरपंत हांसले. आतां आम्ही एकमेकांना पूर्ण ओळखलं होतं. मला त्यांची लाज वाटत होती व त्यांना माझी लाज वाटत होती. अशा स्थितींत एकदांचा बोलपट संपला. आम्ही परत आलों. मनोहरपंत आपल्या बंगल्यांत गेले व मी माझ्या खोलींत येऊन निजलें. त्या रात्रीं दोन–तीन चार—चे टोले ऐकल्यावर कोठे माझा डोळा लागला.

दुसऱ्या दिवशीं मी मनोहरपंताकडे गेल्यें नाहीं, विमलाबाईंनाच बोलावलं. आम्ही किती तरी वेळ कॅरम खेळत होतों. अशा मनस्थितींत सहा दिवस कसेबसे गेले. तेवढ्या मुदतींत व मनोहरपंतांशीं चार पांच वेळां व पांच सहाच शब्द मी बोलले असेन. पण आम्ही बोललों त्यापेक्षां किती तरी वेळा आम्ही एकमेकांना धुंडाळलं. त्यांनी माझ्यावर नजर ठेवावी व मी त्यांच्यावर नजर ठेवावी, असा जणूं आमचा खेळच चालला होता. बाबूचें काम संपलें आणि बाबू घरीं आला. तेव्हां मला कैदेंतून सुटल्यासारखें मोकळें वाटूं लागलें ! आतां मनोहरपंत पूर्वी प्रमाणें आमच्याकडे येत व मीहि त्यांच्याकडे जात होतें. पण आतांचे आमचें एकमेकांशीं होणारें बोलणें शब्द सोडलेल्या घड्याप्रमाणें असे. त्यांत आसक्तता होती, व त्यांत एकमेकांबद्दल वाटणारी अपूर्णताहि होती! त्यांच्याकडे बघतांना मात्र माझ्या सौंदर्याचा मला दिमाख वाटे. तेंही माझ्याकडे स्वाभावीनेंच बघत. मात्र आमचा हा आंधळ्याकोशिंबिरीचा खेळ उघड चालला असता, तरी कोणालाहि कळण्यासारखा नव्हता. कारण विमलाबाई काय किंवा बाबू काय, दोघांनाही सौख्यांत पूर्णता वाटे. आमचें दोघांचें त्याच्या मात्र अगदींच उलट होतें.

किती दिवस बरं चालणार असं ! माझ्या प्रकृतीवर परिणाम होईल किंवा काय, याची मला धास्ती वाटूं लागली. तो दिवस मंगळवारचा असेल. कामकऱ्याच्या आठवड्याच्या पगाराचा दिवस होता. म्हणून बाबू रोजच्या पेक्षां लवकरच गेला कचेरींत. यावयासहि त्याला उशीर होणार होता; बँक हॉलीडे असल्यामुळें मनोहरपंत घरीं होते. ते जेवल्यावर आमच्याकडे आले. आम्ही कॅरमला सुरवात केली. खेळ रंगत होता, असं म्हणण्यापेक्षां आम्हीं रंगत चाललें होतों. क्वीन कोण उडविणार यांत आमची स्पर्धा होती थट्टामस्करीला, अगदीं ऊत आला होता. मी अगदीं भानच विसरलें होतें म्हणा ना. ते म्हणत ' क्वीन ' माझी, मी म्हणे तुमची नाहीं. त्यांच्या बोलण्यांत जोर होता, माझ्या बोलण्यांत शरणागति होती तेवढ्यांत मी दिवाणखान्याची कडी लावून घेतली.

संध्याकाळीं मी टॅक्सी करून बाबूच्या कचेरींत गेलें. मन अगदीं शांत झालं होतें. भीति फक्त जगाची. पण त्या बाबतींत आम्ही दोघांनींहि दक्षता बाळगल्यानें मन निर्धास्त होतें. मनोहरपंत आल्यापासून माझ्यांत उडालेलें समाधान मला परत मिळाल्यासारखें वाटलें. मनोहर येण्यापूर्वीं माझी जशी मनस्थिति होती, तशी पूर्ववत् झाली. आमचा रोजचा व्यवहार पूर्वीसारखाच चालला होता. फक्त फरक इतकाच, कीं मनोहरपंत माझ्याकडे आले काय, गेले काय अथवा एकादे दिवशीं न आले काय, मला कांहींत वाटत नव्हतें. माझ्या सौंदर्यानें पूर्ण सौंदर्याचें सौख्य मिळविलें होतें. माझ्या स्वतांचीच ही गोष्ट असल्यामुळें ' सौंदर्याचा आणि प्रेमाचा ' संबंध जोडून टीका करणाऱ्या लोकांचें मला हांसू आलें. बाबूरावावर माझें काय कमी प्रेम आहे ? स्वतांच्या जीवापेक्षा मी बाबूवर प्रेम करतें; मनोहरांशीं माझा संबंध आला तोहि त्याच्या सौंदर्यामुळे माझ्या सौंदर्यांची अपूर्णत्व त्याच्या सहवासानें भरून निघाले. याचा अर्थ असा नव्हे की मनोहरावर मी पावित्रेम केलें, व बाबूबद्दल मला प्रेम वाटत नव्हतें. आपल्यांत असलेल्या गुणापेक्षां अधिक गुणवानाशीं संबंध यावा, यासाठीं प्रत्येकाची खटपट चालली आहे. आपल्यांतले अपूर्णत्व काढून टाकण्यासाठीं जो तो धडपडतो याच न्यायानें माझा व मनोहरपंताचा संबंध हा न्याय्यच ठरला पाहिजे. जगाच्या दृष्टीनें हा अन्याय्य आहे अनीति आहे हें कबूल पण बोलावयाचे दांत वेगळे व खावयाचे दात वेगळे असा जगाचा निकाल असतो. त्याने दुसरी बायको केली ह्यांत खचित अन्याय नाहीं. हें पाप होऊं शकत नाहीं. कदाचित् त्यांतही त्याला अपूर्णत्व दिसलें तर तो त्यापुढेंहि जाण्याचा प्रयत्न करील, त्याच्या पहिल्या पत्नीचें काय करावें असा प्रश्न विचारणारे लोक लबाड आहेत असें मी समजतें. तिच्यांत पात्रता असेल तर तिनें अधिक चांगला पति मिळविण्याचा प्रयत्न करावा. सौदूपणा नाहींसा करण्यासाठीं किंवा अंधारात चाललेल्या गोष्टी उघड उघड व्हाव्यांत म्हणूनच ' घटस्फोट ' वगैरेसारख्या सुधारणा करण्यांत आल्या आहेत. किंबहुना, मी असेंच म्हणतें, कीं, जी अनीति पूर्वी अपरिहार्य होती ती शुद्ध करून नीती मानण्याचें प्रयत्न म्हणजे सुधारणा होते.

मी वृत्तपत्रे फेंकून दिलीं. कांहीं तरी लिहावयास सांपडेल व धुळवड उडविता यावी म्हणून हे पत्रकर्ते नसत्या गोष्टीला महत्त्व देत असतात. प्रेमाचा आणि सौंदर्याचा कांहीं संबंध नाहीं, आपल्यांतील अपूर्णत्व नाहींसे करण्यासाठीं ज्याची त्याची खटपट चाललेली असते. हें लक्षांत ठेऊन लैंगिक नीतिशास्त्र तयार केलें पाहिजे.

* * *

सुशीला स्वतांशीं असें म्हणाली. शेवटचे वाक्य तिनें उच्चारलें. एक निश्वास सोडला. ती उठली. शाफरला गाडी आणण्यासाठीं खिडकींतून तिनें हुकूम सोडला, व पांचच मिनिटांत ती फिरावयास गेली. वाटेंत तिनें दोन मिनिटे बाबूच्या कचेरीपुढें गाडी उभी केली होती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

“मूळ स्वभाव जाईना”

लेखकः—ना. रं. अळेकर

नोंदणी कचेरींत नोंदणीदार Registrar आपल्या अधिकारी खुर्चीवर [बस]ले होते. त्यांच्या समोरील लांकडी कठड्याच्या पलीकडे एक भिकारी उभा होता. थोड्याशा अंतरावर त्याची मुलगी व जावई आणि साक्षीदार वगैरे लोक होते. नोंदणी कचेरींत भिकाऱ्याला पाहून कुतुहल उत्पन्न झाल्यामुळें साहजिक तेथें नेहमी अधिकच गर्दी झाली होती.

भिकारी तो भिकारीच! कळकट शरीर, कळकट अपुरें पंचेवजा धोतर, ठिकठिकाणीं मळलेला आणि कांहीं ठिकाणीं, अंगावर वाऱ्याचा वारा प्रत्यक्ष आदळावा म्हणूनच काय, छिद्रें असलेला त्याचा सदरा! त्याच्या संसाराचें आणि त्यांतील छिद्रांचें दर्शनच होतें तें. डोक्याला कोणत्याच प्रकारचें शिरस्त्राण नसल्यानें कधींहि तेलाचा स्पर्श न झालेल्या त्याच्या केसांची एकच कडक बट बनलेली दिसत होती. नाकाच्या नाकपुटयांत कोंबकोंबून तपकीर भरण्याच्या त्याच्या संवयीमुळें नागपुड्या तर तपकिरी रंगाच्याच होत्या, पण त्याच्या विपुल मिशांनाहि तोच रंग चढला होता! मात्र त्याची अस्वच्छ राहणी आणि दिसून येणारी दारिद्र्यावस्था लक्षांत घेतां कोणालाहि आश्चर्य वाटावें, इतकी त्याची देहयष्टि धष्टपुष्ट, भरपुरी, सुरळीत दिसे.

नोंदणीदारांनीं त्याचेकडे दृष्टि फेंकली. 'अरे, ही तर कचेरी, येथें तुझें काय काम!' असाच प्रश्न जणूं ते आपल्या चर्येनें त्यास विचारीत होते. तोंच भिकाऱ्यानें कागदाचें मेंडोळें धरलेला आपला हात वर केला.

“हं! तुलाहि नोंदणी कचेरीचें काम आहे! आण पाहूं.” नोंदणीदार म्हणाले. भिकाऱ्यानें मंद स्मित केलें आणि हातांतलें मेंडोळें त्यांच्या मेजावर ठेविलें.

नोंदणीदारांनीं तें उलगडलें व वाचून पाहिलें. ‘हूं’ असा उद्गार अगदीं सहज-त्यांच्या तोंडून निघाला. विस्मय, आश्चर्य, कौतुक, इत्यादिकांच्या छटा त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेल्या दिसल्या.

“काय धर्मदास, तुम्हीं हें बक्षिसपत्र लिहून दिलें असच ना? ही शेजारीं उभी असलेली तुमची मुलगी? हिला तुम्हीं आपली मिळकत बक्षिस करून दिली? हा तुमच्या सहीचा आंगुठा? होय ना?” नोंदणीदार म्हणाले.

“होय सरकार, हा माझा आंगठा. ही माझी एकुलती एक मुलगी. प्राण आहे माझा. माझी सर्व स्थावरजंगम मिळकत मीं हिला बक्षिस केली आहे.” धर्मदास भिकारी बोलला.

“यांत घराशिवाय सोन्याचे दागिने आणि नगद रुपये लिहिले आहेत. कुठ आहेत ते?” नोंदणीदारांनीं प्रश्न केला.

धर्मदास भिकाऱ्यानें कठड्याच्या खालच्या फळीवर ठेवलेली पिशवी मेजावर मोकळी केली. चपराशानें रुपयांच्या चळथी करून ठेवल्या आणि सोन्याचे दागिने नीट मेजावर मांडले. प्रेक्षक तोंडाच्या चंबूला बोटाचें बूच घालून व डोळे फाडफाडून सर्व प्रकार पाहत होते.

“धर्मदास, या बक्षिसपत्रांतील घर, रुपये व सोन्याचे दागिने मिळून चार हजारांची मिळकत होते. ही सर्व तुमची भिक्षेची कमाई? भीक मागून तुम्हीं सांचविली?” नोंदणीदारांनीं सवाल केला.

“जी सरकार. हें सगळें भिक्षेचें धन. कां बरं?” धर्मदास म्हणाला.

“कसं खरं मानावं? अहो, हे दागिने तुम्हांला कोण भिक्षेंत द्यायला गेला. किंवा तुम्हीं तरी कशाला घडवायला गेलां?” नोंदणीदारांनीं पृच्छा केली.

“शंका ठीक, उत्तर चोख, श्रीमंत साहेब. एका गृहस्थानं मजजवळ हे तारण ठेवून रुपये कर्जाऊ घेतले होते. तो नाहीं करूं शकला रुपयांची फेड. त्यामुळें हे दागिने अनिच्छेनें माझेच झाले. तशीच शर्थ होती. अजून त्यानं रुपये आणले, तर दागिने मी परत करीन. माझी मुलगी देखील परत करील. आम्ही गरीब लोक सरकार.” धर्मदास उत्तरला.

“खरं? मला शंका आली कांहीं...” एवढेंच अर्धवट उच्चारून नोंदणीदारांनीं आंवरल्यासारखें केलें.

“काय? काय? चाचरतां कशाला? कसली तुम्हांला शंका आली,” धर्मदास भिकारी चवताळला. ‘चोरीचा माल असेच नाहीं? महाराज, मी आज पन्नास वर्षं हा भिकाऱ्याच्या रोजगार करतों. सर्व उमर यांतच घालविली. पायपीट करून, मानापमानांच्या कल्पना गुंडाळून ठेवून, पोटाला चिमटा घेऊन भिक्षेच्या पैशांत धान्याचे पैसे मिळवून बचत केली. एकुलती एक पोरगी! पोरपणींच विचारीची आई मेली. कसंबसं तिला बांधविलं. लहानाची मोठी केली. देवाची कृपा. तिचं लग्नहि करून दिलं. तिच्याकरितां घर घेतलं. महाराज, आयुष्याच्या उन्हाळ्यांत ही पोरगी तेवढी छायेची जागा. तिच्यासाठीं जमवून ठेविलं, सर्व भिक्षेची मिळकत, सरकार. आपण चोरीचा संशय घेतां! चोरी कशाला करूं? कुठल्या नरकाचें साधन करूं? आमच्या सारख्या गरीबांची अशीच स्थिति असायची. आमच्या जवळ पैसा दिसला, कीं तो चोरीचाच हें जसं कांहीं ठाम ठरलेलंच. या भीतीनें घर घेतलं तेंहि दुसऱ्याच्या नांवावर. पैसा, दागिने लपवून छपवून ठेवावे. महात्मा गांधींच्या चळवळींत तुरुंगांत जाण्याचं ठरवलं. तेव्हां पेटींत घालून खोल खड्डा खणून त्यांत लपविलं हें धन. खणलेली जागा साफ बुजवून त्यावर चौरंग दिला ठेवून, आणि त्यावर महात्माजींचं भलं मोठं चित्र मांडलं. मुलीला बजावून सांगितलं, कीं या चित्राची रोज पूजा करीत जा. जागचें हालवूं नकोस. हेतु हा कीं कोणाला गडंताचा पत्ता न लागावा. घेतां काय? कोणाला कळलं असतं किंवा पोलिसाला सुगावा लागत', तर व्यर्थ. पोलिसचा शक मागें लागून झटके खावे लागले असते. झालं नसतं कांहीं; पण जीव मात्र हैराण झाला असता. तुरुंगांतून परत आलों—कैदेच्या दिवसांत भीक मागण्याचें टळलें, पण प्रकृति मात्र हटली. धनाला हात लागला नाहीं हें भाग्य! आपण शहाणे असून संशय घेतां? गरीबाला वाली नाहीं हेंच खरं! निर्धन असला तर तिरस्काराचा विषय. थोडा पैसा बाळगून असला तर चोर!” (भिकाऱ्याची भाषा इंग्राडी, तो पुष्कळच बोलला; पण त्याच्या भाषणाचा आशय अशा प्रकारच होता. बोलतांना तो मध्येंच संतापे, मध्येंच गंभीर होई आणि गहिंवरून जाई. इतकें तो बोलला, पण नोंदणीदारांनीं त्याला हरकत तर केली नाहींच, पण उलट त्यांना कानकोंड्यासारखें वाटलें आणि दबलेल्या आवाजांत ते म्हणाले: “नाहीं हो, नाहीं हो! तसा कांहीं माझ्या म्हणण्याचा मतलब नव्हता.”

“नाहीं हो काय अन् हो हो काय! गरीबांचा संच म्हणजे चोरी आणि मोठ्यांचा संच म्हणजे चातुरी. गरीबांची बेइमानी अन् थोरांचा व्यवहार! पन्नास वर्षांत चार हजार जमविले, चोरीच झाली. मोठे लोक लेखणीनें कागदावर खरडतात. हजारों रुपये कमावतात. जीभ सोडवात अन् ह्यांच्यावर पैशाचा पाऊस पडतो. इकडून माल घेतात, तिकडे विकतात, लक्षाधीश बनतात. त्यांच्या ढुंगणाला सदा मोटारी चिकटलेल्या. आणि आमच्या जवळ चार हजार दिसले, कीं तुमच्या डोळ्यांत येतें!” धर्मदास खूपच आवेशानें बोलत होता.

“अहो! कां व्यर्थ डोक्यांत राख घालतां? त्यापेक्षा पैशाचें तेल घेऊन डोक्याला लावा ना?” नोंदणीदार आपल्या कोटीला स्वतःच हंसले.

“हंस साहेब, हंसा! गरीबांना कोण नाहीं हंसत? साहेब, तुम्ही लोक तीनचार हजार लोक रुपये तर सहज सिगारेटी फुंकून हवेंत मिळविता! आणखी कशाला बोलूं? कोणाच्या जिव्हारीं लागायचें! महाराज, धन जमविण्याची बुद्धि तर सर्वांनाच असते नाहीं! ज्यांना बचत करतां येत नाहीं ते दुर्दैवी व जे करीत नाहीत ते मूर्ख, असें तर तुम्ही लोकच सांगत असतां.”

“अरेच्या! तुम्हीं तर व्याख्यान झोडायची तयारी करीत आहां. आम्हाला व्याख्यानें ऐकायला सवड नाहीं समजलात कां? अन् मला तुमच्या कारभाराशीं करायचं तरी काय! तुम्हीं लिहून दिलंत. बस! एवढंच मला बघावयाचं. तुम्हीं आपल्यासाठीं कांहीं एक ठेवलं नाहीं! ... पण खरंच. तुम्हाला अखेरपर्यंत पोसण्याचा जिम्मा तुमच्या मुलीनं घेतल्याचं यांत लिहिलं आहे नाहीं का! अन् हिनं नाहीं पोसलं तर?”

“असं कसं होईल? फार चांगली आहे माझी छोकरी. मोठी दयाळू. ती नाहीं देणार मला अंतर अं! अन् तसंच झालं, तर माझी भिकेची मिरास आहेच ना कायम? मला कशाचं भय?”

“पण का हो तुमच्याजवळ, इतकं धन सांचलं असतां तुम्ही भीक काय म्हणून मागत बसलांत?” आपलं सहज विचारतों बरं का?' नोंदणीदार म्हणाले.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

" राग नका येऊं देऊं महाराज. तुमच्या जवळ धन असून तुम्ही फिरून ही नौकरीची यातायात कशाला करतां साहेब ! ह्या ना सोडून आणि करा ना कांहीं देशाची सेवा. किती तरी पैसा असतो जवळ, पण असले लोक देखील आणखी मिळविण्या-साठीं सारखे धडपडत असतात. उपयोग-सुद्धां करतां येत नाहीं त्यांना त्या पैशाचा ! खरं कीं खोटं ? आपणच सांगा कीं ! आम्ही तर काय, लहानच माणसं, अन् आमचं धन तरी कितीसं ! " धर्मदास बोलला.

" तुम्ही पंडितासारखें बोलतां. आशि-क्षित पंडित ! " नोंदणीदार उद्गारले.

मी कशाचा पंडित, इंग्रजी थोडाच पढलोंय् मी ! आपण लोक बोलतां तें ऐकत आलों. पाहतां तें पहात आलों. पण दिसतं तर असंच ! माणसाचा हा स्वभावच !" धर्मदास म्हणाला.

" याला अपवाद आहेत" प्रेक्षकांपैकीं एक जण उसळून बोलला.

" जाऊं द्या तें तत्त्वज्ञान. ही कांहीं चर्चेची जागा नव्हे ! तुम्हीं घर दुसऱ्याच्या नांवावर खरेदी केल्याचें बोललांत नव्हे ? घर परत आपलें करून घेतलेंत ना !" नोंदणीदारांनीं सवाल केला.

" हो ! हो ! परत करून घेतलं तर !" बजरंग, सांगा साहेबांना महाराज, या बजरंगाच्याच नांवानें घेतलें होतें घर. बजरंग, सांगा ना !" धर्मदास भिकारी म्हणाला.

बजरंग तेथें उभाच होता. तो म्हणाला, " होय साहेब. याचं घर मीं याला परत करून दिलें. शिवाय, आपण बक्षिसपत्र बघा. त्यावर माझी साक्षहि घातली आहे. आम्ही गरीब असलों, तरी आमची दानत भ्रष्ट नाहीं झाली सरकार. दुसऱ्याचं गिळून पापाचे धनी कशाला व्हा ?"

" जो उठतो तो टोला हाणतो. चला पुरी झाली ही चौकशी. " असें म्हणून नोंदणीदारानी लिहावयाचें तें लिहून घेतलें. सह्या वगैरे झाल्या. आंगठयाचे ठसे घेतले. नोंदणीदारांनीं अखेरपर्यंत आपला शांत पणा कायम ठेविला. असल्या प्रकारचें प्रकरण त्यांच्या समोर आज प्रथमच आलें असावें असें स्पष्ट दिसत होतें. धडधाकड माणसाला लोक भीक कशी घालतात, याचें त्यांना आश्चर्य वाटत होतें, कीं सर्वच प्रक-रणांत कांहीं खोटेपणा असावा, असल्या संशयानें त्यांना ग्रासलें होतें, कीं अन्य विचार त्यांच्या मनांत उद्भवले हें समज-ण्यास मार्ग नव्हता. धर्मदास भिकारी तावातावानें बोलला, प्रसंगी त्यांना झोंब-तील असे विचार तो वदला, तरी नोंदणी-दारांनीं आपलें मन निश्चल ठेविलें. किंबहुना, गोड रसाळ पदार्थ ज्या प्रमाणें मनुष्य प्रसन्न अंतःकरणानें भक्षण करतो, त्या प्रमाणें ते या समग्र प्रकरणाचा आस्वाद घेत असल्याचें दिसून येई.

प्रेक्षकांना देखील त्यांत मौजच वाटली असली पाहिजे. एरव्हीं एवढा वेळ तेथें तिष्ठत राहून काय करावयाचें होतें ?

" हं ! आतां झालं तुमचं काम थोडे बाहेर थांबा, आणि नोंदलेला कागद घेऊन जा. पुन्हां उद्यां यावयाला नको. बाई, म्हाताऱ्याला संभाळून घेऊन जा बरं. हे आपले रुपये, दागिने संभाळ. म्हाताऱ्याला घाबरवून देऊं नको बरं का घराबाहेर !" नोंदणीदार म्हणाले.

" नाहीं जी महाराज, " म्हणून मुलीनें सर्व गुंडाळलें.

" हूं ! चला आतां. आमचा फार वेळ या कामांत गेला. छे ! छे ! भिकाऱ्यानें खूपच गुंगविलें की " नोंदणीदार पुटपुटले.

धर्मदास भिकाऱ्यानें बाहेर पडण्याची तयारी केली.

" महाराज,गरीबाचा एक अर्ज आहे" धर्मदास भिकारी आर्जवून म्हणाला.

" आतां काय राहिलें हो तुमचें ?" नोंदणीदारांनीं विचारलें.

भिकाऱ्यानें सदऱ्याच्या खिशांतून एक वाटी बाहेर काढली.ती.नोंदणीदाराच्यासमोर धरून तो काकुळतीनें म्हणाला, "गरीबाच्या वाटींत एक पैसा टाका दयावंत. देव तुमचं भलं करील साहेब, दया धरमका मूल है!"

सर्व मंडळी थक्कच झाली. हंसावें कीं काय करावें, हें न समजल्यामुळेंच कीं काय नोंदणीदार भिकाऱ्याकडे आ वासून पहा-तच राहिले. भिकाऱ्याचा घोष चालूच होता. नोंदणीदार स्तब्ध बसलेले पाहून त्यानें प्रेक्षकांकडे आपला मोर्चा वळविला. " द्या ! द्या ! गरीबाला धर्म करा. देव तुम्हांला एकाचे हजार करून देईल." प्रेक्षकांपैकीं एकजण गुणगुणला.

" त्याचें पंचांग राहिना, मूळ स्वभाव जाईना "

तो कचेरीच्या बाहेर पडला. कचेरीच्या आवारांत भिकाऱ्यानें लोकांसमोर वाटी धरून आपली भिक्षेकऱ्याची गर्जना सर्वत्र घुमविली.

नोंदलेला कागद मुलीच्या हातांत पड-तांच ती व शिवाय मंडळी त्याला येऊन मिळाली. रुपये, दागिने वगैरे कोणाला दिसणार नाहीं, अशा तऱ्हेनें मुलीनें अंगा-वरच्या कपड्यांत छपवून ठेविले. समोर मोठमोठ्यानें भिक्षागीत गाणारा धर्मदास भिकारी, शेजारीच त्याची मुलगी व मागें दोन-तीन जण. असें तें टोळकें रस्ता चालूं लागलें. भिकारी सुरांत आळवीत होताः " देवा, धर्म बुडाला रे ! जवळी कवडी नाहीं रे ! जीव चालला बाबा रे ! द्या रे द्या रे कुणि द्या रे !

भर गांठीपर्यंत त्यांच्या वाटींत किती पैसे पडले कोणास ठाऊक ? त्याची तीक्ष्ण नजर मुलीकडे होती, हें मात्र निश्चित !

———

श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी
यांनीं उद्घाटून प्रशंसिलेला
श्री. वि. ना. कोठीवाले, पुणें (छेडलेला छावा) कृत
सचित्र संगीत

विक्रीस तयार !] **सोन्याचा धूर** [किंमत १ रु.

उत्कृष्ट तीन रंगी मुखपृष्ठ, प्रभात संगीत मंडळीचे आठ फोटो, श्रींचा जाहीर निर्णय व लेखकाची मार्मिक पण विस्तृत प्रस्तावना ! पृष्ठ संख्या १५० देवस्थान कारभा-ऱ्यांनीं प्रस्तुत पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें व हिंदूंनीं अभ्यास करून विचार करावा.

मिळण्याचीं ठिकाणें:— दि मॉडर्न बुकडेपो, पुणें.
मेसर्स, परचुरे पुराणिक आणि मंडळी, मुंबई.

मुळव्याधीवर उपाय

ज्यावेळीं एखाद्या मनुष्याला स्वतःला मुळव्याध अगर रक्तस्राव होणारे रोग झाल्याचें समजतें त्याचवेळीं त्यानें योग्य व शास्त्रशुद्ध उपाय योजून रोग समूळ नाहींसे करण्याची काळजी घेतली पाहिजे. नाहींतर त्यामुळें ॲनीमिया, मलावरोध, रक्तक्षीणता, अशक्तपणा, ताप यासारखे भयंकर रोग जडण्याची भिती असते. जीवित धोक्यांत ठेवून भलती सलती औषधे वापरूं नका. जगप्रसिद्ध औषध हाडेन्सा (जर्मनींत तयार केलेलें) (Hadensa) हे एकच औषध असें आहे, कीं तें लावल्यानें कुठल्याही स्थितींतील मुळव्याध समूळ नाहींशी होते. ऑपरेशनची जरूरी नाहीं. मुळव्याधीवर हाडेन्सा (Hadensa) एकदांच लावल्यानें आराम वाटून रक्त वाहण्याचें तावडतोब थांबतें. अमेरिका, युरोप, हिंदुस्थान, चीन वगैरे देशांतील डॉक्टर लोक हॉस्पिटल्समधून याचाच उप-योग करतात. ते हाडेन्साची "मुळव्याधीनें त्रासलेल्यांना हाडेन्सा (Hadensa) ही देणगीच आहे " अशी शिफारस कर-तात. आपल्या जवळच्या औषधीदुकान-दाराकडून हाडेन्सा (Hadensa) खरेदी करा. नकली मालापासून सावध राहा.

धनुर्वात व इतर वातजन्य रोगांवर उपाय

हातापायांचे सांधे व कंबर दुखणें. सुजणें व ताठरणें ही धानुर्वात व त्यासारखेच इतर वातजन्य रोग घातक व किळसवाणे असतात. ह्या रोगांची जाणीव होतांच उपाययोजना सुरू केली पाहिजे.

डॉ. इडस् पिल्स
Dr. Eades Rheumatic & Gout Pills.

हें औषध आज ८८ वर्षे चालू असून ह्या औषधाचा फायदा सर्व जगभर लाखो लोकांनीं घेऊन गुणाची तारीफ केली आहे. रोग कितीही जुना व असाध्य असला तरी ह्या औषधानें हटकून बरा होतो व पुनः पुनः उद्भवत नाहीं. शरीरांत यूरीक आसीडची वाढ झाल्यानें हरएक प्रकारचे वातरोग उद्भवतात. इडस् पिल्सच्या उप-योगानें यूरीक आसिडचा प्रतिकार होऊन रोग मुळासकट नाहींसे होतात.

औषधी दुकानांतून सर्वत्र मिळेल.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

: लेखक :
ग. त्र्यं. माडखोलकर

"आतां कशी काय दिसतें मी? मघांचच्या पेक्षां अधिक मोहक नाहीं वाटत तुला ?"

सुषमेनें हातातील ओष्ठशलाका (lip stick) खालीं ठेवून उत्कंठेनें मागें पहात इंग्रजींत विचारलें.

पण तिचा हिरमोड झाला.

विद्याधराचें लक्ष तिच्याकडे मुळींच नव्हतें. तो कोचाच्या कमानीवर डोकें टेंकून कसल्या तरी गाढ, गूढ विचारांत निमग्न झाला होता.

आपल्या विषयींची त्याची ती उपेक्षा-वृत्ति पाहून सुषमेला फार राग आला. पण त्या रागाची जाणीव त्याला देण्यांत अर्थ नाहीं, हें लगेच तिच्या लक्षांत आलें. म्हणून ती हळूच त्याच्या जवळ गेली; व अर्धवट त्याच्या अंगावर रेलून त्याला लघवीपणानें म्हणाली—

"कसला विचार करतो आहेस विद्या तूं आज एवढा ? मी आरशासमोर उभी असल्यापासून पहातें आहें.—तूं आपला कसल्या तरी विचारांत चूर आहेस सारखा. मी जवळ असतांना तूं दुसऱ्या गोष्टींचा विचार करावास हें सहन नाहीं होत मला !—"

—बोलतां बोलतां तिनें आपलें तोंड चुंबनाच्या अपेक्षेनें त्याच्या तोंडाला भिडविलें.

पण विद्याधरानें लगेच मान फिरविली.

त्याबरोबर सुषमा आर्जवानें त्याला म्हणाली, "नाहीं, नाहीं.—विद्या, तोंड नको फिरवूंस तूं अशा रीतीनं.—तूं यायचा असल्यामुळं आज सकाळपासून शिवलें नाहीं मी सिगारेटला !—"

आणि ती त्याच्या अंगाला अधिकच बिलगली.

त्यानें तिच्या लोभनीय शरीराभोंवती आपले हात लपेटून उन्मादानें अर्धवट मिटलेल्या तिच्या डोळ्यांचें, केंसांचें, कपाळाचें भराभर चुंबन घेतलें.

पण तिचें समाधान झालें नाहीं.

तिनें इंग्रजींत विचारलें, "तूं माझ्या ओठांचं चुंबन कां घेत नाहींस विद्या ?"

"तुला माहित आहे सुमा मी कां घेत नाहीं तें !"

तिनें पदरानें ओठाला नुकताच लावलेला रंग पुसून टाकला व नंतर म्हटलें, "आतां तर हरकत नाहीं ना ?"

आतुरतेनें अर्धवट उमललेल्या तिच्या ओष्ठकलिकेला त्यानें आपल्या ओठांनीं हळूच स्पर्श केला; व त्याच्या तोंडून अत्यंत आर्त उद्गार निघाला—

"सुमा !—"

"काय विद्या ?—अजूनसुद्धां कसला तरी विचार करतो आहेस तूं ! मी इतकी तुझ्याजवळ आहे, पण मला सारखं वाटतंय कीं आपण एकमेकांपासून लाखों मैल दूर आहों ! खरं सांग विद्या,—मी तुझ्या जवळ असतांना तूं कसला विचार करीत असतोस एवढा ?

"पुनर्जन्माचा !—"

"पुनर्जन्माचा ? अन् कुणाच्या तो ?"

"आपल्या प्रेमाच्या पुनर्जन्माचा !"

"कां ? त्यांत विचार करण्यासारखं काय आहे ?"

"कां ? त्यांत विचार करण्यासारखं काय नाहीं ? मीच तुला उलट विचारतों !—सहा महिन्यांपूर्वी तुझ्या स्वप्नांत तरी आलं होतं का आपण पुन्हा अशा रीतीनं एकत्र येऊं म्हणून ?"

"हो !—न यायला काय झालं ? आपला दोघांचा संबंध तुटल्यापासून गेल्या पांच वर्षांत माझ्या आयुष्यांतला एक क्षणहि असा गेला नाहीं, कीं ज्या क्षणीं मला तुझी आठवण झाली नसेल.—माझ्या सौंदर्यावर लुब्ध असलेल्या इतर तरुणांच्या सहवासांत मी जेव्हां नव्या नव्या सुखांचा आस्वाद घेत होतें, तेव्हां त्या आत्मविस्मृतीच्या क्षणीं सुद्धां, विद्या, तुझी आठवण मला सारखी डिंवचीत असे, माझ्या अंतर्मनाच्या तळघरांत पिशाचासारखी वावरत असे ! आपण पुन्हा कधीं एकत्र येणार नाहीं, असं मला कधींच वाटलं नाहीं;—नव्हे, उलट मला सारखं असं वाटत होतं कीं ज्या क्षणीं मी तुझ्या नांवाचा टाहो फोडीन त्या क्षणीं तूं धांवत येशील माझ्याकडे ! आणि तसंच नाहीं का घडलं अखेर ?"

"होय.—घडलं खरं ! त्या दिवशीं संध्याकाळीं थिएटरांत तुझी चिठी आली, तेव्हां विश्वास बसेना माझा स्वतःच्या डोळ्यावर !—पण तें हस्ताक्षर पाहतांच तुझी मूर्ति माझ्या डोळ्यांपुढें उभी राहिली न् मंत्रमूढ होऊन मी तुला भेटण्यासाठीं बाल्कनींत आलों ! खरोखरीच तुझी एक प्रकारची सत्ता आहे माझ्या मनावर, मोहनी आहे माझ्या शरीरावर—"

"आणि तुझी नाहीं का रे मोहनी माझ्या मनावर, माझ्या शरीरावर ?—"

"होय. मी नाहीं म्हणतों कां ? त्या मोहनीमुळंच तर पांच वर्षांच्या वियोगानंतर, पांच वर्षांपूर्वी झालेल्या विलक्षण भांडणानंतर आपण पुन्हां एकत्र आलों. पण, आपल्याला एकमेकांविषयीं वाटणाऱ्या या आसक्तीचें मी पृथक्करण करूं लागलों, म्हणजे आपल्या प्रेमाचा हा पुनर्जन्म अनिष्ट वाटतो, निरर्थक वाटतो मला !"

"कां बरं ? पूर्वीपेक्षां मी तुला कमी आवडतें का ? माझ्या सहवासापासून तुला सुख कमी होतं कां ?"

"तुझ्याविषयींची माझी आवड, आसक्ति कमी झालेली नाहीं, होणें शक्यहि नाहीं ! पण सुख ? कुणाला ठाऊक! तुझ्यापासून मला सुख होतं कां असुख होतं तें ?"

"असं का बोलतोस तूं विद्या ? आपली ताटातूट झाल्यापासून गेल्या पांच वर्षांत मी ज्या पद्धतीनं आयुष्य घालविलं ती पद्धत, माझा सध्यांचा जीवनक्रम तुला पसंत नाहीं याची जाणीव आहे मला.—पण तुला न आवडणाऱ्या माझ्या किती तरी संवई मी सोडल्या, सोडण्याचा सारखा प्रयत्न करतें आहे—"

"होय, खरं आहे तुझं म्हणणं. पण, सुमा, गेलीं पांच वर्षं तुझं आयुष्य ज्या पद्धतीनं गेलं त्यामुळं तुझ्यांत कांहीं फरक पडला नाहीं, तुझ्या मनोरचनेचं—जीविताचं स्वरूप कांहीं बदललं नाहीं असं वाटतं का तुला ?—तो पालट सारखा मला जाणवत असतो;—क्षणोक्षणीं मला सांगत असतो कीं, पांच वर्षांपूर्वी जिच्याशीं तूं विवाहबद्ध व्हायला उत्सुक झाला होतास ती सुषमा ही नव्हे,—ही दुसरीच कोणी तरी स्त्री आहे. त्या स्त्रीच्या आंतर जीवनाचा न् तुझ्या आंतर जीवनाचा कांहींहि संबंध नाहीं.—आपण ज्या वेळीं एकमेकांविषयींच्या आसक्तीनं उन्मत्त आणि एकजीव झालेलीं असतों, तेव्हांसुद्धां ही कल्पना जात नाहीं माझ्या मनांतून—"

"दुसरी स्त्री ? होय—खरंच आहे तुझं म्हणणं ! पण कधीं नव्हतें मी दुसरी स्त्री ? फक्त तूं मला ओळखलं नाहींस त्या वेळीं एवढंच !—"

—बोलतां बोलतां सुषमा झटकन त्याच्या जवळून उठून टेबलापाशीं गेली. पाश्चात्य नटींप्रमाणें तिनें आपल्या साऱ्या केंसांना कातर लावली नव्हती; तर फक्त कानांच्या जवळचे केंस अशा रीतीनें कापले होते कीं, कधींच तेल न लावल्यामुळें पिंगट पण सतेज दिसणारीं त्यांचीं कुरळीं झुलपें तिच्या प्रत्येक हालचालीगणिक अतिशय मोहक रीतीनें हलत असत. टेब-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लावरील डब्यांतली एक सिगारेट तिनें काढली; व ती पेटवून घाईघाईनें तिचे तीन चार झुरके घेतले. तिचें तें धूम्रपान पाहून विद्याधराच्या कपाळाला पडलेल्या आंठया तिच्या लक्षांत आल्या कीं नाहीं, कोण जाणे! कारण आपल्या किंचित् उंचावलेल्या, स्फुरणशील, नाजूक नाकपुड्यांतून बाहेर पडणाऱ्या सुवासिक धुराच्या वलयांकडे पहात ती, अर्धवट स्वतःशींच बोलावें त्याप्रमाणें, एक प्रकारच्या बेपर्वाईनें उद्गारली—

कांहीं कांहीं सुद्धां मेळ नव्हता.—ही गोष्ट जर तूं त्या वेळीं ओळखली असतीस, तर मी सिनेमांत जायचं ठरवल्याबरोबर तूं आपलं निश्चित झालेलं लग्न मोडलं नसतंस, माझ्यावर नाहीं नाहीं ते आरोप करून माझ्याशीं संबंध तोडला नसतास!—आणि आज तूं एकादा नवीन शोध लावल्यासारखं मला सांगतोस--"तूं अगदीं दुसरीच स्त्री वाटतेस मला!"—त्या वेळीं ज्या स्त्रीवर तूं प्रेम केलंस, तीच स्त्री मी आजहि आहें. फार तर परिस्थितीमुळं माझ्या बाह्य

प्रेम! प्रेम! –प्रेम म्हणजे काय एका माणसाचं व्यक्तित्व दुसऱ्या माणसाच्या व्यक्तित्वांत विलीन होऊन जाणं का?

" प्रेम! प्रेम!–प्रेम म्हणजे काय एका माणसाचं व्यक्तित्व दुसऱ्या माणसाच्या व्यक्तित्वांत विलीन होऊन जाणं कां? स्त्री म्हणजे काय मिठाचा खडा किंवा मातीचं ढेंकूळ आहे, कीं एकाद्या पुरुषावर तिचं प्रेम जडतांच त्याच्या जीवनांत तिचं व्यक्तित्व विरघळून, नाहीसं होऊन जावं? तो मिठाचा खडा किंवा तें मातीचं ढेंकूळ पाण्याची रुचि न् रंग थोडा तरी बदलतं. पण ज्याच्यावर स्त्रीचं प्रेम बसलेलं असतं तो पुरुष!–त्याच्या जीवनांत कांहींच का बदल होऊं नये तिच्या व्यक्तित्वाच्या प्रभावानं? तिचं व्यक्तित्व थोडं सुद्धां शिल्लक राहिलेलं सहन होऊं नये का त्याला!–विद्या, आठवण कर तूं,–कॉलेजांत पहिल्या वर्षी आपली ओळख झाल्यापासून तों पुढें पांच वर्षांनीं ताटातूट होईपर्यंत आपलं आयुष्य कशा रीतीनं गेलं याची! आपल्या एकमेकांवरील प्रेमाचं काव्य कॉलेजांत ज्या वेळीं प्रत्येक विद्यार्थ्यांच्या तोंडीं खेळत होतें, त्या वेळीं सुद्धां भांडणाशिवाय एक दिवस सुना नाहीं गेला आपला!—आपलीं मतं, आपले स्वभाव, आपली अभिरुची यांच्यांत जीवनांत काय फरक पडला असेल तेवढाच--"

"होय तुझ्या म्हणण्यांत तथ्य आहे सुमा! आपल्या मतांतला, स्वभावांतला, अभिरुचींतला विरोध मला तेव्हां जाणवत नव्हता असं नाहीं. त्या विरोधामुळंच आपल्याला एकमेकांविषयीं आकर्षण वाटलं इतकं—"

"नाहीं इथं सुद्धां चुकतंय पुन्हा तुझं!–आपल्यामधलं आकर्षण वाढायला तो विरोध पोषक झाला असेल कदाचित्. पण आपल्याला एकमेकांविषयीं इतकं आकर्षण वाटण्याचं खरं कारण निराळं आहे अगदीं."

"कोणतं कारण?—मधाशीं माझ्यावर शोध लावल्याचा आरोप केलास तूं! आतां तुझा हा शोध ऐकूं दे मला— "

"माझा शोध नाहीं हा विद्या! तूं एवढा बुद्धिमान, तर्ककुशल, आपल्या प्रेमाच्या पुनर्जन्माविषयीं सारखा विचार करित असलेला!—पण त्या प्रेमाची कारणं समजून घेण्याचा मात्र प्रयत्न नाहीं केलास तूं कधीं!–आपण दोघं एकत्र आलों, तीं सौंदर्याविषयींच्या आपल्या विशिष्ट कल्पनांमुळं. पुष्कळदां असं होतं कीं, एकाद्या माणसाचे विचार, त्याचं वर्तन आपल्याला आवडत नाहीं. पण त्याचं रूप, त्याचं व्यक्तित्व, त्याच्या डोळ्यांतून जगाकडे बघणारी त्याची बुद्धिमत्ता यांची छाप पडते आपल्या मनावर. तसंच झालं आपलं. स्त्रीसौंदर्याविषयींच्या, स्त्रीच्या व्यक्तित्वाविषयींच्या तुझ्या कल्पनांना जुळतील अशा बऱ्याचशा गोष्टी तुला माझ्या ठिकाणीं आढळल्या, म्हणून तूं माझ्याकडे ओढला गेलास. तूं स्वतःच किती तरी वेळां हें बोलून दाखवलं आहेस मला—"

"म्हणजे काय तुला असं म्हणायचं आहे कां कीं तुझ्याविषयीं केवळ एक प्रकारचं शारीरिक आकर्षण वाटल्यामुळं मी तुझ्यावर प्रेम करूं लागलों!"

"तसंच केवळ नव्हे. आणि, समजा, जरी कदाचित् तसं असलं, तरी राग मानण्यासारखं गैर काय आहे एवढं त्यांत? प्रेमाविषयींच्या आपल्या साऱ्या उच्च न् अमूर्त कल्पना शेवटीं शरीरालाच येऊन भिडतात न् सफल होतात कीं नाहीं?–पण तुला माझ्याविषयीं जें आकर्षण वाटलं, तें नुसतं शारीरिक नव्हतं विद्या. एकदां रुस्तुमनं विचारलं होतं तुझ्याविषयीं मला. "तो विद्याधर वकील इतका रुक्ष न् एकमार्गी असतां तुझं त्याच्यासारख्या माणसावर इतकं प्रेम कसं जडलं सुमा?" तेव्हां मी त्याला जें उत्तर दिलें, तेंच तुझ्याहि माझ्याविषयींच्या प्रेमाला लागू पडतं—"

"काय सांगितलंस तूं त्याला?"

सुषमेनें सिगारेटचें हातातलें थोटूक फेंकून दिलें; व दुसरी सिगारेट पेटवीत त्याला म्हटलें, "मी त्याला सांगितलं,— "पुरुषाच्या सौंदर्याविषयीं माझ्या कांहीं कल्पना आहेत. त्या कल्पना नुसत्या शारीरीक नाहींत, बौद्धिकहि आहेत. त्या कल्पनाचं प्रतीक म्हणून मला आवडतो विद्याधर! तो रुक्ष असेल, कायदेपांडित्यापलिकडे दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींत त्याला गम्य नसेल. पण तरीहि माझं कलासक्त मन त्याच्याकडे ओढ घेतं. कदाचित् त्याच्या त्या रुक्षपणांतच कांहीं तरी मोहनी असेल. आकाश फाडून आंत घुसणारा पर्वताचा उंच बेलाग सुळका आपल्याला कां आवडतो? जुहूच्या वाळवंटांतलं फक्त चांदण्याचंच तेवढं दृश्य आपल्याला आवडतं का!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ाऱ्यानें डोलणाऱ्या ाडाच्या झांवळ्यांतून खरलेला काळोख न् त्या माडांच्या गर्द ांगांमागून ऐकूं येणारी समुद्राच्या भर-ीची गर्जना हीसुद्धां मनाला एक निराळ्याच प्रकारचा आनंद देत नाहीं का? ासंच कदाचित् असेल हें—''

" पण सुमा, तूं रुस्तुमशीं लग्न करणार असें ऐकलं होतं मी गेल्या वर्षी—''

" होय. लोकांना तसं वाटण्यासारखी रिस्थिति उत्पन्न झाली होती खरी. तो वदोदित माझ्या मागें मागें, मी जाईन तिथं ाझ्याबरोबर असायचा. खरोखर विद्या, गेल्या पांच वर्षांत पुष्कळ पुरुषांचा सहवास घडला मला. पण रुस्तुमइतका प्रणयक्रीडेंत चतुर असलेला तरुण मी पाहिला नाहीं दुसरा! आणि तो सुंदर तरी किती आहे!—''

" मग तूं कां नाहीं केलंस लग्न त्याच्याशीं?

-" लग्न?—त्याच्याशीं लग्न करण्याची कल्पना कधींच माझ्या मनांत आली नाहीं!—''

—बोलतां बोलतां ती सिगारेटचा एक झुरका घेऊन किंचित् थांबली. आपण रुस्तुमविषयीं जें बोललों त्यामुळें विद्याधर खिडल्यासारखा झाला आहे, हें तिच्या लक्षांत आलें; व त्याला जास्त डिवचावा म्हणूनच कीं काय, ती पुन्हा एक झुरका घेऊन त्याच्याकडे संथपणानें पहात म्हणाली—

—" पण आपल्याला प्रिय असलेल्या पुरुषाला स्त्री जें कांहीं देऊं शकेल, तें सारं मी रुस्तुमला दिलं आहे!—''

" सुमा!—''

" होय, मी अगदीं खरं खरं सांगतें आहे तुला. माझ्यासारख्या सुशिक्षित स्त्रियांचा हा दृष्टिकोन तुम्हां पुरुषांना कां समजूं नये, कळत नाहीं मला! मी असे पुष्कळ पुरुष पाहिले आहेत कीं, ज्यांचं एकाद्या स्त्रीवर अत्यंत प्रेम असतं, तिच्याविषयीं त्यांना कमालीची आसक्ति वाटत असते, तिच्या सहवासांत ते दिवसच्या दिवस मजेनें घालवितात!—पण लग्नाच्या बंधनानं मात्र स्वतःला तिच्याशीं जखडून घ्यायला ते तयार व्हायचे नाहींत कधीं. ती स्त्री फक्त त्यांना प्रिया, मैत्रीण, सहचरी म्हणून हवी असते; पत्नी म्हणून नव्हे. या त्यांच्या वृत्तीबद्दल मी तरी त्यांना दोष देणार नाहीं. कारण एकादी व्यक्ति आपल्याला प्रिय व्हायला, तिच्याविषयीं आसक्ति वाटायला, तिचं साहचर्य आवडायला जे लोभनीय गुण अवश्य असतात, ते विवाहित आयुष्य, संसार यशस्वी करायला उपयोगी पडतातच असं नाहीं. संसार, विवाहित आयुष्य सुखी न् सफल व्हायला स्थैर्य, मनोभावनांचं एक प्रकारचं गांभीर्य अवश्य असतं.—Hopelessly settled असं जें विवाहितांच्या आयुष्याला येणाऱ्या स्थैर्याचं वर्णन शॉनं केलंय तें उगाच नव्हे!—''

" ढोंगी आहे तुझा तो शॉ! स्वतःच्या वैवाहिक आयुष्याची निसटती छटासुद्धां ज्यानं कधीं जगाला दिसूं दिली नाहीं, त्या शॉचे या विषयावरले विचार कशाला ऐकवतेस तूं मला सुमा?—तुझा न् रुस्तुमचा संबंध—''

"—तेंच तुला समजावून सांगण्याचा प्रयत्न करतेंय मी!—काय बोलत होतें वर मी?—होय! स्त्रीपुरुषांच्या साहचर्याचा सारा आनंद प्रेमाच्या तरलतेंत, त्या तरलतेचा अनिर्बंध उपभोग घेण्यांत आहे. प्रेमाचं अमरत्व ही कविकल्पना आहे निव्वळ एक. प्रेम हें फुलपांखरासारखं असतं. त्याला कुठंच कायमचं घर करून रहायला आवडत नाहीं, आवडणं शक्य नाहीं. प्रेम आणि जीवन! किती जणांना या शब्दांचा अर्थ कळला आहे कुणाला ठाऊक? जीवनाची सारी मजा, सारी जादू तें चंचल, प्रवाही, सैराट असण्यांत आहे!—स्त्रीला एकादा पुरुष प्रिय वाटला, म्हणून काय लगेच तिनें त्याच्याशीं लग्न करून त्याच्या गळ्यांतलं जोखड होऊन कां बसलं पाहिजे!—''

" मग रुस्तुम तुझा प्रियकर होता म्हणायचा तर?''

" होय. खरंच आहे तुझं म्हणणं एका परीनं! जुहूला, पारसीकला, माथेरानला, महाबळेश्वरला मी कितिदां तरी सारी रात्र त्याच्याबरोबर गप्पा मारण्यांत, हिंडण्यांत, खेळण्यांत, नाचण्यांत घालविली आहे. माथेरानचाच प्रसंग तो मला वाटतं!—त्या रात्रीं त्यानं मद्य थोडं जास्त घेतलं होतं; न् नंतर नाचतां नाचतां तो मला म्हणाला, त्यानं मला सुचवलं,—पण मी कबूल नाहीं झालें त्या गोष्टीला. मात्र त्याच्या त्या सुचविण्याचा राग नाहीं आला मला'-आम्ही दोघंहि बेहोष झालों होतों नुसतीं!—पण मी त्याला स्पष्टच सांगितलं, "रुस्तुम, माझं हृदय मी विद्याधराला देऊन टाकलं आहे'' खरोखर विद्या, तुझ्या खालोखाल जर जगांतल्या दुसऱ्या कोणत्या पुरुषावर मी प्रेम केलेलं असेन, तर तें रुस्तुमवर!—पण तुझ्याविषयीं जें आकर्षण मला वाटतं, तें मात्र त्याच्याविषयीं कधींहि वाटलं नाहीं.—मला वाटत नाहीं दुसऱ्या कोणत्या पुरुषाविषयीं असं आकर्षण मला कधीं वाटेल म्हणून! आणि मला जसं हें आकर्षण तुझ्याविषयीं वाटतं, तसंच तुलाहि माझ्याविषयीं वाटतं. तें आकर्षण निव्वळ शारीरिक नाहीं, निव्वळ बौद्धिकहि नाहीं.—शरीर आणि बुद्धि या दोहींनाहि ओढ लावणारी जादू ह्या आकर्षणांत आहे—''

बोलतां बोलतां ती थांबली. तिच्या हातांतली सिगारेट विझली होती.

खोलींत झपाट्यानें काळोख पडत चालला होता.

म्हणून विद्याधरानें उठून दिवा लावला. दिव्याचा प्रकाश अंगावर पडतांच सुषमा दचकली व तिनें भानावर येऊन विद्याधराकडे बघितलं.

—तो तिच्याकडे निश्चल नजरेनें पहात होता.

विद्युद्दीपाचा उज्ज्वल प्रकाश तिच्या अंगावर पडून तिच्या अनावृत अवयवांतून कांति जणूं ओसंडत होती.

आणि त्याच्याकडे पहातांना किंचित् तिरप्या झालेल्या तिच्या मानेवर उठलेले घर्मबिंदु केतकीच्या पानावर नितळ चमकणाऱ्या दंवबिंदूंच्या रेषेसारखे दिसत होते.

विद्याधराला वाटलें, तिच्या त्या पीतगौर मानेचें, त्या निमुळत्या चंचल नेत्रांच्या कडांचें चुंबन घ्यावें.

—तो तिच्याजवळ जाऊन म्हणाला, " तूं म्हणतेस तें खरं आहे सुमा. तुझ्या रूपांत, डोळ्यांत बुद्धींत, हालचालींत जो मोहक चंचलपणा भरलेला आहे, त्यामुळेंच तूं आवडतेस इतकी मला-तुझ्या विषयीं मला वाटणारं हें आकर्षण कधींहि नाहींसं व्हायचं नाहीं. त्या आकर्षणानंच पांच वर्षांनंतर आपल्याला पुन्हां एकत्र आणलं. तरीसुद्धां, तुझ्या सहवासांत मला पूर्वीसारखा आनंद वाटत नाहीं आतां—''

" तुला सारखं वाटत असतं—ही तोंड रंगवते, धूम्रपान करते, केव्हां केव्हां मद्यसुद्धां घेते, वाटेल त्या पुरुषाबरोबर हिंडते फिरते!—माझ्या या स्वैर जीवनक्रमामुळें केव्हां केव्हां अविश्वास वाटत असेल तुला माझा नाहीं का? पण माझ्या या स्वैरतेमुळें, या चंचलपणामुळेंच तुला मी आवडतें ना? कल्पना कर, सांप्रदायिक नीतिबंधनांनीं जखडलेल्या इतर तरुणींसारखं माझं आयुष्य जर निर्लेप, बेचव असतं, तर तुला आवडलें असतें का मी? तुझ्या शरीराला न् बुद्धीला नवनव्या संवेदना देण्याची जी शक्ति माझ्या ठिकाणीं आहे, त्यामुळंच तुला मोह पडतो ना माझ्या विषयीं?—''

" होय.—तूं मदिरा आहेस एक प्रकारची. कांहीं काळ उत्तेजक, पण शेवटीं थकवा आणणारी! पूर्वी तुझ्यांतला चंचळपणा इतका अतिरेकाला गेला नव्हता. आतां मला असं वाटतं, तुझ्यांतले इतर सारे गुण लोपून गेले न् चांचल्य—अगदीं अवखळ, बेछूट असं चांचल्य तेवढं शिल्लक राहिलं आहे!—म्हणूनच मला वाटतं जिच्यावर मी पूर्वी प्रेम केलं ती स्त्री तूं नव्हेस—''

" असं नाहीं तुला वाटत!—तूं मला फसवायला पहातोस भलतेच शब्द वापरून;- स्वतःला हि कदाचित् फसवीत असशील! तुला खरोखरी काय वाटतं तें सांगतें मी.—सांप्रदायिक नीतिबंधनांनीं जखडलेल्या तुझ्या मनाला असं वाटतं कीं, जिच्यावर आपण प्रेम केलं, करतों आहोंत, त्या या स्त्रीचा आयुष्यक्रम किती विचित्र आहे!—या शंकेनें पावलों पावलीं व्याकुळ होतं तुझं मन.—पण विद्या, मी आहे ही अशी आहे. माझा आग्रह नाहीं मुळींच!—तुला वाटल्यास तूं माझा स्वीकार कर. गेलीं पांच वर्षें मी तुझ्या आशेनें अनेक लक्ष्मीपुत्रांना लाथाडलं;—मला आवडणाऱ्या रुस्तुमच्याहि प्रेमाचा अव्हेर केला. माझं मन मला सारखं सांगतं आहे—विद्या माझा आहे, केव्हां तरी आम्ही एकत्र येऊं न् सुखी होऊं. तें स्वप्न खरं करणं न करणं तुझ्यावर अवलंबून आहे.—''

तिनें बोलतां बोलतां त्याच्या मानेभोंवतीं आपल्या हातांचा विळखा घातला.

तिच्या धूम्रवासित ओठांना विद्याधराच्या ओठांचा स्पर्श झाला, त्याचे हात तिच्या शरीराभोंवतीं लपेटले.

जणूं कांहीं सागर आपल्या अनंत ऊर्मींनीं पृथ्वीला कामरूपिणी हृदयाशीं धरण्याचा प्रयत्न करीत होता.

मुंबईंत मध्यवस्तींत राहण्याची उत्कृष्ट सोय!

— म्हणजेच —

माधवाश्रम

गिरगांवांत, ट्रॅम, रेल्वे यांना नजीक.
भोजन व राहण्याची सर्व सुव्यवस्था
आणि हें सर्व अगदीं माफक दरांत—
माधवाश्रम, पारेख स्ट्रीट, मुंबई नं. ४.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भैरवी

: लेखक :

न. दा. सरपोतदार

मंजुळ नाद असाऽऽमधुवानि याऽऽ

घुमवि कान्हाऽऽमुरलि मधुराऽऽ ॥

" काय आवाज आहे हो या बाईचा ! अगदीं सारंगीच ! "

" धा ! म्हणूनच तिला तर बांसरीवालि म्हणतात ! "

" म्हणजे ! हें तिचें खरें नांव नाहीं वाटतं ? "

" छे ! तिचें खरें नांव दुसरेंच कांहीं तरी आहे. शिवाय ती जातीनें ब्राह्मण आहे ! "

" काय म्हणतां ! "

" तर–आमच्या–त्या–ह्याची–ती अगदीं जवळची नातेवाईक आहे. म्हणून तर मला माहीत. "

" वा ! मग अगदींच आश्चर्य ! ब्राह्मण आणि इतकी गाणारी ? "

" तसेंच म्हटलें, तर ती सौभाग्यवतीहि आहे ! "

" अरे वा ! मग तर कमालच झाली आश्चर्याची ! "

" हिचा नवरा मोठा आर्टिस्ट आहे म्हणतात. चांगला २००।३०० रुपये कमवतो तो महिना ! "

"वा वा ! आतां तर अगदींच आश्चर्य चकित झालों मी. "

—वाहे तोंवरि मंद सलिल

यमुनाऽऽऽ!

" वा ! काय हरकत घेतली हो तिनें ?

" आणि मुरकी–बिलंपत तरी काय कमी आहे ? "

" अगोदर गळाच फार चांगला आहे—तशांतून सुरेल."

" अहो; सारंगीच म्हणाना ! "

" बरोबर बोललांत. दुसरी उपमाच नाहीं–आमच्या राजहंसानें– आय मीन–बालगंधर्वांनीहि डोलत रहावें !

" काय राव गप्पा मारताहांत ! एवढीशी शेंबडी पोर—तालाचा पत्ता नाहीं नि गळ्याची मेहेनतहि दिसत नाहीं तिचीशी. नि म्हणताहांत नारायण श्रीपादांना डोलायला लावील ! एक स्त्री गाते आहे म्हणून स्तुति करायची ! पण त्यालाहि कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं ? कीं आपला गोड गळा असला कीं, झाला तो बालगंधर्वच ? मग तुम्ही कधीं–रहिमतखां ऐकला का ? "

" छे बुवा ! ते दहा बारा वर्षांपूर्वीच परलोकवासी झाले म्हणतात... "

" हो. "

पण–त्यांनीं गाणें सोडलें होतें वीसपंचवीस वर्षांपूर्वीच. "

" बरोबर आहे. पण आमच्यासारखे शोकीन–कुरुंदवाडला जाऊन वाटेल त्या खटपटीनें त्यांना गायला लावीतच होतें म्हणा ! बरें तें जाऊं द्या. "

" तुम्ही अब्दुल करीमखांना तरी ऐकलें आहांत का कधीं ? "

" हो ऐकले आहेत मुंबईच्या फॉर्बस-हॉलमध्यें "

" मग त्यांच्यापेक्षां चांगला आवाज आहे का या बाईचा ? "

" अगदीं त्यांच्यासारखाच नाहीं. पण जवळ जवळ तसाच म्हणायला कांहीं हरकत नाहीं—"

" मग आमचा महाराष्ट्र कोकीळ सरनाईक काय कमी आहे ? "

" असेल बुवा तो ! पण, आम्हांला आपलें या बाईचेंच गाणें बरें वाटतें. "

"बरोबर ती बाई आहे नाहीं ? का तशांतून ब्राह्मण !

" ऐका. ही भैरवी सुरू झाली ! "

" अरे वा ! काय मिठी आहे हो ?"

" वा ! छान तान घेतलीन्. "

" कां हो, अतां कां बोलत नाहीं इंदूरकर ?"

" थांबा हो पुणेकर, कांहीं ऐकूं द्याल कीं, नाहीं अम्हांला ? ' '

—प्रभु आला आतां गोकुळींऽऽ

ऽऽ—चिरशांति वसे भूतलीं ॥

* * *

वरील श्रोत्यांचे संवाद एका भव्य हवेलीखालीं–रस्त्यावर चालले होते—आणि हवेलींत—नानासाहेब सरमंडळांकडे त्या बाईचें गाणें चाललें होतें. ती बाई मोठी गायिका म्हणून प्रसिद्ध नव्हतीच; पण तिचा आवाज मात्र अतिमधुर होता. शिवाय, तिच्या म्हणण्यांत जिव्हाळा विशेष होता. गाण्यांतील शब्दांच्या अर्थाकडे लक्ष देऊनहि ती म्हणत असे. त्यामुळें साहजिकच गाण्यांत भावनाप्रधानता उमटे. ती गायिका सुशील, सुशिक्षित–कुलीन व सौभाग्यवतीहि होती म्हणतात ! पण तें तिचें सुभाग्य फार दिवस टिकलेलें नसावें; आणि म्हणूनच आज तिला उदरनिर्वाहासाठींच गायिका बनावें लागलें होतें.

ते दिवस पुण्यांतल्या गणपति उत्सवाचे—त्यावेळीं पुण्यांत मेळ्यांची म्हणजे कोण गर्दी ! तसाच प्रसिद्ध वक्त्यांच्या वक्तृत्वाचा पाऊसहि जोरांत पडत असायचा. शेठ–सावकार व श्रीमंत सरदारांकडे खासगी गाण्यांच्या बैठकीहि तशाच रंगत होत्या–ग्लोबमध्यें प्रभातचा अयोध्येचा राजाहि पुन्हां आला होता—अन् कोणचीशी एक प्रसिद्ध नाटक मंडळीहि किर्लोसकर नाटकगृहांत आपल्या खास सौभद्र-शाकुंतलाचे प्रोग्राम करीत होती. दाणे आळींतल्या विजयानंद थिएटरांतहि झकास बाबूराव व बिजलीचा तमाशा रोज चालू होता. इतके प्रोग्राम पुण्यांत एकाच वेळीं चालू होते तरी पण—बांसरीवालेच्या गाण्याला सरमंडळांच्या शिवप्रासादांत तोबा उडाला होता ! एवढेंच नव्हे तर प्रासादाभोंवतालच्या गल्लींतून–आजूबाजूच्या गच्चीवरून (पुण्याच्या स्पेशल पत्र्यांवरून)–घरांच्या छपरांवरून व खालीं रस्त्यावरूनहि चिक्कार गर्दी झाली होती. अगदीं निर्भीडपणें बोलायचें, म्हणजे हाऊस आणि हाउसेसहि फुल्ल होतीं ! तरी हें गाणें अगदीं आयत्या वेळीं ठरलें होतें व त्याची मुद्दाम होऊन जाहीरखबरहि कोठें दिलेली नव्हती. पण श्रोत्यांची खात्रीच, कीं गणपति उत्सवांत बांसरी–वालेचें गाणें कुठें नाहीं कुठें तरी असावयाचेंच. दहा दिवसांपैकीं एकहि दिवस तिचा रिकामा जायचा नाहीं. उलट, एकाच रात्रीं तीन तीन सुपाऱ्या तिला यायच्या, पण ती त्यांपैकीं एकच स्वीकारायची; व २।३ तासच फक्त गायची. ती दोन वाजल्यानंतर तर कधींच गायची नाहीं–ती–वेळेवर यायची वेळेवरच गाणें सुरू करायची नी–अगदीं वेळेवरच गाणें बंद करायची ! तसेंच चांगला अवाज असला, तरच गाण्याचें आमंत्रण स्वीकारायची, नाहीं तर साफ नाकारायची; आणि म्हणूनच तिचें गाणें आयत्यावेळीं ठरायचें ! आज तसेंच झालें. तिचें गाणें आयत्या वेळीं ठरलें, आणि तरी सुद्धां गाण्याला अतोनात गर्दी झाली !

चिर शांति वसे भूतलीं ऽ ऽ ऽ

प्रभु आ ऽ ऽ ला ऽ अतां भूतलीं ॥



वाहे तोंवरि मंद सलिल यमुनाऽऽऽ!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

आतां तर बांसरी-वालेच्या भैरवीला
च रंग चढत चालला होता. बैठकीचा
ट म्हणजे भैरवी; पण तीसुद्धां बांसरी-
ा अत्यत आस्थेनें व अगदीं तन्मय-
म्हणत असे. आणि म्हणूनच बांसरी-
ेच्या गळ्यांतला शेवटचा सूर निघत
पर्यंत श्रोत्यांची गर्दी सारखी वाढत
ायची ! आज तसेंच चाललें होतें—
ी ऐनभरांत आली होती-बांसरीवाले-
गळ्यांतलें सुराचें कारंजें जोरांत उठत
. वातावरणांताहि नादब्रह्म संचरलेलें
—आकाशांतील चंद्रमाहि स्थिर झाला
ा—चांदण्या डुलूं लागल्या होत्या.
ीर मंद झाला श्रोता आणि वृक्षराजी
जल झाल्या होत्या.

"चिर शांति वसे भूतलींऽऽ
प्रभु आलाऽऽ अतां गोकुळीं ॥

"वा ! काय बहार आहे ?"

"शाबास ! कमाल झाली बुवा !"

"याला म्हणतात आवाज ! शापभ्रष्ट
सराच ही !"

"अगदीं दुसरी महाश्वेता !"

"अहो; जरा बाजूला सरकतां का ? आम्हांलाहि ऐकूं द्या, कीं निदान शेवटचे हे दोन सूर."

"कां, भोंड्यांच्या नकला आटोपल्या का गायकवाड वाड्यांतल्या ?"

"छे ! आम्ही तिकडे गेलोंच नव्हतों. आम्ही गेलों होतों नाटकाला—"

"मग नाटक चांगलें नव्हतें वाटतें ?

कसलें हो तें नाटक ! अगदींच भिकार-आणि रडतात बोलपटामुळें नाटक-मंडळ्या बुडाल्या म्हणून ! असलीं भिकार नाटकें आणि चुकार नट असल्यावर कंपन्या बुडणार नाहींत तर काय होईल ?"

अहो; हें शिवाजी मंदिर नाहीं. भाषण बंद करा; बडबड काय चालविली आहे ? आम्हांला ऐकूं द्याल कीं नाहीं ? "

"वा ! अगदीं बॉक्सचें तिकीट काढून रिझर्व जागेंत बसल्याप्रमाणेंच बोलतां हो ! आमच्या प्रमाणें तुम्ही पण फुकटे अहांत हें विसरतां !

"ए नागपुऱ्या गप्प बसतोस कीं नाहीं ? कीं दाखवूं आतां पुण्याचें पाणी ?

"अहो पुणेकर; कां एवढे एकेरीवर येतां ? ते कांहीं मालवणचे मामा नाहींत, नागपूरचे नागण्णा आहेत ते नागण्णा !"

"खामोष ! खामोष "

"सायलेन्स प्लीज !"

"गप्प बसा हो ऽऽ

"अहो कोल्हापूरकर; वर कांय चढतां अतां मोडेल नाहीं पराच. कितीं माणसें त्याच्यांवर बसलीं आहेत, एकदां पहा तर खरीं ! कां, ऐकत नाहीं कां ? आपल्या बरोबर सगळ्यांनाच खालीं आणण्याचा विचार दिसतो आहे तुमचा ! "

"ए फेटेवाल्या; उतर ल्येका खालीं ! * * * च्या उतरतोस, कीं हाणूं लाथ !"

"अहो सासवडकर जरा गप्प बसा—मी कोल्हापूरकर आहे—लक्षांत ठेवा ! मी पण मुलतानमातींत लोळलेला आहे म्हटलें.

"अरे वा ! मल्लापा लडाक्याच कीं नाहीं तूं—? "

"आणि तूं तरी काय असा प्रतापसिंग पैलवान लागून गेलाहेस ? "

"अहो व्यंकटराव संकटराव; तुम्हाला मराठी भाषा समजते कीं नाहीं ? गप्प बसा म्हणतों ना ? "

"वा वा ! काय बहार केली हो गाण्याची ? "

"आणि आवाज पण काय सुंदर लागला आहे आज बांसरीवालेचा ?

"चिर शांति वसे भूतलींऽऽऽ"
प्रभु आऽला ऽ अतां ऽ गोकुळीं ऽ ऽ

"वहावा ! खाशी खाशी "

कडांड कडाड कड कड कड—

"सांभाळा, सांभाळा ! मोडली पराच
कडड ऽ ध ऽ ऽ प

* * *

"अरेरे ! तो कोल्हापुऱ्याच सांपडला वाटतें सगळ्यांच्या खालीं ? "

"बरें झालें. लेकानं आपल्याबरोबर सगळ्यांनाच—अयायाया ! जरा जरा हा ऽ त द्या हो. "

"अयाया ! चांगलीच कंबर शेकली कीं हो माझी ! "

"तरी बरें. हातपाय मोडला नाहीं—त्या त्यांच्यासारखा "

"आणि त्या कोल्हापुऱ्याचें काय हो ! तो तर बेशुद्धच पडला आहे म्हणतात अजून !"

"विष्णुपंत, मरूं देत तुमच्या त्या फाटक्या वहाणी—चला लौकर नाहीं तर पंचनाम्यांत सांपडण्याची वेळ येईल आणखी !"

"अहो, पण माझा पा ऽऽ य मुरग-ळला आहे—त्याची वाट काय ?"

"तुम्ही चला तसेच कसे तरी लंगडत-लंगडत. मी टांगा करतों पुढें."

"अरे राम राम राम—अयाया या ! हे कोल्हापुरी लोक असेच पुणेकरांच्या कार्यांत नेहमीं आडवे पडतात !"

"नाहीं तर काय, त्या शेमलेवाल्याला भैरवीच्या शेवटच्या दोन तानांसाठीं असें आपल्यांत येऊन अडमळायला पाहिजे होतें ? विघ्नसंतोषी लेकाचे ! अयाया ! काय मार बसलाहो कंबरेला !"

"बाकी बहार झाली बुवा आज गाण्याची ! "

"अगदीं सार्थक झालें पुण्याला आल्याचें. "

"तशी ती दिसायला कांहीं-ही-नाहीं म्हणतात ! "

"अहो 'ही' काय ? अगदींच कुरूप आहे ती ! तिचें गाणें ऐकायचें म्हणजे डोळे मिटूनच ऐकावें लागतें. "

"बाकी, तुम्ही कांहीं म्हणा. कांचेत गानीं पतिव्रता. "

"जाऊंद्या हो, तुम्हांला काय करायचें आहे तिच्या इतर गोष्टींशीं—? तुम्हांला तिचें गाणें आवडलें ना ? बस्स झालें तर मग—! "

* * *



Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या वेळीं बांसरीबालेचें गाणें संपून नानासाहेबांकडील बैठकहि सर्व उठली होती. अर्थात् ठरल्याप्रमाणें बांसरीबाला आपल्या वृद्ध मातोश्रीबरोबर घरीं येण्यास निघाली. कुठेंहि आणि केव्हांहि बांसरीबालेचें गाणें असलें म्हणजे तिची ही वृद्ध मातोश्री तिच्या बरोबर असायचीच ! तशी-बांसरी बाला कुरूपच होती. अर्थात आंबटशोकी, प्रतिष्ठीत व जातिवंत टवाळ, त्यांच्यापासून रक्षण करायला तिला असली वृद्ध बाई बरोबर बाळगणें जरूरच होतें—तशांतून बांसरीबालेची रहाणी अगदींच साधी. तिला आपल्या गायनकलेवर साधारण चांगलाच पैसा मिळे–पण ती कधीं मोटारमधून किंवा घोडागाडींतूनसुद्धां हिंडत नसे. तसें पाहूं जावां ती पायांनींच जास्त अधू होती–म्हणून तिला निदान घोडागाडी तरी ठेवणें जरूर होतें. पण तिनें तसें कधींच केलें नाहीं. भाड्याची गाडीसुद्धां ती कधीं करीत नसे. कितीहि लांब बैठक असली तरी ती आपली पायींच जाई. अशी ती कां वागत असे कोणाला ठाऊक ! पण एकंदरींत ती अगदींच साधी रहात असे एवढें मात्र खरें. धंदेवाल्या गाथिकांच्या दृष्टीनें तर ती–नवबाला असूनहि जोगीण बनलेली होती !

आज तो तशीच आपल्या वृद्ध मातोश्रीबरोबर घरीं चाललेली होती. ती शिवप्रसाद सोडून साधारण पुढें आली असेल नसेल, तोंच तिला रस्त्यांत माणसांचा घोळका दिसला; म्हणून ती उत्सुकतेनें जरा थबकली. पण तिला घोळक्यांतला प्रकार असा दुरून काय समजणार होता ? तोंच तिच्या आईनें तिला हटकलें. "चल सोनू, काय पहातेस ? असेल कांहीं तरी ! नाहीं तर पडला असेल कोणी तरी दारू पिऊन. आपल्याला काय करायचं आहे त्याच्याशीं ? चल, उचल पाय लौकर."

असें म्हणत म्हातारी बांसरीबालेला जवळ जवळ ओढीतच नेऊं लागली. पण कशामुळें कोणाला ठाऊक ! सोनूला अर्थात् बांसरीबालेला–(तिचें हें माहेरचें नांव असावें) त्या जागेवरून हलावेसें वाटेना व गर्दींतला प्रकार काय आहे तो समजून घेतल्याविना रहावेना. तोंच जवळून जाणाऱ्या दोन गृहस्थांचा संवाद तिच्या कानीं पडला.

" त्या गाणारणीचा आणि या गृहस्थाचा कांहीं तरी संबंध असला पाहिजे, खब !"

" काय म्हणतां ? खूळ कीं काय ! तशी ती बिचारी–गाणारीण फार सज्जन आहे म्हणतात !"

" असेल. संबंध म्हणजे कांहीं घाणेरडा नाहीं मी म्हणत. संबंध म्हणजे–नात्यागोत्याचा संबंध."

" बरें, तसें समजा. पण तो तरी कशावरून ?"

" तो पडला तोंपर्यंतच्या त्याच्या हालचाली मी पहात होतों, त्यावरून."

" काय होत्या त्याच्या हालचाली ?"

" तो गाणें ऐकण्यापेक्षां गाणारणीचा चेहेरा पहाण्यासाठींच जास्त धडपडत असलेला दिसत होता "

" ऊं: कांहीं तरीच !"

" बरें राहूं द्या आमचें—शिवाय तुम्हांला माहीत आहे का ? आपल्या शेजारीं तो एकजण—बांसरीबालेबद्दल कांहीं हकीगत सांगत होता, त्यावेळीं ही स्वारी गाणें सोडून ती हकिगतच जास्त लक्ष देऊन ऐकत होता, नाहीं का ?

" मग, त्यांत काय मोठेंसें ? आजकाल नट-नटी आणि गायिका यांचीं खाजगी चरित्रें समजून घेण्याची सगळ्यांचीच आवड दिसते."

" असली तरी अशी नाहीं. मला तर वाटतें–तिला टाकून देणारा हा तिचा नवराच असावा."

" आतां मात्र कमाल झाली बुवा तुमच्या तर्कांची."

हें संभाषण बांसरीबाला नीट लक्ष देऊन ऐकत होती. त्यामुळें शेवटच्या वाक्यानें तिच्या अंत:करणाला एकदम जोराचा धक्का बसला—नि—ती तडक त्या घोळक्यांत शिरली—तोंपर्यंत त्या बेशुद्ध गृहस्थाला हॉस्पिटलांत नेण्याची लोकांनीं तयारीहि चालविली होती. पोलिसलाहि बोलवायला कोणी तरी गेलाच होता—पण ते दिवस गणेश उत्सवाचे असल्यामुळें पोलीस तावडतोब येऊं शकला नसावा. इतक्यांत 'सोने, सोने' करीत बांसरीबालेची आईहि तेथें आली. तरीहि बांसरीबालेची निरीक्षण समाधि भंग पावली नाहीं.

ती बेशुद्ध माणसाच्या चेहेऱ्याकडे सारखी निरखून पहात होती. पण म्युनिसीपालिटीच्या अंधुक प्रकाशांत तो तिला स्पष्ट ओळखूं येणें अशक्य होतें—तोंच म्हातारीनें आपल्या हातांतील कंदीलाचा उजेड त्या बेशुद्ध माणसाच्या तोंडावर पाडला. त्याबरोबर—'अगबाई, हे !' असें बासरीबाला ओरडली व लगेच सुश्रूषेसाठीं पुढें धांवली.

"अग अग सोनू ; काय करतेस हें असें वेड्यासारखें असें ओरडत म्हातारी बांसरीबालेला मागें ओढीतच होती. पण ती तिला न जुमानतां पुढें घुसलीच.

पण ह्या प्रकारानें तमासगीर बघ्या मंडळींत मोठीच खळबळ उडाली. बांसरीबालेसारख्या एका नामांकित गायिकेला अगदीं जवळून पहाण्याची सर्वांचीच उत्सुकता होती, पण ती त्यांची इच्छा अशा अकल्पित रीतीनें पुरी होईल, असें कोणालाच वाटलें नव्हतें. शिवाय, आश्चर्य म्हणजे-बांसरीबालेसारख्या बाला जोगणला कोणी 'ते' असतील हें कल्पनेनेंही कोणाला खरें वाटत नव्हतें–पण आज तिला कोणी तरी 'ते' असलेले प्रत्यक्षच पहावयाला मिळालें! उलट कोणाला असेंहि आश्चर्य वाटलें, कीं बांसरीबाला हें नांव किती मधुर आणि त्याप्रमाणेंच तिचा कंठहि किती मिष्टास, पण त्या मानानें प्रत्यक्षहि !—तिचें सौंदर्य ? कुब्जेची सख्खी बहिण शोभेल जशी कांहीं !

" कुरुपतेच्या कांटेरी कुंपणामुळेंच इतका मधुर आवाज तिला टिकवितां आला—नाहींतर, जर का ही जरा देखणी असती, तर–तर—ती फुटक्या आवाजाची खापरी जानच झाली असती ! आणि आपल्याला तिच्या गोड चेहऱ्याकडे बघून कर्कश आवाजाचें कठोर गाणें निमूट ऐकावें लागलें असतें" असेंही कोणी वडबडत होते.

तर उलट कोणी कुजबुजत होते—कीं—"आपली बांसरीबाला म्हणजे प्रति महाश्वेता–अशी तिच्या वर्तनाबद्दल खात्री असतां—आज तिचा 'हा' कोण उपस्थित झाला ?"

याप्रमाणें लोकांचे तर्कवितर्क चालू असतां बेशुद्ध माणसाच्या अगदीं जवळ जाऊन—त्याच्या तोंडावर कंदीलाचा उजेड पाडून—त्याला पूर्ण निरखून बांसरीबालेची आई—म्हातारी उद्गारली.

"अगबाई ? खरंच कीं हे जावईच !"

आईचीहि खात्री होतांच बांसरीबालाहि हणाली :

"बंधू हो, हीं आमचींच माणसें आहेत. यांनां आम्ही घरीं घेऊन जावों. तुम्ही अगदी तिऱ्हाईत असतांहि जी यांच्याबद्दल आस्था दाखवलीत, त्याबद्दल मी आपली अत्यंत आभारी आहे."

याप्रमाणें सर्वांचे आभार मानून बांसरीबालेनें आपल्या बेशुद्ध पतीला—प्रेक्षकांतील एक-दोघांच्या सहाय्यानें टांग्यांत ठेवलें व ती आईसह घरीं गेली. त्यावेळीं जागेवर राहिलेले बघ्ये लोक आपसांत कुजबुजले.— " आश्चर्य आहे बुवा ! कोणाचें कसें लफडें असेल, देव जाणें !!"

* * *

" पतीला घरीं आणून ठेवल्याबर—त्याच टांग्यानें–बांसरीबालेनें डॉक्टरला बोलावून आणलें, पण त्यानें बेशुद्ध मा… साची प्रकृति तपासून सांगितलें, कीं—

" हा रोगी घरीं बरा होण्याच्… अवस्थेंतील नाहीं. याच्या कमरेला फार जोराचा मार बसलेला आहे–कदाचित्, … जन्माचा पांगळा होण्याचाहि संभव आ… तरी, त्याला शक्य तितक्या लौकर हॉस्पि… टलांत घेऊन जा—तेथेंच तो बरा हो… शकेल. त्याला हॉस्पिटलांत नेण्यास… वाटल्यास मीहि आपल्याला मदत करतों."

बांसरीबालेला अशा वेळीं कोणाच्या त… मदतीच जरूर होतीच—तशांतून ती खा… डॉक्टरचीच मिळतांच तिला दु:खांत सम… भान वाटलें, व ती लगेच आपल्या पती… घेऊन ससून हॉस्पिलांत गेली.

* * *

दुसऱ्या दिवशीं—माधवराव-बांसरीबाले… पति शुद्धीवर आले आणि त्यांनीं प्रथ… मच डोळे उघडले, तेव्हां त्यांना का… दिसलें ! आपण आपल्या कोल्हापूरच्… शोभनासदन मध्यें नसून—पुण्याच्… ससून हॉस्पिटलांत रुग्ण शय्येवर आहों… व आपल्या जवळ आपली प्रियपत्… शोभना नसून—आपली–नावड… म्हणून परित्यक्ता असलेली प… राधा ऊर्फ बांसरीबाला आपली शुश्रूष… करीत आहे. इतक्यांत बांसरीबालेचें… त्यांच्याकडे लक्ष गेलें आणि तिनें आशे… एक श्वास सोडला. जणुं काय तिनें अंत:… करणापासून केलेली परमेश्वराची शु… प्रार्थना फळाला आली आणि तिच्… पतीनें डोळे उघडले, व आपल्या जीव… तावद्दल आशा दाखविली. हीच ती तिच्… आशा ! आणि अशीच तिची परमेश्वर… जवळ प्रार्थना असेल—पण माधवरावां… काय वाटत होतें ?

त्यांना वाटत होतें-" ही एकदां टळलेल… साडेसाती पुन्हां माझ्या कपाळीं को… आणि कशी आली ? हिच्या सान्निध्या… आपण लौकर बरे होण्यापेक्षां—कदाचित… कायमचेहि 'राम' म्हणूं ! त्यापेक्षां-… स्वरूपसुंदर शोभनेच्या नुसत्या दर्शन… नेंही आपल्यांत नवजीवन उत्पन्न हो… लौकर आराम वाटेल. इतक्यांत स… ओकच सकाळच्या तपासणीसाठीं … आले व माधवरावांची राधेकडे पहाण्या… व बोलण्याची काळजी दूर झाली. स… ओकांनीं येतांक्षणींच बांसरीबालेला … केला.

" आतां कशी काय यांची त… आहे ?"

" साधारण बरी आहे–तरी–आं… वेदना होत असाव्यात—?"

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बिचारी बांसरीबाला–सरळपणानें हें रेंख बोलली होती.

पण–पूर्व ग्रहदूषीत माधवरावांनां–ती द्दाम आपल्याला खोंचून बोलते आहे सें वाटलें व त्यांनीं तिच्याकडे तिरस्कानें पहात—सर्जननां अगदीं जवळ ण्याची खूण केली. सर्जन ओक जवळ ले. त्यांनीं प्रथम त्यांचें टेंपरेचर पहाण्याठीं थर्मामीटर त्यांच्या खाकेंत दिला व पला कान त्यांच्यां तोंडाशीं नेऊन ांनां विचारलें:

“ काय पाहिजे ? ”

त्याबरोबर माधवराव त्यांच्या कानांत गदीं हळु व अडखळत बोलले–“ माझी द्वितीय पत्नी कोल्हापूरला आहे ला अर्जंट तार करून बोलावा–म्हणजे ला–लौकर आराम वाटेल ”

लगेच सर्जननीं थर्मामिटर काढून घेत ांनां अश्वासन दिलें:

“ ठीक आहे.बालावतों त्यांनां अत्ताच. र्कला पाठवतों, त्याच्याजवळ त्यांचा रोवर पत्ता द्या. ” असें म्हणून सर्जन ओक आपल्या कामाला निघून गेले व धवरावांनींहि आशेचा एक श्वास सोडून ांसरीबालेकडे पाठ फिरवली. बिचारी ांसरीबाला ! तिनें असें काय पाप केलें त कीं, तिचें मुखावलोकनहि करावेंसें धवरावांना वाटूं नये ?

*   *   *

*   *   *

तीस चाळीस फुट उंचीच्या पराचीरून एकदम कोसळल्यामुळें माधवरावांच्या रेच्या बहुतेक हाडांचा चुराडाच उडाला ा. पण सर्जन ओकांनीं एक्सरेनें त्यांचीं हाडें तपासून अत्यंत कुशलतेनें त्याचें डेज केलें असल्यामुळें—“ निदान न महिने सारखें पडून राहिल्यास धवराव पुन्हां पूर्ववत् चालूं लागतील.” भिच्याशी बांसरीबालेला त्यांनी खात्रीहि दिली ती. अर्थात् बांसरीबालेहि तशी आशा –टत होती. आणि त्याप्रमाणें, ती धवरावांनीं जागचें हलूं न देण्याबद्दल रखी काळजी घेत होती. ती जवळ वळ चौवीस तास माधवरावांच्या जवळच सून कादी—भोजनसुद्धां तिथेंच थेंच करी झोंप ! पण, बिचारीला माधराचांच्या काळजीमुळें झोंप कसुची णार ! शरीरधर्माप्रमाणें एखादी डुलकी ाली तर ती तिथेंच बसून येई ! उलट ाधवराव जागे असले तरी झोंपेचें सोंग त आणि शुद्धींत असले तरी बेशुद्ध सल्याचा बहाणा करीत—आणि नर्सशिवाय औषध किंवा अन्नपाणी घेत सत. कारण, कुरूप बांसरीबालेच्या दर्शनानें न जाणो, जीवाला कांहीं तरी अपाय व्हायचा !

एके दिवशीं—“ माधवराव पावनगडकर याच वार्डांत काय ? ” असें विचारीत ऑफिसचा बॉय तेथें आला, व बांसरीबालेनें त्याला खुणेनें ‘ होय ’ म्हणून सांगतांच त्यानें हातांतील पत्र बांसरीबालेजवळ दिलें–तिनें तें घेतलें, पण—पतीचें पत्र, ती ते त्याच्या आज्ञेशिवाय फोडणार कशी ? या वेळीं माधवराव नित्य नेमाप्रमाणें झोंपेचें सोंग घेऊन पडले होते. त्यांनीं आपल्या नावें पत्र आल्याचें ऐकलें होतें व तें बांसरीबाला घेत असल्याचें चोरून पाहिलेंहि होतें. पण–त्यांना बांसरीबाला त्या पत्राचें काय करते तें पहायचें होतें–शिवाय, तें पत्र कोणा जिव्हाळ्याच्या माणसाचें असेल, असेंहि त्यांना वाटलें नसेल. असेल कोणा तरी स्नेह्याचें–दाखवली असेल त्यानें अपघाताबद्दल दिलगिरी ! दुसरें काय ? बांसरीबालेच्या सांगण्यावरून सर्जन ओकांनीं आपल्या प्रिय शोभनेला तारच केली नसेल ! अर्थात, त्या बिचारीला तारच पोंचली नसली तर ती येणार तरी कशी किंवा तिचें उत्तर तरी कसें येणार ? आणि उत्तर पाठवावयाचें झालें, तरी ती उलट तारच करलि—पत्र कशाला पाठवील ? समजा, सर्जन ओकांसारखा बडा मनुष्य आपल्या कुरूप पत्नीच्या कटांत सामील होणारा नसला, तरी ऑफिसचा क्लार्क कशावरून तिला सामील झाला नसेल ? ‘द्रव्येण सर्वे वशाः अर्थात्, शोभनेला तारच गेलेली नाहीं—आणि म्हणूनच ती आलेली नाहीं—या कुरूप कुब्जेला वाटतें आहे, कीं मी असा अडचणीत सांपडलों आहे, तोंपर्यंत घ्यावें आपलें मन वळवून आणि पुन्हां थाटावा संसार आमच्याशीं ! पण–म्हणावें मी पण पुरा वस्तादच आहें—एकदां प्रतिज्ञा केली तीच शेवटची—नाहीं तर नाहींच तुझें तोंड पहाणार—”

बिचाऱ्या बांसरीबालेला वाटे—“ पत्र घेतलें पण तें पतीला कसें द्यावें ! आणि त्याला त्यांतील मजकूर कसा समजावा ? न जाणो, तें कुणाचें विशेष महत्त्वाचें असलें तर ?” ती एकदां त्या पत्राकडे, तर एकदां पतीच्या ग्लानियुक्त मुखाकडे पाही—तिला वाटे माधवरावांनीं एकदां तरी आपल्याकडे डोळे उघडून पाहिलें म्हणजे विचारतां येईल. पण त्यांनीं जी एकदां तिच्याकडे पाठ फिरविली होती ती–ते पुन्हा इकडे कळवीनातच. शेवटीं बराच वेळ वाट पाहून बांसरीबालेनें त्यांच्या कानांत हळूंच सांगितलें—“ आपलं पत्र आलं आहे—फोडूं का मी तें ? वाचून दाखवूं का ?”

तें पत्र शोभनेचेंच असेल–या कल्पनेनें माधवरावांनीं मोठ्या आशेनें डोळे उघडले, व आपल्या अप्रिय पत्नीकडे–राधेकडे–न पहातांच त्यांनीं तिला उत्तर दिलें—

‘ फोड–पण वाचूं नकोस. ”

बिचारी बांसरीबाला–खरी पतिव्रता ! ! तिनें पत्र फोडलें, पण न वाचतांच तें पतीच्या डोळयासमोर धरलें व पूर्ववत ती त्याच्या कानांत उद्गारली !

“ वाचावं आतां ! ,’

माधवरावांनीं डोळे उघडून वाचण्यास सुरुवात केलीः—

कोल्हापूर

न. वि. वि.

आपण कुणा गायिकेचं गाणं ऐकण्यास गेलां असतां जिन्यावरून पाय घसरून पडल्याचं आपल्याकडील तारेवरून कळलं–जाणून बुजून बांकडं पाऊल टाकणाराचा पाय कधीं तरी असाच मोडायचा ! बरं झालं ! परमेश्वरानंच शिक्षा केली·आपण अत्तां तरी शुद्धीवर याल अशी आशा आहे.

“मी— आपल्या सेवेसाठीं तातडतोब निघून यावं ! अशी आपली अपेक्षा असेल—पण, नव्या मतांप्रमाणं मी आपली दासी नाहीं, सहचारिणी आहे— हें आपण जाणतच असाल !

शिवाय, व्यवहारिक दृष्ट्या विचार करूं जातां–माझ्यापेक्षां हॉस्पिटलांतील एखादी परिचारिकाच आपली सुश्रूषा चांगली करील. शिवाय—?

“ प्रो. वात्सायन यांजबरोबर मी आजच निलगिरी–उटकमंडला–सफरीवर जात आहे–अशी दुर्मिळ सोबत अनायासें मिळत असल्यामुळेंच मी हा जाण्याचा बेत एकदम ठरविला. असो मी परत येईपर्यंत आपण पूर्ण बरे झालेले असाल, अशी मी आशा करतें !

“ प्रवास खर्चाचे पैसे–तूर्त· मी प्रो. वात्सायन यांजकडूनच–हातउसने घेत आहे. तरी ते आपण आम्ही येथें आल्यावर लगेच देण्याची तयारी ठेवावी आजच मागणार होतें पण आपल्याला अपघातांत आणखीही नवी काळजी नको म्हणून मागणी केली. नाहीं.कळावें.

ता....... आपली

—शोभना—”

पत्र वाचून—माधवराव क्लोरोफार्म दिल्याप्रमाणें बेशुद्धच झाले आणि त्यावेळे पासून डॉक्टरनीं त्यांना पत्रें वाचण्याची सक्त मनाई केली !—पण हे पत्र, कीं, ज्यानें–आपल्या पतीच्या अंतःकरणाला जोराचा धक्का बसून बेशुद्ध केलें—तें पत्र बांसरीबालेनें कधींच वाचलें नाहीं. कारण, “ पतीचें पत्र—आपण त्यांच्या आज्ञेशिवाय वाचायचं नाहीं. ” हाच तिचा निर्धार असावा ! मात्र, त्या पत्रांतील मजकुरानें माधवरावांची वारंवार तळमळ बडबड व धडपड चाललेली तिला पहावयाला मिळे–पण त्याला तिचा काय उपाय होता ? मात्र अशा धडपडण्यानें माधवराव तीन महिन्यांनीं जरी बरे झाले, तरी त्यांच्या कमरेंत व उजव्या हातांत मात्र कायमचें वैगुण्य राहून गेलें. जवळ जवळ ते चांगलेच झाले होते ! शिवाय त्यांचा उजवा हात निरुपयोगी झाला होता–कारण, धडपडण्यानें त्यांतील मनगटाचें हाड वांकडें बसलें होतें ! आणि इतकेंहि होऊन गेल्या तीनाहि महिन्यांत त्यांची प्रिय पत्नी शोभना त्यांनां एकदांहि येऊन भेटली नव्हती ! कदाचित् तिला शाळाखात्यानें रजा दिली नसेल ! किंवा आजकाल प्रो. वात्सायन आपल्या पत्नीला माहेरीं पाठवून तिच्याच घरीं ‘ पाव्हणे ’ म्हणून राहावयाला गेले होते—तरी आपल्या या सन्माननीय पाव्हण्यांची गैरसोय करून तिला येतां येत नसेल ! ·

उलट—राधाबांसरीबाला एक क्षणहि त्यांच्यापासून दूर झाली नव्हती अर्थात, तिनें. गेल्या तीन महिन्यांत गाण्याचेंहि निमंत्रण स्वीकारलें नव्हतें. तिला एका संस्थानांतील युवराजांच्या लग्नाचेंहि आमंत्रण येऊन गेलें होतें ! ‘ हिज मास्टर्स व्हाईस ’ कंपनीनें रेकॉर्डस देण्याचीहि तिला विनंति करून—वशिलाही लावला होता–पण तो चान्सहि तिनें साभार नाकारला होता. एवढेंच नव्हे तर तिनें नित्याच्या परिपाठाप्रमाणें श्रीकृष्णाचें (मीराबाई विरचीत) भजनहि कधीं म्हटलें नव्हतें. बरोबरच आहे—तिचा ‘ प्रभु ’ दुखण्यात विव्हल पडला असतां–त्याची सेवा सुश्रुषा सोडून ती आणखीं दुसऱ्या कोणत्या प्रभूला आळवणार ?

*   *   *

कां तें कोणाला ठाऊक !आतांशा माधवरावांच्या वृत्तींतहि बराचसा फरक दिसायला लागला असून–जे राधेच्या अर्थात् बांसरीबालेच्या मुखाकडेहि पहाण्यास आजपर्यंत तयार नव्हते त्यांना आतां तिच्या सान्निध्याशिवाय एक क्षणभरही रहावत नव्हतें ! आतां तें बांसरीबालेच्या मुखचंद्र कडे मुद्दाम पहाण्याचा प्रयत्न करूं लागले होते. मग काय ? बांसरीबालेच्या चेहेऱ्यांतच आजकाल फरक झाला होता कीं, त्यांची दृष्टिच निवळली होती ? ते तिच्याकडे पहाण्याचा प्रयत्न करीत, पण त्यांचे अप-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राधी डोळे त्यांना ऐनवेळीं दगा देत-व ते लगेच आपली दृष्टी दुसरीकडे वळवून घळघळां रडूं लागत ! उलट बांसरीवालेला वाटे—" आपलं सौंदर्य जर आपल्या पतीला एवढं आकर्षक वाटत नाहीं तर मुद्दाम होऊन आपण त्यांच्याशीं प्रेमचेष्टा कां करा ? व त्यांच्या मनाला तरी कां दुखवा ! "म्हणून, तीहि त्यांच्या नजरेला नजर भिडविण्याचा कधीं प्रयत्न करीत नसे.—नाहीं तरी मनुष्य कुरूप झालें, तरी त्याला विकार आणि अंतःकरण नसतें असें थोडेंच आहे ? पण, कुरूप माणसाला दुसऱ्यावर प्रेम करतां येतें—पण त्याच्यावर प्रेम करणारें सहसा कोणी भेटतच नाहीं—!

माधवरावांनीं बांसरीवालेचा त्याग करायला कारण—ती कुरूप होती ! शिवाय तिला ४२ दिवसांचा दोषी ताप येऊन तो तिच्या पायांवरून गेला होता—त्यामुळें ती थोडीशी पांगळी झाली होती. अर्थात् अशी कुरूप पत्नी—रसिक व रंगेल माधवरावांना कशी आवडणार ! ते जातिवंत आर्टिस्ट होते त्यांनां आपली पत्नी एक ' मॉडेल ' असावें असें वाटे. आणि म्हणूनच त्यांनीं प्रथम पत्नीचा कांहीं तरी कारणावरून त्याग केला होता—! त्यांनां प्रथम पत्नीचा त्याग करायला जगाला पटण्यासारखें कारण तरी काय सांपडणार ? कुरूपता हें वाजवी कारण होऊंच शकत नाहीं. तेव्हां त्यांनीं असें कारण दाखविलें, कीं, आतां ही पत्नी वंशवृद्धीला नालायक झाली ! अर्थात् हिंदु-धर्म-शास्त्रानें त्यांनां द्वितीय लग्नाची कायदेशीरच परवानगी दिली. पण माधवरावांचीहि आतां जवळ जवळ तीच स्थिति झाली आहे—पण त्यांच्या दोन्ही पत्नींना पुनर्विवाह करण्याची परवानगी मिळेल काय ? अर्थात नाहीं. आमचा सनातनहिंदुधर्म असलें पाप करण्याची—कोणत्याही सबबीवर परवानगी देणार नाहीं—मग आमची आर्य संस्कृती ती काय राहिली ? बीज किडलें तरी चालेल, पण क्षेत्र-निर्मळच राहिलें पाहिजे—असें आमचा नासिकेत म्हणतो—मिताक्षरी आणि मनूहि त्यालाच पाठिंबा देतात—आणि आमच्या महिलाहि धर्माचें हें कडक व्रत प्राणापलीकडे पाळतात—! अर्थात्, स्त्रियांच्या एकतर्फी त्यागावरच हिंदुधर्मांचा पवित्रपणा तगून राहिला आहे—! ' स्त्री पुरुषाचें अर्धांग ' म्हणायचें, पण पुरुषानें मात्र आपलें अर्धांग स्वैरसंभोगांत अशुद्ध बनवून स्त्रीच्या पवित्र अर्धांगालाहि अपवित्र बनवायचें—आणि परत आपल्या रक्ताची शेखी मिरवायची, कीं आपण सूर्यवंशी, नाहीं तर अग्निकुलांतले आहोंत !

दुसऱ्या दिवशीं माधवराव शुद्धीवर आले तेव्हां आपली नावडती पत्नी ' बांसरीवाला " आपल्या आपल्या पायथ्याशीं बसलेली त्यांना आढळून आली.

माधवरावांनीं एका नवमतवादी शाळामास्तरणीशीं द्वितीय विवाह केला होता, तीच ती त्यांची द्वितीय पत्नी शोभना होय !

परित्यक्ता राधा ऊर्फ जनतेची बांसरीवाला जीव व शील रक्षणासाठींच गाणें गाऊन पोट भरील—! तिला कुरूप बनविण्यांत देवानें जसा तिचा मागच्या जन्मींचा दावा साधल्याप्रमाणें वाटे, तसाच तिला कोकिळेप्रमाणें मधुर आवाज देण्यांतहि त्यानें आपली विचित्र लीलाच प्रकट केल्याप्रमाणें भासे ! व शाप आणि वर एकाच वेळीं भोगण्यासाठीं जन्माला आलेली ही कोणी अप्सराच आहे काय, असें मात्र जगाला वाटे !

* * *

माधवरावांना वाटे, राधा आपल्यावर रुसली आहे म्हणून ती आपल्याशीं बोलत नसावी आणि राधेला म्हणजे आपल्या बांसरीवालेला वाटे, कीं पतीला आपण आवडत नाहीं म्हणून ते आपल्याशीं बोलत नाहींत! देवानं कुरूप बनविलं त्यांत आपला तरी काय इलाज ! पण—म्हणून—आपल्या पतीनें, कीं ज्यांना विवाह प्रसंगीं—देवाब्राह्मणांना—इष्टमित्रांवर व सग्यासोयऱ्यांनां साक्षी ठेऊन " धर्मेच—अर्थेच—कामेच नाऽतिचरामि " अशी शपथ घेतली होती. त्यांनीं आपला विनाअपराध त्याग कां करावा ? तिरस्कार कां दाखवावा ? " बांसरीवालेला असें वाटणें अगदीं सहाजिकच होतें; आणि त्यामुळें ती थोडीशी रागावणें, रुसणेंहि मनुष्यस्वभावाला अनुसरूनच झालें असतें. पण माधवरावांनीं तिच्याशीं आतां अबोला कां धरावा ? आतां म्हणजे, परमेश्वरानें त्यांची इतकी रग जिरविल्यानंतरहि ! जिचें जन्मांत तोंड पहाण्याचीहि त्यांची इच्छा नव्हती, तिच्याच संतत सेवेनें तर त्यांनां आज जीवदान मिळालें होतें ! पुरुषासारखे पुरुष माधवराव, पण त्यांनीं पत्नीला कायदेशीर अशी—म्हणजे तिच्या पोटगीची व्यवस्था करूनही सोडचिठी—दिली नव्हती. अर्थात्, पतीचें कर्तव्य त्यांनीं काडीइतकेंही पाळलें नव्हतें ! उलट—बांसरीवालेनें पत्नी—अर्धांगी—सहचारिणी—वगैरे शब्दांतून जितके अर्थ निर्माण होतात, तितके सर्व धर्म तिनें पाळले होते. म्हणून ती मुळींच अपराधी नव्हती. तर माध-वच खरेखुरे अपराधी होते—अर्थात् रुसण्याचा अधिकार होता, तसा माधवराव रागावण्याचा मुळींच अधिकार नव्हता. तिच्याशीं कां ते बोलत नव्हते ? तर—अ त्यांनां आपल्या वर्तनाचा खराखुरा प चाप झाला होता ! आतां त्यांना खुरी शरम उत्पन्न झाली होती ! आ त्यांचें अंतःकरण खरें खुरें जागें झालें ह व आतांच त्यांना आपलें—पतीचें खुरं कर्तव्य काय याची जाणीव उ झाली होती; आणि म्हणूनच ते आप राधेबरोबर बोलायला लाजत होते !

माधवराव प्रसिद्ध आर्टिस्ट होते, तसे गवईहि होते—अर्थात त्यांच्यांत र प्रमाणें रंगेलपणाहि खूप होता. त्यांच्या डोळ्यांना जसें रोज नवें पहावसें वाटे तसें त्यांच्या कान रोज नवें संगीत ऐकावसें वाटे. रुग्णालयांतच पडून असल्यामुळें गाणें कसें ऐकायला मिळणार ? व ही बरेच दिवसांची तहान कोण भागवि अर्थात्, त्यांना आज आपल्या गा पत्नीची विशेष आठवण होणें सहा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

! त्यांनीं राधेकडे न पहातांच स्वतः-
व गुणगुणायला सुरुवात केली—

—राधे इतुका अबोला—
धरिला ऽऽऽ हरीशीं कशाला !

त्याबरोबर–विचारी साधी भोळी त्यांची
ा खुदकन हंसली ! तिनें स्थळ काळ
णि परिस्थिती यांचा विचार न करतां
ल्या प्रियमाधवाच्या गळयाला मिठी-
ां मारली ! यावेळीं दोघांच्या
न्या नजरा अगदीं धीट बनून समो-
मोर संभाषणहि करूं लागल्या होत्या.
नें माधवाला विचारलें:—

" नाथ, मी आपली संसारांतली पत्नी
ती गायनकलेंतील शिष्याहि आहें—
वेळीं आपण माझ्या गोड गळयाला
तेजन दिलं नसतं आणि मला गायन-
लेंतला मार्ग दाखवला नसता, तर आज
गायिका म्हणून गाजलेहि नसतें—
णून–आज्ञा व्हावी–आपल्याला पाहिजे
सेल ती चीज मी इथें बसून गावें.

" इथें. या हॉस्पिटलांत ! तुला संकोच
हीं वाटणार इतक्या लोकांत गायला ?"

" परिस्थितीनें मला आतां सभाधीट
नवलं आहे."

" आणि कोणाची साथ नसतांहि तूं
ाऊं शकतील ?"

" पतीची साथ नसतांहि जी कधीं
ताल आणि बेसूर झाली नाहीं, ती आतां
ापली प्रत्यक्ष साथ लावल्यावरहि बेताल
ाणि बेसूर होईल, असं आपल्याला
अजून वाटतं ?"

" नाहीं, लाडके, असें मला आतां
सं मुळींच वाटत नाहीं "—माधवराव
ाधेच्या पाठीवर हळुवार हात फिरवीत सद्ग-
दीतपणें उद्गारले !

" मग सांगावं. मी काय म्हणूं ?"
ाधा तिरप्या नजरेनें माधवरावांकडे पहात
हणाली.

" त्या दिवसांची ती भैरवी !
" इश्य ! ऐकदम भैरवी ?"
" हो. कां ?"
" भैरवींत बैठकीचा शेवटच होतो."
" पण, आपल्या जीवनसंगीताची
तेनेंच पुन्हा सुरुवात केली आहे...त्या
दिवशीं मीं तुझी **भैरवी** ऐकण्याचा अट्टा-
हास केला नसता तर आजची ही सुप्र-
भात उगवली असती का ? म्हणून लोकांना
ती भैरवी असली तरी आपल्याला ती
भूपाळीच आहे."

" बरं—जशी आपली मर्जी !"

लगेच तिनें "**प्रभु आला अतां गोकुळीं**". ही आपली आव-
आवडती भैरवी म्हणण्यास सुरुवात केली—
त्याबरोबर हॉस्पिटलांतील रोगी–अगदीं
अंथरुणाला खिळलेलेहि क्षणभर प्रफुल्ल
दिसूं लागले—घरघर लागलेल्या रोग्यां-
नाहि परमेश्वरानें–बांसरीवालेची भैरवी
ऐकण्यास एक तास जास्त आयुष्य बहाल
केलें ! नर्सेस व डॉक्टर्स आपआपलें काम
विसरून जागच्याजागीं खिळून गेले. तापा-
साठीं रोग्याच्या खाकेंत ठेवलेला थर्मामीटर
काढून पहाण्याचेंहि भान आमच्या सर्जन
ओकांनां राहिलें नाहीं. कांहीं अरसिक
ऑफसिरनां मात्र उलट राग आला व ते
शिस्तीचे सरदार आपसांत कुजबुजूं लागले,
हॉस्पिटलांत गाणें गाण्याची परवानगी हिला
कोणी दिली ?" गाणें बंद करण्यासाठीं
कांहीं आगाऊ तर बांसरीवालेकडे दौडतच
आले होते, पण कां कुणास ठाऊक त्यांना
आपला अधिकार गाजविण्याची आठवण
तेथें येताच नाहींशी झाली ! तोंच बांसरी-
वालेची भैरवीहि बंद झाली—व वातावरणां-
तील त्याचे पडसादहि हळुहळू विरूं लागले.
तोंच सर्जन ओक हंसतमुखानें तेथें प्रवेश
करते झाले—व त्यांनीं प्रवेश करतांच
बांसरीवालेला—

" वा ! बहार केलीस बुवा ! आम्ही
आपलें आजपर्यंत नुसतें नांवच ऐयस
होतों. पण आज प्रत्यक्ष गाणेंच ऐकलें.
अगदीं तृप्त झालों बुवा ! खरोखर,
आपला आवाज म्हणजे एक अद्वितीय—
ईश्वरी देणगीच आहे. मला वाटतें, आम-
च्या रोग्यांनां जर रोज एक तास आपलें
स्वर्गीय संगीत ऐकविलें, तर ते लौकर बरे
होतील—बहिऱ्यांनां कान येतील आणि
अंधांनां दृष्टि येईल."

" खरें आहे सर्जनसाहेब, आपलें
म्हणणें–मलाच पहाना–अत्तांच दृष्टी
आली !" माधवराव राधेकडे पहात पहात
स्मितपूर्वक म्हणाले.

" आतां आपल्या सर्वांच्या फाजील
स्तुतीनं माझ्या अवाजाला दृष्ट लागेल
हं–! बांसरीवाला, सर्जन साहेब व माधव-
राव यांच्याकडे खालच्या नजरेनें पहात
म्हणाली !

" बरं बुवा–नाहीं आम्ही स्तुति करीत.
बाकी, माधवराव, आतां तुम्हांला आमच्या
हॉस्पिटलांत रहाण्याची मुळींच जरूर
नाहीं." सर्जनसाहेब चष्म्यांतून दृष्टि
उचलून दोघांकडे पहात म्हणाले.

" का हो ?" माधवरावांनीं स्मित
करीत विचारलें.

" रुग्णालयांतील दुखणाइतांच्या आर्त-
स्वरांपेक्षां ही संगीत–संजीवनीच आप-
ल्याला लौकर आराम देईल—म्हणून."
सर्जन म्हणाले.

" पण, बहिऱ्यांनां कान—अंधांना-
दृष्टि–तसे पांगळयांना पायहि फुटतील
का या संगीतानें ?" माधवांनीं राधेकडे
पहात मिस्कीलपणें विचारलें.

" तेवढें मात्र नाहीं सांगतां येणार. रसि-
कांच्या कानांत संगीताचे झोत शिरत असतां
त्याला आपल्या पायांची आठवणच रहातच
नाहीं—तो रात्रच्या रात्र आणि दिवसच्या
दिवस एकाच जागीं खिळून बसतो."
सर्जनसाहेबांनीं उत्तर दिलें.

" किंवा, माझ्याप्रमाणें पाय मोडून
घेतो." असें माधवराव म्हणतांच सर्जन-
साहेब मोठ्यानें हंसले व बांसरीवालेकडे
पाहूं लागले—पण, त्याबरोबर ती जास्तच
लाजली.

तोंच ऑफिसप्यूननें माधवरावांनां
एक पत्र आणून दिलें—लगेच सर्जन
साहेबहि आपल्या कामाला निघून गेले.
आणि राधेनें पत्र फोडून देतांच माधवराव तें
वाचूं लागले—कारण, माधवराव
तसे पूर्ण बरे झाले होते, तरी त्यांचा मोड-
लेला उजवा हात जवळ जवळ निकामीच
झाला होता–अर्थात विवाहप्रसंगीं राधेचा
जो हात त्यांनीं देवा 'ब्राम्हणांच्या साक्षीनें
ग्रहण केला होता, तोच आतां त्यांना
आधार राहिला होता–!

माधवराव पत्र वाचूं लागले–

न. वि. वि.

मी उटकमंडहून येऊन बरेच दिवस
झाले–तरी मी आपणांस पत्र कां पाठविलें
नाहीं ? किंवा समक्ष येऊन समाचार कां
घेतला नाहीं ? तर–

मला कळलं, कीं आपली प्रथम पत्नी
हल्लीं आपल्या जवळ असते. तरी, आपल्या
लाडकीच्या सहवासांत आपण आतां
पूर्ण बरे झालां असालच ! असो !
आपण माझ्याशीं विवाह करण्यांअगोदर—
" प्रथम पत्नीचं आपण जन्मांत कधीं
तोंडहि पहाणार नाहीं " असा माझ्याशीं
तोंडी करार केला होता. तो आतां आपण
साफ मोडला आहे—हें लक्षांत ठेवावं !

–आपण प्रथम पत्नी सोडण्याचं कारण,
ती कुरूप होती, व मी आपल्याशीं विवाह
करण्याचं कारण—आपण त्यावेळीं सुरूप
होतां, पण आतां आपण विद्रूप झालां
आहांत !

—तरी मी आपल्याशीं आतां पत्नीचं
नातं ठेवूं इच्छित नाहीं—हें कळविण्यास
माझ्या हिंदु मनाला जरी आज कससंच
वाटत असलं तरी—विचार करतां तें
उद्यांसाठीं माझ्या कल्याणाचंच आहे.

"—कुजलेली किरांगुली जशी लगेच
कापून काढावी लागते तसं–नासलेलं किंवा
विद्रूप झालेलं अर्धांग–देवा—धर्माच्या शप-
थेची किंवा–कायद्याचीहि भीति न बाळ-
गतां ताबडतोब छाटून टाकावं."

—हा आपलाच कित्ता मी आतां गिर-
विणार आहें–त्याचा अर्थ थोडक्यांत असा
कीं–

"मी इतःपर पांगळ्याची पत्नी रहायला
तयार नाहीं–पुरुषांप्रमाणं स्त्रियांनाहि
आत्मा अंतःकरण–रसिकता व रंगेलपणा–
असतो व त्याही सौंदर्योपासक असतात !
त्यांनाहि आपल्या पतीचं स्वरूप आकर्षक
असावंसं वाटतं व त्याच्या सुंदर शरीराची
त्यांना आवड व आवश्यकता असते !

—आपला नांवकौकिक व पैसा पाहूनच
मीं आपल्याशीं (आपल्याला प्रथमपत्नी
असतांही) लग्न करण्याचं '**धाडस**'
केलें—(धाडस–म्हणण्याचं कारण, त्यावेळीं
माझ्यावर समाजानं केलेली भयंकर टीका,
आपल्या लक्षांत असेलच !) पण, आतां
आपण पंगू बनल्यावर आपलें दैवहि पंगू
बनणार व नांवहि हळुहळू नाहींसं होणार !
तरी इतःपर आपण माझ्यावरील पति-
त्वाचा हक्क सोडून द्याल अशी आशा
वाटते !

मीं सुरुवातीपासूनच 'बर्थ कंट्रोल—'
कां करीत होतें, त्याचं कारण आतां आप-
ल्याला पटलं असेलच !

'आपण माझ्यावरील नवरेपणाचा हक्क
स्वःखुशीनं सोडीत असाल व तसं मला
लेखी वचन देत असाल,
तर मी आपल्यावर पोटगीचा हक्क सांगून
दावा लावणार नाहीं याची खात्री बाळ-
गावी ? आपल्या आडनांवाचा मला आड-
पडद्याप्रमाणं उपयोग होणार असल्यामुळं
मी हा पोटगीचा हक्क सोडीत आहें.

कळावं—लोभ **नसावाच** ही विनंति ?

आपली माजी पत्नी
—शोभना पावनगडकर—

पत्र वाचून झाल्यावर माधवरावांनीं
काळजींतून मुक्त झाल्याचा एक निश्वास
सोडला व लगेच राधेला बोलावून प्रफुल्लित
मुद्रेनें ते म्हणाले:

'राधे,चल.आतां आपण घरीं जाऊं या!'

" घरीं ? पण कोणाच्या ?" बांसरी-
वालेनें भीत भीतच विचारलें.

" तुझ्याच. शोभनेच्या घरीं जायला
मला आतां परमेश्वरानें पायच ठेवले नाहींत.
माधवराव गळा दाटून आल्याप्रमाणें अड-
खळत उद्गारले !

" आपल्याला लंगड करून माझ्या
संसाराला पुन्हां पाय फोडण्यांत परमेश्वरानं
आपली विचित्र लीलाच प्रकट केली आहे
नाहीं ?" बांसरीवाला सजल नेत्रांनीं पती-
कडे पहात पुटपुटली !

" हा सगळा तुझ्या भैरवीचा प्रताप !
माधवराव स्मित करीत राधेच्या पाठीवरून
आपला डावा हात फिरवित म्हणाले !

" एकूण—धन्य ती **भैरवी**—कीं
जिनं आपलं हें पुनर्मीलन केलं—" असें
म्हणत बांसरीवालेनें पुन्हां ती **भैरवी** म्हण-
ण्यास सुरुवात केली.

यावेळीं–सोनू भलत्याच वेळीं कां भैरवी
म्हणत आहे–तें पहाण्यासाठीं म्हातारी–
बांसरीवालेची आई लगबगीनें वाडीत
आली–तों काय—?

" माधवराव तिच्या मांडीवर आपलें
मस्तक ठेवून स्फुंदत आहेत व सोनू–राधा-
बांसरीवाला–त्यांच्या मस्तकावर हळुवारपणें
हात फिरवीत तितक्याच तन्मयतेनें भैरवी
गात आहे—!

तें दृश्य पाहून म्हातारी उद्गारली–

हात मेल्यानों ! जुळलं का पुन्हा ?
तरीच माझा काळभैरवाचा नवस फुकट
नाहीं गेला ! आतां–हा प्रताप म्हातारी-
च्या भैरवाचा, कीं बांसरीवालेच्या भैरवीचा
तें वाचकहो, तुम्हीच सांगा !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गाढवांचा गोंधळ !

(ले:- पुरुषोत्तम भास्कर भावे)

एक दिवस सकाळीं तो थेरडा माझ्याकडे तांबारलेल्या डोळ्यांनीं आला आणि मला कांहीं नवीनच गोष्टी सांगूं लागला.

" तुम्हीं गाढव आहांत " तो मला म्हणाला.

" अं ? काय ? " अचानक पडलेल्या त्या घावांमुळें बावरून जाऊन मी म्हणालों: " काय म्हटलेंत ? "

" तुम्हीं नंबर एकचे गाढव अहांत " असें तो पुन्हां म्हणाला व त्यानें आपलीं दोन्हीं बुबुळें सर्रकन् नाकाच्या बांधाला आणून भिडवलीं.

" हूँ ? " माझ्या तोंडून नुसताच प्रश्नोद्गार-वाचक शब्द उमटला.

" तुम्हीं पहिल्या प्रतीचे, आला दर्जाचे, गेले गुजरलेले गद्धे आहांत, समजलें ? "

विषयावर प्रभुत्व असणाऱ्या प्रोफेसरसारखा शद्वाशद्वांवर जोर देत त्यानें खुलासा केला. ह्या खेपेस एकमेकांत मिसळलेलीं आपलीं बुबुळें त्यानें दूर दोन टोकांना भिरकावलीं. त्याच्या बुबुळांच्या खुनी खेळाकडे मी क्षणभर बघतच बसलों.

त्याच्या मुलीच्या डोळ्यांनीं मी आधींच घायाळ झालों होतों. आतां उरलेंसुरलें काम हा म्हातारा करणार होता.

" असें बघतां काय डांबरटासारखे ? "

" तुझा चेहेरा म्हणजे कांहीं ताजमहाल नव्हे थेरड्या. " (हें मी मनांत म्हणालों) आणि पडलेल्या सिंव्हलासारखी खालीं मान घातली.

" आतां कां लाज वाटते ? बघा ना टक लावून !"

" तुझा चेहेरा म्हणजे कांहीं तुझ्या मुलीचा चेहेरा नव्हे, जांबुवंता ! "

(—हेंहि मी मनांत म्हणालों) व मानेचा सिग्नल परत वर उचलला.

" वाचा गेली का तुमची ? एरवीं तर ओरडत असतां गुरासारखे. आतां बोला ना ! "

त्या म्हाताऱ्याच्या असमाधानी वृत्तीनें मला नवल वाटलें. त्याला काय पाहिजे आहे, तेंच मला कळेना.

" बोला - बोला ना आता—" तो मला परत घाई करूं लागला.

" काय ? " त्याच्या आग्रहाखातर मीं भीत भीत माझा मेडन बॉल टाकला.

" लाज नाहीं वाटत काय म्हणून विचारायला ? " माझा बॉल सपाटून टोलवत तो म्हणाला. "पाजी ! भेकड, हे गुण कुठें शिकलांत तुम्ही ? "

त्याचा हा प्रश्न आटोक्या बाहेरचा वाटून मीं मूग गिळले. मला आवडणाऱ्या पोरीचा तो बाप नसता, तर कदाचित् खुंटीवरची रॅकेट मी त्याच्या टक्कलबाज टाळक्यांत त्याच वेळीं घातली असती.

" तुमच्या जवळ दुर्बिण आहे, नव्हे का ! "

" मला तारे बघण्याचा नाद आहे. "

" तुमच्या जवळ कॅमेरा आहे, नव्हे कां ? "

" मला फोटोग्राफीचा शौक आहे. "

साळसूद प्रश्नांचीं सरळ उत्तरें पुष्कळदां माणसाला ऐन खड्ड्यांत नेऊन टाकतात, ही गोष्ट लगेच माझ्या अनुभवाला आली. कारण क्षणमात्र दबलेला आवाज व स्थिरावलेलीं बुबुळें वर चढवून तो म्हातारा ओरडला—

" तुमच्या सज्जांतून आमच्या माडींत दिवसाढवळ्या तुम्हांला तारे दिसतात नव्हे का ? हेंच शिकवतात का कॉलेजांत प्रोफेसर तुम्हांला ? "

" मग सहशिक्षण कशासाठीं आहे तर—? " मी स्वगत पुटपुटलों.

" याद राखून असा ! तुमच्या दुर्बिणी—कॅमेरे सगळा गाढवपणा एकदम बंद झाला पाहिजे. मी आज दौऱ्यावर जातों आहें. परत आल्यावर जर का आमच्या कमळीची तक्रार आली, तर डोळे फोडून टाकीन ! "

येवढें आश्वासन देऊन तो थेरडा जायला निघाला, पण कांहीं तरी नवी कल्पना सुचून तो पुन्हां परत फिरला.

"....आणखी तुमचा तो गाण्याचा गोंधळ,—तोही थांबलाच पाहिजे. सिनेमांतलीं बाह्यात गाणीं पुन्हां जर कां चोवीस तास कोंकललात तर तोंड फोडून हातांत देईन ! "

डोळे आणि तोंड ह्यांच्या विषयीं भविष्य वर्तवून तो दाराकडे अर्धी वाट चालून गेला, पण आणखी कसला तरी आघोरी विचार मनांत आल्यामुळें पुन्हां मागें परतला.

"—किंवा घरमालकाला सांगून हा गाढवांचा गोंधळ बंद करवीन. अथवा तुमच्या वडिलांचा पत्ता मिळवून तुमच्या मनी ऑर्डरी बंद पाडीन. किंवा आमच्या कमळीकडूनच कॉलेजगेटमध्यें तुम्हांला चपला मारवीन. तिच्या मनांत फार आहे तें ! "

त्यानें आपल्या कल्पनांची चढती भांजणी माझ्यासमोर माडली, पुन्हां एकदां बुबुळांचा गटगटाट केला व दाणदाण पाय वाजवीत तो एक[illegible] चालता झाला.

—आणि भूकंपानें हाद[illegible] केटा शहरासारखा 'पडेल' चेहेरा [illegible] मी माझ्या खुर्चीत कोसळलों.

* * *

त्यानंतर माझ्या जवळची [illegible] मीं फोडून टाकली व तिची [illegible] कुटून मांजांत घालायला एका [illegible] ट्याला बहाल केली. माझा कॅमेर[illegible] अगदीं नजीकच्या ड्रेनेजमध्यें [illegible] बुडवला. " देवदास " "चंडीदा[illegible] वगैरे बोलपटांच्या पद्यावलींना काडि[illegible] लावली.

वेणी घालताना, पॉवडर [illegible] तांना, वाचताना, निजतांना [illegible] अनेक पोझेसमध्यें ज्या खिडक[illegible] कमळी मला दिसत असे [व [illegible] बद्दल तिची मला जोडे मारण्या[illegible] इच्छा होती] ती वाऱ्याची खि[illegible] मीं "ब्लाइंड" सोडून आंधळी केल[illegible] व माझ्या कमअस्सल नशीबाला दा[illegible] देत रात्रीं आराम खुर्चीत तडफ[illegible] लागलों.

" सुख के दिन मे—एक [illegible] था—" म्हणून हृदयभेदक तानं मा[illegible] ण्याची सुद्धां चोरी झाल्यामुळें भी व[illegible] मानपत्रांतल्या आत्महत्त्यांच्या हकीग[illegible] आतां हावरेपणानें वाचूं लागलों.

आणि अशाच रीतीनें स्थानि[illegible] वर्तमानपत्र वाचत असतां एके दिव[illegible] (—नव्हे रात्रीं) बरोबर अकरा वाज[illegible] एकूणसाठ मिनिटांनीं माझ्या दारा[illegible] कुणाची तरी थाप पडली.

" पागलापुरांत दंग्याचें वाता[illegible] रण !" लोखंडाच्या सळईसारखी ए[illegible] हेडलाईन नुकतीच माझ्या डोळ्यां[illegible] घुसली होती. अर्थात् ही ओळ वाच[illegible] तांच दारावर पडलेल्या थापेविषय[illegible] मी साशंक झालों व घड्याळाक[illegible] बघितलें. गुन्हेगार व प्रेमी लोकांन[illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घटकप्रमाणें वाटणारी अकरा एकूण एक्की वेळ झाली होती !

दारावरच्या थापेकडे दुर्लक्ष करायचें मीं ठरवलें व पुढें सब् हेडिंग्ज् लागलों.

—''सुबर रोडवर प्रक्षुब्ध जमाव.''

—दारावर दुसरी थाप पडली.

''—दाढी दर्ग्याविषयीं भानगड.''

—दारावर तिसरी थाप पडली.

एका ढोम निराशेमुळें आजकाल थंडा... माझें हृदय एकाएकीं धडपडूं लागलें. सबहेडिंगजवरून अचानक ...रून माझी नजर, एकदम तळाशीं ...लेल्या जाहिरातीवर आली.

धुडगुस टॉकीज

रफियन सिनेटोनचा पहिला

कला-कंद.

गोंधळ--ए--गद्दा.

is a Ruffian Cinetone !

दारावर चवथी, पांचवी, सहावी ... पडली आणि मग मात्र सारखा ...धडा झडूं लागला. बायकांच्या बांग...सारखा किंवा पोलादी सुऱ्या खळ... तडतडल्या सारखा कसलासा आवाजही ... होता.

ह्या सगळ्या प्रकारची माझ्या हृदयावर चांगलीच प्रतिक्रिया झाली. ...वता धांवता गळाठणाऱ्या खेळाडू...णें तें अगदीं बारगळण्याचा बेतांत ...लें. दारावरच्या थापांत कसलीहि ...र नव्हती.

'' खोलो—खोलो—'' म्हणत ... असलेल्या दाराशीं जिवाच्या आटापिटीनें मस्ती करणाऱ्या नायि...च्या आवेशानें तिथें सारख्या धडका ...सत होत्या.

अखेर अफझुलखानाच्या मुलाख...स जाणाऱ्या शिवाजीच्या तयारीनें ... उठलों. अंगांत एक बनियन अन् ...न सद्रे अडकवले. चिलखताचे दिवस मागें पडल्यामुळें त्यावर एक ...धा कोट, एक रेन कोट व एक ओव्हर कोट चढवला व मार्च महिन्याची पर्वा न करतां गळ्याभोंवती मफलरहि लपेटला.

सुरीचें टोंक व माझा कलिजा ह्यांच्यांत शक्य तेवढें मध्यस्थ ठेवण्याचा माझा निश्चय होता.

'' Who is there—? '' मी म्हणालों.

पण बाहेरच्या सध्दर्मीयाला कदाचित इंग्रजी समजणार नाहीं, असा विचार करून मी पुन्हां म्हणालोंः '' कौन है ? ''

एक चांगलीशीं किंकाळी वठायला पुरेसा होईल इतका, जोर लावला. तेव्हां कुठें साधारण कुवतीचे शब्द माझ्या तोंडून उमटले.

—'' मी ! जरा दार उघडा ना. कोणत्याहि महंमदानुयायांच्या आटोक्यापलीकडील कोंवळ्या आवाजात उत्तर आलें व लगेच बांगड्याच्या आवाजाची माझ्या कानाला व वेणीच्या सुवासाची माझ्या नाकाला ओळख पटली.

''—मी ? तुम्ही कोण ? ''

पुटपुटायला पुरेसा होईल इतका जोर माऊनहि आतां माझ्या तोंडांतून रुबाबदार सवाल निघाला.

''मी कमळी—अं—मिस् फडके. ''

अंगांतले जादा कपडे भराभर काढून मी लाथेनें दूर उडवले व खोलीचें दार सताड खोललें !

एखाद्या कांठोकांठ भरलेल्या गुलाबी आइस्क्रीम प्लेटसारखी ती माझ्यासमोर उभी होती. रंगदार—गोड—नाजुक ! आणि ह्या पोरीनें मला जोडे मारण्याची हिंमत धरावी अं ?

'' मिस् फडके ? '' करड्या आवाजांत मी म्हणालों.

'' हं. '' कुर्रेबाज आवाजात ती गुरकावली.

'' कशाला आलांत ? ''

'' आपल्या मर्दुमकीची परीक्षा पाहण्यासाठीं ! ''

'' काय—काय—? ''

'' दंग्याची हुल्लड अगदीं आपल्या घरापाशीं सुरू झाली आहे. ''

'' अस्सं ! ''

'' सारखा ओरडा सुरू आहे. ''

'' बरं मग ? ''

'' लवकरच आपल्यावर हल्ला होईल. आपल्या घराला आग लागेल. ''

'' मग ते तुमचे वडील आहेत ना ! ''

'' ते दौऱ्यावर आहेत. ''

'' मग तुम्हांला काय झालं ? ''

'' आणखी तुम्हांला तरी काय झालं ? ''

'' मला जोडे मारण्याची हिंमत ठेवणाऱ्या त्या आपणच ना ? ''

आणि माझे चोरून फोटो काढण्याचें शौर्य गाजवणारे ते आपणच ना ? ''

मला वाटलं होतं, कीं तुम्हीं प्रति प्रमिला राणी असाल ! ''

'' आणि मलाहि वाटलं होतं, कीं तुम्ही प्रति अर्जुन असाल ? ''

वेडावण्याच्या आवेशांत ती चटकन् फसली आणि लगेच गांगरली. माझ्या शरीरांत मात्र त्या वाक्यानें विजेचा कारखाना उघडला. बालामृत, ओकासा, सार्सापरिला ह्या सर्वांचा एकच फायदा प्याल्याप्रमाणें मी तरारलों.

'' आणि मी आहेंहि ! ''

खुबीदारपणें अस्मादिक बडबडले. सावध असल्यामुळें ह्या खेपेस ती गप्प बसली अन् कथानकाचा धागा मी ताबडतोब कातूं लागलों.

''—पण तुम्हीं आहांत का प्रमिला राणी ? ''

आतांहि शब्दात गुंतायला ती तयार नव्हती. मला कुठला जोर चढला देव जाणे, मी तर एखाद्या ग्रामोफोनसारखा बोलूं लागलो

'' तुमच्याकडे चोरून बघितलें आणि तुमचे चोरून फोटो घेतले, म्हणून तुमचे वडील मला भेकड म्हणाले. तुम्हींहि जोडे मारण्याची वायफळ धमकी मला दिलीत. ''

'' वायफळ ! मुळींच नाहीं ! ''

'' नाहीं ? मग चला तर माझ्याबरोबर. आपण दोघेहि दंगेखोरांच्या मुकाबल्याला जाऊं. आहे छाती ? ''

'' हो, हो, आहे ! ''

'' ओ हो, प्रमिला राणी ! ''

तिनें असें कांहीं डोळे वटारले, कीं त्यामुळें सहस्त्रनागाचें बळ माझ्यांत संचरलें.

''चला तर मग, पाहूं कोण तुमचं घर जाळतोय् तें !

'' चला !'' ती म्हणाली.

आह्मी दोन मजल्यांच्या बत्तीस पायऱ्या उतरतों. आह्मीं बाग ओलांडली. आह्मी बागेचें दार ओलांडलें. रस्त्यावर येतांच ''टार्झन दी एप् मॅन''ची कर्कश किंकाळी आणि बाबुराव पेंढारकरांचें विकट हास्य ह्यांचो बेरीज केल्यासारखा आवाज आमच्या कानावर आला.

''—पहा !'' ती एकदम थबकली.

मी घाबरण्याच्या लहरींतच नव्हतों. माझ्या कानाशीं तिचा पदर फडफडत होता. तिच्या केशभारावरचा सुवास पिऊन मी मस्त बनत होतों. एक हजार अविंधांचीं मुंडकीं मारून त्यांचें बोहोलें बनवण्याचा माझा विचार होता.

'' आयाई मारताहेत—''

कोल्हीं, कुत्रीं आणि पोरें ह्यांच्या एकसहा रडण्यासारखा आवाज ऐकूं येतांच ती म्हणाली.

'' घाबरलांत कां?'' मी विचारलें.

'' मुळींच नाहीं,'' खोल आवाजांत तिनें उत्तर दिलें. सुंभ जळून आतां फक्त पीळ तेवढा उरला होता.

'' आतां मागें घ्यावयाचें नाहीं.'' मी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

" नाहीं "—ती.

" आपण ह्या दंगेखोराला शिक्षा ठोठावलीच पाहिजे. "मी.

" हो. " ती.

" लेकाच्यांनीं आपली झोंपमोड केली—गाढव कुठले—"

माझें भाषण पुरें होण्यापूर्वी घोड्याचें खिंकाळणें, गाढवांचें ओरडणें आणि रांकेलचे एक लाख डबे माउंट एवरेस्टवरून खालीं घडघडणें ह्यांचा व्हावा तसा प्रचंड कल्लोळ झाला. तीं चमकून मला खेंटून चालूं लागली.

" काय ? "

" कांहीं नाहीं. "

" गलका जवळ ऐकूं येतो आहे. "

" होय. "

" तुम्ही जर त्यांच्या हातांत सांपडलांत तर ?" मी खिशांत हात घातला. " तर ह्या चाकूचा उपयोग करा. "

" आणि तुम्हीं जर त्यांच्या हातांत सांपडलांत—तर !" तिनें हातांतली बांगडी काढली. " तर लागलींच ही कांच चावून टाका."

" पण मला जिवंत ठेवण्याच्या भानगडींत ते पडणारच नाहींत. मी पुरुष आहें. "

" तरी पण ती बांगडी ? असूं तशीच. "

" बरं. "

आम्ही गुण्यागोविंदानें निरवानिरव करून टाकली. मला जोडे मारण्याचा तिचा विचार होता, हें मीं विसरलों. तिचे चोरून फोटो घेणारा तो मीच, हेंहि ती विसरली. आम्हीं घरापासून फारसे लांब आलों,नसलों, तरी दंग्याच्या अगदीं जवळ आलों होतों. एवढा हल्ला होतो आहे, तरी रस्त्यावर मात्र चिट्पांखरूंहि नाहीं. ह्याचा मात्र आम्हांला मोठा अचंबा वाटत होता.

अखेर ज्या ठिकाणीं खून,रक्तपात, जाळपोळ ह्यांचा कहर चालला असेल, असें आम्हांला वाटलें होतें, त्या रस्त्यावर आम्ही येऊन ठेपलों.

आरडा ओरडीची ह्या सीमा झाली असली, तरी दंगे मात्र कुठें पत्ता नव्हता. प्रथम परस्परांकडे बघितलें व मग दृष्टि फेंकली.

समोरच्याच इमारतीवर करणाऱ्या विजेच्या दिव्यांची लागलीं होती—

" धुडगुस टॉकीज " वाचलें व दिवे गेले.

रफियन सिनेटोनस् फर्स्ट कृति ' मीं वाचले व दिवे आले.

" गोंधळ—ए—गद्दा—' वाचलें व दिवे कायमचे गेले ! !

बृहन्महाराष्ट्रांतील सर्वांचें आवडतें दैनिक !

१ पैशांत
रॉयल आकाराचीं ६ पानें

प्र भा त

देशी व परदेशी ताज्या बातम्यांचें संकलन

मुंबईंत सतत ६ वर्षें जनताजनार्दनाची सेवा बजावून ' प्रभात 'नें दक्षिण महाराष्ट्रावर स्वारी केली.

' प्रभात 'चे विशेषः—दक्षिण महाराष्ट्रांतील ताजी व खुसखुशीत बातमीपत्रें, अ. प्रे., यु. प्रे. व रूटरच्या ताज्या बातम्या याशिवाय सिनेमावृत्त, वाङ्मय-संसार, इ. लोकप्रिय सदरें. आणि हें सर्व

अवघ्या १ पैशांत

' प्रभात 'चा पुण्याचा पत्ताः—जमखंडीकरांचा वाडा, ४९५–९६ शनवार पेठ, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'वंदे मातरम्' चा ध्वनि दुमदुमतांच 'विजयी विश्व-तिरंगा प्यारा। झंडा ऊंचा रहे हमारा।' या गीताला उंच सुरांत तिनें सुरवात केली. झेंडा जसजसा वरवर जाऊं लागला, तसतसें तिचें हृदयहि वरवर उचंबळूं लागलें. जणुं काय झेंडावंदन करणारा पुरुष झेंड्याच्या रस्सीबरोबर तिच्या प्रेमाचें आंतडेंच खेंचित होता! त्या गगनचुंबित डोलकाठीवर झेंडा दिमाखानें फडकूं लागतांच तिच्या हृदयाच्या गगनांत तिचा प्रेमाचा झेंडा फडकत आहेसें तिला वाटलें. झेंडागीताचें शेवटचें चरण होतांच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला व ती बेशुद्ध होऊन खालीं पडली! 'नेत्रा—नेत्रा!' अशी एकच गडबड उडाली. लोक पुढें धांवले, सेविका तिच्याभोंवतीं गोळा झाल्या. अध्यक्षांनीं तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न चालवला. कुणी पाणी, कुणी सोडा, कुणी काय, कुणी काय, ज्याला जें वाटलें—जें सुचलें, तें घेऊन तो पुढें धांवला. 'डॉक्टर, डॉक्टर!' अँब्युलन्स, ॲम्ब्युलन्स अशी हांकाटी झाली. जवळच उभ्या असलेल्या मोटारवाल्यानें शिंग वाजवीत गर्दीमधून मुसंडी मारली. मोटार अगदीं जवळ येऊन उभी राहिली. तेवढ्या कालांत नेत्रा थोडी शुद्धीवर आली. तिनें एकदां सभोंवार नजर फेंकली. अध्यक्षांनीं आपल्या हातानें नारिंगीचा ग्लास तिच्या तोंडाला लावला! प्रीतीचा प्याला स्वतः प्रियंकरानेंच मुखाला लावल्यावर कोणत्या प्रणयिनीला धन्यता वाटणार नाहीं? नारिंगीच्या घोंटाबरोबर ती प्रेमाचा घुटकाच गिळू लागली. तिला हुषारी आली. दोन सेविकांच्या साह्यानें ती मोटारींत बसली. मोटार पों पों करीत नेत्राच्या घराकडे धांवली.

* * *

नेत्राचे वडील दादासाहेब निम-सरकारी अधिकारी होते. नेत्रानें चळवळींत भाग घेणें त्यांना मुळींच पसंत नव्हतें. मुलीच्या चाळ्यामुळें आज ना उद्यां; आपल्या नोकरीवर गदा येणार, अशी त्यांना भीति वाटे. पण एकुलती एक मुलगी! तिचें मन ते कसें मोडणार? तो रविवार असल्याकारणानें ते घरींच होते. नेत्रा एका लोखंडी कॉटवर पडली होती. लोकांची सारखी 'ये-जा' चालली होती. नेत्रा हंसतमुखानें सर्वांचें स्वागत करीत होती. पण अपेक्षित व्यक्ति न आल्यामुळें तिचें मन जरा कष्टी दिसत होतें. शेवटीं ती व्यक्ति आली. नेत्राची कळी उमलली! नेत्राचा आनंद! अहाहा! काय तो आनंद! 'या' म्हणून तिच्या तोंडून शब्द निघतांच कमलाकर तिच्या कॉटवरच जाऊन बसले, व नेत्राचा हात आपल्या हातांत घेऊन 'आतां कसं वाटतं?' म्हणून त्यांनीं प्रश्न केला. नेत्राला 'कसं वाटत होतं' याचें वर्णन कोणता कवि करणार? चहा-कॉफी झाल्यावर निरोप घेतांना कमलाकर हळूंच 'मी उद्यां पुन्हां येईन बरं' म्हणाले असे व जिना उतरून जाऊं लागले त्यांच्या पावलाच्या फट्फट् आवाजाला नेत्राचें हृदय 'धडधड' अशी सांथ देत होतें!

* * *

पहांटेच्या प्रभात-फेरीबरोबर नेत्राच्या प्रेमाची प्रभात विकास पावूं लागली. झोंपे वांचून तिच्या रात्रींच्या रात्री जाऊं लागल्या. एकदां तर गम्मतच उडाली! मध्यरात्रीलाच प्रभात-फेरीच्या पोरी गोळा करण्यासाठीं ती लटकीच घराच्या बाहेर पडली! नंदाच्या घरीं ती गेली. 'नंदा नंदा' अशा नेत्राच्या हांका ऐकतांच नंदानें दार उघडलें. 'चल लौकर' नेत्रा म्हणाली. नंदा घाईघाईनें पातळ नेसूं लागली. तोंच नंदाचे वडील जागे झाले. 'कुठं ग निघालांत पोरीनों अपरात्रीं?' ते रागानें म्हणाले. 'नेत्रा, घड्याळांत तरी पहा किती वाजले ते.' ते हंसूं लागले. भिंतीवरच्या घड्याळावर नेत्राची नजर गेली. 'अगबाई! एकाला पांच मिनिटं! आतां?' 'आतां काय झोंप इथंच नंदेजवळ. पहांट झाली. कीं जा फेरीला.' नंदाच्या वडीलांचा हुकूम होतांच नंदा व नेत्रा दोघीहि अंथरुणावर पडल्या.

* * *

कमलाकर वरचेवर नेत्राकडे येऊं लागले व रात्रीं अपरात्रीं तीही त्यांच्याबरोबर समारंभाना जाऊं लागली. दादासाहेबांना जरी मनापासून हें आवडत नसे तरी मुलीची जिकडे तिकडे तारीफ चाललेली ऐकून त्यांच्या मनाला मधून मधून आनंद वाटत असे. दे. भ. म्हणजे धुतल्या तांदसारखे निर्मळ, असा त्यांचा ग्रह होत चालला. नेत्रादेखील या गोष्टीचा फायदा घेऊं लागली. ती आपल्या मैत्रिणीबरोबर विदेशी कापडाच्या पिकेटिंगलाहि जाऊं लागली. केशरी देशसेविकांच्या करामतीनें चळवळीला रंग चढला आणि कमलाकरांच्या, घरावर छापा येऊन कमलाकर सरकारचे पाहुणे झाले! नेत्राच्या मनाला तळमळ लागली. आपल्यासहि सरकारी पाहुणचार मिळावा म्हणून ती धडपड करूं लागली, पण तिची निराशाच झाली. दोन तीन वेळां तिनें लॉक-अप पर्यंत पळा गांठला, पण पुढचें तिकीट मिळेना, म्हणून तिला परत घरीं यावें लागले. लाठी हल्ल्यांत पडून आपण चार दिवस हॉस्पिटलची तरी हवा खावी, म्हणून ती अडव-लेल्या मिरवणुकींत देखील जाऊन बसली पण तिला यश आलें नाहीं. कमलाकराच्या मागें तुरुंगाबाहेर आपण मोकळें राहणें, म्हणजे कमलाकरायला आपण अपात्र ठरणें-त्यांच्या मनांतून आपण उतरणें असचें तिला वाटलें. तिला चैन पडेना. अहोरात्र हा विचार मनांत येऊन ती रडत बसे!

* * *

गांधीं—आयर्विन् तह झाला आणि अचानक कमलाकरांची मुक्तता झाली. कमलाकर आपल्या घराच्या दारांत उतरले खरे, पण बाहेरच्या बाहेर आईची भेट घेऊन जे निघाले ते नेत्राच्या घरीं आले! नेत्रा पहांटेच्या प्रहरीं कमलाकराच्या भेटीच्या सुखस्वप्नाचा आस्वाद घेत होती, तोंच 'नेत्रा! नेत्रा!' अशी हांक व दारावर थाप ऐकूं आली. ती जागी झाली आणि तिनें दार उघडले. 'कमलाकर!—हे कमलाकरच! नेत्र तृप्त झाले!' दाराच्या आडोशांतच तिनें कमलाकरांना आलिंगन दिलें! दादासाहेबांचा शब्द ऐकतांच ती भानावर आली. कमलाकर आंत आले. सर्वांना आनंद झाला. चहापाणी झालें. तुरुंगांतल्या गोष्टी झाल्या. थट्टामस्करी झाली आणि कमलाकरांची स्वारी घराबाहेर पडली. सावलीसारखी नेत्राहि त्यांच्याबरोबर चलली होती.

* * *

गांठी-भेटी जास्त होऊं लागल्या. लग्न चे बेत ठरले. पुढचें आयुष्य कसें काढायचें तें नक्की झालें. नेत्रा—कमलाकर गांवांत चर्चेचा विषय झाला. कित्येकांनां हें बरें वाटेना. दादासाहेबांच्या कानावर गोष्टी आल्या। त्यांना वेळोवेळीं रागहि आला, पण मुलीच्या ममतेच्या मान्यामुळें त्यांच्या रागाचा निभाव लागेना. आईबापांना काळजी पडला. येत्या लग्नसराईत चांगलें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्थळ पाहून नेत्रांचें लग्न करून टाकूं हाणजे झालें, असा त्यांनीं बेत ठरवला. 'प्रतिपश्चंद्ररेखेव' नेत्रा कमलाकरांची सलगी वाढत चालली, कमलाकर ब्राह्मण, आपण मराठे, त्यांच्याशीं आपलें लग्न होणें शक्य नाहीं अशी कल्पनादेखील कधीं नेत्राच्या निर्मळ मनाला शिवली नाहीं उलट आतां स्वराज्य होणार ! आतां कसल्या जाती राहातात ! स्वातंत्र्याच्या लाटेसरशीं जातीपातींचा नायनाट होणार आणि कमलाकराच्या गळ्यांत माळ घालायला दादासाहेबांची हंसत परवानगी मिळणार असा नेत्राला भ्रम होता. या भ्रमांतच नेत्रा आपल्या भावी संसार—स्वराज्यासाठीं कल्पनेचे किल्ले बांधूं लागली ! पण जेव्हां दादासाहेबांनीं नेत्रासाठीं स्थळें शोधायची मोहीम जोरानें सुरू केली, तेव्हां मात्र नेत्राच्या तोंडचें पाणी पळालें आणि तिचा एक एक किल्ला ढांसळून पडला. तिनें कमलाकराची भेट घेतली, त्याच्या कानीं ही विपरीत वार्ता तिनें घातली. राष्ट्रीय राजकारण मागें पडून प्रेमाच्या राजकारणाला सुरुवात झाली ! गुप्त मसलती चालू झाल्या ! प्रेमाच्या खलबतांना ऊत आला. गरीब बिचारी नेत्रा ! या खलबतांतच तिनें कमलाकरांना आपल्या कौमार्याचा नैवेद्य अर्पण केला ! कमलाकरानें 'मी तुझा प्राणांतींहि त्याग करणार नाहीं' म्हणून शपथ वाहिली !

* * *

इतक्यांत राजकारणाचें वारें उलट दिशेला वाहूं लागले. जोराचें वादळ उठलें. कमलाकरावर धाड आली. राजबंदी होऊन येरवड्याच्या राजवाड्यांत त्याची रवानगी झाली ! त्याच्या पाठोपाठ प्रयाण करण्यासाठीं नेत्रा आतुर झाली. तिला चैन पडेना, तिच्या मस्तकांत विचारांचें वादळ उठलें. रात्रभर तिला झोंप आली नाहीं. बिछान्यावर ती तळमळत होती. शेजारच्या खोलींत तिचें आईबाप कुजबुजत होते. 'आपल्याच लग्नाचा प्रश्न !' नेत्राचे कान तिकडे ओढ घेऊं लागले. 'स्थळ पहिल्या प्रतीचं आहे. चांगलं हजार रुपये घरभाडं येतं.' 'पण त्याला व्यसन आहे म्हणतात.' "छे:ग कधीं कधीं ते घेतो इतकंच. अन् मी स्वतः कुठं नाहीं घेत ? पोरीचा नेम नाहीं. उद्यां जेलमध्यें गेली, तर हातचं स्थळ जाईल आणि पोरीला जन्मभर कुवारपणांत दिवस कंठावे लागतील ! मी म्हणतों उद्यांच निघावं. तिथं गेल्यावर करूं तिथिनिश्चय. सकाळींच बांधाबांधीला लाग. मी बडोद्याला तार देतों." आईबापांचा हा बेत ऐकून नेत्राच्या अंतःकरणाचे पाणी पाणी झालें. उजाडते कधीं असें तिला होऊन गेलें. ही रात्र अशीच अनंतकाल रहावी आणि कधीं उजाडूच नये असाहि विचार तिच्या मनांत आला. तिचे डोळे रडून रडून लाल झाले. काय करावें तें तिला मुळींच सुचेना. ती सकाळींच उठली आणि थोडा वेळ कुठें तरी जाऊन आली. नेत्रा परत येतांच आई म्हणाली, "आजी अत्यावस्थ आहे. आतांच तार आली. रात्रीच्या मेलनं बडोद्याला जायचं आहे. तुझी ट्रंक भरून ठेव." आईचे हे शब्द ऐकून आपला हक्काचा आसरा तुटला असें नेत्राला वाटलें. 'आईसुद्धां आपल्याला अनुकूल नसावी ना ?' तिनें आपल्या मनाचा निर्धार केला. आईबरोबर तीहि ट्रंका भरायला लागली. दादासाहेब घरीं आले. सर्वांचीं जेवणें झालीं. मला यायला वेळ होईल, सारी तयारी ठेवा, असें म्हणून दादासाहेब ऑफिसांत गेले. नेत्रानें सारे सामान बांधलें नेत्राची आई विश्रांतीसाठीं थोडी आडवी झाली. नेत्रा म्हणाली, आई, "रेखाला तेवढी मी भेटून येते." आई 'बरं' हाणाली. नेत्राची घराच्या बाहेर पडली ती थेट ट्रॅममध्यें जाऊन बसली. ट्रॅम गिरगावांत आली. ती सुनंदाच्या घरीं गेली. केशरी साडी ती नेसली, आणि बुलेटिन्स घेऊन ती चार स्वयंसेवकांसह बाहेर पडली. चार चहाट्यावर थाळी बाजवून तिनें बुलेटिन् वाचलें. स्वयंसेवकांना अटक झाली, पण तिला कोणी पकडीचना. आज कैद व्हायचेंच आणि ही लग्नाची आपत्ति टाळायचीच असा तिचा निश्चय होता. ती पोलीस कोर्टांत शिरली. मॅजिस्ट्रेटजवळ जाऊन तिनें 'वंदे मातरम्'चा जयघोष केला. साऱ्या कोर्टांत तिनें बुलेटिन्स भराभर भिरकावलीं. नेत्राला तिथल्या तिथें अटक झाली. पोलिसांनीं लॉकअप्मध्यें तिची रवानगी केली !

* * *

नेत्राची आई निजलेली असतांनाच सुनंदा, नंदा, व दुसऱ्या तीन चार मुली 'नेत्राला पकडली' म्हणून सांगत आल्या. नेत्राची आई ताडकन् उठून बसली. आतां मला विचारून रेखाकडे गेली ! एक ताससुद्धां झाला नसेल.' तिला बरोबर कल्पना आली. 'पोरीनं आपला बेत ऐकला म्हणूनच हा तिनं डाव केला !' दादासाहेब आल्यावर नृसिंहावतार धारण करणार ही तिची खात्रीच होती. ती विचारांतच पडली. संध्याकाळीं दादासाहेब घरीं आले. नेत्राच्या अटकेची बातमी कळताच त्यांच्या अंगाचा संताप झाला. आणि कां नाहीं होणार ! ते निमसरकारी नोकर ! शिवाय नेत्राचे ते कांहीं वाईट का करीत होते ! इष्टमित्र गोळा झाले आणि त्यांची समजूत करूं लागले. 'पोरगी मेली ! मी तिची चौकशी सुद्धां करणार नाहीं, कीं कधीं तिचं काळं तोंडहि पाहाणार नाहीं' असें दादासाहेब बोलले. एक पुढारी म्हणाले, 'नेत्रा देशासाठीं कैद झाली. तिनें आपलं कर्तव्य करून तुमचं तोंड उजळ केलं. तुमच्या मतानं ती कर्तव्याला चुकली असेल, पण तुम्ही तिचे बाप, तुमच्या कर्तव्याला चुकूं नका. ती कोणत्या लॉकअप्मध्यें आहे, पत्ता लावा, वेळीं तिच्यासाठीं प्राण द्या.' दादासाहेबांना हें पटलें. ते तशा रात्रीं तडक बाहेर पडले.

* * *

दुसऱ्या दिवशीं दादासाहेबांनीं लॉकअप् मध्यें नेत्राची भेट घेतली. माफी मागून मोकळी हो, म्हणून त्यांनीं तिला सांगितलें. नेत्राच्या कपाळाला आंठ्या पडल्या. ती बापाजवळ शब्दसुद्धां बोलली नाहीं. बापाचें मन ! त्यांच्या मनाला तें लागून राहिलें ! 'बेहेत्तर आहे नोकरी गेली तर !' त्यांचा निश्चय ठरला. नेत्रानें स्वतःसाठीं भरलेली ट्रंक घेऊन ते कोर्टांत हजर झालें. नेत्राला दोन महिन्यांची सजा झाली. नेत्राच्या गळयांत किती तरी फुलांचे—सुताचे हार पडले ! दादासाहेबांच्या डोळ्यांतून टप्टप् टिपें गळूं लागलीं ! त्यांनीं नेत्राच्या पाठीवरून हात फिरवला. तिला शाबासकी दिली ! नेत्राला धन्य धन्य वाटलें. बापाच्या गळयाला तिनें मिठी मारली !

* * *

दोन महिने भरतांच नेत्रा सुटून घरीं आली. कैदेंतून कमलाकराचीं तिला पत्रें येऊं लागलीं 'मी सुटून घरीं येतांच दादासाहेबांजवळ लग्नाची गोष्ट काढतों.' अशी आश्वासनें त्यांत असत. 'किती गोड शब्द कमलाकर लिहितात ! कमलाकर खास आपल्या शब्दाला जागतील !' तिचा विश्वास खरोखरच अढळ होता. कमलाकराच्या शिक्षेची मुदत संपत आली. नेत्रा एक एक दिवस—एक एक क्षण मोजीत राहिली ! इतक्यांत एके दिवशीं कमलाकर सुटले ही बातमी तिच्या कानीं आली. तिला हायसें वाटलें. कमलाकर आतां आपल्या भेटीकरतां येणार, बाबांना ते लग्नाबद्दल विचारणार, आणि साऱ्या गोष्टी आपल्या मनासारख्याच होणार ! नेत्राचा आनंद गगनांत मावे ना !

* * *

कमलाकर सुटले ते आपल्या आईच्या भेटीला गेले. जन्म देणारी—नऊ महिने गर्भाचें ओझें उदरांत वाहणारी—आई ती ! नेत्राला त्यांचे करणें बरोबर वाटलें. कमलाकराबद्दल तिचा आदर द्विगुणित झाला ! इतक्यांत नेत्राला एक पत्र आलें अक्षर पाहतांच तिनें तें आनंदानें फोडलें. तें कमलाकराचें—तिच्या प्रियकर कमलाकरांचें होतें ! वाचण्याकरितां तिनें तें उघडलें—हें काय ? 'प्रियभगिनी नेत्रा !' नेत्राच्या नेत्रापुढें काळोखी आली ! 'प्रथम भेटीपासूनच तुझ्यावर माझें भगिनीप्रमा प्रेमणें असून येत्या भाऊबीजेला ओवळणीकरतां मी तुझ्याकडे येणार आहें." हें वाक्य वाचून तर तिला तिरमिरी आली ! तिचा राग अनावर झाला. तिनें कमलाकराला पत्र लिहिलें, एकांतांत घडलेल्या गोष्टींची आठवण दिली 'असल्या गोष्टी तुम्ही आपल्या बहिणी जवळ कराल का ?' म्हणून तिनें सरळ प्रश्न केला ! तिनें तें पत्र टपालांत टाकलें अजून तरी कमलाकर ताळ्यावर येतील अशी वेडी आशा तिला फसवूं लागली पण कमलाकरांचें उत्तरच येईना. तिला मनस्वी राग आला, आणि त्याबरोबर 'न भूतो न भविष्यति' धास्तीहि वाटूं लागली. तिनें कमलाकरांना निकराचें पत्र लिहिलें. 'आपल्याला चार महिने गेले आहेत' हें हें गुपित—ही नाजूक गोष्ट तिनें त्या पत्रांत उघड केली. तिनें त्यांची परोपरीनें विनवणी केली. नेत्राच्या अश्रूंनीं तें पत्र भिजून चिंब झालें होतें. पण कमलाकराच्या पाषाण—हृदयाला त्यानें थोडाच द्रव्य यायचा होता ?

* * *

ऊलट टपालीं कमलाकरांचें उत्तर आलें. कमलाकरांनीं नेत्रावर गहजब केला होता. 'मी तुला बहीण मानली ही चूक केली. तूं इतकी दुर्वर्तनी असशील, अशी माझी कल्पना नव्हती. आपलं हिडीस पाप माझ्या गळयांत बांधून माझ्या देशभक्तीला डाग लावण्याचा तुझा डाव आहे. तूं पक्की गळे पडू आहेस ! आपल्या पापाचीं फलं खुशाल भोग, पण माझ्या पवित्र चारित्र्यावर शिंतोडे उडवूं नकोस ! नेत्राला ब्रह्मांड आठवलें ! या अफाट जगांत आपल्याला कोणी वाली नाहीं—आपला सर्वस्वी घात झाला, असा निराशेचा धक्का बसून नेत्रा निचेष्ट पडली ! इतक्यांत नेत्राची मावशी तिथें आली. चार दिवसांपूर्वींच ती बहिणीच्या भेटीसाठीं पुरींत आली होती. नेत्राला अशी पडलेली पाहतांच ती घाबरली. तिनें तें पत्र उचललें व नेत्राला सावध केलें. पत्र वाचतांच तिचा संशय फिटला. कारण नेत्राच्या एकंदर लक्षणांवरून ती गरोदर असावी असें तिला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आगोदरच वाटत होतें. तिनें नेत्राला 'घाबरूं नको' म्हणून धीर दिला. नेत्राच्या आईला मात्र तिनें या गोष्टीची दाद लागूं दिली नाहीं. 'नेत्रा फारच अशक्त झाली आहे, मी तिला चार दिवस—पुरास घेऊन जातें' असें मावशी म्हणाली. नेत्राच्या आईबापांनीं नेत्राचाहि जाण्याचा कल पाहून या गोष्टीला संमती दिली.

* * ६

—पुरांत एका मॅटर्निटी होममध्यें नेत्रा एका कॉटवर पडली होती. तिच्या जवळच पाळण्यांत एक मूल होतें. नेत्रा त्याला 'आनंद' म्हणे. हाच नेत्राचा आनंद! आनंदाला नेत्राच्या उदरांत नऊ महिन्याचा बंदिवास सहन होईना. सातव्या महिन्यांतच स्वारीनें सूर्यप्रकाशांत उडी घेतली! दहा बारा दिवसांनीं मावशीनें बाळबाळंतणीला घरीं आणलें. पण नेत्राची प्रकृति बिघडत चालली. तिला भयंकर चिंतेनें ग्रासलें. ती सारखी झिजत चालली. 'आनंदाचं कसं होणार?' असा सारखा तिचा ध्यास होता. मावशीनें नानातऱ्हेनें तिचें समाधान करण्याचा प्रयत्न केला, पण नेत्राची समजूत पटेना.

'आनंद कुणाचं नांव सांगणार?' आपण केलं तें पाप कीं पुण्य? या विचारांनीं ती वेडी होते कीं काय अशी भीति मावशीला पडली. मावशी म्हणाली 'मी तुला आणली, त्याच वेळीं या गोष्टीचा विचार केला. माझ्या यजमानांनीं आपलं नांव मुलाचा बाप म्हणून नोंदलं आहे. हें बर्थफिकेट पहा.' नेत्रानें तें पाहिलें. स्वतः जाणून बुजून पाप करणारा, पण लोकापवादाच्या भीतीनें खोटं बोलणारा भ्याड कमलाकर व हातून मुळीच गुन्हा न घडतां एका अनाथ मुलीच्या पापाचे धनी म्हणून लोकापवाद ओढवून घेणारे बाबासाहेब-मावशीचे यजमान या दोन मूर्ति तिच्या दृष्टीसमोर उभ्या राहिल्या! कमलाकराचा तिला तिटकारा आला. समाजावर तिचा रोष झाला. संतापाच्या परिस्थितीचा परिणाम तिच्या प्रकृतीवर दिवसें दिवस फार अनिष्ट होत चालला. डॉक्टरांनीं तिच्या रोगाचे निदान केलें. तो भयंकर रोग—'क्षय!'

* * *

मावशीचा यजमान—बाबासाहेब नेत्राला घेऊन—पुरीस आले. त्यांनीं आनंदाला बरोबर आणलें नाहीं. नेत्राची अत्यवस्थ स्थिति पाहून दादासाहेबांच्या पोटांत धस्स झालें? अहेची तर कंबरच खचली! दोन चार एम. डी. ना पाचारण करून आणलें. सर्वांचें एकच मत पडलें—'असाध्य'! शक्य तेवढे उपचार झाले. दादासाहेबांना पाण्यासारखा पैसा खर्च केला. नेत्राच्या आजाराची बातमी मुंबई बेटाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत ज्याच्या त्याच्या तोंडी झाली. भेट घेण्यासाठीं दाराशीं लोकांची झुम्मड जमूं लागली. पण बेशरम कमलाकर मात्र तिकडे फिरकला देखील नाहीं! आणि तो आला नाही तेंच बरें झालें. त्याला पहातांच नेत्रानें, संताप वायू होऊन प्राण सोडला असता? पण कदाचित् त्याच्या भेटीनें—त्यानें पश्चात्ताप होऊन नेत्राची क्षमा मागितली असती तर—नेत्राची प्रकृती सुधारलीहि असती. निदान तिला शांतपणें मृत्यु आला असता—पण कमलाकर देशभक्तीच्या पोकळ बकवा करीत—राजकारणाच्या मिषानें दुसऱ्यांच्या भोळया भाबड्या पोरींना बिघडवीत—एक कर्ता पुढारी म्हणून मिरवीत होता. पुष्कळ लोकांनीं तोंड उघडलें नाहीं जो तो मनांतल्या मनांत 'नेत्राच्या नाशाला कारण कमलाकरच' हें जाणून होता.

* * *

नेत्रानें आनंदाचा ध्यास घेतला. आनंद कोण म्हणून प्रश्न निघाला. बाबासाहेब म्हणाले, नेत्राच्या मावशीला मुलगा नाहीं म्हणून नेहमीं वाईट वाटे. एक अनाथ बाई बाळंत झाली, तिचं मूल नाळमारामुद्धां हिनें घेतलं. नेत्राला त्या मुलाचा अत्यंत लळा लागला आहे. नांव तिनंच 'आनंद' असं ठेवलं. मी तार करून त्याला आणवतों.' 'आनंदाला तातडतोब घेऊन ये' अशी मावशीला तार गेली. तार पोंचतांच मावशी आनंदाला घेऊन निघाली.

७ * *

नेत्राचा जीव आनंदाकरतां घुटमळत होता. इतक्यांत दाराशीं मोटार येऊन थडकली. बाबासाहेबांनीं खिडकींतून पाहिलें, मावशी आनंदाला घेऊन वर आली. नेत्राच्या तोंडून 'आनंद' अशीं अक्षरें निघतांच मावशीनें आनंदाला पुढें केला. नेत्रानें त्याला घेण्यासाठीं हात वर केले. नेत्राची नजर आनंदावर खिळली. आनंदाला हृदयाशीं घट्ट कवटाळून धरतांच तिला ब्रम्हानंद झाला. नेत्रानें आपले नेत्र कायमचे मिटले! 'नेत्राचा आनंद' नेत्राला भेटला!

———

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कारखान्याच्या किंमतीलाच

'डकबॅक' वॉटरप्रुफ कोट

घ्या !

स्त्री-पुरुषांचे कोट—किं रु. ३॥,४॥,५॥ ६॥, ८॥,१०॥, १२॥, १५ ते ५०

लहान मुलांचे कोट—२४" रु. २८२, २७"—२८४, ३०"—२८६, ३३"—२८८, ३६"—२८१२, ३९"—३, ४२"—३८२.

या खेरीज रबर क्लॉथ एअर पिलोज, आयड्रॉपर्स, रबरवलून्स, टीटस, हॉट वॉटर व आईस बॅग्ज तसेंच संततीप्रतिबंधक उपकरणेंहि आम्ही बनवितों. गव्हर्नमेंट मेडिकल स्टोअर्स मुंबई इलाख्यांतील इस्पितळें यांना आम्ही रबर शिटिंग्ज पुरवितो. कॅटलाग मागवा. फुकट पाठवूं.

दुकान रविवारीं व सुटीच्या दिवशींही उघडें असतें.

बेंगाल वॉटरप्रुफ वर्क्स लि.,

३७७ हार्नबीरोड, मुंबई.

भर उन्हाळ्यांतही हीं दोन औषधें खात्रीनें उत्तम गुण देतात

खालील औषधें खोटीं आहेत हें सिद्ध करणारास

दोन हजार रुपये इनाम

(१) बंधेज गोळ्या:—धातू पातळ झाल्यानें लघवींत किंवा स्वप्नांत जाणें, उष्णता, आळस, चेहरा फिका वगैरे दोष असे पळतात, जसे हवेनें मच्छर. ७ दिवसांत धातु घट्ट होते. १४ दिवसांचे सेवनानें व खालील तेलाचे मालीशनें उत्तम शक्ती प्राप्त होते. ७ दि. किं. रु. २.

(२) कामशक्ति नवजीवन:—अति स्त्रीप्रसंगानें व मुष्टिमैथुनाने ज्यानें आपला सत्यानाश करून घेतला, अशाला व ६०–७० वर्षांचे म्हाताऱ्यास हें खरोखर नवजीवन देतें. 'बंधेज गोळ्या' घेत असतांनाच ह्या तेलाची मालीश गुप्तेंद्रियास सुरू ठेवल्यानें नपुंसकता, लघुत्व, बारीकपणा, वांकडेपणा वगैरे दुष्टदोष असे पळतात, जसे मांजरास पाहून उंदीर. किं. रु. १॥.

भर उन्हाळ्यांतही हीं दोन्ही औषधें घेणारास शंभर टक्के गुण येतोच. कामशक्ति इतकी जोरदार वाढते कीं, आटोक्यांत ठेवणें कठीण जातें. स्तंभन शक्तिही मनपसंत वाढते.

मुंबई एजन्ट { १ माधव एजन्सी, मॅजिस्टिक सिनेमा जवळ, गिरगांव.
२-३ पॉप्युलर फार्मसी, ग्रँटरोड व रानडे रोड दादर (बी. बी.)

व्ही. पी. पार्सलनें खालील खास पत्याहूनच मागविणें. १ ते २ ही औषधांस पो. ख. ८ आणे ज्यारत.

मॅनेजर—नवजीवन दवाखाना, (प्र) नागपूर सिटी.

निराश होऊं नका !

यूरोगोनिन्

निराश होऊं नका !

हें एकच औषध सेवन केल्यास अविचारानें केलेल्या वाईट कृत्यांतून तुम्ही मुक्त व्हाल. आमच्या 'युरोगोनिन्' पिल्स मागवून परमा, गरमी व त्यासारखे झालेले रोग समूळ नाहींसे करा.

पत्रव्यवहार अगदीं गुप्त राहील

औषध सुरु केल्यापासून दोन–तीन दिवसांतच गुण दिसून येतो.

लिहाः—Sole Representative for India, Burma & Ceylon

Advance Trading Co.

Shanti Building, Kandewadi,
Bombay 4

हिंदुधर्मशास्त्रावरील एक अमोल ग्रंथ.

उस्मानिया युनिव्हर्सिटींत बी. ए. च्या अभ्यासक्रमासाठीं मंजूर असलेलें

धर्मशास्त्र विचार

लेखकः—प्रो. पां. वा. काणे

केसरी, महाराष्ट्र, नवाकाळ इत्यादि वृत्तपत्रांचे उत्कृष्ट अभिप्राय.

किं. २॥ रु. ट. ख. निराळा.

प्रकाशकः—**मौज प्रिंटिंग ब्यूरो,**

खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाळीं चंद्र असे धरिला

लेखक— सारस्वतीकुमार

सारा गांव हळहळत होता त्या दिवशीं! कां नाहीं हळहळणार ?

साऱ्या गांवाची शोभा, साऱ्या गांवकऱ्यांना बृहन्महाराष्ट्रांत तेजस्वी ठरविणारा सूर्य, त्या दिवशीं सकाळींच सूर्योदयाबरोबर मावळला होता.

साऱ्या गांवावर, दिवसा उजेडीं अंधार पडल्याप्रमाणें झालें होतें. 'मी मी' ह्मणणाऱ्या पुरुष गांवकऱ्यांना त्यामुळें अंधारांत चाचपडण्याची पाळी आली होती. तो होता, ह्मणून गांवाचें व गांवांतील कांहीं कांहीं लोकांचीं नांवें अधुनमधून ठळकपणानें कित्येक दिवस वर्तमानपत्रांतून एकसारखीं झळकत, फडकत रहात होतीं.

त्या दिवशीं तो मेला. गांवपुढाऱ्यांना, पुरुष असून, वैधव्य आल्यासारखें वाटलें. ज्यांच्या किर्तीचें कुंकूं मिळवून देणारा पुरुष, एकाएकीं कालपुरुषाच्या पोटांत गडप झाला ! मग कां नाहीं गांवपुढाऱ्यांना विधवेचा वाण पदरीं आल्यासारखें वाटणार ?

गांवांतील नामांकित स्त्रीसमाजांत तर—काय दुर्धर प्रसंग ओढवला होता, तें समजणेंच शक्य नव्हतें. मग स्त्रीसमाजाच्या मनःस्थितीचें साद्यंतपणें वर्णन करणें कसें शक्य आहे ?

ज्यांचे वर्तमानपत्रांतून 'ब्लॉक' छापून येत असत, अशा कित्येक कीर्तिकन्यका, त्याच्या प्रेताभोंवतीं बसून ढळढळां अश्रू ढाळत असलेल्या दिसत होत्या.

शेजारणीपेक्षां आपल्याला त्याच्या मरणानें अधिक दुःख झालें आहे, असें दाखविण्यासाठीं, त्याच्या प्रेताभोंवतीं जमलेली प्रत्येक महिला, अहमहमिकेनें, आपल्या नाकाची शेंडी जोरजोरानें चोळून, ती, लाल भडक करण्यास धडपडत असलेली दिसत होती.

* * *

तो होताच तसा अद्वितीय पुरुष !
विद्वानांचा शिरोमणी—
पुढाऱ्यांचा अग्रणी—
समाजसेवकांचा तरणी—
देशभक्तांचा मेरुमणि—
कलावंतांचा कल्पतरु—
कल्पनारम्यांचा सागरु—
राजकारणाचा आगरु—
चळवळींचा चपल वारु—
अध्यात्मविद्येचें एक तारूं—
वत्सलतेचें वांसरूं—(!)
तरुणांचा अरुण—
वृद्धांचा वरुण—
सुधारकांचा सुधाकर—
सनातन्यांचा संतश्रेष्ठ—
नवमतवाद्यांचा नवजवान—
जुलमी जवानांचा हैवान—
गरीबांचा कैवारी—
श्रीमंतांचा कट्टा वैरी—
दानशूरांचा कर्ण—
सदोदित अंगावर खादीचा सफेद वर्ण—
चारदां तुरुंगांत गेला—
अगदीं घरीं असल्याप्रमाणें तेथें आनंदांत राहिला—

साऱ्या लोकांनीं त्याला खांद्यावर घेऊन त्याचा उदो उदो केला—

साऱ्या लोकांनीं खांदा देऊन, त्याला स्मशानांत पोहोंचविला—

असा अलौकिक पुरुष, जर एके दिवशीं, एकाएकीं कालवश झाला, आणि साऱ्या गांवावर सूर्यग्रहणाची सुतकी छाया पडली, तर त्यांत आश्चर्य कसलें ?

वर त्याचें वर्णन केलें आहे, तें आमच्या पदरचें नव्हे. निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून त्याचे—त्याच्याबद्दलचे जे मृत्युलेख आले होते, त्यांतील ते उतारे आहेत.

* * *

त्याचें तोंड गोंवऱ्यांनीं झांकण्यापूर्वी, गावांतील सर्व लहान थोर वक्त्यांनीं आपापल्या वक्तृत्वाला सलाम सोडलें. प्रत्येक वक्त्याच्या भाषेला स्तुतिसुमनांचा बहारच आला होता जसा कांहीं. त्यावेळीं, त्याच्या चितेपुढें अहमहमिका थयथया नाचत होती !

तेंच तें त्यांचें वर्णन ऐकून श्रोते कंटाळल्यासारखे झाले होते. त्याहून तो जरी न मरता, तरी बरें होतें, असें पुष्कळ आवत्याभंवत्यांच्या मनांत आलें. तरी पण, जमलेल्या धीट स्त्रीसमाजाकडे करुणेची दृष्टी टाकणाऱ्या अनेक नवमतवादी तरुणांना, ते वक्तृत्वाचे सामने संध्याकाळपर्यन्त चालले असते, तरी हवेच होते.

प्रत्येक गोष्टीला शेंवट केव्हां तरी गांठणारच.

त्याच्या स्तुतीचें वादळाहि अखेरी गाठूं लागलें.

फक्त एकच वक्ते राहिले होते.

मोठे नामांकित होते ते.

त्यांचें बोलणें कुणाला बोचायचें नाहीं, सुचायचें नाहीं, कीं कळायचें देखील नाहीं !

पण प्रत्येक प्रसंगीं स्वारी बोलल्याखेरीज रहायची नाहीं. दुखवट्याच्या ठरावावर कळवळून भाषण करून, फिरत्या तोंडानें अभिनंदनाचें तोंड भरून भाषण करण्यच्या प्रसंगाला तोंड देण्याची शहामत असलेला धादान्त वक्ता होता तो !

त्याच्या चितेसमोर उभा राहून, स्वतःच्या जन्मदात्याच्या सरणापुढें उभें रहाण्याचें मरण ओढवल्याप्रमाणें ओढलेला चेहरा करून, तो स्थानिक डेमॉस्थेनिस् ह्मणाला—

"सर्वांनीं देशभक्त नानासाहेबांचें गुणवर्णन केलेंच आहे. परंतु, एक गोष्ट, आणि तीहि महत्वाची, सांगावयाची राहिली आहे. इसवी सन १९०७ सालीं, डिसेंबर महिन्यांत सुरतेला कॉंग्रेस भरली होती; तेव्हां मी तेथें लोकमान्यांच्या छावणींत होतों. आपले नानासाहेब हि तेथें आले होते. आपल्याला माहीतच असेल, कीं आम्ही लोकमान्याचे अनुयायी; पण नानासाहेबांसारखा उभयान्वयी माणूस, त्या काळच्या जहाल अगर मवाळ पक्षांत सारखाच मान्य आणि अमान्य होता. तरी पण कोणत्याहि पक्षाच्या छावणींत नानासाहेब गेले, तरी त्यांना जेव, वयास मज्जाव नसे. सुरतेस कॉंग्रेसच्या मंडपांत, अखेरच्या दिवशीं, दोन प्रहरीं, बारा वाजून पंचेचाळीस मिनिटें आणि साडेसात सेकंदांनीं, जेव्हां उभयपक्षीं कुरुक्षेत्री करावयास सुरवात झाली, तेव्हां, मुंबईचे सिंह, मरहूम फिरोजशहा मेथा, यांच्याकडे आमच्या बाजूनें पुणेरी जोडा भिरकावण्यांत आला. तो इतिहास आपण सर्वांस प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणें माहित आहेच. तेव्हां मी तो कांहीं येथें समग्र सांगत बसत नाहीं—नव्हे सांगत उभा रहात नाहीं (मोठा हंशा). कै.गोखले यांच्या अंत्यसंस्कारांच्या प्रसंगीं, लोकमान्यांनीं जमलेल्या लोकांना जो इषारा दिला, तोच इषारा मी या प्रसंगीं आपल्यास द्यावा म्हणतों. प्रसंग हंसण्याचा नसून, ढसढसां रडण्याचा आहे. आज आपल्या गांवच्या 'केसरी' आणि 'ज्ञानप्रकाश' एकदम एकमतानें अनुक्रमें मृत व विझले आहेत ! (टाळ्या). मी पुनः आपल्याला सांगतों, टाळ्या वाजवूं नका. छाती पिटून रडा. आज लोकमान्य असते, तर त्यांनीं या प्रसंगीं आपल्याला असाच उपदेश केला असता. मला मुख्य गोष्ट सांगावयाची म्हणजे, त्या अशुभ प्रसंगीं, देशाच्या दुर्दैवानें, जेव्हां बारा वाजून पंचेचाळीस मिनिटें आणि साडेसात सेकंदांच्या सुमारास, सुरतेच्या कॉंग्रेसच्या मंडपांत जोडाजोडीची यादवी सुरूं झाली, आणि आम्हीं मरहूम मेथांकडे पुणेरी जोडा भिरकावला, तेव्हां त्या जोड्याची सनाल टांच, प्रथम कोणाच्या कपाळावर बडविली ? मेथांच्या ? नाहीं—माझ्या ? नाहीं—तुमच्यापैकीं कोणाच्या ?—नाहीं. आपल्याला माहित नाहीं, त्या पुणेरी जोड्याची सनाल टांच, प्रथम आपल्याच दे.भ. नानासाहेबांच्या माथीं बडविली. [टाळ्या] मी तेव्हां नानासाहेबांच्या जवळच होतों; मी तें दृश्य प्रत्यक्ष पाहिलें आहे नानासाहेबांचें सारें मुखमंडल रक्तबंबाळ झालें होतें; तरी तें हंसत होते. (टाळ्याच टाळ्या) त्यांच्या कपाळावरची जखम बरी व्हावयास इ.स.१९०८ चा मे महिना संपावा लागला. जखम बरी झाली, तरी पुढें कित्येक वर्षें त्या पुणेरी जोड्याच्या नालाच्या खुणांची शुभ्र चंद्रकोर आणि तीन स्फटिकवत् चांदण्या, आपल्या नानासाहेबांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाळीं स्पष्टपणें चमकत असत. चांदण्या म्हणजे स्टार्स !–सिनेमांतले स्टार्स नव्हेत–(हंशा). जोड्याला मारता ते लोखंडी स्टार्स–(पुन्हां हंशा). सिनेमांतील स्टार्सना जोडा अवजड वाटतो ! (कडकडून टाळ्या व एकमेकांचे पोट धरधरून हंशा !). सिनेमा स्टार्समुळें जोडा फाटतो, तर लोखंडी स्टार्सपायीं जोडा टिकतो–(टाळ्याच टाळ्या !–कोणी एक गांवपुढारी वक्त्यांच्या कानाशी लागतात व कानपिचक्या बसल्याप्रमाणें वक्त्यांचा मोहरा उतरतो). मला सांगायचें इतकेंच, कीं अलीकडेच त्या नानासाहेबांच्या कपाळावरील खुणा अस्पष्ट झाल्या होत्या. सुरतेची दुःखी स्मृति लोकांना होऊं नये, या लोकहितवादी उदात्त कल्पनेनें प्रेरित होऊन, आपले नानासाहेब ती तीन चांदांची सरदारकी आपल्या रुमालाच्या पट्टीखालीं लपवून ठेवण्याची खबरदारी घेत असत !(टाळ्या) मुद्दाम आतां ही गोष्ट येथें सांगण्याचें कारण म्हणजे, नानासाहेबांच्या कपाळावरची ती देशसेवेची चंद्रकोर, आपण एकवार आणि अखेरची नीटपणें न्याहाळून पहावी. एकदां का तो मुख चंद्र सर्वभक्षक अग्निनारायणानें जाळून भस्म केला, कीं आपल्याला तो भालचंद्र केव्हाहि दिसणार नाहीं ! मत्प्रिय बंधुभगिनींनो, आपण त्या भालचंद्राचें डोळे भरून दर्शन घ्या आणि पावन व्हा, इतकेंच सांगून, मी या चितेपासून बाजूला होतों. ''

* * *

देशभक्त नानासाहेबांच्या दहनानंतर जमलेले लोक स्मशानांतून टोळ्या टोळ्यांनीं घरोघरीं परत जात होते.

त्यांत एक मध्यम वयाच्या लोकांची टोळी रेंगाळत चाललेली होती.

"पुष्कळांचीं भाषणें झालीं; पण आपल्या पंतांच्या भाषणाची सर एकाहि बोलण्याला नाहीं " त्या टोळीपैकीं एकजण म्हणाला.

"हं !" दुसऱ्यानें हुंकार दिला.

"रावांना पंतांचें पटायचें नाहीं. सुरतेची माहिती किती बरोबर सांगितली पंतांनीं ! तारीख, महिना सांगेल कुणीहि; पण तास, मिनिटें, सेकंदें यांची आंकडेवारी इतक्या वर्षांनंतर अगदीं बरोबर सांगणें, फार कठीण आहे. तें पंतांच्या सारखा अनुभवी अभ्यासीच करूं जाणे—बरं का राव ? तुमच्यासारख्यांना नाहीं तें कधींच जमायचं " तिसरा उद्गारला.

"बरोबरच आहे—बेधडक थापा मारण्याचा निर्लज्जपणा करण्याची आमची छाती नाहीं. " राव भेदकपणानें हंसून उत्तरले.



अंधारांत त्यावर झडप घालून, आपल्या पायांतील नगरी चढावानें चंद्राच्या नवऱ्यानें त्याला असा बेदम झोडपून काढला.

" काय हो पंतांनीं थापा मारल्या ? " पहिल्यानें चिडून पृच्छा केली.

" सांगूंच का ? " रावांनीं त्वेषानें विचारलें.

" पाघळूंद्या कीं आपली रसवंती ? "

" नानासाहेबांच्या कपाळावर नालाची खूण होती, ही गोष्ट मलाहि तुमच्याप्रमाणेंच कबूल आहे: कारण सर्वांनींच ती नुकतीच पाहिली आहे. पण ती नालबंदी सुरतेच्या कॉंग्रेसमध्यें झालेली नसून, या आपल्या गांवांतच तीन एक वर्षांपूर्वीं झालेली आहे ! "

" म्हणजे ? " सर्वांनीं उत्सुकतेनें विचारलें.

" म्हणजे काय ? " राव सावकाशपणें सांगूं लागले: " नानासाहेबांच्या घरीं, तीन वर्षांपूर्वीं चंद्रा नांवाची एक तरणीताठी मुलगी, मोलकरीण म्हणून राहिली होती. तिच्या गरिबीच्या खिंडारांतून हल्ला करून, तिच्या पातिव्रत्याचा झेंडा खालीं करण्याचा या तुमच्या अलौकिक पुरुषोत्तमानें आटोकाट प्रयत्न केला. चंद्री तीळ हि ठरूं देईना. पण नानासाहेब का अशानें पिछेहाट घेणारा मनुष्य होता ? त्यानें जंग जंग पछाडावयाला सुरवात केली. लौकिकाच्या मोठेपणाखालीं सारें कांहीं दडपलें जातें, चेपलें जातें, झांकलें जातें. या पूर्वानुभवानें बेफिकीर होऊन, चंद्रीचा नवरा गिरणींत रात्रपाळीच्या कामाला गेला आहे, अशी बातमी मिळवून, नानासाहेब एका रात्रीं शिरला चंद्रीच्या चंद्रमौळी घरांत ! मुद्दामच हुलकावणी देण्यासाठीं, चंद्रीच्या नवऱ्यानें रात्रपाळीची बात नानासाहेबापर्यंत पोहोंचविली होती:— आणि हूं काय? नानासाहेब घरांत शिरतांच, अंधारांत त्याच्यावर झडप घालून, आपल्या पायांतील नगरी चढावानें चंद्रीच्या नवऱ्यानें त्याला असा बेदम झोडपून काढला, कीं पुढें सहा महिने, हा तुमचा नेता, घराबाहेर पडूं शकलाच नाहीं ! नानासाहेबाला भालचंद्र करणारा तो नालखिळ्यांचा वण; पंचवीस सव्वीस वर्षांपूर्वी सुरतेच्या कॉंग्रेसमध्यें फेंकला गेलेल्या पुणेरी जोड्याच्या नालाचा नव्हता; तर तो, दगडासारख्या धट्ट टांचेच्या नगरी चढा-वाला मारलेल्या नालाचा तो वण होता.— सांग पाहूं, तुमचा तो गांवठी डेमॉस्थेनीस तोंड फाटे तों,फटेलपणानें फाटक्या तुटक्या थापा मारतो कीं नाहीं तें ?''

" पण तुमचें तरी हें खरें कशावरून?" पहिल्या मनुष्यानें वरमून विचारलें.

" चंद्रीचा नवरा, वाटेल त्याला, वाटे तेव्हां ती हकीकत सांगत असतो. चला याच घडीला असेच त्याच्याकडे आणि घ्या आपली खात्री करून ! " रावांनीं आव्हान दिलें.

बाकीच्यांनीं तें रावांचें आव्हान पत्क-रलें, कीं भुकेचे कावळे पोटांत कलकलाट करूं लागल्यानें, मुकाट्यानें आपापल्या घरची वाट सुधारली, तें समजलें नाहीं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दयेचे दूत कीं—

लेखक—श्री. वि. गाडगीळ, एम्. ए., एल्एल्. बी.

तो आज नेहमींप्रमाणें जिमखान्यावर आला होता, पण नेहमींप्रमाणें तो आज उत्साही मात्र नव्हता. काल त्यानें कोर्ट मुद्दाम राखून ठेवण्यास सांगितलें होतें व त्यानें आपल्या कांहीं खास मित्रांस खेळण्यासाठीं मुद्दाम आमंत्रणहि दिलें होतें. त्याच्या मागणीप्रमाणें कोर्ट राखून ठेवलें होतें, पण त्याला आपलें मन मात्र होणाऱ्या गोष्टीच्या परिणामापासून राखून ठेवतां आलें नव्हतें. त्याच्या चेहेऱ्यावर विषण्णतेची छटा स्पष्ट दिसत होती. तरी समाजांत मनुष्य गेला, कीं त्याला असें हास्य मुद्दामच आणून आपल्या चिंतेची छाया दुसऱ्यावर पडूं देण्याची इच्छा नसते व त्याप्रमाणें त्यानेंहि स्मितहास्य करून खेळास सुरवात केली. पण त्याचा नेहमींचा जोरदार खेळ आज जमेना. त्याचे शॉटस, व्हॉलीज, बॅक हँडस एवढे प्रसिद्ध, पण आज अगदींच मेणचट काम चाललें होतें. शेवटीं एक सेट झाल्यावर त्यानें खेळ आटोपला व शेजारच्या बांकावर बसून तो इतरांचे खेळ पाहूं लागला.

होतां होतां अंधार पडूं लागला. बाकीच्यानींहि आपला खेळ संपविला व ते सर्व जण गप्पा मारायला नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें गोळा झाले. रॅकेटर आवरण चढवितां चढवितां गोळे म्हणाले: "क डॉक्टर, आज खिन्नसे ? एक सेटहि नीट खेळलां नाहीं ?"

"अरे, आज एकाहि ठिकाणीं व्हिजीटला बोलावणं आलं नसेल, दुसरं काय ? काय डॉक्टर, मी म्हणतो तें बरोबर आहे ना ?" पाटील म्हणाले.

"छेः छेः, आज त्यांची स्वैंपाकीण बाई पळून गेली असेल" तिसऱ्या एकानें आपला तर्क पुढें मांडला.

'मला तर वाटतं, आज एकादी शस्त्रक्रिया अयशस्वी झाली असेल" चौथ्या कानें आपलें बुद्धिप्रदर्शन केलें.

सर्वांनीं एवढा भडिमार केला, तरी क्टर स्वस्थच बसले होते. शेवटीं पुन्हां कदां गोळे म्हणाले:

"काय डॉक्टर, आम्हांला न सांगाय गं नाजुक कारण नसेल तर सांगून का ना ! खासगी असलं तर मग हूं दे."

"छेः छेः, खासगी वगैरे कांहीं नाहीं. हे धंद्यापैकींच. सदसद्विवेक बुद्धीच्या या एकसारख्या डंख मारीत आहेत व णून मन जरा अस्वस्थ झालें आहे. ज सकाळपासून अगदीं बेचैन वाटतं हे. पण गोष्ट जरा मोठी आहे. तुम्हांला आहे का ?"

"होः होः ! चांदणं सुंदर पडलं आहे. अशा वेळीं घरीं जायची कोण इच्छा करील ? चालूं दे." सर्वांच्या वतीनें गोळ्यांनीं सांगितलें.

डॉक्टरनीं आपली हकीकत सांगावयास सुरवात केली.

"माझा स्वभाव आपल्यांपैकीं पुष्कळांना माहित असेलच. साधारणतः कोणालाहि नकार देण्याचं माझ्या अगदीं जिवावर येतें. पण त्या दिवशीं कुठून कळ मिराली कुणास ठाऊक. मी एका ठिकाणीं व्हिजीटला जायाला नकार दिला.

"अगदीं सकाळची वेळ होती. मी नुकताच उठलों होतों व तोंड धुवून चहा घेण्याच्या तयारींत होतों. इतक्यांत घंटा वाजली. अशी भलत्या वेळीं घांट वाजली, कीं आगीच्या बंबाच्या घंटेप्रमाणें छातींत धस्स होतं. मात्र आतां आतसशी मला अशा घंटांची संवयच झाली आहें. तरी हृदयाला भयाचा स्पर्श होऊन जातोच. घंटा ऐकल्या बरोबर मीं दरवाजा जाऊन उघडला, तों आमच्या नेहमींच्याच गिऱ्हाइकांपैकीं एक जण होते. त्यांचा चेहेरा अपेक्षिल्याप्रमाणें चिंताग्रस्त दिसत होता. आल्याबरोबर फारसा वेळ न घालवितां त्यांनीं हकीकत सांगावयास सुरवात केली. ते म्हणाले:

"'माझे वडील कालपासून जरा चमत्कारिक वर्तन करीत आहेत. ते मध्य रात्रींच उठून माडीवरून खालीं आले व म्हणूं लागले, कीं 'बाहेर पोलिस उभे आहेत. उठा. टेलिफोन आला. गांवाला जायची तयारी करा. असं अगदींच असंबद्ध बोलूं लागले. आम्हांला त्या वेळीं कांहींच बोध झाला नाहीं. आम्हीं हूं हूं म्हणून कसेबसे त्यांना वर जावयास सांगितलें व आम्हीं पुनः स्वस्थ झोंपलों. एक दोन तासच फार तर झाले असतील, ते पुनः खालीं आले व आतां निराळ्याच गोष्टी सांगूं लागले. तेव्हां मात्र आम्हांला भीति वाटली व सकाळीं आपल्याला बोलवायचें ठरविलें व आतां आपल्याकडे आला आहे. तरी आपण आतां माझ्याबरोबर आलांत तर आमची काळजी बरीच कमी होईल"

"त्या गृहस्थांनीं ही सर्व हकीकत सांगितल्यावर मला वाटलें, कीं हा रोग सर्वसाधारण सर्वस्वरूपाचा नाहीं. ही कांहीं तरी मेंदूची किंवा मनाची विकृति आहे. आपल्या आंवाक्यांतला हा रोग नाहीं, अशी माझी समजूत झाली व मीं ती केस हातांत घेण्याचें नाकारलें. मीं त्यांना परस्पर एक दोन तज्ज्ञ डॉक्टरांचीं नांवें सुचविलीं व त्या गृहस्थांची बोळवण केली. त्यांनीं मीं एकदां पाहून तरी जावें म्हणून पुष्कळ गळ घातली, पण मी त्यांना त्या डॉक्टरांकडे जाण्यास सांगण्यापलीकडे दुसरें कांहींच सांगितलें नाहीं. शेवटीं त्यांनीं 'आपण निदान नुसतें येऊन तरी जा. वडिलांना तेवढेंच बरें वाटेल' असें सांगितल्यामुळें मीं एकदां येऊन जाण्याचें त्यांस आश्वासन दिलें.

"सकाळीं दहा वाजतां पुनः त्यांच्याकडून माणूस बोलवावयास आला. पण मी कामांत असल्यामुळें जाऊं शकलों नाहीं. पुनः संध्याकाळीं निरोप आला. त्यावेळींहि मला जातां आलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं मात्र कसा तरी वेळ काढून मी भेटावयास गेलों. त्या वेळीं ज्यांची प्रकृति पहावयास मी गेलों होतों, ते स्वस्थ पहुडले होते. मी गेल्यावर त्यांनीं दुसरे डॉक्टर येऊन गेल्याची हकीकत मला सांगितली व आपल्याला त्रास व्हावयास केव्हांपासून सुरवात झाली, तेंहि सांगितलें. ते गृहस्थ कुठल्या तरी शेजारच्याच खेडेगांवीं गेले होते व परत येतांना कांहीं वाहन न मिळाल्यामुळें व परत घरीं यावयाची निकड असल्यामुळें ते उन्हांतून तसेच घरीं परत आले होते. दिवस भर उन्हाळ्यांतले, वेळ दुपारची, तहान लागल्यास आश्चर्य नाहीं. घरीं आल्यावर त्यांनीं आंबे व पाणी घेतलें व तेंच, त्यांची प्रकृति बिघडण्यास मूळ कारण झालें.

"मला त्यांनीं ही सर्व हकीकत सांगितली, पण ती सांगतांना मध्येंच ते कांहीं तरी विचारीत. एकदोन मिनिटें अगदीं छान बोलत. पण पुन्हां त्यांना एकदम झटका येई व त्यांच्या मनाला ज्या कांहीं धास्ती बसलेल्या होत्या, त्या प्रगट होत. अशा रीतीनें सगळें चमत्कारिक होतें. त्यांच्या त्या सर्व हालचाली पाहून मला नक्की वाटलें, कीं यांना मेंदूची विकृतिच झाली आहे. पण त्यांची जीभ वगैरे पाहिली, तर ती पांढरी होती. तेव्हां मानसिक व शारीरिक अशा दोन्हीं उपाधि त्यांना होत असल्या पाहिजेत असें मला वाटलें. पण ती केस आतां दुसऱ्या डॉक्टरांच्या हातीं असल्यामुळें मीं माझ्या मेंदूला फारसा शीण दिला नाहीं. ज्या डॉक्टरांनीं त्यांना उपचार चालू केले होते, त्यांनीं मात्र डोक्यांत ताप शिरला आहे, त्यावर थंड उपचार केले म्हणजे बरें वाटेल, असें सांगून थंड पाण्याच्या नळाखालींहि बसावयास सुचविलें होतें ! मला स्वतःला मात्र तो मानसिक रोगच अजूनहि वाटत होता.

त्यांच्या डोक्यांत विचारांचें तुफान इतकें माजलें होतें, कीं त्यांना या सर्व मुदतींत झोंप म्हणून लागली नाहीं. रात्रभर त्यांचे हेच चाळे चालू असावयाचे. ते अर्ध्या अर्ध्या तासानें उठावयाचे. त्यांच्या डोळ्यांपुढें ज्या विलक्षण चित्रावलि उठत, त्यांच्याविषयीं ते बोलावयाचे व पुनः स्वस्त पडावयाचे. त्यांना कोणत्या तरी उपायानें स्वस्त झोप येऊं देणें फार जरूर होतें.

"ज्या डॉक्टरांनीं ही केस हातांत घेतली होती, ते मध्येंच महाबळेश्वराला निघून गेले. इकडे घरची मंडळी हवालदील झाली. कारण मला प्रथम बोलवायला आल्या दिवसापासून जवळ जवळ त्यांना झोंप नव्हती व त्यांचे ते वेड्यासारखे चाळे एकसारखे चालूच होते. ती मंडळी मला डॉक्टर महाबळेश्वरला गे याचें व झोंपेवर कांहीं तरी औषध देण्याचें सांगूं लागले. पण मी त्याला कबूल झालो नाहीं. मी म्हटलें: आमच्या धंद्याच्या दृष्टीनें एका डॉक्टरचें औषध चालू असतां दुसऱ्याचें औषध घेणें योग्य नाहीं. तुम्हीं, त्यांचे सहकारी डॉक्टर आहेत, त्यांनाच घेऊन जा !' त्या लोकांनीं मला दोन तीनदां सांगून पाहिलें, पण शेवटपर्यंत मीं नकारच दिला. मीं एवढें मात्र सांगितलें, कीं माझी एक दोन दिवसांनीं एक फेरी मात्र चुकणार नाहीं."

"मी दुसऱ्या दिवशीं जेव्हां सहज तिकडे गेलों, त्या वेळीं मला कळलें कीं, त्यांनीं त्या नवीन डॉक्टराला नाडीच पाहूं दिली नाहीं, कीं अंगाला स्पर्शहि करूं दिला नाहीं. त्यांना पाहिल्याबरोबर त्यांनीं पहिला प्रश्न विचारला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'तुम्ही येथें कां आलां? तुम्ही ते आमचे नेहमींचे डॉक्टर नाहीं. तुम्हांला मी हात लावूं देणार नाहीं.'

"डॉक्टरांना मधून मधून अशा प्रकारचे अनुभव येत असल्यामुळें त्यांनीं त्याकडे लक्ष न देतां, मॉर्फियाचें इंजेक्शन द्यायची तयारी चालविली. पण त्या गृहस्थांनीं शेवटपर्यंत त्यांची डाळ शिजूं दिली नाहीं. त्यांचा एकच प्रश्न 'तुम्ही ते आमचे नेहमींचे डॉक्टर नाहीं.' त्या डॉक्टरांशीं अर्धा तासपर्यंत त्यांनीं वाग्युद्ध चालविलें होतें व शेवटीं डॉक्टर आले तसेच परतले व त्यांनीं झोंप यावयाच्या गोळ्या धाडून दिल्या. पण त्यांच्यावर त्यांचा कांहींच परिणाम झाला नाहीं. मी गेलों त्यावेळीं ते मला तारवटलेलेच दिसले. दोन दिवसांपूर्वी मी गेलों होतों, त्यापेक्षां आतां असंबद्धता बोलण्यांत जास्त येत होती. मला पाहिल्यावरोबर त्यांनीं पहिला प्रश्न विचारलाः "तुम्हीं काल कां आला नाहीं? त्या आडमुठ्या माणसाला कां पाठविलांत?"

त्या वेळीं त्यांची प्रकृति पहावयास मी गेलों होतों ते स्वस्थ पहुडले होते.

"मला जरा काम होतें म्हणून येतां आलें नाहीं" असें उत्तर देऊन ती वेळ मीं मारून नेली. त्यांना मी कसें सांगणार, कीं आमच्या धंद्याच्या दृष्टीनें मला तुमची केस हातांत घेतां येत नाहीं म्हणून?

"त्या गृहस्थांची मी एक मात्र गंमत पाहिली. ते इतके मस्त झाले होते, तरी स्नानसंध्या वगैरेंत मात्र त्यांच्याकडून कधींच खंड पडला नाहीं. एकदां मी रात्रीचा दवाखाना बंद करून त्यांच्याकडे गेलों होतों; मला वाटतें, त्या दिवशीं संकष्टी होती. ह्या गृहस्थांनीं स्नान वगैरे करून देवपूजा चालवली होती. मीं विचारपूस केल्यावर त्यांनीं मला सांगितलें, कीं "मी आतांच चांगली चारपांच मैलांची रपेट मारून आलों आहें. देवानें मला मार्ग दाखविला म्हणून मी परत आलों." मला त्यांच्या या बोलण्याचा अर्थच लागेना; कारण आजारी मनुष्य व चारपांच मैलांची रपेट ही काय भानगड आहे! मीं मग घरांत चौकशी केली, तों मला कळलें, कीं त्या दिवशीं संध्याकाळीं कुणाला न सांगतां न कळवतां एकदम ते बाहेरच पडले. घरांतील पुरुष मंडळी कुणी बाजारांत फळफळावळ आणायला, तर कुणी औषध आणायला अशी बाहेर गेली होती. हे गृहस्थ संध्याकाळपर्यंत त्यांच्याकडे आलेल्या त्यांच्या खात्यांतील गृहस्थांशीं खात्यामधील गोष्टीसंबंधीं चांगले बोलत बसले होते. त्या वेळीं कुणाला कल्पनाहि आली नसती, कीं ह्या गृहस्थांच्या मेंदूंत कांहीं तरी विकृति आली आहे म्हणून. त्यामुळें सर्व मंडळी आपापल्या व्यवसायांत मग्न झाली. हे उठले, हातांत काठी घेतली व बुधवार चौकाच्या रोखानें रस्त्यावर दाणदाण काठी आपटीत चालले! त्यांच्याबरोबर जाण्याकरतां घरांतल्या बाया माणसांनीं मुलास सांगेपर्यंत ते बरेच दूर निघून गेले होते व त्या मुलाला ते कुठें गेले याचा कांहींच तपास लागेना. पुरुषमंडळी घरीं आल्यावर त्यांना ही बातमी लागली. तेव्हां ते सर्व दिशांनीं शोधार्थ निघाले. पण पुण्यासारख्या ठिकाणीं कुठें म्हणून शोधणार? शेवटीं मंडळी फिरून नऊच्या सुमारास घरीं परत आली; तों ते गृहस्थ घरीं येऊन स्नानसंध्या करीत असल्याचें त्यांना कळलें. पुढें मग मला कळलें, कीं त्यांनीं नव्या पुलावरून ऑब्सर्व्हेटरीवरून, लकडी पुलावरून परत घरापर्यंत असा फेरफटका मारला होता!

"अशा प्रकारें माझ्या अनुमानास बळकटी आणणारें असेंच त्यांचें एकंदरींत वर्तन होतें. एकदां तर ह्याणे त्यांनीं दुपारींच अंगांत कपडे चढविले व मला आतां लोणावळ्याला जायचें आहे ह्याणून जायलाहि ते बाहेर पडले. पण पाहिजे त्यावेळीं स्टेशनांत गाडी कशी मिळणार? गाडीला अजून तीन चार तास अवकाश आहे, असें झटल्यावर चालतच उन्हांतून ते स्टेशनवरून नव्या पुलाकडे येणाऱ्या वाहेरच्या रस्त्यानें यावयास निघाले. आवेशाच्या भरांत त्यांनीं चालायला सुरवात केली, पण शरीर किती वेळ नेट धरणार? नाहीं म्हटलें तरी आठ दिवसपर्यंत त्यांना झोंप मिळाली नव्हती व अन्नहि पोटांत फारसें गेलें नव्हते. वरं, घरांत त्यांच्यावर कोणाचें वजन वसेल असेंहि कुणी नव्हतें. घरांत सारींच मुलं व बायको. त्यांना जोरानें औषध घ्यायला तरी कोण सांगणार, व अमकं करूं नका किंवा तमकं करा, असं तरी कोण सांगणार? वरं, त्यांचा तरी स्वतःवर ताबा कुठें ताबा होता? झटका आला, कीं पाहिजे तें करून किंवा बोलून ते बाहेर निघून जात. शेवटीं मला वाटतें, घरच्या मंडळींनीं त्यांचें मन कसें तरी वळवून त्यांना मानसोपचार-गृहांत नेण्याचें ठरविलें.

"नंतर जी हकीकत मला कळली, त्यावरून त्या गृहस्थांचा मेंदू विघडित झाला असला, तरी त्यांच्या चेहेऱ्यावरचा तरतरीतपणा कायमच होता. त्या उपचारगृहांत गेल्यावर डॉक्टरांनीं विचारलें, इथें कुणाला ठेवावयाचें आहे? इतके ते तरतरीत दिसायचे. उपचारगृहांत दाखल व्हावयाच्या वेळीं एका फॉर्मवर सही करावयाची असते. ती म्हणे त्यांनीं व्यवस्थित केली. इतर सदरेंहि व्यवस्थित भरलीं, व शेवटीं तारखेच्या वेळीं मात्र त्यांचें विघडलें. त्यांच्या डोक्यांत आदल्या दिवशींची तारीख वसलेली होती. ते कांहीं केल्या ल[...] दिवसाची तारीख घालायला तयार हो[...]नात. शेवटीं एकदां त्यांना दाखल करू[...] घेयणंत आलें.

"पुढची हकीकत जी मला कळाली, [...] फारच हृदयद्रावक आहे. हे गृहस्थ थे[...] जुन्या मताचें व कुटुंबसंस्थेचे अभिमा[...] होते. त्यांना हॉस्पटलांत कोणींहि जाऊ[...] रहावें असें कधींच वाटत नव्हतें. त्यां[...] मुलगा एकदां जीवावरच्या दुखण्या[...] आजारी असतांना व हॉस्पिटलांत पाठ[...] असतां तो लौकर व थोड्या खर्चांत [...] होण्याचा संभव असतांना त्यांना ती [...] पसंत पडली नाहीं. माझेच त्या आज[...]पणांत ५००–६०० रु. झाले. शि[...] वाजारी औषधें. पण त्यांनीं त्याची फिकी[...]र पर्वा केली नाहीं. अशा गृहस्थांवर [...] हॉस्पिटलांत जाण्याची व तेंहि मानसि[...] हॉस्पितलांत जाण्याची पाळी यावी, [...] खरोखरच दैवदुर्विलास नाहीं का? [...] गृहस्थांनीं हॉस्पिटलांत गेल्यावर पाहि[...] गोष्ट तिथल्या परिचारकांना सांगित[...] ती म्हणजे 'मी ब्राह्मण आहें, तुमच्या हातचें पाणी चालणार नाहीं, तुमचा पोशाखहि नको, मला फक्त दू[...] फळें देत जा, म्हणजे झालें.'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

"त्यांनीं मला वाटतें; त्या ठिकाणीं फार तर पांच सहा दिवसच काढले असतील. या मुदतींत एक दोन दिवस त्यांनीं बराच धिंगळ केला म्हणे. इकडचे जिन्नस तिकडे फेंक, परिचारक आल्यावर त्याच्या अंगावर धांवून जा, कपडे फाड अशा एक ना दोन, अनेक गोष्टी त्यांच्याकडून झाल्या. पण पुढें यांना तापच आला. ताप आल्यावर रक्त-तपासणी केली, तों त्यांत मलेरियाचे जंतु सांपडले. पण हा शोध फार उशीरां लागला. शोध लागून त्याप्रमाणें उपचार होईपर्यंत रोगी हातांतून गेलाहि होता!

"उपचार-गृहांतील डॉक्टरांनीं त्यांच्या मृत्यूबाबत शेरा मारतांना 'वास्तविक य रोग्याला ससून हॉस्पिटलमध्यें न्यावयास पाहिजे होतें. तीव्र स्वरूपाच्या मलेरिया-मुळें त्यांना त्रास होत होता; व तो सुरवातीलाच शमन करतां आला असता' असें म्हटलें आहे.

"ते गृहस्थ वारल्याची बातमी आज सकाळीं मला कळली व तेव्हांपासून माझें मन अस्वस्थ झालें आहे. वास्तविक आम्हां डॉक्टरांना या मृत्यूचें विशेष कांहीं वाटत नाहीं. कारण आमचा झगडा मृत्यूशीं नेहमींच चाललेला असतो, व त्यांत कधीं आमचा जय असतो, तर कधीं मृत्यूचा होतो. लोकांना आम्हीं देवदूतहि वाटतों व यमदूतहि वाटतों. पण आजची गोष्ट अशा लढ्यांतल्या जयापजयाची नव्हती, तर, मलत्या भीतीची होती. या सर्व प्रकारांत मीच दोषी आहें असें मला वाटत आहे. मीं त्या दिवशीं सकाळीं ही केस हाताबाहेर टाकली, यांत माझी चूक झाली असें मला वाटतें. धंद्याच्या नियमाप्रमाणें तपासण्याकरिता आलेल्या केसेस त्यांच्याकडे पाठवावयाच्या व एकदां दुसऱ्याला दिलेली केस पुन्हां आपण पाहावयाची नाहीं. या धंदेवाईक धोरणानें मी एका कुटुंबावर मोठा घाला घातला, असेंच मला वाटतें!

"मी सुरवातीलाच जी उडवा उडवी केली, ती न करतां, जर रोग्याला जाऊन तपासलें असतें, तर पुढें जी त्या दुसऱ्या डॉक्टराकडून हयगय झाली, ती झाली नसती; व समजा मीं जरी त्या डॉक्टरांना त्याकरितां आणलें असतें, तरी माझें स्वतःचें मत मला चालवितां आलें असतें. या धंद्याचें दडपण माझ्यावर पडल्यानें आज मला माझ्या डोळ्यासमोर माझ्यावर विश्वास टाके असलेल्या एका जीवाचा नाश पाहावा लागला! ह्या गृहस्थांची माझ्यावर श्रद्धा किती होती, हें मीं मध्यें जी डॉक्टरांची हकीकत सांगितली आहे, त्यावरून तुम्हांला कळलें असेलच. त्यांच्या मुलाला मीं मरणाच्या दारांतून ओढून आणलें होतें व त्यामुळें सर्व कुटुंबाची प्रीति माझ्यावर जडली होती. अशा परिस्थितींत माझ्याकडून हा फार मोठा अन्याय झाला असें मला वाटतें, व म्हणूनच माझ्या कृत्याचें मला वाईट वाटत आहे नाहीं तर साध्या मृत्यूच्या बातमीनें कोण एवढा विचलित होतो? आजच्या प्रकारांत मीच दोषी आहें." असें म्हणून डॉक्टरांनीं हातांतल्या रॅकेटावर डोकें टेंकलें व ते स्वस्थ बसले.

चांदण्याची खुलावट होत होती. थंड व मंद मंद वारें वाहात होतें. सगळ्यांनीं फक्त 'बरें' आहे असें म्हटलें व आपापल्या घरीं जाण्यास ते निघाले. डॉक्टरहि जड अंतःकरणानें उठले; पण आतां त्यांच्या चेहेऱ्यावर, खुपणारा कांटा काढून टाकल्यावर जसें हायसें वाटतें, तसें वाटत असल्याचा भाव दिसत होता. सायकल असूनहि ते हातांत सायकल घेऊन घराकडे निघाले.

डेका

जर्मनीमध्यें तयार झालेल्या 'डेका' छापच्या ए. एन्. (A. N.) क्लासच्या इलेक्ट्रिक वायर्स प्रत्येक बाबतींत सी. एम्. ए. (C.M.A.) च्या तोडीच्या, गव्हर्नमेन्ट आणि फायर इन्शुरन्स असोसिएशननें पास करून प्रशंसिलेल्या इंडियन स्टोअर्स डिपार्टमेन्ट, इंडियन टेलिग्राफ बॉंबे पोर्ट ट्रस्ट, बॉंबे ट्रामवे कं., जी.आय्.पी. रेल्वे व हिंदुस्थानांतील इतर रेल्वे कंपन्या, म्युनिसिपालिट्या, पावर हाऊसेस आणि राजवाडे व बंगले यांमध्यें, समाधानकारक कामें दिलीं आहेत.

'डेका' कारखान्यांत प्रत्येक जातीच्या व साईजच्या इलेक्ट्रिक वायर्स बनविल्या जातात.

हिंदुस्थान, बर्मा, सीलोनमधील एकटेच एजंटः—

जे. सी. कराका अॅन्ड कंपनी,
१२७ ...स्ट्रीट, मुंबई १.

टेलिग्राम Ganutlet — टेलि. २४७२६

गिरगांवच्या नाक्यावरील—

मनपसंत = समाधानकारक = काटकसरयुक्त

—खरेदी करण्याचें ठिकाण—

म्हणजे

श्री गजानन स्टोअर्स

आमचे दुकानीं

वेलवेट—रजई—होलडॉल—गालीचे—जरीची लुगडीं—साड्या—खण—कद—पितांबर—धोतरजोड्या—शर्टिंग—कोटिंग—वगैरे

हरतऱ्हेचा फॅन्सी व जरकिनारीचा माल माफक भावांत मिळतो.

* * * *

याशिवाय खास हिवाळ्याकरतां म्हणून—

स्वेटर्स, रग्ज — शाली वगैरे

गरम कपड्यांचाही भरपूर स्टॉक असतो.

या—पहा—खरीदा—खष व्हा.

पत्ताः—खटाव बिल्डिंग,
पोर्तुगीज चर्च नाका.
गिरगांव, मुंबई नं ४.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खुनी माता

लेखकः–शांताराम दामोदर वीरवाडेकर

'खुनी–माता ' म्हणूनच आज सारं जग तिला ओळखीत आहे. तिनं खून केला आणि तोहि प्रत्यक्ष मुलाचा ! पण याचं कारण ? भाऊबंदांनीं तिच्याबद्दल दाखविलेली अनास्था, कीं पोटच्या मुलाच्या हालांनीं हृदयांत उडालेली कालवाकालव ? याचं उत्तर ज्यानं त्यानंच ठरवावं.

कोर्टांत आज खुनी ममतेचा खटला ऐकण्याकरितां बेफाम गर्दी झाली होती. ममतेनं स्वतःच्या मुलाला विहीरींत लोटून खून केला, असं सरकारतर्फे पुढें आलेल्या पुराव्यावरून पोलिसांनीं शाबीत केलें होतं. तिनं स्वतःच्या बचावाची कांहींच खटपट केली नव्हती किंवा वकीलहि दिला नव्हता. कोर्टांत खटला चालू असतांना ममतेच्या डोळ्यांतून सारखे अश्रू ठिबकत होते. ममतेच्या विरुद्ध बाजूच्या सर्व साक्षीदारांच्या साक्षी आटोपल्यानंतर न्यायाधिशांनीं ममतेला–साक्षीदारांना कांहीं विचारायचं आहे काय ? म्हणून प्रश्न केला. परन्तु ममतेनें खिन्नपणें हंसून उत्तर दिलें, कीं " साहेब ' बिचाऱ्या साक्षीदाराकडे तरी काय दोष ! त्यांनीं पाहिलं–त्यांना दिसलं तेवढंच त्यांनीं सांगीतलं; पण माझ्या मुलाचा खून मींच कां केला याचं कारण ? हो ! पण याचं कारण तरी त्या बिचाऱ्यांना कसं कळणार ! बाह्य दृष्टीनंच त्यांनीं या खुनाबद्दल विचार केला आहे; पण अंतर्दृष्टीनं...? यांत त्यांचा तरी काय दोष ! अंतर्दृष्टि फक्त एका परमेश्वरालाच असते. 'साहेब जग माझ्या हकीगतीला वेड्या ममतेची बडबड म्हणून समजेल किंवा न्यायासन खुनी ममतेनं स्वतःचा बचाव करण्याकरितां केलेला लपंडाव म्हणून ठरवील. ठरवोत बापडे ! आतां मला जगायचं तरी कुणाकरितां ? " असं म्हणून ममता सारखी ढसढसा रडूं लागली. मनसोक्त रडल्यानंतर ममता पुन्हां बोलूं लागली: ' साहेब, आपणाला माझी हकीगत कंटाळवाणी वाटेल–पण खुनी ममतेला शिक्षा देण्यापूर्वी, मरत्या जीवाची इच्छा तृप्त करावी म्हणून–माझ्या वेडीची बडबड आपण शांत चित्तानं ऐकाल, हीच मला आशा आहे. " ममतेनं दीन मुद्रेनं न्यायाधिशाच्या तोंडाकडे बघितलं, न्यायाधिशानं कृपाळू होऊन ममतेला बोलायला परवानगी दिली. ममतेनं समाधानाचा एक दीर्घ निःश्वास सोडला व ती पुधें बोलूं लागली: " साहेब, आज माझ्या लग्नाला तीनच वर्षे झालींत. माझे पति–एका उच्च कुलांत जन्माला आलेले होते. त्यांना एकच वडील बंधु असून, आज ते हयात आहेत. पण मजसारख्या अभागिनीशीं नातं जोडण्यांत आज त्यांना हीनपणा वाटतो ! लग्न झाल्यापासून पहिल्याच वर्षी मला मधु बाळ झाला. मधु बाळाच्या बारश्याच्या दिवशींच तिकडचा बारावा आटोपावा लागला ! बापाच्या मुळावर आलेलं कारटं म्हणून मधू बाळाला, नी पहिल्याच वर्षी नवरा मारणारी पांढऱ्या पायाची म्हणून मला, सारं जग आमच्या तोंडावर म्हणूं लागलं. माझा पतीचा आधार नाहींसा झाल्याबरोबर मधु बाळाच्या पंधराव्या जन्मदिवसापासूनच मी घरांत वागायला उठलें. ज्या जाऊबाई मला पाटावरचं पानावर बसवीत, त्याच जाऊबाईंचीं खरकटीं पानं नी पाटं उचलणारी मी सत्तेची मोलकरीण ठरलें. बरं भावोजी ! पुरुषच ते. त्यांना घरांत बसायला वेळ तरी कुठं होता? जाऊबांईच्या अशा कठोर वागविण्याचा नी प्रेमळ पतीच्या दुःखाचा परिणाम सुखांत वाढलेल्या माझ्या शरीरावर दिसूं लागला. बाळंतपणांत झालेल्या खाण्यापिण्याच्या हालाभुळं मला बारीक सारीक ताप येऊं लागला. मी बरीच अशक्त झालें, नी त्याचा परिणाम माझ्या अंगावरच्या दुधावर झाला. मला अंगावर दूध कमी येऊं लागलं, नी माझ्या गोजीरवाण्या नी सुकुमार मधु बाळाची उपासमार होऊं लागली. माझा सत्तेचा आधार नाहींसा झाल्याबरोबर घरांतील क्षुल्लक वस्तूवरला देखील माझा हक्क उडाला. आमच्या घरच्या कुत्र्यानं पोटभर पिऊन थाळींत उरलेल्या दुधाइतकं देखील दूध माझ्या बाळाला–एका निराधार विधवेच्या पोरक्यां पोराला–मिळत नव्हतं. वेडी माया ! मला वाटलं, जाऊंबांईचं एक असो—पण भावोजी......? भावोजी तिकडचे सख्खे वडील भाऊ आहेत. त्यांना माझी नसली, तरी त्यांच्या धाकट्या भावाच्या एकुलत्या एकच पोराची तरी काळजी वाटेल,म्हणून जाऊबाई कुठंशा बाहेर गेलेल्या पाहून मीं माझ्या मधु बाळाला भाऊजींच्या पायावर घातलं—नी त्यांना सारी हकीगत सांगितली. पण जाऊबाई केव्हां आल्या नी मीं सांगितलेली हकीगत त्यांनीं कशी ऐकली, देव जाणे ! आल्याबरोबर जाऊबाईंनीं माझ्या मधु बाळाला भावोजींच्या पायावरनं लाथेनंच दूर लोटलं. माझा मधु बाळ रडायला लागला–त्याला उचलून मीं पोटाशीं धरलं. माझं–मातेचं हृदय कळवळून आलं–पण तिचं हृदय ? चांडाळीणच ती. शिव–शिव–देवा ! जाऊबाईंना शिव्या दिल्याबद्दल मला क्षमा कर. आमचंच दैव खोटं तिथं जाऊबाईंना तरी दोष देण्यांत काय फायदा ! " कपाळ करंटी मेली, आपल्या संसाराचं वाटोळं केलंन् नी आतां दुसऱ्याच्या संसाराचं...माझ्या भरल्या घरांत रहूं नकोस, चल चालती हो. " असं म्हणून जाऊबाईंनीं मला घराबाहेर घालवलं. जाऊबाईंच्या या कडकाडाटापुढं भावोजींचं कांहींच चाललं नाहीं. संध्याकाळच्या दिवे लागणीच्या सुमाराला बाळाला पोटाशीं धरून नेसत्या लुगड्यावरच मी माझ्या सत्तेच्या घराला पारखी झालें.

पक्षी आपल्या घरट्याकडे धांव घेत होते. गुरं ढोरं आपल्या घराकडे ओढ घेत होतीं. पण मी ! बिन सत्तेच्या कां असेना, पण घराच्या आश्रयाला होतें. पण मी आतां घरादाराला पारखी झालें होतें. गांवाबाहेरच्या देवळाच्या पारावर बराच वेळ बसून मी मनसोक्त रडलें. माझा मधु बाळ माझ्या तोंडाकडे केंविलवाण्या नजरेनं सारखा बघत होता. जसजसा अंधार होऊं लागला, तसतशी मला कुठं तरी आश्रयाची जरूरी वाटूं लागली. मी उठलें. मधु बाळाला उराशीं घट्ट कवटाळून वेड्यासारखी धांवत सुटलें. किती वेळ धांवत होत्यें कोण जाणे ! धांवतां धांवतां मी थकलें. इतक्यांत मधु बाळ भुकेनं सारखा रडूं लागला. जवळपास कांहीं दिसत नव्हतं–कुणी तरी भेटेल किंवा गांव दिसेल, नी मी माझ्या मधु बाळाकरितां कांहीं खायला मागेन म्हणून मी पुन्हां धांवत सुटले. धांवता धांवता ठेंच लागून पडलें. माझा मधु बाळ मोठयानं ओरडला नी दुःखानं मी बेशुद्ध झालें. पुढं काय झालं, ते मला कांहींच कळलं नाहीं. पण मी शुद्धीवर आलें, तेव्हां एका खोपटांत रकट्यावर पडले होतें. भिवा पाटलानं माझी चांगली शुश्रूषा केली. मी एकदोन दिवसांतच बरी झालें.

भिवा पाटील एका श्रीमंत गृहस्था
मळ्यांत अहोरात्र राबणारा मजूर हो
पण दिलाचा प्रेमळ नी मनाचा स
होता. त्यानं मला माझी सारी हकी
विचारली. मींहि पण कांहीं भीडभा
ठेवतां माझी सारी हकीगत त्याला सांगित
मजसारख्या निराधार स्त्रीनं दुसरी
कुठेंहि जाऊं नये, म्हणून त्यानं मला
परीनं विनवलं. मला माझा गतर
आठवूं लागला. घरादारावर माझा
असतांना–माझ्या पतीचे सख्खे बंधु अस
नासुद्धां भावोजीचं माझ्याशीं त्यांचं अ
कठोर बर्तन–नी भिवा जातीपातीचा
कांहीं स्वार्थ नसतांना माझ्याशीं त्याचं अ
प्रेमळ वर्तन ! भावोजीचं तें उन्मत्तप
वर्तन नी भिवाचं सख्ख्या मुलीवर
णारं मजवरील प्रेम–भावोजींच्या डोळ
दोनप्रहरीं सुखानं मिळणाऱ्या अन्नाची
आली होती, तर भिवाजवळ गरीबींत
टोणपे खाऊन अर्धपोटीं राहून दीनावि
हळुवार बनलेलं हृदय होतं. भिवा
मला पितृवत् आपलेपणा वाटूं ला
पण त्याचा तो चंद्रमौळी संसार
मला आयतेपणानं भिवाच्या घरीं
यची शरम वाटायला लागली !
भिवाच्या मदतीनंच मी त्याच्या
काकडे नोकरीला राहिलें. दा
कधीं तरी सुख असतं का
केवळ पोटाची खळगी भरतांना,
दुसऱ्याची सेवाचाकरी करावी लागत
ना ? त्यामुळें मधु बाळाकडे माझं दु
होऊं लागलं. दुर्दैव माझा सारखा
बघत होतं. अशा परिस्थितींतच मा
बाळाला देवी निघाल्या. मालक
कीण चांगले. त्यांनीं बरीच मदत के
पण त्यांना यश आलं नाहीं. माझा मधु
देवीच्या योगानं दोन्ही डोळ्यांनीं आ
झाला. दोन अडीच वर्षांचं दुडदुड
णारं गोजिरवाणं मूल आतां आंधळे
चांचपडत रडत फिरूं लागलं. मला
जास्तच त्रास होऊं लागला. माझं
सर्वस्व मधु बाळ असतांना त्याची
ही दुःखद परीस्थिति बघून मी ज
विषयीं दिवसें दिवस निराश
लागलें. माझा मधु बाळ आंधळेपणानं
असतांनाच जिन्यावरून खालीं आ
नी त्याचा पाय अधू झाला! डॉक्टरच्या
पाय कापावा लागेल असं ठरलं. आधींच
मधुबाळला आंधळं केलं होतं नी त्य
तो असा अपंग होणार ? मग त्याचं
आयुष्य... ! त्यापेक्षां आतांच त्याचं
बरं वाईट झालं तर ? मीं पुष्कळ
केला. माझ्या मधु बाळाचे पुढील ह
नको–ती-कल्पनाच नको. मधु बाळ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माझाहि शेवट केला तर...! शेवटीं ताचे
चार कायम ठरला—नी घरांत सामसूम
ल्यावर मी मधु बाळाला कडेवर घेऊन
हिरीजवळ गेलें. मनांत उडालेली काल-
कालव शांत होईना. प्रत्यक्ष पोटच्या
ला आपल्या हातानं विहिरींत ढकल-
? कीं निर्दय जगांत अशा अ्धु
गसाचें झालेले हाल मुकाट्यानं पहा-
? शेवटीं पहिलाच विचार कायम
ा. माझ्या अंगावर शहारे आले. मधु
ाला मीं माझ्या हृदयाशीं घट्ट कवटाळून
 नी त्याचे प्रेमानें पटापट मुके घेतलें.
बाळ गालांतल्या गालांत हंसत होत.
त्याचे निस्तेज डोळे माझ्या तोंडाकडे
यचा प्रश्न करीत होते; पण
ळ्या माणसाच्या दैवीं तें कसलं सुख ?
 हृदय भडकून आलं. मी सारखी
लागलें. पण लगेच मीं माझं मन घट्ट
. "देवा ! सांभाळ," असं म्हणून
या या निर्दय हातांनीं माझ्या जीवन-
स्व आवडत्या मधु बाळाला या चांडाळ-
 विहीरींत लोटलं. माझा बाळ पाण्यांत
ांना सारखा 'आई—आई !' म्हणून
 मारीत होता ! त्याच्या हांकेला ओ
न मी आतां विहिरींत उडी घालून
या मधु बाळाच्या सोबतीला जाणार,
यात निर्दय जगानं मृत्यूच्या
ून मला मागें खेचलं, नी
ां माय—लेकरांची कायमची ताटा-
टूट केली. प्रत्यक्ष माझ्या मुलाचा खून
 कां केला ? याचं उत्तर, ज्यानं
च ठरवावं. साहेब, संपली या खुनी
ची हकिगत." असं म्हणून ममता
रडूं लागली.

रीनें खुनी ममतेला एकमतानं
 म्हणून सोडून दिलं; आणि त्या
पासूनच वेडाच्या भरांत ममता ओर-
सते:
"ता खुनी, कीं खुनी ममता ?"

—॰—

वरील फोटो—
थॉमस आर्टिस्ट
मुंबई नं. ४, यांनी
काढलेला आहे.

'सत्यकथा' ::

लेखक:—
व. र. ठकार बी. ए.

(१)

सायंकाळची प्रशांत वेळ. सूर्य आर्धाच अस्तास गेला होता. आसमंतांतील अरण्यांत गंभीर शान्ता पसरली होती. गौतम ऋषींचा आश्रम मात्र सांतकालीन धार्मिक कृत्यांनीं गजबजून गेला होता. जवळच लहानशी नदी खळ खळ असा आवाज करीत वहात होती.

आश्रमांतील विद्यार्थीगण आपलीं सर्व कृत्यें संपवून आपले गुरुजी गौतम महर्षींच्या सभोंवार विद्यार्जनासाठी बसला होता. जवळच असलेल्या अग्निकुंडांतील अग्नि पेटलेला दिसत होता, व त्याच्या ज्वाला आसपासचा प्रदेश प्रकाशित करीत होत्या. जणूं कांहीं असत्य कोठेंच लपून राहूं नये, जशी त्याची इच्छाच होती. विद्यार्थ्यांना ज्ञानदान करीत असतां, गौतमांचें लक्ष एका नव्या बालकाकडे वेधलें गेलें. त्या अपरिचित व तेजस्वी बालकानें नम्रतापूर्वक अभिवादन केलें, व "रिक्त हस्तें न गन्तव्यम्" ह्या शास्त्राप्रमाणें गुरुजींच्या भेटीसाठीं म्हणून त्यानें फळापुष्पांचा अहेर आणला होता, तो त्यांच्या चरणांवर ठेविला.

—"तूं कोण ?" गुरुजींनीं विचारलें.

किंचित् कंपायमान व नम्रस्वरांत तो उत्तरला: "भगवन् ! सत्य शोधण्याच्या मनीषेनें प्रेरित होऊन मी आपल्या चरणाकडे आलों आहें. तरी मला सत्याचा मार्ग दाखवावा."

"तुझें नांव काय ?"

"सत्य—काम."

"या नांवावरून सत्याची तुला इच्छाच आहे, असें दिसतें, छान ! परमेश्वर तुझें कल्याण करो. मी तुझें उद्दिष्ट साध्य करण्याचा यत्न करीन, पण तत्पूर्वीं मला तुझी कांहीं माहिती पाहिजे.

"ती कोणती ?"

"तुझा जन्म कोणत्या कुळांत झाला ? तुझ्या पिताश्रीचें नांव काय ? कारण फक्त ब्राह्मणांनाच त्या नित्य सत्याचा शोध करण्याचा अधिकार आहे."

"भगवन् क्षमा असावी. ह्यांपैकीं कोणतीच गोष्ट मला ज्ञात नाहीं. आपली परवानगी असेल, तर मी माझ्या आईला विचारून येऊन आपल्याला निवेदन करीन."

"अवश्य जा. परमेश्वर तुझा पाठिराखा असो."

(२)

गुरुजींची अनुज्ञा घेऊन ह्या विषयावर विचार करीत सत्यकाम परत चालला. वाटेंतील नदी सहज लीलया ओलांडून तो पलीकडे आला. सबंध गांव पूर्णपणें निद्रित झालेला होता. त्याच्या शेवटच्या टोंकाला असलेली एक लहानशी झोंपडी होती. हीच त्याचें निवासस्थान. त्याप्रत तो पोंचला.

झोंपडींत एकच दिवा मंदपणें जळत होता. "एकच पणती मिण मिणती" अशी स्थिति. त्या अस्फुट प्रकाशांत आपल्या सत्यकामाची वाट पहात त्याची आई, त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. बाहेरील प्रदेशाप्रमाणें तिच्या हृदयांतहि निराशेचा काळोख पसरला होता !

सत्यकाम येतांच, तिनें त्याला उचलून हृदयाशीं घेतलें, व त्याच्यावर अश्रूंचा व चुंबनांचा एकच वर्षाव केला. मातृहृदयच तें ! प्रेमानें त्याच्या मस्तकावर हळुवार हात फिरवीत तिनें "काय झालें ?" असा प्रश्न केला.

"आई !" त्या निष्पाप बालकानें, सरळ व निरागसपणें प्रश्न केला: "माझ्या पिताश्रीचें नांव काय ?"

(२)

"कशाकरतां बाळ ?"

"कारण फक्त ब्राह्मणांनाच सत्य शोधण्याचा अधिकार आहे, असें गुरुजी म्हणाले ! सांग ना ?"

तिचा चेहरा किंचित् आरक्त झाला. खालच्या स्वरांत तिनें त्याला सांगितलें: "बाळ, तारुण्यांत माझ्या जवळ पैसा नव्हता. पैशासाठीं, पोटासाठीं, मला अनेक तरुणांना तृप्त करावें लागलें ! ह्या तुझ्या लाडक्या आईचा, जाबालेचा तूं मुलगा आहेस. मुला तुझे पिताजि मला माहित नाहीं. त्यांचें नांव सांगतां येत नाहीं."

"म्हणजे काय आई ?"

"बाळ तुला तें कसें कळणार ? तूं फक्त गुरुजींना असें सांग, कीं माझ्या बापाचें नांव मला माहित नाहीं. मी जाबालेचा मुलगा आहें !"

त्या बालमनाचें समाधान झालें. अधिक न विचारतां आईच्या मांडीवर डोकें ठेवून तो झोंपी गेला.

(३)

प्रातःकाळचा नितान्तरम्य समय. आश्रमस्थ वृक्षांवर बालरवीचें ताम्रवर्ण किरण थयथय नाचत होते. सर्वत्र उत्साहाचें, आनंदाचें साम्राज्य होतें.

आश्रमांतील विद्यार्थी नुकताच स्नानविधि संपवून आपआपला केशसंभार पुसत पुसत सनातन वृक्षाच्या खालीं जमले होते. गुरुजींच्या सभोंवार नित्याप्रमाणें विद्यार्जनासाठीं ते बसले होते.

त्या वेळेस सत्यकाम तेथें आला. नम्रपणें त्यानें अभिवादन केलें व गुरुजींच्या चरणाजवळ न बोलतां तो उभा राहिला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

" तुझी जात कोणती, हें विचारून आलास का ? " महर्षींनीं प्रेमळपणें प्रश्न केला.

" भगवन्, क्षमा असावी. " निर्भयपणें सत्यकाम उत्तरला: " मला माझी जात माहित नाहीं. माझी आई मला म्हणाली, कीं " तारुण्यांत तिला अनेक तरुणांजवळ रहावें लागलें. म्हणून वडिलांचें नांव सांगतां येत नाहीं. तूं फक्त जाबालेचा, माझ्या आईचा मुलगा आहेस " असा आईचा निरोप आहे. मला वडिलांचें नांव माहित नाहीं. -आईच्या इच्छेप्रमाणें आपणांस सांगितलें आहे. "

शांतपणें गुरुजींच्याकडे पहात सत्यकाम उभा होता.

त्याचें बोलणें ऐकतांच, जवळील सर्व विद्यार्थ्यांत रागाची एकच लाट उसळली.

त्रस्त झालेल्या मधुमाशांच्या गुणगुणण्याप्रमाणें तो रागानें गुणगुणूं लागला.

"शान्तं पापम् !!" व सत्यकामाच्या ह्या निर्लज्ज—त्यांच्या मतानें—व उद्धट जबाबामुळें प्रत्येक जण त्याच्याकडे रागानें पाहूं लागला.

सत्यकामाला मात्र, ह्या प्रकाराचा अर्थच कळेना, व असें कां व्हावें, हेंहि समजेना.

परंतु हें ऐकताच दयाघन महर्षि गौतम मात्र जाग्यावरून उठले, त्यांनीं सत्यकामाला आपल्या बाहुपाशांत घेतला व त्याच्यावर आशीर्वादाची व प्रेमाची वृष्टि केली.

" सत्यकाम !" सद्गदित अंतःकरणानें गौतम म्हणाले: "तूंच खरा श्रेष्ठ ब्राह्मण आहेस. कारण, तुझ्याजवळ सत्याचा अमोलिक ठेवा आहे. धन्य धन्य तुझी व तुझ्या मातेची. तूंच ब्राह्मण—श्रेष्ठ ! सत्याचा विजय होवो !!

सर्वत्र प्रतिध्वनि निघाला " सत्याचा विजय होवो. "

डॉ. रविंद्रनाथ ठाकूर ह्यांच्या " Fruit Gathering " ह्या पुस्तकांतील एका कथेचा अनुवाद. —लेखक.

गोदरेजचे वनस्पतिजन्य

टॉयलेट साबण

सौंदर्यवर्धन करणारे आहेत

प्रख्यात जर्मन त्वचातज्ज्ञ हर कार्ल लुझेरटस लिहितातः—

मी एक त्वचातज्ज्ञ आहे. मानवी त्वचेला चरबीयुक्त साबूनें अपाय झाल्यावांचून रहात नाहीं हें मी पूर्ण जाणतों. गोदरेजच्या वनस्पतिजन्य टॉयलेट साबणाची जाहिरात एका वर्तमानपत्रांत वाचून मीं ते साबण स्वतः मागविले. ते पुष्कळ दिवस वापरून नंतर त्यांचें रासायनिक पृथक्करण करून पाहिल्यावर माझें असें निःसंशय मत झालें आहे कीं, ते सौंदर्यवर्धक आहेत, तसेंच आरोग्यपोषकहि आहेत. माझ्या परिचयाच्या कांहीं कमलांनींना मीं ते वापरावयास दिले होते व समाधानाची गोष्ट ही कीं, त्यांत त्यांनीं आपल्या साबणांची मुक्तकंठानें स्तुति केली. शरीराची दुर्गंधी घालविण्याचा उत्कृष्ट गुणहि आपल्या साबण त आहे.

गोदरेजचे टॉयलेट साबण जंतुघ्न व रोगप्रतिबंधक आहेत.

जर्मन इन्स्टिटयूट ऑफ बॅक्टेरिऑलजी व मायक्रॉस्कोपीचे सध्यांचे मुख्याधिकारी व नामांकित शास्त्रज्ञ डॉ. ऑफरट गोदरेजच्या अंगाच्या साबणाचें संशोधन करून म्हणतातः—

मी गोदरेजचे वनस्पतिजन्य तेलापासून तयार केलेले अंगाचे साबण पृथक्करण करून पाहिले. मला असें आढळून आलें कीं, साबण उत्कृष्ट, जंतुघ्न असून ते स्ट्रेप्टोकॉकस व स्टाफिलोकॉक जातीचे जंतु, त्याचप्रमाणें विषमज्वर व त्यांसारख्या इतर संसर्गजन्य तापांचे जंतु नाश करूं शकतात.

ग्लिसरिन साबण, कॅरबॉलिक साबण व चरबीयुक्त साबण माणसाच्या त्वचेला अपायकारक असतात.

अमेरिकेंतील " Soap Gazette & Perfumer " हें मासिक आपल्या डिसेंबर १९३३ च्या अंकात तिकडील साबणांचें वर्णन करतांना म्हणतें—

" अंगाला लावण्याच्या साबणांमध्यें, ग्लिसरिनपासून तयार केलेल्या पारदर्शक साबणांत कातडी फाजील कोरडी व चरचरीत करण्याचा दोष आढळून येतो "

एडिंबरो युनिव्हर्सिटींतील त्वग्रोगाचे अध्यापक आणि रॉयल इन्फर्मरीच्या त्वचाविभागाचे वैद्य डॉ. आर. क्रॅस्टन लो, एम्. डी., एफ. आर्. सी. पी. हे आपल्या ' त्वचेचे सर्वसाधारण रोग ' ह्या ग्रंथांत पृष्ठ १७ वर लिहितात—

' कॅरबोलिक सोप केव्हांहि वापरूं नये '

त्वचारोगाचा उद्भव परदेशी स्वस्त टॉयलेट साबणामुळें झाला असें पुष्कळ वैद्यकव्यवसायिकांचें मत असल्याचें कांहीं दिवसांपूर्वीं ' टाइम्स ऑफ इंडियांत ' प्रसिद्ध झालें होतें.

बर्नार मॅक फेडन हे आपल्या " Hair Culture " ह्या ग्रंथांत लिहितातः—

केंस व डोकें धुण्याकरितां वापरावयाच्या साबणाची निवड अत्यंत कसोशीनें करावयास हवी असें मला पुनः पुन्हा म्हटल्याखेरीज रहावत नाहीं. ह्या कामीं वनस्पतिजन्य तेलाचे साबण निर्दोष होत.

सुचनाः—गोदरेजच्या साबणांच्या प्रख्यातीमुळें कांहीं किरकोळ कारखानदार गोदरेजचा बादरायण संबंध असलेली नांवें घेऊन आपला माल खपविण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणून गोदरेजचे साबण विकत घेतेवेळीं पेटीवर " चावी "चें चिन्ह आहे किंवा नाहीं याची शहानिशा करून " चावी " छापचेच गोदरेजचे साबण अस्सल आंघोळीचे साबण विकत घ्यावेत.

सोल एजंटः—**नादिरशा प्रिण्टर आणि कंपनी;** एस्प्लेनेड रोड, कोट, मुंबई

शाखाः—कलकत्ता, लाहोर, मद्रास व कराची

पुणें एजंटः—विठ्ठलदास साखळचंद.

कारखानदार : गोदरेज सोप्स लिमिटेड, मुंबई

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकरण सातवें

…क्षांत आलेंच असेल, कीं रमाबाईची सांपत्तिक स्थिति पुष्कळच हजारांतील एखाददुसऱ्या भाग्यवंताहूनही पुष्कळच वरच्या पाहिरीची होती. ऐतिहासिक …ळाशीं जोडतां येईल, इतक्या जुनाट घराण्यांत जरी त्यांचा जन्म झालेला नव्हता, …री पांच पन्नास वर्षांत, शेंदीडशें मैलांच्या टापूंत प्रसिद्ध असलेल्या, एका 'पिढी…ाद श्रीमंत कुटुंबाची एकुलती एक वारस,' अशा कीर्तीनें त्यांनीं बाळपण …ालविलें होतें; आणि आपल्या जन्मदात्याच्या मृत्यूनंतर, त्यांनीं ती कीर्ति खरीही …रून दाखविली होती. किती तरी हजारांचें वार्षिक उत्पन्न, लाखांनीं मोजावी …ागणारी रोकड, पाट्यांनीं भरून तिजोरीकडे पोहोंचवावे लागणारे दागदागिने, …रिंदारें, भांडीकुंडीं, इत्यादि प्रकारची टोलेजंगी माहेरची संपत्ति, बापाच्या निधना…ंतर, रमाबाईच्याच मालकीची झालेली होती.

विवाहानें रमाबाईनीं ज्या दुसऱ्या घरीं, दुसरा आणि नवा जन्म घेतला होता, …घर नांवानें फार मोठें, पण लक्षणानें तितकेंच खोटें होतें. देशमुखांचा घरंदाज…णा फार प्रसिद्ध होता. त्याचा पदर, महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व 'अस्सल …रण्यांशीं फार पुरातन काळापासून लागत आलेला होता; तथापि तो अप्रत्यक्ष 'अस्सलपणा' कितीही मोठा असला, तरी अलीकडील सर्व देशमुखांची लायकी …त्यक्ष असल्यानें, * * गांवच्या देशमुखांबद्दल सहसा कोणी बरें बोलत नसे. …यांच्या व्यसनाधीनतेचें शिंग, वेळोवेळीं इतक्या जोरानें व अनेक तोंडीं एकसुरानें …ाजविण्यांत येत असें, कीं त्या घरांतील मुलांचीं लग्नें होणेंही मुष्किल होऊन बसलें …ोतें. छत्रपति राजाराम महाराजांच्या कारकीर्दींत आपल्या घराण्याच्या मूळ …ुरुषानें पराक्रम करून, देशमुखीवतन मिळविलें, इत्यादि प्रकारच्या शिळो…त्याच्या गप्पा मारण्याखेरीज अलीकडील देशमुखांजवळ दुसरें कांहींच शिल्लक …ाहिलें नव्हतें. इ. स. १८५७ नंतरही ज्या कांहीं बेदिलीच्या ठिणग्या महाराष्ट्रांत उडाल्या, त्यांपैकीं एकीच्या झळीनें आपलें वतन बेचिराख झालें, असें 'देशमुख लोक' सांगत असत. राहिलेला रयतावा, नुसतें बसून खाणाऱ्यांच्या कितीशा पिढ्यांना पुरणार ? त्या देशमुख घराचा 'अस्सलकी'वरचा वारसाही नुसता तोंडाच्या वाफेच्या जोरावरच तग धरून राहिला होता. कारण, घरांतील मुलांमुलींचीं लग्नें होण्याची पंचाईत जाणवूं लागल्यापासून, 'वाटेल त्या' घरांतील मुली त्यांच्या घरांत आल्या …होत्या; वाटेल त्या घरांत त्यांच्या मुली गेल्याही होत्या. विवाह, मग तो मुलीचा असो, कीं मुलाचा असो, त्याच्या गोंधळानें आपल्याला समाजांत वरची पाहिरी गांठतां यावी, अशी प्रत्येक वरवधु पित्याची इच्छा असते. 'तें तसें पूर्वी केव्हां तरी असेल, आता तशी स्थिति मुळींच नाहीं' असें कोणी वाटेल तर वादविवादाच्या भरांटींत बोलावें. परंतु, आपल्या समाजाचें रामशास्त्रीय नजरेनें निरीक्षण करून, दिसेल तेंच, वजाबाकी न काढतां, उत्तर द्यावयाचें अलेल, तर वर सांगितलें आहे, तें मुकाट्यानें कबूल करावें लागेल. वयानें, शिक्षणानें, विचारानें वाढविलेल्या मुली, पैशांच्या राशी ओतून, निःशंकपणें मोठमोठ्या मानवंतांच्या घरांत ढकलणारे प्रतिष्ठित, करूं म्हटलें तरी, नजरेआड करतां यावयाचे नाहींत. मुलांमुलींच्या लग्नांची घाई करण्याऱ्या वडीलधाऱ्यांना, त्या धांदलीनें पांगळेपणा व पुढें, परिणामीं आंधळेपणा आला, तर त्याची जबाबदारी नशीबावर लादण्यांत येते ! ज्यांना आयुष्याच्या पटावर मुक्या नरदा म्हणून—निदान लग्नासारख्या महत्त्वाच्या डावांत तरी—नाचविण्यांत येतात, त्यांची इच्छा, आशा, आवड, या सर्वांना, लग्नांत घाणा घालतांना लागणाऱ्या जोडमुसळाइतकेंच महत्त्व राहिलेलें असतें. हे प्रकार, जुन्यांना तोंड भरून नांवें ठेवणारे सोज्वळ सुधारकही जुन्यांच्या निर्लज्जपणानेंच पार पाडीत असतात. जुन्या घाटाचें असो, कीं नव्या नाटकी थाटाचें असो, लग्न हें आईबापांचें महत्त्वाचें कार्य ठरून गेलेलें आहे. ज्यांच्या पदरांना लग्नगांठ बसाव-याची असेल, त्यांचा त्या घटनेंत मुळींच संबंध नसतो. असंबंधित लोकांना मतदानाचें महत्त्व कोण देणार ? समाजांतील वरच्या पाहिरीच्या परीक्षेत, मुलामुलींच्या बापाबापांनीं एकमेकांची आधीं चांचणीतपासणी घेण्याची पद्धत आहे. त्यांचे तरी कारण काय ? त्याचें कारण हेंच, कीं मुलामुलींच्या लग्नांनीं त्यांच्या स्वतःच्या सामाजिक महत्त्वाकांक्षा फुलांफळांला यावयाच्या असतात. मुलाचा बाप, मुलीच्या बापाचा सामाजिक दर्जा लक्षांत घेऊन, त्याच्या तिजोरींतील पैशाला खोरें कसें लावतां येईल, याच्या डावपेंचांत दंग असतो, तर मुलीचा बाप, लग्नासारख्या मंगलकार्यांचा विचार, जांवई मेला, तर मुलीच्या पदरीं अन्नवस्त्राची भीक प्रमाणांत कशी पडेल, अशा अभद्र गणतीनें करूं लागतो ! चुडेवजा झालेल्या मुलीच्या भुंड्या हाताला काय लागेल, याचें, परिस्थितिप्रमाणें सम–व्यस्त त्रैराशिक व्यवहारज्ञानानें सोडवून, मुलाच्या बापाशीं, मुलाच्या पुरुषार्थाचा दरदाम मुलीच्या बापानें ठरावयाचा असतो. मात्र, त्या व्यापारी घासाघिशींत, मुलीच्या बापानें सोडविलेल्या त्रैराशिकाच्या उत्तराचा चुकूनही उच्चार करतां कामा नये. उच्चार अमंगल, आचारविचारांना कोणाचीच हरकत नसते. याहून स्पष्ट बोलावयाचें झालें, तर विचाराच्या प्रांतांत, मुलीचा बाप, आपल्या पोटच्या गोळ्याच्या विवाहमंगलाचें देवक, प्रेतयात्रेच्या मडक्यांतच ठेवीत असतो, असें म्हणावें लागेल ! वाहून गेलेल्या व नवीनपणानें येणाऱ्या, या बाबतींतील विचाररूपी पाण्याची खोली, सामाजिक क्षेत्रांत, निदान आजकाल तरी, अगदीं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सारखी, म्हणजे घोड्याइतकीच आहे! नव्याजुन्यांनीं एकमेकांना बत्तिशी दाखवावयाची, ती केवळ, आपापली सामाजिक लबाडी लपविण्यासाठींच. असो.

रमाबाईच्या वडिलांच्या मुलीबाबतच्या विचारांना वरील प्रकारच्या व्यावहारिक सूत्रांनीं एकत्र बांधलें नव्हतें, हें सांगणें जरूर आहे. पतीकडून आपल्या एकुलत्या एक मुलीच्या जरीपदरांत काय पडेल, याचा विचार त्यांच्या मनांत स्वप्नांतसुद्धां कधीं आला नव्हता. तीनचार पिढयांनीं केलेलें मातीचें हत्तीभार सोनें, तितक्याच सोन्यानें विकत घेतलेली माती–जमीन जुमला—सारें कांहीं मालूच्या-रमाबाईच्याच-मालकीचें होणार होतें. मालूच्या बापाजवळ संपत्ति अपरंपार होती, जरूर होता तो घरंदाजपणा. मालूच्या लग्नानें, आपल्या जिंदगीच्या किंमतीनें तिच्या वडिलांना, आपल्या लोपणाऱ्या घराण्याला 'अस्सलां'चा प्रतिष्ठितपणा मिळवून द्यावयाचा होता. त्यासाठीं त्यांची वर्षांवनुर्षे धडपड चाललेली होती. सामाजिक समजुतीनें ठरविलेला 'अस्सलपणा!' काय ती त्याची किंमत, काय तो त्याचा वडेजाव! जसा कांहीं प्रत्येक 'अस्सलपणा' निर्भेळ राहिलेला असतो? 'आम्ही अस्सल आर्य' म्हणविणाऱ्यांनीं जर आपल्या रक्ताचें शास्त्रीय संशोधन करवून घेतलें, तर त्यांत कितीकिती अनार्यांचे रक्तकोश सांपडतील, तें त्यांना दिसून तरी येईल. जी दशा आर्यत्वाची, तीच जातीच्या अस्सलपणाची. परंतु, तो अस्सल जातिवंतांचा निर्भेळपणा, अगणित कालांत, झांकल्या मुठींत बांदिस्त असल्यानें त्याची खरी कवडी–किंमत कोणालाच कळून येत नाहीं. एका व्यापाऱ्यानें दुसऱ्याला हुंडीनें हजारों रुपयांची रक्कम अदा करावयाची, पहिल्यानें, दुसऱ्याच्या खातीं खर्चे टाकून, दुसऱ्यानें पहिल्याच्या नावें तीच कागदी रक्कम आपल्या वहींत जमा करावयाची आणि ती हुंडी तिसऱ्या व्यापाऱ्याला द्यावयाची, व व्यापारी व्यवहाराचें हें चाक असेंच पुढें ढकलावयाचें! हुंडीवर लिहीलेली रक्कम असते कोठें? पाहतो कोण? देतो कोण? घेतो कोण? सारा पतीचा कारभार, आणि या कारभाराची ऐपत, त्यावर डोळे मिटून देवघेव चाललेली असते. त्याचप्रमाणें सामाजिक जातीच्या अस्सलपणाचाही आंधळा व्यापार आहे!

×× गांवाच्या देशमुखांचा मुलगा, आपल्या मालूला अगदीं हवा तसा, योग्य आहे, असें मालूच्या–रमाबाईच्या–तीर्थरूपांनीं हेरलें होतें. देशमुखांच्या घराण्याचा अस्सलपणा लौकिकवान् होताच. त्या वड्या घराच्या आढ्याचा वासा, कित्येक पिढयांतील पुरुषांच्या पुरुषार्थानें पोखरून पोंकळ करून टाकला; असला, तरी तो पोंकळपणा, आपण पाहतां पाहतां भरून काढूं, अशीही मालूच्या बापाची खात्री होती.

[२]

अगदीं त्याच्या बालवयापासूनच, 'माधव' ×× गांवच्या साऱ्या देशमुखांन अपवाद ठरणार, असें सारे लोक बोलूं लागले होते. दाराबाहेरच्या मातीनें पायाच्या तळव्यांना रासवटपणा आणतांच, शिक्षणांतून, मागच्या पायानें काढता पाय घेण्याची, गर्भश्रीमंत 'जातिवंतां'च्या मुलांची रीत, माधवानें पुरती पायांखालीं तुडविली होती. शिक्षणप्रांतांतलि सर्व वाटा माधव देशमुख मोठ्या ऐटीनें तुडवीत चाललेला होता. घराणें मोठें, मुलगा मोठा हुषार, मोठा हुद्देदार होण्याच्या खात्रीचा, मोठा सालस, असें सारेंच 'मोठें' असल्यानें मालूच्या बापानें दुसरें कांहीं पहावयाचेंच नाहीं, असें आपल्या मनाशीं निश्चितच करून टाकलें.

राहतां राहिली ++ गावांच्या देशमुख्यांची 'नामांकित' नीतिमत्ता. परंतु, घराण्याच्या नीतीचा आणि लग्नाचा कांहीं संबंध असूं शकतो, असें मानणाऱ्यां खुळचटांपैकीं मालूचे वडील खास नव्हते. 'मोठ्या नदींत बारमहा पाणी असावयाचेंच'' या गडकऱ्यांनीं थट्टेसाठीं लिहिलेल्या शब्दांत, "सर्व मोठ्या घराण्यांच्या नीतीचा खरा इतिहास लिहीला आहे'' असें, गडकऱ्यांचे शब्द त्यांच्या कानीं पडले असते, अगर त्यांस पहावयास मिळते, तर मालूच्या बापानें गंभीर मुद्रेनें सांगितलें असतें.

आणि तसेंच कसोशीनें पाहूनही माधवाच्या नीतीला गालबोट लागलेलें आपण पाहिलें आहे, असें सांगणारा एकही मनुष्य मालूच्या बापाला आढळला नसता. पडलाच पुढें मागें थोडासा वेडावांकडा पायंडा, तर तो देशमुखांच्या मोठेपणाला बाधक होणार नाहीं. फक्त, त्या पायंड्याचा राजरस्ता होऊं नये म्हणजे झालें, असें मालूचे वडील अंतःकरणपूर्वक समजत असत! असल्या कल्पनांचे 'पुराण पुरुष' अजूनही कोठें कोठें आढळतातच कीं!

त्या काळांत, वयानें सोळा वर्षांच्या घरांत उभी राहिलेली, संबंध इंग्रजी बुकें पढलेली मुलगी, म्हणजे एक अपूर्वाईचीच गोष्ट होती. मालू अपूर्व होती.

मालूच्या बापानें गनिमी काव्यानें डावाला आरंभ केला.

मध्यावर आलेल्या कॉलेजच्या शिक्षणानें, वैवाहिक जीवनाबद्दल माधव कल्पना फारच पालटून गेलेल्या होत्या. परंतु, आपलें घर व घराणें, यांत प दृढमूल झालेल्या वैवाहिक कल्पना, आपल्या कल्पनांशीं ध्रुवांच्या अंतरानें दूर आ या जाणिवीनें तो आंतर्यामीं बराच रंजीस होता.

'नव्या पोरांच्या' मनाला फुटत असलेली नव्या नव्या विचारांची पा मालूच्या वडिलांच्या व्यवहारी नजरेंतून निसटली नव्हती.

मोठ्या इतमामानें माधवाला एका सुट्टींत आपल्या घरीं आणण्याची व्यवस्था केली. ती व्यवस्था माधवाच्या बापापासून शक्य तितकी गुप्त ठेवण्य त्यांनीं खूप खबरदारीहि घेतली होती.

मालूच्या घरचें वळण, एकदम एका दिवसांत बदलून गेलें होतें. 'मोडेपण चिन्ह म्हणून माथीं मारून घेतलेला 'गोषा' त्याच दिवशीं फाटून गेल्यास झाला होता. अगदीं नव्या राजवटींतील खेळीमेळीचा स्वतंत्रपणा, मोकळ्या अं मालूच्या घरीं दारीं हंसत बागडत असलेला माधवाला आढळून आला. म मनांतल्या मनांत अगदीं खूष होऊन गेला.

चार दिवसांचा संस्थानी पद्धतीचा पाहुणचार झाल्यानं पांचव्या दिवसाच्या तिसऱ्या प्रहरीं मुलगी पाहण्याचें नाटक करण्याचें ठरलें. त्या पहिल्या वहिल्या नाटकावर जीव ठेऊन असलेल्या करकरीत नाटककाराला, ना कंपनीच्या पाहुणचारापेक्षां, आपल्या नाटकांतील पात्रें 'बोलूं' लागलेलीं पाहण्य अतीशय उत्सुकता असल्यानें, त्या नाटकाची तालीम अमुक एक दिवशीं सुरूं हो या बातमीनें जो अथांग आनंद होतो, त्याच आनंदाचा अनुभव, मालूच्या बापा पाहुणचाराला कंटाळलेल्या माधवरावाला, 'आतां मुलगी पाहण्याचा समारंभ हो या वार्तेनें आला.

आकाश गंगेची एकाकार प्रतिमा, म्हणजे माधवाला दाखविण्यासाठीं तय केलेली, जुन्या–नव्या थाटाच्या वस्त्रालंकारांनीं ओथंबलेली मालूची मूर्ती हो डोळ्यांच्या कोंपऱ्यांतूनच, माधवरावानें त्या रूपसुंदर, अर्धमुग्ध मूर्तीकडे पाहि दाखवावयास आणलेल्या मुलीकडे पाहिलें न पाहिलेंसें करूनच, नवऱ्या मुल पसंती ना पसंतीचा निकाल द्यावयाचा असतो. समोरच्या मूर्तीकडे जर 'होऊं घा लेल्या' 'होतकरू' नवऱ्यानें एकटकीनें डोळे लावले, तर तो प्रकार, आप भवंत्या 'बघ्यां'च्या तेव्हांच डोळ्यांत येऊन, मुलाच्या पदरांत उल्लूपणा किंवा नि जपणा पडण्याचा पुष्कळच संभव असतो–असे प्रकार 'आतां होत नाहींत; क बदलला आहे' इत्यादि प्रकारच्या गप्पा मारणारे लोक, एक दांभिक, नाहीं आंधळे तरी असतात. त्यांच्या विधानांतील उत्तरार्ध खरा असतो. काल बदल आहे, ही गोष्ट तेव्हढी खरी. बाकी सर्व गोष्टी—विवाहाच्या बाबतींतील–आ तशाच आहेत. 'प्रीतिविवाह' या झळझळीत नांवानें नटलेल्या, दहा लाखांत होणाऱ्या एखाद्या लग्नाकडे बोट दाखवून, त्या बाबतींतील सर्रास गोष्टी बदलल्या आहेत असें म्हणणें, म्हणजे तोंड आहे, म्हणूनच बोलणें होय.

मालूच्या दर्शनानें दिपलेल्या माधवानें मनाशीं खूणगांठ पक्की के आणि तरुणांच्या बिनचूक भीष्मप्रतिज्ञेची घोषणा आपल्या पित्याच्या कानां जाईल, अशीही व्यवस्था त्यानें तावडतोब घडवून आणली.

माधवरावाच्या पित्यानें, "आमच्या घराण्यांत शिकलासवरलेला असा एकच मुलगा, उद्यां मोठा अमंलदार होणार, लोकांचा न्यायनिवाडा करणार, त्या आवडीनिवडीला आम्हीं मान दिला पाहिजे'' इत्यादि शब्दांनीं जरी उदार घो जाहीर केलें असलें, तरी मालूच्या पायांनीं चालत येणाऱ्या लक्ष्मीचें सादर स्वा करण्याच्या अंतस्थ महत्त्वाकांक्षेनेंच त्यांनीं मुलानें योजलेलें तोरण आपल्या घरा बांधण्यास तयार केलें होतें.

त्यापुढें व्हावयाचा तोच प्रकार झाला.

मालू माधवरावाची 'महाराणी' झाली–'रमाबाई' या नावांनें तिचें महाराणी जगजाहीर झालें.

[३]

लग्नानंतरचीं पहिलीं चार पांच वर्षें, आलीं केव्हां आणि गेलीं केव्हां, तें रमामाधव समजलेंही नाहीं. विजेच्या चमकाऱ्यानें चटकन चमकलेले डोळे, गप्पकन् मि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ावात. लख्खदिशीं चमकून, झट्दिशीं ढगांत गडप्प झालेल्या शलाकेच्या प्रता-पार्थी, डोळ्यांना पुढें कांहीं काळ पुरता आंधळेपणा येत असतो; मात्र तेज दिसलें न देसलें, तोंच नाहींसें झालें, इतकी आठवण तेव्हढी मागें शिल्लक राहते. अगदीं तोच अनुभव, 'संसारला' लागलेल्या रमामाधवांना आला. चांगल्या वाईट कल्पनातीत सुखाच्या तशाच दुःखाच्याही घडामोडी त्या पांच वर्षांच्या रमामाधवांच्या आयुष्यांत ्हून आल्या.

माधवराव बी. ए. होऊन एकदम मामलतीच्या जिन्यावर उभे राहिले. परंतु, ुलाच्या मोठेपणाचा मान मिरवायला माधवरावांचे पिताजी पुरते पांच सहा महिने ांहीं जगले नाहींत. आपलें काम आटोपल्यानंतर कामाच्या ठिकाणीं रेंगाळत राहूं नये, ा नियमाचें परिपालन करण्यासाठींच कीं काय, मुलाचा प्रपंच लागीं लाग-ला पाहतांच, या लोकींचें आपलें बिऱ्हाड त्यांनीं गुंडाळलें !

व्याह्याचा ' बरचढपणा ' राहूं नये, या विचारानेंच जसे कांहीं प्रेरित होऊन, माबाईचे वडीलहि स्वर्गाच्या वाटेला लागले; आणि तेही माधवरावांच्या तीर्थ-पांच्यामृत्यूनंतर तीन चार महिन्यांतच !

माधवरावांच्या पित्याजवळ मुलासाठीं ठेवण्याजोगें कांहीं नव्हतेंच, म्हणून ते ात हालवीत सड्या स्वारीनिशीं स्वर्गाच्या प्रवासाला गेले.

परंतु, रमाबाईच्या श्रीमंत पित्यानें, मरतां मरतां, शारदा नाटकांतील श्रीमंता-प्रमाणें आपली श्रीमंती गाजविली. आपली लाडकी माल्ू सासरीं गेली, हें जाणवूं लाग-ांच, त्या वृद्धाला एकांताची भयंकर धास्ती वाटूं लागली. इतकी, कीं सोबतीशिवाय देवस,—विशेषतः रात्रीं—कंठणें, म्हणजे कंठांत प्राण धरून घटका मोजणेंच होय, असें त्यांस वाटूं लागलें. मानवी जगाच्या सर्व व्यवहारांचे लगाम हातीं धरून, कौश-ल्यानें खेळ करणाऱ्या जगन्माता लक्ष्मीची ज्याच्यावर सतत सारखी दृष्टि पडलेली असते, त्याची इच्छा आणि त्या इच्छेची सिद्धि, यांमध्यें कालाला उभें राहतांच येत नाहीं. त्यामुळें, रमाबाईच्या बापाला, इच्छित ' सोबत ' मिळविण्यासाठीं, फार वेळ वाट पहावीच लागली नाहीं. ' सोबत ' घरीं आल्यापासून एक वर्षाच्या आंत, म्हाताऱ्यानें सोबतीलाच एकटी केली ! तसें करण्यापूर्वी, त्यानें आपल्या ' इष्टेट ' जिंदगीची मृत्युपत्रानें चोख व्यवस्था करून ठेविली होती. जिंदगींत जी रोखड होती, तेचा अर्धा भाग, म्हणजे पन्नास एक हजार रुपये रमाबाईच्या नांवानें बाजूला काढून ठेवण्यांत आले होते. ते सुद्धां त्यांच्या हातीं लागवयाचे नव्हते. या रकमेचें व्याजच तेव्हढें सर्व हयातभर रमाबाईना मिळावें, सदर रकमेवर रमा-बाईची मालकी असल्यानें, त्यांच्या हयातीनंतर, त्यांच्या इच्छेप्रमाणेंच ऐन ऐवजाची त्यांनीं व्यवस्था करावयाची होती; रमाबाईनीं तो पन्नास हजार रकमेचा ऐवज ज्याच्यासाठीं योजनेला असेल, त्यालाच सर्वस्वीं मिळावयाचा होता. अशा तेढया रीतीनें म्हाताऱ्यानें रमाबाईना आपल्या जिंदगीचा भाग दिला होता. जुने म्हातारे हा विकट असत. जन्मभर बोलावयाचें एक, पण मरतांना करावयाचें मात्र भलतेंच. यांच्या अखेर कृतींकडे शांतपनानें पाहिलें, तर त्यांच्या मागें कर्त्याच्या जन्माच्या ास निरीक्षणानें दिलेल्या अनुभवाचें अस्तर असतें, असेंच म्हणावें लागतें.

बाकीचा सर्व—साडेसातीन चार लाखांचा ऐवज, रमाबाईच्या बापानें आपल्या ल्या 'सोबती'च्या मालकीचा करून टाकला होता.

नाहीं म्हणावयाला पन्नास हजारांखेरीज रमाबाईना एक लहानसा बंगला व्हदा देण्यांत आला होता. त्यांतच रमाबाई आपल्या उदयासह रहात असत.

अशा अत्यंत महत्वाच्या गोष्टी, रमामाधवांच्या वैवाहिक आयुष्याच्या पहिल्य ांचच वर्षांत घडल्या होत्या.

[४]

नंदनवनांतील वासंतिक महोत्सवाचा आनंद लाभला केव्हां, आपण भोगला केव्हां आणि तो आपल्याला सोडून गेला केव्हां, कसा आणि कां गेला, तें रमामाधवांना उमगलेंही नाहीं. त्या स्वर्गीय आनंदाचा उन्माद एकदां आपल्या भोग-वट्याला आला होता, एव्हढ्या दुःखद स्मृतीचींच तीं पुढें झलक राहिलीं. सुखाच्या कांचनगंगेवर विहार करीत असतां, एखादें वेळीं, चुकूनच कां होईना, माधवरावांकडून अशी एखादी कृति व्हावी, कीं चाणाक्ष रमेच्या चित्ताला चांगलाच चिमटा बसून, आपलें सारें आयुष्य म्हणजे संशयांच्या बाजारांत चाललेली खोटेपणाची देवघेवच आहे कीं काय, असें, पुढें कित्येक दिवस तिला एकसारखें वाटत रहावें. जन्म-स्वभावाच्या उच्छृंखोरीनें घडवलेल्या कृत्याची जाणीव झाल्यास पुरुषी मतलबाला मिठासपणाच्या पाकांत घोळून, माधवराव रमाबाईची मनधरणी करूं लागे. मग मात्र स्त्री—हृदयाच्या क्षमाशीलत्वानें माधवरावांच्या त्या खलनशील कृतीला विस्मृतीच्या पेवांत टाकून देऊन, तारुण्यसुलभ आनंदांत रमाबाई रममाण होत असे.

परंतु, साधघागिरीच्या कसरतीचें आयुष्य, कोणीहि झालें तरी किती दिवस कंठू शकेल ? वर्षांच्या दुकलीचे तीन साडेतीन फेरे होऊन गेले; आणि माधवराव आपल्याशीं अभ्यासी प्रतारणेनें वागत-रहात असतात, असें रमाबाईच्या हळुहळू लक्षांत येऊं लागलें. रमाबाईच्या ऐवजीं जर एखादी सामान्य प्रतीची स्त्री असती, तर लग्नाच्या कायदेशीरपणानें पदरांत पडलेल्या सर्वसाधारण हक्कांच्या अम्मलबजावणीपणां-तच ती दंग होऊन राहिली असती! माधवरावासारख्या चलाख पुरुषाची कारवाई लक्षांत येऊन, आपल्या वैवाहिक जीवनांत खोटेपणाची उणाखी आहे, हें सामान्य प्रतीच्या स्त्रीला, सारा जन्म उलटला असता, तरीहि कदाचित् ओळखतां आलें नसतें; आणि वितक्यांतूनहि कांहीं थोडें दृष्टीस पडून जाणवलेंच असतें, तरी पतिदेवाला विरोध करण्याचें धैर्य न झाल्यानें, आपल्या पायांखालची जमीन तरी घट्ट आहे कीं नाहीं, इतकें पाहूनच ती स्वस्थ राहिली असती.

रमाबाईची वृत्ति सर्वसामान्य जातीची नव्हती. माधवराव आपल्याकडून त्यांच्या मनःस्वास्थासाठीं खूप जपत असत. पतिदेवाची ती आस्था भक्ताच्या भावनेची नसून, स्वतःच्या सुखासाठीं धडपडणाऱ्या चतुर माण-साची ती खटपट आहे, हें जाणण्याइतक्या रमाबाई कुशाग्रबुद्धीच्या खासच होत्या. वस्त्र-प्रावरणांची व दागदागिन्यांची हौस, 'लाडक्या रमे'च्या आवडीनिवडीप्रमाणें पुरविली जात असली, तरी त्या पुरवठ्याच्या पाठीशीं माधवरावाच्या शृंगारसाहित्याच्या समृद्धीची व्यापारी बुद्धीनें केलेली मोजणी-मापणी सदोदित तयार असे. सौंदर्यसंपन्न रमेच्या रूपवैभवांत बाह्यालंकारांनीं भर पडून, आपल्या विषयीं नज-रेला अधिकांत अधिक तृप्ति मिळावी, म्हणूनच माधवराव रमाबाईची प्रत्येक हौस पुरवावयास सदोदित तत्पर रहात. वाचनानें, विचारानें, विवादानें रमाबाईच्या ठिकाणीं बहुश्रुतपणा आणण्याच्या माधवरावांच्या परिश्रमांच्या मुळाशीं ही 'माधवरा-वांची पत्नि पुष्कळच पुढारलेली आहे' अशा लोकप्रसिद्धीची स्वार्थी हांव असेच असे. रमाबाईना नव्या जमान्याचें धोरण, नवजीवनाची धारणा शिकविण्याची माध-वराव इतकी दगदग कां करीत ? उत्तर हेंच, कीं नवी राहणी-वाणी त्यांना स्वतःला सुखकर वाटत होती; म्हणूनच प्रापंचिक आबादानीसाठीं माधवराव जे परिश्रम घेत असत, ते सारे स्वार्थावर आधारलेले असत, हें रमाबाईनीं पांच एक वर्षांत संपूर्ण-तेनें ओळखून ठेवलें होतें.

स्वार्थ हा जीवमात्र अस्तित्वाशींच एकरूप आहे, हें तर जीवसृष्टि निर्माण करणारा देवच बोलून चुकला आहे—ठरवून बसला आहे ! परंतु, त्या जन्मजात स्वार्थाला, कांहीं स्थळीं, कोण्या काळीं, प्रसंगानुरूप दुय्यम दर्जा देऊन, प्रीतिवस्तूला प्राणांहून प्राधान्य देण्यानेंच 'माणुसकी' शाबीत होत असतें, हेंही तत्त्व त्या देवानेंच मानवी समाजासाठीं आंखून दिलेलें आहे. अहर्निश परमेश्वररूप प्रेमाची पूजाअर्चा करण्यांत तल्लीन असणाऱ्याला प्रपंचांत जो धन्यतेचा आनंद लाभतो, त्यांतच आत्मानंदाचें बीज असतें, हें जरी खरें, तरी त्या आत्मानंदावर दृष्टि ठेवून राहिलें, तर त्या बीजाची धारणा करण्याची शक्ति प्रापंचिक क्षेत्रांत कधींच निर्माण होत नाहीं, हेंही तितकेंच सत्य आहे. निःस्वार्थ बुद्धीनें संपादिलेल्या आत्मानंदाच्या उन्मादी लहरीवर मनसोक्त विहारतांना, महिरलेल्या मेंदूला दिक्कालाची मर्यादा दिसत नाहींत, जाण-वत नाहींत. ' मी ' आणि ' तूं ' यांतील अंतर घासूनपुसून टाकून, पतिपत्नींच्या एकजीवी जीवनांत तल्लीन होऊन उपभोगिलेलें सुख, तेंच खरें प्रेमसुख, तेंच खऱ्या संसाराचें सार !

तसें, सारसर्वस्वानें समृद्ध असलेलें सांसारिक जीवन जर रमाबाईच्या नशीबीं असतें, तर पतीच्या प्रत्येक कृतीचें ' काय ? ' ' कसें ? ' करण्याची वृत्ति त्यांच्या ठिकाणीं निर्माण झालीच नसती. परंतु, प्रपंचाच्या प्रारंभघटकेपासूनच माधवरावांनीं पति आणि पत्नि, या द्वैताची भक्ति चालूं केली असल्यानें, त्या उभयतांच्या हृदयांत नेहमीं अवकाश राहिलाच. त्यामुळें त्या अवकाशांत अलगपणें रमाबाईच्या हृदयाचें स्पंदन होऊं लागलें होतें. त्या स्पंदनाच्या धक्क्यांनीं त्यांची मूळची तीव्र बुद्धि दिवसें दिवस खडबडून जागी होऊं लागली, जागी राहूं लागली. उभयतांच्या हृदयांतील अवकाशांत खडी राहून, रमाबाईची बुद्धि माधवरावांच्या हृदयाच्या चलनवलनांवर जागत्या डोळ्यांनीं पहारा करूं लागली. त्या पहारेकऱ्यानेंच रमाबाईना त्यांच्या प्रापंचिक आयुष्याच्या खऱ्या रूपरेखा दाखवून दिल्या. केवळ आपल्या बाजूनेंच तेव्हढें निरपेक्षपणें आत्मार्पण होत असून, पतीची बाजू स्वार्थाच्या बुरजाआडून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गोळया झाडीत आहे, हें हलकें हलकें रमाबाईंना कळून येत होतें. पुढें तर त्यांची त्याअन्वये पदोपदीं खात्रीच पटूं लागली.

स्त्री–हृदयाच्या प्रेमाला अपूर्णांकाचें गणित करतांच येत नाहीं. त्याच्या व्यवहारी गणिताचें उत्तर एक ‘ शून्य ’ तरी येतें, नाहीं तर पूर्णतेनें ‘ एकच एक ’ असें तरी निघतें. ज्या पुरुष–प्रकृतीला तें प्रेम स्वतःला संपूर्णतेनें वाहून घेतें, त्या प्रकृतीकडून प्रतारणा अगर हेळसांड यांचा मोबदला मिळाला, तरी ‘ जशास तसें ’, या व्यापारी व्यवहारसूत्राचा आधार घेण्याचें त्यास सुचतही नाहीं.

लग्न होऊन वर्ष उलटलें असेल नसेल, तेव्हढ्यांतच रमाबाईंनीं आपल्या मनाचीं गोड रहस्यें आपल्या विश्वास–कोषांत ठेऊन टाकलीं होतीं—म्हणजे सारें कांहीं माधवरावांना सांगून टाकलें होतें. परंतु, उलटपक्षीं, माधवरावांच्या हृदयकपाटाला अनेक लहान मोठे कप्पे असून, त्यांतील फारच थोडे कप्पे त्यांनीं आपल्याकरितां उघडे केले आहेत, कांहींचा आंतरभाग अर्धवटसा आपल्याला दाखविण्यांत आला आहे व कांहीं, सरकारी खजिन्याप्रमाणें, कडेकोटाच्या बंदोबस्तांत आहेत, असें जेव्हां, रमाबाईंच्या अनुभवाला वेळोवेळीं येऊं लागलें, तेव्हां ‘ थोडक्यांत सारें ’ सांगावयाचें, तर तसल्या प्रतारणेच्या लपंडावी संसारांत काळ कंठण्यापेक्षां, काळ्याच कंठाला मिठी मारावी, असें त्यांना वाटूं लागलें. विश्वास पटविण्याजोगें आपल्या पतीचें आपल्याशीं वर्तन असलें, तरी तें सत्याचरण नसून, तो सत्याचा आविर्भाव आहे, असा ‘ लौकिकपर्यायीं ’ रमाबाईंना जबरदस्त संशय येऊं लागला. आणि लौकरच, अनुभवानें त्या संशयाला खात्रीचें रंगरूप प्राप्त करून दिलें.

आपलें वैवाहिक आयुष्य, म्हणजे संसार–नाटकांतील एका श्रीमंती घराचा नुसता देखावाच आहे, हें रमाबाईंच्या लक्षांत यावयास दीड दोन वर्षांहूनं अधिक काळाची जरूरी लागली नव्हती. माधवरावांची भाषा जेव्हां प्रेमाच्या प्रांतांत विहार करावयास निघे, तेव्हां तिच्या लालित्यांत जिव्हाळ्याची हौस प्रगट होण्याऐवजीं, शब्दांचें लाघवच अधिक दिसून येत असे. त्यामुळें, अर्थातच, ‘ काय हें आपलें आयुष्य ? ’ हा प्रश्न रमाबाईंना एकसारखा सतावूं लागला. ‘ विवाह म्हणजें शारीरिक सुखाचा परवाना, इतकीच त्या पवित्र संस्काराची व्याख्या आहे काय ? ’ असें वारंवार रमाबाईंच्या मनांत आपोआपच येत असे. ‘ दुसऱ्यांच्या संसाराची काय व्यवस्था असेल ती असो, आपल्या घरीं तरी निदान, पतीच्या बाहेरख्याली अनिर्बंध वर्तनामुळें, विवाहाची तीच एक हिणकस जातीची व्याख्या ठरूनच गेल्यासारखी आहे !’ असेंहि त्यांचें मन त्यांना वरचेवर बजाबजावून सांगत असे. रमाबाईंच्या प्रेमविश्वांत अविश्वासाचें भूत प्रलयाग्नीची चुडी घेऊन एकदां जें शिरलें, तें तेथें कायमच्या मुक्कामासच राहिलें ! तें घरांत केवळ वस्ति करूनच राहिलें नाहीं. दिवसें दिवस, निसर्गनियमांना बाध येऊं नये म्हणूनच कीं काय, तें अधिकाधिक हिडिस रंगरूप जमवूं लागलें. त्याचा दांडगावा एकसारखा वाढत्या प्रमाणांत चालूं राहिला. त्याच्या तांडवी वर्तनांतील प्रत्येक पावलाच्या झटक्यागणिक रमाबाईंच्या जातिकोमल अंतःकरणाला नवी नवी आणि खोल खोल जखम होऊं लागली. त्या जखमांचें दुःख हुंकाहुंकाऱ्यानें, मुद्राविर्भावानें, अश्रुपातानें, अथवा चुकल्यामाकल्यानें सुस्काऱ्यानेंही इतरेजनांच्या नजरेला येऊं नये, याची ती माऊली सदोदित खबरदारी घेत असे. तशा तऱ्हेनें दुखावून दुर्बल झालेल्या हृदयानें संसाराच्या स्मशानांत वावरत असतां, हंसतमुखानें संसार-देवाची आराधना करण्यांत स्वतःची धन्यता मानणाऱ्या दूधखुळ्या पतिव्रता, आजही आपल्या समाजांत हजारांच्या संख्यांनीं मोजून संपण्याजोग्या नाहींत. उलटपक्षीं, ‘ घराच्या नाटकी देखाव्यांत प्रेमाचें सोंग करणारा मी नव्हे ’ असें प्रामाणिकपणें सांगणारे नरवीर आमच्यांत शेंकडा काय प्रमाणांत सांपडतील ? बाकी, या प्रश्नाचें खरेंखुरें उत्तर मिळेलच, अशी अपेक्षा धरणेंच मूर्खपणाचें आहे. जेथें प्रामाणिकपणाला परमेश्वराइतकें पवित्र मानावयास पाहिजे, तेथें त्याचा पुरता खेळखंडोबा झालेला असणार; मग त्याच्याबद्दलच, त्याचाच आधार घेऊन, कोण कसें बोलूं शकणार ? पूर्वींच्या पिढ्यांतून सांसारिक प्रामाणिकपणाचें प्रमाण खास अधिक तोलामोलाचें आढळून आलें असतें. आतां त्याचा धारा खास उतरला आहे. तो किती खालीं गेला आहे, तें सूक्ष्मपणें व विचक्षणेनें पाहणाराअच दिसून येईल. वरवर पाहणाऱ्याच्या ढोबळ दृष्टीला चकविण्याइतकी झकूपकू जिल्हई, आम्हीं–आधुनिक पुरुषांनीं आमच्या सांसारिक वर्तनाला खास दिली आहे ! ‘ बायकांना फसवायला काय मोठी अक्कल लागते ! ’ असले कुचेष्टेचे उद्गार, आधुनिक पंडितांच्या तोंड्यांतूनच फार ऐकूं येत असतात.

[५]

आपल्या दुहेरी आयुष्याचा आपल्या पत्नीला वासगंधही नाहीं, या कल्पनेंत [राव] राव मात्र पुष्कळच दिवस गुंग होते. त्यांची मनोरचनाच कांहीं वि[प]रीतीची बनून गेली होती. एकीकडे आपल्या वर्तनानें रमाबाईंना दुःख नये असें त्यांना वाटें, तर दुसरीकडे, आपलें घराबाहेरचें वर्तन अक्षम्य असें त्याच्या मनांत चुकूनही येत नसे ! अशा परस्पर विरोधी वर्तनाला जें होतें, तेंच मोठें विचित्र होतें. रमाबाईंवर आपलें अपरंपार आहे, असें जें त्यांना वाटत असे, तें सात्विक, निर्लोभ, परमे[श्वरी] प्रेम नसून, पत्नीबद्दलच्या वैषयिक वासनेचें तें फसवें रूप होतें. रमाबा[ईंबद्दल] माधवरावांना आदर तर नव्हताच; पत्नीच्या अधिकाराची त्यांना भीति वाटत आपलें वर्तन बाहेरख्यालीपणाचें असलें, तरी घरधनीणीच्या अधिकारांत, हक्कां[त] कांहीं उणेपणा राहूं दिला नाहीं म्हणजे झालें; असें माधवरावांचें पतिपत्निसं[बंधाचें] सरळ शास्त्र होतें. एकटे माधवरावच तसल्या सांप्रदायिक शास्त्रापायीं दोषी होते असें नाहीं. शहाणेसुरते म्हणविणारे मोठमोठे लोकही, आजदेखील माधव[रावांचे] शास्त्रबंधु असलेले आढळून येतात.

पुढें माधवरावांच्या वृत्तींत बेफिकीरपणा येत गेला. बेफिकीरीच्या पोटीं बेस[ावध]पणाचीही निपज झाली. बेसावधपणाच्या पाठीवर हात मारून, बेफामपणानें [...] वर्तनक्षेत्रांत उडी घेतली ! त्याचा परिणाम, म्हणजे उदयाच्या बारशाच्या [...] रमाबाईंना रावजीच्या सुनेची किंकाळी आपल्याच घरांत ऐकावी लागली !

होऊं नये तें झालें, कळूं नये तें बायकोला कळलें, मग आतां झाक[ाझाक] कशाला ? अशी माधवरावांच्या मनानें त्या प्रसंगानंतर कोलांटी घेतली.

ज्यांच्या नामोच्चारानें कुलशीलवतींना नरकाचा किळस वाटूं लागते, अ[से] धुडगूस माधवरावांनीं घरांतच सुरूं केले.

रमाबाईंच्या धांवत्यापळत्या सांवलीनेंही ज्यांचीं पातकें नाहींशीं झालीं [...] अशा अवदसा, राजरोजसपणें, मालकिणीच्या ऐटीनें रमाबाईंच्या घरांत [...] लागल्या !

रमाबाई नुसत्या नांवाच्या, केवळ नात्याच्या कुलस्वामिनी राहिल्या.

परिणाम व्हावयाचा तोच झाला. व्यसनांच्या परिणामीं ज्या आ[...] व्याधींनीं गांठावयाचें, त्यांनींच माधवरावांना पछाडलें. त्या दुर्दैवी दांपत्या[च्या] पोटीं आलेला अंकुर पुरता वर येतो, न येतो, तों, कुकर्माच्या दुर्गंधींत, कु[...] कुजून, रमाकांत—माधव, पत्नि, पुत्र व संपत्ति या सर्वांना सोडून, स्वर्गाच्या वा[टे] लागला ! अखेर काळीं माधवरावांना आपल्या कर्माचा पुरता पश्चात्ताप झा[ला] परंतु, त्या पश्चात्तापाचा परिणाम घडला, तर पुढच्यां जन्मीं, या जन्मीं तर खा[त्री] नाहीं, हें त्यांना पुरतें कळत होतें.

[६]

पतीच्या हयातींतच जर रमाबाईंच्या लेखीं संसारसुखाचें वैराण माळरान होतें, तर वैधव्यदशेंत, जगाच्या बागेंत बहारलेली गार वनश्री त्यांना थो[डीच] दिसून येणार होती ? त्यांची आशा एक उदय !

वैतागलेल्या, निराशेनें रुक्ष बनलेल्या मातेकडून, ममतेची शिकवण मि[ळण्या] ऐवजीं, उदयाला बाळपणापासूनच कडक शिस्तीचें वळण मिळत गेलें. तसें [...] लावण्यांत रमाबाईंचें एकच अंतिम धोरण होतें. ‘वाटेल तें करीन, पण मुलाला त्यो[च्या] बापासारखा कधींही होऊं देणार नाहीं.’ हेंच रमाबाईंचें तें धोरण होतें. शिक्षण-क[ळा] देणारा मातेचा योग्य सहवास माधवरावांना लाभला नव्हता, म्हणून [...] आयुष्याची तशी परवड झाली, अशीही एक रमाबाईंची समजूत होती. त्या [...] तीच्या फेऱ्यांत त्यांची विचारशक्ति सांपडली असतां, देशमुखांच्या कुळीला अ[...] शाप—व त्याची सर्व कुळकथा—त्यांच्या स्मरणांतून अजीबात नाहींशी होत [...] ‘ मी उदयाची आई जिवंत आहें, तों सर्वस्वीं सर्वांगांनीं माझाच मुलगा [...] असंच मी शेवटीं जगाला दाखवून देईन ’ या मनोमय प्रतिज्ञेच्या प्रेरणेनें[च] उदयाशीं फाजील कडकपणानें वागत असत.

उदयाचें आपल्या आईवर निर्भेळ प्रेम होतेंच होतें. आईखेरीज त्याला [...] वास तरी कोणाचा होता ? आईखेरीज त्याला ‘ आपलें ’ असें दुसरें दिसत तरी होतें ? उदयाच्या प्रेमाचा ऐनजिनसीं एकजीवीपणा, तो आईचा ओंचापदर असेतोंच टिकून होता. आईसोंवतीं पिंगा घालत राहण्याच्या क्रीडेचा कंटाळा असो, कीं घराबाहेरच्या मोकळ्या हवेची ताजी नवलाई अधिक आकर्षक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लागली, म्हणून असो, उदय जसजसा मोठा होऊं लागला, तसतसें त्याचें आईचें प्रेम झपाट्यानें कमी होऊं लागलें. रमाबाईच्या नजरेचा दाव जसजसा कमी होऊं लागला, तसतसा 'त्याच्यांतील माधवराव' पुनर्जन्मानें जिवंत होऊं लागला !

उदय म्हणजे माधवरावांची सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्तिच ! असा प्रत्यक्ष थोड्या अवधींत परिणाम घडून आला !

बाहेरच्या हवेंत कान टवकारून हुंडारूं लागल्यापासून, उदय थेट माधवरावां-प्रमाणेंच रमाबाईशीं सर्वस्वीं दुटप्पीपणाचें वर्तन ठेवूं लागला. 'आईपुढें गोगलगाय, अन् तिच्या मागें शेण खाय' असें आपापसांत लोक उदयाचें वर्णन करूं लागले होते.

नशीबानें रमाबाईच्या उरल्या आयुष्याची महत्त्वाकांक्षा पार धुळीला मिळवून टाकली होती. त्या धुळधाणीचा रमाबाईला थांग पत्ताहि नव्हता—त्या वेळेपर्यंत !

उदय उद्यां सज्ञान होणार, या कल्पनेची रमाबाईना जी भीति वाटत होती, ती कां वाटत होती, यांचें कारण मात्र त्या सांगू शकल्या असत्या कीं नाहीं, याची शंकाच आहे.

मनोमन साक्ष पटते आणि होणाऱ्याची आधींच कारणाविना भीति वाटूं लागते, असा एक जुन्या लोकांत समज आहे. रमाबाईच्या बाबतींत मात्र तो समज नसून, त्यांच्या मागें जें जें घडत होतें, तें तें त्यांच्या उदय-प्रिय मनांत निराकारानें उतरत होतें; आणि त्याच्या परिणामीं, त्यांच्या पोटीं उदयाच्या सज्ञानीपणाबद्दल ती भीति भरून गेली होती.

रमाबाईची भीतीच शेवटीं खरी ठरली. ज्या घटकेला आपला उदय सज्ञान झाला, असें त्यांना वाटलें, त्याच घटकेपासून तीनचार तासांच्या आंत, त्यांना सगु-णेची करुण किंकाळी ऐकूं आली ! उदय रमाबाईचा मुलगा नसून, माधवरावांचा पुत्र आहे, अशीच सगुणेच्या किंकाळीनें रमाबाईंच्या कानाशीं भयंकर घोषणा केली !

प्रकरण आठवें.

तारीख एक, जानेवारी—नव्या वर्षाचा पहिला दिवस !

'गेल्या वर्षी नाहीं, तर नाहीं यंदांच्या सालीं तरी साहेबबहादूर आपलें नांव पदवीच्या यादींत दाखल करतील' या आशेनें कारकुनी पेशांत, किंवा नोकरींत गुंतलेला आमच्या सुशिक्षितांचा एक वर्ग, त्या नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशीं, सूर्योदयाबरोबर थोडाबहुत तजेलदार दिसूं लागतो. आशारूपीं फसवी मोहनी, त्या दिवशीं नव्या वर्षाचें कोरें कॅलेंडर त्यांच्या बुभुक्षित नजरेपुढें धरीत असते; किंवा त्या कॅलेंडरनें नोकरींत मेलेल्या त्या लोकांना वारा घालून पुनः कामास लाग-ण्याचा नवा उत्साह ती उत्पन्न करते. त्यानेंही पक्का निराशावादी बनलेल्याला धुग-धुगी आली नाहीं, तर आशा—माऊली आपली अंगुली मुखांत चोखावयास देऊन, त्याला मिटक्या मारावयासही लावते.

रमाबाईच्या बंगल्यांत मात्र, त्या विशिष्ट जानेवारीच्या पहिल्या तारखेस उदास-पणाच खुल्या अंगानें पसरलेला दिसून येत होता. पूर्वापार पद्धति म्हणजे, त्या दिवशीं तो बंगला, त्याची बाग, त्याचें आवार आनंदानें ओथंबून गेलेलें असावयाचें ! कारण, एक जानेवारी हा उदयाचा वाढदिवस होता.

बंगल्याच्या पिछाडीस असलेल्या स्वयंपाक घरांत, एक स्वयंपाकीणबाई, बंग-ल्यांतील वातावरणानेंच जशी कांहीं 'थंड पडलेल्या' शेगडींत कांहीं 'तेज' उत्पन्न होतें का, तें बुरडी पंख्यानें वारा घालून पहात होती. ती बाई म्हणजे, मायावी आशा, तिचा तो बुरडी पंखा म्हणजे, नोकरी पेशांतील लोक कॅलेंडर, असें म्हटलें तरी चालेल.

तिप्पण्णा खटपट्या, कोठीतून स्वयंपाकघरांत आणि तेथून बंगल्याच्या दुसऱ्या कोणत्या तरी भागांत उगीच खेपा करून, आपण खरोखरीच कांहीं महत्त्वाच्या खटपटींत आहों, असें इतर नोकरांना दाखविण्याच्या नादांत गुंतला होता.

आंतरगृहांतील सर्व नोकरांच्या तोंडावर 'आज हें असें कां ?' हा आश्चर्याचा प्रश्न उमटलेला दिसत होता.

बंगल्याच्या मुख्य मुख्य भागांत सगळें गुपचुप्, सारें सामसूम होतें.

"तिप्पण्णा, आज सारं असं थंड थंड कां झालंय् हो ?" स्वयंपाकीणीनें तिप्पण्णा खटपट्यास विचारलें.

"कळतोच नाहीं" तिप्पण्णानें तुटकपणानें उत्तर दिलें.

रावजीनें धारा काढल्या; दुधानें भरलेल्या दोन चरव्या, नित्य नियमाप्रमाणें, त्यानें स्वयंपाकघराच्या दारांत उंबऱ्यापलीकडे ठेवल्या आणि तो म्हणाला: "तिप्पन्ना हे दूद संबाळ. अन् कायर, आज तुला बासुंदी आटवावयाची हाए ना ? आताच सांगशील, तर संग्या गवळ्याकड अजूनबी दूद गवसल. पण चार कासरं दिस वर 'आल्याव् रावजी दूध !' म्हनून ताऱ्या पोरावानी जर का टाळा पसरशील, तर तुला काय देऊं तवा ? संग्याच्या हाडीचीं हाडं ?"

ह्यातान्या रावजीची बडबड तशीच पुढें किती तरी वेळ चालूं राहिली असती. पण तिप्पण्णानें, ती आपत्ती टाळून, मध्येंच तोंड घातलें: "मी तर तुला काय सांगतो रेऽ? बाईसाहेब 'साक्कर कालवून भात कर' म्हणतात, का 'दूध कालवून बासुंदी घाट' असं सांगतात, तें मी काय सांगतों रे रावजी ? त्यांचा बेत काय हाए, काय, की काय की. एक करतात, दोन करतात, का बासुंदींत भात मिळवून एक खीरच करवात, तें मी तरी काय समजतों ? बाईसाहेब उठतील तर, सच्या गोष्टी; होय कीं नाहीं आप्पा ?—"

"अं ? बायसाब आज अजून उटल्यावी न्हाईती ! असं कसं झालं बा !"

"न्हाईच उठला बाईसाहेब"

"पन् त्योका, जरा वकत झाला, तर आपुन नाहीं का सुच्चना द्यायची ?"

"निजला माणूस उटवायचा ? रावजी, काय बोल्तो तूं ! यंकटरमणा गोईंदा ! पापू आप्पा तें !"

"डोंबल आप्पा गोईंदा ! त्योका, सुच्चूना दिली न्हाई, तरच आज बायसाब रागावत्याल बघ. खरं की न्हाई माजं म्हननं, त्ये तुला दिसलच् बघ."

"मग तूंच कर तें पाप; आप्पा !"

"करतो कीं न्हाई तें बगा."

रावजी पुढें आणि तिप्पण्णा मागें, अशी ती जोडी माडीवरील रमा-बाईच्या खोलीपुढें येऊन उभी राहिली.

खोलीचें दार बंद असलेलें पाहून, दोघांनींही एकमेकांकडे आश्चर्यानें बघितलें.

"बाईसाब !" रावजीनें जरा हलक्या आवाजांत हांक दिली.

एक—दोन—तीन—रावजीच्या पांच सात हांका झाल्या, तरी त्याला कांहीं दारांपलीकडून मालकिणीचा हुंकार अगर ओ मिळाली नाहीं.

पुनः त्यांनीं एकमेकांकडे वाढत्या आश्चर्यानें पाहिलें.

"बाईसाब, बाईसाब, बाईसाब," लागोपाठीनें हांका देऊन, दाराची बाहेरची कडी दारावर खडखडावयास रावजीनें सुरवात केली.

आंतून येणाऱ्या उत्तरासाठीं रावजी थोडा थांबला. परंतु उत्तर नाहीं, कीं कांहीं हालचालही त्याला भासली नाहीं ! तेव्हां मात्र रावजी मनांतल्या मनांत चरकला. रावजीचें तोंड थोडेसें उतरलेलें पाहून, आपल्या तोंडावरही कांहीं तरी फरक करणें जरूर, नाहीं तर आपल्या स्वामि-निष्ठेंत उणखी राहील, असें वाटूनच कीं काय, तिप्पण्णाही आपण घाबरून गेलों आहों, असें दाखविण्याच्या प्रयत्नाला लागला.

"आतां काय करावं !" रावजी स्वतःशीं पुटपुटला.

"आतां काय करतोस आप्पा ! सुचतोच नाहीं !" तिप्पण्णानेंही स्वतःशीं पुटपुटल्याप्रमाणें केलें.

पुनः रावजीनें दारावर कडीचा खडखडाट केला.

कर्नाटकांतील पद्धतीप्रमाणें, दरएक दाराला एक एक स्वतंत्र कडी न ठेवतां, दोन दारांना एकच कडी ठेवण्याचा महाराष्ट्रीयांचा कंजूषपणा, तेव्हां तिप्पण्णा चांगलाच जाणवूं लागला. रावजीनें मालकिणीला जागी करण्यासाठीं दारावर कडी वाजवत रहावें आणि आपण त्यानें नुसतें पहात रहावें, हें तिप्पण्णाला सहन होण्याजोगें नव्हतें ! स्वामिनिष्ठेंत व सेवातत्परतेंत, रावजीच्या मानानें आपली नोकरी चौपटीनें असली, तरी आपण मुळींच कमी नाहीं, हें दाखविण्याच्या उद्यो-गाला, तिप्पण्णा मालकाच्या कामाहून नेहमींच जास्त महत्त्व देत असे. बाईसाहेबांच्या दारांना एकच कडी असल्यानें, आपल्या हमेशीच्या प्रतिस्पर्ध्यावर कडी करतां येण्याची संधि त्याला दुर्लभ झाली. त्यापायीं, तिप्पण्णा सऱ्याच मराठी मुलखाला कानडी पुटपुटीनें शिव्या मोजूं लागला !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

" कोण आहे तें ? " झोंपेनें सरदून, दोरवटलेल्या आवाजानें, रमाबाईनीं खोलींतून प्रश्न केला.

मालकिणीचा आवाज ऐकून, रावजीची मुद्रा खुलावली. कित्येक वर्षांच्या तमाखूसेवनाच्या अग्निहोत्रानें काळवंडलेल्या त्याच्या ओंठांवर आपसूकच हंसें अवतरलें. रावजीवर मात करण्याची संधि तिप्पण्णाला मिळाली. रावजीनें नुसतें स्मित केलें, तर आपण मोठ्यानें नुसतें एकदांच खिदळून हंसावें, कीं एक सारखें पोट धरधरून हंसतच रहावें, याचा तिप्पण्णाचें मन ठाम निकाल देईना. बाईसाहेब जाग्या झाल्या होत्या. त्यांना हां हां हूं हूं केलेलें मुळींच खपत नाहीं, याची त्याला जाणीव होती. शिवाय, तो मालकिणीला अतिशय घाबरतही असे; म्हणून खिदळून हंसण्याची युक्ति, त्यानें विचारांतून काढूनच टाकली.

" आय्यो ! देवच कृपाच करतो ! बाईसाएब जिवंत असवात ! जाग्याच होवात ! " रावजीकडे पहात, पसरट तोंड अधिकच पसरून, तिप्पण्णानें उद्गार काढले.

रावजीनें त्याच्याकडे क्षणमात्र रोंखून पाहिलें आणि म्हणाला, " चल्, आचरट न्हाईतर ! "

आलेली संधि कामीं लावून, स्वामिसेवेची तत्परता दाखविण्यासाठीं, जिन्याच्या दोन दोन पाह्यऱ्या ओलांडून, तिप्पण्णा खालीं निघून गेला.

दार उघडून, बाहेरच्या खोलींतील एका आराम खुर्चीवर अंग टाकून रमाबाई पडल्या. आडवा केलेल्या उजव्या हाताच्या कोंपरापुढील भागानें त्यांनीं आपले तोंड व डोळे झांकून घेतले होते.

" बायसाब, आज असं कां ? जिवाला वरं वाटत न्हाई का ? " रावजीनें आदबीनें प्रश्न केला.

रमाबाईनीं त्याला उत्तर दिलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांना रावजीचा प्रश्न जसा कांहीं ऐकूंही आला नाहीं, अशा रीतीनें त्या आराम खुर्चीत स्वस्थच राहिल्या.

गरम पाण्याची तपेली, साबूची चांदीची डबी, तोंड पुसण्याचा स्वच्छ रुमाल, इत्यादि मुखमार्जनाच्या साहित्यासह तिप्पण्णा तेव्हढ्यातच तेथें हजर झाला. आणलेलें सामान मुकाट्यानें त्यानें ठराविक जागीं ठेवलें. आपलें काम करीत असतां, खुर्चीत पडलेल्या आपल्या मालकिणीकडे डोळ्याच्या कोंपऱ्यांतून त्यानेंही एक दोनदां पाहिलें. त्यालाही तो प्रकार नवीनच होता.

तिप्पण्णाच्या ओठांच्या थिरथिऱ्या हालचालीवरून, त्याला आपल्याशीं कांहीं बोलावयाचें आहे, हें रमाबाईनीं ओळखलें. झोंप मोडल्यानंतरच्या विसकटलेल्या विचारांची तोंवर त्यांनीं फारच सफाईनें घडी घातली होती. त्या घडीची कोणती बाजू, किती व कशी लोकांना दिसूं द्यावयाची, हेंही त्यांनीं तेवढ्या अवधींत मनाशीं निश्चित करून टाकलें होतें.

" तिप्पण्णा,—" रमाबाईनीं आपण होऊनच सुरवात केली: " कांहीं विचारायचं आहेसं दिसतंय. "

" मी चहा आणतो काय ? "

" तें रे काय सांगूं मी ? " चेष्टेच्या धोरणानें रमाबाईनीं उत्तर दिलें: " तूं कांहीं मला चहा आणतांना दिसत नाहीं आहेस. "

तिप्पण्णाच्या कानडी बुद्धीला रमाबाईची ती मराठी खोंच उमगलीच नाहीं. शोधक दृष्टीनें रमाबाईकडे तो पहातच राहिला.

" आणखी कांहीं विचारायचं आहेसं दिसतंय तिप्पण्णा. "

" म्हटलें, चहा एकटाच पितो, कीं कसा करतो ! "

त्याच्या चौकशीचा उद्देश चटूदिशीं रमाबाईच्या लक्षांत येईना. तिप्पण्णाची ती घेडगुजरी—नव्हे घेडकानडी शब्दसंपत्ति त्यांच्या पूर्वपरिचयाची असली, तरी कित्येकदां, त्या शब्दांच्या पंगतींतून अर्थाच्या धोरणानें वाट काढणें, त्यांना अत्यंत दुस्तर होत असे. त्या सकाळचा प्रसंग थोडासा त्याचपैकीं होता.

" मी नाहीं समजलें तिप्पण्णा—" हंसऱ्या ओठांनीं रमाबाईनीं त्याला सांगितलें.

" बाईसाएब " तिप्पण्णा पूर्वाश्रमीं शाळामास्तर असल्यानें जड डोक्याच्या एखाद्या विद्यार्थ्याला एखादा धडा समजून देण्याचा आविर्भाव, तो चटकन् आणूं शकला: " मी म्हटलों, तुमी एकच एक चहा पितो, कीं करतो काय ? "

" म्हणजे ? " त्याच्या विचारण्याचा हेतु थोडासा ध्यानांत येऊन रमाबाईनीं प्रश्न केला.

" म्हणजे म्हटला तर, धाकटे धनि, तेही अजून आज उटलों नाहीं, तर लाऊन पडलेच आहे; म्हणून माझा चिंता, कीं मी चहा एकच आण[illegible] तुम्ही दोन पितो ! "

" काय, धनीसाब बी इकत्या वाड्ळ झोंपल्यातच ? आज समद्यांस्नीं [illegible] आळसटल्यावानी झालंय ! ह्यो मी इकत्यांत धन्यास्नी उटवूनश्यानी घेऊन [illegible] असें म्हणून रावजीनें खालची वाट सुधारली.

तिप्पण्णानें पुरविलेल्या माहितीनें रमाबाईच्या डोक्यावर कसला तरी [illegible] आघात झाल्यासारखें झालें. त्यांनीं सावधगिरीनें बसविलेली विचाराची घडी, [illegible] उध्वस्त झाली. त्यांची मुद्रा गंभीर होऊन, त्या गंभीरपणाला संतापाची [illegible] आली.

" तिप्पा, " रुक्ष स्वरांत कठोरपणानें रमाबाई बोलूं लागल्या: " माझ्यापुरताच चहा घेऊन ये. मी आज एकटीच चहा घेणार आहें. तो उठ[illegible] तर म्हणावं, मी त्याला त्याच्या खोलींतच चहा घ्यायला सांगितलं आहे. "

मऊपणानें, गोडव्यानें, आपुलकीच्या ममताळूपणानें, विनंती वाटणारी आज्ञा करून, कामें करून घेणाऱ्या धनीणीनें, कठोरपणानें दिलेला [illegible] ऐकण्याचा तिप्पण्णाचा तो पहिलाच प्रसंग होता. तो बापडा कानडा, त्या [illegible] प्रसंगानें घाबरूनच गेला.

तिप्पण्णा खालीं निघून गेला. रमाबाईनीं आपला मोर्चा मुखमार्जना[illegible] साहित्याकडे वळविला.

पुढच्या नैमित्तिकांच्या सर्व क्रिया, एखाद्या यांत्रिक बाहुलीप्रमाणें [illegible] करीत होत्या.

[२]

डोक्यांत विचारांच्या बाजाराचा कलकलाट चाललेला असूं दे, [illegible] निसटत्यापुसटत्या छटाही दुसऱ्यांना दिसूं द्यावयाच्या नाहींत, [illegible] अभिनयाची कला, किंवा थोरांच्या चरित्रांच्या परिभाषेंत सांगावयाचें [illegible] खोल मुत्सद्दीपणाची वाणी, सामान्य लोकांना साधतच नाहीं. मोठ्यांचें [illegible] आयुष्य, त्यांचें त्यांनाच काढतां येतें. छोटयांच्या सरळ आयुष्यांत, ' जै [illegible] तें जनीं ' असा एकमार्गी व्यवहार असतो. उत्तररात्रीं, अकल्पित प्रसं[illegible] निर्मिलेल्या विचारांच्या तुफानांत, रमाबाईच्या मनाच्या हालअपेष्टा झा[illegible] होत्या; त्यांच्या खाणाखुणा सकाळीं त्यांच्या मुद्रेवर थोड्याबहुत दिस[illegible] होत्या. टॉवेलानें त्या तोंड पुसत असतां, रावजी पुनः त्यांच्या माडींत आ[illegible] कांहींही केलें, तरी धाकटे धनी—आबासाहेब—बिछाना सोडत नाहींत, कीं खोल[illegible] दारही उघडत नाहींत, फारच कटकट केली, तेव्हां आंतूनच ' माझं [illegible] फार दुखतं आहे, कांहीं वेळ मला असाच पडून राहूं दे ' असें त्यांनीं [illegible] सांगितलें, वगैरे आशयाची त्यानें मालकिणीला हकीकत सांगितली. धन्या[illegible] प्रकृतीच्या विकृतीनें त्या जुन्या नोकराला बरीच चिंता वाटूं लागली असावी, [illegible] त्यांच्या एकंदर सांगण्यासवरण्यावरून उघड दिसत होतें.

" बरं बरं, पडूं दे त्याला तसाच लोळत—" रावजीला रमाबाईनीं सांगि[illegible] त्यांच्या बोलींत संतापाची धग असावी, असा रावजीला संशय आला.

मुलाला एखादी शिंक आली, अगर अवेळीं त्यानें जांभई दिली, तर [illegible] होणारी आपली मालकीण, भल्या रामपाऱ्यांतच त्याचें डोकें दुखत असल्याची [illegible] ऐकूनही न ऐकल्यासारखें करते आहे, त्याच्या दुखण्याची चौकशी करण्याचें सो[illegible] त्याच्यावर रागावतेच आहे, हें सारेंच गाढें, आज असें उलट्या बाटेनें कां चा[illegible] आहे, याच्या भोंवऱ्यांत रावजीचें मन गिरगिरूं लागलें.

देशमुखांच्या चाकरींत बाबाजीचीं तगडीं हाडें झिजलीं होतीं; काळ्याचे पां[illegible] झाले होते. घरचा जुना नोकर, म्हणजे घराण्यांतील एखादे वडीलधारें माणूस, [illegible] मानण्याइतका रमाबाईच्या ठिकाणीं खानदानी मोठेपणा होता.

धन्याच्या बाबतींतील यजमानणीचा निर्णय रावजीला मुळींच खपला न[illegible] आपली नापसंती दाखविण्यासाठीं तो म्हणाला: " असं कसं म्हनून भागल ! [illegible] दारालाबिगदाराला नको बर आदींच दखलगिरी द्याया ! "

" तसल्या दगदगीची मुळींच गरज नाहीं " रमाबाईच्या सांगण्यांत धनी[illegible] हुकुमी ताकीद होती.

रावजी धूर्त नोकर होता. तापल्या तव्याला थंड करण्यासाठीं गार [illegible] शिंपावें, तर पाण्याची तात्काळ वाफ होऊन, ती तशीच वाऱ्यांत मिसळून [illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याला पुरतें माहित होतें. धनीणीशीं वाद करण्याची ही वेळ नव्हे, हें झटकन् ऊन, मुकाट्यानें व जड पावलांनीं तो खालीं जावयास निघाला.

" रावजी !" रमाबाईनीं त्याला हटकलें.

तसली कठोर हांक, रावजीनें कित्येक वर्षांत ऐकली नव्हती. धनीणीकडे तोंड विण्यापूर्वींच त्याच्या तोंडांतून 'जी' हा उद्गार आपसूकच बाहेर आला.

" रावजी, आज भल्या सकाळींच उदयाचें डोकें कां ठणकतं आहे ?—" बाईंचा इतका कडक प्रश्न रावजीनें, पूर्वीं कधींच ऐकला नव्हता.

'आपण का डॉक्टर, का वैद्य, कीं ज्योतिषी ? आपल्याला बाईसाहेबांनीं असा कां करावा ?' अशा गोंधळांत पडल्यानें, वेड्यासारखी मुद्रा करून, रावजी किणीच्या तोंडाकडे नुसता पहातच राहिला.

त्याच्या चेहऱ्याकडे पाहतांच आपल्या, प्रश्नाला उत्तर येणें अशक्यच, असें बाईंना खात्रीपूर्वक वाटलें.

" रात्रींबेरात्रीं बेसुमारपणानं जाग्रणं करण्याचा आचरटपणा केला, म्हणजे ळच्या प्रहरीं डोक्याच्या शिरा ठणकतात, बरं का रावजी ?"

मालकिणीच्या पहिल्या प्रश्नांतील खोंच रावजीला उमगली; त्यासरशीं तो एकदम चरून गेला. धाकट्या धन्याला, रात्रीं आपण सामील होऊन, गाण्याला जाण्या-बरबूद करून दिली, तें मालकिणीला कदाचित् कळलें असेल, अशी शंका येऊ-न तो गोंधळून गेला होता. कशी तरी वेळ मारून नेण्याच्या इच्छेनें तो म्हणाला:

तसं बी असल. पन् काय असल त्ये असल, आज यदाळापून, सारी हवाच गडल्यावानी झालीया ! आमची सगनीबी, कांब्रुनांत घुसमटून पडलीया नव्ह —"

" ऑं ?—तिला काय झालंयू ?—" अधीरेपणानं रमाबाईनीं मध्येंच चारलें.

" काय व्हतय, त्ये सांगल, तवा मला कळायच कीं न्हाई ? नुसती मुसमुसतीया ट मारून ! इचार इचार इचारलं, पन तिचं येक न्हाई, कीं दोन न्हाई ! म्यां काळंय, थंडीच्या हवनं कार्टीचं अर्दे डोचूकं ठणकत ल, ह्मनून ती रडत पडली असल. आतां बाईचू हात रिकामा झाला, कीं तिच्या त्यांत आल्ल्याचा रस पिळतों, म्हनजी येईल तिचंबी डोचूकं ठिकानावर."

" अहं, तसा कांहीं आघोरीपणा करूं नकोस अं–पाहूं आपण पुढं काय करायचं —जा तूं आपल्या कामाला. " या वेळीं रमाबाईंच्या बोलण्यांत नेहमींचा मऊपणा ला होता.

[३]

रावजी सहज, ओघानें आली, ह्मणूनच सगूणेची हकीकत सांगत असतां, रमाबाईंच्या मुद्रेवरील कठोरपणा, अचानकपणें खडा लागून छिद्र पडलेल्या ीच्या घागरींतील पाण्याप्रमाणें, झरझरां झिरपूं लागला.

अगदीं धांवत्या, घडपडत्या, पळत्या, पडत्या बालपणापासून रावजीच्या लाडांनींच याच्या अवखळपणाला अवसर सांपडत असे. ती गोष्ट रमाबाईंना कधीं कळली ती, असें नव्हे. आडोशापडोशा -शब्दांनीं रावजीच्या फाजील लाडांना आवाळा घालण्याचा प्रयत्न, वेळीं अवेळीं त्या करीत आल्याच होत्या. खडखडीत ांनीं त्याला बजावण्याचें कारण मात्र, त्यांना त्या दिवसापर्यंत कधींच मिळालें तें. उदयाचे लाड, कोडकौतुक करावयास रावजीखेरीज सततचें असें दुसरें माणूस तरी घरीं कोण होतें ? त्याचा उदयावर नुसता जीव कीं प्राण होता. तें पाईमा रावजीच्या लहान सहान हालचालींत, त्याच्या प्रत्येक कृतींत दिसून त असे; ह्मणून त्या इमानी वृद्ध नोकराला त्याबाबत रोंखून बोलून, रंजीस वयास त्या तितक्याशा तयार नव्हत्या.

परंतु, ता. ३१ डिसेंबरच्या रात्रीं, रावजीच्या लाडांनीं कमाल मर्यादा गांठली, त्यामुळें, त्यापुढें कह्यांतून बाहेर गेलेल्या एकुलत्या एक मुलावर आपला णूच अंमल ठेवावयाचा, असा पहांटेच्या रामपाऱ्यांतच त्यांनीं मनाशीं घट्ट र केला होता. बोलतां बोलतां रावजी सगुणेसंबंधीं बोलून गेल्यानें, त्यांना ल्या त्या निर्धाराची आठवण झाली; तरी पण, त्याची अंमलबजावणी तावडतोब वी, कीं थोड्या कालावधीनें व धीरे धीरे लगाम खेंचत जाऊन करावी, याबद्दलच ल द्यावयास, त्याचें मन तारतम्याच्या घोंटाळ्यांतून बाहेरच पडेना.

सगुणेची हकीकत ऐकून रमाबाईंचा राग निवाला; मन उदास आणि सचिंत झालें. कुलुप लावल्याप्रमाणें त्यांचे तोंड घट्ट मिटलें गेलें, इतकें मात्र खरें.

बिघडलेल्या हवेची आपली 'बात' पचली, म्हणून आपली मालकीण एकदम चूप झाली, अशी रावजीनें आपल्या परीनें स्वतःची समजूत करून घेतली. पहिलें पाऊल पक्कें पडलेसें वाटून, आधल्या रात्रीं, उदय ऊर्फ आबासाहेब चोरून घराबाहेर पडला होता, तसें करण्यास त्यांस आपलीच फूस आणि मदत होती, ही गोष्ट धनी-णीच्या ध्यानांतून निसटून निघाली, या समजुतीनें रावजी आपल्या नातीच्या तब्येतीच्या नादुरुस्तीचें चऱ्हाट अधिक नेटानें वळण्याच्या विचाराला लागला.

" बाईसाब, मग तुमी तरी पोरीला काई वखद देतां का ? आतांच दिलं तर बरं बगा. लई लई रडतीया म्हणून म्हनतों. "

मन दुसरीकडेच भटकत राहिल्यानें, रमाबाईंना रावजीचा प्रश्न ऐकूं आला, तरी उमगला नाहीं. पुनः रावजीनें निराळ्या शब्दांत तोच प्रश्न टाकला. त्या खेपेला मात्र रमाबाई थोड्याशा भानावर आल्यासारख्या झाल्या. रावजीकडे त्यांनीं एकवार रोंखून पाहून घेतलें. त्यांची त्या वेळेची नजर, भेदक व शोधक होती. रावजीच्या मुद्रेवर पडणाऱ्या त्याच्या विचारांच्या छाया पडछायांचीं टिपणें घेण्यास ठींच रमाबाईंच्या नजरेनें तें टिप्पण धरलें होतें. वाटला होता तो फरक रावजीच्या मुद्रे-वर मुळींच न दिसल्यानें, त्यांच्या नजरेची ती भेदी धार हलके हलके बोथटली.

" रावजी !" बळेंच हंसें आणून रमाबाई म्हणाल्या: " कसा बघ येंधळा आहेस तूं ! अन् बेंधळा म्हटलं, म्हणजे तोंड वांकडं करून कपाळावर टोपलीभर आंठ्यांच्या शेवया ओततोस ! अरे, सगणीला काय झालं आहे, तें तर तूं सांगि-तलंच नाहींस. तिला काय झालं आहे, तें मला समजेल, तर ना मी तिला औषध पाणी देणार ?— "

" तिला काय व्हतंय, त्ये मला तरी कुठं सांगतीया पोरटी ! नुसती घुंगट घालून, धुसमसून रडतीया वेवडी ! तवा, माजा आपला अंदाज हाए अर्द-शिशीचा— "

" छेः; असल्या गोष्टींत अंदाजावर भागवून कसं चालेल ? पण रडण्याचं कारण एका शब्दानंही कसं सांगत नाहीं ती पोर ? आश्चर्य आहे बाई ! " अखेरचे शब्द उच्चारतांना रमाबाईनीं पुनः एकदां त्याच भेदक नजरेनें रावजीकडे पाहिलें. परंतु पुनः ही त्यांची निराशाच झाली.

" तसलीच हटवादी हाय ती. " रावजी अगदीं सहजपणानें म्हणाला.

सूक्ष्मपणें रमाबाईनीं समाधानाचा एक निःश्वास सोडला. पहांटेच्या प्रहरीं उद-यानें तिच्यावर आणलेल्या प्रसंगाची सगुणेनें आपल्या आजाला एका शब्दानेंही कल्पना दिली नव्हती, अशी खात्री झाल्यानें, रमाबाईंच्या जिवावरचें डोंगरओझें उतरल्यासारखें झालें होतें. त्यामुळें वाटलेल्या समाधानानेंच, त्यांनीं तो निःश्वास सोलडा होता.

रावजीच्या एका प्राणानें दुसऱ्या प्राणाला प्राणसंकटाहून दुःसह अशा संकटांत लोटलें होतें. तितक्या तीव्रतेचा नसला, तरी तशाच जातीचा एक प्रसंग, वीस एकवीस वर्षांपूर्वीं, त्याच घरांतील उदयाइतक्याच महत्वाच्या माणसानें रावजीवर आणला होता. त्या काळाची आणि त्या प्रसंगाची रमाबाईंना त्या सकाळीं, आठवण होणें क्रमप्राप्तच होतें. पूर्वीच्या प्रसंगाला निमित्त असलेल्या रावजीच्या सुनेनें अकांडतांडव करून, देशमुखघराण्याची अब्रू गांवाच्या वेशीवर टांगली होती. सुनेची शीग आणि पक्षपात सोडून, रावजीनें, त्यावेळीं, देशमुखांच्या घरावरून उडालेलीं कौलें पुनः नीटनेटकीं बसवून, सांवरासावरीची शाकारणी करण्याची आपल्याकडून शक्य तितकी शिकस्त केली होती. रावजीची ती इमानदारी त्याची धनीण आजन्मांत विसरणें शक्य नव्हतें. पुनः रावजीवर अगदीं थेट तसलाच प्रसंग, व तोहि अगदीं उतारवयांत; सदर प्रसंगाचा धक्का आयुष्याच्या उतारावरून कदा-चित् त्याला एकदम मृत्यूच्या खाड्यांत लोटील, अशीहि रमाबाईंना भीति वाटत होती, म्हणूनच त्यांनीं सगुणेला रावजीपुरती अळीमिळी घातली होती. ती त्या मुलीनें पाळली होती, हें कळून आल्यानें त्यांना तिच्याविषयीं किती धन्यता वाटली असेल बरें !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

थोडा विचार करून रमाबाईंनीं रावजीला सांगितलें: " बरं, रावजी, तूं जा, लाग आतां आपल्या कामाला. चहापाणी आटोपलं, कीं मीच तुझ्या घरीं जातें, सगुणेला नीटपणें पाहतें आणि काय तें औषध देतें—आणि कायरे रावजी, तुझीही प्रकृति आतांशा नीटशी दिसत नाहीं ती ? सकाळीं उठतांच तोंडावर असा तेल्या तवंग कां दिसतोय ? रात्रीं काय वापवीप आला होता काय ? "

" तसं काय लई न्हाई जी, थोडं अंग ऊन झालं व्हतं झालं. "

" थोड्याशा तापानं तोंडाची अशी दशा होत नसते बरं का रावजी. आतांशा पाहतें आहे, तूं आपल्या तब्येतीची अश्शी चालढकल चालविली आहेस. तें कांहीं नाहीं, आतां डॉक्टर आले—आज-फार करून येतीलच ते—कीं त्यांना सांगून, मला एकदां तुझी नीट तपासणी करून घेतली पाहिजे—बरं लाग तर थोडासा कामाला—पण नकोच, शिदू माळी आला असला, तर त्याला दे माझ्याकडं धाडून—"

" अन् सगणीलावीं धाडूं का ?—"

" सांगितलं ना, मीच तिकडं जाईन म्हणून ?"

" असलं कसलं बाइसाब तुमचं मुलकायेगळच वागनं ? त्या पोरटीपायीं आपुन तिकडं इकल्या लांब जानार ? रडत, बसत, सगणीच येइंल कीं आपल्याकडं !"

" हें पहा रावजी, तें कसं काय करायचं, तें माझं मला सारं समजतंय बरं का. तूं आतां मुकाट्यानें खालीं जाऊन, तिप्पणाकडनं आधीं चहा घे पाहूं. अन् ह्या घे चार गोळ्या, ह्या तोंडांत टाकून, वर चहा पी."

" त्ये होईल कायबी, पन् आपुन सगणीकडं जायचं न्हाई—माज्या गळ्याची—"

" हं चूप ! " रमाबाईंनीं रावजीला खटकावलें. पण लगेच त्या मायेच्या मऊपणानें म्हणाल्या: " असल्या बाबतींत तुझं न् माझं पूर्वीं कधीं पटलं नाहीं, पुढंहि पटणार नाहीं. अरे, मुलं तिकडीं सगळ्यांचीं सारखींच. त्यांना काय लहान-मोठं, श्रीमंत-गरीब असतं का ? शहाणे शहाणे म्हणवणाऱ्या, वयानें वाढलेल्या, आमच्यासारख्या अक्कलवंतांनीं आपल्या आढ्यतेसाठीं ते फरक तयार केले आणि आमच्या तुमच्या मनांत त्यांची पेरणी नी जोपासणी केली. तें नाहीं तुला कळायचं; अन तो कांहीं तुझा दोषहि नव्हे. जा तूं आपला चहा घ्यायला. जशा माझा उदय, तशीच मला सगणी आहे. मी तुझं कांहीं एक ऐकणार नाहीं त्या बाबतींत—समजलं ?"

मालकिणीच्या अखेर घोषणेनें रावजीचा कंठ दाटून आला. कृतज्ञतेनें त्यानें एकदां रमाबाईकडे पटकन पाहिलें, एकदम त्यांच्याकडे पाठ वळविली आणि तो जिन्याच्या वाटेला लागला. एकाएकीं डोळ्यांच्या कांठावर उभे राहिलेले अश्रू जातां जातां त्यानें आपल्या सद्र्याच्या बाहीमें टिपले.

स्वतःच्या प्राणांहून, प्राणाहूनही श्रेष्ठ अशा अब्रूपेक्षांही धन्याच्या हिताला व इभ्रतीला जपणारे इमानी नोकर आणि जुना इमानी नोकर, म्हणजे आपल्या कुटुंबाचाच एक घटक, असें समजून त्याच्याशीं त्या इतमामानें वागणारे मालक, आतां नमुन्यासाठीं तरी दाखवयास मिळतील कीं नाहीं, याची शंकाच आहे. धनीमालकांच्या परस्पर कृतज्ञेचीं उदाहरणें, पूर्वीं आपल्यांत घरोघर आढळत असत. आतां ते ' भावबंधना ' चे ' गोफ ' अति म्हणजे अति दुर्मिळ, कमालीचे महाग, म्हणून किंमतीचे व कौतुकाचे झाले आहेत !

रावजी खालीं गेला, दिसेनासाही झाला, तरी, तो उभा असलेल्या जागेकडे बराच वेळ रमाबाई एकटकीनें पहात राहिल्या होत्या. त्यांचे डोळे त्या पाहण्यानेंच कीं काय, ओलसर झाले होते. तो ओलसरपणा पदराच्या टोंकानें कोरडा करतां करतां त्या पुटपुटल्या: " माझ्या बजावणीप्रमाणं, माझी सगणी अगदीं ओठांना कुलुप लाऊन बसली आहे ! पण मामंजींच्या जागीं असल्यासारखा वाटणाऱ्या या—या रावजीला पहाटें काय झालं, तें कसं सांगूं ? कोणत्या तोंडानं सांगूं ? अन् मीं त्याला सांगितलंच नाहीं तर ? पण त्याला तें दुसरीकडून कळलं, तर तो मला काय म्हणेल ?"

रमाबाई भयंकर घोंटाळ्यांत पडल्या !

—

शक्तिदायक

व

सर्वांगीण शारीरिक उन्नतीसा

घेण्यास सुरुवात करा.

त्यायोगें भूक वाढते.... अशक्तपणा पार दूर पळतो.... अंगीं तरत व हुशारी येते. चवीस गोड स्वादिष्ट.

सर्वत्र मिळतो.

१ बाटली किंमत १। रु. ३ बाटल्या ३। रुपये
१ डझन बाटल्या १२ रु. व वर एक बाटली मोफत.

द्राक्षार्कमधु ऑफिस, निपाणी. बेळगांव.

मुंबई एजंटः—महासुखलाल चिमणलाल आणि
केमिस्ट आणि ड्रगिस्ट्स्
प्रिन्सेस स्ट्रीट. मुंबई नं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Ma

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केलं तुला न् झालं मला

ले.—श्री. ल. ब. भोपटकर, एम्. ए., एलएल् बी.

"वादीच्या दुकानीं तुम्ही खातं ठेवलं होतं ना?"

" होय. "

" बरं, हा प्रतिवादी नं. १ तुमचा कोण ? "

" माझा मेव्हणा. "

" मेव्हणा म्हणजे, कसा मेव्हणा ? म्हणजे बायकोचा भाऊ कीं बहिणीचा नवरा ? "

" बायकोचा भाऊ. "

" बरं, तुमच्या खात्यांत तुमच्या मेव्हण्याला माल देण्यास वादीला तुम्हीं सांगितलं होतं का ? "

" होय. "

" व्याज काय ठरलं होतं ? "

" दरमहा दर शेंकडा बारा आणे. "

" या दाव्यांत वादीनं जी बाकी काढली आहे, ती बरोबर आहे काय ! "

" ती मी काय सांगू ? पण ती बरोबर असावी. वादी हा सचा व्यापारी असल्याची त्याची ख्याति आहे. "

" मग आतां तुमची तक्रार तरी काय ? "

" तक्रार अशी, कीं वादीचा माझ्यावर हुकुमनामा होऊं नये. पाहिजे तर त्यानं तो माझ्या मेव्हण्यावर करून घ्यावा. त्यानं पैसे उधळले, त्याचा भूर्दंड मला कां ? "

" पण तुम्ही तशी पाहिल्यापासूनच खबरदारी कां घेतली नाहींत ? आतां तुमची ही तक्रार कोर्टांत टिकणार तरी कशी ? "

" म्हणून तर मी तुमचं नांव ऐकून तुमच्याकडे आलों आहे. कसंहि करा अन् मला यांतून वांचवा. "

" तें सगळं खरं, पण हें जमावं कसं ?"

* * *

सुमारें बारा तेरा वर्षांपूर्वी मी व माझा एक पक्षकार यांच्यामध्यें वरीलप्रमाणें संभाषण झालें. दावा साधाच व बिन भानगडीचा होता. पुण्याच्या स्मॉल कॉज कोर्टांत वादीनें माझा पक्षकार व त्याचा मेव्हणा यांच्यावर तो आणलेला होता. दाव्याची रक्कम सुमारें सहाशे रुपये होती.

माझा पक्षकार कोणी अडाणी मनुष्य नसून एक सरकारी नोकर होता ! त्याच्या एकंदर रंगरूपावरून त्याला दीडदोनशें रुपये तरी पगार मिळत असल्याचें दिसत होतें !

वरील संभाषण झाल्यावर मीं पुन्हां एकदां वादीची फिर्याद लक्षपूर्वक वाचून पाहिली. हेतु असा कीं फिर्यादीच्या रचनेंत अगर दुसऱ्या बाबतींत एखादें वैगुण्य असतें कीं काय ? त्याचा फायदा घेऊन फिर्यादीच्या मूळावरच घाव घालावा, व पक्षकाराची सोडवणूक करून घ्यावी. परंतु फिर्यादींत कोणताच दोष मला आढळून आला नाहीं. स्मॉल कॉज कोर्टांतील त्या साध्यासुध्या, नेहमींच्या साच्यांतील फिर्यादींत असा दोष तरी असणार काय ? अन् खूप फिर्याद उलथी पालथी केली, तरी असें काय मोठेसें चुकलेलें तींत आढळून येणार कीं त्यामुळें वादीचा दावा रद्दच व्हावा ?

तेव्हां मी आपल्या पक्षकाराला विचारलें: " हें पहा, कांहीं आपसांत मिटलं तर प्रयत्न करून पाहूं का ? "

हा माझा प्रश्न ऐकून माझा पक्षकार तर कावराबावराच झाला ! क्षणार्धांत त्याच्या चेहेऱ्यावर राग, निराशा, शरम इत्यादि भावनांच्या छटा झटझट् उमटून नाहींशा झाल्या !

तो म्हणालाः " वकीलसाहेब, माझ्यावर सबंध रकमेचा हुकुमनामा झाला तरी बेहेत्तर, पण मेहेरबानी करून वादीशीं तडजोड करण्याची भाषा मात्र बोलूं नका. कालच संध्याकाळीं त्याची न् माझी खूप बाचाबाची झाली, अन् त्याच्याशीं तडजोड ? छत् नांव देखील काढूं नका. हुकूमनामा झाला. तर अंगाला राख फांसून कुठं तरी काळं करीन; पण त्या हरामखोराला एक कपर्दिकाहि देणार नाहीं. "

मी—" अहो, अशी डोक्यांत राख काय घालतां ? मीं आपलं सहज विचारलं, कीं आपसांत तडजोड झाली तर पाहूं का ? तुम्हांला जर ती नको असेल तर माझा कुठं आग्रह आहे ? "

* * *

एखादा मनुष्य, मग तो एरवीं कितीहि शहाणासुर्ता असो, वादी अगर प्रतिवादी म्हणून कां एकदां कोर्टांत आला म्हणजे बहुधा तो घरीं डोकें विसरून येतो, असा आम्हां वकिलांचा अनुभव आहे. अंगांत आल्याप्रमाणें कांहीं पक्षकारांच्या अंगांत दावा संचारून ते घुमूं लागतात ! वकिलांचें धोरण असें असतें, कीं आपल्या हातून पक्षकाराचा कांहीं तरी फायदा व्हावा; परंतु पक्षकाराच्या अंगांत एक विचित्र अभिनिवेशच उत्पन्न झालेला असतो ! त्याला वाटत असतें, कीं आपली बाजू कितीहि लंगडी असली, तरी आपल्या वकिलानें कायद्याची लटपट करून, नाहीं तर दुसरीच एखादी हिकमत लढवून, ती सांवरून धरावी व उलट पक्षकारांची चांगलीच फजिती उडवून द्यावी ! त्याला आपलें असें वाटतें कीं कोर्टांत जर खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें व्हावयाचें नाहीं, तर मग तें व्हावयाचें तरी कोठें !

पक्षकाराच्या मनाची अशी सर्वसाधारण भूमिका असल्यामुळें वकील लोक सहसा आपण होऊन पक्षकाराजवळ तडजोडीची भाषा काढीतच नाहींत व नवीन वकिलानें तर विशेषच सावध राहूं असावें ! नवीन वकील आणि तडजोडीची भाषा ही दुक्कल पक्षकारानें पाहिली, कीं " घरचें वकिलानें जेथें हातपाय गाळलें, तो कोर्टांत जाऊन तरी काय रडणार ? " असा विचार पक्षकाराच्या मनांत आल्यावांचून रहात नाहीं ! व हा विचार नवीन वकिलाला तरी आपल्या धंद्याच्या दृष्टीनें फार घातुक असतो व ठरतो ! मुरलेले व नांवाजलेले वकील सुद्धां असली भाषा न काढण्याबद्दल जपूनच असतात ! परंतु कधीं कधीं त्यांनीं ती आपण होऊन काढलीच, तर तिची बाधा त्यांच्या धंद्यास अगर लौकिकास तितकीशी होत नाहीं, इतकेंच काय तें !

* * *

दाव्याची हकीगत अशी कीं माझ्या पक्षकाराला मूलबाळ नसल्यामुळें व पुढें तें होईलसें त्याची आशा सुटल्यामुळें त्यानें आपल्या बायकोचा भाऊ जवळ आणून ठेविला. त्याला थोडेंबहुत शिक्षण दिल्यावर तो रंकेला लागावा म्हणून त्यानें त्यास कापडाचें दुकान घालून दिलें. त्या स:ठीं त्यानें वादीच्या दुकानीं खातें ठेवून त्यांत मेव्हण्यास लागेल तो कापडमाल देण्यास सांगितलें.

दुकान सुरू झाल्यावर दोन-तीन महिने तो मेव्हणा व्यवस्थितपणें व्यवहार करीत होता. पण पुढें तो छंदीफंदी बनला! याचा परिणाम असा होत गेला, कीं दुकानचा दररोजचा गल्ला व्यसनासाठीं खर्चे होऊं लागल्यामुळें वादीची बाकी थकत गेली, व शेवटीं त्यानें दोघांवरहि तिजबद्दल वरील दावा लाविला !

माझ्या पक्षकाराचें म्हणणें असें, कीं मेव्हण्यानें व्यसनापायीं जर पैसे उधळले, तर ते त्यानें कां द्यावेत ? ते वादीनेंच सोसावयास पाहिजेत; फार तर त्यानें त्या मेव्हण्यावर हुकूमनामा करून घ्यावा. तो फिटला. तर उत्तमच. नाहीं तर तो त्यानें वाटला तर खुशाल कोळून प्यावा ! त्याची तोशीस आपल्यास काय म्हणून लागावी ?

अर्थात् माझ्या पक्षकाराची ही विचारसरणी उरफाटी असल्यामुळें ती मला मुळींच पसंत पडली नाहीं, व कोणालाहि पटण्यासारखी नव्हती ! मेव्हण्याच्या व्यसनाची झळ जर त्याला नको होती, तर ती विन्हाईत वादीला तरी कां लागावी ? हा साधा व सरळ विचार त्याला सुचला नाहीं म्हणा, किंवा सुचला असला, तरी रुचला नाहीं म्हणा; परंतु हा विचार त्याच्या मनांत बराच खोलवर मूळ धरून बसलेला त्याच्या बोलण्याचालण्यावरून स्पष्ट दिसत होता !

* * *

नेमिलेल्या तारखेस मीं कोर्टांत कैफियत गुदरली. कैफियत जरी राणा भीमदेवी थाटाची होती, तरी तींत कांहीं विशेषसा राम नव्हता ! परंतु माझा पक्षकार मात्र ती वाचून अतिशय खूष झाला. मी मात्र खूप समजून होतों कीं ही राणा भीमदेवी एका बाजूला राहून, शेवटीं माझ्या पक्षकारावर वादीचा हुकूमनामा झाल्यावांचून मात्र खास राहणार नाहीं.

पक्षकाराचा मेव्हणा कोर्टांत हजर राहिला नाहीं अगर त्यानें कैफियतहि दाखल केली नाहीं. बरोबरच आहे, दोन दिडक्या जवळ असणारालाच दाव्याबिव्याची पर्वा; ज्याच्या खांका वर, त्याला त्याची काय विशाद ?

* * *

पुराव्याच्या तारखेस दावा कोर्टापुढें सुनावणीस निघाला असतां मीं खूप धिंगाणा उडवून दिला. न्यायधीशानें मनांत चटकन् ओळखलें, कीं माझ्या तक्रारी शुष्क असल्या पाहिजेत, नाहीं तर मला एवढ्या शिरा ताणण्याची गरज ती काय ?

दोन्ही पक्षांचा साक्षीपुरावा झाल्यावर न्यायाधीशानें पहिल्या प्रतिवादीवर सबंध हुकूमनामा केला. माझ्या पक्षकाराच्या बाबतींत थोडीशी व्याजाची रक्कम कमी करून दरमहा रुपये चाळीस प्रमाणें हप्तेबंदीचा हुकूमनामा केला. तो ऐकून माझ्या पक्षकाराची जी मनःस्थिति झाली, तिचें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्णन मीं करण्याऐवजीं तिची कल्पना वाचकांनींच आपल्या मनाशीं करावी !

*   *   *

सुमारें तीनचार दिवसांनीं माझा पक्षकार, त्याची बायको आणि तिसरा एक इसम असे तिघे जण माझ्या ऑफिसांत आले. त्यांना पाहून मी मनांत चरकलों. वाटलें, कीं आतां यांनीं नवीन भानगड काय आणली आहे ? पुराव्याच्या दिवशीं मी जी आपल्याकडून कसोशी केली तिजबद्दल त्या तिघांनीं आपला आनंद व्यक्त केला, तेव्हां मला संतोष वाटला.

नंतर तिसऱ्या इसमानें भाषणास सुरुवात करून मला विचारलें: “ वकील-साहेब, हुकूमनामा तर होऊन गेला, तो बुडविण्याला कांहीं युक्ति आहे का ?”

हा प्रश्न ऐकून मी तर चपापून गेलों, व मनांत उमगलों, कीं तो पक्षकार एकाद्या दुर्दैवाच्या फेऱ्यांत अडकण्याच्या बेतांत आहे, तेव्हां त्याला त्यापासून परावृत्त करण्याबद्दल आपण आपली शिकस्त करावी. मग तो आहे आणि त्याचें नशीब आहे !

वरील प्रश्न विचारणाऱ्या त्या इसमाला मींच विचारलें: “ मला अगोदर सांगा, कीं तुम्ही यांचे कोण ? तुमचं नावं गोतं काय ? कां कोणी स्नेही–सोबती आहांत ?”

या प्रश्नाला उत्तर माझ्या पक्षकाराच्या पत्नीनें दिलें: “ याचं अन् आमचं तसं नातं–गोतं कांहीं नाहीं. ते अन् आम्ही एका जातीचेहि नाहींत, हे माझे मानलेले भाऊ आहेत.”

“ असं का ? बरं तर, तुम्हाला काय काय पाहिजे तें अगदीं स्पष्टपणानं मला विचारा !”

“ त्या मारवाड्याला एक छदामहि देण्याची आमची बिलकुल इच्छा नाहीं. तेव्हां तशी जर कांहीं युक्ति असेल, तर सांगा. ”

“ याला उपाय एकच, व तो म्हणजे हायकोर्टांत तपासणी अर्ज करणें. परंतु तो करण्यांत मला तरी कांहीं अर्थ दिसत नाहीं. खर्चांपरी खर्च होईल, आणि लभ्यांश कांहींच होणार नाहीं. होऊं नये, पण आतां हुकूमनामा झाला आहे खरा. कोर्टानं हप्तेबंदीही दिलेली आहे. तेव्हां गांठचे पैसे गळून पडले असं समजून हुकूमनाम्याची फेड करा, अन् मोकळे होऊन जा कसे. नसत्या वेड्या फंदांत पडूं नका. ”

माझ्या पक्षकाराची पत्नी एक जहांबाज स्त्री होती कीं नाहीं हें कांहीं मला निश्चित सांगतां येत नाहीं. परंतु या एकंदर प्रकरणांत त्या दिवशीं व पुढें तिनें जो भाग

“ हे माझे मानलेले भाऊ आहेत. ”

घेतला त्यावरून तिच्या मुठींत तिचा नवरा असावा अशी मात्र माझी खात्री झाली.

ती म्हणाली: “ परवांच आम्ही–वकिलांकडे गेलों होतों व त्यांना सल्ला विचारला, तेव्हां त्यांनीं आम्हांस सांगितलं, कीं सारी इष्टेट दुसऱ्याच्या नांवानं करून कफ्लक बना, म्हणजे वादी तुमच्याजवळून घेणार तरी काय ? तेव्हां हा सल्ला तुम्हांस कसा काय वाटतो ? ”

“ अहो, तुम्ही म्हणतां ते वकील नाहींत, तर एक बगळे वकील आहेत. काय, तुम्हांला वेडबिड तर लागलं नाहीं ना ? असा हुकूमनामा तो काय झाला आहे ? सारा पांचशें–साडेपांचशेंचाच ना ? मग तो बुडविण्यासाठीं तुम्हीं आपलं घरदार धुवून दुसऱ्याच्या घरांत भरणार ? अन् या तुमच्या यजमानांच्या पगारावर मारवाड्यानं टांच मारली, तर काय करणार ? कां नोकरीहि सोडून देणार आहांत ? अन् असा इतका तुमच्यां विश्वासाचा माणूस तरी कोण, कीं आपल्या घरांत चालत आलेली तुमची इस्टेट तो फिरून तुमच्या हवालीं बिनधोक करील ? तेव्हां असं वेड्यासारखं कांहीं तरी करून बसूं नका, नाहीं तर मागाहून पस्तावाल. ”

याच अर्थाचे आणखी कांहीं बोलणें झाल्यावर ते तिघे जण निघून गेले. त्यांच्या एकंदर आविर्भावावरून इतकें स्पष्ट दिसत होतें, कीं त्यांची माझ्यासंबंधानें पूर्ण निराशा झालेली असावी; व वकील म्हणून माझ्यांत कांहींच दम नाहीं, असा त्यांनीं आपला कयास केलेला असावा ! झालेला हुकूमनामा बुडविण्याची करामत ज्याच्याजवळ नाहीं, तो वकील कसला ? अशीहि त्यांची समजूत असावी.

*   *   *

वरील संभाषण होऊन सुमारें दीड एक महिना झालेला असावा. सहज माझ्या कामासाठीं मी कोर्टांत गेलों असतांना तो माझा पक्षकार [illegible] पिंजऱ्यांत उभा असून त्याची जबानी चाललेली होती. [illegible] जिज्ञासेनें तेथेंच बसलों. जबा[illegible] अर्थाची झाली, कीं त्या माझ्या [illegible] आपलें घर, सामानसुमान व [illegible] अशी आपली सर्व मिळकत त्या [illegible] भावाला खरेदी दिलेली असून [illegible] मोबदला त्याला मिळालेला आ[illegible] स्थिति अशी होती, कीं त्या मा[illegible] बुडविण्याच्या इराद्यानें तें एक [illegible] खरेदी–खत करण्यांत आलेलें हो[illegible] तसें नाहीं, तर त्याचा सर्व भरणा [illegible]राला पावलेला आहे, असा पुरावा करण्यासाठीं म्हणून दोघांनीं सं[illegible] तिसऱ्याच एका दाव्यांत पक्षकाराची [illegible] प्रमाणें जबानी घेऊन ठेविलेली [illegible] मला मागाहून असें कळलें, कीं [illegible] जबानी आणखी दोन दाव्यां[illegible] ठेवण्यांत आलेली होती. यांतील [illegible] कीं त्या मारवाड्याच्या हातीं कां[illegible] लागूं नये !

*   *   *

तो मारवाडी वादी एक सच्चा [illegible] होता. कोणाला सहज पेचांत [illegible] किंवा कोणाची बेअब्रू होऊं नये [illegible] त्याची नेहमीं सद्बुद्धि असे. याच्या[illegible] वर वरील खरेदीखताची हकीगत [illegible] होती. परंतु असल्या खरेदीखतां[illegible] भेदरून जाणार ! माझ्या पक्षकारां[illegible] हप्त्याची रक्कम कोर्टांत भरली [illegible] त्यानें त्याच्याकडे मनुष्य पाठवून [illegible] केला. परंतु उलट्या नशिबाच्या [illegible] तो माझा पक्षकार असल्या तगाद[illegible] भीक घालतोय् !

पुढें चार–सहा महिने मार[illegible] कांहींच हालचाल केली नाहीं. या [illegible] त्या माझ्या पक्षकारानें खात्रीनें म[illegible] मांडे खाल्लेले असावेत, कीं आतां [illegible] बुडाला, आपल्या कारस्थानाचा [illegible] झाला ! पण त्यानें धी देखा लेकि[illegible] नही देखा !

परंतु हुकूमनाम्याचे पैसे असे [illegible] हजीं बुडण्यास ते काय चिंचोके अ[illegible] मारवाड्यानें आपल्या हुकुमना[illegible] दरखास देऊन तींत तुरुंगवॉरंटाची [illegible] केली, व कोर्टानें प्रतिवादीस नो[illegible] काढतांच ती मान्य केली.

दुसरे दिवशीं सकाळीं माझा [illegible] आपल्या कचेरींत काम करी[illegible] असतां, त्या मारवाड्याचा [illegible] कोर्टाचा बेलिफ असे दोघे जण [illegible] तुरुंगवॉरंटांत पकडण्यासाठीं म्हण[illegible]रींत दत्त करून उभे राहिले ! त्या[illegible]रींत एकच खळबळ उडून ती घ[illegible]पर्यंत जाऊन थडकली ! त्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हकीगत ऐकून घेऊन त्या माझ्या ला असा दम भरला, कीं जर ते या प्रकरणाची आपसांत निरवा- झाली नाहीं, तर त्याला कामावरून करण्यांत येईल !

मात्र त्याच्या डोळ्यांत चांगलेंच पडलें ! आणि घाईघाईनें बायकोचे ठेविलेले दागिने बाहेर काढून ते डे विकून त्या मारवाड्याच्या हुकू- ची आपल्या पायानें त्याच्या जाऊन त्यानें पूर्ण फेड केली !

* * *

ही त्याची ग्रहदशा येथेंच थांबली मारवाड्यावर फेंकलेला बाण आप- अंगावर उलटल्यामुळें तो मनांतून ला झालेला होता ! कोर्टाच्या कामांत ढालगजपणाबद्दल त्याच्या बाय- र जी हाय खाल्ली, तिजमुळें तिनें च धरलें; आणि त्या दुखण्यांतच अंत झाला ! बायकोच्या दुखण्यानें नें माझा पक्षकार तर अजिबात गेला ! कचेरींतल्या कामाकडे त्याचें लक्ष लागेना. पुढें पुढें तर तो सारखाहि करूं लागला ! म्हणून आपल्या जागेचा राजीनामा द्यावा !

* * *

त्यानें त्या आपल्या पत्नीच्या लेल्या " भावाजवळ आपली सर्व परत करण्याविषयीं मागणी केली. हस्थानें जंगम मालाची केव्हांच ट करून टाकलेली होती ! घरा- रेच दिवस चाळवाचाळव करून तसें करण्यास त्यानें साफ तोंडभर दिला ! घरीं चालत आलेली हेर लोटून कां कोणी देत असतो ! माझा तो पक्षकार माझ्याकडे सल्ला स आला. तेव्हां मीं त्यास चक्क , कीं आपल्या हातानेंच मगरीच्या कोंबलेलें माणिक कायदेशीररीत्या ळणें संभाव्य दिसत नाहीं; सबब तडजोडीनेंच कांहीं होत अस- हावें, नाहीं तर कृतकर्माचा पश्चा- त स्वस्थ 'हरी हरी' म्हणत बसावें ! य दुसरा एखादा मार्ग निदान ी सुचत नाहीं.

* * *

उघड्या डोळयांनीं का कुणाचा त असतो ? बिचाऱ्याचें घर चांगलें दा हजार रुपये किंमतीचें होतें. हे ते लक्ष्मीरोडवर आलें असल्या- जला तर फारच किंमतीचें झालें तें घर म्हणजे त्याच्या सर्व नोकरीची मूर्तिमंत शिल्लकच होती ! तेव्हां त्याची त्याबद्दलची आशा न सुटणें स्वाभाविकच होतें ! परंतु तें स्वाभाविक असलें, तरी संभाव्य मात्र नव्हतें, निदान माझ्या बुद्धीप्रमाणें तरी नव्हतें !

तरी पण त्यानें दुसऱ्या वकीलामार्फत त्या घरासंबंधानें दावा लाविलाच ! ही गोष्ट मला समजली, व त्या दाव्याचा शेवट तरी काय होतो, हें जाणण्याचें कुतूहल माझ्या ठायीं उत्पन्न झालें.

पुराव्याच्या दिवशीं मी मुद्दाम हजर राहिलों. तो माझा पक्षकार वादीच अस- ल्यामुळें त्याची प्रथम साक्ष झाली. जेमतेम सरतपासणी पार पडली, व उलट तपास- णीला प्रारंभ झाला. तींत त्याचे जे एकेक वाभाडे निघाले, ते कांहीं पुसूं नका ! आणि ते कां बरे निघणार नाहींत ? मारवा- ड्याच्या हुकूमनाम्याच्या बजावणींत घराच्या खरेदीखताला यत्किंचितूहि धोका येऊं नये, म्हणून त्यानें ज्या नाना प्रकारच्या तरतुदी करून ठेविल्या होत्या, आणि गळेकापूं जबान्या दिलेल्या होत्या, त्याच नेमक्या त्याच्या उरावर सोळा आणे बसल्या ! साक्षीच्या पिंजऱ्यां- तून तो एक अट्टल बिलंदर खोटें बोलणारा म्हणून बाहेर पडला !

खुद्द वादीचीच अशी दशा उडाल्यावर दाव्याचा निकाल कसा काय झाला असेल, तो स्पष्ट सांगावयास कां हवा ? तेल गेलं, तूप गेलं, अन् हातीं धुपाटणं मात्र राहिलं, अशी त्याची स्थिति झाली ! हुकुमनामा बुडविण्याठीं म्हणून त्यानें घराचें खरेदीखत लिहून देऊन व शपथेवर जबान्या देऊन खोट्याचें खरें केलें, आणि त्याचें बक्षीस म्हणून तेंच खरेदीखत पूर्ण भरण्याचें असें ठरून खोट्याचें माप पुरेपूर त्याच्या पदरांत पडलें !

माय मरते, पण आशा मरत नाहीं म्हणतात, तें कांहीं खोटें नव्हे ! त्याच्या दाव्याचे बारा वाजून गेले असतांहि बिचारा निकालाच्या दिवशीं कोर्टांत हजर राहिला. कोर्टानें निकालपत्रांत त्याच्यावर यथेच्छ ताशेरा झाडून त्याचा दावा खर्चासुद्धां रद्द केला !

तो निकाल ऐकून त्याचे तोंडून एक किंकाळी बाहेर पडली ! कोर्टाच्या शिपायानें त्याला कोर्टाबाहेर जाण्यास सांगितलें. तो जो बाहेर आला, तो दोन्ही हातांनीं आपलें डोकें दाबून धरून मटकन् खालींच बसला !

बदसल्ल्याला बळी पडून जरी त्यानें वरील प्रकार केलेले होते, तरी तो जात्या कांहीं लफंग्या वृत्तीचा नव्हता. एवढेंच नव्हे, तर तो हळुवार मनाचाहि होता. पत्नीच्या मृत्यूमुळें त्याला अगोदरच थोडासा भ्रम झालेला होता. त्यांत एकीकडे हुकूम- नाम्यापरी हुकुमनामा तर पुरा करावा लागला, आणि दुसरीकडे घरापरी घरही गेलें ! यामुळें दिवसें दिवस त्याचा तो भ्रम बळावत गेला.

शेवटीं, येथील वेड्याच्या इस्पितळांत त्याची रवानगी करावी लागली !

त्या मानलेल्या भ.वानें घर गट्ट करून चांगलाच ढेकर दिला !

आणि " केलं तुला न् झालं मला " या साध्यासुध्या म्हणींत सांचलेला शेंकडों वर्षांचा शहाणपणा मला व अनेकांना पटला !

पौष्टिक, सात्विक, स्वादिष्ट आणि स्वस्त
या बहुगुणामुळेंच
साठे बंधू पुणें
यांची
पुना बिस्किटें
सर्वमान्य झाली आहेत.

द. कृ. सांडू ब्रदर्स
याचा
महांमंजिष्टादि काढा.
१ उपदंश गर्मीसंबंधीं विकारांवर, २ व रक्तशुद्धीकर
खर्जुरासव.
दमा, खोकला, श्वास व छातीचे विकारांवर
धातुपौष्टिक गोळया
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स,
कारखाना-चेंबूर, दुकान-ठाकूरद्वार.
शाखा:-१ लेडी जमशेटजी रोड, दादर. २ पोयबावडी परळ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विम्याच्या क्षेत्रांतील नवोदित व धडाडीची विमा कंपनी.

एकाच चाकोरींतून त्याच त्या रुळलेल्या मार्गावरून कारभार हांकणाऱ्या गतानुगतिक—जरी जनतेच्या गरजा प्रत्यहीं बदलत चालल्या, विम्याचें संरक्षण मिळविण्याच्या बाबींत, राहणीच्या व परिस्थितीच्या विविधतेमुळें बदल करणें अत्यावश्यक भासूं लागलें तरीहि आपले जुने मार्ग, व विम्याच्या जुन्या पद्धती न बदलणाऱ्या—विमा कंपन्यांच्या पावलावर पाऊल टाकीत जाण्याकरितां नवभारत विमा कंपनीची स्थापना झाली नसून, विमाकंपनी आपल्या विमेदारांचें व राष्ट्रांचें जास्तींत जास्त हित कशा तऱ्हेनें साधूं शकतें, हें स्वतःच्या उदाहरणानें हिंदी जनतेस दाखविण्यासाठींच तिनें विम्याच्या क्षेत्रांत पदार्पण केलें आहे.

हिंदी जनतेकडून देशी विमा कंपन्यांस जो आश्रय मिळतो तो तिच्यांत जागृत झालेल्या राष्ट्रीय वृत्तीमुळें असल्यानें त्या वृत्तीला साजेसा मोबदला त्या कंपन्यांकडून जनतेच्या पदरांत पडला पाहिजे हें नवभारतचें म्हणणें आहे.

फायद्याचा ठराविक हिस्सा राष्ट्रीय दृष्ट्या विधायक कार्यांकरितां खर्च करण्याच्या योजनेचें बंधन स्वतःच्या घटनेंतच आपणावर लादून घेतलें आहे; आणि इतकें असूनही नवभारतनें विमेदारांच्या हिताकडे मुळींच दुर्लक्ष केलेलें नाहीं. निव्वळ नफ्याचा शेंकडा ९५ इतका भाग विमेदारांच्या पदरांत पाडण्याचें ठरविणें ही गोष्ट हिंदी विमाकंपन्यांच्या इतिहासांत क्वचितच आढळेल.

नवभारतचें विम्याच्या पॉलिसीचें प्रत्येक कोष्टक हिंदुस्थानच्या परिस्थितीचा सूक्ष्म विचार करून हिंदी जनतेच्या वास्तवीक गरजांस मानवेल असेंच तयार केलें आहे. प्रत्येक विमेच्छूनें, आपला विमा उतरविण्यापूर्वीं आमच्या विमापत्रकांची व कंपनीची सविस्तर माहिती आमच्या कडून किंवा आमच्या एकाद्या स्थानिक एजंटाकडून मिळाविण्यास चुकूं नये.

नवभारतएवढया सवलती जेथें मिळतात व नवभारतएवढी जी राष्ट्रीय आहे, अशा विमाकंपनींतच आपण आपला विमा उतरा.

कामाचीं हमीं देऊं शकतील अशा ' स्त्रीपुरुषांना निरनिराळ्या गांवी व शहरीं मोबदल्याच्या अटीवर एजन्सीज देणें आहेत. ज्यांना काम करण्याची इच्छा असेल त्यांनीं अर्ज करावेत.

नवभारत इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, २६१–२६३ हॉर्नबी रोड, कोट मुंबई.

दुसऱ्या मूल्यमापनाचा प्रगमनशील निकाल जाहीर झाला !

बोनसमध्यें सवापट वाढ.

दि कॉमनवेल्थ विमा कं. लि.

एजन्सीच्या शर्ती **आकर्षक व उदार आहेत.**

मराठींत पॉलिसी देणारी **ही पहिलीच कंपनी होय.**

THE COMMONWEALTH ASSURANCE CO. LTD. POONA CITY

दुसऱ्याच मूल्यमापनांत हयातीनंतरच्या विमेदारांना दरसाल दरहजारीं रु.१५ व हयातींतील विमेदारांना रु.१२॥ प्रमाणें बोनस जाहीर करून आम्ही भरभराटीच्या मार्गांचा बराच मोठा टप्पा गांठला आहे. काटकसरीची व्यवस्था, स्वस्त हप्ते व क्लेमचा झटपट निकाल या गोष्टींबद्दल प्रसिद्धी असलेल्या या महाराष्ट्रीय कंपनींतच आपला विमा उतरा. विशेष माहितीसाठीं लिहाः—

जी. व्ही. पटवर्धन अँड सन्स, चीफ एजंटस्

एम्पायर बिल्डिंग हॉर्नबी रोड, फोर्ट मुंबई.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि ही बांगडी...तीहि फुटकी ! किती पण
ग्लीयू तुझ्या या दोस्तानं !
दाचित् ती...
रसा अडखळतोस कां ? म्हण कीं,
ती तुझ्या राजाभाऊच्या प्रेम-
नसेल... कदाचित् त्या तरुण
ीचीहि असूं शकेल–अन् तिनंच
वलाच्या कप्यांत विसरभोळेपणानं
वली असेल...असंच ना ?
ाना, राजाभाऊसंबंधीं तुम्ही असा
रसमज करून...
र तर ! साळसूदच किनई !–तो
त्रेहि ! बापू, मला या भानगडी
ाहींत, समजत नाहींत अन् मी
ळा प्राणी आहे, अशी का आहे
समजूत ? मला नको शिकवूंस
गोष्टी.
ण नाना...
कांहीं बोलूं नकोस अन् कांहीं सांगूंहि
मला. या फुटक्या बांगडीभोंवतीं
आहे–भावना आहे अन् प्रेऽऽम
त्या खेरीज ही गुलाबी बांगडी–
टलेली, अशी ही टेबलाच्या खणांत
वसणार नाहीं. वाहवा रे तुझा हा
ी मुंबाजी ! ! मामेबहिणीसाठीं खूप
स्थळ पण स्थळ शोधून काढलंस !
अहो पण नाना ? तो खरंच तशां-
ाहीं ! माझ्या शब्दांवर विश्वास
ोरी दिसतांच लाजून मान खालीं
ा–मुलखाचा भित्रा नी पापभीरू...
डोळे झांकून दूध पिणारे बोके हे
असतात–अन् काय रे, हा पलंगा-
ोखालीं लेडीज हॅंडकरचीफ कुठून
? कीं तोहि मोलकरणीचाच ?
भाला तिथें राहला ? बापू, हा सारा
ाद बरं !
ांनीं मला अगदीं निरुत्तरच केलें.
टाकलेल्या मातीच्या ढेंकळाप्रमाणें
ळून गेलों. राजाभाऊची कोणत्या
तरफदारी करून नानांच्या मनां-
का–गैरसमज दूर करावा, हेंच मला
.
या माणसाला मी आपली सुमी
देणार नाहीं. त्या परती आडांत
ी बरी नाहीं का ? आतां त्याच्या
ोष्ट देखील काढूं नकोस. मोटार
असती, तर आत्तांच्या आत्तां पुणं
असतं...पण निरुपाय आहे.
पर्यंत नाक मुठींत धरून राहलाच
...
ा नानांचा स्वभाव अत्यंत संशयी
या होता.
िला स्थळ पहाण्यासाठीं म्हणून
सातारला आलों होतों—राजाचें

तरी सांगत नव्हतों–?

(ले:—दत्त रघुनाथ कवठेकर)

स्थळ मींच सुचविलें होतें. तो न् मी पूर्वी सहाध्यायी होतों. त्यानें सातारला सहा महिन्यांपूर्वीच डॉक्टरीचें प्रॅक्टीस सुरू केलें होतें, आणि मी...हॉसुपिटलमध्यें नोकरी धरली होती.

राजाची व माझी पुण्यास असतांना चांगली गट्टी होती. तो नेहमींच माझ्याकडे येत असे–सुमी–माझी मामे बहीण... तिनें त्याला अनेकवार पाहिलें होतें—त्यानेंहि तिला पाहिलें होतें. फायनल् एल्. सी. पी. एस्. पास झाल्यानंतर राजानेंच एके दिवशीं आपलें हृद्गत बोलून दाखविलें. मला मोठें आश्चर्य वाटलें !

सुमीशीं तो कधींहि बोलला नव्हता. सुमी तर काय साऱ्या मुलखाची लाजाळू !

अन् त्याच दिवशीं माझ्या मनानें घेतलें, कीं सुमी व राजा यांचा योग जमवून द्यावा—चांगलीं अनुरूप आहेत एकमेकांना. राजानें तर स्वतःच पसंती दिली आहे—प्रश्न उरला होता फक्त सुमीचा अन् मामींचाच. मामा म्हणजे मामीच्या हातचें खेळणें...चुकलों, असें म्हणणें म्हणजे वडील माणसाचा उपमर्द...

मामींना मीं राजाचें नांव सुचविलें. त्यांनाहि एकंदरींत स्थळ पसंत पडलें. मीं सुमीला विचारतां, तिनें लाजून जो मुरका मारला, त्यांतच तिची पसंती व्यक्त झाली. मुलाला पहाण्यावरच फक्त राहिलें होतें.

मध्यंतरीं पांच सहा महिने मुहूर्त नसल्यामुळें आम्हीं मुलाला पहाण्याचें पुढें ढकललें. मीं 'राजा म्हणजे मदनाचा पुतळा आहे' असें जरी सांगितलें, तरी मामींचा आग्रहच पडला, कीं त्यांनीं म्हणजे मामांनीं मुलाला एकदां पहावें व मगच निश्चित करावें.

मधल्या काळांत मीं राजाभाऊला पण लिहून त्याची संमतिहि मिळविली. सुमीवर तर तो खूपच होता. त्याची कोणतीच अट नव्हती. या एकाच गोष्टीवरून तो सुमीशीं लग्न करण्यास किती उत्सुक होता, हें कळून येण्यासारखें आहे.

एके दिवशीं बोलण्याच्या ओघांत मीं सहज मामांना आह्मां दोघांत झालेला पत्रव्यवहार दाखविला. तो वाचून मामांनीं कपाळाला आठ्या घातल्या नी ते म्हणाले—

—बरेच उल्लू झालेले दिसतात लग्नाला राजेश्री ! लग्न न होत्या तरुणाप्रमाणं हुरळून गेलेला दिसतोय् बेटा ! तूं म्हणतोस तशीच जर त्याची सांपत्तिक परिस्थिति व कुळाचा नांवलौकिक असेल, तर त्याचं या पूर्वींच लग्न व्हायला पाहिजे होतं ! बापू, मला या स्थळाच्या बाबतींत कांहीं तरी गोम असावीसं वाटतं. कळेल—कळून येईलच.

—तसं कांहींच नाहीं. नाना, परीक्षा पास होऊन धंद्याला लागेपर्यंत लग्न न करण्याचा त्यानं निश्चय केला होता. अन् सुमीला त्यानं हजार वेळां पाह्यली आहे–माझी ती मामेबहीण आहे, वगैरे वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन त्यानें, मी त्याचा मित्र म्हणून, माझ्याजवळ ही गोष्ट कबूल केली. यांत आश्चर्य वाटण्यासारखं तें काय आहे ?

त्यावर नाना कांहींच म्हणाले नाहींत. पांच सहा महिन्यांनीं लग्नाचे मुहूर्त लागण्यापूर्वी, मात्र सातारला जाऊन राजाला एकदां डोळ्याखालून घालण्याचं नानांनीं नक्की ठरविलें व त्याप्रमाणें, राजाभाऊला आगाऊ न कळवतां सवरतां एके दिवशीं आम्ही सातारला आलों.

त्या वेळीं पांच वाजण्याचा सुमार होता. राजाभाऊ दवाखान्यांत होता.

आम्ही दवाखान्यांत शिरलों, त्या वेळीं तो एका तरुण स्त्रीशीं बोलत बसला होता. ती त्याची 'पेशन्ट' असावी असा मीं तर्क केला. पण नानांच्या बुद्धिमत्तेची धांव मात्र फारच दूर गेली, हें मात्र मला मागाहून कळलें.

आम्हांला पाहतांच राजाभाऊला जितकें आश्चर्य वाटलें, तितकाच त्याला मला पाहून आनंद झाला. समाचाराच्या चार गोष्टी झाल्यानंतर त्यानें आम्हांला त्याच्या बिऱ्हाडीं जाऊन विश्रांति घेण्याची सूचना केली; ती आम्हांलाहि मान्य झाली.

त्याची बिऱ्हाडाची जागा नवीनच होती–अन् त्यानें आपलें बिऱ्हाड सजविलें होतें तेंहि इतकें सुंदर, डोळ्यांत भरण्यासारखें, कीं तो एक ब्रह्मचारी–एकलकोंडा-एकाकी जीव आहे, अशी कोणाला कल्पनाहि आली नसती. त्याची 'एस्थटिक टेस्ट' खोलींतील प्रत्येक लहानसहान वस्तूवरून दिसून येत होती. अगदीं अद्यावत् फर्निचरनीं शृंगारलेली ती त्याची तीन खणांची बैठकीची खोली पाहून मी तर अगदीं चकितच झालों. बैठकीला लागूनच स्वयंपाकघर होतें व तेथें संसाराला लागणारीं सर्व प्रकारचीं लहान मोठीं भांडीं, कपाटें, शेल्फ हींहि पाहून मला विशेषच आश्चर्य वाटलें. लग्न होण्यापूर्वींच इतक्या दूरदर्शीपणानें कोणी संसाराची जमवाजमव करीत असेल, याची मला तोंपर्यंत कल्पनाहि नव्हती.

नानांची काकदृष्टि तेथील प्रत्येक वस्तु न् वस्तूवरून फिरली.

रामभाऊ साडेसहाला घरीं येईन, म्हणून म्हणाला होता.

तोंपर्यंत नानांनीं त्याच्या खोलीचें चांगलेंच संशोधन केलें, आणि त्याचा परिणाम हा असा झाला, कीं—त्यांना त्याच्या टेबलाच्या खणांत फुटकी गुलाबी बांगडी दिसली, अन् त्याच्या पलंगावर उशीखालीं स्त्रीचा हातरुमाल सांपडला ! आधींच आह्मां तरुणांकडे संशयित दृष्टीनें पाहण्याची त्यांची वृत्ति ! मग या गोष्टी पाहिल्यानंतर तर कांहीं विचारूंच नका !

इतक्यांत राजाभाऊंची मोलकरीण धोंडी झाडलोट करण्यासाठीं, दिवे भरण्यासाठीं, वगैरे कामें उरकण्यासाठीं तिथें आली ! तिच्याकडे पाहतांच—विशेषतः ती तरुण आहे, देखणी आहे, हें पाहून आणि मालक घरीं असो अगर नसो, ती वाटेल तेव्हां येऊन कामें करून जाते—तिच्याजवळ बिऱ्हाडाची किल्लीहि असते, या गोष्टी नानांनीं तिच्याकडून काढून घेतांच त्यांचें मस्तक फिरलें.

—बस्स ! या...डॉक्टराला आपण नाहीं देणार आपली मुमी, असें म्हणून ते तावातावानें, मोलकारणीचा पाय पडतांच, उठले आणि खोलींतल्या खोलींत येरझारा घालूं लागले. येरझारा घालतां घालतां सहजच त्यांचें लक्ष आंतल्या खोलींत गेलें.

त्याच पावलीं ते आंत शिरले आणि उजव्या हातांत धुतलेल्या लुगड्याची घडी घेऊन त्याच पावलीं बाहेर आले !

–पाहिलंस! आत्तांच ती मोलकरीण ठेऊन गेली असावी. हें पहा लुगडं. हं तर नाहीं ना मोलकरणीचं लुगडं ? चांगलं इरकली, टोप पदरी दिसतंय कीं रे ! थाट आहे तुझ्या या दोस्ताचा ! लग्न होण्यापूर्वींच संसार थाटून बसलेला दिसतोय् बेटा !

नाना बोलत होते आणि मी नुसता 'हूंऽ हूंऽ' करून ऐकत होतों. होतें खरेंच असें--नानाच्या बोलण्यावरहि माझा हळुहळू विश्वास बसूं लागला. मेडिकल स्कूलमध्यें असतांना नीतीच्या लांबलांब गप्पा झोकणारा माझा हा मित्र धंद्याला लागतांच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इतका रंगेल बनेल, असें मला कधींच वाटलें नाहीं.

विचार करतां करतां माझ्या डोळ्यांसमोर एक एक गोष्ट उभी राहूं लागली—

दवाखान्यांतील ती तरुण स्त्री...ती तरुण मोलकरीण...ही फुटकी बांगडी... तें लुगडें...हा स्त्रीचा हातरुमाल...छे! छे! याचा ब्रह्मचाऱ्याला विटाळदेखील उपयोगी नाहीं. मग !—

नाना म्हणतात तेंच बरोबर असलें पाहिजे. राजा बहकलाच असला पाहिजे. त्याशिवाय का—

आणि रामभाऊ विन्हाडीं परत आला तो आठ वाजतां.

—माफ कर बापू...पण आज अपेक्षेबाहेर पेशन्टची गर्दी झाली अन् त्यांतल्या त्यांत एक तर बरीच भानगडीची केस होती.

भानगडीची केस म्हणजे सिरीअस केस असेंच त्याला म्हणावयाचें होतें—त्याच अर्थानें तो बोललाहि असला पाहिजे. पण नानांच्या मनांत तिसरेंच कांहीं 'जळत' होतें. ते एकदम म्हणाले—

—तुम्हांला घरीं दारीं बऱ्याच भानगडींच्या केसीस असतात तर एकूण ?

रामभाऊनें आम्हांकडे आळीपाळीनें पाहिलें. त्याला काय वाटलें कोण जाणें; पण त्यानें दुसरीकडेच तोंड फिरविलें. तोंच मघाचीं नाना बाहेर घेऊन आलेल्या लुगड्याची घडी राजाला टेबलावर पडलेली दिसली ! त्याजवळच फुटक्या बांगडीचे दोन तुकडे व तो स्त्रीचा हातरुमाल पडलेला होता.

त्या वस्तूंवरून त्यानें झटकन् आमच्याकडे नजर फिरविली, त्याचा चेहरा गोरामोरा झाला. तो चरकलाच मनांत—निदान मला तरी असें वाटलें.

तो चटकन् उठला आणि मला बाहेर येण्याची खूण करीत तो दरवाजाबाहेर पडला.

—बापू, नानासाहेबांच्या मनांत भलभलीच कांहीं तरी शंका आलेली दिसतेय्... त्या वस्तू...

मींहि जरा रागावल्यासारखं केलें आणि म्हणालों—

—मला कांहींच सांगूं नकोस. नाना न् तूं काय तें पाहून घे. अगदीं कुणाबरोबर सांवळा गोंधळ घालीत असलास, तरी मीं सुमीला तुला दिली असती. पण ती माझी मुलगी असती तर—पण मुलगी आहे नानांची !

—पण माझं ऐकून तर घेशील...असा पराचा पारवा कां करतां ?

तोंच नाना स्वतःच बाहेर आले. आम्ही दोघे गप्पच झालों.

राजाभाऊनें रात्रीं आम्हांला खानावळींत जेवायला येण्याचा खूप आग्रह केला. पण नानाच जेवायला येईनात, तेव्हां मलाहि न जेवतांच झोंपावें लागलें.

नानांशीं राजाभाऊनें बोलण्याचा बराच वेळां प्रयत्न करून पाहिला. पण ते आपणाशीं बोलण्यास तयार नाहींत, हें पाहून राजाभाऊ मनांत बराच खट्टू झाला. त्याला ती गोष्ट जाणवली.

—दुसऱ्या दिवशीं सकाळीं ९ च्या मोटारीनें आम्ही पुण्यास येणार होतों. दवाखान्यांत जातांना राजाभाऊनें आम्हांस शिष्टाचाराला स्मरून नमस्कार केला आणि म्हणाला—

—नवाला [illegible]र येईल. तोंपर्यंत वाटल्यास इथं बसा, नाहीं तर दवाखान्यांत या.

तो दवाखान्यांत गेल्यावर धोंडी आली. आठ झाले-साडे आठ झाले.

नाना अस्वस्थ मनानें खोलींतल्या खोलींत येरझारा घालीत होते. धोंडी आंत-स्वयंपाकघरांत कांहीं तरी काम करीत होती.

नाना दारांशीं गेले आणि तिला उद्देशून म्हणाले—

—काय ग, हें लुगडं कुणाचं ?

—त्यांच्या वहिणीचं नव्हं कां !

—तें कसं इथं आलं ?

—अवं त्या आल्या व्हत्या हतं. परवां तर गेल्या.

—कुठं गेल्या त्या ?

—परळीला.

—परळीला कोण आहे तिचं ?

—गडावर त्यांचा बाप आलाया. त्येना भेटाया येल्यात. आजारी हैत थोडं त्ये.

इतक्यांत डांकवाल्यानें पुकारलें—

—डॉक्टरऽऽ

मी बाहेर जाऊन राजाभाऊच्या नांवानें आलेलें पोस्टकार्ड घेतलें. हस्ताक्षर स्त्रीचें होतें. शिष्टाचाराच्या मर्यादा ओलांडून मीं तें वाचलें.

मला एवढा आनंद झाला, कीं मी धांवतच नानांजवळ गेलों आणि त्यांना कार्डांतील मजकूर वाचून दाखविला.

—इकडे येतांना चहा सांडलेलें लुगडें धोंडीकडून धुवून घेतलंच असेल. तें कोणातरी येणाराजाणारावरोबर पाठवून दे. सोनाराकडे दिलेल्या बांगड्या तयार झाल्या का ? तुझ्याजवळ दिलेल्या बांगडीच्या मापापेक्षां कंसभर देखील वेढ मोठा नको. आणखी तसले हातरूमाल मात्र जरूर पाठवून दे मला. एकच जवळ होता, तोहि इकडे येतांना तिथेंच राहिला वाटतें.

—बाबांची प्रकृति आतां बरी आहे. चारआठ दिवसांनीं मी परत सासरला जाणार आहें, तोंपर्यंत बांगड्या तयार झाल्या पाहिजेत.

कार्डावर सही होती, ती राजाच्या वहिणीची.

—काय नाना ! आतां ?

—म्हणजे ही त्यांची वहीण की

—तरी सांगत नव्हतों...

आतां नानांना बोलायला नव्हतें.

बरें तर बरें—नाहीं तर राजाभाऊ ठिकाणीं दुसरा एकादा असता, तर त्याने सुमीला नाकारून अपमानाची भरपाई केली असती.

मुंबईतील—
भोजनाचें सर्वोत्कृष्ट ठिकाण
न्यू डेक्कन क्लब
देऊळकर हाऊस, गिरगांव, चर्नीरोड, मुम्बई.
मासिक दर रु. १६,
वेळेस ५ आणे.
सात, पंधरा व तीस दिवसांची कूपन्स मिळतात.

नवीन नमुना



जग सुधारत आहे—तसेंच आपल्या घरातील स्टोव्हची सुधारणा करा हा नवीन नमुन्याचा स्टोव्ह फार मजबुत असून त्याची तेलाची टाकी बाजूस असल्यामुळें गरम होत नाहीं. खर्च फारच कमी.

सर्व प्रकारचे स्टोव्ह हमेश तयार असतात.

डी. आर. वागळे,
महाराजा बिल्डींग, गिरगांव, मुंबई.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

"मोत्या" ला गोळी घातली !

लेखकः —
नारायण विनायक कुळकर्णी.

मोत्या नुसता तडफडत होता. त्याची जीभ फारोळया दातांच्या बाहेर ळळत होती. तो गुरगुरण्याचा, भुंक- चा प्रयत्न करी, पण त्याला मर्मीच ठी लागली असल्यामुळें, गुरगुरण्याच्या भा भुंकण्याच्या वेळीं गोळीच्या वेदना तरळा असह्य होऊन त्याच्या आवाजाचें भांतर करुण स्वरांत-रडव्या स्वरांत होत . क्षणभर तो चारी पाय पोटाशीं घेई, दुसऱ्या क्षणाला त्याला तणवा लागी. दां आराम वाटावा म्हणून लोळण न पाही, तर लगेच सर्व शक्ति नष्ट यासारखे व प्राण गोळा होत आहेत, ा भावनेनें तो निपचीत पडून राही ! मी माझी बायको, शाम, बाळ, आण्णा, ी, शशी हीं माझीं लहानसहान मुलें म्हीं सर्व जणन्द मोत्याच्या जवळ जमलों ों. मोत्या आम्हां सर्वांचा आवडता ा ! लहानपणापासून त्याला संभाळ- ा, पाळलेला, पोसलेला ! घरांतल्या ानांपसून थोरापर्यंत तो जीव कीं णच ! कुत्र्याची जात. मुकें जनावर खरें; आम्हां सर्वांला मोत्या म्हणजे आमच्या ुंबांतला एक जबाबदार घटकच वाटत से ! आम्हां सर्वांनाच कुत्र्याची आवड, द आणि हौस. त्याला दूध पाजण्यांत, ळच्या वेळीं भाकरी घालण्यांत, त्याची ा राखण्यांत कोण कमी करणार ! मुलांनीं पल्या ताटांवले मोत्याला मुद्दाम यू यू यू रुन बोलावून घालावें. माझी बायको तर त्याला अगोदर भाकरी घातल्याशिवाय णि पाणी दिल्याशिवाय कधींहि ायला बसायची नाहीं कीं त्याच्याकडे क्ष करावयाची नाहीं. मोत्या म्हणजे मच्या घराचा, शेताचा, गायीगुरांचा, ी-परड्याचा इतकेंच काय, पण आम्हा ंचा संरक्षक इमानीं सरडा शिपाईच ा ना ! मोत्या अस्सल देशी-जातीवंत राष्ट्रीय, खरा उमदा प्राणी ! देखणा ा, चपळ तसा, समजूतदार तसा, आणि ळहि पण तसा ! एरव्हीं मुलें त्याच्याशीं ठावयाची, तो मुलाशीं मोठ्या आनं- ें खेळावयाचा ! आम्हां नवराबायकोंचा राग-लोभ पुरा जाणे, ओळखे. केव्हां हां माझ्या रागाला तो तितकासा स्कीलपणानें जुमानीत नसे; पण बाय- च्या रागाला मात्र भारी भीत असे. करी घालावयाच्या वेळेला तो चुकून र नसला आणि तिनें "मोत्या मोत्या" णून रागानें हांका मारल्या म्हणजे, ूट हालवीत, मान खालीं घालून "आपण चुकलों, क्षमा करा" अशा ायाचा कुरकूर आवाज काढीत तो यावयाचा ! बायको प्रसंगविशेषीं मोत्या वर रागाचें हें खरें, पण इतर कुणी त्याच्याकडे वांकड्या नजरेनें पाहिलेलें, तिरस्कारानें त्याला 'हाडू' म्हटलेलें तिला कांहीं खपावयाचें नाहीं. इतका त्याच्यावर तिचा जीव होता !

त्या मोत्याला आज वर्मी गोळी बसली होती व त्यामुळें तो अगदीं आसन्नमरण स्थितीला आला होता !

बायको मोत्याकडे पाहून अश्रू ढाळीत होती, तर माझ्याकडे लालबुंद डोळ्यांनीं पाहात होती ! माझीं मुलें भयचकित होऊन मोत्याच्या त्या केविलवाण्या स्थिती- कडे पाहात होती. मधूनच त्याला कोणी गोंजारी; "मोत्या, काय झालं रे तुला ? असं रे काय करतोस !" असें म्हणत ! गोळी लागली होती, त्या ठिकाणांहून रक्त भळभळ वहात होतें. बायकोकडून अगोदर हळद मागविली व ती भुकटी मीं त्याच्या- वर दाबली ! मोत्या त्या गोळीला जुमान- णार नाहीं, तो मरणार नाहीं, तो तसा शहरांतल्या नाजूक, मरतुकड्या आणि नुसत्या अळणी आणि भित्र्या कुत्र्यांच्या अवलादीचा नाहीं; तेव्हां तो त्यांतून वांचेल, पुन्हां पाहिल्यासारखा होईल, मी त्यास हरप्रयत्नानें वांचवीन असें मला वाटत होतें. पण मधून मधून माझा त्याबद्दल धीराहि सुटत होता. वेऱ्याला न सुचणारे विचार मला सुचत होते व ते मला भेडसा- वीत होते. मी त्याला कुरवाळीत होतों, थापटीत होतों. तो मुलांकडे पाही, बायकोकडे पाही, आणि माझ्याकडेहि पाही. मुलांना आनंदित करण्याकरितां तशाहि स्थितींत तो आपलें शेंपूट लाडीकपणानें हलवी. बायकोनें त्याच्यापुढें घाईघाईनें दूध-भाकरीचा काला करून आणून ठेवला. त्यानें त्या वेळीं तिच्याकडे किती कृतज्ञतेनें पाहिलें ! तिच्याकरितां त्यानें त्या काल्या- जवळ तोंड नेलें. पण त्याला त्या वेळीं खाववेना ! त्याचा अगदीं नाईलाज झाला ! त्यानें अर्धवट उचललेली मान दुःखावेगानें, पुन्हां काला तसाच टाकून खालीं टाकली !

माझें मन विलक्षण प्रक्षुब्ध झालें होतें. काळजांत भयंकर कालवाकालव होत होती. डोळ्यांतून पाणी येत नव्हतें, पण ते लाल झाले होते. नुसती अंग आग होत होती.

ज्या गायीचें आणि मोत्याकरितांच मुद्दाम पाळलेल्या शेळीचें दूध आम्ही त्यास देत असूं, ती गाय व ती शेळी रानांत चरावयास नेण्याकरितां गडी जात असे. त्यानें दाव्या-

मोत्याला आज वर्मी गोळी बसली होती त्यामुळें तो अगदीं आसन्नमरण स्थितीला आला होता !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पासून त्यांना सोडलें, अंगणांतून दाराबाहेर गाय व शेळी चालली असतां, मोत्याचा करुण स्वर त्यांच्या कानीं पडला. त्या दोघीहि जागच्या जागींच थबकल्या. त्यांनीं माना मुरडून मोत्याकडे पाहिलें. मोत्यांची आणि त्यांची दृष्टादृष्ट झाली. मोत्यानें किंचित् शेंपटी हलविली. गायीला व शेळीला जणूं मोत्याची ती अवस्था कळलीच! गायीनें 'हंबे' आवाज केला. शेळीनेंहि मान हलवीत, बेंए बेंए अशा आपल्या शब्दांत, त्याची सहानुभूतीपूर्ण पृसतपास केली. त्या कदाचित् तेथून हालल्याहि नसत्या, आणि मोत्या चांगला असता, तर त्वरेनें त्यांच्या जवळ जाऊन त्यानें त्यांच्या खोड्याहि केल्या असत्या. पण त्या स्थितींत मोत्या नव्हता. गड्यानेंहि हातांतली काठी वर उगारून त्यांना चरायला जाण्याचा इशारा 'हाईक हाईक' करीत व 'तिर तिर' शब्द उच्चारीत केला. तो गायीला आणि शेळीला घेऊन गेला!

जनावराची माया जनावराला कळली. त्यांची त्यांनाच ती कळली. त्यांनीं मोत्याला सहानुभूति दाखविली. मोत्यानेंहि शेंपटी हलवून आपला मनोभाव व्यक्त केला. करुण आवाजांत किंचाळत त्यानें आपलेंहि दुःख त्यांना सांगितलें.

तें दृश्य मी पाहात होतों. माझ्या बायकोनेंहि पाहिलें. बायकोनें संतापून मोत्यावर निर्दयपणानें गोळी झाडणाऱ्याला लाखोली वाहण्यास कमी केलें नाहीं व देखतां डोळां गोळी झाडूं कशी दिली? स्वस्थ कसें बसला! मोत्या काय वेवारसी होता? तिथल्या तिथें गोळी झाडणाराचा हात कसा पकडला नाहीं, म्हणून माझीहि तिनें यथास्थित पूजा बांधली!

मी मोत्याला कुरवाळीत होतों. थोपटीत होतों. त्याच्या सर्वांगावरून एकसारखा हात फिरवून त्याच्याकडे दुःखी-अपराधी डोळ्यांनीं मी पाहात होतों. मोत्याहि माझ्या नजरेला नजर भिडवीत होता. दर वेळीं त्याच्या पाहण्याच्या भाव मला निराळाच वाटत होता. "आज तुम्हीं निर्धास्त कसे झोंप घेणार? माझ्याशिवाय रात्रीं अपरात्रीं, चोरांचिलटांपासून, मुरख्यांपासून, आल्या गेल्या हातावळ्यापासून, घराचें, शेताचें, गंजीचें, गोठ्याचें रक्षण अशा स्थितींत मी कसें करूं शकणार? मी या गोळीच्या तडाख्यांतून वांचेन तरी कां हो? माझ्या या अवस्थेला आपण माझे धनी असून आपणच कारणीभूत झालांत ना? मला प्रदर्शनांत नेलें-तच कशाला आधीं? अशा तऱ्हेचे प्रश्न डोळ्यांतल्या पाहण्याच्या भावांनीं आणि किंचाळ्यानें मोत्या मला करीत आहे, असेंच मला वाटत होतें?

मोत्याच्या जिव्हारीं गोळी जाऊन भिडावयाला मीच खरोखर कारणभूत झालों होतों; आणि त्याचेंच मला सर्वांत जास्त वाईट वाटत होतें. "मोत्याला गोळी घालण्यापर्यंत पाळी यायला असें झालें तरी काय? कुणीं घातली गोळी? कां घातली!"

मी त्यासंबंधानें आतांपर्यंत एक चकार शब्दहि बोललों नव्हतों. माझ्या बायकोला तें असह्य झालें होतें. मोत्याकडे कळवळून व माझ्याकडे संतापून आळीपाळीनें पहात माझ्या बायकोनें चिडून मला प्रश्न केला. तेव्हां झालेली हकीकत मला आतां सांगणें भागच झालें. आमच्याच गांवांतल्या एक माणसाला, गुरांना टाणाटोण्याचीं औषधें देऊन बरें करणारा एक जण माझ्या बोलावण्यावरून तेवढ्यांत तेथें आला. मोत्याला त्याच्या हवालीं करून व त्याला नीट औषधोपचार कर, असें गद्गदून सांगून मी बायको-मुलांसह चाललों. त्या गांवठी वैदूनें "मोत्याला लगोलग औषधानें बरा करतों. त्याची काळजी तुम्हांला नको" असें म्हणून आम्हांला धीर दिला. आम्ही आंत गेलों!

* * *

रोज नवी नवी टूम काढून ती बाजारांत आणावयाची व तिच्याचबद्दल शक्य तों मोठमोठ्यानें आभिनिवेश करून आपली टूम सर्वांनीं स्वीकारलीच पाहिजे, असा अत्याग्रह धरावयाचा, यांत पटाईत असलेल्या पुण्यांतलीच गेल्या वर्षांची गोष्ट आहे.

पुण्यास असणाऱ्या माझ्या एका मित्रांकडे सहज दोन दिवस राहावयास म्हणून मी गेलों होतों. मी गेलों त्यावेळीं मित्रांकडे बरीच तरुण मंडळी जमली होती. त्यांच्यांत मोठ्या उत्साहानें एका विषयावर चर्चा चालली होती. विषयाची निवड चित्तवेधण्यासारखी—निदान माझें चित्त वेधण्यासारखी तरी खास होती. पुण्यांत कुत्र्यांचें **प्रदर्शन भरवावें** हाच तो विषय. माझ्याप्रमाणेंच माझ्या मित्रालाहि कुत्रें पाळण्याचा नाद. त्यानें हौसेनें पाळलेला आयरिश टॅगर; जवळच मोठ्या दिमाखानें बसला होता. त्याचा रंग पांढरा, व डोळे लहान पण पाणीदार होते. माझ्या मित्रानें आपल्या कुत्र्याचें नांव 'टायगर' असें सार्थ ठेवलें होतें. मित्राकडे आलेली बरीच मंडळी, निरनिराळ्या जातींचीं, व निरनिराळ्या प्रकारचीं कुत्रीं बाळगणारीं हौशी होतीं. कुणी **पमेरिअन्सं** पाळले होते, तर कुणाजवळ **आलसेशन्स** होते. कांहीं जण **स्पॅनिअल्सचे** भोक्ते होते, तर बऱ्याच जणांना **लॅप डॉगजची** जास्त हौस असल्यामुळें त्यांनीं त्यांची पाळणूक मोठ्या प्रेमानें आणि हौसेनें केलेली होती. बसलेल्या मंडळींत बुल्-डॉगवालेहि कांहीं कमी नव्हते. प्रत्येक जण आपण पाळलेल्या कुत्र्याचें रसाळ वर्णन करीच; पण त्या बरोबर दुसऱ्याच्या-आपल्या स्नेहाच्या कुत्र्याचेंहि मनमुराद गुणगान करी. एकानें दुसऱ्याच्या 'बाब' कुत्र्याचे गोडवे गावें, तर दुसऱ्यानें पहिल्याच्या 'रेमंड' ची भरपूर स्तुति करून मित्रऋण फेडावें, असा 'अहोरूपमहोध्वनी'-चा इतरांना वाटणारा पण माझ्या लक्षांत न आलेला प्रकार मात्र मोठा कौतुकाचा विषय वाटला.

कुत्र्यांचें प्रदर्शन भरवावें. वऱ्हाड, खानदेश, दक्षिण महाराष्ट्र, माळवा, गुजराथ, इत्यादि भागांतील कुत्रीं पाळणाऱ्या, कुत्र्यांना मानणाऱ्या व सन्मानाला चढविणाऱ्या हौसी मंडळींना प्रदर्शनाकरितां आपापलीं कुत्रीं आणण्यास आग्रहाचें निमंत्रण करावें, चांगल्या फरणाऱ्या कुत्र्यांना प्रशस्तिपत्रें, बक्षिसें देऊन कुत्र्यांच्या वाढीकडे व समृद्धीकडे महाराष्ट्राचें अधिक लक्ष वेधावें व प्रवृत्त करतां येईल तर करावें. याबद्दल जमलेल्या मंडळींत नानातऱ्हेचीं बोलणीं चालू होतीं. आपलीं कुत्रीं प्रदर्शनांत ठेवावींत, तीं कशीं आहेत त्याची संपूर्ण माहिती द्यावी, 'कुत्र्यांचें सौंदर्य' 'कुत्र्यांची बुद्धि' त्यांचें अन्न, त्यांचा उपयोग यांसंबंधीं सांगावें. 'आदर्श' कुत्रीं कोणतीं हें जगाला दाखवावें, ह वावें. त्या करितां तज्ज्ञांचें परीक्षक मंडळ नेमावें; कोणा चांगल्या कुत्र्याच्या जातीचा सखोल अभ्यास करणाऱ्या व दीर्घ व्यासंग असणाऱ्या थोर विद्वानाच्या करवीं कुत्र्यांचें प्रदर्शन उघडवावें, याविषयीं भवती न भवति चालली होतीं.

चाललेली चर्चा, मधून मधून कुत्र्यांच्या जातींचीं, त्यांच्या रूपाचीं, गुणाचीं आणि सौंपर्याचीं वर्णनें मी लक्ष देऊन ऐकत होतों. मला मोठी मौज वाटत होती. या प्रदर्शनाची कल्पना त्या मंडळींना नुकत्याच पुणें—कॅंपच्या कॅनॉट हॉटेलच्या मागील पटांगणांत, युरोपिअन, खिश्चन व पारशी जातीच्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांनीं व त्यांच्यांतील कित्येक कुत्र्याच्या हौशी मालकांनीं तशा तऱ्हेचें प्रदर्शन उघडलें होतें, त्यावरून सुचली होती. तें प्रदर्शन फक्त दोन तासच चालू होतें. पण फारच यशस्वी झालें म्हणतात. बऱ्याच मंडळींनीं तें पाहिलें होतें. त्या प्रदर्शनांत आपलीं कुत्रीं मांडण्यास व आपल्या श्रमाचें व कुत्र्याच्या सौंदर्यादि गुणांचें चीज [illegible] नाहीं, तें परस्वाधीन. म्हण-

नच खास महाराष्ट्रीयांनीं [illegible] जंगी प्रदर्शन भरविलें पाहिजे. कुत्र्यांचा गौरव झाला पाहिजे. [illegible] ण्यांत, त्यांची पैदास वाढ [illegible] कुत्र्यांचें जीवित तेजस्वी कर [illegible] महाराष्ट्रीय इतरांच्या मानानें [illegible] नाहीं, असें दाखवितां आ [illegible] असेंहि कित्येक जण बोलून दा [illegible]

माझ्या मित्रानें जमलेल्या [illegible] माझी ओळख करून देतांना [illegible] सांगितलें, कीं 'हेंहि एक आपल्या [illegible] कुत्र्याचे नाहीं. छंदी आहेत [illegible] पाळतात. पण अस्सल देशी कु [illegible] कडे असतात. महाराष्ट्रीय [illegible] अस्सल नमुना म्हणून त्यांच [illegible] कुत्रीं प्रदर्शनांत ठेवण्यासारखीं [illegible] मित्रानें मोठ्या उमेदीनें [illegible] कोणा ऐकलें. कोणीं नाहीं. [illegible] माझें कोणाकडेच लक्ष गेलें नाहीं [illegible] आपला आणि आपण पाळलेल्या [illegible] उदोउदो करीत प्रदर्शनांत [illegible] कसा होईल, या नादांत देहभान [illegible] तो माझ्याकडे जास्त कसा [illegible] माझें बाकी विषयाकडे दुर्लक्ष [illegible] माझ्या मित्रानें माझ्या डोक्यांत ए[illegible] कल्पना घातली. मलाहि वाटलें [illegible] चेंच प्रदर्शन आहे. आपण शिका [illegible] अस्सल महाराष्ट्रीय 'मोत्या' [illegible] आहे. तो देखणा आहे, [illegible] पाणीदार, गुटगुटीत आहे, ऐट [illegible] आपण त्याला चांगला राखला [illegible] संबंधी त्याला जडूं दिल्या नाहीं [illegible] लूद वगैरे कांहीं भरलेली नाहीं. [illegible] मापानें मोजलें, तरी आपला [illegible] प्रदर्शनांत आणण्यासारखा खचित [illegible] कदाचित् त्याला देशी म्हणून बक्षि[illegible] णार नाहीं; पण त्याची प्रशंसा [illegible] होईल. तरी देखील पुष्कळ होईल [illegible]

हेच विचार माझ्या मनांत घो[illegible] प्रदर्शनाचीं चित्रें माझ्या डोळ्या[illegible] दरच नाचूं लागलीं. माझ्या [illegible] आग्रहानें सांगितलें: 'गड्या' [illegible] प्रदर्शनाला आणच. मीहि [illegible] 'टायगर' तेथें ठेवणार आ[illegible] चांगला आहे. जातीवंत आहे. [illegible] डोळ्यांत भरल्याशिवाय रा[illegible] त्याची वाखाणणी झाल्याशिवाय [illegible] नाहीं.

मला खूप आनंद झाला. [illegible] पाहिजे होतें. प्रदर्शनाची ता[illegible] स्थळ निश्चित झालें म्हणजे [illegible] तिच्या व्यवस्थापकाकडून [illegible] हजर राहण्यासंबंधीं आपण [illegible] कान घाई. असेंहि आश्वासन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिलें. प्रदर्शनांत आपला ण्याबद्दल कर काय भरावा लागेल, ण अवश्य भरूं, असेंहि मीं सांगून

गेलों आणि प्रदर्शनाच्या तारखेकडे समितीच्या सहीच्या निमंत्रण- हे डोळे लावून बसलों. प्रदर्शनांत मोत्यानें जय मिळविला पाहिजे, ला गेला पाहिजे, त्याला मानाचें लाभलें पाहिजे. अशाकरितां, णेंपिणें, त्याला वेळच्या वेळीं कडे मीं जातीनें लक्ष ठेवलें. त्याच्या वालण्याकरितां माझ्या कल्पने- घुंगुर जडलेला एक सुंदर पट्टा . तो मोकळा सुटूं नये, सहजासहजीं व कोणाचाहि ‘ लचका ’ तोडील ऊं नये, म्हणून त्याच्याकरितां एक कास सांखळी आणली. माझ्या ला व मुलांना ‘मोत्या’ स प्रदर्श- ावयाचें आहे, असें मोठ्या आनं- ंगून टाकलें. त्या सर्वांनाच माझ्या- किती किती तरी आनन्द झाला. जपणूक सर्व जण जीवापाड करूं !

याच्या प्रदर्शनाची तारीख निश्चित समितीच्या व्यवस्थापकाची मला कुत्रा प्रदर्शनासाठीं घेऊन येण्या- निमंत्रणपत्रिका येऊन थडकली ! आनंद गगनांत मावेना. मला ठेंगणें झाल्यासारखें वाटलें ?

मोत्या ! मोत्या ! लेका तुझें भाग्य ला आलें. तूं प्रदर्शनांत बसणार ! ोक पाहणार ! तुझी स्तुति करणार ! करणार लेका ! आहेस कुठें तूं ? ” बडत मोत्याला घेऊन मी वेड्या- नांचूं लागलों. माझी बायको, लेंसुद्धां माझा तो आनंद, माझी ती अवस्था पाहून हंसल्याशिवाय नाहींत. मला वेडच लागलें, असेंहि क्षणभर वाटलें असल्यास नवल

* * *

नाची जाहिर तारीख दुसऱ्या वशीं होती. पण माझ्या मित्राबरोबर जागा व तिथली व्यवस्था पाहावयास च गेलो होतों. जागा छान होती. द्वार लतापल्लवांनीं सुशोभित करण्याची स्वागतम्” हीं वेगडी अक्षरें ज्या अल- र चिकटविलीं होतीं, तें लावण्याची चालू होती. कुत्र्यांकरितां कार्डबोर्डच्या छोटया खोल्या हारीनें उभ्या केल्या कोठें टेबलें, तर कोठें कुत्र्यांना याला खुर्च्याहि ठेवल्या होत्या एकंदर थाट मोठा शोभिवंत दिसत होता. आमच्या प्रमाणेंच ती जागा व आपापल्या कुत्र्यांना ठेवावयाला मिळालेले स्टॉल्स कुठें आहेत, कसे आहेत, त्यांचे नंबर काय आहेत, वगैरे अगोदर पाहाण्यास किती तरी स्त्रीपुरुष, मोटारींतून, गाड्यांतून व सायकलींवरून येत होते. कुणी आपल्या अमेरिकन ‘ बॉब ’ला, तर कोणी आल्सेशन किंगला आपल्या बरोबर मोटारींतून उतरवीत होते. पातळ, अस्मानी, गुलाबी, बदामी रंगाचीं पातळें विनकंसोट्यानें नेसलेल्या व त्याच रंगाचा ब्लाऊज घातलेल्या आणि पाठीवर रुळणारी वेणी सोडून, पायांतल्या फॅशनेबल चपला मृदुपणानें जमीनीला लावीत आपल्या बाहूंत चिमुकल्या लूसी, बाऊबाऊ (लॅप डॉग) ला अगदीं हलुवारपणानें अलगद घेऊन, अनेक तरुणी प्रवेशद्वारानें आंत शिरत होत्या. बुलडॉग टॉम एक जण ऐटीनें बरोबर आणीत होता, आणि एकेकानें रेमंड, टाम, किंग या निरनिराळया जातींच्या कुत्र्यांची जूटच्याजूटच प्रदर्शनाकरितां आणलीं होतीं. जमलेली मंडळी बहुतेक स्थानिकच होती व त्यांचीं कुत्रींहि एकमेकांच्या चांगलींच परिचयाचीं होतीं. वऱ्हाड, मध्यप्रांत, माळवा, कोल्हापूर, सोलापूर, क्वचित् बेळगांव आणि मालवण, वेंगुर्ल्यापर्यंतची मंडळी आपापल्या कुत्र्यांसह प्रदर्शनाकरितां मुद्दाम आली आहेत, असेंहि समजलें. ती मंडळी उद्यां सकाळपासून येऊं लागणार होती.

मंडळी घोळक्या घोळक्यानें प्रदर्शनाच्या आवारांत हिंडत होती. आपापसांत निरनिराळ्या जातीच्या कुत्र्यासंबंधानें बोलत होती. मंडळी चालत चालत बोलत, तर बोलण्याच्या भरांत एकाच जागीं तासचे तास उभी राहात. मी माझ्या मित्राबरोबर निरनिराळ्या घोळक्यांतून शिरत होतों. थोडथोडीं त्यांचीं बोलणीं ऐकत होतों. तो देखावा, तो सुधारलेला स्त्रीपुरुषांचा मिश्र—उत्साही समाज, त्यांचीं ती कुत्रीं, त्यांची माहिती, त्यांचें कौतुक पाहून आणि ऐकून माझें मन थक्क होत होतें. अचंबा वाटत होता.

एका घोळक्यांत, बॉब, टायगर, किंग, लूसी, रेमंड, टॉम, या झाडून साऱ्या परदेशी कुत्र्यांचीं रसाळ वर्णनें चालू होतीं. सगळ्यांत जास्त भरणा लॅपडॉगचा होता. जात आणि जीव लहान, नाजूक, अत्यंत भित्री. पण त्याचें कोण कौतुक चाललें होतें. श्रीमंतांच्या अशक्त आणि रोगट बायकांचें इतकें कौतुक कोणी करणार नाहीं, किंवा ललितवाङ्मयांतल्या लघुकथांचें आणि कवितांचें जसें लेखकांत आणि कविलोकांत कौतुक चालतें, त्याचबरोबर पमेरिअन्स, आयरिश टेरिअर, स्पॉनिअल आणि बुलडॉग यांच्या नांवांचाहि गाजावाजा करावयाला कांहीं वीर सरसावले होते. कादंबऱ्या, नाटकें, आणि काव्यें यांचे वाभाडे काढणारे चमचमीत टीकालेख, यांचेच वर्णन चालू आहे; असें आम्हांला तर थोडा वेळ वाटल्याशिवाय राहिले नाहीं.

दुसऱ्या एका घोळक्याकडे आमचें लक्ष वेधलें. कारण त्यांत एक साहेबी पोषाख केलेले तरुण मोठ्या आवेशानें सभोंवारच्या मंडळीकडे पहात व्याख्यानाच्या तऱ्हेनें बोलत होते. ते म्हणत होते; “ अरे आहे काय हें ? तुम्हांला कांहीं स्वाभिमान आहे कीं नाहीं ? परक्या कुत्र्यांचा कसला भरणा आपल्यांत चालविला आहे ! त्यांची आयात करतां ? त्यांना आपले म्हणतां ? गांवठी कुत्रीं आपलीं खरीं; ती मरतुकडीं झालीं, अन्नान्न होऊन पटापट मरत आहेत, त्यांना लूद भरत आहे. त्यांना सांभाळा. जगवा. त्यांची पैदास वाढवा. त्यांचें प्रदर्शन भरवा ! झाडून साऱ्या परदेशी कुत्र्यांवर बहिष्कार घाला. तुम्हांला टायगर आवडतो. पण आपल्या वाघ्याला कसे विसरलांत ! तुम्हांला इस्तंबुलीं कुत्रे प्यार झाले; पण तुम्हीं आपल्या खास देशांतल्या श्वानाला विसरलां. म्हणावें काय तुम्हांला परक्या कुत्र्यावर बहिष्कार घाला ! त्याशिवाय तुमचा तरुणोपाय नाहीं ! ” अहो पण महाराज प्रथम त्या गृहस्थांना थांबवून घोळक्यांतील एकानें विचारलें “ तुम्हींच परकीय कुत्र्यांची अवलाद आपल्यांत मोठ्या दिमाखानें आणून लोकप्रिय केलीत. हीच तेवढी अवलाद चांगली. बाकीच्या गचाळ असें भासविलेत ? आणि आतांच ही उपरति तुम्हांला कां झाली? आणि गांवठी कुत्र्यांबद्दल प्रेम कां आलें आहे ? परकीय कुत्र्यांवर बहिष्कार घालण्याची टूम काढण्याची लहर कां आली आहे हो ? ” दुसरे उपरणें सावरीत विचारते झाले तो “बहिष्कार घालणें सोपें आहे. पण; यशस्वी करणें फार कठीण आहे. बहिष्कार घालतों म्हणतां, त्यापेक्षां सुधारणा करतों म्हणा, तें आम्हांस कबूल आहे. ”

तिसरे सज्जन चष्मा वर खालीं करीत धिम्मेपणानें बोलले; “ गांवठी कुत्रीं काय आणि परकीं कुत्रीं काय—सारीं कुत्रींच ! परकी खरी. पण तीं आपल्यांत आलीं—तीं आपलींच झालीं. त्यांना पचवून टाकलें म्हणजे झालें ! त्यांना आपले रीतिरीवाज लावा; आपलें शिक्षण द्या. आपल्याला सर्वच कुत्रीं हवींत ! ”

ते साहेबी पोषाखाचे गृहस्थ मंडळीचा गिल्ला ऐकून जरा गांगरले, पण तशांतहि अवसान आणून त्यांनीं आपलें भाषण पुढें चालविलेंच, “ या परकी कुत्र्यांना मोटारी पाहिजेत. खुर्च्यांवर बसायला पाहिजे. यांना डॉक्टर लागतो. प्यायला ब्रँडीच्या बाटल्या लागतात. मस्का, स्लाईस-शिवाय आणि चहाखेरीज त्यांचें चालत नाहीं आणि उपयोग म्हणावा तर काडीचा नाहीं. मांजर पाहिलें तर हीं कुत्रीं मालकीणीच्या मांडीचा नाहींतर मालकाच्या मच्छरदाणीचा आश्रय करतात. मिजास राजाची आणि नांदणूक भिऱ्या भागूबाईची ! तेंच आमच्या गांठवी—देशी कुत्र्यांकडे पहा. तीं गाई—शेळीच्या दुधावर आणि शिळया भाकरीवर संतुष्ट असतात. बसायला त्यांना पटकुर, दरवाजांतला दगड, गंजीतल्या गवताची गादी त्यांना चालते. रक्षणाला दक्ष आणि धन्याशीं इमानी राहतात—परकीय कुत्र्यांना घरांत घेतलें-पाहुणेच शिरजोर झाले आणि घरचे मालक अन्नाला भीताद झाले. त्याकडे पहा, म्हणजे परकी कुत्र्यांवरील बहिष्कारांची माझी मोहीम किती महत्वाची आहे, हें आपल्या लक्षांत येईल. ” तें भाषण मला बरें वाटलें. आवडलें. देशी कुत्र्यांचा अभिमानी कोणी तरी आहे, आपल्या ‘ मोत्या ’ ला कुत्र्यांच्या प्रदर्शनांत मान मिळणार हा मला भरवंसा वाटूं लागला. तेथून फिरत दुसऱ्या एका घोळक्याजवळ जरा थांबलें त्यांत एक धिप्पाड गृहस्थ अगदीं आत्मविश्वासानें आपल्या, आणि आपल्या मित्राच्या, पमेरियन्स, आयरिशटेरीअर, आल्सेशन्स, स्पॉनिअल आणि बुलडॉग, यांच्या विषयीं बोलत होता. झिपऱ्या कुत्र्याच्या केंसावरून हात फिरवीत, तो खेळकर आणि खोडकर विनोदी कसा आहे, बुलडॉग विश्वासघातकी असला तरी पहाणाराला त्याची दहशत कशी असते टेरिअरचा रुबाब, एकाद्या जहागिरदारासारखा असा असतो आणि शहाणा पमेरिअन् आपल्या पोकळ गुरगुरण्यानेंच कशी भीति उत्पन्न करतो म्हणून तो आपणास आवडतो. हें तो आपल्या मिस्कील भाषेंत सांगत होता. कुत्र्यांची उपयुक्तता खरी कां त्याच्यापासून नुसती करमणूक खरी हा वाद घालण्यांत व तसेंच देशी म्हणून वाईट असले तरी तें प्रिय आणि विदेशी चांगले असले तरी अप्रिय समजणारे आपण नाहीं. दोन्हींचा मिलाफ असला तर उत्तमच. पण नसेल तर विदेशी असलें आणि तें खेळकर व जरा जास्त विनोदी म्हणून खोडकर असलें, तर तेंच मी जास्त पसंत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करीन. लोकांना आज त्याचीच जास्त आवश्यकता आहे ! असें ठांसून सांगत होते. तेंही ऐकलें. मग जास्त कांहीं आम्हीं हिंडलों नाहीं. उशीर झाला म्हणून परत फिरलों. जातां जातां आमच्या मोत्याला कुठली जागा देण्यांत आली आहे, तेवढें पाहिलें, आणि निघालों !

* * *

कुत्र्यांच्या जातीचा सखोल अभ्यास करणाऱ्या विद्वान व सन्मान्य अशा एका थोर विभूतीच्या हस्तें नेमल्या वेळीं कुत्र्यांचें प्रदर्शन उघडलें गेलें. समारंभ मोठा अपूर्व होता. सन्माननीय पाहुणे प्रदर्शनाच्या ठिकाणीं आपल्या परिवारासह उपस्थित झाले. त्यावेळीं प्रदर्शनाच्या व्यवस्थापकांनीं बँड वाजवून, खडी ताजीम देऊन सुंदर स्वागत केलें.

सहकुटुंब सहपरिवार, संस्थानिक, जहागिरदार, इनामदार, हे तेथें उपस्थित होतेच. त्यांनीं पाळलेलीं कुत्रीं प्रदर्शनांत आणलेलीं होतीं. त्यांची व्यवस्था ठेवायला, त्याच्याबद्दलची माहिती सांगावयाला त्यांचा नोकरवर्ग तयार होता.

माझा 'मोत्या' कोणावर गुरगुरून त्यास त्यानें भिवऊं नये, म्हणून त्याला मी सांखळीनें चांगला बांधला होता. प्रचंड, अपरिचित, नटल्या थटलेल्या स्त्री पुरुषांचा समाज पाहून नंतर त्याला बरें वाटलें. तोही कान टवकारून व ऐटीनें मान वळवून त्याला पहावयाला येणाऱ्यांचें स्वागत करून पाहणारास आनंदवूं लागला. तें पाहून मला बरें वाटलें.

प्रदर्शन उघडतांना सन्मान्य पाहुण्यांनीं व्यासपीठावरून जें भाषण केलें, तें विद्वत्ताप्रचुर, त्यांचा व्यासंग दाखविणारें, व कुत्र्यांच्या जातीवरील नितान्त प्रेमाचें दर्शक असेंच झालें. त्यांनीं वेदकालापासून तों तहत आज घटकेपर्यंतच्या कुत्र्यांची खूप माहिती सांगितली. वेदकालांत प्रथम वैवस्वत मुनींनीं श्याम-शबल या कुत्र्यांच्या दुकलीला जन्म दिला ती हकीकत, पुराण कालीं विश्वामित्रानें मेनकेकरितां कां होईना, पण कुत्र्याचें स्वरूप धारण करून कुत्र्याच्या जातीला श्रेष्ठपदाला चढविलें याचेंहि वर्णन केलें. (त्या वेळेपासून स्त्रियांना कुत्रीं आवडूं लागलीं. त्याही कुत्रीं पाळूं लागल्या. ती चाल आज तागायत आहे, हें आपल्याला दिसून येतच आहे ! असें विनोदी भाषणहि केलें.) प्रेक्षकांत त्या विनोदानें एकच हास्याचा कल्लोळ उठला. खंडोबानें कुत्रीं पाळून आणि श्रीदत्तात्रयांनींही कुत्र्यांना जवळ करून त्या जातीला मानानें स्थान दिलें व जगाला दाखवून दिलें कीं कुत्रा हा अत्यंत आनंद व सौख्य देणारा प्राणी आहे.

इतिहासकालांतील श्रीशिवाजी महाराजांच्या "वाघ्या" या आदर्श कुत्र्याचा, मोठ्या अभिमानानें उल्लेख करून, वक्त्यांनीं इतिहास—विषयाला रजा घेऊन वक्ते अर्वाचीन-वर्तमानाकडे वळले. देशी आणि विदेशी कुत्र्यांसंबंधीं त्यांनीं खूपच खूप माहिती रसाळवाणीनें निवेदन केली ! देशी कुत्र्यांबद्दल योग्य अभिमान व्यक्त केला. विदेशी कुत्र्यांबद्दलही चांगलाच आदर प्रकट केला. कुत्रीं बाळगण्याची, त्याच्याकरितां लागेल तो खर्च करून झीज सोसण्याची हौस आपल्याकडे वाढत आहे. श्रीमंतांपासून गरीबांपर्यंत व स्त्रियांपासून कोंवळ्या पोरांपर्यंत कुत्रें पाळण्याची प्रथा जारीनें पडत आहे हें पाहून जापल्ला अत्यंत आनंद होत आहे, असें म्हटलें. कुत्र्यांवरील प्रेम किती वाढलें आहे, याचेंच दृश्यफल म्हणजे आजच्या सारखीं कुत्र्यांचीं प्रदर्शनें आपण भरवूं लागलों आहोंत; आणि अशींच तीं पुढें वाढत्या प्रमाणांत ठिकठिकाणीं भरूं लागतील. व तीं अवश्य भरावींत असें सांगून टाळ्यांच्या प्रचंड कडकडांत वक्त्यानीं आपलें भाषण संपविलें. भाषण संपतांची वक्त्याचीं वाक्यें " मी हें माझ्या हस्तें प्रदर्शन मोठ्या आनंदानें उघडीत आहें; हा थोर मान मला आपण देऊन माझ्याकडून आपली व कुत्र्यांची सेवा करविलीत, याबद्दल मी आपणां सर्वांचा अत्यंत आभारी आहें " हीं होतीं.

नंतर सन्मान्य पाहुण्यांना प्रदर्शन फिरून दाखविण्यांत आलें. त्यांच्या पाठीमागून जाणारांची खूप गर्दी होती. पाहुण्यांनीं किती तरी स्टॉल्स पाहिले. कुत्रीं, कुत्र्यांची व्यवस्थाहि पाहिली. किती तरी स्टॉल्सवर स्त्रिया उभ्या होत्या. त्या आपल्या कुत्र्यांची व्यवस्था चोख ठेवण्यांत दक्ष होत्या. कांहीं कुत्र्यांना गाद्यागिरद्या देण्यांत आल्या होत्या. उन्हानें तीं नाजूक कुत्रीं धापा टाकीत होतीं. त्यांना त्यांच्या जवळच्या श्रीमंत आणि नाजूक तरुणी वारा घालीत. मधून मधून बाटलींतील दूध त्यांनीं पाजीत; आणि तसेंच वाटलें, तर डॉक्टरांनाहि आपल्या कुत्र्याची तब्येत दाखवीत.

पाहुणे ज्या कांहीं स्टॉल्सवरून हिंडले, तें पाहून त्यांना फार आनंद झाला. टिन्-टिन्च्या कुळांतलीं कुत्रीं स्टॉलसवर पाहून त्यांनीं आपलें विशेष समाधान व्यक्त केलें. कांहीं कांहीं कुत्रीं पाहुण्यांकडे पाहून अगदीं ओळखल्याचा भाव दाखवून आपली शेंपटी हलवून-गोंडा घोळून चमत्कार पाहून मला मोठा आनंद झाला ! पाहुणे फिरून थकले. त्यांच्या जवळच्या मंडळींनीं जास्त तसदी पडूं नये म्हणून त्यांना विश्रांति स्थानी परत नेले.

माझा 'मोत्या' बांधला होता, तेथपर्यंत पाहुणे आले नाहींत. त्यांनीं त्याला पहावें अशी फार माझी इच्छा होती. पाहातील अशी खात्री होती. पण तें झालें नाहीं. मला किंचित् वाईट वाटलें. श्रीशिवाजी महाराजांच्या 'वाघ्या'चा ज्यावेळीं पाहुण्यांनीं आपल्या भाषणांत उल्लेख केला होता, त्यावेळीं जणूं काय माझ्याच 'मोत्या' चा त्यांनीं गौरव केला आहे, असें वाटून माझ्या आंगावर मूठभर मांस चढलें असें मला वाटून जितका आनंद झाला, तितकीच निराशा शिवाजीमहाराजांच्या 'मोत्या' चाच वंशज मी बाळगला असून तो त्यांनीं पाहिला नाहीं, म्हणून माझी निराशा झाली आणि मला वाईट वाटलें !

* * *

प्रदर्शनाची धामधूम दोन दिवस चालली होती. तें उघडल्यावर पाहण्यासाठीं शहरवासीयांची अलोट गर्दी एक सारखी तिकिटें काढून लोटत होती. हजारों प्रेक्षकांनीं 'मोत्या' ला पाहून आपला आनंद प्रकट केला होता. मोठें उमदें जनावर आहे. अशीच पैदास पाहिजे, असे धन्योद्गार काढल्याचें मी अनेकदां ऐकलें होतें. मात्र तेवढयानेंहि बरें वाटलें !

प्रदर्शन सामितीनें सन्मान्य पसंतीचा छाप मारून प्रदर्श कुत्र्यांच्यां गळ्यांत ' recommended ' ' High ed' ' Rewarded ' अ लावल्या. त्या त्या कुत्र्यांचा झाला.अशा कुत्र्यांकडे जनता ज हलनें व प्रेमानें पाहूं लागली. पहाणारांस असेंहि दिसून आलें ठराविक—ज्यांनीं पाहुण्यांना पा हलवून त्यांचें स्वागत केलें त्यांच्याच गळ्यांत वरील चिठ्या विल्या गेल्या आहेत !

प्रदर्शनसमाप्तीच्या वेळीं सन्मा येत होते. गौरव नाहीं तर नाहीं; प मोत्या त्यांनीं नुसता पहावा मी जरा धाडस करून पाहुण्यांना झालों; त्याचें लक्ष माझ्या मोत्या विण्याचें धाडस केलें. त्यांनीं मोत्याकडे आपली दृष्टी वळविली. गुरगुरत होता. पाहुण्यांचें स्वागत पण पाहुणे घाबरले. त्यांना वाटलें, कुत्रा आपला लचकाच तोडीत आहे मुद्रा फिरली आणि संतापून तेथें मोत्यावर गोळी झाडली ! स ऐवजीं मोत्याला सन्मानीय पा बक्षीस दिलें ! पाहुणे विजयी मु चालते झाले ! मी मात्र धांवत माझ्या 'मोत्या' जवळ गेलों !

* * *

मी ' मोत्याला ' प्रदर्शनाला त्तची हकीकत माझ्या बायको होतेचि प्रदर्शनाला गेलों कसा आ मोत्या ' ला घेऊन आलें कोणत्या स्थितींत ? प्रदर्शनांतली सर्व बायकोला जशी घडली तशीच सां—

माझ्या बायकोला आपल्या 'कु कौतुक झालें नाहीं म्हणून कांहीं वाटत नव्हतें. पण त्याच्या जि बेतली म्हणून ती डोळ्यांतून गाळीत होती.

मला मनांतून दुःख झालें, तें कुत्र्याच्या जातीवर अत्यंत प्रेम म्हणून, कुत्र्यांच्या धन्यांनीं मोठ्या नानें त्याला प्रदर्शन उघडण्याचा मान दिला; त्यांनींच ' मोत्या ' चे गुरण्याचा खरा अर्थ समजावून निर्दयपणानें त्याला गोळी घातली

प्रदर्शनांत मोत्यासारख्या देशी कुत्र्याला पुन्हां केव्हांही नाहीं. जळो तो मान. पण त्याच्या धोका नको. असें मी व भाझ्या त्याच वेळीं ठरवून टाकलें.

आम्हीं मोत्याला बाहेर आलों. वैद्यूच्या उपचाराचा बराच परिणाम होता. ' मोत्या ' जगणार हें पाहून ला त्रिभुवनांत मावेना इतका होऊन गेला.

जेव्हां आपल्या स्वतांकरितां किंवा आपल्या रोग्याकरितां औषधें खरेदी करतां तेव्हां आपण साहजिकच विक्रेत्याच्या प्रसिद्धीकडे लक्ष देतां. होमिओपाथिकची औषधें म्हटलें म्हणजे असें हटकून होतें.
होमिओपाथीच्या क्षेत्रांत ' रॉय आणि कंपनी 'नें चांगला टिकाव धरून आज जवळ जवळ पन्नास वर्षे ती त्या क्षेत्रांत वावरत आहे.
तेव्हां त्याच कंपनीकडून औषधें विकत घेऊन आपलें हित साधा.
कारण
बोरिक आणि टफेल कंपनी फिलाडेल्फियाचे
मुंबई-इलाख्याचे मुख्य एजंटस्—
रॉय आणि कंपनी होमिओपाथस् १७६ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई
" यांचींच औषधें सर्वोत्कृष्ट असतात "
विशेष माहितीसाठीं लिहा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डी लहान लहान स्टेशनांवर थोडा वेळ थांबत होती आणि पुन्हां चालू होती. दुपारचीच वेळ असल्यामुळें न्हामुळें उकाडत होतें तरी घांटां- निसर्गाचें रम्य देखावे पाहून मला समाधान वाटत होतें. लांबच लांब सरलेल्या डोंगराच्या रांगांमधून आढळणारी ती हिरवळ आणि मोठीं झाडें, खालीं दऱ्यांमधून पसर- पिंवळी शेतें–तेथें मधूनच क्वचित् डणारीं माणसें आणि गुरेंढोरें, निरभ्र निळें आकाश! निदान मी देखावा पहाण्यामध्यें रंगून गेलों कदाचित् घांटांमधून प्रवास कर- माझी ती पहिलीच खेप होती. म्हणून शी परिस्थिति झाली असेल. पण त रंगलों असतांना दुसऱ्या एका मुळें माझें लक्ष तेथून उडालें. या त्या डब्यामध्यें एका कोपऱ्यालाच दक्षिणी मंडळी त्या वेळेस गप्पा मार- रंगून गेली होती. प्रथम मीं त्यांच्या- ाणूनबुजूनच दुर्लक्ष केलें होतें, परंतु माझ्या आवडीचे कांहीं शब्द संभाषणामध्यें वारंवार येऊं लाग- ळें मी आतां विशेष लक्षपूर्वक त्यांचें ण ऐकूं लागलों. गाडीमधील त्या मारणाऱ्या कंपूखेरीज व माझ्याखेरीज ीं झोंपेची आराधना करण्यास त केली होती–त्यामुळें गाडीच्या ज्ञाखेरीज तेथें शांतताच पसरली

ा कंपूपैकी कोट काढून ठेविलेला, ाला चष्मा लाविलेला आणि केंस वसविलेला एक तरुण बोलत ां—

तुम्ही कांहीं म्हणा—आजच्या काळांत ीजवळ सौंदर्य आणि सरस्वती हीं आहेत, तिला काय करतां येणार ?' त्यावर एक मध्यम वयाचा गृहस्थ या डोक्यावरील टोपी हातामध्यें िनें वारा घेत म्हणाला—

हो—हें बाकी खरं आहे—समाज- याचा काय किंवा राजकारण काय, कोण- ' च्ये क्षेत्रांत ती वाटेल ती कामगिरी करून वूं शकेल. युरोपच्या राजकारणांत महारीनें केलेली कर्तबगारीच लक्षांत ना ?'

या गृहस्थाचीं हीं वाक्यें पुरीं होतात ोतात, तोंच अंगांत खादीचा संदरा लेला, व डोक्यांत खादीचीच टोपी अडक- ला एक खादीभक्त खिडकीमधून आप- तोंडामधील पानाची पिचकारी टाकीस गाला—

'दोन तलवारी'

लेखकः—प्रभाकर तुकाजी दिवे.

' तें कशाला पाहिजे–आमच्या गांधीची चळवळ एवढी फोंफावयाला सुंदर स्त्रियाच कारण झाल्या नाहींत तर काय ?'

ह्यावर केंस पांढरे शुभ्र झालेला–तोंडाला सुरकुत्या पडलेला—अंगांत लांब डगला घातलेला एक वृद्ध बोलूं लागला—

' मित्र हो ! ' तो गृहस्थ वृद्ध दिसत असला, तरी त्याच्या अंगांत उत्साह एखाद्या तरुणाचाच होता—आपल्या शेजारच्या गृहस्थाच्या पाठीवर थाप मारून तो पुढें बोलूं लागला—' ह्या तुमच्या साऱ्या गोष्टी जरी खऱ्या असल्या, तरी ज्यांच्याजवळ सरस्वतीहि आहे आणि सौंदर्यदेखील आहे, अशा किती स्त्रिया तुह्मीं पाहिल्या आहां–?'

ह्या प्रश्नानें तेथील बहुतेकांनां घोंटाळ्या- मध्यें टाकलें. परंतु त्या तरुणाच्यानें स्वस्थ बसणें शक्य नव्हतें. आपल्या आसनावरून पुढें सरसावित तो तरुण गंभीरपणें त्या वृद्धाला म्हणाला—

' म्हणजे–? सौंदर्यवान स्त्रिया बुद्धिवान् नसतात, असं तुम्हांला म्हणायचं आहे कीं काय ?'

' होय—!'

तो वृद्ध शांतपणें म्हणाला.

यावर तो मध्यम वयस्कर गृहस्थ त्या तरुणाकडे पहात, जरा बेफिकीरीनेंच म्हणाला—

' एकंदर स्त्रिया जात्याच धूर्त आणि मतलबी असतात. ' त्यावर पुनः तोच वृद्ध त्या गृहस्थाला समजावण्यासाठींच म्हणाला—

' एकंदर स्त्रिया जात्या धूर्त आणि मतलबी असतील. परंतु एकंदरींत साऱ्याच स्त्रिया बुद्धिवान् असणें कठीण आणि त्यांतल्या त्यांत सौंदर्यवान् स्त्रीया बुद्धिवान् सांपडणें तर महा कठीण ! '

पुन्हां तो तरुण नापसंती दर्शवित म्हणाला.

' आपणाला मुळींच पटणार नाहीं तुमचं म्हणणं. आपल्या अभिनयामुळें साऱ्या जगाला स्तिमित करणाऱ्या ग्रेटा गार्बो, मार्लीन् डिट्रीच यांच्यासारख्या सौंदर्यसम्राज्ञा काय कमी बुद्धिवान् आहेत ? अथवा आपल्या नृत्यकलेनें साऱ्याच जगाला मोहून टाकणाऱ्या मेनका–रागिणी यांसार- रख्या सौंदर्यसम्राज्ञा काय कमी बुद्धिवान् म्हणावयाच्या–? '

त्या तरुणाचें म्हणणें पुरें होण्यापूर्वीच तो वृद्ध हस्ताभिनय करीत म्हणाला.—

' हं–थांबा–थांबा–इथं तुम्ही नवा घोंटाळा उपस्थित करीत अहां. सुंदर स्त्रिया कलावंत नसतात, असं मीं कधींच म्हटलं नाहीं आणि म्हणणारहि नाहीं. उलट वेळ आलीच तर मी असं देखील म्हणेन, कीं प्रत्येक सुंदर स्त्री कोणत्या ना कोणत्या तरी कलेंत अगदी पारंगत असते. पण इथं मी म्हणतोय कीं सुंदर स्त्री बुद्धिहीन असते–नव्हे बुद्धिवान् नसते !'

यावर कांहीं वेळ तेथें स्तब्धता पसरली होती. कांहीं वेळानंतर तो वृद्ध त्या स्तब्ध- तेचा भंग करीत म्हणाला—

' तुम्हांला याचा अनुभव नसला तरी मला आहे. आजपर्यंतच्या माझ्या आयु- ष्यांत कीती तरी अशा प्रकारचीं उदाहरणं आहेत माझ्या समोर '

" मग सांगा, कीं एखादं, दुसरं उदाहरण आम्हांला—"

तो तरुण मोठ्या उत्सुकतेनें म्हणाला.

' तुमची ऐकायची इच्छाच असेल, तर मला सांगायला काय--?' तो वृद्ध आपल्या हातामधील ' केसरी 'नें वारा घेत घेत म्हणाला–' पण मी उदाहरण सांगतोस तें अलिकडचें नाहीं हं. फार नाहीं तरी दहा पंधरा वर्षांपूर्वीचें असेल. रेल्वेचाच मी नोकर असल्यामुळें फुकटांत मी हिंदुस्थान- मधील किती तरी शहरें पाहिलीं आहेत कीती तरी ठिकाणीं मी राहून आलों आहे. त्यामुळें नाना ठिकाणच्या नाना प्रकारच्या लोकांचा मला चांगलाच अनुभव आहे. त्यावेळीं वऱ्हाडमध्यप्रांताच्या त्या बाजू- लाच मी फीरतीवर होतों. एका गांवामध्यें दोन तीन महिने रहाण्याचा मजवर प्रसंग आला होता. त्या गावामध्यें एक दक्षिणी सावकार रहात असत. जमीनदार असल्या- मुळें ते अगोदरच पैसेवाले होते आणि त्यांत ते सावकारी करीत असत. जबर व्याज देऊन शेतकऱ्यांना फसविण्यांत आणि कर्ज परत न मिळाल्यास त्या शेत- कऱ्यांच्या जमीनी लुबाडण्यात ही स्वारी मोठी वस्ताद. त्यांची भेट घेण्याचा एकदां माझ्यावर प्रसंग आला आणि त्याप्रमाणें मी त्यांची भेट घेतली देखील. त्यावेळीं मी त्यांना समजविण्याचा प्रयत्न कीं " तुमची वाडवडिलार्जित मिळकत भरपूर असतांना आणखीन शेतकऱ्यांना जबर व्याज देऊन त्यांना हैराण करण्यापेक्षां त्यांना सोपं जाईल अशा कांहीं योजनेनं त्यांना तुम्ही कर्जाऊ रक्कमा कां देत नाहीं ! बिचाऱ्या शेतकऱ्यांचा निढळाचा पैसा घेऊन आणखीन् पापाचे धनी कशाला होतां तुम्ही ! " पण त्या गृहस्थाला काय पटणार तें ? त्यांनीं माझी एकाच वाभ्यानें संभावना केली—' तुमच्या- सारख्या निर्धन लोकांना यांतलं कांहीं देखील कळायचं नाहीं—कारण तुमचा तो प्रांतच नव्हे ! ' यावर मीं कांहीं न बोलतां स्तब्धच राहिलों. ह्या त्याच्या भेटींत एक गोष्ट मात्र प्रामुख्यानें माझ्या नजरेंत भरली, आणि ती म्हणजे त्या गृथस्थाची पत्नि अतिशय स्वरूपवान् होती हीच होय ! त्याच्या पत्नी- इतकी सुंदर स्त्री मीं माझ्या साऱ्या आयु- ष्यामध्यें पाहिलेली नव्हती. पण कोणत्या प्रकारच्या अवयवांच्या स्त्रीला ' सुंदर ' म्हणावें यासंबंधीं जरी नियम असले आणि ते नियम कलावंताशिवाय फारसे कोणाला ठाऊक नसले, तरी ती स्त्री अतिशय सुंदर होती असें कोणींही कबूल केलें असतें. भरपूर संपत्ति आणि अशी सौंदर्यवान पत्नि–तो गृहस्थ अतिशय सुखी असला पाहिजे, अशी माझी खात्री होऊन चुकली आदर्श जोडपें म्हणून मीं त्यांच्याकडे बोट दाखविलें असतें त्या वेळीं. बऱ्याच वेळां मी बांधलेले अंदाज अगदीं अचुक ठरलें होतें. परंतु या खेपेस मात्र जवळ जवळ चुकलों असें म्हणावयास हरकत नाहीं कारण मी तेथें बसलों असतांना त्याच्या व त्याच्या पत्नीच्या अशा कांहीं हालचाली माझ्या नजरेखालून गेल्या, कीं त्यामुळें आपण आपलें मत बदलावें असेंच मला वाटूं लागलें. तो गृहस्थ सुखी नसावा अशी कल्पना करूनच मीं त्याची रजा घेतली. नंतर मी त्या गृहस्थासंबंधीं माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला. त्यावरून मला असें आढळून आलें, कीं आपल्याला सुंदर पत्नि मिळावी, असा त्या गृहस्थाचा अगदीं पहिल्यापासून मोठा कटाक्ष होता. सुंदर पत्नि मिळाल्याशिवाय मी लग्न करणार नाहीं असा त्या गृहस्थाचा निश्चयच होता! आणि सुंदर पत्नि मिळवून त्यानें आपला निश्चय पारहि पाडला होता. परंतु आतां लग्नानंतर त्याला आढळून आलं होतं कीं पत्नि नुसती सुंदर असली म्हणजे संसार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुखाचा होत नाहीं. तिच्यामध्यें आणखी कोणत्या तरी गुणाची आवश्यकता असते; आणि त्या गुणामुळेंच संसार. सुखाचे होत असतात. शालीमार—त्या गृहस्थाला आतां आपण शालीमार या नांवानें संबोधूं. आणि त्याच्या सुंदर पत्नीला आपण लता म्हणूंन चालूं लतेजवळ सौंदर्याखेरीज दुसरा कोणताच गुण नव्हता. एवढेंच काय, परंतु आपल्या पतीला आनंदी ठेविण्याचा सर्वसाधारण स्त्रियांजवळ असणारा गुणदेखील लतेच्या ठिकाणीं नव्हता. लतेचें शिक्षण झालें, परंतु तें अगदींच जुजबी. जगामध्यें चालूं असलेल्या घडामोडींसंबंधींची माहिती समजून घेण्याची कुवत तिच्या अंगांत नव्हती, अथवा निरनिराळीं पक्वानें करून पतीला खूष ठेविण्याची कला देखील नव्हती तिला अवगत. आणि म्हणूनच शालीमार नाखूष होता—तिच्यावर—! ह्या असमाधानाच्या धुरामधून लवकरच कधीं तरी अग्निज्वाला बाहेर पडणार, अशी माझी खात्री झाली होती. कारण आतां शालीमार फारसा घरामध्यें राहिनासा झाला होता. बहुतेक वेळ तो पुण्यामुंबईच्या फेऱ्या करण्यांतच तो अलिकडे घालवूं लागला होता. भोळी लता—तिनें या वेळींच मोठ्या सावधगिरीनेंच वागावयास पाहिजे होतें. या वेळींच तिनें आपल्या वर्तणुकीनें पतीस घरीं रहावयास भाग पाडलें पाहिजे. ती वेळ मोठी नाजुक आणि महत्त्वाची होती. त्यावेळीं जर लता समयसूचकतेनें वागली असती तर—? पण प्रत्येकाच्या आयुष्यामधील असें 'तर' काढून टाकलें, तर त्यांच्या आयुष्यामध्यें सुखाखेरीज काय आढळेल आपल्याला? शालमार अलिकडे घरांत रहात नाहीं, तो पुण्या—मुंबईच्या बऱ्याच वाऱ्या करूं लागला आहे. यावरून मी स्वतांची पुसट अंधुक अशी कल्पना करून ठेविली होती; आणि दुर्दैवानें ती खरी ठरली. तो 'बाहेरख्याली झाला असला पाहिजे' अशी नव्हती मी स्वताची कल्पना करून घेतली, पण तें सारं सांगण्यापूर्वी लता कोणत्या स्थितींत होती तें लक्षांत घेतलं पाहिजे. संपत्तिमान पति. मिळाला म्हणून लता मोठ्या आनंदांत होती. तिला तरी आणखीन काय पाहिजे होते? "पैसा असल्यावर आणखी काय पाहिजे—पैसा असल्यावर कोणतं सुख आपल्या उपभोगतां येणार नाहीं असं आहे?' तिची खात्री होती, कीं "चांदीच्या रुपयांचा छन् छन् असा आवाज ऐकला, कीं सबंध जगामधील सारीं सुखं आपल्या पायांपाशीं नाचूं लागतील आणि दासी-मारनें घरामधील तिजोऱ्यांच्या किल्ल्या तिच्या हातामध्यें देतांच तिच्या त्या कल्पना अधिक दृढ झाल्या! शालीमार बाहेरगांवीं गेला कीं, साऱ्या घराचा खर्चवेंच ती स्वताच करीत असे. त्यावेळीं ती मनाला वाटेल तसा पैसा खर्च करी. पण बिचारील काय माहीत, कीं संसारामधील सुख जर पैशानें प्राप्त होत असतें, तर संसारसुखासाठीं तडफडत असलेले कित्येक लक्ष्मीपुत्र आज तसे दिसले नसते, पैशाच्या श्रीमंतीनें जर बाह्य जगामधील सुख प्राप्त करतां आली तर हृदयाच्या श्रीमंतीनें संसारामधील नव्हे व्यक्तीव्यक्तीच्या आयुष्यामधील बहुमोल सुखें प्राप्त होऊं शकतात, हें लतेला कोण सांगणार!

जी गोष्ट कधीं घडणार म्हणून मी आतुरतेनें वाट पहात होतो नव्हे जी गोष्ट शक्य तितक्या लवकर घडून यावी, म्हणून मीं इच्छित होतों, ती एका सुंदर सकाळीं घडून आली. बरेच दिवस मुंबईस कांहीं कामाकरतां गेलेला शालीमार एका नव्या स्त्रीसह आपल्या घरीं अचानक हजर झाला. ती नवीन स्त्री कोण हें मला जरी सांगायला नको होतें, तरी गांवामधील इतर लोकांना तें सांगायला हवेंच होतें, आणि 'ही माझी लग्नाची दुसरी बायको' असें सरळ शालीमारनें आपल्या गांवकऱ्यांना सांगितलें. त्यावेळीं बहुपत्निकत्वाची चाल आपल्या हिंदुसमाजांत रूढ होती असें मुळींच नव्हे. शालीमारनें पहिली बायको हयात असतांना दुसरें लग्न केलेले पाहून साऱ्या गांवाला धक्का बसला. आणि कित्येकांनी त्याबद्दल शालीमारलां दोष दिला, तर कित्येकांनीं त्याच्या कृत्याचें समर्थन केलें कीं—'शालीमारनें केलें तें योग्यच केलें, पहिल्या पत्नीपासून जर त्याला सुख होणें अशक्य आहे असें दिसत होतें, तर काय त्यानें आंधळेपणानें आपलं आयुष्य दुःखांत काढायचं! शिवाय विवाह वैयक्तिक प्रश्न आहे आणि व्यक्तीच्या सुखाची जबाबदारी जर समाज आपल्या अंगावर घेत नाहीं, तर प्रत्येक व्यक्तीनें आपल्या मगदुराप्रमाणें आपल्यास वैयक्तिक सुख कशापासून अधिक मिळेल, त्याकडे कां पाहूं नये आणि त्याप्रमाणें कां वागूं नये?'

लोकांच्या या अनुकूल आणि प्रतिकूल टीका बाजूला ठेवून शालीमारची व लतेची परिस्थिति आतां कशी, काय झाली होती, तें पहाणेंच आवश्यक! शालीमार आतां निरनिराळ्या गोष्टींमध्यें तिच्या आवडी निवडीची विचारपूस करूं लागला होता. तिला शक्य तें ज्या प्रकारानें सुखी राहील त्या प्रकारानेंच वागण्याचा तो प्रयत्न करीत होता आणि त्याच्या नव्यापत्नीशी—पुष्पाशीं-तो प्रेमळपणानेंच वागत होता. शालीमार जरी लतेशीं अशा प्रकारें सहानुभूतीनें वागत होता, तरी लता मात्र त्याच्या ह्या एकंदर वर्तनाविषयीं पूर्ण बेफिकीर होती. आणि पुष्पा ती जरी शिकली सवरलेली होती आणि लतेशीं प्रेमळपणानें वागण्याची शालीमारला तिनें कितीहि वचनें दिलीं असली, तरी मनांतल्या मनांत ती तिचा द्वेषच करीत होती. वरकरणीं लतेजवळ मोठ्या प्रेमळपणाचा आव आणी ती, त्यामुळें शालीमारला जरा बरें वाटे—आणि लतेचे कांहीं प्रसंगींचें सहानुभूतीचें आणि सोशीक पणाचें वर्तन पाहून तो आपल्या भावि आयुष्यामधील सुखाचे इमले उभारी. बिचाऱ्याला कल्पना नव्हती कीं हे त्याचे इमले शेवटीं वाऱ्यावरचे वाऱ्यावरच विरून जाणार होते. त्याच्या घरामधील ती शांतता वादळा पूर्वीची होती! आणि एक दिवस आम्हां गांवकऱ्यांना अनपेक्षित अशी बातमी ऐकावयास मिळाली---

'रात्रीं लतेनें विहीरींत उडी मारून आत्महत्या केली!''

सारे गांवकरी त्या बातमीनें स्तिमित झाले. कित्येकांना त्या बातमीमुळें अतिशय वाईट वाटलें—कित्येकांनी अश्रु ढाळले आणि कित्येकांनीं तर्ककुतर्क करावयास सुरवात केली. पण लतेनें मात्र आत्महत्या करण्यापूर्वीं एक पत्र मागें लिहून ठेविलें होतें—

'माझ्या आत्महत्येची जबाबदारी सर्वस्वी माझ्यावर कोणाच्याहि त्रासाला जाचाला—अथवा कोणाच्याहि वागणुकीला कंटाळून मी हें केलेलें नाहीं.'

'लता'

हं—संपली माझी गोष्ट—!'' तो वृद्ध एक मोठा सुस्कारा सोडीत म्हणाला व त्यानें परत आपल्या हातामधलि 'केसरी' नें जोरजोरानें वारा घेण्यास सुरवात केली.

'पण काय हो? तो मध्यम वयाचा गृहस्थ मोठ्या उत्सुकतेनें विचारूं लागला- ''एक बायको जिवंत असून दुसरी बायको त्यानें केली, त्यावेळीं गवगवा कसा झाला नाहीं लोकांमध्यें? आणि आतां त्या प्रकारचें दोन चार विवाह झालें, तर केवढा गवगवा झाला त्याबद्दल—?'

'कारण आहे त्याला—' तो वृद्ध वारा घेणें थांबवित म्हणालाः--'अहो ज्या वेळीं शालमारानें मुंबईला दुसरा विवाह केला त्या वेळीं तेथें असहकारितेच्या चळवळीची कोण धामधूम उडाली होती—देशाभिमानाची एक मोठी लाटच आली होती—तेथें असल्या बारीक सारीक गोष्टींकडे लक्ष कसें वेधणार—! आणि दुसरी गोष्ट अशी कीं आतां अलिकडे अशा प्रकारचा विवाह जो प्रथम केला, तो एका विद्वानांनींच आणि विद्वानांनींच त्याची प्रथा

पुढें चालविली आहे. मग का
मानपत्रांमधून गवगवा होणार

'कां—हो—पण एक गोष्ट
विचारायची आहे—' तो
आपण ह्या म्हाताऱ्याला निरू
अशा अभिनिवेशामध्यें कि
कीं तुम्हीं हें जें उदाहरण
कशासाठीं—? सौंदर्य आणि
स्त्रीच्या ठिकाणीं सहसा आढ
सिद्ध करण्यासाठीं होय ना
तुम्हीं असंच सिद्ध केलंत या उद्दे
सौंदर्य आणि बुद्धि एका ठिकाणीं
शकतात म्हणून. कारण तुमच्या
वर्तन एखाद्या सूज्ञ आणि
शोभण्यासारखेच आहे.
कुढत बसून दुःख करीत जगण्या
साऱ्या घरभर केवळ आपल्या
सिन्यांचें वातावरण पसरवू
पतीला आयुष्यभर दुःख
देण्यापक्षां—आपण दुसराच
शोधून काढावा, असें तिला
त्या मार्गानें ती गेली तर
तिची—?

'त्यांत तशा प्रकारें वागण्यां
केली—शहाणपणा दाखविला—
केला, हें ठरविणें प्रत्येकाच्या
वर अवलंबून राहील. परंतु
वाटतं, कीं तिनें ती मूर्खपणा के
जीविताची किंमत तिला
स्वताच्या जीवावर उदार
कोणत्याहि परिस्थितीमध्यें
अयोग्य आहे. प्राप्त परिस्थिति
ती कीतीही खडतर असो,
डीच्या मार्गानें बाहेर पडून
जाला आदर्शभूत होऊन
आणि कोपतांच मागें सुचला ना
स्वताच्या जीवावर उठणं निराळं

त्या वृद्धानें परत आपलं म्हणणं
आणि गाडींत पुन्हां शांतता
गाडीच्या चाकांचा खाडू खाडू
जच काय तो त्या शांततेचा
होता—

मी शेजारीच पडलेल्या
लेखकाच्या नव्या कादंबरीचें
रण उघडलें, त्या प्रकरणाला
आलें होतें—'एक म्यान आणि
वारी.' माझ्या मनामध्यें विचार
खरोखर स्त्रीला जर म्यान म्हटलें
आणि सौंदर्य ह्या दोन तलवारी
म्हणावयास हरकत नाहीं.'

आणि मी शून्य दृष्टीनें गाडी
कीबाहेर पाहिलें—निसर्गाची
हृदयें मागें टाकीत गाडी पुढें चा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पतिता कीं पतिव्रता ?

लेखिका—सौ. कृष्णाबाई मुळे

लोकांचे अर्ज लिहून देण्याच्या व्यवसाया वरच आमचे अण्णा आपला …च सुखासमाधानानें चालवीत असत …यदा आणि व्यवहार यांच्या दूरदर्शीच्या …वा भावी परिणामाच्या चौकस विचार…णीनें आणि कांटेतोल शब्दयोजनेनें …कम्च्या कोर्टकचेऱ्यांशीं संबंध …ारी सर्व तऱ्हांचीं खतेंपत्रें लिहिण्यांत …मचे अण्णा पूर्ण वाकबगार होते. त्यांनीं …हिलेल्या एकाद्या खरेदीपत्रांत, गहाण…ांत, भाडेपट्ट्यांत अथवा एकाद्या कर्ज…यांत मागाहून कांहीं भानगड निघाली …यामुळें अशाप्रकारचा दस्तऐवज लिहून …णाऱ्याची किंवा देणाऱ्यांची नुकसानी …ली, व या सर्व नुकसानीची तोहमत …णांवर आली, असें उदाहरण अण्णांच्या या २५ वर्षांच्या व्यवहारांत एकदांहि …न आलें नव्हतें व त्यामुळें कागदपत्र …हून घेणारे खुद्द आमच्या शिरूर गांवां…ल व तालुक्यांतील सारे लोक अण्णां…ाच सल्लामसलतीप्रमाणें वागत होते.

साध्यासुध्या बोटखतापासून तों तहत …तिशय गुंतागुंतीच्या व्यवहाराविषयींचे …ळ्या प्रकारचें कायदेशीर करारमदाराचे …वादपत्र लिहिण्यांत पुरेपूर तरबेज आणि … दिवसांचे अनुभवी असा आमच्या …णांचा नांवलौकिक होता, आणि हा …पला उदरनिर्वाहाचा उद्योग करीत …सतां विलक्षण प्रामाणिकपणा आणि …मालीचा निर्भीडपणा पण त्याचबरोबर …काच अल्पसंतुष्टपणा आणि तसा …गच आल्यास निश्चयी बाणेदारपणा …मच्या अण्णांच्या हाडीं माशीं मुरल्या …रणानें, त्यांचा हा नांवलौकिक …च्यशीं संबंध येणाऱ्या लोकांवर नैतिक …न जबर बसवण्यास कारणभूत झाला म्हणता.

… यामुळें ओटीवर तक्क्याशीं टेंकून … हलेल्या आमच्या अण्णांसमोर अशा … व्यहारी लोकांचा घोळका जमलेला असा… …ाचा आणि जणू काय वकील, बॅरीस्टर …पल्या पक्षकारास कायद्याचा सल्ला गंभीर …चारसरणीनें देतो, त्याप्रमाणें अण्णांच्या …ामसलतीचा व्यवहार अगदीं कायदे…ेवाच्या थाटांत सकाळ संध्याकाळ … असावयाचा ! !

… आजचा दिवस अशाच प्रकारें सल्ला…सलत देण्याच्या अगदीं लगीन घा…चा …ता ! उन्हाळ्याची सुटी संपून तालु…क्याच्या कोर्ट कचेऱ्या नुकत्याच सुरू …ल्या होत्या. त्यामुळें कागदपत्राचे अनेक …कारचे व्यवहार बऱ्याचशा लोकांना होतां …इतों लवकर पुरे करून घ्यावयाचे होते.

त्यामुळें अण्णा तोंडानें लोकांना कायद्याचा सल्ला देण्यांत व हातानें दस्तऐवज लिहिण्यांत अगदीं गढून गेले होते.

घरांतल्या सगळ्या माणसांत अण्णाची मी विशेष लाडकी अन् तशांत माहेरवासी ! यामुळें ओटीवरचं, पण जरा बाजूस बसून, लोकांच्या भानगडी काय काय असतात अन् त्या बाबतींत लोकांना अण्णा सल्ला कसकसा देतात तें मी दररोज ऐकत व पहात असायची.

यावेळीं सकाळचे अकरा वाजून गेले होते; व कोर्टात जाणारे लोक, अण्णाजवळचें काम पूरें होतांच अगदीं लगबगीनें निघून जात होते. ओटीवर अण्णापाशीं एक दोघेच जण शिल्लक राहिले, म्हणून आतां आणखी कुणी येतंय कीं काय अशा विचारानें तीं सहज अंगणांत दूरवर पाहिलें, तों सुमारें बत्तीस तेहतीस वर्षांची डोकीवरून पदर घेतलेली एक ब्राम्हण विधवा, बरोबर तीन-चार वर्षांची एक मुलगी घेऊन अंगणाचें वेडें ओलांडून आंत येत असलेली मला दिसूं लागली. मी माझी नजर तिजवर खिळवून ती कोण तें समजून घेणार, तोंच ती सरळ ओटीवर येऊन अण्णांच्या समोर हात जोडून उभी राहिली.

'कोण बाई तुह्मी ?' असा प्रश्न करून अण्णानी तिच्याकडे बघितलें तोंच 'आज तीन दिवस झाले माझ्या पोटांत अन्नाचा एक घांसहि नाहीं; आणि त्याचप्रमाणं या माझ्या अनाथ मुलीच्या तोंडांत थेंबभर दूधहि नाहीं, त्यामुळें कासावीस होणारा हा जीता जीव माझ्यानं आतां यापुढं जगवंतहि नाहीं !' असं मोठ्या आर्तवाणीनें ह्मणून त्या विधवा बाईनें त्या आपल्या मुलीस अण्णांच्या पायांवर घातलें ! ! अण्णाचें हृदय तर गहिंवरून आलें. सतरा ठिकाणीं उभ्या आडव्या शिवणीनें दंड घातलेलें त्या अनाथ विधवेच्या अंगावरील तें मळकट पांढरें पातळ पाहून माझें मन तर हळहळून गेलेंच, पण तिच्या त्या गौर वर्णाच्या व गहिऱ्या डोळ्याच्या मुलीच्या अंगावर चिंधीहि नसल्यानें अक्षरशः ती दिगंबर असल्याचें पाहून तर माझें हृदय पिळवटून गेलें! आणि अशा या वैधव्याच्या आपत्तींतच, या असहाय्य विधवा मातेला, या तिच्या मुलीप्रमाणेंच कोणा तरी मांगानें नागवलें असेल पाहिजे, असेंहि विचार माझ्या मनांत येऊं लागले.

त्या विधवा बाईचे, त्यांतल्या त्यांत त्या तिच्या दिगंबर मुलीचें तें करुणास्पद दृश्य पहातांच अण्णांनीं आपले दोन्ही डोळे मिटून घेतले. त्यांतून दुःखाश्रूचे प्रवाह सुरू झाले त्यांचे ओघळ अण्णांच्या दोन्ही गालांवर ओसरूं लागले. अशा मनःस्थितींत आणि माध्यान्हाच्या ऐनभरांत त्या बाईस कोण, कुठली, कुणाची वगैरे विचारपूस करण्याची शुद्धि अण्णांना कुठून रहाणार ? त्यांनीं लगेच त्या मुलीस उचलून माझ्या हवालीं केलें व 'कृष्णे, अगोदर या मुलीला थोडासा भात खाऊं घाल आणि मग तिला ऊन ऊन पाण्यानें न्हाऊं घाल.' असें अण्णांनीं मला सांगितलें व 'बाई, तुम्ही कुणीहि असा, या माझ्या मुलीबरोबर आंत जाऊन अंग वगैरे धुवा. कृष्णे, यांना एक चांगलंसं लुगडं किंवा पातळ नेसायला दे. अन् अगोदर यांच्यासह तुम्ही जेवून घ्या ! मला अजून थोडा अवकाश आहे. जा बाई तुम्ही आंत.' असें त्यांनीं म्हटलें.

मी त्या छकुल्या मुलीला कडेवर घेऊन त्या बाईसह माजघरांत निघून गेल्यें.

* * *

रात्रीं, घरांतलीं जेवणें वगैरे आटपून झोंपण्याइतकीं स्वस्थता आल्यानंतर अण्णा माजघरांत आले. मी आणि आई त्या बिचाऱ्या बाईबरोबर इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत होतों व त्यांतच त्या तिच्या मुलीच्या बोबड्या बोलीनें तिच्याशीं बोलत राहून तिला खेळवीत होतों, व आमच्याहि घरंत कुणी लहान मूळ नसल्यानं आम्हीहि पण मोठ्या कौतुकानें तिच्याशीं खेळत होतों.

अण्णा आंत आले, आणि ती बाई व तिची मुलगी जेवली कीं नाहीं, त्यांना घरच्या माणसांप्रमाणं वागवलं कीं नाहीं वगैरे गोष्टी आम्हांस विचारून ते त्या विधवा बाईकडे वळले व म्हणाले: 'बाई, तुम्ही मला या माझ्या मुलीप्रमाणं-कृष्णी-प्रमाणच आहां. जन्मदाता दयाळू पिता ज्याप्रमाणं आपल्या पोटाच्या अपत्यांची विचारपूस करतो, त्याप्रमाणं मी तुमची विचारपूस करतों आहें, असं समजा, आणि मला तुमची सगळी सगळी हकीगत मनमोकळेपणानं सांगा. कसलाहि आडपडदा ठेवूं नका.'

आमच्या अण्णांचें असें प्रेमळ आश्वासन मिळतांच ती असहाय्य विधवाबाई स्वतःवर गुदरलेल्या संकटांची गंडांतरांची करुण कहाणी सांगूं लागली.

ती म्हणाली "आपल्या शिरूरपासून तीन-चार कोसांवर असलेल्या + + + गांवच्या वतनदार जोशांची मी सून ! माझें माहेरचें नांव मैना आणि सासरचें नांव मोहना. आम्हांस कुलकर्णी असेंहि म्हणतात. आमचं घर, माझे सासूसासरे, माझे पति, दोघे दीर, दोन जावा, तीन नणंदा आणि बरींचशीं मुलेंबाळें यांनीं कसें गजबजलेलें असें. पण १९३६ सालीं + + + गांवीं जो प्लेगचा कहर उडाला, त्यांत लागोपाठ सर्व माणसें गुदरलीं.-शेवटीं माझे पति देखील बळी पडले आणि आमचें सगळें घर ओस पडलें ! यामुळें घर व त्याबरोबरच सारें जगच मला जणुं काय खायला उठलें. या सर्व आपत्तींत नाहीं म्हणायला मनास विरंगुळा वाटण्याचं असं एकच साधन मला उरलं होतं; व तें म्हणजे माझं एकुलतं एक कन्यारत्न होय !

"अण्णासाहेब !" मोहनाबाईनें, आम्हां सर्व मंडळीमध्यें लुडबुडणाऱ्या त्या आपल्या मुलीकडे एका विवक्षित नजरेनें पाहून मोठ्या आर्त वाणीनें पुढें म्हटलें: 'खरोखरीच ती एकुलती एक कन्या माझं जीवनसर्वस्व होतं. रत्नांतलं रत्न होतं. माझं असं झालं, त्यावेळीं तिचं दहा वर्षांचं वय होतं. घरांतलीं वीस पंचवीस माणसं प्लेगनं ओढून नेल्यामुळें घरांतलें अगणित धन व त्याच प्रमाणें माझ्या माणिकसारखं चालतं बोलतं नातिवंत कन्यारत्न यांचें संरक्षण करणं अर्थातच मला कठिण जाऊं लागलं. मीं तें सारें द्रव्य कोणाला कळूं न देतां घरामागील परसांत-एका खुणेच्या ठिकाणीं पुरून ठेवलं. आतां जमीन-जुमल्याची व वसुलाची व्यवस्था कशी करावी, आणि घरांत सोबत कोणाची आणावी, अशा फिकीरींत मी पडून राहिल्यें.

" गांवचे कुलकर्णी व वतनदार जोशी या दोन्ही नात्यांनीं आमच्या घरांत गावांतील अनेक माणसांची ये-जा होत असे. त्यांत गांवकामगार पाटील, तलाठी, शाळामास्तर आणि भिमाजीराव भोळे नांवाचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एक तरूण तालीम मास्तर ही मंडळी वरचे-वर येत जात असे. तशांत सर्व माणसांचा प्रेमानें बळी घेऊन मंडा व मुलीला मागें ठेवल्यानें तर ही मंडळी धीर देण्यासाठीं, माझ्या देण्यासवरण्याच्या, वसुलाच्या व जमीनीच्या कबुलायतीच्या व्यवहारांत मदत करण्याच्या निमित्तानें वरचेवर येऊं लागली; आणि पुढें थोड्याच दिवसांत गांवचा तलाठी आणि तो मेला भिमाजी-राव तालीम मास्तर या दोघांनीं माझ्या घरच्या सगळ्या व्यवहाराची व्यवस्था आपल्याच हातांत घेतली. मला दुर्बुद्धि झाली, नी माझा व्यवहार पहाण्यात ते आपला स्वतःचा तळीराम गार करीत होते. तरी ती व्यवस्था मी त्याच दोघांच्या हातून होऊं दिली.

" पुढें साहजिकच माझ्या माणिकच्या लग्नाचा प्रश्न निघाला, व तो ते तलाठी आणि ते तालीम मास्तर यांनीं हां हां म्हणतां हातावेगळा केला. त्यांनीं जवळ-च्याच गांवचा एक जोशाचा वीस पंच-वीस वर्षांचा मुलगा आणून एके दिवशीं माझ्या पुढें उभा केला. तो मुलगा मोठा देखणा आणि पाणीदार आणि हुषार दिस-तांच मी माणिकचें त्याच्याशीं लग्न लावून त्याला घरजांवई कर त्यासंबंधांत रुकार दिला. लगेच बसल्या बैठकीला मुहूर्तनिश्चय होऊन तो मुलगा, त्याच्याबरोबर आलेला त्याचा ४० वर्षे वयाचा चुलता याच्यासह आपल्या गांवीं निघून गेला !

अण्णांना ती विधवा बाई स्फुंदत स्फुंदत आपली करूण कहाणी पुढें सांगूं लागली. " काय सांगूं, माझ्या वाड्यांच्या अंगणांत केवढा तरी लग्न मंडप घातला.ठरव-लेल्या मुहूर्तांच्या दिवशीं नवरा मुलगा घो-ड्यावर बसून वाजत गाजत मांडवांत आला! आणि आरंभीचे सर्व शास्त्र विधि यथासांग होऊन ब्राह्मणांनीं मंगलाष्टकें म्हणत व माझी माणक व तिचा तो नवरदेव यांच्या मस्तकावर अक्षता टाकीत ' शुभ मंगल-सावधान ' असा एकच मंगलघोष केला ! माझ्या माणिकला मनासारखा नवरा मिळाला ! मला ' घरजांवई ' लाभला ! माझा आनंद गगनांत मावेना ! माणिक सुखांत पडल्याचें पाहून मला विधवेला तें एक मोठें वैभवच लाभलें, असें होऊन गेलें.

पण विवाह होमाच्या वेळीं माझी कौतु-काची नजर सहज माझ्या जांवयाकडे गेली, तों काय ! माझी जणु नजरबंदीच झाली ! मी अगदीं निरखून पाहिले, तों तलाठी आणि भिमाजीराव तालीम मास्तर यांनीं आणलेल्या त्या गोऱ्या पान देखण्या मुला-बरोबर त्याचा जो चुलता म्हणून आला होता, तोच कपाळास मुंडावळ्या बांधून नवरदेव झाल्याचा अजब देखावा मला दृष्टीस पडला! त्याबरोबर माझी दृष्टि आपो-आप मिटली !'

*　*　*

" पदरीं पडलें आणि पवित्र झालें' या न्यायानें त्या दोघा मांगाचें,कपट मला पूर्णपणें कळून चुकलें, तरी पण मी आपली चुरमुरे खात गप्प बसल्यें. आणि त्या म्हाताऱ्या मनुष्याला—माणिकच्या नवऱ्यांला ' घर-जांवई ' करून त्यांतच सुखासमाधानानें राहूं लागलें. या लग्नाच्या भानगडीच्या चौकशींत मला पुढें असें समजलें, कीं त्या तलाठ्यानें व त्या तालीम मास्तरानें या सौद्यांत उगेपुरे हजार बाराशें रुपये स्वतःच्या घशांत घातले !

पण कायसेसें म्हणतात, ना काळ एका-द्याच्या मागें सारखाच हात धुवून लागतो. लग्नाला एक वर्ष होतें न होतें, तोंच माझ्या माणकला महामारी झाली व अवघ्या चौवीस तासांच्या आंतच ती मला या जगांतून कायमची सोडून गेली !

म्हाताऱ्या नवरदेवाची तरणीताठी बायको मेली, मग ते माझ्या घरीं कशाला रहातात ! माझ्या घरजांवयाची स्वारीहि एके दिवशीं ' मला आतां इथं करमत नाहीं ' असं कांगावखोरपणानं सांगून आपल्या गांवीं निघून गेली !

"घरांत मी पुन्हां एकटी झाल्यें ! महा-मारीच्या कहरामुळें सगळें गांव रानांत झोंपड्यांतून रहावयास गेलें. तलाठी दुस-ऱ्या गांवाला बदलून जाते झाले आणि एकटे भिमजीराव तालीम मास्तरच काय ते गांवांत राहिले. त्यांची कसाबाची करणी मला माहित होती. त्यांनीं एकदोन कोऱ्या स्टांपावर आणि कांहीं कोऱ्या कागदांवर माझ्या डाव्या हाताच्या आंगठ्याचे ठसेहि कांहीं घरच्या व्यवहाराच्या बाबतींत माझ्याकडून उठवून घेतले होते व त्यामुळें वसुलाचा व शेतीवाडीचा सगळाच कार-भार तेच पहात होते. ' अडकली गाय नी फटके खाय' अशी माझी अवस्था झालेली! करणार काय ? एके दिवशीं भिमजीराव माझ्या घरीं आले आणि 'गांवांत महामारी जोरांत आहे, सारा गांव बाहेर रहावयास गेला आहे. अशा स्थितींत मोहनाबाई,तुम्ही घरांत एकट्या रहाणें धोक्याचें आहे. माझी बायको मीं माहेरी पाठविली आहे. तेव्हां, तुम्हांला सोबत म्हणून मी येऊं का घरीं रहायला ? असें मला ते म्हणूं लागले. मी कसें करावें ? काय करावें, यांच्या या मनसुब्याला काय उत्तर द्यावें, या विचारांत मी पडल्यें. पण शेवटीं या, खुशाल या, विचारायलाच कशाला हवं होत, असें मी सहजा सहजीं म्हणून गेलें !

*　*　*

" झालें, पडत्या फळाची आज्ञा ! त्याच दिवशींच्या सायंकाळपा-सून भिमाजीराव तालीम मास्तर माझ्या घरीं रहावयास आलें!आजपर्यंत त्यांनीं मला पैशा अडक्याच्या बाबतींत साफ साफ बुडवलें होतें, तरी माझ्यासारख्या मूळच्याच गौर काय, सुंदर आणि तरुण विधवेकडे त्यांनीं एकदांहि वांकड्या नजरेनें पाहिलें नव्हतें ! आणि तालमीनें—सूर्यनमस्कारानें शरीर सामर्थ्य वाढवण्याचा हव्यास असलेलीं माणसें ' नादी ' नसतात असंहि मीं कुठंसं ऐकलें होतें. पैलवान्—त्यांतल्या त्यांत पळण्यांत पोहण्यांत व कुस्त्यांत पहिला नंबर मिळ-वून अनेक शहरीं अनेक बक्षिसें मिळवलेला व स्वतःची बायको असलेला हा ब्राह्मण पैलवान् वाईट चालीचा नसलाच पाहिजे, असें मला साहजिकच आतांपर्यंतच्या अनु-भवावरून वाटत होतें.

ते पैलवान् तालीम मास्तर सायंकाळ-पासून घरीं रहावयास येणार, म्हणून जरा लवकरच मी जेवण तयार केलें होतें. सायं-काळीं ते जेवले. मीहि जेवण आटोपलें. सोप्यावरच्या बाहेरच्या खोलींत मीं त्यांचें अंथरुण घातलें व ते तेथें निजावयास गेल्याचें पाहून मी माजघरांत असलेल्या पलंगावर जाऊन आडवी झाल्यें. मी उशा-लगतचा दिवा आतां मालवणार,तोंच माझ्या मागें मला कोणाचासा पायरव लागला. मीं उठून पाहिलें, तों भिमाजीराव आपलें डोकें दोन्ही हातांनीं घट्ट धरून आंत येत असल्याचें मला दिसलें. मी चटकन् उठल्यें, तोंच भिमाजीराव पलंगाजवळ येऊन 'मोहनाबाई, माझं कपाळ मनस्वी दुखतंय्, सुंठ आहे का घरांत ?' असें म्हणाले. मी मानेनेंच होय म्हटलें व तिथल्याच फडताळांतल्या डब्यांतून सुंटीचें कुडें काढून सहाणेवर तें लागल्यें ! मीं वर पाहिलें, तों भिमाजीराव माझ्याच पलंगावर निजलेले ! तें त्यांचें निजणें पाहून मला कसेंसेंच वाटलें. पण वरोपकरणीं मी तसें न दाखवून मी त्यांच्या कपाळावर सुंठीचा लेप घालून उशाशीं बसून त्यांचें मी डोकेंहि चेपूं लागलें. देवाची शपथ—या माझ्या मुलीच्या—पण नकोच—देवाचीच शपथ माझ्या मनांत या वेळीं कस-लाहि वाईट विकार उद्भवला नव्हता. मीं त्याचे थोडावेळ डोकें चेपलें, तोंच माझें थोडें अंग चेपा, ठणकतंय् नुसतं, असं ते म्हणाले. म्हणून मी त्यांचे पाय, पाठ, अंग चेपूं लागल्यें. मी सहज त्यांचे हातहि चेपूं लागल्यें.तोंच त्या मांगानें आपले दोन्ही हात अकस्मात् माझ्या गळ्यासभोंवार टाकले.त्यासरशीं त्या मांगाचें मानभावी स्वरूप मला दिसून आलें. मी झटकन् त्याची ती मगरमिठी सोडवून दूर झाल्यें, पण तो मेला मांग तिथेंहि आला व ' मोहनाबाई, आतां उगीच कशाला धडपड करतां? मुकाट्यानं तुह्मी आतां माझ्या म्हणण्याप्रमाणे वागा ! उगीच कां आपलं तरणंताठं आयुष्य असं फुकट दवडतां ? असें म्हणून तो माझ्या अंगास झोंबूं लागला. 'मेल्या, मांगा दूर हो. मला आजपर्यंत सर्वस्वीं नागवलंस. अब्रूनं-शीलानं तरी तूं मला अशी नागवूं नकोस!' असें म्हणून मी परोपरीनीं त्याला विनवूं लागल्यें. त्याच्याशीं झोंबून-मी माझी सगळी शक्ति एकवटून सुटका करून घेऊं लागल्यें. शेवटीं मी त्याला भाऊ म्हटल्यें, बाबाहि म्हणालें ! पण तो मेला साप बनून मीं पुढें एकहि शब्द बोलूं नये अगर आरडा ओरडा करूं नये म्हणून त्यानें माझें तोंड माझ्याच पदरानें घट्ट आवळलें; व मला अलग पलंगावर जबरदस्तीनें निजवून, अखेर त्यानें माझ्या शीलाचें—जीवापलीकडे आजपर्यंत जतन करून ठेवलेल्या पवित्र्य व पातिव्रत्याचे धिंडवडे काढून पातकाच्या गलिच्छ कर्दमांत मला रुतवून टाकलें ! !

×　×　×

झालें, त्यानें केलेल्या अनन्वित प्रकाराचा मीं बोभाटा करावा, तर त्याच्या अब्रूपेक्षां आणि त्याला तरी अब्रूची चाड होते कोठें! माझ्याच अब्रूचा लोक बभ्रा करणार. म्हणून मी तशीच मूग गिळून गप्प राहिलें, आणि त्यांतच ' झाल्या प्रकाराबद्दल तोंडां-तून अवाक्षर काढशील तर मोहनेनं मला बळेंच घरांत रहायला बोलावून माझ्याशीं दोस्ती केली, मस्ती केली अन् माझ्या गळ्यांत पडली' अशी ओरड करण्याची मला त्यानें जबरदस्त जरब भरली.

अशा जबरदस्त व माझें सर्वस्व हिरावून मला शिरजोर झालेल्या व नांवापुरत्या परवानगीनं माझ्या घरांत घुसलेल्या चोरानं माझ्या नीतीची—शीलाची—अब्रूची दौलत उघड्या डोळ्यांनीं अन् सक्तीच्या खुषीनें लुटूं देणें मला भागच पडलें!

शेणांत जन्मास आलेल्या शेण किड्यांना शेणांतच वाढे उभारणें व त्यांतच रहाणें मोठें सुखावह वाटतें. माझें शील शेणासारखें नव्हतें, तरी पण मेल्या भिम्या मांगानें अनीतीचें मलीनकापड माझ्या शीलासभोंवार लपेटलें गेलें व मानवी ... मला सुख वाटूं लागलं व माझं मन संभ्रमित होऊन त्यांतच मी रममाण होऊन गेल्यें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(पान ६२ वरून चालू)

अखेर या पातकाचरणास पालवी फुटूं लागली. त्यावर आतां मुलासारख्या फुलाची कळी येणार ? असं पाहून भिमरावानें मला ती कळी वेळींच खुडून काढण्याची मसलत दिली. पण माझ्या पातकाच्या पर्वतावर बालहत्येची आणखी पताका फडकवण्याचे मी साफ नाकारले ! पण पुढें हे सगळें लचांड आपल्याच अंगाला चिकटणार असें समजून माझी अवस्था त्यानें पाटलाच्या कानावर घातली व दोघांनीं आपापसांत संगनमत करून; माझ्यावर, मी पातकाच्या पालवीवरील कळी मी खुडून काढण्याच्या इलाजांत असल्याची त्यांनीं तोहमत घेतली.

तदनुसार पोलिसांनीं मला अटक केली ! पाटलानें व भिम्यानें खटल्यांत साक्षी देऊन माझ्यावरील आरोपाच्या पुराव्यास पुष्टि दिली आणि न्यायाधिशांनीं मला तीन वर्षांची शिक्षा ठोठावली !

तीनच दिवसांपूर्वी माझ्या शिक्षेची मुदत संपून माझी तुरुंगांतून सुटका झाली. ही शिक्षा भोगीत असतांना तुरुंगांतल्या दवाखान्यांतच माझ्याकडून घडवल्या गेलेल्या पातकाची ही--कळी ही पोर उमलली !

तुरुंगांतून बाहेर पडतांच या मुलीसह मी माझ्या घरीं हाणून गेलें. पण तें त्या तालीम मास्तरानें गेल्या तीन वर्षांत मीच आंगठे उठवून दिलेल्या कागदानें, स्वतःचें करून सोडलेलें ! आपल्या लग्नाच्या बायकोसह तो माझ्या घरांत तो राहूं लागलेला पडताळा मला आला. मी घरांत जातांच त्या मांगानें मला लाथाबुक्क्यांनीं बेदम तुडवून मुलीसह घरांतून घालवून दिलें !

मी घराबाहेर पडल्यें. इतक्यांत मला मी पुरून ठेवलेल्या धनाचें स्मरण झालें, हाणून मी घराच्या परसावांत खुणेच्या ठिकाणीं गेल्यें. पण तिथें ढिगाऱ्या ऐवजीं खोल खळगाच असल्याचें मला दिसलें ! मी पैशापरी पैशास आणि अब्रूपरी अब्रूस कायमची मुकल्यें हें मला उमजलें.

आणि अण्णासाहेब, तुमचा नांव लौकिक ऐकून मी चार कोस जमीन तुडवून आज बारा वाजतां, तुमच्या आश्रयास अनन्यगतिक होऊन आल्यें ! ! मला आश्रय द्या व माझें घर मला परत मिळेल असें कांहीं तरी करा !

"झालें, माझी करूण कहाणी संपली. अण्णासाहेब बोला, इतक्याउपर मला तुह्मी काय म्हणणार ? पतिता कीं पतिव्रता ?"

* * *

या बाईचे, भीमरावानें बळकविलेलें घर तिला परत कसें मिळवून द्यावें, याचा विचार सबंध रात्रभर करून अण्णा सकाळीं उठून ओटीवर जाऊन बसतात, तोंच कोणा एकानें येऊन अण्णांना सांगितलें, कीं काल रात्रींXXXगांवांत भीमराव तालीम मास्तर रहात असलेल्या कुळकर्ण्यांच्या घरास आग लागली आणि तींत तो तालीम मास्तर, त्याची बायको आणि मुलगी भाजूनभाजून--होरपळून मेली आणि त्या घराची राखरांगोळी झाली ! ! !

घरांत नाहींत म्हणून सांग : :

लेखकः– माधवराव बागल.

'बाबा कोण माणूस आला आहे तुमच्याकडं'

'येऊं दे. मला आला आहे आतां कंटाळा, घरांत नाहींत म्हणून सांग त्यांना'

बाळनं, बाबा घरांत नाहींत म्हणून त्या माणसाला सांगितलं.

पक्षकार परत निघून गेला !

* * *

बाळच्या वडिलाची वकिलीची प्रॅक्टिस गांवांत अगदीं पहिल्या नंबरची होती. हुषार वकील म्हणून सर्व इलाख्याभर त्यांची ख्याती होती. पक्षकारांची म्हणजे अगदीं रीघ लागून राहि.

एकदां काम पतकरलं. कीं मग मात्र कामांत कसूर नाहीं व्हायची. केसमध्यें आपल्याला यश मिळण्याचा संभव दिसला, तरच केस घ्यावयाची. यामुळं अपयशाचा प्रसंग त्याच्यावर क्वचितच येई.

ते केसीस कमी पतकरीत. पण तेवढ्यांतच त्यांना भरपूर प्राप्ती चांगले होईल. नाणावलेले वकील म्हणून लांबलांबून लोक येत. पण तितका त्रास घेण्याची इच्छा नसल्यामुळं पुष्कळानां नाराज होऊन परत जावं लागे.

दुखवा कशाला म्हणून गांठ घेण्याचीच ते टाळाटाळ करीत.

ते आपल्या खोलींत विश्रांति घेत असले किंवा झोपलेले असले, म्हणजे नोकरांची त्यांच्या खोलींत जाण्याचीं छातीच होत नसे. बरे, अशा वेळीं, एखादा तसाच मोठा माणूस आला आणि त्याला घरीं नाहींत म्हणून सांगितलें, तर कोण जाणे, मालक रागावतील म्हणून असली अवघड कामगिरी बहुधा बाळवरच पडे. नोकरहि पण त्यालाच पुढं करीत.

बाबा कुठंहि असले, तरी तो लहान असल्यामुळं, बाळला केव्हांहि बाबांच्या खोलींत जाता येई. पण 'बाळला ' घरांत नाहींत म्हणून सांग ' हाच निरोप सांगण्याचा नेहमीप्रसंग येई.

या नेहमींच्या ठराविक उत्तरामुळं तो पुष्कळ पक्षकारांना 'बाबा नाहींत ' हें ठराविक उत्तर देऊन घालवीत असे. यामुळें बाबासाहेबांचा त्रास चुकून त्यांना आपोआपच विसावा मिळे.

बाळ त्यांना 'बाबा ' म्हणत असल्यामुळें लोकहि त्यांना बाबासाहेब याच नावानं बोलवीत.

बाबासाहेबांस कसलाहि वाईट साईट नाद नव्हता. पण एखादी अत्यंत महत्वाची केस आली, म्हणजे त्यांच्या डोक्याला भयंकर ताण पडे. मग त्यांना रात्रभर झोंप म्हणून लागायची नाहीं.

हे असे प्रसंग नेहमीच येत असल्यामुळं त्याचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होऊं लागला. हें असं सारखं व्हायला लागलं, तर डोकं बिघडेल, म्हणून त्यांनीं डॉक्टरला सर्व हकिकत कळवून सल्ला विचारला.

ते म्हणाले:—

'नेहमींच झोंपेचीं औषधें घेणंहि प्रकृतीस अपायकारक असतें. एक उपाय आहे. पण तो आपल्या पचनीं पडेल, कीं नाहीं याची मला फार शंका आहे कारण त्या उपायापासून पुढें त्याचेंच व्यसन लागतें; आणि तें व्यसन एकदां चिकटलें, कीं संपलं. आयुष्याचं मातेरं झालंच म्हणून समजावं.

उपाय अगदीं सावधपणें नियमित व प्रमाणांत आचरणांत आणला, तर त्याचा परिणाम बहुतेक असल्या प्रसंगीं इष्ट होईल. तेव्हां विचार करून काय तें ठरवा नाहींतर आतांपर्यंत मिळालेली कीर्ति गमावून सर्वत्र बदनामी होईल.

दारू औषध म्हणून जरी घेतली, तरी व्यसन म्हणून ती चिकटतेच, आणि मग घरादाराची, घराण्याची, अब्रूचीव स्वतःच्या देशाची, राखरांगोळी करते. हा जगाचा अनुभव आहे. यांस करारी मनुष्य हा अपवाद आहे.

या सर्व गोष्टीचा विचार करून योग्य दिसेल तें आपण करा. आपण सूज्ञ आहांत, मी जास्ती कांहीं सांगायला पाहिजे असें नाहीं.'

बाबासाहेबांनीं या भीतीमुळं तें औषध घण्याची शक्य ती टाळाटाळच केली. पण आजार कांहीं कमी होईना.

नेहमींच्या जाग्रणानें त्यांना थकवा येऊं लागला. अखेरपर्यंत केस चालवणं त्यांना जड जाऊं लागलं. यानं आपल्या प्रॅक्टीसवर परिणाम होईल, हें जाणून मग त्यांनीं, प्रमाणाबाहेर जाऊं द्यायची नाहीं, असा मनाचा निश्चय करून, रोज ठराविक तेवढीच, नियमितपणें झोंपण्या अगो. दर घेण्याला सुरवात केली !

बाबासाहेब खरंच मोठे करारी. त्यांनीं प्रमाणाबाहेर कधीं म्हणून जाऊं दिली; नाहीं. इतकंच नव्हे, पण या गोष्टीचा कुणाला सुगावाहि लागूं नये, म्हणून ते रात्रीं आठाच्यापुढें कोणीही कितीहि मोठा माणूस गेला तरी त्याची गांठ घेत नसत. नोकरचाकर सर्व लोकांना हें माहीत असल्यामुळं ते 'मालक घरीं नाहींत ' असें चापून सर्वांना सांगत. बाळाहि पण तेंच करी.

* * *

बाबासाहेबांनां कामाचा बोजा भयंकर. पळाची फुरसत मिळायची नाहीं. त्यामुळं मुलांच्या शिक्षणाकडे स्वतः द्यावं तसं लक्ष त्यांना देतां येत नव्हतं. त्याला आपल्या जवळ बसवून घेऊन एखादा धडा शिकवणं शक्य नव्हतं. असं जरी होतं, तरी त्यांनीं त्याची शिक्षणाची हेळसांड केली होती असं केव्हांच म्हणता येणार नाहीं. प्रत्येक विषयाला त्यानीं एक एक खासगी मास्तर नेमून दिला होता.

मुलगाहि तसा कांहीं मद्द नव्हता. तो आतां मोठा झाला होता. इंग्रजी सातवीत गेला होता तो पण ही परीक्षा तो कांहीं केल्या पास होईना.

त्याच्याबद्दल मास्तरांच्या तक्रारी येऊं लागल्या.

त्याची तक्रार आली, कीं 'महिन्यांतले बरेच तास, आपण त्याला कांहीं तरी काम सांगत असल्यामुळं, त्याच्या अभ्यासाची खोटी होते, अभ्यास होत नाहीं.'

मास्तर काय म्हणतात, तें प्रथम तरी बाबासाहेबानां कांहींच समजून येईना. कारण त्यांनीं बाळला केव्हांच त्या वेळेत घरीं किंवा आपल्याकडे बोलावलं नव्हतं. हें प्रकरण आहे तरी काय तें पहावं म्हणून त्यांनीं बाळला हाक मारली आणि विचारलं:

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'काय रे मीं बोलावलं आहे, असं सांगून तूं कुठं जात असतोस ? इतकं खोटं बोलायला तुला कोणी शिकवलं ! सांग, कुठं जात असतोस तें, नाहीं तर चामडीच काढतों ! फारच फाजीलपणा लावला आहेस तूं !'

बाबासाहेबांनीं कधींच नाहीं तो एकदम जमदग्नीचा अवतार धारण केलेला पाहून स्वारी मात्र घाबरली. आतां आपली धडगत नाहीं, असें वाटून तो बोलूं लागलाः

'मी दुपारीं गोट्या खेळायला जात असतों.'

'असं काय ? यापुढं शिकवण चुकवलीस कीं याद राखून ठेव.' असं चांगलं खडकून बजावून त्यांनीं त्याला सोडून दिलं.

बाळला रागें भरल्यापासून त्याच्या वर्तणुकींत सुधारणा झाल्यासारखें दिसूं लागलें. खासगी मास्तरांची आतां कांहींच तक्रार नव्हती.

वडिलानां आपला मुलगा पुनः सरळ मार्गाला लागला, अभ्यास करूं लागला, हें पाहून समाधान वाटलें. बाळ म्हणजे त्यांचा एकुलता एक मुलगा.

* * *

बाबासाहेबांच्या प्रकृतीलाहि आता आराम वाटूं लागला. 'त्या' औषधापासून त्यांना झोंप लागूं लागली होती. जिवालाहि आराम वाटूं लागला होता.

त्यांनीं आपल्या 'या उपायाचा' सुगावा घरीं कुणालाहि लागूं दिला नव्हता. ते स्वतः जाऊन विश्वासू दुकानांतून बाटल्या आणीत. हें त्यांच्या बायकोला माहित होतें. बायकोला माहित व्हायचंच ! पण त्यांनां व्यसन नाहीं ही तिची खात्री असल्यामुळं ती अडथळा घेत नसे. तथापि एखादयावेळीं मात्र ती म्हणेः—

'जपून असा बरं. मोठमोठयांनां हें व्यसन आवरलें नाहीं. डोळ्यासमोरच आपण कितीकांचीं उदाहरणं पाहतों'

बाबासाहेबांनीं तिला दुःख करण्याची पाळी केव्हांच आणूं दिली नाहीं. ठराविक प्रमाणाबाहेर ते केव्हांच गेले नाहींत.

मुलालाहि कळूं नये म्हणून त्यांनीं अगदीं सुरवातीपासून खबरदारी घेतली होती. त्या वेळीं बाळहि पण लहानच होता. बाबासाहेब नियमित रात्रौ घेत असल्यामुळं प्रथम प्रथम बाळ बाबा, हे तुम्ही काय घेता 'असं पुष्कळ वेळा विचारीत असे पण ते 'झोंप येण्याचं औषध आहे' असं म्हणून ते वेळ मारून नेत. एकच ठराविक उत्तर मिळत असल्यामुळं त्यानंही पुढं पुढं विचारायचं टाकून दिलं होतं.

बाबा झोप यायचं औषध घेतात एवढं मात्र त्याला आता समजून चुकलं होतं.

बाळ मोठा झाला, तशी त्यांनीं विशेषच काळजी घेतली. त्याला इंग्रजी वाचता येत होतें. तेव्हां त्याला कशाची बाटली तें समजूं नये, म्हणून दवाखान्याची चिठ्ठी लागलेल्या बाटलींतच ती बाटली तशीच टेबलावरहि केव्हां केव्हां ते ठेवून देत !

बाबासाहेबांनीं आपल्यापरी काळजी घेण्याची शिकस्त केली, तरी घरच्या नोकर लोकांना ती गोष्ट समजल्याखेरीज राहिली नाही.

बाबासाहेबांनाहि पण तशी शंका आलीच. केव्हां केव्हां बाबासाहेबांच्या निष्काळजीपणानं कपाट उघडं राही. त्या वेळीं बाटल्यांतील 'पेय' बरंच कमी झाल्याचं त्यांना आढळून येई. पण कदाचित् आपणच घेतलं असेल, असं समजून ते तिकडं दुर्लक्ष करीत.

पण एकदां तर त्यांची खात्रीच पटली. ते नाटकाला जाणार होते. आल्यानंतर घ्यावी म्हणून त्यांनीं बाटली टेबलावर ठेऊन दिली होती. पण परत आल्यानंतर ती मोकळी झालेलीच त्यांना दिसून आली ! चौकशी करण्यांत आपलाच कमीपणा दिसून यायचा, म्हणून ते स्वस्थच बसले.

नोकरांचा त्यांना आंता पक्काच संशय आला होता.

* * *

बाळच्यावद्दल आतां खासगी मास्तरांच्या तक्रारी येत नव्हत्या. त्यांना आपला मुलगा रांकेला लागलेला पाहून समाधान वाटलं. त्यांची ती एक काळजी दूर झाली होती.

बाळ म्हणजे त्यांचा एकुलता एक मुलगा. आपली व घराण्याची कीर्ति राखणं किंवा घालवणं हें त्याचे हाती होतें. दहा पोरांच्या लटांबरापेक्षां एखादा गुणी मुलगा निपजणं हेंच श्रेयस्कर !

पण बाबासाहेबाचं हें मनोराज्य एकदम ढासळलं !

शाळेच्या मास्तरांची आतां तक्रार आली, कीं 'आपण वेळोवेळीं आपल्या मुलाला घरीं बोलावत असल्यामुळं त्याचे तास बरेच चुकले आहेत. मुलाच्या अभ्यासाची फार खोटी होत आहे. आम्हीहि आपल्याकडे तक्रार केली नसती, पण आपल्याच मुलाचें अज्ञानें नुकसान होणार, म्हणून नाइलाजानें हें कळवावें लागत आहे.'

पुनः तोच प्रकार !

बाबासाहेबांनीं बाळाला वर केव्हांच बोलावलेलं नव्हतं. मास्तराचं हें पत्र वाचून ते तर आश्चर्यचकितच झाले.

आपलं नांव खोटंच सांगून पुनः तो शाळा चुकवूं लागल्याचं आतां त्यांना समजायला तपासहि करण्याची जरूरी नव्हती.

पण या खेपेत त्यांनीं त्याला न बोलावतां हा काय करीत असतो, याचा शोध करायचं ठरवलं.

बाळ निव्वळ गोट्यानं खेळत नव्हता. तो पक्का जुगारी झाला होता, व त्या मिळवलेल्या पैशांतून तो दारूहि पीत असल्याचें त्यांना आढळून आलें. त्यानंतर तो पुढें येण्याला टाळाटाळ करीत असे. हें हि त्यांनां कळून चुकलं.

ही गोष्ट समजल्यामुळें बाबासाहेबांच्या छातींत धस्सच झालं.

पक्का खोटं बोलणारा आणि पुनः दारूबाज ! वय म्हणावं तर पंधरा सोळाच्या आंत. एकुलता एक मुलगा ! बापाच्या हृदयाला काय वेदना झाल्या असतील, त्या, त्याच स्थितींत असलेल्यालाच समजणार !

आई तर ढळढळां रडूं लागली ! बाबासाहेबांचा तर सर्व धरबंद सुटला. त्यांनीं एवढं नांव मिळवलेलं. लाखों रुपयांची कमाई केलेली तिचा उपयोग काय ?

हीं व्यसनें त्याला लावलीं कोणीं हें एक त्यांना मोठं कोडंच पडलं.

त्यांचं डोकं भडकून गेलं होतं. त्यांचा सारासार विचार सुटला. त्यांनीं मुलाला जनावराप्रमाणं झोडपून काढलं. बाळची पाठ मारानं काळी निळी झाली !

बाबासाहेब खरोखरीच सत्शील होते दुसऱ्या बाजूच्या पक्षकाराकडून हजारों रुपये आले तर तिकडं डोळा उघडा करून त्यांनीं कधीं पाहिलं नव्हतं. कुणाचा विश्वासघात केला नव्हता.

असं असतां कमालीचा खोटं बोलणारा मुलगा जुगाऱ्या आणि दारुडा !

'तुला हें कोणीं व्यसन लावलं, सांग' असं म्हणून त्यांनीं त्याला धां—धोपटलं. अखेर तो कबूल झाला.

तुम्ही मला टाकून नाटकाला जात होतां. मग मला झोंप यायची नाहीं. म्हणून झोंपेचें औषध तुम्ही टेबलावर ठेवलं असायचं. मी ते पीत असे. पुढं तुम्ही कपाटांत काळजीनं ठेऊं लागल्यापासून मी विकत घेऊन तें पिऊं लागलों.'

या खुलाश्यानं बाबासाहेबांच तोंड एकदम खर्रकन् उतरलं. त्याला मारायला त्यांचा हात उचलला नाहीं.

त्यांनीं त्याला आपल्यासमोरून घालवून दिलं.

आतां आपल्या हातून पोराला सुधारण शक्य नाहीं, असं समजून त्यांनीं त्याला एका बोर्डींगमध्यें ठेवलें. तिथंही बाळनं आपल्या गुणाचे दिवे पाजळलेच.

सुपरिंटेंडेंटनीं गांठ घेऊन बाबासाहेबांना मुलाचा सर्व वृत्तांत कळवला आणि खबरदारी घेतली नाहीं तर भलताच प्रसंग ओढवेल असं बजावून रजा घेतली.

बाळला त्यांनीं 'आपला मुलगा आहे ... दुर्व्यसनी असल्यामुळं आम्हांला ठे... घेतां येत नाहीं, असं सांगून त्यांनीं ... घरीं पाठवला.

बाळवर आतां त्यांनीं अगदीं करड... नजर ठेवली होती. त्याच्या हातांत पै... पडला, तर पुन्हां तो व्यसनाला लागे... म्हणून एक पैहि त्याच्या हातीं दे... नसत. असा कांहीं महिने त्याच्या... अगदीं पाहरा ठेवला.

पण एका प्रसंगानं बाळची सुधार... ण्याची आशा बाबासाहेबांनीं अगदीं... टाकून दिली.

घरीं कांहीं श्रीमंत पाहुणे मंडळी आ... होती. गांवीं परत जाण्याच्या अगोद... पाहुण्यांचे सोन्याचं घड्याळ आणि बाई... नथ घरी नाहींशी झाली !

चोर कोण ते बाबासाहेबांना समजाय... उशीर लागला नाहीं.

* * *

काय व्हायचें असेल तें होईल, म्हणू... ते आतां स्वस्थ बसले होते. पोराचं नांव... त्यांनीं टाकून दिलं होतें. पण त्यांना स्वस्... बसतां आलें नाहीं. पोलिसांना गप... करण्याकरितां त्यांना नेहमी पैसे खर्ची... लागत.

त्यानें त्यांच्या नांवावरहि जिथें ति... उधारी केली. तेव्हां आपल्या मुलाला को... उधार देऊं नये, अशी जाहीर नोटि... त्यांना देणं भाग पडलें.

* * *

कांहीं वर्षे गेलीं.

बाबासाहेबांचा दुसरा मुलगा आत... चालता बोलता झाला होता. ते आत... थकत चालले होते. बाळच्या वर्तनामुळं त्यांना लवकर वार्धक्य येत चाललं होतं.

त्यांचा दिनक्रम पूर्वीप्रमाणेच चालला होता. पक्षकारांचा त्रास कांहीं चुकत नव्हता.

ते नेहमींप्रमाणें विश्रांति घेत होते. इत... क्यांत 'बाबा, कोणी माणूस आला आहे तुमच्याकडं' असं म्हणत बाळचा धाकट... भाऊ बाबांच्याकडं आला.'

'येऊं दे, मला आला आहे कंटाळा... सांग त्याला साहेब बाहेर गेले आहेत म्हणून'

बाबासाहेबांचे हे शब्द कानावर प... तांच त्या पुढं झाल्या आणि म्हणाल्या:—

'हेंच तें, याचमुळं बाळ बिघडला... यानंच त्याला खोटं बोलण्याची सं... लागली. नका आतां आपण त्याला ... नाहींत म्हणून खोटं बोलायला शिकवूं.'

बाबासाहेबांच्या डोक्यांत एकदम ल... कन् प्रकाश पडला.

पुनः 'असून नाहीं.' म्हणायचं त्यांनीं आजिबात टाकून दिलं !'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रभातचा व हिन्दुस्थानचा १ ला दर्यावर्दी बोलपट——!

अमर-ज्योति

अलम दुनियेंतील दलितांचे—स्त्रियांचे दास्यविमोचन करण्यासाठीं दर्यावर्दी लुटारूचा पेशा पत्करणाऱ्या एका धाडसी स्त्रीची मनोवेधक कहाणी !

: दिग्दर्शक :

व्ही. शांताराम

: मुख्य भूमिका :

दुर्गा खोटे

शांता आपटे

वासंती

चंद्रमोहन

के. नारायण

बी. नांद्रेकर

: कथालेखक :

के. नारायण काळे

शनिवार ता. ४ जुलैपासून

कृष्ण टाकीज

(मुंबई) मध्यें

Printed Published and Edited by D. S. Kulkarni at the Mouj Printing Bureau, Khatau wadi, Girgaum, Bombay 4.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डिसेंबर
१९३६

सत्यकथा

किंमत
४ आणे

Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नूतन वर्षारंभाकरतां—

व्यापाऱ्यांना अमूल्य संधि !

- २५० पासून पुढें हव्या तेवढ्या प्रति.
- स्वतःचें नांव सुबक अक्षरांत छापून देऊं.
- कोणतेंही चित्र पसंत करा.

कॅलेंडरकरतां मोहक चित्रें

तयार आहेत!

- तीन रंगांत
- दोन रंगात
- एक रंगांत

१२' × १८ साइझ.

भाव व सँपलकरतां दोन आण्यांचीं
तिकिटें पाठवा. नमुना पाठवून देऊं—

मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४.

मॅनेजरः—दैनिक प्रभात, ४९५ शनवार पेठ, पुणें २.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संपादक—दत्तात्रय पुरुषोत्तम भागवत

या अंकांत प्रसिद्ध झालेल्या कथा सत्यावर आधारलेल्या असल्या, तरी त्यांतील नांवें व स्थळें काल्पनिक आहेत—

डिसेंबर १९३६

: अनुक्रमणिका :

लेखक	पृष्ठ
१ संपादकीय	३
२ टेलिफोन—भा. वि. वरेरकर	४–६
३ वळणांवळणांतून—सहृदय	७—११
४ सत् संतान—(चालू कादंबरी) सरस्वतीकुमार	१२–१४
५ त्याची आठवण —गो. रा. दोडके	१५
६ म्हातारी !—स. अ. शुक्ल	१७–१९
७ गुदमरलेलें तारुण्य—र. स. देसाई	२०–२८
८ एका चित्राच्या दोन बाजू—रा. ज. जोशी	२९–३२
९ धांवतें जग—प्र. तु. दिवे	३३–३५
१० विशाल हृदय—व्यं. नी. पडित	३६–३९
११ उद्धारक—प्र. ग. सहस्रबुद्धे	४१–४२
१२ पाश्चात्य वधूपरिणीत-समाज—श्री. व्यं. केतकर	४३–४४
१३ पुतळ्यावरचा डाग—कुसुमाग्रज, बी. ए.	४५–४६
१४ संशयाचें वीष—महादेवशास्त्री जोशी	४७–५०
१५ मदननृत्य—सौ. सुलभा कुळकर्णी	५१–५३
१६ काळा पहाड—कमालकर ए. शुक्ल	५४–५५
१७ प्रतिज्ञा पूर्ति—कु. कस्तूर क्षीरसागर	५५–५६
१८ पातिस्पर्धी—वकुळ बढे	५७–५९
१९ ल्यूसी—प्रभाकर के. गुप्ते	६०–६२
२० भाऊसाहेबांचें लग्न—वा. य. शेटगिरी	६२–६४

मालक व प्रकाशक:—
मौज प्रिन्टिंग ब्यूरो,
खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४.

किंमत ४ आणे

मौज ऑफिसांत विकत मिळणारीं पुस्तकें

कादंबऱ्या

१ रूढीच्या वणव्यांत किं. १॥ रु.
२ बहकलेली तरुणी ,, ४॥ ,,
३ मराठ्याची मुलगी ,, १ ,,
४ सतींचा हुंबरठा ,, १ ,,
५ भस्मासुर ,, १ ,,
६ गोदू गोखले भाग १ ,, १॥ ,,
७ गोदू गोखले भाग २ ,, १॥ ,,
८ कुलदैवत ,, १॥ ,,
९ कलंकशोभा ,, २ ,,
१० मरण कीं लग्न ,, १॥ ,,
११ विकारी वात्सल्य ,, १॥ ,,

नाटकें

१२ सोन्याचा कळस किं. १ रु.
१३ गोकुळचा चोर किं. १२ आ.
१४ वीर सौभद्र किं. १ रु.
१५ लग्नसोहळा किं. १० आ.
१६ गैरसमज किं. १ रु.
१७ सावकार किं. ८ आ.

दोन तासांच्या नाटिका

१८ संभावित किं. ४ आ.
१९ योगायोग ,, ४ ,,
२० बुवा ,, ६ ,,
२१ कॉलेज कुमारी ,, ६ ,,
२२ सैरंध्री ,, ६ ,,

शास्त्रीय

२३ प्रेम कीं स्वैराचार ,, ४ आ.
२४ हिंदु धर्मशास्त्र विचार ,, २॥ रु.

ज्योतिषविषयक

२५ संख्याशास्त्र किं. १ रु.
२६ दैवदर्पण ,, ३ रु.
२७ द्रव्यनिधी २ रु

किरकोळ

२८ मुलांचा भक्तिमार्ग किं. ८ आ.
२९ काश्मीर प्रवास वर्णन ,, ८ आ.
३० लोकमान्य चरित्र ,, १२ आ.
Psychology of Cotton
किं. रु.

मौज प्रिंटिंग ब्युरो, खटाववाडी, गिरगांव, मुंबई.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



मानवी जीवितांतील अद्‌भुतरम्य घटनांवर आधारलेल्या सत्यकथा देणारें मराठींतील एकटेंच मासिक

— डिसेंबर १९३६ —

वर्ष दुसरें • अंक १० वा.

सत्यकथेचा हा दहावा अंक प्रसिद्ध होत आहे.

* * * * * * *

सत्यकथेच्या प्रत्येक अंकांत सुमारें १६--१८ गोष्टी प्रसिद्ध होतात. म्हणजे या दहा महिन्यांत सत्यकथेनें १७०--८० गोष्टी प्रसिद्ध करून, मराठी ग्रंथवाङ्मयांत केवढी भर घातली आहे, याची वाचकांना सहज कल्पना येईल.

* * * * * * *

मराठी साहित्य संमेलन नुकतेंच जळगांव येथें यशस्वी रीतीनें पार पडलें. त्याला प्रो. माधवराव पटवर्धन यांच्यासारखा रसिक विद्वान् अध्यक्ष लाभला असल्यामुळें, अध्यक्षीय भाषणांत कथा, कादंबरी, काव्य, नाटकादि मराठी वाङ्मयाच्या निरनिराळ्या प्रकारांवर विद्वत्ताप्रचुर विचार पुढें मांडले जातील, अशी अपेक्षा होती. परन्तु अध्यक्षांनीं आपल्या सर्व भाषणांत भाषाशुद्धी-लाच महत्त्व दिल्यामुळें जळगांवास जमलेल्या साहित्यिकांची थोडीशी निराशा झाली. ठाणे येथें भरणाऱ्या मुंबई मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. वरेरकर हे स्वत: कथालेखक असल्यामुळें त्यांच्या भाषणांत लघुकथांचें तंत्र, कला वि. तत्त्वविचार इ. विषयांवर भरपूर उहापोह होईल, अशी आशा आहे.

* * * * * * *

प्रो. पटवर्धन यांनीं आपल्या भाषणांत हल्लीं मराठी कथांतील सर्व व्यक्ति मायबोलींत न बोलतां, इंग्रजी, हिंदी इ. परभाषांचा मुक्तहस्तानें उपयोग करितात, याविरुद्ध जोराची तक्रार केली. त्या तक्रारींत पुष्कळच सत्य आहे. प्रो. पटवर्धन यांची एकांतिक मतें जरीं सोडलीं, तरी सुवर्णमध्याच्या तत्त्वाचा अंगीकार करून लेखकवर्गानें परभाषेंतील वाक्यसमूहांचा किंवा शब्दांचा उपयोग करण्याचा मोह टाळणें अवश्य आहे.

* * * * * * *

सत्यकथेंतील गोष्टींविषयीं वगैरे स्पष्ट मतें वाचकांनीं कळवावीं, अशी त्यांना विनंती आहे.

—संपादक.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

टेलिफोन

(लेखकः– श्री. भार्गवराम विठ्ठल वरेरकर)

●

निष्कलंक असलेलें मनुष्य दिसलें म्हणजे त्याची निंदा करण्यांत बहुतेक लोकांना जितका आनंद वाटतो, तितका उघड उघड दुराचारी असलेल्या व्यक्तीवर आक्षेप घेण्यांत वाटत नाहीं.

टेलिफोनच्या उपयुक्ततेबद्दल वर्तमानपत्रांतून ज्या जाहिरती प्रसिद्ध होत असतात, त्या पाहिल्या म्हणजे मला ही हकीकत आठवते. प्रत्येक उपयुक्त वस्तूचा यथास्थित दुरुपयोग होणें ही शक्य असतें हें कोणी ध्यानीं घेत नाहीं. अशा होणाऱ्या दुरुपयोगाचा प्रतिकार केला पाहिजे, अशीही जाणीव कोणाला नाहीं.

मृदुला जोशी कांहीं विलायतेला जाऊन आली नव्हती. मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजची ती एल.एम. ॲन्ड एस.होती, तरीही विलायतेच्या मोठ मोठया डिग्र्या घेऊन आलेल्या डॉक्टर आणि डॉक्टरणींना मुंबईच्या पेठेंत ती भारी होउन बसली होती. नुसत्या बायकांच्या रोगांची ती चिकित्सा करीत असे असें नाहीं. पुरुष रोगी देखील तिच्या दवाखान्यांत येऊन तिच्या औषधानें बरे होऊन जात असत. आणि म्हणूनच पुरुष डॉक्टरांना तिच्याबद्दल मत्सर वाटत असे.

प्रथितयश असलेल्या डॉक्टर लोकांत मृदुलाबाईबद्दल वैषम्य उत्पन्न होण्यास आणखी एक कारण होतें. श्रीमंतांकडून ती जरी भरपूर पैसे घेत असे, तरी गरिबांच्याकडून सुश्रूषेसाठीं आणि औषधासाठीं पदरमोड करावयाची तिची तयारी असे. जितक्या उत्साहानें श्रीमंत लोक तिला पैसे देत असत. तितक्याच उत्साहानें गरीब लोक तिला आशिर्वाद देत असत.

पहिल्यानेंच ज्यावेळीं तिनें दवाखाना थाटला, त्यावेळीं तत्कालीन तरुण डॉक्टरांचा घोळका तिच्याभोंवतीं जमा होऊं लागला. एवढे मोठमोठे डॉक्टर आपल्याबद्दल सहानुभूति बाळगतात म्हणून तिला एकप्रकारें अभिमान वाटत असे. पण या सहानुभूतीच्या मुळाशीं त्या जमणाऱ्या घोळक्याचा कोणता डाव होता हें पहिल्यानें तिच्या लक्षांत आलें नव्हतें.

ती विद्वान होती—तरुण होती—आणि विशेषतः सुस्वरूप होती.

विद्वत्ता आणि सौंदर्य यांचा मेळ सहसा पडत नाहीं असा त्या काळचा समज होता. तत्कालीन विदुषी बहुतेक सान्या कुरुपांत गणल्या जात होत्या आणि कांहीं तर इतक्या कुरुप होत्या कीं, त्यांच्या तुलनेसाठीं अफ्रिकेचा किनाराच धुंडाळावा लागला असता !

असें होतें म्हणूनच तिचें सौंदर्य जास्त खुलून दिसत असे. सुशिक्षित असो किंवा अशिक्षित असो–हजारांनीं बायका उभ्या केल्या असत्या, तरी त्यांत ती हिरकणीसारखी चमकून दिसली असती. मग कुरुप विदुषींच्या मेळाव्यांत ती शुक्राच्या चांदणीसारखी चमकली, यांत मुळींच आश्चर्य नाहीं.

आणि म्हणूनच हा तरुण डॉक्टरांचा घोळका तिच्याभोंवतीं जमा झाला होता. त्यांत जसे अविवाहित होते, तसेच विवाहितही होते. विवाहितपणाच्या जोरावर अंतरंगांतली इच्छा उघडकीस न येण्याची खात्री असल्यामुळें विवाहित लोकच तिच्या मर्जीला जास्त पात्र झाले होते.

आणि म्हणूनच तिची बदनामी होत होती. पुरुषाच्या चारित्र्याला जगाच्या दृष्टीनें विवाहितपणाचा बंधारा आड येत नाहीं. अविवाहितांवर भुकेल्या प्रेमाचे बुभुक्षित आरोप जरी सरसहा केले गेले तरी विवाहितांची बुभूक्षा कांहीं झांकून झांकली जात नाहीं.

मृदुलेला मात्र ती दिसत नव्हती. तिचें मन निर्मळ होतें—स्त्रीपुरुष भेदाच्या पलीकडल्या, चार मैत्रिणी गोळा होणें आणि चार विवाहित अविवाहित तरुण पुरुष गोळा होणें यांत तिला भेद दिसत नव्हता.

घरची ती श्रीमंत होती, प्रॅक्टिस न न करतांसुद्धां चांगल्या चैनींत आयुष्य कंठितां येईल एवढी दौलत तिच्या हाताशीं होती.

त्या दौलतीची तिला जितकी पर्वा वाटत नव्हती तितकाच अभिमानही वाटत नव्हता. 'गरिबांत गरीब आणि श्रीमंतांत श्रीमंत होऊन कसें मिसळलें जावें हें ती चांगलें जाणीत होती.

म्हणजे हा तिचा दांभिकपणा नव्हता. तो तिचा स्वभावगूण होता. गरिबाची गरिबी मुद्दाम दाखवून दिली नाहीं, तर गरिब माणूस श्रीमंताच्या सहवासांत बिचकत नाहीं, हें तिला जसें माहित होतें. तसें कोत्या विनयामुळें श्रीमंत लोक खानदानी श्रीमंताला कसे तुच्छ लेखतात हेंही ती जाणत होती. म्हणूनच दोन्ही दर्जांच्या लोकांतच तिची लोकप्रीयता अबाधित राहिली होती.

तिच्या आजूबाजूला गोळा होणाऱ्या तरुणांना हा तिचा स्वभाव अवडत नसे; ते तसें बोलूनहि दाखवीत. पण तिनें तें नुसतें हंशावारीं नेलें. आपलीं मतें दुसऱ्यावर लादण्याचा कधींही प्रयत्न करू नये, या तिच्या स्वभावामुळेंच तिचें मित्रमंडळ टिकून राहिलें होतें.

त्या मित्रमंडळांत मात्र आपआपसांत मोठी चुरस होती. ते सगळे जरी एकमेकांचे सुहृद म्हणून मिरवीत असत, तरी अंतःकरणापासून एकमेकांचा द्वेष करीत असत. त्यांतील प्रत्येकाचा तिच्या हातावर डोळा होता. तो हात पकडण्यासाठीं प्रत्येकजण धडपडत होता. पण तिनें मात्र केव्हांही आपला हात मोकळा सोडला नाहीं.

या मित्रमंडळाशीं वागण्यांत तिनें ज्या प्रकारचें धोरण ठेवलें होतें, त्या धोरणामुळें प्रत्येकाला वाटे कीं, तिचें आपल्यावर प्रेम आहे. प्रत्येकजण आपल्या मनाशीं मांडे खात असे. या विषयाची त्यांनीं आपसांत केव्हांच चर्चा केली नव्हती. पण प्रत्येकजण प्रत्येकाकडे टवकारून पहात होता.

× × ×

वर्षांवर वर्षें जात होतीं, मृदुलेच्या ... नांत कांहींच फरक झाला ... आपण तिची मित्रमंडळी मात्र ... चालली होती.

बहुतेक सर्वांचीं आतां लग्नें ... होतीं. कांहीं जणांनीं तिच्या घरीं ... ही टाकलें होतें, कांहीं जण तर ... शत्रू बनले होतें, मात्र पहिल्यापा... विवाहित असलेले कांहींजण होते ते ... परिस्थितींत तिची मैत्री संपादून ... होतें.

कुणीं आक्षेप घेतले, तर ते ... हीत लोक थट्टेवारी नेत असत. ... तिच्या चरित्र्याबद्दल बहुजनसमा... गैरसमज होत असे.

रोगी या नात्यानें येणाऱ्या ... मात्र आतां दोन प्रकार झाले होते. उत्तम डॉक्टरीण आहे म्हणून ... तिच्याकडे चिकित्सेसाठीं येत ... बऱ्याचशा लोकांचा तिच्या चारि... बद्दल गैरसमज झाला होता.

पण कांहीं असे होतें कीं, ... तिच्याबद्दलची निष्ठा अढळ होती. ... तिच्याविरुद्ध ब्र काढला तर तें ... सहन होत नसे.

असे लोक मात्र फारच थोडे ... साधारणपणें माणसाची वृत्ति कुल... पणाला जितका आश्रय देते तित... निर्मळपणाकडे झुकत नाहीं. ... कोणाला प्रिय नाहीं व कितीही जि... ळ्याचें माणूस असलें तरी त्याची निं... ऐकून घेण्यांत बहुतेक लोकांना ए... प्रकारचा आनंद वाटत असते. निष्कलंक असा कोण आहे !—... कुणी निष्कलंक आहे असें दिसून ये... लागलें तर लोक हवालदील होतात. कलंक सर्वांनाच चढलेले असतात म्हण... निष्कलंक असलेलें मनुष्य दिसलें म्हणजे त्याची निंदा करण्यांत बहुतेक लोकां... जितका आनंद वाटतो, तितका उघड उघड दुराचारी असलेल्या व्यक्तीवर आक्षेप घेण्यांत वाटत नाहीं.

या सार्वत्रिक प्रवृत्तीमुळें मृदुलेचा ... बाजूंनीं छळ होत होता. पण त्याची ... तिला जाणीव नव्हती. ती आपल्या ... कारभारांत चूर होती. प्रॅक्टिस भरपूर असल्यामुळें आधींच तिला वेळ मिळत नसे. वाङ्मय आणि कला यांचें विशे...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एक प्रकारचें वेड असल्यामुळें तद्विषयक चळवळींत भाग घेण्यांत तिचा उरला सुरला वेळ जात असे. सर्व प्रकारें सारावेळ असा गुंतला गेल्यामुळें स्वतःची निंदा ऐकण्याला सुद्धां तिला अवकाश राहिला नव्हता.

विलायतेहून परीक्षा पास होऊन येणारा प्रत्येक नवीन डॉक्टर आशाळभूतपणानें तिची मैत्री संपादन करण्यासाठीं धडपडत होता. खरें पाहिलें तर धडपडण्याची कुणालाच कांहीं जरूरी नव्हती. मृदुलेची वृत्ति स्नेहसुलभ होती. कुणाचे दोष तिला दिसत नसत. कुणाच्याही गुणावर तिची पहिली नजर जात असे. म्हणून प्रत्येकजण तिच्या मित्रमंडळांत सहज शिरकाव करूं शकत असे.

तरीही त्या अशा माणसाला वाटे कीं, धडपड करून आपण मृदुलेच्या मित्रमंडळांत शिरकाव केला. मृदुला जरी सर्वसुलभ होती तरीही तिच्या मर्जीतल्या लोकांत मोडलें जाणें हें सुसंस्कृत समाजांत मानाचें समजलें जात असल्यामुळें त्या लोकांचा असा समज होत असे.

कुणीही जाऊन तिला भेटला असता तरी तो तिच्या मैत्रीला पात्र झाला असता—पण आजूबाजूच्या लोकांनीं तिच्याभोवतीं असें एक वलय तयार केलें होतें कीं, त्यामुळें ही स्नेहदुर्गम व्यक्ति आहे असा बाहेरच्या लोकांचा समज होत असे.

× × ×

माझा तिचा ज्यावेळीं परिचय झाला, त्याचवेळीं मला तिच्या स्वभावाचा ठाव लागला. बाहेर ज्या कंड्या होत्या त्यामुळें तिचा परिचय करून घ्यावा असें मला कधींच वाटलें नाहीं. पण एके दिवशीं माझ्या एका मित्राबरोबर सहज मी तिला भेटावयाला गेलों त्यावेळीं हें पटल दूर झालें.

तो माझा मित्र तिचाही बालमित्र होता. तिच्याबद्दल त्याला पूर्ण आदर होता. तिच्याबद्दल उठविल्या जाणाऱ्या कंड्यांवर त्याचा केव्हांही विश्वास नव्हता.

बाजारगप्पांवर जरी माझा विश्वास नसे तरी डोळ्यांसमोर दिसणारी परिस्थिति ज्या प्रकारचें वातावरण निर्माण करीत होती, त्या प्रकारच्या वातावरणांत मृदुलेसारखी सुंदर, श्रीमंत आणि भावनाप्रधान व्यक्ति सोज्वळ राहिली असेल असें मला वाटत नव्हतें.

सहज परिचय झाला आणि माझें जाणें येणें वाढूं लागलें; त्याचवेळीं माझा हा गैरसमज दूर झाला.

मी जात असें तेव्हां पूर्वीच्या मित्रमंडळींचा घोळका पहिल्या पहिल्यानें हजर असे. बोलण्याचालण्यांत ती त्यांच्याशीं इतकी मिसळत असे कीं, स्त्रीपुरुष भेदाची कल्पना तिच्या मनांत नाहीं कीं जात्याच ती सनाट वृत्तीची बेमुर्वत बायको आहे याचा अंदाज मला पहिल्यापहिल्यानें होत नव्हता.

जसजसा परिचय होऊं लागला तसतसें लोकप्रवादांनीं उत्पन्न झालेले माझ्या डोळ्यावरचे पडदे दूर होऊं लागले. मित्रमंडळी गोळा झाली असतां आनंदानें हंसणारी खेळणारी मृदुला ते लोक निघून जातांच एकदम उदासीन होत असे. एके दिवशीं मी असा सर्वांबरोबर जायला निघालों असतां तिनें मला थांबायला सांगितलें. त्याचवेळीं हें माझ्या नजरेला आलें.

कुणाजवळ तरी तिला बोलून टाकायचें होतें. सारे जे तिचे मित्र म्हणून समजले जात होते त्यांच्याकडे अंतःकरण मोकळें करण्याइतका मनाचा प्रांजळपणा त्यांच्या समोर तिला वाटत नव्हता. त्यांच्या अंतःकरणांतील वृत्ति तिला कळली होती. तिच्या नांवावर, तिच्या पैशावर आणि तिच्या अब्रूच्या भांडवलावर धाड घालून चैन करण्याकरितांच ते तिच्या आंवतीं भौंवतीं गोळा होत, हें तिला आतां कळून येऊं लागलें होतें.

म्हणून तिनें मला थांबवून घेतलें. तिचा माझा परिचय अगदींच तुटपुंजा होता. त्या विद्वद्रत्नांच्या घोळक्याप्रमाणें मी तिच्या अंतरंगांतला मित्र समजला जात नव्हता. म्हणूनच तिला माझ्याबद्दल विश्वास वाटला. आणि म्हणूनच तिनें आपलें दुःख माझ्यापुढें मांडलें.

प्रॅक्टिसची पर्वा वाटण्याइतकी तिची गृहस्थिति नव्हती हें जरी खरें होतें, तरी अलीकडे तिनें प्रॅक्टिसकडे बरेंच दुर्लक्ष केलें होतें. स्वतःच्या दुःखानें चूर झाल्यामुळें दुसऱ्याचीं दुःखें हलकीं करण्याइतकी ताकद तिच्या ठायीं राहिली नव्हती. ठराविक चारदोन केसिस पलीकडे ती केसिस मुळीं हल्लींच घेतच नसे. आलेले रोगी ज्यावेळीं परतून जात त्यावेळीं तिची बदनामीच करीत असत. उपकारांची बरी आठवण कोण अशी किती काळ ती राखून ठेवतो !

ती आतां प्रौढ झाली होती. तिचें लग्नाचें वय केव्हांच उलटून गेलें होतें. तिच्या बरोबरच्या बायकांना यावेळीं नातवंडेंसुद्धां झालीं होतीं आणि अशा परिस्थितींतहि तिच्या वर्तनावर आक्षेप घेतले जात होते.

ज्या व्यक्तींच्या सहवासामुळें तिच्यावर असे आक्षेप घेतले जात होते, त्या व्यक्तींना दूर करणें तिला इष्ट वाटत नव्हतें. माणसांच्या सहवासाची तिला आवश्यता होती. कित्येक वर्षांपासून तीं माणसें तिच्या एकलकोंड्या संसारांत कुटुंबीय होऊन बसलीं होतीं. त्यांना दूर करावें असें कोणतेंच कारण घडलें नव्हतें.

तिला पेंच पडला होता तो हाच कीं त्यांना दूर कां करावें ! त्यांना दूर केलें नाहीं तर तिची बदनामी वाढत जात होती. आणि त्यांना तर दूर करावें तर तो अन्याय व्हायचा.

अशा विलक्षण कैचींत ती सांपडली होती. तिच्याबद्दल श्रद्धा बाळगणारे तिचे पुष्कळ रोगी या बदनामीमुळें तिच्याकडे पाठ फिरवूं लागले होते. ज्या माणसांनीं एकाकाळीं आपल्याला देवाप्रमाणें मानलें तींच माणसें आपल्याला एकाद्या वेसवेच्या पंक्तीला नेऊन बसवीत आहेत, हें पाहून तिचें अंतःकरण रक्ताचीं आसवें गाळीत होतें.

ती मला म्हणाली, "अशा या चक्रांत मी सांपडलें आहें. मी एकटी आहें. माझ्या घरीं येऊन राहील असें माझ्या जवळच्या नात्याचें कोणीच नाहीं, हेंच मोठें दुर्दैव आहे. परक्याला जवळ केलें तर आधींच माझ्य. नांवाची बदनामी झालेला ! एकलकोंडें रहाणें मला शक्य नाहीं. मला गर्दीची जरूरी वाटते. आजूबाजूला घोळका असावा, निरनिराळ्या विषयावर त्यांच्याशीं, चर्चा करावी, काव्यशास्त्रविनोदांत त्यांच्याशी वेळ घालवावा एवढाच माझ्यां जिवाचा विरंगुळा. तोसुद्धां मला लोक लाभूं देत नाहींत.

पूर्वी मला ही जाणीव एवढी. मी अंधारांत होतें. लोकांची माझ्या विषयींची श्रद्धा पाहून मी स्वतःवर खूष होतें. माझं सर्वसंग्राही वर्तन लोकदृष्ट्या टीकला पात्र झालं आहे याची वर्दी मला लागली नव्हती—पण ती वर्दी जेव्हां लागली तेव्हांपासून माझ्या अंतःकरणानें ठाव सोडला. केव्हां केव्हां असें वाटतं कीं, आत्महत्या करावी. पण तितका भेकडपणा माझ्या रक्तांत नाहीं. निर्भय वृत्तीनें मी वागलें आहे आणि निर्भय वृत्तीनेंच मी मरेन. मला अलीकडे जें सतावून सोडण्यांत येतं आहे. त्यानं मात्र मी बावरून गेलें आहे—"

तिनें घड्याळाकडे पाहिलें, आणि ती म्हणाली "मंडळी जाऊन अर्धा तास झाला नाहीं ! पहा आतां टेलिफोन येईल. या टेलिफोनची मी भीति घेतली आहे. रोग्यांसाठीं म्हणून मी टेलिफोन ठेवला. पण, या टेलिफोनमुळें आतां मलाच रोग लागेल कीं काय असें वाटूं लागलं आहे. टेलिफोनचा 'कॉल' आला कीं उत्तर दिल्याशिवाय गत्यंतर नसतें. कुणी सांगावं कोणता रोगी कोणत्या प्रसंगांत असेल तें ! पण रिसीव्हर कानाला लावला कीं असें कांहीं ऐकूं येतं—

ती असें म्हणते आहे तोंच टेलिफोनची घंटा सुरू झाली.

ती टेलिफोनजवळ गेली आणि रिसीव्हर उचलून तिनें हातीं घेतला. रिसीव्हर कानाजवळ नेला मात्र, तिला काय वाटलें कोणाला ठाऊक तिनें मानेनें खूण करून मला बोलाविलें.

कांहीं न बोलतां तिनें रिसीव्हर माझ्या हातीं दिला. मी वेड्यासारखा तिच्याकडे नुसता पहात उभा राहिलों.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

ती अगदीं हळूंच म्हणाली, 'एका' रिसीव्हर मी कानाला लावला आणि उत्तर द्यायला सुरुवात केली.

उत्तर देतांच मला जी भाषा ऐकूं आली, ती अत्यंत गलिच्छ आणि ओंगळवाणी होती. माणसाच्या जातीला न शोभेल, असली ती पिशाचाची भाषा होती. त्यांतून भलभलते आरोप केले जात होते. भलभलत्या मागण्या केल्या जात होत्या. शरीरशास्त्राची सर्व प्रकारची विटंबना केली जात होती.

तें ऐकतांच माझ्या अंगावर शहारे आले आणि मी रिसीव्हर खालीं ठेवला.

मी टेलिफोनवर ऐकत असतांच मृदुला आपल्या बैठकीवर जाऊन बसली. तिनें मला उद्देशून विचारलें, "ऐकलंत !—सारी रात्र हें असें चाललेलं असतं ! रात्रीं दोनतीन वाजतां देखील असेच कॉल येतात. कोणी रोगी असेल म्हणून नाईलाजानं मला ऐकावं लागतं आणि ऐकूं येत तें हें. अशा स्थितींत माणसानं प्रॅक्टिस करावी कशी ! मी प्रॅक्टिसबद्दल बेसुर्वत झालें आहे, असा माझ्यावर आक्षेप केला जातो. पण ही हकीगत मी कुठं कुठं म्हणून सांगत फिरूं ! अशा या परिस्थितींत जीव द्यावा असं मला कां वाटूं नये !—"

बोलतांना तिचा कंठ सद्गदीत झाला. तिच्या त्या गंभीर चेहऱ्याकडे पाहिल्यावर मला देखील तिची दया आली.

मी म्हटलें, "मग तुम्ही दुसरीकडे जाऊन कां प्रॅक्टिस करीत नाहींत !—"

ती खिन्नपणानें हंसली आणि म्हणाली, "कुठंही गेलं तरी पळसाला पानं तीन अशी एक जुनी म्हण आहे, ती तुम्हाला माहित आहे ना ! मी कुठंही गेलें तरी माझं हें दुर्दैव माझा पाठलाग करीत रहाणार ! अविवाहित राहिल्याबद्दल मला मोठा अभिमान वाटत असे. विवाहितेची गुलामगिरी पत्करण्याइतकी माझी वृत्ति नादान नाहीं. पुरुषाप्रमाणें कर्तबगारी करूत दाखवीन असा मला अभिमान असे आणि त्या अभिमानाच्या बळावर आजपर्यंत मी तसं नांवही गाजवलं. पण हें हिंदुस्थान आहे हें मी विसरलें होतें. सुखासमाधानांत रहाला अविवाहित स्त्रीला हिंदुस्थानांत जागा नाहीं हेंच खरं."

सकृत्दर्शनी गोष्ट क्षुल्लक दिसत होती. पण इतक्या वर्षांच्या तिच्या चरित्रक्रमाकडे पाहिलं म्हणजे तिनें किती क्लेशांत दिवस काढले असतील, याची कल्पना येऊन मला मोठं दुःख झालें. तिच्या धीराबद्दल मला मोठा अभिमान वाटला.

बराच वेळ आम्ही बोलत बसलों होतों. विषय तोच होता. तिनें आपले जे अनुभव सांगितले, ते मला इथं नमूद करतां येत नाहींत. अविवाहित रहाण्याच्या पराक्रमाबद्दल समाजानें तिचा अमानुषपणानें तिचा छळ केला एवढें मात्र मला पटलें.

ती खचून गेली होती. आयुष्यांत तिला गोडी राहिली नव्हती. आत्महत्येची कल्पना पुन्हां पुन्हां तिच्या मनांत रिंगण घालीत होती.

× × ×

शेवटीं तिनें आत्महत्याच केली. मी त्यावेळीं मुंबईत नव्हतों. काठेवाडांत फिरायला जायचें असा आम्ही बेत केला होता. तिचें पत्र आलें कीं, प्रवासाच्या तयारीनें मी निघणार होतों.

तिचें पत्र आलें—पण तें काठेवाडांत जाण्यासाठीं नव्हतें.

ती लग्नपत्रिका होती. जवळ जवळ चाळीशी उलटून गेलेल्या त्या निधड्या बाईनें अशाच एका पन्नाशीच्या घरांतल्या श्रीमंत बॅरिस्टरशीं—मुंबईच्या नव्हे उत्तर हिंदुस्थानांतल्या—लग्न करण्याची ती पत्रिका होती.

माझी निराशा झाली. गिरनार पर्वताचे कडे डॉ. मृदुलाबाईच्या संगतींत चढत असतां तिचीं काव्यमय वर्णनें ऐकण्याचा योग माझ्या नशिबीं नव्हता.

गिरनार पर्वतासारख्याच संसाराच्या अवघड पर्वताचे कडे उल्लंघण्यासाठीं आयुष्याच्या उत्तर पथांत ती सरसावलेली पाहून मला दुःख झालें. क्लेशच भोगायचे हेंच विचारीचें नशीब ! असें ना तसें ! मी मनांतल्या मनांत म्हटलें, ईश्वरा, निर्भय वृत्तीच्या या सज्जन जीवाचें पुढील आयुष्य तरी सुखाचें होवो !'

गव्हर्मेंट रजिस्टर असलेली

दोन रुपयांत ४० रु. किंमतीचें वाद्य.

मिळवून देणारी योजना



या योजनेंत साखळी किंवा पॉलिसी सारखा मुळाचें संबंध नाहीं.

आमच्या दुकानांत तिकिटाकरितां २ रुपये दोन फॉर्म करतां ४ आणे भरले म्हणजे तुम्हांस एक अनुक्रम नंबरचें तिकीट नंबरशीं संबंधित असलेली पुढील १६ तिकीटें खपली म्हणजे तुम्हांस विजय हार्मोनियम, तंबोरा किंवा दि[...] बक्षिस मिळेल. त्याकरितां तुम्हीं तिकीटांसोबत मिळणाऱ्या फॉर्मसच्या आधारानें दोनच मेंबर करून दिले पाहिजेत. जास्त जबाबदारी तुमच्यावर नाहीं.

ज्या कोणा व्यक्तीला लवकर बक्षिस पाहिजे असेल त्यानें आपल्यातर्फे १६ मिळवून द्यावेत; आणि बक्षिस घेऊन जावें. जे मेंबर मिळणारे असतील त्यांची दे[...] स्वतःचे बक्षिसाकरितां १६ मेंबर मिळविण्याची तयारी असली पाहिजे. सवलत[...] मेंबरला पुरे १६ मेंबर मिळणार नाहींत त्यानें (पुरे १६ मेंबर होण्याकरतां) जितके कमी असतील तितके रुपये भरले म्हणजे त्यास बक्षिस बिनतक्रार दिले जाईल.

विशेष माहितीकरतां एक आण्याचें तिकीट पाठवा अगर समक्ष भेटा—

मुख्य ऑफिसः—आर. एस. मथेकर.

हार्मोनियम आणि सतारमेकर, सँडहर्स्ट रोड, मुंबई ४

पुना ब्रँचः—केशव कंपनी, नारायणपेठ, नंबर १३ पुणें सिटी.
१ एजन्टः—आर. एल बोरकर, वास्कोडीगामा, गोवा.
२ एजन्टः—कस्तुरचंद प यप्पा कासार, पंढरपूर.
एजन्ट पाहिजेत.

सुस्वागतम् ! सुस्वागतम् !! सुस्वागतम् !!!

माथेरानचे लोकप्रिय व सुप्रसिद्ध

रॉयल हिंदु हॉटेल

धुमधडाक्यानें चालू आहे.

अधिक माहितीसाठीं भेटा अगर लिहाः—

दयाराम दामोदर मिठाइवाले

हेड ऑफीस	आमचीं तीन दुकानें		
चिराबझार	ग्रँटरोड	ट्रमटर्मिनस दादर	माथेरान
टे. नं. २४७७७	टे. नं. ४११४०	टे. नं. ६०४१२	टे. नं. १६

आमचे दुकानांतील फॅन्सी मिठाई एक वेळ घेऊन खात्री करा अशी आमची आग्रहाची विनंति आहे.

ता. क. आमचे तिन्ही दुकानावर माथेरानचा शुद्ध मध मिळेल.

प्रोप्रायटर—दयाराम दामोदर मिठाईवाले, मुंबई.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वळणांवळणांतून

लेखकः—
स-हृदय, महाड

धर्मापेक्षां मानसशास्त्र श्रेष्ठ आहे. तें मत हिंदूंचें असो मुसलमानांचें-असो कोणाचेंही असो. वेळ आली कीं, तें द्रवल्याशिवाय राहाणार नाहीं. माझा मानव जातीवर विश्वास आहे. माझ्या डोळ्यापुढें अस्पृश्यता गेलेली दिसत आहे... ... ...

आनंदराव हा एक तरुण सुविद्य असा कॉलेजिएट हरिजन होता. तो आपल्या गरीब बापाच्या तुटपुंज्या मिळकतीच्या जोरावर कसाबसा मॅट्रीक झाला. मॅट्रीक झाल्यानंतर अस्पृश्यासाठीं मुद्दाम राखल्या गेलेल्या शिष्यवृत्तीच्या जोरावर यंदा तो बी. ए. होणार होता. हरिजनांमध्यें इतक्या शिक्षणापर्यंत पोंचणारा लाखांतून एकादाच. त्यामुळें त्याच्याकडे त्या जिल्ह्यातील साऱ्या हरिजनांची दृष्टी लागून राहिली होती. त्याच्या बुद्धिमत्तेनें तो विद्यार्थीदशेंतच पुढारी झाला होता. त्यामुळं त्याची इच्छा नसतांही त्याला सार्वजनिक चळवळींत पडावें लगे. तो जसजसा लोकांचा पुढाकार स्वीकारूं लागला, तसतसा त्याला लोक मानूं लागले आणि लोकप्रियता मिळत असतां पुढारीपणा सोडणारा या जगांत कोणीच मिळणार नाहीं......मग बिचाऱ्या आनंदरावाची काय कथा !

अलिकडे साऱ्या महाराष्ट्रभर धर्मांतराची घोषणा झाल्यामुळें हरिजनांत त्याबरोबर स्पृश्यांचीहि जी एक मोठी हालचाल झाली, तिचा आनंदरावानें भरपूर फायदा घेतला. त्यानें दौरा काढून साऱ्या जिल्ह्यांत हरिजनांनीं धर्मांतर करणें कसें अवश्यक आहे, हें दाखवून दिलें. तो जवळ जवळ दोर तुटून वाऱ्यावर अस्ताव्यस्त तरंगत जाणाऱ्या पतंगासारखा प्रवाहाबरोबर वहात चालला होता.

हरिजनांचा हिंदुधर्मावर जो इतका राग आहे तो युक्त आहे. साऱ्या हरीजनांनीं हिंदु धर्मांत अनन्वित हाल भोगून विटंबना सहन केली आहे. हिंदूंनीं केलेल्या या दुष्टाचाराला जगाच्या इतिहासांत तोड नाहीं. कुत्र्यामांजरांना जें स्थान आहे तें गरीब बिचाऱ्या कष्टाळू पोटभरू हरिजन मानवांना नाहीं, हें पाहून कोणालाही चीड येणें सहाजिक आहे.

त्यांत जन्मापासून हळुवार वृत्तीच्या-भावनाप्रधान आनंदरावाला, त्याच्या लहानपणापासून भयंकर विटंबना सोसाव्या लागल्या. एक वेळ हालाहल विष प्राशन करून विध्वंसमूर्ती श्रीशंकराला पण त्यानें मागें टाकलें असतें. पण ही अस्पृश्यतेची विटंबना त्यानें कशी सोसली, याचें त्यालाच आश्चर्य वाटत असते !

त्याला समजायला लागल्यापासून तो शाळेंत जाऊं लागला. त्यावेळीं त्याच्या पाटीवर धडा मिळत असे, ती पाटी त्या गुरुजीपासून, त्याची त्यांच्यावर सावली न पडेल इतक्या लांबीवर ठेवावी लगे. त्याला छडीचा मार इतक्या जोराचा बसे कीं मास्तरनें त्वेषानें लांबून फेकलेली छडी त्याच्या अंगावर वाटेल त्या ठिकाणी येऊन बसे. पुन्हां छडी मारण्याचें मास्तरच्या मनांत असेल तर आनंदानें, द्या असें म्हणत, रडत रडत त्यांच्या जवळ छडी नेऊन टाकली पाहिजे आणि तो दूर गेल्यानंतर मास्तरनें ती उचलून घेऊन त्याच्या अंगावर भिरकावली पाहिजे...एक ना दोन आनंदाला त्या आठवणी पीडादायक होत असत.

हायस्कूलमध्यें तरी काय! सर्वांच्या मागें कोपऱ्यांत एक मोडक्या तोडक्या स्टुलावर त्याला बसावें लगे. सर्वांच्या मागून त्यानें शाळेंतून कोणाला स्पर्श होणार नाहीं अशा रीतीनें आंग चोरीत चोरीत बाहेर पडायचें—शाळेच्या कोणत्याही "स्पोर्ट" मध्यें त्याला शिवावें लागेल म्हणून त्याला भाग घेण्यास मनाई होई.. ...त्याला चांगले मार्क मिळाले कीं त्याच्या विरुद्ध साऱ्या स्पृश्य मुलांनीं एकच कोल्हेकुई करावी.......आनंद हा हरिजन म्हणून लोक त्याचे पक्षपाती आहेत अशी तक्रार ते स्कूलसुपरिंटेंडंट जवळ न्यायला पर्वा धरीत नसत......त्यापेक्षां मुसलमान विद्यार्थी त्याच्याशीं मिळून मिसळून वागत—त्याच्याशीं बोलत—त्याला कमी असलेली वस्तु देत...... त्याला आपल्या क्रिकेटसंघांत खेळण्यास घेत.........आणि तेच मुसलमान विद्यार्थी इतर साऱ्या हिंदूंबरोबरच बसून कसें चालत असे याचें त्याला कोडें पडे......! त्यामुळें मुलांनी काढलेल्या हस्तलिखित मासिकामध्येंही तो लिहीत नसे कीं वादविवादोत्तेजक सभेमध्येंही बोलत नसे या असल्या मूर्खपणाच्या आणि मनाला मारणाऱ्या—दुसऱ्यांकडून होणाऱ्या भयंकर अपमान करणाऱ्या वागणुकीमुळें आनंद हा एकलकोंडा—आणि जवळ चिडखोर झाला होता.

पुढें कॉलेजमध्यें हें वातावरण निवळलेलें दिसलें. त्याला हरिजन म्हणून कोणीही कॉलेजमध्यें वागवित नसे...... परंतु कॉलेजांतील कोणत्याही क्लबमध्यें तो अस्पृश्य म्हणून त्याला मज्जाव होता. अशा वेळीं मात्र कॉलिजिएट नवमतवादी तरुणांचा नवमतवाद कोठच्या कोठें वाऱ्यावर विरून जाई. त्यामुळें जवळपास असलेल्या कोठच्या तरी इराण्याच्या हॉटेलमध्यें किंवा मुसलमानाच्या टापरानमध्यें त्याला आपल्या पोटाची खळगी भरण्याची वेळ येई.

त्याचे कपडे तो कँपामधील एका लॉंड्रींत स्पृश्य हिंदू म्हणून देई. त्याला अशी फसवणूक केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. केंस कापायचे म्हणजे त्याला थेट एकाद्या मुसमानी सलूनमध्यें जावें लागे—जगांत मानापमान गिळून खोटेपणाची वागणूक करावी लागे यांची त्याला चीड येई. आणि हे हिंदू त्याला त्यांच्या वागणुकीनें दूरदूर लोटीत असत, याबद्दल त्यात मन विषादानें भरून येई......आणि आतां तर धर्मांतराची घोषणा झाल्यापासून "हिंदूंनींच आम्हाला परधर्माचा आसरा घ्यायला भाग पाडलें आणि आम्ही अस्पृश्य मुसलमान, ख्रिश्चन वगैरे परधर्मीयांच्या सौजन्यानें सहानुभूतीनें जगलों आहोंत !"

अशी त्याची खात्री झाली.

या मेलेल्या अंतःकरणाच्या हिंदू धर्माच्या ××× वर जितक्या लाथा आम्ही मारूं—जितकी त्याची आम्ही छी थू करूं—जितकी त्याची विटंबना करूं तितकी आम्ही आमच्या आजपर्यंतच्या अपमानाची भरपाई झाली असें समजूं—अशा या मेलेल्या मढयाला बाप म्हणून कवटाळण्यात काय हंशील आहे—! त्याला आम्ही आमच्या हातानें भडाग्नी दिलेला काय वाईट !"

अशा तऱ्हेची भावनोद्दीपक व्याख्यानें त्याचीं होत होतीं.

धर्मांतराच्या घोषणेमुळें आनंदरावाच्या जीवनांत एक अनिष्ट गोष्ट मात्र घडून आली.

कॉलेजमध्यें पहिल्यापासून सदाशिव वर्तक नावाच्या एका विद्यार्थ्यांची त्याची मैत्री जमून आली होती—ती थेट इंटर पर्यंत टिकली.

सदाशिव हा आनंदरावाच्या गांवांतील सुखवस्तु ब्राह्मणाचा मुलगा होता.

त्यांची मैत्री जेव्हां त्यांच्या जीवनांत प्रत्यक्षाचे प्रयोग करण्याची पाळी आली नव्हती तोपर्यंत अखंड टिकून राहिली—पण अलिकडे पांच सहा महिने आनंदरावाच्या मनांत त्याची परीक्षा पाहण्याची वृत्ति डोकावूं लागली होती. "स्नेहासाठीं जो आपला जीव—आई—बाप—गण—गोत्र सोडण्यास तयार होईल तोच खरा—जिवाभावाचा स्नेही !" अशी त्याची तीव्र कसोटी होऊं पहात होती. आणि त्या निकषावर जेव्हां वेळ येई तेव्हां सदाशिवला पेचांत धरून घासण्याचा यत्न करी. अशा वेळीं त्याचा आणि सदाशिवचा वाद होई...... त्या वादाचें पर्यावसान मतभिन्नत्वांत होई—आणि अशा तऱ्हेनें त्यांच्या नकळत ते एकमेकांना दुरावत चालले होतें.

धर्मांतराची घोषणा तर सदाशिवला मुळींच आवडली नाहीं.

"तूं जन्माचा अस्पृश्य असतास तर तुला हें कळलें असतें—दुसऱ्यांच्या प्रसववेदनांची कल्पना वांझ बायकांना असणार नाहीं." असें तो उत्तर देई."

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

"अरे–तुम्ही किती झाले तरी ब्राह्मणच–उच्च वर्णाचा फायदा घेऊन आमच्याविषयीं सुखासुखी सहानुभूति दाखविण्यांत तुम्हाला मोठेपणा दाखवितां येतो साऱ्या जगाला—! कशाला या गमजा हव्यात ! त्या गांधीसारख्या 'नकली' अस्पृश्याला या गोष्टीचा एक शतांश सुद्धां मागमूस लागणार नाही..! एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याला अस्पृश्य लेखतो ही कल्पनाच मला मुळीं सहन होत नाहीं. रक्त कसें उसळून येतें. वाटतें कीं......" वगैरे बोलण्यानें आनंद सदाशिवला चूप करण्याचा यत्न करी.

"मानव जात जिथून सारी एक–त्यांत धर्माधर्मांचा कांहीं एक भाग नाहीं. धर्म आणि मानसशास्त्र यांची फारकत असते. धर्मापेक्षां मानसशास्त्र श्रेष्ठ आहे. तें मत हिंदूंचें असो—मुसलमानांचे असो—कोणाचेंही असो. वेळ आली कीं द्रवल्याशिवाय राहणार नाहीं. माझा मानव जातीवर विश्वास आहे. माझ्या डोळ्यांपुढें अस्पृश्यता गेलेली दिसत आहे... फक्त सध्यां आम्हा भोळ्या अज्ञान असंख्य हिंदूंच्या मनावर मानीव धर्माच्या रूढाचारांचें दडपण आहे–तें एकदम दूर होऊं शकत नाहीं. त्यासाठीं सारे समंजस लोक तडपडत आहेत...कोणा एका आचरटानें ही अस्पृश्यता चालू केली–तिला आतां धर्माचाराचें स्वरूप येऊन ती एखाद्या हट्टवाद्यासारखी आमच्या मानकुटीस इतकी बसली होती कीं तिचें वारें आमच्या अंगांतून—देवभोळ्या ह्याताऱ्या कोताऱ्यांच्या अंगांतून टाकणें हें तूं म्हणतोस तितकें सोपें काम नाहीं. याला प्रचंड त्यागाचा–आणि कर्तृत्वाचा जोर पाहिजे. तो जोर तुझ्यासारख्यानें उत्पन्न करायचा—तो तूं साऱ्यांच्या मुळावर उठून आहे तें आमचें नव्हे असें म्हणत खिसे झाडून मोकळा होऊं पहात आहेस........अरे समज, तुझी आई—! भाबडी–देवभोळी आहे–तिचे देवाधर्माच्या नांवाखालीं अनेक मूर्ख रूढाचार चालू आहेत, ते तुला मुळींच पसंत नाहींत–म्हणून तूं तिला एकदम सोडून दिलीस!......फार फार तर तिच्या मरणापर्यंत तरी तुला थांबायला नको का ! या लोकांच्या वेडगळ समजुतीनें आपण चिडून जाऊन उलट हट्टवादी बनून आपल्यासारख्या सुशिक्षितांनीं उतावळेपणाचें कृत्य करावें––हें तितकेंच वेडगळपणाचें नाहीं का !"

सदाशिव तावातावानें उत्तरें देई—

"जगांतील चांगलीं कृत्यें प्रथम वेडगळ वाटणाऱ्या लोकांनींच केलीं आहेत––तुमच्यासारखे सुवर्णमध्य "Go-between" हेच आमच्या मार्गांत जास्त अडथळे आणतात........" आनंदराव बोलत असे.

शेवटीं शेवटीं त्याचे बोलणें अगदीं व्यक्तिनिष्ठ होई.

"तूं जर समतेच्या—शहाणपणाच्या इतक्या गोष्टी करतोस तर–चल आमच्याकडे आज जेवायला, निदान चहा घेण्याइतकें तरी मनोधैर्य दाखव म्हणजे मी ह्मणेन तुझ्या बोलण्याशीं तूं सुसंगत आहेस."

"पण माझा तुझ्या घरीं जेवण्यानें थोडाच अस्पृश्यतेचा प्रश्न सुटणार आहे ! तो सुटत असेल तर आजही माझी तयारी आहे. कांहीं गोष्टी प्रसंगानुसार व्हाव्या लागतात. अप्रासंगीक गोष्टी समाजांत–गैरसमज वितुष्ट वाढवितात कार्याचा नाश करतात......वेळ आली म्हणजे तुला कल्पनाही न होणारें कृत्य मी तुला करून दाखवीन."

सदाशिव जरा नरम पडून बोले.

"तशी वेळ तुझ्या आयुष्यांत, तूं मरेपर्यंत येणारच नाहीं मुळीं–खात्री असूं दे कीं, तुझ्यासारख्या भ्याडाच्या हातून समाजसेवेचीं कार्यें होत नसतात !"

"मी हिंदू आहें म्हणून तर भ्याड नाहींना—! माझ्यासारखे भ्याड खरोखरचाच असेल तर तो कुठल्याही धर्मांत असेल––माणसाचीं कृत्यें इथुनतिथुन सारखींच. त्यांना धर्माचा अडथळा नाहीं......तेव्हां तूं धर्म बदलून माणसांचे मन–त्यांचें हृदय बदलवत असल्यास तर तें दैवी कृत्य होय––पण तें देवाच्यानेंही शक्य नाहीं––माणसाच्या फक्त समजुती, दुराग्रह बदलावा––त्यासाठीं तर आमची धडपड आहे......तुमच्या अस्तित्वामुळेंच आम्हा वेडगळ हिंदूंच्या पूर्वापार समजुती बदलतील. तुमच्या धर्मांतरानें उलट्या त्या जास्त दृढतर होतील. ते तुम्हांला धर्मांतरीत अस्पृश्य लेखतील. तुम्ही धर्मांतर केलें तर सारे हिंदु तुम्हाला स्पर्श करतील अशी कोणी तुम्हाला हमी दिली नाहीं ! गोव्यांत नाहींत का ब्राह्मण खिश्चन–महार खिश्चन ! तसेंच कुठल्याही धर्मांत तुम्ही गेलांत तरी तसा थोडाफार भेद राहणारच—! आणि हिंदूंच्या मनांत कांहींएक बदल न होतां ते आहेत असेच राहिले तर तुम्ही धर्म बदललां म्हणून ते तुम्हाला स्पर्श करतील ही खोटी कल्पना आहे ! जो मुख्य बदल व्हायला पाहिजे तो आम्हा साऱ्या हिंदूंच्या तुमच्या विषयींच्या समजूती आणि मग आपोआपच त्यांच्या मनोव्यापारानुसार त्यांचे आचार बदलतील—"

"रे मानसशास्त्रवेत्त्या—! तत्त्वज्ञात्या—इतका अनंतकाळ थांबण्याची आमची इच्छा नाहीं–"

असे वादविवाद त्या दोघांमध्ये नेहमीं होत. त्याला कांहीं सुमार राहात नसे ! तरीपण एकमेकांशीं अबोला धरण्याइतके बालिश नव्हते—तर ते पुरे दिलदार खेळाडूवृत्तीचे होते.

एके दिवशीं नेहमीप्रमाणें सदाशिव महारवाड्यांत येऊन आनंदाला फिरण्यास घेऊन गेला. जातां जातां त्याचें बोलणें निघालें.

'अरे–तुला तो रामा बुटपॉलीशवाला माहित आहे ! त्यानें दोघां फलटणवाल्या शिपायांच्या बुटाला पॉलीश केले. तो त्याबद्दल चार पैसे मागूं लागला—पण ते अडदांड लष्करवाले त्याला एक पैही न देता चालूं लागले. रामा त्याच्या मागोमाग पैसे मागत चालू लागला.

पण रामा जेव्हां त्या दोघांचा पाठपुरावा सोडीना तेव्हां त्यांतील एका शिपायानें त्याला थोबाडांत मारली. त्यामुळें तो रडूं लागतांच आजूबाजूचे बाजारचे शिंपी–वाणी, भोई, मराठे धांवून आले. आणि त्यांनीं काय केलें माहिती आहे तुला !" सदाशिवानें विचारलें.

आनंदराव बोलला नाहीं.

"त्यांनीं त्या दोघां शिपायांना असा यथेच्छ चोप दिला म्हणतोस कीं ज्याचें नांव ते—पुन्हा दुसऱ्या क्षणीं सामसूम—पोलीसला तेथें कसलीही दाद लागली नाहीं—"

"मग तुला काय सांगायचें य !..."

"अन्यायाची चीड ही स्वयंभू आ... त्यासाठीं रामा हा चांभार होता म्ह... साऱ्या हिंदूंनीं वाट पाहिली नाहीं—... त्याला शिवावें कसें असा त्यांनीं वि... रही केला नाहीं—आतां कोठें स्पृ... स्पृश्यांचा प्रश्न राहिला सांग—!"

आनंदराव विचार करीत होता.

"उलट ते दोघे शिपाई स्पृश्य हि... असूनही चांभाराच्या पोरावरील अन्... याचा बदला घेण्यासाठीं त्यांनीं त... दोघांना मारलें—या गोष्टी धर्मप्रे... झाल्या नाहींत—मनःप्रेरणेनें झाल्... धर्म समजुती, रुढी—यांच्यापेक्षां मन... फार जबरदस्त असतें असें मी म्हण... तें यामुळेंच—"

'अशा या अपवादात्मक गोष्टींव... तूं मूळ सिद्धांत नाशावित करूं पहा... हे तर्कशास्त्राला धरून नाहीं." आनं... राव शेवटीं बोलला.

* * *

या गोष्टीला दहा बारा दिवस होऊ... गेले होते. सदाशिव आपल्या लह... मोठ्या मित्रांना जमवून गोविंद भा... नांवाच्या आपल्या स्नेह्याकडे बस... होता.

"गोविंद भाव्याकडे मी सायंका... ६ वाजतां आहें त्यावेळीं तूं तेथें ये–... नंतर आपण बरोबर फिरावयास जाऊं... असें त्यानें आनंदरावाला सांगून ठेव... होतें. त्याप्रमाणें तो आला आणि त्या... रस्त्यावरूनच सदाशिवला हांक मारली–... गोविंद भाव्यानें त्याला मुद्दाम बोलाव... माडीवर नेलें.

तेथें इतर ८-९ तरुण मंडळी प... तो बैठकी बाहेर रेंगाळूं लागला—

"छेः छेः संकोचूं नकोस ! ये—" असें ह्मणत सदाशिवनें आणि गोवि... दनें त्याला बैठकीवरील मोठ्या तक्क्या... बसविलें.

इतक्यांत चहा बिस्कीटें–चिवडा, केळी... पेरू वगैरे फराळाचें सामान बाहेर आलें.

"अरे, आज आहे, तरी काय !" आनंदरावानें अत्यंत संकोचानें विचारलें.

"तूं पहिल्यावर्गांत पास झाला... ना—! तुझ्या सन्मानार्थ ही आज बारी... कशी पार्टी आहे ह्मणेनास–!" सदाशिव... बोलला—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



त्यांना पाणी पाजूं लागली.

" सदाशिव, अगोदर नाहीं बोललास कुठें तूं ?"

" आम्ही अगोदर बोललों असतों तर तूं तुझ्या मनांतील मानापमानाच्या कल्पनेनें मुळें येथें आला नसतास ! " गोविंद बोलला.

सर्वांनीं चहा वगैरे घेतला--आनंदराव, गोविंद, सदाशिव वगैरे मंडळी त्या दिवशीं आनंदानें फिरून घरीं आले.

या प्रकरणामुळें पुण्याच्या पंचहौद-मिशनवरील चाडगेगिरीबाबत जशी चळवळ माजली तशी, जरी त्या गांवाला झाली नाहीं तरी तो गांव थोडासा हादरलाच; पण बहिष्कारापर्यंत पाळी आली नाहीं. सर्व कांहीं दबल्यासारखें होतें. केव्हां त्याचा स्फोट होईल याचा नेम नव्हता.

या गोष्टीनें आनंदरावाच्या मनांत सदाशिवविषयीं थोडासा आपलेपणा उत्पन्न झाला.

आनंदराव पाहिल्या वर्गांत पहिला जरी आला नव्हता, तरी त्या दृष्टीनें त्याची किंमत कांहीं कमी नव्हती; इतरांच्या मानानें त्याचा ' भाव ' आज मोठा होता.

त्या गांवची शाळा सुटीनंतर सुरू होतांच तेथील विद्यार्थ्यांच्या आग्रहावरून त्याच्या सन्मानार्थ शाळेंत एक सभा भरली गेली होती.

त्यावेळीं त्यानें उत्तरादाखल जे भाषण केलें तें ऐकून गोविंद भावे, सदाशिव वर्तक वगैरेंना तर आश्चर्य वाटलें. कृतज्ञतेचे उद्गार त्याचें तोंडून येतील कोणाचीही अपेक्षा नव्हती. बाकीं सारें व्याख्यान अगदीं समतोल—सडेतोड आणि त्याची उच्च संस्कृतिनिदर्शक असें झालें.

" कायरे—आज कुठें नाहीं घसरलास हिन्दू समाजावर ! आजच्यासारखा शिक्षितांचा प्लॅटफॉर्म तुला पूर्वी कधीं मिळाला नसेल—! " सदाशिवनें येतां येतां विचारलें.

" आजचा प्रसंग माझ्या सन्मानार्थ होता—अशा वेळीं शिष्टाचार पाळणें माझें कर्तव्य होतें ! "

सदाशिवचे घर तळ्याच्या एका पाळीच्या आडबाजूला होतें. बोलत बोलत तो तळ्यावरून जाऊं लागला.

तों, दोघे तिघे अस्पृश्य आपले लाकडाचे भारे टाकून एका घराच्या सावलीलींत हुश हुश करीत होते. ती सकाळची १०-१०॥ वेळी होती. त्यांनां फार तहान लागली होती. मण समोरच्या तळ्यांत उतरतां येणार नव्हतें—म्हणून ते नुसते त्या पाण्याकडे आशाळभूतपणानें पाहात होते.

घरांतल्या आजीबाईनें त्यांच्या भाऱ्याचे पैसे ठरल्याप्रमाणें दिले. ते उठणार तोंच—

" ए आजी—थोडे पाणी पाजतां कां ! " असें एका मनुष्यानें विचारलें.

हें बोलणें कानीं पडतांच, पुढें काय होतें हें पहाण्याची जिज्ञासा वाढून सदाशिव तेथें उभा राहिला—

आनंदरावाला पण थोडीशी जिज्ञासा होतीच—

" थांबा हं—असे कोमल स्वरांत म्हणत ती आजीबाई घरांत गेली आणि एक भला मोठा पाण्याचा तांब्या घेऊन आली.

आणि गटाराच्या एका दगडावर उभी राहून त्या पाणी पिणाऱ्यांचें पाणी अंगावर उडणार नाहीं म्हणून आंग चोरीत—लुगड्याचा ओचा सावरीत त्यांना पाणी पाजूं लागली.

दोघां जणांनींच तिचा तांब्या रिकामा केला.

तिसऱ्यासाठीं म्हणून पाणी हवें होतें; म्हणून ती लगेच समोरच्या तलावाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पायऱ्या उतरून गेली आणि तांब्या भरून घेऊन हळूहळू पायऱ्या चढून तेथें आली. तों ती दम लागल्यामुळें धापा टाकीत होती.

ती त्या तिसऱ्याला पूर्वीप्रमाणें पाणी पाजूं लागली. आनंदराव आणि सदाशिव पुढे चालूं लागलें.

" स्वतःला एकदां दम लागला तरी तिनें पाणी आणून पाजलें. पण विटाळलेल्या तांब्यानिशीं घरांत गेली नाहीं कीं त्या माणसाला तिनें ह्या तळ्यांतील पाण्याला शिवूं दिलें नाहीं. तुम्ही लोक मराल पण आम्हांला पाण्याला शिवूं देणार नाहीं—" आनंदराव कांहींशा उद्वेगानें म्हणाला.

" तिच्या रुढाचाराच्या कल्पनेवर तिच्या दयेनें जय मिळविला. धांपा टाकीत येऊन तिनें पाणी पाजलें त्यांना—! तिला स्वस्त बसतां आलें असतें--पण रुढ धर्माच्याविरुद्ध दयेनें ताण केलीच कीं नाहीं—दया हा मानव्याचा अलंकार नाहीं का ? तो धर्मापलिकडचा आहे !" सदाशिवनें तात्त्विक भूमिकेनें उत्तर दिलें.

* * *

त्या गावाच्याबाहेर सुमारें पाऊण मैल लांबीवरच्या एका टेकडीवर एक शिवालय होतें.

अजून पाऊस सुरू व्हायला अवकाश होता. आकाश अभ्रांनीं भरून हवा फारच ऊष्ण होई. त्यामुळें रोज सायंकाळीं त्या टेकडीवर पुष्कळ मंडळी सहल करण्यास जात.

असेच आनंदराव आणि सदाशिव हे त्या टेकडीच्या मागील अंगाला एका खडकावर जाऊन गप्पा मारीत बसले होते.

त्या देवळाच्या पुढच्या बाजूस बरेच चौथरे होते. त्यांवर बहुतेक मंडळी गटागटानें बसली होती.

त्या टेकडीच्या पायथ्याला मार्गांत बाजूस एक विहीर होती. त्या विहिरीवर गांवांतील भाटीयाची ८-१० वर्षांची मुलगी बसलेली, तिचा रक्षक तेथें जवळ उभा असलेला आणि आजूबाजूला बांधार दोनचार माणसें रेंगाळत असलेलीं त्यांच्या नजरेस पडत होतीं.

तोंच ती मुलगी विहिरींत पडल्याची आरडाओरड त्यांनें ऐकली. कशी पडली कुणास ठाऊक !

आनंदराव आणि त्याच्या मागून सदाशिव दोघे धावत ती टेकडी उतरून त्या विहिरीजवळ आले. पाहतात तों ती मुलगी तळाशीं गेलेली होती. तिचा नोकर वर हतबुद्धच झाला होता. तो वेड्यासारखा रडतच होता.

आनंदरावानें आपली टोपी पार भिरकावून दिली आणि सदाशिवनें आंत उडी टाकण्याच्या आंतच त्यानें धाडकन उडी घेतली तो तळाशीं गेला आणि एका हातानें त्या मुलीस धरून त्यानें वर काढलें.

इतक्यांत सदाशिव त्या विहीरीच्या पायऱ्या उतरून आंत शिरलाच होता. त्या दोघांनीं तिला जपून वर आणली

तिचा क्षीण श्वासोश्वास चालू होता. लगेच दोघांनीं तिला ' फर्स्ट एड '-प्रमाणें ट्रीटमेंट दिली. अर्ध्या तासानें ती चांगली शुद्धीवर आली.

इतक्या अवकाशांत देवालयाकडे फिरण्यास आलेली बहुतेक सगळी मंडळी जमून तें सारें दृश्य पाहात होती.

आनंदरावाचें साऱ्यांनीं कौतुक केलें. इतक्या अवधींत त्या मुलीचा बाप मोटारनें तेथें येऊन पोचला. त्यानें वर जाऊन आनंदरावाला कवटाळला आणि हृदयपूर्वक त्याची पाठ थोपटली.

आनंदरावाला सदाशिवसह मोटारमध्यें घालून त्यानें आपल्या घरीं नेलें. आणि आपल्या घरांतील साऱ्यांशीं त्यांची ओळख करून दिली.

त्या भाटीयानें मोठ्या आनंदानें त्याला मसाल्याचें दूध दिलें. आणि त्याच्यासह त्यानें स्वतः पण घेतलें.

आनंदराव जायला निघाला.

" मी कोणत्या ना कोणत्या रीतीनें तुमचा उतराई होण्याचा यत्न करीन-- माझ्या एकुलत्या एक मुलीचे तुम्ही प्राणदाते आहां हें मी विसरणार नाहीं " अशा तऱ्हेनें त्यानें गहिंवरून निरोप दिला.

त्याला त्याच्या घरीं मोटारींतून पोचविलें.

खात्री झाली !!

इतकी विविधता
इतकें नाविन्य
असल्यावर....
कां नाहीं खात्री होणार
—कीं,—

व सुं ध रा

(साप्ताहिक)

झपाट्यानें सुधारणेच्या मार्गावर आहे
गेल्या शनिवारचा अंक पहा
म्हणजे

नाविन्य.... ....विविधता
उद्बोधन.... ....मनोरंजन

किती भरपूर प्रमाणांत आहे
हें दिसून येईल—

एक नवी योजना !

वसुंधरेचा प्रत्येक अंक जपून ठेवा.
खास ' वसुंधरे ' साठींच—
—प्रसिद्ध ज्योतिषी—
श्री गजाननस्वामी बोरकर
भविष्य लिहीत आहेत.

व्यवस्थापक—वसुंधरा कार्यालय
खटाववाडी, गिरगांव.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

" आतां कोठें राहिला आहे असा अस्पृश्यपणा !" सहजच सदाशिवनें मोटारींत त्याला विचारलें.

आनंदराव हंसला. तो कांहींच बोल ला नाहीं.

दुसऱ्या दिवसापासून आनंदराव महादेवाला पाणी घालण्याच्या विहिरीला शिवला म्हणून सनातन्यांची ठिकठिकाणीं चर्चा सुद्धां झाली.

ही कुणकुण सदाशिवच्या कानीं यायला वेळ लागला नाहीं पण, पुढें काय होतें हें पूर्णपणें कळण्यांच्या अगोदर तो आनंदरावाजवळ कांहीं एक बोलला नाहीं.

त्या भाटीयाला ही वार्ता कळतांच तो संतापानें लाल झाला.

" ××× भटांना खरा देव समजला नाहीं. खरें शुद्धत्व त्यांना ठाऊक नाहीं. " वगैरें तो बोलत होता.

सनातन्यांनीं त्या विहिरीवर बहिष्कार घातला हें कळतांच तो भाटीया राजरोस रोज सायंकाळीं त्या विहिरीवर जाऊन मुद्दामच पाणी पिऊं लागला.

हे भटांना कळावयाचा अवकाश, त्यांनीं तावडतोब त्या विहिरींची शास्त्रोक्त शुद्धि करून घेतली.

हें वृत्त सदाशिवनें आनंदरावाला कळविलें.

" य अज्ञानीं लोक आहेत हे—! सारा वेडगळपणा—त्या लक्षाधीश भाटी ते बहिष्कृत करूं शकत नाहींत म्हणून शुद्धीचा सांवळागोंधळ त्यानीं घातला.—दुसरें काय ! मूर्ख लोकाचे—! ! " आनंदराव सदाशिवला बोलला.

" अशा ह्या अज्ञानानें—वेडगळ समजुतींनीं त्यांनीं आपला धर्म, कलंकित केला—पार धुळीस मिळविला आहे—हा खरा हिंदुधर्म नव्हे......खरा धर्म निराळाच आहे " सदाशिव बोलला.

" खरा मानव धर्म जगांतील सर्व धर्मांच्या पलीकडचा आहे—" आनंदराव खुषींत बोलला.



खार रोड (मुंबई) मध्य वर दाखाविलेल्या बिल्डींग्ज आहेत, व त्या गव्हर्न्मेंन्ट डेव्हलपमेंट स्कीम नं. ७ मध्यें ओखल्या जातात कीं, ज्या १९३४–३५ मध्यें बांधल्या गेल्या आहेत-

बंगले नं. ५० व ५१ हीं दोन माळ्याचीं घरें आहेत. ज्यांत आठ मोठ्या खोल्या, चार स्वैपाक घरें, चार बाथरूम व चार संडास आहेत. त्यांच्या चारी बाजूस बंगल्यापेक्षां तिप्पट जागा सुटी आहे. बंगल्यांत हवा व उजेड चांगल्या रितीनें येऊं शकतो. बंगले अशा रितीनें बांधले आहे, कीं ज्यांत ४ कुटुंबें स्वतंत्र रितीनें राहूं शकतात. प्रत्येक बंगल्याची किंमत २२००० रु. आहेत. व प्रत्येक बंगल्याचें मासिक भाडें १३० रु. येतें.

बंगले नं. ३४ व ३५ फार मोठे आहेत. त्यांत ८ ब्लॉक, पैकीं ६ ब्लॉक मध्यें प्रत्येकांत ४ मोठया खोल्या, एक स्नानघर व एक संडास आहे, व दोन ब्लॉक प्रत्येकीं ३ मोठया खोल्या, एक बाथरूम व एक संडास आहे. ह्या बिल्डिंगची किंमत ५०००० रु. आहे. व त्याचें प्रत्येकीं भाडें ३५० येतें. बंगल्याच्या चारी बाजूस त्याच्या तिप्पट सुटी जागा आहे. २ बक्षिसें बंगला नं. ५० व ५१ बरोबर उत्तरें पाठविणाऱ्या दोघांना देण्यांत येतील.

८ बक्षिसें बंगले नं. ३४ व ३५ मधील एक ब्लॉक—एक चूक ज्यांची असेल त्यानांःखालीलप्रमाणें सर्वांत पहिल्यानदां उत्तर पाठविण्यानां ब्लॉक नं. २ ज्याची किंमत रु. ७५०० आहे. ज्याचें मासीक भाडें ५० रु येतें व नंबर अनुक्रमें

ब्लॉक नं. १ किंमत रु. ७२०० मासीक भाडें रु. ४८, नं. ६ किं. रु. ६८०० भा. रु. ४५, नं. ३ किं. रु. ६७०० भा. रु. ४५, नं. ५ किं. रु. ६५०० भा. रु, ४२, नं.७ किं. रु. ६३०० भा.रु. ४०, नं. ४ किं. रु.४७०० भा. रु. ३८, नं. ८ किं. रु. ४३०० भा. रु. ३२

हमी—ज्याना बंगला नको असेल तर तो बंगला विकल्यानंतर त्याची किंमत रोकड देण्यांत येईल.

बंगला नं. ५० व ५१ प्रत्येकीं. व ब्लॉक नं. १–२–३–४–५–६–७ आणि ८ जे नं. ३४—३५ मध्यें आहेत. त्यांची किंमत अनुक्रमें रु, ५०००, रु. ५२०० रु. ४८०० रु. ३५००, रु. ४६००, रु. ४८०० रु. ४५०० रु. ३३०० रोकड देण्यांत येतील.

स्पेशियल बक्षिसः—ता. १० डिसेंबर १९३६ च्या अगोदर जे सर्वांत जास्त उत्तरें पाठवितील त्यांना २००० रु. रोकड, व ता. १० डिसेंबर ते १५ डिसेंबर ह्यामध्यें जे पाठावितील त्यांना रु. १००० व १५ ते २० ह्यांमध्यें पाठवितील त्यांना व २० नंतर जे शेवटच्या तारखेपर्यंत पाठविणारांस रु. ५०० देण्यांत येतील.

खाली लिहिलेल्या प्रश्नांचीं उत्तरें द्याः—वर फोटोंत दाखविलेल्या बंगला नं' ३४ व ३५ च्या खालीं ज्या लादीची जी जमीन बनविलेली आहे त्या प्रत्येक लादींत चिनी कांचेचे तुकडे लाविलेले आहेत. प्रत्येक लादींत कमी जास्त तुकडे लावले आहेत ज्या लादीवर तुकड्याची संख्या लिहीली आहे त्यांना सोडून बाकीच्या काळ्या व सफेत तुकड्याचें लादींत असे नंबर लिहा कीं आडवी व तिरपी बेरीज २५० होईल. आम्ही ज्या ठिकाणी तुकडे वापरले, आहेत ते त्या ठिकाणी असलेच पाहिजेत.

प्रत्येक उत्तराची फी रु. २, प्रत्येक मनुष्य कोण्या कागदावर वाटेल तेवढीं उत्तरें पाठवूं शकतो पण प्रत्येक उत्तराची फी. रु. २ प्रमाणें पाठावली पाहिजे. मनी ऑर्डर, पोस्टल ऑर्डर मुंबईंत अथवा कोणत्याही बँकेतील ड्राफ्ट ता. १० जानेवारी १९३७ चे अगोदर पाठवावी. मनिऑर्डर करणारांनी मनीऑर्डरचीरसीद उत्तराबरोबर पाठवावी. प्रवेश फी परत देण्यांत येणार नाहीं. बक्षिसे ता. २० जानेवारी रोजी जाहीर होतील. बंगला नं. ५० व ५१. ज्याना बक्षीस मिळेल त्यानां तारेने कळविण्यांत येईल. रिझल्ट वर्तमान पत्रांत प्रसिद्ध करण्यांत येईल. ज्यानां रिझल्ट पाहिजे असेल त्यानीं स्वतःहाच्या नावाचा पत्ता लिहिलेलें एक आण्याचे तिकिट असलेलें कव्हर पाठवावे. मॅनेजरचा निकाल कायदेशीर बंधनकारक राहील.

भाडेकरू बंगल्याचा धनी बनतो

वर फोटोंत दाखाविलेले बंगले सोडून दुसऱ्या बंगल्यांत असें भाडेकरू पाहिजेत कीं ब्लॉकचे रु. ४० व बंगल्याचे रु १५० महिन्याचे भाडे कांहीं मुदती पर्यंत भरून बंगल्याचा मालक बनतां येते.

धी ऑफिसर इनचार्ज प्रॉपर्टी डिलर्स कॉर्पोरेशन, खाररोड, मुंबई नं. २१

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकरण चौदावें

केवळ आठच दिवसांपूर्वी आपण आईशीं कोणत्या तऱ्हेवाईकपणानें वागलों होतों, याचा उदयाला जवळ जवळ विसरच पडल्यासारखा झाला होता. चंदाचीच स्मृति नाहींशी झाल्यासारखी होती, तर तिचें आलेलें पत्र, आणि आणि त्याच्या पायांत उडालेला खटका याची त्याला आठवण रहावी कशी ! आकाशांतील तारके-च्या तेजाची नजरेला आणि मनाला चटक लागली असतां, भडक रंगाच्या चंद्रज्यो-तीची आवड आणि आठवण कोणाला होईल ? अल्लड मनाच्या उसळत्या लहरीवर वाहत जाऊन, चंद्रासारख्या चंद्रज्योतीच्या दिपविणाऱ्या प्रकाशानें आपण दिपून गेलों होतों, असें जरी कदाचित् उदयाच्या मनांत एखादें वेळीं आलें असतें, तर त्या प्रकाशापोटीं उत्पन्न होणाऱ्या धुराची घाण त्या वेळींही घ्राणेंद्रियांत घुसल्याप्र-माणें वाटून त्याला एक प्रकारची शिसारीच वाटली असती. त्या आठवड्यांतील प्रत्येक दिवसाच्या चार पांच प्रहरांत उदयाला उषेच्या सहवासाचा सात्त्विक आनंद लाभत असल्यानें, पावित्र्याचा प्रकाश मंद असला तरी, त्याच्या अंगीं, आपली विषयी दृष्टि निवळून टाकण्याचा गुण आहे, असेंच त्याला विचारान्तीं ठाम कळून आलें असतें; आणि एका रात्रीं आपण चंदाच्या भडक प्रकाशानें आंधळे होऊन सुगणेच्या पावित्र्याला धक्का द्यावयासही तयार झालों होतों, याचें जर स्मरण झालें असतें, तर उदयाला, क्षणमात्र का होईना, उषेला तोंड दाखविण्याचीही शरम वाटली असती. पावित्र्य, 'विरागी' मनाच्या हिंदु कुमारिकेच्या नैसर्गिक जीवनाचें पावित्र्य, वरवर्हीं निःशक्त आणि निष्प्रभ वाटत असलें, तरी, त्याच्या कक्षेंत सांपडलेल्या पुरुषशक्तीला हळु हळु अंकित करून, अखेरीला त्या अडाणी शक्तीला आपल्यापुढें शालीन व्हावयास लावतें. जन्मदात्या आईशींही उखडेलपणा करणाऱ्या मुलाच्या पाशवी प्रवृत्तीला, उत्क्रांतिचक्रांतून, माणुसकींतील देवरूपाकडे नेणारी दैविक शक्ति, म्हणजे 'अशक्त' वाटणारी कुमारिकेची पवित्रताच होय.

उदयाच्या स्मृतिपटावरून चंदाचें चित्र जितकें पुसलें गेलें होतें, तितकेंच त्यानें चित्र चंदाच्या अंतःकरणावर अधिक उठावदारपणानें रेखाटलें जात होतें. किंबहुना, उदय तिला विसरला होता, म्हणूनच तिला त्याची अधिक तीव्रतेनें ओढ वाटूं लागली होती.

एक आठवडा उलटून गेला, तरी आपल्या पत्राचें उदयाकडून उत्तर नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्याची दृष्टिभेटही घडली नाहीं, असें पाहून चंदा अंतरयामीं दिवसें दिवस जास्त जास्तच चिडून गेली होती. पुरुष जातीच्या एका प्राण्यानें तिला पराजित केलें होतें. पराजयाचा अनुभव तिला नवीन होता, म्हणून स्पष्टपणें तिला तो कळत होता, आणि नव्या जोड्याप्रमाणें पदोपदीं तिच्या मनावर घांसघांसून, दुरभिमा-नाच्या पाण्यानें डिळडिळलेलें जसें कांहीं कोडेंच उत्पन्न करीत होता. ते दुरभि-मानाचे फोड ठसठसत होते, खुपत होते, चंदाच्या मनाची आग आग करीत होते. हजारों प्रजाजनांवर सत्ता गाजविणारे एक दोन संस्थानिक, मनांत आणलें, तर साऱ्या जगाच्या व्यापारांत वादळ उत्पन्न करणारे धनिक व्यापारी, संस्कृतिशून्य विद्वत्तेनें तळपळणारे पंडित, इत्यादि प्रकारच्या पुरुषोत्तमांच्या 'भीपणा' ला कित्येकदां चंदानें आपल्या नृत्यनिपुण पायांशीं लोळण घ्यायला लावलें होतें. म्हणूनच उदयाच्या पायांत तोंडघशीं पडल्यासारखें वाटून, तिचा मायावी अभिमान डिवचलेल्या नागासारखा फुंफाटून उठला होता, मनाच्या वारुळांत अष्टौप्रहर फुसफुसत होता.

सगळ्यांना आपल्या माडींतून हाकलून देऊन, चंदानें स्वतःला बंदिवान करून घेतलें होतें. एकदां आरामखुर्चीवर पडावें, दुसऱ्यांदा माडीच्या दुसऱ्या भागांत जाऊन, पलंगावर कलंडल्यासारखें करावें, तेथेंही बेचैनीनें पाठ पुरवली म्हणजे उठून थोडेसें उभें राहिल्यासारखें करावें, अशा तिच्या हालचाली एकसारख्या चालू होत्या.

अशीच ती खिडकीशीं उभी असतां, एकदम स्वतःशीं पुटपुटली, या तर, आतां नाई तिचं काय चालू देणार ? आतां चंदा बारा गांवचं पानी पिऊन हुश्शार झाली हाय म्हनावं ! जुपलीच म्हनावं तुझी माझी आतां. एक जितीन् तरी न्हाईतर जिवानिशी जाईन तरी—'

चंदा कुणाशीं सामना द्यावयाला सिद्ध झाली होती ! ही ती कोण ? उषा ! उदयासारखा नवा नाग त्या केतकीच्या वासानं गुंगून जाऊन, सारें जग, जेथें विकरून गेला होता, तेथें त्या जगाच्या घाणेरड्या कोपऱ्यांत असणाऱ्या चंदाची त्याला काय गणति असणार ? परंतु, चंदा उदयाच्या खिसगणतींत राहिली नाहीं, याचा दोष उषेकडे काय म्हणून ? सुगंध पसरत रहाणें हा केतकीचा निसर्गधर्म, केतकीच्या वासानें गुंगून आत्मानंदानं डोलत रहाणें हा नागराजाचा उपजत—धर्म ! तसें असलें, तरी आपल्या मायेच्या बुट्टींतून केतकीच्या वासासाठीं हातचा नाग पळाला, असें वाटून तर चंदासारखी गारुडविद्यावती रागावणार नाहीं का ? का चंदाच्या मनो-गतांतील 'ती' म्हणजे दुसरीच कोणी व्यक्ती होती ?

* * * *

"अम्मा, अम्मा," जिन्याच्या दारांत उभी राहून, चौकटीच्या दोहों बाजूंवर हातांचे तरफे देऊन चंदानें आपल्या शरीराचा वरचा भाग दाराबाहेर रेलविला होता आणि ती हांका देत होती. अम्मानें ओ दिली नाहीं, म्हणून तिनें तानीच्या नांवानें टाहो फोडावयास सुरवात केली,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

' पंगे मास्तरांना घेऊन अम्मा दवाखान्यांत गेली असून, वानी भाजी–बाजार आणण्यासाठीं केव्हांचीच बाहेर गेली आहे, अशा आशयाची माहिती जिन्याच्या वळाशीं येऊन अल्लीसाहेबानें आपल्या मालकिणीला पुरविली.

" मालिक, काय होतं तुला ?" अल्लीसाहेबानें कळकळीनें विचारलें " माती–माती पायजे मला " चंदानें चिडखोरपणानें उत्तर दिलें.

" मट्टी ? मट्टी कशाला ? झाड लावयाचा हाय काय ? " मुसलमान नोकराच्या खोट्या तत्परतेनें अल्लीसाहेबानें विचारलें.

" व्हय, झाड पुरायचं हाय माझंच ! " चंदाचा संताप वाढीला लागला होता; " मला पुरून घ्यायचं हाय मातींत. जा परड्यांत डबरा खणा, अल्लीसाहेब "

" तोबा तोबा ! " असें म्हणत असतां, उजव्या हाताच्या चारी बोटांनीं अल्लीसाहेबानें आपले दोनी गाल दोनदोनदां हलके हलके थोपटले " क्या झुटी बात; मालिक तूं मट्टींत गेलीस, तर आम्हीं काय पोटांत मट्टी भरावी काय ? "

ज्याला त्याला आपल्या पोटाची काळजी. पोटाच्या काळजींत सांपडलेल्यांना कुणाच्याचं काळजाचीच कदर रहात नाहीं चंदाला त्या सत्याचा अनुभव हरघडी येत होता. तिनें पाळलेल्या कुत्र्यापासून अम्मापर्यंतच्या प्रत्येक प्राण्याला आपापल्या पोटासाठीं चंदा हवी होती. तिच्या शरीराला किंमत होती, त्यांच्या दृष्टीनें तिला काळीज असून नसल्यासारखेंच होतें.

शेजारच्या दुकानांतून चार कप चहा आणण्यासाठीं चंदानें अल्लीसाहेबाला हुकूम दिला. तो पाठ वळवितो न वळवितो न वळवितो, तों वरून चंदानें विचारलें, " अल्लीसाहेब, नानासाब वकील आज आलं न्हाईत काय ? "

" जी, क्यूं नही ? जरूर आलाय् वकीलसाब. बेचारा आजकल रोज येते; पन् मालिकच्या महालाचा दरवाजा बंद पाहून खालीं अम्माशी बात्‌चित् करते, तानूबाईला अन् कुत्तेकू गोंजरते, अने बुरा चेहरा करून जाते रातचा आपले मकानाला, मालिकच्या मुलाकात मुष्किल, ते करितां हवालदिल् हाय् बेचारा ! "

" मग खालीं काय करतायत आतां "

" क्या करना ? तानुबाय नाय तो कुत्ते ले के बैठे है ! कमसो कम् चार चिलीम भरके तमाखू खाक कर दिया इयू हमारा ! बेचारा वकीलसाब ! " अलीसाब ! " अलीसाहेबानें नानासाहेब बाजारबुणग्यांची वकीली करून, आपल्या मालकाजवळ त्यांची कैफियत दिली.

त्याची वकीली फुकटावारीची होती असें मात्र नव्हे. ' जितका पैसा राखला, तितका पैसा मिळविला; अशा व्यावहारिक स्वार्थाचा विचारच अल्लीसाहेबाच्या वकीलीच्या बुडाशीं होता. त्याला दर दिवशीं तमाखूसाठीं अम्माकडून दोन पैसे मिळत असत दोन पैशांची तमाखू तो बिचारा मोठ्या शिकस्तीनें या दिवसापासून त्या दिवसापर्यंत पुरवीत असे. परन्तु, नानासाहेब वकीलांची चंदाच्या कोटींत बेकारी झाल्यापासून–गेल्या चार पाच दिवसांत–त्याच्या वाटणीला अर्ध्या पैशाचीही तंबाखू येईनाशी झाली होती. म्हणून तो वकीलसाहेबांचा आपल्या मालकिणीच्या दरबारांत सनदशीर प्रवेश करवून देण्यास उत्सुक होता. तसें झालें म्हणजे, नानासाहेबांची बैठक आपोआपच त्याच्या ' बिछोन्या ' वरून उठली जाऊन, त्याची दीड पैशाची तंबाखू वांचणार होती. वांचलेली टंबाखु, म्हणजे नवीनपणें कमावलेला मिळकत असेंच अल्लीसाहेबाला वाटत होतें. त्याचें तें वाटणें किती रास्त होतें ! नानासाहेबांनीं बसल्या बसल्या जाळून फस्त केलेल्या तंबाखूची झीज भरून काढण्यासाठींच बिचाऱ्या अल्लीसाहेबाला, पंगे मास्तर, बालशेट सोनार, विनोबा वैतागे, इत्यादि चंदाच्या दरबाऱ्यांच्या खिशांवर हल्ला करावा लागे. नानासाहेबांनीं केलेलें नुकसान, त्यांच्याच खिशांतून भरून काढावें, असें पुष्कळदां त्याच्या मनांत आलें, तरी तें घडून शक्यच नव्हतें, असें अल्लीसाहेबाला पटलें होतें. बाकीचे दरबारी आपपल्या विड्या कोटांच्या खिशांतच ठेवीत, व ते कोट हवे तेव्हां अल्लीसाहेबाच्या हातीं लागत. परन्तु, अल्लीसाहेबाच्या खोलींत बैठक ठोकूं लागल्यापासून, आपली विड्यांची कळकट डबी पाटलोणीच्या खिशांत दडपून ठेवण्याची नानासाहेब खबरदारी घेऊं लागले असल्यानें बिचाऱ्या अल्लीसाहेबाचा ' गनीम को खलास ' करण्याचा मनसुबा मनांतच जिरून जात असे. परमुलखांतून त्याचा त्याच्या तमाखूचें नुकसान भरून काढावें लागे. त्याच्या खिशांत सांपडणाऱ्या विड्याची जातवारी घेतली असती, तर प्रत्येक विडीसाठीं निरनिराळा रकाना घालावा लागला असता !

(२)

किती तरी दिवसांनीं—नव्हे महिन्यांनीं— नानासाहेब बाजारबुणग्यांना सकाळच्या चहाबरोबर केकचे तुकडे चघळावयास मिळाले होते. एके काळीं केकखेरीज चहा गिळत तसे त्यांना. नानासाहेबांचें तोंड केकच्या तुकड्यांनीं मिठीं बसेतों मांठें होऊं लागे, तेव्हां त्यांच्या वडाखयांत सांपडलेल्या अशीलाचें तोंड, अस्सल रत्नागिऱ्याच्या घरचें ताक प्याल्याप्रमाणें आंबट होत असे. पण तीं सदा—आंबट अशीलें गेल्या कित्येक वर्षांत त्यांना तोंडच दाखवेनाशीं झाली होती. नानासाहेब तसे निग्रही; त्यांनीं ठरवून टाकलें, कीं चहाबरोबर केक नसली, तर मुळीं अडून म्हणून रहावयाचें नाहीं. संवय आपल्या आहारांत राहिली पाहिजे; अहारांतील संवयीच्या अहारीं राहण्यासारखी नामर्दाई नाहीं. आपल्याबद्दलच्या साऱ्या गोष्टी, वेळीं अवेळीं, प्रसंगीं अप्रसंगीं लोकांच्या माथीं मारण्याच्या त्यांच्या उदार वृत्तीमुळेंच नानासाहेबांचा तो आहारी—निश्चय सगळ्या जगाला कळून चुकला होता.

कित्येक महिन्यांनीं आलेल्या केक—पर्वणीचा, एखाद्या कट्टर सनातन्याच्या निष्ठावंतपणानें नानासाहेब फायदा घेत होत होते.

" कांय नानासाब, आतांशा अगदीं उंबराचं फूल झालायसा ?" चंदानें लाघवीपणानें विचारलें.

" काय करूं ग, मी सरकारी वकील नाहीं—नाहीं तर—" नानासाहेबानीं गंभीरपणाचा आव आणून बोललें वाक्य अर्ध्यावरून सोडून दिलें.

" म्हणजे काय ?" किंचित् गोंधळून चंदानें विचारलें.

" मी सरकारी वकील असतों, म्हणजे, स्वतः चोरटेपणा करून उलटी ओरड करणाऱ्या या चंदाला चांगली ' समजी ' द्या असं मी पोलिसांना फर्मावलं असतं. आम्ही अगदीं आशाळभूतपणानं तुमच्या उंबरठ्याचीं सालपटं काढावींत तर, चंदाराणीनं आपल्या महालाचीं दारें बंद करून आमचा कोंडमारा करावा आणि आतां उंबराचं फूल म्हणून आमचीच पूजा बांधावी ! खासा न्याय !" ' कशी आपण बोलांची गोलंदाजी केली ?' अशा संतुष्ट मुद्रेनें नानासाहेब शेवटीं हंसले.

" तुम्ही बाई वकील ! आमच्यासारख्यांना का ऐकणार हाय बोलायला ?" चंदा शब्द चावत चावत लाडीकपणानें म्हणाली.

नानासाहेब खूष होऊन गेले. कितीतरी कालानंतर चंदा त्यांच्याशीं मन मोकळेपणानें एकांतांत बोलत होती.

वकीलाची जातच खुळचट असते. जरा स्तुतीच्या बोळयानं पुसली, कीं, लागते आत्मसंतुष्टतेनें तकाकावयाला; मग बुद्धीवर छाया पडून तिची किरणें प्रतिबंधित झालेलीं त्या जातीच्या ध्यानांतही येत नाहीं. नानासाहेब बाजारबुणग्यांना चंदा दिलखुलावटीनें आपल्याशीं बोलत आहे, असें वाटत होतें; परंतु, हृदयाच्या सातां पडद्याआड आपला हेतु लपवून चंदा त्यांच्याशीं वरपांगीपणानें बोलत होती. तमाशेवाली असली, तरी ती नटीच होती ना ? नटी म्हणून तिचें कोणा संपादकानें फोटो छापून उदो उदो केले नसेनात का. परंतु, त्यामुळें, तिला हुकुमी मुद्राभिनय आणि तदनुरूप शब्द व सूर हवे तेव्हां कामीं आणतां येत नव्हते, असें थोडेंच होतें ? तिच्या जवळपास येऊन, मोहित झालेल्यांना आपल्या अभिनयानें क्षणांत हंसवावयाची आणि क्षणांत, डोळ्यांतून पाणी गाळावयास लावण्याची कला म्हणजे तिच्या हातचा मळ होता. अभिनय कलेचें प्रदर्शन करण्याचें स्थळ म्हणजे रंगभूमि. परंतु, चंदा, ' जग ही एक रंगभूमीच आहे ' या काव्युक्तीचें सत्य कित्येक वर्षें आचरणांत आणीत होती. तमाशांत नाचतांना ती जे हावभाव व अभिनय वठवीत असे, त्याहून, ती जेव्हां ' जगाची चंदा ' ही भूमिका रंगभूमीहून अन्यत्र आचरीत असे, तेव्हांचा तिचा अभिनय, कलेच्या दृष्टीनें पाहतां, निखालस अत्युत्तम प्रतीचा असे. आजकालच्या भाषेंतच सांगावयाचें झालें तर, असें सागतां येईल, कीं, ' कलेकरतां कला ' असले भोंपळसुती सूत्र मात्र तिच्या कलेच्या ताण्याबाण्यांत कधींच नसे. खरी चंदा जरी अलीकडे कित्येक वर्षें कधींच कोणाला दिसली नसली, तिचे प्रासंगिक हेतूच ' जगांतील चंदे 'च्या कलेची जीवज्योती पेटवीत असत, पेटली ठेवीत असत.

खुषीच्या भागेनें नानासाहेब वकील बेभान झाले होते आणि कलावंत चंदानें तें तेव्हांच ताडलेंही होतें.

" नानासाब, तुमां ते माझ्यापाशीं तीनशें रुपै मागत व्हतां, त्या भानगडीचं काय झालं ? मिटली वाटतंयू ती उचापत ? "

बोलतां बोलतां, मधेंच एकदम निराळे प्रश्न चंदानें उपस्थित केले.

नानासाहेबांना वाटलें देव पावला. आपल्या गळचेपीच्या फासण्या कमी करण्याची चंदाला कशी आणि केव्हां सुनावणी करावी, या फिकीरींत ते होतेच होते. तेव्हढ्यांत चंदानेंच तो विषय काढला त्यांचें कामच साधलें. तथापि त्यांना आपलें म्हणणें ' पटवेगिरीनें ' चंदाला कसें ऐकवावें त्याची मानसिक मांडणी ताबडतोब

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करवां येईना. त्यामुळें ते बरेचसे गोंधळल्यासारखे झाले होते, आणि त्या गोंधळाची विसकटाविसकट त्यांच्या मुद्रेवर स्पष्टपणें दिसतही होती. चाणाक्ष चंदाच्या भेदी नजरेंतून ती ठळक खूण सुटणें शक्यच नव्हतें.

म्हणून असो, किंवा, तिनें होऊन काढलेला विषय निकालांत काढावयाचा तिच्या निश्चयच झाला होता म्हणून असो, चंदा पुढें आपण होऊनच म्हणाली; " मी त्या दिवसापासून तुमच्या त्या बाईची न् तुमची वाट पहातेय; तीशे रुप्पयेबी तयार ठेवल्ये होते, पन् तुमचा कुटं हाय पत्ता. मी तरी काय अशी मोटी सौकार लागून र्‍हायलय ! म्हटलं एकाद्याची गरज करीन म्हटलं, तर पैशे तयार असावेत म्हणून, इकडं तिकडं करून रक्कम उबी क्येली; पन तुमाला कुठं हाय गरज ? तुमाला गरज न्हाई दिसत असं समजून, मी पैका जिकडच्या तिकडं लागी लावावा, तर तुम्ही आपले येकदम भुईतन वर आल्यावानी संबूर उभे र्‍हाल अन् चंदे द्ये ते रूपै असं म्हणाल, ते साठीं आज निकालच करायचं असं मी योजलयं "

" माझी कल्पना नव्हती—" नानासाहेब बरेच गोंधळल्यासारखे झाले होते.

" तुमाला आपली जेव्हां तेव्हां चेष्टाच वाटतीया. पन् न्हाई त्या गोष्टींत मी न्हाई कधीं तोंड बाटिवणार "

" तसं नव्हे चंदाबाई—"

" मग कसं ? " आपल्याबद्दल आदराच्या आवाजानें बोलूं लागलेले पाहून, चंदाला हंसूं आलें होतें.

" आधीं तूं काय म्हणाली होतीस ? आठवतंय का तुला ? "

" काय बरं ? "

" रखमाबाईचे पैसे रोख देईन, असं कुठं तूं म्हणाली होतीस, तूं तिच्या रकमेबद्दल माझ्यासाठीं जामीन राहीन असें मला म्हणाली होतीस—आहे का लक्षांत ? "

चंदाला आपला तेव्हांचा विचार व त्यावर उभारलेली कृतीची आंखणी—मांडणी यांची चटकन् स्मृती झाली; आणि तेव्हांच्या आणि आतांच्या विचारसरणींत पडलेला फरक जाणवून ती किंचित् बुजल्यासारखी झाली. परन्तु, आपली बूज दाखविण्याइतकी ती कच्ची नसल्यानें तिनें पटकन् मोहरा बदलला.

" मग त्ये कवा मी नाकबूल जातेय ?—"

" मी तसं कांहीं म्हणत नाहीं, माझाच त्यामुळं गैरसमज झाला बघ चंदा. मी म्हटलं तुला उगीच कशाला माझ्या घरापर्यंत यायचा त्रास द्यावा ?—"

' तर तर मोठे घरमद्येवच कीं न्हाई तुमी ? मी घरीं येइन तुमच्या तर नसती वेडी होईल घरादारांत या भीतीनं तुमी रकमाबाईलाच माझ्या घरीं न्याचा आग्रेव करीत असाल. मग ती कथा येत न्हाई म्हनाली ? "

" तिचं आपलं एक म्हणणं, ' मी कोण ती तुमची बाई ओळखत नाहीं'—',

" मी काई त्या तमाशेवालीच्या घरांकडं यायची न्हाई की तिचा हवाली घ्यायची न्हाई ' असंच हटानं एकसारखं म्हणत र्‍हाइली न्हवका ती ? " भेदी नजरेनें नानासाहेबांकडे पहात चंदानें विचारलें.

" तसंच कांहीं नाहीं—ती कशाला तुझ्याब भलतं सलतं बोलेल ? तिला काय तुझी माहिती आहे ? " सारवासारव करण्याच्या खटपटीनें वकील साहेब म्हणाले.

परन्तु त्यांचें ' आर्ग्युमेंट ' एकदम ' फेल ' केलें चंदानें. ती चटकन् म्हणाली, " रकमाबाईला माजी माहिती नसायला काय झालं ? तिनं माजी जामिनकी मुकाट्यानं कबूल करावी, म्हनून तुमी माजी तिला हव्थी तितकी माहिती पुरविली असेल !—व्हय की न्हाई ? "

" चंदा, तूं म्हणजे—" चंदाची नजर चुकवीत नानासाहेब वकीलांनीं अर्धेमुर्धे वाक्य कसें तरी उच्चारलें.

" अट्टल बदमाश हाय ना ? मी कशीबी असूं दे !—पन त्ये र्‍हाऊं दे तुमाला हव तर रोक रुपये देते; मग न्हाईना तुमच्या त्या रकमाईची तक्राद ? "

" मग कशाला करील ती बघा तक्रारी ? चंदा तूं म्हणजे—" कृतज्ञतेनें भरलेली नजर चंदावर रोंखून नानासाहेब म्हणाले.

" अगदीं चिंचणीची यमाई ना ? " चंदा मिस्किलपणानें हंसत म्हणाली; " न्हाइ बरं का वकीलसाब, मी मगा तुमाला वाटलं तशी बदमाशी न्हाई अन् द्येवीबी न्हाई—मी आपली हाय चंदा—उगीच चऱ्हाट नको. मी पैसे देईन, पन माझ्या हातानं त्या रकमाईच्या पदरांत टाकीन. व्हय, न्हाई तर मी तुमाला दे द्यावत, अन् ते दुसऱ्याच एकाद्या सौकारानं पटकावत—तुम्हाला एकाचं करा हाय म्हणून तुमच्यावर ईश्वास टाकावा ? "

नानासाहेब मुकाट्यानें चंदाच्या शब्दाचे फटके खात होते ?

धट्टपणानें ते म्हणालेच " कसं जमणार तें ? सारीच पंचाईत दिसते आहे मला ! "

" आतां कसली पंचाईत ? "

" ती बया तुझ्यापर्यंत कशी येणार ? "

" न यायला काय झालं ? रोकीनं रकम मोजतों, हवं तर इतक्या दिवसांचं याज बी घेतों असं सांगा म्हणजे चट धांवत येईल डोक्यांत हवी तर. पैका रोकीनं मिळतोय म्हटलं तर ती मांज्याच हाय रगतपित्याच्या बी घरी जाईल ती भल्यानं, मला हाये ठाऊक. ते अन् तुमच्या नरड्यांत देलेला पैका परत मिळणार मग का न्हाई येणार ती ?—जा आतां तिच्याकडे ?—उठा—"

" तिच्याकडं जायलाच नको—मी आमच्या घरी गेलों तरी बस्स आहे; बसलेलीच आहे ती आमच्या हपीसांत धरण धरून—" नानासाहेबांच्या बोलण्यांत खिन्नपणा असला, तरी हताशपणा मात्र तेव्हां भासत नव्हता. कारण रखमाबाईच्या शिंग्राचा त्यांच्या गळ्याभोवतालीचा विळखा चंदाच्या उदारपणानं नाहीसा होणारच, अशी त्यांची जवळ जवळ खात्री झाली होती.

* * *

चंदाचें भविष्य—नव्हे अंदाज—ठाम खरा ठरला.

अगदीं त्याच दिवशींच्या रात्रीं रखमाबाई नानासाहेब बाजारबुणग्यांबरोबर संतोषानें आणि मुकाटयानें चंदाच्या घरीं आली !

नानासाहेबांना अल्लीसाहेबांच्या चिलमीची चुंबनें घेण्याची परवानगीवजा आज्ञा करून, चंदानें त्यांना खालीं अल्लीसाहेबांच्या बिछान्यावर ' चुंबित ' होऊन बसावयास भागच पाडलें होतें.

रखमाबाईची आणि चंदाची एकच अशी चांगली दीड दोन तासांची बैठक झाली.

अगदीं दिलखुष अंतःकरणानें रखमाबाई परत जावयास निघाली. आश्चर्याची आणि अगदीं अपूर्व गोष्ट म्हणजे चंदा तिला बाहेरच्या रस्त्यापर्यन्त पोहोचवावयास आली होती.

" सुटलों ना मी ? झालं ना तुझं काम ? " वाटेनें जातां जातां नानासाहेबांनीं रखमाबाईला विचारलें.

" झालं न् नाहीं—"

" म्हणजे ? "

" सारे पन्नासच रुपये दिले चंदाबाईनीं ! "

" अन् मग ? "

" तुम्ही नका चिंता करू. तुम्ही झालांत मोकळे—पावती देतें हवी तर आतां, वकीलसाहेब, तमाशेवाली असली, तरी चंदाबाई मोठ्या सज्जनबाई आहेत अशी माझी खात्रीच झाली आहे. ' आज आठां दिवसां आणखी शंभर रुपये देईन, उगीच वकीलसाहेबांना तसदी देऊं नका—झालं ना ? ' असं चंदाबाई मला म्हणाली तर ' नाहीं ' म्हणायंच कांहीं मला सुचलंच नाहीं बघा वकीलसाहेब, अन् जरी मला तसं कांहीं सुचलं असतं, तरी बाई, माझ्याच्यानं कांहीं तिला नकार देववला नसता. इतक्या दयाळू—मायाळू बाईला कसं बाई फट्कन् नाहीं म्हणायचं ! नाहीं का ? "

रखमाबाईचीं चंदाची सारी स्तुति लक्षपूर्वक ऐकून घेऊन, " अजबच आहे आमची चंदा ! " असें नानासाहेब म्हणाले. त्यांच्या शब्दांचा खरा अर्थ मात्र रखमाबाईच्या लक्षांत आला नाहीं.

" कुठं तरी चंदाबाईला पूर्वी बरीचशी पाहिली असावी असं मला एकसारखं वाटतं आहे ! पण कुठं अन् केव्हा तें मेलं कांहीं केल्या ध्यानांतच येत नाहीं ! " कांहीं अंतर चालून गेल्यावर रखमाई म्हणाली.

" असं ? " आश्चर्यपूर्णतेनें सुचविलेला प्रश्न करून जवळच असलेल्या कंदिलाच्या अंधुक प्रकाशाचा फायदा घेऊन नानासाहेब रखमाबाईकडे पहातच राहिले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांची आठवण

लेः —गो. रा. दोडके

आज एकाएकींच रघूला त्याची आठवण झाली.

त्यांची गांठभेट झाल्याला आज कांहीं वर्षें झालीं होतीं.

सायंकाळची वेळ. आकाश भरून आलेलं होतं, सृष्टी हिरवीकंच दिसत होती. मावळत्या सूर्यनारायणाचीं किरणें घराघरांवर, झाडाझाडांवर, चराचरावर पसरलीं होतीं. वातावरण शांतगंभीर झालें होतें. रघू आणि तो, दोघेही फिरायला म्हणून बाहेर पडले. पाऊस पडूं लागला, सरीवर सरी कोसळूं लागल्या. परन्तु घरीं जायला अथवा आडोसा, निवारा घ्यायला दोघांपैकीं कुणाचेंच मन घेईना. लहान पोरांप्रमाणें एकमेकांच्या गळ्यांत हात घालून पायानें पाणी उडवीत ते तसेच फिरत राहिले. जातांजातां त्यांना एक सिनेमाची ज़ाहिरात मिळाली. रघूनें कागदाच्या दोन नावा केल्या व "ही तुझी आणि ही माझी." म्हणून पाण्यांत सोडल्या. ' नालींतून त्या वाहत जाऊं लागल्या. अगदीं उत्सुकतेनें दोघींचीही शर्यत पाहिली शेवटीं नागनदींत त्या जाऊन पडल्या. पाण्याची धार मोठी असल्यामुळें त्या नावाचें छिन्नभिन्न रूप देखील डोळ्यानें पहायला मिळालें नाहीं.

घरीं परत येतांना एका विश्रांतिगृहांत दोघांनींही चहा घेतला, चांगला दोन दोन तीन तीन कप. मग डझन दोन डझन "ब्लयाक अँड व्हाईट" चा धुव्वा केला. जवळजवळ दीडदोन तास, आपआपल्या कॉलेजांतील मुलींविषयीं ते दोघेही बोलत बसले होते, त्यानंतर दोघेही उठून बाहेर आले. रघूनें पैसे चुकते केले. व पाऊल बाहेर ठेविलें.

तो एकीकडे गेला, आणि हाही एकीकडे.

आज पांचसहा वर्षांमध्यें पुन्हा त्यांची भेट झाली नव्हती. परंतु आज रघूला त्याची आठवण झाली. भोंवतालची सृष्टी पाहतांपाहतां एकाएकीं त्याचें मन दूरच्या भूतकाळांत प्रवेश करतें झाले. कुठें असेल तो ! काय करीत असेल पण लगेच त्याच्या मनांत विचार आला, तो जिवंत तरी असेल कां !

आणि नंतर तो आठवूं लागला.

अशाच प्रकारें एखाद्या मित्राची अथवा नातेवाईकाची आठवण झाली कीं त्याला विचार करावा लागे, ही व्यक्ति आहे पृथ्वीवर ! कीं गेली देवाघरीं !

कारण त्याला वार्ता कळायला कांहीं मार्गच नसे. लहानपणापासून आपल्या आंपल्या ठिकाणीं राह्यची संवय लागल्यामुळें तो कुणाचकडे जात येत नसे. त्यांच्यासंबंधींची बातमी कळायची झालीच तर ती अशाच स्वरुपाची असायची, "चि. गोविंदा मरण पावला. मरताना अतिशय यातना होत होत्या. मरतांना म्हणाला " मला जगण्याची किती जबर इच्छा आहे. आणि कितीतरी कार्य करावेसें वाटतें. " तीन दिवस सुतक पाळावें. कित्येक वेळा सुतक धरावें लागे तर कित्येकदां आंघोळीवर निभावून जाई. मृत्यूनंतर होणाऱ्या ह्या त्रासामुळेंच व्यक्ति त्याच्या ध्यानांत राह्यची. एखाद्या नोकराच्या ध्यानांत घरमालकाचें नांव राहत नाहीं. मग तो त्याच्या घराचें एखादें वैशिष्ठ्य आपल्या ध्यानांत ठेंवतो. नोकराप्रमाणेंच रघूचेंही व्हायचें. "अरे हो, आपल्याला एकच आंघोळ करावी लागली होती नाहीं कां त्याच्या वेळेला ! तोच तो, आलं आतां ध्यानांत." आणखी एखादी व्यक्ति ध्यानांत राह्यची ती यामुळं, "त्याच्याच मृत्यूनंतर सुतक धरावं लागं . आणि सिनेमाला न जातां आल्यामुळं एक सुंदर चित्रपट पाह्यचा राहून गेला. "

एक त्याची आत्या ऐशींच्या घरांत गेली होती. त्याची कशी कल्पना झाली होती कुणाला ठाऊक ! त्याची अगदीं खात्री झाली होती कीं ती मेली असावी. कांहीं वर्षांपूर्वी ती शेवटची त्याच्या डोळयाला आली असतांना एखाद्या जनावराप्रमाणें ती त्याला वाटली. वार्धक्यानें वांकल्यामुळें तिच्या हातांचे पायच झाले होते.

एखाद्या काळया वानरीच्या तोंडाप्रमाणें तिचें तोंड दिसायला लागलें होतें. डोळे कवटीच्या खबदाडांत खोल गेल्यामुळें मुखावर हिडिस भूतकळा आली होती. तिला पाहणें म्हणजे अवसेच्या मध्यरात्रीं स्मशानांत भुताशीं भेटणें होतें, त्याला वाटलें, ही बाई जगांतून लवकर नाहींशी व्हावी आणि नंतर त्याच्या मनानें, थोडक्याच काळांत अशी कल्पना करून घेतली कीं ती मरण पावली.

परंतु ह्यानंतर चार एक वर्षांचा अवधी लोटला व त्याच्या हातांत एक पत्र पडलें. त्यांत होतें, "आत्याबाई वारल्या हें हें करावें, उतारवय असल्यामुळें जीवाचें सोनेंच झालें. काया नश्वर—" आणि असाच इतर आचरटपणा त्या पत्रांत भरलेला होता.

वाचतांक्षणींच त्याला अतिशय नवल वाटलें ही बाई जीवंत होती म्हणजे काय ! ही तर मेली होती. निदान माझी कल्पना तरी तशी होती. कुणाला ठाऊक कां कल्पना झाली होती तर ! त्याला स्वतःचेंच खूप हंसूं आलें. त्या हिडिस मूर्तीला त्यानें आपल्या मनांतून घालवून लावलें होतें. पण आयुष्य होतं बिचारीचं !

आणि असाच प्रकार अनेकदां होई. कोणत्याही माणसाची, विशेषतः आप्तस्वकीयांची आठवण झाली कीं मग तो "सुतकं किती पाळलीं, त्यांत त्या व्यक्तीच आहे काय ! म्हणून आपल्या मनाशीं विचार करायचा. न समजलें तर समजलें तर पत्रें पाह्यचा. मग जर कांहीं मरणाविषयीं माहिती मिळाली नाहीं तर व्यक्ति जिवंत आहे म्हणून समजायचा "अजून परंधाम परमेश्वरांत विलीन झाली नाहीं. " म्हणून सुखाचा दीर्घ उसासा टाकायचा. व विपरीत माहिती मिळाली तर लहानसा उसासा टाकून मन दुसरीकडे लावण्याचा प्रयत्न करायचा.

आतांही त्यानें अशाच रीतीनें विचार केला. मृत्यूसंबंधीं पुरावा मिळाला नाहीं. पत्रें चाळलीं. पण त्याच्या स्मृतिइतकीच तीं देखील अजाण होती. त्याची विसर पडण्याअगोदर तो मनाशीं म्हणाला, "असेल बिचारा जगाच्या पाठीवर कुठं तरी. पण ती त्याच्याबरोबर घालविलेली सायंकाळ किती मजेदार होती नाहीं !"

For Rapid and Sure Success
in
Short—Hand & Typewriting
Join
Abhyankar's Short-Hand
& Typewriting Institute
Next to prarthana samaj,
Girgaon, BOMBAY 4.

निर्धास्त झाले !
संतति–निरोधन औषध घेतल्यापासून माझ्या मागची गर्भारपणाची पीडा कायमची टळली व मी निर्धास्त झालें. वहिनी, तुम्ही सुद्धां गद्रे फिजीशियन खाडवां यांचेकडून औषध मागवा किंमत ५ रु. आहे. व खर्च सहा आणे येतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



(१) ८ बक्षिस, प्रत्येकीं ५००० रुपयांचीं—सर्व कोडीं बिनचूक सोडविणारांस. (२) ५० बक्षिसें, प्रत्येकीं १०० रुपयांचीं—दोन कोडीं बिनचूक सोडविणारांस. (३) १०० बक्षिसें, प्रत्येकीं १० रुपयांचीं- एक कोडें बिनचूक सोडविणारांस. (४) २०० बक्षिसें प्रत्येकीं २० रुपये किंमतीचे, मजबूत यंत्रें व कांच असलेलें घड्याळ प्रत्येकीं कि. रु २० (गॅरंटी १० वर्षे) निदान २५ उत्तरें पाठविणारास,

गॅरंटी:—प्रत्येक बक्षिसाची रक्कम देण्याची आम्ही गॅरंटी देतों. सर्व कोडीं बिनचूक पाठविणारांस ५००० रु; २ कोडीं पाठविणारांस १०० रु; एक कोडें बिनचूक पाठविणारास १० रु; २५ किंवा अधिक उत्तरें पाठविणारांस एक रिस्टवॉच नक्की मिळेल.

(५) आमच्या रजिस्टर बुकांत उत्तरें पाठवि त्यांपैकी ज्यांचे नंबर ५,१५, २५,... असें नोंदलें जातील त्यांना एक १४ कॅ. गो चें फाउंटन पेन मोफत देण्यांत येईल (६) आणि आमच्या रजिस्टर बुकांत ज्यांचें नंबर १०, २०, ३०,इत्यादी... असें नोंदलें जातील त्यांना ५ वर्षें गॅरंटीचें एक खिशातल घड्याळ दिलें जाईल. (७) आणि ज्यांचें नंबर १००, २००, ३००, इत्यादी...असें रजिस्टरांत नोंदले जातील त्यांना व्हिक्टोरीया पोर्टेबल डबल स्प्रिंग ग्रामोफोन—मोफत देण्यांत येईल.

गॅरंटी:—प्रत्येक उमेदवारास प्रत्येक बक्षिस मिळण्याचा 'चान्स' आहे प्रत्येक चार उत्तरानंतरच्या नंबरांना फायदा होण्याची हमी आम्ही देतों. ५ उत्तरें पाठविणारांस ५ व्या कलमांतील बक्षिस नक्की मिळेलच, पण नं. ६ किं, ७ कलमांतील बक्षिस मिळण्याचा जोराचा संभव आहे. १० उत्तरें पाठविणारांस ६ कलमांतील बक्षिस नक्की मिळेल, पण नं. ७ कलमांतील बक्षिस मिळण्याचा जोराचा संभव आहे. १०० किंवा अधिक उत्तरें पाठविणारास ७ कलमांतील बक्षिस नक्की मिळेल—अशा प्रकारें प्रत्येक उमेदवाराला कलम ५, ६ किंवा ७ मधील बक्षिस मिळण्याचा चान्स आहे.

(८) स्त्रिया व विद्यार्थी ह्यांच्या एन्ट्रीजकडे जास्त लक्ष देण्यांत येईल. (९) जास्त बक्षिसें—वर लिहिलेल्या बक्षिसांशिवाय, ज्यांची सर्व बरोबर आम्हास अनुक्रमें तारीख १५, २०, २५ डिसेंबर १९३६ व १ जानेवारी १९३७ चे पूर्वी मिळतील त्याना अनुक्रमें ४०० रु. ३००० रु. २००० रु. व १००० रु दण्यांत येतील.

प्रवेश फी १–४–०

शेवटची तारीख ३–१२–३६

नं. १

		३१
	३०	
२९		

नं. २

		४१
	४०	
३९		

नं. ३

		५१
	५०	
४९		

वरीलकोष्टकांत आम्ही जे आंकडे लिहिले आहेत ते त्या ठिकाणी ठेवून त्यांत असे आंकडे भरा कीं सर्व आकड्यांची उभी, आडवी,तिरपी, कशीही बेरीज केली असतां कोष्टक नं. १ मध्यें ९० कोष्टक नं. २ मध्यें १२० व कोष्टक नं. ३ मध्यें १५० अशी येईल दरेककोष्टकांत एक आंकडा एकदांच वापरला पाहिजे. प्रत्येक उमेदवाराला हवीं तेवढीं उत्तरें कोऱ्या कागदावर लिहून एकाच पाकिटांतून पाठवितां येतील. तीन कोड्यांच्या उत्तरामागें रु. १–४–० ही प्रवेश फी पोष्टल ऑर्डरनें किंवा मनीऑर्डरनें पाठवावी. पण म. ऑ. रिसिट उत्तराच्या कागदाबरोबर पाठविली पाहिजे. नाहींतर त्या उत्तरांचा विचार केला जाणार नाहीं. उमेदवारांनीं उत्तराच्या कागदावर त्याचप्रमाणें म. ऑ. कुपनवर आपलें नांव व पत्ता लिहिलाच पाहिजे. बक्षिसास पात्र होण्याकरितां उमेदवारांचीं उत्तरें आमच्या बँकेंत ठेवलेल्या मोहरबंद पाकीटांतील उत्तराशीं आंकडा न् आंकडा तंतोतंत जुळली पाहिजेत. एक उमेदवाराला सर्वांत अधिक एकच बक्षिस मिळेल. एकदां भरलेली प्रवेश फी परत मिळणार नाहीं. बक्षिसें ता. १५ जानेवारी रोजीं जाहीर होतील व लगेच प्रसिद्ध होईल.उत्तराबरोबर जे आपल्या पत्त्यांचीं स्टॅंप लावलेलीं पाकिटें पाठवितील त्यांनाच निकाल व्यक्तिशः कळविण्यांत येईल.

अनेक उमेदवारांच्या विनंतीवरून शेवटची तारीख १० जाने. १९३७ पर्यंत वाढाविली आहे याकडे लक्ष द्यावें.

व्हिक्टोरीया कॉंपिटिशन,

गिरगांव, मुंबई. ४

मुळव्याधीवर उपा

ज्यावेळीं एखाद्या मनुष्याला
मुळव्याध अगर रक्तस्राव होणे
झाल्याचें समजतें त्याचवेळीं त्यानें
शास्त्रशुद्ध उपाय योजून रोग समूळ
करण्याची काळजी घेतली पाहिजे.
त्यामुळें ॲनीमिया, मलावरोध, रक्त
अशक्तपणा, ताप यासारखे
रोग जडण्याची भिती असते.
धोक्यांत ठेवून भलती सलती
वापरूं नका. जगप्रसिद्ध औषध
(जर्मनींत तयार केलेलें) (Haden
एकच औषध असें आहे, कीं तें
कुठल्याही स्थितींतील मुळव्याध
नाहींशी होते. ऑपरेशनची जरूरी
मुळव्याधीवर हाडेन्सा (Hade
एकदांच लावल्यानें आराम वा
वाहण्याचें तावडतोब थांबतें.
युरोप, हिंदुस्थान, चीन वगैरे
डॉक्टर लोक हॉस्पिटलसमधून याचा
योग करतात. ते हाडेन्साचीं "मुळ
त्रासलेल्यांना हाडेन्सा (Hade
ही देणगीच आहे" अशी शिफार
तात. आपल्या जवळच्या औषधि
दाराकरून हाडेन्सा (Hadensa)
करा. नकली मालापासून सावध रा



धनुर्वात व इतर वात
रोगांवर उपाय

हा वापायांचे सांधे व कंबर दुखणें
व ताठरणें ही धानुर्वात व
इतर वातजन्य रोग घातक व
असतात. ह्या रोगांची जाणीव
उपाययोजना सुरू केली पाहिजे.

डॉ. इडस् पिल्स
Dr. Eades Rheuma
& Gout Pills.

हें औषध आज ८८ वर्षें चालू
औषधाचा फायदा सर्व जगभर
लोकांनीं घेऊन गुणाची तारीफ केली
रोग कितीही जुना व असाध्य अस
ह्या औषधानें हकून बरा होतो
पुनः उद्भवत नाहीं. शरिरांत
आसीडची वाढ झाल्यानें हरएक
वातरोग उद्भवतात. इडस् पिल्स
योगानें यूरीक आसिडचा प्रतिकार
रोग मुळासकट नाहींसे होतात.
औषधी दुकानांतून सर्वत्र मि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हातारी !

लेखक:—सदाशिव अनन्त शुक्ल

मंद मंद हिमवृष्टि सारखी सुरू होती. थंडीनें कहर उडविला होता. हातापायांचा आंकडा वळून हाडें फुटून निघत होतीं. पण ती म्हातारी तशीच रस्त्यावरून पायाखालीं बर्फ तुडवीत स्टेशनकडे चालली होती. कांहीं पुस्तकें व कसल्या तरी कागदपत्रांचीं पुडकीं नीट काळजीपूर्वक बांधून तीं तिनें एका मोठ्या पिशवींत भरलीं होतीं. आणि ती पिशवी पडशीसारखी तिनें डाव्या खांद्यावर टाकली होती. तिच्या उजव्या हातांतही एक थैला होता. त्यांत पाणी प्यायचें भांडें, एक घोंगडें आणि वाळलेल्या भाकरीची पोटळी होती.

त्या म्हतारीचें नांव ईंदा !

गाडीच्या वेळेआधीं बरीच लौकर ती स्टेशनवर जाऊन पोहोंचली. गाडीला अद्यापि अवकाश होता म्हणून ती थेट मुशाफिरखान्यांत गेली आणि तेथें केरकचऱ्यांत एका कोपऱ्यांत सामान ठेवून त्यावरच ती बसून राहिली. मुशाफिरखान्यांत उतारूंची गर्दी मनस्वी होती. उभें रहायला सुद्धां जागा नव्हती. बोलून चालून तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचा मुशाफिरखाना तो ! तेथें टेबल, कोच, खुर्च्या, अशीं ऐषआरामाचीं साधनें कुठून आढळणार ? तिथलें वैभव म्हणजे धूळ न् केरकचरा ! नाहीं म्हणायला, एक जुने पुराणें, लंबेचौडें लोखंडी बांक पलीकडे कोपऱ्यांत पडलें होतें. त्याऱ्यावर दोन तीन लष्करी शिपाई आपल्या कल्लेबाज मिशांना पीळ भरीत ऐटीनें विराजमान झाले होते. त्यांनीं आपल्या भरलेल्या दुबारी बंदुका जवळच भिंतीला उभ्या करून ठेविल्या होत्या. त्या शिपायांच्या रांकट मुद्रेवर विलक्षण मग्रूरी दिसत होती. उतारूंना धाक दटावणी दाखवून भेडवसावण्यासाठीं, त्यांच्यावर सक्त पहारा करण्यासाठींच त्या शिपायांची तेथें जादा नेमणूक झाली आहे, असेंच त्यांच्या चेहऱ्यावरचा आविर्भाव पाहून कुणालाही वाटलें असतें.

पलीकडे शेजारींच चहा फराळाचें दुकान होतें. तेथें एक मोठी शेगडी रसरसलेली होती. पण ज्यांचे खिसे खुळखुळत होते, तेच तेवढे लोक चहा पिण्याच्या निमित्तानें तेथें जाऊन ‘ गरम चाय ’ नें घसा शेकीत शेकीतच गारठलेले हातपायहि त्या शेगडीजवळ बसून शेकण्याची संधी साधून घेत होते. कित्येक शौकिन फक्कडराव सिगारेटचे फवारे सोडीत मिजाशीनें उगीचच इकडे तिकडे हिंडत होते. तोंडांत ऐटीनें पाईप धरून, ओव्हरकोटाच्या खिशांत हात घालून कित्येक बडे आदमी प्लॅटफॉर्मवर शतपावली घालीत होते. आणि बिचारे स्टेशनचे कूली लोक ! ते मात्र आपला निळा, मळका ‘ युनिफॉर्म ’ पेहरून भुतासारखे मधून मधून इकडेतिकडे थंडीनें कुडकुडत वावरतांना दिसत होते.

नजीकच फर्स्टक्लास वेटिंगरूम होती. तिथला थाट काय वर्णन करावा ! जमिनीवर रंगीत कार्पेट, नक्षीचें राऊंड टेबल, प्रशस्त मऊ मऊ कोच, बिलोरी आरसे, उत्तम पॉलिश केलेल्या खुर्च्या, आरामखुर्च्या, झगमगणारा झकास टांगदिवा—तात्पर्य, सर्व प्रकारच्या सुखसोयींनीं सज्ज अशीच ती वेटिंगरूम होती. बडे बडे सरदार, अमीर उमरावश्रीमंत, शेट सावकार, जमीनदार, जहागीरदार आराम करीत गाडीची वाट पहात तेथें बसले होते. कडक थंडीची मिजास थंड पाडण्यासाठीं खूप गरम कपडे त्यांनीं घातलें होतें. स्कार्फ, स्वेटर्स, पुलओव्हर्स, हातमोजे, पायमोजे, रेशमी रजया, दुलयाजणुं काय उंची उबदार रेशमी, लोंकरी कपड्यांचें प्रदर्शनच तें !

इकडे हा थाटमाट होता. गाडी आज जरा ‘ लेट ’ असल्यामुळें थोर लोक आरामांत तिष्ठत बसले होते ! आणि तिकडे ती म्हातारी, कुडकुडणारे हातपाय उराशीं घेऊन मुशाफिरखान्यांत थंडीवाऱ्यांत, केरकचऱ्यांत लोळत होती. सामान उशाला घेऊन गांठोड्यासारखीच, अंगाची चौघडी करून बसल्याजागींच जरा लवंडली ती. पण चोहोंकडून थंडीचा मारा. खालीं गार फरशी. अंगावरच्या फाटक्या लक्तरानें त्या थंडीपासून कितपत बचाव होणार ? उघड्या जागेंत पडल्यामुळें अंगांत ज्यास्तच हुडहुडी भरून बिचारीचे प्राण अगदीं कंठाशीं आले !

जराशा वेळानें ती तेथून उठली आणि कुठें थंडीपासून निवारण होण्याजोगी आडोशाची जागा दिसली तर पहावी, या उद्देशानें सामानसुमान घेऊन वेटिंगरूमवरून ती जाऊं लागली. वेटिंगरूमचें दार बंद—पुढें लोटलेलें होतें. ती तेथून जायला आणि एका सरदार-पुत्रानें बाहेर येण्यासाठीं धाडकन् दरवाजा उघडायला एकच गांठ पडली. एकदम जोरानें उघडलें गेल्यामुळें त्या दरवाजाचा धक्का म्हातारीला एवढा जबर बसला कीं, तत्काळ कोलमडूनच पडली. तिचें सामान चहुंकडे फेकलें गेलें. म्हातारीला मूर्च्छा आली. तिच्या दुबळ्या देहाला तो धक्का सहन झाला नाहीं. त्या बिचारीची अशी अवस्था झालेली आणि या साऱ्या तिच्या दुर्दशेला वास्तविक तो सरदार—पुत्रच कारण ! पण त्याला त्या गोष्टीची तिळमात्र खंत वाटली नाहीं, कीं म्हातारीची लेशभर दया आली नाहीं. उलट, ‘ बेवकूफ शिंची ! खाशी खोड मोडली सटवीची ! इथं दरवाजांत कशाला मरायला उभी राहिली होती थेरडी—’ असेंच कांहींसें पुटपुटत, तिरस्काराच्या रागीट नजरेनें तिच्याकडे पहात पहात तो बडे बापका बेटा एक लठ्ठ सिगार शिलगावीत दुसरीकडे निघून गेला. मूर्च्छित पडलेल्या म्हातारीला उठवून शुद्धीवर आणणें, चार नम्र शब्दांत दिलगिरी प्रदर्शित करणें वगैरे माणुसकीचा साधा शिष्टाचार त्याच्या गांवींहि नव्हता !

पांचसात मिनिटानंतर ती म्हातारी आपोआपच हळूहळू शुद्धीवर आली. आधींच मळके न् फाटकें असलेलें तिचें अंगावरचें वस्त्र अधिकच मळलें. चार दोन ठिकाणीं फाटलेंहि. फरशीचा मार बसून तिचें सर्वांग ठेंचाळल्यामुळें खूप ठणकायला लागलें होतें. सामान गोळा करण्यासाठीं कण्हत कुंथत ती तशीच उठण्याची धडपड करू लागली. पण उठून दोन पावलें चालण्याचेंच काय, पण नुसतें उठून बसण्याचेंहि त्राण तिच्या अंगीं उरलें नव्हतें. अश्रूपूर्ण केंविलवाण्या दृष्टीनें ती चहुंकडे पाहूं लागली. इतक्यांत स्टेशनचे दोन तीन हमाल त्या ठिकाणीं आले. त्यांनीं तिचें सामान गोळा करून तें पूर्ववत् नीट बांधून तिच्या स्वाधीन केलें आणि तिला कशीबशी उठवून तेथेंच जवळ भिंतीला टेंकून बसविली. त्या हमालांचेंच तिला अखेर सहाय्य लाभलें. जगांत गरीबच गरीबांच्या उपयोगीं पडतात. श्रीमंतांचा गरीबांना काडीचाही उपयोग वेळेला होत नाहीं. हेंच पहा ना ? त्या म्हातारीची ती सारी ‘ गंमत ’ धनिक स्त्रीपुरुषांचा घोळका इतका वेळ दुरून पहातच होता. पण त्यापैकीं कुणीहि तिच्या मदतीला धांवून आलें नाहीं. उलट, तिची ती असहाय्य अवस्था पाहून कुणी फिदीफिदी खिदळूं लागले, तर कुणी हेटाळणीच्या स्वरांत तिच्यासंबंधीं आपापसांत कांहीं तरी कुचेष्टेनें कुजबुजून हस्तीदंति पाजळूं लागले ! पुरुषांचे राहूं द्या. पुरुष स्वभावतःच कठोर अंतःकरणाचे ! पण निसर्गकोमल स्त्रीजातीला तरी स्त्रीजातीची करुणा येते म्हणतात ना ? पण तिथल्या त्या रूपगर्वित श्रीमंत स्त्रियांनां त्या म्हातारीची दया आली नाहीं ! त्या तिच्याकडे तुच्छतेनें पहात स्वस्थ उभ्या राहिल्या होत्या. पर दुःख शीतल ! त्यांतून परिस्थितीनें गांजलेल्या, गंजलेल्या दुःखीकष्टी गरीबांकडे पाहण्याचा थोर श्रीमंतांचा दृष्टिकोन सर्वत्र असाच नसतो का ? निदान रशियांत तरी त्यावेळीं श्रीमंतांचें गरीबांशीं असेंच अरेरावीचें, कमालीच्या निर्दयपणाचें दुष्ट वर्तन होतें.

दरम्यान, स्टेशन मास्तरसाहेब सहज आपल्या ऑफिसांतून बाहेर आले. त्यांनीं ह्या साऱ्या गडबडीची चौकशी आरंभली. एका गृहस्थानें त्यांना सर्व हकीकत सांगितली. गांवढळ लोकांकडून सभ्य, थोर लोकांना अशाच प्रकारचा उपद्रव, त्रास

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेळीअवेळीं कसा होत असतो याचेंहि रसभरित वर्णन त्यानें केलें. 'त्या थेरडीला स्टेशनच्या हद्दीबाहेर धक्के मारून हांकलून दिली पाहिजे' असेंहि सुचविण्यास त्या 'जंटलमन' नें कमी केलें नाहीं. हितगुज करणारा गृहस्थ 'खानदानी' जमीनदार होता म्हणूनच त्याच्या शब्दाला किंमत होती. ज्याला लक्ष्मी वश,त्याला सारें जग, वश ! श्रीमंत लोकच समाजांत शिष्ट, संभावित सद्‌गुणी समजले जातात. त्यानांच जगांत मान ! कंगाल गरीबांना कोण देतो मान ! गरीबांना मान, माणुसकी, अब्रू कांहीं नाहीं. जगांत जगण्याचाहि त्यांना अधिकार नाहीं. हीच श्रीमंत–सत्ता–न्यायाची विचार–सरणी तत्कालीन प्रतिष्ठित रशियन समाजांत प्रचलित होती.

स्टेशनमास्तर खाड खाड बूट वाजवीत रागारागानें त्या म्हातारीपुढें येऊन उभे राहिले आणि तावातावानें गरजूं लागले. बिचारी ईदा कांहींच बोलली नाहीं. मास्तरांचा पारा अधिकच चढला.

"ए थेरडे, चल, चालती हो येथून ! कोण ? कुठली तूं ? इथं मोठे लोक वावरताहेत. अन् इथं येऊन ठाण मांडतेस तूं ? बेशरम, पाजी !" इंगळासारखे लाल डोळे रोखून मास्तर वसकन् ईदाच्या अंगावर खेंकसले. ईदा जराशी भेदरली. आपली क्षीण सजल दृष्टी मास्तरांच्या चेहऱ्याकडे लावून ती बोलूं लागली—

"मी–मी–मास्तरसाहेब–मी—"

"मी—मी काय ?" मास्तर मधेंच ओरडले. "अन् अशी डोळे फाडफाडून काय पहातेस माझ्याकडं ? चोर साली—हरामखोर ! बोल, चोरी करायलाच या वेटिंगरूमकडे आली होतीस कीं नाहीं ? सरळ जाब दे. नाहींतर, बुटांच्या ठोकरांनीं ठेंचून टाकीन टाळकं ! एऽऽ कूलीऽऽ ! या बुढ्ढीला हांकलून दे स्टेशन बाहेर ! चोर–बदमाष—" मास्तरांनीं कूलीला हांक मारली आणि एकवार विजयी मुद्रेनें मित्रांचे आंकडे पिळीत चोहोंकडे नजर नाचविली.

'चोर, हरामखोर !' आतां मात्र ईदाच्या सहनशक्तीची समाप्ति झाली. तिला ते शब्द तापल्या तेलाप्रमाणें काळजाला झोंबले. ती गरीब असली तरी स्वाभिमानी होती. ऐशीं वर्षांचें वय झालें तरी तिचें मन अद्यापि ताजेतवानें होतें. म्हातारें झालें नव्हतें. तिच्या अंतःकरणांत स्वाभिमान सळसळत होता. 'चोरीचा' घाणेरडा आरोप विनाकारण तिच्यावर लादला गेला.का ? तर ती केवळ गरीब होती म्हणूनच ना ! तिच्या डोळयांतून अग्निस्फुलिंग चमकूं लागले.उद्वेग, संताप, असहाय्यता, करुणा, स्वाभिमान, कितितरी भावनांच्या संमिश्र छटा त्या तिच्या नेत्रांत त्यावेळीं प्रतिबिंबित झाल्या होत्या. सारी शक्ति एकवटून ती रोंखल्या नजरेनें मास्तराकडे पहात मोठ्यानें म्हणाली, 'मास्तरसाहेब, भलतंच काय बरळतां ! मी–मी चोर आहे काय ?" कां कुणास ठाऊक ? पण तिच्यानें पुढें बोलवेना. तिच्या डोळ्यांतून आसवें गळूं लागलीं.

"वाऽऽरे थेरडी ! चोर ती चोर वर आणखी शिरजोर ! माझ्यापुढं आवाज करतेस ?—" असें म्हणत पिसाळलेल्या मास्तरसाहेबांनीं इदाला जोराची लाथ मारण्यासाठीं पाय उचलला तोंच एका तरुणानें त्यांना दंडाला धरून एकदम मागें खेंचीत म्हटलें, "काय हें मास्तरसाहेब ? उगाच एखाद्या गरीबाला असा त्रास देणं शोभत नाहीं तुम्हाला ! चला व्हा मागं—"

"ती चोर आहे—"

"चोर ! मास्तरसाहेब, ही चोरी करील असं तुम्हाला वाटतं तरी कसं ? तिची अवस्था काय ? तिचं वय काय ? पिकलं पान झाली आहे बिचारी ! धड चालण्याची तिच्या अंगीं शक्ति नाहीं. अन् ही चोरटी ? बिचारीला दुर्दैवानं हे दिवस दाखविलेले दिसतात. नाहींतर तिच्या चालचर्येवरून ही कुणीतरी थोर खानदानी बाई दिसते !"

मास्तरसाहेब जरा वरमले. हां हां म्हणतां इतक्या वेळांत त्या ठिकाणीं मौजबघ्याची मोठी गर्दी उसळली होती. स्टेशनापलीकडल्या रस्त्यानें आपल्या नित्याच्या उद्योगाला जाणारे शेतकरी, कामगार वगैरे लोकहि त्या ठिकाणीं 'काय—आहे तरी काय भानगड ?' हेंच पहाण्यासाठीं गोळा झाले होते. किमानपक्षीं दोन अडीचशें माणसांचें कडें ईदाभोंवती पडलें. ईदा कण्हत बोलूं लागली.

"मी चोरटी–गुन्हेगार नाहीं. माझा गुन्हा–माझं पाप एकच ! आणि तें म्हणजे मी दरिद्री आहें. गरीब आहें. मी चोरटी नाहीं.—"

"मग कोण आहेस तूं ?" मास्तरसाहेब पुनः ठिसकले.

"मी कोण आहे ? मी एक गरीब उतारू आहे. काल क्रांतिकारकांचा खटला होता ना ? त्या खटल्यासाठीं मी या गांवीं आल्यें होतें. कारण, त्या खटल्यांत जो मुख्य आरोपी होता तोच माझा मुलगा. त्याचें नांव—" ईदाला बोलतां बोलतां घशाला कोरड पडल्यामुळें मधेंच ठसक्याची उबळ आली. जरा थांबून ती पुढें बोलूं लागली.

"पण त्याचं नांव सांगण्याची जरूरच काय ? त्याचं नांव ठाऊक नाहीं असा कोण आहे ? साऱ्या जगाच्या जिभेवर त्याचं नांव नाचतं आहे. कामगारांच्या, गरीब शेतकऱ्यांच्या हृदय--सिंहासनावर विराजमान झालेला तो गरीबांचा सम्राट् आहे ! त्याचं नांव पॉव्हेल !" आपल्या क्रांतिकारक कामगार पुढारी वीरपुत्राचें नांव उच्चारतांन ईदाला पराकाष्ठेचा अभिमान वाटला. तिनें पॉव्हेलचें नांव उच्चारतांच जमलेल्या लोकांतही कुजबूज सुरू झाली. त्यांच्या मुद्रेवरही कृतज्ञता,आदर इत्यादि सद्‌भावनांचें प्रतिबिंब उमटलेलें स्पष्ट दिसूं लागलें. सर्वांनीच पॉव्हेलला पाहिलें नव्हतें. तरी त्याचें नांव त्यांना पूर्णपणें ठाऊक होतें.

"काय ! पॉव्हेलची आई ही ?" सर्वांच्याच कुतुहलपूर्ण नजरा ईदाच्या चेहऱ्यावर आदरानें खिळून राहिल्या. ईदा पुढें बोलूं लागली, "काल कोर्टांत माझ्या मुलानं असं दणदणीत, मुद्देसूद, निर्भीडपणानं भाषण केलं कीं, सर्वांनीच त्याची तारीफ केली. सरकारी अधिकाऱ्यांनींहि मनांतल्या मनांत कौतुकानं त्याला धन्यवाद दिले. ही पहा, या पिशवींत छापील पत्रकांचीं पुडकीं आहेत. प्रत्येक खेड्यांतून गांवगन्ना हिंडून हीं पत्रकं वांटायचीं आहेत. खेडोपाडीं हिंडून निदान दोन हजार पत्रकं तरी मी वांटणार आहे. माझ्या लाडक्या पॉव्हेलचं देशकार्य अंशतः तरी पुढें चालूं ठेवण्याचा मी निश्चय केला आहे." असें बोलत बोलतच ईदानें तें पत्रकांचें [...] सोडलें आणि पांच पन्नास पत्रकें [...]लेल्या घोळक्यांत उधळून दिलीं. तीं [...] हस्तगत करण्यासाठीं लोकांची [...] धांदल धमाल उडाली. अक्षरशः [...] पडल्या त्यांच्या त्या पत्रकावर, कुणी [...] खाकेंत लपविलीं, तर कुणी चटकन् [...] तिकडे पहात खिशांत कोंबलीं. कांहीं [...] पठ्यांनीं तर ती तेथेंच भराभर वा[...] काढलीं. सर्वत्र स्तब्धता पसरून ईदा[...] या कृत्यामुळें एक प्रकारचें अपूर्व नवचै[...] त्या वातावरणांत निर्माण झालें !

"या पायींच माझ्या मुलानं अ[...] जीविताचं बलिदान केलं आहे." म्हा[...] आवेशानें खड्या सूरांत बोलूं लाग[...] 'भाई हो ! तो तुरुंगाबाहेर होता तोप[...] त्यानं सत्याचा संदेश साऱ्या [...]तेला कंठरवानं ओरडून सांगितला. जु[...]शाहीनं तुम्हांला शेळ्यामेंढ्यासारखं [...] करून सोडलं आहे ! तुमचं जीवित [...] मातीमोल केलं आहे ! तुमची जिंद[...] ळ्याची जिंदगी केवळ परक्यासाठीं [...] पडत आहे ! तुम्ही काबाडकष्ट करावे[...] तुम्ही मरावं आणि मूठभर श्रीमंतां[...] तुमच्या जीवावर यथेच्छ चरावं ! तुम्[...] पिकवावं पण तुम्हीच उपासमारीनं प्रा[...] सोडावेत ! कुठला न्याय हा ? निरनिरा[...] कर तरी किती द्यायचे ? त्या करां[...] आणि कर्जाच्या ओझ्याखालीं तुम्ही मे[...] आहांत ! अजीर्ण होण्याइतकी श्रीमंतां[...] चैनचंगळ चालावी आणि तुम्ही मा[...] सुखाच्या गोळाभर घांसाला आणि अं[...]भर धड वस्त्रालाही महाग व्हावं ना ! देवादारीं तुम्ही असं काय पातक के[...] आहे ? दोष देवाचा नाहीं. दैवाचा नाहीं. ही विषमता मनुष्यनिर्मित आहे. मा[...]सच माणसाला खातो आहे ! भांडवल[...]शाहीचे सारे सैतानी खेळ [...] आहेत हे ! सत्ता आणि श्रीमंतीचा वा[...]वंटा फिरून तुमच्या आकांक्षा, तुमची माणुसकी, तुमचं अवघं जीवित मातीला मिळालं आहे. असल्या राक्षसी जुलूमशाहीचा सत्यानाश करून तुम्ही आपली गमावलेली स्वतंत्रता, माणुसकी परत मिळावयाला नको कां ?"

ईदाचे शब्द लोकांच्या काळजाला जाऊन भिडत होते. सारा जमाव चित्रा[...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

प्रमाणें स्तब्ध राहून तिचा शब्द न् शब्द आपल्या अंतःकरणावर कोरून घेत होता. गर्दी वाढतच होती. ईदाही उत्साहानें बोलत होती.

' रशियांतील श्रमजीवी वर्ग हरहन्नेचे काबाडकष्ट करतो, रक्त ओकेतों श्रम करतो; पण त्याला त्याच्या श्रमाचा मोबदला काय मिळतो ? तर दारिद्र्य, बेअब्रू, हालअपेष्टा हाच त्याच्या श्रमाचा मोबदला ! दारिद्र्यच सर्व पापांना जन्म देत असतं. परिस्थितीखालीं दडपल्यामुळे बिचारे गरीब जीव जगण्यासाठीं धडपडतात. भलत्याबुऱ्या मार्गानें पोटाची आग शमन करण्यासाठीं त्यांना चोरी सारखे हलकट धंदे करणं भाग पडतं. पण त्यांच्या चारित्र्य–पतनाला खरा जबाबदार कोण ? ही भांडवलशाही ! हीच आमच्या छाताडावर थयथय नाचून आमच्या हाडांचा खुळखुळा करून आयुष्याचं खेळणं करीत आहे.-अघोर दारिद्र्याप्रमाणंच घोर श्रीमंतीसुद्धां पापी अनाचाराला ऊत आणते. पोलिस अधिकारी, सैन्य, आरमार, कायदा हें सारं कशासाठीं ? दुर्बलांच्या संरक्षणासाठीं नव्हे तर अमीरउमरावांच्या, धनिकांच्या संरक्षणासाठीं आणि गरीबांच्या प्राण--हरणासाठीं ! कायदा धनिकांचा पक्षपाती असतो. लगामाळा गरीब लोक आणि तोबऱ्याला मात्र हीं श्रीमंत धेंड ! गरीब लोकांनीं रक्ताचे अश्रू ढाळायचे आणि श्रीमंतांनीं मात्र चैनीचे खेळ खेळायचे ! आम्ही मूर्ख, अशिक्षित, अडाणी आहोंत. आमच्यांत संघटना नाहीं. आणि याच साऱ्या गोष्टींचा फायदा हे गब्बर लोक घेत असतात. यांच्या उंच हवेलीर हवेल्यांच्या पाया भरायला आमच्या प्रेतांची जरूरी असते ! आमच्या होळीनें यांची दिवाळी साजरी होते ! आमच्या रक्ताला चटावलेले हे लबाड लांडगे—" बोलतां बोलतां ती क्रोधानें लालबुंद झाली. तिचा प्रत्येक शब्द जळजळीत आगीच्या ठिणगीप्रमाणें वाटत होता. ईदेनें खणखणीत सवाल केला—" मी सांगत्ये यांतलं एक अक्षर तरी खोटं आहे कां ! बोला--बोला–"

" नाहीं--नाहीं. मातोश्री ! तुमच्या सांगण्यांतलं एकहि अक्षर खोटं नाहीं !" सर्वांनीं एकमुखानें घोषणा केली. " बोला तुम्ही. तुमच्या अमृतवाणीनं आमचे कान पवित्र होऊंदेत ! तुमच्या या संजीवनीनं आमचीं अंतःकरणं जिवंत होताहेत ! "

" हा जीवन–क्रम बदलण्यासाठीं आपले आपणच कांहींतरी उपाय योजिले पाहिजे. सर्वसाधारण गरीब जनतेंत शिक्षणा . प्रसार केला पाहिजे. खेडेगांवं सुधारलीं पाहिजेत. मजूर, शेतकरी, कामगार लोक या सर्वांना शिकवून शहाणे केलें पाहिजे. आणि त्यांना स्वातंत्र्य—स्वराज्य म्हणजे काय हें सोप्या शब्दांत समजावून देऊन त्यांच्या हृदयांतली स्वाभिमानाची—आत्मशक्तीची ज्योत चेतविली पाहिजे. कांहीं सत्यवादी, स्वार्थत्यागी पुढारी महात्मे देशोद्धाराचें पवित्र कार्य करीत स्वातंत्र्याचा संदेश जनतेला पटवीत आहेत. पण त्यांची संख्या फार कमी आहे. कमीतकमी दहा लाख तरुण देशासाठीं आत्मार्पण करायला पुढें सरसावले पाहिजेत. या रशियांत दहा लाख पॉव्हेल निर्माण झाले तर हा चाल अत्याचारी सैतानशाही नष्ट होण्याला दहा दिवससुद्धां लागणार नाहींत !"

इतक्यांत सशस्त्र पोलिस आले. लोकांना शिव्या हांसडीत, मारझोड करीत, गर्दीतून वाट काढून ते ईदासमोर काळदूतासारखे येऊन उभे राहिले.

त्यांच्या त्या अत्याचारी दंगलींत कित्येकांची डोकीं फुटलीं. कित्येक लोक मूर्छित पडले !

शिपायांनीं आल्याबरोबर ईदावर शिव्यांची सरबत्तीच सुरू केली.

"एऽऽ थेरडे,एकदम तोंड बन्द करतेस कीं नाहीं ! कीं ठेंचून टाकूं तुझं टाळकं !" रानरेड्यासारखा एक काळरोम लठ्ठ शिपाई बंदुकीच्या दस्त्यानें ईदाला जोरानें [illegible]लीत ढगाला. इतक्यांत कुणाच्यानें [illegible] पाटींत एक जोराची लाथ हाणून [illegible] चवरीसारखे पांढरे कैंस धरून तिला कुत्रीसारखी फरकटत ओढायला सुरवात केली !

लोक हळहळत होते. पण इलाज काय ! जमावाची पांगापांग होऊं लागली. ईदा बोलूं लागली,–

' हे अत्याचार कांहींच नाहींत. रोज देशाच्या कोनाकोपऱ्यांत याहूनहि राक्षसी अत्याचार सुरूं आहेत.—'

ईदाच्या डोक्यावर दंडुक्यांचा मारा सुरूं झाला. त्या शिपायांनीं तिला लाथा बुक्यांनीं चांगलीच बुकलून काढली.

" तिला मारतां कां ? पाहिजे तर तिला पकडून घेऊन जा. पण हा काय अत्याचार ? दीनदुबळ्यांना छळणं हाच तुमचा पुरुषार्थ वाटतं !" एक साहसी तरुण पोलिसांना उद्देशून धीटपणें म्हणाला."

पोलिसांनीं त्याच्यावर डोळे वटारीत म्हटलें "-अच्छा, साले हरामजादे ! तुलाहि प्रसाद दिला पाहिजे या दंडुक्याचा. असें म्हणून त्यांनीं त्या बेगुन्हा तरुणाला बडवायला सुरवात केली. लोक खवळले. चांगलीच दंगल माजली. पोलीसांनीं लाठीहल्ला सुरु केला जमाव उधळून लावला. म्हातारीच्या मुसक्या आवळून, तिच्या कमरेला दोरी बांधून, मेलेल्या जनावराप्रमाणें ते निर्दय नरपशू तिला ओढून नेऊं लागले. म्हातारीच्या अंगाची सालडी सोलून निघालीं. तिच्या सर्वांगांतून रक्त वाहूं लागलें. तरी ते राक्षस तिला झोडपीतच होते !

" मला तुम्ही ठार मारूं शकाल पण सत्याला ठार करणं तुम्हाला शक्य नाहीं! सोनं कधीं जळत नाहीं. सत्य कधीं मरत नाहीं ! "

म्हातारीच्या जिभेवर एकसारखा याच सत्य-सिद्धांताचा मंत्र नाचत होता. तिला नंतर मूर्च्छा आली.

म्हातारीला तशीच ओढत नेऊन त्या वीरश्रेष्ठ पोलिसबहादूरांनीं तिला तुरुंगाच्या कोठडींत डांबून टाकली !

" पॉव्हेल---पॉव्हेल—" असा आक्रोश करीत चौथे दिवशीं त्या तुरुंगांतच म्हातारीनें प्राण सोडला !

—अनुवादित

एक वेळ वापरणारे हाच बाम पसंत करून इतरांस शिफारस करतात !

इन्डो-बाम

घरगुती उपाय

संधीवात, मज्जातंतू व्यथा, डोकें, पाठ व दांत दुखणें, कफ, शिरा आखडणें, स्नायु दुखणें इत्यादि दुःखांपासून ताबडतोब मुक्त होण्याचा सोपा व विश्वसनीय उपाय.

किंमत ८ आणे. ट. ख. निराळा.
३ बा. रु. १॥१० ट. ख. माफ.
हिंदुस्थानाबाहेर १ बाटली शिलींग १॥.
(टपाल खर्चासह) ३ ,, शिलींग ३.
ब्रिटिश पोस्टल ऑर्डर आगाऊ.



सर्व दुकानीं मिळते. हिंदुस्तानाबाहेर एजंटस्ची जरूरी आहे. पत्रव्यवहार करा.

कर्णिक ब्रदर्स,... ....मुंबई नं. ४

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गुदमरलेलें तारुण्य !

: लेखक :
प. स. देसाई

—लैंगिक मानसशास्त्राचा एवढा अवघड सिद्धांत सोडविल्यामुळें अरुणाला कल्पनातीत लाभ झाला—

'माळी, अरे माळी. ऐक ना ! मला एक फूल देतोस ?'

खुरप्यानें माती खणत असलेला माळी मुकाट्यानें आपलें काम करूं लागला. त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

'बहिरटच दिसतो. ए माळी !'

आतां मात्र माळ्यानें वर पाहिलें; आणि त्या तरुण मुलीला पाहून तो खुद्कन् हंसला. ती मुलगी त्याच्याकडे टक लावून पहात होती.

'काय म्हटलंत ?' माळ्यानें विचारलें.

'कपाळ तुझं.' मुलीनें उत्तर दिलें.

'हें पहा माझं कपाळ.' असें म्हणून माळ्यानें आपलें मस्तक खालीं केलें.

'वाः माळीसुद्धां क्रॉप राखतो वाटतं !'

'म्हणजे ! माळ्यानं केंस राखूं नयेत वाटतं ? त्याला काय हौस नाहीं ?'

'छेः तुझ्याशीं कोण बडबडेल !'

'मी काय माणूस नाहीं ? माझ्याशीं बोललंच पाहिजे. माळ्यानं केंस कां राखूं नयेत, हें सांगितलंच पाहिजे. बोल !"

'नाहीं. सांगणार नाहीं.'

'सांगितलं पाहिजे."

'बघा हो, आजोबा, माझ्याबरोबर उगाचच्या उगाच हा भांडण करतो !'

बोलतां बोलतां त्या तरुण मुलीचे डोळे पाण्यानें डबडबले. तरुण माळ्याला आश्चर्य वाटलें. तो तिच्याकडे पहातच राहिला. त्यानें मनांत म्हटलें, 'खरोखर हिलाच फूल देणें योग्य. हिचें अंतःकरण फुलाप्रमाणें कोमल आहे;' नंतर त्यानें तिला उद्देशून म्हटलें, 'रडूं नको. कां रडतेस ?'

"तूं मला धमकावतोस कां ?"

'आतां नाहीं धमकावणार. काय सांगायचें असेल तें सांग.'

रडतां रडतां ती मुलगी हंसली. माळ्याला वाटलें, 'माझ्या या सगळ्या बागेंतील फुलें आज यासाठींच उमलली असावींत ! हिचें हास्य म्हणजे फुलांच्या पाकळ्यांचें उमलणंच ! ! नंतर तो म्हणाला, 'तूं फूल मागितलंस ना ! चल देतों. माझ्याबरोबर ये.'

माळी चालत होता. 'ही क्षणांत हंसते आणि क्षणांत रडते; वेडी तर नसेल ! कोण बरं असावी ही मुलगी ! बोलणं चालणं अगदीं लहान मुलीसारखं; पण दिसते तर मोठी !' पण याच वेळीं त्या माळ्याच्या अंतःकरणांतून कोणीसें उत्तर दिलें, 'गहन वनांत गुप्तपणानं उमलणाऱ्या फुलांबद्दलची बातमी भ्रमरांना जो सांगतो तोच या मुलीबद्दलचं रहस्यही तुला सांगेल. हिचं तुला कौतुक वाटतं ना ! हळू हळू हिच्यांत आकर्षकताही निर्माण होईल..."

माळ्यानें, तिला आपल्या गुलाबाच्या बागेंत नेलें. बाग कांहीं मोठीशी नव्हती. मात्र ती निरनिराळ्या प्रकारच्या घोंसदार फुलांनीं बहरलेली होती. त्याला वाटलें, 'या मुलीला पाहून आपली बाग प्रफुल्लित झाली आहे.' त्या तरुणानें एकवार तरुण मुलीच्या चेहेऱ्याकडे पाहिलें. तो मनांत म्हणाला, 'छे. या प्रस्फुटित मुखकमलाला शोभेल असें एकहि फूल या बागेंत मला दिसत नाहीं.' शेवटीं शोधशोधून त्यानें सुवर्णवर्णांकित असें एक झुबकेदार फूल तोडून तें त्या मुलीच्या हातीं दिलें.

अत्यंत उत्सुकतेनें आणि घाईनें तिनें तें फूल हातांत घेतलें तोंच तिच्या तोंडून एक बारीक किंकाळी बाहेर पडली. कारण त्या फुलाला असलेला कांटा तिच्या हाताला टोंचला आणि जखमेंतून रक्त वाहूं लागलें.

'ए, किती रे तूं वाईट आहेस !'

'काय झालं ?'

'माझ्या बोटांत फुलाचा कांटा टोंचला ना !'

बोलतां बोलतां तिचे डोळे भरून आले. आणि अश्रू वाहूं लागले.

तरुण—माळी—कांहींसा भयभीत होऊन म्हणाला, 'मी टोंचला ?'

'तर दुसरा कोण आहे इथं ? या फुलाला कांटा आहे, असं तूं मला कां नाहीं सांगितलंस !'

'माझ्या हातून फूल घेतांना तूंच तेवढी खबरदारी घेतली असतीस तर ?'

'वाः! पुनः मलाच धमकावतोस ?'

'बरं. बरं. मीच आतां तुझा हात चांगला करतों हं.'

माळ्यानें आपला हातरुमाल फाडून त्यानें तिची जखम बांधली.

तिनें विचारलें, "अरे, तूं यःकश्चित माळी ! तुला इतका चांगला हातरुमाल कसा मिळाला ? मालकानं दिला वाटतं ? मालकाचं तुझ्यावर फार प्रेम दिसतं !'

'होय. बरं पण तूं कोणावर प्रेम करतेस कीं नाहीं ?'

'कां नाहीं ? श्रीरंगावर माझं फार प्रेम आहे !'

'श्रीरंगावर !' माळ्यानें एवढाच प्रश्न विचारला. कारण त्याच्यानें पुढें बोलवेनाच. त्याचा चेहेरा निस्तेज झाला.

ती म्हणाली, 'आणखी एक फूल दे ना !'

'कशाला ?'

'मी तें श्रीरंगाला देणार.'

'तर मग नाहीं देत.'

'कां ?'

'तुला पाहिजे असेल तर देईन.'

'मला एक पुरे. दुसरं फूल मी श्रीरंगाला देणार ! कसला गोड मुलगा आहे ! देनारे आणखी एक फूल !'

'नाहीं. तुला कांहीं कळत नाहीं. पुनः कांटा टोंचेल.'

'टोंचूं दे. एकदां तर टोंचला ! आतां काय ! दे तूं. एक देच.'

'एक कां दोन देतों. एक श्रीरंगाला दे. एक तूं माळ, माळशील ना ?'

'वेडा कुठचा ! मी आतां कर्तीउवरती झालें. मला काय लहानसारखं फूलं माळणं शोभेल ?'

'वाः ! चांगलंच शोभेल. ये. मी तुझ्या डोकींत माळतों.'

पण त्या तरुण माळ्याची ही इ पूर्ण झाली नाहीं. कारण याच एक पन्नास पंचावन वर्षांचा मनुष्य आला आणि त्या मुलीला म्हणाला

'कमल, तूं इथं आहेस ! मी मुलूख आणि तेरा पर्वत तुझ्या पालथे घातले ! ! एवढ्या वेळांत दि पर्यंत प्रवास झाला—'

'अग बाई, आजोबा तुम्हीं मा साठीं दिल्लीपर्यंत जाऊन आलां ! नेलं नाहीं होय ? बरं बरं. मी तुमच्याशीं बोलायचीच नाहीं मुळीं !'

'अग वेडे, तूं दिल्लीस गेलीस श्रीरंग कुणाकडे राहील ?'

'कां ? माझ्याबरोबर येईल !'

'कांहीं तरीच ! रेल्वेचा मोटरीचा प्रवास करतांना तो आ पडला तर ?'

'खरंच. बरं झालं बाई, मी न आलें ती ! आणि आजोबा, या मा नं मला किती फुलं दिलीं आहेत लींत का ! पण माझ्या या बोटाला कांटा टोंचला हो !'

'कुठं पाहूं; पाहूं !'

'अहो, त्यानं स्वतःचा चां हात-रुमाल त्याच वेळीं फाडला आ चटकन माझी जखम बांधून टाकली !'

'अस्सं ? मग हे दे त्याला दोन रु चांगला माणूस आहे तो !'

पण या वेळीं तो माळी तेथें न त्यामुळें तिला कांहींच करतां आलें नाहीं.

—२—

'या मुलीचें मनोविज्ञान म्हण एक रहस्य आहे.'

दोघां मित्रांत त्या मुलीसंबंधानें च चालली होती. यापैकीं एक आप परिचित तरुण—माळी—होता. त्याचें ना अरुण. दुसरा त्याचा मित्र. त्याचें ना वरुण.

वरुणानें विचारलें, 'रहस्य कसलें !'

'कां ? बोलतां बोलतां ती हंसे लागलीच रडूंहि लागते. वेड्यासारखी स्थिति ! मात्र तिची नजर वेड्याप्रमा नाहीं. मी इंग्लंड, अमेरिका देशांचीं वेड्यांचीं हास्पिटलें पाहिलीं पण असलं वेड मला आढळलं नाहीं. डोळ्यांवरून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पणाचा परिचय होतो, हिचे डोळे तसे नाहींत. त्या देशांत हिच्यापेक्षांहि सुंदर मुली मी पाहिल्या, पण असलें तीक्ष्ण आणि निर्मळ तेज त्यांच्या डोळ्यांत मल आढळलं नाहीं. हिचे डोळे म्हणजे शरत्कालीन नील आकाश ! मेघ यावे आणि जावे. निर्मल हास्याची लयलूट !'

वरुण हंसून म्हणाला, 'तिच्या प्रेमांत सांपडलास कीं काय ?'

'तसं कांहीं निश्चित सांगतां येत नाहीं; पण प्रेम केलं तर मी हिच्यावरच करीन.'

'हिचं वय किती तुला माहीत आहे ?'

'वय? तीहि एक आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे. शरीराची ठेवण पाहिली तर वाटतं सोळा सतरा वर्षे होऊन गेलीं असावींत ! पण हावभाव सर्व कांहीं लहान सहा सात वर्षांच्या मुलीप्रमाणें !! तिच्याकडे पाहिलं म्हणजे वाटतं, हिचं तारुण्य गुदमरून राहिलं असावं ! उमलणाऱ्या तारुण्याला कसला तरी अडथळा होत असावा. फुलणारी गुलाबाची कळी दोऱ्यानं बांधून ठेवावी त्याप्रमाणं ! कोणतीहि तरुणी कोणाहि तरुणाकडे अशा प्रकारें फुलाची याचना करणार नाहीं !

'तुझ्याकडे येऊन तिनं फुलं मागितलीं वाटतं ?'

'अरे तें मागणं कसलं ? जबरदस्तीनं घेणंच. मी तिला पूर्ण अपरिचित ! पण ती माझ्याशीं बोलली तें अगदीं परिचिताप्रमाणें. किती तरी वर्षांचा परिचय असावा. लाज नाहीं, संकोच नाहीं आणि उद्दामपणाही नाहीं. सहजसरल भाव. बालिकासुलभ लडिवाळपणा ! रुसणं, फुगणं, रागावणं— '

'आणि तें सगळं पाहून तूं मुग्ध झालास ! मनोविज्ञानाची चर्चा करूं लागलास. घरीं आल्यावर तुला दुसरं कांहींच सुचेना. मनोविज्ञानासाठीं इतका खर्च केलेला पैसा आणि देशीविदेशीं जाऊन केलेलं सगळं संशोधन व्यर्थ गेलं म्हणेनास ! एका सोळा सतरा वर्षांच्या मुलीचें तुला मनोविश्लेषण करतां येईना. धिक्कार असो तुझ्या मानसशास्त्रवेत्तेपणाला आणि पदवीला ! बरं. फुलं दिलींस; पण आतां तिच्या हातीं तुझे प्राण देऊं नको म्हणजे झालं !'

'अरे प्राण कांहीं कोणी हौसेनें अगर शौकाखातर देत नाहीं ! तेहि या फुलाप्रमाणेंच हळुवार हातानं काढून घ्यावे लागतात. पण ती भीति बाळगण्याचं कारण नाहीं. तिच्या प्रेमाला पात्र झालेला दुसरा एक प्राणी आहे !'

"ही बातमी आणखी तुला कुणी सांगितली बाबा ?'

'तिनंच सांगितलं. ती म्हणाली, मी श्रीरंगावर प्रेम करतें.'

'अस्सं. म्हणूनच आमच्या कमलला तूं वेडी समजतोस ?'

'हं. हं. तिचं नांव कमल. ओळखलंस तूं तिला ?'

'अरे चांगली. ती माझी मावसबहीण. गावशीची मुलगी. तिचं नांव कमला. आम्ही तिला कमल म्हणून हांक मारतों.'

'श्रीरंग कोण ?'

'अरेरे ! तूंही तिच्यासारखाच वेडा दिसतोस !! अरे ती एक तिची बाहुली आहे. आणि ती बाहुली किती बेंगरूळ आहे म्हणतोस ! तूं हातांतसुद्धां घेणार नाहींस. पण आमच्या कमलला मात्र ती मदनाच्या पुतळ्याप्रमाणें वाटते. डॉक्टर म्हणतात, कमलला मनोमॅनियाक झाला आहे. या रोगाचं लक्षण आम्हांला कांहीं कळत नाहीं बुवा ! तूं डॉक्टर आहेस. तुला परीक्षा झाली तर पहा.'

'मी तिला एकदांच पाहिलं आहे; तेव्हां निश्चित कांहीं सांगतां येत नाहीं. तरीपण लक्षणं तशीं दिसतात खरीं. एकाच विषयाचं ज्याला वेड लागलं त्याला मनोमॅनियक म्हणतात. तो त्यांतच तन्मय होऊन जगालाच नव्हे तर स्वतःलाहि विसरतो !'

वरुण मोठ्यानें हंसून म्हणाला, 'तसं म्हटलं तर हा रोग नाहीं कुणाला ? प्रत्येकाला एखादुसरा कांहीं ना कांहीं नाद असतोच ! आमचा केशवच पाहिनास ! अगदीं मंडळींतील माणूस; पण नवमतवादाची गोष्ट काढ कीं रागावलाच ! त्यावेळीं त्याचे डोळे लालबुंद होतात, आणि हातवारे पाहिले तर वाटतें कीं खास याला वेड लागलें आहे. तुझंच पहा. फुलांचं वेड काय तुला कमी आहे? एकसारखा त्या बागेंत रावत असतोस. दवाखान्याकडे लक्षच नाहीं. तीं फुलें तुझ्याबरोबर बोलतात काय रे ?'

अरुण निश्चयी स्वरानें म्हणाला, "अलबत. तीं माझ्याबरोबर बोलतातच. आपला आजार, भूक-तहान सर्व कांहीं तीं सांगतात. आतां त्यांची भाषा मिराळी आहे. ती शिकली पाहिजे."

'तर मग कमलचंहि तसंच आहे. तिला आपल्या बाहुलीची भाषा चांगली कळते. आमची कमू स्वयंपाक चांगला करते; पण स्वयंपाक करतां करतां तिला वाटतें आपला श्रीरंग रडत आहे. कीं, धांवलीच तिकडे ! त्यावेळीं मग फोडणी करपून जावी, दूध उतास जावो अगर भाताची राखुंडी होवो. तिकडे ती पहाणार नाहीं.'

'बरं, हिच्या वंशांत कुणाला कधीं वेड लागलं होतं का ?'

'तसं कांहीं मला माहीत नाहीं. तरी पण हिला जसं बाहुलीचं वेड आहे, तसंच हिच्या आईच्या बापाला पैशाचं वेड होतें. पैपैसा सांठविणं आणि कधीं कांहीं खर्च न करणं हाच एक त्याला नाद ! ज्यावेळीं त्याची प्राप्ति हजार रुपये होती तेव्हां त्यानें कोणा एका जंटलमन्ची हमालगिरी करून चार पैसे मिळविल्याची आख्यायिका प्रसिद्ध आहे. तशीच या कमलची आई. मूल होण्यासाठीं हिनें जितके प्रयत्न केले, तितके जगांत कोणी कधीं केले नसतील. ताईत, देरे आणि गंडे यांनीं तिचा सगळा देह नुसता भारावाला होता. बाप कृपण ! पैसा खर्च होईल म्हणून तो तिचें लग्नच करीना; पण माझ्या मावशीचा निश्चय; कीं कांहीं झालं तरी आपलं लग्न झालंच पाहिजे. त्यावांचून मूल होणं शक्य नाहीं. मुलासाठीं नवरा पाहिजे हा तिचा हट्ट. रात्रंदिवस तिचा आपला एक घोष. मी आई होणार ! शेवटीं अठराव्या वर्षी बापाला नकळत तिनं आपलं लग्न केलं !'

अरुणनें आश्चर्यानें विचारलें, 'बापाला नकळत ! त्या काळींही असं होत असे म्हणतेस ! कन्यादान कुणी केलं ?'

'मामानं. नंतर जेव्हां सौभाग्यालंकार धारण करून तिनं बापाला नमस्कार केला तेव्हां तो कांहीं गृहस्थ रागावला नाहीं. उलट तो असा विचार करूं लागला, 'स्वयंपाकीण ठेवण्याला ज्यास्त खर्च येईल कीं पोटावारी काम करणाऱ्या मुलीचं पोषण करण्याला ज्यास्त खर्च येईल...?' शेवटीं त्यानें असं समाधान मानलं कीं, 'एक तर बिनखर्चानं लग्नाची जबाबदारी टळली; दुसरं, समाजांत आपलं तोंड उजळ राहिलं, आणि तिसरी गोष्ट म्हणजे लग्न झालं तरी स्वयंपाकाला मुलगी आपल्याकडेच राहाणार ! जमेच्या बाजूला इतक्या गोष्टी पाहिल्यावर तो रागावतो कशाला ! ''

अरुण उत्सुकतेनें म्हणाला, 'म्हणजे? कमलच्या बापानं विवाह केला; पण बायकोला आपल्याजवळ ठेविलं नाहीं ! बायकोबरोबर बोलभाषण—''

'अरे तेंहि तसंच. त्याला तरी आपल्या नादापुढं बायकोकडं पहायला वेळ होता कुठं ?'

'तोही नादीच ! त्याला कसला नाद होता ?'

'दुसरा कसला ? तुझ्यासारखाच त्याला फुलांचा नाद होता. फुलांच्या बाबतींत प्रतिसृष्टी कशी करतां येईल, फुलांना निरनिराळे आकार कसे देतां येतील, फुलांचे घबाळ कसं बनवितां येईल वगैरे विचारांतच तो नेहमीं गढलेला असे. मग बायकोबरोबर तो बोलणार कधीं ? माझी मावशी ज्या दिवशीं प्रथम त्याच्याशीं बोलायला गेली, तेव्हां तिला पाहून तो कांहींसा चकित झाला आणि थोडावेळ टक लावून पाहात राहिल्यावर म्हणाला, 'कोण तूं !' नंतर कसलीतरी आठवण झाल्यासारखें करून त्यानं म्हटलं, 'हं हं. तुझ्याशींच मी लग्न केलं नाहीं का ? ये. ये. वाः ! एखाद्या झुबकेदार फुलाप्रमाणें तूं फारच सुंदर दिसतेस ! कां ? आहे कीं नाहीं माणूस ?'

'पण यावर तुझी मावशी काय म्हणाली ?'

'अरे उत्तर कसलं देणार ? कुणी तरी हिंदू मुलगी या असल्या प्रश्नावर उत्तर देईल होय ? फार तर लाजून खालीं मान घातली असेल तिनं, आणि तिच्या बरोबरीच्या गेलेली मोलकरीणहि मला तसंच सांगत होती."

'तें खरं; पण कायरे ? तिच्या बापानं तिला पाठविलं कसं ?'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'अरे, तो त्यावेळीं जिवंतच नव्हता. एका सांथीच्या तापांत तो अकस्मात वारला. जर मेल्यावर आपल्यावरोबर त्याला पैसा नेतां आला असता तर मावशीला एक पैही मिळाली नसती, पण तसं झालं नाहीं. मावशी भरपूर पैसा घेऊन नवऱ्याकडे आली. मात्र तिची मातृत्वाची भूक अद्याप जशीच्या तशीच होती. आई होण्याचा तिचा उतावीळपणा कमालीचा वाढला होता आणि त्यासाठीं ताईत, गंडे, दोरे, अंगारे, धुपारे हें एक सारखी भरीत होती. जसजसे दिवस जाऊं लागले तसतशी ती ज्यास्त उतावीळ झाली. शेवटीं मोठ्या वयांत तिला गर्भ राहिला, आणि एकजीव करून कृपणाच्या धनाप्रमाणें तिनें तो वाढविला. स्वर्गाचं राज्य मिळाल्याइतका तिला आनंद झाला.'

'नवऱ्यालाहि तसाच आनंद झाला असेल !'

'तें कांहीं मला माहीत नाहीं; पण ऐकीव हकीगतीवरून कळतें कीं, तो एकदां तिच्या अंगावरील ताईत गंडे गंडे दोरे पाहून म्हणाला, 'हें सर्व कशाकरतां?' तेव्हां ती हंसून म्हणाली, 'आपण नवीन मूल तयार करणार या आशेनं' त्यावर तो वेडपट म्हणाला, मला कांहीं शक्य नाहीं. तूं तसं कांहीं केलंस तर माझा गौरव होईल !'

'कांहीं तरी काय बोलायचं !' असं मावशी म्हणाली आणि पुढं तिला कमल झाली. मूल होतांच मावशीनं आपल्या नवऱ्याला तें दाखवून म्हटलं, 'हें पहा तुमचं नवं फूल !' त्यानें वेड्याप्रमाणें बराच वेळ निरखून पाहिलं आणि हंसून टाळ्या वाजवीत म्हटलं, 'आहे खरं फूल ! वाः छान; पण हा पिवळा गुलाब झाला. मी काळा गुलाब बनविण्याची खटपट करीत होतों !' त्यावर मावशी रुसून म्हणाली, 'अगदींच वेड्यासारखं काय करायचं तें ! आपला तो गुलाब नको मला. मी हिचं नांव ठेवणार कमल !'

अरुण हंसून म्हणाला, 'सगळा वेड्यांचा बाजार ! बरं पण या मुलीवर तुझ्या मावशीचा नवरा फार प्रेम करीत असेल नाहीं ?'

'तो बांचलाच नाहीं त्यानंतर ज्यास्त दिवस ! कमल झाल्यावर तो गेला अमेरिकेंत. तिथं कसल्याशा एका विषारी फुलाचा कांटा टोंचून तो वारला.'

'तर मग कमलच्या आईला तें दुःख फारच जाणवलं असेल !'

'जाणवणारच; पण कमलकडे पाहून ती दिवस कंठीत होती. कारण अपत्यवात्सल्य आणि मातृत्व हेंच तिचं जीवन सर्वस्व असल्यामुळं मुलीच्या तैनातीपुढं तिला दुसरं कांहीं सुचलंच नाहीं. तिचं रांगणं, बागडणं, बोलणं, आई म्हणून हांक मारलेली ऐकणं यांतच ती अष्टौप्रहर मग्न असे. मुलीला समजण्यासाठींच तिनें ही श्रीरंग नांवाची बाहुली तिला दिली, आणि ती रडूं लागली म्हणे,'कमू, वेडे तूं काय रडतेस ! आधीं तुझ्या या मुलाला समजाव. तूं त्याची आई आहेस. आईनं रडायचं नाहीं. त्याला घे पाहूं आधीं. कमल विचारीत असे, 'हा कोण ?' ती म्हणे 'तुझा मुलगा शिरी' आणि तोच तिचा श्रीरंग झाला आहे. त्याला ती पळभरही विसंवत नाहीं. माझी मावशी वारल्याला आतां बारा वर्षे झालीं; ही वेडी कमू, आपल्या आजोबालाच आई म्हणत असे. त्यानंतर या श्रीरंगाला काढून घेण्याची भीति दाखवून आजोबा म्हणण्याचं हिला शिकविलं.'

वरुणानें सांगितलेली ही सगळी 'कमलेची कहाणी' ऐकून अरुण स्तब्ध झाला. तो कसल्यातरी निगूढ मानशास्त्राच्या सिद्धांतानें संशोधन करीत असावा असें वरुणाला वाटलें. शेवटीं त्यानें विचारलें, 'कसला विचार करतोस ?'

'विचार कसला करणार ? पण काय रे, कमलला कोणी वरं करूं शकणार नाहीं का ?'

'तूं डॉक्टर आहेस. कर ना प्रयत्न ! तिच्या आजोबांशीं मी तुझी ओळख करून देतों.'

—३—

'हे कमलचे आजोबा आणि हे डॉ. अरुण. हे एम्. डी. असून मनोविश्लेषण शास्त्रांत पारंगत आहेत. यांना फुलांचा मनस्वी नाद–'

'अस्सं. डॉक्टरसाहेब, हा फुलांचा नाद माझ्या मुलालाहि होता.'

'मला डॉक्टरसाहेब म्हणूं नका. मी आपल्या या वरुणाचा स्नेही आहे. मला याच्याप्रमाणेंच अरुण हांक मारा. शिवाय या फुलांमुळेंच आपल्या कमलची आणि माझी ओळख–'

'हं. म्हणजे ते माळी—'

'तोच मी. वरुणच्या तोंडून तिचा सगळा इतिहास ऐकला आणि त्यासंबंधानेंच—'

'आजोबा, सांभाळा बरं. तिचा इतिहास ऐकून उत्सुकतेनं जवळ आलेला हा पाहुणा कायमचाच घरांत—'

'कांहीं हरकत नाहीं वरुण. अरुणासारखा खेळगडी मिळाल्यास तिचा तो बाहुलीचा नाद अजीबात सुटण्याचाही संभव—'

'हें बाहुलीचं काय प्रकरण आहे आजोबा !'

या नंतर वरुणाकडून अरुणाला समजलेली सगळी हकिकत आजोबांनीं ऐकवली आणि ते म्हणाले, 'त्या बाहुलीचा आणखीहि थोडासा इतिहास आहे. तें शापित धन आहे !'

'तें कसं ?' दोघांनीहि विचारलें.

'आमच्या कमलच्या आईचा बाप अतिशय कृपण होता. तो स्वतःला फार हुषार आणि व्यवहारी समजत असे. पण या जगांत स्वतःला जे अधिक हुषार समजतात तेच फसत असतात. पक्ष्यांत कावळा हा अतिशय चतुर मानण्यांत येतो पण तो विष्ठा खातो. तसंच हें आहे. अति शहाण्याचा बैल रिकामा म्हणतात. तें असो. या कृपण म्हाताऱ्यानें एका इसमाला चांगला कागद वगैरे करून घेऊन कर्जाऊ रुपये दिले होते. सगळी स्थावरजंगम इस्टेट लिहून घेतली होती; पण शेवटीं त्या कर्जदाराकडून सीलबंद केलेल्या या कांचेच्या बाहुलीखेरीज कांहींच मिळालें नाहीं.

वरुण म्हणाला, 'हें मला माहीत नव्हतं !' या फसवेगिरीबद्दल त्या कर्जदाराला तुरुंगांत नाहीं घातलं ?'

'तो फरारी झाल्यामुळें कांहींच इलाज करतां आला नाहीं !' अजोबा म्हणाले.

'फारच विचित्र ! नंतर काय झालं ?' अरुणानें प्रश्न केला.

'कमलची आई लहानपणीं बाहुलीसाठीं फार हट्ट घेत असे. त्या कृपण म्हाताऱ्यानें ही बाहुली तिला दिली आणि म्हटलें, 'हिला फार किंमत पडली आहे. ही जिवापलीकडे सांभाळ ! तुझा मुलगा बरं. फोडूं नको.' पोरीला लहानपणापासून मुलाची अतिशय आवड ! ही बाहुली मिळतांच तिचा सगळा जीव त्यांत गुंतला. मातृत्व आणि अपत्यवात्सल्याची जाणीव झाली, समजूं लागल्यावर या निर्जीव बाहुलीनं तिचं समाधान होईना; पण तिनें ती जपून ठेविली. त्यानंतर अनेक वर्षांनी कमलचा जन्म झाला. कमल बोलूं लागल्यावर तिनं आपल्या वेडप्या आईला म्हटलं, 'आई, मी तुझी कोण ग !' सूनबाई हंसून म्हणाली, 'तूं माझं बाळ.' कमलनें विचारलं, 'मग माझं बाळ कुठं आहे ?' त्यावेळीं तिच्या आईनं तिला ही बाहुली दिली आणि म्हटलं, 'हा तुझा बाळ. याचं नांव श्रीरंग. म्हणायचं शिरी !" मुलगी अतिशय मातृभक्त असल्यामुळं आईचं म्हणणं खरं मानून तेंच ती आतांपर्यंत घेऊन बसली आहे. आतां कमल एकंदर सतरा वर्षांची झाली पण तिला आहे एक या बाहुलीचं वेड. तो मुलगा, आपण आई हाच भाव. मीराबाईच्या श्रीकृष्णाप्रमाणं ! राधेच्या कन्हैयाप्रमाणं सगळं कांहीं जीवनसर्वस्व तें. असो. आपलेपणानं विचारलं म्हणून सांगितलं. माझी ही अशी वृद्धावस्था ! घरांत अलोट संपत्ति आणि ही अशी वेडी नात ! ! काय करावं सांगा !"

बोलतांबोलतां म्हाताऱ्याचे डोळे अश्रूंनीं भरून आले. तो गहिंवरून म्हणाला, 'पोरीचं लग्न केलं असतं म्हणजे मी सुटलों असतों. पण या वेडीला लग्न म्हणजे काय, तेंच कळत नाहीं ! लग्न म्हटलें म्हणजे वेड्याप्रमाणे माझ्याकडेच पाहात राहते ! शास्त्र म्हणतें 'नवरा म्हणजे काय हें कळूं लागेपर्यंत मुलीचा विवाह करूं नये–अज्ञात पतिमर्यादाम्–' शिवाय या वेड्या मुलीबरोबर लग्न तरी कोण करणार ? पैशाच्या लोभानं कोणी कोणी होय म्हणतात; पण एकदां लग्न होऊन पैसा ताब्यांत आला म्हणजे या पोरीला वेड्याच्या हॉस्पिटलमध्यें टाकतील झालं ! कसं करूं सांगा !'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अरुण डॉक्टर होता. मानसशास्त्राचा त्यानें प्रयत्नपूर्वक अभ्यास केला होता. कांहीं वेळ सर्व गोष्टींचा विचार करून तो म्हणाला,

"वयोमानाप्रमाणं होणारी स्त्रीत्वाची आणि तारुण्याची हिला अद्याप जाणीव झालेली नाहीं. सेक्शुअल इफेक्ट आहे हा!"

"पण ही जाणीव आतां तिला होणार कशी आणि कधीं ? ती तर आतां वयांत आली आहे ?"

"हा तुझा मुलगा ही तिच्या आईनं लहानपणीं तिला दिलेली सजेशन तिच्या अंतःकरणांत पक्की बिंबली आहे. त्या भावनेंतून हिची अद्याप मुक्तता झालेली नाहीं!"

वरूण आश्चर्यानें म्हणाला, "तूं डॉक्टर आहेस म्हणून ऐकायचं झालं! अरे अशा काय थोड्या गोष्टी होतात? सांगणारे सांगतात आणि ऐकणारे ऐकतात; पण तें असं मनांत पक्कं बिंबून रहातं थोडेंच!"

"तें कांहीं नाहीं; पण सर्वांचींच मनं सारखीं नसतात. सजेशन देऊन मनाला मुग्ध–मोहित–सम्मोहित–करण्याची कला अवगत पाहिजे. रामकृष्ण परमहंसांनीं विवेकानन्दांना एका क्षणांत बदललें. नास्तिकाचे ते पक्के आस्तिक बनले. महान् सत्पुरुषांचीं अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. सरळ विश्वास ठेवणाऱ्या मनावर या असल्या सजेशनचा लवकर परिणाम होतो. याला सूचनानुवर्तित्व म्हणतात. सामर्थ्यसंपन्न आणि मानसिक शक्तिशाली मनुष्याची आज्ञा उल्लंघन करणें अशक्य होतें. तो सांगेल तें सत्य म्हणून चालणारीं माणसं पुष्कळ आहेत. या कमलच्या बाबतींत मातृभक्ति आणि तिच्यावरचा अखंड विश्वास हाच कारण झालेला दिसतो! शिवाय वाढत्या वयाबरोबर आईच्या त्या सूचनेचा तिच्या मनावर हळूहळू परिणाम होत गेला आणि या बाहुलींतच तिलां जविनसर्वस्व वाटूं लागलें. दुसरी तशी सामर्थ्य संपन्न सूचना तिला मिळालीच नाहीं. 'हा माझा मुलगा' या सूचनानुवर्तित्वांतच तिचा आतांपर्यंतचा काल गेला. आजारी आजारी म्हणतां म्हणतां मनुष्य खरोखर आजारी पडतो आणि क्षय म्हणतां म्हणतां मनुष्य क्षयीं होतो या गोष्टी काय तूं ऐकल्या नाहींस? मनावर एकसारखा तोच तोच परिणाम करीत राहाणं हेंच याचें तत्व आहे!'

यावर वरूणनें उत्तर देण्यापूर्वी आजोबा म्हणाले, 'अशा गोष्टी पुष्कळ आहेत; पण एका यःकश्चित कांचेच्या बाहुलीला खरोखरीचा जिवंत मुलगा मानणं—'

'अहो, पण ह्या वयांत तिला ही कांचेची बाहुली देण्यांत आली त्या वयांत चेतन अचेतन पदार्थ ओळखण्याची शक्ति नसते हें नाहीं तुम्ही ध्यानांत घेत? शिवाय दगडाची अगर अष्ट धातूंची मूर्ती घेऊन तिच्यांत सर्वस्व सामावलेलें आहे असें मानणारे अगर मानणाऱ्या कांहीं थोड्या नाहींत. याला वात्सल्यभावाची उपासना असें नाव मिळत असेल, पण तेंही एक वेडच आहे. रामाच्या मूर्तीसंबंधानें प्रत्यक्ष पाहिलेली तोतापुरी बाबांची रामकृष्ण-परमहंसांच्या वेळची गोष्ट कालपरवांपर्यंत लोक सांगत होते. बालरामाची ती मूर्ति होती. कृष्णाच्या मूर्तीसंबंधानेंही अशीं उदाहरणें आहेत. हंसणें, रुसणें, रडणें, रागावणें, वगैरे गोष्टी प्रत्यक्ष अनुभवल्याप्रमाणें त्या मूर्तीच्या बाबतींत भक्त सांगतात व मानतात! ज्या ठिकाणीं ती भक्ताच्या भक्तीची पराकाष्टा मानतों, त्या ठिकाणीं मातृत्वाची पराकाष्टा मानावयाचें इतकेंच. त्या भक्तांना कोणीहि वेडे ह्मणत नाहीं; मग कमललाच तेवढी वेडी कां मानतां? ही तिचीं मातृत्वाची भावना आईच्या प्रेमपान्ह्याबरोबरच तिच्या सर्वांगांत संचारली असून आतां तर ती वाढीला लागली आहे. शिवाय पुत्र-प्राप्तीबद्दलचा तिच्या आईचा विलक्षण हव्यास लक्षांत घ्या. आईच्या वडलांचा धनसंग्रहाचा नाद ध्यानांत आणा आणि मग कमलच्या या वेडाची चिकित्सा करा. कारण वारसदार मुलाकानें तिला त्यांची प्राप्ति झालेली आहे. आतां हिचा हा मॅनिया कांहींसा अस्वाभाविक आहे खरा, abnormal असें मला म्हणतां येईल; पण तेवढ्यानें ती वेडी ठरत नाहीं. ज्याला जबाबदारीचें ज्ञान नसतें त्याला फार तर वेडे म्हणतां येईल! श्रीरंगासंबंधानें मानीव कां होईना; पण तिला जदाबदारी कळते. तसें नसतें तर वेडाच्या भरांत तिनें गळा दाबून त्याला मारून टाकलें असतें!'

आजोबा म्हणाले, 'तें तसें खरें असेल; पण—'

'छे. यांत पण नकोच मुळीं. 'तद्भावे भाविता' असा एक प्रवाद आहेच कीं नाहीं?' 'श्रीपाळ चांगुणे' चें आख्यान लावून हरिदास कीर्तन करूं लागला म्हणजे ओक्साबोक्शीं रडणारीं माणसें आढळतात. 'एकच प्याल्यांतील सिंधूचे हाल पाहून रडणाऱ्या बायका दिसतात. अभिमन्यूवधाच्या आख्यानाचे वेळीं रडणाऱ्या माता कांहीं थोड्या थोडक्या नाहींत. ईश्वरासाठीं रडणारे भक्तहि पुष्कळ आहेत. हळव्या भावनाप्रधान मंडळींना या गोष्टी नवीन नाहींत—'

यावेळीं खुद्द कमलच तेथें आली. ती अस्ताव्यस्त, अस्वस्थ आणि अधिर दिसत होती. आंत येतांच अरुणकडे पाहून ती म्हणासी, 'अरे माळी, तूं इथं बसून गोष्टी करीत आहेस होय! तिकडे माझा श्रीरंग फुलांसाठीं हट्ट घेऊन रडत आहे! मी तर तुला शोधून दमलें अगदीं—'

'तूं मला शोधीत आहेस?'

"तर! शोधूं नको. तिकडे तुझ्या बागेंत जाऊन आलें. मला तेथें कोणीच कांहीं सांगेना. चल पाहूं मला फुलें दे.""

"बरं. मी जाऊन पाठवून देतों." अरुण म्हणाला.

"नाहीं. माझ्या बरोबर चल. आजोबा सांगा हो, याला माझ्याबरोबर यायला!"

"तूं माळी कुणाला म्हणतेस?" आजोबांनीं विचारलें.

"कां? हा माळी नव्हे? त्या दिवशीं तर माती खणून फुलझाडांना घालीत होता!"

वरुण हंसत म्हणाला, "छान. माती खणतो म्हणून माळी. आमची कमल मोठी बुद्धिमान् आहे. बरं कमल, तूं स्वयंपाक करतेस म्हणून काय स्वयंपाकीण झालीस?"

"चल तसं कसं? मग हा माळी नव्हे तर कोण?"

"हा फुलांचा डॉक्टर आहे," आजोबा म्हणाले.

अरुणनें त्याला पुस्ती जोडली, "मी फुलांचा डॉक्टर आहे. तसा मुलांचाही डॉक्टर आहें."

"तें कांहीं नाहीं. तूं मला फुलं दिलीं पाहिजेस. चल पाहूं" असें ह्मणून अरूणचा हात धरून कमल त्याला ओढूं लागली.

वरूण खिन्न होऊन म्हणाला, 'पहा, लाज संकोच कांहीं आहे हिला!'

अरूण सहानुभूतीच्या स्वरानें म्हणाला "अरे, ज्यावेळीं लाज आणि संकोच यांचा उदय होईल त्यावेळीं स्वतःच्या स्त्रीत्वाची जाणीव झाल्यावांचून राहील कां? तरुण्याच्या भावना जागृत झाल्या कीं ती सहजच माणसांत येईल. तीच तर आज उणीव आहे!"

आजोबा कांहींशा वैतागानें तिला म्हणाले, "कमल, तो तिकडे तुझा श्रीरंग रडत आहे आणि तूं आपली इकडेच! जा आधीं पाहूं"

कमलनें कानोसा घेऊन अधीरतेनें म्हटलं, "खरंच. एक क्षणभरहि मला सोडून राहण्याचा नाहीं. मुलखाचा हट्टी आणि अवखळ आहे. जातेंच मी—!' बोलतां बोलतां ती धांवतच गेली.

'अरुण, या वेडांतून ही बरी होईल म्हणतां?' आजोबांनीं काळजीयुक्त स्वरानें विचारलें.

"प्रयत्न करून पाहायला हरकत कोणती?"

हिचें सूचनानुर्तित्व किती प्रभावी आहे पहा! ही आली तर या सजेशननेंच ताळ्यावर येईल. आतांच पहा. वास्तविक श्रीरंग रडत नव्हता. तो बिचारा कोपऱ्यांत पडून असेल; पण सजेशन मिळतांच तो रडूं लागल्याचें तिला ऐकूं आलें. बालसुलभ भावप्रवण तेचे हे खेळ आहेत. संकल्पविकल्प हा मनाचा धर्मच आहे. एकदां म्हणायचें होय, एकदां म्हणायचें नाहीं. भावानुकूल वृत्ति! विपरीत भावतरंगांत असेच मनाचे खेळ चालायचे! आजोबा, आपल्या नातीचं अन्तःकरण अगदीं सरळ आणि गंगेप्रमाणं स्वच्छ निर्मल आहे. जो रंग त्यांत घालावा त्या रंगाचें तें होईल. हिचं वय वाढलं. पण मनाची वाढ झाली नाहीं. ती खुंटून राहिली आहे.'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वरुण म्हणाला, 'तूं कांहीं म्हण अरुण. आमच्या कमलला कांहीं आतां स्वतःच्या वयोचित जाणीव होणार नाहीं.'

'प्रयत्न केला पाहिजे!'

'मग कर ना प्रयत्न!'

'तर मग माझ्यावर संपूर्ण विश्वास ठेवला पाहिजे.'

आजोबांनीं तशी संमती दिली आणि नंतर अरुण-- वरुण निघून गेले.

त्याचवेळीं कमल आंत आली आणि म्हणाली, 'अं! माळी गेला वाटतं!'

अजोबा हंसून म्हणाले, 'पुनः तूं त्याला माळी म्हटलंस!'

'तो माळी नव्हे तर काय!'

'तो तुझा नवरा.'

'माझा नवरा? मला सासरीं नेणार!'

'नेईल तर काय झालं!'

'बाई मी माझ्या श्रीरंगाला सोडून कुठं नाहीं जायची! माझा शिरी रडून आकांत करील!'

'तसं कशाला? तूं त्याला बरोबर ने म्हणजे झालं! तुझा नवरा म्हणजे तुझ्या शिरूचा बाप, हें नाहीं का तुला समजत!'

'खरंच. आजोबा चला. चला त्यांच्या बागेंत जाऊं. मला तो चांगलीं चांगलीं फुलं वेंचून देईल—' बोलतां बोलतां तिनें आजोबांचा हात धरून त्यांना उठविलेंच. त्यांनाही नाईलाजानें जाणें भाग पडलें.

—४—

आजकाल पाश्चात्य राष्ट्रांत ज्या सम्मोहन विद्येचा प्रादुर्भाव झाला आहे, त्या विद्येचा उगम फार प्राचीन काळीं भारती युद्धांत त्यावेळच्या योध्यांनीं अनुभविला होता. उत्तरगोग्रहणाच्ये वेळीं सम्मोहन अस्त्रानें कौरवांच्या सैन्याला मुग्ध केल्याची कथा प्रसिद्ध आहे. मात्र आज जी विद्या हस्तसंचालनानें दिग्दर्शित केली जाते तीच विद्या त्यावेळीं मंत्राभिषिक्त शस्त्रानें संपादिली जात होती.

डॉ. अरुण या Hypnotism विद्येंत पारंगत असल्यामुळें त्यानें कमलच्या बाबतींत त्याच विद्येचा उपयोग करण्याचें ठरविलें; पण योग्य संधीची तो वाट पहात होता. कारणाशिवाय कार्य होणें शक्य नाहीं. कमलनें कारणा-वांचून या प्रक्रीयेला मान्यता दिली नसती. शेवटीं आजोबानीं ती संधी दिली. ते एके दिवशीं तिला म्हणाले, 'कमल, अलीकडे लहान मुलांना लिव्हरचा रोग होत आहे. दुधापासून या रोगाची उत्पत्ति होते. तुझ्या शिरूला तूं कसलें तरी दूध घालीत जाऊं नको.'

यानंतर एकदोन दिवस जातात न जातात तोंच कमल खिन्न चेहेऱ्यानें आजोबांकडे येऊन म्हणाली, 'कसं करावं आजोबा, 'श्रीरंग आजारी पडला आहे.'

'भितेस कशाला? आपला अरुण डॉक्टर आहेना? तो त्याला तेव्हांच बरा करील.'

'कोण? तो नवरा होय!'

होय. सांग ना त्याला!'

'काय सांगूं!'

'सांग, नवऱ्या, माझ्या शिरूला बरं कर.'

कांहीं वेळ स्तब्ध राहून ती म्हणाली, 'पण माझा शिरू कांहीं कल्या औषध खायचा नाहीं. मग कसं?'

'अं:! त्यांत काय मोठंसं. त्या डॉक्टरला मंत्रतंत्र सर्व कांहीं माहीत आहे. पाणी मंत्रून घातलं झालं! त्या दिवशीं त्या बुवानं शेजारच्या मुलीला नाहीं बरं केलं?'

'मग तो नवरा काय फकीर आहे!'

'होय तर! त्याचं सामर्थ्य फार मोठं आहे.'

'तर मग तुम्हीं सांगाच त्याला. तो मला चांगलीं चांगलीं फुलं देतो आणि शिरूलाही देतो.'

'कां देतो माहीत आहे?'

'तें मला कसं कळणार! कां बरं देतो?'

आजोबा हंसून म्हणाले, 'अग तुझ्यावर त्याचं प्रेम आहे.'

प्रेम हा शब्दच कमलला अपरिचित होता. तिला त्याचा अर्थच कळेना. ती आजोबांकडे बराच वेळ पाहात राहिली आणि नंतर म्हणाली, 'प्रेम—प्रेम आहे?'

'तर! नाहींतर उगाच तो तुला चांगलीं चांगलीं फुलं देईल? तुझं जसं तुझ्या शिरूवर प्रेम आहे, तसंच त्याचं आपल्या फुलांवर प्रेम आहे. तो आपल्या फुलांना कुणाला हातसुद्धां लावूं देत नाहीं. तो आपल्या फुलांचे किती लाड करतो आणि त्यांना जपतो तुला माहीत नाहीं?"

'मग तो मला कशीं फुलं देतो तर!'

'तुझ्यावर त्याचं प्रेम आहे. तूं त्याला आवडतेस म्हणून तो आपली आवडती वस्तू तुला देतो!'

'खरंच आजोबा. तोच आतां माझ्या शिरूला बरं करील. चला जाऊंया त्याच्याकडे.'

अरुणकडे गेल्यावर कमल म्हणाली, "माळी, तूं माझ्या शिरूला बरं कर!"

अरुण हंसला. त्यानें आजोबांकडे सहेतुक दृष्टीनें पाहिलें आणि नंतर कमलला विचारलं, "काय झालें आहे त्याला?"

"आजोबा म्हणतात, लिव्हरचा आजार झाला आहे त्याला."

अरुण सहज स्वरानें म्हणाला, "अं:! इतकंच. मी उद्यां येऊन पाणी मंत्रून टाकतों म्हणजे तो बरा होईल."

'नाहीं. आत्तां चल.'

अर्थात् अरुणाला त्याचवेळीं तिच्याबरोबर यावें लागलें. तिच्या घरीं आल्यावर तो तिला म्हणाला, 'हं तुझ्या शिरूला या बिछान्यावर निजीव, आणि तूंही त्याच्याजवळ झोंप.'

'कमलनें चकित होऊन विचारलें, 'मी कशाला झोंपूं? मला काय रोग झाला आहे?'

'तसं कसं? तुलाहि मंत्र घातला पाहिजे. कारण तूं जास्त फिरतेस. तो कांहीं बाहेर जात नाहीं आणि रोगही आणीत नाहीं. शिवाय तूं नेहमीं त्याच्या जवळ रहातेस. तेव्हां मंत्र घातला म्हणजे त्याला केव्हांच आजारी पडावं लागणार नाहीं.'

'खरंच असं केलं म्हणजे तो कधींच आजारी पडणार नाहीं?'

कमलच्या प्रश्नानें आजोबांना हसूं आलें, पण तसें कांहीं चेहऱ्यावर न दाखविण्याबद्दल अरुणनें त्यांना सूचना देऊन स्वतः गंभीरपणानें आणि निश्चयीस्वरानें तिला सांगितलें, 'नाहीं. कधींच आजारी पडणार नाहीं.'

'बरं आहे तर—असें म्हणून कमल आपल्या शिरूच्या शेजारीं बिछान्यावर झोंपली.

'आतां डोळे मीट!' असें सांगून अरुणानें आपल्या सम्मोहशास्त्रानुसार तिच्या देहाला स्पर्श न करतां हस्तसंचलन करूं लागला.

थोड्याच वेळांत कमलला गाढ झोंप लागली.

भयभीत स्वरानें आजोबानीं हांक मारली, 'कमल!'

पण ती उत्तर देणार? तिला गाढ झोंप लागली होती. झोंपेची पूर्णता झाल्याचें निश्चित होतांच अरुणनें हांक मारली 'कमल?'

कमलनें त्या गाढ झोंपेंतच उत्तर दिलें 'काय?'

तिचा स्वर कुठून तरी दूरच्या प्रदेशांतून वायूलहरीवर वाहात येत असल्यासारखा भासत होता. अरुणला समजला कीं, कमल आतां पूर्णपणें सम्मोहित झालेली आहे? त्यानें पुनः विचारलें 'कमल तुझ्या शिरूला आजार झाला आहे?'

'होय!'

'तर मग त्यास स्नान घातलें पाहिजे. अगदीं पाण्यांत बुडी मारली पाहिजे त्यानें.'

'स्नान कुठं करायचं?'

'तुला जें समोर तळं दिसतं आहे त्यांत!'

'हं. दिसलं मला तें तळं.'

'आतां त्याला स्नान घाल.'

या हुकुमाप्रमाणें कमलनें स्नान घालण्याचा अभिनय सुरू केला.

अरुण दृढतापूर्ण स्वरानें हुकुम करूं लागला, 'हं—सोडून दे त्याला. ला[illegible] पोंहता येत आहे. पोहूं लागला?"

'लहान आहे हो! पाण्यांत बुडेल.'

'बुडेल. बुडूं दे. सोडून दे तूं.'

'दिला. सोडला.'

कांचेची बाहुली कमलच्या हातून सुटतांच अरुणनें ती आजोबांकडे दिली आणि लपवून ठेवण्याबद्दल संकेत सुचविलें. नंतर कमलला उद्देशून म्हणाला, 'कमल, तूं कधीं त्याला पोंहायला शिकवलं नाहींस वाटतं!'

'नाहीं.'

'कां?'

'लहान असल्यामुळं बुडून जाईल म्हणून!'

'तर मग म्हणूनच तो [illegible] पाण्यांत बुडाला!'

'अगभाई, आतां कसं होणार!' असें म्हणून स्वप्नांत रडल्याप्रमाणें मोठ्यानें रडूं लागली- आजोबांचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कळवळल्यामुळें ते धाई धाईनें ती बाहुली तिच्या हातांत देणार होते; पण अरुणनें तसें न करण्याबद्दल संकेतानें सुचविलें. नंतर त्यानें कमलला हांक मारून म्हटलें, 'तुझा शिरी बुडाला. गेला. संपला. तो आतां येणार नाहीं.'

'होय. होय. माझा शिरू गेला. संपला!' बोलतां बोलतां ती रडूं लागली.

अरुणनें गंभीर स्वरानें हुकूम केला, 'चुप. तुझ्या त्या शिरूला तूं आतां विसरून जा.'

'कसा विसरूं! मला फारच दुःख होतं. रडूं येतं. माझा आवडता शिरू—' बोलतां ती पुन्हां रडूं लागली.

'हं रडायचं नाहीं. तुला तें शक्य आहे. खात्रीनं तूं आतां रडणार नाहींस. हं. अस्सं. आतां सगळी रात्र तूं शांतपणानं झोंप घे. उद्यां उठल्यावरून श्रीरंगाची अगर शिरूची तुला आठवणहि होणार नाहीं. तो तुझ्या आठवणींतून पार नाहींसा होईल.'

'खरंच!'

'होय मी सांगतों. शिरूची तुला आतां आठवण होणार नाहीं. तो कोणी नव्हता आणि नाहीं.'

कमल अगदीं हळूच म्हणाली, 'होय. नव्हता आणि नाहीं. शिरू म्हणून कोणी नव्हता आणि नाहीं—'

* * *

'ही आतां जागृतावस्थेंत आल्यावर कसं होणार?' आजोबांनीं सचिंतपणानें प्रश्न केला.

अरुण म्हणाला, 'कदाचित् या धक्क्यामुळें वेडहि लागेल!'

अरुण थोडा वेळ विचार करून म्हणाला, 'तर मग आजोबा तिला घेऊन तुम्हीं कुठं तरी तिला दूरच्या प्रदेशांत रमणीय अशा भागांत घेऊन जा. एकदां मन रमलं कीं रमलं. थोडा स्थलत्याग योग्य औषध आहे.'

आजोबांना तें पटलें, आणि हवाफेर करण्याच्या निमित्तानें ते कमलला घेऊन ऐन वसंतऋतूंत पन्हाळ्याला आले. वरूण म्हणाला, 'डॉक्टर म्हणून अरुणहि बरोबर असूं द्या,' अर्थात त्यालाहि त्यांच्याबरोबर जावें लागलें.

—५—

पन्हाळगडासारखी हवेशीर रम्य जागा, पुष्पभरानें तरारलेली वनश्री फुलांच्या सुवासानें उन्मादकारक झालेले कोरडे वारे, उन्हाचे चटके जाणवूं न देणारा आरामदायक गारवा आणि नेत्रांना रंगविणारे आकाशाचे बदलते रंग ही निसर्ग शोभा पाहून कमलचें मन उल्हसित झालें नसेल, तिच्या दुखवलेल्या सर्व भावना नकळत्या नव्या जाणिवेनें तरारल्या नसतील असें तरी कुणी म्हणावें!

तिला घेऊन आजोबा रोज फिरायला जात. चुकल्या चुकल्या सारख्या वाटणाऱ्या तिच्या मनाला निरनिराळ्या नवीन गोष्टी सांगून ते तिची उत्सुकता वाढवीत आणि तिच्या अवघड प्रश्नांचीं उत्तरें देण्याचें काम अरुणावर सोंपवून शांत मनानें ते ऊखाद्या उतरणीवर बसत. गाई म्हशींचे कळप, गुराख्यांची गाणीं, खेडवळांच्या मुलीबाळींच्या तोंडून सहज म्हटलीं जाणारीं कृष्णगीतें आणि दूरवर दिसणाऱ्या जोतिबाच्या डोंगराच्या रांगा पाहातां आणि ऐकतां ऐकतां कमल केव्हां केव्हां भावनावश होऊन आतुरता आणि अतृप्तता यांच्या जाणिवेनें बेहोष होई. एकादी कोवळी वेल जवळ दिसणाऱ्या वृक्षाचा आधार घेण्यासाठीं वरखालीं होतांना दिसली कीं तिला कसेंसेंच होई. कोकिलेच्या पंचस्वरानें तिचीं गात्रें विकल होत आणि पक्ष्यांचीं जोडपीं एकमेकांच्या चोचींनीं एकमेकांशीं हितगुज करीत असलेलीं पाहून ती अपरिचित भावनोद्रेकानें संकोचित होई. अशा वेळीं अरुण तिच्याजवळ असला आणि तो आपणाकडे पाहात आहे हें तिला दिसलें तर ती एकदम खालीं मान घाली. त्याला अरे तुरे म्हणण्याची तिची भाषा अलीकडे अगदीं बंद झाली होती. ती त्याला नांव घेऊनहि हांक मारीत नसे. आपली प्रश्न विचारण्याची उत्सुकता आजोबांमार्फत व्यक्त करण्याकडे तिची प्रवृत्ति वाढत होती. आजोबा मनांतल्या मनांत हंसत आणि तिला म्हणत, 'अग, तुझ्या त्या माळ्याला विचार. त्याला सगळ्यांच्या भाषा कळतात आणि तो फुलांची— पक्ष्यांचीं रहस्यैंहि जाणतो. तो तुला चांगलं समजाऊन देईल.'

यावेळीं अरुण तेथें असला तर ती हळूच लाजून त्याच्याकडे पाही, आणि एका गालांत हंसून आजोबांना म्हणे, 'कांहीं तरीच!'

तिचा तो भाव, भाषा आणि आवाजांतील फरक पाहून अरुणाला वाटे आपल्या श्रमांचें सार्थक झालें! सातासमुद्रापलीकडे जाऊन शिकलेल्या विद्येचें चीज झालें!

आजोबा म्हणत, 'अरुण, तुझ्यामुळेंच माझी कमल माणसांत येत आहे. आतां तूंच तिचा आधार! माझं काय दोन दिवसांचा सोबती!'

यावर दोघेंही म्हणत 'असं हो काय म्हणतां, आजोबा!'

पण अरुणच्या आवाजांत आवाज मिळवून आपण बोललों हें ध्यानांत येतांच कमल आरक्त होई. आणि तो आरक्तपणा पाहून नव्या कुंडींत लावलेल्या गुलाबाला पहिलेंच झुबकेदार फूल आल्या इतका अरुणला आनंद वाटे.

अशाच एका सायंकाळीं तीं दोघे पश्चिमेकडच्या उतरणीवर बसलीं असतां, एक तरुण मुलगी गाणें गात गात चढत असतांना तिला दिसली. तिच्या गाण्याकडे तिचें लक्ष वेधलें. ती मुलगी गात होती:—

कां न अजुनि आला! कान्हा!!
दिन मावळला चंद्र उगवला
वाट पहातां जीवहि थकला!
काय करूं नशिबाला! कान्हा!
प्राण तळमळे जीव हळहळे
डोळे भरले हृदयहि उसळे
भाव कळेल कुणाला! कान्हा.
बोलावें परि बोल न उमटे,
थरथरलेला ऊरहि दाटे
प्रेम न बोलवि बोला! कान्हा!

गाणे ऐकतां ऐकतां कमलनें न कळत दीर्घ सुस्कारा सोडला आणि डोळेही पुसले.

याचवेळीं अरुण तिच्याजवळ येऊन अत्यंत सहानुभूतीच्या स्वरानें म्हणाला, 'कमल, काय बरं वाटतं तुला?'

या प्रश्नानें कमल दचकली नाहीं, भ्याली नाहीं, हंसली नाहीं आणि रुसलीही नाहीं. उलट तिनें सहेतुक नजरेनें अरुणकडे पाहिलें. अरुण मनकवडा होता, त्याला मानसशास्त्र अवगत होतें. त्यानें हळूच तिचा हात आपल्या हातांत घेतला आणि म्हटलें, "कृष्णप्रेमानें व्याकूळ झालेली राधा अशीच रानोमाळ फिरत होती.'

'मग तिला कृष्ण भेटला!' कमलनें किंचित हंसून विचारलें.

'भेटलाच. कां नाहीं भेटणार! अंतःकरणाची हांक ऐकूं गेली नाहीं तर प्रेम कसलं! राधेला तिचा प्रियकर भेटला, तिच्या आवडत्या खेळगड्यानें जवळ घेऊन तिला समजविलें आणि—'

अरुण स्तब्ध राहून कमलच्या आरक्त होत चाललेल्या चेहेऱ्याकडे टक लावून पहात राहिला.

तिची दृष्टी यावेळीं अवनत झाली होती, ओठ थरथर कांपत होते, वारंवार येणाऱ्या निश्वासांनीं तिचा ऊर वरखालीं होत होता आणि अरुणच्या हातांत असलेला तिचा हात विवश झाल्यामुळें हेलावणाऱ्या या देहाचा भार अरुणला आपणाला सहन करावा लागणार असें वाटूं लागलें.

'प्रेम न बोलवि बोला—कान्हा— का न अजुनि आला—'

ही एकच ओळ या वेळीं दुरून कुठून तरी ऐकूं येत होती.

कमल अधोमुख झाली. हळूं हळूं तिची मान अरुणाच्या बाजूला झुकली आणि थोड्याच वेळांत तिच्या कुंतलावृत मस्तकानें अरुणाच्या विशाल हृदयाचा आश्रय घेतला. अरुण कृतार्थ झाला. तिचे झर झर वाहाणारे अश्रू त्याला सुस्नात करीत होते, पण ते दुःखाचे अश्रु नव्हत, हें तिच्या गाढ आलिंगनानें व्यक्त होत होतें. अरुणही रसिक होता. त्यानें तिच्या आरक्त कपोलांचें चुंबन केव्हां घेतलें आणि हृदयाशीं केव्हां धरलें हें त्याचें त्यालाच कळलें नाहीं.

ती कोजागिरी पौर्णिमेची रात्र होती. पश्चिमेचा आरक्तपणा लुप्त होतो न होतो तोंच पूर्वेच्या सुप्रकाशित दरवाजांतून पूर्ण चंद्राचा उदय झाला. ती मीलन पौर्णिमा ठरली, आणि सगळें आकाश विमलचंद्रिकेनें स्निग्धोज्वल झालेलें दिसूं लागलें. दोघांची यावेळीं प्रेमसमाधी लागलेली होती.

आजोबा थोड्याच अंतरावरून हे नयनमनोहर दृश्य पाहून स्वतःशींच समाधानानें हंसत होते. त्या दोघांना हांक मारून या प्रेमसमाधींतून जागृत करकरण्याची त्यांनाही छाती होईना. शेवटीं त्यांनीं पुष्कळ परिश्रमानीं जमविलेली ओंजळभर सुवासिक फुलें त्या दोघांच्या अंगावर टाकलीं. त्यावरोबर प्रथम अरुणानें आणि नंतर कमलनें आजोबांना पाहिलें. दोघेंही लाजलीं आणि एकदम उभीं राहिलीं.

यावेळीं म्हाताऱ्यानें दिलेला आशीर्वाद त्यांना स्वर्गीय संगीताप्रमाणें वाटला नसेल का!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बापरे !

लेखकः—पुरुषोत्तम भास्कर भो
नागपूर.

तो एक नवमतवादी होता. आपल्या प्रेमिकेचें प्रेम कांक्ष करण्यासाठीं त्यानें तिच्या हातचे फटकेहि खाल्ले. पण,—

पऽऽऽक् ! तिनें मोजावयास सुरवात केली.

तो एक नवमतवादी होता. तो एक नवमतवादी होता येवढें सांगितलें म्हणजे तो पुष्कळच गोष्टी होता व फारच थोड्या गोष्टी नव्हता, हें सहज ध्यानांत येईल. उदाहरणार्थ तो नंबर एकचा लुच्चा होता. आणि बायकांच्या बाबतींत मुळींच अनुदार नव्हता. येवढेंच काय पण एरवीं इतका सोदा असणारा हा माणूस बायकांच्या बाबतींत पक्का बेवकूफ असे !

तो अभ्यासानें नवमतवादी बनला नव्हता, तर तो जन्मतःच नवमतवादी होता. मुळाक्षरें गिरवून ढोबळ्या अक्षरांत वहीवर नांव लिहिण्याची वेळ येतांच त्यानें क्रांति करून टाकली. आपल्या पाहिल्या सहीसारशीं प्रथम त्यानें आपल्या बापाच्या नांवाला गचांडी मारली व व्यवहारी अपूर्णांकांचें ज्ञान होण्यापूर्वीच दोन त्रितिआंशाचा व्यवहार प्रत्यक्ष अमलांत आणला. उपभोगासाठीं शरीराची गरज नसती तर जुन्याचा संबंध तोडण्यासाठीं त्यानें केव्हांच जीव दिला असता; तरी शॅम्पेनची तहान बेवड्यावर भागवण्यासाठीं त्यानें बापाचें नांव बाद करून टाकलेंच ! असा बापाला बाप न म्हणणारा जळजळीत नवमतवादी होता तो !

पण दैवाची गति मोठी गहन असते. काळाच्या गतीबरोबर दुडकी चालीनें दौडणारा नवमतवादी जरी तो झाला तरी कर्मगतीसमोर त्याला हात टेकावे लागले. नाहींतर ज्या बापाच्या नांवावर त्याला अकालींच पाणी सोडावें लागलें, त्याच्याच नांवानें टाहो फोडण्याची वेळ त्याच्यावर कशाला आली असती ! वास्तविक त्याचें शब्दज्ञान कांहीं अगदींच तोकडें नव्हतें. 'क्रांति', 'प्रतिक्रांति', 'नग्नवाद', ' बुर्झ्वा ' ' Exploitation ' वगैरे कित्येक छान छान शब्द तो आजकाल शिकला होता. बुरसटलेल्या भूतकाळांत सुरवातीचे जे कांहीं शब्द घोटल्यामुळें त्याच्या जिव्हेला कलंक लागला होता, तो नवनीतीच्या पठणानें त्यानें एव्हांपर्यंत साफ धुऊन काढला होता; आणि तरीहि त्या बिकट प्रसंगीं, ' फ्राईड ' ' कर्वे ' ' मार्क्स ' ह्या सर्व लोकांनीं त्याला दगा दिला आणि तेवढाच तो एक नादान शब्द त्याच्या जिभेच्या गोफणींतून अचानक निसटला व अर्थातच वातावरणांत विलीन झाला !

आणखीन् तो सगळा चमत्कारिक प्रकार व्हायला कारण म्हणजे त्याचाच बायकांच्या बाबतींतला आटोकाट बेवकूफपणा !

× × ×

तसें म्हटलें तर त्याला फारसा दोष देण्यांतही अर्थ नाहीं. ह्या खेपेस त्याची परीक्षा बरीच चुकली येवढें मात्र खरें. नाहीं तर अभ्यास किंवा अनुभव ह्या दृष्टीनें त्याच्यांत कांहीं कमतरता होती, असें नव्हे. पण एकाच विषयाच्या अभ्यासानें इतर विषयांचें भानच माणसाला उरत नाहीं. असेंच कांहीसें त्याचें झालें. नवमतवादी नंदिनीचा सराव त्याला इतका झाला कीं, दुसऱ्याही तऱ्हेच्या कांहीं स्त्रिया असूं शकतात ही गोष्टच त्याच्या सपै स्मरणांतून गेली. आणि ह्याच भ्रमांत आपली नवी मोहीम त्यानें धूमधडाक्यानें सुरूं केली.

जिथें जिथें ती जाईल तिथें तिथें हा आपला आजकाल हजर राहूं लागला. बागेंत–शाळेच्या रस्त्यावर–थिएटरांत ! देवावर विश्वास नव्हता तरी तिथेंसुद्धां हा तिच्या मागोमाग फेऱ्या घालून पुण्य जोडूं लागला. सावली, निदान रात्रीं तरी माणसाचा पिच्छा सोडते. पण हा गब्रू रात्रींसुद्धां तिच्या घरासमोरील पानपट्टीच्या दुकानावर विड्या फुंकत बसे !

ही गोष्ट अर्थातच तिच्याही लक्ष रच लक्षांत आली. प्रथम तिनें दुर्ल केलें. त्यासरशीं तिच्या मौनाचा ह्या अमर आशेनें योग्य अर्थ लावला त्याच्या उत्साहाला नवाच बहर आ मग मात्र त्याची तिला चीड आली लवकरच तिचा संताप अगदीं अना झाला.

एकदां हा असाच तिच्या घरास पहारा देत असतां ती सज्जांत आली तिरस्कारानें त्याच्याकडे बघून थुंकली.

ह्या तिच्या वर्तनाचा पुन्हा त्यानें चटकन सोईस्कर असा अर्थ लाऊन टाकला. आपल्या मर्दानी सौंदर्याकडे बघून ह्या पोरीच्या तोंडाला फार पा सुटलें आहे, ह्या विषयीं त्याला शंका उरली नाहीं. आतां मात्र प्रेमाला ऐसपैस जागा करून देण्यासाठीं उरल्यासुरल्या अक्कलेनें त्याची रजा घेतली.

तिचा चेहरा संतापानें लाल झाला, तरी सोव्हियट प्रेमाची तांबडी झेंडी फडकल्याचा त्याला भास होऊं लागला. ती चिडून पाय आपटीत गेली तर ह्याला ती एक प्रणयाची ' परेड ' आहे असें वा लागलें. तिनें रागाऊन भुवया वांकड्या केल्या, तर मोहीव्रतीच्या अक्षर भात्याचा हा शरवर्षाव आहे असें समजून हा शेफारूं लागला. अखेर ती उपहासानें त्याच्याकडे बघून हंसली, तेव्हां ह्याला खूपच गुदगुदल्या झाल्या व ह्यानेंही समाधानानें दात विचकले !

नंतर मग तो फारच निकरानें तिच्या मागें लागला. केव्हां तरी एकटें गांठून आपलें हृदय तिला उघडें करून दाख-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वायचेंच असा चिमाजीआप्पासारखा पक्का निर्धार त्यानें करून टाकला. अशी संधि लवकरच त्याला मिळाली किंवा त्यानें ती उत्पन्न केली म्हटल्यास जास्त शोभेल.

एक दिवस छातीशीं पुस्तकांची चवड धरून ती शाळेंतून घरीं जात होती आणि तोही नित्यक्रमाप्रमाणें तिच्या मार्गावर घोंटाळत होता.

पूर्व आणि पश्चिम ह्या दोघींनाही फसवून (पुरुषांची जात,) सूर्य नुकतांच गायब झाला होता. त्यामुळें पश्चिमेवर रशियन रंग चढला होता; पण पूर्व मात्र काळवंडत चालली होती. (अखेर पूर्वच !)

अशा वेळीं तो प्रकार झाला. तो नक्की कसा झाला, काय झाला हें तिला अजूनही सांगतां येत नाहीं. कदाचित् जवळूनच झपझप जाणाऱ्या भारेवालीचा धक्का तिला लागला असेल, पण तिचा संशय मात्र त्याच्यावरच आहे.

तें कसेंही असलें तरी तिचा झोंक जाऊन तिचीं सगळीं पुस्तकें रस्त्यावर फेंकली गेली येवढें मात्र खरें !

एखाद्या " अर्दली " सारखा तो तिच्या मागेंच होता. असला सुंदर मोहोका तो थोडाच वाया जाऊं द्याय-ला ! स्टॅलीनची टोपी कुणी उडवली असती, तरी जितक्या तत्परतेनें उचला-यला तो धांवला नसता तितक्या फुता-र्तीनें आतां तो पुढें झाला व रस्त्यावरचें शेण सफाईनें टिपणाऱ्या महारणीप्रमाणें तिची पुस्तकें गोळा करूं लागला.

हा सर्व प्रकार डोळ्याचें पातें लवतें न लवते तोंच आटोपला नाहीं. कारण मधूनच एखाद्या राक्षसणीप्रमाणें धांवत येणाऱ्या मोटारीकडे बघून त्याला बाजू-ला सरावें लागे व त्याच्या अशा बैठ्या कुगाड्या चालू असतां डोळ्यांची पाती कित्येकदां लावून जाण्यास वाव होतीं.

आपला जीव बचाऊन शक्य ती प्रेमसेवा तो बजावत होता. कारण जीव-च गल्यावर प्रेम कोण करील आणि सेवा तरी कोण करील ?

येवढ्या अवकाशांत ती आतां चांग-लीच सावरली होती. मुंबईच्या फुटपाथ-वरून जन्मांत कधीं न चालल्यामुळें ह्या आयुष्याला पहिला धक्का तिला



असेच श्रम मी मोठ्या आनंदानें करीन

फारच जाणवला. पण बघा, पुस्तकें बग-लेंत मारल्यावर आपली विणकामाची पिशवी हस्तगत करण्याच्या विचारांत तो आहे हें बघतांच तिचें मस्तक फिरलें व ती जवळ जवळ ओरडली—

" राहूं द्या ! तुम्ही नको येवढी तकलीफ घ्यायला ! "

आपला हुतूतू क्षणभर थांबवून त्यानें मागें वळून बघितलें. त्याला एक नवाच शोध लागला होता. तिच्या तिखट सौंदर्याप्रमाणें तिचा आवाजही तिखट गोड आहे हें पाहून तो अगदींच बेभान झाला व आपल्या सदऱ्यानें तिचीं पुस्तकें पुसूं लागला.

ती जास्तच संतापून म्हणाली, " सांगतें ना, तुम्ही येवढे श्रम घेऊं नका म्हणून ! "

तिच्या बोलण्याचा सूर लक्षांत येण्या-इतका तो शुद्धीवर नव्हता हें त्याच्या उत्तरावरून उघड झालें. कारण व्हिस्कीचे कित्येक पेग जरी तो वीर लीलेनें पचवीत असला, तरी इष्काची शराब त्याला फार लवकर " टेर " बनवीत असे. तो घोगऱ्या आवाजांत म्हणाला—

" श्रम ? Not at all ! जन्मभर असेच श्रम मी मोठ्या आनंदानें करीन. खरेंच, मी तुमचा आजन्म सेवक होऊं शकेन काय ? "

ती थक्क होऊन त्याच्याकडे बघतच राहिली. आजन्म सेवाच करायची असेल तर ह्या " सर्व्हंट्स् ऑफ इंडिया " सोसायटीकडे कां जात नाहीं, असा तिला प्रश्न पडला. पुष्कळसे पुरुष वेरड अस-तात हें तिला ठाऊक होतें. पण, निगर-गट्टपणाचा हा नवमतवादी नमुना तिला अगदींच नवीन होता.

ती गप्प बसलेली पाहून आपल्या जीवाचें " बैन " सांगायला त्याला आणखी जोर चढला. एखाद्या अमेरिकन टॉकींतल्या नायकासारखा कांपरा आवाज काढून तो सारखा बोलत सुटला. तो काय बोलला तें सगळें इथें सांगण्याची अव-श्यकता नाहीं. कारण प्रत्येकाला तें ठाऊक आहे.

" निर्लज्ज ! " निराळ्याच कारणा-साठीं ती कांपऱ्या आवाजांत एकदम उद्गारली.

" प्रेमाला लाज नसते. निष्प्रेम होण्यापेक्षां मी निष्प्राण होणें पसंत करतों. तो पुन्हां चन्हाट वळूं लागला. "

" माणुसकी गहाण टाकलीत कां कुठें नेऊन ! "

" माणुसकीच काय मी स्वतः तुम-च्याकडे गहाण पडायला तयार आहें. वास्तविक ही भांडवली भाषा वापरतांना मला वाईट वाटतें. पण, तुमच्या पुढें मी सर्व कांहीं रद्द समजतों. फक्त मला प्रेमाचें कर्ज द्या ! "

" मला काय ? समजून तुम्हीं हें बोलतां आहांत ? "

" काय समजून ! तुम्हीं माझ्या मनाची मलका आहांत ! तुम्हीं माझ्या प्रेमाचें पेट्रोग्राड आहांत ! तुम्ही सौंद-र्याच्या कॅपिटॅलिस्ट आहांत ! ह्या 'प्रोले'-च्या हृदयानें तुमच्यामुळें नंबर २ ची क्रांति अनुभविली आहे. मी खाजगी मालमत्तेच्या विरुद्ध आहें, तरी तुमची मालमत्ता व्हावयास माझी हरकत नाहीं !

" नीच ! "

" अहा ! तुमची नजर कोयत्या-सारखी आहे, येवढेंच नव्हे तर तुमची जीभही हातोड्यासारखी आहे ! "

" चाबकाखालीं झोडपून काढावें तुमच्या सारख्या हलकटांना ! "

" येवढेंच—ना मोठ्या खुषीनें ! चाब-काखालीं झोडपा, चिंचेचे फोक उडवा, राखेचे तोबरे द्या ! मी तरी दुसरें काय म्हणतों ! तुमची जुलमी साम्राज्यशाही खास ' अनार्की ' च्याही तोंडांत मारील. जन्मभर तुमचाच मार खायला मिळावा, येवढीच माझी इच्छा आहे ! "

त्याचीं पाजी भाषणें ऐकून तिचा नुसता चडफडाट झाला होता, पण त्याचें शेवटचें वाक्य ऐकतांच तिच्या डोळ्यांत निराळीच चमक आली. तिचा संताप मावळला व एका विशिष्ट तऱ्हेनें तिनें त्याच्याकडे बघितलें. ज्या पुरुषाकडे बायका अशा तऱ्हेनें बघतात, त्यांचें दुर्दैव ओढवलें म्हणून खुशाल समजावें. ती नजर रागाची नसते. प्रेमाची नसते. खुल्या तिरस्काराची नसते. अतिशय थंड अशी ती नजर असते. त्या नजरेचा अर्थ त्याला कळला नाहीं. प्रत्येक नवमत-वाद्यास त्या नजरेचा अर्थ फार उशीरां कळतो.

' फटक्यांचा करभार घेऊन हें कडक दैवत प्रसन्न होणार असेल तर पत्नुरीचा पहिला हप्ता मी याक्षणीं चुकवीन ! '

' खरेंच ?, किंचित् हंसून ती म्हणाली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'अगदीं खरें. गॉर्कीच्या प्रियकरणीच्या पाया शपथ सांगतों !'

'असं—,

'पण मग मला चाबूक मारल्यावर खरंच तुम्हीं माझ्याशीं लग्न कराल ?'

'होय.' ती पुन्हां हंसली.

'अहाहा ! मग आतांच मला मारा: कारण तुमचा विरह मला सैबेरियाच्या वनवासापेक्षांही असह्य वाटतो. !'

'बघा,—'

'हो, हो, बघितलं; ध्येयाखातर फटकेच काय पण वाटेल तें खायला नवमतवादी डरत नाहीं. पंचवीस–पन्नास–पांचशें–किती कोरडे खाल्ले म्हणजे माझें ध्येय मला साध्य होईल ?'

'पांचशें ! मग लग्नाआधींच सती जावें लागेल मला.'

'मुळींच नाहीं. त्या राक्षसी रूढीच्या मी विरुद्ध आहें. मी मेल्यावरच काय पण माझ्या जिवंतपणींसुद्धां तुम्हीं वाऱ्यासारख्या मोकळ्या रहाल !"

'बरं मग पंचवीसच "

'O. K. तुम्हीं मला पंचवीस फटके मारायचे–'

'हो.'

'आणि मग तुम्हीं माझ्याशीं लग्न लावायचं–'

'हो.'

'रजिस्टर, सनातनी कीं कसं तें मग पाहूं. पण, चाबूक हाच आपला भटजी, साक्षीदार सर्व कांहीं—'

'हं—'

'पण, अरेरे ! ही अट नाहींच कां बदलतां येणार तुम्हांला ! "

'कां बरं ! " ती विथरून म्हणाली.

'कारण कीं मला मारतांना तुमच्या कोमल हातांना किती कष्ट होतील बरें !'

'त्याची नका काळजी करूं तुम्हीं. दादा विकेटकीपींग करतांना घालतो, ते हातमोजे घालून मारीन मी तुम्हांला.'

"बस्–!" मोठीच काळजी दूर झाल्यासारखा उसासा टाकून तो म्हणाला," कधीं येऊं मग मी तुमच्याकडे ! "

"उद्या सायंकाळीं तुमच्या त्या पानपट्टीच्या दुकानावरून शीळ घाला. म्हणजे मी दार उघडीन. "

"तारेच्या कांब्यांनीं गुंफलेल्या चाबकानें मला मारा ! प्रेमाची पुरतीच परीक्षा होऊं द्या ! "

"नाहीं !"

"मग सह्यापदरी वादीच्या चाबकानें तरी मारा."

"नाहीं."

"टांगेवाल्यांचा सुतळीचा चाबूक मला वापरूं नका हं ! त्यांच्यांत कांहींच अर्थ नसतो."

"नाहीं."

"मग कोणाच्या चाबकानें मारणार तर तुम्हीं ! चाबूक मीं आणून देऊं कां ! "

"त्याचें पाहीन मी. वाटल्यास आयाडीन आणा थोडेंसें."

"हूं ! साऱ्या पंचवीस फटक्यांसाठीं ! "

"बस्स !"

"हात्तिच्या ! तुमच्या एकाच प्रेमस्पर्शानें माझ्या साऱ्या जखमा भरून मी टंच होईन ! सस्ता सौदा ! ट्रा–ला ला–" जरासें हंसून तिनें त्याला निरोप दिला व वारंवार खालीं पडणारीं कॉलरचीं दोन्ही टोकें दातांत धरून तो तेथून निघाला.

* * *

दुसऱ्या दिवशीं फक्कडपैकीं पोषाख करून तो खरोखरच तिच्याकडे गेला. जसा कांहीं लग्नाला सजलेला नवरदेव ! तीही "कोब्रा" नागासारखा लुकलुकीत चाबूक घेऊन त्याची वाट पहात होती. ती फारच सुंदर दिसत होती त्यामुळें. लडिवाळपणाणें भाषण करावयास त्यानें आरंभ केला. ह्यावेळीं त्याचा एकही शब्द ऐकण्याच्या लहरींत ती नव्हती. कुठल्याही प्रेयसीलाच शोभेल असल्या आवाजांत दरडावून तिनें त्याला गप्प बसवलें व चाबकाच्या फडफडाटासरशीं पट्ठ्याला रंगणावर धरणाऱ्या रिंगमास्तरच्या आवाजांत ती म्हणाली.

"हं पुढें या पाहू !"

"तुमच्या हातांतला हंटर तुमच्या शेपट्याशीं स्पर्धा करत आहे—"

"पुढें या—"

"तुम्हीं आज डायना ह्या शिकारी देवतेसारख्या सुंदर दिसत आहांत—"

"पुढें या मुकाट्यानें–" तिचा सूर आणखी चढला.

"प्रेमाच्या जंगलांत शिकार व शिकारी दोघेही विजयी होतात—"

"फाड–फट्—" तळपळणाऱ्या विजलीप्रमाणें चाबकाची वादी हवेंत फिरली व तो एकदम गप्प झाला.

"एक "–तिनें मोजावयास सुरवात केली. ह्या सुंदर मुलीच्या मनगटांत इतकी शक्ती असेल अशी त्याची कल्पना नव्हती. तोंडें वेडीवाकडीं करीत त्यानें तो फटका सहन केला. सगळा मार आपण हंसत हंसत फुलाच्या छडीसारखा झेलू व शेवटीं तिचा तो मारका हात धरून चुंबन घेऊं, असें त्याचें मनोराज्य होतें. पण आपल्या मनमुराद्यांपैकीं हंसत राहण्याचा भाग अव्यवहार्य आहे, अशी त्याची लवकरच खात्री झाली.

तोंडानें आंकडे मोजीत ती त्याला अगदीं निर्दयपणें झोडपत सुटली. दर फटक्यागणिक नवमतवाद्यांच्या आद्य गुरूंचीं नांवें त्याला आठवूं लागली. तो "समाजस्वास्थाचा" भोक्ता असला तरी अंगावर कपडे असल्याबद्दल त्याला आनंदच वाटत होता,

"दहा–अकरा–बारा–" ती मोजीत होती. पुढचा फटका मागच्या फटकाऱ्याला जोरकसपणांत मागें टाकीत असे, त्याच्या रेशमी कोटाच्या चिंधड्या उडाल्या होत्या. तोंडावरून घामाच्या अखंडधारा सुरूं झाल्यामुळें त्याच्या चेहेऱ्यावरचे सर्व "क्रीम" हळूं हळूं धुऊन निघत होतें. प्रत्येक फटक्यासरशीं आपला तिच्यावरील हक्क वाढत आहे व करार पुरा झाला कीं, ह्या माराचा वचपा काढणें शक्य आहे ह्याच आशेनें तो त्या राक्षसी वेदना सहन करीत होता.

"एकोणीऽस–वीस–एकवीऽऽस–" ती शांतपणें हेल काढून मोजत होती.

"ओय् ह्या ! वरच लागत आहे हो !"

तो मधेंच विव्हळला.

"मग ! तुम्हांला गुदगुल्या व्हाव्यात म्हणून कां मारतें आहें मी ! प्रेमाचें शिलालेख कोरतांना इतका त्रास व्हायचाच !"

पुन्हा नव्या दमानें चाबूक चालवावयास तिनें आरंभ केला.

"एकवीस–वावीस—तेवीस–"

ती थांबली व जोरदार रामटे[...] मारून अभिमानानें चैंडूंकडे बघणा[...] खेळाडूप्रमाणें त्याच्या रंगीत पाठी[...] बघूं लागली.

"लवकर ! मला आतां सहन [...] नाहीं—" तो रडक्या स्वरांत म्हणा[...]

"काय मार !"

"नाहीं. हां प्रत्यक्ष विरह !"

तिनें ओंठ चावला व उंच चा[...] उचलून ती म्हणाली—" घ्या–चो[...] हं, काढा आतां आयोडिनची वाटी–

"पण—पण अजून एक फ[...] राहिला आहे ना–" तो धापा ट[...] म्हणाला.

"पुरे ! फक्त चोवीसच फटके [...] तुम्हांला मारणार. पंचवीसाव्या फटक्या[...] मी तुम्हाला आहेर करतें."

"तर मग आतां माझ्या जखमा[...] हक्कानें तुम्हीं– " पण येथेंच उस[...] तिनें त्याला चूप केलें.

"हक्क,: कसला आला आहे हक्क[...]"

"आपला करार—"

"होय, पंचवीस फटके मारल्या[...] मी तुमच्याशीं लग्न करायचें अ[...] आपला करार होता. पण मी तुम्हा[...] फक्त चोवीसच फटके मारले आहे[...] पंचवीसावा फटका मारण्याची म[...] मर्जी लागत नाहीं !"

तो दुर्दैवी नवमतवादी "आ[...] वासून मूर्खासारखा तिच्याकडे बघ[...] राहिला.

'बघतां काय रामोशासारखे ! [...] राच्या अटी पुऱ्या झालेल्या नाहींत. [...] तुमचं कांहीं एक लागत नाहीं. हवे [...] माझे साक्षीदार आहेत—'

तिनें हळूंच दाराजवळचा प[...] सारून हांक मारली 'दादाऽ—तात्या[...]'

लगेच दोन धटिंगण हातांत हॉ[...] स्टिक्स् घेऊन तेथें धांवले.

त्यांच्या नुसत्या दर्शनानें आमच्या न[...] मतवादी नायकाची भंबेरी उडाली [...] आपल्या पितृदेवाचा धावा करून [...] ओरडला—'बाऽऽरे !'

तांतडीनें त्यानें दरवाजाकडे [...] ठोकली. पण जातां जातां त्याच्या [...] डीवर हॉकीस्टिकचा रपाटा बसला.

त्याला हवा असलेला पंचवीस[...] फटका अशा रीतीनें मिळतांच तो [...] करूं लागला. 'बापरे—बाऽऽपरे[...] बाऽऽपरे !'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एका चित्राच्या दोन बाजू

लेखक:—
श्री. रा. ज. जोशी,

● प्रत्येक जिवंत माणसाच्या आयुष्यांत सवंध आयुःप्रवाहाला विशिष्ट वळण देणारा, सुख-संवेदनानें जीव उडून टाकणारा किंवा दुःखस्मृतीनें हृदय पिळवटून टिपें गाळायला लावणारा प्रसंग येतो. ●

संपादक "सत्यकथा" यांस—

तुमच्या मासिकाकरितां मी कांहीं लिहावें असें तुम्ही सांगून कितीतरी दिवस झाले. परंतु काय लिहावें हा निश्चय होईना.

'सत्यकथा' हा शब्द मनांत येतांच माझेपुढें कितीक सत्यकथांचा चित्रपट उभा राहिला. ऐकलेल्या, पाहिलेल्या, मला आलेल्या, कित्येक खासगी पत्रांतून आपण-हून स्पष्ट झालेल्या किंवा कितीकांनीं आपलें मन खुलें करून सांगितलेल्या! मानवी जीवितांच्या विविध प्रांतांवर, त्यांनीं प्रकाश पडेल!! कादंबऱ्यांना लाजविणाऱ्या घटना मानवी आयुष्यांत असतात असें तो चित्रपट पाहून मला वाटलें! 'त्यांतलीच एक सांगूं का?' असं म्हणून मी लेखणी घेतली; व लिहूं लागलों. पण मनांत विचार आला हे खरेखुरे अनुभव जसेच्या तसे ऐकण्याचा अगर वाचण्याचा मनाचा मोठेपणा आमच्या महाराष्ट्रीय वाचकांत आहे का?

मग दुसऱ्यांनीं मोठ्या आत्मविश्वासांनीं सांगितलेलीं हृद्गतें मला उघड्यावर ठेवण्याचा काय अधिकार?

दुसरें असें कीं वाचकवर्गाला एक संवयच लागून गेली आहे कीं 'कथा'-'कादंबरी' म्हटली कीं, त्यांत प्रेमाची गुलगुल, स्त्रीजातीच्या उद्धाराच्या गप्पा व व त्यांत लिहिलें तें नवमतवादाच्या चौकटींत बसलें पाहिजे! कथात्मक वाङ्मयाचें जणुं हें तंत्रच होऊन बसलें आहे अलिकडे!

या रूढ मनोवृत्तीकडे पाहिलें कीं, माझ्या 'सत्यकथां'तून या सर्व छटा सांपडतील कीं नाहीं अशी शंका वाटते. माझी आपली प्रामाणिक समजूत आहे कीं, ज्यांचें आयुष्य 'जिवंत' म्हणतां येईल; त्या प्रत्येक जिवंत माणसाच्या आयुष्यांत सबंध आयुःप्रवाहाला विशिष्ट वळण देणारा, सुखसंवेदनानीं जीव उलून टाकणारा किंवा दुःखस्मृतीनें हृदय पिळवटून टिपें गाळायला लावणारा, असा भावनांना हलवून सोडणारा प्रसंग येतोच येतो; आणि याच प्रसंगांतूनच मला वाटतें, जीवितांतील खरींखुरीं सुखदुःखें, झगडा आणि विजय; प्रेम व तिटकार. इत्यादिकांचें चित्रण प्रामाणिकपणें होत असतें.

हा विचार मला आला मात्र; अन् वाटलें, मलाहि नाहीं का माझ्या आयुष्यांतील घटनांतून असं एकादं टिपण करतां येणार? दुसऱ्यांनीं सांगितलेल्या कथा अगर आपणांजवळ उघड केलेलीं हृद्गतें खरीं आहेतच; पण त्याहिपेक्षां स्वतःच्या मनोभावना जास्त खऱ्या नव्हत काय? पण आपण आपल्या आयुष्याचें-तरी अदूषित दृष्टीनें परीक्षण करूं शकूं काय?

नाहीं—कदाचित् नाहीं!

पण, असं जरी असलं तरी एकाच प्रसंगाचें दुसऱ्या व्यक्तीच्या दृष्टीनें चित्रण झालें तर त्या घटनेचें संपूर्ण व खरेंखुरें परीक्षण कां नाहीं होणार!

माझें अन् माझ्या विमलचें आयुष्य ज्या घटनेनें एकत्रित झालें त्या घटनेबाबत दोघांच्या कैफियती एकत्र केल्या तर!

आम्ही दोघांनीं त्याप्रमाणें आपापल्या कैफियती लिहून काढल्या, व एकमेकांना वाचायला दिल्या; आणि हीच एक उत्तम सत्यकथा होईल असं वाटून मी ती आपणांकडे पाठवीत आहें.

* * *

तसं म्हटलं तर माझी अन् विमलची ओळख नव्हती. ती आमच्या समोरच्या बंगल्यांत राहात असे; इंटर-सायन्सपर्यंत मी कॉलेजांत जात असतां तिची माझी गाडी एकच असल्यानें आम्ही एकाच गाडीनें 'खार'हून निघत असूं इतकेंच!

डोळ्यांनीं एकमेकांना पाहिलेलें, ओळखलेलें इतकेंच!

तारुण्य! काय वय असतें तें!! एकमेकांची ओखळ नसतांना मी तिच्याबद्दल इत्थंभूत माहिती काढली होती. तशी ती सुन्दर होती असं मुळींच नव्हे, किंवा पोरींपाठीमागें धावणारा म्हणून कॉलेजांत जो एक विद्यार्थी वर्ग असतो त्यांतही माझी गणना कधींच झालेली नव्हती. तरीपण, कित्येक मुलींप्रमाणें तिचीहि माहिती मी मिळविली होती एवढें मात्र खरें.

दोघेंहि आम्ही ठराविक वेळीं स्टेशनवर येत असूं, नकळततर्णे पण न चुकतां एकमेकांकडे पाहात असूं. ती दादरला उतरून चालूं लागे; व आमची गाडी पुढें होई.

दोन वर्षें असा हा क्रम चालू होता; व नंतर मीच पुण्याला एंजिनियरिंग कॉलेजमध्यें गेल्यानें तो थांबला इतकेंच. रजेमध्यें मी खारला यायचा पण कालाच्या धुक्याआड ती इतकी दृष्टिआड झाली कीं, पूर्वीप्रमाणें ती भेटो अगर न भेटो माझे डोळे आपोआप विशिष्ट वेळीं व विशिष्ट ठिकाणीं वळत असें होत नसे. कधींमधीं ती रस्त्यांतून दिसे; तेव्हां आम्ही एकमेकांकडे पहात असूं. पण, पूर्वीइतकाच त्यांत अहेतुकपणा!

अशीं दोनचार वर्षें गेलीं. नाताळच्या सुट्टींत खारला आलों होतों. या वेळेस मात्र जरा निराळेंच वाटलें.

विमलचें माझ्या प्रत्येक हालचालीवर विशेष लक्ष असतें. असें मला आढळून आलें. मी जितक्या वेळां तिला दिसेन, तितक्या वेळां मला पाहावें असें कांहींतरी तिला वाटत असावें, असा संशय येण्याइतकी ती आपल्या खोलीच्या सज्जांत उभी असलेली मला दिसे.

यामुळें म्हणा अगर माझीहि मनोवृत्ति बदलली म्हणून म्हणा; झालेल्या या फरकाबद्दल मला प्रथमतः आश्चर्य, नंतर चमत्कारिक प्रकारची भीति जी वाटत होती त्याची जागा कुतूहलानें घेतली. मला वाटे, एकदां तिच्याशीं बोलावें. पण आपणहून बोलणें मला कमीपणाचें वाटलें. इतके दिवस शेजारीं असूनहि एकमेकांकडे जाण्यायेण्याइतका परिचय माझ्या मावशीनें वाढविला नाहीं, याचीहि त्यावेळीं मला चीड आली. नाहीं तर तेवढ्या निमित्तावर आम्हांला बोलतां नसतें कां आलें! सुट्टीचे दिवस जसजसे संपत आले तसतसे तिच्याशीं बोलून एकदां हें सर्व आहे तरी काय असा सोक्षमोक्ष करावा असें मला होई. एकदां वाटे पत्रानें कळवावें; पण भीति वाटे. पत्र तिच्या म्हाताऱ्या बापाच्या हातीं पडून भलतेंच कांहीं उत्पन्न झालें तर! एकदां वाटे कुठेंतरी वाटेंत भेटली तर तिला सांगावें "नुसतें डोळयानें मूकपणें बोलण्यापेक्षां एकदां स्वतंत्रपणें भेटा कीं!' पण ती तशी भेटली म्हणजे मात्र तसें सांगणें कधीं जमलें नाहीं.

सुट्टी संपायला आठ दिवस उरले. कृतींत कांहींच उतरेना तेव्हां एकमेकांकडे पाहाण्याची धडपड करणें येवढेंच शिल्लक राहिलें.

त्याप्रमाणें आम्ही दोघेंहि एकमेकांकडे पाहात आपापल्या खोल्यांच्या सज्जांत किंवा त्याच्या आसपास असूं. डोळ्यांतूनहि एकमेकांचीं हृदयें दिसतात कीं काय नकळे, एकमेकांशीं बोलण्यास आम्हीं दोघेंहि धडपडत आहोंत असें आम्हां दोघांना एकदम पटलें असें मला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाटे. एकमेकांचे डोळे चुकवूनच आम्ही एकमेकांना पाहात होतों. डोळे मिळतहि कधीं कधीं या लपवाछपवींत. निर्भयपणें आम्ही पाहात असूं. पण पुष्कळच वेळां असं होई कीं तिला माझ्याकडे पाहायचें आहे असें मी ओळखलं असं तिला वाटे; व मोठ्या नाइलाजानें पण गडबडीनें ती दृष्टिआड होण्याचा प्रयत्न करी !

मी पुण्यास गेलों. ज्यूनियरचें वर्ष असल्यानें अभ्यासाचा डोंगर होता पण निकडमात्र फारशी नव्हती.

पण, झोंपेच्या वेळीं जी थोडी मोकळीक मनाला सांपडे तेवढ्यांत खारला झालेला " लपंडाव " पुनः डोळ्यांपुढें येईच.

विमल कां नाहीं बोलत माझ्याशीं!— तिला माझ्याबद्दल येवढं वाटतं तर ! तिला काय वाटत असेल माझ्याबद्दल ! मीच कां नाहीं विचारला हा प्रश्न तिला !

एकमेकांना एकमेकांबद्दल वाटत असलेलें कुतूहल कां नाहीं बोलून दाखवितां येत !

पावसाची वाट पाहात असलेल्या धरित्रीप्रमाणें माझी मूर्ति डोळ्यांत सांठविण्याला आतुर असलेले ते डोळे मला भोंवतीं दिसत !

यामुळें म्हणा कीं तें एक वयच असतें म्हणून म्हणा; अभ्यास, कॉलेजचा वेळ संपला कीं एकप्रकारचें भकास वाटे मला !

मला बरोबरची बहीण वगैरे कोणी नसल्यानें स्त्रीवर्गाबद्दल मला कांहींच माहिती नाहीं. पण, मला आठवतं मी इंटर सायन्समध्यें असतांनाच —तेव्हां मी अठरा वर्षांचा होतों—मुलींबद्दल बोलावें, मुलींच्याबद्दल गोष्टी ऐकाव्या, स्त्रीपुरुषविषयक वादविवाद ऐकावे—वाचावेत; अनेकांचीं रहस्यें ठाऊक असावींत असं वाटे येवढं खरं ! माझ्या मित्रांच्या घरीं त्यांचा व त्यांच्या बहिणी वगैरे—बरोबरचें—हंसणेंखिदळणें, रागावणें, रुसणें, हिंडणें—फिरणें पाहिलें कीं, माझ्या आयुष्यांत एकप्रकारचें कांहींतरी कमी आहे असें मला वाटे. मुलींच्या पुढें पुढें करण्याचा मी कधींच प्रयत्न केला नाहीं. मला तें स्वभावतः पसंत नसे. परंतु, माझ्या हुशारीच्या जोरावर ज्याप्रमाणें मित्रांचें कडें माझ्याभोंवतीं असे, त्याप्रमाणें मैत्रिणींचेंहि असावें-निदान माझ्या मित्रांच्या बहिणी अगर त्यांच्या मैत्रिणी यांतून मलाहि एखादी स्त्रीमैत्रिण असावी असें वाटे हें खोटें नाहीं.

तशी मैत्री करण्यास विमलची धड, पड आहे. पण ती जोडतां येत नाहीं असें मला नाताळच्या सुट्टींत खारला आलेल्या अनुभवावरून वाटलें.

माझ्यांत उत्पन्न झालेल्या भकासपणांत या अगतिकपणानें भरच पडली. टर्म संपून उन्हाळ्याची सुट्टी येतांच मी खार गांठलें.

विमल कृश झाली होती. डोळ्यांतील आतुरतेंत निराशेचा गडदपणा आला होता. तेवढ्या दृश्यानें माझें मन वितळलें. मी तिच्याशीं बोलायचें ठरवलें, व त्याप्रमाणें मला संधि मिळालीहि !

स्टेशनवर तिकीट काढतांना आम्ही एकदम एकत्र आलों.

' मला तुमच्याशीं बोलायचें आहे ' ! मी म्हटलें.

' मलाहि ! ' तिच्या त्या निराशेनें काळवंडलेल्या डोळ्यांत एक चमक आली असें दिसलें.

' कुठें निघालांत !' मी विचारलें.

" दादरला मैत्रिणीकडे !" ती म्हणाली.

" आज नाहीं गेलांत,तर नाहीं का चालणार ! " मी विचारलें.

" मी तिच्याकडे राहायला यायचें कबूल केलें आहे " ती म्हणाली.

" मग फार उत्तम. आज तुम्ही तिच्याकडे जाऊं नका. आपण दोघेंहि आज हॉटेलांत राहूं. मला पुष्कळ बोलायचं आहे. "

ती घाबरल्यासारखी दिसली; पण नाकबूलहि झाली नाहीं.

मी चटकन सेकण्डचीं तिकिटें काढलीं व लोकल येतांच डब्यांत बसलों.

आयुष्यांत कधींहि न केलेलें धाडस मी करीत आहें असं मला वाटलं.

डब्यांत त्यावेळीं कुणी नव्हतें. विमल व मी अगदीं खेटून बसलों होतों. मी तिच्या खांद्यावर हात टाकला. ती किंचित् दूर सरली. " असं काय बरं !"

मला काय झालं होतं तें सांगतां येत नाहीं. मी हंसलों. " कां, भीति वाटते माझी ! मी खातों कीं काय तुम्हांला ! "

ती कांहींसें पुटपुटली. तिचा त्यावेळचा चेहरा उरांत खालींवरतीं हलणें, डोळ्यांतील ती भीति, आतुरता, आणि कितीतरी रंगलेल्या भावना यामुळें मी बेभान झालों होतों. मी तिच्याकडे पुनः सरकत तिचें चुंबन घेतलें.

ओंठ पुसत ती म्हणाली, ' काय हें ! आजपर्यंत नाहीं कुणी असं केलं. "

" खरंच ! "

" म्हणजे; मी खोटं सांगतें असं तुम्हांला म्हणायचं आहे !"

" बरं मग हा घ्या आणखी एक नमुना ! " दोन्ही बाहूंत घट्ट धरून तिचें चुंबन घेत मी म्हटलें.

माझें सर्व आंग कढत कढत झाल्यासारखें मला वाटलें. मी तिचीं कितीतरी चुंबनें घेतलीं.

तिची मान माझ्या खांद्यावर विश्वासानें टेकली होती.

ग्रँटरोड आल्यानें गाडी सावकाश चालूं लागली.

धुकं जाऊन चक्क ऊन कसं पडावं तसा—आतां आम्हां दोघांच्या वागण्यांत मोकळेपणा आला—असं मला वाटलं.

चर्चगेटला उतरतांच मी टॅक्सी ठरवून रीजंट हॉटेल गांठलें.

' मिस्टर व मिसेस दामले ' अशीं नांवें मी सांगतांच तिनें माझ्याकडे पाहिलें. चहाची ऑर्डर देऊन, लिफ्टनें वर जातांच आम्हांला आमची खोली दाखविण्यांत आली.

चहा झाल्यावर आम्ही दोघेंच त्या खोलींत होतों.

एका सोफ्यावर एकमेकांच्या भोंवतीं हात टाकून, आमच्या तीन—चार वर्षांपूर्वी होणाऱ्या दृष्टिभेटी नातलगांची ओळख वगैरे गप्पागोष्टी केल्या.

पण, लवकरच आम्ही दोघेंहि गप्प बसलों.

मन कितीतरी बोलत होतें पण शब्द फुटत नव्हता.

मी तिच्याजवळ सरकून एक दीर्घ चुंबन घेतलें. विमल व मी दोन आहोंत असें नुसतें वाटणें मला सहन हो[ईना] नव्हतें. मी तिला घट्ट धरून म्हटलें, " विमल, तूं बोलत कां नाहींस ! "

' काय बोलूं, श्याम ! ' हंसऱ्या डोळ्यानें माझ्या डोळ्यांकडे पाहात ती म्हणाली, ' माझ्या आयुष्यांत अ[सा] दिवस लिहिलेला आहे,असं मला कधींच वाटलें नाहीं. '

तारुण्य मुसमुसत होतें. आम्हां दोघांत जीविताचीं सत्यस्वरूपें आम्हांला कुठून दिसणार !

अंतराळीला जाऊन भिडणारी तेजस्वी ज्योत धडाडत होती आमच्या पुढें ! विस्तवाशीं खेळलों दोघेजण आम्ही त्या रात्रीं ! !

सकाळीं जाग आली.

आम्ही कुणी कुणाशीं बोलत नव्हतों. मला वाटतें आम्हां दोघांना एकमे[कां]कांची भीति वाटत होती.

आम्ही दोघें खारला पुनः गेलों.

न झालेल्या गाण्याचें खोटेंच पण रसभरीत वर्णन मी मावशीला सांगत होतों. पण माझ्यांत अंतर्बाह्य झालेला वाटणारा फरक तिला माझें बिंग सांगेल कीं काय अशी भीतीहि वाटत होती मला ! !

नंतरचे उरलेले दिवस मी कसे घालविले हें नाहींच सांगतां येणार मला. मी जाण्यापूर्वी ती पुनः मला भेटावी असें वाटे, परन्तु तसें घडलेंच नाहीं. कुणी पाहात नाहीं अशी खात्री करून आम्ही एकमेकांकडे पाहून हांसत असूं पण बोलणें !—अं—हं ! ! पुण्यास जातांना मी कितीतरी वेळ वांकून वांकून पाहिलें गाडीतून; कीं, कुठेंतरी ती आली असेल निरोप द्यायला ! ती न भेटल्यानें पुण्यापर्यंत माझा प्रवास अगदीं त्रासदायक वाटला.

शेवटचें वर्ष असल्यानें, अभ्यासाच्या गडबडींत विमलची आठवण काढायला उसंतच नव्हती. विमलला मी विसरलों असें म्हणतां नाहीं यायचें. पण तिच्या आठवणीहि वारंवार येत असत असेंहि नव्हे; आणि आल्याच तर कादं[बरींतील]बरींतील आपणाला आवडणारी नायिका किंवा चित्रपटांत आपणाला आपल्या अभिनयानें वेड लावणारी नटी यांची जशी आठवण येते तशीच येई इतकेंच !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पण राख धरलेल्या निखाऱ्यावर फुंकर घालतांच खरें स्वरूप कसें दिसतें !— विमलबद्दलहि असेंच झालें. मावशीच्या एका पत्रांत तिनें लिहिलें होतें ' तुला आपल्या शेजारच्या बंगल्यांतील विमल ठाऊक आहे ? इतकें मोठें वय होऊनहि लग्न झाल्यानें जें व्हायचें तेंच झालें. तिच्या आईबापांनीं तिला घरांतून हांकून दिली. इकडच्या प्रयत्नानें तिला अनाथ महिलाश्रमांत पोंचविली असून, तिला मोठा सुंदर मुलगा झाला आहे. कसं झालं असेल तें असो; पण बिचारीचें दुर्दैव !! तीहि कुणाचें नांव सांगत नाहीं हें ऐकून तर मला तिचें कौतुक वाटतें !!'

काय वाटलं मला तें पत्र वाचून !

मी माझ्या मनाशीं झगडत होतों.

विमलनें आपल्या मुलाच्या बापाचें नांव सांगितलें नाहीं !

कां ?—

माझ्यापेक्षां आणखी कोणाशीं तिचा संग झाला असेल ?

—' माझ्या आयुष्यांत असा दिवस लिहिला आहे असं मला कधींच वाटलं नाहीं—' असं नाहीं का ती म्हणाली होती त्यावेळीं ?

मी तो दिवस आठवला. महिने मोजले. तिचा मुलगा तो माझा मुलगा असणें शक्य आहे !

—काय ?—माझा मुलगा ! ! '—

मी एकदम कानांवर हात ठेवले. जबाबदारी टाळण्याचा पुरुषी मुर्दाडपणा माझ्यांत होता.

पण, विमलचे डोळे ? त्यांतील तें अनेकविध भावनांचें मिश्रण ? ती निराशा, ती उत्सुकता, तो आत्मदानाचा आनंद, तें विश्वासाचे आकाश, त्यांतील निर्दग्ध ती ज्योत ?...कसं विसरूं ?

सकाळच्या गाडीनें मी खारला गेलों.

मला पाहतांच मावशीला व नारायण-रावांना—मावशीच्या पतिराजांना—आश्चर्यच वाटलें.

' मध्येंच कुठें ? ' दोघांनीं विचारलें.

" मावशी !' मी खालीं मान घालून म्हटलें. ' रागावणार नाहींस ? मला एक गोष्ट सांगायची आहे. शेजारच्या विमलचा मुलगा माझा आहे."

" काय ! " मावशी ओरडली.

" मावशी, खरंच तो माझा आहे. तूं रागावशील;—रागाव. पण, विमलला अशा संकटांत सोडून मी उजळपणें फिरणें शक्य नाहीं." असं म्हणून झालेली हकी-कत त्या दोघांना मी इत्थंभूतपणें सांगितली.

" श्याम " नारायणराव म्हणाले, "शाबास ! श्याम ! झाली गोष्ट बरी नव्हे—पण तूं न घाबरतां पुढें येऊन ती कबूल केलीस ह्यानें मला सर्वांत जास्त आनंद वाटतो. "

आम्ही तिघेंहि आश्रमांत गेलों.मुलाला पाहातांच माझ्या व त्याच्यांत असलेल्या साम्यानें मावशीची खात्रीच पटली.

आमच्या लग्नाला आज तीन वर्षें होत आलीं. आज माझें वय सव्वीस आहे, अन् विमलचें २३—२४ असेल. पण, छोट्या अरूच्या सहवासांत आमच्या मधील प्रेम व विश्वास सारखा वाढत आहे. आमचें लग्न लोकरीतीचा नेहमींचा मार्ग सोडून झालेलें आहे. पण विम-लच्या स्वभावांतील सौंदर्यानें भावी जीवित-यात्रा म्हणजे काश्मीरचा प्रवास वाटतो आहे मला ! माझ्या कॉलेजच्या गैरहजेरींत तिच्या आईबापांकडून व समाजाकडून तिला जो लोकापवाद सहन करावा लागला व जो अजूनहि निवळलेला नाहीं; त्याब-द्दल मी कधींही ' ब्र ' काढीत नाहीं, त्या प्रसंगांत मीच खऱ्या धीरवंत पुरु-षासारखा वागलों असंच ती म्हणत असते. आणि आतां मला जर कशाचा आनंद वाटत असेल तर तो एकाच गोष्टीचा कीं, विमलसारख्या समजूतदार स्वभावाच्या स्त्रीचें प्रेम मला जन्मभर मिळणार आहे !

* * *

खरोखरच मी मागचें आठवूं लागलें कीं, मला आश्चर्य वाटतें कीं हें झालें तरी कसं ?

मी सुंदर नाहीं आणि म्हणूनच नाहीं का मला चार ठिकाणीं दाखवून मी ' नाकारलेली मुलगी 'ठरलें ?

त्यांतच ' माई 'ला तिच्या नवऱ्यानें टाकल्यामुळें ती [illegible] परत आली: आणि त्यावेळची ती घरांतील गडबड !— आठवण झाली कीं या घटकेलाहि कांटा उभा राहातो सर्वांगावर !

बाबांचें म्हातारपण, होती नव्हती ती मिळकत बंगल्यांत घालून बसलेले. घरांत आम्ही तीन भावंडें—मी, दादा अन् आण्णा !—तिघांचेंहि शिक्षणें चाल-लेलीं. काय नको ? दादा अन् आण्णांच्या चैनी—सगळ्या चालू ! पण परीक्षा पास होण्याच्या नांवानें अं हूं ! ! कां नाहीं बैतागणार ? बाबा आईवर चरफ-डत, आई आदळाहापट करी; दादा—अण्णा तर स्वतःपलीकडे पाहायचें नाहीं अशा तोऱ्यांत ! ! माझी उचलबांगडी करण्याची बाबा खटपट करीत तों जिकडे तिकडे ' नकार ! ' त्यांत ' ताई ' परत आली ! मग काय विचा-रतां ? घरांत नुसतां डोंब पेटला होता ! !

हें असं काय झालं ? त्यावेळीं हा प्रश्न माझे पुढें पहिल्यांदा उभा राहिला ? ताई परत कां आली ? तिला नवऱ्यानं टाकलं म्हणजे काय ? तिला जर टाकलं तर मला कां दाखवितात बाबा ?

लग्न झाल्यापासून ताई दुःखीकष्टी आहे मग मीहि तशीच होणार असेन तर लग्न कां करायचें ? लग्न म्हणजे काय ?

माझ्या बरोबरच्या मैत्रिणी यावर बोलतांना मी ऐकें. कांहींचें ' मित्र ' असून त्यांच्याशीं लग्न करण्याचा इरा-दाहि त्या स्पष्ट बोलून दाखवीत. पण ' प्रेम करणें ' म्हणजे काय, लग्नापूर्वी प्रेम कीं लग्नानंतर प्रेम, वगैरे गोष्टी घरांत कुणी बोलत नसत हें मात्र खरें. ' ताई ' परत माहेरीं आली तेव्हां आई-बाबा बोलतांना मी ऐकलें होतें कीं, ' ताई 'च्या नवऱ्याचें दुसऱ्याच मुलीवर प्रेम जडल्यानें त्यानें दुसरें लग्न केलें. तेव्हां आई फणफणत म्हणायची, ' जळ्ळं प्रेम तें ! आमचीं नाहीं कां लग्नं झालीं ? पण या नव्या पोरांचे थेर आईबाप चालू देतात; अन् आमच्या-सारख्यांच्या मुलींचा सत्यनाश "

या साऱ्या वातावरणाचा माझ्या मनावर नक्की परिणाम काय झाला हें मला स्पष्ट व सुसंगतपणें सांगतां यव-याचें नाहीं. परंतु मला पहायला येणा-ऱ्याकडून मला ' नकार ' मिळाला कीं मला आनंद वाटे हें कांहीं खोटें नाहीं. पण त्या पाठोपाठ आई—बाबा आकाश-पाताळ एक करून जेव्हां या पोरी म्हणजे 'गळ्याला फांस ' असें म्हणत तेव्हां चिड, राग, कींव व स्वतःबद्दल त्रागा वाटे हेंहि खरें !

त्यांतच माझी शाळा सुटली आणि मगमात्र हा मनस्ताप असह्य होऊं लागला.

मला आठवतें, याच दिवसांत मला ' श्याम ' ची ओळख झाली.

श्याम व मी कधींहि बोललों नाहीं; पण, तो पुण्यास जाईपर्यंत आमची नक-ळतपणें स्टेशनवर होणारी भेट, त्यावरून त्याची माझी दृष्टिओळख झाली होती. त्याचा स्वभाव वगैरे कळण्याचें मला कांहींच साधन नव्हतें. परंतु, इतर फाजील मुलांप्रमाणें तो नव्हता हेंहि त्याच्या आजप-र्यंतच्या वागणुकीनंतर स्पष्ट झालें होतें.

' बुडत्यास काडीचा आधार ' ही म्हण तुम्ही साहित्यिक काय अर्थानें योजीत असतात तें असो;—पण माझ्या-भोंवतीं सहानुभूतिशून्यतेचा पसरलेल्या डोहांत ' श्याम ' बद्दलची निवळ स्मृति मोठी आधार वाटे मला !

काय कार्यकारणभाव असेल तो असो; ' श्याम ' ची माझी यत्किंचितहि बोला-चाल नसतां भोंवतालच्या निराशामय वातावरणांतून तोच एकटा माझी सुटका करील असें त्यावेळीं माझ्या वेड्या मनाला वाटे.

माझी अशी मनःस्थिति व्हायला व नाताळची सुट्टी होऊन ' श्याम ' पुण्या-हून खारला यायला एकच गांठ पडली.

माझ्या शरीरांतील अणुन् अणु श्यामकडे ओढला जात होता. माझ्या साऱ्या शक्ति डोळ्यांत एकवटून मी समोरच्या बंगल्यांतल्या सज्जांत उभ्या असलेल्या श्यामला पाहायला धडपडा-यची ! एक—दोनदां मी त्याच्याकडे पाहा-यला व त्यानें माझेकडे पाहायला एक गांठ पडली. मला आठवतेय अजून त्या वेळचें तें हृदयाचें धडधडणें व मनाचा गलबला होणें ! कधीं कधीं नाहीं मी विसरायची तें !

पण माझी ही मनाची ओढ, मनाचा गळबळा, जिवाची धडपड, उलट त्याच्यांत मला दिसेना; आणि म्हणूनच कीं [illegible] नकळे, त्याचें लक्ष माझेकडे बघण्याला कांहींतरी करावें असें मला फार फार तीव्रतेनें वाटूं लागलें. त्यानें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माझ्याशीं बोलावें, माझ्याबरोबर फिरायला यावें; माझेबद्दल माझ्याइतकी आतुरता त्याला वाटावी असें मला फार जोरानें वाटूं लागलें.

तेवढ्यांत नाताळ संपला व श्याम पुण्याला गेला. त्याची डोळ्यांत सांठविलेली मूर्ति पुनः पुन्हां मनश्चक्षूंपुढें आणून मी मानसपूजा चालविली होती.

घरांतील वातावरण जितकें जितकें अधिकाधिक उदास होत होतें तितकी त्याची मूर्ति माझ्या अंतर्यामीं जास्त स्पष्ट होत होती. स्वप्नांत आम्ही भेटत असूं; बोलत असूं; पण तें स्वप्न संपलें कीं विचार येई; सत्यसृष्टींत खरोखरच कसं बरं मला श्यामशीं बोलतां येईल !

मनाची हुरहुर त्यानें जास्तच वाढे; इतकी कीं, सत्य नाहींतर नाहीं पण स्वप्नांतून होणारें तें त्याचें दर्शन पुनः व्हावें; त्याच्या स्वप्नांतील सहवास, वाटणारा गोडवा; सर्वांगाला वहरून टाकणारी चैतन्यमय लहर अनुभवास यावी असें सारखें वाटे. कधीं कधींच तशीं सुखस्वप्नें पुनः पडत जीव त्यामुळें, कसा अगदीं हरखून जाई.

' पण, ही मूकभावना सशब्द व्हावी कशी ! '—

या प्रश्नाचें उत्तर मला कधींहि मिळालें नाहीं.

कॉलेज संपून श्याम पुनः खारला आला. मन रोज बेत करी कीं, मला त्याच्याबद्दल जें वाटतें तें एकदां त्याला सांगावें. पण, तें कधींच साधलें नाहीं.

मी कोण अन् तो कोण ! मराठा मुलीनें ब्राह्मणावर प्रेम ! आणि असलं तरी त्याचे उलट असायला हवं ना प्रेम माझ्यावर ! काय आहे माझ्यांत असं कीं, त्यानें प्रेम करावं माझेवर. सारं इंग्रजी सात यत्ता झालेलं शिक्षण; रूपानेंच तर ठिकठिकाणीं नकार दिला; कसं कोठल्या तोंडानं विचारूं मी !

असे उलट सुलट विचार चालू असतानांच एके दिवशीं ' श्याम 'नेंच स्टेशनवर मला गांठलें; आणि चटकन् तिकीट काढून सेकण्डने आम्ही मुंबईला बरोबर निघालों.

त्यानें गाडींत माझें चुंबन घेतलें. आयुष्यांत असला अनुभव नसल्यामुळें मला किती भीति वाटली ! पण त्या चुंबनांतील ती आतुरता, डोळ्यांतील ती माझ्याबद्दल त्याला वाटणारी आपुलकीची मादकताहि किती प्रखर ! माझ्यांत नवें चैतन्य खेळत आहे असं त्याचे ओठ माझ्या ओठावर टेकतांच मला वाटलें ! माझा अननुभवीपणा, माझ्यावर आजपर्यंत झालेले सांस्कृतिक परिणाम मला त्याच्यापासून पळून जाण्यास सांगत होते तर सर्वांगांत सळसळणारें रक्त, नवचैतन्यानें भोंवतीं गरगर फिरणारी सृष्टी, व अनुभवास येणारें नवजीवन मला त्याच्याकडे खेंचीत होतें.

या रस्सीखेचीची येईल का तुम्हाला कल्पना !

त्यानें पुनः जेव्हां आपले हात माझेभोंवतीं टाकले तेव्हां सारें जग मला तुच्छ वाटलें. त्यानें दुसऱ्यांदा घेतलेल्या दीर्घ चुंबनानें, माझ्या प्रेमशक्तीचा अपूर्व सत्कार झाला असें मला वाटलें. मी त्याच्या खांद्यावर मान टेकली.

मैत्रिणीकडे त्या दिवशीं मी रहायला जात होते पण श्यामपलिकडे मी कसलाच विचार करूं शकले नाहीं. तो नेईल तिकडे मी आपोआप जात होतें.

चर्चगेटवरून आम्ही रीजंट हॉटेलमध्ये गेलों. ' मि. व मिसेस दामले ' म्हणून त्यानें एक खोली घेतली.

' मी होईन कां कधीं सौ. दामले ! ' माझे मनांत विचार आला.

सारी रात्र आम्ही एकत्र राहिलों.

मी प्रेमानें बेभान झालें होतें; तारुण्यांतील दुर्दमनीय भावनांच्या मी संपूर्ण आहारीं गेले होतें. तृषार्त हरीण मृगजलाच्या नुसत्या कल्पनेनें तिकडे धांव घेतें मग इतक्या दिवस अतृप्त असलेल्या माझ्या भावना कामनांइच्छांची पूर्ती होणार, शिवाय स्वप्नमय सृष्टी खऱ्या स्वरूपांत अनुभवास आली, व येणार असा विश्वास उत्पन्न झाल्यावर बेभान नाहीं होणार तर काय !

वेली ज्याप्रमाणें वृक्षावर चढतात, त्याप्रमाणें मी श्यामला त्या दिवशीं बिलगून होतें. तो माझा होता अन् तो मला हवा होता. मीहि त्याला हवी होत्यें. चुंबनावर चुंबनें तो घेत होता; मी त्यांची पतरफेड करीत होतें—नव्हे, प्रेमसागरांतच मी इतकीं बुडून गेलें होतें कीं माझें सर्वस्व मी त्याला दिलें होतें !

स्वप्न जितकें लवकर संपतें तितक्या वेगानें तो दिवस संपला असें मला वाटलें.

पण यापूर्वींचीं स्वप्नें होतीं; आतां मिळाली तो अनुभव होता ! त्यामुळें, यापूर्वी, गोड हुरहूरच काय ती लागे. पण, " रीजन्ट " हॉटेलमधून मी घरीं आलें मात्र ! मन, मला भेडसावीत होतें ! !—

—' काय केलंस हें ! आणि याचा शेवट ! इतक्या सहज तूं श्यामच्या आहारीं गेलीस ! काय म्हणत असेल तो तुझ्याबद्दल ! काय किंमत केली असेल त्यानें तुझी ! '—

त्या दिवशीं झोंपतांना श्यामची मूर्ति डोळ्यापुढें येणें अपरिहार्य होतें माझ्या नकळत आनंदानें माझे ओंठ अलग झाले. ' श्याम, मी तुझ्यावर जसं प्रेम करतें तसंच तूं करतोस ना माझेवर ! '

मी माझी मान उशीवर टेकली नसून श्यामच्या विशाल वक्षःस्थळावर ठेवली आहे असा मला भास झाला; अन् मी त्या मानसमूर्तीचीं कितीतरी चुंबनें घेतलीं आणि म्हटलें, ' प्रेमांत सर्व कांहीं वितळून जातें. '

पण थोडेच दिवसांनीं मला कळून आलें कीं, ' प्रेमांत कांहींहि वितळून जात नाहीं !'

' मृत्यूंत सारे कष्ट संपतील म्हणून मृत्यूला हांक मारणाऱ्या इसापनीतींतील म्हाताऱ्यापुढें ' मृत्यु ' प्रत्यक्ष उभा रहातांच त्याची कशी गाळण उडाली !'

माझेंहि तसेंच झालें.

प्रेममूर्ति जेव्हां माझ्या पोटांत ढवळूं लागली; चेहऱ्यावरील फिकटपणानें आपल्या आगमनाची ललकारा तिनें दिली; व ओकाऱ्यांनीं जेव्हां भोंवतालच्या लोकांचें तिनें आपणांकडे लक्ष वेधलें तेव्हां माझी झालेली मनःस्थिति कशी वर्णन करूं !

आई—बाबा—दादा, ' आण्णा ' सर्वजण एकत्र होऊन त्यांनीं माझ्या प्रेममूर्तीची चौकशी करून चालविली. पण ' श्याम ' ची स्वप्नांत मला रोज दिसणारी मूर्ति मला त्याचें नांव सांगूं देईना.

शेवटीं काय व्हायचें तें झालें. म[illegible] घराला मुकावें लागलें.

आणि तेव्हांमात्र विचार प[illegible] कीं ' श्याम ' चें नांव नको सांगू[illegible] काय करूं ?

कुणाकडे जाऊं ? जन्मदाते आ[illegible] आधार देईनात तर मग कोण देणार !

पुण्याला जावें; श्यामला सारी ह[illegible] सांगावी असें वाटलें. पण, त्याची [illegible] त्याचें शिक्षण, त्याचा सामाजिक [illegible] त्याच्यापुढें आज उद्यां उघडणारें उ[illegible] भवितव्य या सर्वांचा मी नाश नाहीं [illegible] करणार माझ्या कहाणीनें ?

मी सहन करीत असलेल्या दुःखां[illegible] या विचाराची टोंचणी मला [illegible] झाली.

माझा निश्चय व्हायला मला म[illegible] कसें झगडावें लागलें हें शब्दांनीं [illegible] सांगतां येत नाहीं. पण शेवटीं ए[illegible] अनाथाश्रमांत जाईन किंवा वेळ पड[illegible] परधर्म पत्करीन. पण, ज्यानें मला [illegible] दिलें, चैतन्य अनुभवास आणून [illegible] माझें स्त्रीत्व सुफलित केलें त्याच्या [illegible] सारख्या जीविताला माझा डाग [illegible] मी कमीपणा आणणार नाहीं असा[illegible] ठरला.

श्यामच्या मावशीचे पतिराज—[illegible] यणराव—हे महिलाश्रमाचे [illegible] हयात सभासद असून, त्या [illegible] आस्था बाळगणारे आहेत हें मला [illegible] असल्यानें, श्यामचें नांव वगळून, [illegible] सर्व हकीकत मी सांगितली; व [illegible] अपेक्षेबाहेर यश मिळून मला आ[illegible] प्रवेश मिळाला.

' अरु " जन्माला आला तेव्हां [illegible] ' श्याम ' मला मिळाला असं [illegible] किती हुबेहुब त्याच्यासारखा ! !

पण, मला बाळंत होऊन चार [illegible] झाले नसतील इतक्यांत श्याम, ना[illegible] राव व श्यामच्या मावशी मला भे[illegible] आलीं. पहिल्यांदा मी दचकलें. प[illegible] जातां ' श्याम ' नें मला जें सांगि[illegible] ऐकून जुन्या कथांतील ' आकाश[illegible] व ' पुष्पवृष्टि ' झाल्याप्रमाणें मला [illegible]

आणि श्यामच्या माझ्यावरील [illegible] प्रेमाचा, त्यांच्या चुंबनाच्या [illegible] अजूनही येणारा अनुभव, मला घडे[illegible] असंच म्हणावयास भाग पाडे[illegible] ' जीवित ही पुष्पशय्या ' आहे !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धावतें जग:

लेखक:—प्रभाकर तुकाजी दिघे.

अभया बॅ अरविंद यांच्यासारख्या बड्या लक्षाधीशाची मुलगी. ती वडिलांच्या तोलाच्या श्रीमंत तरुणालाच माळ घालणार अशी सर्वांची कल्पना. पण, तिनें दीपकासारख्या दरिद्री तरुणावर प्रेम केलें—नव्हे ती त्याच्याबरोबर लग्न केल्याशिवाय राहूं लागली.

त्या दिवशीं अभयेची एक मैत्रीण तिचें मन वळविण्यासाठीं आली होती. तिनें दीपकशीं विवाह करण्याचा आपला निश्चय सर्वांत कळवितांच केवढी खळबळ उडाली सगळीकडे त्या बातमीनें—! त्याचं कारण कीं अभया म्हणजे सुप्रसिद्ध बॅरिस्टर अरविंद दीक्षित ह्यांची एकुलती एक कन्या आणि बॅरिस्टर अरविंद म्हणजे मुंबईमधील एक कोट्यधीश नव्हते तरी लाखोपति होते ह्यांत शंकाच नव्हे. तेव्हां अशा माणसाच्या मुलीनें एखादा तिला शोभेल—तिच्या इभ्रतीला साजून दिसेल, असाच सहकारी निवडणें इष्ट. आणि ती तसाच निवडणार अशी सर्वांची अपेक्षा. परंतु, अभयेनें त्यांच्या अपेक्षेला जबरदस्त धक्का दिला. सहकारी म्हणून तिनें एका गरीब परंतु प्रामाणिक आणि प्रेमाचें महत्त्व ओळखणाऱ्या धडधाकट तरुणाची निवड केली. तिच्या मातापित्यांची अपेक्षा अशी कीं, आपली कन्या एखाद्या श्रीमान तरुणाचीच निवड करणार. कारण असें कीं, तिच्या सभोंवती कितीतरी श्रीमान—खुशालचेंडू तरुण घिरट्या घालीत असावयाचे आणि त्या वेळीं तिला अधिक सुलभतेनें आनंदी कोण करतो, ह्याबद्दल त्यांच्यामध्यें अहमहमिका चालवयाची. कोणी आपल्या निरनिराळ्या खेळांमधील कौशल्यांची तारीफ तिच्या समोर करावयाचा, तर कोणी आपल्या शक्तीसामर्थ्याच्या गोष्टी तिच्यासमोर काढावयाचा—तर कोणी यंत्रावरील आपल्या हुकमतीची तिला जाणीव करून द्यावयाचा, तर कोणी एखादा हरीचा लाल आपण आपली 'टुरींग कार' किती 'हाय् स्पीडनें' सोडतो ह्याचेंच वर्णन तिच्या समोर करीत बसावयाचा. सर्वांचा उद्देश अशा वेळीं एकच असावयाचा आणि तो म्हणजे तिनें आपल्या विषयीं धन्योद्गार काढावे. तिनें आपल्याविषयींच फक्त आपुलकी दाखवावी. परंतु अभया ह्या सगळया गोष्टींकडे दुर्लक्ष करून आपल्याच व्यवसायामध्यें दंग झालेली असे. एखादं पुस्तक वाचण्यांत किंवा एखाद्याशीं एखादा खेळ खेळण्यांत ती इतकी गढून गेलेली असे कीं, इतर तरूण कशाविषयीं गप्पा मारीत आहेत ह्याचें तिला बिलकूल भान नसे. अशा वेळीं तिच्याबरोबर खेळणाऱ्या तरूणाचा किंवा तिच्या हातांमधील पुस्तकाचा द्वेष करूं लागे प्रत्येक जण.

आणि इतके तरूण जरी तिची मैत्री संपादण्यांत गढून गेले होते, तरी त्यांपैकीं एका तरुणाची निवड तिच्या वडिलांनीं केव्हांच करून ठेवली होती. आणि त्याच्याशींच अभयेचा विवाह लावावयाचा हें जवळ जवळ त्यांनीं निश्चित् ठरवूनच टाकलें होतें; आणि तो तरूण म्हणजे चारुचंद्र देशमुख—सर विधिनचंद्र देशमुखांचा कनिष्ट मुलगा, जो नुकताच अमेरीकेला जाऊन पी. एच. डी. ची डिग्री घेऊन परत आला होता. आणि ज्याच्याकडे मुलींच्या आईबापांची अगदींच रांग लागून राहिली होती. आपल्या मुलीविषयीं त्या स्थळीं शब्द टाकला तर तो खास वाया जाणार नाहीं, अशी बॅरीष्टर अरविंदांची—अभयेच्या वडिलांची अगदीं पूर्ण खात्री. आणि म्हणूनच ते इतक्यांत कोणत्याही प्रकारची हालचाल करावयास कबूल नव्हते.

आणि शिवाय चारूचंद्र आणि अभया ह्यांची दोस्ती देखील बऱ्यापैकीं होती. चारूचंद्राविषयीं अभयेनें कांहीं प्रसंगीं स्तुतीपर उद्गार काढल्याचेंही अरविंदाच्या स्मरणांत होतें. तेव्हां तीं दोघें एकमेकाला पसंत आहेत, इतकंच नव्हे तर तीं दोघें एकमेकांवर अनुरक्त आहेत, अशीच त्यांची कल्पना. आणि मग चारूचंद्र अभया सोडून इतर मुलगी कशी पसंत करील असे तर्क लढवूनच त्यांनीं स्तब्ध बसण्याचें ठरविलें होतें.

× × ×

परन्तु, त्यांची आशा फोल ठरली. एक दिवस त्यांनीं अभयेजवळ त्या प्रश्नाला तोंड फोडलें आणि तिच्या तोंडचे उद्गार ऐकून अरविंदांची पक्की निराशा झाली. ते ब्रेच रागावले अभयेवर—आपल्याकडून त्यांनीं तिची निरनिराळ्या प्रकारांनीं समजूत घालण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं तिला सांगितलें—"अभये, जो माझा जांवई होणार तो कांहींतरी माझ्या इतमामाचा दर्जाचा नको कां ! बॅरिस्टर अरविंदाचा जांवई कोण तर एक भिक्षाधीश, एक जन्मदरिद्री असं लोकं म्हणूं लागलीं तर मला काय वाटेल. माझ्याजवळ इतका पैसा आहे. तूं वाटेल तेवढ्या श्रीमंत मुलाची निवड कर. वाटेल तेवढे पैसे द्यावे लागले, तरी त्याचा आणि तुझा मी विवाह लावून देतों. परंतु दीपकाशीं विवाह करण्याचा वेडा हट्ट तूं धरूं नकोस. हा दीपक कोण आहे. तूंच सांगतेस ना—! तो एक अंडरग्रॅज्युएट आहे—चाळीस रुपड्या कमाविणारा शाळामास्तर आहे. त्याच्यांत तुला एवढं काय विशेष दिसलं कीं, त्यामुळं तूं दिपून जावंस. अभया, निदान माझ्यासाठीं तरी तूं त्याचा नाद सोडलाच पाहिजेस. घराण्याच्या इभ्रतीसाठीं तरी असं विलक्षण तूं करूं नकोस. माझ्या तोंडाला काळीमा फासूं नकोस."

परंतु, ह्या बोलण्याचा—समजावणीचा अभयेवर कांहींच परिणाम झाला नाहीं. उलट तिनें फक्त एवढेंच म्हटलें, "बाबा, घराण्याची इभ्रत अनेक गोष्टी करून राखतां येईल—एकदां काळें झालेलें तोंड उज्ज्वल कर्तबगारी करून दाखवून उज्ज्वल करतां येईल. परंतु आयुष्याचा विचका झाल्यावर मेल्याशिवाय त्यांना सुधारणा होणें शक्य नसतें" तिच्या तोंडचे हें अशा प्रकारचे शद्ब ऐकून अरविंदांची खात्री झाली कीं, आपल्या सांगण्याचा कांहींच उपयोग होणें शक्य नाहीं ह्या बाबतींत. मग त्यांनीं त्या बाबतींत निरनिराळ्या क्लृप्त्या योजण्याचें ठरविलें. प्रथम त्यांनीं आपल्या पत्नीला तिला समजाविण्यास सांगितलें. तो प्रयत्न फोल ठरल्यावर त्यांनीं तिचे मित्र, मैत्रीणी ह्यांना तिची समजूत घालण्यास सांगितलें. परंतु, कृतनिश्चय अभया आपल्या निश्चयापासूनच मुळींदेखील परावृत्त होण्यास तयार नव्हती.

आतां ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची झाली होती कीं, बॅरिष्टर अरविंदांची एकुलती एक मुलगी अभया दीपक नांवाच्या कोणा एका भिकारड्या तरुणाशीं विवाह लावणार आहे. त्या वेळीं लोकांत निरानिराळ्या प्रकारचे तर्ककुतर्क सुरूं झाले आणि प्रत्येकानें आपापल्या मनाप्रमाणें कल्पना करून घेतल्या त्या बाबतींत आणि खरोखरच एक दिवस दीपक आणि अभया विवाहाशिवाय एकत्र रहात असलेली सर्वांच्या दृष्टीस पडलीं. बॅरिष्टर अरविंद म्हणूं लागले, "ह्या पोरीच्या पुढें हात टेकले बुवा आपण—!" आणि त्या दिवसापासून त्याची शाळेमधील मास्तरकीदेखील सुटली. काय योगायोग असतो पहा. आणि तें कळतांच सर्वांना आणि सर्वांबरोबर दीपकला देखील विचार पडला कीं, 'आतां आपण दोघें रहाणार कशाच्या जीवावर—'. जरी त्यानें वरुन दाखविलें नाहीं तरी तो हताश झाला होता ह्यांत शंका नाहीं. परंतु, अभया खंबीर मनाची, धडाडीची अशी नवयुवती होती. "संकटांना तोंड देण्यास सदैव सज्ज असलें पाहिजे अशी तिची विचारसरणी असे ! ती बी. ए. होती आणि इतर कोणती नोकरी धरण्यापेक्षां तिनें देखील शाळेमधील नोकरी धरली. लोकांना वाटलें कीं, बॅरिस्टर अरविंदांसारख्याची मुलगी एक सामान्य शिक्षकिणीची नोकरी कशाला पत्करील ? आणि तिनें जरी तसें ठरविलें, तरी बॅरिष्टर तिला तसें थोडेंच वागूं देणार आहेत ? आणि खरोखरीच ज्यावेळीं बॅरिष्टरसाहेबांच्या कानांवर ही गोष्ट गेली त्या वेळीं त्यांनीं बऱ्याचशा पैशाचें एक पाकीट एका नातेवाइकांकरवीं अभयेकडे पाठविलें आणि तसा वेडेपण न करण्याची त्यांनीं त्यांस विनंति केली. पण, त्यांची त्या बाबतींत देखील निराशा झाली. कारण तिनें तें पाकीट तसेंच परत केलें आणि फक्त एवढेंच म्हटलें कीं—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

जगाच्या अशा ह्या धकाधकीच्या मामल्यांत दुसऱ्यानें केलेली मदत केव्हांही अपुरीच पडते. स्वकष्टावर, स्वतःच्या निढळाच्या घामावर जगतां येण्याची ज्यांच्यांत कर्तबगारी नाहीं असा मनुष्य केव्हांना केव्हां तरी जमीनदोस्त होताच. मग मी स्त्री झालें, तरी दुसऱ्याच्या मदतीवर कां अवलंबून रहावें!''

आतां ही स्वकष्टावर पैसे मिळविणार तरी कसे! तिच्या पित्याबरोबर इतरांना देखील हा प्रश्न पडला होता. परंतु, ती शिक्षकीण बनतांच तो प्रश्न आपोआप सुटला.

शिक्षकीण असल्यामुळें आतां तिला शिकवण्यादेखील मिळूं लागल्या होत्या आणि आतां तिनें दोन तीन शिकवण्या देखील धरल्या होत्या. दीपक आणि अभया ह्या दोघांचा संसार आतां सुरळीत चालला होता. दीपकला जरी नोकरी नव्हती—त्याच्याकडून जरी आर्थिक मदत मुळींच मिळत नव्हती, तरी अभया धीटपणानें सारें गाडें हांकीत होती. विवाह झाला नव्हता तरी ती दोघें पतिपत्नींसारखी रहात होतीं. लोकांना आश्चर्य वाटत होतें कीं, 'विवाह न करतां हीं दोघं एकत्र रहातात तरी कशीं—! एकमेकांविषयीं दोघांना इतका विश्वास आहे! दोघांविषयीं इतकी पूर्ण खात्री आहे! परंतु, तीं दोघें निर्विघ्नपणें आपलें आयुष्य कंठीत होतीं.

एकदां एका मैत्रिणीनें अभयेला पत्र लिहिलें—अर्थात निश्चित मार्गापासून तिला परावृत्त करण्याचाच सूर येत होता त्यामधून—

' अभया, ज्याच्याकडून जी कधीं आपण अपेक्षा करीत नाहीं. तीच गोष्ट नेमकी त्या व्यक्तिकडून घडते कधींकधीं. सर्वसामान्यतः त्याच्या वागण्यामध्यें दिसून येणाऱ्या मनप्रेरणा पाहूनच इतरांनीं कांहीं ठराविक अटकळी बांधलेल्या असतात इतरांनीं. पण, एखादेवेळीं ती त्यांची अटकळ सपशेल चुकीची ठरते. आपणांला चुकीची वाटणारी, इतरांना गैर वाटणारी गोष्टच नेमकी त्या व्यक्तीच्या हातून घडते. त्या व्यक्तीला जरी तें योग्य वाटत असलें तरी ती गोष्ट अयोग्य असते.

दीपक तें वाचूं लागला

अभया, आतां तुझीच गोष्ट घेना! तुझ्या हातून हें असं घडेल—असा वेडेपणा तूं करशील असं केव्हांच वाटलं नाहीं मला. केवढ्या मोठ्या धनवान पित्याची मुलगी तूं! शाळा कॉलेजमध्यें असतांना देखील जे तुझे मित्र होते—जे, तुझ्या सहवासांत होते ते सारे श्रीमान होते. पण आतां पहातें तूं विलक्षणच करते आहेस.

एखाद्या श्रीमान तरुणाशीं तूं लग्न लावावेंस अशी सर्वांची अटकळ आणि मनीषा असतांना तूं त्याच्या अगदीं विरुद्ध कां वागतेस! ह्यावरून मला पैशापलीकडे कांहीं दिसत नाहीं आणि कळत नाहीं, असं समजूं नकोस. प्रेम म्हणजे काय तें मला समजत नाहीं, अशी तूं कल्पना करूं घेऊं नकोस. पण, अभया, जीवनकलह इतका तीव्रतम होत चालला आहे. आपलं जीवन इतकं बिकट होत चाललं आहे कीं, पैशापलीकडे दुसऱ्या कशामध्यें पहायाला देखील फुरसत नाहीं. सारं जग, जगामधील सारीं राष्ट्रं, राष्ट्रांमधील सारे समाज, समाजामधील सारीं माणसं, पैशामागें धांवत आहेत. ज्या राष्ट्राजवळ आज पैसा आहे—तें राष्ट्र शहाणे समजलें जात आहे—ज्या मनुष्याजवळ पैसा आहे, तो मनुष्य शहाणा समजला जात आहे त्याच्याजवळ मेंदू आहे असें म्हटलं जात आहे. तो सर्वगुणसंपन्न आहे, असं समजलं जात आहे. अशी परिस्थिति पाहून देखील जाणूनबुजून हा वेडेपणा करण्यांत काय अर्थ आहे—! जाणूनबुजून समुद्राची खोली पहाण्याचा अट्टाहास धरण्यांत काय अर्थ! माणसाला महत्त्वाकांक्षा असाव्यात—असूं नयेत असं मी म्हणत नाहीं. पण त्या महत्त्वाकांक्षा स्वतःला पेलतील कीं नाहीं, ह्याची प्रथम खात्री करून घ्यावी, प्रत्येकानं—तुझ्या महत्त्वाकांक्षा काय आहेत, काय काय मनोरथ तूं रचले आहेस ह्याविषयीं पूर्ण अज्ञानांत आहे मीं! परंतु, आकांक्षाना पैशाच्या पाठबळाची अतिशय आवश्यकता असते, हें तुला सांगायला पाहिजे कां! पैशाशिवाय महत्त्वाकांक्षा लंगडी पडते हें तुला समजत नाहीं कां! मग आयती संपत्ति जवळ असतांना—त्या संपत्तीचा उपमर्द करण्यांत—त्या संपत्तीला लाथ मारण्यांत काय अर्थ आहे--! तुझ्या आकांक्षा सफल व्हाव्या अशी तुझी मनीषा असेल तर तूं ह्या अविचारापासून दूर हो. आणि मीं सांगितलेल्या गोष्टीचा पुन्हां पुन्हां विचार कर. जी गोष्ट कैक माणसांना करायला जड जाते—तीच गोष्ट एखाद्या लहानशा यंत्राच्या साह्यानें सुलभतेनें करतां येते. आणि पैशासारखं चकचकीत यंत्र जवळ असतांना जगांत अशी कोणतीही गोष्ट नाहीं कीं, जी मनुष्याला करतां येणार नाहीं.

दारिद्र्यामध्यें राहून तुला जितके परिश्रम पडतील त्याच्या अर्ध्यानं देखील परिश्रम पैसा जवळ असल्यावर तुला पडणार नाहींत. विचार कर आणि तुझ्या ह्या मैत्रीणिला होकारार्थी पत्र पाठव."

अभयेला ज्या वेळीं हें पत्र मिळालें, त्यावेळीं ती प्रसन्न मनस्थितीमध्यें होती; आणि म्हणूनच ह्या पत्राचा तिच्यावर विरुद्ध असा कांहींच परिणाम झाला नाहीं.

दीपक आणि ती थट्टाविनोदाच्या ऐन रंगामध्यें असतांनाच पोस्टमननें तिच्या हातांत तें पत्र आणून दिलें. मोठ्या उत्सुकतेनेंच तिनें तें फोडलें आणि हंसत हंसत तिनें दीपकच्या हातांत देत म्हटलें—

' दीपक, जगांत सर्वांत सोपी गोष्ट कोणती— '

थोडा वेळ विचार करीतच राहिला दीपक. कांहीं वेळांनंतर तो म्हणाला.

' जगांत सर्वांत सोपी गोष्ट म्हणजे झोप काढणं—'

'चूक—साफ चूक—! झोप काढणं इतकी सोपी गोष्ट असती तर सारे लक्ष्मीपुत्रांचे चेहरे सुखी दिसले असते आणि कलकत्त्याच्या त्या लक्षाधीशाला जगाच्या दुसऱ्या टोकाहून झोपेच्या औषधी मागवाव्या लागल्या नसत्या—!

एक हात कमरेवर ठेवून अभया गंभीरतेनें म्हणाली.

' मग सर्वांत सोपी गोष्ट म्हणजे जेवणं—! '

दीपकनें पुन्हां प्रयत्न करून पाहिला.

' छट—हें देखील चूक!

' मग बरोबर तरी कोणतं उत्तर!'

' जगांत करायला सर्वांत सोपी अशी

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जर कोणती गोष्ट असेल तर उपदेश. उपदेश करायला लहानपणीं कधीं कोणी कोणाला शिकवत नाहीं. निसर्गतः मनुष्य दुसऱ्या'ला उपदेश करूं शकतो. ही पहा आमची मैत्रीण मला उपदेशाचा डोस देत आहे. हिलाच काय परन्तु हिच्याप्रमाणं साऱ्या जणांना वाटतं कीं, ज्ञानाचा सारा गड्डा—सारासार विचार-शक्तीचं सारें ओझं परमेश्वरानं आपल्या-वरच काय तें दिलंय--वाच तर खरं हें पत्र. मग समजेल तुला.' आणि अभयेनें दिलेलें पत्र हातांत घेऊन दीपक तें वाचूं लागला आणि अभया उल्हासानेंच खिडकीबाहेर लांब अगदीं दूरवर कोठें तरी पहात होती.

* * *

त्या आपल्या मैत्रीणीला रात्रीं ती उत्तर लिहायला बसली, त्यावेळीं तिनें आपल्या वागण्याचं त्या ज्या तऱ्हेनें समर्थन करतां येईल त्या त्या तऱ्हेनें ती करण्याचा प्रयत्न करीत होती. आपण कां अशा तऱ्हेनें वागत आहों—कशासाठीं वागत आहों. सारं सारं कांहीं त्यांत तिनें लिहायाचें ठरविलें—ती लिहीत होती—

' महत्त्वाकांक्षेला पैशाच्या पाठबळाची आवश्यकता असेल—अगदीं आत्यंतिक आवश्यकता असेल. परंतु, तो पैसा जर आयता मिळालेला असेल, महत्त्वाकांक्षेचा मनामध्यें प्रादुर्भाव होण्यापूर्वींच जर हें पैशाचं पाठबळ मागं येऊन उभं राहिलं असेल तर त्या महत्त्वाकांक्षेमध्यें यश मिळणें दुरापास्तच ! आणि सारा सरंजाम बरोबर घेऊन यशाची खात्री असल्यावर एखादी महत्त्वाकांक्षा धरण्यांत काय हंशील. वाघाच्या शिकारीची महत्त्वाकांक्षा धरावयाची, बरोबर चारचौघे उत्तम शिकारी घ्यावयाचे—चांगल्या बंदुका घ्यावयाच्या–वाघाची शिकार कोणत्याजागीं सांपडेल ह्याचा अगोदरच तलास लावून ठेवायचा—मोर्च्याची जागा अगोदरच मुक्रर भरून ठेवायची, झाडांच्या माथ्यावर अगोदरच एक पाळणा तयार करून ठेवायचा—हांका घालणाऱ्या लोकांचा ताफ्याच्या ताफा साऱ्या जंगलभर उभा करावयाचा—आणि वाघ बंदूकीच्या बेतांत आल्यावर त्याची शिकार करावयाची. महत्त्वाकांक्षेसंबंधींचं कल्पनाचित्र अशाच प्रकारचं दिसतंय, विनीते, मला तुझं. तसं जर असेल तर किती चुकीची समजूत करून घेतलेस तूं! महत्त्वाकांक्षेसंबंधीं माझं कल्पनाचित्र असं आहे. विनीते, वाघाची तर शिकार करावयाची मनांत आकांक्षा मी धरली आहे. पण जवळ बंदुक नाहीं. बंदुक विकत घ्यावयासाठीं जवळ पैसा नाहीं; कीं एखादा मित्र नाहीं कीं ज्याच्या जवळून चार दिवसांकरितां ! तो आणतां येईल. पटाईत शिकाऱ्यांची व माझी दोस्ती नाहीं. तेव्हां त्यांच्या मदतीची मला आशाच नाहीं. वाघ कोणत्या जंगलांत सांपडतो ह्यासंबंधीं पूर्ण अज्ञानांत आहें मी. मग मोर्च्याची जागा मी कुठून शोधून ठेवणार ! झाडावर पाळणा बांधायला—मजजवळ पाळणा नाहीं किंवा पाळणा बांधण्याचीं साधनं देखील नाहींत. परंतु, इतकं असून देखील माझी खात्री आहे कीं, वाघाची शिकार मी कधीं ना कधीं तरी–कशी ना कशी ना कशी तरी करणार ! तूं हंसशील माझ्या ह्या कल्पनाचित्राला—पण त्याला माझा नाइलाज आहे. हें सारं झालं माझ्या महत्त्वाकांक्षेसंबंधीं—!

आतां माझ्या प्रेमाविषयीं ! विनीते, तूं आपल्या पत्रामध्यें लिहीतेस, प्रत्येक मनुष्य, प्रत्येक समाज—प्रत्येक राष्ट्र पैशामागं धांवत आहे, सारं जग पैशामागं धांवत आहे;. गोष्ट खरी आहे—अगदीं निर्विवाद खरी आहे. पण धांवणारं हें जग चालतं कशावर ह्याची कांहीं कल्पना आहे तुला. विनीते, सारं जग "प्रेम" ह्या दोन अक्षरांच्या पायांवर चाललं आहे--आणि तसं तें चाललं आहे म्हणूनच तें धांवूं शकत नाहीं. तें प्रेम पातिपत्नीमधील पितापुत्रामधली, मातापुत्रामधील, बंधूभगिनीमधील, मित्रामित्रांमधील, कोणामधीलही असेल; परंतु त्याच प्रेमावर आज सारं जग चालत आहे.

जग पैशामागें धांवत असेल. पण मी ह्या दिव्य प्रेमामागें धांवत आहें–धांवणार आहें. आणि विनीते—प्रेम पैशासाठीं अडून बसत नाहीं–प्रेम रूपाला भाळत नाहीं—प्रेम शरीरसौंदर्याकडे पहात नाही—प्रेमाला बुद्धिमत्तेची आवश्यकता वाटत नाहीं. प्रेम कसं उत्पन्न होतं—कां उत्पन्न होतं, केव्हां उत्पन्न होतं—! असल्या प्रश्नांचीं उत्तरं मी देऊं शकणार नाहीं आणि कोणताही जगामधील मोठ्यांतला मोठा शास्त्रज्ञ देखील त्या प्रश्नाची त्याच्या मनाला पटणारीं उत्तरें देऊं शकणार नाहीं. आणि असले प्रश्न कोणी विचारूं नयेत; आणि कोणी विचारल्यास त्या प्रश्नाचीं उत्तरें देण्याचा कोणी प्रयत्न करूं नये. तें द्रव्य प्रेम कसं असतं हें वर्णन करून सांगतां येणार नाहीं. पण त्याचा ज्याला अनुभव आहे, त्याला त्याची नुसती आठवण देखील सुखद होत असते. त्या प्रेमाची प्राप्ती झालेल्या माणसाला अंधाराची भीती वाटत नाहीं. अंधारांत अज्ञात प्रकाशाचे किरण त्याला मार्ग दाखवित असतात. संकटांची त्याला बिलकूल भीति वाटत नाहीं. दुःखाची तो पर्वा करीत नाहीं. मार्गांतील खडे त्याला बोचत नाहींत. कांटे टोंचत नाहींत, डोंगरदऱ्या चढण्याउतरण्यास त्याला कांहींच त्रास होत नाहीं. नद्यानाले ओलांडण्यास–दऱ्याखोऱ्या ओलांडण्यास तो लीलेनें तयार होत असतो–गरूडासारखी भरारी मारण्यास तो केव्हांही तयार असतो–आकाश ठेंगणें वाटत असतें त्याला.

नर्काचें आस्तित्व संपुष्टांत येतें त्याच्या स्मरणामधून आणि स्वर्ग प्रत्यक्षांत दिसूं लागतो त्याला. तूं म्हणशील, विनीते, कीं माध्यान्हांत पोटाला चिमटे बसूं लागले कीं स्वर्ग आठवत असेल त्या प्रेमिकाला–! प्रेमानं पोटं भरत नसतात; पैशानंच भरत असतात तीं. पण मग निव्वळ पोट भरण्यासाठींच साऱ्या आयुष्यभर खटाटोप करीत असायंच असेल तर कित्येक मार्ग आहेत–भलेबुरे कां ते असेनात—!

प्रेमिकांच्या पोटाला बसलेल्या चिमट्यांची जाणीव इतरांना जितक्या कठोरतेनें होते तितकी ती इतरांना होत नसते. आणि खऱ्या प्रेमाचा अनुभव जर कोणाला घ्यावयाचा असेल तर तो दरिद्री बनूनच प्रत्येकानें घ्यावा-निष्कांचन बनून प्रेमाची गोडी जितकी अनुभवाला येते तितकी कशानेंही अनुभवाला येणार नाहीं. त्यावरून तूं म्हणशील. "शेपूट तुटलेल्या कोल्ह्यासारखं करते" आहे, अभया ! पण विनीते--प्रेमाचा प्रश्न पुरा वैयक्तिक आहे. सांगून सवरून कोणावर कोणाला प्रेम करतां येत नाहीं किंवा प्रेमाचा त्याग देखील करतां येत नाहीं. मग अशा त्या प्रश्नाबद्दल कोणी कोणाजवळ चर्चा करीत बसूं नये, हेंच उत्तम.

तूं पत्र लिहिलेंस म्हणून त्याला उत्तर लिहिलें आहे हें."

तुझी
अभया

पत्र पुरें करून तिनें फाउंटनपेन खालीं ठेवली. तोंच वाऱ्याची एक गारशी झुळुक खिडकीमधून आंत आली आणि मोठ्या उत्साहानें ती खुर्चीवरून उठली.

स्त्री–रोग चिकित्सक तज्ञ
डॉ. पुरंदरे
म्हणतात—

अति रजोस्राव, अतिदमिन रजोस्राव, मुळींच रजोस्राव न होणें तसेंच गर्भपात होण्याची घातुक संवय वगैरे गर्भाशयासंबंधींच्या सर्व तक्रारी दूर करण्यास ' युटेरीन एलिक्झीर ' हें फारच उत्तम औषध आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विशाल हृदय ::

लेखकः—
व्यंकटेश नीलकंठ पंडित

अनीति पोसा, तिला अप्रत्यक्ष उत्तेजन द्या, असं नाहीं मी म्हणत. झाले व होतात ते प्रकार घाणेरडे खरेच पण त्यांत-ल्या त्यांत उपाय शोधावे, धैर्य दाखवावं असं मी म्हणतों!

"कुठं चलायचं आज फिरायला विश्वनाथ?"

"तूं म्हणशील तिथं. पण केशव, हें पहा आज जरा शहराबाहेर जाऊं या बुवा. रोजरोजचे ते रस्ते नकोत"

'ठीक आहे'

यांप्रमाणें त्यांनीं आज वेगळ्या बाजूला फिरावयास जावयाचें ठरविलें आणि ते निघाले. विश्वनाथ हा कायद्याचा विद्यार्थी आणि केशव एम्. बी. बी. एस्. फायनलला बसून निकालाची वाट पहात होता. उन्हाळ्याच्या सुटीमुळें दोघेही घरीं आलेले होते.

शहरापासून अर्धा मैल दूर गेले असतील आणि समोरून एक मोलकरीण बजाबाई कडेवर गोरें पान आणि बाळसेंदार मूल घेऊन येतांना दिसली. ती बाई केशवकडे पाहून ओळखीच्या माणसानें पाहून हंसावें तशी किंचित् हंसली. केशवनेंही जरासें स्मित केलें व तें विश्वनाथच्या ध्यानांत आलें.

"केशवराव, काय आहे हा प्रकार?" शंकापूर्ण स्वरानें विश्वनाथानें विचारलें.

"कोणाचं आहे तें मूल, असं तुला वाटतं?" केशवनें उलट विचारलें.

"हें कांहीं माझ्या प्रश्नाचें उत्तर खास नाहीं"

"पण त्याच्या उत्तरांतूनच तुझें उत्तर आपोआप मिळेल. सांग तर तुझा कयास!"

"मोलकरणीजवळ आहे त्या अर्थी एकाद्या बड्या गृहस्थाचं असेल"

"छट्"

"तर मग कुणाचं!"

"मूल माहीत असूनहि तें कुणाचं आहे हें मला माहीत नाहीं"

"म्हणजे! याचा काय अर्थ!"

"तें पहा समोर 'अनाथ मंदिर' दिसतं आहे ना तिथलं आहे हें मूल. आणि ही मोलकरीणही तिथलीच आहे. मी इथं आलों म्हणजे नेहमीं तिथं जाऊन शक्य तेवढा वैद्यकीय सल्ला देतों आणि म्हणून माझी आहे ओळख. आलं लक्षांत ही बाई कां हंसली तें."

"आतां आलं ध्यानांत. पण कां रे, तुझा प्रवेश कसा झाला!"

"आमचे नाना या मंदिराचे खरे-खुरे संस्थापक आणि आर्थिक सहाय्यक आहेत."

"खरंच कां तुझे वडील इतके परोपकारी आहेत!"

"वडिलांबद्दल मी काय बोलूं! मला त्या ठिकाणीं प्रवेश मिळाला आणि वाटेल तिथें त्यांत प्रवेश आहे याचं कारण हेंच"

"अगदीं खरं कां!"

"तर तर! ही थट्टा नव्हे!",

"मग केशव मला दाखीव ना रे आंतून तें. माझी अत्यंत इच्छा आहे तें पहायची. तिथें येणाऱ्यांचें, ऐकतों कीं रजिस्टर असतें म्हणून"

"होय. मूल येते वेळीं त्यांत सर्व नोंद करावी लागते. अर्थात त्याची अत्यंत गुप्तता राखण्यात येते"

'तूं पाहिलंस कां कधीं तें रजिस्टर!'

'होय'

'मग केशव मलाही फार फार जिज्ञासा—'

'पण एका अटीवर'

'कोणती!'

'आतां तुझं मन जितकं कोरं आहे तितकंच कोरं परत येतांनाही रजिस्टरांतल्या नांवागांवाविषयीं ठेवलें पाहिजेस.'

'माझें आश्वासन घे हें'

आज कितीतरी दिवस त्याला ही उत्कंठा लागली होती; अन् ती आज अशा अचानक रीतीनें तृप्त होण्याचा योग जमून आला होता. मात्र या उत्कंठेंत समाजांतील कुलंगडीं आपल्याला समजावींत, त्यावर बाजारगप्पा पसरवितां याव्यात, एकाद्या पतित स्त्रीस त्यायोगें आडसड्यांत आणावें अशापैकीं एकही घाणेरडा हेतू नव्हता. उलट समाजघटनेचा विचार करण्यांत नवा मार्ग सांपडतो कीं काय, हे पहावें हा त्याचा हेतू होता. केशवनें तरी ही गोष्ट इतक्या चटकन् केली. याचें कारण हेंच कीं, त्याला विश्वनाथाच्या विचारांची पूर्ण कल्पना होती.

प्रवेशद्वाराशीं जातांच केशवनें घंटेचें बटन दाबलें. थोडक्याच वेळांत दार उघडलें जाऊन एक गृहस्थ आला.

'नमस्कार हरिभाऊ' त्याला उद्देशून केशव म्हणाला.

'या दादासाहेब! मला वाटलं कुणी दुसरं आलं—'

'छे, छे! ये रे, विश्वनाथ, आंत'

दोघे आंत गेले आणि दरवाजा पुनः बंद झाला.

'हें मुख्य ऑफिस. इथें सगळा रेकॉर्ड असतो. या समोरच्या निरनिराळ्या खोल्या. तो तिकडे हॉल जेवायचा, हें खेळायचें पटांगण, शिकण्याची वगैरेची शक्य तेवढी व्यवस्था अ त आहे. अगदीं तान्ह्या मुलांसाठीं कांहीं wet nurses ही आहेत" केशव सांगत होता.

ते दोघेही दाराशीं जाऊन थांबले.

"निराळं विश्वच आहे. असंच म्हणेनास" विश्वनाथ म्हणाला.

"जवळ जवळ तसंच आहे. चल आतां तुला मुलं दाखवतों हं. नुसतीं पहायचीं हो. कांहीं विचारूं नकोस."

"हें काय, हीं मुलं रांगेनं उभीं आहेत."

"हीं जाणतीं मुलं आहेत. सारीं प्रार्थनेला जमलींत"

"यांना प्रार्थना!"

"साऱ्यांचं दैवत एकच आहे"

"किती गोड मुलं आहेत. निव्वळ फुलं आहेत फुलं. यांना स्वतःविषयींचं अज्ञान म्हणजे अमृत आहे नाहीं!"

"अगदीं अक्षरशः खरं! आज इतकं पुरं. आतां रजिस्टर दाखवतों अन् मग जाऊं."

ते पुन्हां मुख्य कचेरीशीं आले.

"हरिभाऊ, रजिस्टर आणा" केशव म्हणाला.



CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केशवला रजिस्टर न द्यायची कोणाची हिंमत होती !

" विश्वनाथ, हें बघ रजिस्टर अन् चटकन् दे "

अंधाशाप्रमाणें त्यानें रजिस्टर चाळलें. एकेक नांव वाचून—त्यापुढील इतिहास वाचून त्याचे डोळे अधिकच विस्फारले गेले. त्यानें सरसरी पंधरा केसेस वाचल्या.

" चल आण ! नाना येतील एवढ्यांत. आपण जाऊं ! पुन्हां कधीं तरी पुढें ! "

केशवनें रजिस्टर काढून घेतलें आणि ते बाहेर पडले.

' काय वाटलं विश्वनाथ, तुला ? "

केशवला प्रश्न

' मोठी चूक होते आहे '

' कोणची ? '

' यांतल्यां कांहीं कांहीं अर्भकांच्या जन्मदात्यांना हीं मुलं अगदीं घरीं वाढवणं शक्य असून तीं यांना इथं ठेवतात ही "

' वेडा आहेस तूं "

' अरे कुणी सांगावं ! यांतलीं कांहीं मुलं त्यांच्या जन्मदात्यांनीं अल्पकाल लोकापवाद सोसून वाढवलीं, तर यांतून मोठमोठे पुरुष निर्माण होतील कदाचित्. एकादा राष्ट्राला तारणारा राष्ट्रभक्त, एकादा समाजसेवक, एकादा दैवी देणगीचा वक्ता निपजेल यांतून पण आतां मुलाचं भवितव्य काय आहे ? उदर भरण्याची ताकद आली कीं, हे जीव उडून जातील आणि खरोखरच लोकाश्रयावरील या संस्था, त्यांनीं यापेक्षां काय अधिक करावं ! चुका झाल्या त्या कबूल आहेत. पण नीटपणें दुरुस्त कां करूं नयेत ? अनीति पोसा, तिला अप्रत्यक्ष उत्तेजन द्या, असं नाहीं मी म्हणत. झाले व होतात ते प्रकार घाणेरडे खरेच पण त्यांतल्या त्यांत उपाय शोधावे, धैर्य दाखवावं असं मी म्हणतों !

' होय तुझ्या विचाराचे कैक लोक मी पहातों. पण आचाराचा मात्र औषधाला सुद्धां नाहीं. बाबा, हें करायला कठीण आहे. '

' कसलं आलेय हें कठीण ?'

' उद्यां तुझ्यावर असला प्रसंग आला—'

' म्हणजे मी करूनच दाखवीन—'

' नको बोलूंस असं—'

' हा विश्वनाथ आहे ! आहे ना माहीत ! '

एवढ्या अवधींत ते घरीं पोंचलेही. केशवला या संवादानें मुळींच त्रास झाला नाहीं. कारणं तो इतका खोल विचार करणारा नव्हताच. विश्वनाथाला मात्र यामुळें बेचैन झाल्यासारखें झालें. त्याला खरोखरच अनाथ मंदिरांतील निष्पाप मुलांची कींव वाटत होती. जन्मदात्यांच्या अविचारीपणाबद्दल विनाकारण शिक्षा झालेले ते एकाप्रकारचे खरेखुरे निरपराधी कैदी होते असें त्याला वाटूं लागलें. केवळ अनाथमंदिरांत ठेवलें गेल्या कारणानें त्यांचें भवितव्य कायमचें अंधारमय ठरलें होतें. या तऱ्हेचे नाना विचार त्याच्या मनांत थैमान घालूं लागले. वरील गोष्टींच्या पंधरा दिवसानंतर विश्वनाथाच्या परीक्षेचा निकाल लागून तो वकील झाला व थोडक्याच दिवसांनीं केशवही एम्. बी. बी. एस. उत्तीर्ण झाला. ही गोष्ट जून मधली.

* * *

केशव आणि विश्वनाथ आज विश्वनाथासाठीं मुलगी पाहून आले होते.

' कशी काय वाटली मुलगी, केशव ? "

" मी म्हणतों उत्तम आहे "

' असं ना ! तर मग होणार ही तुझी वहिनी. आई, काकांना सांगतों हा अभिप्राय '

' अगदीं खुशाल '

' अन् माझ्या लग्नांत तुला Best man म्हणून वावरावं लागेल हो ! '

' अर्थात '

मुलीच्या गांवीं लग्न व्हावें असें विश्वनाथाच्या वडिलांनीं कळविलें. परंतु, त्यांच्या कडील लोकांनीं ते कबूल केलें नाहीं आणि अखेर विश्वनाथाच्या गांवींच लग्न व्हावयाचें ठरलें.

मंगलाष्टकें संपून अंतर्पाट काढला होता. मुलीकडील मंडळींच्या चेहऱ्यावर अपूर्व समाधानाचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. अभिनंदनार्थ आलेल्या तारा केशव विश्वनाथाला वाचून दाखवीत होता. निर्मला विश्वनाथाच्या वधूचें नांव—अधोवदन बसली होती. तिच्या चेहऱ्यावरील भावना दिसणें शक्य नव्हतें. परंतु, बारकाईनें पहाणारास ती गळल्यासारखी दिसत होती, हें समजलें असतें.

' भटजी, आणखी किती वेळ या खोड्यांत पडावें लागणार आहे '

' लागतीलच दोन अडीच तास.चढा त्या बोहल्यावर '

' विश्वनाथ, दोन अडीच तास नव्हे; आतां जन्मभर आहे हा खोडा '

' कर थट्टा ! ही थट्टेची वेळ आहे. '

वधुवर बोहल्यावर चढलीं. होम हवनला सुरवात झाली. विश्वनाथ खालीं पाटावर बसला होता. तारांचा वर्षाव संपून पत्रें यावयास सुरवात झाली होती. विश्वनाथ स्वतः पत्रें वाचीत होता.

" विश्वनाथराव, पत्र जरा बाजूला ठेवा. एवढी सप्तपदी झाली म्हणजे मग वाचा. "' भटजी

' हें एवढें पत्र वाचतों अन् मग बाकीचीं नंतर वाचीन '

विश्वनाथानें पत्र वाचलें आणि त्याची चर्या गंभीर झाली. त्यानें निर्मलेकडे भेदक दृष्टीनें पाहिलें.

' कुणाचेंरे पत्र ?' केशव म्हणाला

' फार जुन्या मित्राचें. भटजी या सप्तपदीला काय महत्व आहे हो ?' विश्वनाथानें विचारलें

' कां ?'

' नाहीं ! म्हटलं आवश्यक असेल तर करा नाहींतर नको. मला आतां याचा कंटाळा आला आहे '

' छे, छे ही काय गोष्ट आहे ! सप्तपदी हीच खरी विवाहग्रंथींची धर्ममान्यता आहे. सप्तपदीपर्यंत विवाह हा विवाह नाहीं ठरत. एवढेंच काय पण सप्तपदीपर्यंत वराला कांहीं बरें वाईट झाल्यास वधूला वैधव्य येत नाहीं '

' अगदीं खरेंच कां गुरुजी !' विश्वनाथानें अत्यंत अधीरतेनें विचारलें.

' तर तर !'

निर्मलेच्या छातींत ' धस्स ' झालें.

' काय उकिरडा विषय काढलासरे, विशा !' केशव आंबट तोंड करून म्हणाला.

" असं ना भटजी ! करा सप्तपदीला सुरवात लवकर "



बाळ, तुझ्या पराक्रमापुढें तुझें हें मूल लोक खास विसरतील.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विश्वनाथ धीरपणें व शांतपणें म्हणाला.

निर्मलेच्या हृदयाला हायसें वाटल्यासारखें दिसलें.

आणि अर्ध्या तासांत ती विश्वनाथाची धर्मपत्नी झाली.

विवाहसमारंभ आटोपला. सगळी मंडळी आपल्या ठिकाणीं जाऊन चार दिवस लोटले. विश्वनाथ–निर्मलेच्या एकांत प्रथम भेटीचा प्रसंग. भीत भीत निर्मलेनें आंत पाऊल टाकलें. तिचे पाय थरथर कांपत होते.

' ये ' विश्वनाथ गंभीरतेनें म्हणाला.

ती कांहींच बोलली नाहीं

" अगदीं खरं सांगशील ना मला ' तो पुन्हां म्हणाला.

तरी देखील ती कांहीं बोलली नाहीं. तो काय विचारणार होता तें तिला पक्कें कळलें होतें. त्याची कबुली देखील तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट होती.

' अगदीं खरं आहे ना तें पत्र ! ' त्यानें खोदून विचारलं. '

' हो ' ती अस्पष्टपणें म्हणाली.

' मलाही सप्तपदी पूर्वींच ही गोष्ट कळली होती '

* * *

तें पत्र असें होतेंः–

प्रिय विश्वनाथ,

हें पत्र तुला वेळेवर मिळेल कीं नाहीं कोण जाणे. परंतु, वेळेवर मिळाल्यास मात्र हें लग्न करूं नकोस. मित्र या नात्यानें मी माझें कर्तव्य बजावीत आहें. तूं मला विसरला आहेस हें दिसत आहे. कारण मला तुझ्या लग्नाची मुळींच कल्पना तूं दिली नाहींस आणि म्हणून हें पत्र कशा वेळेस तुला मिळतें याची कल्पना मला नाहीं. तरी मी माझें कर्तव्य करतों. या मुलीला—निर्मलेला चांगले तीन महिने लोटले आहेत. तूं सूज्ञ आहेसच.

तुझा मित्र
बाळू (विद्याधर नेने)

× × ×

' क्षमा करा मला. मी पतित आहें. अपराधी आहें. मला तारून न्या यांतनं. समाजाच्या होळींत नका टाकूं पुन्हां ! मला भीति वाटते आहे. '

निर्मलेनें विश्वनाथाच्या पायावर हात टेकले होते.

' उठ, उठ, वेडी आहेस कां तूं ! असं असतं तर मला सप्तपदीपूर्वीं ही गोष्ट कळूनं आणि तोंपर्यंत लग्न मोडणें शक्य असूनही–त्या वेळचें भटजीचें बोलणं तूं ऐकलंसना--मी ती पार पाडली; त्याच वेळेस मी तुझा अंगिकार केला. तुझ्या नाहीं आलें हें लक्षांत. ये, ये अशी जवळ ये. '

इतकें म्हणून त्यानें तिला ओढून हृदयाशीं घट्ट धरलें.

' किती विशाल हें हृदय ' ती अस्पष्टपणें बोलत होती.

आणि, मागें पारधी लागलेला असतांना सशाचें पिलूं अभयस्थानीं आपल्या आईच्या कुशींत तितकें स्वस्थ पडावें तितक्या स्वस्थपणें ती विश्वनाथाच्या बाहुपाशांत पडली होती; सशाच्या नेत्रांतील भय आणि काळजाची धडधड हींही तिच्या नेत्रांत आणि हृदयांत तितकींच प्रतीत होत होतीं.

'निर्मले, पुन्हां समाजाच्या व्याघ्रमुखांत टाकायसाठीं कां तुझा अंगिकार केला मीं. कुणाची प्राज्ञा आहे या माझ्या धर्मपत्नीविरुद्ध ' ब्र ' काढायची. मी तिचा सर्वस्वीं स्वामी आणि पाठिराखा–'

' खरंच ! खरे आपणच माझे परमे—' ती स्फुंदत होती.

' होऊं दे, लोकनिंदेच्या आगीचा वर्षाव खुशाल होऊं दे. त्यांत हें फुल आणि ही कळी तिच्या पोटाकडे पहात तो म्हणत होता–" मी होरपळूं देणार नाहीं. आपण आतां एकजीव झालें आहोंत. मी कांसवाची पाठ अन् तूं आंतली बाजू बरं कां. त्याच्या पाठीची ढाल करतात ना त्याप्रमाणें मी ढाल आणि तूं--गवताची काडी टोंचूनही प्राण जाईल म्हणतात असलं तूं त्याचं आंतील मृदु अंग '

त्याच्यापेक्षांही अधिक दृढतेनें तिनें त्याला आपल्या अशक्त व कोमल हातांनीं विळखा घातला.

अनंतकालपर्यंत याच अभयस्थानांत पडून रहावें, आपला हा आसरा दुरावूं नये असें तिला वाटत होतें कीं काय कोण जाणे !

* * *

समाज—पुरुषाचे कान मात्र फार तिखट असतात. दूर रानांत जरी वृक्ष; समाजांतील एकाद्या व्यक्तीविषयीं कांहीं कुजबुजलें—आणि ती निंदा असल्यास हटकून—तर त्याची वार्ता गावांतील चावडी-चावडीवर येतेच येते. जसा कांहीं चावडीवर या गोष्टींचा लाउडस्पीकरच लावलेला असतो. लवकरच आठ दिवसांत बातमी हां हां म्हणतां गांवभर पसरली. विश्वनाथासमोर लोक कुजबुजूं लागले. घरांत आईला तर ही गोष्ट प्रथम उमगली.

' विसू, सूनबाईचं लक्षण कांहीं बरं नाहीं दिसत. माहेरींच राहूं दे तिला. इथं नको ही पीडा ' ती म्हणाली.

' अहं ! ती आतां मजजवळच रहाणार आहे. हवं असेल तर मीच तिला घेऊन वेगळा होतों. '

' अगदीं खुशाल ' वडीलही मध्यें येऊन म्हणाले.

आणि खरोखरच ते दुसऱ्या दिवसापासून वेगळे राहूं लागले. यामुळें तर खरी गोष्ट सर्वांना पुरतेपणीं समजली. केशवलाही अर्थात् समजली.

' विश्वनाथ, वहिनीबद्दल गावांत फार वाईट बातम्या पसरताहेत. तुझाही दुर्लौकिक होतो आहे. सारं खरं आहे कां हें !' केशवनें विचारलें.

' होय ' तो शांतपणें म्हणाला.

" मग असं कर. गुप्तपणें प्रकृतीच्या सबबीवर आणि कायद्याच्या पकडींत न सांपडेल अशा तऱ्हेनें मी वहिनींना सोडवतों. एवढें वैद्यकीय ज्ञान मला आहे '

' छट मला तें नको आहे '

' मग निदान अनाथ मंदिरांत जाऊं दे '

' तूंच कां सांगतो आहेस मला ! दुसरा कोणी असता तुझ्या जागीं तर " मूर्ख " म्हटलं असतं मी. तुला आठवते ना ती मे महिन्यांतील गोष्ट '

' पण विसू, विषाची परीक्षा नको घेऊंस—'

'माझं मला समजतें आहे नीट. समाजांतील एका घटकानें केलेला हा अविचार आहे. एकानं गाय मारली म्हणून मी वांसरूं मारणार नाहीं. निर्मलेला होणाऱ्या अर्भकाला या . गावांत इथें या घरांत वाढवीन. त्या अनाथ मंदिरांत धाडून त्याचं भविष्य मी नाहीं अंधारांत लोटणार समजलास. निर्मलेचा मी धर्मबद्ध ' नाथ ' आहें आणि तिला होणाऱ्या पोराचा कायदेशीर पिता आहें. एक तरी उदार पुरुष दुनियेंत आहे, हेंही पटूं दे दुनियेला. अन् यांतूनही तुझी केव्हांही व कोणतीही मदत लागलीच तर तुला अवश्य कळवीन. तूं जा कसा. '

यावर काय बोलणार केशव. वाचावीर नसून कर्मवीर आपल्यासमोर उभा आहे हें त्याला पटूं लागलें.

' विसू, मी जातों तर. तुझं एवढें धैर्य असेल तर मी देखील तुला हवं तें साह्य वाटेल तेव्हां देईन '

विश्वनाथाला किती तरी समाजटीकेचें विष प्राशन करावें लागत होतें, परंतु तें पचविण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगांत होतें.

' कायहो, हे नवीन वकील पुरुष तरी आहेत का खरे. मला नाहीं वाटत असतील म्हणून. कारण खऱ्या पुरुषाला असला प्रकार सहन होईलसं मला नाहीं वाटत. इतकी दुराचारी पत्नी घरांत बाळगणं म्हणजे शुद्ध अपौरुष आहे '

इतक्या घाणेरड्या टीका त्याच्या कानावर येऊं लागल्या. परंतु तरी तो पर्वताप्रमाणें अविचल होता. त्याला जर कुणी तसें स्पष्ट म्हटलें असतें, तर तो म्हणाला असता

' मोलकरणींशीं किंवा इतर स्त्रियांशीं संबंध ठेवणारे किती विवाहित आणि अविवाहीत लोक तुम्हांला दाखवूं. त्यांच्या बायका देतात कां त्यांना हांकून ! समाज तरी त्यांना शासन करतो काय ! तेव्हां कुठें जाते समाजाची अक्कल ! एक स्त्री बिघडणं म्हणजे त्या बरोबर चार पुरुष तिला बिघडवीत असतात, स्वतःही बिघडलेले असतात हें समजायला नाहीं कां समाजाला अक्कल ! स्त्रीच काय ती पतित असते अन् पुरुष नाहींत कीं काय, या कुकर्मासाठीं अजाण अर्भकांना काय म्हणून शिक्षा. या फुलांना काय म्हणून आगींत टाका. '

या नंतर पांच महिन्यांनीं केशवला विश्वनाथाचें बोलावणें आलें. आणि केशवही धांवूनच आला.

' केशव तुझं आज काम आहे '

' हा मी तयार आहे, विसू ! '

' हे पन्नास रुपये घे आणि निर्मलेला सूतिकागृहामध्यें पोंचव. करशील ना एवढें ! '

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'ठीक आहे.'

विश्वनाथाच्या अलौकिक दयेनें व उदारतेनें निर्मला अगदीं शरमून गेली होती. केशवनें मोटार आणली व विश्वनाथानें हातानें धरून निर्मलेला मोटारींत बसवली. आणि मोटार गेली.

दोन तासांनीं केशव परत आला.

'विसू, अगदीं वेळेवर नेलंरे वहिनीला!'

'असं कां?'

'हो, कारण तिथें गेल्यावर अर्ध्या तासांतच त्या प्रसूत झाल्या'

'काय झालं?'

'विसू, It is a boy! A beautiful child so said the nurse मुलगा! सुरेख मूल झालंय असं नर्स म्हणाली'

'असं कां. कर्तृत्वशाली पुरुषाचा तर हा अंकुर नाहीं ना! I wish he to be a great man माझी इच्छा आहे कीं तो थोर पुरुष निघावा"

'ईश्वराची इच्छा'

'कुणी सांगावें तो खरोखरच एकादा महापुरुष होणार नाहीं म्हणून!!

दहा दिवसांनीं निर्मलेला परत आणावयासाठीं विश्वनाथ व केशव मॅटर्निटी होममध्यें गेले. तिच्या खोलींत पडदा लावलेला होता. ते दोघेही दाराशीं थाऊन थांबले. कारण ती कांहींतरी बोलत आहे असें त्यांच्या कानीं आलें. ते ऐकूं लागले—

"वरं कां बाळ, असा कर्तृत्वशाली पुरुष नीघ कीं त्यामुळें तुझ्या या आईला लागलेला कलंक थोडा तरी पुसून निघेल. बाळ, तुझ्या पराक्रमापुढें तुझें हें मूळ लोक खास विसरतील. कालांतरानं. कारण तूं पुरुष आहेस. पराक्रमाच्या, कर्तृत्वाच्या तेजानें लोकांचे डोळे असे दिपवून टाक कीं, तुझा हा कलंक—तुझा नव्हे माझा—लोकांना दिसणार नाहीं. आपल्या जन्मदात्याच्या—या कायदेशीर जन्मदात्याच्या, ज्याचं नांव आपल्या नांवापुढें तूं लावशील त्यांच्या उदारतेकडे पहा, त्यांच्या विशालतेकडे पहा. ते नांवाचे विश्वनाथ नाहींत तर कृतीचे विश्वनाथ आहेत. तुझा शारीरिक संभव जरी दुराचारांत झालेला असला, समाजाला मीहि त्यांत आहेच हं—पापाचार करतां येतात मात्र; पण, निस्तरतां येत नाहींत तरी तुझा खराखुरा जन्म—आध्यात्मिक जन्म याच प्रत्यक्ष पुरुषाच्या मनोते जानं झाला आहे. आज त्यांनींच माझं ढालीसारखं रक्षण केलें आहे; अन् तुझ्यावर छत्र धरलं आहे. तुला नाहीं कल्पना कीं, त्यांनीं आजवर किती लोकनिंदेचे विष पचवलें आहे अन् पुढेंही पचवतील. बाळ, तूं माझ्याकडे नको पाहूंस. आज ते नसते तर तूं झाला असतास का! मी तरी राहिलें असतें कां! राहिलें असतें तरी तूं नदीच्या प्रवाहांत वाहात गेला असतास किंवा फार तर अनाथ मंदिरांत वाढून अदृश्य झाला असतास. पण यांच्यासारख्या धीर पुरुषा—पण काय मी वेडी बाई! या दहा दिवसाच्या पोराला समजतं कां कांहीं यांतलं'

असें अर्धवटपणें म्हणून तिनें त्या अर्भकाला हृदयाशीं कवटाळलें आणि एवढ्यांत केशव आंत येऊन म्हणतो

'वहिनी, हें तर दहा दिवसाचं निष्पाप अजाण पोर आहे! परंतु, या दीड शहाण्या समाजपुरुषाला तरी या गोष्टी समजतील कीं नाहीं, कोण जाणे! विश्वनाथाच्या उदार अंतःकरणाची, धीरगंभीरतेची, व धैर्याची किंमत एक तुम्हांला, मला किंवा त्याची त्यालाच माहीत आहे. या मूर्ख समाजाला नाहीं ही दृष्टी. ये विश्वनाथ! ये ना आंत; अरे असा बाहेरच कां उभा, ये!'

'आं! ते आलेत कीं काय बाहेर!"

एवढें बोलून ती रडूं लागली. सजल नेत्रांनीं तिनें दाराकडे पाहिलें, तों दारांत विश्वनाथची धीरगंभीर व अचल मूर्ति उभी होती. जन्मदाता नसूनहि त्याच्या डोळ्यांतील वात्सल्य तिला दिसत होतें.

'निर्मले, किती वेडी आहेस तूं. किती घट्ट धरलं आहेस त्याला! आण दे त्याला इकडे'

त्यानें त्या अर्भकाला घेतलें व त्याचें एक चुंबनही घेतलें आणि म्हटलें—

'बर कां बाळ, तुझ्या या आईचा संदेश सांग जगाला. चांगले कान पीळ त्याचे पुढें. हं असा कतृत्ववान् नीघ!

एकप्रकारची विलक्षण मंगलमय शांतता तिथें भासत होती.

जेवण्या व राहण्याच्या उत्तम सोयींचें पुण्यांत पहिल्या प्रतीचें

गेस्ट—हाऊस

शहराच्या मध्यवस्तींत—प्रासादवजा भव्य इमारतींत—हवशीर जागेंत

लक्ष्मीरोड वरील गणपतीचौकांत

सिंगल फॅमिली रूम्सची स्पेशल व्यवस्था!

सुग्रास भोजन-बादशाही सुखसोयी आणि माफक दर.

जर्मन पॉकेट पिस्तूल



ह्या पिस्तूलसाठीं सरकारी परवानगी लागत नाहीं. यापिस्तूलाचा उपयोग खऱ्या पिस्तूलाप्रमाणें करतां येतो. इतकेंच नव्हे तर एकामागून एक असे दहा आवाज करतां येतात. सदर पिस्तूलाचा नाटक कंपनीला स्टेजवर अति उपयोग आहे. किंमत रु. पांच, व्ही. पी. ख बारा आणे प्रत्येक पिस्तुलाबरोबर पंचवीस काडतुसें फुकट. जास्ती पाहिजे असल्यास दोन रुपये शेंकडा.

एम्. गोविंद आणि कंपनी,

मुंबई नं. ४

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

— आमची दोन नवीं प्रकाशनें —

मराठ्याची मुलगी

(ऐतिहासिक कादंबरी)

ले. सरस्वतिकुमार

मूकपटांच्या काळांत रुपेरी पडद्यावर अत्यंत लोकप्रिय झालेली ऐतिहासिक कथा.

* * *

राजाराम कालीन राजनिष्ठेसाठीं पति-प्रेमाचा बळी देण्याचें दिव्य करणाऱ्या क्षत्रीय विरांगनेची हृदयस्पर्शी कथा.

किंमत १ रुपया

विकारी वात्सल्य

(सामाजिक कादंबरी)

ले. भा. वि. वरेरकर

वैवाहिक जीवनांतील अनेक प्रसंगाचें यथोचित व स्पष्टपणें दिग्दर्शन करणारी नवलपूर्ण कादंबरी.

* * *

अशिक्षित त्याचप्रमाणें सुशिक्षित स्त्री-जीवनाचें मार्मिक विश्लेषण.

* * *

घटस्फोटाचें सोपत्तिक प्रतिपादन करणारी कादंबरी.

किंमत १॥ रुपया

प्रकाशकः— मौज प्रिंटिंग ब्युरो

खटाव वाडी, गिरगाव मुंबई ४.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उद्धारक—

लेखक —प्र. ग. सहस्रबुद्धे, नागपूर.

खेड्यांतील मास्तर म्हणजे एक ठराविक नमुना ! टकल्या डोक्यावर एक जुनी पगडी, बटबटीत डोळ्यांवर मुलांनीं अधिक घाबरावें म्हणून लावलेला चष्मा, कळकट काळा कोट, लालसर मळकें धोतर, आणि पायांत फाटका पुणेरी जोडा.

बस्स ! ज्याचा म्हणून खेड्यांत हा थाट आढळून येईल तो मास्तर ! निदान बनगांवच्या मास्तर तरी अगदीं अशा थाटाचा होता.

पण हो आतां बनगांवचा मास्तर नव्हता तो. त्याची बदली झाली होती. दुसरा मास्तर आतां तेथें बदलून येणार होता.

तीन दिवस मुलांना सुट्टी मिळाली. त्यांना आनंद झाला. नवा मास्तर कसा असेल याबद्दल त्यांचे तर्कवितर्क सुरु झाले. त्यांतच तीन दिवसांची सुट्टी गेली. चवथा दिवस उजाडला. सकाळीं रोजच्या वेळेवर सर्व मुलें शाळेंत आलीं. मनांत घडविल्यासारखा मास्तर त्यांना कुठेंच दिसला नाहीं. मास्तर आलाच नाहीं असें समजून त्यांनीं आपली गडबड चालूं ठेवली. पण तोंच टेबलावर छडी वाजली आणि ते टवकारून पाहूं लागले. मास्तर आला तर ! त्यांना वाटलें आला असेल झालं पूर्वी सारखाच दुसरा एखादा खेकडा, पण पहातो तों काय—

सारेंच निराळें. एक सावळेंसें किड-किडीत शरीर, खादीच्या रंगीत कोटांतून व काचा मारलेल्या पांढऱ्या शुभ्र धोतरां-तून डोकावत होतें. डोक्यावर इवलीशी खादीची पांढरी टोपी आणि पायांत कोंकणी वाहणा.

नव्या मास्तरांचे वर्णन साऱ्या गावांत पसरलें. मुलेंच तीं. त्यांनीं एकादा मनांत आणलें, मग काय उशीर ! नवीन मास्तर म्हणजे खेड्यांतील एक कौतुक होऊन बसलें. सकाळीं मास्तर शाळेंत जात तेव्हां चावडीवर किंवा सोनूसुताराकडे, शेताला जाण्यापूर्वीची चिलिम भरीत मंडळी बसलेलीं असत. नवीन मास्तरांशीं कांहीं बोलायला मिळावें, परिचय करण्या-करितां वाट करावी म्हणून ती मंडळी मास्तरांस म्हणत—

' राम राम, मास्तर ! शाळेला चाललांत ? '

आणि मग ' हो. सात वाजून गेले ना ' असें म्हणून व त्यांचा रामराम स्वीकारून मास्तरांनीं पुढें जावें.

विहिरीवर देखील, ' देख व नया मास्तर जाई न्हायना शाळेला ' म्हणून एखादीनें म्हणावें कीं लगेच खडखड वाजणारे पोहरे थांबत आणि माना वळ-वून त्या नव्या मास्तराकडे कौतुकानें पहात.

* * *

या नव्या मास्तरांचे नांव शरद होतें. शरद म्हणजे एक अजब प्राणी होता. चांगला एल.एल. बी झालेला. वाटेल तिथें फक्कडशी नोकरी मिळाली असती त्याला. पण, सर्व साधारण लोकांसारखें करील तर तो शरद कसला ! न्यायी टीकाकार, प्रसिद्ध निबंधलेखक ! खळबळ उड-वून येणाऱ्या कादंबऱ्या लिहिणारा तो कादंबरीकार शरद, एका खेड्यांतील मराठी शाळेंत मास्तर झाला; आणि तेंही सरकारी शाळेंत नव्हे तर ग्राम-सुधारणा करणारी एक संस्था होती तिच्या खासगी शाळेंत. तेथें त्याला अवघा पंधरा रुपये पगार मिळणार होता. पण, त्याला पैशाची मुळींच काळजी नव्हती. तो म्हणायचा, गरीब लोकांस शिकवायचें म्हणजे त्याच्या स्थितीचाही अनुभव यायला हवा.

त्याला आतां समाधान वाटत होतें. कीर्तीच्या सोनेरी कळसाच्या मार्गाला आपण लागलों याबद्दल त्याला आनंद वाटत होता. त्याकरितांच त्यानें वडि-लांचीं बोलणीं खाल्लीं होतीं, आईला रडविलें होतें, बायकोला कायमचें माहेरीं धाडलें होतें. त्याचेसमोर आतां एकच ध्येय होतें.—

देशसेवा–समाजकार्य–कीर्ती.

त्याचे विचित्र पसंतीबद्दल कित्येकांनीं त्याला विचारलें होतें. सर्वांस त्यानें एकच उत्तर दिलें—

" तुम्हांला खेड्यांतील मजा माहीत नाहीं म्हणून तुम्ही असें बोलतां. खरो-खर खेडें म्हणजे एक नंदनवनच असतें! तेथील त्या निरक्षर आडदांड लोकांत मिसळून रहाणें हीसुद्धां एक कला आहे. शिवाय तेथें राहून, त्यांच्या जीवनाचा अभ्यास करून, त्यांच्या परिस्थितीचें निरी-क्षण करून आपल्या देशांतील दीन जनतेची जी सेवा करतां ती काय येथें चालविलेल्या नुसत्या व्याख्यानबाजीनें होणार आहे !'

या त्याचे स्पष्टीकरणानें कित्येकांचे मनांतील त्याचेविषयीं आदर दुणावला. आणि सहाजिकच होतें तसें ! ती कल्पना किती तेजस्वी आणि सुंदर होती !

मुलगा अगदींच हट्ट सोडीत नाहीं ! मग काय करणार ! आईवडिलांनीं त्याला नाखुषीनें परवानगी दिली. पण आदले दिवशीं जेवण झाल्यानंतर वडि-लांनीं सहज त्याला आपल्या खोलींत बोलाविलें.

' बाळ, जाणारच ना तूं !'

' हो कधींच ठरवलं मी तें '

'नाहीं ! मग मीं म्हणतों वेणूसह बिऱ्हाड करायला काय हरकत आहे !'

शरदचा चेहरा गंभीर झाला.

' बाबा, तुम्ही पुन्हा पुन्हा तोच प्रश्न कशाला विचारतां ! '

' मी एकदां सांगितलें कीं, मीं स्वतःला वाहून घेतलें आहे. हें पत्नीचें लोढणें मला गळ्यांत अडकवायचें नाहीं. '

' नाहीं बाळ ! कोणाही मानवाचें जीवन पत्नीच्या सहचर्याशिवाय अपूर्ण रहातें. तिचे शिवाय कोणाचेंही जीवन पवित्र, उज्ज्वल होऊं शकत नाहीं– '

' हें ऐकून ऐकून कंटाळा आला आहे मला बाबा ! माझी खात्री आहे वाटेल त्या परिस्थितींत मी पवित्र राहूं शकेन ! माझा आत्मविश्वास कधींही फोल ठरणरा नाहीं'

तो उठला आणि खोली बाहेर पडला.

आईनेंही पुन्हा त्याला तेंच सांगितलें. अगदीं अंतरांतून आलेल्या मायाळू शब्दांत सांगितलें ! डोळ्यांत आसवें आणून सांगिनलें !

पण, देशभक्तीपुढें मातापित्याच्य प्रेमळ बोलांची किंमत करणारांपैकीं तो नव्हता ! शरद जावयास निघाला तेव्हां त्याचे सर्व मित्र मंडळींनीं मिळून त्याला एक लहानशी मेजवानी दिली. त्यांना त्याचें फार कौतुक वाटत होतें. ते म्हणत शरद खरा अभ्यासू लेखक आहे. खेड्यांत जाऊन तो त्या लोकांच्या जीवनाचा अभ्यास करील. त्यांना शिकवील, उन्नत स्थितीला आणून पों-वील ! देशाच्या उत्कर्षाची खरी कळकळ आहे त्यांचे अंतरांत !

झाडून सारे मित्र स्टेशनवर आले होते त्याचे. आपण शरदचे मित्र आहोंत, याबद्दल प्रत्येकास अभिमान वाटत होता.

* * *

खेड्यांतील सारेंच तंत्र शहरापेक्षा निराळे असतें. मग शाळेचें तरी कसें जुळतें असणार ! तेथें सकाळीं व संध्या-काळीं दोन्ही वेळ शाळा भरे. शरदला सोयीचेंही पडे.

सकाळीं शाळा सुटल्यावर घरीं येऊन स्वयंपाक करावा, जेवावें आणि मग वाचन करीत बसावें. नंतर दुपारीं दीड दोन वाजतां पुन्हां शाळा !

पांच वाजतां घरीं आल्यावर जेवून फिरायला जावें. त्यानंतर घरीं परतून आल्यावर लेखन करीत बसावें. असा त्यानें आपला क्रम आंखला होता.

एकंदर सारी व्यवस्था अगदीं उत्तम लागली होती.

पण चांगलीशी करमणुक म्हणून किंवा गप्पा मारायला, गोष्टी करायला मात्र कोणीच नव्हतें. कारण त्याची ओळख अजून कोणाशींच झाली नव्हती. ती लवकरच झाली. आणि तीहि फारच मजेदार !

ती दुपारची वेळ होती. जेवण वगैरे त्यानें नुकतेंच आटोपलें होतें. मागें तक्याला टेंकून आतां बाजूच्या कपाटा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तून कोणचें पुस्तक काढावें याचा तो विचार करीत होता. हळू हळू कसलेसें गाणें गुणगुणत होता.

तितक्यांत तिकडे दार किलकिलें झालें.

त्याचें लक्षच नव्हतें.

एक पाऊल आंत आलें.

बांगड्यांचा आवाज आल्यामुळें शरदनें मागें वळून पाहिलें.

त्यानें ओळखलें—

ज्या पाटलाचे घरांत तो रहात होता, त्याची ती बायको होती.

' काय कुणीकडे आलांत ? "

गडबडीनें तो म्हणाला.

' कांहीं काम नव्हतं तसं '

' हूं. '

' उगाच आलें मीं. आपली शेतावर जायंच आहे तेव्हां किती वेळ झाली—'

' असं होय ! साडेबारा झाले आहेत आतां,' ती त्याला फारच सुंदर दिसली. खेड्यांत रहाणाऱ्या बायकाही सुंदर असतात याबद्दल त्याला आश्चर्य वाटत होतेंसे त्याचे चेहऱ्यावरुन कोणीही ओळखलें असतें.

पण खेड्यांतील स्त्रिया कां नसाव्यात सुंदर ! उलट निसर्गाजवळ असणारें सारेंच सुंदर--असतें. तेथें घाण कोणी करीत असेल तर तो मानव. अल्हाददायक निर्झर जिथें खळखळ करीत आनंदानें बागडतो तिथें हा जाऊन सारें पाणी गढूळ करून टाकतो.

कशा करितां !—

केवळ चार क्षणाच्या आनंदा करितांच—

ती खरोखरच सुंदर होती, वर्ण गोरा म्हणजे अगदीं केतकीसारखा नसला, तरी फुलत्या तारुण्याची तकतकी चेहऱ्यावर खेळत असल्यामुळें ती फारच मोहक दिसत होती. साधें अन्न खाऊन पुष्ट झालेले तिचे अवयव तेजस्वी दिसत होते. अंगमेहनतीच्या कामामुळें तिचे शरीरास एक प्रकारचा रेखीवपणा आला होता. शिवाय मामाकडे जाऊन जो शहरी दिखाऊपणा तिनें बरोबर आणला होता तो निराळाच.

ती तशीच त्याचेकडे पहातच राहिली. शरदनें जरा पुस्तकाकडे दृष्टी वळविलेसें केलें.

' शाळेला केव्हां जातां तुम्हीं ! '

' अडीच वाजतां '

मग पुन्हां शरदकडे पहात ती निघून गेली.

—आणि त्यानंतर रोजच ती तशी येई. तिचा नवरा शेतावर जात असे. त्याला मदत करण्याकरितां म्हणून तीही घरांतील सर्व कामें उरकून निघे शेतावर जाण्यापूर्वी किती वाजले तें ती विचारून जाई. खरें म्हटलें तर घड्याळातील वाजण्यावर तिचें कांहींच अवलंबून नव्हतें. लवकर गेली असती, तर शेतांतील चार कामें तिला जास्त करतां आलीं असती. पण मुद्दामच कीं काय न कळे, रोज ती साधारण बारा वाजण्याचे सुमारास वेळ विचारण्यास येत असे.

आकरा सव्वा आकरा झाले होते. जेवण वगैरे आटोपून तो आपल्या बैठकीवर येऊन पडला. त्याचे मनांत आज तिचे विषयींचे विचार चालू होते.

'—बाकी हें खेड्यांतील सौंदर्य म्हणजे कांहीं निराळेंच. रेखीव कमानदार भुंवया सरळ नाक, डौलदार बांधा—"

त्याचें मन नकळत स्वैरपणें भडकत चाललें होतें. स्वतःसच धिक्कारुन त्यानें एकादें चांगलेंसें पुस्तक काढलें, उघडलें आणि समोर धरलें. पण समोर धरणें म्हणजे कांहीं वाचणें नव्हे. त्याचे डोळे अक्षरांवरुन फिरत असले तरी मन निराळ्याच विचारांमागें फिरत होतें.

मागील कांहीं प्रसंग त्याचे डोळ्यांसमोर पुन्हा उभे आहेत असें त्याला वाटलें.

किती वाजले विचारण्यास ती आली होती. अजून बारा वाजण्यास बराच वेळ असल्याचें आपण तिला सांगितलें. तिनें घरची माहिती विचारली, मग आपल्या पत्नी-संबंधानें थट्टा करूं लागली.

' मग मास्तरीणबाईंनां कां नाहीं घेत बोलावून ! '

आपण कांहींच बोललों नाहीं—

' एकट्या जिवाला कसं करमतं बाई ! तिनें पुन्हा विचारलें.

आणि मग तुमच्यासारखीं माणसं आहेत ना सोबतीला असें आपण उत्तर दिल्यावर ती किती गोड लाजली !

लिहिणें शिकविण्याबद्दलचा तिचा नेहमींचा हट्ट ती त्या दिवशीं जास्तच धरून बसली. अगदीं पाटी पेन्सिल आणून तयार झाली. शेवटीं त्यानें ' श्री ' चा धडा दिला. पण, किती वेळ झाला तरी तिला धडपणें गिरवतां देखील येईना.

शेवटीं ती अगदीं त्रासली. तिनें पाटी खालीं ठेवली. पेन्सिल फेंकून दिली.

' इश्श, काय हें लिहिणं, हातसुद्धां वळत नाहीं माझा. '

मग त्यानेंच तिचे हातांत पेन्सिल दिली आणि तिचा हात धरून ' श्री ' म्हणून तिला धडा वळवून दाखविला.

त्याला वाटलें होतें, शेतांतील अवघड मातकामें करणारा तिचा हात नुसता लाकडासारखा असेल. पण किती मांसल आणि कोमल होता तो !

मग ' आजचे सुशिक्षित ' हें पुस्तक हातांत घेऊन तो तिला हंसत म्हणाला होता—

' येवढं देखील लिहितां येत नाहीं तुला ! हें पहा येवढें सारें पुस्तक लिहिलें मीं. '

तिनें त्या पुस्तकांतील आपला फोटो पाहिला आणि मग कितीवेळ तरी सारखी एकदां आपल्या चेहऱ्याकडे व एकादा त्या फोटोकडे असें पहात होती. किती सुंदर अभिनय होता तो !......

छेः नको ते विचार !

तोंडावर पुस्तक पालथें टाकून तो आपलें मन शांत करूं लागला.

त्यानंतर फार वेळ झाला नसेल. दाराची एक फळी उघडली गेली व ती आंत आली.

' मास्तर ! ' तिनें हांक मारली

थोडें जवळ येऊन तिनें पुन्हां हांक मारली. पण मास्तर जागे झाले नाहींत.

अगदीं जवळ जाऊन तिनें त्याचे तोंडावरील पुस्तक उचललें.

ती तशीच वाकलेली होती.

तो उठून बसला.

दोघांचीं तोंडें एकमेकांवर आदळलीं.

ती दूर झाली.

' आज फार लवकरच निघालीस, सारजे ! '

त्यानें हंसत विचारलें.

' घड्याळ कुठं आहे ! कोनाड्यांत नाहीं दिसत ! '

' आंतल्या खोलींत आहे. '

घड्याळ आणण्याकरितां ती आंत गेली.

शरद उठला. त्यानें दाराला कडी लावली. आणि आपल्या बैठकीवर येऊन तो उभा राहिला.

घड्याळ आणून तिनें मास्तरांना दाखविलें. तो हंसला.

' अजून कितीतरी अवकाश आहे ! '

आणि जवळ येऊन त्यानें तिचा हात धरला.

लहान मुलांसाठीं, वैशिष्ठ्यपूर्ण चटकदार व उपयुक्त मासिक म्हणजे

खेळगडी

हंसत खेळत करमणुकीच्याव्दारा मुलांना ज्ञान देणें हें याचें वैशिष्ठय आहे.

आपल्या मुलांसाठीं आजच मागवा

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या

दिवाळी अंकाचा फायदा मिळवा

हा दिवाळी अंक म्हणजे मुलांना मेजवानी देणगीच वाटते. किरकोळ अंक मिळत नाहीं. वर्गणीदारांस मात्र फुकट मिळतो.

वार्षिक वर्गणी फक्त २ रु. ४ आ.

खेळगडी कार्यालय, मुंबई नं. ४

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाश्चात्य वधूपरिणीत समाज

लेखक —
श्री. त्र्यं. केतकर.



हीं वर दिलेलीं (ऑगस्टच्या अंकांतील) पाश्चात्य स्त्रियांशीं लग्न करणाऱ्या गृहस्थांचीं उदाहरणें माहीत असलेल्या कुटुंबांपैकीं आहेत. याशिवाय दुसरीं अनेक उदाहरणें देतां येतील. तथापि, प्रस्तुतच्या स्वरूपाची विवेचना करण्यास अधिक उदाहरणांची आवश्यकता नाहीं. विशिष्ट प्रकारच्या विभागांच्या अनुभवानें आणखी कांहीं उदाहरणें द्यावीं लागतील.

पाश्चात्य वधूपरिणीत समाजाचें भवितव्य काय होईल हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. हिंदू धर्मास आहे त्यापेक्षां अधिक सर्वसंग्राहक स्वरुप आलें, तर त्यांचा अन्तर्भाव त्या समाजांत होईल यांत शंका नाहीं. ब्रह्मसमाजाचें जरी स्वरूप अत्यंत उदार मताचें आहे, असें त्या समाजाच्या पुढाऱ्यांकडून सांगितलें जातें, तरी तें तसें नाहीं. कारण त्यांचें औदार्य ख्रिस्ती मंडळींना जवळ करण्यापुरतें जरी असलें तरी हिंदुसमाजाच्या संबंधानें तिरस्कारबुद्धि वाढविणार आहे आणि ब्रह्मसमाजाचा जन्म परंपरागत संस्कृतीच्या पराभवांत झालेला आहे, विकासांत झालेला नाहीं; आणि त्यामुळें जो त्या समाजाकडे वळेल, त्यास अत्युच्च संस्कृतीचे असे जे आपण ते अधिक उदार होऊन इतरांस योग्य सन्मान देऊन बरोबरीनें वागवितों अशी भावना समूहांत न वाढवतां आम्हीही साहेबांजवळ जवळ येत चाललों आहोंत, आम्हीही मूर्तिपूजा सोडली आहे या प्रकारची वृत्ती पसरविणारें होईल अशी भीति स्वाभाविकपणें पाश्चात्य वधू करणाऱ्या अनेक सुशिक्षित व्यक्तींना वाटते; आणि यासाठीं असली मंडळी ब्राह्मसमाजापेक्षां आर्यसमाजच अधिक पसंत करतात.

पाश्चात्य वधू करणारांचें एक दोन पिढ्यांनन्तर भवितव्य काय होतें, याची कल्पना एक दोन उदाहरणांवरून थोडीशी देतां येईल, कांहीं मुली हिंदु समाजांतील ब्रह्मोशीं लग्न झालें नाहीं किंवा झालेलें लग्न मोडलें तर मुसलमानांशीं लग्न करतांना दृष्टीस पडतात. सध्यां पुढें आलेल्या एका सुशिक्षित नर्तकीची गोष्ट अशांतलीच आहे. जातिबद्ध हिंदु समाजांत शिरणें कठीणच जात असल्यामुळें त्यांनादेखील अत्यंत अल्प क्षेत्रांत लग्नें करावीं लागतात. कांहीं मंडळी जरी पाश्चात्य देशांत जाऊन राहिली, तरी देखील त्यांच्या वंशजास रक्ताची जाणीव होऊन त्यांचे पाय हिंदुस्तानकडे वळले असें दृष्टीस पडलें. बोस्टन येथील एका बंगाली डॉक्टरला स्कॉच बायकोपासून दोन मुली झाल्या होत्या. त्या चांगल्या देखण्या होत्या. त्या मुलींनीं हिंदुसमाजांत लग्न करावें असें बापाचें मुळींच मत नव्हतें. तर तुम्ही अमेरिकन नागरिक आहांत, तुम्ही अमेरिकन मनुष्याशींच लग्न करा, असें होतें. इंग्लिश सत्तेखालीं वागणाऱ्या हिंदूंशीं बिलकूल संबंध ठेवूं नका असें तो मुलींना सांगे. मुलींची हिंदूंशीं बिलकूलच ओळख होणार नाहीं, याबद्दल तो काळजी घेत असे. पण, एक मुलीनें शेवटीं बंगाली तरुणाशीं ओळख केलीच आणि विशेषतः क्रांतिकारकांच्या गोटांत ती सामील झाली, असें ऐकूं आलें होतें व मध्यें त्या हिंदुस्थानांत प्रवासही करून गेल्या असें कळतें.

असल्या कुटुंबाच्या सौख्याविषयीं विचार करतां हें सांगावें लागतें कीं, कांहीं असुखी झालेलीं लग्नें मागच्या यादींत आलेलीं आहेत; तथापि, कांहीं कुटुंबांचें असौख्य जरा प्रमाणाबाहेरच गेलेलें दिसतें.

' मागें दिलेलें उदाहरण नं. ९ यासंबंधी नुकतीच वर्तमानपत्रांतून बातमी आली आहे कीं, हिंदी नवऱ्यानें आत्महत्या केली आहे. आत्महत्येचें कारण समजलें नाहीं. पूर्वींच्या अनेक उदाहरणांवरून कांहीं गोष्टी स्पष्टपणें नजरेस येतात व त्या म्हटल्या म्हणजे जरी पाश्चात्यांशीं विवाहसंबंध करण्याची मोकळीक किंवा संधि तेथें जाणाऱ्या बहुतेक तरुणांस सारखीच असली तरी देखील असे विवाह क्वचितच होतात ही होय. हिंदुस्तानी लोक इतर देशांतील कोणत्याही लोकांपेक्षां अन्य देशीयांबरोबर विवाह करण्यास तयार नसतात, ही गोष्ट लक्षांत आल्यावाचून राहात नाहीं. लग्न करण्यास नाखूष असणाऱ्या व्यक्तींमध्यें जातीची भावना असलेले हिंदूच असतात असें नाहीं. पाश्चात्यांशीं लग्नें करण्यास नाखूषी किंवा अडचण ही हिंदु, मुसलमान व पारशी या सर्वांसच सारखी असते असें दिसतें. एवढेंच केवळ नव्हे तर इंग्लंडांत गेलेल्या ख्रिस्ती लोकांतदेखील इंग्रजांशीं लग्नव्यवहार करणारा वर्ग थोडाच असतो. मी अमेरिकेला असतां तेथें एक इंग्रज पदवीधर (रामलिंगम रेड्डी जे पुढें आंध्र विश्वविद्यालयाचे व्हाईस चॅन्सेलर झाले ते) आले होते व ते हिंदू विद्यार्थ्यांच्या गैर वर्तणुकीवर टीका करीत होते ते म्हणून कीं, " हिंदू विद्यार्थ्यांना खालच्या वर्गांतील पोरींशींच दोस्ती करावी असें कां वाटतें ! मध्यम वर्गीय मुलींशीं ते फारसा संबंध कां ठेवीत नाहींत असें लोक विचारतात." असें म्हणून त्यांनीं हिंदू लोकांच्या हलकटपणावर बरें च तोंडसुख घेतलें. त्यावेळीं मी त्यांना उत्तर दिलें कीं, ' जेव्हां केवळ विवाहाबाहेर स्त्रीपुरुषसंबंध संकल्पित असतो. तेव्हां तरुणांची प्रवृत्ति कनिष्ठ वर्गीय स्त्रियांकडेच व्हावयाची हें अगदीं स्वाभाविकच आहे. कारण पाश्चात्य स्त्रियांशीं कांहीं लग्न करावयाचे नसतें. कारण तें लग्न धर्मबाह्य होईल व आपण समाजाबाहेर पडूं ही त्यांस भीति असते पण तशी भीति

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विवाहाविरहित संबंध ठेवण्यांत नसतें, हें माझें उत्तर ऐकून एकदम नीत्यावेशाचा आव आणून " तुमचा धर्म स्त्रियांशीं अयोग्य संबंधानें बिघडत नाहीं, योग्य संबंधानेंच बिघडतो ! " अशा तऱ्हेचे त्यांनीं उद्गार काढले. वस्तुस्थिति तशी आहे खरी एवढेंच मी उत्तर दिलें.

इंग्लंडसारख्या देशांत जाऊन देखील तेथें होतात त्यापेक्षां अधिक लग्नें झालीं नाहींत याचीं कारणें अनेक आहेत. धार्मिकदृष्ट्या हिंदू कायद्यानें अन्य समाजांतील स्त्रिया अविवाह्य आहेत ही भावना बऱ्याच काळपर्यंत हिंदूंस नियंत्रक झाली असेल यांत शंका नाहीं. पण, मुसलमानांची स्थिति तशी नाहीं. ख्रिस्ति अगर यहुदी स्त्रियांशीं लग्नें करण्यास मुसलमानांस परवानगी असतांना देखील त्यांचीं पाश्चात्य स्त्रियांशीं लग्नें क्वचितच होतात. आणि याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे दोन समाजांतील रहाणीमधील अन्तर होय. पुष्कळ तरुण मुसलमान इंग्रज स्त्रियांशीं लग्नें केल्यानंतर हिंदुस्थानांत परत येण्यास भीत असत. कारण बुड्डा (बाप) ख्रिस्ति बाईशीं लग्न केल्याबद्दल जरी रागावला नाहीं तरी तो तिला पड्यांत राहाण्यास सांगे व त्यामुळें सुनासासऱ्यांचा खटका उडे. या खटक्याला भीत असलेल्या मुसलमानास शेवटीं हिंदुस्थानांत आल्यानन्तर त्याच्या बायकोस पड्यांत रहावें लागेच. आणि त्याच्या बायकोचा हिन्दी मंडळीशीं लग्न केलेल्या दुसऱ्या इंग्रज स्त्रियांशीं जेव्हां संबंध येई तेव्हां आपण नवऱ्यास खूष करण्याकरितां त्याच्या बापाच्या अपेक्षेस संमति दिली, याबद्दल पश्चात्ताप व्यक्त होत असे. एका सुप्रसिद्ध पंजाबी पुढाऱ्याची इंग्रज बायको—घरी गेल्यानन्तर तिला असें आढळून आलें कीं, आपणांस दोन सासवा आहेत. एक सख्खी, व दुसरी सावत्र; आणि तिच्यासाठीं तिच्या सासवेनें जी एक खोली पाहून ठेविली होती ती देखील तिचा पडदा घट्ट करण्याकरितांच होती. आणि हें तिला कळल्याबरोबर तिनें सासरच्या घरांत राहाण्याचें नाकारलें व त्यामुळें नवराबायकोचाही खटका उडाला. नवरा जरी बॅरिस्टर झाला होता तरी त्याला पुरेसे पैसे मिळूं लागले नव्हते, दोन मुलें झालीं होतीं व बापाकडून पैसा अपेक्षित होता व यासाठीं तूं आपल्या मुलांना सासऱ्याकडून पैसा मिळावयास पाहिजे. म्हणून सासऱ्याला दुखवूं नकोस. असें सांगून तिला पडदानशीन करण्याचा प्रयत्न तिच्या नवऱ्यानें केला. ही गोष्ट एका मुसलमानाची नसून आर्यसमाजी हिंदूंची आहे आणि यावरून सामाजिक अडचणी कशा उत्पन्न होतात तें कळून येईल.

सुमारें २०।१५ वर्षांपूर्वीच्या काळांत जी कांहीं हिंदूंची पाश्चात्त्याशीं लग्नें झालीं, त्याचें कारण हिंदूंतील बालविवाह हेंही एक होतें. विद्यार्थी शिकून आला म्हणजे त्याला उपवर मुली मिळतच नसत व त्यामुळें कांहीं लग्नें पाश्चात्त्य स्त्रियाशीं झालेलीं आहेत, त्याप्रमाणेंच कांहीं लग्नें अशांची झालीं आहेत कीं, ज्यांना हिंदू समाजांत मुली मिळण्यास त्याच्या जातीच्या अल्पसंख्यांकत्वामुळें अडचण येते. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे मिश्र विवाह होतांना तो प्रथम अडचणींत असलेल्या व्यक्तींकडून होतो असें दिसून येईल. कांहीं व्यक्तींची अडचण पुष्कळ लोकांच्या लक्षांत येण्यासारखी नसते. यासाठीं अशा प्रकारचें एकच उदाहरण देतों.

सुमारें २२ वर्षांपूर्वी कलकत्ता युनिव्हर्सिटींतील माझ्या एका अध्यापन-सहकारी बंगाली कायस्थाचें लग्न एका इंग्रज मुलीशीं झालें. त्या लग्नानंतर मी त्याच्याकडे जेवावयास गेलों असतां जेवून परत येतांना आमचें रस्त्यांत बोलणें जरा मोकळेपणानें झालें. त्यावेळेस त्यानें आपल्या लग्नाचें कारण पुढीलप्रमाणें दिलें होतें तें असें—

मी ब्राह्मो आहें; आणि ब्राह्मो समाजांतील जो वरचा वर्ग आहे त्याला मी मोठ्या पगाराच्या नोकरींत नाहीं किंवा बॅरिस्टरी करीत नाहीं (त्यावेळेस या गृहस्थास पगार फक्त २५० रु. च होता) म्हणून मी अविवाह्य आहें. ब्राह्मोंतील जो दुसरा एक वर्ग आहे, त्याच्या मनांत अजून जातिभावना चिकटून आहे आणि त्यांच्यामध्यें मुलीदेखील फारशा शिकलेल्या नाहींत. आणि त्यांच्या मुलीशीं ओळख होऊन मग लग्न व्हावें ही शक्यताच नाहीं. अगोदर फार तर फोटो दाखवितील; पण, या पलीकडे मात्र ते जाणार नाहींत. आणि त्यांच्यापैकीं देखील कांहीं मंडळी मला वांशिक कारणांमुळें लग्नाला अयोग्य ठरवीत आहेत. कारण माझे वडील व आई ही एकाच जातीचीं नव्हतीं. ह्या इतक्या सर्व भानगडी ज्या ब्राह्मो समाजांत आहेत, त्यांची एकंदर संख्या किती, तर ४-४॥ हजार आणि दुरून मुलगी दाखवून लग्न जुळविणाऱ्या व्यक्ती देखील एक दोनच निघाल्या. अशा स्थितींत माझें १॥ वर्ष गेलें. शेवटीं मी माझ्या इंग्रज पूर्वपरिचितेस लग्नाकरितां मागणी घातली आणि ती स्वीकारली गेली. असा माझा थोडक्यांत वृतान्त आहे.

हा समाज जरी विविध आहे तरी संख्येनें लहान आहे आणि संख्येच्या अल्पत्वामुळेंच त्याच्या भवितव्याविषयीं विधान करण्यास जरा अडचणीच उत्पन्न होतात; तथापि एक विधान मात्र केलें पाहिजे. ते हें कीं, परदेशीय लोकांशीं विवाह देशाभिमानी लोकांस अपकर्षक होतील किंवा हिंदू संस्कृतीच्या मताभिमान्यांस अपकर्षक होतील असें वाटत नाहीं. उलट हिंदू संस्कृतीच्या संबंधानें आग्रही मंडळी देखील या वर्गांत दृष्टीस पडतात. हिंदूंचा परदेशीं हिंदू राहून जर विवाहसंबंध झाला तर तो ब्राह्मण वर्गाच्या जागतिक महत्त्वास साधकच कसा होईल ही गोष्ट मी 'भारतीय समाजशास्त्रांत' विवेचली असल्यामुळें त्याची पुनरुक्ति येथें करीत नाहीं. मलाही ही एक गोष्ट शक्य वाटते कीं, निरनिराळ्या जातींना समतेनें वागविणारा व देशांतील सर्व ज्ञातींशीं लग्नें करण्यास अनुकूल असा अखिल भारतीय प्रतिष्ठित वर्ग निर्माण होण्यास हा समाज उपयोगी पडेल, आणि त्यायोगें तो भारतीयांच्या प्रतिष्ठित वर्गांमध्यें संघटनाकारी असाही होऊं शकेल.

जडी बुटीचीं औषधे खात्रीनें सर्व ऋतूंत उत्तम गुण देतात
खालील औषधें खोटी आहेत हें सिद्ध करणारास
दोन हजार रुपये इनाम
(१) बंधेज गोळ्याः—धातू पातळ झाल्यानें लघवींत किंवा स्वप्नांत जाणें, उष्णता, आळस, चेहरा फिका वगैरे दोष असे पळतात, जसे हवेमुळें मच्छर. ७ दिवसांत धातु घट्ट होते. ७ दि. किं. रु. २. (२) जवानमर्द मोदकः—हें बाणेदार औषध सुस्त व कमजोर शरीरांत नवीन रक्त उत्पन्न करून घट्ट, पुष्ट, व मस्त बनवितें. शिथिलता, हृदय, मेंदू व कमरेची अशक्तता, निराशा वगैरे २१ दिवसांत असे पळतात जसें वाघास पाहून हरणः—पुरुषत्व व स्त्रीप्रसंगीं वीर्यस्तंभनशक्ति इतकी जोरदार वाढते, कीं खाणेवाला 'जवानमर्द' बनतो. धातु घट्ट करण्यास प्रथम 'बंधेज गोळया' घेऊन नंतर आठवे दिवसापासून हे मोदक सुरू करणारा फारच आनंद लुटतो. २१ दि. किं. २ रु.
(३) कामशक्ति नवजीवनः—अति स्त्रीप्रसंगानें व मुष्टिमैथुनानें ज्यानें आपला सत्यानाश करून घेतला, अशास व ६०–७० वर्षांच्या म्हाताऱ्यास हें खरोखर नवजीवन देतें. 'बंधेज गोळया' घेत असतांना ह्या तेलाची मालीश गुप्तेंद्रियास सुरू ठेवल्यानें नपुंसकता, शिथिलता, बारीकपणा, लघुत्व, वांकडेपणा वगैरे असे पळतात, जसे मांजरास पाहून उंदीर किं. रु. १॥। वरील पद्धतीनें हीं तीनही औषधें घेणारास शंभर टक्के गुण येतोच कामशक्ति इतकी जोरदार वाढते कीं, आटोक्यांत ठेवणें कठीण जातें. अगदींच खात्रीचीं औषधें आहेत.
मुंबई एजन्ट } १ माधव एजन्सी मॅजिस्टिक सिनेमाजवळ, गिरगांव.
२-इ पॉप्युलर फार्मसी, ग्रँटरोड व रानडेरोड दादर (बी. बी.)
व्ही. पी. पार्सलनें खालील खास पत्त्याहूनच मागविणें. पो. ख. ८ आणे.
मॅनेजर नवजीवन दवाखाना, (म) नागपूर सिटी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुतळ्यावरचा डाग

ले:—लीला ग्रेज बी. ए. (ऑनर्स)

खरं म्हटलं तर कोणत्याही विषयावर विचार केल्याखेरीज तडकाफडकीं मत देणें योग्य नसतं ! पण कधीं कधीं क्षुल्लक गोष्टी देखील मनावर अशी कांहीं छाप पडतात कीं, त्यामुळें कित्येक दिवस-रात्र न सुटलेले प्रश्न सुटकीसरशीं डोक्यांत येतात.

त्याचं असं झालं ! सदानंद नुकताच बी. ए झाला होता. तेव्हां त्याच्या भवि-ष्याची काळजी असलेल्या सर्व जवळ-च्या मंडळींनीं त्याला वकिलीचा अभ्यास करण्याविषयीं सुचविलें. पण सदानंद पडला जात्याच शांतताप्रेमी. कायदेबाजी-च्या कटकटींत आयुष्य कंठण्यापेक्षां कुठेंतरी आदर्श शिक्षक म्हणून कोवळ्या जीवांच्या जगांत शांतपणें दिवस घालविण्याची कल्पना त्याला अधिक पसंत होती. आणि वकिलींत तरी आतां काय राम राहिला आहे ? रात्रं तर जिवापाड धडपड करून अशीलं मिळवायचीं, लाजलज्जा गुंडाळून ठेवून, स्वतःची स्तुति व इतर वकिलांची निंदा करून त्यांचा आपल्यावरील विश्वास कसा-बसा टिकवायचा व स्वतःचं घर भरण्या-साठीं अगदीं तळीरामाच्या मुर्दाडपणानं त्याच्या तावडींत सांपडलेल्या अशीलांचें कोर्टबाजीनें व्यसन अधिकाधिक वाढ-विण्याची शिकस्त करायची ! हे व असेच कितीतरी विचार मनांत येतांच सदानंदाला वाटे कीं बस्स—स्वतःचं मन मारून असा नावडता धंदा करण्या-पेक्षां शिक्षकाचा उदार पेशा पत्करलेला बरा. आणि त्याला कांहीं कमी नव्हतें. घरची सुस्थिति असल्यामुळें त्याचेवर अर्थार्जनाची विशेष जबाबदारी अशी कांहींच नव्हती. पण, सर्व वडीलधाऱ्या मंडळीला वाटे—सदानंदानें खूप शिकावं—वकिलीची परीक्षा द्यावी व चांगला हुशार वकील किंवा न्यायाधीश म्हणून त्याचा लौकिक व्हावा. सदानंदाला वाटे—काय प्रत्येकाच्या आकांक्षा बाळगतात सारे—! पण त्यांना माझ्या स्वतःच्या आवडी-निवडीची मुळींच पर्वा नाहीं.

बी. ए. व्हायच्या आधींच या संबं-धांत वादविवादांना आरंभ झाला होता—पण—! त्यावेळीं त्याची उत्क-टता त्या मानानं जरा कमी होती ! आतां सदानंद बी. ए. झाला, तो म्हणे—मी " बी. टी " ला जाणार !

त्याचे हितचिंतक म्हणत—नं " लॉ " घेच !

स्वाभाविकपणें त्याची द्विधा मनः-स्थिति त्याला चैन पडूं देईना ! म्हणून कुठेंतरी बेचैन जिवाला शांतपणें विचार करायला जागा मिळावी या इराद्यानें तो चौपाटीवरील आपल्या एका मित्राच्या स्टुडियोंत गेला.

विश्वास जगताप हा मुंबईचा नामां-कित शिल्पकारांत मोडत असे. त्यानें चौपाटीवरील एका तळमजल्यावरील फ्लॅटमध्यें आपल्या शिल्पकामाचा स्टुडियो ठेविला होता. सदानंदाच्या कुटुंबाचा व त्याचा दाट घरोबा आणि सदानंदाला देखील विश्वासच्या स्टुडियोंत रोजची फेरी टाकून त्याच्याशीं जिव्हाळ्याचे असे शब्द बोलण्याखेरीज मुळींच करमत नसे ! इतकी त्यांची दाट मैत्री.

सदानंद रोजच्या नेमाप्रमाणें स्टुडि-योंत आला, त्यावेळीं विश्वास एका संस्था-निकाच्या फोटोवरून त्याचा (चिकण-मातींत) अर्धपुतळा करण्यांत गुंतला होता.

चार चार फूट उंचीच्या पेडेस्टलवर असे कितीतरी (चिकण मातीचे) अर्ध पुतळे ओल्या फडक्यांत लपेटून ठेविलेले होते. भिंतीबरोबर ठेविलेल्या मोठमोठ्या शेल्फवरून प्लॅस्टरमध्यें ओतलेलीं अशीं आणखी किती तरी मॉडेल्स नीट मांडून ठेविलीं होतीं.

रस्त्यावरून संध्याकाळची येजा सुरू झाली म्हणजे बाहेरून दिसणाऱ्या त्या निरनिराळ्या माणसांच्या मूक आकृतीं-कडे कुतुहलानें पहात स्टुडियोच्या दरवा-जांत किती तरी वाटसरू थबकत व कधीं कधीं परवानगी मिळाल्यास आंत येऊन सर्व स्टुडियो देखील पाहून जात. हमरस्त्यावर स्टुडियो असल्यामुळें त्याच्या धंद्याची अप्रत्यक्षपणें चांगली जाहिरातहि अनायासें होत असे.

सदानंद आला तेव्हां विश्वास आपण करूं घेतलेल्या पुतळ्याला ठिकठिकाणीं माती चिकटवून त्या निर्जीव मातींतून फोटोंत दिसणारा जिवंतपणा निर्माण करूं पाहात होता !

सदानंद त्याच्या शांततेचें महत्त्व ओळखून हळूच बाजूच्या कोचावर बसून जवळच पडलेल्या' मासिकाचा ताजा अंक घेऊन चाळूं लागला.

त्याची नजर अंकांतील निरनिराळीं चित्रें पाहात होती पण मनांत एकच विचार पुनः पुनः उमटत होता—

वकीली की मास्तरकी ! आणि या दोहोंच्या तुलनात्मक विचारांची दीर्घ सांखळी वाढतच जाई.

असाच कितीतरी वेळ गेला.

विश्वासच्या कामाला प्रकाश अपुरा पडूं लागतांच त्यानें ओल्या कपड्यांत होऊं घातलेला मातीचा अर्ध पुतळा लपेटून ठेविला व हात धुवून टॉवेलनें ते पुसत तो सदानंद ज्या कोचावर बसला होता त्याच कोचावर रेलून उभा राहिला. सदानंद अजून विचारमग्न स्थितींतच बसला होता—

' काय वकीलसाहेब, कसला विचार चालला आहे एवढा !' थट्टेच्या स्वरांत विश्वासानें त्याला जागविलें.

' वकीलसाहेब कीं मास्तरसाहेब ! ' सदानंद आपली मास्तर होण्याची इच्छा प्रदर्शित करीत म्हाणाला.

' काय बुवा तुला एवढं वेड मास्तर व्हायचं ! तुला आपलं वाटतं तसं—पण म्हणतात ना जावें त्याच्या वंशा—

' पुरे झालं तुझं तत्वज्ञान ! मी जिला माझी महत्त्वाकांक्षा म्हणतों तें तुला वेड वाटतं. पण तुझ्या दृष्टीनं...'

' वेड नाहींतर ! ' मास्तर ' आणि ' वेडा ' म्हणजे जवळ जवळ समाना-र्थक शब्द आहेत किरे ! तूं ' सत्तेचे गुलाम ' पाहिलं आहेस ना ' त्यांतला तो कान्होबा आठवतो कां बेटा मास्तर म्हणून मिरवतो पण वाटतं कीं ठाण्याच्या तुरुंगाचीं दारं एका-एकीं उघडीं पडून—"

" अगदीं छान आठवण केलीस. आतां मास्तरचं राहूं द्या ! पण तुझं आयडियल् वकील ना ! मग जरा त्याच नाटकांतल्या केरोपंताचंच घे कीं उदा-हरण. कां ! पटतं कां तुला तें स्वभाव-चित्र ! अरे जगाच्या रंगभूमीवरही जर मास्तर वेडा ठरत असला तर वकील पहिल्या प्रतीचा खलनायक ठरेल—! '

' छे. छे. असंच नाहीं कांहीं. माझ्या मतें केरोपंताचं स्वभावचित्र कांहींसं अस्वाभाविक व अतिशयोक्तीचं आहे. एरवीं वकील म्हटला कीं तो ' केरोपंती ' थाटाचाच असतो असा नियम नाहीं कांहीं "

' तर मग कान्हू मास्तराच्या बाजूनें देखील मला तसंच म्हणतां येईल कीं ! तूं कांहीं म्हण—पण विश्वास, त्या नंद-नवनाची कल्पनाच किती आनंद देते जिवाला ! तें शाळेचं रम्य वातावरण—तीं बालिशपणें किलबिलणारीं, चिमणी फुलपाखरी वृत्तीचीं निष्पाप मुलं—मास्तराकडे आदरयुक्त भक्तीनं पाहाणारे त्यांचे लिंकलिकणारे डोळे—सारं कांहीं काव्यमय जिवाला महिरून टाकीत असतं—त्यांच्या बाल मनाचे निरनिराळे प्रश्न ऐकतानां तर स्वर्गीय संगीताचे सूर कानांत घुमावे तसं— अगदीं तस्सं वाटत असेल—! '

' अरे हो,—पण वेड्या त्या काव्यमय स्वर्गातून जरा या व्यवहारी जगांत तर उतरशील ! हें पहा तुझं तें नंदनवन अन् स्वर्गीय संगीत. या आहेत कल्पनेच्या भराऱ्या. चारच दिवस त्या नंदनवनांत घालवितांच पांचवे दिवशीं तुला माझ्या म्हणण्याची सत्यता पटेल. स्वर्गीय संगीत झालं तरी रोज रोज तीच चीज जर ऐकावी लागली, तर वेड लागण्याची पाळी यायची, आणि नंदनवन जाऊन त्या जागीं मद्राशांचं बिन्हाड यायचं !" वादाच्या भरांत विश्वास मद्राशांवर घस-रलेला पाहून सदानंद मोठ्या मोठ्यानें हसूं लागला ! विश्वासला देखील आपलें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हास्य आवरेना. दोघांच्या मनमुराद हास्याचे स्टुडियोमधें पडसाद उठले... ......! आणि.........!

त्यानें हास्य पूर्णपणें थांबण्यापूर्वीच त्यांत आणखी एका विकट हास्याचे ध्वनि मिसळले! दोघांनीं चमकून मागें पाहिलें......!

स्टुडियोसमोरील दारांतून संधिप्रकाश आंत डोकावत होता! त्या अंधुक प्रकाशांत त्यांना तें भेसूर दृश्य दिसलें! दोघेही क्षणार्धांत उठून त्या जागीं आले!

बाहेरील फूटपाथवरून स्टुडियोंत शिरून दाराजवळच ठेविलेल्या एका मार्बल–बस्टशीं दंगल करणारा तो एक वेडा होता......!. आनंदानें बेहोष होऊन तो विकट हास्य करीत होता!

वयानें चाळीशीचा असावा; पण दिसेसाठी उलटल्यासारखा! वणवण हिंडून उपासमार करून आयुष्य कंठीत असल्यामुळें शरीराचा सांपळाच तेवढा शिल्लक राहिला होता.

धुळीनें माखलेल्या, जटेनें जखडलेल्या, पिंगट, राठ केसांभोंवती बांधलेली काळी चिंधी कपाळावर लोंबत असल्यामुळें त्याचा हाडकुळा चेहरा अधिकच भयाण दिसत होता.

कमरेसभोंवती लपेटलेली गोणपाटाची चिंधी एखाद्या व्यभिचारी स्त्रीप्रमाणें लाज घालवीत होती.

" बरो गावलेस माज्या तावडींत... आतां बगतंय चोरा...खयंसर जातस तो......"

दांत ओंठ खात तो त्या अर्धपुतळ्याच्या गळ्याला धरून कायसें बरळत होता. त्याचे खोबणींत गेलेले क्रूर डोळे, डोळे नव्हेच ते–अंधाऱ्या गुहेंत धगधगणारे दोन निखारेच जणूं काय—आपल्या प्रखर आगीनें त्या पुतळ्याला खालपासून वरपर्यंत भाजून काढीत होते......!

'तुजां निसंतान करीन मी आतां...!' असें मोठ्या आवेशानें म्हणत त्यानें त्या दगडी पुतळ्याला गदगदा हालविलें. त्याचे दोन्ही कान पिरगळण्याचा प्रयत्न केला.

त्याच्या सफेत थोबाडींत खणखणीत चार फटके लगावले...तरीही त्याचें समाधान होईना...!

क्षणार्धांत या सर्व गोष्टी घडून आल्या! पण विश्वासनें चपळाई करून वेड्याच्या हातून त्या पुतळ्याची सुटका केली! तरी वेडा धडपड करीतच होता.

'ए ऽऽ पागल-काय गडबड लावली आहेस! चलो ऽऽ एकदम बाहर जाव...!' त्याला धक्के देत विश्वास खेंकसला...! तरी वेड्याच्या संतापाचा आवेग ओसरला नव्हता. विश्वासच्या धक्क्यासरशीं तोल जाऊन तो कोलमडत दाराशींच पडला! पण त्याचें बरगळणें चालूच होतें...

'ह्येनी...ह्येनीच माज्या घरादारावर नांगर फिरवलो...मार्जी पोरांटोरां उपाशी टाकलीं...सगळो पैसो उपटलो ...माजो संसार धुळीक लायलो... सैतान खेंचो...तुजां नरडां दावून जीव घेईसतवर माजो जीव जावचो नाय... हरामखोर...लुचो...'

त्याचे क्रूर डोळे त्या पुतळ्यावरच रोंखले गेले होते. दोन्ही हात सूडासाठीं शिवशिवत होते.

विश्वास व सदानंद तटस्थ उभे राहून आश्चर्यचकित दृष्टीनें त्याच्या हालचालीकडे पाहात होते.

त्याच्या चेहेऱ्यावर असहायतेची छटा दिसूं लागली! सूडाचें समाधान लाभलें नसल्यामुळें निराशेनें तो रडकुंडीस आला!

'ब ऽऽ रां! आज नाय उद्यां! पण तुझो पुरो समाचार घेतलंय...याद राख...'

असें कांहींसें धमकावणीचे शब्द पुतळ्याला उद्देशून उच्चारीत, चमत्कारिक हातवारे करीत, मानेला, विचित्र झटके देत स्वारी लंगडत लंगडत फूटपाथवरील गर्दीत दिसेनाशी झाली......

विश्वासनें एक दीर्घ निःश्वास टाकला!

'काय विक्षिप्त आहे प्राणी' विश्वास तुच्छतेनें म्हणाला.

मालवणचा दिसतो नाहीं!' सदानंदानें त्याच्या भाषेवरून अटकळ केली.

दोघांची नजर त्या अर्धपुतळ्याकडे वळली. कांहीं वेळापूर्वी पांढरें शुभ्र दिसणारें पुतळ्याचें तोंड आतां वेड्याच्या हाताच्या धुळीनें डागळलेलें दिसलें...!

'कुणाचा बस्ट आहे रे हा!' सदानंदानें कुतूहलानें विचारलें.

'मालवणच्या 'सावंत–वकीलांचा.' तेथील म्युनिसीपॉलिटीनेंच मागवला आहे......'

विश्वास, त्याचेविषयीं आणखी किती तरी माहिती सांगत होता...पण सदानंदचें लक्ष तिथें नव्हतेंच मुळीं.

'सावंत...वकील आणि मालवणचे...तो वेडाही मालवणचाच...... कल्पनेचे धागेदोरे झुळत चालले. आतां सदानंदाच्या मनांत मुळींच शंका राहिली नाहीं......वेडा बरळत नव्हता!

त्याच्या प्रत्येक शब्दांत भयंकर सत्य भरून राहिलें होतें!

सदानंदाचें अंग त्या अकल्पित उलगड्यानें शहारून आलें! त्यानें मनाशींच ठाम ठरवून टाकलें की, 'बस्स वकिलीचा विटाळ म्हणून करून घ्यायचा नाहीं...!'

आणि त्याच वेळीं विश्वास एका फडक्यानें बस्टच्या चेहेऱ्यावरील धुळीचे डाग पुसून टाकीत होता.

सदानंदानें आपल्याशींच किंचित् स्मित केलें!

—'ते पुतळ्यावरील डाग पुसून टाकण्याऐवजीं तसेंच ठेवून त्याचें अनावरण केलें तरच सावंत—वकीलांच्या चेहेऱ्याचें खरेंखुरें साम्य त्यांत दिसलें असतें—'

हाच त्या स्मिताचा अर्थ असावा...!

हिंदुधर्मशास्त्रावरील एक अमोल ग्रंथ.

उस्मानिया युनिव्हर्सिटींत बी. ए. च्या अभ्यासक्रमासाठीं मंजूर असलेलें

धर्मशास्त्र विचार

लेखकः—प्रो. पां. वा. काणे

केसरी, महाराष्ट्र, नवाकाळ इत्यादि वृत्तपत्रांचे उत्कृष्ट अभिप्राय.

किं. २॥ रु. ट. ख. निराळा.

प्रकाशकः—मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४

गुलाबाच्या पाकळ्या

(कथा संग्रह)

प्रकाशकः—
यशवंत गोपाळ जोशी
७२३ सदाशिव, पुणें.

विखुरलेलें प्रेम

या लोकप्रिय मनोविश्लेषणात्मक कादंबरीचे कर्ते
श्री. दत्त रघुनाथ कवठेकर
यांचा नावीन्यपूर्ण कथासंग्रह
सर्वत्र मिळेल.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संशयाचें विष

(लेखकः—महादेवशास्त्री जोशी)

दुपारीं तीन वाजण्याची वेळ वामकुक्षी झाल्यावर वळकटीला टेंकून पडल्यापडल्या मी कालिदासाचें कुमारसंभव वाचीत होतों. वाचतां वाचतां पार्वतीच्या यौवनावस्थेचें रसभरित वर्णन असलेले श्लोक आले. तिच्या प्रत्येक अवयवाचें आपल्या प्रतिभाशाली वाणीनें सौंदर्य-निदर्शन करीत असतांना उरोभागाचें वर्णनहि क्रमप्राप्तच होतें. ते कसें पुष्ट अन् उन्नत होतें तें त्यानें मोठ्या खुबीनें खुलवून सांगितलें होतें. ' मध्ये यथा श्याममुखस्य तस्य मृणालसूत्रान्तरमप्यलभ्यम् ' असा तो श्लोकचरण होता. तो वाचतांच माझ्या मनाला किती गोड गुदगुल्या झाल्या म्हणून सांगूं ! नलिनी अर्थात् आमची सौ.—हि थोडेंसें संस्कृत शिकलेली होती. तिलाहि या काव्यानंदाचा आस्वाद घ्यावा या हेतूनें मी तिला हांक मारली.

' नलू, ए नलिनी, अहो नलिनी देवी, अहोऽअहोऽऽ !'

मागच्या आंगणांतून एक अलड अवखळ व्यक्ति धांवत पळत बैठकीच्या खोलींत आली नी तिनें माझ्या तोंडावर हात ठेवला.

' काय वेडबिड लागलं कीं काय आज ! " वटवटीत डोळे करून तिनें विचारलें.

' मला वेड लागायला काय झालं ! मी कांहीं दगड नाहीं मारला; फक्त हाकच—,

' एवढ्या मोठ्यांदां ! ही कुठली रीत ! ह्मणे मी दगड नाहीं मारला !'

' अग तूं मागच्या आंगणांत काम करीत बसली आहेस हें मला नक्की माहीत असतांना तुला ऐकूं जाईलशी मोठ्यानें हाक मारायची नाहीं तर काय मनांतल्या मनांत मारायची !'

' बरं बरं, पुरे ! काय नडलं होतं एवढं !'

' कुमारसंभवांतला . एक श्लोक नडला होता. ''मध्ये यथा''चा जरा अर्थ सांग पाहूं. अगदीं उघड करून सांग !''

—श्लोक ऐकून नलिनीचे ओठहि बिलग झाले अन् चटकन तिनें खालीं मान घातली.

' मला नाहीं समजत त्याचा अर्थ. असला पांचटपणा करायला बोलावलं होतं वाटतं मला इकडे !'

पांचटपणा काय झाला बुवा यांत ? अगदीं साधी गोष्ट आहे ही, मला एका श्लोकाचा अर्थ लागेना. म्हटलं, आमच्या राणीसाहेब संस्कृत पढलेल्या आहेत; पहावा त्यांना तरी विचारून.'

' तर तर, अगदीं भोळे भाविकच पडलांत कीं नाहीं ! ' तिनें रागाचें अवसान तर खूप आणलें होतें. दुसरं सुचतंय काय या तुमच्या कालीदासाला ! बायकांभोंवतीं घुटमळत असतो सदान् कदा. जणू दुसरा विषयच नाहीं जगांत.'

' रसिकांचा मुकुटमणि होता तो. शृंगाररसाचा खरा पुरस्कर्ता. भवभूतीसारख्या ' एको रसः करुण एव ' म्हणणाऱ्यांपैकीं तो नव्हता. ' एको रसः श्रृंगार एव " आणि तोच निमित्तभेदानं निरनिराळ्या रसांची रूपं घेऊन नटतो, असंच त्याचं मत असलं पाहिजे. काय, खरं आहे कीं नाहीं ! अन् शृंगारांतून जर रमणी वजा केली तर बाकी तर काय राहील ! शून्य !'

' पुरे पुरे ! समजली—'

' अग माझी अक्कल तर समजलीच आहे तुला. आतां तुझी किती डोंगराएवढी आहे तें तरी कळूंदे मला. सांग या श्लोकाचा अर्थ—'

' मला नाहीं समजत ! '

' वाः असं कसं होईल ? आजपर्यंत शिकलेलं सगळं फुकटच वाटतं. सांग लवकर. हें पुस्तक हवं तर घे. '

' आज काय भूतबीत संचरलं आहे कीं काय अंगांत ! '

' भूत म्हण, ब्रम्हसमंध म्हण, नाहीं-तर आम्या वेताळ म्हण. ' कोणी निंदा कोणी वंदा, आमचा श्लोकार्थाचा धंदा ' पुरे आतां. जास्त ओढलं तर तुटतं हें ठाऊक आहेना तुला !

' मी सांगणार नाहीं, अन् मला समजतहि पण नाहीं ! '

' मी सांगितलेलं कांहींच ऐकत नाहींस. अगदीं उलटया अर्थानं पतिव्रताधर्माचं आचरण करायचाच विडा उचलला आहेस कीं काय ! '

' त्यापेक्षां चोरांच्या उलटया असं मी म्हटलं तर काय बिघडेल ?'

' असं ! अशानं मी एकदम घरांतून निघून जाईन हें लक्षांत ठेव !'

' कुठं जाणार ?'

' बेळगांवला.'

' कशाला ?'

' कशाला तें तुला पूर्ण माहित आहे. एकदा तिकडे गेलों अन् पाशांत अडकलों म्हणजे मग पुढचा परिणाम काय होईल त्याचा विचार कर !'

ज्या हेतूनें बेळगांवला जाण्याची गोष्ट मी बोललों होतों. तो हेतू सफल व्हायला वेळ लागला नाहीं. नलिनी एकदम हसतच सुटली. मलाहि हंसू आवरेना. शेवटीं ' हो, जावं बेळगावला! पाहून घेईन मी माझा परिणाम !!' असें ह्मणत एक तिरपा कटाक्ष माझ्यावर फेकून ती घरांत पसार झाली.

आह्मा दोघांत असा हा हंद्वा का पिकला हें कळायला वाचकांना गोष्टीच्या शेवटपर्यंत जावें लागेल. ज्या एका गोष्टीची आठवण काढून आम्ही आज हंसलों, ती गोष्ट ज्यावेळीं घडली त्यावेळीं ! तो प्रसंग ! म्हटलें तर गंभीर; ह्मटलें तर हास्यापद असा होता. पण त्यानें थोडावेळ तरी आह्मा दोघांना शरीरानें जवळ असूनहि मनानें फार लांब लांब नेऊन सोडलें होतें, एवढी गोष्ट खरी !

× × ×

आमचा पिढीजाद धंदा पुराणिकाचा. शास्त्राध्ययन करावें, व्यासंग चालू ठेवावा, कुठेंतरी चातुर्मास पुराण सांगावें अन् ' अकृत्वा परसंतापं अगत्वा खलनम्रताम् ' या वाण्यानें उपजीविका करावी असें आमच्या वडिलांपासून चालत आलेलें कुलव्रत होतें. अर्थात् मीहि त्याच परंपरागत व्रताचाच अवलंब केला.

माझें वय त्यावेळीं पंचवीस वर्षांचें असेल. नुकताच अध्यायन करून मी घरीं आलों होतों. शास्त्री या पदवीबरोबरच एका कुमारिकेनेंहि माझ्या गळयांत माळ घातली होती.

त्याच वर्षी पहिल्या प्रथम मी बेळगांवांत चातुर्मास्य पुराण ठरवलें होतें. सुरवातीच्या अगोदर आठ दिवस मी घराहून तिकडे जाण्यास निघालों. आपल्याला बरोबर नेण्याबद्दल नलिनीचा लकडा पाठीमागें होताच. पण आधीं तिकडचा रागरंग पाहून बिऱ्हाडाची वगैरे व्यवस्था करून नंतर तुला मी बोलावून घेईन अशी तिची मी समजूत केली होती. जायच्या वेळीं देवापुढें सुपारी ठेवून नमस्कार झाल्यावर सर्वांचा निरोप घेऊन मी आमची वृद्ध आजी खोलींत आंथरुणांवर पडली होती तिच्याकडे जाऊन तिला नमस्कार केला.

' आजी, जाऊन येतों हं ! '

" जा बरं, बाळ ! प्रकृतीला संभाळून रहा. '' म्हातारीचे डोळे पाण्यानें भरून आले. ती उठून ती बसली अन् तिनें मला जवळ घेऊन माझ्या पाठीवरून हात फिरवला. उत्कट माया—ममतेनें भरलेला हात होता तो. ईश्वरी वरदहस्तासारख्या वाटला तो मला.

' विनू ! तूं आज पहिल्यानेंच पुराणाला जातो आहेस. एक सावधगिरीची सूचना देऊन ठेवतें तुला. हा पुराणाचा धंदा, आहे चांगला. पण, यांत बायकांशीं संबंध अधिक. जगांत जितकं चांगलं आहे तितकंच वाईटहि आहे. कित्येक बायका वाईट प्रवृत्तीच्या असतात. नाना तऱ्हेच्या मार्गांनीं त्या भुरळ घालण्याचा प्रयत्न करतात. बाबारे, मोह हा वाईट आहे. अब्रूची काच एकदा तडकली कीं ती पुन्हा सांधत नाहीं. म्हणून आपलं सांगून ठेवतें कीं, कोणाशीं विशेषसा संपर्क ठेऊं नको ! पुष्कळांच्या मी अशा गोष्टी आइकलेल्या आहेत. तूं शहाणा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेस. कुलाच्या कीर्तीला कलंक लागेल असें वर्तन तुझ्या हातून घडणार नाही ही मला खात्री आहे. पण माझा म्हातारीचा जीव! राहवेना म्हणून सांगितलं. जा बाळ! प्रकृतीला मात्र जप हं!'

आजीचे ते बहुमोल शब्द मी माझ्या हृदयसंपुटांत सांठवून ठेवले. मी कांहीं बोललों नाहीं. पण तिच्या उपदेशाप्रमाणें वागण्याचें एक प्रकारें मूक अभिवचन मी तिला दिलें.

* * *

एखाद्या गोष्टीचा पडताळा इतक्या लवकर येतो कीं आश्चर्यच वाटतें त्याच्या बद्दल. आजीनें सांगितलेल्या गोष्टीचा अनुभव योगायोगानें मला रोकडा आला.

शरीराचें धनुष्य झालेले एक दोन वृद्ध गृहस्थ सोडल्यास माझ्या पुराणाला बायकाच फार जमत. सुमारें पन्नाससाठ स्त्रियांचा समुदाय पुराणश्रवणासाठीं माझ्या आवतीभोवतीं गोळा झालेला असे. हातानें वाती वळणें, कानानीं पुराण ऐकणें अन् तोंडानें मधून मधून शेजारीं बसलेल्या बाईशीं कुजबुजणें हे सारे व्यवहार त्यांचे एकसमयावच्छेदानें चालत. अन् अशा श्रोतृवृंदाच्या पुढें व्यासपीठावर बसून मला पंडित्य करावें लागे.

माझ्या हातांत एकहि आंगठी नव्हती मी डोक्यावर बाटोळा घेराहि ठेवीत नसे. काश्मीरी शालीऐवजीं शुभ्रकाठी एक साधें उपरणें पांघरूणच मी पुराणाला बसत असें. लोकांवर वजन पाडण्यासाठीं भपका करणें मला साधत नसे अन् आवडतहि नसे! काकू, मामी, आजी करून ओळख काढणें, उगाच हस्तिदंती करणें, वगैरे प्रकारांनाहि मी पारखा होतों. पुराण सांगत असतांना माझ्या दृष्टीचें लक्ष्य म्हणजे समोरचे दोघे वृद्ध आजोबा!

अशा स्थितींतहि एक ससेमिरा माझ्या पाठीस लागलाच.

माझ्या पुराणाला ज्या बायका येत होत्या, त्यांत एक बाई विशेष रीतीनें माझ्या नजरेंत येण्याचा प्रयत्न करूं लागली. बाई होती काळी सावळीच; पण, तिचे नाकडोळे रेखीव होते. ऐन तारुण्यांत असल्यामुळें तिचा प्रत्येक अवयव जिथल्यातिथें, पुष्ट अन् डौलदार होता. रोज रोज नवें पातळ ती इतक्या आकर्षक रीतीनें नेसून येई कीं, ती देवळांत येतांच प्रत्येकाचे प्रत्येकाचे डोळे अभावितपणें तिच्याकडे लागत. तिची चालण्याची ढबहि मोठी प्रेक्षणीय होती. स्वर तितकासा गोड नव्हता पण बोलण्यांत मार्दव आणण्याचा ती बराच प्रयत्न करी. तिच्याकडे पाहिलें कीं 'क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः' या कव्युक्तीची मला आठवण होत असे.

अगदीं पहिल्या दिवसापासून ती पुराणाला येत असे. मागें पुढें करतां थोड्याच दिवसांत व्यासपीठासमोरची जागा तिनें पटकावली. त्यामुळें मी सहज दृष्टी वर केली कीं ती तिच्या दृष्टीशीं भिडत असे. सारें पुराण एकनिष्ठेनें ती ऐकत असे. द्रौपदी वस्त्रहरणासारखा प्रसंग सुरू झाला कीं, तिचा पदर ओला होत असे अन् डोळे डबडबत. लगेच तिची चर्या कोमेजून गेल्यासारखी दिसे. द्रौपदीला श्रीकृष्ण—तिचा सखा—भेटल्याची,कथा ऐकली कीं स्वतःला परमेश्वर पावल्याचा आनंद होई तिला. तावडतोब तिचें मुखमंडळ हृष्ट दिसे. एकादा रसोत्कट अन् पेच प्रसंगानीं भरलेला कथाप्रसंग सुरू झाला कीं पुढें काय होणार, पुढें काय होणार या औत्सुक्यभावनेनें आधणावरची ताटली थाड् थाड् उडावी तसें तिचें मन हृदय खालीवर होत असे. कथेतल्या पात्रांच्या विचारविकारांचें अन् भावनांचें प्रतिबिंब तिच्या मुखावर स्पष्टपणें उमटलेलें मला दिसे.

पुढें पुढें दररोज माझ्यासाठीं एक हार आणण्याचा क्रम तिनें चालू केला. व्यासपीठावर बसून माझें मंगलचरण होतें न होतें तोंच तो हार माझ्या गळ्यांत पडे. कधीं गुलाब, कधीं शेवंती कधीं जाई वगैरे निरनिराळ्या फुलांचे हार प्रत्येक दिवशीं माझ्या कंठांत रुळत असत. त्यांतील प्रत्येक फुल नाजुक, कोमल, टवटवीत अन् सुवासिक असे. त्यांच्या संस्पर्शानें अन् सौरभानें माझ्या हृदयांतून स्फूर्तीची कारंजीं शतधारानीं रहूं लागत. केवळ त्या फुलांचाच हा प्रभाव होता काय! नाहीं; मुळींच नाहीं! जिनें तो हार मला समर्पण केला तिची भावना त्या फुलांपेक्षांहि कोमल अन् नाजूक होती. अन् त्याच मुग्धमधुर भावनेचा प्रताप होता तो. हार गळ्यांत घालीत असतांना ती असें कांही गोड स्मित करी कीं त्याला उपमा 'पुष्पं प्रवालोपहितं यदि स्यात् मुक्ताफलंवा स्फुट-विद्रुमस्थम्' या कालिदासोक्तीचीच.

पुराण आटपून मी व्यासपीठावरून खालीं उतरूं लागलों कीं नेमकें पुढें येऊन ती माझ्या पायांवर डोकें ठेवीत असे.मला मुळींच आवडत नव्हतें. हें मी लाजल्यासारखा होत असें त्यावेळीं ती नमस्काराला आली कीं पाय मागें घ्यावा किंवा पायावर डोकें ठेऊं नका असें सांगावें असें मला वाटे; पण माझी वाचा खुली होई, अन् पाय मागें होण्याऐवजीं पुढेंच जात. ती पुढें आली कीं शरीरावरचें अन् मनावरचें माझें स्वामित्व नष्टच होत असे म्हटलें तरी चालेल.

मी एका पुराणांत ओढून ताणून विषय आणला नी असें प्रतिपादन केलें कीं,ईश्वर हा सर्वज्ञ असून मनुष्य किंचिज्ज्ञ आहे. ईश्वराची सत्ता अमर्याद तर मनुष्याची किती मर्यादित! ईश्वराचें सामर्थ्य,अगाध–अपार–तर मानव किती क्षुद्र पामर जीव! तेव्हां पायावर डोकें ठेवायचें असेल तर तें ईश्वराच्या पायावर ठेवावें, पूजा ईश्वराची करावी, सर्वभाव त्याला समर्पण करावे. मानव त्या भक्तीला नी उपचारांना सर्वथैव अपात्र आहे. वगैरे वगैरे.'

माझ्या वक्तृत्वाचा तिच्यावर किर्तीसा परिणाम झाला तें अजमावण्यासाठीं मी तिच्याकडे पाहिलें. मी कशासाठीं हा विषय बोललों तें तिला कळून चुकलें होतें. अन् त्या जाणवीचें, ओळखलेंरे ओळखलें या भावनेचें स्मित तिच्या मुखावर झळकत होतें. तिनें आपली दृष्टी माझ्या चर्येकडे स्थिर केली. जणूं ती दृष्टी मला सांगत होती. 'खरें आहे तुमचें बोलणें. पण तुम्हीच मला परमेश्वरासारखे दिसतां. माझा परमेश्वर तुमच्याच रूपानें नटला आहे.'

मला राहून राहून वाटे कीं कां बरें हिच्या अंतःकरणानें माझ्याकडे अशी ओढ घ्यावी! काय आहे माझ्याकडे असें! 'भावस्थिराणी जनान्तरसौहृदानि' अशापैकीं हें कांहीं असेल का! हिची भावना! खरेंच काय असेल हिची माझ्याविषयीं भावना! गुरु, बन्धु, मित्र कीं—

मी संशयाच्या जाळ्यांत पडत असें. शुद्ध अन् पवित्र भावनेनें ही माझ्याकडे पहात असेल का! माझें मन या प्रश्नाला आस्ति नास्ति दोन्ही पक्षीं उत्तर देई. पण तिचा तिरस्कार मला कधींच वाटला नाही.

बहुधा लोखंडानें लोहचुंबकाकडे आकृष्ट होणें हा व्यवहारांतला नेहमींचा प्रकार. पण इथें उलट होतें. लोहचुंबकच लोखंडाकडे धांव घेत होता. अर्थात् लोखंडाला दूर पळून न जातां स्वतःच्या जागेवर तरी स्थिर राहणें क्रमप्राप्त होतें.

एक दिवस तिनें जातां जातां मला प्रश्न केला. 'तुम्हाला हात पाहतां येतो कां!' मला सामुद्रिकशास्त्राची थोडी-बहुत माहिती असूनहि मी 'मला समजत नाहीं' असें उत्तर देऊन टाकलें. न जाणो, कसल्या भावनांचीं रेघा तिच्या हातावर दिसतील तें कांहीं सांगता येत नव्हतें.

ती कोण, कुठली, कुठें रहाते, घरची परिस्थिति काय, नवरा कसा असेल, ती सुखी असेल का दुःखी असेल, वगैरे प्रश्न मला भंडावून सोडीत होते. तिच्या विषयींची जिज्ञासा मला अगदीं आकुल झाली होती. पण 'हें! सांगा! वाहवत चाललास! असा आजीचा उपदेश आंतून सारखा दटावीत असे. शिवाय ज्याला विचारावें तो काय म्हणेल ही भीती होतीच. लोकापवादाला मी फार भीत असें.

वर लिहिल्याप्रमाणें तिचा क्रम अबाधित चालला होता. थोड्या दिवसांनीं ती नलिनीला बेळगवांला आणली. नलिनी पुराणाला पहिल्या दिवशीं आली. त्याच वेळीं तिला त्या अज्ञात बाईचा हा प्रकार कळून चुकला. पुढेंहि ती दररोज पहात होती. पण, तिनें त्यासंबंधीं अवाक्षर माझ्याजवळ उच्चारलें नाही. आपले मनोविकार लपवून ठेवायचें म्हणून आणलें तर त्या बाबतींत बायका कोणाला हार जाणार नाहीत हेंच खरें!

× × ×

पुढे थोड्याच दिवसांत गांवांत प्लेगाची साथ उद्भवली. जिकडे तिकडे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



धडाधड उंदीर पडूं लागले. म्युनिसिपालिटीच्या फळ्यावर लागण अन् मृत्यूचे आंकडे रोजच्या रोज वाढूं लागले. मनाला एक प्रकारची भीति अन् औदासिन्य वाढूं लागलें, त्यामुळें आणि एक दिवस सकाळीं उठतों तों माझ्या काखेंत एक लहानशी गोळी उठून ती दुखत असल्याचें मला कळलें. एकदम माझ्या तोंडचें पाणी पळालें. ही प्लेगाची गांठ तर नसेल ना ? मनांत शंका उद्भवली आपल्या मनासारखा दुसरा शत्रु कोणी नाहीं. मन चिंती तें वैरी न चिंती ’ म्हणतात तें त्याचमुळें. तसेंच संशयासारखें दुसरें विष नाहीं. हालाहलापेक्षांहि तीव्र असतें तें. मारीत नाहीं; पण जाळीत मात्र सुटतें.

जरासें कांहीं झालें तरी नलिनीला आपल्या मोवती नाचायला लावणारा मी. पण ती घाबरेल, रडेल अन् साऱ्या वाड्यांत बोभाटा होईल यासाठीं मी ही गोष्ट तिच्याजवळ बोललों नाहीं. दुपारीं सडकून ताप भरेल असें मला वाटलें होतें. पण तसें कांहीं झालें नाहीं. पण, मनाची रुखरुख जाईना. तशा स्थितींतच पुराणहि सांगितलें. गांठ दुखत होती अन् त्यामुळें हात खालीवर सुद्धां करवत नव्हता. कुठें तरी मोकळ्या हवेंत फिरायला जावें म्हणजे जरा बरें वाटेल या कल्पनेनें मी फिरायला गेलों; तो रात्रीं आठ वाजतां घरीं आलों. नलिनी स्वैंपाक करून वाट पहात बसली होती. जेवायला बसलों पण जेवणावर लक्ष होतें कुठें ? हाताला येईल तो ताटांतला पदार्थ पोटांत ढकलीत होतों एवढेंच.

‘आज कुठं चित्त गुंतलं आहे एवढं !’ नलिनीनें प्रश्न केला.

‘कुठें नाहीं !’ मी उडवाउडवी केली.

जेवतांनाच मनांत विचार केला कीं हें काय प्रकरण आहे तें डॉक्टरला दाखवून एकदाचा सोक्षमोक्ष काय तो करून टाकावा. नाहींतर रात्रीं झोपसुद्धां येणार नाहीं.

जेवण झाल्याबरोबर मी कपडे केले अन् बाहेर पडलों. जातांना ‘ बाहेर जाऊन येतों ’ एवढेंसुद्धां मी नलिनीला सांगितलें नाहीं. सांगितलें असतें तर कुठें, काय, कशाला, वगैरे तिच्या प्रश्नाची सरबत्ती सुरू झाली असती.

ज्या एका डॉक्टरची त्या गांवांत प्रसिद्धी होती त्यांच्याच घरीं मी गेलों. पण डॉक्टर घरीं नव्हते. रात्रीं साडेदहा वाजतां ते घरीं आले. त्यांचें कपडे काढणें वगैरे होईपर्यंत अकराचे ठोके पडले. अन् त्यानंतर त्यांनीं बाहेर येऊन माझी चौकशी केली.

प्लेगची शंका प्रदर्शित करून मी त्याना काखेंतली गांठ दाखवली. आज सकाळपासून सारखी दुखत असल्याचेंहि सांगितलें. जरा वेळ पाहून त्यांनीं सांगितलें. ‘ गळूं आहे तिथें. ”

‘ प्लेगाची गाठ नव्हे ना ! ’ मी आतुर होऊन विचारलें.

‘ मुळींच नाहीं ! ’ डॉक्टर उत्तरले.

‘ डॉक्टर ! केवढ्या दारुण संशयांतून तुम्ही मला सोडवलंत ! सकाळपासून चैन नव्हतं माझ्या जिवाला ! ’

माझी मीति निघून गेली. औदासिन्य नष्ट झालें. संशयाचें विष उतरलें. उल्हासित वृत्तीनें जवळ जवळ धांवतच मी घरीं आलों.

दरवाजा नुसताच लावलेला होता. आंतून कडी नव्हती. मी दार लोटून आंत गेलों. दिवा बारीक करून नलिनी आंथरुणावर झोपली होती.

मी जवळ जाऊन हांक मारली “ नलू ! ”

तिनें उत्तर दिलें नाहीं. तिला झोप लागली असेल अशा कल्पनेनें मी दिवा मोठा केला अन् तिला हालवून जागी करण्याचा प्रयत्न करूं लागलों. “ नलू, ऊठ ना ! जागी हो ! ”

तिनें विरुद्ध दिशेला तोंड फिरवलें अन् पांघरूण डोक्यावर ओढून घेतलें.

तेव्हां माझी खात्री झाली कीं, ही झोपली नसून पूर्ण जागी आहे अन् हिला कसला तरी राग आला आहे.

‘ काय झालं तुला ! माझा राग का आला आहे ! असं वेड्यासारखं काय करतेस ! ’ मी तिच्या डोळ्यांवरचें पांघरूण दूर करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांत मला यश आलें नाहीं.

‘ बोलना ! अशी रुसलीस कां ! माणसानं बोलल्याशिवाय त्याला काय होतं तें कळणार तरी कसं दुसऱ्याला ! ’

तरीहि तिच्या तोंडून वाचा निघेना.

मी हरतऱ्हेनें विनवण्या केल्या, काकुळतीस आलों, पण तिच्या हृदयाला पाझर फुटला नाहीं.

शेवटीं मलाहि राग आला अन् मी म्हटलें—

इतकं विनवून, पायधरण्या करून सुद्धां तूं बोलत नाहींस ना ! ठीक आहे ! मीच कुठेंतरी चालतों होतों ! ’ मी उठून दरवाज्यापर्यंत गेलों.

‘ जावं, जावं ! खुशाल जावं आलांत तरी कशाला मग घरीं ! मी मुळीं नको-शीच झालें आहे तुम्हाला ! ’ तिला एकदाची वाचा फुटली तिच्या बरोबर रडण्याचा हुंदकाहि होता. मी मागें फिरून पुन्हा तिच्याजवळ जाऊन बसलों.

‘ म्हणतेस काय तूं ! काय झालं तें तरी सांग ! ’

‘ जाणार ना ! मग मागें कशाला फिरलांत ! मात्र कुठेंतरी जाऊं नका. आतां जिथून आलांत तिथेंच जा ! ’

‘ मला असली उखाणीं समजत नाहींत. काय तें तुला स्पष्ट सांगायचं आहे़का ! ’

‘ वेड घेऊन पेडगांवाला जायचं सोंग केलंत तरी मी इतकी भोळी नाहीं. मला सगळे कळतात हे कावे बरं ! ’

‘ माझ्या प्रश्नाचं हें उत्तर नव्हे ! ’

‘ यापेक्षां मला स्पष्ट सांगतां येत नाहीं. माझा चांगला केसानं गळा कापलात. असले चाळे करायचे होते तर मला आणलीत तरी कशाला इथं ! ’

आतां माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. कोणत्या संशयानें नलिनी मघापासून जळफळत होती तें मला कळलें. नलिनीच्या या महादीर्घ संशयाबद्दल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मला अनिवार हसूं लोटलें. सकाळपासून मला झालेला प्लेगचा संशय ! आतांचा नलिनीचा माझ्या अनैतिक वर्तनाबद्दल संशय ! मला वाटलें, प्लेगच्या साथीबरोबरच संशयाचीहि सांथ आली असावी गावांत ! माझा संशय डॉक्टरनें फेडला. मी त्या रोगांतून मुक्त झालों. नलिनीचा संशय घालवायला मलाच स्वतःला डॉक्टर होणें भाग होतें.

' असा ! पोट भरून हंसा. दुसऱ्याच्या जिवाला आग लावायची. अन् आपण खदखदां हंसायचें हें तुम्हा पुरुषांनाच शोभतं ! '

" नलिनी, किती दुष्ट आहेस ग तूं ! "

" दुसरी एखादी फटाकडी मिळाल्यावर मी दुष्ट—" मी चटकन तिच्या तोंडावर हात ठेवला.

' चूप ! एक अक्षर बोलूं नकोस पुढं. पहा अशी नीट माझ्याकडे ! इतक्या हलक्या मनाची तूं असशील, अशी माझी कल्पना नव्हती. एक वर्ष माझ्या सहवासाला राहून हीच माझी पारख केलीस वाटतं. अहारे बुद्धि ! असला भलताच संशय घेतांना मागचा पुढचा कांहीं विचार करायला पाहिजे होतास तूं ! तुझ्यावर एखादा निंद्य आरोप मी केला तर तुला तो खपेल, नलिनी ! मग मलाहि तो खपणार नाहीं " माझ्या स्वरांत यावेळीं बरीच तीव्रता आली होती.

यावर मात्र नलिनी कांहींच बोलली नाहीं. ती कावरीबावरी होउन आंथरुणावर उठून बसली होती. आपण केलेल्या आघाताला इतक्या जोराचा प्रत्याघात होईल अशी तिला कल्पनाहि नव्हती.

' एक वेळ तुझ्यावरचं माझं प्रेम कमी होईल; पण, शुद्ध शीलावरचं माझं प्रेम कधींहि ढळणार नाहीं. लहानपणीं वाचलेलं केशवसुतांच्या काव्यांतलं एक कडवं अजूनहि माझ्या कानांत घुमतं—

' पृथ्वीमध्यें रत्नें बहु आहेत
आकाशीं तर असंख्य दिसताहेत
परि एक रत्न तुजमधें जें सच्छील
कोणाला नच सर त्याची येईल—'

' नलिनी, मी चार ठिकाणीं फिरणारा माणूस आहें. सर्व ठिकाणीं तूं माझ्याबरोबर येऊं शकत नाहींस अन् आलीस तरी माझ्या प्रत्येक हालचालींवर पाळत ठेवणं तुला सुतराम् शक्य नाहीं. मी मनांत आणलं तर वाटेल तें करून तुला त्याचा मागमूसहि लागूं न देणें मला सहज साध्य आहे. पण, माझ्यावर विश्वास ठेव ! मी तुझ्याशीं प्रतारणा करणार नाहीं ! ! तुझ्यासारखी रूपगुणवान् पत्नी मिळूनहि ज्याचं समाधान होत नाहीं तो—तो मनुष्य या श्रेष्ठ पदवीला पात्र नाहीं !'

' मला आज घरीं यायला रात्र कां झाली, मी कुठें गेलों होतों हें जर तुला कळेल तर बोललेल्या शब्दांबद्दल अन् घेतलेल्या संशयाबद्दल तुला खात्रीनें पश्चात्ताप होईल !'

मी भिंतीला डोकें टेकून स्तब्ध बसलों.

उरलेंसुरलेंहि नलिनीचें अवसान गळून गेलें ती म्याली. अगदीं कमालीची म्याली. तिचें सर्वांग उलट कांपूं लागलें. एक जोराचा हुंदका देऊन तिनें माझ्या गळ्याला मिठी मारली.

' चुकलें मी ! वेडी आहें. क्षमा करावी मला ! पुन्हा कधींकधीं मी असा भलता संशय घेणार नाहीं...! आपल्या जिवाला लागलं. कसली दुर्बुद्धी मला आठवली ! ...क्षमा करणार ना मला ? अं...अं... ? '

मी कांहींच बोललों नाहीं. बोलावेंसेंच वाटेना. एक प्रकारें मस्तक सुन्न झाल्यासारखें वाटलें.

' बोलावंना ! केलीना क्षमा ? नाहीं—का एवढा अन्याय पोटांत घालणार ?... माझ्या आईनं सांगितलं नाहीं का आपल्याला कीं ' नलू वेडी आहे, तिला संभाळून घ्या ' म्हणून ! '

तिच्या या अनन्य शरणागतीनें माझ्या हृदयाला मीच स्वतः घातलेले कृत्रिम बंध तुटून गेले. मी तिला जवळ ओढली अन् तिचे अश्रु पुसले.

' केली बरं क्षमा ! रडूं नको आतां नलू, तूं किती द्वाड मुलगी आहेस ! मघाशीं तशा रीतीनें माझ्या काळजावर घाव घातलास अन् आता तशा तऱ्हेनें हृदयाचा ठाव घेतेस ! तुला वाईट म्हणावं का चांगली ! '

' कांहींहि म्हणा पण आपली म्हणा ! मला दूर लोटूं नका ! ' ती अधिकच माझ्या कुशींत विलगली.

नंतर मी तिला सगळी हकीगत सांगितली.

' पहा ही गांठ ! आहे ? ' मी तिचा हात हळूच काखेंत नेऊन तिला ती जागा दाखवली.

' हिनेंच आज सकाळपासून माझा जीव नुसता उबवून टाकला होता. आतां झाली का खात्री ? '

नलिनी कांहींच बोलली नाहीं. तिनें फक्त आपली मान माझ्या खांद्यावर टाकली. शंभर शब्दांनीं जें व्यक्त झालें नसतें, तें फक्त खांद्यावर मान टाकण्याच्या एका लहानशा कृतीनें व्यक्त झालें.

तो प्रसंग झाला, मागें पडला. पण ' शिमगा सरतो अन् कवित्व उरतें ' म्हणतात ना ? आम्हालाहि आतां त्या प्रसंगाची आठवण दुःखावह न होत सुखावहच होते.

ज्या ज्या वेळीं नलिनी हट्ट करते अन् रुसते त्या त्या वेळीं मी तिला धमकी देत असतों—

' बघ हो, तूं माझं ऐकलं नाहींस तर मी अस्साच्या अस्सा बेळगांवला निघून जाईन ! '

अन् मग तीहि खुदकन् हंसते आणि म्हणते—

' हो, हो, जावं निघून ! मी कांहीं भिणार नाहीं. एवढ्या धमकावण्या कशाला हव्यात ? "

मस्कराज साबू

"बुल" ब्रँड

हा अस्सल कस्तुरीचा सुगंधी साबू हमेशा स्नानासाठीं जरूर वापरा. ३ वड्यांची एक बॉक्स घेणारास १९३६–३७ सालचें भगवान प्रतिमेचें मोठ्या साईझचें सुंदर कॅलेंडर भेट. देण्यांत येईल. तुमच्या व्यापाऱ्यांकडे मिळेल. " बुल " ब्रँड छ.पाचे २० जातीचे साबू. जसे खस–राज, उत्तम नीम साबू, राधाराणी (हीना) खस-खस, टर्किश बाथ इत्यादि इत्यादि वापरून पहा,

एजंटस–एल. उत्तमचंद आणि कंपनी,
प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 3749

मदननृत्य

(लेखिका :– सौ. सुलभा कुळकर्णी)

"तक् तक् तदियन तदियन, तक्डान् थैं, तक्डान् थैं, तक्डान् थैं ! ''

आतांपर्यंत आपण कधींहि पाहिलें नाहीं असें नृत्य आज पहावयास मिळणार या उत्कंठेनें त्या नृत्यगृहांत बसलेल्या वसंतच्या आणि त्याच्या मित्रांच्या कानीं हे पखवाजचे स्वर आले. ज्या भूमीवरून हे शब्द आले होते तिला आच्छादून टाकणारा अत्यंत तलम असा पडदा एकाएकीं खेंचला गेला आणि सर्व प्रेक्षकगृहांतील दिवे मालवले जाऊन फक्त रंगभूमीच तेवढी चित्ताकर्षक प्रकाशानें तळपूं लागली.

आणि उत्कंठेनें पहात बसलेल्या प्रेक्षकांनीं रंगभूमीवर काय पाहिलें !

वसंत—वसंत—वसंत !

रंगभूमीवर निसर्गाचा जणूं वसंतोत्सवच सुरू होता. खरंच होतें तें ! रंगभूमीनें तिच्या मालकिणीच्या—शीलेच्या वसंतोत्सवांत भाग घ्यावयाला नको होता का ?

शीला. सर्व हिंदुस्थानांत जिनें आपल्या नृत्यनैपुण्यानें नांव मिळविलें होतें—त्या शीलेचा आज वसंतोत्सव होता. जिच्या सौंदर्यानें आणि कलेनें मोठमोठ्या कोट्याधीशांना वेडे केलें होतें, त्या शीलेनें सर्व श्रीमंतांना लाथाडून देऊन वसंतसारख्या एका सर्वसाधारण इसमाला माळ घालावी; त्याच्याशीं लग्नानें बांधलें जावें ही गोष्ट सर्वांचाच चर्चेचा विषय होऊन बसली होती. उपहासानें कित्येक जण असेंहि म्हणत कीं, 'नाहीं म्हणायला त्या दोघांत एक साम्य आहे खरें आणि तें म्हणजे हेकेखोरपणा आणि संतापी स्वभाव. तेवढयावरच ती लग्न करीत असावी!'

आणि ही गोष्ट कांहीं खोटी नव्हती. पण त्या थोड्याफार जणांना नर्तिकेला आवड असलेल्या सौंदर्यसौष्ठवाची जाणीव होती, त्यांना शीलाची ही निवड मुळींच वावगी वाटत नव्हती. केवळ श्रीमंतीखालीं झांकलेल्या श्रीमंतांच्या त्या बेढब आणि कलाहीन शरीरांपेक्षां शीलासारख्या अभिजात नर्तिकेनें तिच्या नर्तिकेच्या दृष्टीला सुंदर दिसणाऱ्या वसंतसारख्या रेखीव बांध्याच्या पुरुषाला निवडणें केव्हांहि योग्य असेंच होतें. त्यांत शीलेला पैशाची येवढी जरूरी कुठें होती ! लक्ष्मी—गडगंज लक्ष्मी तिच्या पायाजवळ लोळत होती. शीला इतकी श्रीमंत होती कीं नृत्यासाठीं तिनें एक खास नृत्यगृह आपल्या प्रासादामध्येंच तयार करविलें होतें. त्याच ठिकाणीं ती आपले नृत्याचे जलसे करी, त्या शीलेला पैसेवाल्यांच्या पागल प्रेमाशीं काय करावयाचें होतें !

आणि म्हणूनच स्वतःला सर्वतोपरी योग्य अशा वसंताची निवड करून तिनें त्याच्याशीं आजच्या मुहूर्तावर कायदेशीर विवाह केला होता.

या विवाहाच्या आदल्या रात्रींच वसंत—शीला बोलत बसलीं होतीं. त्या वेळीं बोलणें निघतां निघतां वसंतानें विचारलें होतें,

" खरंच शीला, उद्यां आपला विवाह होणार ! पण या विवाहाच्या दिवशीं मला कायमची आठवण राहील अशी कसली भेट तूं मला देणार आहेस ! "

" कायमची आठवण ! " आपल्या धनुष्याकृति भिंवया चढवून शीलानें तिरप्या नजरेनें पहात म्हटलें.

" कायमची आठवण रहाणारी भेट देण्यासाठींच उद्यां विवाह करीत आहोंत ना ! "

" म्हणजे ! " भाबडया वसंतानें प्रश्न केला.

" उद्यां लग्न करून मीच तुम्हांला मला देत नाहीं कां ! " मिष्कीलपणें हंसत शीला म्हणाली, "यापलीकडे मी आणखी कसली आठवण रहाणारी भेट देणार ! "

" ही भेट नव्हे." वसंत हंसतच म्हणाला, "हा विवाहप्रसंग झाला आणि त्या प्रसंगानिमित्तची भेट यापेक्षां निराळीच असली पाहिजे. कोणतं नृत्यनैपुण्य उद्यां तूं आम्हांला दाखविणार आहेस ! माझे मित्र मला म्हणतात, ' वसंत, तुझ्या लग्नानिमित्त आम्हांला तूं मेजवानी वगैरे कांहीं न दिलीस तरी चालेल. पण असं एक नृत्य आम्हाला दाखीव कीं जें आतांपर्यंत आम्हीं कधींहि पाहिलें नाहीं ! "

गोड हास्य करीत शीला म्हणाली, "असं ! एकूण माझ्या नृत्यकलेची आमरण आठवण राहील अशी भेट तुम्हाला आणि तुमच्या मित्रपरिवाराला पाहिजे तर ! आहे, आतांपर्यंत मी कुणाहीपुढें केलें नाहीं असं एक नृत्य माझ्याकडे आहे. आणि तें मी उद्यां तुमच्यापुढं करून दाखवायला कांहींच हरकत नाहीं. पण ·· "

बोलतां बोलतां शीलेचा चेहरा गंभीर होऊं लागला होता. त्या चेहऱ्याकडे पहात वसंतनें विचारलें, " पण- पण काय ! कसल्या एवढ्या विचारांत पडलीस तूं !"

" विचार--विचाराचा कांहीं प्रश्न नाहीं ! " शीलेनें उत्तर दिलें, " जें नृत्य मी तुम्हाला दाखविणार आहे तें नृत्य असें आहे कीं त्यानंतरच्या कांहीं अटी तंतोतंत पाळावयाला तुमची तयारी असेल तरच मी तें नृत्य उद्यां तुम्हाला करून दाखवायला तयार आहे !"

" कसल्या त्या अटी!"वसंतनें अधीरतेनें प्रश्न केला.

" अगदीं साध्या अटी आहेत त्या ! " गोड गोड असें हास्य करीत शीला म्हणाली. तिच्या चेहऱ्यावरचा गंभीरपणा जाऊन तिथें आतां हास्याचें मनोहर नृत्य सुरू झालें होतें. मधुर असें हंसत ती म्हणाली, " उद्यांचें नृत्य संपून मी आंत गेलें म्हणजे—"

" म्हणजे काय ! "

" म्हणजे तुम्ही आपल्या मित्रमंडळींना सोडून एका निमिषाचाहि विलंब न करितां मला येऊन भेटलं पाहिजे. यामध्यें यत्किंचितहि कसूर होतां कामा नये !'

" एवढंच ! " वसंतनें समाधानाचा एक मोठा निश्वास टाकून म्हटलें, " ही कसली मोठी अट ! यांत काय आहे विशेष ! "

" तें आतांच नाहीं ध्यानांत येणार तुमच्या ! पण कबूल आहे तुम्हाला ही अट !—द्या तर वचन ! " शीलानें आपला उजवा हात पुढें करून म्हटलें.

" हें घे वचन. " वसंत शीलाच्या हातावर हात ठेवीत तो हात तसाच दाबून धरीत म्हणाला, " उद्यां तुझें शेवटचें नृत्य झाल्यावर मी निमिषाचाहि वेळ न लावतां तुला आंत येऊन भेटेन ! झालं समाधान !"

" हो ! " मानेला हिसका देऊन शीलानें उत्तर दिलें. "उद्यां रात्रीं बोलवा तुमच्या मित्रमंडळींना !"

" पण काय सांगूं त्यांना ! " वसंतनें उत्कंठेनें प्रश्न केला, " कसलं एवढं अलौकिक नृत्य तूं उद्यां दाखविणार आहेस म्हणून सांगूं त्यांना ! "

" उद्यांच्या नृत्याचं नांव ! " त्या नृत्याचे नांव तोंडावर येतांच जणूं शीलाच्या अंगावर रोमांच थरथरले. अस्पष्ट अशा स्वरांत तिनें उत्तर दिलें, " उद्यांच्या नृत्याचें नांव ' मदननृत्य !'

आणि हेंच नृत्य पहाण्यासाठीं सकाळचा विवाहसमारंभ साजरा करून वसंतचा मित्र परिवार शीलाच्या त्या भव्य नृत्यगृहांत यावेळीं गोळा झालेला होता.

प्रकाशमान झालेल्या त्या रंगभूमीकडे प्रत्येक जण अतृप्त नजरेनें पहात होता. एकही पुरुष वादनकार त्यावेळीं रंगभूमीवर नव्हता. रंगभूमीवरील निरनिराळ्या वृक्षांच्या खोडाला टेकून, कुठें जाळीच्या झोल्यामध्यें अशी एक एक स्त्री वादनकार बसलेली होती. त्यापैकींच एका स्त्रीनें पुन्हां पखवाजांतून निनाद काढले.

" तक् तक् तदियन तदियन तक्डान् थैं, तक्डान थैं, तक्डान् थैं !

नुपुरांचा मंजुल नाद ऐकूं येऊं लागला. सर्व वाद्यांचा एकच स्वर रंगभूमी डोलवूं लागला. आणि त्याच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वरावर ताल धरीत शीलाची मूर्ति रंगभूमीवर अवतीर्ण झाली.

तिची या वेळची भूषा निराळीच होती. आपले लांबलचक केस तिनें पाठीवर मोकळे सोडले होते. कानाजवळील दोन बटी घेऊन तिची मागें वीण केली होती आणि कपाळावर एक बारीक फुलांचा हार आडवा बांधला होता. आजची सर्व भूषाच तिची पानांची आणि फुलांची होती. पण ती पानांची आणि फुलांची होती येवढं सांगूनच तिची बरोबर कल्पना येणार नाहीं. तिनें फुलांचे रंग आणि निरनिराळीं पानें यांची जी कलात्मक योजना केली होती, तिचें वर्णन कधींहि कुणालाहि करतां येणें अशक्य होतें.

रंगभूमीवर येतांच तिनें एकदां सर्वांना अभिवादन केलें; वसंतकडे पाहून मधुर असें हास्य केलें. एकदां भोंवतीं पाहून तिनें सर्व साथीदारांकडे दृष्टिक्षेप केला; पांच पावलें ती मागें गेली आणि पुन्हां पुढें येऊन तिनें हातावर ताल धरीत म्हटलें,

" धे तिरकिटतान् तक्डान्धा, धिडन् किटतक् तागितिट धिडान् ताकिट धाकिट धा !'

पखवाजांतून पुन्हां तेच स्वर निघाले आणि शीलाचें नृत्य सुरु झालें. तिच्या पावलांच्या घुंगुरांच्या ठेंक्यांतून तेच स्वर पुन्हां पुन्हां निनादित होऊ लागले.

" धे तिरकिटतान् तक्डान्धा धिडन्किडतक् तागितिट धिडान् ताकिट धाकिट धा !"

ती यावेळीं करीत होती, तें वसंतनृत्य होतें. वसंतोत्सवाचा सगळा भाव तिनें आपल्या नृत्यांत दिग्दर्शीत केला होता. आणि जणूं वसंतोत्सवांत रममाण झालेला तिचा आत्मा नृत्यांत स्वैरसंचार करतो आहे तोंच—

उजव्या बाजूच्या एका वृक्षाच्या फांदीवर हातांत धनुष्यबाण घेतलेली एका सुंदर दहा बारा वर्षांच्या युवकाची मूर्ति दिसूं लागली. त्याच्या मुद्रेभोंवतीं प्रकाशाचे रंगी बेरंगी वलय विलसत होतें. शीलेकडे मधुर असें हास्य करीत पहात त्या मूर्तीनें फुलांच्या धनुष्यावर फुलांचा बाण चढविला आणि तो शीलेच्या हृदयाच्या रोखानें सोडून तो युवक लुप्त झाला.

अहाहा ! सर्व नृत्याची, संगीताची साथ एकदम बदलली गेली.

कोणत्या तरी निराळ्याच नादांत सर्व रंगभूमि गढली गेली. सर्व भावना उत्तान करणाऱ्या स्वरांनीं सर्व प्रेक्षकगृह दाटून गेलें. आणि भारल्या गेलेल्या या उत्तान प्रसंगांत शीलाचें ' मदन नृत्य ' सुरुं झालें.

तें नृत्य पहात असतां प्रेक्षकगृहांतील लोकांत चळवळ सुरू झाली. प्रत्येकजण बेभान होऊन आपल्या उजव्या हातानें शेजारीं बसलेल्या इसमाचा खांदा, हात—सांपडेल तो घट्ट आंवळून धरूं लागला. आणि वसंत,–वसंताची वृत्ति तर बेफाम झाली होती. रंगभूमीवर शीलेच्या बेफाम नृत्याचा सारा रोख वसंतवरच खिळलेला होता. तिचा प्रत्येक कटाक्ष वसंतच्या वृत्ति प्रज्वलित करीत होत्या आणि वसंतच्या त्या प्रज्वलित भावना पहातांच शीलाहि बेफाम बनत होती.

आणि शीलानें अखेरचे तोडे घेतले आणि तीं तशी बेफामपणें आंत गेली.

रंगभूमीवर पडदा पडला.

सर्व प्रेक्षकगृहाला स्वर्गांतून भूतलावर लोटून दिल्यासारखें झालें. प्रत्येकजण एकदम उठून उभा राहिला. आणि वसंतहि आंतमध्यें जाण्यासाठीं निघाला. पण, त्याच्या भोंवतीं त्याच्या मित्रांचा गराडा एवढा होता, आणि प्रत्येक जण वसंतासारख्या सुदैवी इसमाची स्तुति करण्यांत इतका गर्क होता कीं, त्या स्तुतिसुमनांच्या वर्षावांत वसंत अडकून पडला.

शीला रंगभूमीवरून जी बेफाट निघाली, ती आधींच तिनें सुसज्ज ठेवलेल्या नजीकच्याच वेषभूषागृहांत येऊन पोहोंचली. एक मोठा मंचक तिथें हरतऱ्हेच्या फुलांनीं सुशोभित केलेला होता. एका भिंतीला एक मोठा आरसा लावलेला होता. जवळच वेषभूषेचीं साधनें होतीं. भिंतीला शीला करीत असलेल्या शिवपार्वति नृत्य अशा सारख्या पौराणिक नृत्यांची कल्पना येईल अशी कांहीं चित्रें होतीं.

शीला जी आली ती एक निमिष तशीच उभी राहिली. आतां वसंत येईल याची तिला खात्री होती. आपल्या पायाचें आंगठे तिनें तळपायाखालीं मोडून धरले होते. हाताचा आंगठा मुठींत धरून मुठी गच्च आंवळून धरल्या होत्या. मादक नजरेनें ती भोंवती पहात होती.

पांच मिनिटें गेलीं. आपले पंचप्राण कंठाशीं आले असें तिला वाटलें. आतृप्त नजरेनें ती दाराकडे पहात होती. तितक्यांत दारांत पावलांचा आवाज झाला. वसंतच आला असें समजून ती दाराकडे धांवली. आणि दारांत उभ्या असलेल्या मूर्तीला तिनें घट्ट आलिंगन दिलें. तिचे डोळे नशा आल्यासारखे अर्धवट बंद झाले होते. आपल्या बाहुपाशांत तिनें त्या मूर्तीला घट्ट आंवळून धरले होतें. त्यांच्या मुखाचीं चुंबनें घेण्याचा तिनें सपाटा चालविला होता. त्या मूर्तीला काय करूं आणि काय नको असें तिला झालें. तिला अतृप्तता वाढूं लागली आणि बाहुपाशांतील तो जीव तसाच ओढून घेऊन ती फुलांनीं सुशोभित केलेल्या मंचकावर जाऊन बसली. आपल्या पायाच्या विळख्यांत तिनें तो जीव आंवळून धरला होता.

तिच्या सर्वांगावर भावनांच्या लाटा थरथरत होत्या. नाकांतून उष्ण श्वास वाढूं लागले होते. पुन्हां—पुन्हां सर्वांगाचें आकलन करून तिनें त्या मूर्तीला पुन्हां कुसकरून त्याचीं चुंबनें घेतलीं.

आणि दारांतून किंचित् रुक्ष स्वरांत हांक आली. " शीला ! "

सुरेल संगीताला बेसूर करण्याचा तो रुक्ष स्वर होता. त्या बेसूरपणानें शीला किंचित् भानावर असल्यासारखी झाली. तिनें दाराकडे पाहिलें, तिच्या वसंताची मूर्ति तिथें उभी होती.

आपल्या बाहुपाशांतील गुदमरला गेलेला तो जीव तसाच टाकून देऊन शीला दाराकडे वसंतला अलिंगन देण्यासाठीं धावली.

पण वसंतच्या चेहऱ्यावर पुरुषी मत्सराचें तांडव नृत्य सुरु झालें होतें.

शीलाच्या आधीर बहुपाशाला रोखून धरून तिचा दंड धरून गदगदा हालवीत वसंतनें विचारलें." शीला, हा कोण !"

" हा ! " शीला मंचकाजवळ विकल होऊन पडलेल्या त्या जीवाकडे पहात म्हणाली, " हा आतां मदनाचं काम केलं तो माझ्या परिवारांतला अरुण !"

" अरुण ! " दांत ओठ खात वसन्त म्हणाला, " त्याला आलिंगनं देऊन, त्याचीं चुंबनं घेण्यांत तुला समाधान वाटतं !—हें तुझं सुख ! अकरा वर्षांचा अरुण उद्यां अठरा वर्षांचा झाला म्हणजे ! "

मदननृत्यानें शीलाच्या सर्वांगांत भिनलेल्या भावना कोठल्या कोठें पळाल्या. आपल्या धनुष्याकृति भिंवया चढवून तिनें प्रश्न केला, " म्हणजे—म्हणजे काय !"

" म्हणजे काय ! " वसंत कुत्सित स्वरानें म्हणाला, " म्हणजे आज माझी वाटणारी गरज उद्यां तुला मुळींच वाटणार नाहीं ! हाः हाः हाः हाः !! अखेर नर्तिका ती नर्तिकाच ! "

या शब्दांनीं शीला डिंवचली गेली. तिचे डोळे तळपूं लागले. " नर्तिका नर्तिका ! काय म्हणतां तुम्ही !" तिनें संतापानें प्रश्न केला.

" नर्तिका ! कुलटा ! " पुरुष जागा झालेल्या वसंतच्या तोंडून शब्द बाहेर आले.

" नर्तिका ! कुलटा–" शीलाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. संतापून एकेक शब्द जणूं जळतच तिच्या तोंडून बाहेर पडूं लागला, " ज्या इसमाला एका रात्रीपूर्वी दिलेल्या वचनांची आठवण रहात नाहीं त्यानं दुसऱ्याचे दोष जरा उघड्या डोळ्यानं पहावेत. कायहो केलं मी ! "

" काय केलं ! काय करायचं बाकी ठेवलं आहे !" वसंतनें कातावून म्हटलें.

" नर्तिका—कुलटा—काय ठेवायचं बाकी ठेवलं आहे !" शीलाचें डोकें भडकलें. "मी कुलटा आहे हाणतां! मी कुलटा आहे. जा-जा-जा-मी कुलटा आहे. तुमचा माझा कांहीं एक संबंध नाहीं. चला, चालते व्हा ! मला तुमच्याशीं–नव्हे कोणाशींच यापुढें संबंध ठेवायचा नाहीं!"

रागाच्या भरांत शीलानें वसंतला वेषभूषेच्या खोलीबाहेर ढकललें. ही घट-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पड ऐकून तिचा सर्व परिवार तेथें गोळा झाला होता. पण शीलेपुढें बोलावयाची कोणाचीहि प्राज्ञा नव्हती. शीलेनें वसं- तला ढकललें आणि धाडकन् दार लावून घेतलें. दारावर डोकें टेकून ती तशीच उभी राहिली. समोरच्या आरशांत तिचें प्रतिबिंब पडलें होतें. तें प्रतिबिंब पहा- तांच तिचा रागाचा पारा पुन्हां चढला. आपल्या सर्वांगावरची फुलांची भूषा तिनें रागानें तोडून टाकली. तिच्या हृदयांत हलकल्लोळ माजला होता. या स्थितींत कसला तरी आधार मिळेल म्हणून तिनें भोंवताली पाहिलें. भिंतींवर चित्रांच्या तसबिरी टांगल्या होत्या.

त्यामध्यें कैलासांत शंकर तपश्चर्येला बसले आहेत आणि भिल्लीणीच्या वेषांत त्यांना मोहण्याकरितां आलेल्या पार्वती- बाईंचें एक चित्र होतें. पलीकडे श्रीरा- मांचें एक चित्र टांगलें होतें. वनवासांत सीतामाईला रावणानें पळवून नेल्यानंतर सीतेचा विरह न साहवून श्रीरामचंद्र झाडाझुडपांना आलिंगनें देत आहेत, हें चित्र होतें.

त्या चित्राकडे शीलेची दृष्टि रोंवली गेली. त्याकडे पाहतां पहातां तिचा क्रोध नाहींसा झाला, डोळे पाण्यानें भरून आले, आणि अस्पष्ट असें शब्द तिच्या तोंडांतून बाहेर पडले, " एकपत्नीव्रत आचरणाऱ्या रामानें सीतेचा विरह न साहून झाडाझुडपांना आलिंगनें दिलेलीं जगाला चालतील, पण माझ्या सारख्या एका नर्तिकेनें ज्याच्या मनांत ' स्त्री–पुरुष भावांचे अद्याप उत्पादनहि झालें नाहीं ' अशा कोंवळ्या मुलाला मदाच्या भरांत आलिंगन दिलेलें जगाला चालणार नाहीं ! "

तिला ही विचारसरणि असह्य झाली. तिनें भोंवती पाहिलें. इतका वेळ भांबा- वून गेलेला अरुण कोंपऱ्यांत थरथर कांपत उभा होता. त्याच्याकडे धांवत जाऊन तिनें त्याला हृदयाशीं घट्ट धरलें, आणि ' अरु, माझा बाळ तो ! ' असें अर्धवट शब्द उच्चारीत, त्याच्या कपाळाचा मुका घेत ती मंचकांवर निश्चेष्ट पडली.

———

द. कृ. सांडू ब्रदर्स
यांचा
महामंजिष्ठादि काढा.
१ उपदंश गर्मीसंबंधीं विकारांवर, २ व रक्तशुद्धीवर
खर्जुरासव.
दमा, खोकला, श्वास व छातीचे विकारांवर
धातुपौष्टिक गोळ्या
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स,
कारखाना–चेंबूर, दुकान–ठाकूरद्वार.
शाखा:—१ लेडी जमशेटजी रोड, दादर. २ पोयबावडी परळ.

बृहन्महाराष्ट्रांतील सर्वांचें आवडतें दैनिक !
१ पैशांत
रॉयल आकाराचीं ६ पानें
प्रभात
देशी व परदेशी ताज्या बातम्यांचें संकलन
मुंबईत सतत ६ वर्षें जनताजनार्दनाची सेवा बजावून ' प्रभात 'नें दक्षिण महाराष्ट्रावर स्वारी केली.
' प्रभात 'चे विशेष:—दक्षिण महाराष्ट्रांतील ताजी व खुसखुशीत बातमीपत्रें, अ. प्रे., यु. प्रे. व रूटरच्या ताज्या बातम्या याशिवाय सिनेमावृत्त, वाङ्मय–संसार, इ. लोकप्रिय सदरें. आणि हें सर्व
अवघ्या १ पैशांत
' प्रभात 'चा पुण्याचा पत्ता:—जमखंडीकरांचा वाडा, ४९५–९६ शनवार पेठ, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कालपहाड

लेखकः—कमलाकर ए० शुक्ल.

घड्याळांत चाराचे टोके पडले. अन् मी पटपट कपडे घालून. माझ्या एका स्नेह्याकडे जायला निघालों. रस्त्यांत आणखी ओळखीचे दोघे तिघे भेटले. सस्मित नमस्कारांची देवाणघेवाण झाली. अन् आम्हीं एकदांचे आमच्या मित्राकडे येऊन पोहोंचलों.

तेथें गेल्यावर एका रिकाम्या खुर्चीवर अधिष्ठीत होत, मी भोवतालीं नजर टाकली. तेथें असलेल्या मंडळींत एक गृहस्थ अनोळखी दिसले.

आणि तेवढ्यांत माझ्या स्नेहानें त्या अनोळखी गृहस्थाचा आणि माझा परिचय विधी उरकून घेतला.

ते एका संस्थेचे प्रचारक असून, संस्थेच्या प्रचारकार्यासाठीं येथें आले होते.

अल्पावधींतच आम्हीं गप्पाष्टकांत रंगून गेलों. जरा वेळानें त्यांनीं आम्हांला मध्येंच एक प्रश्न विचारला—

तुम्हीं कुणीं मूर्तिभंजक 'कालपहाड' हें पुस्तक वाचलं आहे कां ?'

' कुणीं उत्तर देत नाहींसं पाहून मी हळूच म्हणालों.

' मी वाचलं आहे तें पुस्तक '

' मग सांगा बघूं, तें वाचून तुम्हांस काय वाटलं !'

' दुसरं काय वाटणार ! आपल्या समाजाच्या अनुदार, संकुचित, अन् ऐक्यविध्वंसक वृत्तीचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजेच ' कालपहाड ' !

' बरोबर बोललांत. प्रचारकार्यांत मला येणारे अनुभवही तुमच्या म्हणण्याला पोषक असेच आहेत. '

' तें कसं काय ! ' उत्सुकतेनें मी पृच्छा केली. आणि सर्वांनीं असा एकदां अनुभव सांगण्याविषयीं साग्रह विनंती केली.

' तुमचा आग्रहच आहे, तर सांगेनही मी. पण तुम्ही त्यांतील व्यक्तींचें नांव, गांव सांगा, असा आग्रह धरतां कामा नये. '

यांवर सर्वांनीं संमतिदर्शक माना लिविल्या.

आणि ते पुढें सांगूं लागले—

—घंटा झाली. अन् वारुळांतून मुंग्या बाहेर पडाव्या, त्याप्रमाणें त्या हायस्कूलमधून विद्यार्थिवर्ग बाहेर पडला. बहुतेक विद्यार्थी निघून गेले होते.

एक मुसलमान विद्यार्थी जरा रेंगाळतच त्या रस्त्यावरून चालला होता.

एक ' ब्राह्मणकन्या– ' केतकरांची नव्हे बरं कां !—अर्थात् त्या हायस्कूलची विद्यार्थिनीही त्या हायस्कूल गार्डनमधून बाहेर पडून रस्त्याला लागली. तो मुसलमान विद्यार्थी तिला पहातांच खांकरूं लागला; डोळे मिचकावूं लागला. तशी ती तरुणी घावरली, अन् चालण्याचा वेग वाढवून ती रस्ता आक्रमूं लागली. बरेच दिवसांपा न तो तिला दुरून असभ्य [illegible] करून त्रास देत असे. त्या मुसलमान विद्यार्थ्यानें जरा एकवार आजूबाजूला पाहिलें. आणि एक बारीकसा दगड त्यानें त्या मुलीवर फेंकला.

आणि येवढ्यांत त्याच हायस्कूलच्या एका हिंदू विद्यार्थ्यानें त्याचें मनगट धरून खेंचीतच त्याला हायस्कूलमध्यें आणिलें. ती मुलगी केव्हांच घरीं निघून गेली.

हेडमास्तरसमोर त्या मुसलमान विद्यार्थ्याला खेंचून उभें करीत त्यानें घडलेली सर्व हकीगत सांगितली. आणि पुढें तो असेंही म्हणाला कीं, ' आपल्या वर्गभगिनीशीं यानें असें असभ्य वर्तन करावें कां ! हिंदु मुली म्हणजे काय याला परसांतली भाजी वाटते ! आपण याचा योग्य तो न्याय केलाच पाहिजे. सर ! आपण जरी मुसलमान असलां, तरी आपल्या निःपक्षपाती बुद्धीवर माझा विश्वास आहे. आणि अ[illegible] पहा, कीं माझ्या मुसलमान वर्गभ[illegible]

" आमची अन्न काय तुम्ही...... "

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ळीं जर मी असें वर्तन केलें असतें र.....!'

हेड मास्तरनीं क्षणभर थांबून उत्तर लें, "ठीक आहे. तुम्ही कांहीं काळजी नका. त्या मुलीला अन् तुह्मां शेघांना उद्यां मी ऑफिसमध्यें बोलावीन. आणि एकदांचा या प्रकरणाचा निकाल लावून टाकीन!"

दुसऱ्या दिवशीं मधल्या सुटींत त्या दोघांना ऑफिसमध्यें बोलावण्यांत आलें. हेडमास्तर त्या मुलीस म्हणाले, 'काय गे। यानें काल सुटी झाल्यावर तुम्हांला खडा मारला कां?'

ती मुलगी जरा गोंधळली. तिच्या मनाचा एक निश्चयच होईना. क्षणभर शिकवून पढविलेल्या पोपटासारखी ती बोलूं लागली.—

"यांनीं मला मुळींच खडा मारला नाहीं!"

पण, बोलतांना तिचा आवाज मात्र कापरा येत होता. तो तेजस्वी तरुण उद्गारला, "काय यानें तुह्मांला खडा मारला नाहीं! खरं सांगतां तुम्ही हें?'

'हो. खरं सांगतें?'

'ऐकलंत! यावर तुमचं कांय म्हणणं आहे! मला वाटतं, तुह्माला कांहीं तरी दृष्टिभ्रम झाला असेल.' हायस्कूलचे हेडमास्तर म्हणाले.

क्रोधाचा ज्वालामुखी आंत नुसता धुमसत होता. उष्ण सुस्कान्याच्या रूपानें त्याची वाफ जणूं बाहेर पडत होती. त्या दृष्टीनें खालीं पहात हिंदू तरुण म्हणाला, 'सर, झाल्या प्रकाराबद्दल, मला क्षमा करा. बहुदा आपण ह्मणतां तसा दृष्टिभ्रमच झाला असेल मला! आणि त्या दोघांकडे रोंखून पहात तो पुढें ह्मणाला, 'पण आतां मात्र तो भ्रम नाहींसा झाला आहे!' विकट हास्य करीत तो पुढें ह्मणाला, 'केवढा दुर्दैवी मी!' अन् तडक तो हायस्कूलबाहेर पडला. पण दुर्दैवानें त्याच्यापुढें आणखी निराळेंच ताट वाढून ठेवलें होतें.

सुमारें एक तासानें त्या मुलीच्या घरील एक नोकर त्याला बोलावूं आला.

तेथें गेल्यावर त्या मुलीच्या वडिलांनीं रावसाहेबांनीं—उलट त्यालाच दटावलं.

'आमची अब्रू काय तुम्ही लिलावांत विक्रीला काढली आहे काय? आमच्या मुलीच्या बाबतींत तुम्हांला मध्यें लुडबूड करून चोंबडेपणा करायला कुणीं सांगितलं होतं!' त्यांनीं विषारी शब्दांचा नुसता भडिमारच केला त्याच्यावर. अंतःकरण पिळवटून तो येवढंच म्हणाला. 'क्षमा करा. अशी चूक माझ्या हातून पुनः कधींही घडणार नाहीं. घडली ही चूक पहिली अन् शेवटचीच ठरेल!"

क्रोधानें नुसता जळतच तो घरीं आला.

दुर्दैव कीं सुदैव कांहींही म्हणा—त्याचवेळीं मी त्याचे येथें गेलों. जरा वेळानें शांत होत घडलेली हकीगत त्यानें सांगितली.

एका हातानें डोक्यावरील केंस विस्कटीत, दुसऱ्या हातानें मुठी वळींत दांत-ओठ खात तळमळून तो येवढंच म्हणाला, 'आजपासून माझं ध्येय बदललं. विचार बदलले.' जणूं कोणत्या तरी मागील गोष्टींचा चलच्चित्रपट प्रत्यक्ष पहात आहे अशा आविर्भावांत दृष्टी समोरच्या भिंतीवर रोंखीत तो म्हणाला, "दृष्टिभ्रमच झाला असेल मला! पण आतां मात्र तो साफ नाहींसा झाला आहे." नंतर माझ्याकडे वळून तो म्हणाला, "हें पहा! तुमची आमची ही शेवटचीच भेट. तुमचें आमचें ध्येय, विचार आजपासून भिन्न झाले. आतां एकच विचार, हिंदूंचीं नाकें ठेंचायचीं. कुलीनपणाचा टेंभा मिरविणारे—मग ते कोणत्याही जातीचे असोत—त्यांच्या पोरींचें शीलभ्रष्ट करून, त्यांच्या अब्रूचे धिंडवडे काढायचे. बस्स ठरलं.!'

—आणि कांहीं वर्षांनीं ऐकायला मिळालें कीं, एका प्रबल आणि बुद्धिवान हिंदू गुंडाची भीती सर्वांना—विशेषतः मुसलमान मवाल्यांतल्या 'दादां' ना सुद्धां—वाटते.

मला केव्हांच समजून चुकलं, कीं, एक शीलभंजक कालापहाड जन्माला आला आहे.

———

प्रतिज्ञापूर्ति

लेः--कुमारी कस्तूर क्षीरसागर

"ए आई गं, इथं बघ. हा बघ आपल्या दादाचा पुतळा!"

पलिकडच्या खोलींतून येत असलेल्या ताईच्या हांका ऐकतांच आई जवळ जवळ धांवतच बाहेर गेली. मला तर जागच्या जागीं खिळूनच गेल्यासारखें वाटलें. मागच्या स्मृतींचें ओझें माझ्या डोक्यावर आदळलें.एक दोन मिनिटें भाराबलेल्या स्थितींत मी खुर्चीवर बसून होतों. एकाएकीं मी उठलों व आईच्या मागें धावलों. दिवाणखान्यांत शिरतांच प्रथम माझी दृष्टि माझ्या पत्नीच्या—सुधेच्या—फोटोवर गेली. ब्रह्मांड आठवलें मला!

"सुधे, तुझी प्रतिज्ञा पुरी न करतांच तूं गेलीस ना शेवटीं!"

पुन्हां मला ताईची हांक ऐकूं आली. मी तिच्याकडे पाहिलें. ती खुणेनें मला प्रभाकडे पाहाण्यास सांगत होती. स्वप्नांत तर नाहीं ना मी! होय, ती माझीच प्रतिमा होती. प्रभा माझी नक्कल करण्यांत गुंग होऊन गेला होता. एका मेजावर दोन तीन जाड जाड पुस्तकें ठेवून शेजारच्याच आरामखुर्चीवर स्वारी डोळयांना,चष्मा लावून एकावर एक पाय चढवून व दोन बोटांत एक कागदाची सुरनळी सिगारेटप्रमाणें धरून एक पुस्तक वाचण्यांत गढून गेली होती. मेजावर मुद्दाम एक चहाची रिकामीच कपबशी ठेवून दिली होती. आम्हीं पाहात होतों याची त्यास दादही नव्हती. तो आपली पोज शक्यतों 'परफेक्ट' करण्याचा प्रयत्न करीत होता.

मला त्याच्याकडे पहावेना! डोळे घट्ट मिटून तें चित्र दूर करण्याचा प्रयत्न मी केला. पण तें तितक्याच उठावदारपणें माझ्या मनावर उमटूं लागलें. माझ्या काळजांत कोणी सुरी खुपसत आहेसें वाटलें.

"सुधे, तुझी प्रतिज्ञापूर्ति झाली पण तूं आज नसावीस ना!"

* * *

सहा वर्षांपूर्वीचे दिवस मला आठवले. गिरगांवांतील ती चाळ, त्यावेळीं मी सीनियर बी. ए. च्या वर्गांत होतों. आतांपर्यंत मी गिरगांवांत मामांच्या येथें अभ्यासासाठीं राहात होतों. परंतु मामांच्या आकस्मिक निधनामुळें आम्हांला मला व मामींना, त्या घरांत रहावेसें वाटेना. मामींनीं तर कोंकणांत घरीं पोंचविण्याचा आग्रह धरला, व त्याप्रमाणें त्यांना त्यांच्या घरीं म्हणजे माझ्या आजोळीं मी पोंचविलें. दुसरें जवळच्या नात्याचीं माणसें मुंबईत कोणींच नव्हती. व माझें तें शेवटचें वर्ष असल्यानें मुंबई सोडतां येईना तेव्हां आईच्या सांगण्यावरून कोठेंतरी एकादी खोली घेऊन राहाण्याचा विचार केला आणि तीनच महिन्यांपूर्वीं मी या चाळींत, सुधेच्या शेजारच्याच खोलींत, माझें बिऱ्हाड थाटलें.

सकाळीं सातला उठून, चहा घेऊन व इतर नित्यकर्में आटोपून मी खाणावळींत जेवावयास जात असे, खाणावळींतून परत घरीं न येतां तसाच कॉलेजांत जाई. विद्यार्थ्यांचा संसार सर्व नोकराच्या हातीं, माझ्या नोकराला माझ्या हजिरींत येण्यास जमत नसल्यामुळें खाणावळींत जातांना मी खोलीची किल्ली सुधेच्या आईकडे, शांताबाईकडे, देऊन जात असे. सुधेच्या घरची मंडळी थोड्याच दिवसांत माझ्या दाट परिचयाची झाली. मनोहर—सुधेचा भाऊ—नुकताच एम्. ए. होऊन एका शाळेंत शिक्षकाचें काम करीत असे. सुधेनें मॅट्रिक होऊन कॉलेजांत न जातां आपल्या आवडत्या कलेचें--शिल्पकलेचें, शिक्षण घेण्यास सुरुवात केल्यास दोन वर्षें होत आलीं होतीं. लहानपणापासूनच तिला शिल्पकलेचा नाद होता. रिकाम्या वेळांत तिनें बरींच लहान मोठीं मॉडेल्स तयार केलीं होतीं. आतां तर त्या कलेचें शिक्षणच घेऊं लागल्यामुळें थोड्याच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अवधींत तिनें त्या कलेंत प्राविण्य मिळविलें. शांताबाईच्या बोलण्यावरून मला असें कळलें कीं, सुधेचे वडीलही एक नामांकित शिल्पकार म्हणून प्रसिद्धीस आले असते. पण पैशाच्या अभावीं त्यांना तिची जोपासना करतां आली नाहीं व म्हणूनच मनोहरनें जेव्हां सुधेचा कल शिल्पकलेकडे पाहिला तेव्हां ती वाढविण्यास त्यानें तिला उत्तेजन दिलें.

नेहमीप्रमाणें मी त्या दिवशीं दुपारीं तीन वाजतां घरीं परतलों; शांताबाईकडे किल्ली मागण्यास गेलों; पण त्या घरीं नव्हत्या. सुधा बाहेरच्याच खोलींत एक ' बस्ट ' करण्यांत व्यग्र झाली होती. एका लहानशा फोटोवरून ती तो बनवित होती. त्या बस्टकडे पाहातांच तो तिच्या वडिलांचा आहे, हें मी तात्काळ ओळखलें. सुधा इतकी हुबेहूब प्रतिमा कोरूं शकते, हें आजच माझ्या दृष्टीस पडलें. क्षणभरच माझ्या मनांत विचार आला. मी तिला म्हटलें, ' सुधाबाई, जिवंत मनुष्याला बस्याचा मॉडेल बसवून तुम्ही ध्याचा बस्ट करूं शकाल ? '

' मग नेहमीं आम्ही काय करतों ? जिवंत मनुष्यानांच मॉडेल्स बसवितों ! ती हांसतच म्हणाली.

' माझा बस्ट तुम्ही करून द्याल कां ? '

मी भीतभीतच विचारलें.

" हो ! आनंदानें पण तुम्हांला कुठं वेळ आहे मॉडेल म्हणून बसायला ?"

" रोज एक दीड तास मला बसतां येईल. पण—पण मला नाहीं वाटत तो तुम्हांला करतां येईलसं !" मी चांचरतच बोललों !

सुधेने रागानेंच माझ्याकडे पाहिलें. आपल्या कलेविषयीं शंका घेतलेली तिला मुळींच खपली नाहीं.

"मला तुमचा बस्ट करतां येणार नाहीं हें जर तुम्हांला आधींच ठाऊक होतं तर विचारलं कां तुम्ही मला ! मी कांहीं माझ्या कलेचं तुमच्याजवळ प्रदर्शन करायला आले नव्हते. माझ्याविषयीं जर तुम्हांला खात्री नव्हती, तर एकाद्याची हेटाळणी करण्यानें काय मिळतें देव जाणें !"

" छे, तुमची हेटाळणी करण्यासाठीं मी असें मुळींच म्हटलें नाहीं. तुमची प्रत्यक्ष कृति माझ्यापुढें असता तिची हेटाळणी मी कशी करीन ! परंतु, परन्तु—पण नकोच. ती गोष्ट मी तुम्हांला सांगितली, तर तुम्ही माझी मूर्खांतच गणना कराल. "

" काय, काय ती गोष्ट आहे, सांगा तरी " सुधेनें उत्सुकतेनें विचारलें.

स्त्रिया जात्याच चौकस. आपण एकाद्या गोष्टीचा सुगावाहि लागूं न देण्याची कितीही खबरदारी घेतली तरी त्या ती गोष्ट आपणांकडून अनेक युक्तिप्रयुक्तीनें काढून घेतील मग माझ्या अर्धवट भाषणानें उत्कंठित झालेली सुधा ती गोष्ट पूर्ण कळवून घेतल्याशिवाय कशी राहील ! मी बरीच टाळाटाळी केली. पण तिनें मला सांगण्यास भाग पाडलेंच.

—पण एकाद्याचा फोटो हुबेहुब आला नाहीं. म्हणून त्याचें शिल्पचित्रही हुबेहुब येणार नाहीं. उलट फोटोला नालायक असलेल्या चेहऱ्यांवरूनही शिल्पकाराची शिल्पकृति कलापूर्ण निघूं शकेल. "

' माझ्या बाबतींत मी फारच निराश झालों आहें. फोटोग्राफर नवशिके असते तर मी एकवेळ त्यांना दोष दिला असता. नांवाजलेल्या चित्रकारांचीही ' विनायकं प्रकुर्वाणं रचयामास वानरम् " सारखी स्थिति होणें हा मी माझ्या प्रतिमापूर्णतेंतील अपशकुन समजतों. तुम्ही हंसाल, खुळी कल्पना आहे माझी हें मीही कबूल करतों. पण तरीही मला सारखं सारखं वाटतं कीं, माझी प्रतिमा हुबेहूब निघूं शकणार नाहीं. तुमच्याकडून माझा बस्ट करवावा असें हज्जारदां आलें मनांत पण मागील इतिहासाची पुनरावृत्ति नकोच असें वाटूं लागलें व म्हणूनच तुमचा अमोल वेळ विनाकारण खर्च करणें मला अवघड वाटूं लागलें.

" माझ्या हातून तुमचा बस्ट न होणें हा माझ्या कलेला लागलेला कलंकच वाटतो मला. आणि तो धुवून काढण्यासाठीं माझ्या प्राणाची देखील पर्वा देखील पर्वा बाळगीत नाहीं. मग याल कां तुम्ही उद्यांपासून ? माझ्या प्रयत्नांची शिकस्त करून पाहीन् मी. प्रतिज्ञाच करतें मी आपला बस्ट काढून देण्याची. माझा नाहीं तुम्ही सांगतां त्यावर विश्वास बसत. फोटो काढणाराचीच चूक होत असली पाहिजे. तुम्ही याच उद्यां. मी कांहीं आपला फार वेळ घेणार नाहीं !'

' बरं जर तुमची इच्छाच असेल तर माझी कांहीं हरकत नाहीं. मला देखील ही खुळी कल्पना काढून टाकण्याची उत्कंठा लागली आहे.'

ती रात्र मी बहुतेक जागूनच काढली. सुधेचें भाषण सारखें मला आठवत होतें. पाहूं या तरी सुधेसारख्या कलावंताची कला !

× × ×

दुसऱ्या दिवसापासून मी सुधेकडे अर्धापाऊण तास मॉडेल म्हणून बसूं लागलों. दोन तीन दिवस ती उत्साहानें काम करीत होती. पण पुढें पुढें तिचा उत्साह मावळूं लागला. तिच्या मनासारखा कांहीं बस्ट उतरेना. एक दिवस तर तिनें पहिला बस्ट तसाच अपुरा टाकून दुसरा नवीन करण्यास सुरवात केली. पण त्यांतही तोच प्रकार. मी समजून चुकलों कीं, हिच्या बाबतींत सुद्धां ती गोष्ट खरी होऊं पाहात आहे. दिवसेंदिवस तिचा उत्साह जास्त जास्त कमी होऊं लागला व ती माझ्यासमोर भीतीयुक्त लज्जेनें वागत आहेसें मला वाटूं लागलें. मी तिला प्रयत्न सोडण्यास सांगूं लागलों. ती जरी नाखूष असल्याचें दाखवी तरी तसें करणें बरें असें तिलासुद्धां वाटूं लागलें. एक दिवस नेहमीप्रमाणें मी तिच्या खोलींत मॉडेल म्हणून बसण्यास गेलों. तिचा थाट कांहीं वेगळाच दिसला मला आज ! रोजच्या प्रमाणें एकदम कामास न बसतां आज तिनें दुसऱ्याच गोष्टी बोलण्यास सुरवात केली. तिच्या दृष्टींतही एकप्रकारची चमक मला दिसली. माझ्या मनांत चलविचल् होऊं लागली. मी शक्यतों तिच्याकडे पाहाण्याचें टाळीत होतों. आज काम करण्याची तिची इच्छा नाहींसे दिसलें, मलाहि तेथें तशा स्थितींत बसणें कसेंसेंच वाटलें. इकडच्या तिकडच्या गप्पा मारून व चहा घेऊन मी माझ्या खोलींत आलों.

आज ती असें कां वागली ? नेहमीची भाबडी सुधा आज कांहीं विशिष्ट भावानें माझ्याशीं वागली. दुसऱ्या दिवशींही तोंच प्रकार. आतांतर ती बस्टचें नांवही काढेनाशी झाली. मलाही उगीच तिला आठवण देऊन डिंवचावेसें वाटेना. माझा तिच्याकडे जाण्यांत मात्र मी एक दिवससुद्धां खंड पडला नाहीं. तिच्या माझ्याशीं वागण्यांत एकाएकीं पडलेला फरक मला अनूकूलच होता. आणि पर्यवसान व्हायचें त्यांतच झालें. एका सुमुहूर्तावर सुधा माझी झाली.

त्या नंतर एक वर्षाची गोष्ट. मी बी. ए. पास होऊन सध्यां एल्एल्. बी. च्या टर्म्स भरीत होतों. अजूनही आम्ही त्याच चाळींत रहात होतों. सुधेच्या माहेरची मंडळी मात्र हल्लीं पुण्यास, रहावयास गेली होती. सुधेलाही दोन महिन्यांपूर्वींच बाळंतपणासाठीं माहेरीं पाठविली होती.

तो दिवस ! त्या दिवशीं दुपारीं मी वाचीत पडलों होतों. मला झोंप केव्हां लागली कोण जाणें. पण सुधा मला हाका मारते आहेसें वाटलें. मी दचकून उठलों. तारवाला माझ्या नावानें ओरडत होता. मी उठून तार घेतली.

' सौ. सुधा अत्यवस्थ्य आहे, तातडतोब निघून यावें.'—मनोहर.

मी तसाच जरुरीपुरतें सामान घेऊन तीनच्या गाडीनें निघालों. गाडींत सारखा सुधेचाच विचार. सुधेच्या प्रथम भेटीपासूनचे सर्व प्रसंग माझ्या डोळ्यापुढून चलच्चित्रपटाप्रमाणें धांवत होते. वडिलांचा बस्ट काढीत बसलेली सुधा ! तिचें माझें भाषण ! तिची प्रतिज्ञा ! ' हो पण प्रतिज्ञा पुरी नाहीं केली तिनें अजून 'सहजच माझ्या तोंडून उद्गार निघालें.'

संध्याकाळीं मी सुधेच्या माहेरीं पोंचलों. मनोहर माझी वाटच पहात होता. पण मात्र मृत्यूच्या दारीं उभी राहून माझी वाट पहात होती. मी तिच्याजवळ गेलों. दुःखानें आणि तितक्याच आश्चर्यानें मी स्तिमितच झालों. त्या दिवशींची चमक आज मला तिच्या डोळ्यांत पुन्हां दिसली. तिचे ओंठ कांहींतरी पुटपुटूं लागले. मी तिच्या ओंठांजवळ कान नेला.

" त्या दिवसाची आठवण आहे कां ? माझी प्रतिज्ञा पुरी केली. मी जाऊं ना मी आतां ?"

मला कांहीं समजेच ना.

प्रतिज्ञा पुरी केली म्हणतेस पण माझी प्रतिमा कोठें आहे ?" मी म्हटलें.

तिनें मुलाकडे—प्रभाकडे—बोट दाखवलें.

× * *

" प्रभा, मी धांवत जाऊन प्रभाला हृदयाशीं धरलें.

"'दादा, दिसतो ना मी तुमच्यासारखा !'

" हो, हो. अगदीं माझी प्रतिमाच आहेस तूं. सुधे, शेवटीं तूं म्हटल्याप्रमाणें आपल्या प्राणांची सुद्धां परवा केली नाहींस प्रतिज्ञापूर्तिसाठीं. पण किती दुष्ट मी. माझ्या हट्टानें बळी घेतला मी तुझा !"

' आई, ताई, प्रभा आ वासून पाहात होती माझाकडे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रतिस्पर्धी

लेखकः—
बकुल बढे, नागपूर.

> त्याचें आयुष्य रुक्ष आणि ध्येययुक्त होतें वीरेन्द्राच्या परिचयामुळें त्याच्या आयुष्यांत स्निग्धपणा आला. त्याला सदैव तीच बोचणी लागली होती.

दुधानें तोंड पोळलें कीं, मनुष्य ताक-सुद्धां फुंकून पितो म्हणतात. दोन व्यक्तींचा परिचय जास्त दृढ होण्याकरितां एका बलवती शक्तीचें साह्य घ्यावें लागतें. ती म्हणजे विश्वास—विश्वासावरच मनुष्य संघटित कार्यें करूं शकतो.

चंद्रशेखराला आतां कुणाशीहि मैत्री करण्याची इच्छा नव्हती. पण त्या नवीन आलेल्या मुलाची, त्याच्या ठिकाणीं असलेली उत्कट भक्ति पाहून त्याचें अंतःकरण पाझरलें. वीरेन्द्राचा संबंध तुटल्यानंतर कुणाशीहि मैत्री करायची नाहीं, असें त्यानें ठरवून टाकलें. ज्या व्यक्तीवर आपण निस्सीम प्रेम करावें—आणि त्या गाढ प्रेमाचा शेवट मात्र भयंकर व्हावा यासारखी दुर्धर गोष्ट जगांत दुसरी नाहीं! चंद्रशेखरानें वीरेन्द्रावर पाठच्याभावापेक्षां नव्हे—स्वतःपेक्षां जास्त प्रेम केलें. त्याच्या साहाय्यावर त्यानें मोठमोठ्या मनोराज्याच्या इमारती बांधण्याचें ठरविलें. चंद्रशेखरचा देशाभिमान—करारीपणा त्याच्या प्रत्येक कृतींत निदर्शनास येत असे. त्याचे डोळे घारे असून लालबुंद होते. त्याच्या लालबुंद डोळ्यांतून क्रांतीची ठिणगी उडाली तर अखिल हिंदुस्थानांत क्रांतीचा वणवा सहज पेटेल असें पहाणाऱ्याला वाटेल. त्याच्या वागणुकींत असें कांहीं पावित्र्य होतें कीं त्याच्या क्षणैक सहवासांत मनुष्यावर त्याची सहज छाप पडत असे. त्याला पहातां क्षणींच मनुष्याला त्याचेविषयीं आदर आणि वचक वाटत असे आणि त्यानें सोडलेल्या हुकुमाविरुद्ध वागणें म्हणजे आपण कांहीं देशद्रोह करीत आहोंत अशी कल्पना मनुष्याच्या मनाला सहज शिवून जात असे!

त्याचें आयुष्य रुक्ष आणि ध्येययुक्त होतें. वीरेन्द्राच्या परिचयामुळें त्याच्या आयुष्यांत स्निग्धपणा आला. त्याला सदैव तीच बोचणी लागली होती. त्याच्या जीवनक्रमांत विरेन्द्राचा उदय झाला नसता तर चंद्रशेखर ही एक भिन्न आणि तेजस्वी व्यक्ति लोकांच्यासमोर आदर्श राहिली असती. त्यानें केलेली आयुष्यांतील प्रथम आणि शेवटची भयंकर चूक म्हणजे वीरेन्द्रावरील आत्यंतिक प्रेम! आतां ती चूक सुधारण्याचा तो प्रयत्न करीत होता. पण, भूतकाळावर काळाकुट्ट पडदा पाडतां आला असतां तर प्रत्येकाला उपरति होऊन त्याच्या हातून घडून गेलेल्या वाईट गोष्टींबद्दल लोकांनीं जन्मभर विनाकारण डागण्या दिल्या नसत्या!!

वीरेन्द्रांत कुणालाहि भुरळ पाडावी असे गुण होते. त्याचें तें भव्य कपाळ, तेजःपुंज डोळे आणि कमनीय बांधा या सर्व गुणामुळें तो कुणावरहि आपली छाप पाडित असे.

चंद्रशेखरानें वीरेन्द्राला प्रथम पाहिलें त्यावेळीं तो एक अजाण बालक होता. त्याचा तो बेडरपणा आणि बेफिकीरवृत्ति पाहूनच चंद्रशेखर फार खुष झाला. त्यानें वीरेन्द्राला आपल्या हृदयाच्या विशाल छायेंत आसरा दिला. पक्षीण ज्याप्रमाणें दिवसभर भटकून आपल्या पिलांसाठीं चोंचींतून खाद्य आणते त्याप्रमाणें जगानें बहिष्कृत केलेल्या चंद्रशेखरानें वणवण फिरून वीरेंद्रला सुखांत ठेवलें.

वीरेन्द्र मोठा झाला. चंद्रशेखरनें त्याला विश्वासांत घेतलें. जिवश्चकंठश्च वीरेन्द्र आपल्यावर उलटेल ही कल्पनाच त्याला किळसवाणी वाटली. त्यानें आपलें मनोगत वीरेन्द्राला सांगितलें.—आपल्या महत्त्वाकांक्षा कोणत्या मार्गानें सफल होतील ते मार्ग दाखविले. त्यानें आपल्या पंथाची त्याला दीक्षा दिली. वीरेन्द्र हा देशाचा स्वयंसेवक बनला. त्याच्या पंथाची शिकवण वीरेन्द्र लोकांना देऊं लागला. चंद्रशेखरला धन्य धन्य वाटलें. त्यानें आपला शिष्य नव्हे प्रतिनिधी तयार केला. त्यानें समाधानाचा विश्वास सोडला.

पण 'चिंतितो नर एक कांहीं दैव योजी दुसरें!' वीरेन्द्रानें आपल्या कार्याला फार उत्साहानें प्रारंभ केला. 'आपल्यावर होत असलेल्या अन्यायाचा नायनाट झाला पाहिजे—प्रत्येकानें स्वावलंबी बनून स्वराज्य हिसकून घेतलें पाहिजे' वगैरे जोरदार भाषणें करायला त्यानें नुकतीच सुरुवात केली होती.

त्या दिवशीं × × × × मैदानावरील ती प्रचंड गर्दी—वीरेन्द्राचें जोरदार भाषण—लोकांनीं काढलेले प्रशंसेचे उद्गार—कोपऱ्यांत बसलेल्या चंद्रशेखरचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले. त्याला अभिमान वाटला; आणि हा आपलें कार्य सिद्धीला नेणार याबद्दल विश्वास वाटला. त्याला वीरेन्द्राची दृष्ट काढाविशी वाटली.

पण त्या प्रसंगानंतर वीरेन्द्राच्या पाठीमागें सी. आय. डींतील लोकांचा ससेमिरा लागला. त्याच्यासमोर निरनिराळीं आमिषें ठेवण्यांत आलीं. पैशाचा त्याला मोह पडला. तो स्त्रीला भाळला. सरकारला बरें वाटलें. वीरेन्द्र चंद्रशेखरला सोडून गेला.

चंद्रशेखरच्या हृदयाच्या चिंधड्या चिंधड्या उडून गेल्या.—"विश्वास" वगैरे सब झूट आहे असें त्याचें ठाम मत बनलें. त्याच्या प्रेमाचा शेवट झाला. त्याच्या मनीषा असफल राहिल्या आणि कावळ्याच्या घरट्यांत बालपण घालविणाऱ्या कोकिळेनें पंख फुटतांच बाहेर पडावें म्हणजे कावळ्याला तिच्या स्वार्थीपणाची आणि लबाडीची चीड येते त्याप्रमाणें चंद्रशेखरची स्थिति झाली.

वीरेन्द्र विकारांना बळी पडेल आणि देशापेक्षां स्वार्थाकडे अधिक लक्ष देईल, ही कल्पनाच त्याच्या मनाला कधीं शिवली नव्हती. तो वीरेन्द्राच्या प्रेमानें आंधळा झाला होता. पण आज त्याचा आवडता वीरेन्द्र वेश्येच्या घरीं पडला होता. तो आतां उघडपणें चंद्रशेखरच्या तत्त्वाची टवाळी करीत असे.

त्यावेळच्या वीरेन्द्राचें हल्लीं असणारें शरीर म्हणजे विडंबन होतें. त्याच्या चेहऱ्यावरील तजेला जाऊन तो निव्वळ हाडांचा सांपळा उरला होता.

चंद्रशेखरनें जुने सर्व पाश तोडून टाकले. पूर्वस्मृति विसरून जाण्याचा प्रयत्न केला पण वीरेन्द्राची ती बेडर छबी नेत्रासमोर उभी रहातांच त्याचा पोटांत कालवाकालव होत असे! त्यानें जगाचा अजिबात संबंध टाकला. आपल्या दृष्टीनें योग्य अशी देशसेवा तो करूं लागला. त्याचे दिवस एकांतांत जाऊं लागले. तो बहुतेक वेळ वाचनांत घालवित असे. त्याचा हा ठराविक कार्यक्रम दोन वर्षेंपर्यंत अव्याहत चालू होता. मधून मधून सूर्यावर येणाऱ्या ढगांमुळें पृथ्वीवर छायाप्रकाश पडतो, त्याप्रमाणें वीरेन्द्राच्या आठवणीमुळें चंद्रशेखरच्या मुखावर खिन्नता पसरे!

× × ×

त्या दिवशीं एक सतरा अठरा वर्षांचा कोंवळा छोकरा चंद्रशेखरकडे आला. चंद्रशेखर स्तिमित झाला. समाजानें बहिष्कृत केलेला एक क्रांतीकारक असून अनेकवार जेलची हवा खाऊन आलेला एक मनुष्य होता. गुप्त हेरांचे डोळे त्याच्या क्षुल्लक हालचालींकडे असत. त्याचा एक पाय तुरुंगाच्या आंत होता. त्याच्याशीं मैत्री करणें म्हणजे आपल्यावर स्वखुषीनें संकट ओढवून घेण्यासारखेंच होतें. चंद्रशेखरला त्या तरुणाचें आश्चर्य वाटलें. आपल्याविषयीं अनभिज्ञ असणारा एखादा चुकलेला वाटसरू असेल असें त्याला वाटलें. पण त्याच्या प्रश्नांच्या उत्तरानें चंद्रशेखर गारच झाला.

'तुला ठाऊक आहे तूं कुठं आहेस-तें?'

'हो मी आपल्या देवाजवळ उभा आहें. प्रत्यक्ष चंद्रशेखरांच्या समोर उभा आहे--' तो बोलत उभा असतांना त्याच्या डोळ्यांतील पाणी मोठ्या मजेदार तऱ्हेनें चमकत होतें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'म्हणजे ! मला तुझ्या बोलण्याचा अर्थ कळला नाहीं—'

'चंद्रशेखर, विनाकारण कां तुही असं न समजण्याचं सोंग घेतां—मला तुमच्या पायांजवळ जागा द्या. मी आजन्म तुमच्याजवळ राहून तुमच्या तत्त्वांचें पालन करीन. मला माझ्या देशाची अनन्यभावानें सेवा करायची आहे. तो मार्ग तुमच्याखेरीज कुणींच दाखवूं शकत नाहीं. मी वीरेन्द्राप्रमाणें विश्वासघात करणार नाहीं. माझ्या प्रामाणिकपणाची तुम्ही परीक्षा घेऊं शकतां--'

वीरेन्द्राचें नाव काढतांच चंद्रशेखरचा चेहरा एकदम खिन्न झाला. तरुणाला चंद्रशेखरच्या मुखावरील झालेला फरक जाणवला. चंद्रशेखरच्या मुखावर असा फरक कां झाला, याबद्दल तो विचार करूं लागला. परन्तु लगेच चंद्रशेखरच्या मुखावरील उदासीनतेची छाया जाऊन त्याठिकाणीं गंभीरता पसरली.

'मुला, तूं अजून एक कोंवळा बच्चा आहेस. भावनावश होऊन अविचारानें कोणचीहि गोष्ट करूं नकोस. त्यामुळें कदाचित् पश्चात्ताप करण्याचा प्रसंग तुझ्यावर येईल.—माझ्या नादीं लागून आपलें जीवन फुकट घालविण्याची इच्छा करतोस ! माझ्यामुळें विनाकारण गुप्त पोलीसांचा तुला त्रास होईल. शिवाय देशसेवा करण्याचं आणि क्रांतीचा मार्ग स्वीकारण्याचं तुझं हें वय नाहीं. फुलपांखराप्रमाणें स्वैरतेनं वागडण्याचं हें तुझं वय आहे. तूं हे विचार मनांतून काढून टाक—'

'ते शक्य नाहीं. मी सर्व परिस्थितीचा पूर्णपणें विचार केला आहे. हा मार्ग मी खुषीनें स्वीकारीत आहें. हें कार्य म्हणजे माझ्या हृदयाची तळमळ आहे. त्यांतच माझी प्रगति आहे आपण त्या पवित्र कार्यापासून मला परावृत्त करूं नका. मला मार्ग दाखवा—'

तो तरुण अत्यंत कळकळीनें बोलत होता. त्याची कळकळ आणि नम्रता पाहून त्याच्या सत्यतेविषयीं चंद्रशेखरला खात्री वाटली. पण वीरेन्द्राची मूर्ति डोळ्यासमोर दिसतांच तो त्या तरुणाला आपल्याजवळ करण्याला भ्याला. बरांच वेळपर्यंत ते स्तब्ध होते. निर्णय काय द्यावा याबद्दल चंद्रशेखर विचार करीत होता, आणि निर्णय काय लागतो याबद्दल तो तरुण उत्सुकतेनें वाट पहात होता. चंद्रशेखरला विचार पडला. एकदां संकटानें दुखावलेला मनुष्य प्रत्येकवेळीं साशंक असतो. त्या तरुणाची मैत्री मृगजळ तर ठरणार नाहीं ! पत्र तो तरुण चंद्रशेखरच्या नज़रेला नजर मिळवित होता. त्या दृष्टींत सरलता होती. त्यांत लबाडी आणि लुच्चेपणा मुळींच दिसत नव्हता. ते डोळे त्याचा सच्चेपणा आणि विश्वासूपणा दर्शवित होते.

'काय चंद्रशेखर, अजून आपण माझ्यासंबंधी साशंक आहांत ! दुर्दैव माझं—आपल्या सारख्या विभूतींच्या सान्निध्यांत रहाण्याचं माझं भाग्य नाहीं—पण मी स्पष्ट सांगतों कीं, तुम्ही जर मला आसरा दिला नाहीं तर मी आपल्या जिवाचं काय करीन—तें मी बोलून दाखवित नाहीं.—बरं आहे—'

तो जाण्याला निघाला. तो वळला. दारापर्यंत जाऊन पोचला असेल तोंच 'थांब' असें मागून अधिकारवाणीनें चंद्रशेखर म्हणाला म्हणून तो परतला. चंद्रशेखरनें अभावितपणें प्रेमानें त्याचा हात आपल्या हातांत घेतला. त्याला आपल्याजवळ बसण्यास सांगितलें.

'तुझं नांव काय आहे ! आणि तुला माझ्याकडे येण्याची प्रेरणा कां झाली !--'

'माझं नांव बादल आहे. मी जातीचा रजपूत आहें. आपली कीर्ति लहानपणापासून ऐकत आलों आहें. आपल्या त्यागाचा आणि चारित्र्याचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. मी आपलें आदर्श डोळ्यांसमोर ठेवलें; आणि त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करीत असतों. आपला फोटो सदैव माझ्याजवळ असतो—'

असें म्हणून त्यानें आपल्या सदऱ्याच्या आंतील लॅकेट बाहेर काढलें. ते सोन्याचें होतें. त्यानें वरचें झांकण काढलें—आंत एक चंद्रशेखरचा छोटा फोटो होता.

वीरेन्द्राचा आणि चंद्रशेखरच्या बेत्रनाव ही एक प्रसिद्ध गोष्ट होती.

'तुला मी परत बोलावलें याबद्दल तुला आश्चर्य वाटत असेल. पण अनुभवानें मनुष्य शहाणा होतो. वीरेन्द्रानें दाखविलेल्या प्रामाणिकपणामुळें कुणाविषयींहि मला विश्वास वाटत नाहीं. आतां मी तुझी परीक्षा घेणार आहे—'

बादलनें संमति दिली.

चंद्रशेखरनें कंदील लावला. दहापंधरा मिनिटें तो थांबला. कंदीलाची कांच चांगली गरम होऊं दिली. त्यानें एकवार बादलकडे पाहिलें. बादलला काय प्रकार आहे, ते कळेना ! तो निर्विकार मुद्रेनें चंद्रशेखरच्या हालचालीकडे पहात होता.

चन्द्रशेखरनें त्याचें दोन्ही हात आपल्या हातांत घेतले. त्याच्या लालबुंद कोंवळ्या हातांना चटका बसून वेदना होणार ! त्याचे हृदय हळहळलें. पण लगेच त्यानें आपलें मन सांवरलें. कसानाचा कठोरतेनें त्यानें बादलचें दोन्ही हात गरम कांचेवर कांहीं वेळपर्यंत ठेवले. चरचर करीत त्याच्या तळ हातावर फोड आले. त्यानें हूं कीं चूं केलें नाहीं. एकाग्रतेनें तो कंदीलाकडे पहात होता.

परीक्षा आटोपली. बादल With Distinction पास झाला. क्षणापूर्वी चन्द्रशेखरच्या मुखावर असलेली कठोरता जाऊन त्यानें मातेच्या ममतेनें त्यानें बादलच्या हातांची मलमपट्टी केली. त्याची प्रेमळ वागणुक पाहून बादलला फार धन्यता वाटली. तत्त्वाकरितां मनुष्याला किती कठोर व्हावें लागतें याची महति त्यानें बादलला पटवून दिली. आणि आतां प्रेमाखेरीज दुसरा कोणाचाच भाव चंद्रशेखरच्या मुखावर दिसत नव्हता,

बादल सुखी झाला. चंद्रशेखरच्या प्रेमळ शिकवणुकींत तो हळू हळू तयार होऊं लागला.

बादल चंद्रशेखरचा अतिशय लाडका होता. पण वीरेन्द्राची जागा घेऊं शकला नाहीं तो. मनुष्य स्वभावच असा आहे कीं, मनुष्य निस्सीम प्रेम एकदांच आणि एकाच व्यक्तीवर करूं शकतो. तो दुसऱ्या व्यक्तीवर प्रेम करील पण त्या प्रेमांत उत्कटता रहाणार नाहीं. चंद्रशेखरला अजून वीरेन्द्राचा मोह पडे. कारण त्यानें वीरेन्द्रावर एकेकाळीं आत्यंतिक प्रेम केलें होतें. बादल त्याला फार आवडे; पण बादल म्हणजे वीरेन्द्र नव्हता.

बादलला त्याची पूर्ण कल्पना होती. तो चंद्रशेखरच्या शब्दाबाहेर जात नसे. चंद्रशेखर आपल्यावर बंधुतुल्य प्रेम करतो याचीं त्याला पूर्ण जाणीव होती. मातेप्रमाणें चंद्रशेखर आपली काळजी घेतो, याबद्दल त्याला कृतज्ञता वाटे. पण तरीहि त्याला कांहीं रुखरुख वाटत होती. 'आपण पूर्ण सुखी नाहीं' असें त्याला वाटत असे.

चंद्रशेखर आणि बादलचा दाट परिचय झाल्यानंतर तो उघडपणें वीरेंद्राच्या गुणांची तारीफ करीत असे. विरेन्द्राच्या हुशारीचें तो कौतुक करी—पण तो विश्वासघातकी होता. प्रसंगीं चंद्रशेखर वीरेन्द्राची बाजू घेऊन बोलूं लागे. 'You can not find hero at all points.' मनुष्यांत कांहीं दोष असतातच ! बादलला वीरेन्द्रासंबंधीं काढलेले प्रशंसोद्गार आवडत नसत, त्यानें आत्मनिरीक्षण केलें. त्याला प्रत्येक बाबतींत आपण वीरेन्द्रापेक्षां श्रेष्ठ आहोंत असें दिसून आलें. तरी आपण वीरेन्द्राची जागा घेऊं शकत नाहीं. याबद्दल त्याला अतोनात दुःख झालें.

बादल मत्सरी बनला.

वीरेन्द्रासंबंधीं सूडाग्नी त्याच्या हृदयांत धुमसूं लागला. त्याला चंद्रशेखरच्या हृदयांत कोरलेली वीरेन्द्राची प्रतिमा नाहींशी करावयाची होती. अर्थात् ती जागा आपल्याला मिळावी हा स्वार्थी हेतू मनांत होतांच ! पण ते अशक्य होतें ! ! चंद्रशेखर वीरेन्द्राला केव्हांहि विसरूं शकत नव्हता. तो बादलवरीहि योग्य प्रमाणांत प्रेम करीत होता. त्याला बादलचा अतिशय लळा होता. पण त्याचवेळीं त्याचं मन त्याला सांगत असे कीं,

'तूं वीरेन्द्राप्रमाणें बादलवर प्रेम करीत नाहींस ! वीरेन्द्राच्या खालोखाल त्यानें बादलवर प्रेम केलें. पण बादल अल्पसंतुष्ट नव्हता. त्याला सर्वस्वीं चंद्रशेखर पाहिजे होता. चंद्रशेखरवर आपला पूर्ण ताबा असावा अशी इच्छा होती. चंद्रशेखरनें वीरेन्द्राविषयीं विचार करूं नये असें त्याला वाटे ! चंद्रशेखर भूतकाळ दृष्टिआड करण्याचा प्रयत्न करी. बादलचा आणि त्याचा सहवास घडून आला नसता तर कदाचित् सफल झाला असता त्याचा प्रयत्न. त्याचें पूर्वायुष्य वीरेन्द्राशीं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



त्याच्या लालबुंद कोंवळ्या हातांत चटका बसून वेदना होणार

इतकें निगडीत झालें होतें कीं, बादलच्या उदयामुळें पूर्वस्मृति जागृत होऊन वीरेंद्र-संबंधींचे विचारचक्र जोरांत सुरूं झालें.– शिवाय ताटातूट होऊन दिवस जसजसें जास्त होऊं लागले तसतसें वीरेन्द्रासंबंधीं झालेलें वाईट मत हळूंहळूं सौम्य होऊं लागलें.––आणि नंतर तर चंद्रशेखरला वीरेन्द्राचें कृत्य म्हणजे मनुष्यस्वभावांतील एक साधारण दोष वाटूं लागला.

ऐहिक दृष्टीनें वीरेंद्राचा सपाटून उत्कर्ष झाला. सरकार फार धोरणी आहे. त्यांना प्रत्येक मनुष्यापासून आपला फायदा करवून घेतां येतो. गुप्त पोलीस खात्यांत विरेंद्राला दीडशें रुपयांची नोकरी मिळाली. सद्-सद्विवेक बुद्धीची तिळमात्र पर्वा न करितां त्यानें नोकरीचा स्वीकार केला. त्याला चंद्रशेखरवर आणि बादलवर लक्ष ठेवण्यानरितां नेमण्यांत आलें.

वीरेन्द्राला बादल आणि चंद्रशेखरची मैत्री विशेष आवडली नाहीं. मनुष्याला एकेकाळीं मित्र असलेल्या मित्रांबरोबर जर कुणी मैत्री केली तर त्याला फारसें बरें वाटत नाहीं.

बादलला वीरेन्द्र आपल्या पाळतीवर आहे हें समजलें. त्यानें चंद्रशेखरला इशारा दिला. चंद्रशेखरला त्यांत कांहीं विशेष वाटलें नाहीं. जगाच्या दृष्टीनें वीरेन्द्र मार्गाला लागला. चंद्रशेखरच्या कचाट्यांतून सुटल्याबद्दल लोकांनीं त्याचीं प्रशंसा केली.

विरेन्द्राच्या कुटील कारस्थानामुळें आपल्याला जेलची हवा खायला जावें लागेल याची बादलला पूर्ण खात्री होती. तो तुरुंगांत जाण्याला भित नव्हता. त्याला जेलमध्यें चंद्रशेखरचा कलिजा म्हणून जावयाचें होतें.

दोन चार दिवसांपासून बादल अस्वस्थ होता. त्याच्या मनाची होत असलेली चलबिचल चंद्रशेखरला जाणवली. त्यानें परोपरीनें त्याला विचारलें, पण बादल अगदीं स्तब्ध होता. त्यानें अस्वस्थतेचें कारण सांगितलें नाहीं.

मध्यरात्रीची वेळ होती. चंद्रशेखरला केव्हांच गाढ झोंप लागली. बादल अजून जागाच होता. त्याची अंथरुणावर सारखी चुळबुळ चालू होती. बाराचे ठोके पडले अन् बादल अंथरुणावरून ताडकन् उठला त्याचा चेहरा निश्चयी दिसत होता. अंथरुणाखालीं चकाकणारी एक वस्तु होती. ती त्यानें हातांत घेतली आणि पायजम्याच्या खिश्यांत कोंबली.

तो चन्द्रशेखर जवळ आला. क्षणभर त्यानें त्याच्या मुखांकडे पाहिलें. दोन उष्णबिंदू त्याच्या डोळयांतून खालीं पडले. त्यानें अलगद् चन्द्रशेखरच्या भव्य कपाळाचें चुंबन घेतलें––आणि त्या गडद अंधारांत तो दिसेनासा झाला. ती अमावास्या होती.

दुसरें दिवशीं वर्तमानपत्र विकणाऱ्या पोऱ्याच्या ओरडण्यानें चन्द्रशेखर जागा झाला. तो ताठ उठून बसला. त्यानें एकवार बादलच्या अंथरुणाकडे पाहिलें तें रिकामें होतें. आपण स्वप्न तर पाहिलें नाहीं ? तो निव्वळ भास असावा असें त्याला वाटलें.

' पण तो मुलगा पुन्हां ओरडला. सी. आय. डी. अधिकारी श्री. विरेन्द्र यांचा अमानुष खून––आरोपी बादल यांना पकडण्यांत आलें–––!

बादलला फांशी होणार हें निश्चित होतें. बिचारा चन्द्रशेखर...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ल्यूसी

लेखकः—
प्रभाकर के. गुप्ते, पनवेळ

" प्रेम ?—प्रेमबिम काय आहे तें मला माहित नाहीं; मला माहित आहे तो पुरुष ! भूक लागली म्हणजे जेवायचं -मिळेल तें खायचं एवढं मला कळतं ! हं ! प्रेम–? कसलं प्रेम ? काय चीज आहे ही ?–"

अकरा अप्टून त्या लहानशा स्टेशनवर येऊन उभी राहिली आणि सेकंडक्लासच्या डब्यांतून डोळ्याला चष्मा लावलेला आणि सुटामध्यें सज्ज असलेला एक ऐन पंचवीशींतला तरुण उतरला. तांबड्या मातीचा मळवटलेला एक रस्ता लगतच्या खेड्याकडे जात होता. दूरवर एका चर्चचें शिखर दिसत होतें. तें खेडें साधारण खोलगट भागांतच होतें. सभोंवतीं उंच सखल टेकड्या सारीपटावर मांडलेल्या सोंगट्यांप्रमाणें दिसत होत्या.

गाडींतून उतरलेलीं दोनचारच माणसें घोंगड्या खांद्यावर सरकवीत आणि मुंडासे गुंडाळीत स्टेशनबाहेर पडलीं. त्या तरुणानें—शशीकांतानें ऐटींतच 'पोर्टर' म्हणून हांक मारून पोर्टमँटो आणि बेडिंग त्याच्या स्वाधीन केलें, व तिकिटकलेक्टरच्या हातांत त्यानें हिरव्या रंगाचं तिकिट पँटच्या खिशांतून काढून मोठ्या ऐटीनें दिलें,

तसें पाहिलें तर शशीकांत हा मुंबईहून म्हणजे बऱ्याच दूरवरच्या प्रवासाहून आलेला होता. पण त्या तिकिटावरील स्टेशनचीं नांवें जर कोणीं वाचलीं असतीं तर तें तिकिट अलीकडील स्टेशनपासून काढल्याचें दिसून आलें असतें; आणि या दिखाऊ मोठेपणाचें कारणहि तसेंच होतें. वस्तुतः या स्टेशनापासून चौथ्या स्टेशनाजवळ एका मोठ्या कंपनीचें काम सुरू होतें. आणि कंपनीचा नोकर म्हणून शशीकांताच्या या बाजूनें वरच्या वर खेपा होत असत, तरीहि आज बरेच दिवस मनांत योजलेला हेतु वेळेच्या व संधीच्या अभावीं शशीकांतला तडीस नेतां आला नव्हता, आणि ती वेळ त्याला आज मिळाल्यामुळें तो या स्टेशनवर उतरला होता. या भिकारड्या स्टेशनवर रहाण्याखाण्याची काय व्यवस्था होणार याची पूर्वीच पूर्ण कल्पना असल्यामुळें शशिकांतानें आपला 'खाना' अगोदरच्या एका जंक्शनवर आटोपून घेतला होता.

नेहमींची त्याची चष्म्याच्या वर तिरपे डोळे करून पहाण्याची नजर त्यानें सभोंवार फेंकली. त्या नजरेंत निर्ढावलेलें पाणी खेळत होतें. नजर चौफेर फिरत असतां शशीकांतच्या ओठावर क्षणभरच हास्याची लकेर चमकली. स्टेशनवरील नळाच्या रोखानें झपाट्यानें पावलें टाकीत तो गेला आणि डाव्या हातानं डोळ्याचा चष्मा ऐटींत काढून त्यानें डोळ्यावर आणि तोंडावर पाणी फिरविल्यासारखें केलें. वांकल्यामुळें कपाळावर आलेला केसांचा झुपका नुसता मानेनेंच मागें उडविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पण हें सर्व करीत असतां त्याच्या त्या विशिष्ट नजरेचे कटाक्ष स्टेशनाच्या पत्र्याच्या पत्र्यावाहेरील जरा खोलगट भागीं असणाऱ्या गांवासाठीं रेल्वेनें पुरविलेल्या नळाकडे फेंकले गेले.

चारदोन किरिस्तावणीं, 'इटाळ' होऊं नये म्हणून दूर अंतरावर आपल्या मांड्यांची चळत ठेऊन खालीं बसलेल्या घाटणी एवढीच कायती नळावरची गर्दी. दूर अंतरावर तहानेनें व्याकूळ झालेलें एक कुत्रें नळांतून सांडून बाहेर वाहत जाणारें पाणी जिभेच्या चाटीत पीत होतें, आणि म्हणूनच कृतज्ञतेनें त्या बायांकडे पहात होतें.

कुत्र्याची गंमत करण्याकरितांच कां होईना नुकतीच भरलेली घागर कडेवर घेण्यापूर्वी त्या स्त्रियांतील एका तेरा चौदा वर्षांच्या मुलीनें घागरींतील पाणी ओंजळींत घेऊन त्या कुत्र्याच्या अंगावर लीलेनें फेंकलें. हाताचा झटका, किंचित कलती मान, बावचकलेलें कुत्रें मागें सरल्यामुळें गालावर नाचलेलें मोकळें हंसू, आणि डोळ्यांतील निर्मळ आनंद ह्या गोष्टी पाहून शशीकांताच्या अंगावर तें पाणी उडालें नसतांहि, त्याच्या अंगावर अननुभूत असें शहारे थरथरले.

आपल्या उतरण्याचें सार्थक झालें असा भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसला आणि क्षणार्धांत कोणसा तरी विचार त्याच्या डोक्यांत येऊन वरच्या खिशांतील हातरुमालाला हात व तोंड पुशीत तो लगबग रेलिंगजवळ आला. तितक्यांत दुसऱ्या एका खिश्चन तरुणीनें 'ल्यूस' म्हणून मारलेली हांक त्याच्या कानीं आली. शशीनें हांक आलेल्या दिशेकडे पाहिलें.

एक वीस वर्षांची अंगानें साधारण ओबडधोबड अशी व वर्णानें सांवळी तरुणी ल्यूसीच्या दिशेनें हातांत रिकामी घागर घेऊन येत होती. तिच्या अंगांतील फ्रॉक गुलाबी आणि दोन्ही खांद्यांवरून पुढें टाकलेल्या लांब केसाच्या वेण्या. पण या गोष्टी शशीकांतचें मन खेंचण्यास, समोर ल्यूसी असल्यामुळें यावेळीं तरी अपुऱ्या होत्या. ल्यूसीच्या पाठमोऱ्या शरीरावर त्याची नजर पुन्हां खिळली. ल्यूसी म्हणून हांक मारलेली ती तरुणी ल्यूसीजवळ आली आणि म्हणाली, "तुझा नॉटीपणा जायचा केव्हां ! पाणी पित्या जवावराला असं हुसकाऊ नये ! जातेस कशाला रेव्हरंड बावांच्याकडे ! "

ल्यूसी मिष्किलपणानें हंसली आणि तिनें अगदीं अल्लडपणानें ' ओल्ड सिस्टर' असें म्हणून आपले गाल फुगवलें आणि म्हटलें, ' पाणी पुरेसें प्यायल्यावर टॉम्या जाईलच पळून !—पण आतां बघ कसा टपून उभा आहे तो ! मला हें असलंच आवडतं ! "

हा या बहिणींचा संवाद चालू असतां स्टेशनकडून कोणीतरी त्यांनांच उद्देशून बोललेले शब्द त्यांच्या कानीं आले. दोघांनी एकदम स्टेशनकडे नजर फेंकली.

शशीकांत त्यांच्याकडे पाहून बोलत होता, " एक्सक्युज मी सिस्टर्स ! इथं गांवांत जेवणाखाणाची चांगली सोय कुठं आहे का ? " .

एक अपटुडेट पोषाख केलेला तरुण आपल्याजवळ बोलतो आहे, या एका कल्पनेनेंच त्या दोघी खिश्चन तरुणींना कितीतरी आनंद झाला. नाहीतर या खेडेगांवांत त्यांच्याजवळ बोलावयाला इतका अप–टुडेट इसम कोठला यायला. पाहाला मिळायची मारामार ! शशीकांतच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठीं ल्यूसी आपलें तोंड उघडणार तोंच नळाच्या बाजूला बसलेल्या घाटणींतून एका घाटणीनें सहानुभूतीच्या स्वरांत उच्चारलेले शब्द शशीकांतच्या कानीं आले, 'त्या पोद्दर दादाला इचारा कीं " सायव ! "

ल्यूसीच्या नाजूक आणि पातळ ओठांतून पडणाऱ्या गोड शब्दासाठीं हापापलेल्या शशीकांताच्या कानीं केवढी ही आपत्ति !

अगदीं तिरस्करणीय नजरेनें त्यानें घाटणीकडे पाहिलें आणि आपली आशाळभूत नजर पुन्हां ल्यूसीवर वळविली. ल्यूसी बोलूं लागली, " इथं–अन् खाण्याची व्यवस्था !–या भिकारड्या गांवांत ? इथं कांहीं कोणी मोठे साहेब लोक कधीं येत नाहींत. त्या टोकाला आहे एक मराठ्याचं दुकान ! —पण आम्ही तुम्हाला तिकडे जाऊं देणार नाहीं. त्यापेक्षां–"

कोणत्या तरी एका विचारानें ल्यूसीनें आपल्या वडील बहिणीकडे पाहिलें. तिच्या वडिल बहिणीनें मार्गारेटनें तिच्या मनांतील भाव ओळखून होकारार्थी मान हालविली.

" मार्गी मी आतां पळत पपाला विचारून येते हं ! " असें फक्त मार्गारेटच्या कानीं जातील एवढ्या हलके शब्द उच्चारून ल्यूसीनें जवळच दिडाणाचा एका घराकडे धूम ठोकली. पण तिकडे जाण्यापूर्वी तिनें स्टेशनच्या दिशेकडे अशी कांहीं एक विवक्षित झटक्यानें नजर फिरविली कीं त्या एका दृष्टिविक्षेपांत शशीकांतासारख्या निर्ढावलेल्या इसमाच्या तोंडून 'हाय रे ' असा अस्पष्ट ध्वनी बाहेर पडला.

आणि ल्यूसी आपल्या वृद्ध पित्यास बरोबर घेऊन जेव्हां पुन्हां स्टेशनच्या दिशेनें आली तेव्हां शशिकांत आणि मार्गारेट स्टेशनबाहेर आपलीच वाट पहात उभी असल्याचें तिनें पाहिलें. कारण ल्यूसी दृष्टिसमोरून निघून जातांच शशिकांतची नजर मार्गारेटवर सहानि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कच वळली होती. अनुभवी अशा शशिकांतनें ल्यूसी वडिलांना घेऊन येईपर्यंत मार्गारेटवर या थोड्या अवकाशांत केवढी कांहीं विलक्षण छाप बसविली होती कीं; वडिलांना पहातांच मार्गारेटनें वडिलांशीं शशीकांतची अशा रीतीनें ओळख करून दिली कीं, अणू मार्गारेट आणि शशिकांत ही किती तरी दिवसाचे ओळखी आहेत !

मार्गारेट वयांत आलेली होती तर ल्यूसीला वयाची अद्याप कल्पनाही नव्हती. हसावयाचें, खेळावयाचें, बागडावयाचें हीच तिची अखंड वृत्ति होती, आणि या दोघा भगिनींच्या वडिलांनी-अंतोननी जेव्हां शशीकांतला उतरण्यासाठीं म्हणून आपल्याच घरीं नेलें, तेव्हां त्या सर्व कुटुंबाला आपल्या घरीं आज केवढा मोठा पाहुणा आला आहे असें वाटलें; त्या अभिमानांतच त्या सर्वांची आपल्या त्या चिमुकल्या घरांत धांवपळ सुरू झाली.

ल्यूसी, ल्यूमीचे पपा, मार्गा, आणि शशिकांत ह्यांच्या गोष्टी सुरू झाल्या. ल्यूसीची 'मम्मा' स्वयंपाकांत गर्क होती. तरी मधून मधून ती बाहेर येऊन यांच्या संभाषणांत भाग घेत होतीच. मार्गारेट ही वडील बहीण असल्यामुळें मध्येंच तिला आईच्या मदतीसाठीं घरांत जावें लागे, पण त्यावेळीं तिच्या चेहऱ्यावर उठून जाण्याची कोण नाखुषी दिसून येई. लहानसें काम असल्यास ती ल्यूसीलाच जावयाला सांगे. पण ल्यूसी आपल्या अल्लड वृत्तीनें 'तूंच जा' म्हणे आणि शशीकांतही हंसत हंसत ल्यूसीला बसण्याबद्दल आग्रह करून मार्गारेटलाच जाण्याबद्दल पर्यायानें सुचवी; तेव्हां तर मार्गारेटला फारच वाईट वाटे. गप्पामध्यें–मुद्दां मार्गारेटला हीच गोष्ट जाणवे. शशिकांत आपल्यापेक्षां ल्यूसीच्या प्रश्नांना उत्तरें देण्यास जास्त आतूर आहे ही गोष्ट मार्गारेटसारख्या मुलीच्या लक्षांत यावयाला वेळ लागला नाहीं.

आणि त्या दिवशीं त्या गप्पाष्टकांत शशिकांतनें सर्वांवर आपल्या अनुभवी वृत्तीमुळें इतकी विलक्षण मोहिनी घातली कीं त्यामुळें शशिकांत हा केवढा मोठा, केवढा विद्वान, केवढा श्रीमंत असा एक समज सर्वांचा होऊन बसला. या सर्व समजावर कळस चढविण्यासाठींच कीं काय बोलण्याच्या ओघांत तेव्हां त्या दिवशीं धर्माबद्दलच्या गप्पा निघाल्या तेव्हां ख्रिश्चन धर्माविषयीं आपल्याला असलेलें ज्ञान शशिकांतनें अशा कांहीं स्वरूपांत त्या सर्वांपुढें उघडें केलें कीं, त्यावर ल्यूसीच्या मम्मानें आश्चर्यातिरेकानें शशीकांतला प्रश्नहि केला,

"एवढं आमच्या धर्माचं ज्ञान घ्यायला गेला होता तरी कुठं!"

आणि यावर शशीकांतनें उत्तर दिलें, "खरं सांगायचं म्हणजे मला ख्रिश्चन धर्माबद्दल विलक्षण आपलुकी वाटते !"

या एका उत्तरानें तर टाकलेल्या सर्व मोहिनीवर कळस चढविला, आणि त्यांच संध्याकाळीं शशिकांत, ल्यूसी आणि मार्गारेट हीं अगदीं कित्येक दिवसांच्या ओळखीच्या इसमांप्रमाणें हंसत खिदळत बाहेर जातांना लोकांना दिसलीं.

पण दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं त्या सर्व कुटुंबावर केवढा मोठा अनर्थ गुदरल्यासारखें झालें. सर्वांचे चेहरे उतरल्यासारखे झालें होते. आणि त्याचें कारण आदल्या दिवशीं त्यांच्याकडे आलेला शशिकांत त्यांना सोडून पुन्हां जाण्यासाठीं निघाला होता ! ल्यूसीचे पपा आणि मम्मा त्याला पुन्हां सांगत होती, "हें पहा, आतां पुन्हां कामासाठीं आलांत म्हणजे इथंच उतरायला यायचं हं ! घर तुमचंच आहे!"

मार्गारेटला पुष्कळ पुष्कळ बोलावेसे वाटत होतें, पण ती कांहींच बोलत नव्हती. आणि अल्लड ल्यूसी, तिची तर सारखी वटवट सुरू होती. हजार गोष्टी ती शशिकांतला सांगत होती. आणि शशीकांतलाही तेंच पाहिजे होतें.

यावेळीं ती सर्वजण घराबाहेर उभी होती. ल्यूसीनें नेहमींप्रमाणें फुलझाडावरचीं एक कोमल कलिका खुडली आणि तिला आपल्या कोमल करांगळीनें उमलवून ती शशिकांतच्या बटनहोलमध्यें खोंचली.

मार्गारेट लगेच म्हणालीही,

"ल्यूसी तुला कितीदां सांगितलं कीं अशीं कोंवळीं कळी खुडून उमलवूं नाहीं म्हणून ! बिचारीचं सर्व आयुष्य त्यानें फुकट गेल्यासारखं होतं !"

"कोंवळीं कळी !" शशिकांतनें ल्यूसीकडे पहात तेंच शब्द अर्धवट उच्चारीत हास्य केलें.

आणि सेकंड क्लासच्या डब्यांत उभ्या असलेल्या शशिकांतनें ऐन गाडी सुटावयाच्या वेळीं एक पांच रुपयांची नोट काढून जेव्हां अंतोनच्या हातावर ठेवली, तेव्हां ती स्वीकारणें त्याच्या गृहस्थपणाला शोभेसें त्याला वाटलें नाहीं, तरी घरची गरिबी जी गृहस्थपणा विसरावयाला भाग पडते तशीच त्याची स्थिति झाली. म्हातान्या अंतोननें गाडी सुटल्यामुळें रुमाल उडवू लागलेल्या शशीकांतकडे कृतज्ञतेच्या नजरेनें पाहिलें. मार्गारेट डोळ्यांनी यत्किंचीही उघडझांप होऊं न देतां रोखल्या नजरेनें दूरदूर चाललेला शशिकांतचा चेहरा न्याहाळित होती, तर ल्यूसी आपला हातरुमाल शक्यतों वरवर उडवीत शशीकांतला निरोप देत होती.

* * *

यानंतर पुलाच्या कामासाठीं म्हणून शशिकांत जेव्हां जेव्हां त्या बाजूला आला तेव्हां तेव्हां त्या ख्रिश्चन कुटुंबाकडे जाण्याची संधी त्यानें दवडली नाहीं. प्रत्येक वेळीं त्यांच्याकडे तीनचार दिवस राहावयाचे, त्या मुदतींत ल्यूसीला, मार्गारेटला बरोबर घेऊन फिरावयाला जावयाचे हा त्याचा क्रमच होऊन बसला होता. शशिकांत आपल्या इच्छित गोष्टींचें जाळें मोठ्या धूर्त कौशल्यानें विणीत होता. दुसऱ्या खेपेस तो जेव्हां आला तेव्हां त्यानें फिरावयाला निघाल्यानंतर मार्गारेटच्या लक्षांत येईल अशा तऱ्हेवाईक रीतीनें तिला उत्तरें देण्याचा क्रम ठेवला. या गोष्टीचा शशिकांतला पाहिजे असलेला योग्य परिणाम होऊन शशिकांत जेव्हां पुन्हां त्या ख्रिश्चन कुटुंबाकडे आला तेव्हां संध्याकाळीं फिरावयाला जातांना मार्गारेट म्हणाली,

"आज तुम्हीं दोघंच जा. मला बरं वाटत नाहीं !"

आणि शशिकांतलाही हेंच पाहिजें होतें; तरी त्यानें मार्गारेटला तिच्या मम्माच्या आणि पपाच्या समोर वरकरणी आग्रह केलाच. पण मार्गारेटचा निकराचा नकार पहातांच ल्यूसीची मम्माही म्हणाली, "तुम्ही दोघेच जाकीं ! तिला नसलं यायचं तर न येऊं देत !"

आणि शशिकांतला हा वेळपर्यंत पाहिजे असलेला एकांत यापुढें मिळाला. त्या खेपेला शशिकांत नेहेमींपेक्षां जास्त दिवस राहिला.

एका हातावर ओव्हरकोट टाकलेली शशिकांतची मूर्ति रोज ल्यूसीला बरोबर घेऊन फिरावयाला जातांना दिसूं लागली. ती दोघे नित्याप्रमाणेंच खेड्यापासून अगदीं दूर अशा एका टेकडीच्या आड हिरवळीवर येऊन बसली होतीं.

सतत चार दिवस मिळालेल्या ल्यूसीच्या मोकळेपणानें शशिकांतनें तिला असें खुलवलें होतें कीं ल्यूसीला वाटे, 'हा असाच बोलत रहावा,' त्यानें त्या गोष्टी पुन्हा पुन्हा काढाव्यात–आणि बोलतां बोलतां आपल्या कमरेभोंवती'––––आणि आज आतां तसेंच झालें. शशिकांतनें ल्यूसीवर आपली मोहिनी पसरतां पसरतां आपल्या उजव्या हाताचा विळखा ल्यूसीच्या कमरेभोंवती टाकला. बोलण्याच्या भरांतच त्यानें खालीं ठेवलेला ओव्हरकोट त्या हिरवळीवर पसरला आणि कोवळ्या ल्यूसीला मुग्ध मनोभूमिकेंतच पुरुषाची ओळख झाली.

ती म्याली, तिचें सर्वांग थरारलें, घाबरलीहि ती, पण सुखद अशा अननुभूत संवेदनेखालीं या सर्व गोष्टींदडल्या गेल्या.

मनोविकासाची एक मधली पायरी ओलांडावयाच्या आंतच ल्यूसीला पुरुषत्वाची जाणीव करून दिली गेली !

त्या खेड्याच्या सरिपाटावर नैसर्गिक मांडलेल्या गेलेल्या टेकड्यांच्या सोंगट्यापैकीं, एका सोंगटीआड शशिकांतानें इतक्या दिवस आपल्या मनांत योजून ठेविलेली बुद्धीची सोंगटी हालविली !

यानंतर एकदोन खेपेला शशिकांत तिच्या घरीं येऊन गेला, पण आतां पुन्हां जो तो आला, तो,–मार्गारेटच्या लग्नासाठीं. मार्गारेटचें लग्न तो ज्या पुलाच्या कामासाठीं म्हणून येई तेथेंच काम करणाऱ्या एका फिटरशीं ठरलें. आणि आतां यावेळीं तो हा लग्नसमारंभ साजरा करण्यासाठीं आला होता.

या समारंभासाठीं चर्चमध्यें जेव्हां ही सर्व मंडळी गेली होतीं; तेव्हां पाहुण्यासाठीं आणलेला एक हार हळूच आपल्या फ्रॉकखालीं दडवून ल्यूसीनें शशीकांताला एका बाजूला नेलें आणि म्हटलें, 'डिअर आपल्या लग्नाच्यावेळीं मी हा हार अस्साच तुमच्या गळ्यांत घालीन हं !'

शशीकांतनें मोवती कोणी नाहीं, असें पाहून हळूंच तिच्या गालावर एक टिचकी मारली आणि हास्यानेंच तिच्या प्रश्नाचें उत्तर दिलें.

× × ×

मार्गारेट आपल्या नवऱ्याकडे रहावयाला गेली होती. आतां तिघेजण राहिली होती. म्हाताऱ्या अंतोनला ल्यूसीचाच काय तो आधार होता. शशिकांत यावेळीं जो तेथें आला होता. तो पुलाचा उद्घाटन समारंभ पार पाडल्यानंतर आला होता. तीन चार दिवस नेहमीप्रमाणें ल्यूसीबरोबर आनंदांत घालून आज तो जावयाला निघाला होता. म्हातारा अंतोन, ल्यूसीची आई आणि ल्यूसी त्याला प्रेमभरानें निरोप देत होती, आणि म्हणत होती, "हें पहा पुलाचं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काम संपलं तरी तुम्हाला आठ पंधरा दिवसांनीं सव्राथला आलंच पाहिजे हं!"

यावर शशिकांतनें ल्यूसीकडे पहात म्हटलें, " वा ! मी आल्याशिवाय कसा-राहीन !

पण त्या प्रेमळ कुटुंबाचा निरोप घेऊन या खेपेला शशिकांत जो गेला तो त्यावर त्याची एक दोन पत्रें आलीं तेवढीं. नंतर त्याचीं पत्रेंही आलीं नाहींत. त्यानें म्हाताऱ्याला दिलेल्या पत्त्यावर म्हाताऱ्यानें दोन पत्रं पाठविलीं, पण तीं त्या पत्त्यावर सदर नांवाचा कोणी इसम नाहीं म्हणून परत आली.

* * *

आणि आज

ज्या पुलानें त्या खिश्चन कुटुंबांत वरील घटना घडवून आणली होती. त्याच पुलानें त्या खेड्यांतहि तशीच क्रांति केली होती. त्या पुलामुळें मोठा एक रहदारीचा मार्ग सुरू झाल्यामुळें त्या खेड्याला आज एकदम निराळेंच स्वरूप प्राप्त झालें होतें.

खेड्यांतील वस्तीच्या . उत्क्रांतीनें खेड्याला जें भरभराटीचें स्वरूप कालांतरानें आलें असतें. त्या स्वरुपाचा आव पुलावरील वाहतुकीमुळें खेड्यावर एकाएकीं लादला गेला आणि पुलाच्या बांधकामानें अगदीं ल्यूसीप्रमाणेंच त्या खेड्याचीहि स्थिति करून टाकली होती.

आज अंतोन हयात नव्हता. ल्यूसीची म्हातारी आई केव्हां जगाचा निरोप घेईल याचा नेम नव्हता.

शशीकांतनें ल्यूसीला लावलेल्या पुरुषसंगाच्या आवडीचा ल्यूसीच्या अपरिपक्क मनावर असा कांहीं परिणाम झाला होता कीं, भूक लागली म्हणजे जेवावयाचे, खाणें कुठलेंहि मिळालें तरी चालेल या पलीकडे तिला त्या गोष्टीची मातबरीच वाटत नव्हती. यामुळेंच मार्गारेट आपल्या माहेराला अजिबात मुकली होती. तिचा नवरा तिला माहेरीं पाठवीना.

खेड्यांत बांधल्या गेलेल्या रहदारी बंगल्यांतील पाहुण्यांचें ल्यूसीचें घर म्हणजे निवासस्थान बनलें होतें. आणि या रहदारी बंगल्यांत उतरणारा एखादा आंबटशोकी तरुण ल्यूसीबरोबर गुजगोष्ट करीत असतां प्रेमाच्या गोष्टी बोलूं लागला म्हणजे ल्यूसी म्हणे,

"प्रेम !--प्रेमबिम काय आहे तें मला माहित नाहीं; मला माहित आहे तो पुरुष ! भूक लागली म्हणजे जेवायचं—मिळेल तें खायचं एवढं मला कळतं ! हं ! प्रेम—! कसलं प्रेम ! काय चीज आहे ही !"

भाऊसाहेबांचें लग्न :

लेः—श्री. य. शे गिरी

खरं सांगू धोंडोपंत ! या म्हातारपणीं कां माणसाला बायकोशिवाय राहतां येतं ! जिवाचा असा त्रागा होतो म्हणतां ह्या एकलेपणानं ! "—

भाऊसाहेब आपल्या दिवानखान्यांत लोडास टेंकून आपले विश्वासू मित्र धोंडोपंत यांना आपल्या विधुरावस्थेची हकीगत शक्य तितकी मीठमिर्ची लावून सांगत होते. धोंडोपंत भाऊसाहेबांचें अगदीं जिवाभावाचे स्नेही, नाहीं म्हटलें तरी निदान आज दहा वर्षें तरी त्यांचा स्नेह बी. बी. सी. आय्. रेल्वेच्या गाड्यांप्रमाणें अव्याहतपणें चाललेला ! त्यांची जोडी इतकी अभेद्य होती कीं भाऊसाहेबांच्या घरीं धोंडोपंत तिन्ही त्रिकाळीं कधींही सांपडत. चुकलेला फकीर मशीदींत सांपडायचा, त्याप्रमाणें धोंडोपंत घरीं नाहींत असें दिसतांच त्यांनीं भाऊसाहेबांच्या घरीं ठिय्या दिलेलाच आहे असें बेशक समजावें. कुणी दोघां गृहस्थांच्या मैत्रीचा अतिरेक होत आहे असें दिसतांच लोक " धोंडो—भाऊं " च्या जोडीचा म्हणीप्रमाणें उपयोग करीत; कथांत् अशा जिवलग मित्राशिवाय भाऊसाहेब आपलें अंतरीचें दुःख इतर कुणाला सांगतील !

भाऊसाहेबांचें बोलणें ऐकून धोंडोपंतानीं दीर्घ निःश्वास सोडला. पुढें ठेवलेल्या पानाच्या करंड्यांतून चिमूटभर तंबाखू काढून त्यांनीं ती आपल्या डाव्या तळव्यावर ठेवली. उजव्या हातानें चुन्याचें एक लहानसें टेंगूळ त्याच्या वरती ठेवून महालक्ष्मीवरील धोबी ज्याप्रमाणें खसाखस कपडे धुतात त्याप्रमाणें त्यांनी ती खसाखस मळली. आणि स्वाहा करीत व पानाचा तुकडा पुन्हां हप्त्याहप्त्यानें तोंडांत कोंबीत ते म्हणाले,

" भाऊसाहेब, तुमचा आपला हट्ट निराळाच ! आतां रोज महिना दीड महिना पाहतों मी, लग्नसंबंधांच्या सगळ्या गोष्टी माझ्याजवळ सांगतां, तुम्ही जरा चौकशी केली पाहिजे. चार चौघांना विचारलं पाहिजे !"

भाऊसाहेब यावर उत्तरलें, " धोंडोपंत, मी एकदां चांगलांच फसलों या भलत्या फंदांत पडून !—पुण्यांतल्या तुळसीबागेंतील तो दिवस—छे, नको ती भानगड ! झालेली गोष्ट होऊन गेली. कसं काय धोंडोपंत !"

" बरोबर बोललांत ! तुमच्या मनांत आहे तीच गोष्ट माझ्याही मनांत आहे, प्राणांशपथ सांगतों, भाऊसाहेब तुमचं लग्न झाल्याखेरीच मला सुखानं अन्नाचा घांस जायचा नाहीं !"

" तुम्ही अवश्य प्रयत्न करा. पण पुन्हां तुळशीबागेंतील प्रकार मात्र घडवून आणूं नका ! "

" छ, मला काय वेड लागलंय ! अहो पुण्यांतल्या पोरी त्या तशाच ! "

यानंतर धोंडोपंत पुण्यावर अधिक घसरले नाहींत. कारण ती अप्रिय आठवण उकरून अधिक खोलांत शिरल्यास 'मायबाप' भाऊसाहेबांचा रोष सर्वस्वी घेण्याचा पर्वणीयोग धोंडोपंतांना सांपडला असता.

भाऊसाहेबांची पत्नी जवळजवळ त्यांच्या चाळीशीच्या आधींच वारली. ती होती तेव्हां कांहीं भाऊसाहेबांनीं तिला सुख दिलें नव्हतें. तथापि ती मरतांच भाऊसाहेबांनीं टाहोच फोडला, " माझी घरधनीण गेली. घेतों आतां सन्यास ! " अशी त्यांनी संसारांतराची प्रचंड घोषणा केली. आपलीं दोन कॅलिको मिलचीं धोतरें त्यांनीं रंगाऱ्याकडून भगवीं रंगवून घेतलीं. खादीचा सदरा कफनी करायला चांगला उपयोगी पडला. त्यांनीं जुना कमंडलूही विकत घेतला. आणि एके दिवशीं पहांटे गळ्यांत रुद्राक्षांची माळ, अगांत भगवी कफनी, त्याखालीं भगव्या रंगाचें धोतर, पायांत खडावा व अंगावर विभूतीचें चर्चन या थाटांत 'जयनारायण' करीत स्वारी बाहेर पडली.

—तोंच धोंडोपंत जीव घेऊन घरांतून बाहेर पडले आणि भररस्त्यावर लोटांगण घालून त्यांनीं महाकष्टानें भाऊसाहेबांचें मन त्या घोर निश्चयापासून वळविलें. जेव्हां धोंडोपंतांनीं प्रत्यक्ष त्यांच्यापुढें लोटांगण घातलें, तेव्हां भाऊसाहेबांचें हृदय दर्याद्र झाल्याशिवाय कसें राहील ! धोंडोपंताचा प्राणांतिक आग्रह पाहून त्यांनीं त्यांना कडकडून मिठी मारली. पुन्हां चांगली बायको मिळवून देईन असें धोंडोपंतांनीं कानांत गुपचूप सांगतांच, त्यांनीं संन्यासवेषाची ती भिकार कफनी व तो कमंडलू दूर फेंकून दिले, अशी एक आख्यायिका ठाकुरद्वारांत प्रचलित होती. पण बोलून चालून आख्यायिकाच ती ! भाऊसाहेबांचें संन्याशाचें पुन्हां गृहस्थांत रुपांतर झाल्यानंतर अर्थात् त्यांना सहधर्मिणी मिळवून देण्याचें काम धोंडोपंतांना आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें करावें लागलें. कारण भाऊसाहेब येऊन उद्गार काढीत,

" धोंडोपंतासारख्या पूज्य गृहस्थानें विनवणी केल्यामुळें मी माझा बेत रद्द केला. ! "

त्याप्रमाणें आपल्या प्रतिज्ञेस जागून धोंडोपंतांनीं गेल्याच वर्षीं भाऊसाहेबांचा लग्नाचा घाट जमवून आणला.

× × ×

वधुसंशोधनासाठीं गेल्या वर्षी भाऊसाहेबांनीं धोंडोपंतांसह पुण्यांत तळ दिला होता. नियोजित वधूच्या घरीं भाऊसाहेब गेले होते. त्या वधूच्या पित्यास हा वर 'चालण्यासारखा' होता. कारण बड्या बापाचा एकुलता एक मुलगा असल्यामुळें भाऊसाहेबांजवळ बरीच माया होती. पण, आपला नवरा होणारा माणूस (!) पन्नाशीच्या दारांतील जांबुवंत असेल अशी त्या मुलीची कल्पनाही नव्हती. रीतीप्रमाणें चहा आणून भाऊसाहेबांच्या पुढ्यांत ठेऊन जातांना तिच्या वडिलांनीं भाऊसाहेबांकडे बोट दाखवून उद्गार काढले, 'हेच वरें तुझे......मालू !'

पण मालू होती नवमवादी ! हें पन्नाशी जवळचें पण ओढून ताणून चंद्रबळ आणून चकमक् दिसणारे ध्यान पाहून ती दरवाजाजवळ गेली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

" जळलं, मेल्यांचें तोंड ! दाढी वाढलेला बोकड कुठला, अन् म्हणे मुली पाहिजेत. ध्यान तरी काय शोभतंय ! हा हा हा, तोंडाचें तें बोळके झालेलें, सोडावॉटरच्या गोळ्यांप्रमाणें आंत गेलेले ते लुकलुकीत डोळे, गालाच्या खोबऱ्याच्या पात्या झालेल्या—अहाहा, काय शोभतंय तरी ! त्या मिशा पाहूनच मुलें घाबरतील; स्वंजासारखा अर्धा अधिक जीव जिरून जाईल त्यांत !......"

आणखी जें कांहीं ती बोलली तें स्वतः धोंडोपंतांसुद्धां कळलें नाहीं असें म्हणत ! पण भाऊसाहेबांचा मात्र त्या मुलीच्या निर्लज्ज, अप्रबुद्ध व उर्मट उद्गारांनीं फारच अपमान झाला. त्यांनींही त्या पित्यास अस्सल शिव्या हांसडण्यास कमी केलें नाहीं आणि जातां जातां तिकडे गुरदगुरले,

" मुंबईंत या तर खरें एकदां, नेऊन भेंडी बाजारांत उलटा टांगला नाहीं तर नांवाचा भाऊसाहेबच नव्हे ! "

बिचारे भाऊसाहेब ! आपल्या लग्नांत असलें मलतें सलतें विघ्न उपस्थित होईल असें भविष्य त्यांनीं स्वप्नांतसुद्धां केलें नव्हतें. संध्याकाळच्याच 'डेक्कन क्वीननें' ही दोघांमाऊंची दुक्कल परत मुंबईला आली. मात्र भाऊसाहेब जातांना जसे एकटे गेले होते तसेंच पुन्हां कां एकटे आले याचें कारण पुष्कळ दिवसपर्यंत मुंबईकरांना कळलें नाहीं. पण खरें कारण कळतांच त्या भाऊसाहेबांवर चोहीकडून अज्ञात शब्दांचा मारा होऊं लागला.

× × ×

आज धोंडोपंत तंबाखू चघळीत चघळीत व मधून मधून रुचिपालटासाठीं तपकिरीचा दम मारीत निश्चयात्मक स्वरांत म्हणत होते,

" भाऊसाहेब, तुमचा आपला हट्ट भलताच ! आज महिना दीड महिना झाला तुम्हीं कुठल्या तरी दीर्घ चिंतनेंत आहांत. तसें पाहिलें तर तुमचें काय वय होऊन गेलें ! आमच्या काळीं ऐशीं वर्षांचें म्हातारेसुद्धां म्होतूर लावीत. हूँ हूँ हूँ ! म्हणून म्हणतों दुसरी प्रयत्न करून पहा ! "

" पोहेल, धोंडोपंत माझें लग्न आतां या जन्मांत व्हावयाचें नाहीं ! ' क्षणमात्र दुःखाची तीव्र लहर त्यांच्या चेहऱ्यावर दिसूं लागली.

" कां नाहीं होणार ? सोन्यामारुतीपुढें दंगा होईल असें कोणी भाकित केलें होतें ? पण, तो झालाच कीं नाहीं शेवटीं ! अहो, मला माहीत म्हणून"—

" त्यांना पुढें बोलूं न देतां भाऊसाहेब म्हणाले " काय म्हणालांत, तसें स्थळ सांपडलें आहे ! " त्यांच्या खिन्न झालेल्या चेहऱ्यावर पुन्हां आनंदोर्मी खेळूं लागल्या. प्रसंगावधान राखून धोंडोपंत म्हणाले.

" हूं, पण तसें पाहिल्यास वय उतार झालेल्या माणसांचीं लग्नें कुठें पटापट होतात ? त्यांत सतरा भानगडी नी अठरा अडचणी. "

" भानगडी असूं देत ! " नापास झालेल्या विद्यार्थ्यास वरच्या वर्गांत ढकलण्याचें आश्वासन देतांच त्याचा चेहरा जसा खुलावा तसें भाऊसाहेबांचें मुखकमल खुलूं लागलें, " आधीं स्थळ सांपडलें पाहिजे ! "

" त्याची नको तुम्हांला काळजी ! मी तो सगळा बेत आधीं जमवूनच ठेवला आहे. उत्तर येण्याचा अवकाश कीं आपण करावें कूच ! तुम्हांला नाशिक माहित आहे कीं नाहीं ? आपणां हिंदूंचें पवित्र क्षेत्र. '

" हो हो " भाऊसाहेब म्हणाले " मुंबईपासून तीन तासांच्या रस्त्यावर—"

" होय. " धोंडोपंत म्हणाले " तेथें सुधारकी, नवमतवादी असे धर्मबुडवे करंटे पंथच नाहींत मुळीं. तेथें स्थळ तर पाहून ठेवलें आहे एवढेंच नव्हें पत्रसुद्धां टाकलें आहे ! "

" घ्या टाळी ! " शर्यतींतील घोडा जिंकावा त्या विजयोन्मादानें भाऊसाहेब ओरडून म्हणाले " मग जमलेंच म्हणायचें ! "

" घ्या टाळी ! " हस्तांदोलनाचा कडाक्याचा आवाज झाला.

× × ×

नाशिकास गेल्यामुळे पुन्हां पत्नीचा लाभ होईल व तिच्या सहवासांत आयुष्याचें शेवटचे क्षण रामराम म्हणत घालवूं असें गोड स्वप्न भाऊसाहेबांना दिसूं लागलें. ते या कल्पनेनें बेहोष तर झालेच पण नाशिकांत जाण्याविषयीं ते धोंडोपंतांच्या मागें लकडा लावूं लागले.

आणि भाऊसाहेब म्हातारपणीं मुली पाहतात असें वर्तमान कळतांच ठाकुरद्वारावरील इतर विधुरांच्या अंगींही पुन्हां चैतन्याचें वारें संचारूं लागलें. स्त्री व संसाराविषयीं उदास झालेले विधुर व पेन्शनर पुन्हां संसाराच्या गोष्टी बोलूं लागले व आसपासच्या स्त्रियांकडे विशेष सूक्ष्म नजरेनें पाहूं लागले. आज भाऊसाहेबांचें लग्न हाच विषय ठाकुरद्वारांत सर्वत्रांच्या तोंडीं होता. द्वितियविवाह करणारांचें ते मारून मुटकून म्होरकेच बनले. ' भाऊसाहेबांचें लग्न होणार, मग आपण करणारच !" असा कांहीं विधुरांनीं हट्ट धरला. मुलींची शाळा, हळदीकुंकवाची ठिकाणें, सार्वजनिक नळ, चर्नीरोड गार्डन येथें विधुर लोक अर्थात् भाऊसाहेबांसहित घुमुं लागले. मुलींच्या शाळांभोंवतीं तर त्यांनीं खडा पहाराच ठेवला. कधीं काळीं वार्षिक संमेलनाच्या वेळीं साळसूदपणें चहा पिण्यास येणारे हे सभ्य गृहस्थ आतांशा रोज कां घिरट्या घालतात हें तत्त्व आंत शिकत असलेल्या अप्रबुद्ध मुलींना उमगलें नाहीं. असो, भाऊसाहेब नाशिकला निघण्याच्या त्या मंगलप्रद दिवसाची डोळ्यांत तेल घालून चातकासारखी वाट पाहूं लागले. आणखी त्यांच्या लग्नाच्या सिमलाची वाट पाहणारे इतर विधुरहि उत्सुकतेनें त्या दिवसाची मोजदाद करूं लागले.

अखेर एकदां तो दिवस उजाडला. त्या दिवशीं भाऊसाहेब धोंडोपंतांसहित नाशिकला रवाना झाले. अनेक प्रकारचे खाण्याचे जिन्नस, लुगडीं, सुगंधी द्रव्यें यांची नुसती खैरातच करण्याचें त्यांनीं ठरवलें होतें.

× × ×

धोंडोपंतांच्या मुदतीनें भाऊसाहेबांस मोठाला बंगला तात्पुरता राहण्यास मिळणें जड गेलें नाहीं. पंचवटीजवळच्या एका मोठ्या बंगल्यांत राजेशाही थाटांत त्यांनीं आपली बरदास्त ठेवली. कलापादि शृंगारप्रसाधानाच्या वस्तूंचा खुराक वाढत्या प्रमाणांवर ठेवण्यांत आला.

भाऊसाहेबांचें श्वशुर होणारे सद्गृहस्थ, होऊं घातलेल्या जांवयांना भेटण्यास बंगल्यांत आले. नमस्कार, चमत्कार झाल्यानंतर धोंडोपंतांना पाहून ते विलक्षण तऱ्हेनें हंसले. आपलें बोलणें आवश्यक असाच अर्थ त्यांतून भाऊसाहेबांनीं काढला व ते म्हणाले -' हूँ हूँ हूँ, ठीक ना मुलें बाळें वगैरे ? "

" हो " गंभीरपणें श्वसुरा उत्तर दिलें.

" आपला संबंध ह्या धोंडोपंतानींच जुळवून दिला ! "

" असें कां ! " जणूं काय ह्या बातमींत विशेष अर्थ नाहीं असें त्यांना वाटलें.

" मग उद्यांचा मुहूर्त धरला तर चालेल ना ? आमचें काय म्हणतां ! तुमच्या सोयीकडे आम्ही आधीं पाहिलें पाहिजे. घरांतील बायकामंडळींना अगोदर बेत पसंत पडला पाहिजे. आमचें काय विचारतां ! गळ्यांत माळ पडतांच ठेवला आम्ही पॅसेंजरांत किंवा मेलांत पाय ! "......

" उद्यांचा मुहूर्त चालेल ! हूं " दीर्घ निःश्वास सोडून आणि जणूं काय छातीवरील एक ओझें दूर झालें असें समजत सासरे निघून गेले. ते निघून जातांच भाऊसाहेबांनीं धोंडोपंतांस विचारलें,

" तो माणूस कसा काय आहे हो ! "

" एक नंबरचा माणूसघाण्या आहे तो ! एरव्हीं त्याला माणसांचा तिटकाराच ! तरी तुमच्याजवळ इतका बोलला हें माझें मोठें भाग्य ! "

दुसऱ्या दिवशीं सकाळीं भाऊसाहेबांच्या घरीं ' बँड ' दुमुं दुमुं लागला. आजूबाजूची चार मंडळी जमवून त्यांनीं थाटाचें जेवण केलें. सरासरी दोन तीनशें लोक जेऊन गेलें असतील. त्या शिवाय धोंडोपंतांच्या वशिल्यानें कित्येक बडे अधिकारी यथास्थित दोन्ही हात मारून केशरभात व लाडू चोपून गेले. त्या दिवशीं तर भाऊसाहेबांना अस्मान ठेंगणें वाटत होतें.

" काय विशाद आहे लग्न मोडण्याची ! नाशिक म्हणजे कांहीं पुणें नव्हे ! "

असे उद्गार त्यांनीं एकदां बाहेर काढले. पण मनांतल्या मनांत त्यांनीं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांची कितीदां पुनरावृत्ती केली, हें सांगणें कठिण आहे.

भाऊसाहेब देवाच्या पुढें बसून आपल्या जरतारी रुमालास बाशिंग बांधून घेण्याच्या ऐन गडबडींत होते. आज लग्नाचा दिवस होता. धोंडोपंत प्रयत्नांची शिकस्त करून चार पांच सुवासिनी गोळा करीत होते.

—तोंच वावटळीप्रमाणें धांवत व धांपा टाकीत एक तरुण त्या बगल्यांत शिरला. सर्वांचे डोळे त्याच्याकडे लागले.

"गिरवणुक काढूं नका ! लग्न फिसकटलें ! !"

एखाद्या आकाशवाणीप्रमाणें हे शब्द (शब्द कसले शापवाणीच) उच्चारून तो पोरगा नाहींसा झाला. धोंडोपंतांनीं व व भाऊसाहेबांनीं डोळे फाडफाडून पाहिलें. छे, तो तरुण बाणाच्या गतीनें पंचक्रोशीबाहेर पोंचला होता.

या अकल्पित विधिघटनेचा भाऊसाहेबांना अर्थच कळेना. त्यांची चर्या चिंतेमुळें सर्रकन् उतरली. ते कडाडले.

"धोंडोपंत ही काय यांनीं चेष्टा चालविली आहे कीं काय ? ही काय थट्टा झाली ! प्राण घेणारी चेष्टा कसली ही ! धोंडोपंत, चला लौकर जाऊन या पाहूं वधुपक्षांना आणि त्यांना निक्षून सांगा, कीं तुम्हां गाढवांच्या लोकांना रीतीरिवाज नाहींत. मुहूर्त पुढें ढकलल्यास आमची 'ना' नाहीं. पण अशी थट्टामस्करी करायची ही वेळ नाहीं. चला, धोंडोपंत जलद......"

पण धोंडोपंत कशाला उठतात ! त्यांनीं दिवाणखान्यांत शतपावली घालण्यास जोरानें सुरुवात केली. शेवटीं तेच होऊन म्हणाले, "भाऊसाहेब, मी एकटा जाण्यापेक्षां आपण दोघेही गेलेले बरें ! म्हटलेंच आहे ना 'संघशक्ती कलौयुगे !' आणखीं (जरा मंद स्वरांत) असें आहे मी एकटा गेलों तर गोष्ट निराळी. मला एकट्यालाच पाहून ते बेरड चार दोन दुगाण्या झाडायला मागें पुढें पहाणार नाहींत. पण प्रत्यक्ष यजमान येतांच त्यांची वाचा थंडावेल ! आपलें मत हें असें आहे, साहेब !"

धोंडोपंतांचा हा युक्तिवाद भाऊसाहेबांना शंभर टक्के पसंत पडला. धोंडोपंत म्हणजे भाऊसाहेबांचा नाना फडणवीसच होता. मग त्या तरुणाची अभद्रवाणी ऐकून भाऊसाहेबांच्या छातींत जी कळ आली होती ती धोंडोपंतांच्या युक्तिवादानें नाहींशी झाली. आणि कपाळावर बाशिंग चढविण्यापूर्वींच ही भाऊधोंडूची दुक्कल वधुगृहाकडे एकवार फेरी टाकावी म्हणून उठली. धोंडोपंत बरोबर असतां भाऊसाहेब कलिकाळासही घाबरणार नव्हते. एक छकडा ठरवून ही जोडी वधुगृहीं जाऊन उतरली. बाशिंग, मुंडणावळ कांहीं न बांधतां वधुपक्षीयांचा चांगला खरपूस समाचार घेण्यास निघालेले भाऊसाहेब हे हिंदुस्थानांतील पहिलेच वर असतील कोण जाणे !

× × ×

वधुगृहीं भाऊसाहेब उतरले पण लग्नाच्यावेळीं वधुगृहीं जी धामधुम व धुमश्चक्री चाललेली असते ती त्या घरांत आढळत नव्हती. धोंडोपंत,भाऊसाहेबांनीं एकवार निरीक्षण करून आंत पाहिलें. त्या वधुगृहीं सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे वधूच नव्हती. असें त्यांच्या निदर्शनास आलें. 'गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते' हा श्लोक पुन्हां त्यांच्या छातीवर गुद्दे मारूं लागला !

सोप्याच्या आंतल्या बाजूस दोघे जवान मात्र हातांत सोटे घेऊन गप्पा मारीत बसले होते. त्यांस पाहून भाऊसाहेब म्हणाले,

"अरे, तुम्ही माणसे कीं कोण ! आम्ही परस्थळची मंडळी आम्हाला इथें अशा रीतीनें फसवायला कां आमंत्रण दिलें. ! सांगा पाहूं, वधु कोठें आहे !"

"वधु राहूं दे ! वधूचें नख दिसणें सुद्धां मुष्कील आहे. अहो, ती मंडळी मोटरीवर सुद्धां निघून गेली. तुमच्याकडे निरोपहि धाडला होता. "

'पण आम्हाला असें फसवायचें कारण काय–! " भाऊसाहेब दरडावून म्हणालें.

'चला धोंडोपंत, आत्तांच्या आतां सिटी मॅजिस्ट्रेटकडे जाऊन फिर्याद ठोकूं ! ह्या लोकांची हड्डी नरम केली नाहीं, तर मी नांवाचा भाऊसाहेबच नव्हे !'

'रावसाहेब,' त्या जबानापैकीं एक म्हणाला ' निमूटपणें रस्ता कांपा, नाहीं तर सोट्याचा प्रसाद खावा लागेल !'

कां म्हणून ! कां म्हणून ! तुमच्या बापाचें आम्ही घोडें मारलें आहे !"

भाऊसाहेब गर्जून बोलतांच धोंडोपंतांच्याही अंगीं अवसान आलें.

"रावसाहेब आपलें, लग्न जुळवून देणाराने काय पत्र पाठविलें होतें ! हा धोंडोपंत कोण ! आहे' समोर दीर्घ दंड घेऊन उभा असलेला गृहस्थच धोंडोपंत होता हें त्या अनोळखी गृहस्थांच्या लक्षांत आलें नाहीं हें बरेच झालें !

भाऊसाहेब व धोंडोपंत दोघेही गुपचुप् होते. त्या जवानानें खिशांतील पत्र काढून भाऊसाहेबांना दाखविलें. भाऊसाहेबांनीं पाहिलें त्याच्यावर त्यांच्या नानाफडणवीसांची धोंडोपंतांची सही होती. तो पत्र वाचूं लागलें लागला "आपली चिंगू वाढली आहे असें ऐकतों. मुंबईंत मला एक चांगलें स्थळ सांपडलें आहे. वर गोरागोमटा असून दिसायला सुंदर आहे. पहिली बायको नुकतीच निवर्तल्यामुळें दुसरा संबंध इष्ट व व्यवहार्य ! चिंगीचें वय १९ असें ऐकतों, वरास नुकतेंच पंचविसावें वर्ष लागलें आहे "

" काय रावसाहेब ! " दुसरा जवान म्हणाला "वराचें वय आमच्या नाशिकला येतांच पंचविसाचें पन्नास झालें कां ! "

यांत सगळें कारस्थान धोंडोपंतांचें आहे असं भाऊसाहेबांस वाटल्यावांचून राहिलें नाहीं; तर भाऊसाहेबांना कलप चोळून चोळून देखील ऐन पंचविसांतल्या तरुणांप्रमाणें छातीपुढें करून चालतां येत नाहीं, असें धोंडोपंतांच्या मनानें घेतलें.

—आणि ते दोघे जिवलग मित्र सात जन्माच्या हाडवैऱ्याप्रमाणें एकमेकांकडे डोळे वटारींत एकमेकांच्या पारा चढवीत होते.

भाऊसाहेब व धोंडोपंत ही जोडी मुंबइस येण्यापूर्वींच भाऊसाहेबांचा लग्नाची मंबेरी उडाल्याची बातमी ठाकुरद्वारांत चहूंकडे गाजूं लागली. कुठल्या वृत्तपत्राच्या बातमीदारानें ही बातमी मुंबईंत प्रसृत केली हें अजून कळलें नाहीं. मात्र भाऊसाहेबांच्या लग्नाचा एकाद्या म्हणीप्रमाणें उपयोग करण्याची सुवर्ण संधी मुंबईकरांच्या वांट्यास अनायासें चालून आली !

सर्वांच्या खात्रीचे व विश्वासू

चष्म्याचे व्यापारी

आर. एन्. शिंदे ॲन्ड सन्स

२०७ गिरगांव, मुंबई नं. ४

यांचेकडे खास डोळ्यांच्या डॉक्टरकडून डोळे मोफत तपासून योग्य नंबरचे उंची, टिकाऊ व नवीन फॅशनचे चष्मे माफक किंमतींत मिळतात.

ब्रँच नं. १ परेल, पोयबावडी.

ब्रँच नं. २ दादर, कोहिनूर सिनेमाजवळ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

तुम्ही जर निःशक्त असाल तर यशस्वी होणार नाहीं.

तुम्ही जर निःशक्त बनला असाल आणि हा नेहमी कमजोरीचा परिणाम होय—तर तुम्ही कधींहि यशस्वी होणार नाहीं. जर तुम्हांला सकाळीं उठल्याबरोबर थकल्यासारखें वाटत असेल आणि दिवसभर काम करण्याची ताकद नसेल तर रात्रीं झोंपतांना एक कपभर **हॉर्लिकचें दूध** घ्या. त्यायोगें तुमची निःशक्तता पार निघून जाईल.

गाईच्या सकस व पूर्ण मलईदार दुधानें चांगलें गुणधर्म आणि त्याबरोबरच पक्व बार्ली व गव्हाचें पौष्टिक सत्त्व **हॉर्लिकमध्यें** समाविष्ट असतें. त्यांत पिष्टमय पदार्थ नसतात.

हॉरलिक्स अशक्ततेला प्रतिबंध करतें

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

REGISTERED No. B. 951.

ॐ तत्सत्

चित्रमय-जगत्

अकबराचें वेदसाधन.

ऐतिहासिक कादंबरी

लेखकः–विठ्ठल कृष्ण नेरूरकर, बी. ए.

ही कादंबरी ऐतिहासिक कादंबऱ्यांत गणली जाणारी आहे. ऐतिहासिक आधार देऊन लिहीलेली प्रस्तुत कादंबरी " चित्रमयजगत् " मधून क्रमशः प्रसिद्ध होत असतांना अनेक रसिक व विद्वान् वाचकांनीं ती वाचली असून त्यांना ती पसंत पडली आहे. अकबराच्या चरित्राची फारशी बखरींमधून माहिती घेऊन ऐतिहासिक मत्यास धरून अकबराची भूमिका रंगविली आहे. आजच्या परिस्थितींत हिंदी लोकामध्यें सर्वतोपरी ऐक्य उत्पन्न होणें आवश्यक असल्यामुळें हिंदुमुसलमानांचेंच नव्हे, तर सर्व धर्मांचें ऐक्य करणाऱ्या अकबर बादशहाचें प्रयत्न कथानकरूपानें जनतेसमोर ठेवणें इष्ट वाटलें, म्हणून या कथानकाची जुळणी केली. या कथानकांतील बहुतेक व्यक्ति ऐतिहासिक आहेत व कथानकाचे बरेचसे धागेदोरे ऐतिहासिक सत्याशीं संलग्न असे आहेत. सदरहू कादंबरीचें मुखपृष्ठ अकबर बादशहाच्या रंगीत चित्रानें सुशोभित केलेलें आहे. किंमत अवघी १ रुपाया. टपाल हशील शिवाय.

पानें ८० वर रॉयल]   [चित्रें १००

लहान मुलांकरितां कवितांचें नवीन पुस्तक

स्वतंत्र भाग १ ला.

बालगायन.

कविः—मुरलीधर.

हल्लींच्या बालवाङ्मयवृद्धीच्या काळांत मुलांकरितां कवितांचें पुस्तक अत्यंत आवश्यक आहे. रा० मु० मों० कुलकर्णी यांचें बालगायन आम्ही त्याकारितांच प्रसिद्ध करीत आहों. यांत १ बाळगाणीं, २ सृष्टिवर्णन ३ कवितावद्ध कथा, ४ अभिनयगीतें, वगैरे प्रकारचीं गाणीं आहेत. मुलांस वाक्यरचनेस यांचा उपयोग होईल अशा तऱ्हेनें पुस्तक छापांत आहोत. शिवाय हें पुस्तक पुरवणी वाचनाकरितांही उपयोगी पडेल. टाईप ठळक वगैरेंक किंमत सुमारें १२ आणे पडेल.

ऑद्योगिक हिंदुस्थान.

(ऱ्हासाचीं कारणें व उपाय.)

(ले. त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर)

सध्यांच्या काळांत प्रत्येकानें हें पुस्तक अवश्य वाचावें.

हिंदुस्थानचा व्यापार इंग्रजांनीं कसा बुडवला, तो व्यापार कसा हस्तगत करतां येईल परदेशांतून कोणकोणता माल येतो व किती रुपयांचा माल जातो, आमच्या औद्योगिक ऱ्हासाचीं कारणें काय इत्यादि प्रश्नांची अत्यंत सांगोपांग व विस्तृत चर्चा या पुस्तकांत केली आहे अनेक इंग्रज व हिंदी ग्रंथकारांचे उतारे व भरपूर आकडे या पुस्तकांत असून हिंदुस्थानचें यथातथ्य चित्र रंगविलें आहे. आजच्या बहिष्काराच्या काळांत या पुस्तकाइतकें माहितीनें भरलेलें दुसरें पुस्तक नाहीं. किंमत फक्त १ रुपया.

म्यानेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

CC-0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

अनुक्रमणिका.

विषय	पृष्ठ
वैदिक काळांतील तत्त्वज्ञानाचा विचार ...	१
विचारशक्ति ही राष्ट्राच्या उत्कर्षाची गुरुकिल्ली आहे ...	६
परीक्षेचा कागद	१०
यांत्रिक सहाय्याशिवाय हस्तकौशल्यानें करतां येणारे कांहीं घरगुती धनोत्पादक धंदे ...	१२
प्रोफेसर रामन्	१६
" प्रभात, अर्धा आणा प्रभात " (संपूर्ण सचित्र गोष्ट)	१९
शास्त्रीय चमत्कार	२२
हिंदी राष्ट्राचे शत्रु	२५
तुरुंगांतील सभ्यांचें वर्गीकरण	३२
बहिष्कार बळकट करा	३४
बाबू गेनू झिंदाबाद	३५
स्फुट-विचार	३६
मृत्यु-लेख	४१
पोंच व अभिप्राय	४५

वधू पाहिजे.

कऱ्हाडे, कोंकणस्थ अगर देशस्थ शाखेची, सुदृढ, सुशील, कुलीन, गरिबाची चालेल. वर कऱ्हाडा, बिजवर, अत्रीगोत्र वय ३०, सरकारी नोकर, पगार १२५. लिहाः—

जी. C/o ग्रेट इंडियन फार्मसी, मुंबई नं. ४

सरकारांत रजिस्टर केलेला

जौहर शिलाजित.

४० दिवस सेवन केल्यास वीस प्रकारचा प्रमेह, लघ्वीच्या नंतर धातु स्रवून जाणारा मूत्ररोग, स्वप्नदोष, धातुक्षीणता, निर्बलता, मंदाग्नि, जीर्णज्वर, कफ, क्षय, कास, श्वास, कृमि, पंडुरोग, मूळव्याध, कुष्ट इत्यादि रोगांवर फार लाभदायक आहे. त्याचप्रमाणें स्त्रियांचे मासिक दोष, प्रदर, प्रसूतिसंबंधी रोग हरण करतें व उत्तम संतति निर्माण होते. किं. २० दिवसांचें औषध २॥ तो० २॥ रु०; पूर्ण ४० दिवसांचें ५ तो० ४ रु०; १० तो० ७॥ रु०; २० तो० १४ रु० ट० ख० नि०

पत्ता-शिलाजित डेपो, नं. १८१ हरद्वार U.P.

विक्रीस तयार !   विक्रीस तयार !!

शके १८५३ चें
चित्रशाळा पंचांग.

यांतील महत्त्वाच्या गोष्टी.

१ यांत सार्थ संवत्सरफल दिलें आहे.

२ लग्नामुंजींच्या मुहूर्तांच्या वेळा स्टँ. टा. प्रमाणें दिल्या आहेत.

३ पर्जन्यविचार यांत दिला आहे.

४ पत्रिका, फलें इ. कामासाठीं महयुत्या यांत दिल्या आहेत.

इतक्या माहितीचें पंचांग, इतकें स्वस्त, दुसरें कोणतेंही नाहीं. एका प्रतीची किंमत अर्धा आणा. एकदम हजार प्रती घेणारास दर हजारीं रु. २०

म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

विक्रीकरतां पंचांगें घेणारास बोर्ड फुकट देण्यांत येईल.

'झेनिथ' द्राक्षासव

' झेनिथ द्राक्षासव ' प्रसिद्ध आयुर्वेदिक पद्धतीनें सशास्त्र तयार करण्यांत आलें आहे. याचे सेवनानें क्षयाची प्रथमावस्था, दमा, खोकला, वगैरे छातीचे विकार, सर्दी, पडसें, अरुचि, अजीर्ण, अपचन, बद्धकोष्ठ, आंबट ढेकर येणें, आम्लपित्त, वांती, कंठरोग वगैरे साफ बरे होतात. लहान मुलांच्या डांग्या खोकल्यावर याचा चांगला उपयोग होतो. हें घेण्यास स्वादिष्ट असून याचे नियमित सेवनानं शौचास साफ होऊन सणसणीत भूक लागते, पचनक्रिया सुधारते व अन्न रुचीनें जाऊं लागतें. रात्रीं निजते वेळीं ' झेनिथ द्राक्षासव ' घेतल्यानें झोंप चांगली लागते व सकाळीं उठल्यानंतर काम करण्यास हुरूप व तरतरी वाटते. " झेनिथ द्राक्षासव " आतां शहरोशहरीं व खेड्यांतसुद्धां प्रत्येक दुकानीं मिळतें. बाटल्या पोस्टांतून पाठविणें फार खर्चाचें होतें, तरी आमचे गिऱ्हाइकांना " झेनिथ द्राक्षासव " आपलेच गांवीं घेणें फायद्याचें पडेल.

१॥ पौंडाची किं. १८१२. १ पौंडास १। रु. व अर्ध्या पौंडास ८१२. पॅकिंग खर्च निराळा.

दि झेनिथ केमिकल वर्क्स, अरब बिल्डिंग, मुंबई नं २

अमृतांजन
वापरल्यानेंच

णका, मस्तकशूळ, उसण, ठेंचलेला अगर भाजलेला भाग, संधिवात, मुरगळा, कफ, थंडी वगैरे सर्व प्रकारच्या शारीरिक वेदना झटपट नाहींशा होतात म्हणून नेहमीं हेंच वापरा. किं. १० आणे ट. ख. निराळा. सर्वत्र मिळतें.

अमृतांजन डेपो.

[रजिस्टर्ड]   मुंबई   व   मद्रास

सर्वांत जुना कारखाना.

अनेक सर्टिफिकिटें व सुवर्णपदकें मिळालेला,

सरकारांत रजिस्टर झालेला,

रक्तशुद्धि व धातुवृद्धिकारक,

द्राक्षार्कमधु

MANE

हा अजबवल्ली द्राक्षार्कमधु, कोंकणप्रांतांतील अनेक वनस्पतींच्या रसांत द्राक्षांचा रसार्क मिश्र करून स्वदेशी यंत्रसाह्यानें तयार केला आहे. हा मधु महौषधी असून फार गोड व स्वादिष्ट आहे. हा मधु खाल्ल्यानें वात, पित्त, कफ या त्रिदोषाच्या मिश्रणानें होणाऱ्या व्याधी जातात. ६०-७० वर्षांच्या वृद्धांना सुद्धां कामविकार तरुणाप्रमाणें प्रज्वलित होतो. खरोखर एका सप्तकांतच दाखला पटतो. जननेंद्रियांतील शक्ति जाऊन प्राप्त झालेले नपुंसकत्व नाहींसें होतें. लघवीच्या पूर्वी अगर नंतर स्रवून जाणारी धातु बंद होते. स्वप्नावस्था होणार नाहीं. वीर्य वृद्धि होतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. तीनच दिवसांत गुण प्रत्ययास येतो. तरुण स्त्रिया व पुरुष यांनीं या द्राक्षार्कमधूचें सेवन करून यांतील खरी मजा पहावी. यानें क्षयरोग, दमा यांचा नाश होतो. दिवसांतून तीन वेळा जेवलें तरी अन्न पचून भूक चांगली कडकडून लागते. याचा अनुभव पहिले दिवशीं येतो. शौचास साफ होतें. अंगांत कितीहि वर्षांची मुरलेली कडकी असो, एका सप्तकांतच नाश पावते. या औषधास पथ्य नाहीं. स्त्री वर्ज करण्याचें कारण नाहीं. नवा रोग असल्यास दहा दिवस पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. व जुना रोग असल्यास तीन बाटल्यांनीं गुण येतो. एका बाटलीची किंमत १। रु. तीन बाटल्यांची किं. ३। रु. तीन बाटल्या पार्सलांत भरून पाठवूं, म्हणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं, डझन बाटल्यांची किंमत १२ रु. शिवाय १ बाटली मोफत. टपाल खर्च वेगळा पडेल. कार्ड पाठवून आर्डर आल्यास व्ही. पी. नें पाठवूं.

मॅनेजर—द्राक्षार्कमधु ऑफिस पो. निपाणी. जि. बेळगांव.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बाटलीवर "सुख संचारक कंपनी मथुरा" असें पाहून घ्यावी.



अंगूरी द्राक्षांचें बनविलेलें.

द्राक्षासव

थंडीच्या दिवसांत सेवन करण्या योग्य गोड, स्वादिष्ट सर्वांत उत्तम. शरीरांत रक्त व मांस यांची वृद्धी होते. सर्दी, खोकला, क्षय यांचा नाश करितें. शरीरांत तात्काळ स्फूर्ती उत्पन्न होते. अग्निमांद्य दूर होऊन भूक वाढते. आजारानंतर ची व प्रसूती नंतर येणारी अशक्तता दूर करते. शरीरांत शक्ती उत्पन्न करून चेहेऱ्यावर लाली येते. वृद्धपणीं होणाऱ्या रोगापासून बचाव करिते. किंमत मोठी बाटली २ रु. लहान बाटली. १ रु. ट. ख. मोठी बाटली १।=लहान बा.।।।= एक बाटली पेक्षां जास्त मागविणारांनी नजीकचें रेलवे स्टेशन कळवावें.

पत्ता—सुख संचारक कंपनी, मथुरा.

संगीत सहचारिणी नाटक.

हें श्रीयुत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं रचिलें असून पं. गंधर्व मंडळीकडून याचे प्रयोग होत असल्यामुळें हें अत्यंत लोकप्रिय झाले आहे. यांत अनेक फोटो दिले आहेत. किंमत १ रु.

म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें

भारतीय संग्राम.

लेखक-गं. रा. साने बी ए.

प्रस्तुत " भारतीय संग्राम " ह्या ग्रंथाची द्वितीयावृत्ति आम्हीं छापली असून पुस्तकांत प्रसंगोचित अशीं चौदा चित्रें घातलीं आहेत व तीन रंगी मोहक सचित्र मुखपृष्ठ " भारतीय युद्धा " प्रमाणेंच ह्यावरही ठेविलें आहे. कागद मोठोरेदार, छपाई उत्कृष्ट, व बाइंडिंग मजबूत असून सुबक हाफक्लॉथचें आहे ह्या ग्रंथाच्या बहिरंगाप्रमाणेंच अंतरंगाहि विशेष चटकदार झालें आहे. प्रो. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले न्यू पूना कॉलेज; प्रो श्रीकृष्ण नीलकंठ चापेकर डेक्कन कॉलेज; श्री. ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर वकील; व केसरी ता. १७ जून १९२४ इत्यादि विद्वानांचे उत्कृष्ट अभिप्राय मिळाले असून इंदूरच्या " ग्रंथोत्तेजक मंडळीनें " पुण्याच्या " डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें प्रस्तुत ग्रंथास बक्षिसें देऊन त्याच्या उत्तमत्वाची साक्ष पटवून दिली आहे. पुस्तकांत करुण, वीर, रौद्र, अद्भुत, भयानक, इत्यादि रसांच्या तरंगिणींचे कल्लोळ प्रसंगोपात्त उठून सहृदयांस क्षणैक आत्मवश करून टाकतात. पण आजवरच्या सर्व ग्रंथांहून ह्या ग्रंथांचा विशेष हा कीं. पूर्वग्रह अथवा परंपरा यांच्या भिडेस न पडतां, रा. साने यांनीं भारतीय युद्धांतील ठळक पात्रांच्या शीलाची व ठळक प्रसंगाच्या युक्तायुक्ततेची छाननी चिकित्सक व समतोल दृष्टीनें केली असून ही स्वतंत्र विचारसरणी गेल्या अनेक शतकें लुप्त झाली होती. तिला रा. साने यांचा ग्रंथ चालना दिल्याशिवाय खास रहाणार नाहीं. एकंदरींत धावत्या व चटकदार भाषेंतील गोष्ट व चर्चात्मक निबंध यांचा येथें मधुर मिलाफ झाला असून शंतनु राजापासून तों पांडवस्वर्गारोहणापर्यंतची कथा यांत चातुर्यानें व रसिकपणानं संकलित केली आहे ठिकठिकाणीं काव्यपद्धतीचा स्वीकार केल्यामुळें भारतीय युद्धाच्या हकीकतीस मनोहरपणा आला आहे. तुकाराम, वामन, श्रीधर, ज्ञानेश्वर, मयूरपंडित, व कित्येक आंग्ल कवि यांच्या प्रसन्न व रमणीय कृतींतील वचनांच्या फुलबागेंतील सरस वचनपुष्पांनीं प्रस्तुत ग्रंथांस अधिकच सौंदर्य आलें आहे. एकंदरींत सरस, रमणीय, चित्ताकर्षक, बोधक, अतएव संग्राह्य असाच हा ग्रंथ झाला असून त्याची किंमत फक्त १॥ रु. च आहे. ट. ख. ।≈३. पृष्ठें २०० पर्यंत आहेत.

भारतवर्षाचा धार्मिक इतिहास!

(पूर्वार्ध)

लेखक—गं. रा. साने, बी. ए. बी. टी.

हें पुस्तक आम्ही छापलें असून त्यांत वेदकालापासून ते भागवत धर्मीय साधुसंतांपर्यंतचा इतिहास सुबोध, सुगम व आटपशीर रीतानें दिलेला आहे रा. साने यांची वर्णनशैली चटकदार असून भाषाही जिव्हाळ्याची व मोठी मनोज्ञ आहे. त्याजबरोबर त्यांचा विषयप्रतिपादनशैली व विवादकुशलता हृदयंगम असल्यामुळें सुवर्णकर फळें कलाकुसरीच्या पात्रांत ठेवावी तसा सुयोग येथें जमून आला आहे. पुस्तकाची पानें २२० असून तिनरंगी दोन चित्रें आंत घातलीं आहेत. पुस्तकाचें टायटलही मोहक चित्राचें असून बायंडिंगही हाफ क्लॉथचें मजबूत आहे. पुस्तकास प्रो. श्री नी. चापेकर, प्रो. लेलेशास्त्री, व श्रीयुत श्री म. माटे यांचे उत्कृष्ट अभिप्राय मिळाले आहेत किं २ रु. पण आमचेकडे मागणी करणारांस हें व 'भारतीय संग्राम' मिळून २॥ स मिळतील ट. ख. निराळा.

मॅनेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

दरिद्री नारायणाचें कालरूप रंगीत चित्र.

स्वातंत्र्यसंग्राम.

मयैवैते निहताः पूर्वमेव। निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्॥

तीनरंगी चित्र साइज १०×१५ किं. २ आणे.

' निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ' या गीतेच्या अकराव्या अध्यायांतील श्लोकार्धाला धरून वरील तीनरंगी चित्र तयार करण्यांत आलें आहे. ब्रिटिश साम्राज्यशाही कालग्रस्त झाली असून तूं फक्त निमित्तमात्र हो आणि कायदेभंगाचें शस्त्र हातीं घे असा तरुण भारताला महात्मा गांधी उपदेश करीत आहेत असा देखावा चित्रांत उत्तम रीतीनें रंगविण्यांत आला आहे. प्रत्येकानें आपल्या घरांत चौकटींत बसवून लावण्यासारखें हें चित्र आहे प्रती नियमित असल्यामुळें मागविण्याची त्वरा करावी घाऊक प्रतीबद्दल पत्रव्यवहार करावा.

दरिद्री नारायणानें कालरूप धारण केलें असून त्याच्या विशाल मुखांत ब्रिटिश साम्राज्य आंत चाललेंच आहे. म. गांधी हिंदुस्थानला या मरू लागलेल्या ब्रिटिश साम्राज्याच्या नाशाकरितां तुम्ही निमित्तमात्र व्हा असा परमेश्वराचा संदेश सांगत आहेत. चित्रांत आहिंसेचा रथ आहे. असहकारितेचें धनुष्य, कायदेभंगाचा एक बाण जोडलेला व दुसरा करबंदीचा जवळच ठेवलेला आहे. रथाचे. खादी, बहिष्कार, अस्पृश्यतानिवारण व मद्यपान असे चार घोडे आहेत या घोड्यांना उद्यमाचा लगाम व संशयाचा चाबूक दाखविलेला आहे महात्मा गांधी सारथ्य करीत आहेत व तरुणभारत या रथांत संग्रामाकरितां बसला आहे.

मॅनेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ग्लोब विक्रीस तयार.

हे ग्लोब सहा इंची फारच सुबक असून लांकडी स्टँडवर मजबूत बसविलेले आहेत. किंमत ७॥८.
ट. ह. नि. मॅनेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

डॉ. वामन गोपाळ
सार्सापरिला.

कोणत्याहि कारणानें बिघडलेलें रक्त शुद्ध करून त्याची शरीरांत संपूर्ण शुद्धि करण्याचा हा एकच खात्रीचा इलाज होय असें ७५ वर्षांच्या अनुभवानें ठरलें असून अनेक सर्टिफिकिटें व पदकें बक्षीस मिळालेलीं आहेत. किं. रु. १।.

नकली मालापासून सावध रहा.

प्रो. डॉ. गौतमराव केशव ॲन्ड सन्, मुंबई. नं. २

सतत चौदा वर्षे चालू असलेलें.

रजिस्टर्ड

जोशी बालामृत.

लहान मुलांकरितां वापरा. इतर नवीन हलकी बालामृतें घेऊन फसूं नका.

जोशी बालामृत डेपो, मुंबई नं. ४.

अवघें २४ डब्यांवर रिस्टवॉच फुकट.

दद्रु विनाशक मलम.

गजकर्ण, खरूज कितीही जुना व हट्टी असो २४ तासांत जडापासून जातो आज २० वर्षे लाखों लोकांनी वापरून खात्री केली आहे, किं. ४ आ. १२ डब्यावर टाईमपीस २४ वर रिस्टवॉच फुकट बक्षिस नको असल्यास रु. १॥। बक्षन ट. ख. निराळें,

किंग जार्ज कारोनेशन कं. मुंबई नं ४

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारावर, वाचन व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल) **ब्राह्मी तेल** (सावध रहावें.

बाळबाळंतिणीकरतां औषधें.

बाळंतकाढा-नं.१ पहिल्या दहा दिवसांत देण्याचा ८१४: बाळंतकाढा-नं. २ दहा दिवसानंतर ८१४: बाळकडू-मूल जन्मल्यापासुन देण्यास योग्य ८८. कुमारी आसव-लहान मुलांकरितां ८१२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें कोणत्याहि ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १८१०) **द्राक्षासव** (अर्धा रत्तल ८१४
दीड रत्तल २८४ ट. ख. पै. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत तयार टिकाऊ काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार असतात त्यांचे माहितीचा मोठा क्याटलॉग व प्रकृतिमान मक्त पाठविण्याकरितां " रुग्णपत्रिका " ही, धात आण्याचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं. ब्राह्मी तेलाचे व टिकाऊ तयार काढ्यांचे मूळ कल्पक व शोधक, दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स, आर्यौषधी कारखाना, चेंबूर.जि.ठाणें. दुकान-दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

फुकट ! फुकट ! फुकट !

इंग्रजी सात यत्तेपर्यंत विद्यार्थ्यांस अत्यंत उपयोगी पडणाऱ्या

२ रुपयांत तीन डिक्सनऱ्या.

(१) चिपळुणकर बी. ए. कृत इंग्रजी मराठी उच्चारासह मोठी डिक्शनरी शब्दसंख्या २५००० किं. दोन रुपये (२) मराठी इंग्रजी डिक्शनरी भरपूर शब्दांचा व निरुक्त म्हणींसह किं. १ रु. (३) इंग्लिश टु इंग्लिश डिक्शनरी १४००० शब्दांची किं. ८ आणे ह्या तीन डिक्शनऱ्या दोन रुपये किंमतीस मिळून शिवाय इंग्लिश टीचर (घरबेघरी इंग्रजी शिकणेचें पुस्तक) भाग १।२।३ किं. १। रु. फुकट मिळेल. ट. ख ८१३ आणे निराळा पडेल पत्ता-सोमनेश्वर ब्रदर्स '२१' सदाशिव पेठ पुणें सिटी

सहावें वर्ष सुरूं झालें सहावें वर्ष सुरूं झालें

आठवड्याचा नवा काळ

सोळा पानांचें भरगच्च चित्रांचें स्वस्त साप्ताहिक.

यांत दर आठवड्यास दोन सचित्र गोष्टी, संकीर्ण समालोचन, भरपूर वर्तमानसार, अग्रलेख व स्फुट सूचना, चौफेर नजरफेक आणि एक स्वतंत्र चित्रांचें पान असून शिवाय इतर पंधरा वीस चित्रें दिलीं जातात वार्षिक वर्गणी ट. ह. सह मनीऑर्डरनें फक्त ३॥ रुपये व व्ही. पी. नें ३८११, सहामाही वर्गणी ट. ह. सह मनीऑर्डरनें फक्त १८१२ रुपये व व्ही. पी. नें १८१५.

मॅनेजर—नवाकाळ, मुंबई नं. ४

" प्रेसिडेन्सीं " तच विमा उतरवा.
डॉक्टरच्या तपासणीशिवाय विमा.

अखिल हिंदुस्थानांत डॉक्टरच्या तपासणीशिवाय आधुनिक पद्धतीनें पुरुष, बायका व मुलें ह्यांचा विमा घेणारी ही पहिली आणि एकच कंपनी आहे. रु. १२५ पासून पुढें वाटेल तितक्या रकमेचा विमा उतरतां येतो.

विशेष माहितीसाठीं व एजन्सीच्या अटींसाठीं लिहा—

कायमचे पंगु होणाऱ्यांची पुढें हप्ते न भरतां पुरे पैसे मिळण्याची सोय केली आहे.

प्रेसिडेन्सी विमा कंपनी

अमृत बिल्डिंग बॅलार्ड पायर फोर्ट मुंबई

विक्रीस तयार ! नवी कादंबरी ! !

[कौंट टॉल्स्टॉय यांच्या खळबळ उडवून देणाऱ्या ANNA KARENINA या हृदयद्रावक कादंबरींतील तत्त्वानुसार लिहिलेली नवी कादंबरी]

' शून्यजगत् ' कर्ते श्री. के. रा. पुरोहितकृत

आकाश--पुष्प

" आर्यन फिल्म कंपनींतील सुंदर नटनटींच्या ८ फोटोंसह "

पृष्ठसंख्या ३५० किंमत २ रु.

" शून्यजगत् " व आकाश-पुष्प " एकदम मागविणारास टपालखर्च माफ.

मॅनेजर-चित्रशाळा प्रेस पुणें व मॅनेजर नवाकाळ मुंबई

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनेक प्रशंसापत्रें व रोख बक्षिसें मिळालेलीं खात्रीचीं गुणकारी औषधें.

धातुपौष्टिक व वीर्यवर्धक

नवजवान-डबा

याचे सेवनानें धातुक्षीणता, गरमी, परमा यांची कडकी, बाल्यावस्थेंत मुष्टिमैथुनानें केलेला धातुचा नाश व त्या योगें आलेलें शिथिलत्व, अति स्त्रीसंगानें धातु पाण्यासमान पातळ होऊन शरीर क्षीण होणें, स्वप्नावस्थेंत किंवा लघवीच्या वेळीं धातु जाणें, स्त्रीप्रसंगीं वीर्य त्वरित स्खलन होणें, निस्तेज चेहरा, दृष्टिमंद, सांधे दुखणें, आळस, तापानंतरची अशक्तता, कमजोरी, अन्नपचन न होणें, निद्राभंग वगैरेवर हा पाक खल्ल्यानें पचनशक्ति व स्मरणशक्ति वाढून शरीरांत नवीन रक्ताची पैदास होऊन चेहऱ्यावर गुलाबी तेजदार तजेला येतो धातु पाऱ्यासारखी घट्ट बनून निरोगी संतति होण्यास साहकर बनतें, व पुरुषत्वास जोर येतो. जोरदार शक्ति आणणार दुर्मिळ किंमती वस्तुपासून बनविलेलें औषध वृद्ध, तरुण, रोगी, निरोगी प्रत्येकानें एक वेळ जरूर सेवन करावें १४ दिवस पुरणाऱ्या डब्याची गुणाच्या मानानें किंमत फारच कमी आहे, अशीं प्रत्युत्तरें येत आहेत. किंमत २॥ रुपये. ३ डब्यास सात रुपये.

एक डबा २ रुपये.] **नवचैतन्य-लेप.** [दोन डब्यांस ३॥ रुपये.

नामर्दी अथवा नपुंसकत्व नष्ट करून विजेप्रमाणें शक्ति देण्यास हा लेप फारच चमत्कारिक आहे हस्तमैथुनानें अगर कुकर्मानें उत्पन्न झालेली शिराची शिथिलता आणि वाकडेपणा, बारीकपणा, सुस्ती. ह्या लेपाचे मर्दनानें दूर होऊन पूर्ववत् पुरुषत्व प्राप्त होतें. पहिल्याच दिवशीं खात्रीनें गुण समजून येतो. भर तारुण्यांत वृद्धापकाळचीं चिन्हें भासल्यास निराश न होतां मागवून अनुभव पहा—

एक डबा किं. १॥ रु.] **वातराक्षस कल्प** [तीन डब्यांस ४ रुपये.

याचे सेवनानें सर्व प्रकारचे वातरोग, आमवात, संधीवात, अर्धांगवात, कंपवात, नळाश्रित वात, बाळंतस्त्रियास होणारे वातविकार, मेदोवृद्धी, सूज, डोकें, मान, हात, छाती, पाठ, कंबर. मांड्या, गुडघे, पोटऱ्या तळपाय, इत्यादि शरिराचे भागांस वातानें ठणका लागणें, मुंग्या येणें, पेटके येणें, जडत्व येणें, कळा लागणें, बधीरता येणें, हुरहुऱ्या येणें, चावा घेतल्यासारखें वाटणें, दमा, श्वास, खोकला, ग्लानि, सुस्ती, अल्प श्रमानें श्वास लागणें, कानांत व डोक्यांत घुं घुं आवाज होणें, चक्कर येणें, इत्यादि ८० प्रकारचे वातरोगांवर हा कल्प अचूक गुणकारी खा चि अर्थे रामबाण औषध आहे. यानें क्षुधा वाढून अन्न चांगलें पचन होतें. ह्या अल्पमोली बहुगुणी औषधाचा अनुभव पहा.

गोनो गुलेल

परम्यावर रामबाण औषध.

नवा अगर जुना कितीहि हट्टी परमा, पू वाहून पांढरे पिवळे डाग पडणें, लघवी थेंब थेंब होऊन भयंकर तिडीक उठणें, मूत्रावरोध, चिमचिम, उन्हाळी सूज, लघवींतून तार तार जाणें, स्त्रियांचे पदर वगैरे विकार पिचकारी न करतां बरे होतात. निव्वळ वनस्पतींवर बनविलेलें तेव्हां निर्धास्तपणें घ्या.
बा. किं. २॥ रुपये.

गरमी-धूप.

गरमीवर चमत्कारिक इलाज.

उपदंशापासून गुप्त इंद्रियास चट्टे. फोड, मुजेमुळे कातडीला मज्जाव, रस वाहणें वगैरे कितीहि भयंकर बिघडलेला रोग असो, पोटांत न घेतां नुसता चट्ट्यावर या गोळ्यांचा धूर दिल्यानें पूर्ण गुण येतो याचेपुढें रसायनें व इंजेक्शन्स तुच्छ मानतात. सोबत पोटांत घेण्याच्या औषधासह बा. किं. २॥ रुपये. अनुपान साबत.

व्यापारी व वैद्यांनीं हीं औषधें संग्रहीं ठेवून मनाजोगे पुरेपुरे पैसे व कीर्ति मिळवा. खोटें मानूं नका. शंका असलेल्या रोग्यांनीं आमचे गांवीं राहिल्यास गुणानंतर पैसे घेऊं. औषधें खोटीं ठरल्यास १०१ रुपये बक्षिस देऊं. किंमतीशिवाय पोष्ट खर्च निराळा. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन.

पत्ता--नवजवान औषधालय, टेंभुरखेडा पो. वरुड अमरावती.

हें पुस्तक शाळांतून चालविण्यास सरकारनें मंजूर केलें आहे.

पिकांवरील कीड व तीवर उपाय.

सुरबंट, मावा, टोळ, पांखरकिडे इ० कीटक, उंदीर, रानडुकरें इ० कीटकेतर प्राणी, तांबेरा यांसारखे अति- सूक्ष्म वनस्पतिजन्य रोग, टवळी निर्माणासारखे बांडगुळ रोग अशा बारही प्रकारच्या प्राणिज व उद्भिज रोगांपासून पिकाचें नुकसान कितें होतें, त्यावर काय उपाय योजावे, कोणतीं औषधें वापरावीं व तीं कशीं वापरावीं हें या पुस्तकांत सविस्तर सरवाशीं चित्रे देऊन सांगितलें आहे. म्हणून हें पुस्तक शेतकऱ्यास चांगलें मार्गदर्शक आहे. करितां त्याचा प्रत्येक शेतकऱ्यानें फायदा घ्यावा. किं० १२ आणे. ट० ख० नि०

मॅनेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

गरुडाची गोष्ट.

(लेखक-श्री. गो. वि. चिपळूणकर.)

हें पुस्तक म्हणजे मुलांना अत्युत्तम देणगी आहे. मातृभक्ति व स्वातंत्र्यप्रीति हे गुण मुलांच्या मनांत बिंबविण्यास हें पुस्तक चांगलें साधन आहे. यांत निरनिराळ्या प्रसंगांचीं दहा सुंदर चित्रें घातली आहेत. किंमत चार आणे ठेविली आहे.

मॅनेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

शुद्ध स्वदेशी व पवित्र

१२ वर्षांपासून प्रसिद्ध.

सौराष्ट्र नं. १ व चरखाछाप.

बारसोप व चोकोनी साबू नेहमीं वापरा. लिहा.

सौराष्ट्र उदय सोप फॅक्टरी.

गायवाडी गिरगांव, मुंबई ४

चेहरा गोंडस दिसावा

म्हणून 'रिंगोल कंपाऊंड' हें जगप्रसिद्ध मलम वापरा. केवळ २४ तासांत तोंडावरील फोड मावळून तोंडावर तारुण्याची तकाकी चमकूं लागेल. खरूज, खवडे इ० त्वचेच्या विकारांवर वस्ताद, फॅन्सी-बरणी किं.१२. ट. ख. निराळा. एजंट पाहिजेत. सर्व औषधांचा जंगी स्टॉक 'गोंडस म्हणजे रिंगोल.'

मेंथालिन बॅम. } पराडकर केमिस्ट,
किं. ८ आणे. मागवा. } सॅण्डर्स्ट रोड, मुंबई नं ४
पुण्याचे स्टॉकिस्ट—डी मॅसोडो कंपनी.

बलिदान.

अनुवादक—च्यं. र. देवगिरीकर.

फ्रान्सचे वाङ्मयसम्राट् व्हिक्टर ह्यूगो यांनी फ्रान्सच्या राज्यक्रांतीचे वेळच्या एका अद्भुत प्रसंगावर ही कादंबरी लिहिली आहे. ह्या कादंबरींत आपल्या तिघा मुलांचा रानावनांतून शोध करीत फिरणाऱ्या मातेचें अत्यंत करुणास्पद असें चित्र रेखाटलें आहे. राजपक्षानें प्रजापक्षाचीं हेरदारें, व बायकामुलें कशीं जाळलीं याचें रोमांचकारी वर्णन यांत वाचावयास सांपडेल. गिलेटिनचा पराक्रम, राज्यक्रांतीचे वेळची फ्रान्सची समाजस्थिति, राजसत्तेबद्दल अनादर, वेंडीच्या शेतकऱ्यांचें बंड इत्यादि प्रसंग फारच वाचनीय आहेत. निर्मनुष्य जंगलांत तिघा मुलांना घेऊन बसलेली आई; तिच्यावर गोळ्या झाडणारे सैनिक, अफाट समुद्रांत तोफेनें माजवलेला धुमाकूळ, धन्यास मारावयास तयार झालेला नावाडी, लाटोरचा रणसंग्राम, मूठभर सैनिकांनीं मोठ्या थोरल्या सैन्यास पळवून लावण्यास योजलेली युक्ति, किल्ल्यांतील कळीचा दगड, किल्ल्याला लावलेली भयंकर आग व त्यांतून मुलांची सुटका, इत्यादि प्रसंग फारच मनोवेधक आहेत. अखेरीस कर्तव्य श्रेष्ठ कीं दया श्रेष्ठ याचा झगडा लागून शेवटीं दया श्रेष्ठ म्हणणाऱ्याला प्राणास मुकावें लागतें.

व्हिक्टर ह्यूगोला शेक्सपिअरपेक्षांहि मोठा समजतात. त्याच्या कादंबऱ्या फारच रहस्यमय, ध्येयपूर्ण व चित्ताकर्षक आहेत. या कादंबरींचीं जगांतील प्रमुख भाषेंत भाषांतरें झालीं आहेत. हिंदुस्थानांतील कांहीं भाषेंत ही कादंबरी भवतीर्ण झाली आहे वाचकांना ही कादंबरी वाचल्याशिवाय राहूं नये. किंमत १ रुपया.

मॅनेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

लिहा ! नमुना फुकट !

हमारे बगीचेमे पैदा हुवा'

फूलदणाणा

रजिस्टर्ड औषध

सो. ए. नोगी आणि मुंबई न. ४

मुंबई व मध्यप्रांत सरकारने शाळांना मंजूर केलेले

डॉ. सी. एस्. मुळे यांचें

निरोगी कसें व्हावें ?

अथवा

आरोग्यशास्त्राचीं मूलतत्त्वें.

धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांचें आदिकारण मनुष्यदेह होय. परंतु तो निरोगी व बलवान् असा असला, तरच त्याजकडून हे पुरुषार्थ साध्य होतील. ह्यांत मनुष्याच्या ऐहिक व पारमार्थिक सुखाचा पूर्ण अंतर्भाव होत असल्यामुळें त्यांच्या प्राप्तीसाठीं यत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. पण हे पुरुषार्थ व्याधिग्रस्त अशा शरीराकडून साध्य होणें नाहीं. करितां निरोगी कसें व्हावें हें प्रत्येकाला समजणें आवश्यक आहे व त्याकरितां आरोग्यशास्त्राचीं मूलतत्त्वें समजावीं म्हणून, हें छोटेसें पुस्तक लिहिण्याचा यत्न केला आहे. किं. १ रु. ट. ह. निराळा.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस पुणें

मा. श्री. नी. चापेकर यांची कविता—

सुवर्णचंपक.

हें पुस्तक मुंबई सरकारनें दुय्यम शाळांतील वाचनालयासाठीं व बक्षिसासाठीं मंजूर केलें आहे. किंमत १ रुपया.

रुक्मिणीहरण—निरीक्षण.

(लेखक—श्री. प्र. धों. कानिटकर एल्. एल बी,)

सामराज कवींच्या 'रुक्मिणीहरण' काव्याचा हा सांगोपांग अभ्यास आहे हें पुस्तक लेखकाच्या सखोल अभ्यासाची, गाढ व्यासंगाची आणि सूक्ष्म विवेचनशक्तीची साक्ष पटवितें बी. ए आणि एम्. ए. च्या विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक. किंमत ८ आणे.

प्रभाकर आणि मंडळी, पुणें. } चित्रशाळा, पुणें.

नशीबाची परीक्षा



प्रश्नवेळ, वय व वाटेल ते ६ प्रश्न स्पष्ट लिहून पाठवा उत्तरें खुलासेवार पाठवूं. फी २ रु. दशेसह मोठ्या पत्रिकेस ३ रु. वर्षफल २ रु. सवलत—६ प्रश्न. १ पत्रिका १ वर्षफल ही सात रुपयांची तीन कामें एका वेळीं मागविल्यास ३ रुपयांत पाठवूं.

ज्योतिर्विभूषण पं. दामोदर त्रिंबक गायधनी नं. १०३७ नाशिक

॥ वनस्पतीचीं अमूल्य औषधें ॥

१ रक्तक्षय—कफांतून रक्त पडणें ८।२. पूयमेहसिंधू निर्दोष व आयुक्त १॥ रु. अग्निमांद्यदीपन (डिस्पेप्सिआ) ८।२. आम्लपित्तकेसरी—घशाशीं जळजळ. कडवट व आंबट ढेकर व 'आकारी ८।२. स्त्रीसंजीवनी—ऋतुदोष वगैरे जाऊन कांति, शक्ति, आयुष्यवर्धक व संततिजनक १ रु रक्ती व साधी मूळव्याध ८।२. उदकमेहारी (मूत्रातिसार) १ रु. मधुमेहदमन-लघ्वी फार व शर्करायुक्त १॥ रु. नेत्रसुधा अक्षणफूल सारा, दृष्टिमांद्य व मांसवृद्धिनाशक गोळी ८८. उरःक्षतामृत छातींत वेदना व रक्तस्राव १ रु. शूलामृत मलम—डोकें छाती व बरगड्यांतील वेदना वाटला ८५. औषधें मागवितांना प्रकृतिमान कळविणें, अनुमानपत्र सोबत. पोष्ट व प्यांकिंग खर्च निराळा.

पत्ता:—वनौषधालय बुधवार ५०३ नातूंची चाळ जुनी तवकीर गल्ली पुना सिटी.

इंद्रिय—विज्ञान (PHYSIOLOGY) किं. १२ आणे.

'सुदृढ शरीर तर सुदृढ मन' प्रत्येकाला आपलें शरीर सुदृढ कसें राहील, त्यांतील अवयवांचे व्यापार सरळीत कसे चालतात हें कळणें अवश्य आहे. त्यानें हे पुस्तक एकवार तरी वाचावें. विवेचन सुबोध व क्लिष्ट परिभाषा न वापरतां केलें आहे. १०० एक चित्रं घातलीं आहेत प्रत्येक भागाचे शेवटीं साराश व जागोजाग टिपा दिल्या आहेत.

अलीकडे ह्या विषयाचें महत्त्व इतकें पटूं लागलें आहे कीं मॅट्रिक्युलेशन, ट्रेनिंग व स्कू. फा. परीक्षांस हा विषय नेमिला आहे. त्या परीक्षांस लागणारी माहिती ह्या पुस्तकांत संपूर्ण आली आहे.

बालसाधु—एकनाथ.

मनुष्याला आपला संसार आनंद, सुख व शांति यांचें माहेरघर बनवून परमार्थ व लोकसेवा हीं साधतां येतात हें साधुवर्य एकनाथ महाराजांनीं सर्वांना कृतीनेंच सिद्ध करून दाखविलें आहे. त्यांनी व्यवहार आणि परमार्थ यांची सांगड फारच चांगल्या रीतीनें घातलेली आहे. सध्याच्या काळीं श्री एकनाथ महाराजांचें चरित्र सर्वांना सुमार्गदर्शक असेंच आहे. श्री एकनाथांनीं 'भागवताचा उपदेश'' यांत धर्माचें रहस्य हे आचार आणि विधि यांहून अलग असून तें कशांत आहे हें उत्तम रीतीनें प्रतिपादिलेलें आहे. श्री एकनाथांच्या प्राकृतमधील श्रीभागवत व श्रीरामायण ह्या ग्रंथांबद्दल श्रीतुकारामापासून तों न्यायमूर्ति रानडे यांच्यापर्यंत सर्व महाराष्ट्राची अलौकिक भक्ति दिसून येते. आजकाल सर्व जातींस व सर्व सामान्यजनांस ह्या भागवत धर्माचें बाळकडू पाजलें असतां, त्यांच्या चारित्र्यावर व पुढील आयुष्यक्रमावर अनुकूल असा परिणाम झाल्यावांचून राहाणार नाहीं. या दृष्टीनें श्री एकनाथांचें चरित्र सोप्या भाषेंत श्री. सुतार मास्तर यांनीं लिहून एक साधन करून दिलें आहे नाथांचें चरित्र, म्हणजे भागवतावरील एकादश स्कंधांत प्रतिपादिलेल्या भागवतधर्मरहस्याचें प्रेमळ उदाहरण होय. त्याची किंमत अवघी ४ आणेच ठेविली आहे. पोस्टेज खर्च निराळा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

शिवचरित्रसाहित्य खंड ३ रा,

(विक्रीस तयार.)

किंमत ३ रुपये. — पृष्ठें २८०.

भा. मंडळाच्यां सभासदांस २॥ रु. संपादकः—शं. ना. जोशी, व ग. ह. खरे.

[भा. इ. सं. मंडळ पुरस्कृत ग्रं क्र. २४]

शिवकालीन मराठ्यांचा इतिहास अस्सल मराठी पत्रांच्या आधारें लिहिला पाहिजे, या इतिहासाचार्य राजवाडे यांच्या सिद्धांतानुसार विश्वासनीय व निवडक कागदपत्र प्रसिद्ध करण्याचें काम पुणे येथील शिवचरित्रकार्यालयाच्या खटपटीनें व या खंडातील २७७ नवीन पत्रानें होणार आहे. पुरंदर किल्ला घेतल्याची हकीकत, जयसिंगप्रकरण मोरया गोसावी व रणदुल्लाचे उल्लेख वगैरे साक्षात् शिवाजी चरित्राच्या माहितींत भर घालणारे प्रसंग यांत २५।३० आले असून सांधेकर, जेधे, मोरे, बेलसरे, शिवरे, आणि इंदापूर, आकोले, बावडे, नागोटणें, चांबळी वगैरे ठिकाणचे वतनदार, यांच्या कागदांतून शिवाजीकालीन लोकांची स्थिति व विचार समजण्यास उपयोगी असे निवडक कागद यांत ३३ घराण्यांतून १०।१२ संशोधकांच्या कित्येक वर्षांच्या खटपटीनें प्रकाशित झाले आहेत. मराठ्यांच्या इतिहासाची अभिरुचि असणाऱ्या सर्व वाचकांनीं व संस्थांनीं या ग्रंथाचा संग्रह करणें अवश्य आहे.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

२१ वर्षांच्या प्रयोगानें] ११०० रु. बक्षीस [पूर्ण यशस्वी ठरलेला

मिरज येथील सुप्रसिद्ध वैद्य मोहनलाल सिंह यांचा

रजिस्टर्ड **मदनमस्त पाक** रजिस्टर्ड

हा एक अत्यंत धातुपौष्टिक, शक्तिवर्धक व कामोत्तेजक असा मौल्यवान ६० वनस्पतींचा सशास्त्र बनविलेला आहे. यानें स्वप्नावस्था व लघवीद्वारें जाणाऱ्या वीर्यास प्रतिबंध न झाल्यास पैसे परत पाठवूं. हस्तक्रियेनें व अति ब्री लंपटपणामुळें आलेला नामर्दपणा, धातुक्षीणता, अशक्तता कामेच्छा होतांच वीर्यपतन होणें, गर्मीचे परिणाम, कसलाहि परमा, अंगदुखणें, आजारांतून उठल्यानंतरची अशक्तता, हातपाय व लघवीचा दाह इत्यादि रोग १ व त्यानें नाहसे होऊन शौचास साफ होतें. भूक, शक्ति व वजन झपाट्यानें वाढतें. शरीर लोखंडाप्रमाणें मजबूत होऊन वीर्यास पुष्ट व संततीस योग्य बनवितो. सर्व शरीरांत नवशक्तीचा संचार होतो. या पाकानें ६० वर्षांच्या वृद्धानाहि तारुण्याचा अनुभव आलेला आहे; मग तरुणांना पुरुषत्व, बल व तेज प्राप्त होणार नाहीं काय ? शिवाय यानें स्त्रियांचा रक्तश्वेतप्रदर नष्ट होऊन त्या सशक्त होतात, व गर्भाशय अत्यंत शुद्ध होतो. २१ दिवस पुरणाऱ्या पूर्ण गुणकारी ८४ तोळ्याच्या डब्याची किं. रु. ५ ट. ख. निराळा. पथ्य नाहीं अनुपान डब्यासोबत. यांत ६० वनस्पती नाहींत व धातुपौष्टिक व शक्तिवर्धक नाहींत, असें सिद्ध करणारास ११०० रु. बक्षीस.

सूचना—हा पाक टिकाऊ असल्यानें मुळींच बिघडत नाहीं. इतरांचा अनुभव कृपा करून आमच्यावर लादूं नका. प्रथम हा पाक मागवून आपल्या आयुष्याचें नंदनवन बनवा. रोगमुक्त होण्याची ज्याची वेळ आली असेल त्यानाच हा प्रभावशाली पाक मागविण्याची इच्छा होईल.

वैद्य मोहनलाल एस्. औषधालय, पोस्ट मिरज S.M.C.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

१००० रुपये बक्षीस.

सतत २० वर्षे अनुभवून हजारों लोक रोगमुक्त होऊन असंख्य सर्टिफिकिटें मिळविलेला मॅ. डी. एस्. अँड को. औषधालय मिरज यांचा जगप्रसिद्ध

शक्तिवर्धक धातुपौष्टिक पाक.

हा सेवन केल्यानें अंगातील सर्व प्रकारची कडकी, लघवींतून धातु जाणें, स्वप्नावस्था, स्त्रीसंग, अतिजलद अन्यकारणानें आलेलें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, गर्मी, परमा वगैरे नाहींसें होऊन धातु घट्ट बनते. शौचास साफ होऊन भूक लागते. इच्छेनुरूप कामशक्ति वाढते, तरुणाना होईलच यांत आश्चर्य नाहीं; पण ८०।९० वर्षांच्या वृद्धांनींही घेतल्यास पहिल्या पंचविशीची मजा केल्याशिवाय राहाणार नाहींत. स्त्रियांचे सर्व रोग, तांबडी, पांढरी धुपणी, मुलें न होणें व होऊन मरणें वगैरेवर हा रामबाण आहे. संतति होण्यास मदत होते. यांत अनेक वनस्पति व भस्में, सुवर्णमालिनी, वसंतमालिनी वगैरे मौल्यवान् औषधें मिश्र केलीं आहेत. नं. १ डब्याची किं. रु. १० सात दि० गुण. नं. २ किं. रु ५ पंधरा दि. गुण. स्पेशल डबा श्रीमंत शेटसावकाराकरितां किं. १५ रु. चोवीस तासांत गुण. यांत पुष्कळ जोरदार, मौल्यवान् औषधें मिश्र केलीं आहेत. यास पथ्य नाहीं. रोज सकाळीं १ तोळा पाक खावा. वर २० भार दूध प्यावें. एक डबा ४ सप्तक पुरतो. दोन डबे घेणारास पो. ख. माफ. चार डबे घेणारास एक डबा बक्षीस.

ताजीं सर्टिफिकिटें (शिफारसपत्रें वाचा) म्हणजे खात्री होईल. (१) सूर्यभानजी रुंजाजी ढोणे, मु. करोड (कारंजा):—नं. २ च्या पाकाच्या डब्यानें गुण आला. पुनः नं. २ चे दोन डबे पाठवा. (२) अबदुल शेख महंमद चौगुले, क्लॉथ आणि ग्रोसर मर्चंट. मु. जयगड:—आमचे मित्र अबदुल कादर शेख हसन यांनीं आपला पाक मागविला होता. त्यांना गुण आला. सबब मला स्पेशल २ डबे व नं. २ चे दोन डबे व बक्षिसाचा एक असे चाळीस रु. चे व्ही. पी. नें पाठविणें. (३) श्रीधर ऊर्फ बाबुराव मालगुजर, मु. सौसर (छिंदवाडा) मी स्पेशल डबा बोलाविला होता त्यानें गुण आला. पुनः स्पे. २ डबे जरूर पाठविणें. (४) भगवान गणेश शेटे, कॅप मर्चंट विजापूर. पाठविलेलें औषध उत्तम आहे. पुनः स्पे. १५ रु चा डबा पाठविणें. (५) बिरबलदास मु खुरजगांव (सावनेर):—पूर्वी कोमादेव मुनीम यांचेमार्फत पुष्कळ डबे बोलाविले. त्यानें तब्येतीस फायदा बराच झाला. पुनः नं. १ चे ४ डबे पाठविणें. (६) भिवा बाबुधुरी, मु. सदर मराठी स्कूल कराची:—नं. २ च्या पाकाच्या डब्यानें बराच गुण आहे. पुन नं. २ चा डबा जरूर पाठविणें. अजून पुष्कळ सर्टिफिकिटें आहेत. स्थलसंकोचामुळें देणें अशक्य आहे. हीं खोटीं आहेत असें सिद्ध करणारास वरील बक्षीस मिळेल. निराश न होतां अवश्य एकवार अनुभव घ्या म्हणजे खात्री होईल.

पत्ता—मॅ. डी. एस्. अँड को. औषधालय, मु. पो. मिरज बॉक्स नं. २०.

पुरुषत्वप्राप्ति व धातुपुष्ट करणारें चूर्ण.

हें चूर्ण धातुपौष्टिक व शक्तिवर्धक अशा अनेक वनस्पतींचें बनविलें असल्यानें अत्यंत पातळ वीर्यास एकदम घट्ट करतें. शौचाचे वेळीं, लघवींतून व स्वप्नावस्थेंत जाणाऱ्या धातूस तात्काळ प्रतिबंध होतो, बालपणांतील अविचारानें व अति स्त्रीलंपटपणामुळें आलेली नरमाई, धातुक्षीणता, अशक्तता, धातुस्थानची उष्णता, डोकें, पाय, कंबर वगैरेंचा पीडा, हे सर्व विकार खलास होऊन रक्त शुद्ध होतें, भूक, शक्ति व वजन वाढतें, आणि शरीर वज्राप्रमाणें सुदृढ होतें. निर्जीव पुरुषत्वास हें चूर्ण सजीव करून गर्भधारणेस योग्य अशा वीर्याची मजबूती करते. २१ दिवस पुरणाऱ्या १ डब्याची किं. ५ रु. व्ही. पी. खर्च -॥-

स्त्रीरोगनिवारी चूर्ण.

सर्व रंगाची धुपणी, (प्रदर) विटाळपणांत, ओटीपोटांत व कंबरेंत कातरल्याप्रमाणें शूळ, विटाळ थोडा अगर फार, अगर अगदींच न येणें, अनियमितपणें विटाळ येणें, अगर रक्ताच्या गाठी पडणें, गर्भाशयांत दोष असल्यानें गर्भ न राहणें, गर्भपात होणें, अशक्त संतति होणें, किंवा होऊन मरणें, इत्यादि विकार २१ दिवस चूर्ण दिल्यास गर्भाशयांतील व शरीरांतील सर्व दोष खलास होऊन, विटाळ नियमित सुरू होतो, गर्भपात न होतां मुलें सशक्त, निरोगी जन्मतात. व ४० वर्षांच्या स्त्रियांससुद्धा खात्रीनें गर्भधारणा होते. १ डब्याची किं. ४ रु. ट ख. -॥-

कोणतेहि २ डबे मागविणारास ट. ख. माफ. पथ्य नाहीं. हल्कीं औषधें घेऊन फसलेल्यांनीं विश्वास ठेऊन एकच वेळ अवश्य मागवून अनुभव पहावा.

संततीप्रतिबंधक व तहकुबी गोळ्या.

पुष्कळ वेळा बाळंत झाल्यानें स्त्रियांस भयंकर अशक्तता येते व गरीब स्थितींत ज्यास्त संतति दुःखदायक होते. त्यामुळे अथवा अन्य कारणानें संततीची इच्छा खलास झाली असल्यास ४२ दिवस रोज २ गोळ्या घेतल्यास शरीरांत व संसारसुखांत काहींच बिघाड न होतां टाइमानें विटाळ सुरू असून गर्भधारणा एकदम बंद पडते. नंतर काहीं केल्या सुरू होणार नाहीं. पूर्ण विचार करून मागविणें. परंतु तूर्त संतति नको आहे, पुढें पाहतां येईल असें म्हणणाऱ्यांनी ४२ दिवस गोळ्या न देतां फक्त संभोगानंतर एकच गोळी देत गेल्यास देईतांपर्यंत गर्भधारणा होत नाही. गोळ्या घेण्याचे बंद केल्यास पुनः गर्भधारणा होते. ४२ गोळ्यांचे १ बाटलीस सात रुपये. ट. ख. -॥- गोळ्या कमी पाठवितां येणार नाहींत. पथ्य नाहीं.

पत्ता—वैद्य. विरुपाक्ष सिद्दाप्पा, पो. मिरज. S. M. C.

उत्तम कातड्याच्या गळ्यांत घालण्याच्या पिशव्या.

फारच चांगल्या तऱ्हेनें केलेल्या. प्रत्येक पिशवीचें वजन १। पौंड आहे. किंमत फक्त ३ रु.

मॅनेजर:- चित्रशाळा प्रेस पुणें

५० वर्षांच्या अनुभविक डॉ. गद्रे यांचा परम्यावरील अप्रतिम पाक. डबी १ रु.

परमा अंगांत कितीही मुरला असला, तरी ह्या पाकापासून खात्रीनें बरा होतो. किं॰ १ रु. नवीन असल्यास ३ डब्या. जुना असल्यास ६ डब्या. परम्यावर पिचकारीचें औषध. किं॰ रु. १।८.

लहान मुलाच्या डांग्या खोकल्यावर गोळ्या किं. १ रु.

पत्ता—वि. ग. गद्रे. मेडिकल युनिअन, बुधवार पेठ पुणें.

मूतछाप खर खात्राच

केशर

आमचेकडे खालीलप्रमाणें मिळेल

एक पौंड १६ औंस ११२ आ



८ „ २१

४ „ ११-

२ „ ६

१ „ ३-

एक तोळा ।। रु.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस. पुणें

फावल्या वेळांत शेकडों रुपये गरीब विद्यार्थी व बेकार लोक घरबसल्या

" महत्त्वकला संग्रहाच्या "

साह्यानें अल्प भांडवलावर फावल्या वेळांत, स्वतंत्र धंदा करून शेकडों रुपये मिळवितात. किं १ रुपया. व्ही. पी. नें १। रुपाया.

गद्रे ब्रदर्स. मु. पो. ओगले वाडी, सातारा.

हिंदी भांडवलाच्या गिरण्यांमधून तयार झालेल्या सुताचीं प्रसिद्ध इलकलचीं लुगडीं.

फॅशनेबल व भरपूर लांबीरुंदीचीं व गॅरंटी रंगाचीं. विशेष माहितीसाठीं कॅटलॉग मागवा.

श्री महालक्ष्मी रेशमी लुगड्यांचा कारखाना. इलकल (जि. विजापूर.) S. M. RY.

ग्यासबत्तीचें मोठें दुकान.



आमचे येथें सर्व जातीची ग्यासबत्ती, प्रायमस चुली, खिशांत ठेवण्याचा विजेचा दिवा वगैरे स्वस्त भावानें मिळेल. भावासाठीं आमचा सचित्र कॅटलॉग मागवा. फुकट पाठवूं.

एच. टी शाह आणि कंपनी. ४२३, गोलपीठा, मुंबई नं. ४

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मराठी दुसरें पुस्तक.

(नवीन धर्तीवर लिहिलेलें)

लहान मुलांच्या मनांत स्वाभिमान बाणावा, त्यांची बुद्धिमत्ता वाढावी, शील-संवर्धन व्हावें, मातृभूमीवर त्यांनीं प्रेम करूं लागावें, त्यांना स्वधर्माविषयीं आवड उत्पन्न व्हावी; इत्यादि उद्देश पुढें ठेऊन हें मराठी दुसरें पुस्तक तयार केलें आहे. लहान मुलांना गोष्टींची अत्यंत आवड असते. त्याकरितां या पुस्तकांत भरपूर गोष्टी व भरपूर चित्रें दिलीं आहेत. गोष्टी शिवाय, राम, कृष्ण, दधीची, रामदास, शिवाजी-महाराज बापू गोखले, नानाफडनवीस, म. गांधी, टिळक, राममूर्ति वगैरे देशादिकांच्या व थोर पुरुषांच्या लहान मुलांना समजतील अशा सोप्या गोष्टी दिलेल्या आहेत. मुलांची चौकसबुद्धि वाढावी, शास्त्रीय गोष्टींची माहिती व्हावी. सृष्टिनिरीक्षणाची त्यांना संवय लागावी, शारीरिक मेहनतीची त्यांच्यांत आवड उत्पन्न व्हावी ह्या उद्देशानें अनेक धड्यांचा समावेश या पुस्तकांत केला आहे. रोजच्या परिचयाचे पुष्कळ धडे या पुस्तकांत असल्यामुळें या पुस्तकाचा खेड्यांत व शहरांत प्रसार होण्यास हरकत नाहीं. अशा प्रकारचें राष्ट्रीय भावनांचें बीजारोपण, ज्ञानसंवर्धन व अनेक सद्गुणांची आवड उत्पन्न करणारें हें एकच पुस्तक आहे. या पुस्तकांत एकंदर ६८ धडे आहेत. व पृष्ठसंख्या १२८ आहे. या पुस्तकांत तीन रंगीत चित्रें व पुष्कळ साधीं चित्रें आहेत कवितांचा समावेशही पुस्तकांत करण्यांत आला आहे. पुस्तकांतील धड्यांची मांडणी पाहिल्या पुस्तकाप्रमाणें आकर्षक व उपयुक्त आहे. लहान मुलें हें पुस्तक अत्यंत आनंदानें वाचतील. सर्वांना पुस्तक विकत घेतां यावें म्हणून किंमत अगदीं थोडी फक्त ३॥ आणे ठेवली आहे.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

विनायकाची कविता.

ह्यांची कविता उच्च दर्जाची असून पूर्वींच्या जुन्या कवीपेक्षां अगदीं नवीन तऱ्हा यांच्या कवितेंत आढळून येते. यांची कविता निरनिराळ्या विषयांवर असून प्रासादिक आहे. तसेंच यांची कविता वाचली असतां महाराष्ट्राच्या व महाराष्ट्र-वाङ्मयाच्या भवितव्यतेविषयीं निराश होण्याचें कारण उरणार नाहीं. ह्यांची सर्व कविता धुंडाळून वरील पुस्तकांत संकलित केली आहे. पुस्तकास कै. प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन यांनीं सुंदर प्रस्तावना लिहिली आहे. कवीचें त्रोटक चरित्रहि पुस्तकांत प्रारंभीं दिलें आहे. पुस्तकाचीं पानें १३६ असून कागद ग्लेझ व टाईप ग्रेट वापरला आहे. किंमत रु. १८४ व ट. ह. ८२.

मॅनेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

पुण्यसंग्रह करा.

॥ भाविकास अपूर्वसंधि ॥

नरहरिवेंकटेश शास्त्री अष्टाधिकारीकृत-

संस्कृत नीरांजनसंग्रह

(आरत्या) भाग १ ला.

संस्कृत व वैदिकपूजेमध्यें प्राकृत मराठी आरती म्हणून दोहोंचा संकर करण्याचा दोष जो नेहमीं भोळे भाविक जन अजाणपणें पदरीं बांधून घेतात त्यांना त्यांतून बचावण्याच्या हेतूनें हा आर्तिक्यसंग्रह आम्हीं महत्प्रयासानें छापला आहे. तरी भाविक व श्रद्धालु जनांनीं हा संग्रह अवश्य संग्रहीं ठेवावा व पुण्यसंग्रह करावा. किंमत ८=.८=॥ चीं पोस्ट तिकिटें पाठवून एक प्रत अवश्य मागवून घ्यावा.

अष्टाधिकाराकृत सूत्रोक्त काण्वशाखीय नित्यनैमित्तिक ब्रह्मकर्म किं. २ रु. मॅनेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

सौ. लहानबाई धुरंधरकृत पुस्तकाची सुधारून वाढविलेली चौथी आवृत्ति

गृहिणीमित्र अथवा हजार पाकक्रिया.

या पुस्तकांत नाना प्रकारचीं पक्वान्नें, भाज्या, चटण्या, कोशिंबिरी, रायतीं, लोणचीं, मसाले, खिचड्या, मुरांबे, तऱ्हेतऱ्हेचीं मिष्टान्नें, उपवासाचे पदार्थ, जेली, जाम्स, पाव, केक्स, पुडिंग, बिस्किटें, सरबतें, आइस्क्रीम वगैरे पदार्थ करण्याची उत्कृष्ट माहिती प्रमाणांसह दिलेली आहे. शिवाय, मत्स्यमांसाचे अनेक प्रकारचे पदार्थ बनविण्याच्या अनुभविक कृती सविस्तर दिल्या आहेत व उपकरणांचा चित्रपट जोडला आहे.

नवीन आवृत्तीचा विशेष—आजारी माणसांच्या पथ्यपाकक्रिया हें नवीन प्रकरण जोडलें आहे. पृष्ठसंख्या एकंदर ४०० किं. कागदी बांधणी १॥। रु. कापडी सोनेरी २ रु. टपालखर्च निराळा.

परचुरे. पुराणिक आणि मंडळी. बुकसेलर्स माधवबाग मुंबई नं. ४.

प्रथम व २१ दिवसांनंतर वजन करून पाहण्यास विसरूं नये.

खप्याची दुनिया] १००० रुपये बक्षीस [आहे काय पाहूं !

धिक्कार कराल तर क्षीणता राखून ठेवाल.]

धातुपौष्टिक व शक्तिवर्धक

रजि-) वज्रांग सुंदर पाक. ·(स्टर्ड.

[थोडक्या खर्चासाठीं व्यर्थ क्षीणता राखूं नका.

लघवींतून व स्वप्नावस्थेपासून जाणारी धातु आणि मुष्टिमैथुनानें व जास्त स्त्रीलंपटानें, शिराशिथिलत्वानें आलेली नरमाई, धातुक्षीणता, स्त्रीस्पर्शकरतांच त्वरित वीर्यस्खलन, वीर्याचा पातळपणा, हातापायाची व लघवीची जळजळ, उष्णता, पित्तांश, जुनाट परमा, गरमीचे दोष, कंबर, पाठ दुखणें, कोणत्याही रोगांतून उठल्यानंतरची क्षीणता इत्यादि मुळापासून नष्ट होऊन शौचास साफ होतें भूक, शक्ति व वजन वाढतें, आणि शरीर वज्राप्रमाणें सुदृढ होऊन गर्भधारणेस योग्य अशा वीर्याची मजबुती करते. वीर्यवृद्धि होऊन वीर्य घट्ट होतें, निर्जीव झालेले पुरुषत्वास सजीव करितो. वीर्यस्तंभन होऊन कामोत्पत्ती होते, तरुणाप्रमाणें ५०।६० वर्षांच्या वृद्धांनासुद्धा कामेच्छा जास्त होऊन रतिसुखाचा पुष्कळ वेळ उपभोग घ्याल. या पाकांत धातुपौष्टिक व शक्तिवर्धक अमोल्य ५२ वनस्पति वापरल्या आहेत. स्थलविस्तारास्तव वनस्पतींचीं नावें नमूद केलीं नाहींत. अनुभवानें थक्क व्हाल. नंबर १ चा डबा किं. १० रु. सात दिवसांत गुण. नंबर २ चा डबा किं. ५ रु. चौदा दिवसांत गुण. श्रीमंत शेटसावकार यांच्याकरितां स्पेशल डबा किं. १५ रु. यांत अमोल्य किंमतीचीं औषधें जास्त प्रमाणांत वापरल्या आहेत. २४ तासांत अद्भुत चमत्कार दाखविणारा पो. ख. माफ. एकदम ४ डबे मागविणारास पांचवा डबा बक्षीस. कोणतेंच पथ्य नाहीं. सकाळीं २ तोळ्याचो १ वडी खाऊन वर १ कप गरम कोणतेंही दूध प्यावें. याचप्रमाणें रात्रीं जेवणानंतर घ्यावें एका डब्यापेक्षां कमी पाठवितां येणार नाहीं. यांत ५२ वनस्पति नाहींत व त्या धातुपौष्टिक नाहींत असें सिद्ध करणारास १००० रु. बक्षीस.

वैद्य, व्ही. एम्. कापशे, पो. मिरज.

अत्तरदाणी.

अर्थात् चित्रमय-जगत्मधील अत्यंत मनोरंजक गोष्टी.

लेखक—तरुण भारतीय.

या अत्तरदाणींत पांडवांचें शस्त्रग्रहण, दाजीबाची गोष्ट धर्कम बहादूर, बहिष्कार, अवमान, डोळे उघडले, मेनावध, मा विशा या विमुक्तये, ह्या आठ गोष्टी छापल्या आहेत गोष्टी पौराणिक, सामाजिक, ऐतिहासिक विषयांवर लिहिल्या असून फार चटकदार व बोधप्रद आहेत. या गोष्टी अगदीं नव्या धर्तीवर लिहिल्या असल्यामुळ वाचकांना नाविन्य वाटल्याशिवाय रहाणार नाहीं गोष्टींतील कथा [illegible] आहेत. किं. १२ आणे [illegible]

तुम्हाला माहीत आहे काय ?

(१) गोड व मधुर असल्यामुळें घेण्यास मुळींच कंटाळा येत नाहीं. (२) शुद्ध वनस्पतींपासून बनविलेला आहे. (३) कुटुंबांतील लहान थोर सर्व स्त्री-पुरुषांना उपयोगी पडतो. (४) हा शास्त्रोक्त आयुर्वेदिक पद्धतीनें बनविलेला आहे. (५) शक्तिवर्धक, रक्तशोधक व रोगजंतुनाशक अशाच शुद्ध वनस्पतींचा यांत उपयोग केला आहे. (६) कडकी, जीर्णज्वर, मलबद्धता, अपचन वगैरेवर हा खात्रीचा उपाय आहे. (७) मलेरिया किंवा इतर ताप येऊन गेल्यानंतर प्रकृती सुदृढ व निकोप होण्यास याच्या प्रतीचें दुसरें औषध नाहीं. (८) विशेषतः शहरांतील रहाणीमुळें उद्भवणाऱ्या अपचन, मलबद्धता व निरुत्साह याचा हा काढा समूळ नाश करतो (९) याचा दिवशीं एक डोस जरी नियमानें घेतला तरी वरील सर्व रोगांपासून अलिप्त रहातां येतें (१०) या अप्रतीम गुणकारी व सर्वोपयोगी औषधाची किंमत फक्त १। रु. आहे. (ट. ख वेगळा.

एक वेळ वापरून खात्री करा. खेड्यापाड्यांतसुद्धा सर्व दुकानांत मिळतो.

माहितीपत्रक मागवा. फुकट पाठवूं.

पर्ल कंपनी, राणीचा बाग, मुंबई.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

	फेब्रुवारी.	मार्च.	एप्रिल.	
[illegible] [illegible]१८ २५	१ ८ १५ २२	१ ८ १५ २२ २९ ...	५ १२ १९ २६ ३१	[illegible]
[illegible] [illegible]१९ २६	२ ९ १६ २३	२ ९ १६ २३ ३० ...	६ १३ २० २७ ...	[illegible]
[illegible] [illegible]२० २७	३ १० १७ २४	३ १० १७ २४ ३१ ...	७ १४ २१ २८ ...	[illegible]
बुध. [illegible]२१ २८	४ ११ १८ २५	४ ११ १८ २५ ...	१ ८ १५ २२ २९ ...	[illegible]
गुरु. [illegible]२२ २९	५ १२ १९ २६	५ १२ १९ २६ ...	२ ९ १६ २३ ३० ...	[illegible]
शुक्र. २ ९ १६ २३ ३०	६ १३ २० २७	६ १३ २० २७ ...	३ १० १७ २४ ...	१ [illegible]
शनि. [illegible]१७ २४ ३१	७ १४ २१ २८	७ १४ २१ २८ ...	४ ११ १८ २५ ...	२ ९ १६ २३ [illegible]



	जुलै.		सप्टेंबर.	आक्टोबर.	नोव्हेंबर.	
रवि. ...	[illegible]	[illegible] ...	६ १३ २० २७ ...	४ ११ १८ २५	१ ८ १५ २२ २९ ...	[illegible]
सोम. ...	[illegible]	[illegible] ३१ ...	७ १४ २१ २८ ...	५ १२ १९ २६	२ ९ १६ २३ ३० ...	[illegible]
मंगळ. ...	[illegible]	[illegible] ...	१ ८ १५ २२ २९ ...	६ १३ २० २७	३ १० १७ २४ ...	१ ८ १५ २२ २९
बुध.	१ ८ [illegible]	[illegible] २६ ...	२ ९ १६ २३ ३० ...	७ १४ २१ २८	४ ११ १८ २५ ...	२ ९ १६ २३ ३०
गुरु.	२ [illegible]	[illegible] ...	३ १० १७ २४ ...	१ ८ १५ २२ २९	५ १२ १९ २६ ...	[illegible]
शुक्र.	३ १० १७ २४ ३१ ...	७ १४ २१ २८ ...	४ ११ १८ २५ ...	२ ९ १६ २३ ३०	६ १३ २० २७ ...	[illegible]
शनि.	४ ११ १८ २५ ...	१ ८ १५ २२ २९ ...	५ १२ १९ २६ ...	३ १० १७ २४ ३१	७ १४ २१ २८ ...	५ १२ १९ २६

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्ष २२ ॐ तत्सत VOL. 22

चित्रमय जगत

अंक १ ला.

वैदिक काळांतील तत्त्वज्ञानाचा इतिहास. *

(लेखकः-चिंतामण विनायक वैद्य.)

वैदिक काळांत तत्त्वज्ञानाची प्रगति कशी झाली, याचा इतिहास या लेखांत सांगावयाचा आहे. इतिहास म्हटला म्हणजे स्थळ व काळ यांची निश्चिति झाल्याशिवाय त्यास योग्य स्वरूप येत नाहीं, अर्थात् ' वैदिक काळांतील ' या शब्दाचा ठीक निश्चय प्रथम आपणांस करावयास पाहिजे. **ऋग्वेदादि संहिता** कधीं झाल्या हें मी अन्यत्र ठरविलें आहे. त्यांचा काळ इ. स. पू. ३१०० हा निश्चित होतो. **भारतीय** युद्धाचाहि हाच काळ होय. आणि **भारतीय** युद्धाच्या व्यक्तींमध्यें **व्यासांची** गणना आहे. **ऋग्वेदादि** संहिता **व्यासांनीं** हल्लींच्या स्वरूपांत सांगितल्या हें निर्विवाद व सर्वसंमत आहे. **ऋग्वेद सूक्तें** याहि पूर्वींची असतील व आहेत, परंतु त्यांचा काळ भिन्न भिन्न असून, कित्येक सूक्तें इ. स. ४५०० इतकी जुनीं, **टिळकांच्या मतें**, किंवहुना इतरांच्या मतें, इ.स. पू. २५ हजार इतकीं जुनीं आहेत, आणि हीं सूक्तें अनादि आहेत असाहि हिंदूंचा आस्तिक भाव आहे तोहि एका दृष्टीनें योग्य आहे. परंतु या ऐतिहासिक विवेचनांत आपल्यास **व्यासरचित वेदांच्या** संहितांचा काळ घेतला पाहिजे आणि म्हणूनच वैदिक काळाचा प्रारंभ इ. स. पू. ३१०० हा घेऊं. या वेळीं आर्य **हिंदुस्थानांत पंजाबांत कुरुक्षेत्रांत** किंवहुना **गंगायमुनेच्या** पूर्वेस **अयोध्येंत** वसले होते. या काळीं व या स्थळीं तत्त्वज्ञानाच्या विचारास प्रारंभ झाला आणि त्याची वाढ हळु हळू होऊन **ब्राह्मणामध्यें** आणि **उपनिषदांमध्यें** त्याची प्रगति झाली. उपनिषदांचा काळ इ. स. पू. २५०० पासून दोन हजारपर्यंत असा निश्चित होतो. मुख्य उपनिषदें दहा असून त्यानंतरचीं तीन उपनिषदें **श्वेताश्वतर, कौषीतकी**, आणि **मैत्रायणीय** हीं येतात. **मैत्रायणीय** उपनिषदाचा काळ इ. स. पू. १९०० **लो. टिळकांनीं** योग्य रीतीनें, त्यामध्यें वसंतसंपातस्थिति सांगितली आहे, त्यावरून ठरविला आहे. अर्थात् दशोपनिषदें या पूर्वींचीं आहेत हें मी उघड आहे आणि सर्वांत जुनें **बृहदारण्यक** उपनिषद **शतपथ ब्राह्मणाचा** शेवटचा भाग होय, तेव्हां त्याचा काळ इ. स. पू. २५०० मानला जाईल म्हणजे दशोपनिषदांचा काळ, इ. स. पू. २५०० पासून दोन हजारपर्यंतचा ठरतो हें मी माझ्या पुस्तकांत (History of Sanskrit literature Vedic Period) ह्यांत विस्तारानें दाखविलें आहे.

वैदिक काळ या शब्दांत **वेदांगांचाहि** काळ येतो. **श्रौत** सूत्रें या काळांतील असून त्यावरूनहि **तत्त्वज्ञानाची** प्रगति कशी होत होती हें आपणांस कळतें. **वेदांगांतील** शेवटचें वेदांग **पाणिनीचें** व्याकरण असून त्याचा काळ इ. स. पू. सुमारें ८०० निश्चित होतो. या काळांत आर्यांची प्रगति पूर्वेस **मिथुलेपर्यंत** व दक्षिणेस **उज्जनी-द्वारकेपर्यंत** झाली होती, हें मी वरील पुस्तकांत विस्तारानें दाखविलें आहे, तेव्हां वेदांगाचा काळ इ. स. पू. दोन हजार पासून इ. स. पू. हजारपर्यंत मानण्यास हरकत नाहीं. याच काळामध्यें **भगवद्गीता** झाली हाहि निश्चय आहे आणि या काळांत तत्त्वज्ञानाची प्रगति कशी झाली याची विस्तृत माहिती आपल्यास भगवद्गीतेपासून फारच चांगली कळते. तेव्हां वैदिक काळांतील तत्त्वज्ञानाचा इतिहास म्हणजे सुमारें इ. स. पू. तीन हजार पासून एक हजारपर्यंत आर्यांनीं तत्त्वज्ञानाचे विचार त्या त्या वेळच्या ग्रंथांत म्हणजे **संहिता, ब्राह्मणें, दशोपनिषदें, श्रौतसूत्रें, भगवद्गीता**, यांत ग्रथित केले आहेत, त्यावरून **तत्त्वज्ञानाची** वाढ कशी झाली हें आपल्यास ऐतिहासिक रीतीनें पहावयाचें आहे. हे विचार **आर्यांनीं पंजाबांत, सरस्वती क्षेत्रांत, कोशल-विदेहांत, कुरु-पांचालांत** असतांना केलें असून त्यांचें केंद्र **कुरुक्षेत्रात** होतें असें आपणांस उपनिषदांवरून व श्रौत सूत्रांवरून दिसून येतें. जशी हल्लीं **महाराष्ट्राची विद्याकेंद्रभूमि पुणें** आहे, तशी त्या वेळीं **कुरुपांचालभूमि** होती. आर्वाचीन काळांत हें केंद्र तेथून निघून अगदीं दक्षिणेकडे **शृंगेरीपर्यंत** गेलें आहे व तत्त्वज्ञानाचा उत्कर्ष तेथें होऊन तेथून प्रवाह उत्तरेकडे **काश्मिरापर्यंत** गेला आहे हें पाहून एकप्रकारचें आपल्यास आश्चर्य वाटतें. पण हल्लीं जरी तत्त्वज्ञानाचें केंद्र **कुरुक्षेत्र** किंवा **पंजाब** नाहीं तथापि वैदिक काळांत म्हणजे इ. स. पू. एक हजारपर्यंत याच क्षेत्रांत तत्त्वज्ञानाची प्रगति झाली. ती कशी होत गेली आणि तत्त्वज्ञानाचे निरनिराळे सिद्धांत कसे प्रस्थापित झाले याचा इतिहास आपल्यास या लेखांत द्यावयाचा आहे.

' वैदिक काळ ' आणि ' इतिहास ' या शब्दांची फोड झाल्यावर आपल्यास ' तत्त्वज्ञान ' या शब्दाची फोड करावयास पाहिजे. Philosophy म्हणजे तत्त्वज्ञान या शब्दानें कोणते विचार दर्शित होतात हें बहुतेक सर्वत्र एकच ठरलेलें आहे. मी कोण, हें दृश्य जगत् कोठून आलें ? मी कोठून आलों आणि कोठें जाणार असे हे विचार मुख्यतः तत्त्वज्ञानात येतात.

पंजाब व **कुरुक्षेत्र** हे अत्यंत सुपीक प्रदेश असून तेथें खावयाची ददात नाहीं, अशा समृद्ध देशांत, पूर्व ऋषि जगताकडे पाहून तें कसें उत्पन्न झालें याचा विचार करूं लागले. **इंद्रादि** वैदिक देवताना यज्ञांत हविर्भाग अर्पण करून ते त्यास संतुष्ट करींत होते. यज्ञमार्ग आणि देव या कल्पना हजारों वर्षांपूर्वींच्या प्रत्येक मनुष्यसमाजांत चालत आल्या आहेत, त्याप्रमाणें, प्राचीन **भारतीय** आर्यांतहि त्या प्रचलित होत्या, परंतु या देवतांच्याहि पलीकडे त्यांचे विचार जाऊं लागले व परमेश्वरानें हें जग निर्माण केलें आहे, ही सर्व मनुष्यप्राण्यांत असलेली कल्पना घेऊन त्यांनीं हें जग कसें निर्माण केलें याविषयीं खोल विचार करण्यास प्रारंभ केला. तात्त्विक विचार करतांना कोणच्याहि वस्तूचें निर्माण, उपादानाशिवाय होत नाहीं; हा विचार पुढें येतो. नेहमींचा त्या वेळचा रथाचा दृष्टांत ऋषीपुढें येऊन **रथत** सुतारानें वनांतील झाडें तोडून आणून तासून फोडून तयार केला, तशा रीतीनें हें जग निर्माण करतांना **ईश्वरानें** कोणतें उपादान कारण घेतलें होतें हा प्रश्न उपस्थित होतो. ऋषि विचारतो–

* गीताजयंती पुणें येथें दिलेल्या व्याख्यानाच्या आधारें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

" किंस्विद्वनं क उ स वृक्ष आस ।
यतो द्यावापृथिवी निष्टतक्षुः ॥ "

तें वन कोणचें, तो वृक्ष कोणता कीं ज्याच्यापासून परमेश्वरानें पृथ्वी आणि आकाशांतील तारे निर्माण केले? हा प्रश्न प्रत्येक धर्माच्या तत्त्वज्ञानांत उपस्थित होतो. **बायबलांत** सुद्धां पूर्वी कांहीं अंधकारमय स्थितींत (chaos) केऑस होते त्या अव्याकृतापासून परमेश्वरानें सात दिवसांत आप, तेज, वायु इत्यादि मनुष्यान्त सृष्टि निर्माण केली असें वर्णन आहे. **ग्रीक** तत्त्वज्ञानी सुद्धां प्रारंभीं एक अव्याकृत (Matter) मानतात. अर्थात् जगाचें उपादान कारण matter, chaos, अथवा परमाणु अनादि आहे असें तत्त्वज्ञानांत मानलें जातें, पण येथें अशी शंका उपस्थित होते कीं, हें अव्याकृत कांहीं निराळें होतें असें मानलें तर परमेश्वरानें उत्पन्न केलेलें नाहीं असें मूल जगत् पूर्वी असलेंच पाहिजे; अर्थात्, **परमेश्वरानें** सृष्टि निर्माण केली या विधानास बाध येतो. सांख्याप्रमाणें प्रकृति आणि पुरुष दोन्ही अनादि, निराळीं मानावीं लागतात, तेव्हां तत्त्वज्ञानाच्या विचारांत ही गोष्ट नडते. कित्येकांनीं परमेश्वर नाहींच असें येथें मानलें आहे. चोहीकडे केवळ matter च, जड पदार्थच, आहेत ते आपल्या निसर्गशक्तीनें जगदाकार परिणत होतात पण हा नास्तिकांचा सिद्धांत पुढें जरी प्रबळ झाला असला तरी तो प्राचीन आर्यांनीं तत्त्वज्ञानांत मानला नाहीं. उत्पत्तिस्थितिलयकर्ता परमेश्वर आहे असें त्यांनीं मानलें, ही विविधाकार अनेक चमत्कारांनीं भरलेली, सुखदुःखादि भावनांनीं युक्त, आनंदमय सृष्टि, अचेतन, जड matter अथवा प्रकृति कशी उत्पन्न करील हा विचार नडतो; अर्थात् चेतन, ज्ञानमय, आनंदघन अशा परमेश्वराची कल्पना करणें प्राप्त आहे. "**रचनानुपपत्तेश्च नानुमानम् ।**" असें **बादरायणाचें** सूत्र आहे. जड प्रकृति, असें रचनाकौशल्ययुक्त जग निर्माण करूं शकणार नाहीं. यालाच पाश्चात्य तत्त्ववेत्ते " Arguement of Design " असें ईश्वरसिद्धीकरतां प्रमाण म्हणतात. **सांख्यांनीं** सुद्धां जडप्रकृतीशिवाय पुरुष मानला याचें कारण अचेतन प्रकृतीला सुखदुःखाचा अनुभव येणें शक्य नाहीं. " पुरुषस्सुखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते " असें भगवद्गीतेमध्यें पुरुषाचें लक्षण दिलें आहे. तेव्हां matter शिवाय दुसरी कोटी मानणें प्राप्त असल्यानें सांख्यांनीं प्रकृति आणि पुरुष असे दोन पदार्थ मानले.

हें matter अथवा ही प्रकृति निराळी अनादि मानली तर वर सांगितल्याप्रमाणें परमेश्वरानें उत्पन्न केली नाहीं अशी एक वस्तु मानावी लागते. ही अडचण दूर करण्यासाठीं कित्येक तत्त्ववेत्ते परमेश्वरानें आपल्या इच्छामात्रानें शून्यापासून हें जग निर्माण केलें, असें मानूं लागले. पूर्वी असत् होतें त्याचपासून सत् उत्पन्न झालें असें मानावें तर ऋषींना तेथें अशी शंका उत्पन्न झाली कीं " कांहीं नाहींपासून " " कांहीं आहे " कसें उत्पन्न होईल? ईश्वर अमर्याद शक्तीचा आहे हें मानलें असतां, तो शून्यापासून सृष्टि निर्माण करूं शकेल हें कबूल करावें लागेल. तथापि यांत अरुचि उत्पन्न होते, हें निर्विवाद आहे, म्हणूनच छांदोग्य उपनिषदांत " कथमसतः सज्जायेत सदेव सोम्येदमग्र आसीत् " असतापासून सत् कसें निर्माण होईल तेव्हां पूर्वीपासून सत् आहे असा सिद्धांत केला. आतां परमेश्वरानें निर्माण न केलेली वस्तु सत् किंवा प्रकृति मानावी लागते ही अडचण पुनः राहिलीच. उपनिषदांच्या तत्त्ववेत्त्यांनीं या अडचणीचा परिहार एका विलक्षण कल्पनेनें केला, ती कल्पना म्हणजे, ईश्वरानें आपल्यापासूनच हें जग निर्माण केलें ही होय. " यथोर्णनाभिः " इत्यादि मंत्रांत जसा कोळी आपल्या शरीरांतून सूत काढून त्याचें जाळें बनवितो, त्याप्रमाणें परमेश्वर आपल्या शरीरांतूनच हें जग निर्माण करतां झाला हा सिद्धांत त्यांनीं मानला आहे. अर्थात् सृष्टि हें परमेश्वराचेंच रूप आहे, असा अभेद–सिद्धांत ऋषींनीं प्रतिपादिला. जगतांत दिसणारें जड हें जड नसून चेतन आहे, सुखदुःखादि भावनायुक्त आहे, असें यांत ठरतें. आश्चर्याची गोष्ट ही कीं, जें आपल्या विशाल कल्पनेनें ऋषींनीं सांगितलें तेंच हल्लीं भौतिक शास्त्रांच्या प्रगतींत सिद्ध होऊं पहात आहे. कलकत्त्याचे प्रो॰ **बोस** यांनीं प्रत्यक्ष प्रयोगावरूनहि असें सिद्ध केलें आहे कीं, वनस्पतीस किंबहुना जड लोखंडास सुखदुःख, श्रम, विश्रांति इत्यादि विकार आहेत.

या सिद्धांतास अभिन्ननिमित्तोपादान सिद्धांत वेदांतांत म्हणतात. जगाचें जें निमित्तकारण म्हणजे परमेश्वर तेंच त्याचें उपादान कारण आहे. म्हणजे ईश्वरानें आपल्या शरीराचीच सृष्टि बनविली आहे. या सृष्टीपासून अभिन्न अशा ईश्वरास ऋषींनीं ब्रह्म हें नांव दिलें, आणि हाच सिद्धांत वेदांतसूत्राच्या दुसऱ्याच सूत्रांत खुबीनें सांगितला आहे. ' अथातो ब्रह्मजिज्ञासा ' हें पहिलें सूत्र असून त्या ब्रह्माचें लक्षण दुसऱ्याच सूत्रांत ' जन्माद्यस्य यतः ' या लहानशा वाक्यांत दिलें आहे. ' यतः ' ज्यापासून, या विभक्तींत निमित्तकारणहि आलें आणि उपादानकारणही आलें- ' अस्य ' जगतः या जगाचें 'जन्मादि' म्हणजे जन्म, स्थिति व लय होतात, तें ब्रह्म असें येथें उत्तर दिलें आहे. या उत्तरांत सर्व प्रतिपक्षांना उत्तर आलें. नास्तिक जगताचा अंत व जन्म मानीतच नाहीं आणि परमेश्वर नाहींच नाहीं, यांत त्यांनाहि उत्तर आलें आणि सांख्य प्रकृति व पुरुष भिन्न मानतात त्यांनाहि उत्तर आलें.

ब्रह्माची कल्पना संहिताकालांत हा शब्द नसला तरी होती असें दिसतें. सर्व सृष्टि परमेश्वरस्वरूप आहे ही कल्पना **पुरुषसूक्तांत** स्पष्टपणें मांडलेली आहे. **पुरुषसूक्त** हें वेदांतील महासूक्त असून तें चारी वेदांत आहे व त्यांत परमेश्वराच्या विराट् स्वरूपाचें वर्णन आहे. या सूक्ताशिवाय आणखीहि सूक्तें संहितेमध्यें वेदांतपर आहेत. पण ब्रह्माची पूर्ण कल्पना उपनिषद्कालीं प्रस्थापित झाली. ब्रह्म या शब्दानें ऋग्वेदांत वेद असा अर्थ कधीं कधीं होतो व तो अर्थ **भगवद्गीतेंतहि** आहे. पण " सर्वं खल्विदं ब्रह्म " या वाक्यांत ब्रह्माची पूर्ण उदात्त कल्पना दिलेली आहे.

किमिदं ? कुत इदं जातं ? या प्रश्नांचें उत्तर, हें दृश्य जगत् ब्रह्मस्वरूप आहे, ब्रह्मापासूनच निर्माण झालें आहे, व ब्रह्मांतच लीन होणार असा सिद्धांत उपनिषत्कालीं पूर्णतेस आला त्यांत आलें. आतां त्याबरोबर कोऽहं ? या प्रारंभींच्या तिसऱ्या प्रश्नाचें उत्तर मीही ब्रह्म आहे असेंच ठरतें. नास्तिक लोक केवळ matter आहे असें मानतात, आणि सुखदुःखाचा अनुभव घेणारा जीव हा matter चाच एक गुण आहे असें प्रतिपादन करतात. कित्येक तत्त्ववेत्ते जीवात्मा निराळा मानतात Body आणि Soul अशा दोन वस्तु भिन्न मानतात. जडसृष्टि आपल्या शरीरांत आहे, पण आपला जीव अथवा आत्मा हा भिन्न आहे कीं नाहीं, तो अमर आहे कीं नाहीं, त्याचें स्वरूप काय इत्यादि प्रश्न तत्त्ववेत्त्यास सोडवावे लागतात.

ऋषींनीं आत्मा निराळा मानला खरा, पण तोहि परमेश्वरस्वरूप आहे आणि अमर आहे असें ठरविलें. उपनिषदांतून या आत्म्याचें रसभरित वक्तृत्वपूर्ण वर्णन आहे आणि " तत्त्वमसि " या आख्यानांत छांदोग्यांत व याज्ञवल्क्य–जनकसंवादांत, **बृहदारण्यकांत** फारच मनोवेधक विवरण आहे. संस्कृतच्या विद्यार्थ्यांनीं हे दोन्ही भाग पाठ करण्यासारखे आहेत व ते वाचतांना Plato's Dilouges वाचण्या, इतका किंबहुना अधिक आनंद येईल. **कठोपनिषदांत** मनुष्य मेल्यावर कांहीं जिवंत रहातें कीं नाहीं या प्रश्नाचें उत्तर देऊन आत्मा कसा अमर आहे हें सांगितलें आहे. केनोपनिषदांत, शरीराव्यतिरिक्त जीवात्मा कोणी तरी आहे हें प्रतिपादिलें आहे. नास्तिक लोक शरीरांतील जीवास matter चा पंचमहाभूतांच्या एका विशिष्ट समवायाचा, गुण मानतात, उदाहरणार्थ. शरीर हें एक घड्याळ आहे, त्यामध्यें धातूंचीं निरनिराळीं यंत्रें बनविलीं असून धातूच्या एका स्प्रिंगच्या जोरावर घड्याळ जसें चालतें तसें शरीरांतील निरनिराळ्या भौतिक नाडींच्या जोरावर शरीर चालतें, असें ते म्हणतात. पण असें मानलें तरी **केनोपनिषदांत** प्रारंभींच केलेले प्रश्न राहतातच. " केनेषितं पतितं प्रेषितं मनः । केन प्रयुक्तः प्रथमः प्रैति प्राणः " हा प्राण, हा श्वासोच्छ्वास प्रथम कसा चालला, घड्याळाच्या यंत्राप्रमाणें शरीरांतील सर्व यंत्रें व्यवस्थित आहेत तरी घड्याळास चालविण्यास कोणी तरी लंबकास गति देणारा लागतो, त्याचप्रमाणें या शरीरांतील श्वासोच्छ्वासास प्रथम गति कोणी दिली ? मन हें उडणारें जहाज आहे. आकाशयान सर्व यंत्रांनीं तयार व पेट्रोल घालून सज्ज असलें तरी त्यास उडविणारा कोणी तरी लागतो, त्याप्रमाणें, या मनरूपी जहाजास प्रथम उडविणारा कोण आहे. या प्रश्नाचें उत्तर अर्थात् ईश्वर हेंच आहे. ईश्वरस्वरूपी आत्मा शरीरांतील इंद्रियरूपी यंत्रांस गति देतो आणि मग सर्व शरीर कार्य करूं लागतें. याचसाठीं **सांख्यांनीं** पुरुष हा प्रकृतीहून निराळा मानला पण अखेरीस ऋषींच्या मताप्रमाणें, जड शरीर हेंहि परमेश्वरस्वरूप आहे आणि शरीरांत वास करणारा जीव हाहि परमेश्वरस्वरूप आहे. **भगवद्गीतेच्या** पंधराव्या अध्यायांत सांख्यांच्या वरचा सिद्धांत कसा आहे हें थोडक्यांत मार्मिक रीतीनें सांगितलें आहे. " गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ।" पृथ्वी मीच आहे " पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः " ज्वल ही मीच आहे. " अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ." शरीरांतील अग्नीही मीच आहे आणि " प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् " प्राणरूप वायु मीच आहे, शरीरांतील जड मीच आहे त्याचप्रमाणें चेतनहि मीच आहे. अर्थात् " सर्वस्यचाहं हृदि संनिविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च " हृदयांत वास करणारा जीव आणि स्मृति, ज्ञान इत्यादि त्याचें कार्य मीच आहे असें **भगवंतानीं** येथें थोडक्यांत सांगितलें आहे. पण पुढें प्रकृति आणि पुरुष असे दोन पदार्थ नसतां खरोखर दोन्ही पुरुषच आहेत असें लागलीच सांगितलें." द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एवच. " **क्षर व अक्षर** दोन्ही पुरुषच आहेत आणि याहून तिसरी कोटी **पुरुषोत्तमाची** म्हणजे परमात्म्याची. " यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः " लोकत्रयाला व्यापून, त्याचें भरण करणारा, परमेश्वर परमात्मा आहे असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. जड, जीव आणि ईश्वर अशा दिसणाऱ्या तीन वस्तु अखेरीस परमेश्वरस्वरूपच आहेत असा उपनिषद् तत्त्ववेत्त्यांचा सिद्धांत **भगवद्गीतेंत** याप्रमाणें येथें सांगितला आहे.

" किंस्विद्वनं क उ स वृक्ष आस । यतो द्यावापृथ्वी निष्टतक्षुः " या ऋचेंत संहिताकाळीं, ऋषींनें विचारलेल्या प्रश्नास " ब्रह्म तद्वनं । ब्रह्म स वृक्ष आस । असें उत्तर ब्राह्मणकाळीं व उपनिषद्कालीं **आचार्यांनीं** स्पष्ट दिलें आहे. या सिद्धांताप्रमाणें, सर्व जग हें ब्रह्म आहे व आपला आत्मा हें ब्रह्म आहे, तर जगतांत दिसणारें नानात्व नष्ट होतें असें अनुभवास येणारें आहे कीं नाहीं हा प्रश्न उपस्थित होतो. त्याचप्रमाणें आत्म्याची गति म्हणजे स्वर्गप्राप्ति कीं काय ? ती खरोखर नसून ब्रह्मास जाऊन मिळणें हीच आत्म्याची खरी गति आहे असें ठरतें काय ? या दोन्ही प्रश्नांचीं उत्तरें उपनिषद्कारांनीं अस्तिपक्षीं दिलीं. ब्रह्माचा अनुभव होतो, आणि नानात्व नष्ट होतें, असें याज्ञवल्क्यानें ' यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत् तत्केन कं पश्येत् ' इत्यादि वाक्यांनीं दिलें. त्याचप्रमाणें 'ब्रह्मैव सन् ब्रह्माप्येति' या वाक्यांत आत्मा मूळचा ब्रह्मच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे, तो ब्रह्मास पोंचतो असेंहि सांगितलें. ब्रह्मानुभव होण्याचा उपाय "अहं ब्रह्मास्मि" असा सतत निदिध्यास सांगितला आहे, त्याप्रमाणें ब्रह्मानुभव होतो असें मानावें लागतें. " दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते " यालाच ब्राह्मी स्थिति म्हणतात आणि मृत्युसमयीं अशी ब्राह्मी स्थिति असतां मनुष्य निर्वाणाप्रत जातो. " स्थित्वास्यामंतकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ".असा भगवद्गीतेंत या उपनिषदसिद्धांताचा अनुवाद केला आहे.

दुःखाच्या ठिकाणीं मन उद्विग्न न होणें, सुखाची लालसा नष्ट होणें, प्रेम, भय, क्रोध इत्यादि विकार नष्ट होणें या गोष्टी प्रत्यक्ष ब्रह्मानुभव न झाला तरी ब्रह्मनिदिध्यासानें प्राप्त होतात, त्याचप्रमाणें ·" सर्वभूतहितेरतः " सर्व भूतांचें कल्याण करण्यांत मुनि रममाण होतो असेंहि सांगितलें आहे. या ब्राह्मी स्थितीला पोंचणारे **महात्मा गांधींसारखे** पुरुष या जगतांत विरळा होत. कारण अव्यक्ताची उपासना अथवा ब्रह्मनिदिध्यास फार कठिण आहे. ' अव्यक्ताहि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते " हें पाहून **भगवद्गीतेनें** भक्तिमार्ग नवीन उपदेशिला. तत्त्वज्ञानाच्या प्रगतीमध्यें ही नवीन पायरी खालच्या दर्जाची कां होईना **भगवद्गीतेनें** नवीन तयार केली. स्त्री, शूद्र, वैश्य तसेंच अनेक ब्राह्मण व क्षत्रिय यांना या सोप्या मार्गानें सुद्धां मुक्ति मिळेल असें " तेऽपि यान्ति परां गतिम् " या वाक्यानें भगवद्गीतेंत सांगितलें. भक्तिमार्गामध्यें ब्रह्माची उपासना शक्य नाहीं यासाठीं व्यक्तोपासना सांगितली आहे. परमेश्वराचें विशिष्टस्वरूप घेऊन तेंच परमेश्वरस्थानीं कल्पून त्याची उपासना करणें हाच भक्तिमार्ग होय. यासाठीं दहाव्या अध्यायांत विभूतींचें वर्णन आलेलें आहे. रामकृष्ण इत्यादि कोणत्याहि विभूतींचें परमेश्वरस्वरूपानें सेवन करणें भक्तिमार्गांत उपदेशिलेलें आहे. भक्ताची अशी पूर्ण भावना झाली पाहिजे कीं **रामकृष्ण** इत्यादि उपास्य देवता हीच परमेश्वर असून तीच " प्रभुर्भर्ता गतिः साक्षी निवासः शरणं सुहृत्" आहे अशा रीतीनें सतत रामकृष्णाचें स्मरण करणारे अंतीं मोक्षास जातील असें **भगवद्गीतेंत** उपदेशिलेलें आहे.

ही ईश्वराची कल्पना आणि कित्येक धर्मांतील ' Deity ' ची कल्पना भिन्न आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. उपनिषदांतील ब्रह्मसिद्धांतावरून खालीं उतरून " Personal job " चा सिद्धांत **भगवद्गीतेत** प्रतिपादिला आहे असें वाटत नाहीं. जगताहून भिन्न, जगताचा शासक व चालक असा वैयक्तिक परमेश्वर भगवद्गीतेंत मानलेला दिसत नाहीं. **हिंदुधर्मांतील** मानलेले वैयक्तिक देव ते ब्रह्मस्वरूपीच आहेत असें सनातनधर्मांत मानलें जातें. गणपतीची स्तुति करतांना " त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि " असेंच **अथर्वशीर्षांत** म्हटलें आहे. तथापि कमी बुद्धीच्या लोकांकरता सत्यनारायणांतील देवाप्रमाणें वैयक्तिक ईश्वर मानावाच लागतो. त्याप्रमाणें **भगवद्गीतेंतहि** उपदेशिला आहे. पण या मार्गानें भक्त शेवटीं ब्रह्मभावालाच पोंचतांना त्यास परमेश्वराचें खरें स्वरूप कळतें. अशा रीतीनें **भगवद्गीतेंत** भक्तिमार्गाचा आणि **ज्ञानमार्गाचा** समन्वय केलेला आहे. " ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् " असें शेवटीं अठराव्या अध्यायांत सांगितलें आहे. भक्तिमार्गाचें शेवटीं ब्रह्मज्ञान होतें असें येथें उपदेशिलें आहे.

असो, भक्तिमार्ग सिद्धीस जाण्यास **भगवद्गीतेनें** कोणकोणचे जरूरी उपाय सांगितले आहेत याचें येथें विस्तृत वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं. पण भगवंताच्या ठिकाणीं परा प्रीति याचेंच नांव भक्ति होय, असें भक्तिसूत्रांत सांगितलें आहे व " भजतां प्रीतिपूर्वकं " असें **भगवद्गीतेंतहि** म्हटलें आहे. परम प्रीतीनें भगवंताचें सतत स्मरण करणें ब्रह्माच्या सतत निदिध्यासाप्रमाणें शेवटीं ब्रह्मानुभवास पोहोंचवील असें **भगवद्गीतेंतहि** सांगणें आहे. असा भगवद्भक्त स्थितप्रज्ञाप्रमाणें " दुःखेष्वनुद्विग्नमनाः " " सुखेषु विगतस्पृहः " आणि " सर्वभूतहितेरतः " असा होतो. हा मार्ग बुद्धिवान् तर्कशक्तियुक्त मनुष्यास सांगितलेला नाहीं, आणि स्त्री, शूद्र, वैश्य, अज्ञ ब्राह्मण–क्षत्रिय यांसच सांगितला आहे, याचें इंगित असें दिसतें कीं बुद्धिवान, तर्कशक्तियुक्त मनुष्यास वैयक्तिक ईश्वराविषयीं तसें प्रेम असणें शक्यच नाहीं, जसें स्त्री वैश्य शूद्रादिकास होऊं शकेल आणि अनन्यभावाशिवाय भक्तिमार्गांत सिद्धि प्राप्त होणें शक्य नाहीं; अर्थात् ज्या मनुष्यास असें शक्य आहे त्यास भक्तिमार्गांतहि पडतां येईल. असो, वैदिककाळांत **भगवद्गीतेपर्यंत** तत्त्वज्ञानाची प्रगति कशी झाली याचा इतिहास मला जसा समजला तसा येथें सांगितला आहे. **उपनिषदें** व **भगवद्गीता** समजण्यास सोपीं असलीं तरी इतकीं वादग्रस्त आहेत कीं तीं आपणास खरोखर योग्य समजलीं कीं नाहीं याशीं शंका वाटते. किंबहुना **अर्जुनास** सुद्धां सांगितलेलें तत्त्वज्ञान समजलें कीं नाहीं याची **भगवंतास** शंका आली. आणि शाळेंत मास्तर जसा Do You understand असा शिष्यास जोरानें प्रश्न छडी हालवीत करतो तसा ' कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ' असा प्रश्न भगवंतांनीं **गीतेंत** केला आहे. इति शम्.

———



लष्कर ग्वाल्हेर येथें झालेले चरका व टकळीवर सूत काढण्याचे सामने.

[फोटोआर्टिस्ट–आर. एल्. देसाई, लष्कर ग्वाल्हेर.



श्रीक्षेत्र काशी येथील पितापुत्र पंडित लक्ष्मणशास्त्री व राजेश्वरशास्त्री द्रवीड, यांनीं सनातन वर्णाश्रम स्वराज्य संघातर्फे नुकताच महाराष्ट्रभर दौरा काढला होता. या प्रचार-कार्याच्या निमित्तानें उभयतां पंडितांचा मुक्काम पुणें येथें असतांना घेतलेला फोटो.

कै० अनंत वामन बरवे यांनीं केलेले

सुलभ व्यायाम

आणि उत्तम बोलतां व गातां येण्यासाठीं

स्वरसाधन.

किं. ८६. मॅनेजर–चित्रशाळा प्रेस पुणें.

पोटदुखीवर प्रतिज्ञेचें औषध–दिवसा ४ वाजण्याचे सुमारास नियमित वेळेस परिणामशूळाच्या प्राणांतिक अवस्था होणें; याशिवाय दुसरा कोणताही शूल, पोट फुगणें, वांती, मलावरोध व थोडेसें खाण्यानें बरें वाटणें, अशा प्रकारचा नवा, जुना शूल खात्रीनें बरा होतो. शेंकडों औषधें घेऊन निराश झालेले रोगी बरे झाले आहेत. किं. रु. ३ ट. ख. नि. वैद्य–यशे धन्वंतरी फार्मसी दळवीबाग, पुणें.

दातांचें अपूर्व औषध.

" वज्रदंती गुटिका " पायोरियासुद्धां सर्व दंतविकार बरे होऊन दांत घट्ट होतात. दीप्यपदकें मिळालीं व डॉ मॅन यांनीं वाखाणलेलें. ३२ गो. १ रु.ट. खं. नि. वि. शं सावळे. सावंतवाडी, पो. माणगांव.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



वेळगांव आयुर्वेदोत्तेजक मंडळ.

खुर्ची उ. कडून डा. कडे—(१) डॉ. बा. म. बाके (२) वैद्यरत्न रा. म. जोशी. (३) वे. शा. सं. उपाध्येशास्त्री. (४) कॅ. जी श्रीनिवास मूर्ती. (६) विद्वान् के. शेषशास्त्री. (७) डॉ. ह. त्र्यं. सावनूर.



श्रीसच्चिदानंद स्वरूप शिवानंद महाराज बंकापूर, यांची षष्टीसंवत्सर शांतीसमारंभांत रौप्यतुला करण्यांत आली. हे कर्नाटकांतील ब्रह्मनिष्ठ असून वेदांत विषयाचा त्यांचा अभ्यास दांडगा आहे.



बाल सत्याग्रही नेने. (वाई)

या बाल सत्याग्रहीस तीन वर्षे रेफमेंटरींत ठेवण्याची शिक्षा झाली होती, पण अपीलांत ती कमी होऊन चार म. साधी शिक्षा झाली.

पंडित वीरभद्र शर्मा, वेदतीर्थ.

हे निजाम हैद्राबादकडील असून सध्यां काशीस राहतात. यांनीं नुकतीच 'वेदतीर्थ' ही अत्युच्च परीक्षा दिली. हे कवी व ग्रंथकार आहेत. ही पदवी संपादन करणारे हेच पहिले आंध्रदेशीय गृहस्थ आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सौ० कमलादेवी चट्टोपाध्याय.
यांना ६ म. साधी व १५० रु. दंड व दंड न दिल्यास तीन म. साधी.
व ४७ सॉल्ट ॲक्टाखालीं २० रु. दंड व दंड न दिल्यास १५ दिवस साधी.

कुमारी दलशेड सय्यद्.
संपादिका कॉंग्रेस बुलेटिन, तीन महिने साधी मुंबई.

'स्वातंत्र्यलक्ष्मी' सौ० मालतीबाई थत्ते. हिंगणघाट सी. पी.
जंगल सत्याग्रहाबद्दल ५० रु. दंड.

मिसेस असफअली (बॅ० असफअली यांच्या पत्नी.)
एक वर्ष साधी.

सपटलोशन

पैशापरी पैसा जाऊन

हालअपेष्टा कां सोसतां ?

गजकर्ण, पांढरें कोड, चिखली, वगैरे या रोगांवर अनेक उपाय करून विनाकारण पैसे खर्च करण्यापेक्षां आमचें " सपट लोशन " वापरा. हें औषध सुवासिक असून प्रवाही आहे. पण कपड्यास डाग पडत नाहीं. बाटली किंमत ६ आणे.

सपट आणि कंपनी मुंबई नं. २

व. ब. नि.

स्फूर्तीसाठीं गोष्टी.

स्फूर्ति मासिकासाठीं स्फूर्तिदायक, मनोरंजक व चटकदार अशा ऐतिहासिक राजकीय, शास्त्रीय वगैरे विविध विषयांवरील छोट्यामोठ्या गोष्टी व कादंबऱ्या हव्या आहेत. महाराष्ट्रीय लेखकांनीं स्फूर्तीच्या धोरणाच्या गोष्टी लिहून पाठवाव्यात अशी विनंति आहे.

मॅनेजर स्फूर्ति.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विचारशक्ति ही राष्ट्राच्या उत्कर्षाची गुरुकिल्ली आहे.

जगाची प्रगति पाहिली म्हणजे आश्चर्य वाटतें. पण हा सर्व विचार करण्याचा—मननाचा परिणाम आहे. विचारशक्ती हा देशाच्या उन्नतीचा पाया आहे. आपण जर विचार करूं लागलों तर आपल्या अधोगतीचीं कारणें आपल्याला सांपडतील आणि आपण योग्य मार्गानें गेल्याशिवाय रहाणार नाहीं. आपण हिंदुस्थान कां गमाविलें ? या प्रश्नाचें उत्तर खालील लेखांत सांपडेल.

" Thought is the most revolutionary thing on earth."
—Pandit, Jawaharlal Nehru.

दिवसदिवस आपलें आयुष्य गुंतागुंतीचें होत आहे, ही गोष्ट नाकबूल करून चालणार नाहीं. आयुष्य खरोखरीच कां गुंतागुंतीचें व धडपडीचें होत आहे ? कां पूर्वीपेक्षां आपल्याला कोणत्याहि गोष्टीचा निर्णय तडकाफडकीं करावा लागत आहे ! जगांत सुधारणा होत जाऊन जग एकसारखें पुढें पुढें चाललें आहे. आणि आपण मात्र मागें मागें चाललों आहों. आपली एकसारखी अधोगति होत आहे आणि असेंच जर आपण अविचारपूर्वक व विवेक सोडून वागूं लागलों, तर आपली स्थिति किती भयंकर होईल त्याची कल्पना करणेंही अशक्य आहे. आपल्यावर परकीयांचे राज्य सुरू झाल्यापासून आपल्या वैभवाला, आपल्या सामर्थ्याला आणि आपल्या विचारशक्तीला एकसारखी ओहोटीच लागत चालली आहे. ह्या ओहोटीची जरी इतके दिवस नुसती जाणीव झाली असती तरीहि पुष्कळ कार्य झालें असतें. **चिपळूणकर, टिळक, दादाभाई नौरोजी** इत्यादि महात्म्यांनीं **हिंदुस्थानच्या** अवनतीची ओळख पटवून दिली. यांत दादाभाईनीं व्यापार, राजकारण यांमध्यें चांगला विचार केला होता. परंतु नुसत्या जाणिवेनें कार्य होत नसल्यामुळें देशाच्या परिस्थितींत म्हणण्यासारखा बदल झाला नाहीं. अलीकडे **महात्मा गांधींनीं** आपल्या कर्तृत्वानें जनतेच्या विचारांत क्रांति केली आहे. लोकांचीं मतें बदलणें निराळें आणि लोकांचीं मनें फिरणें निराळें. लोकांची विचारशक्ति काम करूं लागल्याखेरीज लोकांचीं मनें फिरत नाहींत. **महात्मा गांधींचें** हें कार्य **हिंदुस्थानच्या** इतिहासांत अपूर्व आहे. हिंदी जनता व्यापक दृष्टीनें विचार करूं लागल्याशिवाय तिला आपलें अंतिम कल्याण कशांत आहे, याचा बोध व्हावयाचा नाहीं. पुढाऱ्यांनीं चार उपदेशाचे शब्द सांगितले आणि एकादें कार्य करण्यास अनुज्ञा दिली, तथापि जोंपर्यंत विचार करण्याची बुद्धि जागृत झाली नाहीं तोंपर्यंत वरील गोष्टी करून सुद्धां उपयोग होणार नाहीं. **हिंदुस्थानांत** सार्वत्रिक विचारशक्ति उत्पन्न झाल्याशिवाय देशाची उन्नति होणें दुरापास्त आहे.

आपली राजकीय स्थिति व दळणवळणाचीं साधनें बदलल्यामुळें मनुष्याची दृष्टि अजिबाद बदलून गेली आहे, आणि **हिंदुस्थानची** स्थिति कठीण होऊन बसली आहे. आपण पूर्वीपेक्षां अधिक प्रवास करूं लागलों, अधिक निरीक्षण करूं लागलों, पुष्कळ लोकांच्या सहवासांत येऊं लागलों व पुष्कळ गोष्टी करूं लागलों. पण या सर्वांपासून फायदा काय झाला ? या उलाढालींत आपण अधिक उपयुक्त मनन करूं लागलों कीं नाहीं ? हा प्रश्न प्रामुख्यानें डोळ्यांपुढें येतो. कारण मनन करणें हें अत्यंत कठीण काम आहे, आणि म्हणूनच त्या कामांत फारच थोडे लोक गुंतलेले असतात. लोकांना विचार कसा करावा हें शिकविल्याशिवाय आणि त्यांना स्वतः विचार करावयास लावल्याशिवाय देशाची उन्नति होणें शक्य नाहीं.

कल्पना काय ? एक पेलाभर भांग घेतल्यावर कल्पनाच कल्पना ! आपण शुद्धींत असतांना सुद्धां आपल्या मनांत हजारों कल्पना येतात, पण ह्या कल्पना कितपत व्यवहार्य आहेत, कितपत उपयुक्त आहेत याचा विचार करावयाला नको काय ? **हिंदुस्थानानें इंग्लंडशीं** सशस्त्र युद्ध करावें अशी कल्पना मनांत आली तरी ती कितपत युक्त आहे, शक्य आहे याचा सारासार बुद्धीनें विचार करावयास नको काय ? मनांत एकादी कल्पना आली म्हणजे विचार सुरूं झाला असें नाहीं. एकाद्या गोष्टीबद्दल विशेष आश्चर्य, विस्मय, खेद किंवा चिंता इत्यादि विकार उत्पन्न झाले, तरी त्यामुळें मनुष्य विचारी बनला असें होत नाहीं. आठवणींतून जाऊं नये म्हणून एखाद्या गोष्टीची पुनः पुनः उजळणी करणें म्हणजे विचार नव्हे. आपणां प्रत्येकाजवळ थोडी फार बुद्धि आहे, आणि बुद्धि आहे म्हणून ग्रहणशक्तिही आहे. **महात्मा गांधींनीं** खादीचें तत्त्व आपल्यापुढें मांडलें आणि ज्याला विचार करण्याची शक्ति आहे त्यालाच तें पटलें. तत्त्वाच्या मुळाशीं खोलवर जाण्याची ज्याला विचारशक्ति नाहीं, त्याला तें अप्रयोजकच वाटणार यांत संशय नाहीं. नुसती बुद्धि आणि पुस्तकी विद्या असली म्हणजे विचारशक्ति असते असें नाहीं.

विचार करणें म्हणजे मनांत चाललेल्या कल्पनांचें पृथक्करण करून त्यांपासून काय साध्य करतां येईल तें पहाणें. बुद्धीच्या सहाय्यानें एकाद्या गोष्टीची रूपरेषा चटकन् ग्रहण करतां येते; विचाराची क्रिया सुरूं झाली म्हणजे मनांतल्या मनांत तिचें पृथक्करण होतें, कोणत्या मूलतत्त्वांची ती बनली आहे याचा शोध सुरू होतो, आणि तिची सर्वांगीण पहाणी होते. **हिंदुस्थानांत** चाललें आहे तें ठीक आहे, तसेंच चालूं द्या असें म्हणण्याचे आतां दिवस संपले. यापुढें नवें मन्वंतर सुरु करण्याची वेळ आली आहे. आजपर्यंत विचाराची क्रिया झालेली नाहीं असें म्हणणं भाग आहे. आजपर्यंत जर विचार करण्याची क्रिया चालू असती तर आपण थोडें तरी पुढें सरकल्यावांचून राहिलों नसतों. विचारशक्तिही नाहीं आणि विचार करण्याची क्रियाही नाहीं मग देश अधःपाताला लागल्यास नवल काय ?

जो विचार करतो त्यालाच जीविताचें रहस्य काय आहे याचा उलगडा होतो. एखाद्या गोष्टीचीं पाळेंमुळें शोधून तिच्यांतील आदि तत्त्वांचें संशोधन करणें म्हणजेच विचार करणें होय. विचार करण्याची बुद्धि असल्याशिवाय मनुष्याचें जीवित यशस्वी होऊं शकणार नाहीं. निर्जीव–निर्बुद्ध मनुष्य विचार करीत नाहीं, जिवंत माणूस विचार केल्याशिवाय एक पळही दवडीत नाहीं. त्याच्या डोक्यांत एकसारखें विचारचक्र फिरत असतें. शक्याशक्यतेचा आणि इष्टानिष्टतेचा विचार केल्याशिवाय कोणतीहि गोष्ट साध्य होत नाहीं.

अनुभव हीच आपली सामुग्री आणि अनुभव हाच आपला मार्गदर्शक. सत्याजवळ पोंचण्याचा हाच राजमार्ग. सुधारणायुगाला सुरवात झाली तेव्हांपासून सत्यासाठीं लोक धडपडत आहेत. ही धडपड निरुपयोगी ठरणार नाहीं हें निश्चित. आधिभौतिक शास्त्रें, यंत्रें, मोटारी, विमानें, बिनतारी तारायंत्र, वीज या साधनांचा आपण किती व कसा उपयोग करून घ्यावा याचा विचार अगत्यानें करणें ही गोष्ट आज महत्त्वाची आहे. आधुनिक काळांत आपल्याला दररोज आणि दरघडीं नवे नवे अनुभव येत आहेत. अनुभवांचें क्षेत्र विस्तृत झालें आहे. हें सर्व खरें असलें तरी आपल्यासारख्या विचार न करणाऱ्यांना त्याचा काय उपयोग होणार ? ह्या अनुभवांचा जर आपल्याला फायदा घेतां आला तर आपण निदान मागें तरी पडणार नाहीं.

नुसत्या पोकळ व दिखाऊ सुधारणांनीं राष्ट्राची उन्नति होत नसते. **हिंदुस्थानांत** असल्या आत्मघातकी सुधारणा बोकाळल्यामुळें देशाची अवनति होत आहे. आपण हिंदी लोक योग्य दिशेनें चाललों नाहीं हें स्पष्ट आहे. नवीन आयुष्यक्रमाविषयीं नुसती नापसंती व्यक्त करून भागणार नाहीं. त्याचें तत्त्वज्ञान समजून घेतलें पाहिजे आणि त्याचा त्याग कां करावयाचा याची उपपत्ति लाविली पाहिजे. जगाकडे जर आपण व्यापक दृष्टीनें पाहूं लागलों तर आपले डोळे फिरून जातील इतकें जग बदलत चाललें आहे. जग नवीन युगांत पाऊल टाकीत आहे. जुन्याचे अवशेष नष्ट होत चालले आहेत. नव्या विचारपद्धतीनें आणि नव्या कार्यपद्धतीनें जगाची नवीन घटना निर्माण होत आहे. नवीन सृष्टि, नवीन विश्व, किंबहुना नवीन स्वर्ग अस्तित्वांत येत आहे. ही अघटित घटना पाहून आपण नुसतेच आश्चर्यानें स्तंभित होऊन रहाणार काय ? आपणांपुढें **हिमालयासारखें** प्रचंड कार्य आहे. आपणाला नव भारत निर्माण करावयाचा आहे. जगाशीं तुलना करण्याचा उद्देश आपण निरुत्साही व निष्क्रिय बनावें असा नाहीं. तर मोठ्या उत्साहानें आणि धैर्यानें पुढें पाऊल टाकावें असा आहे. तसें केलें तरच आपला तरणोपाय आहे आणि आपल्याला उज्वल भविष्यकाळ आहे.

हिंदुस्थानची अवनति होत आहे याबद्दल आम्हांला मुळींच शंका वाटत नाहीं. याचें कारण आपल्या हातून एका पाठोपाठ हिमालयासारख्या चुका होत आहेत. परंतु त्यापासून धडा घेऊन आपण शहाणपण शिकलें पाहिजे. ह्या चुक्या सुधारून आणि बहकलेल्या मार्गावरून आपण जेव्हां सरळ रस्त्यावर येऊं, तेव्हांच आपली प्रगति होईल. सुधारणेच्या रोखानें आपण एकसारखें पुढें पुढें चाललों आहोंत असें आपल्याला वाटतें. पण तो भ्रम आहे. खरी सुधारणा झाली नाहीं, तरी आपल्या गरजा वाढत आहेत. ह्या गरजा आपल्या कल्याणाच्या आहेत कीं नाहींत हा महत्त्वाचा प्रश्न आपल्यापुढें आहे आणि त्याला जितक्या नेटानें तोंड देतां येईल तितकें तें दिलें पाहिजे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आधुनिक सुधारणावादी लोक जेव्हां एखादें नवीन नीतितत्त्व प्रचलित करतात आणि त्यास समानधर्मीय लोकांचें व श्रुतिस्मृतींचें पाठबळ मिळवितात, तेव्हां पुराणमतवादी व पारंपारिक लोकांना वाटतें कीं जुनें नीतिशास्त्र लयाला गेलें—कायमचें नेस्तनाबूद झालें. पण अशा गोष्टी खरोखर घडल्या तरी त्यापासून मनाला लावून घेण्याचें प्रयोजन नाहीं. बदलत्या जगाचें तत्त्वज्ञान केव्हांहि बदलतच रहाणार. नवीन पिढीसाठीं नव्या स्मृतींची, नव्या नीतिशास्त्राची आवश्यकता नाहीं काय ? नव्या पिढीनें, जरीपुराणवाल्यांचीं मतें अजूनही कवटाळून बसावयाचीं कीं काय ? जुन्या लोकांना तसें वाटत असेल तर नवीन युगांत वावरावयाची त्यांची लायकी नाहीं, हें सिद्ध होतें.

नव्या पिढीचीं नवीन मतें पुढें येऊं लागलीं तरी जगांत नवीन असें कांहीं नाहीं. गुणग्रहण करण्याची क्रिया व एखादी गोष्ट योग्य रीतीनें समजून घेण्याची क्रिया या गोष्टी खरें पाहिलें असतां नवीन आहेत. ह्या गोष्टी अनुभवजन्य असल्यानें त्यांचा मनुष्याच्या शीलाशीं निकट संबंध येतो. अनुभव मिळवून शील संपादन करणें हें आपल्या जीविताचें कार्य आहे. आपला प्रारंभ जरी ल्हान प्रमाणावर असला तरी जीविताच्या शाश्वत तत्त्वांशीं आपण निगडित होत असल्यामुळें आपलें कार्यक्षेत्र उत्तरोत्तर व्यापकच होत आहे. आपल्या व्यक्तित्वाची जाणीव कधींहि नाहींशी होऊं नये. मनुष्याच्या व्यक्तित्वाची जाणीव जर का नष्ट होण्याच्या मार्गाला लागली तर त्या मनुष्याचा जिवंतपणा संपुष्टांत आलाच म्हणून समजावें. विचार करण्याच्या जन्मसिद्ध हक्काला आपण विसरणें म्हणजे आपल्या उत्कर्षाची दृष्टि गमावून बसणें होय.

मनुष्य पुष्कळ चांगला किंवा सज्जन असला तरी जोंपर्यंत तो चांगुलपणा प्रत्यक्ष व्यवहारांत उतरत नाहीं तोंपर्यंत त्याचा कांहीं उपयोग नाहीं. दुसऱ्याच्या हितासाठीं जो सत्कर्म करीत रहातो तो सज्जन मनुष्य होय. मनुष्याचा चांगुलपणा जोंपर्यंत सामाजिक, अध्यात्मिक, धार्मिक, शैक्षणिक इत्यादि बाबतींत प्रत्यक्ष कृतींत येत नाहीं आणि मनुष्याच्या जीवनाशीं निगडित झालेला नाहीं तोंपर्यंत तो चांगुलपणा किंवा तें साधुत्व असून नसून सारखेंच. कोणी ' महाराज ' होऊन मिरवितात, तर कोणी गिरिकंदरांत जाऊन तपश्चर्या करीत बसतात. त्यांच्या स्वतःच्या दृष्टीनें त्यांचें साधुत्व पूर्णतेला सुद्धां पोंचलें असेल, पण समाजाला जर त्याचा उपयोग होऊं शकत नाहीं, तर असलें साधुत्व मिळवून फायदा काय ? जग आज उपयुक्ततावादी बनत चाललें आहे. ज्या गोष्टींचा उपयोग नाहीं त्या गोष्टी नामशेष झालेल्याच बऱ्या, असें कोणीहि म्हणेल.

जड वस्तु आणि आत्मा या गोष्टी भिन्न आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. एकाच वस्तूचीं हीं दोन स्वरूपें आहेत. एकापेक्षां दुसरें वरचढ आहे इतकेंच. चक्राच्या गतीनें दोघांचीं स्वरूपें बदलत आहेत. परंतु अशीं स्थित्यंतरें घडलीं तरी त्यापासून मुळींच तोटा नाहीं. उलट फायदाच होण्याचा संभव अधिक.

दारिद्र्य, अन्याय आणि स्वार्थबुद्धि या गोष्टींची दशा वरीलप्रमाणेंच चक्रगतीनें होत असेल काय ? होत असेल, तर आपण दैववान आहों. जगाचा ' चक्रनेमिक्रम ' सारखा चालू आहे असें आपल्या अनुभवास येतें. परिस्थितीच्या भाराखालीं मनुष्य जेव्हां दडपला जात नाहीं, आणि जेव्हां तो परिस्थितीवर विजय संपादन करतो, तेव्हां त्याचें नैतिक बळ दिसून येतें. प्रचलित नीतिनियमांना अनुसरून नसलें तरी व्यक्ति, समाज आणि मनुष्यजाति यांच्या हिताचें जें असेल त्यानेंच खरी प्रगति होईल.

व्यवहार म्हणजे चांगली गोष्ट उत्तम प्रकारें करण्याची हातोटी. व्यवहार हा आपल्या जीविताला व्यापून उरलेला असल्यामुळें आपली उन्नति किंवा आपली अवनति त्यावर अवलंबून असते. व्यवहार हा एक सृष्टीचा कायदा आहे आणि तो पाळल्याशिवाय आपल्याला गत्यंतर नाहीं. उद्योगधंद्यांत यश मिळविण्याचा व्यवहार हा उत्कृष्ट उपाय आहे. ज्याप्रमाणें उत्तम हत्यारें, चांगली यंत्रसामुग्री वगैरे सर्व सिद्धता असली म्हणजे चांगलें काम निघतें, त्याप्रमाणें **मनन, शील आणि व्यवहार यांवर जीविताचें यशापयश अवलंबून आहे.** आपणांपैकीं फारच थोड्या लोकांना ही गोष्ट समजली आहे. बहुजनसमाज कृत्रिम व खोट्या भपक्यावर भुलून मार्गभ्रष्ट होतो, आणि त्यामुळें त्याचें आयुष्य व द्रव्य यांचा निरर्थक खराबा होतो. ही खराबी होऊं न देण्याची प्रत्येक व्यक्ति जर दक्षता बाळगील तर आत्मोन्नति दूर नाहीं.

आजच्या औद्योगिक युगांत ज्या कांहीं चुकीच्या कल्पना व पद्धति असतील त्यांचा नायनाट केल्यावांचून पुढें पाऊल टाकणें धोक्याचें आहे. लोकोपयोगी कार्याची खरी तळमळ, सद्धेतु आणि उत्कृष्ट पद्धति या गोष्टी व्यवहारांत आल्या पाहिजेत. व्यवहारज्ञ माणूस भावनाप्रधान झाला कीं त्याचा व्यवहार डळमळलाच म्हणून समजावें. म्हणून व्यापार व व्यवहार यांची सांगड घातल्याखेरीज आपल्याला दुसरी गति नाहीं. परमेश्वर व न्यायबुद्धि यांचा पाठिंबा असल्यावर मनुष्याच्या इच्छेला येईल ती गोष्ट साध्य होईलच होईल, यांत संशय नको. राज्य, अधिकार, न्याय आणि नेकी या गोष्टी पाठीशीं असल्यावर जगांतला अन्याय, दारिद्र्य आणि हावरेपणाची वृद्धि या गोष्टी अस्तित्वांत सुद्धां रहाणार नाहींत.

मनुष्य विचार करूं लागला म्हणजे तो खरा जागा होतो. तोंपर्यंत तो अर्धवट झोंपेतच असतो. जागृति आली म्हणजे त्याचा उत्कर्ष होऊं लागतो. जगाची प्रगति पाहिली म्हणजे आश्चर्य वाटतें. पण हा सर्व विचार करण्याचा—मननाचा परिणाम आहे. रशिया आणि चीन या देशांत औद्योगिक लढा सुरू आहे. पण त्याच्या कारणांचा खोल विचार केल्याशिवाय आणि मनन केलेलीं तत्त्वें प्रत्यक्ष व्यवहारांत आणल्याशिवाय तो सुटणार नाहीं. **हिंदुस्थानांत** सुद्धां आजकाल तोच लढा सुरू आहे. आणि **रशिया व चीन** यांचा जो मार्ग तोच **हिंदुस्थानचा मार्ग** होय. हिंदी जनतेनें मनावर घेतल्याशिवाय हें कार्य साध्य होणें शक्य नाहीं.

आपलें हें यांत्रिक युग आहे, असें कित्येकांना वाटतें, पण तें चुकीचें आहे, जगाच्या प्रगतीचीं मूलतत्त्वें न समजल्यामुळें ते लोक असलीं विधानें करितात. आपण यांत्रिक युगांत रहात नसून शक्तियुगांत रहात आहों. ह्या सामर्थ्याचा जर आपण सदुपयोग केला तर त्याचा फायदा **हिंदुस्थानाला** झाल्यावांचून रहाणार नाहीं.

येथें एक नैतिक तत्त्व उपस्थित होतें. शक्तीचा जर आपण योग्य उपयोग करून घेतला तर ठीक, नाहीं तर तीच शक्ति आपला नाश करावयाला कमी करणार नाहीं. आपण जर भलत्या मार्गानें गेलों तर आपण खचित अवनतीला पोहोंचूं. नवें युग सुरू झालें असल्यामुळें मनुष्याला नवी दृष्टि आलेली आहे आणि तो नवीन जगीन जगांत पाऊल टाकण्यासाठीं अहमहमिकेनें धडपडत आहे. आपल्या शिक्षणपद्धतींत आतां क्रांति होण्याची वेळ आली आहे. औद्योगिक व धंदेशिक्षणाच्या शाळा गावोंगांवीं निघाल्याशिवाय **हिंदुस्थानची** उन्नति होणार नाहीं, असें **सर विश्वेश्वर अय्या** यांनीं नुकतेंच आपल्या भाषणांत सांगितलें. पुस्तकी शिक्षण संपून उद्योगधंद्यांचें शिक्षण सुरू झालें म्हणजे **हिंदुस्थानांत** क्रांति घडून येण्यास वेळ लागणार नाहीं.

लोकांना एकदां विचार करण्याची पात्रता आली म्हणजे प्रत्यहि डोळ्यांपुढें येणारे प्रश्न सुटण्यास अवधि लागणार नाहीं. एखाद्या गोष्टींतलि सत्य शोधून काढल्याशिवाय आणि तिचा तर्कशास्त्राच्या दृष्टीनें सांगोपांग विचार केल्याशिवाय त्या गोष्टींतील रहस्य उलगडणार नाहीं आणि हेंच कार्य तर विशेष महत्त्वाचें आहे. ह्या गोष्टीचा उपयोग **हिंदुस्थान**च्या कल्याणासाठीं आणि उत्कर्षासाठीं होणारा असल्यामुळें त्याकडे लक्ष पुरविणें अगत्याचें आहे.

ह्या जगांत असें कांहीं अज्ञेय तत्त्वज्ञान वास करीत आहे, कीं तें दुसऱ्याला शिकवितां येत नाहीं—सांगतां येत नाहीं. ज्याचें त्यानेंच हें ज्ञान मिळविलें पाहिजे. तें ज्ञान अनुभवानें मिळतें व बुद्धीला ग्रहण करतां येतें ग्रहण करण्याची क्रिया सुद्धां सोपी नाहीं. तीं दुसऱ्यांनीं सांगून येत नाहीं. पेरल्याशिवाय उगवत नाहीं हें त्रिकालाबाधित सत्य आहे. तारुण्यांतील आशा-आकांक्षा किंवा ध्येयें हीं तात्काळ फलद्रुप झालीं नाहींत तरी त्यांची पेरणी झालेली असते, हें निश्चित. त्या इच्छा-आकांक्षा स्मरणांतून गेल्यावर सुद्धां फलद्रुप झाल्यावांचून रहाणार नाहींत. आपलें दुर्लक्ष झालें किंवा आपल्या ध्यानांत नसलें तरी पेरलेलें उगवल्याशिवाय रहात नाहीं. मनुष्यानें आपल्या आयुष्यांत व्यवहारज्ञान मिळवत रहावयाचें म्हणजे तें वेळोवेळीं रुजत घालावयाचें. त्याचें फळ पुढें मिळाल्याशिवाय रहात नाहीं.

हल्लींच्या तरुण पिढीची अशी प्रवृत्ति आहे, कीं प्रत्येक गोष्ट आयती गोळी बंद तयार करून मिळावी. शिक्षण जितकें लवकर आणि जितकें अनायासें होईल तेवढें बरें, असें त्यांना वाटत असतें. एका दृष्टीनें ही प्रवृत्ति स्पृहणीय आहे, यांत शंका नाहीं. व्यापारी शिक्षण देतांना ह्या मार्गाचा उपयोग चलच्चित्रपटाचे रूपानें करण्यांत येतो. ज्या गोष्टी शब्दांनीं सांगून समजत नाहींत त्या गोष्टी चित्रांचे योगें सहज आणि थोडक्यावेळांत समजतात. चित्रें हीं मुळचींच बोलकीं असतात. परंतु चित्रें पाहून त्यावर विचार न केला तर त्या पहाण्याचा कांहीं उपयोग नाहीं. आपल्याकडे पुष्कळ चलच्चित्रपट आले आहेत, पण त्यांचा मनोरंजनापलीकडे कांहीं उपयोग आहे काय ? पूर्वींच्या काळीं जी गोष्ट जशी असेल तशीच पहावयास मिळे. आजकाल आपल्याला जशी पाहिजे तशी पहावयास मिळूं शकते.

मात्र ज्ञान असें सुलभ झाल्यामुळें आपली विचारशक्ति मंदावत जाण्याचा संभव आहे. तथापि हीं शिक्षणाचीं नवीं साधनें हळूंहळू प्रचारांत येणार. समाजापेक्षां व्यक्तींची प्रगति केव्हांहि जलद असते. तेव्हां व्यक्तीच्या बाबतींत हीं साधनें उपयोगांत आलीं तरी समाजाच्या बाबतींत उपयोगांत येण्यास बराच कालावधि लागेल. ही गोष्ट इष्ट अशीच आहे.

पुष्कळ लोक विचारतात कीं **हिंदुस्थानांतील** मोठमोठीं शहरें तशींच कायम रहाणार कीं लहान खेड्यांची संख्या अधिक वाढणार ? थोडा विचार केला तर असें वाटतें कीं हल्लीं आहे तीच स्थिति कायम राहील. कारण आपल्याला दोन्हींही हवीं आहेत. त्यांच्यापासून तोटे असले तरी फायदे तेवढेच शिल्लक रहातील. आजच्या लोकांना ज्या गोष्टी आवडत नाहींत किंवा जी परिस्थिति मान्य नाहीं, त्या गोष्टी आणि ती परिस्थिति त्यांच्या हातूनच बदलल्याखेरीज रहाणार नाहीं.

दळणवळणाचीं साधनें वाढलीं असल्यामुळें निरनिराळ्या लोकांचे विचार, कल्पना आणि आकांक्षा यांचेंही दळणवळण—देवाणघेवाण सुरू असतें. आणि एकमेकांमधील दुराग्रह नाहींसे होऊन परस्परांना परस्परांची ओळख पटते आणि एकमेकांमधील प्रेमभाव वृद्धिंगत होण्यास मदत होते.

हिंदुस्थानांत राज्यकर्ते आणि प्रजा यांच्यामधलि द्वैताचा लढा संपून शांततेचा प्रसार कसा होईल या प्रश्नाचें उत्तर वरील विचारसरणींत सांपडण्याजोगें आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राज्यकर्त्यांची स्वामित्वाची आसुरी हांव जोंपर्यंत नष्ट झाली नाहीं, आणि शस्त्रांच्या जोरावर राज्य चालविण्याची त्यांची मग्रूरी कमी झाली नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थानांत सलोख्याचें वातावरण निर्माण होईल अशी मुळींच आशा नाहीं. युद्धाची सर्व साधन-सामग्री हाताशीं असून सुद्धां जें राष्ट्र युद्धाला प्रवृत्त होत नाहीं, त्या राष्ट्रांतच खरी शांति नांदत असते. युद्धाची सामुग्री हाताशीं असतांना तिचा उपयोग केला जाणार नाहीं असेंही निःशंकपणें म्हणतां येत नाहीं. जीं राष्ट्रें विश्वशांतीच्या मोठमोठ्या गप्पा मारतात तीं युद्धातुर राष्ट्रांपेक्षां अधिक सामर्थ्यवान आहेत यांत वाद नाहीं. शांतता प्रस्थापित करण्यास लागणाऱ्या शस्त्रांच्या मानानें त्यांचं शांतिसामर्थ्य मर्यादित आहे.

सुसंस्कृतता हें शिक्षणाचें ध्येय आहे त्याबद्दल वाद नाहीं. पण आर्थिक स्वातंत्र्य हें आजकालच्या शिक्षणाचें ध्येय होणार असें दि : आहे. पण त्यांत कांहीं बिघडत नाहीं. देशकालानुसार असा फरक पडला तरी संस्कृति कांहीं नष्ट होत नाहीं. मनुष्य आपला रिकामपणाचा वेळ ज्या प्रकारें घालवितो त्यावरून त्याची संस्कृति पारखली जाते. रिकामपणाचा वेळ जर निरर्थक गप्पा झोडण्यात गेला तर तो सत्कारणीं लागला नाहीं हें सिद्ध आहेच.

हा वेळ सत्कारणीं किंवा उपयुक्त ठिकाणीं जर लावण्यांत आला तर आत्मोन्नति साधण्याच्या कामीं तो सार्थकीं लागेल. **अमेरिकेंत** प्रत्येक माणसाला मुबलक वेळ मिळतो. कामाचे तास कमी करून मजुराला अधिक रिकामपण मिळेल अशी तजवीज केली जात आहे. बिनकामाचा रिकामपणाचा वेळ फुकट जात नाहीं. त्यापासून कितीतरी फायदे करून घेतां येतील. हा वेळ मनन करणें आणि विचार करणें या सत्कारणीं लावतां येणें शक्य आहे. आजकाल विचारी लोकांची वाण आहे. कामाव्यतिरिक्त खर्च झालेला वेळ म्हणजे वायां गेलेला वेळ अशा कल्पना आतां सोडून दिल्या पाहिजेत. उद्योगधंदा, समाजस्थिति आणि देश यांच्या कल्याणासाठीं ह्या फावल्या वेळाचा कसा उपयोग करता येईल, हें आपण शिकावयास पाहिजे.

शेतकी, हस्तकला आणि वहातुक या तीन गोष्टी म्हणजे जगांतील एकंदर उद्योगधंद्यांचा पाया आहे. जीवनाच्या दृष्टीनें शेतकी हा सर्वांत महत्वाचा व्यवसाय आहे. परंतु त्याकडे जितकें लक्ष द्यावयास पाहिजे तितकें दिलें गेलें नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. अन्नमय प्राण असल्यामुळें अन्नाची जोपासना किती महत्त्वाची व उपयुक्त आहे हें सांगणे नकोच. शेतकरी अहोरात्र शेतांत खपून धान्य पिकवीत असतो. देशाचें जीवन त्याच्यावरच अवलंबून असतें. पण त्याचे कष्ट कमी होतील, त्याला सुखानें चार घांस खातां येतील असे प्रयत्न झाले नसल्यामुळें शेतकरी आजकाल दुःस्थितीला पोंचला आहे. **अमेरिकेंत** किंवा इतर सुधारलेल्या देशांत शेतकीच्या कामीं यंत्रांचा उपयोग करण्यात येतो. आणि तो सुधा मोठ्या प्रमाणावर शेती असेल तरच. आपल्याकडे शेतकीचें काम यंत्रांच्या सहाय्यानें करण्यासारखी परिस्थिति नाहीं. निदान शेतीच्या बाबतींतील इतर गोष्टी तरी आपल्याला त्यांच्यापासून घेतां येतील. शेतकीच्या कामांत सुधारणा झाली आणि त्यांत कमी लोक गुंतवतां आले तर पुष्कळ फायदा होईल. आज शेतकीच्या कामांत गुंतलेले अनवश्यक लोक दुसऱ्या उद्योगधंद्यांत आणि वाहतुकीच्या कामीं गुंतावितां येतील आणि पुष्कळ काम निघूं शकेल. ह्या गोष्टीमुळें मालाच्या किंमती उतरतील आणि एकंदर सुबत्ता होईल, हें सर्व खरें. पण आपल्याला त्यांतलें काय घेण्यासारखें आहे याचा विचार व्हावयास नको काय ?

मनुष्य जर आरोग्यसंपन्न नसेल व व्यसनग्रस्त असेल तर तो विचार करण्यास असमर्थ होय. विचारशक्ति त्यास सोडून गेली असल्यास नवल नाहीं. एकादें व्यसन अंगीं असलें म्हणजे मनुष्य सुखी असतो अशी कित्येक लोकांची कल्पना असते, पण ती साफ चुकीची आहे. **व्यसनी मनुष्याची माणसांत तरी गणना करतां येईल काय याची शंका वाटते.** मनुष्य आधीं व्यसनीच कां बनावा हा प्रश्न आहे. आपल्याकडे पाश्चात्यांच्या संसर्गानें बिड्यासिगारेटचें इतकें व्यसन बोकाळलें आहे कीं तें कमी कसें करता येईल याची देशहितेच्छूंस चिंता पडली आहे. मनुष्य व्यसनमुक्त झाल्याखेरीज त्याच्या अंगीं विचार करण्याची शक्ति येणार नाहीं, आणि त्याची जिवंत माणसांत जमा होणार नाहीं.

आपण विचार कां करतो ? आणि कसा करतो ? हे विचार येतात तरी कोठून ? हे प्रश्न मनोरंजक असले तरी महत्त्वाचे आहेत. आपल्या सभोंवतीं, आपल्या समोर जें जें कांहीं आपल्या नजरेस येतें त्याबद्दल आपोआपच विचार स्फुरतात. विचार कोठून येतात आणि कसे येतात तें आपणास समजत नाहीं. आपली ग्रहणशक्ति जर तीव्र असेल तर विचारांना तेव्हांच गति मिळते. विचार करण्याचे कार्य जितकें महत्त्वाचें आहे तितकेंच तें अवघडहि आहे. जगातील अज्ञात रहस्यें विचारवंतांनाच उलगडलेलीं आहेत हें लक्षांत घेतां विचारशक्ति केवढी मूल्यवान् वस्तु आहे तें कळून येईल. आपलें खाणें, पिणें, जगणें, रहाणें विचारानेंच व्यापून गेलें आहे आणि जगाच्या अंतापर्यंत आपण विचार करीत राहून कालक्रमणा करणार यात तिळमात्र संशय नाहीं.

दुसऱ्याच्या चुकावर टीका करणें फार सोपें असतें पण त्या चुका सुधारण्याचें काम सोपें नाहीं. मागील पिढीची कीर्ति गाऊन किंवा तिच्यावर टीका करून आपण आपल्या व्यवसायांतून सुटत नाहीं. मागल्या पिढीचें कर्तृत्व तिच्याबरोबर गेलें, आपल्याला त्यापासून काय लाभ? कर्तव्य करीत राहून देशासाठीं सर्वस्व वेंचणें हें आपलें आजचें कार्य आहे. पूर्वीच्या काळीं ज्या गोष्टी योग्य आणि व्यवहार्य वाटत होत्या त्या आज वाटत नाहींत याचें कारण बदलता काळ हें आहे. '**साम्राज्यांतर्गत स्वराज्य**' हें **काँग्रेसचें** पूर्वीचें ध्येय होतें. पण आज काळाबरोबर लोकांच्या विचारसरणीची धांव पुढें गेल्यामुळें '**संपूर्ण स्वातंत्र्य**' हें काँग्रेसनें आपलें ध्येय ठरविलें. मर्यादित धोरण ठरविल्याबद्दल **काँग्रेसच्या** जुन्या कार्यकर्त्यांना दोष देणें जसें गैरवाजवी होईल तसेंच आज एवढा पल्ला मारल्याबद्दल आपली पाठ थोपटून घेणें अप्रयोजक होईल. पुढें पुढें जाणें हें प्रत्येक पिढीचें मुख्य कार्य आहे. तसेंच भावी पिढीला योग्य मार्ग दाखविण्याच्या कामीं तिनें मदत केली पाहिजे.

आपल्या पूर्वजांचें आयुष्य मोठें सुखाचें व बिनकष्टाचें असल्यामुळें त्यांना देशाच्या परिस्थितीची जाणीव होण्याचें कांहींच कारण नव्हतें. शिवाय परराष्ट्रांशीं तितकासा संबंध न आल्यामुळें त्यांची दृष्टि विस्तृत झाली नाहीं, हा कांहीं त्यांचा दोष नाहीं. आजकाल आपलें जीवन कष्टाचें आणि खडतर होऊं लागल्यामुळें आपल्या सभोंवतीं अडचणींचे आणि संकटांचे केवढाले खडक आहेत याची आपणांस जाणीव होऊं लागली. आणि ह्या जखडलेल्या स्थितींतून मुक्त झाल्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं अशी आपली खात्री पटूं लागली. आपली परिस्थिति इतकी हलाखीची कां व्हावी, आपल्याला आपल्या पूर्वजांप्रमाणें सुखाचें आयुष्य कां घालवितां येऊं नये याचा आपण विचार करूं लागलों. मनुष्य विचार करूं लागला म्हणजे त्याला आपल्या सभोंवतालच्या अडचणी व खांचखळगे दिसूं लागतात व आपली दुःस्थिती कां झाली तें समजून येतें. हिंदी राष्ट्र परकीयांच्या अमलाखालीं आल्यामुळें हिंदी जनता आणि परकीय लोक यांचा संबंध अधिकाधिक येऊं लागली. ब्रिटिश सरकारची वृत्ति व्यापारी असल्यामुळें **हिंदुस्थानांत** ब्रिटिश मालाचा एकसारखा झरा वाहूं लागला. लोकांना डोळ्यांत भरणारा व नवीन माल दिसूं लागल्यामुळें त्यांना त्या मालाची हळूंहळूं चटक लागली, आणि अशा प्रकारें आपल्या व्यापाराचे पाश **हिंदुस्थानच्या** गळ्याभोंवतीं आवळले गेले. हिंदी जनतेला ही परिस्थिति आकलन करण्याची विचारशक्ती नसल्यामुळें राष्ट्रावर दुर्धर प्रसंग ओढवले आणि हा व्यापार राष्ट्राचा अधःपात करण्यास कारणीभूत झाला. ह्या अधःपाताचा आपण जेव्हां विचार करूं लागलों, तेव्हांच त्याच्या बुडाशीं काय आहे तें आपल्या ध्यानांत आलें. प्रत्येक गोष्टीची उपपत्ति शोधून काढण्यांत जरी पुष्कळसा काळ घालविला, तरी तो काळ वायां गेला असें समजण्याचें कारण नाहीं.

जगांतून जर युद्धाचें निर्मूलन झालें तर जगांतलीं सर्व दुःखें नाहिशीं होतील असें कित्येकांना वाटतें. लढाई नष्ट झाल्याचा कोणास आनंद वाटणार नाहीं? पण जरा विचार केला तर असें आढळून येतेंच कीं लढाईचें मूळ नाहींसें केल्याशिवाय लढाई थांबणार नाहीं. लढाईचें मुख्य कारण पैसा आणि अर्थव्यवहार हें आहे. देशाभिमानामुळें लढाईचा जन्म होत नाहीं. किंवा लढाईंत सुखासुखीं मरावें अशी कोणाचीही प्रामाणिक इच्छा नसते. लढाईच्या मुळाशीं दौलतीचा—वैभवाचा हव्यास असतो. जे लोक नुसते वरवर विचार करणारे असतात त्यांना हीं मूळ कारणें समजत नाहींत.

हिंदुस्थानांत इतकी अजस्र संपत्ति असतांना **हिंदुस्थान** भिकारी कां व्हावा याचें कित्येकांना नवल वाटतें. पण ही खनिज संपत्ति काढून तिचा कसा उपयोग करतां येईल, हें कल्पक लोकांनीं ठरविल्याखेरीज ती असून नसून सारखींच आहे. पृथ्वीच्या पोटांत द्रव्याच्या अगणित खाणी आहेत, पण ज्याला विचार करण्याची दृष्टी नाहीं त्याला त्या खाणी केवळ मातीमोलच होत. **हिंदुस्थानांत** निसर्गदेवतेनें आपल्या वैभवाचें प्रदर्शन मांडून त्याच्यापुढें अगणित ठेवा ठेवलेला आहे. औषधि, नद्या, पाणी, धबधबे, खनिज द्रव्य इत्यादि अनेक गोष्टींची संपन्नता आहे; फक्त कल्पकतेचीच वाण आहे. **म्हैसूर** संस्थाननें खनिज द्रव्यांचें संशोधन करून आपलें संस्थान संपन्न केलें आहे, ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. मनुष्य एकदां विचार करूं लागला म्हणजे त्याला एकादेवेळीं अशी कल्पना सुचते कीं ती कल्पना अखिल मानवजातीस हितावह झाल्यावांचून रहात नाहीं. म्हणून माणसानें विचार करीत रहावें. विचारांची गुंतागुंत सोडवितांना एकादें गूढ चटकन् केव्हां उलगडेल याचा नियम नाहीं.

परदेशी कारखानदार आपलें सर्व भांडवल कारखान्याच्या कामांत खर्च करीत नाहींत. कारखाना चालविण्यासाठीं निम्में भांडवल व संशोधनासाठीं (research) निम्में भांडवल अशी त्यांची विभागणी असते. हें तात्पुरतें अर्धें भांडवल बुडित आहे असें वाटतें, परंतु जेव्हां संशोधन खात्यांतले कल्पक लोक नवीन नवीन कल्पना काढून माल आकर्षक कसा करावा हें नजरेस आणून देतात, तेव्हांच त्यांच्या संशोधनाची किंमत कळते. मालाचा खप वाढूं लागला म्हणजे संशोधनाकडे खर्च झालेलें भांडवल निरर्थक नाहीं अशी खात्री पटते. आणि जो फायदा होतो तो सर्व संशोधकानें विचार केला म्हणून होतो याची जाणीव होते. संशोधनाचा धंद्यावर होणारा परिणाम चिरकाल टिकणारा असतो आणि त्यामुळें धंद्याला निराळें वळण मिळतें. या गोष्टीवरून प्रत्येक महत्त्वाच्या कार्यांत जसें काम करणारें खातें पाहिजे तसें विचार करणारेंही खातें असणें जरूर आहे. बुद्धी आणि शक्ति यांचा मिलाफ झाला पाहिजे.

यंत्रें आलीं म्हणून हस्तकलेचा नाश झाला अशी पुष्कळ ओरड ऐकूं येते. परंतु त्यांत कांहीं तथ्य नाहीं. यंत्रावर माणसाची हुकमत असल्याखेरीज यंत्र काम करूं शकत नाहीं यंत्रामुळें तर कारागिरीला उत्तेजन आलें आणि हे कारागीर यंत्रांकडूनच सुबक काम काढूं लागले. ते जर कारागीर नसते तर यंत्रें काय करणार होतीं ? हिंदुस्थानांतील हस्तकौशल्याचा व कारागिरीचा नाश **हिंदुस्थानांत** यंत्राचें आगमन झालें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणून झाला नाहीं. स्वार्थी **इंग्रजांच्या** जुल्मी कृष्णकृत्यांनीं **हिंदुस्थानांतील** हस्तकलेचा विध्वंस केला. परकीय सत्तेच्या स्वार्थांधतेमुळें देशाचें कलाकौशल्य कसें धुळीला मिळतें, यांचें हें एक उत्तम उदाहरण आहे. **हिंदुस्थानानें** परक्या यंत्रांवर विसंबून न रहातां **जपानप्रमाणें** नवीन यंत्रे बनविण्याचा उद्योग सुरू केल्यास **हिंदुस्थानास** ऊर्जितावस्था येण्यास वेळ लागणार नाहीं. नष्ट झालेल्या कारागिरींचें पुनरुज्जीवनही सहजच होईल.

हल्लींच्या शिक्षणांत उद्योगधंद्यांचा समावेश न झाल्यामुळें तें शिक्षण राष्ट्राला उपकारक होत नाहीं. राष्ट्रीय पण औद्योगिक शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय हिंदुस्थानचा उत्कर्ष होणार नाहीं. चालू शिक्षणानें लोकांना तोंडपाटीलकीची संवय लागते आणि त्यांच्याहातून कांहीं होत नाहीं. वकिली किंवा वडबड करण्याचा धंदा करण्यापेक्षां प्रत्यक्ष अंग मेहनत करणें बरें, असें नव्या पिढीला वाटलें पाहिजे. वकिलीच्या धंद्यावर जगण्याची हीन मनोवृत्ति जोंपर्यंत आपणांत आढळत आहे, तोंपर्यंत प्रत्यक्ष कार्याचें नांवच काढतां कामा नये. वडबड करणें हेंच ज्याचें भांडवल आहे, त्याच्यापासून राष्ट्रानें काय अपेक्षा करावी ? आमचे आजचे पुढारी राष्ट्राला अन्न कसें मिळेल या प्रश्नाचा विचार न करतां इतरच गोष्टी करीत बसले आहेत. “ **आपल्यापुढें सध्यां भाकरीचा प्रश्न आहे** ” हे उद्गार काढून पंडित **जवाहरलाल नेहरु** यांनीं तो प्रश्न देशापुढें मांडला आहे. पण त्याकडे लक्ष देतो कोण ?

चालू शिक्षणांत कर्तृत्वशक्तीचा अभाव दिसून येत असल्यामुळें असल्या शिक्षणाला मूठमाती देणें आवश्यक नाहीं काय? ह्या शिक्षणाला परकी राजसत्ता पूर्णांशानें जबाबदार आहे हें सांगणें नकोच. ह्या शिक्षणामुळें विचारशक्तीचा विकास होत नाहीं, हें स्पष्ट आहे. शिक्षण आणि कर्तृत्व या गोष्टी परस्परसंलग्न नाहींत. ज्याला विचारशक्ती नाहीं, तो सुशिक्षित नव्हे. ज्याला एकाद्या गोष्टीबद्दल पूर्ण विचार करतां येतो तोच ती गोष्ट करूं शकतो. ज्या शिक्षणांत मागील पिढीच्या चुका व अयशस्वी अनुभव ग्रथित झालेले असतात, तें शिक्षण निःसंशय उपयुक्त होय. दिशा चुकलेल्या प्रयत्नवाद्यांची हकीगत पुढील पिढीला उपयोगीं पडणारी असते. शिक्षण मिळालेले लोक नवीन शोध लावतात असें नाहीं. विचार करणारे लोकच नवीन शोध लावीत असतात.

जुन्या इतिहासाचा काथ्याकूट करीत बसण्यापेक्षां आजच्या पिढीला काय पाहिजे आहे याचा विचार करणें शतपट उपयुक्त आहे. जुन्या इतिहासांचा उपयोग काय या प्रश्नाला इतिहाससंशोधक उत्तर देतील. पण त्या उत्तरावरून कांहीं अर्थबोध व्हावयाचा नाहीं. बुद्धिवाद व तात्त्विक वादविवाद वाढविण्यास इतिहास कारणीभूत होत असल्यामुळें आजच्या युगांत जुन्या इतिहासांचीं वाडें हृदयांशीं कवटाळून बसण्यांत मूर्खपणाच पदरीं येईल. ह्या इतिहाससंशोधकांनीं जर आपलें कर्तृत्व आणि आपला उत्साह राष्ट्राच्या आजच्या अडचणींचा परिहार करण्याकडे खर्च केला, तर तो सत्कारणीं तरी लागेल. त्यांनीं पुढील तत्त्व ध्यानांत ठेवावें. ‘ इतिहास लिहिणारापेक्षां जो इतिहास निर्माण करतो, त्यालाच जगांत खरी किंमत असते. ’

आपण कोणती गोष्ट करावयाला लायक आहों याचा जर माणसाला अंदाज काढतां आला तर फारच महत्त्वाचें कार्य झालें असें म्हणतां येईल. आपण पुढील आयुष्य कोणत्या धंद्यांत घालवावयाचें याचा मनुष्यानें आधींच सांगोपांग विचार केला पाहिजे. आपलें जीवितकार्य नक्की करून धंद्याला सुरवात केल्यास यश मिळाल्याखेरीज रहाणार नाहीं. आपलें जीवन यशस्वी कसें करावें याचें रहस्य ह्या निवडींत आहे. निवड चुकल्यामुळें पुष्कळांची दिशाभूल झालेली आहे. आपल्या लायकीचें काम न मिळाल्यामुळें पुष्कळांचें आयुष्य फुकट गेलें आहे. काय करावयाचें हें पूर्ण विचारांतीं नक्की ठरविल्यावर मग निश्चितपणें कार्याला सुरवात केल्यास यश आल्याखेरीज रहावयाचें नाहीं.

आपण योग्य मार्गानें चाललों आहोंत असा पक्का आत्मविश्वास असला म्हणजे मनुष्यानें कार्याला लागावें. मग एकटा असला तरी फिकीर बाळगूं नये. वास्तविक तो एकटा असतो असें नाहीं. त्याच्या पाठीमागे कितीतरी अज्ञात अनुयायी असतात. त्याची कल्पना बाहेर येण्याचीच ते वाट पहात असतात. महात्मा गांधींनीं जेव्हां खादी, सत्याग्रह आणि असहकारिता हीं तीन दिव्य तत्त्वें हिंदी जनतेपुढें मांडलीं, तेव्हां त्यांना प्रारंभीं कोणीहि अनुयायी नव्हता. लोकांना तीं तत्त्वें अप्रयोजकपणाचीं वाटूं लागलीं. परंतु जेव्हां विचार करून लोकांच्या डोक्यांत प्रकाश पडला तेव्हां त्यांना त्या तत्त्वांचें आकलन करतां आलें. **हिंदी चळवळीची दृष्टि औद्योगिक असल्याशिवाय तरणोपाय नाहीं.** ह्या गोष्टीचा जाणीव झाल्यामुळें गांधींचें तत्त्वज्ञान अखिल **हिंदुस्थानाला** पटलें. हा केवढा विजय आहे !

भीति आणि अहंमन्यता या दोन गोष्टी यशस्वी आयुष्याच्या आड येतात. भीति नाहींशी झाली तरी अहंमन्यता नाहींशी होणें कठीण असतें. आत्मविश्वास असावा पण अहंमन्यता नको. आपल्याकडे अहंमन्यतेचें प्रमाण फार वाढल्यामुळें कार्याची हानि झाली आहे. आमचे वाडवडील असे होते, आमच्या वेदांत, आमच्या पुराणांत वाटेल तें आहे, आमच्या संतांनी हेंच सांगितलें आहे अशा प्रकारची पूर्वजांची कीर्ति सांगून त्या भांडवलावर स्वतःची वढाई मारण्यांत दिवस गेल्यामुळें आपल्या हातून प्रत्यक्ष असे कांहींच झालेलें नाहीं. वेदांत विमानें असतील, पण आज आपल्या हातांत आहेत कां, याचा विचार नको कां करावयाला ? ‘ **सांग पूर्वजांची कीर्ति तो एक मूर्ख** ’ हे समर्थांचे उद्गार अनुभवाचे आहेत. पूर्वजांचा अभिमान बाळगावयाचा नाहीं, असें नाहीं; पण त्यांचेंच घोडें पुढें दामटून स्वतः मागें लपणें मात्र मुळींच चांगलें नाहीं. स्वतःविषयीं आत्मविश्वास जर असेल तर अशी कृति करावयाचें कारणच उरणार नाहीं.

मनुष्य प्रत्यक्ष कार्य करूं लागला म्हणजे त्याच्या हातून चुका होणारच आणि चुका ह्या झाल्याच पाहिजेत. कारण चढेल तो पडेल ह्या चुकांमुळें त्याच्या कामांत विघ्न येतें असें नाहीं. उलट त्याचा फायदाच होतो. चुकांमुळें झालेला फायदा जरी प्रत्यक्ष दिसला नाहीं तरी चुकांचा अप्रत्यक्ष असा पुष्कळ फायदा होतो. ज्याच्या कामांत चुका होत नाहींत त्याला उत्कृष्ट काम करतां येत नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. आपल्या कार्यांतले दोष हुडकून काढण्यास आत्मनिरीक्षण–शक्ति पाहिजे. दोषाचें पृथक्करण, टीका आणि चुका या गोष्टी विशेष महत्त्वाच्या आहेत. या गोष्टींचें क्रियेंत रूपांतर झालें कीं यश हें ठेवलेलेंच.

मनुष्यानें कितीहि स्थिर व अचल रहाण्याचा प्रयत्न केला तरी समाज त्यास एकसारखा पुढें खेंचीत असतो. परंपराप्रिय लोक नव्या गोष्टी जुन्या तऱ्हेनें करण्याचा हास्यास्पद प्रयत्न करितात. नव्या युगाशीं समरस झाल्याशिवाय कार्यसिद्धि होणार नाहीं हें त्यांना केव्हां कळणार कोणास ठाऊक !

नुसत्या मूलतत्त्वाचें ज्ञान असून मनुष्य जर चालू परिस्थितीला पारखा असेल तर व्यवहाराच्या दृष्टीनें तो कुचकामाचाच होय यांत शंका नाहीं. व्यवहारचातुर्य अंगीं यावयाला बदलत्या घटनेची चांगली ओळख असावयास पाहिजे. सृष्टीचा विकास होत आहे ही जरी त्याला जाणीव असली तरी त्याच्या मनावर परंपरेची व **रूढीची शतपुटी** बसली असल्यामुळें तो नव्या दृष्टीला व नव्या सृष्टीला पारखा होतो.

केवळ वर्तमान स्थितीचाच विचार करणारा मनुष्य प्रगतीच्या दृष्टीनें मागासलेला असतो. दूरवर विचार करण्याची त्याला दिव्यदृष्टि नसते. यामुळें पुढें काय होईल या बद्दल तो नेहेमीं साशंक असतो. दुसऱ्यांच्या पाठीमागें न जातां जो स्वतंत्रपणें आपला मार्ग कापीत पढें पुढें जातो, त्यालाच दूरवर विचार करण्याची शक्ति असते. कारण त्यावांचून त्याला गत्यंतरच नसतें.

जगातील प्रत्यक्ष परिस्थितीशीं तोंड द्यावयाचें असल्यामुळें आपल्याला पुष्कळ नवीन गोष्टी शिकावयास पाहिजेत. नुसत्या तत्त्वांची माहिती घेऊन कांहीं उपयोग नाहीं. जगाची प्रगति नदीच्या बदलत्या प्रवाहाप्रमाणे आहे. नदीचें पात्र आणि तिचा प्रवाह एकसारखा बदलत असतो. त्या प्रवाहाबरोबर मनुष्यानें चाललें पाहिजे. पूर्वीं ह्या वाळवंटांतून नदी वाहत होती म्हणून आपण आपल्या नावा त्या वाळवंटांतून हांकारावयाच्या नाहींत.

उद्योगधंद्यांत पडलेले लोक हेच समाजाचे खरे पुढारी आहेत. शिक्षक, धर्मगुरु किंवा राजकीय पुढारी यांच्यापेक्षां त्यांचें समाजावर अधिक वजन असतें. समाजाची जी प्रगति होत असते ती घडवून आणण्याचें श्रेय त्यांनाच निःसंशय आहे. ह्या लोकांनीं समाजाचें नेतृत्व हातीं घेऊन समाजापुढें त्याचें भवितव्य उभें केलें पाहिजे. त्यांनीं समाजाला भावी आर्थिक परिस्थितीची जाणीव करून दिली पाहिजे. लोकांना दररोजच्या व्यवहारांत ज्या अडचणी येतात त्यांतून मार्ग कसा काढावा हें औद्योगिक पुढाऱ्यांनीं जनतेला शिकविणें जरूर आहे.

दान आणि **परोपकार** या गोष्टी नाहींशा झाल्याखेरीज दारिद्र्य नाहिसें होणार नाहीं व बेकारी नष्ट होणार नाहीं. परोपकारानें कायमचें दारिद्र्य नाहिसें होत नाहीं, त्याचें तात्पुरतें निवारण होतें. गरीब लोकांच्याकडून काम करून घेतल्याशिवाय त्यांना सुस्थिती व्हावयाची प्राप्त नाहीं. जो माणूस काम करतो तो दारिद्र्यनाशासाठींच झटत असतो यांत संशय नाहीं. परोपकारामुळें बेकारीला मदत झाली आहे. फुकटच्या पैशाला लोक सोकावलेले असतात. दानानें **आळसाला** उत्तेजन मिळतें. म्हणून आपली दानपद्धतीच बंद करणें आहे.

आळशीपणांत जे आपला काळ घालवितात त्यांची विचारशक्ति नष्ट झालेली असते. अविचाराचीं कृत्यें करणारे लोक बहुधा काम न करणारे उडाणटप्पूच असतात. जो मनुष्य सतत उद्योग करण्यात आपलें आयुष्य घालवीत आहे, त्याच्या हातून सहसा अविचाराचें कृत्य व्हावयाचें नाहीं. ज्याचें मन उद्योगांत गढून गेलेलें आहे त्यालाच विचार करण्याची शक्ति असते. हात चालू असला म्हणजे डोक्याला काम करण्याची पात्रता येते. ज्या विचाराचें कृतींत रूपांतर होत नाहीं तो विचार माथेफिरूपणाचाच द्योतक होय यांत संशय नाहीं. ज्याच्या डोक्यांत नुसतें विचारभ्रमण चालू आहे, त्याच्या हातून काय कृति होणार ?

आपल्यासाठीं दुसऱ्यांनीं विचार करून आपले प्रश्न सोडवावे असें आपल्याला पुष्कळ वाटतें. पण तें चुकीचें आहे ज्याचा त्यानेंच विचार करून आपले प्रश्न सोडविले पाहिजेत. प्रत्येक मनुष्य जर ह्याप्रमाणें विचार करूं लागला तर समाजाचें पुष्कळ हित

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाल्यावांचून रहाणार नाहीं. सम विचाराचीं माणसें जर समाजांत निर्माण झालीं तर प्रगति दूर नाहीं. **कृतींचें परावलंबन हें मनुष्याच्या निरुद्योगी-पणाचें निदर्शक आहे. तर विचाराचें परावलंबन हें त्याच्या मानसिक अधोगतीचें द्योतक होय,** यांत शंका नाहीं.

निरनिराळे लोक आपापल्या कल्पना जगापुढें मांडीत असतात. त्यांतल्या आपण कोणत्या घ्यावयाच्या आणि कोणत्या टाकावयाच्या याची जर आपण योग्य निवड केली तर आपलें आयुष्य यशस्वी होण्यास त्याची मदत झालीच पाहिजे. कार्य-क्षेत्र मोठें आहे, पण निवड मर्यादित आहे.

अशी एकसारखी निवडानिवड चालू असते म्हणून प्रगतीचें पाऊल वेगानें पुढें पडत नाहीं. सुधारणा नेहेमीं हलक्या पावलानें व मंदगतीनें होत असते, याचें कारण तेंच.

इतकें सगळें असलें तरी सुधारणा ही होतच असते. समाजाचा विकास एक-सारखा चालू असतो, जगाचें पाऊल पुढें पुढें पडत असतें. लोक विचार करून कांहीं तरी उद्योग करीत असतात, म्हणूनच आपण ह्या स्थितीला येऊन पोचलों आहोंत.

परीक्षेचा कागद.

[कवि—आनंदराव कृष्णाजी टेकाडे, नागपूर.]

स्वातंत्र्य-देवता ही
ठाकली समरिं, समर पाही
देवता ही ॥ ध्रु० ॥
भक्तांत भक्तराज
चढवितो कोण भक्ति-साज
भक्तराज ॥ १ ॥
सत्प्रेम हृदयतेला
वाहितो कोण तत्पदाला
हृदयतेला ॥ २ ॥
अभिषेक शिरावरती
करि कोण तप्त रुधिर-पात्रीं
शिरावरती ॥ ३ ॥
ललाटिं तिलक साचा
लावितो कोण निज सुखाचा
तिलक साचा ॥ ४ ॥
कंठांत कोण विमला
घालितो जीवपुष्पमाला
कोण विमला ॥ ५ ॥
निश्चित कोण पुढती
उजळितो पंच प्राणज्योति
कोण पुढती ॥ ६ ॥
सर्वस्व होम करुनी
नैवेद्य अर्पि कोण हंसुनी
होम करुनी ॥ ७ ॥
परदास्य-शृंखलेला
तोडण्या कोण सज्ज झाला
शृंखलेला ॥ ८ ॥
शत्रूस दंडुनीयां
करि कीर्ति अमर कोण जगिं या
दंडुनीयां ॥ ९ ॥
रक्षील अभयतेनीं
छातिचा कोट कोण करुनी
अभयतेनीं ॥ १० ॥
ही आज परीक्षा ती
बोलवी कोण खरा जगतीं
परीक्षा ती ॥ ११ ॥
स्वातंत्र्य-विजय-हार
घालुनी मिरवि कोण धीर
विजय-हार ॥ १२ ॥
निष्काम कर्मयोगी
कोण ह्या वैभवास भोगी
कर्मयोगी ॥ १३ ॥

— वन्दे मातरम् —

भयंकर मूत्ररोगासंबंधीं अगदीं शेवटचा
आश्चर्यकारक शोध
'गोनोकिलर' रजिस्टर्ड.
प्रमेह, परमा व तमाम मूत्ररोगांवर
चमत्कारिक इलाज.

GONO KILLER

गोनोकिलरः—तमाम मूत्ररोग व धातुसंबंधींच्या रोगांवर शेवटचा एकच रामबाण दवा आहे कीं, रोगी त्यापासून कधींपण निराश होत नाहीं. मोठे मोठे वैद्य व डॉक्टर यांचीं औषधें व इंजेक्शन्स घेऊन कंटाळलेला, व इंग्लिश, जर्मन, फ्रेंच आणि अमेरिकन भयकेदार पेटंट मेडसिनांत (औषधांत) पैसे घालवून निराश होऊन थकून बसलेला असेल तर शेवटचा "गोनोकिलर" एकच बीनजोखमी वनस्पतीचा अचूक रामबाण इलाज आहे.

कितीहि जुनाट अगर नवा प्रमेह असो अगर कितीहि भयंकर स्थितींत तो रोगी असो, लघ्वीद्वारें वाहणारा पूं, धातुस्राव, होणारी आग, लघ्वी थेंब थेंब होणें, लघ्वीमार्गाचे आंतील सूज किंवा झालेली जखम, त्याचप्रमाणें स्त्रियांचा भयंकर प्रदर, घुपणीं व तत्संबंधी इतर दुखावे वगैरे सर्व ह्या औषधानें समूळ नाहींसे होऊन धातुस्थान निर्दोष होतें व ताकद पूर्ववत् येते. ५० गोळ्यांची बाटली किं. ३ रु. व्ही. पी. खर्च नि.

एकटेच तयार करणार—डॉ. डी. एन्. जसाणी, १३७ गुलालवाडी, मुंबई नं. ४.
तारेचा पत्ता—"गोनोकिलर"
पुणें एजन्ट—मोतीलाल आणि कं० बुधवार पेठ पुना.

सचित्र] मुलांचा शिवाजी. [सचित्र

शिवचरित्राची माहिती मुलांना मराठी चवथ्या इयत्तेंत होते. ह्यावेळीं मुलें १० ते ११ वर्षांचीं असतात. म्हणजे शिवचरित्राची माहिती मुलांना जरा उशिराच होते. अगदीं लहानपणींच ह्या चरित्राचें वाचन झालें तर लहान मुलांच्या कोंवळ्या मनावर ह्या चरित्राचा ठसा चांगला उमटेल, ह्या हेतूनें हें शिवचरित्र तयार केलें आहे.

यांत एकंदर निरनिराळ्या रंगाचीं २० चित्रें दिलीं असून किंमत फक्त ८४ आणे ठेविली आहे.

मॅनेजरः—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

काका मला शिकवा.

इंग्रजींतील नर्सरी सॉंगचे धर्तीवर श्री. अनंततनय यांनीं हें पुस्तक अगदीं लहान मुलांमुलींकरितां लिहिलें असून यांतील प्रत्येक कवितेला आम्हीं विविध रंगांनीं युक्त असें सुबक चित्र घातलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हा काव्यमय चित्रबोधच आहे. या तऱ्हेचें मराठींतील हेंच पहिलें पुस्तक असून तें शुभ मुहूर्तावर विद्यालयांत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक लहान मुलामुलींस त्यांच्या पालकांनीं अवश्य घेऊन द्यावें. किंमत ८८ शि. ट. ह.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



आझाद-मैदानापासून निघालेली मिरवणूक [वरं] पोलीसांनीं दोघा स्वयंसेवकांना पकडल्याचा देखावा. स्वयंसेवकांनीं आपल्या हातांतील निशाणें पोलीसांना दिलीं नाहींत.

ता. ५ डिसेंबर रोजीं आझाद मैदानावरील झेंडावंदन, पोलिस, स्वार व लोकांची गर्दी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांत्रिक सहाय्याशिवाय हस्तकौशल्यानें करतां येणारे कांहीं घरगुती धनोत्पादक धंदे.

(लेखक—जी. बा. दसाई, आर्टिस्ट.)

हिंदुस्थानाखेरीज बाकीचीं सर्व राष्ट्रें उद्योगाच्या बाबतींत किती तरी पुढें गेलेलीं आहेत, व आम्ही अगदीं क्षुल्लक वस्तूंसाठीं परक्यांवर कसें अवलंबून आहोंत, ह्याविषयीं चित्रमयजगतच्या औद्योगिक अंकावरून वाचकांच्या मनावर प्रकाश पडण्यासारखा आहे. परकीं राष्ट्रें अगदीं क्षुल्लक दिसणाऱ्या बारिकसारिक वस्तूंपासून मोठमोठे धंदे आपल्या ताब्यांत कसे रहातील व त्यांचें पोषण कसें होईल याचा विचार रात्रंदिवस स्पर्धेनें करतात. आम्ही मात्र याच्या अगदीं उलट ! काय हो ती वस्तु मला कशी करतां येईल ? तीस भांडवल नको कां ? असल्या क्षुल्लक वस्तूंत काय मिळणार ? असा हलका धंदा मी कसा करूं ? लोक मला नांवें ठेवतील; माझे अमके आप्त बडे श्रीमंत आहेत ते मला हांसतील. इतकें शिकलों तो असे हलके धंदे करण्याकरतां कां ? मी नोकरी पहाण्याच्या विचारांत आहे, केव्हां मिळेल तेव्हां नशीब निघेल. अशी आमच्या मनाची ठेवण बनलेली आहे. तिचा अगोदर नायनाट झाला पाहिजे. असे सुशिक्षित तरुण आजला किती तरी बेकार आहेत. नोकरीसाठीं हजारें वेळां ऑफिसरांचे उंबरठे झिजवतील. शेंकडों कारखानें फिरतील व हांजीहांजी करून नशीब न निघाल्यामुळें कित्येक तरुण वेडे बनलेले आहेत. व जन्माचे परावलंबी बनून भूमीस भार झाले आहेत. वरील कारणाशिवाय पारतंत्र्य हें एक मुख्य कारण आहेच, परंतु त्यांतूनही बारिकसारिक घरगुती धंदे करण्यांत आम्ही नेटानें प्रयत्न केल्यास त्यांत धंदा करणाऱ्याचा स्वतःचा फायदा होऊन धंद्याच्या विस्ताराच्या मानानें कांहीं बेकार लोकांचा पोटापाण्याचा प्रश्न सुटेल व राष्ट्राचा दुवा मिळेल.

ज्या मनुष्यास साधारण ड्राइंगचा, नाद,—मातीकाम, साधारण सुतारी काम, कल्पकबुद्धि, आत्मविश्वास, दृढ निश्चय, काम करण्याची हौस आहे, अश मनुष्यास कोणत्याहि धंद्यांत पूर्ण प्रगति करून घेतां येण्यासारखी आहे. मात्र खोटी लाज आळस वगैरे दुर्गुणांना थारा देतां उपयोगी नाहीं. म्हणजे लौकरच त्याची प्रगति होऊन कांहीं लोकांचा पोशिंदा तो खात्रीनें होईल.

आतां करण्यासारखे धंदे कोणकोणते आहेत ते आपण पाहूं.

१ ब्रशः—ब्रश ही वस्तु आम्हांस किती हलकी वाटते, परंतु त्याचा किती तरी उपयोग आहे. आर्टिस्ट लोकांस, पेंटरांस, ड्रॉइंगकरितां, घरें, लांखंडी लांकडी



केंस, टिनची नळी, खांब दांडर

सामान रंगाविण्याकरितां, कपडे झाडण्याकरितां तर प्रत्येक घरीं एक तरी ब्रश असतोच. तसेंच हजामाच्या दुकानांत, मोटमोठ्या कारखान्यांत अनेक कामाकरितां त्याचा उपयोग होतो. म्हणून परदेशाहून १२ लाख रुपयांचा हा माल हिंदुस्थानांत येत असतो. ब्रश हे यंत्रसहाय्यावांचून सहज होण्यासारखे आहेत. ते तयार करण्याची कृतिः—

१ आतां आपण अगदीं साधे ब्रश मऊ केसांचे पाण्यांतील रंग लावण्याचे घेऊं. अर्ध्या आण्यापासून बारा आण्यापर्यंत प्रत्येकाची किंमत असते. जेवढे जाडीला जास्त त्यांस जास्त किंमत पडते. ब्रश कसा असतो तो पुढील बाजूस पहा—केंस त्याच्या पाठीमागें एका बाजूस निमुळती व दुसऱ्या बाजूस रुंद तोंडाची टीनची नळी, व रुंद तोंडाच्या बाजूस हातांत धरण्याकरितां लावलेली लांकडी दांडी. अशी याची रचना आहे. आकृति नंबर १ पहा. आतां हे केंस कशाचे वापरतात व कशाचे वापरावे. खार म्हणून एक प्राणी आहे. त्यांच्या दोन जाती आहेत. १ मांजरासारख्या रंगाची असून पाठीवर काळे पांढरे ठिपके असतात. ती गांवांत, जंगलांत कोठेंही सांपडते. व दुसरी ब्राऊन रंगाची मुंगसापेक्षां मोठी असते ती फक्त जंगलांत असते. अशा प्राण्याच्या शेंपटीचे केंस अगर मुंगसाचे केंस वरीलसारख्या मऊ ब्रशास फारच उत्तम असतात. असले प्राणी वडु लोक खातात. त्यांचेकडे वरील प्राण्यांच्या शेंपट्या वाटेल तेवढ्या मिळतात. असले केंस फक्त नंबर ० पासून नंबर ६ पर्यंत ब्रशास वापरावेत. नंबर ० हा ब्रश बारीक दाभणाच्या टोकायेवढा असतो व नंबर ६ च्या ब्रशाचे केंस साधारण पेन्सिलीएवढ्या जाडीचे असतात. याच्यापुढें आंगठ्याएवढे जाडीचे व त्याच्याहीपेक्षां जाडीचे असतात. त्यास बकरीच्या, बोकडांच्या मांडीच्या आंतील पोटाखालचे केंस वापरावेत अगर गाढवाचेही केंस मोठ्या ब्रशास फारच उत्तम उपयोगीं पडतात. याशिवाय मनुष्याच्या डोकीचे केंसही अशा मोठ्या ब्रशास वापरण्यास हरकत नाहीं, कारण ते हेअर कटिंग सलूनमध्यें मुबलक सांपडतात. मनुष्याच्या डोकीचे केंस वापरण्याची सूचना केली म्हणून वाचक मला दोष देतील. परंतु सुधारलेले पाश्चिमात्य लोक विष्ठेपासून पोटांत घेण्यासारखें कॉडलिव्हर ऑईल व नवसागर तयार करतात असें माझ्या वाचनांत आलेलें आठवतें. त्यापेक्षां माझी सूचना अमंगळ वाटणार नाहीं अशा आशा आहे. असो. आतां ब्रशांचे केंस कसे बांधावेत व ते ठेवण्याची खबरदारी कशी घ्यावी हें पाहूं. वरील कोटल्याही जनावरांच्या कातडीच्या शेंपटीचे केंस कापल्यास ते अस्ताव्यस्त न ठेवतां जसे कापले असतील तसेच जुडीच्या जुडी घेऊन मध्यभागीं साधा दोरा लपेटून बांधून ठेवण्यास हयगय करूं नये. तसें न केल्यास वाऱ्यानें उडण्याचा व केसांचे टोंक केसांचे मुळाकडे होऊन सर्व केसांची नासाडी होईल व नंतर ते जुळवण्यास अत्यंत त्रास पडेल. अशा जुड्या बांधून ठेवल्यानंतर ब्रश करण्याचे तयारीस लागावें एका भांड्यामध्यें पाणी घ्यावें, व जे केंस आप-

जुळवून घेतलेले केस,

बांधलेले केंस,



टिनचा पत्रा.

णास उपयोगास घ्यावयाचे आहेत ती जुडी पाण्यांत भिजवावी. नंतर त्याच्यावरचा लपेटलेला दोरा सोडून टाकावा. नंतर ते केंस पाण्यांत भिजवल्यामुळें एके ठिकाणींच एकमेकास चिकटून रहातील. नंतर ज्या नंबरचे ब्रश आपणास बनवावयाचें आहेत तेवढाली लहान लहान जुडी काढून पुनः पाण्यांत बुडवून एका फळीवर ठेवावी. अशा बऱ्याच जुड्या झाल्यानंतर त्यांपैकीं एकेक घेऊन दोन्ही हातांनीं आंगठा व त्याच्या नजीकच्या बोटाच्या साहाय्यानें जुडींतील केंसाचे टोंक उजव्या हातांत धरावें व मुळाकडील भाग डावीकडे करून डाव्या हातांतील भाग घट्ट धरून उजव्या हातानें



टिनची नळी.



नळींत, बांधलेले केंस कसें घालावेंत.

केसांच्या टोंकाकडील भाग ओढावा म्हणजे या हातांत जुडींपैकीं निम्मा भाग व दुसऱ्या हातांत अर्धा भाग होईल. पुनः उजव्या हातांतील अर्धा केसांचा भाग डाव्या हातांतील अर्ध्या भागावर ठेवावा. असे दोन चार वेळा पुनः पुनः ओढून पुनः पहिल्याप्रमाणें निम्म्या भागावर ठेवावा. असें करण्याचा उद्देश त्या केंसांतील अगदीं आखूड अगर अगदीं लांब केंस निघून जावेत व जुडीला पुढच्या बाजूस टोंक येऊन केंस व्यवस्थित बसावेत. आकृति नं. २ पहा. अशी जुडी तयार होतांच त्या जुडीच्या मुळाकडील भागांस केसांच्या लांबीच्या मानानें सूत दोन सूत मुळाकडे अंतर सोडून रेशमी अगर सुती बारीक दोरा चार पांचदां लपेटून घट्ट बांधावा. नाजूक व बारीक ब्रशास रेशमी दोरा वापरावा. हलक्या ब्रशास सुती दोरा वापरावा. ब्रशांची जुडी बांधून



तयार ब्रश.

तयार झालेली आकृति नं. ३ पहा. अशा जुड्या अनेक अनेक लहान मोठ्या नंबरांच्या बांधून प्रथम तयार करून घ्याव्यात व शेवटीं त्या साधारण डिंक घातलेल्या पाण्यांत बुडवून दोरा बांधलेला भाग डाव्या हातांत धरून उजव्या हातानें त्यांतील जुडीच्या टोंकाकडील भाग ओढून काढून टाकावे म्हणजे साधारण डिंक घातलेल्या पाण्यामुळें जुड्या जरी सुकल्या तरी केंस एकमेकास चिकटून व्यवस्थित रहातील. वरील तऱ्हेनें केसांच्या जुड्या तयार झाल्यानंतर त्या अडकवण्याकरितां टीनच्या नळ्या लागतात. त्या तयार करण्याची कृतिः—अगदीं पातळ असा टिनचा डबा घेऊन आकृति नंबर—४ मध्यें दाखविल्याप्रमाणें एक बाजूला निमुळती व दुसऱ्या बाजूस रुंद अशा पट्ट्या अजमासें इंच सव्वा इंच लांबीच्या कापाव्यात त्या पट्ट्या रुंदीनें ब्रशाच्या जाडीवरून (नंबरवारी) कमी जास्त रुंदीच्या व लांबीच्या असाव्यात अशा निरनिराळ्या साईजच्या पट्ट्या कापून घेतल्यानंतर त्यांच्या गोल नळ्या कराव्यात त्या करण्याची कृतिः—टोंकाकडे निमुळत्या व पाठीमागें जाड अशा गोल मोठ्या, बारीक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आकाराच्या निमुळत्या लोखंडी अगर पोलादी गोल सळ्या लोहाराकडून गोल घडवून आणाव्या. त्या अजमास पांच सहा इंच लांबीच्या असाव्यात व ज्या रुंदीची टिनची पट्टी असेल त्या मानानें सळी घेऊन त्यावर पट्टी ठेवून लहानशा हातोडीनें त्या पट्टीस गोल आकार द्यावा आकृति नं. ५ पहा. याप्रमाणें एका बाजूस लहान भोंक व दुसऱ्या बाजूस मोठ्या भोंकाच्या नळ्या तयार होतील. नंतर त्यांस टिनमेकर कथील व नवसागराच्या साहाय्यानें जसें सांधतो त्याप्रमाणें सर्व नळ्या जोडाच्या ठिकाणी सांधून घ्याव्यात—टिनच्या नळ्याशिवाय, निसर्गाकडून लहान लहान ब्रशास नळ्या आयत्याच मिळण्याची व्यवस्था आहे. मोरांच्या, कबुतरांच्या, घारांच्या, अनेक जातीच्या पक्ष्यांच्या पंखाच्या शेपटांच्या पिसाऱ्या बुडक्याकडील भाग पुढील पंख छाटून टाकून राहिलेल्या नळीचा उपयोग टीनच्या नळ्यांपेक्षां फारच उत्तम होतो. परदेशाहून ब्रश येण्याचे पूर्वी आमचे लोक पक्षाच्या पंखाच्याच नळ्या ब्रशकरतां उपयोग करीत असत. असो. आतां वरील कृतीप्रमाणें नळ्या तयार झाल्यानंतर आकृति नंबर ६ मध्यें दाखविल्याप्रमाणें ज्या जाडीची नळी असेल त्याच जाडीची केसांची बांधून तयार झालेली जुडी घेऊन नळीच्या मोठ्या भोंकाकडून जुडाचें टोंक घालून लहान भोंकाद्वारें ओढावें म्हणजे आकृति नं. ७ प्रमाण ब्रश तयार होईल. आतां त्यास पाठीमागें हातांत धरण्यासाठीं लांकडी दांडी कशी करावी. दांड्या करण्याची कृतिः—

ब्रशाची दांडी.

तीन सूत जाडीच्या देवदारी फळ्या घेऊन तीन सूत रुंदीच्या उभ्या पट्ट्या करवतीनें कापाव्यात. नंतर त्या लहानशा रंधानें गोल रंधून घ्याव्यात. नंतर त्याचे सहा इंच लांबीचे तुकडे पाडावेत. असे तुकडे पाडून घेतल्यानंतर पटाशीनें एका बाजूनें निमुळतें करून गोल छिलून घ्यावे. नंतर पॅलिश कानसनें घासून गोल करावे व शेवटीं अगदीं बारीक पॉलिश पेपरनें साफ घासून त्यांस कापडामध्यें कापूस घालून बोळा करून फ्रेंच पॉलिशमध्यें पॉलिशचा काळा रंग घालून दोन वेळा लावल्यास दांड्या काळ्याभोर शोभिवंत होतात. आकृति नं. ९ पहा. त्यानंतर दांडीच्या मोठ्या भागाकडील भाग ब्रशाच्या रुंद तोंडांत सरसामध्यें बुडवून दाबावा. व टीनच्या नळीला एक खांच असते तशी खांच अंबोरच्या सहाय्यानें अगर त्यासाठींच तशी खांच पाडण्यासाठीं एकादें हत्यार करवून तशा नळीला खांचा पाडाव्यात. म्हणजे नळीपासून दांडी सुटून पडणार नाहीं. कारण नुसत्या सरसानें टिकाव लागत नाहीं. कारण पुष्कळ वेळा ब्रशाचें काम पाण्यांत असतें त्यामुळें सरस पातळ होऊन दांडी सुटते. पक्ष्यांच्या पंखाच्या नळ्या असल्यास लाखेनें दांडी चिकटवावी. वरील कृतीप्रमाणें ब्रश तयार झाल्यानंतर प्रत्येक ब्रश तपासून केंस वगैरे सुटतात काय हें ओढून पाहून ब्रशवर जाडीप्रमाणें नंबर घालून पातळ पुठ्ठ्याच्या पेट्या बनवून त्यांत ग्रोस अर्धा ग्रोस घालून पॅक करावयात व कारखान्याच्या नांवाचें लेबल वर चिकटून बाजारांत व्यापाऱ्याच्याकडे विक्रीस पाठवाव्यात.

२ अ. तेलांतील रंग लावण्याचे ब्रश उंचीपैकीं, हे ब्रश एन्लार्जमेंटकरितां उपयोग करतात. याच्या किंमती अगदीं बारीक ब्रश नंबर ० च्या ब्रशास सहा आण्यापासून नंबर आठपर्यंत दोन रुपयापर्यंत किंमत पडते. हे ब्रश विन्सर अँन्ड न्यूटन कंपनी करून फॉरीनहून येतात. यांस वरील ब्रशास लागणाऱ्या ब्रशांच्या केंसापेक्षां थोडा



ब्रशाच्या नळीस खांच पाडण्यास हत्यार कसें असावें याचा साधारण नमुना.

जाड जातीचा केंस लागतो, तो वांकतां कामा नये अशा जातीतला हवा. असे केंस साधारण ब्राऊन रंगाची खार, कोल्हे, वगैरे जनावरांचे चालतात. कृति मात्र वरील ब्रशाप्रमाणेंच. मात्र काळजीपूर्वक सुबक व टोंकदार करावेत. यांस टीनच्या नळीऐवजीं पितळेच्या पत्र्याच्या नळ्या अगर पक्ष्याच्या पंखाच्या नळ्या वापराव्यात. यांच्या दांड्या वरील ब्रशापेक्षां दुप्पटीनें लांब फूट सव्वा फूट ठेवाव्यात. बारीक ब्रशास देवदारीची दांडी न लावतां बांबूची दांडी लावावी; देवदाराच्या बारीक दांड्या, दांड्या लांब असल्यामुळें लवकर मोडतात असा अनुभव आहे. या ब्रशाच्या दांड्यास काळ्याऐवजीं तांबडा, लाखी वगैरे झोंकदार रंग, पॉलिश, वगैरे लावावें. ब्रशाचे नंबर वगैरे सुबक दिसतील असे उठवावे.

२ ब. एन्लार्जमेंटकरितां तेलांतील रंगास उपयोग करण्याचे ब्रश. हे ब्रश राठ केंसाचे असावे लागतात हे एक सूत जाडीपासून आंगठ्याएवढ्या जाडीपर्यंत लहानमोठे असतात. यांस चार आण्यापासून बारा आणेपावेतों किंमत पडते. त्यांत गोल चपट्या अशा दोन जाती कराव्यात. यांस घोड्यांच्या शेपटीचे आयाळाचे व अशाच जातीचे राठ केंस वापरावेत. या केसांची जुडी नुसती बांधून चालत नाहीं. केंस राठ असल्यामुळें केंस निसटतात, तरी जुडवा लहानमध्यें बांधून पाठीकडील भाग लाख, तांबडा राळ, कढवून त्यामध्यें बुडवून काढावा म्हणजे केंस सुटणार नाहींत. यांचेही दांड्या फूट सव्वा फूट लांब असाव्यात व नं २ अ. प्रमाणेंच ब्रश झोंकदार करावेत. चपटे ब्रश करावयाचे असल्यास टीनची नळी केंसांकडील भाग आंत केंस घातल्यानंतर हातोडीनें नाजूक रीतीनें ठोकून चपटा करावा व पाठीमागील नळीचा मोठ्या भोंकाचा भाग गोलच असूं द्यावा व नळीच्या पाठीमागच्या भागांतून राळ, लाख, वगैरे घालून लांब गोलदांडी लावावी दांडी मोठी असल्यास टीनच्या नळीवर बारीक टांचणी, खिळा दांडींत बसेल अशा बेतानें १।२ ठोकावेत. यांस पक्ष्यांच्या पंखांच्या नळ्या वापरूं नयेत.

३. राठ केसांचे चपटे ब्रश. हे ब्रश अर्ध्या इंच रुंदीपासून चार पांच इंच रुंदीपर्यंत असतात. यांचा खप अतिशय असतो कारण असला ब्रश विशिष्ट जातीच्या कारागिरांस लागतो असें नाहीं. मोठमोठ्या इमारतीचे लांकूडकाम, रंगीत भिंती, साधारण घरांचें लांकूडकाम, लोखंडी सामान, कारखान्यांत व छापखान्यांत असे त्याचे अनेक लोक उपयोग करतात. या ब्रशास घोड्यांचे केंस डुकरांच्या मानेवरील व अशाच



चपटा ब्रश

जातीच्या राठ केसांच्या जनावरांचे उपयोगास घ्यावेत. आकृति नं. १० पहा. पुढें केंस त्याच्या मागें टीनची चपटी पट्टी व त्यामागें लांकडी चपटी दांडी. यांची कृती:—प्रथम आपणास ज्या रुंदीचे ब्रश करावयाचे आहेत त्या रुंदीच्या अडीचपट रुंद टीनच्या पट्टीच्या पट्ट्या कापून घ्याव्यात व त्या पट्ट्या लोखंडी पट्टीवर हातोडीनें ठोकून त्यांस आकृति नं. ११ प्रमाणें आकार द्यावा. तो आकार दांडीकडील पोकळी केंसाकडील पोकळीपेक्षां मोठा असावा हें मात्र लक्षांत ठेवावें; कारण दोन्हीकडील पोकळी सारखीच ठेवल्यास दांडीच्या पोकळीकडून केंस घातल्यास पुढून पडतील म्हणून पुढील पोकळी आकुंचित असल्यास पाठीमागून केंस घालून पुढें ओढल्यास पुढील भागाच्या आकुंचित पोकळीमुळें केंस घट्ट बसतील. हें धोरण पट्ट्या कापून घेतांना लक्ष्यांत ठेवावें. नं. ११ प्रमाणें पट्ट्यांना आकार दिल्यावर पट्टीच्या सांध्याच्या ठिकाणीं कथलाचा डाक द्यावा. नंतर रुंद पोकळीकडून केंस घालून पुढच्या बाजूस



चपट्या ब्रशासाठीं टिनची पट्टी करणें, त्याचा आकार

ओढून घ्यावेत, असे एकदां केंस व्यवस्थित घट्ट बसले म्हणजे ब्रशाचे दांडे तयार करून घ्यावेत. आकृति नं. १२ पहा. याप्रमाणें दांड्यांस आकार द्यावा लागतो. हातानें आकार देण्यास फार वेळ लागतो म्हणून (फ्रेट मशीन) लांकडाची फळी कापण्याचें यंत्र कमीत कमी ४० रुपयांस मुंबईस मिळतें तसलें आणवावें. त्यांत अर्धा इंच जाडीची फळी वाटेल त्या आकारानें कापली जाते व ह्या मशीनवर वाटेल तसली नक्षी कापली जाते. त्याची करवत केसाएवढी बारीक असते. तें शिंप्याच्या मशीनप्रमाणें पायांनीं



चपट्या ब्रशाची लांकडी दांडी.

चालवण्याची व्यवस्था असते. या मशीनचा अनेक कामीं फार उपयोग होतो. मात्र उपयोग करून घेणारा कल्पक मनुष्य पाहिजे. असल्या मशीनच्या सहाय्यानें दांडी कापून पॉलिश वगैरे करून घेतल्यानंतर पट्टीच्या रुंद बाजूनें पट्टींत घालावा. तो पट्टीचा अर्धा भाग केंस रहातील व अर्ध्या भागांत दांडी बसेल असे समांतर असावें. नंतर पट्टी पुनः बाहेर काढून पट्टीच्या पोकळीकडून राळ कढवून थोडा टाकावा. नंतर पुनः पट्टी बसवून केंसाकडील पट्टीच्या भागावर केंसाकडे दोन सूत पट्टीचें अंतर सोडून अगदीं बारीक टांचणी व चुका ठोकाव्यात. ज्या मानानें ब्रश लांब असेल त्या मानानें जास्त चुका ठोकाव्यात. त्या दोन सूत अंतरावर ठोकून ब्रशाच्या दुसऱ्या बाजूस आलेल्या चुकांचीं टोकें वाकवून रिव्हिट करावीत. असें केल्यानें ब्रशाचे केंस घट्ट बसतील. नंतर पुनः दांडी बाहेर काढून दांडीची पट्टींत घालण्याची बाजू राळ अगर लाख यांच्यामध्यें थोडेसे बुडवून पट्टींत घालून ब्रशाच्या रुंदीच्या मानानें पट्टीवरून आंत दांडींत शिरतील अशा चुका ठोकाव्यात व उलट दिशेनें त्या वाकवून रिव्हिट कराव्यात म्हणजे ब्रशाची दांडी मजबूत होईल व ब्रशांच्या टोंकाचे लांब आखूड झालेले केंस पटाशीनें गुण्यांमध्यें नीट तोडून घ्यावेत. म्हणजे ब्रशांचें काम संपूर्ण झालें.

४. कपडे झाडण्याचे ब्रश. यांत बरेच आकाराचे ब्रश असतात. हातांत धरण्याच्या दांडीचे बिन दांडीचे. तसेच हात घासण्याचे ब्रश कपडे साफ करण्याच्या कृतीप्रमाणेंच केलेले असतात पण ते बारीक असतात. तरी अशा ब्रशांना केंस चपट्या ब्रशाच्या प्रमाणेंच राठ लागतात. यांची कृति मात्र वेगळी असते. प्रथम ज्या आकाराचा ब्रश आपणास करावयाचे आहेत त्या आकाराच्या १ सूत जाडीच्या फ्रेंसउडच्या फळ्या अगर तसल्याच जातीच्या पातळ चहाच्या खोक्याचे तक्ते घेऊन फ्रेट मशीनवर आकार कापून घ्यावेत. नंतर त्या फळ्यांस दोन सूत अंतरानें समांतर १ सुत जाडीचीं भोंक पाडावीत. नंतर दोन इंच लांबीची मध्यमागीं दुमडून दुमडलेली बाजू फळीच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भोंकांत बरोबर असेल अशा जाडीचा केसांची जुडी घेऊन दुमडलेली बाजू भोंकांत घालावी. दोन इंच लांबीची केसांची जुडी दुमडल्यामुळें १ इंच लांबी होईल. अशा दुमडलेल्या जुड्या प्रत्येक भोंकांत घालीत असतात. बारीक पितळेच्या विस्तवांत टाकून तापवून घेतलेल्या मऊ तारेनें विणत जावें म्हणजे केंस घट्ट बसतील (एकादां कपडे झाडण्याचा जुना ब्रश खोलून पहा म्हणजे त्याची पूर्ण कल्पना येइल.) तारेनें विणून केंस घट्ट बसल्यानंतर अर्ध्या इंच जाडीची सागवानी फळी खालील फळीच्या आकाराचीच फ्रेट मशीनवर कापून घ्यावी व तीस एक बाजूस निमगोल मारफ्यानें घासून आकार द्यावा व न घासलेली बाजू केंस विणलेल्या बाजूवर ठेवून मजबूत बसेल अशा वेतानें बारीक तारेच्या चुका ठोकाव्यात. चुका मात्र वर येतां कामा नयेत अशा वेताच्या आंखूड व बारीक असाव्यात. चुका केंसाकडील बारीक फळीमधून बारीक लोखंडी गोल दांडीच्या सहाय्यानें ठोकाव्यात. ठोकल्यावर दोन फळींच्या मध्यें अंतर आलें असल्यास लाख वगैरे भरून तें अंतर भरून काढावें. नंतर केंस कात्रीनें समांतर कापून घ्यावेत व वरील लांकूड अगर दांडी वगैरे पॉलिश पेपरनें घासून साफ करून केसांची बाजू सोडून बाकीच्या भागांस पॉलिश रंग वगैरे लावून झोंकदार दिसेल असें करावें म्हणजे काम पुरें होतें. वरील कृतीप्रमाणेंच दांत घासण्याचे ब्रश करावेत.

दाढीस साबण लावण्याचे ब्रश. यांसही राठ केंस लागतात. १॥–२ इंच लांबीचे केंस ब्रशाच्या जाडीएवढे घेऊन केंसांच्या कापलेल्या बाजूंस (मुळाकडे) दोऱ्यानें घट्ट बांधावे दोऱ्याचे ८–१० वेढे घ्यावेत नंतर बांधलेल्या बाजूकडील भाग राळ, लाख, अशासारख्या पदार्थांमध्यें बुडवावा. नंतर एक बाजूस किंचित् निमुळती अशी अजमासें १ इंच लांबीची पितळेच्या अगर टिनच्या पत्र्याची केंसाची वरील जुडी घट्ट बसेल अशा वेताची गोल रिंगणी करून ती सांधून घ्यावी व रुंद तोंडाच्या भागाकडून केसांच्या जुडीच्या टोंकाकडील भाग घालून निमुळत्या भागाकडे जोरानें ओढावा म्हणजे त्या रिंगण्यांत केंस घट्ट बसतील. नंतर काताऱ्याकडून अगर लेथवर शोभिवंत दिसतील असे आकारांचे दांडे कातवून रिंगण्याच्या राहिलेल्या रुंद तोंडाच्या निम्म्या पोकळीमध्यें लाख लावून बसवावेत व रिंगण्यावरून दांडींत बसतील अशा पितळेच्या चार चुका ठोकाव्यात• म्हणजे मूठ मजबूत बसेल. नंतर मुठीस पालिश वगैरे करावें म्हणजे ब्रश तयार झाले. वरील शिवाय गवंडी लोकांस घरें रंगविण्यास, चुनासफेती वगैरे लावण्यास नारळ माडासारख्या झाडांच्या पानांमधील दांडे घेऊन ते साधारण ठेंचून चार दिवस पाण्यांत भिजत टाकावेत. नंतर पाण्यांतून काढून पुनः साधारण ठेंचून आंतील तारासारखे तंतूमधील घाण काढून टाकून साफ करून घ्यावेत व अशा तंतूपासून कल्पनेनें लहान मोठे ब्रश बांधावेत. यांचाही खप बराच असतो. असो. वरीलप्रमाणें ब्रशांच्या धंद्याविषयीं सविस्तर माहिती दिलेली आहे तरी हा धंदा अल्प भांडवलावर ज्याला जेथें अनुकूलता असेल तेथें करतां येण्याजोगा आहे. या धंद्यांत लहान लहान मुलें, बायका सहज काम करूं शकतील. एक दोन वाकबगार माणसें असलीं कीं पुरें. प्रथम त्यांनां बाजारांतून अनेक ब्रशांचे नमुने घेऊन त्याप्रमाणें करण्याचा प्रयत्न करावा. मात्र थोडेसें करून साधत नाहीं. म्हणून निराश होऊं नये. दृढनिश्चय व बळकट चिकाटी पाहिजे. धंदा फारच फायदेशीर होईल.

टीप—ब्रशांना लागणारे केंस केव्हांही कुरळे, वांकडे असतां कामा नयेत. केस सरळ पाहिजेत. जो ब्रश रंगांत घालतांच वांकडा होतो अगर ज्यांचे केंस निसटतात ते ब्रश निरुपयोगी समजावे. तरी हा धंदा करूं इच्छिणारांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी.

पॉलिश पेपर करण्याचा धंदा.

पॉलिश कागद हा कितीएक कारागीर, फर्निचर मेकर, अनेक कारखाने, वगैरेंना उपयोगी आहे. मात्र हे कागद बनविण्याचा हिंदुस्थानांत एकही कारखाना नाहीं. **मेड इन इंग्लंड, मँचेस्टर, लिबर्टी ब्रँड, ओके ब्रँड हरक्युलीस ब्रँड**; अशा मेकरचे पॉलिश पेपर पहाण्यांत येतात. **मेड इन् इंडिया** हें नांव सुद्धां ऐकूं येत नाहीं. हा धंदा अगदीं सोपा आहे परंतु करण्याचीच कोणाची इच्छा नाहीं. सर्व कांहीं आयतें पाहिजे. ते लोक मोठमोठ्या यंत्रसहाय्यानें करीत असतील आपण लहान प्रमाणांत हस्तसाह्यानें करावेंत. पोटापुरती मजुरी खात्रीनें पडून कांहीं थोडे लोक त्यांत खास राबतील व कांहीं कालाच्या अनुभवानें धंद्यास पोषक अशीं देशीं यंत्रें जलद काम होण्यास अनुभवानें काढतां येतील. कारण धंदा कांहीं गुंतागुंतीचा नाहीं. अगदीं साधा आहे.

कागदाच्या तुकड्यावर कांचेच्या चुकणींचें कोटिंग असतें हें सर्वांना माहीत आहेच. १०'' ८'' साईजचा एकेक तुकडा असतो; अशा १ डझन कागदांस आठ आणे किंमत पडते. ते करण्याची कृतिः—

फुटक्या कांचेच्या बाटल्या व अनेक फुटक्या कांचेच्या जिन्नसांचे तुकडे वाटेल तेवढे मिळतात. फुटक्या बाटल्या, कांचेचीं भांडीं घरीं नको म्हणून मनुष्य उकिरड्यावर तावडतोब फेंकून देतो. तरी असे तुकडे महाग पडणार नाहींत. प्रथम कांच कुटून बारीक करण्यास उखळ लागतें तें कसं असावें. जमिनींत दोन फूट खोल गोल खड्डा खणून मध्यंतरीं चांगला सपाट दगड घालावा व कडेनीं दगड चुन्यांत बांधून घेऊन जास्त रुंद नाहीं दोन फुटांपेक्षां खोलीला कमी नाहीं असें दगडी उखळ व वरची बाजू फरशी सिमेंट वगैरेनीं चौफेर साफ असावी, कारण चुकणी कुटून बाहेर काढतांना उखळाच्या कडेला पडली तरी झाडून घेतां यावी. त्यास कुटण्यास आपलेकडे धान्य कुटण्याचीं मुसळें असतात तशीं मुसळें असावी. धान्य कुटण्याच्या मुसळास फक्त एक दीड इंच रुंदीचे पोलादी अगर लोखंडी रिंगणें बसविलेलें असतें. काच कुटण्याच्या मुसळास जाड लोखंडी अगर पोलादी पत्र्याचें आठ दहा इंच लांबीचें टोपण आंत शिसे शेर दोन शेर घालून बसवावें. म्हणजे मुसळ जड होऊन कांच लौकर कुटली जाईल. नंतर कांचेचे तुकडे उखळांत घालून कुटावेत. जमिनीवर बसून कुटूं नये;स्टूल अगर खोक्यासारख्या उंच जागीं बसून कुटावें. कांचेची चुकणी उखळांतील हलवण्यास व बाहेर काढण्यास पळीसारखे जाड लोखंडी चमचे असावेत. हातांनीं चुकणी काढूं नये. तसेंच कुटतांना पायांचीही वाटल्यास कांहीं तरी साधनांनीं काळजी घ्यावी. जास्त भीति वाटत असल्यास चष्म्यासारख्या साह्यानें डोळ्यांचीही काळजी घ्यावी. अशा तऱ्हेनें बरीच कांच कुटून पिठासारखी बारीक झाल्यावर एकाद्या पत्र्याच्या पेटींत सांठवून ठेवावी. नंतर यास लागणारा कागद अगदीं चिवट असा असावा. तो साधारण ब्राऊन पेपरच्या जाडीचा व चिवट पाहिजे. घडी करून अथवा फाडून पाहिल्यास त्याची परीक्षा होईल. जे कागद मोठमोठ्या कागदाच्या गांठीवर, रिमावर येतात ते फार चिवट व मजबूत असतात. तरी अशाच तऱ्हेचा कागद घेऊन आपल्याकडे दाब देण्याचा प्रेस ज्या मानानें मोठा असेल त्या मानानें त्या कागदाचे तुकडे पाडावेत व ते तुकडे उपयोगाचे पूर्वी कांहीं वेळ प्रेसमध्यें दाबून ठेवावेत. नंतर सरस एका मोठ्या भांड्यांत पाणी घालून विस्तवावर कढवण्यास ठेवावा. सरस १ शेर असल्यास त्यांत अर्धा पावशेर सपीट (मैदा) पाण्यांत कालवून सरस चांगला शिजल्यानंतर घालावा. सरस चांगला शिजला किंवा नाहीं हे पाहूनच त्याचा उपयोग करावा. नाहींपेक्षां शिजण्याच्या आधीं सरसाचा उपयोग केल्यास माल चांगला निघणार नाहीं. सरस शिजवण्याच्या पूर्वी पॉलिश पेपरकरतां उपयोग करण्याचे कागद मोठमोठ्या देवदारी बोर्डावर पिना लावून अगर कोपऱ्याला खळ लावून सफाईदार बसलेले असावे. नंतर शिजलेला सरस चपट्या मोठ्या ब्रशानें एकानें सफाईदार लावावा व दुसऱ्यानें ० शून्य नंबरची चाळण घेऊन चाळणींत चमच्यानें पूड भरून सरस लावलेल्या कागदावर चाळत यावें. पेटींतील सर्व पूड संपेपर्यंत शून्य नंबरचेच चाळणीनें चाळावें. असा एकदां सर्व कागदावर लेप बसला म्हणजे प्रथमपासून एकेक कागद बोर्डापासून सोडवून घ्यावा व त्यांच्यावर जी कांचेची अधिक पूड पडलेली असते ती एका दुसऱ्या पेटींत सांठवून ठेवावी. व लगेच ते सोडवलेले कागद पुनः एकावर एक जुळवून प्रेसमध्यें दाबत ठेवून चांगले सुकल्यानंतर काढावेत. नंतर पुनः बोर्डावर पूर्वीप्रमाणें कागद चिकटवून १ नंबरच्या चाळणीनें कांचेची पूड चाळावी. नंतर १॥–२–३–४. नंबरवारी चाळणीनें काम करावें म्हणजे प्रत्येक जातीचे बारीक, जाडे नंबरवारी कागद तयार होतील; नंतर बाजारांतील पॉलिश पेपरच्या साईजप्रमाणे कटिंग मशीन अगर लोखंडी पट्टी ठेवून चाकूनें त्याचे तुकडे करावेत. कारखान्याचें नांव जाड्या अक्षरांच्या रबरी शिक्क्यानें कागदांच्या पाठीमागें उठवावें. म्हणजे पॉलिश पेपर मेड इन, इंडिया असा लोकांना कागदावरचा मजकूर वाचून आनंद होईल.

तसेंच पॉलिश पेपरमध्यें इमरी पेपर म्हणजे लोखंडी सामान व दुसरे धातूंचे पदार्थ पॉलिश करण्याचे उपयोगाचे असतात. त्यांस कागदाऐवजीं कॅनव्हस वापरलेलें असतें व कांचेच्या ऐवजीं दुसरा काळा असा लेप असतो. तरी पहिली तऱ्हा करून जो विजयी होईल त्यास इमरी पॉलिश पेपर त्या अनुभवानें करण्यास जड जाणार नाहींत. मी मात्र इमरी पॉलिश पेपर करण्याचा प्रयत्न अद्याप केलेला नाहीं. म्हणून मला कांहीं माहिती लिहितां येत नाहीं.

खडू तयार करण्याची रीत.

खडू हा शाळेतील मुलांस शिकवितांना फळ्यावर लिहिण्यास, सुतार लोकांस, शिंपी लोकांस कापडावर आंखण्याच्या कामीं उपयोगी पडतो. हिंदुस्थानांत कांहीं ठिकाणीं तयारहि होतो, परंतु परदेशाहून कांहीं माल येत असेलच. बाजारांत व्हायटिंग म्हणून पांढऱ्या रंगाची पूड रुपयास १० शेर (८० भाराचा शेर) या भावानें ठोक घेतल्यास मण अर्धा मण मिळते. तो आणवून पाण्यांत कालवावा व मळलेल्या गव्हाच्या पिठापेक्षां थोडा घट्ट असा करून कुटून घ्यावा व चार शेर व्हायटिंगमध्य पावशेर डिंकाचे पाणी कालवतानाच मिसळाव. अशा रीतीनें लुकण तयार झाल्यावर १ साफ असा पाट व हातांत धरतां येईल अशी चार इंच जाड, पाच इंच रुंद, आठ दहा इंच लांबीची सफाइदार फळी घेऊन वरीलपैकीं समभागानें लुकण घेऊन गोल अशा बाजारांतील खडूच्या कांड्याप्रमाणें पाटावर वरील फळीच्या साह्यानें कांड्या लाटाव्यात व ओलेपणींच कांड्यास कारखान्याचा ठसा उठवून वाळवाव्यात. रंगीत खडू करण्याचा असल्यास व्हायटिंग पाण्यांत कालवते वेळीं ज्या प्रकारचा रंग पाहिजे असेल तो रंग मिसळावा. चपट्या कड्या कांड्या वगैरे तयार करून वाळवाव्यात. व देवदाराचे लहान लहान खोक्यांत भराव्यात. असो. एथपर्यंत सध्यां तीन धंद्यांची अल्पमतीप्रमाणें माहिती दिली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्त्रियांच्या सभेंत सौ. हंसा मेथा भाषण करीत आहेत.



आझाद मैदानावर सभा भरूं न देण्यासाठीं ठेविलेला पोलिसबंदोबस्त.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रोफेसर रामन्.

(लेखक—के. म. सामंत. M. Sc.)

स्वदेशजातस्य नरस्य नूनं गुणाधिकस्यापि भवेदवज्ञा ।
निजांगना यद्यपि रूपराशिस्तथापि लोकः परदारसक्तः ॥

आंतरराष्ट्रीय कीर्तीचीं जीं कांहीं थोडींबहुत माणसें **हिंदुस्थानांत** आहेत, व ज्यांच्यामुळें **हिंदुस्तान** देश सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांपेक्षां कोणच्याहि तऱ्हेनें कमी नाहीं असं मानण्यांत येतें, त्यांत प्रोफेसर **सर चंद्रशेखर व्यंकट रामन्** यांची प्रामुख्यानें गणना होते यांत संशय नाहीं. अशा अत्यंत थोर पुरुषाचें चरित्र मराठी वाचकवर्गापुढें ठेवावें असा माझा विचार आहे. **डॉक्टर रामन** यांचा चरित्रक्रम इतका उज्ज्वल आहे कीं त्यांत प्रत्येक तऱ्हेच्या वाचकाला आल्हाद व अभिमान वाटल्याशिवाय राहाणार नाहीं.

" पदार्थविज्ञानशास्त्रांतील **नोबेल प्राईझ सर चंद्रशेखर व्यंकट रामन्** यांस देण्यांत आलेलें आहे " अशी तार ता. १५ नोव्हेंबरच्या वृत्तपत्रांत वाचल्यावर, ज्या माणसास अभिमान वाटला नसेल असा हिंदी गृहस्थ असणें विरळा ! जगांतील अत्यंत उच्च बौद्धिक कर्तबगारीचें पारितोषिक म्हणजे ' **नोबेल** ' **प्राईझ** होय. पदार्थविज्ञानशास्त्रांतील हें बक्षीस मिळवणारे **डॉक्टर रामन्** हे केवळ पहिले हिंदीच गृहस्थ नसून, पहिलेच एशिॲटिक आहेत ही एकच गोष्ट त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची साक्ष देण्यास पुरेशी आहे. **जपानसारख्या** आधिभौतिक शास्त्रांत पुढें गेलेल्या स्वतंत्र राष्ट्रालाहि हा मान अद्याप मिळालेला नाहीं हें ध्यानांत घेतल्यास, योग्य संधि दिल्यावर हिंदी राष्ट्र सुधारणेचा टेंभा मिरविणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांपेक्षां कमी नाहीं—उलटपक्षीं प्रत्येक क्षेत्रांत अत्युत्कृष्ट माणसें तें निर्माण करूं शकतें—ही गोष्ट सहज पटण्यासारखी आहे. वस्तुतः **डॉ. रामन्** यांस हा मान फार पूर्वींच मिळावयास पाहिजे होता; पण देशाच्या विशिष्ट परिस्थितीमुळें—पारतंत्र्यामुळें विद्वत्तेचें चीज जेवढें व्हावें तेवढें होत नाहीं, आणि म्हणूनच हा विलंब लागला असावा. मानवी बुद्धीला जगाच्या या शिफारसपत्रासाठीं **हिंदुस्थानांत** आणखी पुष्कळ माणसें असतील; पण " जंगलांतील फुलां " प्रमाणें त्यांच्या गुणांचें चीज कधीं होईल तो सुदिन !

प्रो. रामन.

श्रीयुत **रामन्** यांचा जन्म **त्रिचनापल्ली** येथें ७ नोव्हेंबर, १८८८ सालीं झाला. लहानपणापासूनच त्यांची बुद्धि फार तीव्र होती. हायस्कूलमधील अभ्यासक्रम पुरा केल्यावर ते प्रेसिडेन्सी कॉलेज **मद्रास** येथें उच्च शिक्षण घेऊं लागले, व वरील कॉलेजमधून १९०४ सालीं, म्हणजे वयाच्या केवळ सोळाव्या वर्षी बी. ए. च्या परीक्षेस बसून ते पहिले आले ! बी. ए. नंतर दोन वर्षांनीं एम्. ए. च्या परीक्षेला बसून पदार्थविज्ञानशास्त्रामध्यें ते पहिल्या वर्गांत पहिले आले ! या विषयांत एम्. ए. च्या परीक्षेंत येवढे मार्क मिळविलेला मद्रासविद्यापीठाचा हा पहिलाच विद्यार्थी होय ! !

ते केवळ सोळा वर्षांचे असतांना, म्हणजे १९०४ सालीं, **इंग्लंडमध्यें** प्रसिद्ध होणाऱ्या " फिलॉसॉफिकल् मॅगॅझिन " नांवाच्या एका भारदस्त मासिकांतून " On unsymetrical diffraction bands due to rectangular apparture " या विषयावर त्यांचा एक शोध प्रसिद्ध झाला. सोळा वर्षांच्या मुलाचा शोध प्रसिद्ध करण्याचें भाग्य त्या मासिकाच्या इतिहासांत हें पहिलेंच असेल ! !

अशा तऱ्हेच्या त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेची छाप त्यांच्या शिक्षकवर्गावर पडल्याशिवाय राहिली नाहीं. ते एम्. ए. च्या परीक्षेस बसल्यावर (रिझल्ट लागावयाच्या पूर्वींच) प्रोफेसर **जोन्स** यांनीं त्यांच्यावर खूष होऊन पाश्चात्य देशांत शिक्षण घेण्याकरतां त्यांस शिष्यवृत्ति देण्यांत यावी म्हणून सरकारकडे फारच जोरदार शिफारस केल्यावरून त्यांस ती मंजूर करण्यांत आली. पण अशक्त प्रकृतीमुळें वैद्यकीच्या परीक्षेंत नालायक ठरल्यावरून ती रद्द करण्यांत आली. यानंतर विद्यार्थी म्हणून परदेशांत जाण्याचा योग त्यांच्या आयुष्यांत कधींच आला नाहीं !

एम्. ए. चा रिझल्ट अद्याप लागलेला नव्हताच ! मित्रमंडळीच्या व नातेवाईकांच्या आग्रहावरून त्यांनीं फायनान्स परीक्षेला बसावयाची कशीबशी मनाची तयारी केली. " कशीबशी " म्हणण्याचें कारण येवढेंच कीं, त्या परीक्षेस असलेल्या इतिहासासारख्या कांहीं विषयांचा त्यांस पूर्ण वीट होता; तसेंच पोलिटिकल इकॉनमी, संस्कृत वगैरे अपरिचित विषयांचा अगदीं थोड्या म्हणजे सहा सात महिन्यांत त्यांस अभ्यास करावयाचा होता. याप्रमाणें अभ्यासासाठीं ते **कलकत्त्यास** गेले व तिथें गेल्यावर कांहीं दिवसांनीं एम्. ए. च्या परीक्षेंत असामान्य यश संपादन केल्याची तार त्यांस मिळाली ! ! १९०७ सालीं ते फायनान्सच्या परीक्षेस बसून त्यांतहि पहिले आले ! याच वर्षी श्रीयुत ए. एम्. **कृष्णस्वामी आय्यर** यांची कन्या कु० **लोकसुंदरी** यांच्याशीं त्यांचा विवाह घडून आला !

फायनान्स परीक्षेत अशा तऱ्हेनें यश संपादन केल्यावर **कलकत्ता** येथें असिस्टंट अकाउन्टंट जनरलच्या जागीं त्यांची नेमणूक झाली. त्यावेळीं त्यांचें वय केवळ एकोणीस वर्षांचें होतें ! कार्डिनल् वुल्सले यांस पुष्कळदां ' **बॉय् ब्रॅज्वेर्** ' म्हणून म्हणण्यांत येतें; पण श्रीयुत **रामन्** यांस " बॉय्-ऑफिसर " म्हणून संबोधावयास कांहीं अडचण नाहीं !

अशा तऱ्हेनें त्यांच्या तीक्ष्ण बुद्धीला जरी पुरेसें काम मिळालें होतें, तरी शास्त्रीय विषयावर त्यांचें नैसर्गिकच गाढ प्रेम होतें. एके दिवशीं हापिसातून घरीं जात असतांना, " धि इंडिअन् असोसिएशन् फॉर दि कल्टिव्हेशन् ऑफ सायन्स् " (The Indian Association for the Cultivation of Science) अशीं अक्षरें लिहिलेली एक पाटी ट्रॅममधून अर्धवटपणानें त्यांच्या दृष्टीस पडली ! चटदिशीं धांवत्या ट्रॅममधून त्यांनीं उडी मारली, व वाचलेला मजकूर खरा असल्याबद्दल मनाची खात्री झाल्यावर ते तडक आंत गेले. बड्या शास्त्रज्ञांनीं एकत्र जमण्याची इंडिअन् असोसिएशन ही एकच जागा होती. **डॉ. महेंद्रलाल सरकार, सर अशुतोष मुकर्जी** वगैरे मंडळी सभा बरखास्त झाल्यामुळें बाहेर जावयाच्या बेतांत होती. अशा वेळीं हा ल्हानसा ' पोऱ्या ' आंत गेल्यावर त्यास कोणत्या तऱ्हेचा मान मिळाला असेल हें सहज अजमावता येण्याजोगें आहे ! स्वारीनें कसेंबसें सेक्रेटरी **डॉ. सरकार** यांस गांठलें व दुसऱ्या दिवसाची मुलाखत त्यांच्याशीं मुक्रर केली. मुलाखतीनंतर, एवढ्याशा या मुलाची अलौकिक बुद्धिमत्ता पाहून **डॉक्टर सरकार तर** आश्चर्यचकितच झाले ! त्यांनीं आपल्या असोसिएशनकडून जी जी मदत होणें शक्य होतें ती ती देण्याचें त्यांस आश्वासन दिलें; व **रामन्** हे त्या संस्थेचे अल्पावधींतच सभासदहि झाले. नोकरी करून मिळेल तेवढा वेळ, म्हणजे निदान चार पांच तास तरी, ते वरील संस्थेच्या प्रयोगशाळेंत घालवीत असत. त्यांच्या जगद्विख्यात झालेल्या शोधांस कारणीभूत होणाऱ्या वरील संस्थेस **डॉ. रामन्** कधींहि विसरले नाहींत. त्या संस्थेचे ते आज सेक्रेटरी असून, एक उत्साही कार्यकर्तेंहि आहेत. वरील संस्थेवर, तसेंच **कलकत्ता** शहरावर त्याचें किती गाढ प्रेम आहे हें त्यांच्या पुढील उद्गारांवरून अजमावतां येण्याजोगें आहे: " **कलकत्ता** माझें माहेरघर (home) आहे. जगांत मी पुष्कळ फिरलों असेन, व पुष्कळ प्रयोगशाळाहि पाहिल्या असतील; पण **कलकत्ता**शहराप्रमाणें व तेंथील प्रयोगशाळेप्रमाणें माझें मन कुठेंहि धांव घेत नाहीं." ज्या संस्थेवर एवढ्या मोठ्या शास्त्रज्ञाचें असे प्रेम आहे ती संस्था खरोखरीच धन्य होय!!

परंतु आपल्या आवडत्या विषयाचा मनसोक्तपणें अभ्यास करण्याइतके श्री. **रामन** हे नशीबवान् नसावेत. कारण १९०९ च्या सुमारास त्यांची **रंगूनला** बदली झाली. थोड्याच दिवसांत त्यांचे वडीलहि वारल्यामुळें ते सहा महिन्यांच्या रजेवर **मद्रासला** गेले. मनाला विरंगुळा वाटावा म्हणून प्रेसिडेन्सी कॉलेजच्या प्रयोगशाळेंत ते तासचे तास घालवूं लागले. या पांचसहा महिन्यांमध्यें त्यांनीं कांहीं अत्यंत महत्त्वाचे शोध लावले. १९११ च्या नोव्हेंबरमध्यें **कलकत्त्यास** त्यांची अकाउंटंट जनरल ऑफ पोस्ट्स् ॲन्ड टेलिग्रॅफ्सच्या फार बहुमानाच्या जागीं नेमणूक झाली. अशा तऱ्हेनें **कलकत्त्याशीं** तात्पुरता तुटलेला त्यांचा संबंध पुन्हां जडून आला !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्री गोपालकृष्ण.

[चित्रकार-एन्. एस्. जोशी, इचलकरंजी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कलकत्त्यास पहिल्यानें म्हणजे १९०७ सालीं इंडियन इंस्टिस्ट्यूशन फॉर-दि कल्टिव्हेशन ऑफ सायन्सशीं यांचा संबंध आल्यापासूनच सर आशुतोष मुकर्जींसारख्या विद्वद्वर्याचें लक्ष रामन यांजकडेस वेधलें होतें। त्यांचा अत्युत्कृष्ट अभ्यासक्रम, व असामान्य शोधकबुद्धि यांचें चीज ते सरकारी नोकरींत राहिल्यास व्हावें तसें होणार नाहीं, ही गोष्ट सर आशुतोष यांच्या ध्यानांत आल्याशिवाय राहिली नाहीं। पण त्याचबरोबर सरकारी नोकरींत त्यांना मिळत असलेला पैसा दुसरीकडे कुठेंहि मिळणें शक्य नव्हतें। आणि म्हणूनच त्यांना सरकारी नोकरी सोडून आपल्या गुणाचें योग्य चीज करा म्हणून सांगण्याचें धाडस सर आशुतोष यांजकडून घडलें नव्हतें.

पण आपल्या मनांत आलेला विचार रामन् यांजपाशीं बोलून टाकण्याचें धाडस सर साहेबांनीं एकदां करून पाहिलें, व त्याला त्या होतकरू तरुणाकडून अगदीं अनपेक्षित असें उत्तरहि मिळालें।। आशुतोष मुकर्जी यांनीं नुकत्याच म्हणजे १९१५ सालीं कलकत्त्यास स्थापन केलेल्या युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ सायन्समध्यें (University College of Science) सर तारकनाथ पलित प्रोफेसरशिपकरतां अनेक विद्वान् तरुणांना दोन वर्षेपर्यंत नेमून पाहिलें; पण आशुतोष यांस योग्य मनुष्य लाभल्याचें समाधान कधींच मिळालें नाहीं। शेवटीं त्यांनीं अफाट पैसा मिळवणाऱ्या ह्या सरकारी नोकरास विचारून पाहिलें; व श्री. रामन् यांनीं पैशाच्या दृष्टीनें अत्यंत स्वार्थत्याग करूनहि ती जागा मोठ्या आनंदानें पत्करिली ! सरकारी नोकरीच्या पाशांतून मुक्त करावयाला जर सर आशुतोष मुकर्जी याप्रमाणें कारण झाले नसते, तर स्वतां रामन् यांचा, देशाचा व जगाचा आज जो फायदा झाला आहे. व पुढेंहि होणार आहे, तो झाला असता कीं काय हें निश्चितपणानें सांगणें फार कठीण आहे. पण गुणाची योग्य पारख करून योग्य माणसाला योग्य त्या धंद्याला लावल्याबद्दल जो अभिमान व आनंद वाटावयाचा तो अनुभवायला सर आशुतोष आज हयात नाहींत ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे! पण आपल्याला योग्य दिशेला लावल्याबद्दल प्रोफेसर रामन् यांनीं मात्र सर आशुतोष यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत।। ह्या वेळेपासून प्रोफेसर साहेबांचा व कलकत्ता युनिव्हर्सिटीचा जो संबंध आला आहे, तो अद्यापपर्यंत तसाच अव्याहत चालू आहे. नुकत्याच त्यांना मिळालेल्या बहुमानाबद्दल सीनेटची जादा सभा भरून त्यांनीं त्यांचें अभिनंदन केलें व फेब्रुवारीपर्यंत प्रोफेसर साहेबांची भरपगारी रजा मंजूर करून त्यांचा पगारहि आगाऊ देण्यांत आलेला आहे।

प्रो. रामन् यांचे शास्त्रीय शोध येवढ्या बहुविध विषयांत आहेत कीं त्यांची त्रोटक माहितीहि या लहानशा लेखांत देणें कठीण आहे. म्हणून त्यांचा केवळ येथें नामनिर्देश करूनच समाधान मानून घ्यावें लागत आहे।

त्यांच्या शास्त्रीय शोधांचे मुख्यत्वें दोन वर्ग करतां येतील. एक नादशास्त्रांतील (acoustics) व दुसरे प्रकाशशास्त्रांतील त्यांचे पहिले शोध हे नादशास्त्रांतीलच आहेत. या शास्त्रांत ते अगदीं अग्रगण्य मानले जातात. १९२७ सालीं जर्मनींत प्रसिद्ध " Hand buch der Physik " नांवाच्या पदार्थशास्त्रविज्ञानावरील कोशमालिकेला 'नादशास्त्रा'वर माहिती देण्याकरितां त्यांस विनंति करण्यांत आलेली होती त्याचें कारण हेंच होय। वरील कोशांत माहिती देण्याचा हा मानहि हिंदी माणसाला पहिल्यानेंच मिळालेला असेल।। गायनशास्त्रांतील हिंदी आयुधांच्या (Indian Musical Instruments) शास्त्रीय माहितींत त्यांचा अगदीं हातखंडा आहे।

पण याहिपेक्षां जगाला थक्क करून सोडणारे, त्यांचे शोध प्रकाशशास्त्रांतील आहेत! आकाशाच्या निळ्या रंगावरील लॉर्ड रॅले यांचे शोध प्रसिद्धच आहेत. याच विषयांत रामन् यांनीं पहिल्यानें शोध करावयास सुरवात केली. १९२१ सालीं समुद्राच्या निळ्या रंगावरील आपले शोध त्यांनीं प्रसिद्ध केले. रामन् यांच्या मतें, या निळ्या रंगाचें कारण असें आहे, कीं, अणूंवरून परावृत्त झालेल्या प्रकाशांत निळ्या रंगाचें प्राधान्य असतें हें मत आतां सर्वमान्य झालें आहें। ज्यांच्यामुळें त्यांना नोबेल प्राईझ मिळालें ते शोध " रामन् इफेक्ट " (Roman effect) या नांवानें प्रसिद्ध आहेत. एकाद्या पदार्थावर शुद्ध प्रकाशलहरी (monochromatic light) काटकोनांत परावृत्त पाडल्यावर होणाऱ्या प्रकाशांत नवीनच प्रकाशलहरी (radiation) दिसतात— उत्पन्न होतात. ज्या पदार्थावर मूळ शुद्ध प्रकाश पडला असेल त्या पदार्थांचा व त्याच्या स्थितींचा नवीन उत्पन्न होणाऱ्या प्रकाशलहरींशीं अत्यंत निकटचा संबंध आहे, असें अनेक पदार्थांचा अभ्यास केल्यावर प्रोफेसर रामन् यास आढळून आलें. परावृत्त प्रकाशांत नवीन उत्पन्न झालेल्या प्रकाशलहरींस ' रामन लाइन्स ' असं म्हणतात. प्रत्येक पदार्थाला त्याच्या विशिष्ट ' रामन् लाइन्स ' असतात. यामुळें कोणच्याहि पदार्थाचें शुद्धाशुद्ध स्वरूप व स्थिति (state) कळावयास या " रामन लाइन्स " चा फार उपयोग होईल. पण पदार्थविज्ञानशास्त्राच्या दृष्टीनें या शोधांचे उपयोग अतिशय आहेत. प्रकाशाच्या उत्पत्तीची जी नवीन मीमांसा (Quantum theory of light) आहे. त्याला या शोधामुळें फारच पुष्टि मिळालली आहे. " रामन् लान्इस " चें स्पष्टीकरण प्रो० रामन् यांनीं अत्यंत उद्बोधक असेंच दिलें आहे. हा शोध प्रो० रामन यांस २८ फेब्रुवारी १९२८ सालीं लागला व १६ मार्च १९२८ रोजीं त्यांनीं तो बेंगलोर येथें साउथ इन्डिअन सायन्स असोसिएशनपुढें वाचून दाखविला. या शोधांमुळें पदार्थविज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र यांतील कित्येक गूढ प्रश्न सोडवावयास मदत होईल असें मानण्यास बरीचशी जागा आहे. जगांतील सुप्रसिद्ध माणसांनीं या विषयाचा अभ्यास करावयास सुरवात केलेली असून सुमारें पांचशें स्वतंत्र लेख प्रसिद्धहि झाले आहेत।

प्रोफेसर रामन् यांस त्यांच्या श्रमाचें पारितोषिक म्हणून १९१२ सालीं कर्झन रिसर्च प्राईझ (Curzon Research Prize) व १९१३ सालीं वुडबर्न रिसर्च मेडल (Woodburn Research medal) हे बहुमान मिळाले. १९२१ सालीं कलकत्ता युनिव्हर्सिटीची त्यांस ऑनररी डी. एस्. सी. (D. Sc.) मिळाली. त्याचप्रमाणें फ्रायबर्ग युनिव्हर्सिटीची ऑनररी पी. एच्. डी. (Ph. D.) व ग्लासगो युनिव्हर्सिटीची ऑनररी (LL.D.) ह्या पदव्या मिळाल्या. १९२३ सालीं त्यांस एफ्. आर्. एस्. (F. R. S.) करण्यांत आलें. रॉयल सोसायटीची फेलोशिप मिळविणारे हे तिसरे हिंदी गृहस्थ होत. या बहुमानाच्या वेळीं त्यांचें वय केवळ ३६ वर्षांचें होतें. पुढें १९२८ सालीं म्हणजे वयाच्या ४१ व्या वर्षी त्यांस ' सर ' करण्यांत आले. एवढ्या लहान वयांत सर झालेले हे पहिलेच हिंदी गृहस्थ होत असें म्हणतात.

त्याच वर्षी म्हणजे १९२८ सालीं त्यांस इटलीमधील सायन्सच्या सोसायटीनें (Italian Society of Science) मॅटेन्सि मेडल अर्पण केलें व यंदा त्यांस पदार्थविज्ञान नोबेल प्राइझ देण्यांत आलें. आतां त्यांस कोणताहि ऐहिक मान मिळावयाचा राहिला नाहीं!

नोबेल प्राईझः—डॉक्टर ऑल्फ्रेड बी नोबेल नांवाच्या स्विडनमधील एका शास्त्रज्ञानें १८९६ सालापासून निरनिराळ्या विषयांत सुमारें ४० हजार पौंडांचीं पांच बक्षिसें ठेवलीं आहेत (१) पदार्थविज्ञानशास्त्र, (२) रसायनशास्त्र, (३) औषधिशास्त्र, (४) वाङ्मय, व (५) शांतता.

यांवर जगांत ज्यांचे पहिल्या प्रतीचे शोध असतील त्यांस त्या त्या विषयांतील सुमारें ८ हजार पौंडांचें (१ लक्ष रुपये) बक्षीस दरसाल देण्यांत येतें. डॉक्टर रवीन्द्रनाथ टागोर यांस हा बहुमान वाङ्मयाकरितां मिळालेला आहे.

यंदा पदार्थविज्ञान शास्त्रासारख्या विषयांत हें पारितोषिक मिळवून डॉ. रामन् यांनीं ' क्ष ' किरणाचा शोधक रॉन्टजेन (१९०१), रेडिअमचा शोध लावणारे प्रो० व मॅडम क्युरि (१९०३), बिनतारी तारायंत्राचा शोध लावणारे मार्कोनि (१९०९) व ईन्स्टांन (Einstein) (१९२२) यांसारख्या जगद्विख्यात विद्वद्वर्यांच्या मालिकेंत आपली गणना करून घेतली आहे! हा मान मिळविणारे हे पहिलेच आशिया खंडांतील शास्त्रज्ञ असल्यामुळें त्यांचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच होणार आहे!

डॉक्टर रामन यांच्या चरित्रांत ओजस्विता आहे. पदार्थविज्ञानशास्त्रासारख्या अगदीं आधुनिक विषयांतसुद्धां, कोणत्याहि तऱ्हेनें पाश्चात्य देशांत शिक्षण न घेतां, असे अपूर्व शोध हिंदुस्थानांत लावतां येणें शक्य आहे, या एकाच गोष्टीवरून पाश्चात्य देशांतील महाग शिक्षणाचें (व पदव्यांचेंहि) फाजील स्तोम माजविणाऱ्या लोकांस यावरून पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. पूर्णपणें हिंदुस्थानांतच शिक्षण घेऊन आधुनिक शास्त्रांत मान मिळविलेले फारच थोडे हिंदी गृहस्थ आहेत.

सर जगदीशचंद्र बोस व सर प्रफुल्लचंद्र रॉय याप्रमाणें प्रोफेसर रामन् यांचाहि विद्यार्थिवर्ग फार मोठा आहे, डॉ. एन्. के. सानि (बनारस हिंदु युनिव्हर्सिटी), प्रो. फणिंद्रनाथ घोष, प्रो. एस्. के. मित्र, डॉ. एस्. के बानर्जी, डॉ. बी. एन्. बानर्जी, मि. एन्. के. सूर, मि. आर. एन्. घोष, वगैरे डॉक्टर रामन् यांचेच विद्यार्थी होत.

उच्च विचारसरणी व साधी रहाणी जर कुठें पहावयाच्या असतील, तर त्या प्रो. रामनमध्यें सांपडतात. नोबेल प्राईझ मिळाल्यावर वर्तमानपत्रांच्या बातमीदारांस त्यांनीं दिलेला संदेश संस्मरणीय आहे.

" पोष्टाच्या शिक्क्यांप्रमाणें मला आतां डिग्र्या मिळत जातील, पण मी अगदीं साधा रामनूच राहीन " (ॲडव्हान्स–कलकत्ता)

" राष्ट्रसेवा करा; वंदेमातरम्. " (लिबर्टी–कलकत्ता.)

निसर्गानें एकाद्या माणसाला ज्या तऱ्हेनें राष्ट्रसेवा करावयास उत्पन्न केला असेल, त्याच तऱ्हेनें ती करणें ही अत्युत्कृष्ट देशसेवा होय; आणि म्हणून डॉक्टर रामन् यांनीं केलेली देशसेवा व राष्ट्राला आणून दिलेला मान हीं दुसऱ्या एका कोणच्याहि माणसाच्या देशसेवेशीं दुय्यम नाहींत. परमेश्वर त्यांस दीर्घायुरारोग्य देवो, येवढीच त्याच्यापाशीं प्रार्थना आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



उमरावती येथील कौन्सिल निवडणुकीवर पिकेटिंग.

मध्यप्रांत कौन्सिल निवडणुकीवर उमरावती येथें पिकेटिंग करण्यांत आलें. उमरावती शहर म्युनिसिपल कचेरींतील पोलिंग स्टेशनवर देशसेविका पिकेटिंग करीत असून लाठीबाज पोलीस दारावर उभे आहेत असा देखावा वरील फोटोंत दाखविला आहे. देशसेविकांचें नेतृत्व डॉ. मिस जावळे यांनीं स्वीकारलें होतें.



उमरावती येथें दारूच्या लिलावांवर पिकेटिंग करण्यांत आलें होतें. त्याप्रसंगीं शहरांतील व वऱ्हाडांतून बऱ्याच ठिकाणाहून आलेल्या देशसेविकांनीं अत्यंत शिस्तीनें पिकेटिंग केलें. पिकेटिंगमध्यें प्रमुखपणें भाग घेणाऱ्या देशसेविकांचा फोटो वर दिला आहे.

सर्व जातींच्या मूळव्याधींवर— सतत तीस वर्षांच्या अनुभवानें अत्यंत गुणकारी ठरलेलें, तात्कालिक गुण देणारें वस्ताद औषध. यानें रक्ताची, मोडाची, चुंबळीची वगैरे सर्व प्रकारची मूळव्याध त्वरित नाहींशी होऊन मोड गळून पडतात. शौचास साफ होतें व भूक लागते. (डॉक्टर व वैद्य मोठ्या प्रमाणावर वापरू लागले आहेत हींच प्रशंसापत्रें) किं. ३॥ रु. ट. ख. माफ. पत्ता—वैद्य रघुनाथ माधवराव खरे, ३०३ सोमवार पेठ, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'प्रभात, अर्धा आणा प्रभात !'

(लेखकः—राजाराम प्रल्हाद कानिटकर.)

"England holds India in bondage because Indians co-operate with Englishmen and thereby Strengthen British rule. Withdraw that co-operation and the fabric of foreign rule collapses. That follows automatically."

Pandit Jawaharlal Nehru.

"प्रभात अर्धा आणा, प्रभात "—वर्तमानपत्रें विकणारीं पोरें आपल्या खड्या आवाजांत ओरडत होतीं. वर्तमानपत्रें वाचण्याचें व्यसन फैलावल्यामुळें त्यांच्या ओरडण्याचें जसें चीज होत होतें तसें खुसखुशीत बातम्या पुरवणाऱ्या वृत्तपत्रांची चांगलीच चलती होती.

" अरे, तू असा स्वस्थ उभा कां ? हीं वर्तमानपत्रें विकायलाच घेतलींस ना तूं ? " पोऱ्याचें एक नाहीं दोन नाहीं !

" ओरडल्याशिवाय कां वर्तमानपत्रें खपणार आहेत ? "

—तरीही पोऱ्या मुकस्तंभच !

' अरे, ह्या धंद्यांत पडलं म्हणजे सगळी लाजलज्जा गुंडाळून ठेवावी लागते. मी आज इतकीं वर्षं हा धंदा करतों आहे–म्हणूनच-अरर- डोळे पुसायला काय झालें ? तुला काय ओरडायला येत नाहीं ? '

पोऱ्या हातानें डोळे पुशीत होकारार्थी मान हलवतो.

" मग चालूं दे.—आज तुझा पहिलाच दिवस आहे वाटतं ? असं मुकस्तंभ राहून कां कोण तुझीं वर्तमानपत्रें घेणार आहे ? जाऊं दे, तुझ्याशीं बोलायला मला वेळ कुठें आहे ? मला हीं वर्तमानपत्रें तर खपवलीं पाहिजेत ?–हं, ओरड–प्रभात, अर्धा आणा प्रभात—"

तितक्यांत पोऱ्याही मोठा हिय्या करून ओरडला–

" प्रभात–अर्धा आणा प्रभात—"

' प्रभात ' म्हणून ओरडतांना त्या पोऱ्याचें अंतःकरण धडधडत होतें. तो शब्द उच्चारतांना त्याला केवढे प्रयास पडले, त्याच्या हृदयांत काय कालवाकालव झाली हें त्याचें त्याला माहीत. मोठ्या मुष्किलीनें आणि मनाचा मोठा धडा करून पोऱ्यानें तोंडांतल्या तोंडांत ' प्रभात ' शब्द उच्चारल्यावर त्याला थोडा धीर आला आणि तो आजूबाजूच्या वर्तमानपत्रविक्यांकडे पाहूं लागला. पण त्याच्याकडे लक्ष देतो कोण ? त्यांचें खड्या सुरांतलं ओरडणें ऐकून त्याच्या अंगीं जरा धैर्य आलें आणि मन खंबीर करून तो पुन्हां ओरडला–" प्रभात-अर्धा आणा प्रभात "–

एजंटाकडून मोठ्या मिनतवारीनें कांहीं वर्तमानपत्रें घेऊन **श्रीधर उर्फ शिदू गांधी चौकांत** जाऊन उभा राहिला. किती वेळ तरी तो उभा होता. लोक जाताहेत येताहेत पण हा हातांत वर्तमानपत्रांची गुंडाळी घेऊन आशाळभूत नजरेनें जाणाऱ्यायेणाऱ्यांकडे पहात स्वस्थ उभा होता. इतर पोरें ओरडत होतीं पण ओरडायचें कसें हा त्याला प्रश्न पडला ओरडायलाही धैर्य लागतें याची त्याला जाणीव होऊन तो अगदींच धीर खचल्यासारखा झाला. ' ओरडायला कुणाची भीति आहे ? '– त्यानें मनाशीं खूप विचार केला- अखेर त्याच्या अंतःकरणाचा ठाव सुटला व तो गोरामोरा होऊन इकडे तिकडे पाहूं लागला. इतक्यांत त्याच्या सुदैवानें एका पोऱ्याला त्याच्याबद्दल सहानुभूति वाटली आणि त्यानें त्याची गाडी चालू केली.

किती केलें तरी **श्रीधर** एका श्रीमंत अधिकाऱ्याचा मुलगा- मोठ्या खानदानींत वाढलेला-ख्यालीखुशालात बाळपण गेलेलें-आईबापांचें एकुलतें एक लाडावलेलें पोर. लहानपणापासून हूड म्हणावा तर तसा प्रकृतीनें थंड. कुणाचा मुलाहिजा ठेवायचा नाहीं असें नाहीं-अगदीं बाळबोध वळण, पण मोठा करारी आणि अभिमानी- मग प्रत्यक्ष बाप आडवा आला तरी भ्यायचा नाहीं. ' साहेब '–त्याचे वडील–त्याला लहानपणीं पुष्कळ वेळां हंसत हंसत म्हणावयाचे–

" **शिद्या**, टाकूं कां तुला एकदां तुरुंगांत ? "

" टाका पाहूं कसें टाकताय तें ? मी काय तुमचं केलंय ? मला भीति दाखवतां ती ? टाका तुरुंगांत म्हणजे पहा दाखवतो काय तें ! "

" काय लेका, दाखवणार आहेस ? वेतांनीं असा फोडून काढीन कीं यंव !–तूं पाहिलं नाहींस अद्याप, मी वेत्रांना कसं फोडून काढतों तें ? रक्ताचे पाट वहातात पण लेकाचे बेरड हूं कां चूं करीत नाहींत– तुला पहावयाची आहे ती गंमत ? "

" साहेब–लोकांना तुम्ही इतकं मारतां-तुम्हांला कांहीं नाहीं काहो वाटत ? मी हा अस्सा तुमच्याच पुढं आलों तर माराल कां मला ? "

" **शिद्या**, तूं नुसता आलाच तर नाहीं मारणार. पण सत्याग्रही म्हणून आलास तर दाखवीन तुला मौज !—"

" सत्याग्रही म्हणजे काय हो साहेब ? "

' तुला नाहीं इतक्यांत कळायचं तें ! '

इतक्या लहानपणापासून **श्रीधरच्या** कानांवर तुरुंग, कैदी मारहाण, सत्याग्रही इत्यादि शब्द पडूं लागल्यामुळें त्या शब्दांच्या पाठीमागें कल्पना तरी काय आहेत याचा तो सारखा विचार करूं लागे. त्या गोष्टींचा थोडाबहुत उमज पडल्यावर आपले ' साहेब ' माणूस आहेत कां राक्षस आहेत याची त्याला भ्रांत पडे. लहानपणापासून असल्या शब्दांशीं परिचय झाल्यामुळें त्याची मनोवृत्ति खंबीर बनूं लागली आणि वाटेल त्या प्रसंगाला तोंड देण्याची त्याच्या मनाची तयारी होऊं लागली.

नवऱ्याच्या करडेपणामुळें **श्रीधरची** आई संसाराला एक प्रकारें पारखी झाली होती. नवऱ्याच्या अरेरावी सुलतानशाहीपुढें तिचें कांहींच चालत नसल्यामुळें सुखाची आणि तिची कायमचीच फारकत झाली होती. बरेच दिवस अंथरुणाला खिळून अखेर तिनें आपली जीवितयात्रा संपविली आणि तापत्रयांतून मुक्तता करून घेतली. जवळ जवळ लहानपणींच **श्रीधर** आपल्या आईला आंचवला असल्यामुळें त्याला ' साहेबा ' शिवाय दुसरें कोणी ममतेचें माणूस नव्हतें. आणि ते तर पडले जमदग्नि. ह्या सर्व कारणांमुळं श्रीधरचा स्वभाव असा बनला होता. परिस्थितीच्या फेऱ्यांत सांपडल्यानें स्वभावालाही नवीन दिशा लागूं शकते–व ' **स्वभावो दुरतिक्रमः** ' हें नीतिवचन खोटें ठरतें–हें **श्रीधरच्या** उदाहरणावरून सहज ध्यानांत येण्यासारखें आहे.

" **महादू**, आजचा काय हकीगत आहे ? मला कांहीं सविस्तर कळली नाहीं अद्याप. "

" साहेब, तुमास्नी काय सांगायचं, सर्व कांहीं तुम्हांस ठावं आहे. मी आपला बाहेरच पहारा करीत होतों. इतक्यामंदी लोक आले. त्यांनीं तिथं सभा भरवली आणि पुन्हां सूत काढीत बसले. इतक्यांत आम्हांस मोठ्या साहेबांचा हुकूम आला कीं ह्या लोकांना हाकून लावा म्हणून. आम्ही काय हुकमाचे ताबेदार. आम्ही सर्वजण त्या लोकांच्यावर तुटून पडलों. आम्हीं बेदरकारपणें त्यांच्यावर हल्ला चढविला. ते लोक काय बिचारे बकऱ्यासारखे शांत बसले होते. आम्हीं बंदुकीच्या दस्त्यानें लोकांना पिटून काढलें. आम्हांला गोळ्या सोडायचा हुकूम नव्हता. नाहींतर आमच्या हातून केवढी हत्या झाली असती राम जाणें ! अशी देवाला स्मरून सांगतों कीं ही नोकरी हराम आहे. "

" कां ? आपण तर मायबाप सरकारचे नोकर. आपल्याला हें सरकार अन्न तरी देत आहे. हे बदमाष आपल्याला काय देणार ?–"

" तसं नव्हं साब– आपलं असं वाटतं कीं आपल्याच भाईबंधूंना उगीच मारायचं म्हणजे हात उचलत नाहीं. अंगावर शहारें येतात. पण करायचं काय ? हें पोट आहे ना ? आजच पहा, तुमचे ते **शिदुभाऊ** आहेतना, त्यांना सुद्धां आम्हीं मारलं. "

" **शिद्याला** मारलं ? कुणी ? " साहेब अधिकाराच्या ऐटींत उद्गारले.

" साहेब, तुम्हांला आतां काय सांगायचं ? मी आपल्या ह्या हातांनीं बंदूक त्यांच्या डोक्यावर हाणली. करणार काय ? गोऱ्या साहेबाचा हुकूम पडला ! माझा **संभ्या** समोर असता तर त्याला सुद्धां मला मारावं लागलं असतं. "

" पण **शिद्या** कुठें आहे आतां ? घरांतून केव्हां नाहींसा झाला बेरड ? कारट्याच्या डोक्यांत कुणी हें शिरवलं ? कुठें-कुठें गेला लेकाचा पळून ? "

" साहेब, ते पळणार कसचे ? कांग्रेसचे लोक आले आणि त्यांनीं **शिदूभाऊंना** मोटारींत घालून नेलें. मी स्वतः हेरलं. **शिदूभाऊंना** मारल्याबद्दल तुम्ही मला कांहीं करणार नाहीं ना साहेब ? त्यांच्या डोक्यांत हा दस्ता जेव्हां हाणला तेव्हां माझा जीव अगदीं हैराण झाला. आणि जेव्हां रक्ताचा पाट वहायला लागला तेव्हां तर मला चक्करच आली. साब, तुम्ही नाहीं ना माझ्यावर रागावणार ? "

" **महादू**, तुझ्याकडे काय दोष आहे ? तो कारटा बदमाष निघाला त्याला तूं काय करणार ? "–असें म्हणतां म्हणतां साहेबांच्या डोळ्यांपुढें डोक्यांतून रक्ताची धार गळत असलेली **श्रीधरची** मूर्ति दिसूं लागली. त्याला आतांपर्यंत त्यांनीं कितीही कठोरपणें वागविलें असलें तरी त्यांचें पितृहृदय व्याकुल झाल्याशिवाय राहिलें नाहीं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीधरला केव्हां पहातों असें त्यांना होऊन गेलें. ते लगबगीनें उठले आणि शिदू कोठें आहे म्हणून त्यांनीं पुन्हां चौकशी केली. पण स्वयंसेवकांनीं त्याला नेलें यापलीकडे त्यांना कांहीं हकीगत समजली नाहीं. 'साहेबा' ना कांहीं सुचेना. ते इकडे तिकडे फेऱ्या घालूं लागले. घरांत श्रीधराशिवाय दुसरें आपलें कोणी नाहीं हें लक्षांत येऊन त्यांचें अंतःकरण थरारलें.... शिदूचें तिकडे काय झालें असेल-त्याची जखम कोणी बांधली असेल कां ? -कीं स्वतः काँग्रेस हॉस्पिटलमध्यें जावें ? -'त्या बदमाषांच्या हॉस्पिटलमध्यें जायचें ? छे-तें शक्य नाहीं, मुलगा मेला तरी बेहेत्तर-पण तिकडे पाऊल टाकावयाचें नाहीं-' अशा तऱ्हेचे परस्परविरोधी विचार त्यांच्या अंतःकरणांत थैमान घालूं लागले आणि त्यांना स्वस्थ बसूं देईनात. त्यांनीं आपल्या मनावर दडपण घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण व्यर्थ. मुलाचें दर्शन घेण्याची इच्छा तर तीव्र-परंतु मोठ्या शिस्तीनें आत्मसंयमन-किंवा जुलमाचा रामराम-करून त्यांनीं श्रीधरच्या समाचाराला एक पोऱ्या पाठविला आणि त्याच्या परत येण्याची मोठ्या उत्कंठेनें वाट पाहूं लागले.

महादू घरीं गेला खरा. पण त्याचेंही मन स्वस्थ नव्हतें. त्याला आज भाकर गोड लागेना. आपल्या हातून आज काय भयंकर गोष्टी झाल्या याची आठवण होतांच त्याच्या हृदयाला हजारो इंगळ्या डसल्याच्या वेदना होऊं लागल्या. निरपराधी लोकांना मारून त्यावर जगावयाचें ही गोष्ट त्याचें अंतःकरण विद्ध करून टाकीत होती. 'आज इतके दिवस नोकरींत वाढले पण असा प्रसंग आपल्यावर आजच ओढवला. लोकांना गुरासारखं झोडपून काढायचं-उडीद बडवतों तसें बडवावयाचें-यांत माणुसकी कसली ? लोकांच्या अंगावर मुर्दाडपणें बंदुका चालवावयाच्या-काय हा आपला धंदा ? त्यापेक्षा राजरोस मारेकऱ्याचा किंवा खाटकाचा धंदा केला तर काय वाईट ?... आज शिदूभाऊच्या डोक्यावर हाणायला माझा हातच चालेना. पण करणार काय ? नाहींतर माझ्याच पाठींत बडगा बसला असता. शिदूभाऊ तर पुढारी-म्हणून त्याच्यावर सगळ्याचा रोख.त्या बाईला मी मारलं नाहीं म्हणून मला एक चाबूक हकनाक खावा लागला. काय न्याय आहे पहा ! त्या बाईच्या पाठीवर टोले लगावतांना मी कांहीं दयामाया किंवा लाज शिल्लक ठेवली नाहीं. कारण पोट जाळायचं आहे ना ? कित्येक वेळां अगदीं असं होऊन जातं कीं ह्या मुर्दाड जीवाचा एकदां शेवट करून टाकावा म्हणजे मनाच्या यातना तरी नकोत-देवा-देवा ! !-' महादूला विचार करतां करतां कांहीं सुचेना. सबंध रात्रभर तो तळमळत पडला होता. उद्यां पुन्हां असा प्रसंग आला तर त्यावेळीं कसे वागायचें ह्या विचारांत त्याची सगळी रात्र गेली.



आम्ही बेदरकारपणें त्यांच्यावर हल्ला चढविला.

श्रीधरचे 'साहेब' ही असेच सबंध रात्रभर एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर तळमळत पडले होते. एकसारखा विचार हा कीं 'हा शिद्या आतां माझें तोंड काळें करणार !' त्यांना श्रीधरबद्दल थोडी सहानुभूति वाटली तरी त्यांचा क्रोध मुळींच शमन झाला नव्हता. 'काय करावं, आज त्याचं टाळकं फुटलं आहे—नाहीं तर त्याचं टाळकं असं फोडलं असतं कीं त्याला जन्माची याद रहावी. कारट्याला माझा इंगा अद्याप माहीत नाहीं ! ...मरूं दे त्याला. त्याच्याकडे लक्षच देऊं नये झालं.' अशा विचारप्रवाहांत ते सांपडले होते. त्यांनीं पुष्कळ निश्चय केला, पण श्रीधर कांहीं त्याच्या डोक्यांतून जाईना. अखेर पहाटे पहाटे त्यांचा थोडासा डोळा लागला. पण स्वप्नांत सुद्धां श्रीधरनें त्यांचा पिच्छा सोडला नाहीं.

'साहेबा' नीं श्रीधरची चौकशी केली नाहीं. त्यांनीं ठरविलें कीं त्याचें काय होईल तें होवो त्याच्याकडे लक्ष द्यावयाचें नाहीं. एके दिवशीं अकस्मात् श्रीधर घरीं आला. त्याला पाहून साहेब चवताळले. खदिरांगासारखे लाल झाले आणि मोठ्यानें उद्गारले—

"मूर्खा, घराच्या बाहेर चालता हो. हरामखोरानं माझ्या तोंडाला काळोखी फासली. तोंड दाखवूं नको मला."

'पण मीं काय केलं साहेब ?'

'करूनच्या करून पुन्हां बेशरमपणें विचारतोस काय केलं म्हणून ? शिद्या, कुणाला विचारून मिरवणुकींत गेलास ? गद्ध्या, तुला कोणी असल्या बदमाषांच्या टोळींत शिरायला सांगितलं होतं ?'

'कुणी नाहीं. मीच गेलों'. श्रीधरनें संथपणें उत्तर दिलें.

"'मीच गेलों -' सांगायला कांहीं लाज वाटत नाहीं ? असले उद्योग करायचे असले तर आत्ताच्या आत्तां घराबाहेर चालता हो."

"साहेब, आम्हीं अगदीं शांत बसलों होतों. पोलिसांनींच जर आम्हांला उगीचच्या उगीच मारलं तर आम्ही काय करणार ? आम्ही कां मारामारी केली ? कां काय केलं ?"

'काय केलं म्हणजे ? तुम्ही जमलांतच कां तिथें ? तुम्हांला कोणी एवढे उपद्व्याप सांगितले होते ? चोर तो चोर आणि वर शिरजोर—आणि पुन्हां तोंड करून बोलतोस आम्ही काय केलं म्हणून ? तें कांहीं चालायचं नाहीं. घरांत नीट रहायचं असलं तर रहा, नाहीं तर अस्साच्या अस्सा चालता हो."—

श्रीधर त्याच पावलीं परत फिरला आणि थेट चालूं लागला. साहेब त्याच्याकडे 'आ' वासून पहात राहिले !

श्रीधर आपल्या घरांतून निमूटपणें चालता होतो—नव्हें त्याला आपण हाकून देतों हें पाहून त्यांचे डोळे चक्क झाले. तो कांहीं आतां येणार नाहीं. त्याला परत बोलवावयाचें कसें ? हातातोंडाशीं आलेला एकुलता एक मुलगा आकस्मिक रीतीनें घर सोडून चालता होतो, हें दृश्य कोणत्या पितृहृदयाला व्यथित करणार नाहीं ? श्रीधर आपण होऊन घरांतून निघून गेला कीं आपण त्याला हाकलून दिलें याचा त्यांच्या मनाशीं पुरता निश्चय होईना. शेवटीं श्रीधरच्या हकालपट्टीला आपणच कारणीभूत झालों आहोंत याबद्दल त्यांचें मन त्यांना खाऊं लागलें. आतां ह्यापुढें श्रीधरचें काय होणार ? तो काय करणार ? इत्यादि प्रश्न त्यांच्या डोळ्यांपुढें एकसारखें थैमान घालूं लागले.

ती रात्र त्यांनीं कशीबशी घालविली. दुसरा दिवस उजाडला. पण जेव्हां श्रीधर दिसेना तेव्हां ते कावरेबावरे होऊन अस्वस्थपणें इकडे तिकडे फेऱ्या घालूं लागले. जेवतांनाही श्रीधर बरोबर नव्हता. श्रीधरच्या खोलींत जाऊन त्याचीं पुस्तकें कुरवाळण्यांत ते पुत्रसुखस्पर्शाचा अनुभव घेऊं लागले. त्यांना डोळ्यांपुढें एकसारखा श्रीधर दिसूं लागला. जेवण झाल्यावर थोडी वामकुक्षी करण्यासाठीं म्हणून ते लवंडले. तरीही त्यांच्या डोळ्यांपुढें श्रीधर आलाच. स्वप्नांत श्रीधरची रक्तबंबाळ मूर्ति पाहून 'श्रीधर श्रीधर' अशा हांका मारीत ते एकदम दचकून उठले. सभोंवतीं श्रीधर नाहीं असें पाहून ते धाडकन् बिछान्यावर पडले.

श्रीधर तडक जो निघाला तो एकदम काँग्रेस हॉस्पिटलमध्यें शिरला. तेथें पहातो तों एक मोठी गडबड उडाली होती. सकाळीं पिकेटिंगला गेलेले चार सत्याग्रही वीर पोलिसांनीं बेदम मारल्यामुळें नुकतेंच हॉस्पिटलमध्यें आणले होते. त्यांपैकीं तिघांची स्थिति विशेष काळजी करण्यासारखी नव्हती. पण लाठीचा मार बसून जखमी झालेल्या त्या चौथ्या स्वयंसेवकाची स्थिति अतोनात रक्तस्रावामुळें अत्यवस्थ झाली होती. हा तरुण स्वयंसेवक जातीनें मराठा असून त्यानें लाठीचा मार बसत असतांही परत फिरण्याचें नाकारलें होतें. तो बेशुद्ध झाला तरी माणुसकी नसलेल्या माणसांकडून त्याच्यावर लाठ्यांचे घाव पडतच होते. कपडे धुतांना लोक ज्या वृत्तीनें कपड्यांवर काठ्या मारतात, तीच वृत्ति त्याच्या माराला कारणीभूत झाली होती. त्याला हॉस्पिटलमध्यें जेव्हां आणला तेव्हां तो तांबड्यालाल रक्तानें न्हालेला आहे असें दिसत होतें. जणूं काय रुधिराच्या नदींतून स्नान करून तो नुकताच बाहेर आला आहे. डॉक्टरनीं त्याची भयंकर स्थिति पाहून माणसाच्या रक्ताची मागणी केली. त्याबरोबर दहा बारा स्वयंसेवक आपलें रक्त काढून देण्यास पुढें सरसावले. श्रीधर तर सर्वांच्या पुढें होता. पण इतक्यांच्या रक्ताची गरज नसल्यामुळें डॉक्टरनीं फक्त तीन स्वयंसेवक पुरेत असें सांगितलें. त्याबरोबर त्यांच्यांत अहमहमिका सुरू झाली. स्वार्थत्यागाची एवढी चढाओढ पाहून डॉक्टरांचें हृदय भरून आलें. पण त्यावेळीं भावनांकडे लक्ष द्यावयाला मुळींच अवकाश नव्हता. अखेर त्यांनीं तिघांना निवडलें. आपल्याला न निवडल्याबद्दल श्रीधरला अतोनात वाईट वाटलें. 'डॉक्टर, माझें रक्त घ्या कीं' असें म्हणून त्यानें डॉक्टरांच्या विनवण्या केल्या. डॉक्टरनीं त्याला अखेर सांगितलें कीं 'सध्यां आणखी रक्ताची गरज नाहीं. पुढें संधी येईलच.' डॉक्टरनीं येवढें आश्वासन दिलें आणि ते लगेंच आपल्या कार्याला लागले. आपण इतक्या उत्साहानें केलेली विनंती डॉक्टरनीं नाकारावी याबद्दल श्रीधरचा बराच हिरमोड झाला, आणि ह्या स्वार्थत्यागी वृत्तीबद्दल तो स्वतःशीं विचार करूं लागला.

'समजा, आपली विनंती जर डॉक्टरनीं मान्य केली असती तर आपण स्वार्थत्याग करण्याचा एक प्रकारें स्वार्थच साधला असता. **स्वतः स्वार्थत्याग करावयाची तयारी असतांना दुसऱ्यांना स्वार्थत्यागाची संधी देणें हाच खरा स्वार्थत्याग होय.** आपण स्वार्थत्याग केला या स्वार्थी विचारानें मनुष्याला आनंद होत असतो. तो आनंद जर मला मिळाला असता तर मी स्वार्थीच ठरलों असता. मी जर स्वतःचें रक्त देऊं शकलों असतों तर मी स्वार्थ साधला असें दुसऱ्या स्वयंसेवकांना वाटलें असतें व त्याबद्दल त्यांना खेदही झाला असता. तेव्हां झाली ही गोष्ट हळहळ वाटण्याजोगी झाली नाहीं अशा श्रीधरनें विचार केल्यावर त्याच्या मनाची तळमळ शांत झाली आणि त्याचें हृदय हलकें झालें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीधर घरांतून बाहेर पडला खरा, पण पुढें काय करावयाचें याचा त्यानें मुळींच विचार केला नव्हता. सध्यांच्या चळवळींत पडावयाचें एवढेंच त्यानें आपलें ध्येय ठरविलें होतें. सत्याग्रहशिबिरांत रहावयाची मात्र त्याची इच्छा नव्हती. शिबिरांत राहून देशसेवा करावयाची म्हणजे मोलानें राष्ट्रकार्य करणें आहे अशी त्याची दृढ समजूत होती. पोटावारी देशकार्य करणें म्हणजे खरें निःस्वार्थीपणाचें—आत्मत्यागाचें देशकार्य नव्हें असें त्याचें मत असल्यामुळें स्वतःच्या पोटासाठीं कांहीं धंदा करून ह्या चळवळींत सामील व्हावें असें त्याच्या मनानें घेतलें. आणि त्याप्रमाणें त्यानें एकादा धंदा पहावयास सुरवातही केली. अखेर वर्तमानपत्रविक्याचें काम त्यानें पसंत केलें. कारण तें काम स्वतंत्रपणें करून त्याला देशकार्यही हवें तेवढें करतां येण्यासारखें होतें. मात्र वर्तमानपत्रें विकण्याचा धंदा कसा सुरूं करावयाचा याची त्याला काळजी वाटूं लागला. स्वतःच्या पैशावर पोट भरण्याचा ज्यानें एवढा बाणेदारपणा दाखविला त्याला वर्तमानपत्रें विकण्याचें काम कांहीं मोठेंसें अवघड नव्हतें. परंतु सुरवात कशी करावयाची असा त्याला प्रश्न पडला. पण तो प्रश्न त्याच्या नशिबानें त्याला लवकरच सुटला.

* * * *

प्रखर राष्ट्रभक्तीनें ज्या तरुणांचीं अंतःकरणें आंतल्या आंत जळत होतीं अशांपैकींच **श्रीधर** होता. नोकरीनें किंवा कुटुंबानें ज्यांचे हातपाय जखडलेले आहेत असे त्याचे अनेक मित्र होते. देशासाठीं कांहीं तरी करण्याची त्यांना इतकी तळमळ लागली होती कीं त्यांची बहुतेक रात्र झोंपेवांचून जावयाची. आपले पाश तोडून टाकण्यासाठीं त्यांची धडपड चालली होती, परंतु त्यांना म्हणण्यासारखें यश येत नव्हतें. **श्रीधर**सारख्या तडफदार तरुणाला त्याच्या वडिलांनीं घराबाहेर हांकून लावावा याचा त्यांना मनस्वी संताप आला होता. पण त्यांच्या हातांत काय होतें ! **श्रीधरला** आपल्या घरीं राहून घेण्याची प्रत्येकाची मनापासून इच्छा होती, पण **श्रीधर** कुणाच्याच घरीं रहावयाला तयार नव्हता. ह्या बाबतींत मित्राचें मन मोडणें म्हणजे पातक नव्हे अशी त्याची ठाम समजूत असल्यामुळें त्यानें प्रत्येकाला स्पष्ट नकार दिला होता. देशाचें वातावरण अशा परिस्थितीला येऊन पोंचलें होतें कीं प्रत्येकाच्या हृदयांत देशकार्याची लाट उसळल्याशिवाय रहात नव्हती. हिंदी जनता हा एक प्रचंड महासागर आहे आणि त्यांत ब्रिटिश नाखवे आपलीं गलबतें खेळवीत आहेत. त्यामुळें तरंगावर तरंग निर्माण होऊन त्या तरंगांचें रूपांतर मोठमोठ्या लाटांत होत आहे. पाषाणहृदयी देशद्रोह्यांच्या अंतःकरणावर ह्या लाटा एकसारख्या आदळत असल्यामुळें आशेला जागा आहे. एकाद्या संथ जलाशयांत आंदोलन सुरूं व्हावें त्याप्रमाणें आज प्रत्येक व्यक्तीच्या हृदयसागरांत आंदोलन सुरूं झालें आहे. देशांत एवढी प्रचंड व सर्वव्यापी लाट उसळली असतांना **श्रीधरसारख्या** उत्साही युवकाला क्षणभर तरी स्वस्थ बसवेल काय ? आणि झळ लागण्याचा संभव असला तरी तो त्यांत उडी घेतल्याशिवाय राहील काय ?

अलीकडे **रतनपूरचे** कारागृहाधिकारी **विनायकराव** ऊर्फ ‘ साहेब ’ यांचें चित्त अस्वस्थ असल्यामुळें त्यांच्या हातून कळत न कळत बऱ्याच चुका होऊं लागल्या. **श्रीधरला** घरांतून घालवून दिल्यामुळें मनस्ताप आधींच असह्य झालेला, त्यांत वरिष्ठांकडून पदोपदीं मानहानी—त्यामुळ साहेबांचें डोकें जवळ जवळ फिरून गेलें. पण करणार काय ? मानापमान, सुखदुःख, क्षोभसंताप सर्व कांहीं सरकारी नोकरानें मुकाट्यानें सोसलें पाहिजे. त्यावांचून गत्यंतर नाहीं. अशा स्थितींत ‘साहेब’ आपले दिवस काढीत होते. नेहेमींप्रमाणें आज सत्याग्रही बंदीवानांचा एक तांडा आला. **रतनपूरचा** तुरुंग त्यांचें स्वागत करावयाला सज्ज होताच. दररोज येणाऱ्या नव्या पाहुण्याकडे पाहून तो अंतरीं उच्छ्वास टाकीत असावा असें वाटत होतें. दगडविटांचा निर्जीव तुरुंग एकादे वेळीं तरी आपली सहानुभूति दाखवून अश्रु ढाळील, पण ह्या हाडामांसाच्या जिवंत माणसांना कैद्यांबद्दल मुळींच कांहीं वाटावयाचें नाहीं. आज नवे कैदी आले त्यावेळीं **विनायकराव** त्यांचें स्वागत करावयाला दारांतच उभे होते. एकेका कैद्याची तपासणी होऊन त्याला आंत सोडला जाई. शेवटीं शेवटीं श्रीधरची पाळी आली. त्या सरशीं **विनायकरावांना** एकदम धक्का बसला आणि ते धाड्‌दिशीं मूर्च्छित पडले. ‘ तुला तुरुंगांत टाकूं कां ! असें मी **श्रीधरला** म्हणत होतों. तो **शिद्या** खराखरच तुरुंगांत आला. आतां त्याला फटके मारावे लागतील आणि त्या रक्ताच्या चिळकांड्या—’ साहेबांना पुढ विचारच करवेना क्षणार्धांत हे विचार त्यांच्या डोळ्यांपुढें चमकून गेले आणि लगेच त्यांची शुद्धबुद्ध नाहींशी झाली. **श्रीधरची** आंत रीतसर रवानगी झाली आज त्याला केवढी कृतकृत्यता वाटत होती !

‘ पोरगा आतां कांहीं सहा महिने बाहेर येत नाहीं. त्याला माझ्या हाताखालीं कैदी म्हणून काम करावें लागणार ! माझ्या देखत माझ्या परवानगीनें त्याला फटके द्यावे लागणार ! आणि त्या रक्ताच्या चिळकांड्या उघड्या डोळ्यानें पहाण्याचें माझ्या नशीबी येणार ! काय हा भयंकर प्रसंग ! देवा, माझ्या **शिद्याला** आतां कोण सोडवील ?—मींच त्याला घराबाहेर काढला नसता तर !—पण नशीबाचे फेरे कुणाला चुकवितां येणार ? **शिदू, श्रीधर, श्रीधर !** तुझी आतां भेट केव्हां होणार ! ’ त्यांना **श्रीधरचा** सारखा ध्यास लागला. त्यांचा आत्मा पुत्रासाठीं तळमळूं लागला. ‘ मींच त्याला तुरुंगांत घातला, त्याला तुरुंगांत घालावयाला मींच कारणीभूत झालों. ’ अशा प्रकारें त्यांच्या मनाची सारखी छळणूक चालली होती. सबंध रात्र त्यांचा डोळ्याला डोळा नव्हता. अखेर पहाटे पहाटे त्यांना एक विचार सुचला. त्याबरोबर आनंदानें त्यांचें अंतःकरण फुलून गेलें. उद्यांच्या उद्यां राजीनामा द्यावयाचा असा विचार ठरविल्यानें त्यांना हायसें वाटलें. त्यांच्या जळत्या अंतःकरणावर शीत जलाचा वर्षाव झाल्याचा त्यांना भास होऊं लागला. त्यांचें समाधान झालें. त्यांना सात्त्विक आनंदाचा अनुभव आला, त्या आत्मिक समाधानाच्या भरात त्यांचा डोळा लागला. इतक्यांत त्यांच्या कानांवर कांहीं शब्द आल्यामुळें ते जागे झाले. एक वर्तमानपत्र विकणारा पोरगा त्यांच्या दारावरून ओरडत जात होता—

“ प्रभात, अर्धा आणा, प्रभात ! जेलरचा मुलगा तुरुंगात ! **प्रभात, अर्धा आणा, प्रभात !**”

तुकाराम महाराजांचा दिव्य संदेश.

(सार्थ व सटीप निवडक अभंग)

लेखकः—श्री. प. दि चित्रे, बी ए.

तुकाराम महाराजांच्या अनुयायांनीं व वारकऱ्यांनीं एक प्रत संग्रहीं ठेवण्याकरितां अवश्य खरेदी करावी. पुस्तक वाचूं लागल्यावर त्यांत कांहींतरी नवीन आहे याची जाणीव वाचकांना झाल्यावाचून रहाणार न हीं. किं. १ रुपया ट. ख. वेगळा पुस्तकें खालील ठिकाणीं किंवा इतर बुकसेलर्सकडे मिळतील. -

(१) प. दि. चित्रे, बी. ए. पालघर, जि. ठाणे (२) दि बॉम्बे बुक डेपो, चर्नीरोड, मुंबई.

रंगीत राष्ट्रीय निशाण.

सदर निशाण लहान साइजचें म्हणजे ५×२ इंच साइजचें आहे. ह्या निशाणांच्या एका मोठ्या कागदांत २१९ निशाणें असून त्या कागदाची किंमत एकदम घेणारास ५॥ आणे आहे. हीं निशाणें किरकोळ विकण्याकरितां असून प्रत्येक पैशास ८ मिळतात सदरहू निशाणाचा बिल्ल्याप्रमाणें कोटावर लावण्याच उपयोग करतां येतो मॅनेजर–चित्रशाळा प्रेस पुणें

“ नागरी ” लेखन यंत्र

(पहिलाच मराठी व हिंदी परिपूर्ण)

टाइप-रायटर.



मोहक आकार, साधी रचना, शास्त्रशुद्ध मांडणी, सुंदर अक्षर, किंमतींत “ स्वस्त ” पण “ टिकाऊ ” अनेक संस्थांत व संस्थानांत वापरण्यांत आहे.

विशेष माहितीकरितां लिहा -

बच्छराज कंपनी लिमिटेड.

३९५ काळबादेवी, मुंबई नं. २.

विक्रय प्रतिनिधी,

पुणें, सोलापूर, कोल्हापूर, अमरावती, मलकापूर, इंदूर वगैरे व इतर सर्व प्रमुख शहरीं आहेत.

सीतेची–कथा.

(लेखक–नरहर परशुराम महाजन, इंदापूर.)

ही ‘ सीतेची कथा ’ लहान मुलींसाठीं सोप्या भाषेंत लिहिली आहे. ती वाचतांच सीतेच्या अत्यंत उज्वल चरित्राचा ठसा पूर्णपणें मुलींच्या मनावर बिंबेल, अशीच या पुस्तकाची रचना केली आहे. पुस्तकाची छपाई अत्यंत सुंदर व जाड टाइपांत केली आहे. पुस्तकांत जागजागीं निरनिराळ्या प्रसंगांचीं १५ सुंदर चित्रें घातलीं आहेत. शिवाय मुखपृष्ठ तीन रंगी सुंदर चित्रानें शोभित केलें आहे हें पुस्तक मुलींच्या हातांत पडतांच त्यांना आनंद वाटेल. पण पुस्तकवाचनानें मन सुप्रसन्न होऊन, त्यांच्या अंगीं अनेक सद्गुण आल्याखेरीज राहणार नाहींत. तरी प्रत्येकानें एकवार हें पुस्तक आपल्या मुलींच्या हातीं वाचण्यास अवश्य द्यावें. किंमत अवघी ४ आणे ट ह. ८१.

मॅनेजर–चित्रशाळा प्रेस. पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

शास्त्रीय-चमत्कार.

जर्मनींतील वर्तुळाकृति घरें.



घर म्हटलें कीं तें चौकोनी असावयाचें हें जणूं ठरून गेल्यासारखेंच आहे. जुन्या पद्धतीचीं घरें अलीकडे कोणी बांधीत नाहींत. रचनापद्धतींत आधुनिक सुधारणा पद्धतीप्रमाणें पुष्कळ सोयी करण्यांत येतात. **अमेरिकेंत** पन्नास साठ मजल्यांचीं उंच घरेंहि बांधण्यांत येतात. पण गोलाकार घरें बांधण्याची कल्पना आजवर कोणाला सुचलेली नाहीं. अशा प्रकारचा यशस्वी प्रयत्न नुकताच **जर्मनीमध्यें लाइपझिक्** शहरीं तेथील म्युनिसिपालिटीचे शिल्पी **एम्. रिटर** यांनीं करून दाखविला. त्यांनीं एका वर्तुळामध्यें चक्राकार घरें बांधण्याची कल्पना मांडली. गाडीच्या चाकाला जशा मध्यें आरे असतात त्याप्रमाणें या वर्तुळाकृति घरांच्या मधून रस्ते नेलेले आहेत. अशा प्रकारें घरांच्या तीन रांगा बांधण्यांत आल्या असून त्यामुळें घरवाल्यांना हवा, प्रकाश व मोकळी जागा यांचा भरपूर पुरवठा होतो. आमच्याकडील टॉऊन प्लॅनिंग वाल्यांनीं असा एखादा प्रयोग करून पहावा.

रशियांतील कांचेचें घर.



मास्को येथें नुकत्याच उघडण्यांत आलेल्या एका घराचें हें चित्र आहे. या इमारतीच्या भिंती बहुतांशीं कांचेच्या तयार केलेल्या असून त्या कांचेपैकीं बराच मोठा भाग पारदर्शक आहे. या इमारतीचें बाह्यस्वरूप एखाद्या किल्ल्यासारखें दिसते. यांत एकाच वेळीं हजारों कामकऱ्यांची सोय होण्यासारखी आहे. कामकऱ्यांचें तें विश्रांतिगृह आहे. त्यांत स्नानगृहें, वाचनालय, उपाहारगृहें आणि विश्रांतिस्थानें यांची सोय केलेली आहे. ही इमारत सोव्हिएट सरकारनें बांधली असून ती पूर्णपणें कम्युनिस्टांच्या देखरेखीखालीं आहे. जे कामकरी **सोव्हिएट** सरकारशीं स्नेहभावानें वागतात त्यांनाच या गृहांत प्रवेश मिळतो. या संस्थेच्या खर्चाची तजवीज म्युनिसिपालिटीच्या बजेटांतून करण्यांत येते. याच पद्धतीवर **रशियांतील** निरनिराळ्या शहरीं विश्रांतिगृहें बांधण्याचा **सोव्हिएट युनिअनचा** विचार आहे.

आगीपासून बचाव करणारा पाळणा.

एखाद्या घराला आग लागली असतां घराच्या वरच्या भागांत राहणाऱ्या माणसांचा आगीपासून बचाव कसा करावा. हा मोठा प्रश्न असतो. **पोर्टलंड** येथील **एम्. ई. इमेन** या गृहस्थानीं त्यावर एक नामी युक्ति सुचविली आहे. त्यांनीं एक विशिष्ट पद्धतीची शिडी तयार केली असून जेथें आग लागली असेल तेथें नेऊन वरचीं माणसें सुखरूपपणें बाहेर काढण्याची सोय त्यांत केलेली आहे. शिडी तळाशीं हवी तेवढी वर किंवा खालीं करण्याची सोय केलेली असते. या शिडीचा आग विझविण्याकडेंहि



उपयोग होतो शिडी वाटेल तेवढी उंच नेण्याची सोय असल्यानें उंचीवरून पाणी वगैरे मारण्याला सोपें जातें. ही शिडी इकडून तिकडे नेतां येण्यासारखी आहे.

उन्हापासून संरक्षण.



ऊन्ह पावसापासून संरक्षण व्हावें म्हणून आपण छत्री वापरतो. पण ऊन एकाच दिशेनें सारखें लागत असतें असें नाहीं आपण ज्या ज्या दिशांना जाऊं त्या त्या दिशांच्या अनुरोधानें उन्हाचा ताप निरनिराळ्या बाजूनें होतो. त्याचें निवारण करण्याची योजना या छत्रींत आहे. छत्रीच्या मुठीच्या जवळ एक यंत्र बसविलेलें असतें. तें आपण जसे फिरवूं त्याप्रमाणें वरची छत्री फिरत राहते व त्यामुळें उन्हाचा ताप आपणास होत नाहीं.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रबरी देह.



फोर्टलंड येथील डॉ. लॉयल क्लार्क यांनीं नुकताच एक मनुष्याच्या आकाराचा रबरी पुतळा तयार केला असून त्यांत मानवी अवयव तयार करून बसावले आहेत. वैद्यकीय शिक्षण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सप्रयोग शिक्षण देण्याकडे त्याचा उपयोग करण्यांत येणार आहे. रबरी कातडें उघडण्याचीहि सोय त्यांत असल्यानें आंतील हाडांची वगैरे रचना समजावून देणें वा घेणें सुलभ आहे. या योजनेमुळें प्रत्येक हाड, स्नायु, शिरा यांचा परस्पर संबंध व कार्यपद्धति यांचा उलगडा होतो. या पुतळ्यांतील कोणताहि किंवा सगळेच भाग अलग करून पुन्हां जोडतांहि येतात. या नमुन्याचा उपयोग शारीरवैद्य व दंतवैद्य यांना फार होईल असा विश्वास वाटतो. हा पुतळा तयार करण्यास पांच वर्षांचे परिश्रम लागले. जगांत अशा प्रकारचा हा पहिलाच नमुना आहे.

ओकलंड (कॅलिफोर्निया) येथील मि. व मिसेस एम्. डब्लु मॅक्मीलन यांनीं एका झाडावर सोळा प्रकारचीं फळें उगवून दाखविलीं! पुष्कळ वर्षांपूर्वीपासून मॅक्मीलन हे एका कोवळ्या झाडाच्या रोपावर दुसऱ्या निरनिराळ्या झाडांचीं कलमें करीत असत. त्यांचा प्रयोग अखेर यशस्वी होऊन त्या झाडावर सोळा प्रकारचीं फळें लागल्याचा चमत्कार घडून आला!

झुडपांपासून रबर निघणार.



प्रख्यात अमेरिकन शास्त्रज्ञ थॉमस एडिसन व आणखी कांहीं शास्त्रज्ञ यांनीं अलीकडे बरेच दिवस पूर्व अमेरिकेंत एखाद्या झुडपापासून रबर तयार होईल किंवा कसें यासंबंधीं प्रयोग चालू केले आहेत. पण त्यांना या प्रयोगांत यश मिळण्यापूर्वीच पश्चिम अमेरिकेंत सॅलिनस (कॅलिफोर्निया) येथें हा प्रयोग यशस्वी होऊन रबर काढण्यासाठीं तेथें मोठ्या प्रमाणावर एक कारखानाहि निघाला आहे मॅक्सिकोकडील भागांत विपुल प्रमाणांत उगवणाऱ्या एका रानटी झुडपापासून रबर काढतां येईल असा शोध डॉ. विलियम बी. मॅकालम, कॅलिफोर्नियाचे एक वनस्पतीशास्त्रज्ञ यांनीं यशस्वी करून दाखविला. ह्या पद्धतीचें एवढेंच एक झुडप (जात) अमेरिकेंत असून त्याच्यावर सॅलिनस येथें आज कित्येक दिवस सारखे प्रयोग चालू होते. शेवटीं एका आठवड्यांत शेकडोंशें पौंड रबर या झुडपांपासून निघूं लागलें. आतां या झुडपांची फार मोठ्या प्रमाणावर लागवड चालू आहे, आणि यांत्रिक सहाय्यानें त्याच्यापासून मोठ्या प्रमाणावर रबर काढण्यांत येणार आहे.

कामिनिया ऑईल

म्हणजेच

केसांचें जीवन.

ईश्वरानें मनुष्यप्राण्याला दिलेले केस निरुपयोगी नाहींत. अर्थात् त्यांची जोपासना करणें फार जरूरीचें आहे. केसांचें संरक्षण करण्यास मनुष्यें तेलाचा उपयोग करतात परंतु त्यांत केसांच्या मुळांस पोषक अशा द्रव्यांचा समावेश नसल्यास केस गळून पडूं लागतात.

कामिनिया ऑईल
(रजिस्टर्ड)

हें केसांच्या मुळांस पोषक व तें वाढविण्यास मदत करणाऱ्या अशा अमोलिक वनस्पतीच्या सत्त्वापासून बनविलेलें उत्कृष्ट सुगंधी तेल आहे. केसांस व मेंदूस गुणकारी असें ह्या तेलासारखें दुसरें तेल आपणांस मिळणें शक्य नाहीं.

हजारों लोक आजतागायत हें तेल वापरीत आले आहेत, तरी आपणही तें आजपासून वापरण्यास लागा व त्याच्यापासून होणाऱ्या फायद्याचे वांटेकरी व्हा. :

किंमत १ बाटलीस रु. १-०-० ट. ख. ०-६-० निराळा.
,, ३ ,, रु. २-१०-० ,, ,, ०-१२-० ,,

ओटो दिलबहार (रजिस्टर्ड)

म्हणजे

शेंकडों नव्हे पण हजारों सुवासिक पुष्पांचें मोहक व मधुर खुशबो देणारें

बादशाही सेन्ट.

मंगलकार्य, मजलस किंवा समारंभास, सर्वांस प्रिय होणारें हें सेंट एक वेळ वापरून खात्री करा व त्यानें आपण खर्च केलेल्या पैशाचा पुरा मोबदला मिळेल.

-॥- औंस बा. किं. २ रु.पाव औंस किं. १॥ रु. १ ड्राम किं. १२ आ. अर्धा ड्राम किं. ८ आ. या सर्वांस व्ही. पी. खर्च निराळा. कपड्यांचे कपाटांत ठेवण्यासाठीं ओटो दिलबहारचें सुगंधी कार्ड प्रत्येकीं १ आणा. पोष्टखर्चासाठीं दोन आण्यांचीं तिकिटें पाठविणारांस सॅम्पल बाटली फुकट पाठविण्यांत येईल.

चेहेऱ्याचें नैसर्गिक सौंदर्य वाढविण्यासाठीं अत्यंत उपयोगी व शास्त्रोक्त रीतीनें बनविलेलें

कामिनिया स्नो (रजिस्टर्ड) वापरा.

हें चामडीवर घासल्यानें त्वरित चामडीच्या छिद्रांवाटें आंत जाऊन चामडी साफ राखतें व ती रेशमासारखी मऊ ठेवते.तसेंच शरीरकांतीमध्यें चांगलीच वाढ करतें.

उष्ण प्रदेशांत हमखास चामडीचे विकार उत्पन्न होतात. ते होऊं नयेत म्हणून अटकाव करण्यासाठीं व चामडीची शोभा वाढविण्यासाठीं " कामिनिया स्नो " वापरण्यास आरंभ करा.

किंमत १ बाटली ०-१२-० व्ही. पी. खर्च निराळा.

अपरिचित व हलकीं मलमें वापरण्यापेक्षां जगविख्यात व दुःखहारक असें

ऑडमन्स साइप्रस साल्व वापरा. (रजिस्टर्ड)

हा साल्व डोकेंदुखी, हातपाय, कमर, छाती वगैरे शरीराच्या सर्व अवयवांचें दुःख त्वरित आणि हटकून दूर करणारा रामबाण उपाय आहे. थोडेसें मलम हातावर घेऊन दुःखपीडित भागावर थोडा वेळ चोळल्यानें आराम वाटूं लागतो. प्रसंग सांगून येत नाहीं, त्यामुळें ऐन वेळीं उपयोगी पडावें म्हणून एक बाटली अवश्य संग्रहीं ठेवा.

तूर्त दोन आण्यांची नमुन्याची बाटली मागवून आपली खात्री करून घ्या. एका पौंटची किं० १ रु० पो. पॅ. ख. निराळा.

सोल एजंटस्–

धी अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कं०,

२८५ मार्केट, पो० बॉ० २०८२. ... . मुंबई नं. २

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



उमरावती येथील देशसेविकासंघ.

उमरावती येथील देशसेविका संघाचा फोटो वर दिला आहे. खुर्चीवर बसलेल्या डावीकडून पांचव्या सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांना इं. पि. को. ११७ अन्वयें ६ म. साध्या कैदेची शिक्षा देण्यांत आली आहे. त्या उमरावती जिल्हा-युद्धमंडळाच्या उपाध्यक्ष होत्या.



अमरावती जिल्हा सत्याग्रहदल व कार्यकारी मंडळींचे फोटो.

आर्तवदोषारी— सतत तीस वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या कष्टसाध्य रोगांवर औषध अत्यंत गुणकारी ठरलेलें असून यानें पांढरा व तांबडा धुपर्णा, विटाळशूळ, विटाळ नसणे, जास्त अथवा कष्टसाध्य विटाळ होणें, अकालीं गर्भपात, योनिदाह, योनिशूळ वगैरे सर्व रजोदोष नाहींसे होतात. हें औषध डॉक्टर व वैद्य मोठ्या प्रमाणावर वापरूं लागले आहेत. जास्त गुणप्रशंसा नको.
किंमत बाटलीस ३॥ रुपये. ट. ह. माफ. पूर्ण गुणास ६ बाटल्या किं. १९॥ रुपये. ट. ख. निराळा. वैद्य-रघुनाथ माधवराव खरे, ३०३ सोमवार पेठ, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

" चिंतातुर ! "

एके दिवशीं महाराज व मातोश्री जिजाबाई ' पण ' लावून बुद्धिबळें खेळावयास बसलीं असतां महाराज हरले व नऊ दिवसांत कोंडाणा सर करून दे हा मातोश्रींचा पण पाहून कोंडाणा कसा सर करतां येईल या विचारानें उद्विग्न होऊन महाराज सचिंत झाले आहेत.

चित्रकार—श्री. रघुनाथ बाळकृष्ण केळकर, धुळें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हिंदी राष्ट्राचे शत्रु.

(श्रीयुत महादेव राजाराम बोडस एम्. ए. एल्एल्. बी.)

Many of the problems we have to face are the problems of vested interests, mostly created or encouraged by the British Government. The interests of Rulers of Indian States, of British officials and British capital and Indian capital and of the owners of big Zamindaris are ever thrust before us and they clamour for protection. The unhappy millions who really need protection are almost voiceless and have few advocates. So long as the British Empire continues in India in whatever shape it may do so, it will strengthen these vested interests and create more.

Jawahirlal Nehru:—Lahore Presidential address.

× × × ×

सन १८८५ सालीं **राष्ट्रीय सभेचे** स्थापनेनें हिंदी राष्ट्राची गर्भधारणा झाली, तसें सन १९३० सालीं ४५ वर्षांनीं बालपण संपून त्यानें तारुण्यांत प्रवेश केला. राष्ट्राचें आयुष्य मोठें असतें तशा त्याच्या अवांतर अवस्थाही दीर्घकालिक होतात. पहिली बावीस वर्षें **हिंदी राष्ट्र** रांगत होतें, १९०८ पासून पुढील बारा वर्षें बसूं लागलें, १९२० साला असहकारितेच्या पायावर उभें राहिलें, व आतां १९३० सालीं स्वयंनिर्णयाच्या प्रेरणेनें त्याचे पायांत शक्ति येऊन चालूं लागलें आहे. सन १९३१ सालचा प्रारंभ हिंदी राष्ट्राच्या तारुण्याचा उदयकाल होय. आजपर्यंत—आतापर्यंत परकी राज्यकर्त्यांचा हात धरून चालत होते तें आतां स्वतःच्या पायानें चालणार. राज्यकर्ते खुषीनें हात सोडीत नाहींत, म्हणून हिसकाहिसक सुरूं झाली आहे. कायदेभंगाचे रूपानें मुलानें जमिनीवर लोळण घेतली आहे, व बायकाट, अत्याचार, दंगे वगैरे लाथाही सुरूं झाल्या आहेत. मुलाला जावयाचें आहे एका दिशेला, व हात धरणारा नेणार भलतीकडे. अशा स्थितींत त्याचा हात सोडून मुलानें आपली उद्दिष्ट दिशा धरावी हेंच श्रेयस्कर आहे. प्रथम कांहीं दिवस झटापट होईल, विरोध वाढेल, आणि क्रोधद्वेषादि मनोविकारही जागृत होतील; पण सर्व क्रांतिकालांत या गोष्टी होतातच. जुनीं बंधनें तुटून नवी घडी बसेपर्यंत थोडीबहुत चलबिचल होणें अपरिहार्य आहे. मुलगा वयांत आल्याबरोबर आईबापांनीं जमीनजुमला त्याचे स्वाधीन करून संसाराचा भार त्याजवर टाकलाच पाहिजे. **इंग्रजांनीं हिंदुस्थान** कसें पादाक्रांत केलं हा पूर्वेतिहास बाजूला ठेवला तरी १८५८ सालीं **व्हिक्टोरिया** महाराणीनें या देशाचें पालनकर्तृत्व पत्करलें. आज सत्तर वर्षें पालनकार्य केलें. तीन पिढ्यांत **हिंदुस्थानां**तील लोक राज्यकारभार चालविण्यास समर्थ झाले आहेत हें उघड दिसत असतां त्यांना त्यांचा देश परत न देणें हा लोभातिरेक होय. फार दिवस भोगलेला अधिकार सोडणें जिवावर येतें खरें; पण दुसऱ्यानें भाग पाडण्यापेक्षां खुषीनें सोडणें अधिक थोरपणाचें आहे. इंग्लंडांत शहाण्या इंग्रज लोकांना ही गोष्ट कळते; पण अधिकारलोभी स्वार्थी लोकांचे कोलाहलापुढें त्यांचाही आवाज कोता पडतो. सर्व **इंग्रज** लोकसमाज न्यायबुद्धिप्रेरित आहे अशी आपल्या मनाची खुळी समजूत करून घेऊन कित्येक नेमस्त पुढारी शाब्दिक वादविवादानें हक्क मिळवूं पहात आहेत; पण त्यांना मनुष्यस्वभावच कळत नाहीं. जगांत स्वार्थपरायणता इतकी भरली आहे कीं कडक उपायांचे मदतीखेरीज न्यायाचे पाऊल पुढें सरकतच नाहीं. **मुंबईकर** नेमस्तांचे एक भाडोत्री गोरे लेखक **विलायतेहून** कळवितात कीं **गोलमेज** प्रतिनिधींचे अस्खलित इंग्रजी वक्तृत्व ऐकून इंग्लंडांतील लोक फार खुष होऊन **हिंदुस्थानाला 'डोमिनियन स्टेटस'** देण्याला बहुतेक तयार झाले आहेत, पण कांहीं लोकांचा **गांधी** आणि **कांग्रेसकडे** ओढा आहे हीच मोठी अडचण आहे ! जणूं काय हिंदी लोकांचे इंग्रजी वक्तृत्व **इंग्लंडांत** पूर्वी कधीं झालेंच नव्हतें. नुसत्या वक्तृत्वानें स्वराज्य मिळविणें इतकें सोपें होतें तर नेमस्त बारिस्टर आजपर्यंत स्वस्थ कां बसले ? **गोलमेजाचा** खर्च, ४०–५० हजार लोकांचा तुरुंगवास, आणि हजारों लोकांच्या लाट्या, चुकविण्याकरितां **जीना, सप्रूला** लठ्ठ फी देऊन **विलायतेस** पाठवितां आलें असतें. कोणीहि मनुष्य आपल्या जातीवर व धंद्यावर जावयाचाच. बारिष्टरांना वक्तृत्वाखेरीज दुसरें काय दिसणार ? **गांधी, मोतीलाल, पटेलबंधु** हेही बारिष्टर होते; पण त्यांची दृष्टि धंद्यापलीकडे गेली. त्यांना लवकरच कळलें कीं नुसत्या तोंडाच्या वाफेनें शत्रु चीत होत नसतो हातपाय किंबहुना सर्व शरीराचा जोर द्यावा तेव्हांच शत्रु जमीनदोस्त होतो. **इंग्लंडांत** हल्लीं लोकमत बदलत चाललें असेल तर तें **हिंदुस्थानांतील** हजारों लोकांच्या स्वार्थत्यागानें होय. **हिंदुस्थानासारख्या** प्रचंड देशांतील लोक हातपाय हालवूं लागले असतां चिमुकल्या **इंग्लंडांतील** लोक खडबडून जागे झाले नाहींत तर त्यांचेसारखे मूर्ख कोणीच नाहींत. **गोलमेजाभोंवतीं हिंदुस्थानांतील** सर्व पक्षाचे लोक जमले आहेत, **कांग्रेस** मात्र नाहीं; पण **कांग्रेस** प्रत्येकाचे अंतःकरणांत वास करीत आहे. **महात्मा गांधी** प्रत्येकाचे डोळ्यासमोर दिसत आहे; आणि आपण कर्तव्याला जागलों नाहीं तर स्वदेशीं परत गेल्यावर आपले देशबांधव आपली चांगली पूजा करतील ही भावना प्रत्येकाचे मनांत जागृत आहे कांग्रेस मूर्तस्वरूपानें विलायतेंत हजर नाहीं; पण **कांग्रेसचें** भूत मुख्य प्रधान **म्याकडोनाल्ड** आणि अध्यक्ष लॉर्ड **सांके** यांचे डोळ्यासमोर नाचत आहे. **हिंदुस्थानाचा** प्रश्न एका महिन्यांत समाधानकारक रीतीनें न सोडविला तर **हिंदुस्थान** देश कायमचा हातांतून जातो असे उद्गार आतां **ब्रिटिश** मुत्सद्यांचे तोंडून निघूं लागले आहेत. हा प्रभाव कशाचा ? प्रचंड हिंदी राष्ट्रानें स्वतंत्र होण्याचा निश्चय केल्यावर लाख-दीड लाख गोरे लोक त्यांना किती दिवस रोकून धरणार ? जागृत झालेल्या हिंदी राष्ट्राला मूठभर नोकरशाहीनें बंदींत ठेवूं पहाणें म्हणजे महासागराच्या भरतीला वाळूचा बांध घालण्यासारखेंच आहे. एवींतेवीं **हिंदुस्थान** हातचें जाणार, मग गोडीगुलाबीनें स्वराज्य देऊन स्नेह कायम ठेवणें काय वाईट हा विचार समंजस इंग्रज लोकांचे मनांत येऊं लागल्यास नवल नाहीं. सध्यां **विलायतेंतील** लोकांचे अंतःकरणात सुविचार आणि स्वार्थबुद्धि यांचें भयंकर युद्ध सुरूं झालें आहे. अखेर कोणाचा जय होतो तें पहावयाचें आहे.

सन १९३० अखेर ४५ वर्षें **राष्ट्रीय सभेनें** हिंदी राष्ट्राची तयारी केली. १९३१ सालापासून नवें युग सुरूं झालें म्हणण्यास हरकत नाहीं. सन १९३० च्या पहिले दिवशीं **लाहोरास** जाहीर केल्याप्रमाणें एका वर्षांत **कांग्रेसनें** आपली शक्ति दाखविली. अनत्याचारी कायदेभंगानें स्वत्व न सोडतां सरकारी आणि व्यापारी तिजोऱ्या रिकाम्या केल्या, कागदी कायद्यांनीं बिनबोभाट राज्यकारभार चालविणें अशक्य करून पोलीस आणि लाठी हीं **इंग्रज** सरकाराचीं गुप्त हत्यारें उजेडांत आणलीं. इंग्रजी अंमल लोकांचे कल्याणाकरितां नसून **जवाहीरलाल नेहरूंनीं लाहोरास** सांगितल्याप्रमाणें vested interests म्हणजे वतनदार लोकांचे फायद्याकरितां चालूं आहे हें उघड केलें. परकी **इंग्रजांनीं** आपल्या राज्याचे बळकटीकरितां हे देशातलेच वतनदार खांब उभे केले. ते अगोदर तोडल्याशिवाय इमारत खालीं यावयाची नाहीं हें आतां लोकांस कळूं लागलें आहे. कायदेभंगानें हिंदी राष्ट्राचें संघटन केलें, पण तेवढ्यानें **कांग्रेसचें** कार्य संपलें असें नाहीं. खरें कार्य अजून पुढेंच आहे, व तें आतां १९३१ सालापासून करावयास आरंभ करावयाचा आहे. १९३० सालापर्यंत तयारीचा काल गेला; आतां पुढील खऱ्या लढाईचें कार्यास आरंभ करावयाचा आहे. ही लढाई कशी, कोणाशीं आणि कोणत्या साधनांनीं करावयाची याचाच आपणाला आतां विचार करावयाचा आहे. हिंदी राष्ट्र तयार झालें, पण त्या राष्ट्राचे खरे शत्रु कोण, व ते कसे नामोहरम करतां येतील हें ठरवून त्या मार्गाला लागणें आपलें पुढील कर्तव्य आहे. सैन्य तयार केलें म्हणजे लगेच जय मिळतो असें नाहीं; तर त्या सैन्यानें शत्रूवर चाल करून त्याला पळवून लावणें ही खरी लढाई होय. हिंदी राष्ट्राचे खरे शत्रु कोण ते ओळखून त्यांना हतवीर्य करणें ही स्वराज्याची पहिली स्वारी आपणाला १९३१ सालीं करावयाची आहे. **महात्मा गांधी**सारख्या सात्त्विक पुढाऱ्यांनीं सैन्याची जुळवाजुळव करून रस्ता दाखवून दिला. आतां शत्रूवर स्वारी करून त्यांचा बीमोड करण्याला आपणाला अधिक धडाडीचे तरुण सेनापति पाहिजे आहेत. आजपर्यंतचें कार्य आत्मसंयमन आणि सहनशीलता यांचे साहाय्यानें करावयाचें होतें. यापुढील युद्ध आत्मबल आणि कर्मयोग यांनीं सिद्धीस न्यावयाचें आहे. **जवाहिरलाल** नेहरूंनीं पांचव्यानदा तुरुंगांत जाण्याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेळीं प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्यांत म्हटल्याप्रमाणें आपणाला आत्मशक्तीनें परशक्ति जिंकावयाची आहे. नुसता कायदेभंग केल्यानें ते कायद उचलून धरणाऱ्या शक्तीचा नाश होऊं शकत नाहीं. त्याकरितां निराळ्या शक्तीचीच योजना केली पाहिजे. **महात्मा गांधींनीं** आपणांस पहिल्या मुक्कामाला आणून सोडलें. त्यांचें कार्य सफल झालें, व त्यांना इतःपर विश्रांति घेण्यास सांगणें आपलें कर्तव्य आहे. पुढील मुक्कामास जाण्याचा मार्ग अधिक अवघड आणि जोखिमीचा असल्यामुळें वाटाड्याही नव्या जोमाचा तरुण पाहिजे.

वेळोवेळीं बदलणाऱ्या परिस्थितीप्रमाणें लोकांचे म्होरके नवे झाले तरी **महात्मा गांधींच्या** प्रेरणेनें **कांग्रेसनें** आखून दिलेला मार्ग सोडणें केव्हांहि हितावह होणार नाहीं. नोकरशाहीच्या पाशवी शक्तीला लोकशाहीच्या संघशक्तीनें जिंकावयाचें आहे. ही लोकांची शक्ति पूर्णपणें नैतिक म्हणजे अनत्याचारीच असली पाहिजे. नोकरशाहीची मदार लाठी आणि बंदुक यांजवर, पण या निर्जीव वस्तु केव्हांच भंगून जातील. नोकरशाहीच्या पाशवी शक्तीचा तात्कालिक विजय झाला तरी अखेरीस लोकांच्या नैतिक बलानेंच स्वराज्य मिळणार आहे. अत्याचारानें तात्पुरता सूड घेतां येईल किंवा क्षणिक समाधान मिळवितां येईल; पण एका अत्याचारानें जे अनेक दुर्विकार आणि कुविचार उत्पन्न होतात त्यांनीं सत्कार्याचाही नाश होतो. दुष्टाचा संहार करणें कित्येक वेळां न्याय्य किंबहुना अपरिहार्य होतें; पण त्या संहाराचा प्रतिध्वनि उमटल्याशिवाय रहात नाहीं. आपणाला स्वराज्य नुसतें मिळवावयाचें नाहीं, तर तें चिरस्थायी करावयाचें आहे; व कोणतीहि गोष्ट चिरस्थायी होण्याला तिचा पाया नैतिक बलावरच ठेवावा लागतो. पूर्वीही **हिंदुस्थानांतील** लोकांनीं बंड लढाया स्वाऱ्या करून स्वराज्यें मिळविलीं. शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्र स्वतंत्र केलें, पेशव्यांनीं अटकेपर्यंत भगवा-झेंडा नेला, आणि **रणजितसिंगानें अफगाणिस्तान** जिंकलें; पण त्यांचा अंमल टिकला नाहीं. कारण तो केवळ शस्त्रबळानें वाढविलेला होता, त्याला लोकांच्या नैतिक बळाचा आधार नव्हता. मिळविणारांचा जोर कमी होतांच पुन्हां विदेशी राज्य देशावर पसरलें आपणांस आतां चिरकालिक स्वराज्य स्थापावयाचें आहे, व तें लोकांच्या सात्त्विक मनोवृत्तीच्या भक्कम पायांवरच स्थापलें पाहिजे. **भगवान् श्रीकृष्णानीं** १६ व्या अध्यायांत दैवी संपत् आणि आसुरी संपत् यांतील सविस्तर भेद वर्णन करून "दैवीसंपद्विमोक्षाय निबंधायासुरीमता" असा निष्कर्ष काढला आहे तो खाजगी व सामुदायिक व्यवहारांत सारखाच पाळला पाहिजे. अनत्याचार तत्त्वाचा पुष्कळ लोक विपर्यास व अतिरेक करतात, त्यामुळें कित्येक वेळां तें उपहासास्पद होतें. पण तत्त्व खरें आहे. एकट्याच्या व्यवहारांत मनुष्य प्रसंगानुसार मनोविकारांचें संयमन करूं शकतो; परंतु अनेक व्यक्तींनीं आरंभिलेल्या सामुदायिक कार्यांत तें शक्य नसतें. तेथें व्यक्तींच्या मर्जीवर न ठेवतां सामान्य निर्बंधच घालावा लागतो. अनत्याचारासारखा कडक निर्बंध न घातला तर भिन्न मनोवृत्तींच्या व्यक्तींचें आकलन करणें अशक्य होतें, व एखाद्या व्यक्तीच्या मूर्खपणानें सामुदायिक कार्याचा बिघाड होण्याचा संभव असतो. वस्तुतः आपणांस सर्व कार्य संघशक्तीनें करावयाचें असल्यानें अत्याचारासारख्या पाशवी साधनाची जरूरीच नाहीं. विदेशी अमलाचा प्रतिकार तो न मानल्यानें करतां येतो, व त्याबद्दल होणारें शासन राष्ट्राच्या संघशक्तीपुढें निर्जीव होतें. दंड न दिल्यास सरकार मिळकत जप्त करून लिलाव करतें; पण लिलाव घेणारा कोणी पुढें न आल्यास सरकार काय करणार? थोडे गुन्हेगार असल्यास तुरुंगाची भीति; पण सर्व राष्ट्र गुन्हेगार झाल्यावर सर्व देशासभोंवतीं तुरुंगाची भिंत घातली पाहिजे. विदेशी अंमल मोडण्याचा खरा उपाय तो अकिंचित्कर आणि निर्बळ करणें हाच होय व तो संघशक्तीनेंच साध्य आहे, हा महत्वाचा सिद्धांत आपणांस भावी राष्ट्रीय-युद्धांत नेहमीं डोळ्यासमोर ठेवला पाहिजे.

असाच दुसरा एक सामान्य सिद्धांत येथें नमूद करणें जरूर आहे. तो हा कीं, जरी गोलमेज चर्चेमुळें किंवा दुसऱ्या कांहीं कारणांनीं सध्यां कांहीं राजकीय अधिकार मिळाले तरी तेवढ्यानें आपलें भावी राष्ट्रीय युद्ध संपत नाहीं. किंबहुना खऱ्या युद्धास आतां प्रारंभ झाला असेंच आपणास आढळून येईल. दीडशें वर्षें सत्ता वापरणारे **इंग्रज** व त्यांचे इष्टमित्र एकदम **हिंदुस्थान** सोडून जातील किंवा येथें राहून हिंदी लोकांचा अंमल बिनबोभाट सोसतील हें मुळींच शक्य नाहीं. राजकारणांत निष्णात असलेले **इंग्रज** पदोपदीं अडथळा करतील, संपत्तीच्या व इभ्रतीच्या बळानें हिंदी अधिकाऱ्यांस पायबंद घालतील आणि देशांतील मूर्ख स्वार्थलोलुप लोकांस फुस लावून गृहकलह माजवितील. **इंग्लंडाचा व रशियाचा** कांहीं संबंध नसतां तेथें ही कृत्रिम सैन्यें उभारून **बोलशेविक सेव्हिएटास** पांच वर्षें त्रास दिला; मग पूर्णपणें हस्तगत झालेलें **हिंदुस्थान** सुखानें सोडतील हें मुळींच संभवत नाहीं. **टयांगानिका, इराक, पॅलेस्टाईन** हे देश **टहसेलिस** तहानें थोडीं वर्षें हातांत आले असतां पचविण्यास कमी करीत नाहींत. ते **इंग्रज** पचलेलें **हिंदुस्थान** प्रयासावांचून ओकून टाकतील हें अशक्य आहे. आज हजारो लोक तुरुंगांत पाठवून जे हक्क आपण मिळवूं, ते संभाळण्यास किंवा वाढविण्यास आपणाला आजच्या दसपट स्वार्थत्याग करावा लागेल हें आपण विसरतां कामा नये. १९३० सालअखेर हिंदी स्वातंत्र्ययुद्धाचा एक अंक संपला तर १९३१ सालाचे प्रारंभीं दुसऱ्या अंकाचा पडदा उघडला असेंच आपणांस आढळून येईल. **सर्व सुधारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीनें हिंदुस्थानचा दर्जा असावा, अशी जर आपली महत्त्वाकांक्षा असेल, तर इतर प्रगमनशील राष्ट्राप्रमाणें देशाकरितां सर्वस्व अर्पण करण्यास तयार असलेलीं माणसें पुढें आलीं पाहिजेत.** परकी अमलांतील गुलामगिरींत वाढलेल्या लोकांत हल्लीं जी बेहोष स्वार्थबुद्धि आणि क्षुद्रवृत्ति दिसून येते, तिचा बीमोड करून राष्ट्रव्यापी भावना लोकांत जागृत झाल्या तरच पुढील जीवन-कलहांत हिंदी राष्ट्राचा टिकाव लागेल. मुसलमानांनां **मुसलमानांकडेच** बघावें, **मराठ्यांनीं** मराठ्यांपुरताच विचार करावा, **अस्पृश्यांनीं** वेळीं अवेळीं आपली अस्पृश्यता लोकांपुढें नाचवावी, **लिंगायितांनीं वीरशैवांचें** बंड माजवावें, आणि **कऱ्हाड्यांनीं** कऱ्हाडासंघ स्थापावा, असल्या संकुचित विचारांत गढलेल्या लोकांना व्यापक राष्ट्राची कल्पना कशी यावी? सबंद देशाच्या भावी राज्यघटनेचा विचार चालू असतां कांहीं शहाणे मुसलमान आम्हाला पोलिसांच्या आणि गटार इन्स्पेक्टरांच्या अमुक जागा मिळाव्या म्हणून आग्रह धरतात, आणि त्यांचेच अनुकरण करणारे अस्पृश्य पुढारी देवळांत शिरण्याचा प्रचंड हक्क मागतात! मराठ्यांना वाटतें सर्व शाळामास्तर आपण व्हावें, व अस्पृश्य म्हणतात आम्हास पट्टेवाले आणि बेलिफ करा. सर्व जाति नोकऱ्याकरितां धडपडतात, पण सर्वांवर हुकमत चालविण्याचा अधिकार मिळविण्याची कोणीच महत्त्वाकांक्षा धरीत नाहीं. मुसलमान म्हणतात हिंदु आमच्यावर जुलूम करतील, मराठे म्हणतात ब्राह्मण आम्हांस मागें सारतात, आणि महारमांग म्हणतात स्पृश्य जाति आम्हास दूर बसवितात; पण हिंदु, मुसलमान, ब्राह्मण, मराठे, स्पृश्य अस्पृश्य या सर्वांस सारखेंच चेपून टाकणारे **इंग्रज** काय करीत आहेत याचा किती लोक विचार करतात? कित्येक पिढ्यांच्या परकी अंमलानें आमची विचारशक्ति खुरटली, उच्च भावना मालविल्या, आणि आत्मतेज मंद झालें आहे. प्रजावृद्धि, द्रव्यसंचय आणि आपल्या चिमुकल्या स्नेहीसोबती कंपूंत प्रतिष्ठा हींच ज्यांचीं आयुष्याचीं ध्येयें झालीं त्यांचे हातून राष्ट्र कसें उदयास येणार? हिंदी राष्ट्राचा दर्जा वाढवावयाचा असेल तर प्रत्येक समंजस माणसानें आपलें ध्येय उच्च आणि सर्वव्यापी करण्यास झटलें पाहिजे. नोकऱ्या मागणारे नेहमीं नोकरच रहाणार; पण स्वदेशाची मालकी मिळविण्यास झटणारे लोक कधीं तरी मालक होतील. मोंगलांची पांच हजारी झिडकारणाऱ्या **शिवाजीला** हांसणारे मराठे सरदार जन्मभर हजारी आणि पांचहजारीच राहीले; पण शिवाजी महाराष्ट्राचा राजा झाला. क्षुद्र-प्राप्तिकरितां देशबांधवांशीं वैर करणाऱ्या लोकांनीं हें उदाहरण डोळ्यापुढें ठेवण्यासारखें आहे.

या सामान्य विवेचनाचा मुख्य उद्देश **हिंदुस्थानांतील** लोकांना पुढें जें कार्य करावयाचें आहे, त्याची रूपरेषा ध्यानांत यावी. **हिंदुस्थानाला** आंतले व बाहेरचे पुष्कळ शत्रू आहेत. अजून ते गुप्त आहेत किंवा **इंग्रज** सरकाराच्या दाबानें कमजोर आहेत. पण एकदां हिंदी राष्ट्र आपले पायावर उभें राहिलें, म्हणजे सर्वजण उचल करतील, व सर्वांशीं सामना करण्यास आपण सिद्ध झालें पाहिजे. या शत्रूंचे तीन वर्ग करतां येतील; १ भौगोलिक स्थितीमुळें होणारे शत्रु, २ राजकीय घडामोडींनें होणारे शत्रु, आणि ३ देशांतील मिश्र लोकसमाजांत उद्भवणारे अंतर्गत शत्रु. यांपैकीं पहिल्यांचा आजच विचार करण्याचें कारण नाहीं. कारण **हिंदुस्थानावर** राज्य करणाऱ्या **इंग्रजांशींच** आज त्यांचा विरोध आहे. आणि जरी कदाचित् लोकांना अंतर्गत स्वराज्य मिळालें तरी संरक्षण, सैन्य आणि परराष्ट्रीय व्यवहार **व्हाईसरायाचे** ताब्यांत रहातील तोंपर्यंत परकी राष्ट्रें **इंग्रजांशींच** सामना करतील व लोकांचे वाटेस सहसा जाणार नाहींत. यांपैकीं आम्हास मोठा बागुलबोवा दाखविण्यांत येतो तो वायव्य सरहद्दीवरील पठाण लोकांचा. पण वस्तुतः हे लोक हिंदी लोकांचे मित्रच आहेत. **लाहोर ते पेशावर** प्रांतांतील लोकांशीं त्यांचे सगाईसंबंध होतात, व व्यापारी दळणवळण नित्य चालू आहे. त्यांचें वैर आहे तें त्यांच्या प्रांतांत हळुहळू शिरून, रस्ते, आगगाड्या, नाकीं बांधून त्यांना आपले अंकित करूं पहाणाऱ्या **इंग्रजांशीं**. पूर्वी एकाद्या महत्त्वाकांक्षी **अफगाण** किंवा **मोंगल** सरदारानें शेपन्नास वर्षांनीं पंजाबावर स्वारी केली असेल व त्याचा प्रतिकारही हिंदु राजांनीं वेळोवेळीं केला. पण आजच्यासारखें अहोरात्र चालू असलेले सरहद्द प्रकरण पूर्वीच्या **हिंदुस्थानच्या** इतिहासांत केव्हांही आढळावयाचें नाहीं. **हिंदुस्थानांतील** लोक इतरांचे घर घेऊं इच्छित नाहीं, व इतरांनींहि आपले देशांत शिरूं नये अशी त्यांची इच्छा आहे. सरहद्दीवरील पठाण किंवा **अफगाण** यांनाही दुसऱ्याचा अपहार करण्याची इच्छा नाहीं मग वैर व्हावें कां, व संरक्षण तरी कोणापासून करावयाचें? **इंग्रज** लोक सरहद्दीवरील स्वाऱ्यांचा धाक दाखवितात, व आम्ही तुमचें रक्षण करतों अशी बढाई मारतात. पण ही लुच्चेगिरी आहे. इंग्रजांनीं वायव्य सरहद्दीवर फौज ठेवली आहे ती लोकांचे रक्षणाकरितां नसून इंग्रजी अंमल वाढविण्याकरितां आहे. सरहद्दीवरील शीख गुरख्यांचे सैन्य **इंग्रजी** राज्यतृष्णेला बळी पडत आहे, व **हिंदुस्थानच्या** कोट्यावधि रुपयांचा चुराडा होत आहे. सरहद्दीवरील सर्व फौज गोरी आणि सर्व खर्च **इंग्लंदाच्या** तिजोरींतून या दोन गोष्टी अमलांत आल्या कीं सरहद्दीचा प्रश्न ताबडतोब मिटेल आणि **हिंदुस्थानाच्या** संरक्षणाची भाषाही बंद होईल. संरक्षणाचें स्तोम माजविणाऱ्यांना हिंदी लोकांनीं एकच उत्तर द्यावयास पाहिजे कीं **इंग्रजांनीं** अगोदर येथून बिऱ्हाड उचलावें; मग आमचें आम्ही पाहून घेऊं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सरहद्दीवरील पठाणाप्रमाणें जपानी आरमारवाल्या युरोपियन राष्ट्रांचीही आम्हास भीति दाखविण्यांत येते. तसेंच उत्तरेकडील रशियाचाही बाऊ करण्यांत येतो; पण या सर्व पोकळ धमक्या आहेत. आज सर्व युरोपियन राष्ट्रांत बलिष्ठ इंग्रज आहेत; त्यांनाही हिंदुस्थानावर राज्य करणें अशक्य झाल्यावर दुसरें कोणतें राष्ट्र हिंदुस्थानाकडे पहाण्यास धजावेल ? आणि असला वेडा प्रयत्न करण्याला द्रव्यबल आणि मनुष्यबल तरी कोणाजवळ आहे. महायुद्धानें हतवीर्य झालेलीं युरोपियन राष्ट्रें स्वतः कशीं जगतात याच विवचनेंत आहेत. रशिया आणि जपान यांना घरचींच इतकीं कामें आहेत कीं आणखी शेपन्नासवर्षें तरी हिंदुस्थानाकडे येण्यास त्यांना फुरसत मिळणार नाहीं. जगावर उपकार करण्याच्या मिषानें स्वतःचे खिसे भरणाऱ्या इंग्रजांच्या थापा आम्ही आजवर पुष्कळ ऐकत आलों; व अजूनही त्यांना सडेतोड उत्तर देण्याचें धैर्य आमच्या पुढाऱ्यांत येत नाहीं, हें दुर्दैव आहे. आम्हाला आमचे घराचें रक्षण करतां येणार नाहीं असें लोकांनीं आम्हास बिनदिक्कत सांगावें, व आम्ही निमूटपणें ऐकून मान डोलवावी, हें मानसिक ऱ्हासाचें चिन्ह आहे. हिंदू आफिसर नेमल्यास फौजेंतील मुसलमान शिपायी त्याचा हुकूम मानणार नाहींत, असले बाष्कळ उद्गार काढणारे सेनापति इकडे येतात;पण त्यांना महाराजा जयसिंग, मानसिंग, महादजी शिंदे यांचे हाताखालीं हजारों मुसलमानांची फौज होती ही साधी ऐतिहासिक गोष्ट माहीत नसते किंवा माहीत असून खोटें बोलतात. दैवयोगानें गेलीं दोनशें वर्षें इंग्रजांची चोहोकडे चलती झाली; तीमुळें डोक्यांत शिरलेल्या अहंकाराचे हे फूत्कार आहेत; पण आत्मविश्वास बुजालेल्या आमच्यांतील कित्येक लोकांस ते खरे वाढतात. महायुद्धांत इंग्रजांच्या अतुल शक्तीविषयीं भ्रम बराच दूर झाला. हल्लींच्या चळवळीनें अंशतः स्वराज्य मिळालें तर इंग्रजाच्या सामर्थ्याचा पारा पुष्कळच खालीं जाईल यांत शंका नाहीं.

वस्तुतः भोंवतालचीं राष्ट्रें हिंदुस्थानाचे शत्रु नसून हिंदी स्वातंत्र्याची चातकासारखी वाट पहात आहेत. पृथ्वीवरील सर्वांत मोठें खंड आशिया, त्यांत मध्यवर्ती हिंदुस्थानदेश असल्यानें तो जगाचे राजकारणाचा मध्यबिंदु झाला आहे. पूर्वदक्षिणपश्चिम तिन्ही दिशांकडे जलव्यापार करूं शकणारा हा एकच देश आहे; पण परतंत्र झाल्यानें पूर्वेकडील चीन, जपान, सयाम आणि पश्चिमेकडील अफगाणिस्तान, इराण, व अरबस्तान यांचेमध्यें मोठा बांध पडल्यासारखा झाला आहे. मध्य आशियांतील देशांना हिंदुस्थानाखेरीज समुद्रमार्ग खुला नसल्यानें इंग्रजांचे तोंडाकडे पाहावें लागतें, आणि परदेशाहून सुया, टांचण्या आणावयाच्या झाल्या तरी कराचीला कस्टम ड्यूटी द्यावी लागते. या सर्व लोकांचा रोष हिंदी लोकांवर नसून अंमल करणाऱ्या इंग्रजांवर आहे. हे सर्व लोक हिंदी लोकांचे हितचिंतक आहेत. पण इंग्रजांचे भीतीनें त्यांना तोंड बंद करून बसावें लागतें. पामीर प्रांतांत काशगर, यार्कंड शहरांत इंग्रज, चिनी, तुर्की, रशियन गुप्त हेरांचे डावपेच हल्लीं चालत आहेत, त्यांची हकीकत ऐकली म्हणजे हिंदुस्थानाकरितां किती लोक धडपडत आहेत तें समजतें. पण बिचाऱ्या हिंदी लोकांचा कोणीच विचार करीत नाही. इंग्रज लोकांचें येथून ठाणें उठलें कीं आशियांतील सर्व राष्ट्रांचा स्नेहाचा व्यवहार राजरोस चालू होईल.प्रत्येकाजवळ इतका प्रदेश आहे कीं दुसऱ्याचा अपहार करण्याची बुद्धीच होणार नाहीं; आणि त्यामुळें परस्पराविषयीं भीति आणि मत्सरही नाहींसा होईल.वस्तुतः हिंदुस्थानाचें संरक्षण करावयाचें आहे,तें आशियांतील शेजाऱ्यांपासून नसून युरोपियन आगांतुकापासून करावयाचें आहे. इंग्रजानीं आमचें रक्षण करण्याचा बहाणा करणें म्हणजे एकाद्यान मालकाचें गांठोडें लांबवून तें सुरक्षित ठेवतों म्हणून सांगण्यासारखेंच आहे. हल्लींच्या वाटाघाटींत संरक्षण आणि फौज खातीं इंग्रज व्हाइसरायाकडे ठेवण्याचें लोकांनीं कबूल केलें याचें खरें कारण हीं खातीं इंग्लंडाचे फायद्याकरितांच आहेत; हिंदी लोकांना त्यांशीं कांहीं कर्तव्य नाहीं. आणि त्यांचा खर्चही हिंदुस्थानावर पडूं नये.

हिंदी राष्ट्राला अंतर्गत शत्रु दोन प्रकारचे होणार आहेत.;एक विदेशी म्हणजे राज्यकर्त्यांच्या जातीचे, व दुसरे देशी म्हणजे हिंदुस्थानांतीलच वतनदार, स्वार्थी, आणि अधिकाऱ्यांचे मिंधे. पहिल्या प्रकारचे निसर्गवैरी म्हणजे आमरण विरोध करणारे असून त्यांजपासून क्षमा, शांति किंवा प्रेम केव्हांहि मिळणें शक्य नाहीं. इंग्रजी अमल सदोदित रहाण्यांतच ज्यांचें हित आहे असे सर्व लोक या वर्गांतील होत. आजपर्यंत अनियंत्रित अधिकार चालविणारी नोकरशाही व त्यांचे अनुषंगानें पोटें भरणारे इतर गोरे अगांतुक, मोठमोठीं कंत्राटें मिळविणाऱ्या कंपन्या, सरकाराला विलायती माल पुरविणारे कारखाने, सरकारी पैशानें व्यापार करून दलाली, कमिशन्, हुंडणावळ वगैरे रूपानें लोणी खाणारे अडते, आणि ओळखीदेखीनें हिंदुस्थानांत प्रवासाला येऊन चैन भोगणारे पाहुणे, हे सर्व इंग्रजी नोकरशाहीचे वऱ्हाडी स्वराज्य झाल्याबरोबर निराधार आणि निरुद्योगी होणार. ते सर्व इतःपर हिंदी राष्ट्राचे निसर्गवैरी होऊन शक्य-तितका त्रास दिल्याशिवाय रहाणार नाहींत. नोकरशाहीला राज्यकारभाराची पूर्ण माहिती असल्यानें हरएक जागीं अडथळे, अडसर आणि खुंटे घालतील. आज अनियंत्रित सत्ता वापरणारा कलेक्टर देशी दिवाणाचे हाताखालीं स्वतः कामाची दिरंगाई करील, आणि हाताखालच्या लोकांनाहि काम करूं देणार नाहीं. पांच मिनिटांत फुटाण्यासारखे आरोपी तुरुंगांत पाठविणारा माजिस्ट्रेट सहा महिने खटले लांबवून काम तुंबवील. घरें गुरें लिलांव करून सरकारसारा वसूल करणारे मुलकी कामगार हात जोडून बसतील, क्षुल्लक कारणकारतां लाठी चालविणारे पोलीस दंगाधोप्यांना उत्तेजन देतील किंवा पैसे खाऊन गुन्हेगार पळवितील. तात्पर्य जेणें करून देशी दिवाणांचा कारभार ढिला, कमजोर आणि लोकांना अप्रिय करतां येईल त्या सर्व युक्त्यांनीं देशी दिवाणांना कारभाराला नालायक ठरविण्याचे प्रयत्न नोकरशाही करील. हल्लींहि इंग्रजी मुलखांत उत्तम व्यवस्था ठेवून शेजारच्या संस्थानांत बेबंदशाही माजविणारे इंग्रज कामदार आढळतात. मग दिवाणांच्या राज्यांत त्यांना पुष्कळच अवसर सांपडेल. मागच्याला बरें म्हणविणाऱ्या दिवाणांच्या जुलमी अंमलाला कंटाळून लोक पुन्हां इंग्रजांना शरण जातील आणि राज्य करण्यास बोलावतील, ही गोष्ट अगदींच असंभवनीय नाहीं. हा परिणाम टाळण्याकरितां सर्व विलायती नोकरवर्ग एकदम काढून टाकणें हा एकच उपाय आहे; पण हिंदुस्थानासारखा अवाढव्य देशाच्या राज्यकारभारांत अशक्य आहे. इतक्या जागा एकदम भरण्यास लायक देशी लोक मिळणें कठिण, आणि एकानें सोडलेलीं अधिकार सूत्रें एकदम हातीं घेणें दुसऱ्याला अवघड. अधिकारक्रांति आस्ते आस्तेच झाली पाहिजे, व ती पुरी होईपर्यंत दिवाणानीं त्राव भोगलाच पाहिजे. दुसरी बाब पैशाची. इंग्रज सरकारच्या पतीमुळें एकादे सालीं वसूल न झाला तरी वाटेल तितकें कर्ज मिळून राज्यशकट हांकला जातो; पण देशी दिवाणांना नवीन कर्ज मिळणें कठीणच; पण जुन्याचे तगादे मात्र मागें लागतील. आज पैसा यूरोपांत व अमेरिकेंत आहे. इंग्रजांनीं हात आखडल्यावर इतर यूरोपियन राष्ट्रेंही नकारच देणार; आण अमेरिका कर्जासाठीं भरपूर जामीन आणि मोबदला मागणार. इराणानें रेल्वे बांधण्याकरितां कर्ज मागितलें, तेव्हां देशाची सर्व तिजोरी अमेरिकेनें आपले ताब्यांत मागितली. हल्लीं चीन देशाला अशीच कर्जाची नड आहे तर कोणी यूरोपियन राष्ट्र कर्ज देत नाहीं हिंदुस्थान इंग्रजी अमलांतून मुक्त झाल्यास कांहीं वर्षें तरी त्याची आर्थिक स्थिति पोरक्या पोराप्रमाणें होईल. पैसा सर्वांना गुलाम करतो; आणि पैशाकरितां कोणाचे गुलाम होण्याची पाळी हिंदुस्थानास आली तर इतकी चळवळ करून आम्ही मिळविलें काय व आजची स्थिति काय वाईट आहे ? तिसरी बाब हुकमतीची. आज इंग्लंडाच्या दराऱ्यामुळें हिंदु, मुसलमान, पारशी सर्व जातीचे लोक इंग्रजाचे हुकमतीनें चालतात; पण देशी दिवाणांची आरंभीं तरी सर्व जातांवर हुकमत चालेल कीं नाहीं, याची शंका वाटते, जी गोष्ट इंग्रजी मुलखांत बिनबोभाट अमलांत येते, तीच एकाद्या संस्थानिकानें केल्यास किती भानगडी उत्पन्न होतात तें हल्लींही आपण पहातों. संस्थानी कामगार कमी हुशार किंवा अधिक जुलमी असतात असें नाहीं. कारण ते बहुधा ब्रिटिश अंमलांतील पेनशनरच असतात. पण इंग्रज सरकाराचा दरारा त्यांचा पाठीराखा नसतो. स्वराज्यअंमलांत दिवाणांची अशीच स्थिति होणार असल्यास आम्ही मिळविलें काय, असा साहजीक प्रश्न उत्पन्न होतो. चवथी बाब साधनांची. राज्यकारभार, देशसुधारणा, रेल्वे, रस्ते, कालवे, तारा, पोस्ट वगैरे लोकांच्या सुखसोयी यांना लागणारे हरएक प्रकारचें सामान इंग्रज सरकार नुसत्या पतीवर वाटेल तिकडून आणूं शकतें; पण हिंदी दिवाणांना इंग्रजांच्या मदतीशिवाय तें साधेल काय, हा मोठाच प्रश्न आहे. या व अशाच दुसऱ्या अडचणी काल्पनिक नाहींत, किंवा स्वराज्य मिळविण्याच्या प्रयत्नापासून लोकांना पराङ्मुख करण्याकरितां येथें सांगितल्या नाहींत. स्वराज्य मिळविलें पाहिजेच, व तें मिळवितांना कोणत्या अडचणींना तोंड देण्याकरितां आपण तयारी केली पाहिजे, तें समजण्याकरितां वरील विवेचन केलें पाहिजे. आपणास जावयाचा मार्ग बिकट आहे, उघड्या डोळ्यांनीं खाचखळगे नीट पाहून पाऊल टाकलें पाहिजे, व एकादेवेळेस घसरलें तरी निरुत्साह न होतां नेटानें पुढें गेलें पाहिजे, हें सांगण्याकरितांच वरील अडचणींचें दिग्दर्शन केलें आहे. आजची नोकरशाही आणि त्यांचे इष्टमित्र आपले निसर्गवैरी आहेत, हें ओळखूनच आपणास स्वराज्याचा गाडा हकावयाचा आहे. मतलबाकरितां एकमेकाचे वाटेवर त्यानीं कितीही साखर पेरली, तरी इंग्रज नोकरशाहा आणि हिंदी लोक यांचें गोत्र कधींही पटावयाचें नाहीं. अधिकारच्युत झालेले इंग्रज आणि त्यांचे आश्रित हिंदी खुषमस्करे स्वराज्याचे कायमचे विरोधी आहेत; आणि केव्हांतरी आपणास त्यांचा संबंध अजीवात तोडावा लागणार हें समजून वागावयास आपण शिकलें पाहिजे.

विदेशी शत्रूंपैकीं बिनसरकारी दुसरा वर्ग, इंग्लिश कंपन्या, कारखाने, मळेवाले, ब्यांका आणि व्यापारी होत. कंपन्यांमध्यें प्रमुख रेल्वे, आगबोटी, कंत्राटदार, इंजिनियरिंग कारखाने, तारायंत्र, टेलीफोन, वायरलेस, आणि आतां विमानें. या सर्व विलायतेंतील असून त्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूपानें सरकारचे तिजोरींतील हिंदुस्थानाचा पैसा पोंचतो. कोणाला चार पांच टक्के व्याजाची हमी, रेल्वेना जमिनी फुकट किंवा अल्प किंमतींत, आगबोटींना सरकारी खर्चानें धक्के, पोस्टाच्या कंत्राटाबद्दल वार्षिक नेमणुका, रेल्वे व तार कंपन्यांना मोनोपली व इतर जरूरीच्या सवलती, नोकर लोकांना दाबांत ठेवण्यास कायद्याची मदत, आणि पोलीसांचा बंदोबस्त, असल्या सर्व प्रकारच्या सरकारी मदतीनें या विलायती कंपन्या हिंदुस्थानांत बिनधोक धंदा चालवून हिंदुस्थानाचें द्रव्य हरण करतात. शिवाय रेल्वे, तारा व टपालखातें यांची मोनोपली सरकाराकडे असल्यानें तद्द्वारा लोकांचे सर्व खाजगी व्यवहारावर सरकाराची बारीक नजर रहाते तें वेगळच. तारापत्रांचें गुप्त निरीक्षण, अमूक मनुष्य अमुक दिवशीं अमकीकडे गेला त्याचे टिकिटाची पोलीसांत नोंद, जागोजागीं उतारूंच्या मालाची तपासणी, परदेशी जाण्याला पासपोर्टाचे निर्बंध, आणि विवक्षित माणसांवर पोलीसांची नजर इत्यादि उपायांनीं हिंदुस्थानची प्रजा आज गुन्हेगाराप्रमाणें वागविण्यांत येत आहे. त्याला इंग्रजी कंपन्यांचीच मदत आहे. हिंदुस्थानच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पैशावर चरणाऱ्या या **विलायती** कंपन्यांनीं लोकांना गुलाम करून टाकलें आहे. त्यांची शिदोरी बंद झाली कीं चोहोंकडे गिल्ला होणारच. हें इंग्रजी नोकरशाहाचें जांवई, मेव्हणे आणि आश्रित कांहीं वर्षें तरी देशी दिवाणांना सुखानें राज्य करूं देणार नाहींत. कायद्याच्या बळावर नाचणारे हे लोक त्याच कायद्यांनीं नव्या राज्यकर्त्यांस अडथळे करतील. रेल्वेचे अपघात होतील, बोटी उशारांने येतील, तारायंत्राच्या तारा तुटतील, **इंग्रजी** कारखाने रद्दी माल पुरवितील आणि गोरे नोकर सोडून जातील किंवा संप करून काम बंद पाडतील. या कंपन्यांचें विलायती भांडवल एकदम काढून घेण्यांत येईल, व कंपन्यांचें सर्व कामकाज बंद पाडण्याचे हरएक प्रयत्न होतील. **हिंदुस्थानाचा** सर्व राज्यकारभार नोकरशाहीचे हातांत आहे तसा लोकांचा इतर सर्व खाजगी आणि सार्वजनिक व्यवहार या आश्रित कंपन्या चालवितात. **हिंदुस्थानांतील** लोक किती परावलंबी झाले आहेत, हें समजण्याला प्रत्येकानें आपले नित्याचे व्यवहार बारकाईनें तपासून पहावे. आगगाड्या बंद झाल्यास धान्य मिळणार नाहीं, मिठागरें मोडल्यास मीठ मिळणार नाहीं आणि आगबोटी थांबल्यास दिव्याला ग्यासलेट मिळणार नाहीं. स्वराज्य मिळविणें म्हणजे नुसते कायदे-कौन्सिलांत लोकनियुक्त सभासद पाठवून दिवाण नेमणें नव्हे, तर राज्यांतील अठरा कारखाने **युरोपियनांचे** मदतीशिवाय स्वतः चालविण्यास तयार होणें होय. प्रथम कांहीं वर्षें हें कठीण पडेल व पुष्कळ त्रास होईल. पण तो सोसून अडचणींतून पार पडण्यास आपण कंबर बांधली पाहिजे. पुढील पिढीला योग्य शिक्षण देऊन या कामाकरितां तयार केलें पाहिजे, व चालू पिढीनें वायफळ वाद न वाढवितां मुख्य कार्यावर नजर ठेवली पाहिजे.

राहिले **विलायती** व्यापारी. यांना साक्षात् सरकारची मदत नसली तरी राज्यकर्त्यांचे जातभाई असल्यानें पुष्कळ सवलती मिळतात. रालीब्रदर्स, सी. पी. सिंडिकेट किंवा **बंगालमधील** खाणीवाले यांना रेल्वेचे स्पेशल डबे व सवलतीचे दर मिळतात. वेल्श कोल पाठवावयाचा असल्यास तावडतोब वागन मिळते. पण येथील लोकांचा माल महिनोंगणती स्टेशनावर पडून रहातो. विलायतेस पाठविण्याच्या मालाला मुंबईपर्यंत अल्प भाडें, पण तोच **कल्याणास** किंवा **ठाण्यास** पाठवावयाचा असल्यास दुप्पट चौपट भाडें. **म्यांचेस्टरचें** कापड **लंडनपेक्षां मुंबईस** स्वस्त मिळतें. असें कां? पहिल्या दुसऱ्या वर्गाच्या उतारूंना सर्व ऐषआराम, सवलतीचे दर व सोयी, पण तिसऱ्या वर्गाला कांहीं नाहीं. स्टेशनावर वरच्या वर्गांना वेटिंगरूम, पण तिसरे वर्गाला निजण्याला मैदान. हा पंक्तिप्रपंच अर्थात् गोऱ्या लोकांकरितां. रालींचा एजंट कलेक्टराचे बंगल्यावर जातो, आणि वाटेल तेव्हां शिपाई घेऊन पैसे व माल वसूल करतो. पण देशी व्यापाऱ्याला कोर्टांत फिर्याद करून हिसके मारीत बसावें लागतें. पांच सहा वर्षांपूर्वी एका **इंग्रजी** कंपनीचें दिवाळें वाजण्याची वेळ असतां **मुंबई**सरकारानें इंपिरियल ब्यांकेमार्फत मोठी रक्कम देऊन अब्रू वचावली; पण देशी व्यापाऱ्याला अशी मदत केल्याचें कोठेंहि ऐकिवांत नाहीं. सारांश, **ईस्टइंडिया** व्यापारी कंपनीनें **हिंदुस्थानदेश** काबीज केला तो राणीसरकारानें ताब्यांत घेतला तरी इंग्रजी व्यापाऱ्यांची चलती पूर्वीप्रमाणें चालतच आहे. हिंदुस्थानाचे राज्यापासून इंग्रजांना दुसरा कांहीं फायदा असो वा नसो, **इंग्रज** लोकांचे दीड हजार कोटी रुपये भांडवल आज हिंदुस्थानांत गुंतलें आहे त्याची हमी ते मागणारच; व ती दिल्याशिवाय येथून जावयाचे नाहींत. अधिकाराचे पाश आम्ही कायदेभंगानें तोडूं शकूं. पण हा पैशाचा अदृश्य गळफांस कसा तोडणार? आमचे हातांत पूर्ण स्वराज्य आलें तरी हे **विलायती** मारवाडी दाराशीं तगादा करीत बसणारच. **जर्मनी**सारख्या प्रबळ राष्ट्राला त्यांनीं मेटाकूस आणून सोडलें आहे व **रशियाची** चोहोंकडून नाकेबंदी केली आहे. **हिंदुस्थान** तर चारी बाजूंनें उघडेंच आहे. स्वराज्य मिळालें तरी सुरळीत चालण्याचे मार्गांत ही मोठी धोंड आहे.

विदेशी शत्रूंपैकीं तिसरा वर्ग इतर **युरोपियन** राष्ट्रांचा. **हिंदुस्थानांत** साक्षात् संबंध असलेलीं युरोपियन राष्ट्रें दोनच. **फ्रान्स** आणि **पोर्तुगाल. फ्रान्सची चंद्रनगर, पांडेचरी** आणि **माही** या वसाहती आहेत, व **पोर्तुगालचीं गोवा दमण** आणि **दीव** आहेत. या चिमुकल्या वसाहती केवळ इंग्रजांच्या आश्रयानेंच टिकल्या आहेत, त्यामुळें इंग्रजी अंमल कायम रहाण्यांत या राष्ट्रांचेंही हित आहे. वस्तुतः या वसाहतींमुळें सदर राष्ट्रांना कांहीं फायदा नाहीं, उलट खर्चच आहे. पण इभ्रतीकरतां ठेवल्या आहेत. **इंग्रज** गेल्यावर हे पाठराखणी तरी कशाला रहातात? भोंवतालची **ब्रिटिश** प्रजा स्वतंत्र झाल्यावर **गोवा** किंवा **चंद्रनगर** येथील लोक थोडेच स्वस्थ बसणार आहेत? **हिंदुस्थानांत** कायदेभंग सुरू झाल्याबरोबर फ्रेंचांच्या **आनाम** प्रांतांत तेच झालें. ब्रिटिश अंमलांतील लोकांना जे हक्क मिळतील ते **पोर्तुगाल व फ्रेंच** देशांची हिंदी प्रजा मागितल्यावांचून व मिळविल्यावांचून रहाणार नाहीं. **फ्रान्स** किंवा **पोर्तुगाल**पासून आपणास साक्षात् अडथळा होणार नसला तरी मदत तरी खास होणार नाहीं. या राष्ट्रांनीं **इंग्लंडाशीं** केलेले तहनामे उद्यां स्वतंत्र **हिंदुस्थानाला** लागू करावयाचे कीं नाहीं हा प्रश्न निघेल तेव्हां बऱ्याच भानगडी उपस्थित होतील.

विदेशी शत्रूंचा विचार झाल्यावर स्वराज्याचे अंतर्गत शत्रूंचाही विचार करणें जरूर आहे. हे अंतर्गत शत्रु परिस्थितीमुळें तात्पुरते विरोधी झाले आहेत; पण कालांतरानें शहाणे झाले म्हणजे सार्वत्रिक जनप्रवाहांत मिळून जातील हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. विदेशी निसर्ग शत्रूप्रमाणें हे कायमचे विरोधी नसून स्वार्थ बुद्धीनें किंवा अल्प दृष्टीनें कांहीं काळ स्वराज्याला अडथळे करतील. सबब त्यांना गोडीगुलाबीनें किंवा शांतवृत्तीनें वागवून आपलेसें करून घेणें हाच त्यांचा विरोध मोडण्याचा खरा मार्ग आहे. जवाहीरलाल नेहरूंनीं सांगितलेले देशी वतनदार लोक या वर्गांत येतील. नोकरशाहीनें भेदनीतीकरितां कित्येकांना चढविलें, आपसांत भांडणें लावण्याकरितां कित्येकांना जवळ केलें, नेमणूका, नोकऱ्या, कंत्राटें व पोकळ पदव्या देऊन शेकडों अंकित केलें, आणि जहागिरी, वतनें, इनामें वंशपरंपरा चालविण्याचीं आश्वासनें देऊन पुष्कळांना मिंधे केलें. जे इनामदार सदर आश्वासनें विसरून राष्ट्रीय चळवळींत पडतात त्यांचीं इनामें जप्त करण्याच्या धमक्याही निघूं लागल्या आहेत. तात्पर्य हें सर्व इंग्रज सरकाराचे वतनदार इंग्रजी राज्याचे आधारस्तंभ आणि स्वराज्याच्या मार्गांतील कांटे आहेत. **महाराजा वर्द्धान**सारख्या बड्या जमीनदारापासून सरदार मुतालिकासारख्या छोट्या इनामदारपर्यंत सर्व ऐतखाऊ, **इंग्रज** सरकाराचे अभीष्टचिंतक व स्वराज्याचे प्रच्छन्न विरोधी आहेत. आपल्या इनामाचे रक्षणाकरितां **इंग्लंडांतील** मुख्य प्रधानाकडे तारा करतात; पण हिंदुस्थान देशाविषयीं स्वप्नांत तरी विचार करतात कीं नाहीं याची वानवाच आहे. आपलें कुटुंब आणि चिमुकली वतनवाडी यांतच ज्यांना ऐहिक सर्वस्व दिसतें, त्यांना देश कोठून आठवणार? आणि देशही त्यांना पारखाच पहातो. सरदारकीकरितां अधिकाऱ्यांना चहापाण्या देणारे व नोकरीकरितां चहाड्या करणारे लोक सर्व देशांत असतात; आज इंग्रजांचे मागें आहेत, उद्यां स्वराज्य झालें म्हणजे देशी दिवाणांचे खुषमस्करे होतील. देशाच्या स्वातंत्र्ययुद्धांत असल्या शाळू-सोबत्यांचें महत्त्व नसतें. सबब त्यांजकडे दुर्लक्ष करणेंच बरें.

या अंतर्गतविरोधी वर्गांत मुख्य स्थान मुसलमानांस दिलें पाहिजे. बहुतेक मुसलमानांची जन्मभूमि **हिंदुस्थानच** असतां त्यांना देशापेक्षां आपल्या जातीचें प्रेम अधीक वाटतें; निदान त्यांचे पुढारी तसें म्हणतात. मुसलमान अल्पसंख्य असल्यामुळें **हिंदुस्थानाला** स्वराज्य दिलें तर बहुसंख्य हिंदु लोक मुसलमानांना छळतील या सबबीवर सर्व प्रांतांत मुसलमानांचें प्राबल्य राखण्याची त्यांची धडपड चालू आहे. **सर सय्यद अहमदनें** या चळवळीस आरंभ केला. सर सय्यदनें १८५७ चे बंडांत साहेबांचे जीव वांचविले, व नबाबास फसवून **बिजनोर** प्रांत **इंग्रजांचे** घशांत घातला. या कामगिरीबद्दल **सर सय्यद अहमद** इंग्रजांचे विश्वासपात्र दोस्त झाले. अलीगडला शिक्षणाचे मिषानें मुस्लीम चळवळीचा अड्डा स्थापून **पंजाबांतील** मुसलमानांचा व शीख आणि हिंदूंचा वैरभाव वाढविण्याचें महा पवित्र काम त्यांनीं आरंभिलें. **वहाबी** लोकांनीं इंग्रजांविरुद्ध बंड केलें हा **हंटर साहेबाचा** आरोप खोडून काढण्याच्या मिषानें सरहद्दीवरील व पंजाबांतील मुसलमानांनींच **रणजीतसिंगाचे** पश्चात् शिखांचें राज्य **इंग्रजांस** मिळवून दिलें. अशी सरकाराची **सर सय्यद आहमदांनीं** खात्री करून दिली. * सारांश सरकारदरबारीं मुसलमानांची तरफदारी करून हिंदु-मुसलमानांची तेढ उत्पन्न करणारे **सर सय्यद** हल्लींच्या तंट्याचे जनक म्हटलें तरी चालेल. मतलबी **इंग्रज** आणि आपमतलबी **मुसलमान** यांचें मेतकूट जमून हिंदु व इतर जातींवर कुरघोडी करण्याचा हा डाव आहे; आणि हल्लीं मुसलमानांची स्वतंत्र निवडणूक **पंजाबबंगालमध्यें** बहुमत, इतर प्रांतांत एक तृतीयांश जागा आणि सरकारी नोकऱ्यांत हक्काचा अंश, असे जावईहक्क मुसलमान मागत आहेत. कोठें अल्पसंख्याक म्हणून हक्क मागतात, व कोठें बहुसंख्याक म्हणून मागतात. तात्पर्य मागणीला तत्त्व किंवा धरबंद मुळींच नाहीं. टिकाकारांच्या आक्षेपांना उत्तर देतां येत नाहीं, म्हणून आमचें मागणें न दिलें तर आम्ही तुमच्या वाटेंत आडवे पडूं व तुम्हाला स्वराज्य मिळूं देणार नाहीं, अशाही धमक्या देतात. मुसलमानांत इतका शिरजोरपणा आला तो अंतस्थ इंग्रज अंमलदारांच्या चिथावणीनें आला आहे, हें उघड आहे. आपण साहेबांच्या हातांतील बाहुलें होऊन नाचतो हें कळण्याची अक्कल मुसलमानांत नाहीं, हें देशाचें दुर्दैव आहे. परस्थांच्या भुलथापांनीं फसून स्वदेशबांधवाशीं भांडणारे अस्पृश्य, मराठे वगैरे अल्पसंख्य लोक असेच वाहवत होते; पण सुदैवानें त्यांची दृष्टि निवळत चालली आहे. वस्तुतः मुसलमानांच्या धमक्यांना आम्ही भिण्याचें मुळींच कारण नाहीं. **नर्मदेच्या** दक्षिणेस हा प्रश्न विशेष जोराचा नाहीं, आणि मराठ्यांनीं पूर्वींच मुसलमानांना नरम केलें असल्यामुळें त्यांना त्यांच्या धमक्यांची मुळींच भीति वाटत नाहीं. **अबदालीला अटके**पलीकडे घालवून देणारे व दिल्लीचें तख्त फोडणारे मराठे तेहतीस टक्के आणि ५१ टक्के मुसलमानांना थोडीच भीक घालणार आहेत! तसेंच शीख लोकही दोन हात करण्यास तयार आहेत. पण कांग्रेसच्या चळवळीनें आपलें डळमळणारें बिऱ्हाड सांवरण्याकरितां इंग्रजी नोकरशाहीनें हा मुसलमानांचा बागुलबोवा उभा केला आहे. व आमच्यांतील कांहीं हवशे मवाळ त्यांचेपुढें कुरनीश करण्यास तयार झाले आहेत.

वस्तुतः मुसलमानांच्या मागण्यांचे मुळाशीं अंतस्थ डाव निराळाच आहे. त्यांच्या मुख्य मागण्या पांच १ स्वतंत्र निवडणूक, (२) पंजाबांत कायद्यानें दिलेलें कायमचें बहुमत, (३) **मध्यवर्ती सभेंत** एक तृतीयांश, आणि (४) **सिंधप्रांत** तुटक, (५) आणि सर्व शेषाधिकार प्रांतिक सरकारांना. या परस्परविसंगत मागण्यांची संगति लावली म्हणजे त्यांतील इंगित लक्षांत येईल. वायव्य

* Life and Work of Sir Sayad Ahmad, by G. F. L. Graham p. 141

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सरहद्दीचा प्रांत व **बलुचिस्तान** यांत मुसलमानांचें बाहुल्य आहेच. **सिंध** वेगळा करावयाचा व **पंजाबांत** प्राबल्य करावयाचें; व मग हे चारी प्रांत एकत्र करून एक मोठें मुसलमानी संस्थान समुद्रकिनाऱ्यालगत **हिंदुस्थानाच्या** पश्चिमेस बनवावयाचें, म्हणजे **आफ्रिकेपासून हिंदुस्थानाच्या** अंतर्भागापर्यंत प्रचंड मुसलमानी संघ तयार होईल. शेषाधिकार प्रांताकडे असल्यानें मध्यवर्ती सरकारचा त्यावर अंमल चालणार नाहीं. तसेंच **बंगाल** व **आसामांत** मुसलमानांचें प्राबल्य स्थापन झालें म्हणजे पश्चिम **चीनांतील** मुसलमान लोकांशीं सहज एकी करतां येईल. या दोन चक्रांमध्यें **हिंदुस्थानांतील** हिंदू लोकांस चेपून टाकण्यास काय उशीर? **टर्कीच्या अब्दुल हमीदनें पान इस्लामी** व **खिलाफत चळवळ** सुरू केली तेव्हां ही कल्पना उद्भवली. व हल्लींच्या मुसलमानांच्या मागण्या बर्यायानें तिचेच प्रतिध्वनि आहेत. आणि मागण्या न दिल्यास पश्चिमेकडील अरेबिया, इराक, इराण, व अफगाणिस्तान हीं मुसलमानी राष्ट्रें **इंग्रजां**विरुद्ध उठवूं अशा प्रच्छन्न धमक्या निघत आहेत. **इंग्रजांना** हा डाव कळत नाहीं असें नाहीं; पण तूर्त **हिंदु** लोकांच्या कांग्रेसला पायबंद घालण्याकरितां **मुसलमानांच्या** मागें दडण्यास हरकत नाहीं, असें नोकरशाहीस वाटतें. दोन सोदे एकमेकांस फसवू पहात आहेत. हिंदु-समाजानें दोघांचाहि डाव ओळखून आतांपासून सावध राहिलें पाहिजे. वस्तुतः **मुसलमान** वरून एक दिसले तरी त्यांच्यांत अनेक जाति व धर्मपंथ आहेत. शिया व सुन्नी यांचा जुना तंटा आहे. त्याशिवाय हनाफी वहाबी यांच्या मारामाऱ्या आहेतच. हबशी व आरब खेराज **मुंबई** इलाख्यांतील सर्व मुसलमान मूळचे हिंदु बाटलेले असून **हिंदुस्थान** हीच त्यांची मातृभूमि आहे. **खोजा, बोहरी, मेमण, कोंकणी** हे सर्व धर्मानें **महंमदी** असले तरी हिंदभूमीचे पुत्र म्हणवितात **बंगाल्यांतील**, व **मद्रासे**कडील मुसलमानहि तसेच आहेत फक्त **सिंध, पंजाब** आणि **संयुक्तप्रांतां**तील मुसलमानांत परदेशस्थ मिसळलेले आहेत. त्यांना माल देशापेक्षां आपल्या जमातीचें महत्त्व अधिक वाटतें. **सय्यद, मोंगल, पठाण, तुर्की, आरब** या लोकांचा ओढा अर्थातच **हिंदुस्थानापेक्षां** स्वदेशाकडे आणि जमातीकडे अधिक आहे, आणि हल्लींचा **हिंदुमुसलमानांचा** वाद याच लोकांनीं उपस्थित केला आहे. या लोकांना उपरी समजून त्यांचे हिंदी प्रजेचे सर्व हक्क काढून घ्यावे, व त्यांना स्वदेशास जावयास सांगावें हेंच न्याय्य होईल. एकदां पुढील राज्यव्यवस्था कायम झाली म्हणजे हा वाद आपोआप मिटेल.

हिंदुस्थानांत दुसऱ्या ज्या कांहीं अल्पसंख्याक किरकोळ जाति आहेत, त्यांचा विशेष विचार करण्याचें कारण नाहीं. **पारशी, ज्यू, आंग्लो-इंडियन, ख्रिश्चन** वगैरे वर्ग अल्प असून उगवत्या सूर्याला नमन करणारे आहेत. जी राज्यपद्धति त्यांचे धंदे व रीतिरिवाज सुरक्षित चालवील ती त्यांना पसंत होईल. या लोकांना स्वतःचा देश नाहीं व स्वतंत्र राष्ट्र नाहीं. तेव्हां मिळेल तेथें सुखासमाधानानें रहाणें त्यांना भागच आहे. हल्लींची नोकरशाही साधेल तेथें त्यांचा उपयोग करून घेते त्यामुळें पुष्कळदां हे लोक देशद्रोही बनतात. वेळोवेळीं त्यांची कानउघाडणी करून त्यांना सुमार्गावर ठेवणें हाच याला उपाय आहे. दारूभक्तेवाल पारशी किंवा पाटलोणवाले ख्रिश्चन कित्येक वेळां इतर लोकांना जाचक होतात, पण कानउघाडणी आणि सामाजिक बहिष्कार हीं अस्त्रें त्यांना पुरे आहेत.

सारांश स्वराज्य मिळालें तरी आपणांस पुढें कसे विरोध येतील त्याचा पहिल्यांपासून विचार करूं लागलें पाहिजे. इतःपर पुनः **इंग्रजी पार्लमेंटापुढें** जाण्याचा प्रसंग न येईल याविषयीं मात्र आपण फार खबरदारी घेतली पाहिजे. सन १८६० सालीं **इंग्रजी पार्लमेंटाचा** अंमल **हिंदुस्थानावर** बसला तो अजिबात काढून टाकण्याची हीच वेळ आहे. बादशहाचें छत्र डोक्यावर असलें तरी चालेल, पण **सेक्रेटरी ऑफ स्टेट** त्याचे कौन्सिल, तसेंच **गव्हर्नर जनरल** आणि गव्हर्नरांचीं कौन्सिलें यांचा सासुरवास नाहींसा झाल्याशिवाय आम्हास स्वराज्य, किंवा डोमिनियन स्टेटस किंवा स्वातंत्र्य मिळालें असें कदापि म्हणतां येणार नाहीं. **हिंदुस्थानाला** गुलाम करणारी नोकरशाही निर्बल होईल तेव्हांच हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळालें असें म्हणतां येईल.

डांग्या खोकला—

हा संपर्कजन्य साथीचे रोगांपैकीं होणारा प्राणघातक व्याधि आहे. उष्णतेनें श्वासमार्ग दाह होऊन फुफुसांच्या संकोचामुळें हा होतो. खोकल्याच्या उमळी जोराच्या येऊन श्वासोच्छ्वास गुदमरतो व आकडा येते तोंड ओठ डोळे लाल होतात व मुजतात. कष्टानें चिकट वांती होते. उमळीनें मुलांची प्राणांतिक अवस्था होते. यानें मुलें बहुतकरून दगावतात. यावर आमचे औषधींनें १५ दिवसांतच मुलें बरीं होतात असें खात्रीचें औषध कोठेंच नाहीं. हें पैजेनें सांगतो. किं. १॥रु. शि. ट. ख. वैद्य शास्त्री धन्वंतरी फार्मसी पुणें.

'झंडु'— द्राक्षासव

द्राक्षासवाचा प्रत्येक डोस
शक्ति व स्फूर्तिवर्धक आहे!

(—मृद्विकारिष्ट— शारंगधर म. अ. १०)

रामबाण औषध

सरदी घालविणारें	भूक वाढविणारें
शौचास साफ करणारें	झोंप आणणारें
शक्ति देणारें	स्फूर्ति आणणारें

रुचिकर पेय

झंडु फार्मास्युटिकल वर्क्स लि० मुंबई, नं १४
पुण्याचे सोल एजंट—मनमोहन ब्रदर्स, लक्ष्मीरोड पुणें.
नाशिकचे एजंट—नाशिक मेडिकल स्टोअर्स, मेनरोड
किंमत:—अर्धा रत्तल ॥१३, एक रत्तल रु. १॥, दीड रत्तल रु. २.

जा ग र ण.

मग तें मौजेखातर केलेलें असो, पोटासाठीं करावें लागलेलें असो किंवा प्रकृतीमुळें घडलेलें असो; क्षयादि अनेक भयंकर रोग उत्पन्न करून आयुष्याची हानी करतें. म्हणूनच गाढ झोंप लागून जागरणापासून होणारे अपाय टाळण्यास थंडगार सुवासिक व केशवर्धक लेमन क्रीम अर्थात् लिंबलोणी डोक्यास चोळा, विद्यार्थी, नटवर्ग, पोस्ट व तारमास्तर व रेल्वेनोकर यांना फारच उपयोगी. ६ औं. बा. व्ही. पी. ॥ रु. ३ बा. ३ रु.
केलडिन केमिकल कंपनी अंधेरी. मुंबई.

शुद्ध सोनें-चांदीचे दागिने व भांडी.

आमचेकडे डौलदार व खात्रीचीं मिळतील. मालाचे खरेपणाबद्दल जबाबदार आहों. माल व्ही. पी. नें पाठवूं. आमचा माल मुंबईत गोविंद आणि मंडळी पोर्तुगीज चर्चजवळ रामचंद्र बिल्डिंग रूम नं. ११५ गिरगांव मुंबई येथेंही मिळेल.

हरी वासुदेव भावे, सराफी दुकान सांगली, S.M.C.

लॅक्डोल

लॅक्डोलनें "ग्रोंचास (जुलाब, मुरडा, कळ न होतां) साफ होते. भूक वाढते. व शारीरिक सामर्थ्य वाढते. किं. १ रु.
दूध आणि कं. पुणें २

मुंबईच्या घड्याळाच्या बाजारांत जंगी खळबळाट !



स्वित्झरलंडच्या प्रख्यात कारखान्यांत बनलेलें ३ वर्षांच्या गॅरंटीचें, हलक्या कडीचें, व सेकंड कांटा असलेलें, चित्रांत नमुना दाखविल्याप्रमाण हुबेहुब फॅन्सी डिझाईनचें रिस्ट-वॉच, नंबर ३१३ किं. रु. ५; सुबक नमुन्याचे रेडियम किं. रु. ६; चांदीचे फुलज्युवेल लिव्हर किं. रु. १०; गोल्डगोल्डचे १० वर्षांच्या गॅरंटीचें किं. रु. १३.
आजच लिहा:—धी यंग इंडिया वॉच कंपनी, ग्लोब सिनेमासमोर, मुंबई नं. ४

पद्मदल.

नाशिक क्षेत्राला भिन्न-भिन्न काळीं भिन्न भिन्न नांवें होतीं. 'पद्मपूर' हें त्याचें अत्यंत प्राचीन नांव व त्याचे स्मरणार्थ म्हणून या संग्रहास 'पद्मदल' असें नांव दिलें आहे. या संग्रहांत २२ कवि व २ कवयित्री यांच्या ६० कविता संकलित केल्या आहेत. प्रत्येक कवीनें आपल्या कवितांची निवड स्वतःच केली असल्यामुळें बहुतेक कविता सरस अशाच आहेत. कवींच्या मनःप्रवृत्तींचा परिचय करून घेण्यास अशा प्रकारची निवड बऱ्याच वेळां उपयोगी पडते व हाच तिचा विशेष आहे. किं. ८० ट ख. व व्ही. पी. खर्च ८२ शिवाय पडेल.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



लीलावती मुंशी. (३ म. साधी.)

श्री. सत्यवती कोल्ही

हिंदुस्थान टाईम्सचे चालक श्रीकृष्णदास कोल्ही यांच्या पत्नी. तीन म. साधी व ५० रु. दंड.



सौ. पार्वतीबाई कर्णिक.

सौ. पार्वतीबाई ह्या ठाण येथील कॉं. स्वयंसेविका संघाच्या अध्यक्ष. ठाणें येथील भगिनींवर्गांत त्यांनीं बरीच जागृति केली असून त्यांच्या नेतृत्वाखालीं वांद्रें, भिवंडी, ठाणें, कल्याण वगैरे ठिकाणीं संघाचें पिकेटिंग झालें होतें.

कुमारी कृष्णाकुमारी सरवेबाई.

या हिंदुस्थानी सेवादलाच्या स्त्रीशाखेच्या एक कॅप्टन असून आझाद मैदानावरलि धरपकडीनंतर यांना ८॥ महिन्यांची शिक्षा झाली. लाठीमार धैर्यानें सहन करण्यांत या प्रमुख होत्या.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



पं. कृष्णकांत मालवीय.
यांना चालू सत्याग्रहांत शिक्षा झाली.



रमाकान्त
मुंबई युद्धमंडळ ५ म. कैद.

मु. गो. सत्नपारखी.
नांदगांव (नाशिक).
यांना जंगलसत्याग्रहांत शिक्षा झाली.

श्री. भांगारा.
मुंबई कांग्रेस स्वयंसेवकांचे कप्तान.
४ म. कैद.



डॉ. ना. र. ठोसर (वऱ्हाड)
जंगलसत्याग्रह ६ म स. म.



रा. शंकर विष्णु काणे, बी. ए. एल्एल्. बी.
वकील वऱ्हाड. १० म. कैद जगल सत्याग्रह.

कोंढाळी येथील कुंडीचे जंगलांत सामुदायिक सत्याग्रह.
बायका व मुलें गवत कापीत आहेत.



बार्डोली येथें सरकारनें जप्त केलेल्या जागेवर पोलीस पहारा करीत आहेत.



सरकारनें ताब्यांत घेतलेला बारडोली आश्रम.



बार्डोलींतील निर्मक्षिक घरें.



बार्डोलींतील गांवकरी सामानसुमानासह गांवें सोडून जात आहेत.



घरें सोडून गेलेल्या बारडोलीकरांनीं बडोदें संस्थानांत तात्पुरती वसाहत केली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुरुंगांतील सध्यांचें वर्गीकरण.

(ले. त्र्यं. र. देवगिरीकर)

कायदेभंगाची चळवळ सुरू झाल्यापासून हजारों लोक तुरुंगांत गेले व आणखी हजारों लोक तुरुंगांत जातील. या तुरुंगभरतीमुळें अनेक प्रश्न लोकांपुढें आले व त्यांचें उत्तर काय द्यावें हें कळेनासें झालें. या सर्व प्रश्नांमध्यें अत्यंत महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे तुरुंगांतील वर्गीकरणाचा. कांहींना अ वर्ग मिळतो, कांहींना ब वर्ग मिळतो व कांहींना क वर्ग मिळतो. दिसायला तीन वर्ग असले तरी खरे वर्ग दोनच आहेत. अ वर्ग व ब वर्ग यांत फरक असला तरी दोन्ही वर्गांत अतिशय मोठा फरक आहे असें वाटत नाहीं. तीन वर्गांची थोडक्यांत कल्पना येण्याकरितां खालीं कोष्टक मांडूं.

	अ वर्ग	ब वर्ग	क वर्ग
खर्च	दररोज खर्च ७ आणे	दररोज खर्च ७ आणे	दररोज खर्च २॥ आणे
पदार्थ	ब वर्गा इतकेंच शिवाय स्वतःचे खर्चानें बाहेरचें पदार्थ	पोळी, तूप, दूध, साखर, चहा भात, डाळ, भाजी.	कांजी, भाकरी, डाळ, व भाजी, गूळ (रविवार) भात (कांहीं ठिकाणी)
दिवा	रात्रीं दहा वाजेपर्यंत	रात्रीं दहा वाजेपर्यंत	दिवा नाहीं.
पत्र व भेट	१५ दिवसाला एक पत्र पाठविणें एक येणें व एक भेट	१ महिन्याला पत्र पाठविणें येणें व भेट	३ महिन्याला पत्र पाठविणें, येणें व भेट.
कपडे	ब वर्गाप्रमाणेंच शिवाय पलंग मच्छरदाणी कपाट, टेवल, खुर्ची	पायापर्यंत दोन विजारी, दोन हाफ शर्टस, टुवाल, १ लंगोटी, तरट, गादी, उशी, दोन कांबळीं, गरम बंडी, न्हाणा, कंगवा, ब्रश.	दोन गुडघ्यापर्यंत चड्डया, दोन बंड्या, टोपी, टुवाल, लंगोटी, दोन कांबळीं, तरट, गरम बंडी.
लेखन साहित्य	कागद शाई, टांक वगैरे स्वतःचे खर्चानें	कागद, शाई, टांक वगैरे स्वतःचे खर्चानें.	लेखनसाहित्य नाहीं.
काम	ब वर्गासारखेंच	शेतकाम, बागकाम, सूत खोलणें, लेखनकाम, वगैरे कामें. चक्की शिक्षा म्हणून.	सर्व कामें इतर कैद्याप्रमाणें
वागणूक	माणुसकी असते	अर्धवट माणुसकी	माणुसकीचा पूर्ण अभाव
भांडीं	ब वर्गाप्रमाणेंच	थाली, पॉट ' ॲल्युमिनम ' किंवा एनॅमलचे ताट व टमरल	थाली व पॉट.
वृत्तपत्रें	टाईम्स (स्वतःच्या खर्चानें)	विविधवृत्त, आठवड्याचा टाईम्स,	वृत्तपत्र नाहीं.
चरखा	चरखा व टकळी मिळू शकतें	चरखा व टकळी मिळू शकते	चरखा व टकळी देणें अधिकाऱ्याच्या मर्जीवर बहुधा नाहींच.
रेल्वे भाडें सुटकेनंतर	इंटर	तिसरा वर्ग	तिसरा वर्ग

वर थोडक्यामध्यें तीन वर्गांमधील फरक सांगितलें रेल्वेच्या तिसऱ्या व दुसऱ्या वर्गांत जितकें तर असतें तितकेंच अंतर ब व क वर्गांत असतें. अ व ब वर्गांत रेल्वेतील पहिल्या व दुसऱ्या वर्गांतील अंतराइतकेंच अंतर असतें. कोणत्याहि कैद्याला खरा फरक वाटत असला तर ब व क वर्गांमध्ये वाटतो हा फरक नाहींसा कसा करावा याची चर्चा चोहोंकडे चालू आहे आणि **कॉंग्रेसनें** कांहीं नियम घालून दिल्याशिवाय हा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटेल असें वाटत नाहीं.

जतीनदासाच्या मृत्युनंतर हें वर्गीकरण जन्मास आलें. करणारा सद्हेतूनें गोष्ट करून गेला; पण आज मात्र हें वर्गीकरण त्रासदायक होऊं लागलें आहे. वर्गीकरण हवें कीं नको हा प्रथम आपल्याला प्रश्न सोडवावा लागेल. कांहीं जण म्हणतात आम्हाला वर्गीकरण नको. याला त्यांचीं कारणें अशीं. आम्ही व आमच्या बरोबरीचे कार्यकर्ते समाजांत सारख्या दर्जाचे नसलों तरी तुरुंगांत आल्याबरोबर घरचा दर्जा विसरून एकाच राहणीनें आम्ही राहिलें पाहिजे. आम्ही ब वर्ग घेतला आणि आमच्या खांद्याला खांदा भिडवून काम करणारांना क वर्ग मिळाला तर तुरुंगांत सुद्धां घास तोंडांत टाकतांना आम्हाला गोड वाटणार नाहीं. शिवाय या वर्गीकरणामुळें अप्रबुद्ध स्वयंसेवकांच्या मनांत एक प्रकारचें द्वेषाचें बीज पेरलें जाईल व पुढें ते स्वयंसेवक म्हणून यावयास तयार होणार नाहींत. कांहीं स्वयंसेवकांना साहाजिकच असें वाटतें कीं, अरे, ज्या ब बरोबर मी कालपर्यंत काम केलें तो तुरुंगांत येतांच तूप पोळी, साखर खाऊं लागला आणि मला भाजी व भाकरी गिळावी लागते. तेव्हां साहाजिकच तो पुढाऱ्यांना नांवें ठेऊं लागतो व फारच भडकला तर शिव्याहि देण्यास कमी करीत नाहीं. वरील उद्गार हे काल्पनिक नसून प्रत्यक्ष अनुभवास आलेले आहेत. कांहीं स्वयंसेवक तर असेंहि म्हणाले कीं, इतरांच्याप्रमाणें आम्ही मोठे पुढारी होऊं तेव्हांच तुरुंगांत येऊं तेव्हां सरकारच्या हातांत हें एक नवेंच साधन आमच्यामध्यें दुही पसरविण्यास झालें आहे. अशा प्रकारची दुही पसरावयास नको असेल तर आपण वर्गच घेऊं नये असें या पक्षाचें म्हणणें. हे त्यांचें मत भावनाप्रधान असलें तर शुद्ध व प्रेमळ भावनेचें आहे व आदरणीय आहे यांत शंका नाहीं.

वर्ग हवे अशा पक्षाचें म्हणणें असें कीं, मी व माझा गडी दोघेहि आम्ही तुरुंगांत आलों आणि दोघांनाहि एकच वर्ग मिळाला तर ते जमावें कसें ? गरीबींत प्रपंच करणाऱ्या व भाजी भाकरीचा आहार असणाऱ्या सामान्य शेतकऱ्याला तुरुंगांत ब वर्ग दिला पाहिजे असा हट्ट धरणें गैर होईल. तुरुंगांत आपण जे जातो ते चैन करण्याकरितां जात नाहीं. तेव्हां ज्याचे घरचें खाणें भाजीभाकरीचें असते त्याला तूप, पोळी तुरुंगांत मिळणें गैर होईल. आम्ही आमच्या बाहेरच्या रहाणींत जर वर्ग पाळतों, तर तुरुंगांत वर्ग नकोत असें कां म्हणावें ? तुरुंगांत वर्ग पाहिजेत व प्रत्येकाला त्याच्या दर्जाप्रमाणें वर्ग मिळाले पाहिजेत. या वर्गवारींत अन्याय होणें अगदीं साहजिक आहे. हा अन्याय दोन प्रकारें होऊं शकेल, एक जाणून बुजून केलेला अन्याय व दुसरा चुकीमुळें झालेला अन्याय. एखाद्या प्रतिष्ठित, सुशीक्षित श्रीमंत अशा माणसाचा अपमान करायचा असला अगर पोलीसांना किंवा मॅजिस्ट्रेटला त्याच्यावर सूड उगवावयाचा असला तर ते मुद्दाम त्याला क वर्गांत टाकतील. दुसऱ्या प्रकारचा अन्याय म्हणजे बरोबर कल्पना न आल्याकारणानें होणारा अन्याय. वर्गवारी जी करण्यांत येते ती चारपांच गमकांच्या सहाय्यानें करण्यांत येते. १ शिक्षण, २ पैसा, ३ सामाजिक दर्जा ४ राहणी, ५ गुन्ह्याचे स्वरूप. साधारणपणें कॉलेजांत असलेला माणूस, किंवा ज्याला उच्च शिक्षण म्हणतां येईल किंवा जो बुद्धिप्रधान काम करीत असेल अशा माणसाला हा वर्ग मिळू शकतो. पैशाला वास्तविक मर्यादा कोणती घातली आहे हें समजत नाहीं; आणि अशी मर्यादाहि घालणें शक्य नाहीं. महात्मा गांधीसारखे मोठे पुढारी पैसे मिळवीत नाहींत, तेव्हां त्यांची प्राप्ति शून्याच्या आसपास कोठें तरी असते. असे अनेक देशभक्त आज देशांत आहेत कीं, ज्यांनीं द्रव्यार्जन करावयाचेंच नाहीं असें ठरविलें आहे. त्यांना उत्पन्नावर वर्ग द्यावयाचा म्हटला तर शक्य होणार नाहीं. अशांना वर्ग मिळतो आणि उलट इनकम टॅक्स देणारा एखादा सत्याग्रही असला तर त्याला वर्गहि देत नाहींत. पण या गोष्टी पहाणें मॅजिस्ट्रेटच्या हातीं असते. तिसरा मुद्दा म्हणजे सामाजिक दर्जा तो; ठरविणें फार कठीण असते. प्रत्येक सत्याग्रही सामाजिक दृष्ट्या मोठाच असतो. तो नैतिक गुन्हेगारी करणाऱ्या वर्गांतील नसतो. राहणीची चवथी बाब ही तरी कशी ठरवायाची ? त्यांत त्यांनीं वरिष्ठ, मध्यम व कनिष्ठ असे प्रकार केले आहेत. मध्यम वर्गांतहि पुनः वरचा व खालचा Upper middle class व Lower middle class अशी वर्गवारी आहे. पांचवा मुद्दा गुन्ह्याबद्दलचा. तुरुंगांत येणारा प्रत्येक सत्याग्रही नैतिक दृष्ट्या गुन्हेगार नसतो. तो देशाकरितां—स्वार्थाकरितां नव्हे—कांहीं तरी कार्य करून तुरुंगांत जात असतो. या एका मुद्याकडे लक्ष देऊन जर वर्ग दिला तर प्रत्येक सत्याग्रहीला ब वर्ग मिळाला पाहिजे. आणि खरें भांडण याच तत्त्वांवर आहे. पण सरकारचे अधिकारी नैतिक गुन्हे करणारांना सुद्धां वर्ग देतात असें आम्हाला ठाऊक आहे. वर ज्या पाच परीक्षा सांगितल्या त्या पांचीहिमध्यें एखादा माणूस उतरला तरी त्याला वर्ग मिळेलच असें सांगवत नाहीं. ही सहावी बाब म्हणजे मॅजिस्ट्रेटच्या लहरीची. अर्थात् कैद्यांच्या दैवाची असते. बरं इतकेंहि करून एखाद्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

डॉ. बाळकृष्ण चिंतामण लागू, पुणें.
यांना शिरोड्याच्या मिठाच्या सत्याग्रहांत ६ महिने स. म. व २०० रुपये दंड अशी शिक्षा झाली होती. ते गेल्या महिन्यांत सुटून परत आले.

फुलमडीकर, पुण्याचे डिक्टेटर.
रास्तापेठ, ६ महिने शिक्षा, ३०० दंड.

श्री. वा. वा. अतीतकर, पुणें.
यांना वंडगार्डनजवळ झालेल्या सत्याग्रहाबद्दल ४ महिने म. मजुरीची शिक्षा व १०० रुपये दंड झाला होता. हे नुकतेच सुटून आले.

मा. आप्पा देशपांडे,
जी. जा. जोशी यांना शिक्षा होतांच क्रांतीचे संपादकत्व या तरुणाकडे आले. त्यांनीं सर्व कामें धैर्यानें चालवलीं आहेत.

श्री. बाळ.
अमरावती कौन्सिल निवडणुकीचे वेळीं रा. बाळ ओझरकर यांना बेदम मार बसला.



तुरुंगांतील छळास बळी पडलेले अमर शहीद लक्ष्मणराव पाचघरे यावली (ता. उमरावती.)
यावली कॉंग्रेस कमेटीचे सेक्रेटरी दे. भ. लक्ष्मणराव पाचघरे यांना जगलसत्याग्रहाबद्दल ९॥ म. स. म. शिक्षा झाली होती. त्यांना उमरावती डिस्ट्रिक्ट जेलमध्यें २५ शेर धान्य दळण्याचें कठीण काम देण्यांत आल्यामुळें त्यांचे छातींत दुखावयास लागलें व त्यांतच त्यांचा तुरुंगांत अंत झाला.



हिंदुधर्मवीर-श्री. वरुडकर वकील.
कळमनुरी (निजाम स्टेट) यांस मुसलमान गुंडांनीं पाडून त्याचें नाक कापलें. पुण्यास तें जोडून बसविण्यांत आलें. जनता ह्यापासून योग्य बोध घेईल काय?



दारूच्या लिलावावर पिकेटिंग करीत असतां वऱ्हाडचे डिक्टेटर दे. भ. आबासाहेब ओझरकर आणि कांग्रेसचे दवंडी देणार श्री. पी. एस्. पोतदार यांना कौन्सिल-निवडणुकीवर पिकेटिंग करतांना पोलिसांनीं बेदम मार देऊन जखमी केलें.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



मुंबईचे युद्धमंडळ पारेख (चिटणीस.) कु. दिलसद सय्यद (संपादिका) पाठक (उपाध्यक्ष) ध्रुव (सभासद)
पैकीं कु. सय्यद यांना तीन म. सा. व बाकींच्या सर्वांस चार म. स. म.



जोसेफ बेनी १६ व्या युद्धमंडळा (मुंबई) चे अध्यक्ष एक वर्ष कैद.



मुंबईचें १८ वें युद्धमंडळ.
श्री. शांताबेन पटेल, श्री. गंगाबेन पटेल, कु. सुमति त्रिवेदी.
जगताप मानसिंग व हिंमतलाल शहा झेंडावंदनाबद्दल या सर्वांस पकडून शिक्षा ठोठावण्यांत आल्या.



सोमवंशी क्षत्रिय पाठारे ज्ञातींचे पहिलेच पुढारी विसापूर तुरुंगांतून सुटून आलेले रा. रा. पुरव व रामकृष्ण. हरिश्चंद्र हे उपनगर जिल्ह्यांतील कॉंग्रेस कमेटीचे उपाध्यक्ष होते.



पालेकर मुंबई बॉर कौन्सिलचे माजी चिटणीस तीन महिने शिक्षा भोगून सुटले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



सौ० जयश्री सयश्री.
सौ० हंसा मेथा यांच्या या भगिनी असून त्याहि राष्ट्रीय चळवळींत उत्साहानें भाग घेतात.

पबना येथें पिकेटिंगबद्दल पकडलेल्या श्री० कुसुमकुमारी देवी व श्री० प्रफुल्लरानी देवी.

कच्छी वीरकुमारी पानबेन.
यांना निपाणी मॅजिस्ट्रेटनें ६ महिने सक्तमजुरीचा शिक्षा सुनावली.



कु. दुर्गाताई नाडकर्णी, कारवार.
यांस ८॥ म. शिक्षा झाली.

सौ० अंबालाल साराभाई, अहमदाबाद.
यांना पिकेटिंगबद्दल शिक्षा झाली.

कु० गणेश महादेव करमरकर. (वय वर्षे ४)
" बाबांनों दारू पिऊं नका, बंधूंनों रेस खेळूं नका, पिवळा हत्ती ओढूं नका, पांढरा हत्ती पोसूं नका. "
असा फलक घेऊन प्रचार करीत असतो.

डॉ० ना. र. ठोसर, (मलकापूर वऱ्हाड)
६ म. स. क.

रतीलाल वेद.
येरवडा जेलमध्यें हे मरण पावले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS



देशदास रानडे यांनीं आपला बुधवार बागेंतील अन्नत्याग सत्याग्रह ५१ मद्या मिळवून पुरा केला. सात दिवसांत त्यांचें १४ पौंड वजन कमी झालें.



सौ. रमीबेन कामदार व त्यांचे पति—सौ. रमीबेन या मुंबई वॉर कौन्सिलच्या अध्यक्ष असतांना त्यांना तीन म. साधी कैद झाली होती. त्यांच्या पतींनाहि सत्याग्रहाबद्दल शिक्षा झाली.



मद्रास येथील स्वदेशी स्त्रियांचा संघ.

लक्ष्मी क्यालेंडर चित्र लौकरच प्रसिद्ध होईल. हिंददेवी, सरस्वती, (विद्यार्थ्यांकरितां) व कृष्ण क्यॉलेंडर चित्रें अवश्य मागवावींत. किं. ३ प्रतीस १५ आणे. व्ही. पी. नें २ आणे ज्यास्त. नमुनेकरितां किं. ६ आणे. पोस्टाचीं तिकिटें पाठवावींत. यापुढें १९३१ सालचीं पाठविलीं जातील.

न्यूज सर्व्हिस अथवा चित्रशाळा प्रेस, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्ग मिळाला तरी तो अक्षय्य टिकेल असें सांगवत नाहीं. मॅजिस्ट्रेटनें ब वर्ग दिला तरी तो सरकारकडून मंजूर व्हावा लागतो. त्याकरितां गुप्त पोलिसखात्याकडून त्याची चौकशी होते कलेक्टरची संमती लागते व होम डिपार्टमेंटची शिक्कामोर्तब त्यावर व्हावी लागते इतकें सव्यापसव्य झाल्यानतर त्याचा वर्ग निश्चित होतो, आणि मध्येंच कोणाला कांहीं लहर लागली अगर सूडाची बुद्धि उत्पन्न झाली म्हणजे तो खालीं आलाच. आम्हाला अशीं कांहीं उदाहरणें ठाऊक आहेत कीं, प्रथम ब वर्ग मिळून पुन्हा क वर्ग मिळाला, पुन्हा ब वर्ग मिळून फिरून क वर्गांत त्याच व्यक्तीला खेचण्यांत आलें अशा प्रकारची ओढाताण सारखी चालू असते, पण त्याच्या मुळाशीं कोणाची तरी दुष्ट भावनाच असते व त्यामुळेंच ही खेचाखेच सुरू असते. प्रत्येक माणसाला कांहीं मानअपमान असतो अशी अधिकाऱ्यांना कल्पनाच नसते. कांहींच्या बाबतींत समजून उमजून अन्याय जसा केला जातो, तसाच कांहींच्या बाबतींत न कळत अन्याय होतो. कांहीं सत्याग्रही आपलें शिक्षण, उत्पन्न वगैरे सांगण्यास तयार नसतात आणि मॅजिस्ट्रेट जर दुर्वासाचा अवतार असला तर त्याला योग्य उत्तर न मिळणें हाच अपमान वाटून त्याला तो क वर्गांत टाकतो.

वर वर्गीकरणाच्या बाबतींत ज्या पांच परीक्षा सांगितल्या त्या अगदीं स्वैर आहेत. एखादा बेताचा शिकलेला असेल, पण अत्यंत श्रीमंत असेल, एखादा पुष्कळ शिकलेला असेल पण श्रीमंत नसेल, एखादा शिकलेलाहि नसेल, श्रीमंतहि नसेल, पण त्याचा सामाजिक दर्जा मोठा असेल व राहणी उत्तम प्रकारची असेल, पण अशांना वर्ग मिळणें अत्यंत कठीण जातें. वरील सर्व जण मात्र नैतिक गुन्हेगार नसतात. जेव्हां सामुदायिक सत्याग्रह होतो, तेव्हां शिक्षण, पैसा, दर्जा, राहणी या चारहि कसोटीला न उतरणारेच सर्व स्वयंसेवक असतात, मात्र पांचवी कसोटी जी अनैतिक गुन्ह्याची ती सर्वांना लागू पडते व वर्गीकरणांत त्या कसोटीशिवाय दुसरी कसोटी असूं नये.

सत्याग्रहींच्या प्रतिज्ञेंत एक तत्त्व असते व ते म्हणजे कोणत्याही कारणानें अधिकाऱ्यांजवळ हक्क न मागण्याचें. क वर्गांत एखाद्याला टाकलें तर त्यानें ब वर्ग मिळण्याकरितां तोंडी अगर लेखी विनंती करू नये आणि अन्नत्यागासारखा सत्याग्रह तर करूं नयेच नये, असें तें तत्त्व आहे. क वर्ग मिळाल्यामुळें आपल्याबद्दल अन्याय झाला असें वाटत असतांना सुद्धां मुकाट्यानें तो वर्ग पत्करावा आणि बिनतक्रार शिक्षा भोगावी असें सत्याग्रह नीतीचें तत्त्व आहे. पण या अन्यायाशिवाय इतर अन्याय जर अधिकाऱ्यांनीं आपल्यावर लादले तर मात्र त्यांची उपेक्षा करू नये असहि या नीतींत सांगितले आहे. अधिकाऱ्यांना सलाम करणें, धर्मबाह्य जुलूम सहन करणें इत्यादि गोष्टी अशा आहेत कीं, माणुसकीला त्यामुळें धक्का बसतो व आपला नैतिक अधःपात होतो. तेव्हां अशा बाबी वगळून इतर बाबतींत हट्ट धरणें रास्त नाहीं. सवलती किंवा हक्क मिळविण्याकरितां सत्याग्रह करणें योग्य नाहीं असें सत्याग्रहीचें तत्त्व आहे.

मॅजिस्ट्रेटनें दिलेला वर्ग पत्करावा, त्याबद्दल तक्रार करू नये असें कांहीं जण म्हणतात. ब वर्ग मिळाला असतां क वर्ग मागून घेणें हेंहि एक प्रकारची सवलत मागण्यासारखेंच आहे असें कांहींचें म्हणणें. अद्यापपर्यंत सरकार ब वर्ग दिला असून जर एखादा क वर्ग मागू लागेल तर त्याला क वर्ग देते उद्यां कदाचित् हीहि सवलत सरकार देणार नाहीं आणि त्याला कारण असें सांगेल कीं आमच्या ताब्यांत आलेल्या कैद्याला त्याच्या इतमामाप्रमाणें वागविणें व त्याच्या आरोग्याची काळजी घेणें आम्हांला जरूर असल्यामुळें आम्ही त्याला क वर्गांत ढकलूं शकत नाहीं. हा उलट्या प्रकारचा जुलूम होईल. पण हा जुलूम अद्याप होत नाहीं. हल्लीं सुद्धां ब वर्गाच्या कैद्याला क वर्ग मिळणें कठीण जातें पण क वर्गाचें अन्न देणें मात्र सुपरिंटेंडेंट किंवा जेलर यांच्या हातीं ठेवलें आहे सरकारचा त्यांत फायदा होत असल्यामुळें इतक्या सुलभ रीतीनें ही गोष्ट होऊं शकते. पण ब वर्गाचा कैदी जो क वर्गांत जातो किंवा क वर्गाचें अन्न घेतो तें सुद्धां त्यानें करूं नये. कारण क वर्गाचें अन्न घेतांना सहानुभूती, निषेध किंवा सर्वांना ब वर्ग मिळावा अशी अपेक्षा असते. या तीनहि गोष्टी विशिष्ट हेतूनें केल्या असल्यामुळें त्याज्य आहेत असें कांहीं जण म्हणतात तेव्हां ज्याप्रमाणें कांहींना २ वर्षें शिक्षा मिळते, कांहींना दोन महिने शिक्षा मिळते, कांहींना सक्तमजूरी मिळते, कांहींना साधी कैद मिळते, त्याचप्रमाणें ब वर्ग अगर क वर्ग हाहि शिक्षेचाच एक प्रकार समजून मुकाट्यानें मुदतीच्या व कामाच्या शिक्षेप्रमाणेंच वर्गाचीहि शिक्षा समजावी असें कांहीं जण म्हणतात.

वर वर्गवारीचें एकंदर स्वरूप काय आहे व लोकांचीं मतें काय आहेत हें थोडक्यांत सांगितलें. पण इतक्या विवरणानंतर सुद्धां बुद्धीचें समाधान होत असलें, तरी मनाचें समाधान होत नाहीं ही गोष्ट प्रांजळपणें कबूल केली पाहिजे. कांहीं तरी चुकत आहे असें मनाला वाटतें आणि या वर्गवारीविरुद्ध प्रयत्न झाले पाहिजे असें वाटतें. या सर्व आपत्तीला मूळ कारण म्हणजे ब्रिटिश सरकार अद्याप आम्हाला राजकीय कैदी समजत नाहीं, हेंच होय. त्यांच्या कायद्यांत राजकीय गुन्हेगारी नाहीं. राजकीय गुन्हा कशाला म्हणतात हें आपल्याला ठाऊक नाहीं असें त्यांचें म्हणणें. इंग्लंडमध्यें सुद्धां आम्ही राजकीय कैदी ओळखीत नाहीं, मग हिंदुस्थानांत कां ओळखावें असें ते म्हणतात. साऱ्या जगावर जुलमानें राज्य करणाऱ्या ब्रिटिश सरकारला राजकीय गुन्हेगारी ठाऊक नसावी हा निव्वळ ढोंगीपणा आहे. स्वार्थाकरितां गुन्हे कोण करतो व देश स्वतंत्र व्हावा या पवित्र व उच्च भावनेनें कोण गुन्हे करतो, यांतील भेद न कळण्याइतकें बुद्धिमालिन्य ब्रिटिश बुद्धिमत्तेला आलें आहे असें आम्हाला वाटत नाहीं. राजकीय गुन्हेगारांवर त्यांची वक्रदृष्टी असते व तशी वक्रदृष्टी असणें स्वाभाविक असते; तरी तो वर्ग नाकबूल करण्याचा अप्रामाणिकपणा करण्याचें कारण काय? तुम्ही राजकीय कैद्यांना सवलती देऊं नका,दुष्टपणानें वागवा;पण स्पष्टपणें जगाला व आम्हाला तसें कळवा म्हणजे झालें. राजकीय कैदी उजळमाथ्यानें सरकार कबूल करीत नसलें तरी तुरुंगावरच्या अधिकाऱ्यांना मॅजिस्ट्रेटना तशा सूचना असतात व कांहीं ठिकाणच्या कैद्यांच्या हिस्ट्रीटिकीटवर तशी नोंदहि असते. मग हें कांबडें लपवून ठेवण्यात अर्थ कोणता? आज जो वर्गवारीचा सावळागोंधळ माजविण्यात येत आहे व सरकारला आमच्यांत दुफळी माजविण्याची संधी मिळाली आहे ती यामुळेंच. आमच्या देशांतील पुढाऱ्यांचें सुद्धां स्वतःला राजकीय कैदी असें नामाभिधान ठरवून घेणें कर्तव्य ठरतें. त्याकरितां आम्ही प्रयत्न केले पाहिजेत. राजकीय कैदी कोणाला म्हणावें हें ठरवितांना अनेक अडचणी येतील हें आम्हाला ठाऊक आहे. पण या अडचणी इतक्या कठीण नाहींत कीं, ज्यावर उपाययोजना होणार नाहीं. अनेक लोकांनीं कष्ट सोसले; कांहींचे प्राणहि गेले; पण अद्यापपर्यंत राजकीय कैद्यांचा निराळा वर्ग काढण्याची माणूसकी ब्रिटिशांना करवली नाहीं.

हें तुरुंगांतील वर्गीकरण महात्मा गांधींनाहि पसंत नाहीं व सर्वांनीं एकच वर्ग घ्यावा असें त्यांचें म्हणणें आहे. तुरुंगांत जाणाऱ्या कोणाहि गृहस्थाला ही वर्गवारी पसंत पडणार नाहीं. अ, ब, व क हे तीनहि वर्ग अजिबाद नष्ट करून त्या जागीं एकच वर्ग व तो राजकीय कैद्यांच्या करितां निर्माण झाला पाहिजे. त्यांत मॅजिस्ट्रेटला पोलिसांना किंवा कोणालाहि आपली पुण्याई खर्च करण्यास सवड नसावी. ह्या वर्गाला अन्न कोणतें द्यावें, सवलती काय असाव्या याचा विचार करण्याचें कारण आम्हाला नाहीं. आम्ही फक्त आम्हाला राजकीय कैदी म्हणून ओळखा एवढेंच म्हणणार! राजकीय कैद्यांचा वर्ग निर्माण झाला म्हणजे त्याकरितां थोड्याफार गैरसोयी कांहीं जणांना सोसाव्या लागतील, पण त्याला इलाज नाहीं. समान दर्जाविषयींच बोलावयाचें म्हणजे वर्गवारी येण्यापूर्वी सामान्य कैदी व राजकीय कैदी या सर्वांना सरकार एकाच मापानें मोजीत होतें. तेव्हां यापुढें सर्व राजकीय कैद्यांना एकाच प्रकारची वागणूक मिळाली तर कोणी फारशी तक्रार करणार नाहीं. राजकीय कैद्यांच्या वर्गांत पुनः अत्याचारी कैदी, अनत्याचारी कैदी असा भेदभाव होतां कामा नये. त्याचप्रमाणें राजकीय कैद्यांकरितां स्वतंत्र तुरुंग असावा. निदान इतर कैद्यांत त्यांना मिसळूं नये.

सध्याचें वर्गीकरण हें प्रयोगादाखल होतें असें सांगण्यात येत होतें. हा प्रयोग कसा काय यशस्वी होतो यावर त्या वर्गीकरणाचें जीवित अवलंबून रहाणार होतें. आतापर्यंत या वर्गीकरणाचा अत्यंत कटु व तिरस्करणीय असा अनुभव आलेला आहे. तेव्हां सध्यांचें वर्गीकरण आजिबाद नाहींसें करून राजकीय कैद्यांचा एक नवा वर्ग निर्माण करावा व वर सांगितल्याप्रमाणें त्यांच्यासंबंधीं सुधारणा करावी. यासंबंधीं सर्व वृत्तपत्रांनीं आपापलीं मतें प्रगट करणें अत्यंत जरूर आहे असें वाटतें. कॉंग्रेसनें सुद्धां या संबंधीं पुढेंमागें आपलें म्हणणें प्रकट केलें पाहिजे.

चित्रमयजगत्चे संपादक श्री. त्र्यं. र. देवगिरीकर हे पहिली शिक्षा भोगून आल्यानंतर त्यांना पुनः नोव्हेंबरच्या १७ तारखेस मिठाचा कायदा मोडण्यास प्रोत्साहन दिल्याच्या आरोपावरून (११७ व ४७कलमान्वयें) सरकारनें अटक केली ते सुमारें २० दिवस अटकेंत होते. ता. ५ डिसेंबर रोजीं मि. खान रत्नागिरीचे स. डि. मॅजिस्ट्रेट यांचे समोर खटला चालून त्यांच्य वर आक्षेप सिद्ध होत नाहीं म्हणून सोडून देण्यांत आलें.

वा. व.) शालापत्रकाचा हिंदुस्थान अंक (२८६ रु.

जानेवारी १९३१ मध्यें शालापत्रकाचा खास हिंदुस्थान अंक काढण्याचें आम्ही योजिलें आहे. या अंकांत आपल्या मातृभूमीविषयीं अतिशय उपयुक्त व उद्बोधक अशी माहिती मुलांच्या दृष्टीनें आम्ही देणार आहोंत. सदर अंकांत हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील लोक, त्यांची राहणी आणि इतर मनोरंजक व बोधपर माहिती सचित्र देण्याची व्यवस्था केली आहे. या अंकांत ६ रंगीत चित्रें व इतर १०० चे वर चित्रें देणार असून चित्रें छापावयास सुरवातही झाली आहे. या पुस्तकानें बालवाङ्मयांत अपूर्व अशी फार चांगली भर पडणार आहे. मुलांचें सर्वोत्कृष्ट मासिक म्हणून शालापत्रकाची आतां सर्वत्र वाखाणणी होत आहे. या मासिकाच्या योगानें मुलांच्या सद्भावनांचें पोषण होऊन त्यांना चित्रांच्या साह्यानें निरनिराळ्या विषयांचें हसत खेळत ज्ञान होत असतें दर अंकांत सुमारें ४० चित्रें व मधूनमधून शिक्षणोपयोगी अशीं रंगीत चित्रेंही देण्यांत येतात. मासिकाचा मोठ्या (डबल क्राऊन) आकाराचा ४० पृष्ठें असून वार्षिक वर्गणी टपाल-हशिलासह फक्त २ रु. ६ आणे आहे. इतकें सुंदर, उपयुक्त व स्वस्त असें मासिक मराठींत तरी दुसरें नाहीं. नमुन्याकरितां एकदां अंक मागवून पहा.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बहिष्कार बळकट करा.

आमच्या **स्वराज्याची** किल्ली परदेशी मालावरील बहिष्कारांत आहे. हा बहिष्कार जितका **बळावेल व टिकेल** तितकें स्वराज्य जवळ येईल. मुदतबंदाचा बहिष्कार निरुपयोगी ठरतो. रोग साफ बरा होईपर्यंत औषध घ्यावें लागतें व पथ्य तर कायमचेंच पाळावें लागत. **बहिष्कार** हें पारतंत्र्याच्या रोगावर औषध आहे आणि **स्वदेशीचें** पथ्य पारतंत्र्य पुनः नको असेल तर कायमचें पाळावें लागेल. मी आठ दिवस फक्त औषध घेईन अशी मर्यादा घालून ज्याप्रमाणें रोग हटत नाहीं, त्याप्रमाणें चार सहा महिने आम्ही **विलायती कापड** विकणार नाहीं. असें म्हणून पारतंत्र्य नष्ट होणार नाहीं. यापुढें व्यापाऱ्यांनीं व गिऱ्हाइकांनीं **विलायती कापड** आम्ही कधींहि विकत घेणार नाहीं अशा प्रतिज्ञा केल्या पाहिजेत. मुदतबंदीच्या बहिष्कारानें परदेशी धंदे नष्ट होत नाहींत व स्वदेशी धंदे फोफावत नाहींत परदेशाचा कारखानदार मुदतीची मर्यादा ढासळून पडेपर्यंत दबा धरून बसतो व ही मर्यादा कोलमडली कीं पुनः जोरानें पुढें सरसावतो. पण स्वदेशांतल्या धंदेवाल्यास तर ही मुदत फारच घातुक होते. तो अनिश्चितपणाच्या डोहांत सारख्या गटंगळ्या खात असतो. आणि अनिश्चितपणासारखा शत्रू व्यापाराला दुसरा नसतो.

व्यापारी हे गिऱ्हाईक व कारखानदार यांच्या मधले दुवे आहेत. कोणत्याहि मालाची मागणी उत्पन्न करणें हें यांच्याच हातांत असतें. वस्त्रदेवतेचे हे पुजारीच आहेत. यांच्याच मार्फत कारखानदार गिऱ्हाइकाकडे जाऊं शकतात. यांनींच जर नाकेबंदी केली तर गिऱ्हाईक कुंठित होतें. देवापुढली दक्षिणा फक्त या दलालांना मिळते; मग ती दक्षिणा **विलायती** कापड विकून मिळविण्याऐवजीं देशी कापड विकून मिळवलेली बरी नव्हे काय ?

इंग्रजांनीं आमचें राज्य व्यापाराकरितां घेतलें आणि आज **हिंदुस्थान** त्यांना व्यापाराकरितांच पाहिजे आहे. **हिंदुस्थानांत** व्यापार चालेनासा झाला म्हणजे राज्य-सत्तेची पोकळ हाडकें चघळतांना त्यांना मोठेंसें समाधान वाटणार नाहीं. व्यापाराकरितां राज्य व राज्याकरितां लष्कर अशी ही तीमजली इमारत आहे. त्यांतला व्यापाराचा पहिला मजला आपण पाडला म्हणजे वरचे दोन मजले धडधडा जमिनीवर कोसळतील. पण मुदतबंदीनें हें काम होणार नाहीं. शपथेपुरते चार घाव आम्ही या मजल्यावर घालूं. मग तो मजला पडो वा न पडो, अशी मनोवृत्ति चालणार नाहीं. त्या मजल्याचा चक्काचूर त्यांच्या द्वेषामुळें करावयाचा नसून आमच्या कल्याणाकरितां करावयाचा आहे. आम्हाला त्या जागीं आमची इमारत बांधावयाची आहे. पण आमचे व्यापारी व आमची जनता ती इमारत आपल्या आधारांनीं सावरून धरीत आहे याचें अत्यंत वैषम्य वाटतें. गेल्या महायुद्धांत **इंग्रजांनीं** कोट्यावधि रुपयांचें नुकसान दररोज सोसलें. त्याचप्रमाणें कायदेभंगाचें युद्ध चालू आहे, तोपर्यंत कोट्यावधि रुपयांचें नुकसान तें सोसतील आणि हें युद्ध संपताच पुनः आपले कारखाने सावरून आमच्यावर मात करतील. पण बहिष्कारसत्र दोनचार वर्षें कडकडीत चालूं राहिलें तर त्यांचे कारखाने कायमचे मोडतील. आणि **हिंदुस्थानांतूनच** नव्हे तर जगांतून **इंग्रजाच्या** जुल्मी राजवटीची इतिश्री होईल. आज **इंग्लंड जें** जगलें आहे तें व्यापारावर जगलें आहे. आज आम्ही कसें जगूं शकूं, हा आमच्यापुढें प्रश्न आहे व तो प्रश्न बहिष्काराशिवाय सुटणें कठीण होईल.

हिंदुस्थानांतल्या लोकांना अद्यापपर्यंत **बहिष्काराचें** पुराण सांगावें लागतें यांचें अत्यंत दुःख होतें. पुष्कळ लोकांना बहिष्काराचें व **स्वदेशीचें** महत्त्व कळलें आहे; पण अगदीं कानाकोपऱ्यांत असलेल्या खेड्यांतील शेवटच्या माणसापर्यंत हा संदेश पोंहोचलेला नाहीं. त्यांच्यापर्यंत हा संदेह पोंहोचविणें व **स्वदेशीचें** महत्व पटविणें प्रत्येकाचें काम आहे. ज्याला ज्याला ही गोष्ट कळेल त्यानें त्यानें भेटतील त्या मंडळींना ती पटविणें जरूर आहे. प्रत्यक्ष चळवळींत उडी घेतां आली नाहीं तरी स्वदे-शीचा सदेश सांगणें कोणालाहि कठीण नाहीं. आमच्या देशांतील हरदासांनीं, भटाभिक्षु-कांनीं, साधुसंतांनीं, गुरुमहाराजांनीं आपापल्या शिष्यगणांना स्वदेशीचें पावित्र्य सांगितलें पाहिजे. शिक्षकांनीं विद्यार्थ्यांना, वकीलांनीं आशिलांना, डॉक्टरांनीं रोग्यांना, मालकांनीं चाकरांना व मुलाबाळांना व पत्नीभगिनींनीं नातेवाईक सरकारी नोकरांना पटविलें पाहिजे. इंग्लंडमधला कोणताहि माणूस जीव जाण्याचा प्रसंग आला तरी आपल्या देशाशिवाय इतर देशांतील माल घेणार नाहीं. उलट आमच्याकडे निव्वळ चैन म्हणून विलायती वस्तु घेण्याकडे प्रवृत्ति !

विलायती माल वापरणाऱ्यांचे दोन वर्ग. नाइलाजानें वापरणारे व न कळत वापरणारे. याशिवाय तिसरा वर्ग आहे, तो ' ते के न जानीमहे ' या वर्गांतला. त्यांना स्वतःपलीकडे जग दिसत नाहीं व स्वतःच्या चैनीपुढें गोरगरिबांचीं दुःखें बापडीं वाटतात. सरकारी नोकर, कॉलेजांतले श्रीमंत वडिलांचे चिरंजीव, कांहीं वकील व डॉक्टर हें या वर्गांत येतात. त्यांच्यापुढें ब्रह्मदेव सुद्धां हात टेकील; मग इतरांची कथा काय ?

खेड्यापाड्यांत राहणाऱ्या पुष्कळ लोकांना स्वदेशी म्हणजे काय अगर बहिष्कार कशाला म्हणतात हें समजत नाहीं. तेव्हां विलायती कापड वापरण्याचें पातक त्यांचे हातून न कळत होत असतें. या पातकाची जबाबदारी त्यांचेपेक्षां त्यांच्या शेजारीं राहणाऱ्या समंजस लोकांवर अधिक येते. त्याचप्रमाणें कर्जाच्या खोल गर्तेत रुतल्यामुळें व सावकारच देव बनल्यामुळें तो देईल तें कापड त्यांना वापरावें लागतें. पण आतां हा प्रकार यापुढें चालू ठेवणें घातुक आहे. आम्हींच आमचें शत्रू आहों व प्रत्येक क्षणीं आम्ही आमचें पारतंत्र्य टिकवण्याकरितां परदेशी माल विकत घेत असतो. हा आत्मघातकीपणा आतां पुरे झाला. खेड्यांतलि अज्ञ जनतेला स्वदेशी व बहिष्काराचा मंत्र तेथल्या समजूत-दार मंडळींनीं सांगितला पाहिजे. नाहींतर पारतंत्र्य टिकाविण्याचें मोठें पातक त्यांच्या डोकीवर फुटेल.

नाइलाजानें कित्येक वेळां परदेशी माल वापरण्याचें पातक आम्ही करतों. रेल्वें-तून प्रवास करणें, रस्त्यानें चालणें, मोटारींतून जाणें, असे अनेक प्रकार परदेशी मालाच्या बाबतींत होतात. पण स्वातंत्र्याशिवाय त्याला आळा बसणें शक्य नाहीं. स्वतःच्या खुषीनें जो परदेशी कापड अगर माल विकत घेतो, तोच खरा देशाचा घात करीत असतो. अशा प्रकाराला आळा घालणें हेंच आमचें कर्तव्य आहे.

गेल्या ९ महिन्यांत कायदेभंगाची जी प्रचंड चळवळ झाली त्या चळवळीमुळें परदेशचा माल विशेषतः **इंग्लंडमधील** कापड यांवर चांगलाच घाव घातला गेला. ही गोष्ट आम्हीच काय पण **व्हाईसरॉय** सुद्धां कबूल करतात.

It (civil disobediance movement) has immeasurably aggravated the situation both by the boycott directed against the trade in foreign and particularly British Goods and indirectly by creating an atmosphere of uncertainty and unrest.

तथापि याचा अर्थ असा नव्हे कीं, **ब्रिटनमधील** कापडाला आमचा बहि-ष्कार जाणवण्याइतका बाधला आहे. गेल्या वर्षांत शेकडा ३७ टक्के कापड इकडे येण्याचें थांबलें आहे, असें आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या आकड्यांवरून दिसतें. ९ महिन्यांत इतकी प्रचंड चळवळ झाली, हजारों लोक तुरुंगांत गेले, **बाबू गेनू**सारखे शूर सत्याग्रही आपल्या प्राणाचें बलिदान करण्यास पुढें सरसावले, तरी **ब्रिटिश कापड** वापरणारीं माणसें आमच्या देशांत आहेत ही दुर्दैवाची गोष्ट आहे ! कदाचित् आणखी बलिदान राष्ट्रानें करावें अशी त्यांची अपेक्षा असेल ! आजचा स्वार्थत्याग हा **ब्रिटिशांच्या**करितां नसून आमच्या लोकांच्या करताच चालू आहे.

ब्रिटिश मालाचें मोठें गिऱ्हाईक कोणत्या वर्गांत आहे, हें सांगणें कठीण असलें तरी आमच्या देशांतील संस्थानी प्रजा, गोव्यासारखीं राज्यें, सरकारी नोकर आणि या चळवळीविरुद्ध असणारे कांहीं विशिष्ट वर्ग यांच्यांत सांपडतें. पण या देशांतील व्यापा-ऱ्यांनीं जर माल मागविण्याचें थांबविलें तर याहि वर्गाला **विलायती कापड** घेणें अशक्य होईल. **मुंबईला** चाललेली पिकेटिंगची चळवळ व्यापाऱ्यांना विलायती माल आणू देत नाहीं हें अगदीं स्पष्ट आहे. सरकार जसजसा लाठीचा हल्ला जास्त करील तसतशी **बहिष्काराची** चळवळ वाढत जाईल. त्याचप्रमाणें जसजसे लोक अधिकाधिक तुरुंगांत जाऊं लागतील तसतसाहि बहिष्कार वाढेल. गेल्या ऑक्टोबर महिन्यांत तर बहिष्कार इतका यशस्वी झाला कीं, असाच हा बहिष्कार आणखी कांहीं महिने टिक-ल्यास **इंग्लंडच्या** कारखान्यांना विश्रांतीच घ्यावी लागेल. आक्टोबर महिन्यांत शेकडा ८२ टक्के कापड कमी आलें असें खालील आंकड्यावरून दिसतें. **इंग्लंडहून** आलेल्या कापडाचे हे आकडे आहेत.

	१९३० आक्टोबर पौंड	१९२९ आक्टोबर पौंड
रंगीत	३७,०००	६,०५,०००
सफेत	१,२७,०००	५,६४,०००
छापाचें	७७,०००	३,११,०००
रंगवलेलें	६५,०००	२,७७,०००
एकूण	३,०६,०००	१७,५७,०००

[बोर्ड ऑफ ट्रेड लंडन, मुंबई क्रॉनिकलवरून]

वरील आंकड्यावरून शेकडा ८२ टक्के **ब्रिटिशांचा** कापडाचा व्यापार बुडाला असें दिसतें; पण एकंदर वर्षाचा आढावा काढला तर इतकी बूड दिसत नाहीं. त्याचीं अनेक कारणें आहेत. एक तर ही चळवळ सुरू होण्यापूर्वींच तेथील व्यापाऱ्यांनीं माल मागविला असल्यामुळें तो येथें येऊन पडला, पण चळवळ जोरावूं लागल्यानंतर **ब्रिटिश कापड** खपेनासें झालें आणि अर्थातच व्यापाऱ्यांना कापड मागवणें अशक्य झालें. त्यामुळें आज शेकडा ८२ टक्के व्यापार कमी झालेला दिसतो. ही चळवळ जर अशीच जोरावेल तर पुढील चार सहा महिन्यांत कापड ५ टक्याच्या आंत येऊन बसेल. पण चळवळीच्या जोरावर विलायती कापड वापरणें न वापरणें अवलंबून ठेवणें घातुक आहे. चळवळ आहे म्हणून व **विलायती कापड** मिळत नाहीं म्हणून तें न वापरणें निराळें आणि स्वाभिमानामुळें **विलायती कापडावर** बहिष्कार घालणें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निराळें. पारतंत्र्याचा ज्यांना वीट आला असेल त्यांनीं निदान ही अत्यल्प गोष्ट तरी करावी. गेल्या १२ महिन्यांत कापडाची आयात किती कमी झाली हें पाहूं.

	१९३० मागलि १२ महिने	१९२९ मागील १२ महिने
रंगीत	५४५९	९४३४
सफेत	६२२५	९७६५
छापील	२४२६	३६१७
रंगवलेल	२७८२	३९३१
एकूण	१,६८,९२	२,६७,४७

[बोर्ड ऑफ ट्रेड लंडन. मुंबई क्रॉनिकलवरून]

यावरून सबंध वर्षाचा व्यापार फक्त ३७ टक्केच कमी झाला आहे. असें दिसते. पुढें आपल्याला निम्म्याहून अधिक क्षेत्र आक्रमण करावयाचें आहे, आणि त्याकरितां राष्ट्रीय भावना प्रत्येकाच्या मनांत जागृत होणें अवश्य आहे.

आमच्यापुढें फक्त कापडाचाच प्रश्न नसून त्याशिवाय मोठाले प्रश्न आ वासून उभे आहेत. कापडाच्या खालोखाल हिंदुस्थानला कंगाल करून सोडणारी वस्तू म्हणजे साखर. या गोड साखरेनें किती वीष फैलावलें आहे, याची आम्हाला कल्पनाच नाहीं. **२० कोटी रुपयांची साखर** आम्ही खात असतों. आमच्या कल्पनेप्रमाणें या २० कोटींकीं बरीचशी साखर हिंदुस्थानांत चहाकरतां लागते. एक चहाचें व्यसन किती आमचें नुकसान करतें! याशिवाय **सिगरेट्स, मोटारी, खेळणीं, बांगड्या, छत्र्या, घरावरचे पत्रे** कोट्यवधी रुपये आमच्या देशांतून घेऊन जातात. या सर्व जिनसांवर **बहिष्कार** घालण्याची चळवळ आपल्याला केली पाहिजे. वास्तविकपणें इतक्या प्रचंड लढ्यानंतर लोकांनीं आपण होऊनच बहिष्कार घालावयास हवेत. पण आमचेकडे साधी गोष्टसुद्धां पिकेटिंग केल्याशिवाय व लोक तुरुंगांत गेल्याशिवाय साध्य होत नाहीं ! असो; तेव्हां बहिष्काराचें महत्त्व पूर्णपणें ओळखून आमचेकडील जनतेनें आतां डोळ्यावरची झापड पूर्णपणें घालवली पाहिजे, तरच स्वराज्य!

बाबू गेनू झिंदाबाद !

बाबू गेनू झिंदाबाद !

जन्म १९०८ मृत्यु १२-१२-१९३०

सत्याग्रहाचें पर्यवसान आत्मत्यागांत झाल्याशिवाय सत्याग्रह पूर्णपणें यशस्वी होऊं शकत नाहीं. किंबहुना सर्वस्वत्याग हें सत्याग्रहाचें आदितत्त्वच आहे. ह्या तत्त्वा-



बरहुकूम आत्मबलिदान करून बाबू गेनूनें आपलें नांव 'वीर सत्याग्रही' म्हणून अजरामर केलें आहे. परदेशी मालाची अडवणूक करण्याच्या कामीं आपला बळी देऊन बहिष्कारासाठीं जनतेनें काय करावयास पाहिजे याचा बाबू गेनू उत्कृष्ट आदर्श दिला आहे. परदेशी मालानें हिंदुस्थानाला गळफांस लावल्यामुळें त्या मालाची आयात बंद करण्याकरितां बलिदानाची पाळी यावी हें दुर्दैव आहे. ज्या स्वाभिमानशून्य लोकांना अद्याप बहिष्काराची जाणीव झाली नाहीं· त्यांचे डोळे तरी हा आत्मत्याग पाहून उघडतील काय ? बाबू गेनूच्या पवित्र रक्तानें भिजलेलें परदेशी कापड वापरण्याचे हे लोक बंद करतील काय ? बाबू गेनूनें आपली आहुति हेतुपुरःसर दिली असल्यामुळें त्याच्या हत्येचा आरोप सरकारवर करण्याचें कारण नाहीं. सरकारनें कांहींहि केलें असलें तरी बाबू गेनूनें आपलें श्रेष्ठ कर्तव्य बजाविलें आहे. या

राष्ट्रांतील तीन हुतात्मे.

कालीशंकर वाजपेयी.

बाबू गेनूच्या स्मशानयात्रेवर जो लाठीहल्ला झाला त्यांत जखमी होऊन हे ता. १८ डिसेंबर रोजीं मृत्यू पावले.

महंमद हुसेन.

अंजुमने इस्लाम संस्थेचे हे एक स्वयंसेवक किंग एडवर्ड हॉस्पिटलमध्यें बऱ्याच दिवसाच्या आजारानंतर वारले.

माणिकलाल सेन.

मुर्शिदाबाद जेलमध्यें ६० दिवस अन्नत्याग करून यांनीं आत्मार्पण केलें.

या तिघांच्याहि स्मशानयात्रा फार मोठ्या निघाल्या होत्या.

बद्दल त्यास धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच ! ज्याला देशाबद्दल खरें प्रेम आहे तो आपुढें तरी परदेशी मालाचा त्याग करील आणि पूर्ण स्वदेशीचा अंगीकार करील, बाबू गेनूचा देहत्याग फुकट जाणार नाहीं.

... ...

हें पुस्तक शाळांतून चालविण्यास सरकारनें मंजूर केलें आहे.

हिंदुस्थानांतील पक्षी.

या पुस्तकांत उत्क्रांति-तत्त्वावर पक्ष्यांचें वर्णन, त्यांचे वर्ग, त्यांच्या जाती, त्यांत येणारे पक्षी वगैरे माहिती आली आहे. कांहीं पक्षी शेतकऱ्यांचे मित्र आहेत, तर कांहीं शत्रु आहेत. कांहीं सुंदर दिसतात तर कांहीं सुंदर गातात. कोकिळेसारखे कांहीं दुसऱ्या जातीच्या पक्ष्यांच्या घरट्यांत आपलीं अंडीं घालतात असे त्यांचे नाना प्रकार आहेत. अशा बहुतेक सर्व हिंदुस्थानांतील पक्ष्यांचें वर्णन ह्या पुस्तकांत आलें आहे.

पृष्ठसंख्या १०० पर्यंत असून यांत निरनिराळ्या पक्ष्यांचीं सुमारें ७० सुंदर चित्रें दिलीं आहेत. मुखपृष्ठ तीनरंगी सुंदर चित्र देऊन सजविलें आहे. किंमत ८१०. ट. ह. ८१ निराळा.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

१९३१

विद्यार्थ्यांकरितां

९१ वाग्रत्नासह सरस्वती क्यालेंडर

चित्र किं. फक्त ६ आणे.

जोशी ब्रदर्स सर्व्हिस अथवा,

चित्रशाळा प्रेस पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्फुट-विचार.

(संपादकीय.)

बाबू गेनू.

गेले पंधरावीस दिवस बाबू गेनूचें नांव साऱ्या हिंदुस्थानांत दुमदुमलें. क्षणभर विद्युल्लता देदिप्यमान तेजानें चमकावी त्याप्रमाणें बाबू गेनूनें पराक्रम केला. महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाची चर्चा करणारे पठिक पंडित हिंदुस्थानांत पुष्कळ असतील; पण प्रत्यक्ष तत्त्वज्ञानाची तोंड–ओळखहि नसतां कृतीनें आपलें नांव अजरामर करून गेलेला एखादाच बाबू गेनू भेटतो. त्या कृतीचा ग्रंथ लावणारे वक्ते व लेखक मागाहून पुढें सरसावतात. निःशस्त्र मनुष्याचें आत्मिक बल हेंच शस्त्र असतें. या आत्मिक बलाच्या सहाय्यानें प्रचंड साम्राज्यें सुद्धां धडधडा जमिनीवर कोसळूं शकतात, हेंच या चळवळींत हिंदुस्थान जगाला दाखवणार आहे. बाबू गेनूचें बलिदान म्हणजे आत्मबलाचा प्रचंड विजय होय. प्रत्यक्ष मृत्यु डोळ्यासमोर दिसत असतां आणि आत्मबलाशिवाय दुसरें साधन जवळ नसतां आपला प्राण खुषीनें देऊन टाकणें हें अहिंसेचे नितांत रमणीय व सात्विक स्वरूप होय. दुर्बल मनुष्य बलिदान करूं शकत नाहीं, बलवान् मनुष्यच असें बलिदान करूं शकतो. महात्मा गांधी म्हणतात त्याप्रमाणें अहिंसा हें दुर्बलाचें शस्त्र नसून अत्यंत पराक्रमी मनुष्या-

कायदेभंगाच्या प्रखर उष्णतेमुळें हिंदी माणसाला विलायती कापड अंगांत नको असें झालें आहे.

चेंच शस्त्र आहे, असें बाबू गेनूनें जगाला दाखविलें आहे. खरा सत्याग्रह ज्याचें आत्मबल अमर्याद आहे तोच करूं शकेल. हा सत्याग्रही आपल्या आत्मबलावर परक्याची विनंति करील, त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न करील आणि मृत्यूनें आपल्या कार्याची समाप्तीहि करील. निःशस्त्र माणसाजवळ स्वतःच्या प्राणाशिवाय दुसरें कांहींहि नसतें आणि हा प्राण जुलमी सत्तेखालीं चिरडला गेला तर त्याचें त्याला कांहींहि वाटत नाहीं. बाबू गेनूनें परदेशचें कापड विक्रीकरितां बाहेर जाऊं नये म्हणून आपला प्राण खर्च केला आणि सत्याग्रहाची अंतिम मर्यादा जी मृत्यु ती गांठली. परदेशी मालाच्या बहिष्काराकरितां प्राण देणाऱ्या बाबू गेनूचें स्मारक पुढील पिढ्या तर करतीलच; पण मुंबईच्या जनतेनें त्याच्या शवाला एखाद्या सम्राटापेक्षांहि अधिक मान देऊन आपली कृतज्ञता प्रगट केली. हिंदुस्थान जगावा म्हणून बाबू गेनू गेला. त्याच्या मृत्यूनंतर आमच्या देशांतील लोकांनीं दुसऱ्या देशभक्तांच्या आत्मबलाची कसोटी पाहूं नये. या एका मृत्यूनंतर त्यांनीं डोळे उघडले पाहिजे व ज्याकरितां बाबू गेनू मेला तें कारण नष्ट केलें पाहिजे. **स्वदेशी कापड वापरणें व परदेशी कापडावर बहिष्कार घालणें या गोष्टी इतक्या सोप्या आहेत कीं त्याकरितां कोणाच्याहि प्राणाची आम्ही अपेक्षा करूं नये.** असल्या सोप्या गोष्टींकरितां जर आम्ही बाबू गेनूसारख्या श्रेष्ठ पुरुषाचे प्राण खर्ची घालूं लागलों तर आम्ही नादान ठरूं. बाबू गेनू तर नांव गाजवून गेला; पण त्याच्या मृत्यूचें पातक आम्हा हिंदी लोकांच्या डोक्यावर आहे हें विसरतां कामा नये.

***

महात्माजी सांगतील तर.

कायदेभंगाच्या चालू लढ्यांत इतक्या अलौकिक गोष्टी घडल्या कीं, त्यांचें स्मरण आम्हांला नेहमीं अभिमानास्पदच वाटेल. या गोष्टींचा संग्राहक कोणी भेटला तर उपकारकर्ताच भेटला असें म्हणता येईल. कोणी लाठ्या खाल्ल्या, कोणी प्राण दिले, सहनशक्तीची परमावधि करून कोणी आपल्या प्रतिस्पर्ध्यांनाहि चकित केलें. आणि कोणी सर्वस्वाचा त्याग करून ऐहिक वस्तूंची क्षुद्रता प्रत्यक्षपणें दाखविली, पण या सर्वांत बारडोली, बोरसद, खेडा वगैरे ठिकाणच्या गुजराथेंतील शेतकऱ्यांनीं केलेला त्याग अद्वितीय आहे. या भागांतील एक लाखांवर शेतकरी आपलीं घरेंदारें सोडून परागंदा झाले आहेत या भागांत लहानमहान सरकारी अधिकारी लोकांचीं मनें वळवायांत म्हणून फिरत आहेतच, आणि हडसनसारखे मोठे अधिकारी सुद्धां लोकांचीं मनें सारा देण्याकडे वळवीत आहेत. पण तेथील शेतकऱ्यांनीं सारा न देण्याचा कृतनिश्चय केला आहे " महात्माजी आणि इतर पुढारी जेव्हां सारा द्या असें सांगतील तेव्हांच आम्ही सारा देऊं. " अशीं उत्तरें तेथील शेतकरी निर्भयपणें देत आहेत. ' परमेश्वर हें स्वातंत्र्याचें युद्ध पहात असल्यामुळें आम्हाला कशाचीहि भीति नाहीं ' असे जबाब अधिकाऱ्यांना मिळत आहेत. परागंदा झालेले शेतकरी म्हणतात कीं, पोलीसांच्या व मामलतदारांच्या जाचामुळें आम्ही देशत्याग केला. त्याच अधिकाऱ्यांनीं आमच्या पिकापाण्याची



हिंदुस्थानच्या हुकमी मागण्यावर अवलंबून राहिलेला ब्रिटिश व्यापार आतां बहिष्कारामुळें आटोपणार !

नासाडी केली, व जप्तीच्या नांवानें आमचा नायनाट केला. ते म्हणतात कीं, आमच्या जवळ पैसा आहे, पण महात्माजी सांगतील तर आम्ही सारा देऊं, नाहींतर सर्वस्वनाश झाला तरी डगमगणार नाहीं. शेतकऱ्यांच्या अंतःकरणांत एवढी शक्ति कोठून जागृत झाली? जो शेतकरी वर्ग कालपर्यंत निर्माल्यवत् वाटत होता त्याच शेतकऱ्यांनीं आज एका जगांतील बलाढ्य सत्तेबरोबर युद्ध आरंभिलें आहे. ही शक्ति श्रद्धेपासून निर्माण झाली आहे व हीच श्रद्धा आज हिंदुस्थानांत प्रबळ झाली आहे. शेतकरी वर्ग किती धैर्यशाली असतो याचें हें प्रत्यक्ष उदाहरण आहे. महात्मा गांधी व वल्लभभाई या दोघा थोर पुरुषांनीं गुजराथच्या शेत-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ऱ्यांना योग्य मार्ग दाखवला आणि त्या कल्याणप्रद मार्गापासून आपण ढळावयाचें नाहीं असा तिकडील शेतकऱ्यांनीं निश्चय केला. **बारडोलीच्या** मागील लढ्या-प्रमाणें या लढ्याची मर्यादा संकुचित नाहीं. हा लढा अमुक एक गाऱ्हाणें दूर झालें म्हणजे संपणार नसून **स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत** या लढ्याची व्याप्ति आहे **गुजराथच्या** शेतकऱ्यांचा त्याग प्रचंड खराच; पण असे त्याग करतांना जी खंबीर मनोवृत्ति व जो अनुभव लागतो तो मागील लढ्यांत त्यांनीं संपादन केला असल्यामुळें अगदीं अखेर बेतली तरी ते डगमगणार नाहींत. **स्वातंत्र्याच** युद्ध एकदां सुरू झालें म्हणजे तें स्वातंत्र्य मिळेपर्यंत थांबत नाहीं. परराष्ट्रीय व्यापारबंदीप्रमाणें अंतर्गत रसद-बंदी हाहि या युद्धाचा एक विशेष आहे. परदेशी मालावरील बहिष्कार यशस्वी होऊं लागलाच आहे. त्याचप्रमाणें **गुजराथनेंहि** दुसरें उदाहरण पुढें मांडलें आहे. हें उदाहरण गिरवणें पूर्व तयारीविना होणें शक्य नाहीं. विधायक कार्यक्रम म्हणून **महात्माजी** जी ओरड करीत असत ती फुकट नव्हती. त्यांनीं खरोखरीच विधायक कामगिरी करून तिकडील कांहीं भाग या सामयुद्धाला तयार केला. इतर प्रांतावरहि अनुकरणाची पाळी येणारच आहे. पण त्याला पूर्वतयारी पाहिजे व ही पूर्वतयारी विधायक कामगिरीशिवाय होणार नाहीं, हें उघड आहे. **गुजराथच्या** शक्तीचें रहस्य समजून घेऊन आम्हीं त्याप्रमाणें वागणें जरूर नाहीं काय?

***

चालु युद्धांतील शिपाई. युद्धाच्या स्वरूपाप्रमाणें युद्धाचे शिपाई बदलत असतात. अत्याचारी युद्धांत शक्तीला प्राधान्य असतें, धार्मिक युद्धांत धार्मिक वृत्तीचे शिपाई लागतात, अनत्याचारी युद्धांत शांतिप्रधान शिपाई पुढें सरसावतात आणि औद्योगिक युद्धांत व्यापारीच शिपाई बनतात. युद्धांत सामील झालेल्या शिपायांना अनेक प्रकारचे कष्ट, हालअपेष्टा, ह्या सोसाव्याच लागतात व प्रत्यक्ष मृत्युमुखीं



आधुनिक समुद्रमंथन.

पडावें लागतें. युद्धांत पडलेला सैनिक नफ्यातोट्याचा विचार करीत नसतो, तो एका विशिष्ट ध्येयानें प्रेरित झालेला असतो. सध्याचें युद्ध अनत्याचारी आहे व औद्योगिकहि आहे. कायदे मोडून व शांतता पाळून अनेक सत्याग्रही आतांपर्यंत तुरुंगांत गेले, त्याचप्रमाणें परदेशी कापडाच्या बहिष्कारामुळें अनेक व्यापाऱ्यांचें नुकसान झालें. या युद्धाच्या पहिल्या सलामींत निव्वळ तुरुंगांत जाणारे व कायदे मोडणारे असे सत्याग्रही पडले, आज त्यांच्या जोडीला व्यापारीवर्गावर हें युद्ध चालविण्याची जबाबदारी आलेली आहे. ही जबाबदारी व्यापारीवर्गानें ओळखली तर ठीकच; नाहीं तर त्यांना त्यांच्या जबाबदारीची आठवण करून देण्याकरितां राष्ट्राला आपली शक्ति खर्चावी लागेल. विलायती कापड विकणाऱ्या व्यापाऱ्यांचें मरण खास टळत नाहीं. त्यांनीं मुकाट्यानें हें कापड विकण्याचें टाकलें तर राष्ट्रांतील मनुष्यबळाचा दुसरीकडे उपयोग करतां येईल. आणि त्यांनीं स्वतःच्या पोटाकरितां अनेक सत्याग्रहींना तुरुंगांत पाठविण्याचें पुण्य पदरांत घेतलें तर त्यांत दोघांनाहि त्रास होईल. इकडील व्यापारी हे शिपाई बनलेच पाहिजेत. ते स्वखुषीनें शिपाई बनले तर त्यांत त्यांना समाधानाला व संतोषाला जागा राहील आणि मारून मुटकून त्यांना शिपाई बनविले गेले तर जनतेची सहानुभूति व आत्मसंतोष याला ते पारखे होतील. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण पुष्कळ अशीं त्यांच्या हातीं आहे. इंग्लंडातून बोटी भरून येणारें कापड हें कापड नसून खरोखर पारतंत्र्य आहे व तें पारतंत्र्य विकण्याचें काम स्वतःच्या पोटाकरितां हे व्यापारी करीत असतात. इकडील गिऱ्हाईक पारतंत्र्याच्या खरेदींत स्वतःला धन्य मानून घेते, हीहि दुर्दैवाची गोष्ट आहे. सरकारी नोकरी करणारा कारकून, पोलीस, न्यायाधीश वगैरे स्वखुषीनें ज्याप्रमाणें आमचें पारतंत्र्य टिकविण्याचें काम करतात त्याप्रमाणें व्यापारी सुद्धां हेंच काम करीत असतात. पण दलाली करणारावर अमुकच माल विकून पोट भरलें पाहिजे अशी सक्ति नसते. तेव्हां व्यापाऱ्यांनीं इतःपर हें पातक न करण्याच्या शपथा घ्यावयास पाहिजेत वास्तविकपणें विलायती कापडाच्या बहिष्काराचें काम त्यांनींच पुढें येऊन करावयास पाहिजे.

त्यांनींच आपसांत संघटना करून राष्ट्रांतील पुढाऱ्यांना सांगितलें पाहिजे कीं, परदेशी कापडाबद्दल आपण निश्चिंत रहा; पण काळ असा उलटा आहे कीं, संघटना दूरच पण कांहीं व्यापारी या पुढाऱ्यांना विरोध करीत आहेत! अलीकडे व्यापाऱ्यांनीं माल मोहोरबंद करण्याची नवी टूम काढली आहे. या मोहोरबंदीचा अर्थ असा कीं, उद्यां लढा संपला आणि व्यापाऱ्यांना आपल्यावर कोणाचें बंधन नाहीं असं वाटलें म्हणजे ते सरसहा ह्या मोहोरा फोडून विलायती कापड विकूं लागणार. याचा अर्थ असा कीं, हें कापड विकण्यांत आपण पातक करतों असें त्यांना वाटत नाहीं. पोलिसांच्या भीतीनें माणूस जसे गुन्हे टाळतो तद्वत् स्वयंसेवकांच्या भीतीनें हे व्यापारी कापड बांधून ठेवतात. ही पातकाची कुजट घाण दूर ठेवली तरी ती घाणच आहे हें जोंपर्यंत व्यापारी वर्गाला समजलें नाहीं तोंपर्यंत बहिष्कार टिकाऊ होणार नाहीं. एकदां प्राणहानी-शिवाय ज्याप्रमाणें स्वातंत्र्य नाहीं असें होतें त्याप्रमाणें आतां वित्तहानीशिवाय स्वातंत्र्य नाहीं असं सिद्ध झालें. व्यापाऱ्यांच्याजवळ असलेल्या परदेशी कापडाच्या नाशामुळें जी वित्तहानि होईल तीच खरी क्रांति घडवून आणील. हा शिपाईबाणा व्यापाऱ्यांत संचरला पाहिजे, तरच आजचा लढा यशस्वी रीतीनें सुटण्यास मदत होईल. बार्डोलीच्या बलिदानापुढें व्यापाऱ्याचें नुकसान अधिक महत्त्वाचें नाहीं.

***

क्रांतीची वेळ. चालू बहिष्कारसत्रांत पूर्वी कधींहि मोडलें नव्हतें इतकें **इंग्लंडचें** कंबरडें मोडलें आहे. तशा प्रकारची कबूलीहि तिकडील व्यापारी देत आहेत. दुष्काळांत तेरावा महिना यावा, त्याप्रमाणें जगांतल्या खालावलेल्या व्यापाराच्या जोडीला **हिंदुस्थानचा** बहिष्कार आल्यामुळें **इंग्लंडची** स्थिति तर फारच अनुकंपनीय झाली. जपान, अमेरिका वगैरे देश विलक्षण गतीनें पुढें सरसावत आहेत आणि **इंग्लंडला** आपलें आसन सावरतां सावरत नाहीं. जोंपर्यंत **हिंदुस्थानांत** मूर्खपणा व अज्ञान होतें तोंपर्यंत **इंग्लंडची** पोळी पिकली होती. हा मूर्खपणा अद्याप पूर्णपणें गेला नाहीं हें जरी खरें असलें, तरी गेलेला मूर्खपणा पुनः संचरला तर **इंग्लंडला** अजूनहि आमचें रक्तशोषण करतां येईल. **हिंदुस्थान** हा सत्वप्रधान देश आहे आणि चालू चळवळ ही सात्विक अधिष्ठानावरच सुरू झालेली आहे. सत्याग्रहाच्या चळवळींत द्वेषाची भावना नसते. **इंग्लिश** व्यापारी मरावेत अशा बुद्धीनें ही चळवळ सुरू केलेली नाहीं. आम्ही स्वतःचें मरण परदेशी कापडाच्या रूपानें विकत घेत असतो. हें मरण टाळण्याकरितां आम्ही धडपड करीत आहों. हिंदुस्थानांतील उद्योगधंदे **इंग्रजांनीं** आसुरी प्रकार करून बुडविले हें जरी खरें असलें तरी आम्हाला त्यांचें अनुकरण करावयाचें नाहीं. आज आमच्या देशापुढें आत्मोन्नतीचा प्रश्न आहे. म्हणूनच बहिष्कारापेक्षां खादीला महात्माजींनीं जास्त महत्त्व दिलें आहे. **इंग्लिश** कापडावर व मालावर बहिष्कार घालून **हिंदुस्थानला** जपान अगर **अमेरिकेचें** अंकित व्हावयाचें नाहीं, ही गोष्ट आम्ही विसरता कामा नये. एकदां बहिष्कार घातल्यावर स्वराज्य मिळाल्यानंतर सुद्धां आम्ही परवयांचा माल घेणार नाहीं. कांहीं इंग्लिश लेखक असें सुचवतात कीं, तुम्ही **इंग्रज** व्यापाऱ्यांना असें आश्वासन द्या कीं, **डोमिनिअन स्टेटस** दिल्यानंतर आम्ही **इंग्लंडचें** गिऱ्हाईक होऊं. **हिंदुस्थानचे** हितचिंतक असें आश्वासन कधींहि देणार नाहीं. **इंग्लंडचें** गिऱ्हाईक होऊन आम्हाला स्वराज्य विकत घ्यावयाचें नाहीं. आधीं अशा प्रकारच्या सूचना करणारे मोठेसे प्रामाणिक असतात असें नाहीं व दुसरे त्यांच्या प्रामाणिकपणाशी आम्हाला कांहीं कर्तव्य नाहीं. **हिंदुस्थानला** आपला मार्ग मोकळा आहे. स्वातंत्र्याकरितां आम्ही काय मोल देतों ह्याकडे ईश्वरी शक्ति लक्ष लावून बसल्या आहेत इतर राष्ट्रांत स्वातंत्र्याकरितां शत्रूची नरडीं चरचरा चिरलीं गेलीं, हिंदुस्थानला शत्रूच कोणी नाहीं आणि कोणाच्या रक्ताचा शितोडा सुद्धां **हिंदुस्थानला** उडवावयाचा नाहीं. **इंग्लंडमधील** मुत्सद्यांना अद्यापपर्यंत हिंदी लोकांच्या जाज्वल्य राष्ट्रभावनेची कल्पना आली नाहीं, म्हणूनच त्यांनीं अद्यापपर्यंत आरूची हेटाळणी चालवली आहे. **हिंदुस्थानइतकी** सहनशीलता, हिंदुस्थानइतकी सात्विकता कोणत्याहि देशानें दाखविली नाहीं. **आयर्लंडमध्यें इंग्लिश** शिपायांनीं केलेले अत्याचार व अधिकाऱ्यांनीं घातलेला धिंगाणा स्वतंत्र झालेला **आयर्लंड** विसरला नाहीं. **हिंदुस्थानचा** हक्क स्वतंत्र होण्याचा आहे व **हिंदुस्थान** स्वतंत्र होईलहि. पण आज अधिकारी जुलमाचा वर्षाव जो करीत आहेत तो निरर्थक आहे असें हिंदुस्थान म्हणतो. पण हे जुलूम नको असले आणि स्वातंत्र्याची प्राप्ति लवकरच व्हावी अशी इच्छा असली तर प्रत्येकानें आत्मनिरीक्षणाला सुरवात केली पाहिजे. परदेशचा माल मग तो कितीहि सुंदर असो, स्वस्त असो अगर सोयीचा असो मी विकत घेणार नाहीं असा निश्चय केला तर लंडनच्या सेंट जेम्स पॅलेसकडे, व्हाईटहॉलकडे, किंवा व्हाईसरिगल लॉजकडे पहाण्याची जरूरीच उरणार नाहीं. स्वातंत्र्य आमच्या दारांत येऊन उभें राहील. इतकी मनोवृत्ति तयार झाल्याशिवाय आम्हाला स्वातंत्र्याची तळमळ लागली आहे हें बोलण्यांत तरी स्वारस्य कोणतें? आज ब्रिटिश व्यापारी टेकीस

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आलेच आहेत. तेव्हां हीच वेळ अत्यंत क्रांतीची आहे. या वेळेला जो जागरूक राहील तोच स्वातंत्र्य मिळवूं शकेल हें आपण केव्हांहि विसरूं नये.

* * *

राऊंड टेबल परिषदेविषयीं लिहिण्यापेक्षां न लिहिलेलेंच बरें. कारण या परिषदेवर कोणाचा विश्वास नव्हता किंवा या परि-

परिषद संपत आली. षदेचें कार्य आमच्या चळवळीच्या आडहि येत नव्हतें. या परिषदेविषयीं लिहिणें म्हणजे तिला नसतें महत्त्व देणें होय. पण **राऊंड टेबलवर** बहिष्कार घालण्यांत **म. गांधींनीं** व कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनीं जो दूरदर्शीपणा दाखविला त्याबद्दल मात्र त्यांचें **अभिनंदन करावेसें वाटतें**. जी गोष्ट कॉंग्रेसनें परिषदेला न जातांहि जाहीर केली तीच गोष्ट परिषदेला गेलेल्यांच्या अनुभवास आली. आपला मार्ग चुकीचा होता हें सांगण्याचा मोठेपणा जयकराप्रमाणें तेथें गेलेले लोक **दाखवितील तर बरें होईल**. परिषदेला गेलेल्या मंड-

सभासदः--अरे बापरे ! हे हिंदी माणसाचें भूत कोठून आलें !

[राऊंड टेबल परिषदेत हिंदी माणसाचा विचारच नाहीं.]

ळींना अशी आशा वाटत असावी कीं, आपण निदान **डोमिनियन स्टेटस**पर्यंत तरी परिषदेंत मजल मारूं. पण ती आशा फोल ठरली; एवढेंच नव्हे तर **डोमिनिअन स्टेटस**चा नामोच्चार सुद्धां त्या परिषदेंत अद्याप झालेला नाहीं. **हिंदु व मुसलमान** यांच्यामध्यें परस्परांच्या हक्कासंबंधीं लढे आहेत ही गोष्ट सिद्ध करून दाखविण्याकरितांच जणूं काय **मॅकडानाल्ड** साहेबांनीं हा खटाटोप केला होता असा संशय येतो. उभयतांच्या हक्कांचा प्रश्न गांधीलमाशीच्या पोळ्यासारखा आहे; त्या प्रश्नाला स्पर्श केला कीं, सारी परिषद मोडेल हें **मॅकडोनल्ड** जाणून होते. आणि त्यांनाहि परिषद यशस्वी करण्याऐवजीं अयशस्वी करून इकडील भांडणाची घाण जगापुढें मांडावयाची होती. तें कार्य मंत्रि त्यांनीं साधलें. **राऊंड टेबल** परिषदेला कॉंग्रेस गेली असती तरी यापेक्षां निराळा निकाल लागला असता असें वाटत नाहीं; मात्र चळवळ थांबविण्याचें मोल परिषदेला जाण्याकरितां द्यावें लागलें असतें ! इतक्या वर्षांच्या सहवासानंतर इकडील पुढाऱ्यांना **इंग्रज** मुत्सद्यांचें नाडीज्ञान बरोबर झालें आहे. **राऊंड टेबल** परिषदेमध्यें जो निर्णय आज कांहीं हिंदी लोकांनीं लावून घेतला तो निर्णय एक वर्षापूर्वी **महात्माजींना** समजला होता. **राऊंड टेबल** परिषदेंत शाब्दिक मंथन होऊन ' फेडरेशन ' हा एक शब्द निघाला. ह्या शब्दाच्या नामाभिधानाकरितां लाखों रुपये **हिंदुस्थानचे** गेले आणि हें फेडरेशन काय काय पराक्रम करणार याचीहि बरोबर कल्पना नाहीं. चर्चेच्या पहिल्या भरांत **इंग्रज** मुत्सद्यांनीं **फेडरेशनच्या** मोहिनीनें इकडच्या लोकांचे डोळे दिपवून टाकले आणि **शास्त्र्यां**सारखे मुत्सद्दी सुद्धां संमतिदर्शक माना डोलवूं लागले. पण त्यानंतर इंग्लंडच्या कर्णधारांनीं परिषदेचें सुकाणूं फिरवलें आणि जातिभेदाच्या खडकावर परिषदेचें तारूं फोडून टाकलें. आज **राऊंड टेबल** परिषद मरणोन्मुख स्थितींत आहे आणि लवकरच तिची अवतारसमाप्तीहि होईल. परिषदेला न गेलेले लोक प्रवासाची दगदग वांचवून शहाणे झालेच आहेत, पण तेथें जाऊन श्रम करून आलेली मंडळी **इंग्रज** माणसाची स्वभावरचना ओळखूं शकली व इतःपर सावधगिरीनें वागूं लागली तर पुष्कळ कार्य होईल. पण उभय देशांतील पुढारी इतक्या सहजासहजी आपला पराभव कबूल करावयाचे नाहींत. **इंग्रजांना हिंदुस्थानांत** परिषद भरविण्यास लावण्याचें, सर्व राजकीय कैद्यांना सोडून देण्याचें व स्वातंत्र्य कमविण्याचें सामर्थ्य आमचे अंगीं आहे. त्या सामर्थ्याचा उपयोग आमचेकडून कसा काय केला जातो तो लवकरच दिसेल.

* * *

राऊंड टेबल परिषदेंतून काय काय रत्नें निर्माण होणार आहेत कोण जाणें; पण **ब्रह्मदेशाच्या** विभागणीचा विचार मात्र

ब्रह्मदेशचें ब्रह्मलिखित. जरा गंभीरपणें चाललेला दिसतो. या परिषदेंत **ब्रह्मी** लोकांचे पुढारी नसल्यामुळें तेथें नेलेले लोक म्हणतील तें प्रमाण अशी स्थिति होणार आहे. **ब्रह्मदेश हिंदुस्थाना**पासून वेगळा करावा अशी ओरड राऊंडटेबलला गेलेल्या ब्रह्मी लोकांची कदाचित् असेल; पण **इंग्रजांना ब्रह्मदेश हिंदुस्थाना**पासून फोडण्याची फार आतुरता लागली आहे. ही पर्वणी चालू परिषदेंत साधून घेण्याचा त्यांचा विचार आहे व तो कितपत पार पडतो हें दिसेलच. **ब्रह्मदेश** हा रॉकेल पेट्रोलच्या खाणींमुळें आणि तांदूळ वगैरे कच्च्या मालाच्या निपजेमुळें **हिंदुस्थानपेक्षांहि** अधिक महत्त्वाचा आहे. दुसरें असें कीं, **ब्रिटिशांच्या** हातून **हिंदुस्थान** आज ना उद्यां जाणारच. अर्थात् ही मर्यादा लांबविण्याचा **ब्रिटिशांकडून** शक्य तो प्रयत्न होईल; पण त्या प्रयत्नाला भीक घालण्याइतकी परिस्थिति आज उरली नाहीं. तेव्हां **हिंदुस्थान** जाणार असला तर जावो; पण तत्पूर्वी **हिंदुस्थानची** व **ब्रह्मदेशाची** फारकत करून टाकली म्हणजे पुढील काळांत अडचण नको या बुद्धीनें आज **ब्रह्मदेशाच्या** पृथक्करणाचा प्रश्न ब्रिटिशांनीं आपल्यापुढें घेतला आहे. कांहीं मूर्ख **ब्रह्मी** लोक **हिंदी** लोकांचे द्वेष्टे आहेत व हें पृथक्करण झालेंच पाहिजे असा आग्रह धरणारे आहेत. पण **हिंदुस्थाना**बरोबर रहाण्यानें दोघांचा प्रश्न एकदम सुटण्याचा जो संभव तो पृथक्करणानें अजिबाद नाहींसा होईल. **इंग्रजांना ब्रह्मदेशांतील** तेलाच्या खाणी अद्याप अनेक शतकें वाहून न्यावयाच्या आहेत. हा त्यांचा डाव दोघांचीं दैवें एकत्र निगडित केल्यानें साधणार नाहीं. कांहीं **ब्रह्मी** लोकांना हें ब्रिटिश राजकारण कळूं लागलें आहे, व ते चळवळीहि करीत आहेत. पण या चळवळीचा कितपत उपयोग होतो कोणास ठाऊक ? **ब्रह्मी** लोकांना वसाहतीचें स्वराज्य अगोदर हवें आहे व नंतर **हिंदुस्थाना**पासून वेगळें व्हावयाचें आहे. पण **ब्रिटिश** मुत्सद्दी त्यांच्या हातांत नुसतें पृथक्करण देतील व वसाहतीच्या स्वराज्याची अनेक वर्षें वाट पहावयास लावतील.

* * *

लॉर्ड आयर्विनसाहेब आतां लवकरच जाणार आहेत व **मुंबईला** मानपत्राच्या संबंधीं ज्यांनीं आपलें नांव संस्मरणीय करून

मनस्येकं वचस्येकं ठेवलें ते **बुईलिंगडन** येथें येणार आहेत. **लॉर्ड आयर्विननीं** इकडील पुढाऱ्यांच्या मनांत आपण **हिंदुस्थानचे** बडे दोस्त आहों असा समज दृढ करून ठेवला आहे. वास्तविक इकडे

राऊंड टेबलच्या चार अवस्था.

फेडरेशनचें इंजेक्शन. **हिंदुमुसलमानांचीं भांडणें.**

मृतपेटी चालली. **खड्डा तयार केला.**

येणारा प्रत्येक अधिकारी आमचा मित्रच असतो. निष्कारण कोणी कोणाचे शत्रु होत नसतात. **महात्मा गांधींच्या** अमदानींत तर वैयक्तिक शत्रुत्व आजवाद गेलें आणि राज्यपद्धत तेवढीच शत्रुस्थानीं आली. **आयर्विन हिंदुस्थानचे** मित्र खरेच आणे त्यांना या मैत्रीचें प्रदर्शन करतां आले असतें तर नको होतें असें नाहीं. त्यांच्या सुदैवानें कायदेभंगाचे युद्ध त्यांच्या अमदानींत सुरूं झालें आणि या युद्धाच्या निमित्तानें **हिंदुस्थानला** स्वातंत्र्याचे हक्क द्यावयास त्यांनाहि वाईट वाटलें नसतें. पण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांचीं सूत्रें विलायतेहून हालतात आणि इच्छा असली तरी त्यांना मैत्रीचा दृक्प्रत्यक दाखवितां येत नाहीं. व्हाइसरायनीं स्टेटसेक्रेटरीकडे बोट दाखवावें, स्टेटसेक्रेटरीनें प्रधानाकडे अंगुलीनिर्देश करावा, प्रधानांनीं पार्लमेंटचा हवाला द्यावा, पार्लमेंटनें **ब्रिटिश** जनतेचे आम्ही प्रतिनिधि आहों असें म्हणावें, आणि **ब्रिटिश** जनतेनें **व्हाइसरॉय** व इतर अधिकारी काय करतील तें प्रमाण असें लोण परत फिरवावें. ' कोण म्हणतो टक्का घेतला ' या खेळाप्रमाणेंच हा सारा खेळ चालू आहे व हे सर्व आमचे मित्रच आहेत. आमचे शत्रु काणी अपले तर आम्हींच आहोंत. आमचे मित्र **लॉर्ड आयर्विन** हे आतां जाणार असल्यामुळें भरतवाक्य म्हणायला त्यांनीं सुरवात केली आहे. **कलकत्त्यास** त्यांचें एक भाषण झालें. या भाषणाचा उद्देश आत्मसमर्थनपर होता असें दिसतें. त्यांच्यावर **इंग्लंडांतील व हिंदुस्थानांतील ब्रिटिश** पत्रांनीं व व्यक्तींनीं प्रज्वलित ज्वालामुखीइतकी रौद्र दडपशाही केली नाहीं म्हणून आग पाखडलेली दिसते. या आगीला त्यांनीं उत्तर दिलेलें आहे. त्यांत ते म्हणतात कीं, मला वृत्तपत्रें नेस्तनाबूद करतां आलीं असता, गांवचे गांव बेचिराख करतां आले असते, लष्करी अंमल सुरू करतां आला असता; पण तें ब्रिटिशांनाच पुढें जाचक झालें असतें. त्यांनीं **हिंदुस्थानांत** उचंबळलेल्या पर्वततुल्य राष्ट्राभिमानाचा उल्लेख केला आहे व ही लाट आतां दडपशाहीनें आवरतां येणार नाहीं अशी स्पष्ट कबूली दिली आहे. **हिंदुस्थानच्या** राष्ट्रीय आकांक्षा तृप्त होणारे अधिकार **हिंदु**-

रोडावलेला सिंह व जॉन बुल.

ब्रिटानिया:—[संस्थानिकांच्या गळीं पडून] **महाराज ! तुम्ही आमच्या व्यापाराकरितां येतांना कांहीं मागण्या आणल्या आहेत काय ?**

[राऊंड टेबलच्या परिषदेला आलेल्या प्रतिनिधींकडे फक्त व्यापाराच्या-दृष्टीनें तेथील जनता पहात आहे.]

स्थानला मिळाले पाहिजेत असें **लॉर्ड आयर्विनच** काय पण प्रत्येक अधिकारी म्हणत असतो. पण त्यांच्या सद्भावनेचें प्रत्यक्षांत रूपांतर होत नसतें. **लॉर्ड आयर्विनसाहेबांनीं** असें भासविलें आहे कीं, गेल्या चळवळीचे वेळीं आपण शक्य तितकी कमी दडपशाही केली. हें विधान अगदीं असत्य आहे. सोलापूर , पेशावर वगैरे ठिकाणीं झालेले प्रकार डोळ्यासमोर उभे असतां **व्हाइसरॉयनीं** दडपशाही कमी केली असें म्हणावें हेंच आश्चर्य. **मुंबईस** लोकांच्या डोक्यावर लाठ्यांचे प्रहार होत आहेत, तुरुंगांतील हालअपेष्टामुळें सत्याग्रही मृत्युमुखीं पडत आहेत, सारा राज्यकारभार फर्मानांनीं सुरू आहे, बार्डोली, बोरसद वगैरे ठिकाणचीं नंदनवनें स्मशानासारखीं भयानक होत आहेत, राष्ट्रांतील निवडक पाऊण लाख जनता तुरुंगांत डांबली गेली आहे, तरी व्हाइसरॉय म्हणतात कीं, दडपशाही कमी झाली ! यापेक्षां अधिक दडपशाही **व्हाइसरॉयनीं** केली नाहीं याचा अर्थ त्यांना दडपशाही नको होती अगर करतां येत नव्हती असा नाहीं. पण त्यांच्या दडपशाहीच्या अग्नीला इन्धन पुरविण्याचें सहाय्य अनत्याचारी युद्धांत नव्हतें. शांतताप्रधान युद्धांत जे **व्हाइसरॉय** इतके प्रकार करूं शकले तेच **व्हाइसरॉय** चालू लढ्यानें उग्र स्वरूप धारण केलें असतें तर काय करूं शकले असतें याचें त्रैराशिक गणितज्ञांनीं मांडावें. **व्हाइसरॉयनीं** कमी दडपशाही केली असे गृहीत धरलें तरी तीं **इंग्लंडच्या** कल्याणाकरितां आणि त्यांनीं जास्त दडपशाही केली असती तरी तीं इंग्लंडच्या कल्याणाकरितांच केली असती. पण मद्यपानावर व्याख्यान देणारानें मद्यपान करून बाहेर पडावें तद्वत् आपण दडपशाही कमी केली नाहीं असे त्यांच्या तोंडून निघालेले शब्द हवेंत लुप्त होतात न होतात तोंच त्यांनीं नवीं ऑर्डिनन्सेस काढून आपलेंच म्हणणें खोटें ठरवावें तसा हा प्रकार आहे. हीं ऑर्डिनन्सेस झालेली दडपशाही कमी होती म्हणून त्यांची भरपाई करण्याकरितां काढलीं कीं काय कोण जाणे. एकंदर त्यांचें हें भाषण खरें मानावयाचें तर आत्मनिंदेपर होतें असें म्हणावें लागतें.

* * *

न्यूरिपब्लिकपत्राचा इंग्रजांना इषारा.

अमेरिकेंत प्रसिद्ध होणारें **न्यूरिपब्लिक** पत्र **हिंदुस्थानची** बाजू योग्य रीतीनें मांडूं लागल्यामुळें **इंग्लंडमधील** वृत्तपत्रांनीं कोलाहल सुरू केली. या कोलाहलीचा उद्देश त्या पत्राला **हिंदुस्थानवर** दुगाण्या झाडण्यास लावाव्या असा होता, पण तो व्यर्थ गेला. **न्यूरिपब्लिक** पत्राच्या अनुकूल लिखाणामुळें हिंदी लोक **राऊंड टेबल परिषदेला** जात नाहींत अशीं हास्यास्पद विधानें इंग्रजी वृत्तपत्रें करीत आहेत. जणू काय न्यूरिपब्लिक पत्र म्हणजे या चळवळीचें सूत्रधार आहे ! पण कोणत्याहि वृत्तपत्रानें **हिंदुस्थानबरोबर** सहानुभूतीनें वागूं नये अशी **इंग्रज** वृत्तपत्रांची इच्छा आणि एखादें पत्र सहानुभूतीनें वागलेंच तर तेवढ्यानें **इंग्रजांचें** राज्य आटोपलें असें भासविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. तेव्हां अशा सहानुभूति तुम्ही दाखवूं नका व आमचें वैर संपादूं नका असें ते म्हणत असतात. न्यूरिपब्लिक साप्ताहिकाच्या संपादकानें १९ नोव्हेंबरच्या अंकांत जे विचार मांडले आहेत ते इंग्लिश लोकांनीं अवश्य स्वीकारावयास पाहिजेत. तें पत्र म्हणते ' **हिंदुस्थान काय मागत आहे ? स्वातंत्र्य ना ? हें आतां किंवा अल्पावधींत वसाहतीच्या स्वराज्याच्या द्वारां मिळावें अशी त्याची इच्छा. ब्रिटिशांनीं त्यांना १३ वर्षें स्वराज्याच्या गप्पा मारून झुलवलें. ब्रिटिशांनीं केलेला वचनभंग व अद्याप हिंदुस्थानवरील ताबा न सोडण्याची इच्छा यामुळेंच हिंदी लोक बिथरले आहेत.** आम्ही आतांपर्यंत जें जें लिहिलें तें सत्याला धरून आहे. पण मनुष्य स्वतःला तापदायक वाटणाऱ्या गोष्टी समजून घ्यावयास टाळीत असतो आणि ही गोष्ट उदार मनाचे इंग्रज लोक २५००० तुरुंगांत पडलेल्या देशभक्तांविषयीं उदासीन आहेत यावरून सिद्ध होते. या देशभक्तांना खालचा वर्ग देणें, अन्न-पाणी त्यांना न मिळू देणें, त्यांच्यावर लाठ्यांचा मारा करणें, व देशभक्तांच्या गुन्ह्याकरितां कांहींना फांसावर लटकावणें वगैरे प्रकार हेंच सिद्ध करतात. हिंदी लोकांनीं सध्यां जी अनत्याचारी असहकारिता सुरू केली आहे तीच जर अत्याचारी स्वरूप धारण करूं लागली तर इंग्लंडचें काय होईल ? इंग्लंडला हिंदी लोकांबरोबर लढणें अशक्य आहे. ही गोष्ट सध्यांच्या परिषदेनें लक्षांत घेतली पाहिजे. **महात्मा गांधींविषयीं** ब्रिटिश पत्रकार म्हणत आहेत कीं, ते बुद्धीला पटणाऱ्या गोष्टीला सुद्धां मानावयास तयार नाहींत; ते एक तत्ववेडे गृहस्थ असून त्यांच्याबरोबर तडजोड करणें शक्य नाहीं; त्यांचे ग्रह आतां मावळले आहेत आणि निव्वळ कृपादृष्टि म्हणून गांधी पक्षांतील तरुण मंडळी त्यांच्याविषयीं सहिष्णुता बाळगीत आहेत; या **गांधींच्या** गैरहजेरीतच तडजोड होईल आणि नंतर सध्यांचा विरोध आयर्लंडप्रमाणें नाहींसा होईल. या त्यांच्या विचारांना जास्त सौष्ठव आलें असतें; पण **ब्रिटिशांनीं गांधी** व त्यांचे २५००० अनुयायी तुरुंगांत डांबले नसते तर. **महात्मा गांधी** हे समजुतदार नाहींत असें या पत्रकारांना म्हणण्याचा अधिकार काय ? त्यांना पटेल अशी गोष्ट करण्याचें ब्रिटिशांनीं कधीं कबूल केलें होतें ? अमुक काळीं आम्ही तुम्हाला खात्रीनें स्वातंत्र्य देऊं अशा बुद्धीनें ब्रिटिश मुत्सद्दी गांधींना कधीं भेटले होते काय ? **हिंदुस्थानच्या** वतीनें इंग्लिश लोकांबरोबर मैत्री करावी, सहकार्य करावें या महत्त्वाकांक्षेने **गांधींनीं** आपल्या दीर्घ आयुष्यांत प्रयत्न केला; पण त्यांच्या या आयुष्यांत त्यांना उर्मटपणे वागविलें गेलें, त्यांना तुच्छतेनें लेखण्यांत आलें, त्यांना अनिश्चित उत्तरें दिलीं व तींहि कधीं खरीं ठरवलीं नाहींत. हिंदुस्थानाला पुळपुळीत सुधारणा देण्याचे अर्धवट प्रयत्न इंग्रजांनीं केले आणि त्या सुधारणा निरुपयोगी ठरल्या ! गांधी जर आतां समजुतदार नसले, कालमर्यादेच्या बंधनाशिवाय ते जर तुमच्या वचनावर विश्वास ठेवीत नसले, इंग्लिश लोकांच्या विश्वासाविषयीं ते जर निराश झाले असले तर तो कोणाचा अपराध आहे ? **गांधींशिवाय** तडजोड करणें व संगीनीच्या पहाऱ्यांत ती अंमलांत आणूं पहाणें म्हणजे मोठी चूक करणें होय. अशी तडजोड करण्याऐवजीं नुसत्या शस्त्राच्या सामर्थ्यावर राज्य करणें काय वाईट ? **इंग्लिशांनीं** हिंदुस्थानला असें तात्काळ व असंदिग्ध वचन दिलें पाहिजे कीं, आम्ही तुम्हाला पूर्ण स्वराज्य देऊं, त्याची सुरवात आतां करूं व तें स्वराज्य अमुक अमुक अवधींत पुरें करूं. कानडा, **ऑस्ट्रेलियाप्रमाणें हिंदुस्थानलासुद्धां** वसाहतींतून फुटण्याचा अधिकार आहे ही गोष्ट देखील इंग्रजांनीं कबूल केली पाहिजे. अशा प्रकारची वृत्ति **इंग्लंडनें** दाखविली तरच सध्यांचा लढा मिटेल. एरवीं **हिंदुस्थानचें** काय होईल कोणी सांगावें ? ”

* * *

चर्चिलची स्पष्टोक्ति.

मित्र व शत्रु यांची पारख करणें फार कठीण असतें. बाहेरून मायाजाल पसरणारा पण आंतून दावा साधणारा मित्र, उघड शत्रुत्व करणाऱ्या मनुष्यापेक्षां खात्रीनें दुष्ट होय. **चर्चिल** साहेबांनीं जेव्हां **हिंदुस्थानविषयक** विचार बोलले तेव्हां पुष्कळ मंडळी त्यांच्यावर क्रुद्ध झाली. या क्रुद्ध मंडळींत **इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानची** मंडळीहि होती. **राऊंड टेबल परिषदेसारखा** मंगलकारक समारंभ चालू असतां **चर्चिलनें** भलते विचार प्रगट करावेत हें तिकडील मुत्सद्यांना पसंत पडलें नाहीं. त्या मुत्सद्यांना डोळा फोडायचा नाहीं व काडी मोडायची नाहीं या म्हणीप्रमाणें **स्वराज्य** आम्हाला द्यायचें नाहीं पण नाखुष तर आम्हाला करायचें नाहीं असें धोरण आंखलें. त्यांच्या या डावपेचांत एखादा **चर्चिल** सत्य वाटणारी गोष्ट बोलून गेला म्हणजे डाव उघडा पडतो आणि **इंग्लिशांचें** हृद्गत् बाहेर पडतें. **पण ज्यांना इंग्लिशांची पूर्ण माहिती आहे त्यांना चर्चिलच्या भाषणांत नवें असें कांहींच वाटत नाहीं.** जुनी आठवण आम्ही विसरूं नये म्हणून **व्हाइसरॉय, स्टेट सेक्रेटरी व बादशहा** जसे **स्वराज्याच्या** अभिवचनाचे जाहीरनामे प्रसिद्ध करतात, त्याप्रमाणें **चर्चिलसारखा** एखादा माणूस मधून मधून **इंग्रजांच्या** अंतःकरणांत **हिंदुस्थानविषयक** कोणते विचार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

आहेत हें जाहीर करीत असतो. हेच विचार **हिंदुस्थानाला** मार्गदर्शक आहेत. **महात्मा गांधी** म्हणत आले कीं, **इंग्रजांच्या** अंतःकरणांत अद्याप बदल झालेला नाहीं; त्याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे अमलीं भाषणं होत. तेव्हां ढोंगी मित्रापेक्षां सच्चा शत्रू चालतो आणि चॉचिल हे **हिंदुस्थानचे** सच्चे शत्रु आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. **चर्चिलसाहेबांनाहि** आम्ही त्याबरोबरच सांगून ठेवलें पाहिजे कीं, **हिंदुस्थान इंग्रजांच्या** हातून आपल्याला स्वराज्य मिळेल असें कधींच समजत नव्हता व नाहीं. **स्वराज्य कोणी कोणाला खुषीनें दिलेलें नाहीं व देणाराहि नाहीं.** मग अशी व्यर्थ दर्पोक्ति काढण्यांत हेतु कोणता? **राऊंड टेबलला** जे **हिंदुस्थानचे** कांहीं लोक गेलेले आहेत त्यांना **हिंदुस्थाननें**

अवनतीचीं कारणें.

सरकारला बुद्धि विकतांना आमच्या अव्वल पिढीनें विचार केला नाहीं आणि आजहि आपली बुद्धि सरकारला विकणारे विचार करीत नाहींत. आपल्या स्वार्थामुळें आपण राष्ट्राचें किती नुकसान करतों हा विचार जर पांढरपेशावर्गानें केला तर आज आमचा उत्कर्ष होईल. पण स्वार्थापुढें जग तुच्छ लेखणारे मागील पिढींत होते तसे आजच्याहि पिढींत आहेत हेंच राष्ट्राचें दुर्दैव होय. सरकारी नोकराप्रमाणें इतर वर्गहि असेच बेदरकार झालेले आहेत. राष्ट्रोन्नतीची जबाबदारी आपल्यावर आहे ही कल्पना त्यांना शिवतच नाहीं. पण अशा उदासीनवृत्तीनें त्यांना यापुढें कोणी गप्प बसूं देणार नाहीं. ज्यांना ज्यांना म्हणून विचार करण्याचें सामर्थ्य असेल त्यांनीं त्यांनीं आपल्या



ब्रिटिशांचा पूर्वींचा व्यापार. व आतांची दुर्दशा.

आपले प्रतिनिधि म्हटलेलें नाहीं. ते स्वतःचे तरी प्रतिनिधि आहेत किंवा नाहींत याचीहि आम्हाला माहिती नाहीं. **हिंदुस्थानच्या** कल्याणाची त्यांना इतरांप्रमाणेंच तळमळ आहे पण त्यांचा मार्ग चुकीचा आहे. **पाठीशीं पुरेसें सामर्थ्य असल्याशिवाय कोणत्याहि परिषदा यशस्वी होत नाहींत.** कायदेभंगाच्या चळवळीनें असें सामर्थ्य निर्माण झालें असतें तर **महात्मा गांधींच्या** चरणावर या परिषदेनें लोळण घेतली असती. पण अद्याप हें सामर्थ्य निर्माण व्हावयाचें आहे. यंत्राला गति मिळाली आहे आणि तें यंत्र एवढें सामर्थ्य निर्माण केल्यावांचून रहाणार नाहीं. **चर्चिलसाहेबांच्या** स्पष्टोक्तीबद्दल आम्ही त्यांचे आभार मानले तरी त्याचा अर्थ **हिंदुस्थान इंग्लंडच्या** दातृत्वावर याचकाप्रमाणें दृष्टि लावून बसला आहे असा कोणी समजूं नये.

***

रशियांतील माणुसकी.

कांहीं दिवसांपूर्वी **रशियांतील** चार पांच जणांवर तेथील सध्यांच्या राज्यपद्धतीविरुद्ध चळवळ केल्याबद्दल खटला करण्यांत आला आणि त्यांना फांशीची शिक्षा फर्मावण्यांत आली. या राज्यद्रोह्यांना देहान्त प्रायश्चित्त मिळालेलें पाहून जगांतील भांडवलवाली राष्ट्रें **रशियावर** तुटून पडलीं. पण **रशियांत** अद्यापपर्यंत माणुसकीनें ठाव सोडलेला नाहीं; व आपल्या कट्टया शत्रूचे सुद्धां प्राण घ्यावे असें त्यांना वाटत नाहीं. एखाद्या गुन्हेगारानें दुसऱ्या एखाद्याला ठार मारलें तर न्यायाच्या नांवाखालीं त्या गुन्हेगाराला न्यायाधीश फांशीची शिक्षा देतो. याचा अर्थ ते असा करतात कीं, न्यायाधीश हा सुद्धां न्यायाच्या नांवाखालीं खूनच करतो व तो न्यायाधीश नसून खुनीच इसम होतो. पण भांडवलवाल्या राष्ट्रांत न्याय्य पद्धतीनें केलेला खून हा खून होत नाहीं. रशियांत मात्र असा प्रकार नाहीं. **रशियांत** सूडबुद्धि नाहीं व इतर सुधारलेल्या रानटी राष्ट्रांप्रमाणें फांशीची शिक्षाहि नाहीं. झारशाही आटोपल्यानंतर **रशियानें** ही रानटी शिक्षाहि नाहींशी केली आणि जास्तींत जास्त १० वर्षें कैदेची शिक्षा ठेवली. त्याप्रमाणें त्या मंडळींनीं झालेली फांशीची शिक्षा रद्द होऊन १० वर्ष शिक्षा देण्यांत आली. **रशियांतला** तुरुंग आमच्या इकडील घरापेक्षां पुष्कळ चांगला असतो आणि तुरुंगांतील तटबंदी किंवा छळ बिलकूल नसतो. **रशियाला** शिव्या देणारीं राष्ट्रें कसले भयंकर प्रकार करीत आहेत हें पाहिलें म्हणजे अंगावर शहारे येतात. **रशियांतील** माणुसकी साऱ्या राष्ट्रांत संचरेल तर खरोखर जग सुखी होईल.

***

अवनतीचीं कारणें दृष्टि अन्तर्मुख करून शोधून काढावीं. निव्वळ सरकारला शिव्या देऊन इतउत्तर भागणार नाहीं. आम्ही हि पुष्कळ दोषी आहों. स्वतःतील दोष निघाल्याशिवाय सद्गुणांना आंत रहावयास जागा सांपडत नाहीं. काम करण्याचा आळस, परदेशी माल घेऊन चैन करण्याची आत्मघातकी संवय, व्यवहारांतील अप्रामाणिकपणा, स्वतःपलीकडे न पहाण्याची प्रवृत्ति, व दुसऱ्यांना नांवें ठेवण्याची



ब्रिटिशांची दुर्दशा.

From *Kladderadatsch* (Berlin)

खोड इत्यादि अनेक दुर्गुण आमच्यांत आहेत. यासंबंधीं आम्ही विचार केला पाहिजे व सुधारणा केली पाहिजे. या उद्देशानेंच याच अंकांत '**विचारशक्ति ही राष्ट्राच्या उत्कर्षाची गुरुकिल्ली आहे**' हा लेख दिला आहे, तिकडे आम्ही वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों.

***

खमंग] विनोद, वर्णन, वैचित्र्य [खुसखुशीत

लोण्यासह था * लि * पी * ठ लोण्यासह

चविष्ट] लेखक—ग. स. मराठे एम्. ए. पोस्ट पुणें नं. ४ [चुरचुरीत.

पृष्ठें २२५ चित्रें ८ किं. रु. १॥; व्ही. पी. सह रु. १॥।≈.

अभिप्रायः—केसरी "विनोद त्यांच्या लेखणींत निसर्गतःच आहे, व त्याशिवाय बहुश्रुतपणा, संस्कृत काव्यांचें ज्ञान व ऐतिहासिक माहिती या योगानें विनोदास वेळ पाडले आहेत."

मिळण्याचें ठिकाण—लेखकाकडे किंवा मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मृत्युलेख.

प० हुसेन सा़ो मोडक.

माखजन जि. रत्नागिरी येथील कांग्रेसचे कार्यकर्ते हुसेन सा़ो मोडक यांस सप्टेंबर महिन्यांत मृत्यूनें इहलोकांतून नेलें हें कळविण्यास आम्हांस अत्यंत दुःख होत आहे हुसन सा़ो मोडक हे कोकणांतील मुसलमान समाजातील वजनदार पुढारी होते. रत्नागिरी जिल्ह्यांतील मुसलमान समाज त्यांचे उदाहरणानें कांग्रेसचे चळवळींत मोठ्या प्रमाणांत भाग घेत आहे. हिंदु समाजातही त्यांचें वजन असल्यामुळें हिंदुमुसलमानांचें ऐक्य राखण्यांत हुसेनसाहेबांनीं यश संपादिलें होतें. लो. टिळकांच्या होमरूलच्या चळवळीपासून ते राजकारणांत पडले व कांग्रेसचें राजकारण मतमतांतराच्या गलबल्यांतही त्यांनीं सोडलें नाहीं. म. गांधींचे ते एकनिष्ठ भक्त होते १९२१ सालचे असहकारितेचे चळवळींत त्यांनीं पुष्कळ काम केलं व त्या कामगिरीमुळें महाराष्ट्र प्रां. कां. कांमटीनें त्यास ऑ. इं. कां. कमिटीवर दोन वर्षें निवडून दिलें होतें. मध्यंतरीं काहीं घरगुती अडचणीमुळें त्यांस कांग्रेसचें काम करितां आलें नाहीं, तथापि चालू सालीं म. गांधींनीं कायदेभंगाची चळवळ सुरू करताच आपल्या घरगुती अडचणी बाजूस सारून जळगांवचे मुसलमान पुढारी मारशुक्ला याचे बरोबर रत्नागिरी जिल्ह्यांत दौरा काढून कायदेभंगाचा प्रचार करून शेवटीं शिरोडे येथें अनेक मुसलमान सहकारी घेऊन मिठाचा कायदेभंग केला. त्यांस सरकारनें पकडलें नाहीं म्हणून तुरुंगवास घडला नाहीं, तथापि पावसाळा संपताच पुन्हां मीरशुक्ला यांस घेऊन महाराष्ट्रांत कांग्रेसला अनुकूल असलेला मुसलमानांचा संघ काढून जोराची चळवळ सुरू करण्याचा त्यांचा विचार होता. खुद्द माखजन पंचक्रोशींतील लोकांस त्यांचे अकालीं मरणानें अत्यंत दुःख होईलच. तथापि हुसेन सा़ो मोडकांच्या असंख्य अनुयायांनीं त्यांचं कार्य पुढे चालवून त्याची उणीव भरून काढावी मरणसमयीं हुसेन सा़ो मोडकांचें वय चाळिसांचे आंत होतें. त्यांचे मागें त्यांची तरुण पत्नी, वृद्ध वडील व चुलते आहेत त्यांनीं जगरहाटीकडे पाहून समाधान मानावें. धर्मांत निषिद्ध मानल्यामुळें त्यांनीं आपला फोटो काढून घेतला नाहीं.

गृह्यसंस्कार.

कै० हरी कृष्ण गोखले.



रा. रा. हरी कृष्ण गोखले यांचा जन्म, १८५८ सालीं रत्नागिरी जिल्ह्यांतील कार्ले या गांवीं झाला. त्यांचे वडील कृष्णशास्त्री हे उत्तम शास्त्री होते. हरीभाऊ पितृसुखास लहानपणींच अंतरले. घरची गरिबी असल्यामुळें कुटुंबाचा सर्व भार त्यांच्यावरच पडला. मुंबईस आपल्या एका स्नेह्यास भागीदार घेऊन त्यांनीं विड्याच्या पानाची वखार काढली. व त्या धंद्यांत त्यांनीं चांगलें यश मिळविलें. त्यांची प्रकृति हल्लीं तीन चार वर्षें बरीच खालावली होती, तरी त्यांच्या नित्य व्यवसायांत व कार्यक्रमांत त्यांनीं खंड पडूं दिला नाहीं. मरणापूर्वी एकच दिवस ते अंथरुणावर निजून होते. व अत्यंत शांतपणं, २० आक्टोबर १९३० रोजीं सकाळीं ५॥ वाजतां त्यांनीं इहलोक सोडला. त्यांचे मागें त्यांचे चिरंजीव विश्वनाथ हरी गोखले हे मुंबई युनिव्हर्सिटीचे पदवीधर असून तेही व्यापारांतच आहेत.

गृह्यसंस्कार.

कै० श्री. गुलाबराव रामराव जाधवराव सरंजामदार वाघोली.



कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें कीं "श्रीमंत" "जहागीरदार गुलाबराव रामराव जाधवराव वाघुलीकर सरंजामदार हे पुणें मुक्कामीं त्यांचे वाड्यांत ता. ३ नोव्हेंबर १९३० रोजीं सायंकाळीं ७ वाजतां आपल्या वयाच्या ५२ व्या वर्षी कालवश झाले. कै. गुलाबराव हे सुप्रसिद्ध ऐतिहासिक जाधवराव घराण्यांतील हल्लीं विद्यमान असलेल्या सरंजाम जहागिरीचे मालक होते. त्यांच्या एकुलत्या एक कन्या

देवी इंदुमतीबाई ह्या ह्याच वर्षांत ता. २१ जानेवारी १९३० रोजीं आपले वयाच्या ११ व्या वर्षी मृत्यु पावल्या होत्या. कै. गुलाबराव यांस त्यांच्या उतारवयांतला हा एक आधारस्तंभ एकाएकीं नाहींसा झाल्यामुळें जबरदस्त धक्का बसणें साहजिक होतें. मुलीच्या मृत्यूनंतर ते क्वचितच घराबाहेर पडत असत. सरदारसाहेब हे लोकांशीं अत्यंत प्रेमळपणानें वागत असत. त्यांचा स्वभाव अत्यंत दिलदार होता. सार्वजनिक कामांत त्यांनीं उघडपणें कधींहि भाग घेतला नसला, तरी कित्येक संस्थांस गुप्त रीतीनें त्यांनीं सढळ हातानें मदत केली आहे. त्यांच्यांत आत्मविश्वास व मानीपणा विलक्षण तऱ्हेनें दिसून येत असत. त्यांनीं आजन्मांत कोणापुढें मान वांकविली नाहीं, व हें त्यांच्या ऐतिहासिक घराण्यास शोभेल्सेंच झालें.

गृह्यसंस्कार.

कै० सरस्वतीबाई नेरलेकर.आळंदी.

न मातुः परदैवतम्

आर्थीच चिता मायेच । वरी मिष झालें पाढियंताचे । आतां अद्भूतपण स्नेहाचें । कवण वानू श्रीज्ञानेश्वर. भक्तिपरायण परमपूज्य माझे मातोश्रीचा जन्म आळंदीस असल्यानें माहेर व सासर आळंदीच. त्यामुळें लहानपणापासून श्रीचरणीं गुरुभक्ति करणं माझे वंशज, श्रीराम गुरुमहाराज साखरे यांचे शिष्य सांप्रदायी व श्रीगुरु हैबतबुवा यांचे उपाध्ये असल्यानें माझे वडील रंगोआप्पा हे वारल्यावर मातोश्रींचा श्रींची काकड आरती, दूध आरती व प्रदक्षणा करण्याचा मरेपर्यंत सारखा नेम चालू होता. त्यां इतर बायांस अभंग, पदें, काकडा व आरतीचे वेळीं म्हणण्यासाठीं गाणीं शिकवीत असत. त्यामुळें त्यांना ह्या बाया गुरुजी म्हणत असत. त्यांनीं मला २४ वर्षें मातृप्रेमाचा लाभ देऊन शके १८५२ मार्गशीर्ष शुद्ध ५ मंगळवारीं दुपारीं श्रीचरणीं देह अर्पण केला. त्यांचे नांवें श्रीचरणीं अल्पसेवा म्हणून कोनशिळा गणपतीजवळ गाभाऱ्याचे पूर्व दरवाजांत बसविली आहे. ती यात्रेकरूं लोकांनीं वाचली म्हणजे मातोश्रीस आनंद वाटत असे. सदरहू लेख वाचून हल्लींचे स्त्रीपुरुषांस अनुकरणीय होईल. मरणसमयीं त्यांचें वय ८२ वर्षांचे होतें. त्यांचे प्रेमांतील श्रींचे भजनकरी मंडळी भजन करीत स्मशान यात्रेस आली होती. श्रीज्ञानेश्वरमहाराज आपले प्रेमी भक्तास चरणारविंदीं ठाव देतील, अशी श्रीचरणीं प्रार्थना करून लेख पुरा करतो. आपला, मातृप्रेमी.

मराठे फूटवाले बिल्डिंग कारकून

हजारों लोक वांचले आहेत.

जवेरियन यांचें

जीवन—मिक्श्चर

प्लेग, कॉलरा, उलटी, शौचास वारंवार होणें, पोटांत दुखणें, ताप, दमा, खोकला, पडसें, कान व दाढ दुखणें, विंचू वगैरे प्राण्यांचा दंश वगैरेंवर हें औषध फार गुणकारी आहे. किं. बा. १ रु. मोठी बा. १-१२-० रु.

एम्. एच्. जवेरियन आणि कं., चकला स्ट्रीट, मुंबई नं. ३.

बहुमूत्ररोग (मधुमेह) डायाबिटीस—

हा भयंकर व्याधि पिठाचे पदार्थ, चहा, पातळ गोड पदार्थ, पक्वान्नें, भात, वगैरे पदार्थांच्या अतिसेवनानें होतो. ह्यांत लघवीचें प्रमाण बरेंच वाढून त्यांतून पुष्कळ साखर जाते. तहान फार लागते, तोंडास गोडी, पोटांत वात धरणें, मलावरोध अपचन, हातपाय पोटदुखणें, अंगावर गळवें येणें, अशक्तता, मानसिक व शारिरीक श्रम न होणें, इत्यादि लक्षणें होतात. याची हयगय केल्यास एखादी जखम झाल्यानें मरण येतें. त्यावर हें औषध कायमचें गुण देणारें खात्रीचें आहे. यांत संशय नाहीं. किं. ३॥ रु. वि, ट, ख. वैद्य थत्ते धन्वंतरी फार्मसी पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पोंच व अभिप्राय.

पुष्पगुच्छ—शिरोड्याचे श्री. निखारगे यांनीं एका झाडाच्या फायांच्या लाकडाच पातळ काप करून त्याचीं अतिशय उत्कृष्ट फुलें बनविलीं आहेत. हीं फुलें इतकीं हुबेहुब आहेत कीं, माहीत नसलेला माणूस त्यांचा वास घ्यावयास जातो. श्री निखारगे यांच्या या अप्रतिम कौशल्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.

मोत्यांची माळ—(ना. के. बेहेरे—प्रकाशक पर चुरे पुराणिक, मुंबई.) हा कवितासंग्रह वाचल्यावर 'राजन् गुंजफलानां स्रज इति शबरा नैव हारं हरन्ति।' हा चरण रसिक वाचकाच्या डोक्यांत घोळूं लागतो आणि 'मनांत हरघडीं उत्पन्न होणारें काव्य शब्दांत मांडण्यास जेथें वेळ मिळत नाहीं तेथें तें नटविण्यास कसा वेळ सांपडणार?' य' बेहेऱ्यांच्या उद्गारांवरून हा संग्रह खऱ्या रसिकांचें चित्त आकर्षण करून घेणार नाहीं अशी खात्री पटते. हीं हुरमुजी मोत्यें नव्हत, टपोरीं गुंजाफळें आहेत असेंही त्यास वाटल्यावांचून रहात नाहीं. मनांत जर हरघडीं काव्य उत्पन्न होऊं लागलें तर काव्याची व्याख्याच बदलल्याचा अनवस्थाप्रसंग आपल्यावर आंदवेल. मनात आलेल्या प्रत्येक कल्पनेस शब्दनिविष्ट करण्याची जो अमर्याद महत्वाकांक्षा बाळगतो त्याचा दर्जा 'जुळारी किंवा 'पद्यकार' याहून मुळींच वरच्या दर्जाचा नाहीं. आधुनिक कवितासंप्रदांत भरगच्चपणा आणि वैपुल्य या दृष्टीनें मोत्यांच्या माळेला बराच वरचा नंबर देतां येईल. रा. बेहेऱ्यांच्या कवितेंत प्रतिभेची तेजस्विता, स्फूर्तीची भरारी, 'अभिनवानेषी रम्याविष्कार' किंवा काव्याचा जिवंतपणा यांचा अभाव दिसला तरी त्यांची कविता बालबोध, अगदीं सांधीसुधी आणि केवळ निरंगी आहे तिनें पद्याचा बुरखा परिधान केला आहे, आणि तो अलीकडची आहे, म्हणूनच आधुनिक कवितेंत तिची गणना करावयाची. 'राजा शिवाजी' लिहिणाऱ्या कुंट्यांचा अभिनिवेश बेहेऱ्यांच्यापुढें फिक्का पडतो. रा बेहेरे हे उत्कृष्ट व दणदणीत लेखक असतील, त्यांची लेखणी अखंडधाराप्रवाही असेल, पण ते 'कवि' नाहींत. एखद्या प्रचंड ग्रंथाच्या आधारावर महाकवि किंवा कविशिरोमणि (!) होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा 'उभ्या साठ वर्षांच्या आयुष्यांत दहा पांच कविता खर झून त्या चोपड्याच्या जोरावर महाकवि म्हणून घटका अर्ध घटका मिरविण्याची ज्याची मोजकी महत्त्वाकांक्षा आहे' त्याच्यापेक्षां निःसंशय हिशेबी व कांटेतोल व्यवहारी आहे. संस्थेवर जर यशापयश व कर्तृत्व अजमावयाचें असेल तर अभिमन्यूला जन्म देणाऱ्या अर्जुनापेक्षां धृतराष्ट्राला श्रेष्ठ ठरवावें लागेल आणि मृगराज सिंहापेक्षां बगहराजालाच मानाचें पान द्यावें भाग पडेल. एवढ्या मोठ्या कवितासंग्रहांत पांच पंचवीस किंवा त्याहूनही अधिक उत्कृष्ट व गोळीबंद काव्यमौक्तिकें सांपडणार नाहींत असें नाहीं. जास्तही सांपडतील. स्वतःचें कविचरित्र (यांत अनवश्यक आत्मचरित्र पुष्कळच आलें आहे.) देतांना कुठें कुठें आत्मश्लाघेचा भास झाला तरी हें आत्मकथन अगदीं निःसंकोचानें व आपलेपणानें झालें आहे. ही भूमिका म्हणजे टांकाकाराच्या बाघनखांपासून स्वतःचा बचाव करण्याची तयारी नव्हे, हें सांगावयास नकोच. बाळबोध वळणाच्या विद्यार्थांना वाचकानाच ह्या कवितासंग्रहाचें रसग्रहण (appreciation) करितां येईल आणि त्यांना तो संग्रह 'बालबोध मेव्या'-सारखा वाटेल अशी आशा आहे.

गडकऱ्यांचा वाग्विलास—(पां. ग. क्षीरसागर ४६४ नारायण, पुणें). कै. गडकऱ्यांच्या सहवासांत कांहीं काल घालविण्याचा ज्यांना ज्यांना योग आला असेल त्यांना त्यांना गडकऱ्यांच्या विनोदी स्वभावातील कांहीं रम्य स्थळें दृष्टीस पडल्यावांचून राहिलीं नसतील हीं स्थळें स्मरण (वक टिपून काढून रा. क्षीरसागरांनीं गडकऱ्यांच्या स्वभावाची ओळख पटवून दिली आहे ह्या आठवणी तात्पुरत्या महत्त्वाच्या असल्या तरी त्यावरून कवि व नाटककार गडकऱ्यांच्या मनाची ठेवण कशी आहे हें समजून येतें. ह्या पुस्तकांत 'वाग्विलास' मुळींच आढळत नाहीं. त्यामुळें त्यांस 'गडकऱ्यांचा स्मृतिविलास' हें नांव अधिक शोभून दिसलें असतें.

श्रीमत् दासबोध.

(समर्थचरित्र, शब्दार्थसार व टीपा यांसह)

संपादकः—सत्याग्रही वीर पां. प्र. कुकडे, पुणें.

या दासबोधाचें अंतरंग आणि बहिरंग अत्यंत उद्बोधक व प्रासादिक असून बाल व वृद्धांप्रमाणेंच सर्व **तरुण-तरुणींच्या हातीं देण्यास सर्वस्वी योग्य असा हा एकच दासबोध आहे.** यांविषयीं "महाराष्ट्रभाषाकोविद" **श्री० दत्तो वामन पोतदार, बी. ए.** [सुपरिटेंडेंट–नूतन मराठी विद्यालय, पुणें प्रोफेसर–सर परशुरामभाऊ कॉलेज पुणें. इ०] हे लिहितात:–" श्रीमत् दासबोध हा मराठी वाङ्मयांतील एक अत्यंत प्रासादिक, स्फूर्तिदायक आणि वाचकाची 'क्रिया तात्काळ पालटविणारा' प्रभावी ग्रंथ आहे.........असा हा 'अनेक संशयाच्छेदि' ओजस्वी ग्रंथ सर्वांच्या विशेषतः तरुणांच्या मननाचा विषय होईल तर त्यांचें मोठें कल्याण होईल......... दासबोधाच्या जुन्या व विश्वसनीय.........शुद्ध प्रतीच मुद्रण मोठ्या अक्षरांनीं करून तें स्वानुभवी आणि मननशील असे समर्थभक्त रा. कुकडे यांचे नजरेखालीं सटीप स्वरूपांत लोकांसमोर मांडण्याचें श्रेय चित्रशाळेनें मिळविलें आहे.........''तोचि ग्रंथ बरा पहा'' असें समर्थच स्वतः या दासबोधाविषयीं लिहितात. अशा ग्रंथाचा अभ्यास चिकित्सापूर्वक व स्वानुभवपूर्वक किंवा समर्थांच्या शब्दांत बोलावयाचें तर गुरुप्रचीति, शास्त्रप्रचीति, आणि आत्मप्रचीति या त्रिविध प्रचीतींच्या द्वारें पूर्ण घडेल तो भाग्यवान् खरा.

रा कुकडे आणि चित्रशाळा यांचा प्रस्तुतचा प्रयत्न त्याकामीं पुष्कळांस उपयोगी पडेल. रा. कुकडे यांनीं अखेर पुरुष व स्थलदर्शक ज्या सूचा जोडल्या आहेत त्यांचे योगें ग्रंथाची उपयुक्तता वाढली आहे.........'' इ. पृष्ठसंख्या ११००, किंमत **कापडी** बांधणी २। रु. **रेशमी** बांधणी २॥ रु. व **सुटी पोथी** केवळ २ रु. टपाल हशील. १२ आणे.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

डॉ. जे. डी. कुळकर्णी यांचीं "निवडक" औषधें.

नं. ४९ वीर्योटोन गुटिका [रजिस्टर्ड] सर्वांगसुंदर धातु पौष्टिक. रक्त–मांस–मेंदु–वीर्यबलवर्धक. रक्तहीनता, स्वप्नावस्था, स्त्रियांच्या प्रदरादि विकारांवर अप्रतिम प्रौढ विद्यार्थी वर्गास व मानसिक श्रमाचीं कामें करणाऱ्यांस अमोलिक ईश्वरी देणगी. किं. ३२ गुटिका बाटली रु. २॥, १०० गु. बा. रु. ६

नं. ५० चैतन्योटोन गुटिका [रजिस्टर्ड] अत्यंत धातुपौष्टिक, वीर्योत्पादक, संतानोत्पादक पिंडवर्धक, कामोत्तेजक, वीर्यस्तंभक. स्त्री–पुरुषांच्या मानसिक, शारीरिक–रेत–आर्तव–वीर्य दुर्बलतेवर अमोलिक. किं. ३२ गुटिका बाटली रु ६ १०० गु. बा. रु १४.

नं. ५१ चैतन्योटोन तेल [रजिस्टर्ड] मोरांच्या पिसांपासून युनानी पद्धतीनें बनविलेलें. इंद्रियशिथिलता–वक्रता नाहींशी होऊन मर्दाई येण्यावर अत्यंत खात्रीचा बाह्योपचार. किं. २॥ तोळे बाटली रु. ५

स्त्री पुरुषांचे अनेक दुर्धर रोग नाहींसे करून शरिरांत भरपूर पाचनशक्ति, रक्त–आर्तव–वीर्य–वृद्धि करणारा, चैतन्यवर्धन करून इच्छित समाधान व मानसिक शांति देणारा **चैतन्योटोन गुटिका** व **चैतन्योटोन तेल** हाच एक बिनधोक, सर्वोत्कृष्ट, जगप्रसिद्ध, निर्वाणीचा उपाय होय, अशी याची सर्वत्र फार ख्याति आहे. १ सेट किं. रु. १०.

पाचनशक्ति अत्यंत क्षीण असणाऱ्यांस आमचें **पलिकझीर–अंगूर कंपाऊंड** (प्रचलित सर्व जातीचीं व्हिटामिन–जीवन–तत्त्वें युक्त) जेवणापूर्वी घेणें. तसेंच आंगांत जीर्णज्वर, जुनाट मलेरिया तापाची कसर, कोष्ठबद्धता इत्यादि विकार वाटत असतां रोज सकाळीं १।१ **मलेरिन वटिका** घेणें अत्यंत हितावह. मोठा कॅटलॉग मागवा.

तारेचा पत्ता "ॐकारोदय" "Omkarodaya" Bombay.

डॉ. जे. डी. कुळकर्णी. ठाकुरद्वार रोड, मुंबई नं. २

हिंदुस्थानची भावी तरुण पिढी सशक्त व जोमदार होण्यास एकच उपाय.

आमचा बालसुधा आमच्या छोट्या दोस्तांस पचतो व मानवतो.

प्रत्येक आईबाप थंडीच्या दिवसांत आपल्या मुलांस

बालसुधा—

देतात. याचे योगानें मुलांचा आहार पचतो. शौचास साफ होतें. शरीरांत रक्त व मांस यांची वृद्धी होऊन चेहरा तजेलदार होतो. थंडीच्या दिवसांत होणारे रोग सर्दी, खोकला, पडसें, होत नाहींत. पिण्यास एकदम गोड किं. -।।।- ट. ख. -।।- सर्व दुकानदाराजवळ मिळतो.

ज्या शिशीवर 'सुख संचारक कंपनी मथुरा' चें नांव नसेल अशी शिशी घेऊं नका.

पत्ता—सुख संचारक कंपनी, मथुरा.

हार्टडिसीज—ह्या हृदयावर घात्रांचा उपाय–याने छातीत चमका भारणे व दुखणे, छातीत जोरानें धडधडणें (पाल्पीटेशन) जीव घाबरणें, अतिशय थकवा येणें, दम कोंडणे, गार घाम सुटणे, पोटांत वात धरणें. यापासून एकादे वेळीं हृदयक्रिया एकदम बंद पाडून मृत्यूही येतो. अशा भयंकर व्याधीवर इंग्रजी औषध कायमचें गुणकारी नाहीं. आमच्या **हृदजीवन औषधानें** नव्या जुन्या व्याधि साफ बऱ्या होतात. तरिवाही येतो याचें म्हणून हें अगदीं स्वल्प देविली आहे. किं. १ बिबाव ३। रु. वि. इ. ई.

वैद्य. रघुचे बुधवारपेठ, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हाच कां धर्म

(एक उत्कृष्ट सामाजिक कादंवरी.)

ही कादंवरी सुप्रसिद्ध लेखिका सौ. शांताबाई नाशिककर (भिडे) बी. ए. यांनीं लिहिली असून धर्मावर अशी सुंदर कादंवरी मराठींत निघालीच नाहीं. स्त्री-पुरुषांनी ही कादंबरी अवश्य वाचावी. तुम्ही रोज पाळता तो धर्म काय, त्यांत किती अधर्म आहे व खरा धर्म कोणता याचा विचार व हृदयंगम चर्चा यांत केली आहे. गोपिनाथ महाराजांचे पापी आचरण व त्यामुळें अनंतरावाचां वायको कशी विघडली हें तुम्ही अवश्य वाचा. कापडी बांधणी किंमत रुपये २ ट. ख. निराळा.

महात्मा गांधी सैतान कीं साधु

ही प्रचलित राजकारणावर लिहिलेली अशी पहिलीच कादंवरी आहे. महात्मा गांधींच्या राजकारणाची, त्यांच्या सामाजिक मतांची व त्यांच्या योग्यतेची चर्चा फारच मार्मिकपण केली आहे. महात्मा गांधी हे सैतान आहेत कीं साधु आहेत याचें उत्तर तुमच्या मनाप्रमाणें पाहिजे तें त्यांत दिलेलें आढळून येईल. किंमत रुपये २ ट. ख. निराळा.

ही कादंवरी वाचीत असतां डोळे अश्रूंनीं भरून येतात.

बंधमुक्ता

लेखिका सौ. कमलाबाई बम्बेवाले बी. ए.

सुशिक्षित नवरा मिळाला तरी उपेक्षाखत्या बी. ए. झालेल्या स्त्रीला कसा अनन्वित छळ सोसावा लागला याचें करुणाजनक चित्र तुम्ही वाचल्याखेरीज राहूं नका. आबासाहेब हे जहागिरदार होते. पण मिस् शर्मा नांवाच्या तरुणीच्या नादीं लागून त्यांनीं आपल्या संसाराची कशी माती केली हें चित्र तुम्हांस या कादंबरींत बाचावयास सांपडेल मराठींत सौ. कमलाबाई बम्बेवाले यानीं चांगला लौकिक कमाविला असून त्यांच्याइतक्या चटकदार गोष्टी दुसऱ्या कोणत्याच लेखिकेला लिहिणें साधत नाहीं. आपण ही कादवरी अवश्य वाचा. किंमत रुपये २ ट. ख. निराळा.

बेळगामी ब्राह्मणेतर

ही कादंवरी तुम्ही वाचल्यास ब्राह्मणेतर ब्राह्मणांचा कसा निष्कारण द्वेष करतात याची तुम्हास चांगलीच कल्पना येईल सत्यशोधकांच्या अघटित लीला यांत फारच उठावदार रितीनें वर्णन केल्या असून ब्राह्मणेतर म्हणविणाऱ्या कांहीं मूर्खांच कालित्व वर्णन मनास चटका लावते यांत शंका नाहीं. किंमत रुपये १ ट. ख. निराळा.

स्त्रियांच्या मनोरंजक गोष्टी

या पुस्तकांत सौ सुधा अत्रे बी. ए. सौ. यमुनाबाई हिर्लेकर एम. ए कुमारी वसुंधरा भांडारकर सौ इंदिराबाई पेंडसे, सौ. शांताबाई नाशिककर बी. ए. सौ. मनोरमाबाई, भोंडे सौ. कमलाबाई वावळे, कुमारी इंदुमती पानसे इत्यादि लेखिकांनीं लिहिलेल्या अत्यंत चटकदार, हृदयंगम व मनोरंजक गोष्टी संग्रहित केल्या आहेत. त्या आपण वाचल्याखेरीज राहूं नका. वरील सर्व पुस्तकें लहानापासून मोठ्यापर्यंत वाचण्यासारखीं आहेत. किंमत एक रुपया ट. ख. निराळा.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

'आनंदा'चे

एका वर्षांत दोन खास अंक!

फेब्रुवारी १९३१—'आपटे' खास अंक.

जुलै १९३१—३०० वा खास अंक.

१९३१ साळच्या वर्गणीदारांना हे दोन्ही अंक मोफत मिळतील. तरी जानेवारी पासून वर्गणीदार व्हा.

वार्षिक वर्गणी—लहान अंक २ रु. मोठा अंक ३ रु.

मुलांना हेंच मासिक फार आवडतें याचें कारण त्यांना समजणार नाहीं अगर त्यांना गोडी वाटणार नाहीं असें ह्यांत कांहींहि असत नाहीं. प्रत्येक विषय मनोरजक करून सोप्या भाषेत सांगितलला असतो. पौराणिक, ऐतिहासिक अद्भुत इ. गोष्टी, शास्त्रीय विषय, प्रवासवर्णनें, थोरांचीं चरित्र, मुलांच्या प्रश्नांना उत्तरें, व्यायामाची आवड उत्पन्न करणारे विषय, अगदीं लहान मुलांसाठीं ठळक टाइपांतील मजकूर, मुलांचे लेख, नवीं कोडीं इ विषय आणि सुंदर व मौजेचीं चित्रें आनंदांत येतात.

पत्ता:—आनंदकार्यालय, पुणें नं. २

नं. ७०१ रिस्ट वॉच किं. रु. ४॥



रोल्ड गोल्ड गॅरंटी ५ वर्षे

हें घड्याळ घड्याळाची महाराणीसारखें आहे. नवीन, खरोखरच उत्तम व सुंदर डिझाईनचे, मजबूत मशीनरी आणि सुंदर व खुष करणारा शृंगार. घड्याळ खऱ्या सोन्यासारखें दिसतें. सर्व प्रकारें खरी वेळ दाखविणारें, केव्हांही आळस करीत नाहीं, तसेंच जोरानें चालत नाहीं या खुब्या असून ही घड्याळाची ब्यांडसह किं. रु. ४-८-० आहे. टपालखर्च वगैरे -६-०

पत्ता-इंपिरिअल ॲन्ड एम्पायर पोष्ट ऑफिस बीडन स्ट्रीट कलकत्ता.

पदार्थविज्ञान—

या शास्त्राच्या मूलतत्त्वांची माहिती सुबोध व सचित्र या पुस्तकांत दिली आहे. मुंबई सरकारांनां हें टेक्स्टबुक म्हणून मंजूर केलें आहे. किं. ८ आणे.

कीटकशास्त्र—

ह्यांत कीटकांचे वर्ग व त्यांचीं लक्षणें वगैरे माहिती देऊन, कीटकांचें निरीक्षण कसें करावें हें अनेक प्रयोग देऊन सांगितलें आहे. भरपूर चित्रें घातलीं आहेत. मुंबई व मध्यप्रांत सरकारांनीं हें पुस्तक मंजूर केलें आहे. किं. ६ आणे.

खाद्य पदार्थांचें पृथक्करण—

पौष्टिक, उष्णतोत्पादक, व्हिटामीन, फॉस्फरस हीं द्रव्यें कोणत्या खाद्य पदार्थांत जास्त प्रमाणांत असतात हें कळण्याकरितां सर्व खाद्य पदार्थांचें पृथक्करण दिलें आहे. किं. १ आणा.

म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

बालकवींची कविता.

बालकवींच्या काव्याचें वाचन मनास फार आल्हाद देतें. अगदीं लहानपणापासून सृष्टीच्या सौंदर्यानें मोहित होऊन जाण्याची शक्ति या कवीला प्राप्त झालेली होती. प्रस्तुत कवीच्या मनाचा अवघा व्यापार सरासरी शंभर पानांत समाविला आहे. ह्या पुस्तकांत एकंदर ८६ कविता दिल्या आहेत. ठोंबरे यांची शब्दावरील हुकमत वाखाणण्यासारखी आहे. त्यांची कोणतीही कविता वाचून पाहिली तरी शब्दाची जडण एकजिवाची अशी दिसते. यांचे काव्यांत प्रसाद हा गुण तोंडोतोंड भरलेला दिसतो. अलंकारांच्या व कल्पनांच्या सोपेपणामुळें वाचणाराला अर्थाची प्रतीति केवळ खेळत खेळत होत जाते. बालकवी हे खरे रसिक व खरे सौंदर्यउपासक होते. त्यांच्या कवितेची एक आवृत्ति छापून प्रसिद्ध केली आहे. किंमत रु. १ ट. ह. ०१०६ म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

" हिंदुस्थानचे लोक, परकीय साम्राज्यांतून समानभावानें वागूं शकतात; समान दर्जाला पोहोंचूं शकतात; समान-हक्क प्राप्त करून-घेऊं शकतात; परक्या सरकारशीं राजकारण करूं शकतात; राजकीय संबंध जोडूं शकतात. आणि ज्या ज्या वेळीं, देशांतील पुढारी कूपमंडुकन्यायानें राजनीतीला कॉंग्रेसच्या वर्तुळांतच आबद्ध करून ठेवितात, त्या त्या वेळीं ' भारतीय राजनीती ' ला ते बाहेर सन्मुख आणून, जगाच्या सिंहासनावर नेऊन बसवितात. "

क्रांतिकारकांचा-

अप्रकाशित राजनैतिक

इतिहास.

लेखक

भूपेंद्रनाथ दत्त एम्. ए. पी. एच.डी.**राजा महेंद्रप्रताप** (अफगाणिस्थान); **श्रीशैलेंद्रनाथ घोष**(न्यू यॉर्क)

महायुद्धाच्या वेळीं क्रांतिकारकांनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां केवढे आटोकाट प्रयत्न केले; **एमडेननें** केवढा कहर उसळून दिला; **कुतल अमीराचें** पतन कसें झालें; जर्मनी, तुर्कस्थान, इराण, अफगाणिस्थान, चीन, जपान या देशांना अनुकूल करून घेऊन क्रांतिकारकांनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां आपल्या राजनैतिक कारस्थानांचीं जाळीं चहूंकडे कशीं पसरविलीं; २२ वर्षांचा बालक **केदारनाथ**, पहिलाच **पार्शी** तरुण **केरसास्प** यांना केरमानला इंग्रजांनीं गोळ्या घालून कसें ठार मारलें; रशियाच्या झारला **महेंद्रप्रतापचें** गुप्त पत्र पोहोंचवीत असतां इंग्रजांच्या हातीं सांपडून डॉ० **मथुरासिंहाचा** मृत्यु कसा झाला; **इंडो-जर्मन मिशनचा** छळ कसा करण्यांत आला; राजा **महेंद्रप्रतापचें** अफगाणिस्थानांत कसें अपूर्व स्वागत झालें; **यतींद्र मुकर्जीच्या** युद्धकौशल्याची इंग्रजांनाहि कशी तारीफ करावी लागली; श्रीशैलेंद्रास अंदमानला पाठविण्याचा हुकूम झाला असतां श्रीशैलेंद्र कलकत्त्यासच कित्येक महिने कसा राहिला; **शैलेंद्राला २५ हजारांचें बक्षीस कशासाठीं लावण्यांत आलें**; शैलेंद्रानें शेवटीं तुरी देऊन **अमरिकेस** कसें पलायन केलें; **एका क्रांतिकारक तरुण स्त्रीचें साहस** प्रत्येक **ओळीओळीं-तून सत्य** आणि **रोमहर्षण इतिहास** तुम्हांला दिसून येईल. महायुद्धाच्या वेळीं ज्या गोष्टीची कल्पनाहि नव्हती त्या गोष्टी आज प्रकाशित होत आहेत. हा इतिहास वाचत असतांना **इतिहासाच्या एका अज्ञात दालनांत** आपण प्रवेश करीत आहां असें तुम्हांस वाटेल. हा इतिहास हिंदुस्थानला नवी दृष्टि प्राप्त करून देईल; आणि तुम्हांला थक्क करून सोडील. देशकल्याणाचा जो जो मनुष्य विचार करीत आहे त्यानें हें पुस्तक अवश्य वाचलें पाहिजे प्रत्येक तरुण स्त्रीपुरुषानें आपल्या देशाच्या या स्वातंत्र्येतिहासाचें मनन केलें पाहिजे. कागद ग्लेझ; सुंदर बांधणी; मिशनचे आदिकरून सात फोटो; **मुखपृष्ठ कैसरच्या फोटोनें विभूषित.** पुनः हें पुस्तक मिळण्याचा संभव फारच थोडा. सर्वांना हें पुस्तक घेतां यावें म्हणून किंमत फारच थोडी ठेवली आहे. किं. १ रुपया. ट. ह. निराळें.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

फ्लोरावेरा परफ्युम कंपनी
३०३, जुम्मा मशीद मुंबई नं. २
Floravera Perfumery Co.
303, Jumma Masjid
Bombay No. 2

---

६ रु.त ग्रामोफोन व ७ घड्याळें फुकट—इनाम.



आमच्या ओटो सुगंधराज सेंटरच्या १२ बाटल्या मागविल्यास एक रेल्वे टाईम ट्वाय पॉकेट वॉच, ६ सुंदर ट्वाय रिस्ट वॉच आणि जर्मनींत तैयार झालेला सर्व सामानासह एक ग्रामोफोन फुकट दिला जाईल. सगळया वस्तूंचा किं. ६ रु. टपाल खर्च वगैरे निराळा. रेकर्ड ७॥ रु. डझन या भावानें मिळतील,

पत्ता—एम्पायर ट्रेडिंग कं. पोष्ट बॉक्स नं. ११४०२ कलकत्ता.

दमा, खोकला, कफ—

त्यांपासून होणारे सर्व विकारांवर श्वासरिपू नांवाचें औषध घेतल्यानें तात्काळ गुण येतो. १ बा. किं. १-१-० तीन बा. किं. २-६-० ट. ह. सह. जी.डी. मावे, वैद्य पुणें शहर.

सराफी दुकान सांगली.

आमचे दुकानीं सर्व तऱ्हेचे चोख सोन्याचांदीचे दागिने व चांदीचीं भांडीं मिळतात. माल सुबक आणि खात्रीचा असतो. मोत्यांचे जिन्नसही मिळतील. ८२ पाठवून कॅटलॉग मागवा. पत्ता-गोविंद नारायण जोग सांगली.

हीं स्वदेशी औषधें सशास्त्र व गुणकारी न ठरल्यास १०१ रु. इनाम.

पुरुषत्व-संजीवनी चूर्ण. (रजिस्टर्ड)

या चूर्णानें स्वप्नावस्था व लघवीद्वारें जाणाऱ्या वीर्यास तात्काळ प्रतिबंध होतो. गरमीपरम्यानें मुरलेली उष्णता, हस्तक्रियेनें व अतिसंगानें आलेली नरमाई, धातुक्षीणता, अशक्तता, वीर्यपतन होणें, हे सर्व रोग खलास होऊन रक्तशुद्धि होते, भूक, शक्ति व वजन वाढते. वीर्यास पुष्ट करून गर्भधारणेस योग्य बनवितें. २१ दिवस पुरणारा डबा किंमत ५ रु व्ही. पी खर्च -॥-

स्त्रीधर्म-संजीवनी चूर्ण. (रजिस्टर्ड)

हें चूर्ण रक्तश्वेतप्रदराचा काळच आहे ऋतूचा अनियमितपणा व क्लेश; आंग दुखणें, उष्णता, क्षीणता, गर्भाशयांतले दोष, गर्भधारणा न होणें, अकालीं गर्भपतन वगैरे इत्यादि रोग खात्रीनें बरे होतात. मूल होत नाहीं म्हणून दुसरें लग्न करण्यापूर्वी आहे त्याच गृहदेवतेस हें चूर्ण अवश्य द्या. २१ दिवसांचा डबा किं. रु. ३ ट. ख. -॥-

संतति-प्रतिबंधक चूर्ण. (रजिस्टर्ड)

पुष्कळ वेळां बाळंत झाल्यानें स्त्रियांना भयंकर अशक्तता येते व गरीब स्थितींत जास्त संतति दुःखदायक होते. त्यामुळे अथवा अन्य कारणानें संततीची इच्छा खलास झाली असल्यास हें चूर्ण मागवा. या चूर्णाच्या सेवनानें विटाळ नियमित सुरू राहून शरीरांत व समागसुखांत कांहींच बिघाड न होतां एकदम गर्भधारणा बंद पडते नंतर कांहा केल्या सुरू होणार नाहीं. पूर्ण विचार करून मागवा. पूर्ण गुणकारी डबा किं. ४ रु. व्ही. पी खर्च ८ आणे.

कोणत्याही २ डब्यांस खर्च माफ.

संजीवनी औषधालय मु.पो.मिरज. S.M.C.

शिवाजीचा कोण.

लेखक-शंकर परशराम जोशी
बी. ए. एलएल्. बी. वकील.
विचित्रलीला वगैरे नाटकांचे कर्ते.

ही एक शिवकालीन ऐतिहासिक सत्याला धरून लिहिलेली कादंबरी असून तींत निर्व्याज प्रेम आणि पश्चात्तापानें उत्पन्न झालेली खडतर कर्तव्यनिष्ठा यांचें वीररसाच्या उठावदार रंगांत काढलेलें सुंदर चित्र आहे तें वाचकांचें मनोरंजन करीलच; पण त्याबरोबर मातृभूमिविषयक कर्तव्याची जाणीव देऊन शिवाजीमहाराज किती दूरदर्शी होते, आणि त्यांनीं त्या काळींहि शुद्धीचा प्रश्न कसा मार्मिकतेनें सोडविला तें मनाला बरोबर पटवून देईल. किं. १। रु. ट. ह. शिवाय.

मॅनेजर-चित्रशाळा प्रेस पुणें.

७॥ रु. त ३ अस्सल घड्याळें.

तिन्हींचीं ग्यारंटी ५ वर्षें.

अस्सल लिव्हर पॉकेट वॉच किं. रु. ३-८-०, अस्सल बॉ टाईमपीस किं. रु. २-८-० व अस्सल मनगटाच (रिष्ट) घड्याळ किं रु. ४-८-०, तिन्ही घड्याळें खरी वेळ दाखविणारीं आहेत हीं घड्याळें फारच मजबूत व खरोखर सुंदर अशीं आहेत. तिन्हींची ग्यारन्टी पांच पांच वर्षांची आहे तिन्हीं एकाच वेळीं मागविल्यास रु. ७॥ त मिळतील टपाल खर्च वगैरे निराळा.

पत्ता-इम्पीरियल ट्रेडिंग कं. पोष्ट बॉक्स, नं. ६७०१ कलकत्ता.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जगांतील, सात, विलक्षण, गुणकारी औषधें.

फेशनूव्हिगर. (शक्तीवर)

मानवी कौशल्याची परमावधी या औषधांत दिसेल, समस्त वीर्यविकार, धातु जाणें, स्वप्नावस्था, स्त्रीसंगास अति जलद, नपुंसकत्व जाऊन सप्त धातुपौष्टिक होऊन वृद्धांना देखीं नवचैतन्य मग तरुणांची मजा काय वर्णावी ! ब्रेन ट.निक असून विजेच्या झटक्याप्रमाणें विलक्षण उत्साह व तारुण्य,आंगांत संचारेल. अनुभवानंतर आश्चर्यानें गारीगार व्हाल.१८ वर्षांच्या आंतल्यांनीं मागणी करूं नये. किं. ५ रु.

कफस्थमॉल.(खोकल्यावर)

हें साऱ्या जगांत अव्वल दर्जाचें औषध असून आधुनिक शास्त्रीय शोधांचें मूर्तिमंत स्मारकच आहे. दमा, श्वास, धाप, दम्याची फिट, जीव कासाविस, बरगड्या दुखणें, रात्रीं, व पहाटेला सुरू होणारा व दिडी ओढणारांचा वहूद खोकला, नेहमीं पडसें, सर्व प्रकारच्या ओल्या व सुक्या खोकल्यावर एकदोन दिवसांतच विलक्षण गुण.किं.५रु.

सिफलिऑल. (गर्मीवर)

उपदंशाचे सर्व विकार गरमी, वद, चट्टे, सर्वांग दुखणें, हाडीताप, आंगावर काळे फोड व डाग, नेहमीं अंग व कोठा गरम, केस जाणें, डोळ्याची व हातापायांची आग, मूळव्याध, रक्त विघडणें, टाळूला भोक पडणें हातपाय वाकडे होणें, रसायनाचे दुष्ट विकार भाजल्या सारखीं मुलें जन्मणें, इतर सर्व स्त्री–पुरुषांचे विकार २१ दिवसांत कायम गुण. इंजक्शन् नको. हा प्राणघातक रोग जन्मभर त्रासतो. वरील जगद्विख्यात अलौकिक वनौषधीपासून कायमचे मुक्त करून देण्याची हमी घेऊं. किं. ५ रु.

गनोऱ्हीऑल.(परम्यावर)

नवा, जुना, हट्टी, नामर्द, आग होणें, रक्त पडणें, लघवी बंद, पांढरा, पिवळा, ठणका, सूज, वगैरे वीस प्रकारचा परमा, आमच्या अद्वितीय हातखंड्या औषधापासून सात दिवसांतच कायमचा बरा. निःशंक रहा. गुणाची तारीफच कराल. पत्रव्यवहार गुप्त. पथ्य नाहीं. पिचकारी नको. गुण मात्र झटक्यासरसी. किं. ५ रु.

भल्लातक सुधा.(वातावर)

अत्रि ऋषींच्या प्रिस्क्रिपशन्प्रमाणें आधुनिक चालरीती लक्षांत घेऊन बनविलेली आहे. सर्व प्रकार वातरोग, संधीवात, कंबर दुखणें, सर्वांगांत कळा, पोटशूळ, गुल्म, अपचन, सुस्ती, मुंग्या, ग्लानी, कंटाळा, हातपाय अधु. फाजील स्थूलपणामुळें लागलेला श्वास, धाप, मलावष्टंब, वगैरेवर केवळ पृथ्वीतलावरील अमृतकलश होय.किं.५ रु.

हिमरॉइटमेंट. (मूळव्याधीवर)

हा एक जगद्विख्यात दवा असून सर्व प्रकारच्या मूळव्याधीवर अवघ्या ४५ मिनिटांतच आराम वाटेल. हमखास गुणकारी, छातीठोक निर्वाणीचा जालीम उपाय आहे. मूळव्याधीवर ऑपरेशन देखील निष्फळ ठरूं पाहात आहे; कारण कापलेले मोड पुनः उगवतात असा कांहींचा अनुभव आहे. अगदीं सौम्य, थंडा उपाय आहे. बिनधोक वापरावें. "जन्माची मूळव्याध कायमची गेली" असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं. किं. ५ रु.

फेशॉल (शौचास साफ होण्याकरितां)

अत्यंत दुर्दैवाची गोष्ट ! शौचास साफ होण्याकरितां औषधें घेणें म्हणजे पाप आहे. जी नैसर्गिक सृष्टिनियमाप्रमाणें होण्याची बाब त्याला औषध ? चमत्कार आहे. फाजील सवयी, व्यसनें, खोट्या श्रीमंतीच्या कल्पना, यामुळें मलबद्धतेचा रोग एकसारखा वाढत आहे. हेंच सर्व रोगाचें मूळ आहे. आमच्या वनस्पतीच्या इलाजापासून रोज शौचास साफ होऊन हुषारी वाटेल. कोठा साफ मूळव्याधीवर वस्ताद, अल्पमोली, बहुगुणी, गोड, रुचिकर, मोठा डबा २॥ रु. ३ महिने पुरेल. मुबईच्या लोकांनीं जरूर वापरावी.

सूचनाः–आमचीं औषधें फार तीक्ष्ण, अत्यंत जालीम किंमतींत भारी आहेत. बाजारी माल नव्हे. कमी किंमतीच्या औषधापासून गुणाची अपेक्षा करणें चूक. "स्वस्ताईचा मामुला हलुहलु कोकला" हा प्रकार आमच्याकडे नाहीं. वय व प्रकृतीमान कळवून मागणी करा. अचुक लागू पडतील. उत्तरास एक आण्याचें तिकीट.

च्यालेंज अँड को, पुणें शहर.

आयुर्वेदीय औषधि–भांडार.

अत्यंत स्वस्त देशी औषधें.

औषधांचें नांव	तो.		किं. रु.	औषधांचें नांव	तो.		किं. रु.
१ सुवर्णभस्म	१	–	२	१ अभ्रकभस्म	१	–	५
१ सू. शेखर (उत्तम)	१	–	३	निश्चंद्र पुटें १००			
१ प्रवाळ	८	–	१	१ त्रिभुवनकीर्ति ...	२॥	–	१
१ कपर्दिकभस्म	५	–	१	१ लवंगादिवटी ...	८	–	१
१ शौक्तिकभस्म ...	८	–	१	१ आरोग्यवर्धिनी ...	२॥	–	१
१ शंखभस्म	८	–	१	१ अग्निकुमार	३	–	१
१ शृंगभस्म	४	–	१	१ नाराचगो	४	–	१
१ श्वासकुठार	४	–	१	१ योगराजगुग्गूळ ...	६	–	१
१ गंधकरसायन ...	३	–	१	१ गोक्षुरादिगुग्गूळ ...	६	–	१
१ शंखोदर	२	–	१	१ कुमारीआसव ...	१ शेर	–	३
१ शौचशुद्धी चूर्ण तोळे	१०	–	१	१ द्राक्षासव	१ शेर	–	२

वै. भू. गणेशशास्त्री जोशी यांचीं अनुभविक औषधें.

१ हिंवतापावरील गोळ्याः—या गोळ्यांच्या सेवनानें २ दिवसांत ताप जातो. किं. ३२ गोळ्यांस रु. १

१ संग्रहणीवरील गोळ्याः—पहिल्याच आठवड्यांत गुण वाटूं लागतो. कि. ३२ गोळ्यांस १ रु.

१ हगवणीवरील गोळ्याः—तांबडी व पांढरी आंव गोळ्या सुरू करतांच कमी होते. किं. ३२ गो. १ रु.

१ वातावरील गोळ्याः—चमका येणें, आंग बधिर होणें, मुंग्या येणें, वगैरे सर्व वातविकार यांच्या सेवनानें दूर होतात. किं. ३२ गोळ्यांस १ रुपया.

पोस्टेज व पॅकिंग खर्च निराळा. पत्ता—आयुर्वेदीय औषधिभांडार, पुणें नं. २

चिमुकला हितोपदेश.

बालवाङ्मय] ले. प्रो. स. बा. हुदलीकर. [बालवाङ्मय

सदरहू पुस्तक शाळाखात्यानें पुरवणी वाचन पुस्तक म्हणून मंजूर केलें आहे, यांत सात गोष्टी असून प्रत्येक गोष्टीस अनुरूप मोठीं सुंदर चित्रें दिलीं असून टाईप मोठा वापरला आहे. मुलांनीं हें अत्यंत आवडतें पुस्तक आहे. किं. ८६ आ. ट. ह. शिवाय.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

तिलक-विजय

[पूर्व खंड अ. १ ते १५].

बरेच दिवस नांवानें सर्वविश्रुत झालेला कवि अनंततनयविरचित "तिलक विजय" नामक ओंवीबद्ध ग्रंथ [पूर्व खंड अध्याय १ ते १५ पृ. संख्या ५०० ग्रंथसंख्या अदमासें साडेतीन हजार (३५००)] विक्रीस तयार आहे. ग्रंथ पुस्तकरूपांत छापला असून प्रायशः प्रत्येक अध्यायाला चित्र वगैरे घालून ग्रंथ शक्य तितका सर्वांगसुंदर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. उत्तर खंडाचेंहि काम लवकरच हातीं घेणार आहोंत. श्री. अनंततनयांच्या काव्यशैलीचा परिचय महाराष्ट्राला आज दोन तपांचे वर असल्यामुळें जास्त लिहिण्याची जरूरी आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

कागदी साधी बांधणी किं. रु. २ कापडी बांधणी किं. रु. २८४ ट. ह. वेगळें.

मुलांकरितां] पंचतंत्र. [सचित्र !

संस्कृत पंचतंत्रांतील सर्व गोष्टींचें मराठी सुबोध भाषांतर असून प्रत्येक गोष्टीस सुबक चित्र जोडलें आहे. एकंदर गोष्टी ५० असून चित्रेंहि ५० आहेत. इसापनीतीप्रमाणेंच पंचतंत्रांतील गोष्टीहि विशेष मनोरंजक असून बोधप्रदही आहेत. टाईप ग्रेट, कागद ग्लेज, पृष्ठसंख्या ३५०. बाइंडिंग बाड पुठ्ठयाचें. किंमत १।. रु. चित्रशाळा प्रेस, पुणें.

लंघन–चिकित्सा (रा. कृ. गो. किनरेकृत) किंमत १ रु. मिताहार–महात्म्य (किनरेकृत) किंमत ८१० आणे. सुख आणि शांति (रा. रा. महादेव हरि मोडक बी. ए. कृत) किं. रु. २॥. हे सहा रुपये, दोन आणे किंमतीचे तीन ग्रंथ तूर्त तीन रुपये, एक आण्याला देऊं ट. ख. ८१० निराळा पडेल. शारीरिक आणि मानसिक आरोग्य प्राप्त करून घ्यावें व दीर्घकाल टिकवावें अशी इच्छा असल्यास हे ग्रंथ जरूर वाचा. सर्व प्रमुख बुकसेलराकडे मिळतील. (१) परचुरे, पुराणिक आणि मंडळी, मुंबई नं. ४. (२) भट आणि मंडळी, बालाजीसमोर पुणें, खिंडी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

छापखान्याचें सामान.



आमच्याकडे उत्तम लाकडी मागवानी मराठी, इंग्रजी व कानडी केसीस विक्रीस तयार आहेत.
क्युन्स फरमा ठोकण्याकरितां लहान मोठ्या उत्तमपैकीं विक्रीस तयार आहेत.
सर्व जातींच्या चेसीस विक्रीकरितां आहेत.

स्टीचिंग मशीनः-लहान पुस्तकापासुन मोठ्या (पाव इंचापासून १॥ इंचापर्यंत जाडी) पुस्तकापर्यंत शिवणारें, पावर व हातानें चालणारें, उत्तम जर्मनमेकरचें विकाऊ आहे. किं. ३०० रु.

लिथो हँड प्रेस विलायतीः-लहान दगडापासून २०×३० इंची दगड बसवून उत्तम काम देणारें आहे.
किं. रु. ३०० म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

२॥ रुपयांत ५०१ सुंदर वस्तु



ग्रँड
क्लीअरन्स
सेल.



आमच्याकडून ६ शिशी ऑटो मोहिनी, गजकर्ण मलमाच्या ६ डब्या घेणारास खालीं दाखविलेल्या चिजा फुकट मिळतील. शिशांची किंमत फक्त रु. २॥ आहे. इनामांत वस्तु-१ फॅशनेबल टॉय रिस्टवॉच पट्ट्यासह, १ गंजिफा, १ हातरुमाल १ फॅन्सी आरसा, १ फणी, १ सुवासिक साबू, १ शानदार आंगठी, १ गोल्ड गील्टचा बटन सेट, १ फॅन्सी कातर १ फॅन्सी फाऊंटन पेन, १ ड्रापर, १ फलीप, २ गोल्ड गील्ट फ्रेमची चाळशी, १ रबराची बलून शीटी, १ डझन सेफ्टी पिना, १ पेन्सील, २२२ शाईच्या गोळ्या, १ गोल्ड गील्ड नाकांतली चमकी, १ डझन टोकें, १ जोडी ईयरिंग १ पेन होल्डर, १ जोडी कानांतील फूल, १ झिग बुटाचा जोड, २५ दोऱ्यांचीं बंडलें, १ मनी बॅग, १ चाकू १ शंभर केपसह पिस्तुल, १ केपचे पाकीट, १ खेळण्याच्या पत्त्याचा जोड, १ किल्लीसह पॅडलॉक आणि १ रबर इतक्या वस्तु आहेत. पोस्टेज व पॅकिंग ॥≈ आणे, ऑर्डरबरोबर पायाचें माप पाठवावें.

इंडियन वॉच Co. २० श्याम बाजार स्ट्रीट, पोस्ट बागबाजार, कलकत्ता.

"एझेड्‌एडी"
एक उच्च प्रकारचें लिव्हरचें मनगटावरील घड्याळ फक्त ३ रुपयांत.



कारखानदाराची तबकडीवर १० वर्षांची पक्की गॅरंटी दिली आहे.

"एझेड् एडी" उच्च दर्जाची लिव्हरची रचना पूर्ण व्यवस्थित केलेली आहे. निकल सिल्व्हरची चकाकणारी केस नक्षीदार चांदीची तबकडी १, आधुनिक पद्धतीची वाटोळी गुळगुळीत व १० वर्षांची गॅरंटी दिलेली आहे. किंमत फक्त ३ रुपये पॅकिंग व टपालखर्च शिवाय. सदर घड्याळें नीट बरोबर लावून व तपासून नंतर पाठविलीं जातात. खालील पत्त्यावर मागणी कराः— **धी किंगस्टन वॉच एजन्सी १९५।१ हॅरिसन रोड, कलकत्ता.**

मेळ्यातील निवडक पदें.

गेल्या दहा वर्षांत म्हटल्या गेलेल्या निवडक राष्ट्रीय पदांचा यांत संग्रह केला आहे. श्री. ग. त्रि. केतकर सहसंपादक केसरी व श्री. ल. ब. भोपटकर यांचा उपोद्‌घात व प्रस्तावना यांसह किं. १२ आ. ट. ख. निराळा.

१ चित्रशाळा प्रेस पुणें.
२ महाराष्ट्र पब्लिशिंग हौस लि. १२ बुधवार पुणें.

'स्वराज्याचा सुदिन.'

हिंदी राजकारणांत हौशीनें लक्ष घालणाऱ्यांनीं हें नवीन नाटक यावेळीं अगदीं अवश्य वाचावें. सर्वस्वीं आपल्याच हातांतील अशा एका सुलभ आणि सनदशीर मार्गांच्या युक्तिपूर्वक अवलंबनानें आणीबाणीच्या प्रसंगीं एकमुखी मागणी करतां आल्यामुळें, इंग्लंडनें हिंदुस्थानास संपूर्ण स्वराज्य आणि तेंही पाठीस लागून संतोषानें एकाच दिवसांत कसें दिलें तें यांत मोठ्या कुशलतेनें दाखविलें आहे. प्रस्तुत सामाजिक राजकीय परिस्थितीचीच पार्श्वभूमिका देऊन भावी कालाचें एक नमुनदार चित्र, सयुक्तिक कार्यक्रमाच्या आणि सहजसुंदर कल्पनांच्या कुंचल्यांनीं प्रौढ आणि अलंकारिक भाषेंत रंगविलें असल्यामुळें, राजकारणाचा एक उद्बोधक हृदयंगम आणि नयनमनोहर असा चित्रपटच पाहिल्यासारखें वाचकास वाटतें. किं. बारा आणे. शिवाय टपाल खर्च.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

वृषणवृद्धि व अन्तर्गळ.

हत्तीपाय आणि वृषणवृद्धीवर रामबाण महौषध. पंधरा दिवसांत अर्धा व १ महिन्यांत पूर्णपणें रोग बरा होतो. गुण आल्यावर आम्ही बक्षीस घेऊं. एकवार अनुभव घ्या,
पत्ता-कविराज श्रीकृष्ण कुमारसेन कविरंजन २०. अपर सरक्युलर रोड, (सियालदह) कलकत्ता.

भारतीय ज्योतिषाचार्य कै. वें. बा. केतकर यांचीं

ज्योतिषविषयक पुस्तकें.

१ संस्कृत	वैजयंती	किं. रु.	२
२ ,,	केतकीग्रहगणित—वासनाभाष्य.	,,	५
३ ,,	भारतभूमंडलीय सूर्य—ग्रहणगणित	,,	४
४ ,,	शास्त्रशुद्ध पंचांग—अयनांश निर्णय	,,	१
५ ,,	सौरार्यब्राह्मतिथि—गणित	,,	२
६ ,,	मराठी नक्षत्रविज्ञान	,,	२
७ ,,	ग्रहगणित	,,	४

मिळण्याचें ठिकाण—
चित्रशाळा प्रेस, पुणें.

सोनेरी पावडर.

आमचेकडे अस्सल उत्तम सोनेरी, फिकी सोनेरी, तांबूस, सोनेरी व रुपेरी पावडर (Rich Gold) जर्मनीहून आलेली आहे. दर पौंडास तीन रु.

मॅनेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

रोल्डगोल्डचे काळे न होणारे दागिने.

चंद्रहार रु.५, सरी रु.५, हुशी रु.:८, वज्रटीका रु.५, नथ मोत्यांची रु.६, आंगठी रु.१, पाटल्या जोडी रु.२॥, बांगड्या जोडी रु. २॥, कुडी मोत्यांची जोडी रु. ३.

मगनलाल के. गिरगांव मुंबई.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खालील औषधें गुणकारी नाहींत हें सिद्ध करणारास

दोन हजार रुपये इनाम.

आमचीं जुनीं औषधें "कामशक्ति नवजीवन," "जवानमर्द मोदक," बंधेजचूर्ण" हीं गुणकारी प्रसिद्ध असतांना आम्ही रद्द कां करितों व त्याऐवजीं खालील औषधें कां प्रसिद्ध करीत आहोंत ? याला कारण आज देशामध्यें खरी

स्वदेशीची लाट उसळली

आहे म्हणून या स्वदेशी वातावरणांत पिढीजात खानदानी देशी औषधांचा खरा चमत्कार लोकांना दाखवावा या हेतून प्रसिद्ध वैद्य एस. के. दिवाणजी यांनीं वरील औषधें रद्द करून त्यापेक्षा थोड्या दिवसांतच अनेक पटीने गुणांत अत्यंत श्रेष्ठ अशीं खालील औषधें प्रसिद्ध केलीं आहेत. व त्यांचा नमुनाही ठेविला आहे.

(१) **नवजीवन मोदकः**—हें औषध पाण्यासमान पातळ झालेल्या धातूचा व स्त्रियांचे सर्व रंगाचे प्रदर (धुपणी)चा कट्टर दुष्मान आहे. धातु लघवींतून जात असो, किंवा स्वप्नावस्थेंतून जात असो लौकर बंद करून घट्ट करिते. व वीर्याची वृद्धी करिते स्मरण शक्ति मंदावणें, कामकाजास मन न लागणें, सुस्ती फार, चेहरा निस्तेज, कंबर, छाती, शरीरांत पीडा, उष्णता, कडकी, वगैरे धातुविकारांपासून होणारे विकार १४ दिवसांत नावडतोब दूर होतात. नमुना सात दिवसांचे औषधास किं. रु. १॥≈ व १४ दि० किं. रु. ३. याचे नंतर खालील नं० २ चें औषध सेवन कराल तर तुम्हांच स्तुती कराल.

(२) **नवजीवन शक्तिः**—या औषधानें कशीही नामर्दी, अशक्तता, सुस्ती, व गुप्तेंद्रियांतील शिथिलता असो नाहींशी करून मनुष्यास खरा बलवान् बनवितो. सर्व प्रकारचे वातविकार व शरीरांतील पीडा नाहींशी करिते. कामोत्तेजकपणा वाढविण्यांत व सर्व शरीरांतील नसानसांत उत्तम शक्ति भरण्यास ह्यासारखें खरं औषध व थोड्या दिवसांत चमत्कार दाखविणारें मिळणें अशक्य आहे. साठ, सत्तर वर्षांचे म्हाताऱ्यास तरुणाप्रमाणें शक्ति देणारें हें खात्रीचें औषध आहे. १० दिवसांचे सेवनांतच आपणांस आश्चर्य वाटेल व २० दिवसांत इतर अशी शक्ति येईल कीं, आपण स्वतः तारीफ कराल. हें स्त्रियांचे प्रसूतिविकार व अशक्तपणासही खात्रीचें आहे. पुरुषांची धातु पातळ व स्त्रियांना प्रदर (धुपणी) असल्यास प्रथम नं. १ चें घेऊन नंतर हें घ्यावें, तेव्हां मनपसंत गुण येतो. नमुना दहा दिवसांचे २० गोळ्यांची किं. रु. २॥. दहा दहा दिवसांच्या डब्या तयार केल्या आहेत. मनपसंत गुणास दोन डब्या बस आहेत. सुस्त व नामर्द यांनीं ह्याच सेवनासोबत नं ३ चे लेपाचा उपयोग अवश्य करावा.

(३) **नवजीवन लेपः**- मुष्टिमैथुनादिकाने ज्यानें आपले हस्तें आपणास बिघडून टाकलें असल्यास, गुप्तेंद्रियांत बारीकपणा, वाकडेपणा, लघुत्व आलें असल्यास, नामर्दी व सुस्ती असल्यास, अति ह्या प्रसंगानें किंवा म्हातारपणानें शिथिलता आली असल्यास अशांना हा लेप पुनः नवजीवन देण्यास समर्थ आहे. धातु पातळ असल्यास ह्याचा उपयोग करूं नये. प्रथम नं. १ चें सेवन करून घेणें. त्यानंतर नं. २ चे सेवनाचे सोबत ह्या लेपाचा रात्रीं उपयोग करावा लागतो. अशा ह्या योजनेनें कसाही बिघडलेला रोगी असो तो बरा झाला पाहिजे. शिशीची किं. रु. ३.

वरील औषधें डंक्याची चोट नवजीवन, नवचैतन्य व नवयौवन प्राप्त करून देणारीं आहेत. शेपन्नास रुपयांचे कंट्राक्टनें आम्हीं समक्ष रोगी घेऊन त्यांना ह्या वरील औषधानींच खात्रीनें खरा गुण आणीत होतो घेण्यास भानगड नाहीं. नं. १ चें दहा, वीस तोळे दुधाबरोबर किंवा निव्वळ पाण्याबरोबर घेण्याचें. नं. २ च्या गोळ्या वीस तोळे दुधाबरोबर घेण्याचें. सेवनविधी सोबतच असतेच. एक ते तीनही औषधांस पोस्ट खर्च सहा ते आठ आणे येतो.

मॅनेजर—नवजीवन दवाखाना, (चि) नागपूर सिटी.



कलकत्त्यांत भयंकर लूट !

एक महिन्याच्या आत खरेदी करणारास.

अर्ध्या किंमतींत वाटेल तो हार्मोनियम मिळेल.

तीन महिन्यातः- हार्मोनियम वाजविण्याची माहिती देणारें मराठी पुस्तक किंमत १।~

आतां बापा मला हार्मोनियम वाजविण्यास शिकवा.

कारण मास्टर घोटकरनें पास केलेलें, इंदू फ्ल्यूट एस् मोहीन फ्ल्यूट, गांधी फ्ल्यूट. हार्मोनियम्स लोक हेच हार्मोनियम्स कीर्तनांत, भजनांत, व नाटकांत वाजवितात व अर्ध्या किंमतींतही मिळतात.

३ सप्तक सिंगल आरगन रीड ४ स्टॉपवाला असली किंमत रु. २५ हल्लींची किंमत १२॥ रु.
,, डबल ,, ५ ,, ,, रु. ४५ ,, २२॥ रु

ऑर्डर देतेवेळीं चौथाई दाम आगाऊ पाठवावी मेसर्स-सुलभ एण्ड को ४०१ अपरचितपूर रोड. कलकत्ता

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि० सातारा.

पांचवें व्हॅल्युएशन प्रसिद्ध झालें.

हजारी वार्षिक वीस आणि पंचवीस रु. बोनस !

महाराष्ट्राचे प्रख्यात अॅक्चुअरी श्री. ग. स. मराठे, एम्. ए. एफ्. आय्. ए म्हणतात कीं 'कारकसरीचा कारभार सुरक्षित आणि फायदेशीर इन्व्हेस्टमेंट आणि विमेदारांची केलेली निवड या दृष्टींनीं अति उत्कृष्ट हिंदी विमा कंपन्यांशीं बरोबरी करणारी ही कंपनी आहे.' एजंटांस अपूर्व संधि आजच माहिती मागवा.

डायरेक्टर.

नवीन चार आणे माला.

ही माला धार्मिक विषयांची व जरूर लागणाऱ्या अनेक धंद्यांच्या माहितीच्या विषयांचीं पुस्तकें यांचा थोड्या किंमतींत प्रसार करणारी आहे. एक वर्षांत हिचीं १० पुस्तकें निघतील. प्रत्येक पुस्तकाचीं क्राउन षोडशपत्री आकाराचीं १०० पानें असतील. सदर पुस्तकें पुणें येथील चित्रशाळा छापखान्यांत छापून सर्वांगसुंदर निघतील याची शंका नको.

मालेचें पहिलें पुस्तक '**नवीन भक्तिमार्ग—प्रदीप—**' हें माघ शु. ४. (श्रीगणेशजयंति) ता. २२ जानेवारी सन १९३१ रोजीं प्रसिद्ध होईल. व त्यानंतर '**प्रेमळभक्तभजनसुधा**' '**संगीत मानससरोवर**' '**ब्रह्मानंद भजन-माला**' व '**संगीत गीतांजलि**' हीं ४ पुस्तकें ता. ३० जून सन १९३१ पर्यंत प्रसिद्ध होतील.

या ५ पुस्तकांकरितां सव्वा रुपाया आगाऊ भरणारास पुढील १५ पुस्तकांपैकीं कोणतेंही १ पुस्तक बक्षीस मिळेल—सन १९३१ सालची, क्राउन साइजची भरपूर माहितीची व गुळगुळीत कागद आणि जाड पुठ्ठ्याची टेबलडायरी किं. १ रु. २ मुरारी उत्कृष्ट शिवकालीन ऐतिहासिक कादंबरी किं. २ रु. ३ सायुज्यसोपान पारमार्थिक विषयाचा अगदीं सोप्या भाषेंत विवरण केलेला ग्रंथ किं. २ रु. ४ धी इंग्लिश टीचर सर्वांच्या उपयोगी पुस्तक किं. १॥ रु. ५ मराठी अर्थासह सार्थ पंचरत्नगीता यांत गीता विष्णु-सहस्रनाम—भीष्मस्तवराज—अनुस्मृति-गजेंद्रमोक्ष हीं पांचीं प्रकरणें आहेत किं. १॥ रु ६ अनेक विद्वानांचे अनेक विषयांवरील लेख व भाषणें किं. १ रु. ७ रा. न. चिं. केळकर यांचे इंग्रजी लेख व भाषणें किं. १। रु. ८ प्राकृत वामनी टीका व मराठी भाषांतर यांसह भर्तृहरीकृत शृंगार—नीति वैराग्य शतकत्रय किं. १ रु. ९ संस्कृत ऐतरेयब्राह्मण किं. १॥ रु. १० संस्कृत ऋग्वेदी मंत्रसंहिता पोथी १॥ रु. ११ English into English Dictionary २५००० शब्द १॥ रु. १२ ईस्ट इंडिया कंपनीच्या कारस्थानांचा इतिहास ३ रु. १३ ग्रनुर्धारीकृत मराठी साम्राज्याचा इतिहास (मोडी) १॥ रु. १४ भारतवर्षाचा धार्मिक इतिहास किं. २ रु. १५ विवरण व अर्थासहित पार्थमहिम्न ॥ सार्थ मेघदूत काव्य ॥ आणि भगरस्रांसह लो० टिळक यांचा डागरातील पहिला तुरुंगवास ॥ हीं तीन्हीं पुस्तकें.

वर्गणीदारांस बक्षीसासह मालेच्या ५ बुकांचा ट. ख. सहा आणे निराळा पडेल. बक्षीस पुस्तक व्ही. पी. नें पाठवून वर्गणी घेऊं.

लघाटे मंडळी ४२५, नारायण पेठ पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शक्तीची सर्वोत्तम दवा.

मदनमंजरी गोळ्या

या गोळ्यांच्या सेवनान शौचास साफ होतें, वीर्य वीकारापासून होणारे प्रत्येक राग नाहींसे होतात; व हात पाय ठणकणें वगैरे अशक्ततेपासून होणाऱ्या सव व्याधी नाहींशा होऊन शरीर बळकट होतें. किंमत ४८ गोळ्यांच्या डबीस १ रुपया.

दमा, श्वास,व खोकल्यासाठीं अमूल्य औषधी

श्वास कासारी अवलेह

दमा, श्वास, खोकला, छातान दुखणें वगैरे विकार या अवलेहाच्या सेवनान लवकरच दूर होऊन शरीर निरोगी होतें किं. २० तोळ्यांच्या डब्यास १॥ रु.

राजवैद्य नारायणजी केशवजी.

३९३ काळबादेवी भाटीया महाजनवाडी, समोर, मुंबई २

पुणें एजंट–डी. एस. दातार, ब्रदर्स बुधवार पेठ.

उत्तम फोटो न निघाला तर दुप्पट किंमत परत ! !

३ रु. त क्यामेरा.



किंमतींत स्वस्त पण कामांत, बहुमूल्य क्यामेऱ्याम मागें टाकणारा हा क्यामेरा खरोखरच सुंदर क्यामेरा आहे. या क्यामेऱ्यानें एक लहान मूलही सरळतेनें एका मिनिटांत, वाटेल त्या वस्तूचें सुंदर चित्र घेऊं शकतें. याचे बरोबर एक प्लेट, कागद, मसाला आणि फोटो काढण्याची रीत फुकट.

भारत मित्र स्टोर्स नं १४ अलीगड.

शाळेंतील मुलाकरिता फूटपट्ट्या.

१२ इंची फूट पट्ट्या.

किरकोळ भाव ८१ व ८१८३. डझनास ८१० व ८१॥

मॅनेजर–चित्रशाळा प्रेस. पुणें

आरबी भाषेंतील

सुरस व चमत्कारिक गोष्टी.

या ग्रंथाचें भाषांतर कै० कृष्णशास्त्री, कै० विष्णुशास्त्री व कै० हरि कृष्ण दामले यांच्यासारख्या प्रसिद्ध लेखकांनीं केलेलें आहे. या ग्रंथाच्या पहिल्या दोन आवृत्त्या खपून ही नवीन आवृत्ति ठळक टाइपांत ग्लेझ व मोहोरेदार जाड कागदावर छापली आहे. ह्या पुस्तकाइतकें चटकदार व मनोरंजक पुस्तक लहान थोर स्त्रीपुरुषांस वाचण्यायोग्य मराठी भाषेंत क्वचितच सांपडेल. या पुस्तकाचें बाइंडिंग फुल कापडी जाड पुठ्ठ्याचें मजबूत केलें आहे. डबल सुपररॉयल १६ पेजी. पृष्ठसंख्या ६६८ किं. रु. ६ शिवाय ट. ह. ८१०.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

या पुस्तकाला डक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें बक्षिस दिलें असून केसरी, महाराष्ट्र, ज्ञानप्रकाश, चित्रमयजगत्, वागीश्वरी, लोकमत, वऱ्हाड शालापत्रक, इ. प्रमुख मराठी नियतकालिकांनीं व प्रताप, कर्मवीर, हंस, माधुरी, विशाल भारत, संदेश इ. प्रमुख हिंदी नियतकालिकांनीं त्यांचेविषयीं प्रशंसोद्गार काढले आहेत.

मराठीच्या कथावाङ्मयांत एक अपूर्व भर !

प्रेमचंदाच्या गोष्टी.

(भाग १ ला.)

अनुवादकः–आनंदराव जोशी. नागपूर.

हिंदीचे जगद्विख्यात कादंबरीकार व लघुकथालेखक मुन्शी प्रेमचंद यांचें नांव ज्यानें ऐकिलें नाहीं असा सुशिक्षित मनुष्य मिळणें विरळा ! त्यांच्या कादंबऱ्यांनीं हिंदी वाङ्मयांत सर्वोच्च स्थान मिळविलें असून त्यांच्या लघुकथांनीं तर हिंदी वाचकांना वेड लावून सोडलें आहे ! त्यांच्या लघुकथांचे अनुवाद हिंदुस्थानांतील सर्व प्रमुख भाषांतून प्रसिद्ध झाले आहेत. एवढेंच नव्हे तर जपानी भाषेसारख्या दूरस्थ भाषेंतही त्यांच्या लघुकथा अनुवादित झाल्या आहेत ! अशा या नामांकित लघुकथालेखकाच्या गोष्टींचा मराठी वाचकांना परिचय व्हावा म्हणून आम्ही हें पुस्तक मुद्दाम तयार केलें आहे. ह्या भागांत राजा हरदौल, राणी सारंधा, मंदिर व मशिद, ॲक्ट्रेस, अग्निसमाधि वगैरे १४ निवडक गोष्टी संग्रहित करण्यांत आल्या असून त्या वाचतांना वाचक अगदीं तल्लीन होऊन जातात. करमणुकीसाठीं इंग्रजी किंवा फ्रेंच भाषेंतील भिकार कादंबऱ्यांचीं रूपांतरें वाचणारांनीं ह्या गोष्टी एक वेळ अवश्य वाचाव्या अशी आम्ही त्यांस शिफारस करितों.

ह्या भागासोबत मुन्शी प्रेमचंदांचें छायाचित्र व त्यांचें संक्षिप्त चरित्रही जोडण्यांत आलें आहे. आतांपर्यंत प्रेमचंदाच्या कोणत्याही पुस्तकांत त्यांचें जीवन–चरित्र व त्यांच्या कृतींची आलोचना प्रसिद्ध झाली नाहीं. तेव्हां वाचकांनीं ह्या अपूर्व संधीचा अवश्य लाभ घ्यावा.

आकार–क्राऊन षोडशपत्री, पृष्ठसंख्या २०२. मुखपृष्ठ राजा हरदौलसिंह व राजा जुझारसिंह यांच्या चित्रानें सुशोभित. किंमत १ रुपया.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

राजनैतिक कारस्थान.

(भाग १ व २)

चित्रमयजगत्मधून क्रमशः प्रसिद्ध होत असलेल्या या हृदयस्पर्शी राजकीय ' कादंबरीचा प्रथम खंड छापून विक्रीस तयार आहे. या प्रथम खंडांत माणिकतोळ्यांत गुप्त कटाची स्थापना झाल्यापासून, कटाचा स्फोट होऊन, सर्व मंडळीं पकडली जाऊन अंदमानला प्रस्थान ठेवीपर्यंतची समग्र हकीगत आली आहे. श्री. वारिंद्रकुमार घोष, उपेन्द्रनाथ बानर्जी, उल्हासकर दत्त, हेमचंद्रदास, कन्हैयालाल वगैरे ज्वलत् देशभक्तांनीं माणिकतोळ्यांत बॉम्बचा व हत्यारांचा कसा संग्रह केला, गुप्त पोलीस लोक त्यांच्यांत कसे शिरले, खूनाचे बेत कसे फसले, शेवटीं नरेंद्र गोस्वामीच्या फितुरीमुळें कट उघडकीस कसा आला. सर्वजण कसे पकडले, गेले तुरुंगांत त्यांचा कसा अनान्वित छळ करण्यांत आला, कन्हैयानें व सत्येंद्रानें जेलमध्यें रिव्हाल्व्हर्स मिळवून देशद्रोही नरेंद्रास कसें ठार केलें व त्याबद्दल त्या दोघांना कसें फांशी जावें लागलें, फांशी जाण्याच्या वेळीं कन्हैयाचें सोळा पौंड वजन कसें वाढलें, अरविंद बाबूंचे कसे हाल हाल करण्यांत आलें आणि अखेरीस कांहीं जणांस फांशीं व कांहींना काळ्या पाण्यावर कसें जावें लागलें हें वाचतांना वाचकांच्या अंगावर शहारे येतील, त्यांचीं अंतःकरणें पिळवटून जातील, कन्हैयाची स्मशानयात्रा, तुरुंगांत कन्हैयालाल वगैरे प्रसंग वाचीत असतां वाचकांच्या डोळ्यांतून अश्रू निघाल्यावांचून खास राहाणार नाहींत. याहून अधिक वर्णन करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. एकदां हें पुस्तक वाचकांनीं वाचावयास घेतल्यावर तें समग्र वाचून पाहिल्याशिवाय खालींच ठेववणार नाहीं. प्रत्येक भागास किं. १२ आणे ट. ह. नि.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें. खंड १ ते २२ मधील

कै० इतिहासाचार्य रा. वि. का. राजवाडे यांच्या संपूर्ण

ऐतिहासिक प्रस्तावना.

पृष्ठसंख्या ५०० चे वर किंमत ३ रु.

राजवाडे यांचें भाषाप्रभुत्व व विचारसामर्थ्य एवढें गंभीर, तेजस्वी आणि शास्त्रीय असून प्रसंगविशेषीं इतका बालबोध आहे कीं, त्यांचे लेख वाचतांना गोष्टींतील सोपेपणा, तत्त्वज्ञानांतील गूढता आणि काव्यामधील स्फूर्ति, ध्वनिनाद व मनोहारित्व हीं एकत्र अनुभवास येतात. मराठींत असा क्वचितच वाचक असेल कीं ज्यानें राजवाडे यांचा एकादाहि लेख वाचला नाहीं. ' यामुळें इतिहासाचार्य राजवाडे यांचे हे लेख होत, एवढें म्हटल म्हणजे ह्या प्रस्तावना-संबंधानें वेगळें व विशेष सांगण्याचें कारण नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाविषयीं अधिकारयुक्त लेखन असें राजवाड्यांचेंच होय. तरी सामान्यतः पुढीलप्रमाणें ह्या प्रस्तावना-भागांत विषयविवेचन आलेलें आहे. आर्यांच्या व पाश्चात्यांच्या इतिहासव्याख्येची तुलना, इतिहासाची स्थलकाल-व्याप्ति, भाषा व इतिहास यांतील परस्परसंबंध, इतिहासाचे भौतिक व आत्मिक भाग, मराठ्यांच्या इतिहासाची स्थिति, मराठ्यांच्या मोहिमांची धोरणमीमांसा, महाराष्ट्र धर्मविवेचन, वारकरी पंथ व इतर पंथ, श्री शिवाजाची थोरवी, शिवाजीच्या बखरींचे विस्तृत व प्रसंगशः परीक्षण, ग्रँटडफच्या इतिहासांतील चुका, पानपतप्रकरणाची साद्यंत व कारणात्मक चिकित्सा, ब्रह्मेंद्रस्वामी, पेशवे, छत्रपति, आंग्रे, शिंदे, चंद्रराव मोरे, समर्थ, व बुंदेले इ. इ. व्यक्तींचें कार्य, मराठे व अवदली, तत्त्वज्ञान व व्यवहार, मराठी भाषेची श. १२१२ ते १८१८ तील चढउतार, फारशी भाषेच्या संसर्गानें मराठीचें झालेलें स्थित्यंतर, भाषेची वाढ केव्हां होते, समाजभ्रष्टता म्हणजे काय, मुसलमान व हिंदुसंस्कृतिवैशिष्ट्य, स्वराज्याचीं अंगें, इतिहाससाधनांची प्रामाण्याप्रामाण्यता, कालनिर्णय इ. इ. अनेक महत्त्वाच्या विषयांचें विवेचन साधार व परिणामकारक भाषेनें ह्या प्रस्तावनांतून आलेलें आहे. पुस्तकास शेवटीं विस्तृत सूची दिली असल्यामुळें वरील कोणत्याही विषयावरील राजवाड्यांचें मत नेमकें व चटकन् काढून पाहण्याची मोठी सोय झाली आहे. किं. रु. ३ ट. ह. शिवाय. सर्वांस घेण्यास सुलभ पडावें म्हणून किंमत अत्यंत कमी ठेविली आहे.

मॅनेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशक्त मुलें

डोंगरे यांचें बालामृत

दिल्यानें

सशक्त व गुटगुटीत होतात.

H. L. M. S. H. M. B. etc. by Correspondence. Send anna stamp for prospectus Dr chhatbar Homoeopathic Institute (Regtd Mahuva Kathiawar.

इंडोबाम

सर्व प्रकारच्या शारीरिक दुःखांवर अप्रतिम मलम १० आणे.

कर्णिक एग्युमिक्श्वर–

हिंवताप, मलेरिया वगैरे तापांवर खात्रीलायक औषध. किं. १-४-० मोठी बा. ०-१४-० ल. बा.

कर्णिक ब्रदर्स, गिरगांव मुंबई.

पुणें एजंट–जी. व्ही. शिंदे. आणि सन्स.

एल. बी. जोगळेकर, बुधवार पेठ.

सातारा एजंट–लक्ष्मी स्टोअर्स.

मुळव्याध

साधी अगर रक्ताची, नवी अगर कितीहि जुनीपुराणी, अत्यंत तापदायक कशीहि असो; फक्त एक वेळ औषध घेतल्यानें जादूप्रमाणें परिणामकारी, साफ बरी होते. तीन दिवसांत समूळ झडते. याहून अधिक तारीफ करणें नलगे. पथ्यपाण्याची जरूरी नाहीं. गुण न आल्यास चौपट पैसे परत. किं० २ रु०

बहिरेपणा

कानांतून पू वाहणें, आग, खाज सुटणें, कानांतील भयंकर वेदना, कान वाहणें, तसेंच बहिरेपणा वगैरे कानासंबंधीं सर्व रोगांवर आमचे अद्भुत बहिरोद्दीपन तेल अमोघ अस्त्र आहे. हजारों बहिरे बरे झाले. फायदा न झाल्यास पैसे परत. किं. रु. २

फकिरी सुरमा

हा अस्सल फकिरी सुरमा, डोळ्यांची गळती, पू, पिचकपणा, रातांधळें, फूल पडणें, लाली, मोतिबिन्दु-इत्यादि सर्व प्रकारचे नेत्ररोगांवर रामबाण आहे. ऑपरेशन, शिवाय हटकून गुण देणारें हें औषध आहे. हें कांहीं दिवसपर्यंत रोज लावीत गेल्यास चष्मा लावण्याची संवयही नाहींशी होते. किं० बा० रु० १।; तीनची किं० रु० ३

शक्तिसुधाकार्यालय, चौथा कुंभारवाडा मुंबई नं. ४

विक्रीस तयार.

शास्त्रशुद्ध ऐक्यवर्धक पंचांग शके १८५३

श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधि चीफ ऑफ औंध यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें येथें भरविण्यांत आलेल्या संमेलनाच्या ठरावानुसारें पंत प्रतिनिधींच्या हुकमान्वयें तयार केलेलें. स्थूल तिथि धर्मकार्यार्थ व सूक्ष्म तिथि जातकादि गमनादि कार्यास उपयुक्त अशा दोन्हीं देऊन दृक्प्रत्ययास येणारे सूर्योदय व ग्रहांचे अस्तोदयासह औंधचे दिलेले. किरकोळ प्रतीस किंमत पाव आणा, १०० स १८६, १००० स रु. १२॥.

मॅनेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

काश्मीरी कोकशास्त्र

मनुष्यानें अनेक ठिकाणांहून ‘ कोकशास्त्राचीं ’ पुस्तकें मागवून आपले पुष्कळ रुपये व्यर्थ उधळले आहेत, परंतु त्यास अस्सल ‘ कोकशास्त्र ’ ग्रंथ मिळाला नाहीं, अशांनीं ही आलेली अमूल्य संधी व्यर्थ दवडूं नये. त्यांनीं तावडतोब पंडित कोकाजी महामंत्री महाराज काश्मीर अनुवादित अस्सल, सचित्र, प्राचीन आणि सुप्रसिद्ध ‘ कोकशास्त्र ’ मागवून त्याचें वाचन अवश्य करावें. यांत स्त्री—पुरुषांच्या ८४ आसनांची पूर्ण माहिती, स्त्री-पुरुषांच्या ८४ रंगीत चित्रां (फोटो) सह दिलेली आहे. त्याचप्रमाणें वशीकरणयंत्र व त्याचा उपयोग, स्त्री व पुरुष यांचे निरनिराळे प्रकार व त्यांचीं लक्षणें, संतति होत नसल्यास ती खात्रीनें होण्याचे उपाय, वांझपणावर व सर्व प्रकारचे नामर्दीवरील खात्रीचे इलाज, गर्भपरीक्षा, स्त्री–पुरुषांचे सर्व प्रकारचे गुप्तरोग व त्यावरील उपचार इत्यादि उपयुक्त व सुंदर माहिती दिलेली असून शिवाय यांत अशा कांहीं अनेक गुप्त गोष्टी लिहिल्या आहेत कीं, त्यांचा येथें नामनिर्देश करणें उचित नाहीं. अशा ग्रंथाच्या प्रत्येक प्रतीची किंमत फक्त ३ रु. शक्य असेल त्यांनीं आपला व आमचा पत्ता इंग्रजींत अवश्य लिहिण्याची मेहेरबानी करावी.

¶ Vasikarad Tantra or the art of controlling others.
English Edition price Rs. 6. Secret of Texual bliss (illustrated.)

पत्ताः—देशसेवक पुस्तकभांडार नं. ५५ लुधियाना (पंजाब)

कोणतेंही घड्याळ फक्त ५॥ रु. त.

प्रत्येक घड्याळाची गॅरंटी ५ वर्षे.

पसंत न पडल्यास किंमत परत.

रेडियम पॉकेट वॉच. रेडियम रिस्ट वॉच.



एक घड्याळाचें प्यांकिंग आणि टपाल खर्च ०-६-० दोन घड्याळ एकाच वेळीं घेतल्यास प्यांकिंग व टपाल खर्च माफ.



विख्यात कारखान्यांतून तयार झालेलें अनुभविक, मजबूत मशीन जें केव्हांही बंद होत नाहीं. सुंदर आकार आणि दिखाऊ व चकाकणाऱ्या निकल सिल्वर केसचीं खरीं वेळ दाखविण्यास विश्वासू अशीं हीं घड्याळें आहेत. विशिष्टता ही आहे कीं, रेडियम लावलेलें असल्यामुळें घोर अंधकारांतही स्पष्ट वेळ दाखवितात. जास्त प्रशंसा करणें व्यर्थ आहे. व्यवहारानें (वापरल्यानें) परीक्षा होईल. किंमत प्रत्येक घड्याळास फक्त ५॥ रु.

हींच घड्याळें उत्तम व चकाकणारीं सुंदर अशीं आहेत. सोनेरी पॉलिशचें घड्याळ घेतल्यास घड्याळाची किं. ६॥ रु.

पत्ता—धी युनिअन ट्रेडिंग कंपनी, १६६ हरीसन रोड (C) कलकत्ता.

विक्रीस तयार ! विक्रीस तयार !

माझा काश्मीरचा प्रवास.

(ले० श्रीयुत मो. गो काळे, शिक्षक, नू. म. वि. पुणें.)

श्री. काळे यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक प्रवास करून, माहिती मिळवून लिहिलेल्या चित्रमयजगत्मधील लेखांचें हें पुस्तक तयार केलें असून पुस्तकास श्री प्रो. भाटे यांनीं विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहिली आहे. पुस्तकांत श्रीनगराहून निरनिराळ्या ठिकाणीं जावयाच्या मार्गाची माहिती, दोन ठिकाणामधील अंतर, प्रत्येक ठिकाणाची समुद्रसपाटीपासून उंची वगैरे माहिती जादा जोडली आहे. शिवाय काश्मीरचा दोन रंगी सुंदर नकाशा व सुमारें ३० सुंदर चित्रेंही घातली आहेत. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर झेलम नदीचें सुंदर छायाचित्र दिलें असून पुस्तक शक्य तितकें उपयुक्त व आकर्षक करण्याचा प्रयत्न केला आहे. पृ. सं. डेमीसाईज ९०. किंमत फक्त ८ आणे. ग्राहकांनीं त्वरा करावी.

मो. गो. काळे, ३८२ शनवार पेठ, पुणें. व म्यानेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

हातांनीं तयार केलेली खादी.

अगदीं शुभ्र व टिकाऊ असून सदरे वगैरे करण्यास अतिशय उत्तम आहे. १७ ते १८ वार लांब व २७ इंच रुंद तुकड्याचा किंमत फक्त ६ रु. तसेंच उत्तम कोटाची खादी, फॅन्सी चेकसारख्या नमुन्याची, एक सूट होण्यास पुरेशी, म्हणजे ७ वार लांब व २७ इंच रुंद इतकी फक्त रु. ४–६ किंमतीस मिळेल. पॅकिंग व टपाल खर्च माफ. जर पसंत पडली नाहीं तर पैसे परत दिले जातील.

जगन्नाथ चमनराम–लुधिआना, उत्तर हिंदुस्थान.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

फक्त रोखीनें खरेदी करणारांस भल्लातककल्प व शौचास साफ क. औ. हा दोन (मुंबईस) आर्यन इंडस्ट्रिअल कं. ठाकुरद्वार सुश्रुत फार्मसी दवाखाना ठाकुरद्वार (३) माधव एजन्सी, मोहन बिल्डिंग गिरगांव (पुणें). हनुमान सौगंधिक स्टोअर रे मार्केट नं. २० (बेळगांव) स. वि. सहस्त्रबुद्धे धुतपापेश्वर एजंट मारुती गल्ली (धारवाड) विनायक धोंडो खांडेकर धुतपापेश्वर एजंट मंगळ पेठ (रत्नागिरी) बलवंत कचेरी (चिपळूण) वैद्य रघुनाथशास्त्री पटवर्धन देशी दवाखाना (सातारा) व्ही. जी. डिंगणकर बुक पागेजवळ (नाशिक) पेंढारकर आणि कंपनी या ठिकाणीं मिळतील. व्ही. पी. नें रवानगी नाहीं.

एक डबा किं. १॥ रु. व्ही.पी. सह १।८१५ रु. तीन डबे व्ही.पी. सह ४।८१२ रु.

भल्लातककल्प

पूर्ण गुणास चार डबे. व्ही. पी. स ६।८२ रु. व ६ डबे ८।८१२ रु.

याच्या सेवनानें सर्व प्रकारचे वातरोग, आमवात, संधिवात, अर्धांगवात, पोट–पाठ–पोटऱ्या कमरेंतील वात, सूज, मेदोरोग च बोलतां लागणारा श्वास, दमा, खोकला, पोटशूळ, गुल्म, बाळंतवात, श्रम, मस्तकशूळ, नेहमीं पडसें, सुस्ती, मुंग्या, सुरसुऱ्या, ग्लानी वगैरे शिरांतून खेळणारे वातविकार, कोणत्याही प्रकारचे व्रण शुद्ध करणें व भरून आणणें. नेहमीं कोठ्याची जंत होण्याची खोड नाहींशी मलेरिया, इन्फ्ल्युएंझा वगैरे सांथींत प्रतिबंधक कार्य करणें. बैठी नोकरी करणारांचें अपचन, मेदोवृद्धी नाहींशी करणें. अग्निमांद्य, मलावष्टं करणें. बाळंतपणांत वातविकाराची व पुढें बाळंतरोगाची भीति नाहींशी करणें. अशा क्षुद्र, मध्यम व तीव्र घातविकारांवर याचा उत्कृष्ट गुण

थोडे अभिप्राय पहा:—दयाराम आंबाजी पंढराखेडी (छिंदवाडा) लिहितात:—आजपावेतों आपणाकडून पुष्कळच डबे मागवि पासून सर्व रोग्यांना चांगला गुण आला. खुद्द माझी प्रकृती आपल्या कल्पानें उत्तम सुधारली. नरहर नारायण सोनटक्के पुणें लिहितात:— स्त्रीचे बाळंतपणांत गेलेले पाय येऊन ती तीन डब्यांत चालूं लागली. एका गृहस्थाचा आमवात साफ गेला. हेमराजसिंह कानुनगो अम लिहितात:—आपला कल्प फारच गुणदायक व लोकप्रिय होऊन गेला आहे. आर. बी. कोप्पे रेवास्टेट म्हणतात:—माझ्या मुलाला अनेक डाक्त औषधानें गुण न येतां, आपल्या कल्पानें फार चांगला गुण आला.

अशक्त पुरुष, स्त्रिया, व मुलें यांच्याकरितां सर्वोत्तम शक्तिवर्धक लेह. एकवार अनुभवा. प्रसन्नचित्त होऊन पुन्हां मागाल.

१ बाटली किं. २ रु. पोष्टखर्च ८।१०
२ बाटल्या किं. ४ रु. पोष्टखर्च ८।१३
३ बाटल्या किं. ५॥ रु. पोष्टखर्च १ रु.

आनंदभुवनामृत

मागणी करतांना १ पासून ३ बाटल्यांपा १ रुपया व ६ बाटल्या असतां दोन रु आगाऊ आले पाहिजेत.

नीरक्तता–रक्ताचा क्षीणता यानें आपलें शरीर फिक्कट बनलें आहे काय. आत्यंतिक धातु–क्षीणता, स्वप्नावस्था यानें आपलें अस्थिपंजरवत् बनून शरिरांतील शिरा व छा . हातें मोजतां येतील इतकें शरीर कृश झालें आहे काय. तारुण्यानें आपणांस सोड आपलें जीवन कंटाळवाणें झालें आहे काय. तसें असल्यास आनंदभुवनामृत घ्यावयास लागा. म्हणजे नेहमीं आनंदभुवनांत आपण र कारण त्यांत प्रत्येक दिवशीं पोटांत जाणाऱ्या औषधाबरोबर नवें रक्त व नवें वीर्य यांच्या पुरवठ्याची मुबलक सुरवात होत असते. अ भुवनामृत खालील विकारांवर मुजरत परिणामकारक आहे. दमा, खोकला, कफ–छातीचे रोग, अग्निमांद्य, अपचन, मूत्रावष्टंभ–मलाव स्नायूंची अशक्तता (नर्व्हस डिबीलिटी) प्लीहा व यकृताची अशक्तता सर्व प्रकारचे वातविकार, पांडुरोग, (तिसऱ्या अवस्थेंतील क्षयरोगी सो प्रथम व द्वितीयावस्थेंतील क्षयरोग, स्मरणशक्ति, मेंदूची क्षीणता, मूळव्याध, फुप्फुसांची अशक्तता, गर्भाशयस्थरोग, आणि बौद्धिक श्रम णारे विद्यार्थी, वकील, व्यापारी, लेखक, यांच्याकरितां मेंदूचें शक्तिवर्धक. तसेंच कोणत्याही रोगांस शक्ति टिकविण्याकरितां जरूर ज

सावधगिरीचा इशारा:—अलीकडे वर्तमानपत्रांतून धातुपौष्टिक, उत्तेजक, कामोत्तेजक, कित्येक एक दिवसांत, काहीं चार आठ सांत कामदेवाची मजा लुटविणारी औषधें अनेक प्रसिद्ध आहेत. अविचारी मनुष्य सद्य:स्थिती व पुढील परिणाम लक्षांत न घेतां अशीं उत्त औषधें घेऊन मी चांगला सशक्त झालों व माझ्याजवळ धातूचा पुरवठा मजबूत झाला आहे. असें मानून विषयलालसा तृप्त करतो अ अगोदरच शरिरांत लेशमात्र असलेली शक्ति गमावून क्षयरोगास आमंत्रण देतो. आमच्या मतें अशा औषधांचे दाते व त्यांचे ग्राहक दो अपेशी होत. तरी असें होतां कामा नये (दुसऱ्या प्रकारें, शरीरांत रक्तधातूची शुद्धी शौचशुद्धी अग्निदीप्ती, रक्ताला लाली, धातुवृद्धी व धातुपुष्टी व इतकें असून कामवासनेविषयीं शांतता. अशा रीतीनें पायरीपायरीनें शरीराची सुधारणा झाल्यावर तो गुण कायमचा टिकतो मग निसर्गानेंच कामोत्पत्ती होत असतें. त्याकरितां कामोत्तेजक औषधाकडे धांव घ्यावी लागत नाहीं. अशा दुसऱ्या प्रकारांत सांगितल्याप्रम आनंदभुवनामृत आहे. तें तुम्हाला शक्तिपुष्टी–तुष्टी देऊन नेहमीं प्रसन्नचित्त ठेवील.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 3

एक डबा व्ही. पी. सह १ रु.

शौचास सा[illegible]णारें औषध

चार डबे व्ही. पी. सह ३ रु. ४ अ

यानें जुनाट, नवीन, कोष्ठबद्धतेचा विकार जातो. आंतडीं स्वच्छ होतात, फार अन्नपाचक आहे. आनंद वाटतो. मूळव्याधीच्या विकारांत हितावह आहे. मुंबईसारख्या दाट वस्तीच्या ठिकाणीं अपचन, मलावष्टंभ जडून मलेरिया ...खीं विषें शरीरांत शिरतात, अशावेळीं याचा उपयोग अत्यंत फायदेशीर आहे.

थोडे अभिप्राय:—आपलें 'शौचास साफ' औषध अत्यंत गुणकारी असून त्याचे गुण पूर्णपणें प्रत्ययास येतात. वैद्य व डॉक्तर अगदीं जलाल औषधें वापरतात, त ऐवजीं आपलें औषध वापरल्यास अशक्तांसही फार फायदा होईल. म्यानेजर नवीन किताबखाना पुणें शहर. आपलें 'शौचास साफ' औषध मुंबईच्या मलेरियानें वर्षे खितपत पडलेल्या रोग्यास ३ आठवडे दिल्यानें सदर रोगी व्याधिमुक्त झाला, जाहिरातीवर विश्वास न ठेवणारांनीं १ डबा जरूर संग्रही ठेवावा; दत्तात्रय बाळकृष्ण सा रकर किरोली (सातारा) आपल्या 'शौचास साफ' औषधानें फार बरें वाटलें. मूळव्याधीच्या आजारांत फार उत्तम उपयोग झाला. रं. ना. शिरवाडकर वर्क कोर्ट पिंपळगांव बसवंत (नाशीक), आपली शौचास साफ करणारी औषधी फार उत्तम वाटली, मूळव्याधीच्या बिमारींत शौच साफ होऊन रक्त पडणें बंद झालें. रोज सक काहीं एक तखलिफ न होतां शौच साफ होऊन आराम वाटला; केशव राजेश्वर दीक्षित चामोरशी (चांदा) आपलें 'शौचास साफ' औषध बद्धकोष्ठतेवर राम आहे. मी पुष्कळ औषधें बोलाविली पण गुण नाहीं. आपल्या औषधानें गुण आला व आतां आपोआप शौचास साफ होतें. के. ए. मोरे टाकरखेड (अंजनगांव) अ 'शौचास साफ' औषध खरोखरच फार उत्तम आहे. तें कलियुगांतील रोग्यांस अमृतच समजलें पाहिजे. जे. आर. जयसिंगकार पदूर (यवतमाळ). आपलें 'शौ साफ' औषध इकडील लोकांस पसंत पडल्यानें वारंवार मागणी करावी लागते; जगन्नाथ नारायण पालघर (ठाणें).

व्ही. पी. [illegible] मागविण्याचा पत्ता—वैद्य परशराम महादेव माळशे, पोष्ट माखजन, जि. रत्नागिरी

संपादक–त्र्यंबक रघुनाथ देवगिरिकर
मुद्रक व प्रकाशक–शंकर नरहर जोशी, [illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funded by MoE-IKS

CC-0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi